वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।



चित्र क्र. १ : (पृष्ठ ८८१ पहा)

कै. श्री हरिशचंद्र पाटील यांचा 'गणपती'

नऊशे वर्षाचा

अमरावती शहराचा इतिहास

भाग पहिला व दुसरा
सचित्र

लेखक : भि. दे. कारंजकर

मूल्य ८० रुपये

शके १८९९ इसवी सन १९७८

अमरावती नगरपालिकेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त प्रकाशित

प्रथमावृत्ति खेरीज
बाकीचे सर्व हक्क लेखकाकडे

प्रथमावृत्ति, १९७८ इसवी

प्रकाशक :
श्री. दा. मुळे
मुख्याधिकारी
नगरपालिका, अमरावती.
जिल्हा अमरावती (महाराष्ट्र)

मुद्रक :
राजेन्द्रकुमार जैन
सुदीप प्रिंटर्स
भाजी बाजार, अमरावती.

पुणर प्रकाशित प्रत
नोव्हेबर(२०१६)वर्ष
मुद्रक :- सुयोग ऑफसेट,
अमरावती

विषयानुक्रम

भाग पहिला

पृष्ठ क्रमांक

१. **विषयानुक्रम** तीन ते सहा

२. **चित्र–सूची** सात ते चौदा

३. **प्रकाशकाचे दोन शब्द** पंधरा ते अठरा

४. **लेखकाचे निवेदन** एकोणवीस ते एकोणतीस

५. **कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे यांचा आशीर्वाद...** एकतीस

६. **मान्यवर व्यक्तींचे अभिप्राय** बत्तीस ते अडोतीस

- डॉ. एम्. बी. देवपुजारी
- इतिहासज्ञ सेतू माधवराव पगडी
- इतिहासाचार्य प्रा. ग. ह. खरे
- डॉ. अ. ना. देशपांडे, नागपूर व डॉ. शं. गो. तुळपुळे, पुणे

७. **अर्पण–पत्रिका** एकोणचाळीस

८. **प्रकरण पहिले** : नाम व्युत्पत्ति...प्राचिनत्व...अकरावे शतक... औरंगजेबाची सनद...विद्वानाची वस्ती...भोसल्यांची उमरावती प्राचीन व पौराणिक काळ.....रुक्मिणी हरणाची कथा..... कुंडिनपूर नगर...भौगोलिक स्थिती.....कसबे उमरावती...पेठ उमरावती. परिशिष्ट क्र. १. १ ते ३३

९. **प्रकरण दुसरे** : उमरावतीकर भोसले...पूर्व पीठिका...रूपाजी भोसले.....परसोजी भोसले. राणोजीची कामगिरी व सवाई संताजी पदवी...दिल्ली मोहिम...माळव्याचे स्वारीत...बुंदेल खंडाचे स्वारीत.....दिल्लीचे स्वारीत.....वसईची मोहीम.... निर्वासितांना आश्रय...राणोजीची वतने, सरंजाम वगैरे...रघूजी व राणोजीची कान्होजीवर स्वारी.....राणोजीचा मृत्यू..... अमरावतीकर भोसल्याची वंशावळ.....जिजाजी भोसले कुंभारीची लढाई.....उमरावतीस दंड.....उमरावतीकर शिवाजी भोसल्याचे बंड.....शेवटचे उमरावतीकर भोसले... श्रीमंत माधवराव पेशवे उमरावतीत...वेलस्लीची उमरावतीत छावणी.....उमरावतीत इंग्रजांच्या पलटणी. परिशिष्ट क्र. १. (दस्तावेज १ ते २०) ३७ ते ८२

१०. **प्रकरण तिसरे** : १९ व्या शतकातील उमरावती..... ठग व पेंढाऱ्यांचा उपद्रव. उमरावती शहरावर चित्तू पेंढाऱ्याचा हल्ला. नंतरही बंदोबस्त नाहीच.....माल टेकडी.....उमरावतीचा परकोट...खुनारी खिडकी. आठवडी बाजार...राजा बिशनचंद यांची हवेली.....दुष्काळ आणि शेठ धनराज यांची हत्या... उमरावती टांकसाळ...उमरावतीचे शेटे...निजामाचे काळातील वऱ्हाड.....उमरावती आशिया खंडातील कापसाची मुख्य पेठ बनते.....उमरावतीचा कापूस व्यवसाय.....उमरावती कॉटन यार्ड. कॉटन मार्केटची सुरुवात.....कॉटन मार्केट हटविण्याची योजना...मँचेस्टरमध्ये ख्याती प्राप्त 'उमरावती कॉटन'...प्राचीन कापूसभूमि 'वऱ्हाड'.....परिशिष्ठ क्र. १ ते ११. ८५ ते १७२

११. **प्रकरण चवथे** : इंग्रजी अमदानीची सुरुवात.....वऱ्हाडच्या पहिल्या कमिश्नरची कचेरी उमरावतीला.....उमरावतीचा पहिला डेप्युटी कमिश्नर.....राजधानीचा मान.....उमरावती जिल्हा झाला.....१८५७ चे बंडात उमरावती...दळण वळणाचे क्षेत्रात क्रांती...टपाल सेवा.....चलनी नोटा...पहिली बँक... टाऊन म्यु. कमेटी.....उमरावती १८६७ ते १८७० ..... उमरावतीची पहिली मराठी प्रा. शाळा...उमरावतीचे पहिले हायस्कूल...नेटिव्ह जनरल लायब्ररी...वकीली धंद्याचा उदय... कॅम्प म्युनिसिपॅलिटी...इ. सन १८९६ चा भयंकर दुष्काळ... उमरावतीचा पहिला भूक मोर्चा.....इंडियन नॅशनल काँग्रेसचे तेरावे अधिवेशन...लोकमान्य टिळकांच्या अभिनंदनाची सभा... उमरावतीची पहिली गायन शाळा.....पहिली संगीत नाटक मंडळी...पहिला सार्वजनिक गणेशोत्सव.....१९ व्या शतकांतील वाहने. घंटाघर.....जुनी कोतवाली.....इंद्रभुवन थिएटर... नेकोलेट पार्क...इत्यादी...परिशिष्ठ क्र. १ ते ५. १७५ ते २७७

१२. **प्रकरण पांचवे** : भारतीय असंतोषाचे जनक उमरावतीत... कारोनेशन मंडपाची होळी.....टाईल भट, तिखे व खापर्डे... टिळकांना मानपत्र...उमरावतीत पुन्हा प्लेगचा कहर...राष्ट्रीय शाळेची सुरुवात, बाल गंधर्व उमरावतीत ..... व्यायामाचार्य दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी.....कादंबरीकार आपटे... २८१ ते ३५७

इतिहासाचार्य राजवाडे. उमरावतीचे परकोट प्रकरण..... दादासाहेब खापर्डेचे सभासदत्व रद्द.....उमरावतीची पहिली राजकीय अटक...उमरावतीच्या कलावंतिणी...बाबू अरविंद घोष उमरावतीत...खापर्डेचे इंग्लंडला प्रयाण...राक्षसी महत्वाकांक्षा दे. भ. स्वामी शिवानंद.....१९१८ चा एन्फ्ल्यूएंझा..... जालियानवाला बागेचे हत्याकांड; उमरावतीत हरताळ..... परिशिष्ठ क्र. १ ते ४

१३. **वस्तूंच्या किंमती, कोष्टके वगैरे.** ३६१ ते ३६८

भाग दुसरा

१४. इसवी सन १९२० (परिशिष्ठ क्र. १) ३६९ ते ४०४
१५. इसवी सन १९२१ (परिशिष्ठ क्र. १) ४०५ ते ४४९
१६. इसवी सन १९२२ ४५१ ते ४६१
१७. इसवी सन १९२३ ४६३ ते ४८३
१८. इसवी सन १९२४ ४८५ ते ४९८
१९. इसवी सन १९२५ ४९९ ते ५२०
२०. इसवी सन १९२६ ५२१ ते ५५१
२१. इसवी सन १९२७ ५५३ ते ५७७
२२. इसवी सन १९२८ (परिशिष्ठ क्र. १) ५७९ ते ५९९
२३. इसवी सन १९२९ ६०१ ते ६२३
२४. इसवी सन १९३० (परिशिष्ठ क्र. १ ते ३) ६२५ ते ७००
२५. इसवी सन १९३१ (परिशिष्ठ क्र. १ व २) ७०१ ते ७५०फ
२६. इसवी सन १९३२ ७५१ ते ८०९
२७. **विशेष परिशिष्ठें :** ८११ ते ८९२

१. श्री अंबादेवी संस्थान, उमरावती.
२. उमरावतीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन.
३. उमरावतीचा शिराळशेट उत्सव व यात्रा.
४. उमरावतीची वृत्तपत्र – सृष्ठि.
५. परमहंस श्री जनार्दन स्वामी.

६. वै. श्री. नारायण गुरु.
७. 'देवकी नंदन गोपाला'
८. ह. भ. प. जयरामबाबा विवरेकर.
९. कै. मृगेंद्रशंकर स्वामी.
१०. उमरावतीचे 'स्त्री–जीवन'.
११. डफरिन हॉस्पिटल.
१२. श्री लक्ष्मीनारायण मंदिर.
१३. श्री. हरिश्चंद्र पाटील यांचा 'गणपती
१४. मराठी 'नार्मल स्कूल' उमरावती.

२८. व्यक्ती सूची, संस्था वगैरे (INDEX) ८९३ ते ९४९
२९. शुद्धि पत्र ९५० ते ९५६
३०. संदर्भ–ग्रंथ ९५७ ते ९६०
३१. पहिल्या व दुसऱ्या भागाचा उपसंहार ९६१ ते ९६२

○ चित्र-सूची ○

– प्रकरण पहिले –

चित्र क्रमांक		संबंधीत पृष्ठ क्रमांक
	लेखक, नगराध्यक्ष व माजी उपाध्यक्ष	
१)	श्री. हरिश्चंद्र पाटील यांचा 'गणपती'	८८१
२)	अमरावतीची 'नगर देवता' श्री अंबादेवी	८१३
३)	अंबादेवी मंदिराचे शिखर	
४)	अंबादेवी मंदिराचे महाद्वार व दर्शनी भाग	
५)	श्री एकवीरा देवी (मोठी अंबा)	१२
६)	जैन मूर्ती श्री ऋषभनाथ	८
७)	जैन मूर्ती श्री अजितनाथ	
८)	श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर (रुखबदेव संस्थान भाजीबाजार)	९
९)	श्री दिगंबर जैन मंदिरातील लाकडी कोरीव कामाचा नमुना	
१०)	जुम्मा मस्जिद, मजरे औरंगपूर	११
११)	(चित्र रद्द करण्यांत आले)	
१२)	श्री एकबीरा मंदीराचा दर्शनीभाग व शिखर	
	– उमरावतीची मानचित्रे –	
१३)	इ. स. १६५८ ची उमरावती	
१४)	इ. स. १७२२ नंतरची उमरावती	
	– प्रकरण दुसरे –	
१५)	वसईचा किल्ला	४९
१६)	राणोजीच्या सनदा	६७
१७)	राणोजीच्या सनदा	
१८)	श्रीमंत माधवराव पेशवे	६४-६५
	– प्रकरण तिसरे –	
१९)	निजामाचे सैनिक	८८
२०)	निजामाचे पोलिस	,,
२१)	ठगांची टोळी	८५, १५३-५४
२२)	पेंढारी : सामान्य वेषात	८९
२३)	उमरावतीचा तत्कालीन मुख्य बाजार सक्करसाथ : नव्या स्वरूपात	९३
२४)	निजाम शिकंदरजहाँ (१८०३-१८२९)	८९

२५)	उमरावतीचा तत्कालीन मुख्य कापड बाजार : जुना बजाजा	
२६)	अंबागेट : शहराचा पूर्व दरवाजा	११२
२७)	नागपूरीगेट : शहराचा उत्तर दरवाजा	,,
२८)	खोलापूरीगेट : शहराचा पश्चिम दरवाजा	,,
२९)	महाजनपूरीगेट : शहराचा दक्षिण दरवाजा	,,
३०)	भुसारीगेट : हल्लीचा जवाहर गेट	,,
३१)	मालटेकडी	११४
३२)	खुनारी खिडकी	,,
३३)	राजा बिशनचंद यांची हवेली	११६
३४)	बिशनचंद हवेलीतील भव्य दिवाणखाना	
३५)	शेटच्याची हवेली	११९
३६)	निजाम नासिरुद्दौला आसफजहाँ (१८२९–१८५७)	१२७
३७)	छत्रपुरी लोकांचे धार्मिक स्थळ 'लाला हरदौल मंदिर'	१२४
३८)	उमरावतीचा कापूस बाजार	१२८
	– प्रकरण चवथे –	
३९)	श्री विठ्ठलगीर बोवा उर्फ विठ्ठलानंद सरस्वती	१८३
४०)	उमरावतीचे रेल्वे स्टेशन	१८५
४१)	स्टेशनचा प्लॅटफार्म	
४२)	स्मॉलकॉज कोर्टाची इमारत	१८५
४३)	तहसील कचेरी, उमरावती	,,
४४)	कमिश्नर कचेरी (हल्लीचे कलेक्टोरेट)	,,
४५)	जुनी बँक बिल्डिंग, धनराज लेन (दर्शनी भाग)	१९१
४६)	उमरावती टाऊन म्यु. कमेटीची इमारत	१९४
४७)	श्रीनारायण रामबिलास चाळीचा एक भाग (वकील लाईन)	,,
४८)	हिंदु हायस्कूल, वलगाव रोड	२०५
४९)	हिंदु हायस्कूलची पूर्वीची इमारत	,,
५०)	नेटिव्ह जनरल लायब्ररी (हल्लीचे नगर वाचनालय)	२०७
५१)	रावसाहेब अण्णासाहेब तळवलकर	२०५
५२)	महर्षि अण्णासाहेब पटवर्धन व लो. टिळक	२०७
५३)	उमरावती बाररूम १८९५ ते १९०० इसवी	२१३
५४)	उमरावती बाररूमची इमारत	
५५)	निजाम शाहीतील कोर्टाचा देखावा	

५६) डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन्स् कोर्टाची इमारत
५७) उमरावतीची जलदेवता : छत्रीतलाव २१६
५८) छत्री तलावाचे आणखी एक दृष्य
५९) वडाळी तलाव २१९
६०) वडाळी तलावाचा स्विमिंग पूल (बागवे स्विमिंग पूल)
६१) वऱ्हाडातील भीषण दुष्काळ : लोकांची झालेली दुर्दशा २२३–२४
६२) दुष्काळाने गुरे ढोरे मेली माणसे तिफण ओढत आहेत.
६३) दुष्काळाने मानवाची केलेली दुर्दशा
६४) सर सी. शंकरन् नायर
इंडियन नॅशनल काँग्रेसच्या, १३ व्या,
उमरावती अधिवेशनाचे अध्यक्ष २३०
६५) श्री. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे २२८
इंडियन नॅशनल काँग्रेसच्या १३ व्या,
उमरावती अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष
६६) सर मोरो विश्वनाथ उर्फ अण्णासाहेब जोशी, वकील ,,
६७) रावबहादूर रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकर, वकील ,,
६८) श्री. प्रल्हाद नारायण उर्फ दादासाहेब जोग, वकील ,,
६९) सर मोरोपंत यांचा बंगला
(या बंगल्याचे आवारात काँग्रेस अधिवेशन भरले होते.) २३३
७०) काँग्रेसच्या उमरावती अधिवेशनाला
आलेले काही प्रमुख प्रतिनिधि
७१) डॉ. ॲनी बेझंट बाई, बी. पी. वाडिया व अरुंडेल २५२–५३
७२) श्री. गोपाळराव उर्फ बाबासाहेब बेडेकर २५४
(उमरावतीकर संगीत नाटक मंडळीचे संस्थापक)
७३) घंटाघर (क्लॉक टॉवर) २५५
७४) जुनी कोतवाली २५६
७५) इंद्रभुवन थिएटर : दर्शनी भाग २५७
७६) गंभीरपूर हनुमान संस्थान २५८
७७) गंभीरपूर हनुमान मंदिर
७८) गणेश थिएटर (नव्या स्वरूपातील हल्लीचे प्रभात) २५९

– प्रकरण पांचवे –

७९) खापर्डे वाड्यातील मुक्कामात लो. टिळक सोबत दादासाहेब खापर्डे २८१

८०) लोकमान्य टिळक व दादासाहेब खापर्डे २८१
८१) चित्र रद्द केले
८२) प्लेगच्या काळातील क्वॉरंटाईन कॅम्प २९३
८३) संत श्री गुलाबराव महाराज २९६
८४) श्री. नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व (स्त्री वेषात) ३०५
८५) व्यायामाचार्य श्री. दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी ३०६
८६) उमरावतीच्या परकोटाचे एक दृष्य ३१८–१९
८७) बाबू अरविंद घोष (१९०८) ३२७
८८) बादशहा पंचम जॉर्ज व महाराणी मेरी ३३१
८९) कारोनेशन गार्डन (हल्लीचा कस्तुरबा बाग) ३३४
९०) देशभक्त स्वामी शिवानंद ३३६
९१) श्री. वाय्. जी. उर्फ अण्णासाहेब देशपांडे वकील, अंजनसिंगीकर ३४५
† ९२) जालियानवाला बागेतील हुतात्मा स्मारकाचे रेखाचित्र ३४८
९३) होमरुल लिगचा ध्वज ३५७

भाग दुसरा

९४) इंडियन नॅशनल काँग्रेसच्या डेलिगेशनचे ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांसह घेतलेले छायाचित्र ३६९
९५) ब्रिटिश पार्लमेंटचे महाद्वारा समोर, इंडियन नॅशनल काँग्रेसचे डेलिगेशन ३६९
९६) श्री. दादासाहेब खापर्डे यांना उमरावतीकर जनतेने दिलेले मानपत्र ३६९
९७) संदेश' कार श्री. अच्युतराव कोल्हटकर ३७३
९८) लोकमान्य बाळगंगाधर टिळक ३८५
९९) महात्मा गांधी (१९२१) ४१४–१५
१००) दे. भ. वीर वामनराव जोशी व दे. भ. नानासाहेब बामणगावकर ४२०–२१
१०१) स्वामी श्रद्धानंदजी ४५१
† १०२) परदेशी कापडाची होळी ४३७
१०३) श्री. जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे, वकील ४५५

१०४) क्रांतीकारक सरदार पृथ्वीसिंह ४५७
†१०५) दे. भ. चित्तरंजनदास ४५६
१०६) विदर्भ साहित्य संघाचे पहिले अधिवेशन ४६३
१०७) किंग एडवर्ड कॉलेज (विदर्भ महाविद्यालय, अमरावती) ४७२
१०८) प्रिंसिपॉल मि. एफ्. पी. टॉस्ट्विन्
(१९२३ ते १९४१) किंग ए. कॉलेज ४७२–७३
१०९) श्री. वामनराव मोहरीर ४८२
११०) श्री. बा. ग. उर्फ बाबासाहेब खापर्डे ४८२
१११) बॅरि. रा. मा. उर्फ अण्णासाहेब देशमुख ४८२
११२) श्री. मा. श्री. उर्फ बापूजी अणे ४८२
११३) श्री. यादव माधव काळे (वऱ्हाडचा इतिहास'कर्ते)
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ परिषद १९२४ ४८९
११४) दे. भ. पं. मोतीलालजी नेहरु ५११
११५) जगप्रसिद्ध गामा पहेलवान ४९९–५००
११६) महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा ५१५–१६
११७) श्री. काशिराव बापू देशमुख ५१६
११८) डॉ. शिवाजीराव पटवर्धन (१९२६) ५२७
११९) प्रख्यात गवई श्री. नामदेवबुवा जोशी ५२९
१२०) कै. नामदेवबुवांचे शिष्य श्री. नथ्थुबुवा ५२९
१२१) न्यु हायस्कुलच्या प्रयोग शाळेचे ना. गव्हर्नरांचे हस्ते उद्घाटन. ५४१
१२२) बॅरि. पंजाबराव देशमुख ५४१
१२३) सिंघई, पन्नालाल बन्सीलाल ५४३
†१२४) हिंदु हायस्कुल ५४५
१२५) महात्मा गांधी यांचे हस्ते हनुमान व्यायाम शाळेच्या
इमारतीचे उद्घाटन. ५४९
१२६) महात्मा गांधी (१९२७) ५५५
१२७) श्री. त्र्यं. ल. उर्फ दादासाहेब शेवडे, वकील ५६०–६१
†१२८) पंजाब केसरी दे. भ. लाला लजपतरॉय ५५९
१२९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उमरावतीतील पुतळा ५६८
१३०) श्री. नानासाहेब अमृतकर, वकील ५१६
†१३१) डॉ. शिवाजीराव पटवर्धन ५८५
१३२) उमरावतीचे इरविन् हॉस्पिटल ५८७

१३३)	दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस आणि श्री. दादासाहेब खापर्डे	५९०–९१
१३४)	म्युनिसिपल ए. व्हि. स्कूलची इमारत	५९०–९१
१३५)	बॅरि. इ. एम्. जोशी	५९६–९७
†१३६)	वऱ्हाड जमीन महसूल कायद्याचे व्यंगचित्र	५९५
†१३७)	सरदार भगतसिंग व बटुकेश्वर दत्त	६०८
†१३८)	कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे	६१०
†१३९)	हुतात्मा यतिंद्रनाथ दास	६१२
१४०)	कविभूषण श्री. बलवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे	
१४१)	यांची दोन दुर्मिळ छायाचित्रे	६०९
१४२)	दे. भ. पं. मदन मोहन मालवीय	६०५
१४३)	दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस	६१८
†१४४)	श्री. श्रीपाद बळवंत उर्फ तात्यासाहेब तांबे (मध्यप्रांत–वऱ्हाडचे पहिले हिंदी गव्हर्नर)	६१७
†१४५)	उमरावती नगरपालिकेवर बाबू सुभाषचंद्र यांचे हस्ते राष्ट्रध्वज फडकला	६२० ६२०
१४६)	उमरावतीचा पहिला स्वातंत्र्यदिन दि. २६ जाने. १९३०	६३१
†१४७)	दे. भ. पं. जवाहरलालजी नेहरू	६३४
१४८)	उमरावतीत मिठाचा सामुदायिक कायदेभंग	६३६–३७
१४९)	दे. भ. वीर वामनराव जोशी	६४१
१५०)	दे. भ. हरिहरराव देशपांडे व दे. भ. वीर वामनराव दादा : एका सत्याग्रही शिबिरात	४४ ४४
१५१)	दे. भ. डॉ. शिवाजीराव पटवर्धन आणि दे. भ. डॉ. सोमण यांना अटक	६४८
१५२)	वडाळी जंगल सत्याग्रहाचे सेनापती डॉ. भोजराज	६५०
१५३)	दे. भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले	६६०
१५४)	हुतात्मा श्री. लक्ष्मणराव पाचघरे	६६२
१५५)	उमरावतीची शूर महिला सौ. पार्वतीबाई पटवर्धन	६६५
१५६)	सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, देशसेविका संघाच्या अध्यक्ष	६५
१५७)	दे. भ. दत्तात्रय रामराव उर्फ अण्णासाहेब कलोती, वकील	७०
१५८)	उमरावती जिल्हा सत्याग्रही दल	६७७
१५९)	स्वयंसेवक कै. श्री. हनुमंत भीमराव पतकी	६७८

१६०) दे. भ. वैद्य पं. दा. मुळे आणि लोकनायक श्री. बापूजी अणे ६७७
१६१) कै. श्री. केशवराव शालिग्राम ६७८
१६२) श्री. विठ्ठल बंधूजी चौबळ, वकील ६९१
१६३) बॅरि. डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख ६९१
१६४) हुतात्मा श्री. राजगुरू ७१७
१६५) शहीदेआजम सरदार भगतसिंग ७१७
१६६) विदर्भ प्रांतिक महिला परिषद ७३६–३७
अधिवेशन पहिले; अमरावती
†१६७) दे. भ. पं. मोतीलालजी नेहरू ७०९
१६८) विदर्भ युवक संघाचे सर्वाधिकारी
श्री. पी. वाय्. देशपांडे, वकील ७५३
१६९) दे. भ. त्र्यंबकराव जोशी ७४५
१७०) दिवाणबहादूर के. वा. उर्फ नानासाहेब ब्रम्ह, वकील ७९३
१७१) सीमोल्लंघनास निघालेली अंबादेवीची पालखी ८१३
१७२) उमरावतीची नवरात्र जत्रा ८१३
†१७३) विदर्भ महिला परिषद, अधिवेशनाच्या
स्वागताध्यक्ष, अध्यक्ष व चिटणीस ७५१
१७४) मराठी रंगभूमि शताब्दि महोत्सवाचे अध्यक्ष ८२३
श्री. मामासाहेब वरेरकर ८२३
१७५) शिराळशेटीची मूर्ती ८२८
१७६) प्रमोद सिंधूचे संपादक श्री. रामभाऊ केसकर वगैरे. ८३२
१७७) 'सत्यप्रकाश' अंकाचे छायाचित्र ८३१
१७८) 'इंद्रधनुष्य' चे संपादक प्रो. कृष्णमूर्ती ८३६
१७९) श्री. नारायण गुरू ८४१
१८०) संत श्री गाडगे महाराजांचा पुतळा ८४५
१८१) ह. भ. प. जयरामबाबा विवरेकर ८४७
१८२) वनिता समाजाच्या संस्थापक लेडी सौ. यशोदाबाई जोशी ८५५–५६
१८३) इ. सन १९१२ मधील उमरावतीच्या स्त्रियांची वेषभूषा
(एका समारंभाचे छायाचित्र)
१८४) सौ. लक्ष्मीबाई खापर्डे ८६३
उमरावतीच्या पहिल्या नगर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा
१८५) श्रीमती गीता साने ८६४

१८६)	सौ. विमलाबाई देशमुख	८६५, ८६८
१८७)	श्री हरिश्चंद्र पाटील यांचा 'गणपती' (इ. सन १९११ मधील छायाचित्र)	८८१
१८८)	कै. श्री. हरिश्चंद्र पाटील	८८१
१८९)	उमरावतीच्या मराठी नार्मल स्कूलची इमारत	८८७
१९०)	नार्मल स्कूलचे प्रिंसिपॉल श्री. गोखले	८९१
१९१)	,, ,, श्री. जोशी	
१९२)	,, ,, श्री. ओक	

† अशा चिन्हांनी दर्शविलेली चित्रे मजकुरासोबत आहेत.



(श्री. श्री. दा. मुळे)

प्रकाशकाचे दोन शब्द

अमरावती नगरपालिकेचे स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त विविध कार्यक्रमानिशी शताब्दी महोत्सव साजरा करावा आणि त्यावेळी अमरावती नगरपालिकेचा शंभर वर्षाचा इतिहास आणि आणखी काही लेख स्मरणिकेच्या रूपाने प्रकाशित करावे असे १९७३ मध्ये ठरविण्यात आले होते व त्या दृष्टीने त्यावेळी तयारी सुरू झाली होती. परंतु पुढे विविध अडचणीमुळे वर्षभर आणि नंतर १९७४ मध्ये म्यु. निवडणुकीचे वारे सुरू झाल्या कारणाने शताब्दी महोत्सव होऊ शकला नाही.

इ. सन १९७४ मध्ये म्यु. निवडणुका पार पडल्या. नव्या बॉडिने दि. १७ दिसेंबर १९७४ रोजी नगरपालिकेची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर १९७५ साली पुन्हा शताब्दी महोत्सवाची कल्पना पुढे आली.

त्यावेळी, आमच्या नगरपालिकेचे गेली ३५ वर्षे सभासद असलेले श्री. भि. दे. उर्फ बापूसाहेब कारंजकर हे अमरावती शहराचा इतिहास लिहीत असल्याचे आमचे कानी आले व शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने या शहराचा ९०० वर्षाचा इतिहास प्रसिद्ध करणे जास्त उचित ठरेल असे ठरल्यावरून, त्यांनी हा इतिहास शक्य तितक्या लवकर पूर्ण करावा असा आम्ही त्यांना आग्रह केला.

इतिहास आणि तोही संशोधित इतिहास लिहायचा, म्हणजे हे काम किमान ५–१० वर्षे चालणार. तसे त्यांनी आम्हाला सांगितलेही. पण 'शक्यतो लवकर तयार करा आम्ही प्रसिद्ध करू' असा शब्द आम्ही त्यांना दिला.

वास्तविक श्री. कारंजकर हे डोळ्याच्या विकाराने १९७२ पासून आजारी होते व १९७३ मध्ये त्यांची दृष्टी फार अंधू झाल्याने ते सार्वजनिक व राजकीय कार्यातून एक प्रकारे निवृत्त होऊन, घरी वेळ घालविण्यासाठी हा इतिहास लिहिण्याचा छंद त्यांनी लावून घेतला होता. त्यासाठी टिपणे घेण्याचे त्यांचे काम सतत चालू होते. आमचे आग्रहामुळे त्यांनी या कार्याचा वेग वाढविला. प्रो. मदन भट्ट व पुढे प्रा. मा. ल. व्यवहारे यांना त्यांनी मदतीला घेतले. १९७५ चे सुरुवातीला त्यांच्या एका डोळ्यावर शस्त्रक्रिया होऊन, आवश्यक विश्रांती नंतर त्यांनी या इतिहास लेखनाचे कामाला आणखी वेग दिला आणि सुमारे साडे तीन वर्षे खपून परिश्रमपूर्वक अमरावती शहराचा सुमारे नऊशे वर्षांचा इतिहास त्यांनी लिहून काढला, परंतु या इतिहासाचे फक्त दोन भागच या ग्रंथ रूपाने प्रसिद्ध होत आहेत, कारण वर म्हटल्याप्रमाणे हे काम ५–१० वर्षाचे आहे. अती परिश्रम घेऊन हे दोन भाग शताब्दी महोत्सवाचे वेळी प्रसिद्ध करण्यासाठी त्यांनी तयार करून दिलेत. तिसरा भाग थोडा सवडीने प्रसिद्ध होईल. त्यामुळे या ग्रंथात अकराव्या शतकापासून तो इ. सन १९३२ पावेतोची अमरावती शहराची राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक माहिती आलेली आहे. श्री. कारंजकर यांनी या ग्रंथ लेखनासाठी किती परिश्रम केले याची कल्पना हा ग्रंथ वाचणाराला सहज व्हावी.

सर्वदूर परिचित असलेले श्री. बापूसाहेब कारंजकर इ. सन १९४३ पासून तो आजतागायत या नगरपालिकेचे सातत्याने सभासद आहेत. गेली २५–३० वर्षे ते विरोधी पक्षाचे नेते म्हणून ओळखले जातात, परंतु त्यांच्या स्वार्थत्यागी जीवनामुळे मतभिन्नतेनंतरही सर्व पक्ष आणि विचारांच्या लोकांना त्यांचे बद्दल आदर वाटतो. विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांनी नगरपालिका गाजविली आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सबंध विदर्भात, प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यातच जोरात होती, याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. कृषी विद्यापीठ आंदोलन, महागाई विरोधी चळवळी आणि कित्येक

नागरी चळवळीचे त्यांनी नेतृत्व केले आहे. दुर्दैवाने १९७२ नंतर त्यांचे दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू होऊन व पुढे त्याचा प्रकृतीवर परिणाम होऊन त्यांना एक प्रकारे सार्वजनिक व राजकीय जीवनातून अंग काढून घ्यावे लागले, परंतु सतत कार्यमग्न असलेल्या माणसाला रिकामपणा फार जाचक ठरतो. त्यातूनही त्यांनी मार्ग काढला आणि अशा एका विषयात लक्ष केंद्रित केले की ते काम किमान १० वर्षे त्यांना वेळ घालविण्याचे उत्तम साधन ठरावे. तो विषय म्हणजे आपली जन्मभू आणि कर्मभू असलेल्या अमरावती नगरीचा हजार वर्षाचा इतिहास. पण त्यांच्या या छंदामुळे अमरावतीच्या जनतेला आपल्या गावची हजार वर्षाची अज्ञात माहिती उपलब्ध झाली हे श्री. कारंजकरांचे ऋण अमरावतीची जनता कधीही विसरणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

त्याचप्रमाणे हा हजार पानाचा व हजार वर्षांचा इतिहास शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने प्रसिद्ध करण्याचे मोलाचे कार्य अमरावती नगरपालिकेने केले त्याबद्दल या नव्या बॉडीला, नगराध्यक्ष श्री. हरिभाऊ कलोती आणि त्यांचे सहकारी सर्व म्यु. सभासदांना, अमरावतीकर जनता या कामाबद्दल दुवा दिल्या शिवाय राहणार नाही.

अमरावतीसारख्या गावाचा हजार वर्षांचा इतिहास परिश्रमपूर्वक (तेही डोळे चांगले नसताना) संशोधून काढून तयार करणे यासाठी श्री. कारंजकर यांना जसे नागरिक धन्यवाद देतील तद्वतच हा प्रचंड इतिहास ग्रंथरूपाने जनतेला देण्याचे जे धाडस व औचित्य अमरावती नगरपालिका, तिचे अध्यक्ष व सभासद यांनी दाखविले त्याबद्दल त्यांनाही जनता धन्यवाद देईल.

या ग्रंथ निर्मितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या साहित्य-संस्कृति मंडळाने अनुदान देण्याचे तत्त्वत: मान्य केले आहे. त्यामुळेच या प्रचंड ग्रंथाची किंमत सवलतीची ठेवणे शक्य झाले. त्याबद्दल आम्ही महाराष्ट्र शासनाचे ऋणी आहोत.

या ग्रंथ निर्मितीसाठी कित्येक व्यक्तींनी व संस्थांनी मदत केली आहे, त्या सर्वांचा नामनिर्देश न करता त्यांचे नगरपालिकेचे वतीने मी आभार मानतो.

सुदीप प्रेसचे चालक श्री. जैन यांनी हे ग्रंथ छपाईचे काम सुबक करून दिले त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या प्रेसच्या कर्मचाऱ्यांचे आम्ही आभारी आहोत.

आमचे माहितीप्रमाणे सबंध भारतात, दिल्ली, बनारस आणि मुंबई अशी काही थोडी इतिहास प्रसिद्ध मोठी शहरे सोडलीत तर एका लहान गावचा (अमरावती अलीकडे मोठे शहर झाले) असा दीर्घकालीन संशोधित इतिहास म्हणजे श्री. कारंजकर यांनी लिहिलेला हा अमरावती शहराचा इतिहासच होय. हा नवा उपक्रम लेखकाने केला याबद्दल इतिहासज्ञ श्री. सेतु माधवराव पगडी यांच्या सारख्यांनीही प्रशंसोद्गार काढले आहेत. हा श्री. बापूसाहेब कारंजकर यांच्या या इतिहास लेखनाच्या यशस्वीतेचा मोठाच पुरावा आणि गौरवही होय असे मला वाटते.

या ग्रंथाबद्दल चोखंदळ वाचकांनी आपले अभिप्राय जरूर आमचेकडे पाठवावेत. त्यामुळे या ग्रंथातील उणीवा व उपयोगिता तर कळेलच पण या ग्रंथाचा १९३३ ते १९४७ या कालखंडातील जो इतिहास अजून लिहायचा राहिला तो लिहिण्यास व प्रकाशित करण्यास प्रोत्साहन देखिल मिळेल.

अमरावती.
दि. १४ जानेवारी १९७८

श्री. दा. मुळे
प्रकाशक
मुख्याधिकारी
नगरपालिका, अमरावती.



(श्री. भि. दे. कारंजकर)

लेखकाचे निवेदन

केल्याने होत आहे रे
आधी केलेच पाहिजे – रामदास

'अमरावती शहराचा इतिहास' यासारखा एकदा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा प्रसंग माझ्यावर कधी काळी येईल याची मला कल्पनाही नव्हती. गेली २५–३० वर्षे संघर्षमय जीवन व्यतित केल्यामुळे आपल्या हातून असा एकदा ग्रंथ लिहून होईल ही कल्पना पुसटपणे देखिल मनात येणे शक्यच नव्हते. मात्र विविध प्रकारची जुनी नवी माहिती, कात्रणे, लेख (त्यात अमरावतीची जुनी माहिती) इत्यादींचा संग्रह करण्याचा व वाचनाचा माझा छंद जुनाच आहे. शिवाय इ. सन १९५० ते १९६० या काळात साप्ताहिक 'संघर्ष', साप्ताहिक 'ज्वाला', साप्ताहिक 'जागृत–वऱ्हाड' आदी साप्ताहिके व द्विसाप्ताहिके चालविण्याची जबाबदारी कारणपरत्वे मी सांभाळली असल्याने वृत्तपत्रास आवश्यक अशा विविध प्रकारच्या माहितीचा संग्रह करण्याचा व कात्रणे जमविण्याचा माझा छंद वाढीस लागला.

या सर्व माहितीचा उपयोग वेळी प्रसंगी मी केला तरी, ग्रंथ लिहिण्याचे दृष्टीने त्यांतील माहितीचा उपयोग होईल, याची मला कल्पना

नव्हती. परंतु गेल्या ५-६ वर्षांपूर्वी १९७२ चे सुमारास डोळ्यांनी एकाएकी कमी दिसायला लागले आणि हळूहळू, चालण्याफिरण्याचे दृष्टीने कठीण होऊ लागले. दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू झाल्याचे डॉक्टरांनी सांगीतले होतेच. स्वच्छ दिसत नसल्याने बाहेरील कामे बंद पडली आणि जवळ जवळ घरी बसण्याचा प्रसंग आला. सतत कार्यमग्न असलेल्या व्यक्तीवर असा प्रसंग म्हणजे मोठीच आपत्ती. शेवटी रिकामा वेळ घालविण्यासाठी जुनी कात्रणे, टिपणे, नोंदीच्या वह्या इत्यादी जमेल तसे चाळण्याचा कार्यक्रम सुरू झाला. त्यातूनच मला अमरावती शहराचा इतिहास लिहिण्याची कल्पना सुचली. इ. सन १९७३ मध्ये अमरावती नगरपालिकेचा शताब्दी महोत्सव करण्याचे ठरले व त्या निमित्ताने अमरावती नगरपालिकेचा १०० वर्षांचा इतिहास लिहून प्रसिद्ध करावा असे ठरविण्यात आले होते. त्यासाठी नगरपालिकेतील जुने रेकार्ड चाळून त्याची टिपणे घेण्यात आली होती. त्या टिप्पणीचा उपयोगही अमरावतीचे इतिहासाला होईल हे जाणून त्याच्या प्रतिलिपी मी घेतल्या. (पुढे हा शताब्दी महोत्सव लांबणीवर पडला.) मी ठरल्याप्रमाणे अमरावती शहरासंबंधी जेवढी म्हणून जुनी माहिती व टिपणे मिळवता आली ती मिळवून व एकत्र करून ठेवली आणि आणखी माहिती व त्यासाठी पुस्तके, ग्रंथ इत्यादी चाळणे चालू ठेवले. १९७४ मध्ये एका डोळ्याचा मोतीबिंदू पूर्ण झाल्याने त्या डोळ्याने दिसेनासे झाले व दुसऱ्या डोळ्याची दृष्टी बरीच मंद झाली, तेव्हा डोळ्याचे ऑपरेशन करण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. परंतु तोंडावर म्यु. निवडणुकी होत्या त्यामुळे निवडणुकी आटोपल्यानंतर फेब्रुवारी १९७५ मध्ये एका डोळ्याचे ऑपरेशन केले. पुरेशा विश्रांती नंतर चष्मा लावला त्यामुळे वाचता येऊ लागले. पण चष्मा लावल्यानंतर डोके दुखणे सुरू झाले आणि दुसरीकडे प्रकृतीवरही परिणाम झाला. जास्त वेळ घरात विश्रांती घेणे भाग पडले, पण त्याचा उपयोग संकल्पित अमरावतीचा इतिहास लिहिण्यासाठी करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यावरच मी सर्व लक्ष केंद्रित केले. थोड्या अवधीत या ग्रंथ लेखनाचे दृष्टीने जो अनुभव आला त्यावरून हे कार्य किमान ८ : १० वर्षे चालेल असा मी कयास केला होता. वेळ घालवण्यासाठी हा छंद बरा होता.

पुढे १९७५ मध्ये नगरपालिकेचा शताब्दी महोत्सव करण्याचे ठरविण्यात आले आणि या शताब्दीनिमित्ताने अमरावती शहराचा इतिहास प्रसिद्ध करणे जास्त समयोचित ठरेल असे वाटले वरून नगराध्यक्ष

श्री. हरिभाऊ कलोती आणि मुख्याधिकारी श्री. बाळासाहेब मुळे यांनी मला हा इतिहास लवकर पूर्ण करा असा आग्रह केला. त्याप्रमाणे मी या कार्यावर अधिक लक्ष केंद्रित केले. कच्चा आराखडा तयार केला, पण वर म्हटल्याप्रमाणे हे काम दीर्घ मुदतीचे असल्याने अगदी शिकस्त करूनही गेल्या सुमारे सव्वातीन वर्षात या इतिहासाचे दोन भाग तेवढे पूर्ण होऊ शकले.

इतिहास म्हटला म्हणजे तो सत्यच असला पाहिजे. काल्पनिक किंवा केवळ ऐकीव अशी माहिती इतिहासाला चालत नाही. त्यामुळे संशोधन करून, प्रत्येक घटनेला आधार देणे हे काम फार किचकट, दीर्घ काळाचे आहे. प्रत्यक्ष हा ग्रंथ वाचताना वाचकांस त्याची कल्पना येईलच.

या कामासाठी अमरावतीच्या व इतर ठिकाणच्या वाचनालयातील दुर्मिळ ग्रंथ, ऐतिहासिक दस्तावेज वगैरे आणि संशोधन मंडळातील ग्रंथ, कागदपत्रे, पुणे, हैद्राबाद व दिल्लीच्या सरकारी अभिलेखागारातील जुनी कागदपत्रे इत्यादींचा फार उपयोग झाला आहे. अमरावती नगर पालिकेतील जुनी कागदपत्रे, फाईल्स व प्रोसिडिंग बुके, सव्हेंसेटलमेंट रेकार्डस् वगैरे अनेक कागदपत्रांचे संशोधन करून त्याचा उपयोग करावा लागला आहे.

खालील संस्थांच्या वाचनालयातील संदर्भ ग्रंथांचा मी उपयोग केला आहे.

१. एशियाटिक सोसायटीची सेंट्रल लायब्ररी, मुंबई.
२. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
३. केसरी – मराठा संस्थेचे ग्रंथालय, पुणे.
४. महाराष्ट्र राज्य अभिलेखागार, पुणे.
५. आंध्र राज्य अभिलेखागार, हैद्राबाद.
६. राष्ट्रीय अभिलेखागार, दिल्ली.
७. विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.
८. राजाराम वाचनालय, नागपूर.
९. नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर.
१०. श्री समर्थ हायस्कूल, भारतीय महाविद्यालय, केसरबाई लाहोटी महाविद्यालय, शाहू हिंदी पुस्तकालय, अंबादेवी संस्थान ग्रंथालय आदी अमरावतीच्या संस्थांचे ग्रंथालये.

याशिवाय अमरावतीच्या इतिहासाची महत्वाची साधने म्हणजे कै. दादासाहेब खापर्डे यांची डायरी, चरित्र व खापर्डे रेकार्ड, कै. सर मोरोपंताचे चरित्र आणि इ. सन १९२० पासूनचे 'उदय' पत्राचे फाईल्स. अमरावती नगर पालिकेची इ. सन १८७० पासूनची प्रोसिडींग बुके व इतर कागदपत्रे, इ. सन १९२८ पासूनचे सर्व्हे-सेटलमेंट रेकार्डस्, अमरावती कॉटन मार्केट कमेटीचे जुने रेकार्ड यांचाही उपयोग केला आहे.

तसेच अमरावतीचे पत्रकार व जुने कार्यकर्ते श्री. रघुपतराव देशमुख, दे. भ. श्री. त्रिबक गुरुजी, श्री. गिरगावकर, श्री. सुदाम देशमुख, सौ. सीताबाई ब्रम्ह, श्री. रा. ब. खरे ॲडव्होकेट, श्री. गव्हाणे, श्री. वासुदेवराव खापर्डे, पंचशील विद्यालयाचे श्री. निंभोरकर, श्री. शिवचंद्रस्वामी माणूरकर, श्री. अण्णासाहेब देशमुख पाटील तारखेडा, या सर्वांनी या कार्यासाठी त्यांचे कडील पुस्तके व इतर माहिती उपलब्ध करून देऊन या कार्यास हातभार लावला आहे.

शिवाय सेन्सेस रिपोर्टस्, पोस्ट ऑफीस् गाईडस्, गॅझेटीयर्स, जुनी मासिके, वृत्तपत्रे, स्मरणिका, सनदा इत्यादींचा या कामी उपयोग झालेला आहे.

कै. श्री. टिकेकर मास्तर, श्री. लढके गुरूजी, श्री. कुळकर्णी मास्तर प्रा. मा. ल. व्यवहारे, श्री. उमदीकर वैद्य, श्री. हिर्लेकर इत्यादी व्यक्तींच्या आठवणींचा यांत प्रसंगोपात उपयोगही केलेला आहे.

सावणपुऱ्यातील जुम्मा मसजिदला इ. सन १६५८ साली औरंगजेब बादशहाने दिलेल्या सनदेचा अस्सल इंग्रजी तर्जुमा माझे, मित्र श्री. अब्दुल सत्तार, माजी उपाध्यक्ष अमरावती नगर पालिका, यांनी पुरविला तर, भाजी बाजारातील श्री दिगंबर जैन आदिनाथ मंदिराच्या पंच मंडळींनी व विशेषत: श्री भिसेकर गुरूजी यांनी, तेथील जुन्या मूर्तीची व त्या वरील कोरीव लेखाची माहिती दिली. श्री अंबादेवी संस्थानची जुनी प्रोसिडिंग बुके, संस्थानचे सेक्रेटरी श्री. भास्करराव ढोके यांनी पाहण्यासाठी उपलब्ध करून दिलीत. सर्व्हे सेटलमेंटचे रेकार्डचे बाबतीत श्री. लक्ष्मणराव हेडावू यांचे अमोल सहकार्य मिळाले आणि खापर्डे घराण्यातील एक उत्साही व नेहमी सहकार्यासाठी तयार राहणारे तरुण श्री. वासुदेवराव खापर्डे यांचे या ग्रंथासाठी जे सहकार्य मिळाले ते खरोखरच फार मोलाचे असे आहे. सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथाला आवश्यक अशी काही चित्रे माझे संग्रही होती पण तेवढ्याने काम भागण्यासारखे नव्हते. म्हणून आणखी चित्रे– विशेषत: दुर्मिळ चित्रे– मिळविण्याचा माझा सतत प्रयत्न चालू होता. श्री. वासुदेवराव खापर्डे यांनी काही महत्त्वाची दुर्मिळ चित्रे मला दिलीत. तसेच हैद्राबादहून काही चित्रे आणली. पुण्याच्या केसरी–मराठा ट्रस्ट या संस्थेकडून, तसेच पुण्याच्याच भरत नाट्य संशोधन मंडळाकडून आणि 'उदय' च्या फाईल्स मधून दुर्मिळ चित्रे मिळालीत. श्री. दे. भ. रतनलालजी काळे यांचेकडून, देवी संस्थानकडून, श्री. अण्णासाहेब देशमुख (तारखेडा) यांचेकडून, तसेच सौ. सीताबाई ब्रम्ह, श्री. किशोर देशपांडे, श्री. मोतीदासजी उदासी, श्री. नरेंद्र जयकृष्ण मुळे, बार रूम असोसिएशन, श्री. भीमरावजी देशपांडे वकील, हनुमान व्या. प्र. मंडळ, आणि अरबिंदो सोसायटी अमरावती आणि इतर अनेक ठिकाणाहून या बाबतीत चांगले सहकार्य मिळाले. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

या सर्व साधनांचा संकलित यथामती उपयोग करून हा अमरावती शहराचा इतिहास पुनः पुन्हा लेखन करून व त्यावर वारंवार संस्करणे करून आजच्या स्वरूपात तयार झाला आहे. या ग्रंथात अजूनही बऱ्याच उणीवा आहेत याची मला जाणीव आहे. ह्या उणीवा दूर करण्याचे काम बरेच श्रमाचे, खर्चाचे अन् काहीसे किचकटही आहे. एवढेच नव्हे तर ते दीर्घ मुदतीचेही आहे. निरपवाद इतिहास तयार करण्यासाठी दीर्घ परिश्रमाबरोबरच अनेकांचे सहकार्यही हवे आहे. असा प्रयत्न नव्या दमाच्या उत्साही तरूणांनी करावयास हवा. त्यांना या ग्रंथापासून स्फूर्ती मिळाली तरी मी केलेल्या परिश्रमाचे सार्थक झाले असे मी समजेन. एवढे प्रचंड कार्य एकट्याचे मात्र नाही.

हा ग्रंथ शक्य तितक्या लवकर तयार करून प्रसिद्ध करण्याची तात्कालिक प्रेरणा मात्र अमरावती नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या निमित्ताने मला मिळाली. हा उत्सव इ. सन १९७३ मध्येच व्हावयाचा, पण तो पुढे ढकलला गेला. या उत्सवप्रसंगी उमरावती शहराचा व नगर पालिकेचा इतिहास लिहून प्रसिद्ध करावा अशी एक औचित्यपूर्ण कल्पना पुढे आली.

जिज्ञासेपोटी ग्रंथ लिहिण्याच्या माझ्या मूळच्या इच्छेला अमरावती नगरपालिकेचे विद्यमान अध्यक्ष श्री. हरिभाऊ कलोती आणि मुख्याधिकारी

श्री. बाळासाहेब मुळे यांनी प्रोत्साहन दिले. नगरपालिकेच्या शताब्दी समारोह प्रसंगी केवळ नगरपालिकेचा गेल्या शंभर वर्षाचा इतिहास प्रसिद्ध न करता संपूर्ण अमरावती शहराचा सर्वांगीण इतिहास प्रसिद्ध करणे हे अधिक औचित्यपूर्ण ठरेल, एवढेच नव्हे तर तसे केल्यास नागरिकांना आपल्या या जन्मभूची अन् कर्मभूची अज्ञात माहिती उपलब्ध होईल व ते मोठे समाजकार्य घडेल असे त्या दोघांचे प्रांजल मत पडले. त्यासाठी त्यांनी मला आग्रहही केला. मूळची जिज्ञासा व हा प्रेमळ आग्रह यामुळे माझा उत्साह दुणावला व सातत्याने सुमारे सव्वातीन वर्षे अविश्रांत परिश्रम करून मी हा इतिहास यथामती लिहून काढला. या कामात मला प्रा. मदन भट आणि प्रा. मा. ल. व्यवहारे यांचे मोलाचे साहाय्य मिळाले आहे ही बाब विशेष उल्लेखनीय असून, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

इ. सन १९२० साली अमरावती येथे सुरू झालेल्या 'उदय' वृत्त पत्राची सालवार फाईल्स म्हणजे अमरावतीचा इ. सन १९२० नंतरचा बोलका इतिहासच. या फाईल्समुळे या इतिहासाचा दुसरा व तिसरा भाग लिहिण्यासाठी फार मोलाची मदत झाली आहे. (याच काळात १९२३ मध्ये डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या संपादकत्वाखाली आणि वीर वामनराव जोशी यांचे नेतृत्वाखाली उमरावतीत सुरू झालेले 'स्वतंत्र हिंदुस्थान' या साप्ताहिकाचे व तत्कालीन इतर काही साप्ताहिकाचे अंक प्रयत्न करूनही उपलब्ध होऊ शकले नाहीत.)

अमरावती नगरपालिकेचे सर्व सदस्य व कित्येक कर्मचारी यांचेही या कामी बरेच सहकार्य लाभले आहे त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष, इतिहासाचार्य प्रा. श्री. ग. ह. खरे यांनी या ग्रंथातील ऐतिहासिक कालखंडाचे प्रकरण २, वाचून जिव्हाळ्याने योग्य ते मार्गदर्शन केले आहे. तद्वतच नागपूरच्या विदर्भ संशोधन मंडळाचे डॉ. देवपूजारी (नागपूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख) यांनी या ग्रंथाची टंकलिखित प्रत वाचून महत्वाच्या सूचना दिल्या आहेत.

प्रसिद्ध इतिहासज्ञ श्री. सेतू माधवराव पगडी, मुंबई डॉ. अ. ना. देशपांडे, नागपुर व डॉ. शं. गो. तुळपुळे, पुणे हे अमरावतीला व्याख्यान दौऱ्यावर आले असता त्यांनीही या ग्रंथाची टंकलिखित प्रत वाचून आपला अनुकुल अभिप्राय देऊन प्रोत्साहित केले आहे. याबद्दल मी

त्यांचा सदैव कृतज्ञच राहीन. उमरावतीचे वयोवृद्ध नागरिक कविभूषण प्रो. अण्णासाहेब खापर्डे यांचा या ग्रंथाला आशीर्वादही लाभला आहे.

या ग्रंथात अनेक ग्रंथातील संदर्भ आणि अवतरणे उद्धृत केली आहेत. त्या सर्व ग्रंथकारांच्या ऋणातच राहणे मी पसंत करतो. तसेच यवतमाळचे श्री. महाजन वकील यांनीही बरीच महत्त्वाची माहिती पुरविली आहे. अमरावतीचे कै. श्री. राजाभाऊ देशपांडे यांनीही सुरवातीचे हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचना केल्या आहेत व प्रोत्साहन दिले आहे. या सर्वांचा आभारपूर्वक उल्लेख केल्यावाचून राहवत नाही.

... ...

एखाद्या देशाचा किंवा प्रांताचा इतिहास लिहिण्यासाठी साधने उपलब्ध होऊ शकतात, पण ज्या गावांना पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व नाही अशा आधुनिक युगात प्रसिद्धीस आलेल्या अमरावतीसारख्या नगरीचा पूर्वेतिहास लिहिणे खूप अवघड असते आजचे अमरावती नगर पूर्वी प्रसिद्ध नव्हते. इसवी सनाच्या सतराव्या शतकात तर त्याला परगण्याचाही दर्जा नव्हता इतके हे गाव लहान होते.

अमरावतीस जागतिक प्रसिद्धी मिळाली, ती कापसाच्या व्यापारामुळे. हा व्यवसाय अमरावतीस इ. सन १८१३ चे सुमारास सुरू झाला आणि इ. सन १८६६-६७ मध्ये येथे कॉटन यार्ड अस्तित्वात आले. इ. सन १८९७ मध्ये अमरावती येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनामुळे आणि इ. सन १९२० नंतर सुरू झालेल्या स्वातंत्र्य आंदोलनाचे वऱ्हाडातील प्रमुख केन्द्र म्हणून अमरावतीस विशेष प्रसिद्धी मिळाली. पण या सर्व घटना अगदी अलीकडच्या आहेत. त्या दृष्टीने इ. सन १८०० पूर्वीचा जुन्यातला जुना इतिहास संशोधून व तो क्रमवार संकलित करून या ग्रंथात देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या देशाचा, महाराष्ट्राचा किंवा वऱ्हाड प्रांताचा संशोधित इतिहास विद्वान लेखकांनी लिहून प्रसिद्ध केलेला आहे. परंतु एकाद्या शहराचा संशोधित इतिहास लिहिण्याची परंपरा आपलेकडे नाही. याला अपवाद दिल्ली, बनारस व मुंबईसारख्या शहरांचे संशोधित इतिहास काही विद्वान लेखकांनी लिहून प्रसिद्ध केलेत पण असे प्रयत्न तुरळक गावा पुरतेच आढळतात. त्यामुळेच ह्या अमरावतीच्या इतिहासाचे टंकलिखित जेव्हा श्री. सेतू माधवराव पगडी यांनी पाहिले तेव्हा त्यांनी त्याची प्रशंसा

केली आणि हा पायंडा चांगला आहे असे प्रोत्साहनपर शब्द काढलेत. त्यावरूनच हा प्रयत्न किती आवश्यक होता ते लक्षात येईल.

या ग्रंथातील माहितीची सुरुवात अकराव्या शतकापासून होते व ही माहिती भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाचा, म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ चा वृतान्त देऊन संपते. यापैकी पहिल्या भागात अकराव्या शतकापासून तो इ. सन १९१९ अखेर पावेतोची, दुसऱ्या भागात १९२० ते १९३२ व तिसऱ्या भागात १९३३ ते १५ ऑगस्ट १९४७ पावेतोची माहिती आलेली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या भागातील माहितीची मांडणी थोड्या निराळ्या पद्धतीने केलेली आहे. ती वाचत असताना त्या त्या वर्षात अमरावतीस घडलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादि घडामोडींचा आणि त्या त्या काळातील व्यक्ती, नेते, आणि बोलभाषा यांचा परिचय होतो. एवढेच नव्हे तर तत्कालिन अमरावतीच्या लोक जीवनाची स्पंदने ऐकावयास मिळतात. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमावर देशभक्तीची, देश सेवेची कशी छाया पडलेली होती हे पदोपदी जाणवते आणि स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळातील लोकभावना व प्रवृत्तीतील फरक जाणवू लागतो.

आजचे अमरावती हे शहर मूळचे उदुंबरावती या नावाचे एक चिमुकले ग्राम. हे ग्राम इसवी सनाच्या अकराव्या, तेराव्या, सतराव्या अन् अठराव्या शतकात अस्तित्वात असल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. अठराव्या शतकाच्या पहिल्या दशकात हे ग्राम ओसाड बनले, पण पुढे त्याच शतकाच्या तिसऱ्या दशकात ते प्रयत्नपूर्वक पुन्हा बसविले गेले. अठराव्या शतकाच्या उतरार्धापासून तर या शहराची चांगलीच भरभराट झालेली आहे.

एकोणवीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या शहरावर निजामाची सत्ता होती. उत्तरार्धात इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर या शहराला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आणि कापूस व्यवसाय, शिक्षण, सामाजिक व राजकीय चळवळी यांची सुरुवात झाली. सर्व वऱ्हाडच्या शासकीय नियंत्रणाचे केन्द्र अमरावती येथे आले.

अमरावतीचे पुनर्वसन व विकास अठराव्या शतकाच्या मध्यात राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले (अमरावतीकर भोसले) यांनी केल्यामुळे तोच

या शहराचा पहिला नेता ठरतो. अठराव्या शतकात या शहराचे नेतृत्व व्यापारी व सावकार यांचेकडे असावे असा संकेत मिळतो. एकोणवीसावे शतकाचे उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीस या शहराचे नेतृत्व श्री. दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी, रा. ब. मुधोळकर इत्यादि उच्च मध्यम वर्गातील इंग्रजी विद्या विभूषित वकील मंडळींनी केले आहे तर, इ. सन १९२० पासून पुढे वीर वामनराव जोशी, डॉ. पटवर्धन, सौ. पटवर्धन, श्री. नानासाहेब गोखले, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री बामणगावकर इत्यादि त्यागनिष्ठांकडे हे नेतृत्व आलेले आहे असे दिसून येते.

संपूर्ण भारतात आणि वऱ्हाडप्रांतात ज्या घडामोडी निरनिराळ्या काळात घडल्या त्याचे प्रतिध्वनी या शहरात अपरिहार्यपणे निनादले. त्याची माहिती देताना, देशात वा वऱ्हाडात घडलेल्या काही घटनांचा संक्षिप्त उल्लेख स्वाभाविकपणेच या ग्रंथात आलेला दिसेल. ज्या व्यक्तींचा आणि घटनांचा उल्लेख आलेला आहे अशा व्यक्तींची अन् घटनांची आवश्यक ती माहिती तळटीपेत दिलेली आढळेल. या शिवाय आवश्यक त्या माहितीची परिशिष्टेही ग्रंथास जोडली आहेत

या ग्रंथात समाविष्ट केलेल्या हकीकतीचे सामान्यतः पुढील टप्पे पाडता येतात.

१ प्राचीन व पौराणिक काळ–रुक्मिणी हरणाची आख्यायिका.

२ अकरावे शतक ते सतरावे शतकातील अमरावती.

३ अमरावतीकर भोसले घराणे व त्यांची कारकीर्द.

४ निजामाचे काळातील अमरावती.

५ अव्वल इंग्रजी अमदानीतील अमरावती.

६ विसाव्या शतकातील अमरावती.

या टप्यानुसार या ग्रंथात प्रकरणांची योजना केली आहे.

वास्तविक केवळ हौस म्हणून ऐतिहासिक पुस्तके वाचण्यापलीकडे 'इतिहास' या विषयाशी माझा संबंध नाही. परंतु अमरावती शहराचा इतिहास लिहिण्याच्या दृष्टीने कोणीही इतिहासज्ञ अजून पुढे न आल्यामुळे केवळ जिज्ञासेपोटीच हा तुटका–फुटका प्रयत्न मी केला आहे. तो कितपत यशस्वी झाला हे तज्ज्ञ वाचकांनीच ठरवावे.

त्याच प्रमाणे अमरावतीच्या इतिहासाला पूरक अशी अज्ञात माहिती व कागदपत्रे जर कोणाजवळ असतील तर ते मला अवश्य कळवावे म्हणजे त्याचा उपयोग ग्रंथाची पूरक माहिती म्हणून दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे वेळी करता येईल. वाचकांनी या ग्रंथासंबंधीचा आपला अभिप्राय कळविला तर त्याचाही उपयोग ग्रंथाच्या पुनर्मुद्रणाचे वेळी मार्गदर्शक होईल.

या ग्रंथाचे स्वरूप काहीसे गॅझेटीयर सारखे झालेले आहे. पण त्या दृष्टीने यांत दिलेली माहिती अपुरी आहे याची मला जाणीव आहे.

कोणतीही जुनी माहिती सहजासहजी मिळत नाही व मिळाली तरी तिच्या खरेपणाविषयी जरूर ती खात्री करून घ्यावी लागते. यात वेळ बराच जातो. त्यामुळेही काही उणीवा राहिल्या आहेत.

वास्तविक अशा तांत्रिक स्वरूपाचे ग्रंथाला पांच-सात वर्षाचा अवधी देखिल अपुरा ठरावा. शिवाय हे एका व्यक्तीचे काम नव्हे, केवळ तीन-सव्वातीन वर्षात एकट्याने हा प्रपंच केला त्यामुळे उणीवा आणि काही दोष राहणे अस्वाभाविक नाही. अर्थात उणीवा व दोष राहू नयेत यासाठी जरूर ती खबरदारी घेतलेली आहे.

'इतिहास' हा शब्द इति, ह, आणि आस या संस्कृत शब्दांचा बनलेला आहे. या शब्दाचा अर्थ 'भूतकाळात असे झाले किंवा घडले' असा स्थूलमानाने होतो. म्हणजे गतकालाची हकीकत किंवा पूर्वजांच्या लहान थोर कृत्यांचे वर्णन. आपल्या पूर्वजांचा, आपण राहतो त्या देशाचा, प्रांताचा किंवा गावाचा पूर्वेतिहास जाणून घेण्याची स्वाभाविक इच्छा प्रत्येकाला असते. शिवाय वर्तमानकाळात घडणाऱ्या गोष्टी ह्या एकाएकी घडत नाहीत तर त्याला मागील अनेक वर्षाची किंवा शतकांची परंपरा असते. अशा ह्या मागील परंपरेची माहिती या इतिहासाद्वारे मिळते. म्हणूनच इतिहासाला त्या दृष्टीने अनन्य साधारण महत्त्व आहे. अर्थात हा अमरावती शहराचाच इतिहास नसून येथे राहणाऱ्या हजारो लोकांच्या, वर्ग आणि जातींच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक घडामोडींचाही इतिहास आहे. म्हणून तो वाचताना थोडी चिकित्सक दृष्टी बाळगणे जरूर आहे.

या ग्रंथात दिलेली माहिती कोणत्या ना कोणत्या कागदपत्रांचे आधारेच दिलेली असल्याने ती पूर्णपणे सत्य हकीकत आहे. अगदी तुरळक घटना ऐकिव किंवा आठवणी यांचे आधारे दिलेल्या आहेत. अर्थातच हा अमरावतीचा सत्य इतिहास आहे. या ग्रंथात विषयाशी संबंधित नसलेली काही माहिती आल्याचे दिसून येईल. उदाहरणार्थ 'वऱ्हाड आणि निजाम' यातील संबंधाबद्दल ठिकठिकाणी उल्लेख आलेला आहे, परंतु वस्तुतः या प्रश्नावर म्हणजे वऱ्हाड परत निजामाकडे जाऊ नये म्हणून पुढे मोठे आंदोलन उभे झाले ती माहिती तिसऱ्या भागात येणार आहे. पण त्याची पार्श्वभूमी कळावी म्हणून हे उल्लेख जरूर तेथे वेळोवेळी केलेले आहेत.

शेवटी, ज्या ज्या लोकांचे आणि संस्थांचे सहकार्य या कामी मिळाले त्या सर्वांचा नामोल्लेख करणे अशक्य असल्याने, त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करून हे निवेदन पुरे करतो.

मकर संक्रांत
दि. १४ जानेवारी १९७८

भि. दे. कारंजकर
लेखक

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी
कार्याध्यक्ष, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर
यांचा

अभिप्राय

अमरावती शहराच्या इतिहासाच्या पहिल्या भागाची पहिली सुमारे दोनशे पृष्ठे मी वाचली त्यावरून या ग्रंथाचे लेखक श्री. बापुसाहेब कारंजकर यांनी त्यातील माहिती जमविण्याकरिता घेतलेल्या अपार परिश्रमाची कल्पना येऊन मी अतिशय प्रभावित झालो. त्यांनी त्या शहराचा अत्यंत प्राचीन काळापासून इतिहास देण्याचा भगीरथ प्रयत्न केला आहे. त्याकरिता त्यांनी प्राचीन संस्कृत वाङ्मय, उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रे, सनदा, व्यापाऱ्याचे हिशोब इत्यादि विविध साधनांचा उपयोग करून अमरावती शहराचे शेकडो वर्षांचे यथातथ्य चित्र वाचकांपुढे उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथामुळे विदर्भातील या प्रमुख शहराची सर्वांगीण माहिती वाचकास विनायास होईल.

असा उत्कृष्ठ ग्रंथ लिहून प्रकाशित केल्याबद्दल मी त्यांचे तसेच त्या ग्रंथाच्या प्रकाशकाचे हार्दिक अभिनंदन करतो व या ग्रंथाने विदर्भातील इतर शहराविषयीही सविस्तर माहिती जमवून असेच ग्रंथ लिहिण्यास इतरास स्फूर्ति होईल अशी आशा करतो.

वा. वि. मिराशी
कार्याध्यक्ष,
विदर्भ संशोधन मंडळ

दि. ६-८-७८

• कविभूषण अण्णासाहेब खापर्डे •

यांचा

आशीर्वाद

अमरावती
दि. २८ नोव्हेंबर १९७६

श्री जगन्माता रुक्मिणीचे अमरावती हे जवळ जवळ माहेरच आहे. ह्या गावाचे 'उम्बरमन्ती' असे पूर्वीचे नांव आढळते. एलिचपूरच्या नबाबशाहीच्या काळातील तटबंदीचे ऐतिहासिक स्थान म्हणूनच केवळ या नगरीला महत्त्व नाही, तर पौराणिक काळापासून तिला महत्त्व आहे. येथील श्री जगदंबेचे स्थान हे फार प्राचीन व प्रसिद्ध असून देवीच्या महत्त्वाच्या स्थानापैकी आहे. अशा या नगरीचा इतिहास संशोधनपूर्वक आणि श्रमपूर्वक लिहिला जायलाच पाहिजे होता. तो नव्हता ही इतिहासात मोठी उणीव होती. ती ह्या प्रस्तुत पुस्तकाने भरून निघत आहे, हे पाहून मला फार आनंद होतो. संशोधक व वाचक ह्या पुस्तकाची योग्य ती किंमत जाणून लेखकाच्या श्रमाचे चीज करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

ब. ग. खापर्डे
(बळवंत गणेश खापर्डे)

अभिप्राय

Nagpur Dt. 28-10-76

I was introduced to Shri B. D. Karanjkar by Prof. M. C. Bhatt and I had an opportunity to go through the typed script of his book "Amravati Shaharacha Itihas". It is a painstaking work. The author has done justice to the theme and has relied on contemporary documents for his statements as far as possible. It makes interesting reading.

Dr. M. B. Deopujari
M. A. LL. B. Ph. D.
former, Head of the Dept. of History, Nagpur University.

अभिप्राय

अमरावती
ता. १३-४-७७

श्री. कारंजकर यांनी लिहिलेले 'अमरावती शहराचा इतिहास' या ग्रंथाच्या दोन खंडाचे हस्तलिखीत वाचण्याचा योग आला. एकच शहर घेऊन त्याचा समग्र इतिहास देण्याची पद्धत अद्याप आपल्याकडे विशेष रूढ झाली नाही; काशी, दिल्ली अशा शोडया फार शहराचे इतिहास लिहिले गेले मुंबई प्रांताच्या जुन्या गॅझेटियरमध्ये मुंबई शहराचा इतिहास दोन खंडात प्रसिद्ध झाला आहे. पण असे उपक्रम फारच थोडे आहेत.

या दृष्टीने अमरावती शहराचा इतिहास हा ग्रंथ स्वागतार्ह्य म्हणावयास हवा. कारंजकरांनी या ग्रंथलेखनासाठी अनेक साधने संशोधली आहेत. अमरावतीकर भोसल्यांचा इतिहास प्रथमच सलगरुपाने या ग्रंथात येत आहे ही मोठी गोष्ट आहे.. निजामी अमलाखाली वऱ्हाड, मराठे निजाम संघर्ष इत्यादि विषय चांगले हाताळले आहे.

अमरावतीतील अंबा देवालयाच्या उत्पत्ती व प्राचिनत्व यासंबंधी लेखकांनी जी मते मांडली आहेत ती सर्वांनाच पटतील असे नाही पण अमरावतीचे जुने भाग, उपनगरे, शहराची झालेली वाढ ही सर्व माहिती वाचनीय आहे.

दुसऱ्या खंडात १९२० पासूनच्या कालखंडातील अमरावतीतील विविध चळवळींचा आढावा घेतला आहे तोही वाचनीय आहे.

हा ग्रंथ अवश्य छापला जावा; त्यामुळे वऱ्हाडवरील ऐतिहासीक साहित्यात निश्चित भर पडेल.

श्री कारंजकरांनी घेतलेले श्रम हे इतरांना अनुकरणीय ठरावेत.

सेतु माधवराव पगडी

(भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांचे पत्र.)

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

१३२१, सदाशिव पेठ, भारत इति. सं. मंडळ पथ, पुणे ३०, दुरध्वनी : ४२५८१
कामाची वेळ : स. ८-३० ते १०-३०, सायं. ४ ते ८, साप्ताहिक सुटी शुक्रवार

श्री. भि. दे. कारंजकर मुक्काम अमरावती यांसी कृ. सा. न. वि. वि. आपण मला, आपण तयार केलेल्या उमरावतीच्या पुस्तकातील इतिहासाचा भाग वाचून त्या विषयीचा अभिप्राय देण्यास सुचविले. त्याप्रमाणे येथे करीत आहे. आपणास उमरावतीचा संस्थापक व वर्धक राणोजी भोसले यांचे पूर्वज, स्वत: तो व त्याचे वंशज या विषयी माहिती द्यावयाची होती. ती माहिती आपण आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात एकत्र केली आहे. ती करीत असतांना शिवाजी महाराजांच्या मुख्य भोसले वंशासी अमरावती–नागपूरकर भोसल्यांचा संबंध कसा जुळतो हे आपण दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांच्या पणजापूर्वीची माहिती आज तरी पक्की विश्वसनीय मानता येत नाही ती कच्ची समजणेच युक्त होईल. मुधोळच्या घोरपडे घराण्याच्या इतिहासात प्रसिद्ध केलेल्या पत्रापैकी पहिली सहा–सात पत्रे निश्चयाने अविश्वासनीय आहेत, असे आज तरी वाटते. त्या पत्रांच्या साह्याने भोसल्यांची वंशावळ जुळविणे धोकादायक आहे. आपण आपल्या वंशावळीस उपयोगी पडणाऱ्या त्या कागदांचा आधार घेतला आहे. तो घेणे एवढे उचीत नाही. तथापी राणोजी भोसल्याच्या पूर्वजांचा इतिहास देणे हा आपला मुख्य उद्देश नव्हता. राणोजी, रघूजी, व कान्होजी या तीन छत्रपति शाहू कालीन भोसल्यांचे संबंध कसे होते हे आपण शक्यतोवर अस्सल पुराव्याच्या योगाने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात येथे मिळालेल्या नवीन अस्सल पुराव्यांची भर घातली म्हणजे आपले ते प्रकरण अधिक वास्तव होईल यात शंका नाही. संकलनात्मक पुस्तकांचा आधार घटितांच्या कथनासाठी सामान्यत: करावयाचा नसतो. तो मत समर्थन अथवा मतविरोध यासाठी घ्यावयाचा असतो. पण क्वचित प्रसंगी संकलनात्मक पुस्तकात मूळ साधनच प्रकाशित केलेले असते. अशा वेळी त्या साधनाचा सावधानतेने उपयोग करता येतो. शुद्ध इतिहासलेखनात हे तत्त्व सदैव डोळ्यापुढे ठेवावे लागते.

इतिहास लेखन हे एक सतत प्रगत होणारे लेखन आहे. नवीन पुरावे मिळाले की जुन्या लेखनाचे स्वरूप बदलावे लागते. पण यामुळे लेखन

करू नये असे होत नाही. आपण लिहिलेल्या पुस्तकात राणोजी संबंधीची सध्या जमविलेली माहिती घालाविच पण अधिक माहिती जमविण्याचा आणखी प्रयत्न करून व तिची सध्याच्या लेखनात भर घालून हे प्रकरण स्वतंत्र रीतीने प्रकाशित केले तर त्याचीही आवश्यकता आहेच. त्या योगे राणोजी भोसले व उमरावती यांचा थोडासाच ठाऊक असलेला इतिहास अधिक विस्ताराने लोकांपुढे येईल. तसे करण्याचाही आपण प्रयत्न करावा अशी आग्रहाची सूचना करतो. बहुत लिहिणे तरी सुज्ञ असो.

ग. ह. खरे

कार्याध्यक्ष

दि. १३–१०–७६

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे–३०

(पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या लायब्ररीतील संदर्भ ग्रंथाचे वाचन व टिपणे घेणे चालू असताना प्रा. ग. ह. खरे यांनी दिलेला वरील अभिप्राय आहे. त्यानंतर ह्या संदर्भ ग्रंथातील टिपणांचे आधारे तसेच पुणे अभिलेखागारातील शाहू दफ्तरातील आणि पेशवे दफ्तरातील अस्सल कागद पत्राचे आधारे या ग्रंथाचे प्रकरण २ पूर्णपणे नवीन लिहून काढले व त्याची एक प्रत प्रा. खरे यांचे अभिप्रायार्थ पाठविली होती. त्या संदर्भात त्यांचे आलेले पत्र पुढे दिले आहे.)

BHARAT ITIHASA SAMSHODHAKA MANDALA, POONA
1321 *SADASHIV PETH, POONA–30 (India)*

Out No. 486/99 *D/–27–10 77*

कृ. सा. न. वि. वि.

श्री. कारंजकर यांनी लिहिलेला अमरावतीचा संस्थापक व वर्धक राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले हा लेख मी वाचला. त्यांनी दिलेले सर्व संदर्भ मी मुळातून काही पाहिले नाहीत. ते येथे आले होते. त्यांनी पुष्कळ पुस्तके पाहिली. मला बनले ते मार्गदर्शन मी केले. त्यांचा लेख सामान्यतः ठीक आहे एवढेच मी म्हणू शकेन. वाक्य नी वाक्य अचूक आहे की नाही, हे संदर्भ पाहिल्या शिवाय आणि संदर्भांची विश्वसनीयता पारखल्या शिवाय सांगता येणार नाही.....क्वचित् ठिकाणी पुनरुक्ति झाली आहे.....पृष्ठ ६ वरील ४ थ्या परिच्छेदात ''१७१९ फेब्रुवारी मध्ये'' असे लिहीले आहे ते चूकच आहे. '१७१८ असावे'. पण फेब्रुवारी हा महिना चुकेल. शाहिराचे काव्य गायन हा कांही इतिहासाचा आधार असेलच असे सांगता येणार नाही. असो. आपणास त्वरा आहे आणि मला सावकाशीने वाचण्या इतका वेळ नाही यामुळे सहज सुचले ते लिहिले आहे.

आपला

स. ह. खरे

अभिप्राय

अमरावती नगरी अतिप्राचीन सुमारे सहस्त्र वर्षांपासून तरी ती अस्तित्वात आहे. त्रिवाय तिचे नाव कृष्ण-रुक्मिणीशी जोडलेले. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात अमरावती विषयी कुतूहल व जिज्ञासा. हे जिज्ञासापूर्तीचे कार्य श्री. कारंजकर यांच्या सहाय्याने सिद्ध झालेल्या प्रस्तुत 'अमरावती नगरीचा इतिहास' या ग्रंथराजाने उत्कृष्टपणे केले आहे सुमारे सहस्त्र पृष्ठांचा हा प्रचंड इतिहास लिहिण्यास लेखकास किती साधने शोधावी लागली असतील, किती हिंडावे लागले असेल आणि कितीजणांच्या भेटीगाठी ध्याव्या लागल्या असतील, त्याची कल्पनाच करणे बरे. हा इतिहास संपूर्ण व सर्वांगीण असून त्यामुळे गतकाळ कायमचा जिवंत झाला आहे. प्रकृति बरी नसताना श्री. कारंजकरांनी या कामी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत. अमरावतीचे नागरिक तर त्यांना या प्रचंड कार्याबद्दल धन्यवाद देतीलच, पण इतर शहरांना सुद्धा या इतिहास ग्रंथावरून स्फुर्ति मिळेल यांत शंका नाही. तशी स्फुर्ति मिळून वऱ्हाडातील इतर नगरींचे इतिहास तयार होवोत हीच सदिच्छा. श्री. कारंजकर यांना पुनश्च धन्यवाद.

अमरावती
दि. ३१-३-७८

डॉ. अ. ना. देशपांडे, नागपूर
डॉ. शं. गो. तुळपुळे, पुणे

डॉ. बी. आर. तथा मधुकर आष्टीकर,
अध्यक्ष– विदर्भ साहित्य संघ, नागपूर आणि
सदस्य– साहित्य अॅकॅडमी, दिल्ली

यांचा

अभिप्राय

सायासे शोध कीजे । बहुतांसी बोध दीजे ।
वोपलीया अचुक बीजे । पौंतादिके फलयही ।

अमरावती शहराचा प्राचीन इतिहास, हा मूळ ग्रंथाचा पहिला भाग वाचला. ह्या विशालकाय ग्रंथाचे गुणाढ्यरूप अत्यंत लक्षणीय आहे. श्री. बापूसाहेब कारंजकरांनी प्राचीन इतिहासाची साक्ष काढताना घेतलेल्या अचूक व अथक परिश्रमांना सीमा नाही. महानुभाव ग्रंथ, गॅझेटिअर्स, विविध कोष, पुराणग्रंथ, बखरी, शिलालेख आदि अनेकरूप साधनांचा बलाढ्य वापर करून हा ग्रंथ उपयोजिला आहे उदुंबरावतीचा महानुभावीय उल्लेख प्रस्तुत शहराबद्दलचाच होता, हे भौगोलीय आधार अधिक मिळाले असते तर भरभक्कमपणे सिद्ध होऊ शकते. तसे अमरावती हे अतिप्राचीन नाव आहे. तसा विदर्भ हा देशच अतिप्राचीन ज्यामधाचा पुत्र विदर्भ ह्याने वेदकाळी हे राज्य नर्मदेच्या दक्षिणेला स्थापले. त्याच्या मुळेच या देशाला विदर्भ नाव प्राप्त झाले. ऐतरेय ब्राह्मणानुसार या विदर्भाचाच पुत्र भीम यानेच विदर्भ देश पुढे नेला. विदर्भाची राजधानी कुण्डिनपूर होती. पुढे भोजकट ही देखील राजधानी म्हणून होतीच. अमरावतीचा उल्लेख अनेक महाकाव्यातूनही होतो तेव्हा हे नाव देखील अति प्राचीनच होय. असो.

अमरावती शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास अत्यंत काटेकोरपणे व साक्षेपी लिहिण्यात श्री. बापूसाहेबांनी अमाप यश मिळविलेले आहे. राजकीय धकाधकीत बौद्धिक धडपडी करणारे बापूसाहेबांचे हे एक व्यक्तिमत्व मनाला भुरळ पाडणारे आहे. लेखक, त्यांचे सहाय्यक व प्रकाशक ह्या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. हा अमोल ज्ञानकुंभ पुढील पिढीला प्रेरणादायक ठरेल ह्यात शंका नाही.

श्रावण शुद्ध चतुर्थी, शके १९००

—मधुकर आष्टीकर

• अर्पण पत्रिका •

अमरावती शहराच्या

सर्वांगीण भरभराटीला, उन्नतीला, विकासाला

व शहराचा नाव लौकिक वाढविण्यासाठी,

सुरुवातीपासून आजपर्यंत

ज्यांनी ज्यांनी हातभार लावला

त्या सर्व लहान थोर नागरिकांना

हा ग्रंथ

प्रेमादर पूर्वक

अर्पण

करीत आहे.

– भि. दे. कारंजकर

चित्र क्र. २: (पृष्ठ ८१३ पहा)

उमरावतीची नगर देवता श्री अंबादेवी.



चित्र क्र. ३ : श्री अंबादेवी मंदिराचे शिखर.

भाग पहिला

प्रकरण पहिले

अनुक्रमणिका

नामव्युत्पत्ती ... प्राचीनत्व ..... अकरावे शतक

तेरावे शतक ... औरंगजेबाची सनद ...

विद्वानांची वस्ती ... भोसल्यांची उमरावती.

प्राचीन व पौराणिक काळ ... रुक्मिणीहरणाची

आख्यायिका ... रुक्मिणी स्वयंवराची कथा.

कुंडिनपूर नगर ... भौगोलिक स्थिती ...

कसबे उमरावती ... पेठ उमरावती ...

परिशिष्ट क्र. १

चित्र क्र ५ : एकवीरा देवी (मोठी अंबा) (पृष्ठ १२ पहा)

अमरावती शहराचा इतिहास

प्रकरण पहिले

नामव्युत्पत्ती : 'उदुंबरावती' हे अमरावतीचे प्राचीन व मूळ नाव होय, आणि या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप 'उंबरावती' असे होऊन या नावानेच काही शतके हे गाव ओळखल्या जाई. त्याचा लेखी पुरावा उपलब्ध आहे[१]. पुढे उंबरावतीचा उच्चार व्यवहारात 'उमरावती' असा होऊ लागला आणि हेच नाव गेल्या सुमारे चार शतकापासून तो अगदी परवापर्यंत चालू होते. याचेही अनेक कागदी पुरावे उपलब्ध आहेत.

इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनी "अमरावती हे नाव बरोबर नसून उमरावतीच जास्त बरोबर आहे, कारण उदुंबरावती पासून उमरावती हे रूप बनले[२]". असा स्पष्ट निर्वाळाच दिलेला आहे.

उदुंबरावती किंवा उंबरावती या शब्दाची (नावाची) व्युत्पत्ती उदुंबर किंवा उंबर या वृक्षाचे नावावरून झालेली असावी. कारण जेव्हा हे गाव वसले तेव्हा या भागात उदुंबराची (उंबराची) विपुल झाडे असावीत. अशा या उदुंबर वनाचे सान्निध्यात वसलेल्या वस्तीला जर 'उदुंबरावती' हे समर्पक नाव न मिळते तरच नवल ! पण उदुंबरावती हा संस्कृत शब्द सर्व सामान्य लोकांना उच्चारताना जड वाटला आणि म्हणून मग 'उंबरावती' हा सुटसुटीत व सहज उच्चारता येणारा प्राकृत शब्द निर्माण झाला आणि तो अनेक शतके प्रचलित राहिला. पण पुढे उंबरावतीचा (व्युत्क्रम) उच्चार जनसामान्यांकडून 'उमरावती' असा होऊन उमरावती हेच नाव रूढ झाले. असा या नावाचा इतिहास दिसतो.

---

१ : श्री. गोविंदप्रभु यांचे चरित्र : डॉ. कोलते : पृ. ७९

२ : अभिनव मराठी ज्ञानकोश : भिडे : प्रथम खंड : पृ. १७२

गावांना वृक्षांची नावे : वऱ्हाडातील अनेक गावांची नावे ही कोणत्या तरी वृक्षाचे नावावरून पडल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, पिंपळगाव, वडगाव, चिंचगाव, बोरगाव, एरंडगाव, जांबगांव, कण्हेरी, कारले, पळसखेड इत्यादी[१].

उदुंबरावती किंवा उंबरावती हे नाव देखील उदुंबर या वृक्षाचे नावावरूनच या गावाला मिळाले असावे. अर्थातच हे गाव वसले त्यावेळी येथे उंबराची विपुल झाडे असावीत किंवा उंबर – वन असावे. तात्पर्य : उदुंबरावती किंवा उंबरावती हे नाव 'उंबर' वृक्षाचे नावावरून या गावास मिळाले, हे म्हणणे जास्त संयुक्तिक व तर्काला धरून आहे.

एक पुरावा : याचा आणखी एक पुरावा असा की, गेल्या ४० : ४५ वर्षांपूर्वी उमरावतीला अनेक घरांचे आवारात आणि इतरत्रही, जुनाट उंबरांची झाडे अस्तित्वात होती. कालांतराने ती नष्ट झाली असली तरी या गावात उंबराच्या झाडांची विपुलता होती हे खरे. त्यामुळेही असे वाटते की, या भागात एके काळी उदुंबर–वन असावे.

उदुंबरांची (उंबरांची) झाडे या गावात दीर्घकाळ राहण्याचे कारण म्हणजे हिंदुलोक उंबराचे झाड स्वत: होऊन कधी तोडीत नाहीत. हे झाड त्यावर दत्तात्रेयांचा निवास आहे या समजुतीने पवित्र मानतात. शिवाय उदुंबरवृक्षाची पाने, फळे व साल ही औषधी गुणधर्मांनी युक्त आहेत. घरगुती औषधीत त्यांचा वेळी अवेळी उपयोग होतो[२]. त्यामुळेही हे झाड राखणे पसंत केल्या जाई. उदुंबरवृक्षाची लाकडे कोणी घरात जाळीत

---

१ : भांदक येथील राष्ट्रकूटाचे ताम्रपटात त्या काळातील (९ वे शतक) गावांची नावे दिलेली आहेत. त्याचे संशोधन कै. य. खु. देशपांडे यांनी केले. त्यानुसार–

ताम्रपटातील नावे		हल्लीची नावे	ताम्र; नावे		हल्लीची नावे
उदुम्बरमन्ति	–	उमरावती (राणी)	नागाम	–	नायगाव
णगणपुरी	–	गणोरी	उम्बरग्राम	–	उंबरी
अंतरेग्राम	–	अंतरगाव	नांदीपूर	–	नांदूरा

२ : सुलम विश्वकोश : दाते–कर्वे : भाग पहिला : पृ. ३०१

नाहीत. यज्ञात हवनासाठी† त्याचा उपयोग होतो. या कारणांमुळे जुनाट उंबरवृक्ष या वस्तीत पूर्वी विपुल दिसत.

इंग्रजी स्पेलिंग : इ. स. १८०० चे आसपास उमरावतीचे इंग्रजी स्पेलिंग Oomraooti असे केल्या जाई[१]. तर इ. स. १८५४ ते १८६० या काळातील, येथील कोर्टाचे कागदोपत्री हे स्पेलिंग 'Omraoti' असे आढळते. इ. स. १८६१ साली प्रसिद्ध झालेल्या 'दि निजाम'[२] या ब्रिग्ज चे ग्रंथात उमरावतीचे इंग्रजी स्पेलिंग 'Oommrawuttee' असे दिलेले आहे. तर उमरावती टाऊन म्युनिसिपालिटीच्या सन १८७० च्या व नंतरच्या प्रौसिडिंग मध्ये दि. २० एप्रील १८७६ च्या सभेपर्यंत Oomraotee. व

---

† "... ब्राम्हणग्रंथाची रचना होण्यापूर्वी विदर्भ हा यज्ञभूमी म्हणून प्रसिद्ध होता[१] ..." "... पुढे पुढे हे यज्ञ फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. चारी वेदांच्या लोकांना त्यांत कामे देण्यात आली व यज्ञ म्हणजे एक मोठी जत्रा असे त्याला स्वरूप आले*". 'यज्ञामुळे नवीन वसाहती स्थापन झाल्या. जंगलांत जावयाचे तेथील भूमि नांगरावयाची, आणि तेथे हा मोठा उत्सव करुन लोक आणावयाचे, आणि कांही तात्पुरती मोठी वस्ती उत्पन्न करावयाची; अशा आशेने की, पुढे कायमची वस्ती उत्पन्न होईल†'.

या यज्ञाला हवनासाठी उदुंबराची लाकडे व धार्मिक विधीसाठी उदुंबराच्या समिधा लागत. तेव्हा असे मोठे यज्ञ उदुंबर वनाचे सान्निध्यात होत असावेत, आणि ज्या अर्थी उदुंबर वनाचे सान्निध्यातीत वस्ती म्हणून उदुंबरावती, त्याअर्थी या उदुंबरावतीचे जवळपास एकेकाळी यज्ञभूमी असण्याचा संभव आहे. अर्थात हा काळ सातव्या शतकापूर्वीचा असावा. कारण तो पावेतो यज्ञ असत, नंतर यज्ञासोबत मूर्तिपूजाही अस्तित्वात आली व मंदिरे उभी होऊ लागली.

यावरून उमरावती ही एके काळी यज्ञभूमी असावी असा संभव वाटतो. कदाचित यज्ञ–यागा–मुळे येथे कायम वस्ती होऊन त्या वस्तीला (दुंबरावती' हे नाव मिळाले असावे. अर्थात हा संशोधनाचा विषय होय.
(* महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास : शं. दा. पेंडसे : पा. १० व २५;
† : महाराष्ट्रीय ज्ञानकोश : विभाग २ रा : डॉ. केतकर : पा. २१२.)

१ : ठकाची जबानी : १८३९ : मेडोज टेलर :

२ : दि निजाम : १८६१ : ब्रिग्ज : पा. ३१३

दि. २९ जुलै १८७६ च्या सभेपासून तो दि. १ नोव्हेंबर १८७६ च्या सभे पर्यंत 'Amraotee' असे आढळते. दि. १८ दिसेंबर १८७६ च्या सभेपासून पुढे 'Amraoti' असे स्पेलिंग आढळून येते. त्याचप्रमाणे, फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट, हैदराबाद चे कमिश्नर बेरार यांना आलेल्या पत्र क्र. २१७ : १८७० मध्ये 'Oomrawtty' असे स्पेलिंग आहे[१].

यावरून, वऱ्हाडवर इंग्रजांची वहिवाट सुरू झाली तेव्हा, म्हणजे इ. स. १८५३ मध्ये या गावाचे 'उमरावती' हे नाव रूढ असल्याने त्याचा इंग्रजी उच्चार जसा केला जाई, त्याच आधारावर हे इंग्रजी स्पेलिंग तयार झाले असावे.

शंका – समाधान : येथील अंबेच्या देवळामुळे 'अमरावती' हे नाव या गावाला मिळाले असावे, असा एक समज आहे. परंतु तो चुकीचा आहे हे वरील विवेचनारून लक्षात येईलच. इ. स. १८७० च्या गॅझेटियर 'फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् (संपादक : सर आल्फ्रेड लॉयल, कमिशनर ऑफ वेस्ट बेरार.) मध्ये, पान १५४ वर 'Ancient Name "Amravati" From Goddess of Amba, या मजकुराचे संदर्भात संपादकाने तळटीपेत Doubtful' असा शेरा मारला आहे. यावरून त्यावेळीही हा, वरील समज प्रचलित होता असे दिसते. पण संपादकाला हा समज बरोबर नसावा असे वाटले व म्हणून त्याने तळटीपेत मुद्दाम तसे नमूद करून ठेवले आहे.

तात्पर्य, या गावाला मिळालेले उदुंबरावती हे नाव उदुंबर (उंबर) या वृक्षाचे नावावरूनच मिळाले हे संयुक्तिक वाटते. आणि या विशिष्ट मूळ नावामुळेच त्याचे प्राचीनत्व, त्याची सांस्कृतिक व धार्मिक स्थिती आणि वैशिष्ट्य काय असावे याचीही कल्पना करता येते. उदुंबरावती या संस्कृत शब्दाचे प्राकृत रूप उंबरावती आणि त्याचे अपभ्रष्ट रूप उमरावती झाल्याचेही दिसून येते. वर दिलेल्या पुराव्यावरून व माहितीवरून यासंबंधी शंकेला जागा राहत नाही.

अमरावती हे नाव कसे आले ? : मूळ नाव उदुंबरावती. त्याचे प्राकृत रूप उंबरावती आणि व्यवहारात कालांतराने उमरावती असा प्रवास करीत आता या नगरीचे नाव 'अमरावती' रूढ झाले आहे. हे कसे घडले ? याचा शोध घेता असे आढळून आले की, इ. सन १८६९ साली उमरावतीला

---

१ : याच ग्रंथातील प्रकरण ३ चे परिशिष्ठ क्र. २ पहा.

· टाऊन म्युनिरि (स्थापना करण्यात आली तेव्हा, हैद्राबाद रेसिडेन्सीतून या .च्या हद्दीचे जे नोटिफिकेशन निघाले त्यात Omraottee ऐवजी Amravati हा इंग्रजी शद्व प्रथम आला. आणि या शद्वाचा मराठी अनुवाद करताना 'उ' ऐवजी 'अ' (अमरावती) वापरण्यात आला. असे असले तरी हा 'अ' एकदम रूढ झाला नाही. तर पुढेही इंग्रजी स्पेलिंग Umraottee किंवा Omraoti असे चालूच होते. आणि मराठीत 'उमरावती' हाच शद्व प्रचलित होता. कधीकधी अमरावती असाही शद्व वापरल्याचे दिसते. पण मुख्यत: मूळ इंग्रजी Amravati या शद्वाचा प्रती शद्व म्हणूनच 'अमरावती' हे नाव मराठीत जन्माला आले. आणि या शद्वाचा वापर गेल्या २० : २५ वर्षात जास्त होऊन तो रूढ होऊ लागला असे कागदपत्रावरून दिसून येते.

उमरावती ऐवजी 'अमरावती' हे नाव या गावाला चिटकण्याचे कारण वरप्रमाणे दिसते.

भारतात उमरावती किती ? : भारतात उंबरावती किंवा उमरावती या नावाने प्रख्यात असे हेच एक गाव असावे. कारण महाराष्ट्रात यवतमाळ जिल्ह्यातील राणी उमरावती तसेच मराठवाड्याच्या सिल्लोड तालुक्यातील उमरावती (१४:२: १२९)[१] सोडून, उमरावती या नावाचे गाव आढळत नाही. भारतीय पोस्ट व तार खात्याने प्रसिद्ध केलेल्या पोस्ट ऑफिस गाईड पार्ट १ व २ आणि पोस्ट इंडेक्स नंबर्स डिरेक्टरी (पीन कोड) मध्ये, उंबरावती किंवा उमरावती या नावाचे एकही गाव आढळत नाही. मात्र अमरावती आणि अमरावथी या नावांची अनेक गांवे आढळतात ती अशी:–

(१) अमरावती, Amravati (जि. अमरावती) महाराष्ट्र.
(२) अमरावती, Amraoti (जि. नागपूर) महाराष्ट्र.
(३) अमरावथी, Amravathi (जि. बेल्लारी) म्हैसुर.
(४) अमरावती, Amraoti (जि. बैतुल) मध्यप्रदेश.
(५) अमरावती–रतनपुर, Amraoti-Ratanpur (जिल्हा इटाह) उत्तर प्रदेश.
(६) अमरावथी (गुंटूर), Amravathi (Guntur)
आंध्र प्रदेश. (बौद्ध शिल्पासाठी प्रसिद्ध.)
(७) अमरावथी नगर, Amravathi Nagar तामिलनाडू
(८) अमरावथी पुडूर, Amravati Pudur तामिलनाडू

१ : महाराष्ट्रातील खेड्यांची व शहरांची वर्णक्रमी १९६५ : पा. २०

इंद्राची अमरावती : महाभारतातही इंद्राच्या अमरावती नगरीचे वर्णन आलेले आहे. (महाभारत: वनपर्व : अध्याय त्रेचाळीस.) पांडवांपैकी अर्जुनाच्या स्वर्गातील आगमनप्रसंगी हे वर्णन दिलेले असून, "सिद्ध व चारण यांची येथे वस्ती आहे, सर्व ऋतूंत फुलणारे वृक्ष आहेत, तेथील नंदनवनात अप्सरा विहरतात, देवांची विमाने अनिर्बंध संचरतात, धर्माने सांगितलेली कर्तव्ये पार न पाडणाराला या नगरीचे दर्शन कधीच होत नाही.[१]" असे हे वर्णन आहे.

श्रीकृष्णाने गरुडावर आरुढ होऊन याच इंद्राचे राजधानीवर चाल केली व तेथून पारिजातक वृक्ष आणला[२]. असे पौराणिक ग्रंथात वर्णन आहे.

याशिवाय अनंतव्रताचे कथेतही अमरावती नगरीचे नाव येते. ही कथा श्रीकृष्णाने पांडवांना त्याचें वनवासाचे काळात सांगितली होती. त्यानुसार "कौंडिण्य ऋषी व त्याची पत्नी सुशीला ही दोघेही अनंतव्रत करून, अमरावती नगरी जवळ येऊन पोहोचताच तेथील नागरिकांनी त्यांचे आदरातिथ्य करून त्यास आपला राजा केले, व अशारीतीने अनंतव्रताचा प्रभाव त्यांना तात्काळ कळून आला[३]." असे म्हटले आहे.

याप्रमाणे पौराणिक काळात 'अमरावती' नगरीचा उल्लेख आढळतो.

आपल्या उमरावतीचे नाव उदुंबरावती → उंबरावती → उमरावती या क्रमाने रूढ होत आता ते 'अमरावती' असे झाले असले तरी, या नगरीचे वैशिष्ट्यपूर्ण असे मूळ नाव 'उमरावती' हेच, शतकानुशतके चालत आले असून, वऱ्हाडातील अव्वल इंग्रजीचे काळात Amravati या इंग्रजी शद्वाचा 'अमरावती' हा अनुवाद एक प्रकारे लादण्यात आलेला आहे. त्याचा सविस्तर इतिहास वर दिलेला आहेच.

उमरावतीचे प्राचीनत्व : उमरावतीचे मूळ अस्तित्व आणि प्राचीनत्व यांचा विचार केला तर, 'उदुंबरावती' ह्या मूळ संस्कृत नावावरूनच या गावाचे अस्तित्व फार जुने–संस्कृत भाषेच्या प्रभुत्वाचे काळापासून–असावे असे वाटते. याचे एक कारण असे की, उमरावती जिल्ह्यात एकूण दोन

---

१ : अभिनव मराठी ज्ञानकोश : भाग पहिला : भिडे : पृ. १७२

२ : सुलभ विश्वकोश : भाग २ : दाते – कर्वे : पृ. ५२१

३ : महाराष्ट्रीय ज्ञानकोश : डॉ. केतकर : भाग ६ : पा. (अ) १६०

जार गावे[1] आज आबाद आहेत. त्यापैकी फक्त दोनच गावे अशी आहेत कीह, ज्या गावाच्या नावाचे मागे 'वती' हा प्रत्यय येतो. ती गावे म्हणजे एक 'उमरावती' आणि दुसरे, चांदूर तहसिलीतील 'अंजनवती'. याचा अर्थ, संस्कृत भाषेचे, या भागातील प्रभुत्वाचे काळी इतर गावे नव्हती असा मात्र नाही.

एकादे नवे गाव वसले म्हणजे त्याला कोणते तरी नाव स्वाभाविकपणे दिले जाते. आणि त्या नावाचे मागे येणारा प्रत्यय पूर, वाडा, गाव, किंवा खेड यापैकी कोणता तरी लावला जातो. बहुसंख्य गावाच्या नावामागे बहुधा पूर, वाडा, गाव[2] किंवा खेड[2] हाच प्रत्यय आढळून येतो. 'वती' हा प्रत्यय क्वचितच् आढळतो.

व्युत्पत्ती शास्त्राचे दृष्टीने विचार केला तर : १) उदुंबर किंवा उडुंबर हा मूळ संस्कृत शद्व वृक्षवाचक आहे. मराठीत या वृक्षाला औदुंबर किंवा उंबर म्हणतात. अमरावती गावात आणि त्याच्या परिसरात उंबराची झाडे एका काळी खूप असावीत.

(अ) १ : उदुंबर + मतुप् (तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप्–५. २. ९४) ते त्यात आहे' अशा अर्थी. येथे उदुंबरला मतुप् प्रत्यय लागला आहे. (म्हणून उदुंबर अर्थात उदुंबराची झाडे तेथे आहेत असा अर्थ निष्पन्न होतो.)

त्या नंतर मतुप् प्रत्ययाचा वतुप् प्रत्यय पुढील नियमाने झाला आहे–

२ : उदुंबर+वतुप् (मादुपधायाश्च मतोर्वोड यवादिभ्य : ८–२–९)

३ : उदुंबर + वत् (वतुप्) – उदुंबरवत्.

उदुंबरवत् याचा अर्थ उदुंबराच्या म्हणजे उंबराच्या झाडांनी परिपूर्ण वा समृद्ध.

---

१ : डिस्ट्रिक्ट सेन्सस हॅन्डबुक, १९७१

२ व ३ : गाव' 'हे सर्वसाधारण नाव, खेडे' म्हणजे मूलत: लहान असलेले गांव. (याशिवाय मौजा, कसबा व पेठ 'ही नावे काही गावाचे नावा समोर येतात. जसे मौजे उमरावती, कसबे उमरावती किंवा पेठ उमरावती. त्याचा अर्थ– मौजे किंवा मौजा हा शद्व सरकारी दप्तरात उपयोगात आणला जातो. कसबे व पेठ' चा अर्थ पुढे 'कसबे उमरावती, पेठ उमरावती' यांत दिला आहे तो पहावा.)

उदुंबरवत् हे पुल्लिंगी नाम आहे.

(आ) हलन्त (व्यंजनान्त) पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप करताना पाणिनीच्या सूत्राप्रमाणे (स्त्रीयां ङीप्)
ङीप् म्हणजे ई हा प्रत्यय लागतो. जसे
उदुंबरवत् + ङ.ीप् (ई) = उदुंबरवती.

(ई) उदुंबरवती किंवा उदुंबरावती या शब्दाचे भाषेच्या बदला बरोबर पुढील प्रमाणे रूपांतर झालेले आहे–

उदुंबरावती	–	संस्कृत भाषा
उंबरावती	–	प्राकृत भाषा
उमरावती	–	अपभ्रंश भाषा
अमरावती	–	अर्वाचीन भाषा

याप्रमाणे लोकभाषेत 'उमरावती' हा शब्द उच्चार सौकर्यामुळे रूढ झाला. पुढे ब्रिटिशांच्या काळात (सन १८७६ नंतर) उमरावतीचे 'अमरावती' असे रूप झालेले आहे. तरी अशिक्षित लोकांच्या तोंडी उमरावती हाच शब्द बराच काळ रूढ होता व आजही आहे†.

अकरावे शतक : तूर्त उमरावतीचे अस्तित्वाचा जुन्यात जुना पुरावा अकराव्या शतकातील उपलब्ध आहे. तो म्हणजे भाजीबाजार विभागातील श्री सोमेश्वर मंदिराशेजारच्या रुखबदेव (ऋषभदेव) संस्थानातील (हल्लीचे नाव, श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर) तळ घरात असलेल्या भगवान आदिनाथ, ऋषभनाथ वगैरे तीर्थंकरांच्या संगमरवरी मूर्तीचे बैठकीवरील (आसनावरील) कोरलेला लेख[१]. त्यावरून असे दिसून येते की, या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा या ठिकाणी संवत ११५३ मध्ये, म्हणजे इसवी सनाच्या अकराव्या शतकाचे अखेरचे दशकात (इ. स. १०९७) झाली.

---

†उमरावती : 'नद्यामतुप् (४–२-८५) ह्या पाणिनिसूत्रात नदी वाचक शब्दांना चतुर्थी मतुप् प्रत्यय लागतो. जसे, उदुंबरावती-उंबरावती (प्राकृत)-उमरावती.'

कित्येक लोक वऱ्हाडातील उमरावती नामक नगरवाचक शब्दाचा अमरावती' असा उच्चार करतात परतु तो अपभ्रष्ट होय. (भा. इ. १८३२)

(राजवाडे नामादिशद्धव्युत्पत्ति कोश : कै. वि. का. राजवाडे : पान २७९.)

१ : ही कोरलेली अक्षरे खालील प्रमाणे आहेत. काही अक्षरे फार अस्पष्ट आहेत. " संवत ११५३ श्रावग शु॥३॥ श्री मुलसंघ महाराजजी... "



चित्र क्र. १२ : श्री एकवीरादेवीचे मंदिराचा दर्शनी भाग व शिखर



चित्र क्र. ९ : श्री आदिनाथ दिगम्बर जैन मंदिराचे
आतील लाकडी कोरीव कामाचा एक नमुना.



चित्र क्र १० : (पृष्ठ ११ पहा)
जुम्मा मस्जीद, साबणपुरा.

या मूर्ती सुमारे ३ फूट उंचीच्या, संगमरवरी दगडाच्या, सुंदर व प्रमाणबद्ध आहेत, आणि त्या मजबूत अशा तळघरात भितीला असलेल्या मोठमोठ्या कोनाड्यातून बसविलेल्या आहेत. ह्या तळघराच्या भिती सुमारे ४-५ फूट रुंद एवढ्या जाड आहेत. भव्य चौकोनी खांबावर कमानी देऊन त्यावर छत दिलेले आहे व एका बाजूचे भितीतून तळघरात जाण्यासाठी जीना आहे. या भव्य मूर्तीखेरिज अनेक लहान मूर्ती तळघराच्या वरच्या मजल्यावर आहेत. त्यावरही संवत ११५३ कोरलेला आहे. सर्व मूर्ती संगमरवरीच आहेत. मंदिराचे चोहोबाजूंनी भक्कम अशा भिती असून, लहानशी किल्लेवजा ही इमारत आहे. तिच्या बांधणीवरून, तळघराचे बांधकाम फार जुने असावे असे दिसते. तेथील सर्व मूर्तीवर एकच संवत कसा? ह्याची चौकशी करता 'ज्या मूर्तीची विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा झाली नसेल ती मूर्ती पूजेसाठी वर्ज मानली जाते' असे सांगण्यात आले.

यावरून असे दिसते की, इ. स. १०९७ चे सुमारास उमरावतीत हिंदु सोबतच जैन धर्मीयांची वस्ती बरीच असावी आणि ते सांपत्तिक दृष्टया इतरापेक्षा श्रेष्ट असावेत. कारण इतक्या ५ : ५० संगमरवरी मूर्ती (६ मोठ्या व इतर लहान) आणि त्याही उत्तम कारागिरीच्या एकाच वेळी आणणारा समाज सधनच असला पाहिजे. शिवाय या मूर्तीसाठी त्यांनी त्याकाळी मजबूत व भक्कम अशी इमारतही बांधली, तेव्हा त्यांची संख्या, संघटना व सांपत्तिक स्थिती उत्तम असणार! या मूर्ती स्थापनेचे काळापूर्वी सुमारे २५–३० वर्षे अगोदर, इलिचपूरला 'ईल'[१]. नावाचा जैन धर्मी राजा (जो स्वतंत्र असावा किंवा देवगिरीचे यादवांचा प्रतितिधी असावा?) राज्य करीत होता. त्यामुळे या राजाचा वऱ्हाडातील जैनसमाजाला बराच आश्रय असावा.

वरील पुराव्यावरून उमरावती हे गाव अकराव्या शतकात अस्तित्वात होते याबद्दल शंका राहत नाही. इतकेच नव्हे तर जैन व्यापारी वर्गाचे येथील वास्तव्यामुळे हे गाव त्या काळी व्यापार–उदीमाचे दृष्टीनेही बरेच पुढारलेले असावे असे वाटते.

---

१ : 'ईल' हा खनजमानगर येथील राहणारा होता व त्याने जेष्ट शु॥११ विक्रम संवत १११५ (सन १०५८) मध्ये एलिचपूर येथे राज्य स्थापन केले." (गॅझेटियर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्ट : लॉयल : १८७० पृ. १४४)

तेरावे शतक : तेराव्या शतकात महानुभावपंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर यांचे गुरू श्री गोविंद प्रभू यांचा उमरावती जिल्ह्यात दौरा झाला. त्यावेळी ते 'उंबरखवती'स आले होते, याची नोंद त्यांचे चरित्रात[१] आहे. त्यावेळी या गावाला 'उंबरावती' हे नाव प्रचलित होते‡.

श्री. गोविंद प्रभूचे दर्शनास त्यावेळी गावातील महाजन (प्रतिष्ठित) लोक गेले होते, याचीही नोंद चरित्रात आहे. ती अशी:–

> उंबरावतीय माहाजनी साउमे यणे :– ॥ मग गोसांवी उंबरावतीयसि बीजे केले : उंबरावतीचे महाजन गावी दक्षिणे वाहाले पैलाडि साउमे आले : गोसांवी तयांते एत देखिले : : आणि दांडियावरि पंजरु घातला: तयांसी दरीसन ने दीतिचि: विनंती न स्वीकरीतीचि: बीजे केले: मग गोसांवी नदी उतरतां दांडियावरुनि श्रीकरीचिया करांगुलीयाचेनि नखे करुनि पाणी घेतले: आणि श्रीमुखे घातले: एकी वासना: श्री चरणींचा आंगुठा उदकासि लाविला : मग बीजे केले : ॥ २३६ ॥

त्यावेळी वऱ्हाडप्रांत हा देवगिरीच्या हिंदू राजाचे (यादवाचे) आधिपत्याखाली होता.

राजधानी उमरावती : 'वऱ्हाडची राजधानी देवगिरी होण्यापूर्वी वऱ्हाडचे दोन भाग झाले. उत्तरेस उमरावती आणि दक्षिणेस प्रतिष्ठान (पैठण) ह्या राजधान्या झाल्या', असा उल्लेख आपटे यांचे संस्कृत कोशात पृ. ११९६ वर आलेला आहे. परंतु त्याचा आधार दिलेला नाही. त्यामुळे हा उल्लेख कोणत्या शतकातील किंवा कोणाचे कारकिर्दीतील आहे. याचा उलगडा होत नाही.

---

१ : श्री गोविंद प्रभु यांचे चरित्र : डॉ. कोलते : पृ. ७९

‡ : पेशवेकालीन पत्रांतूनही, इ. स. १७३८–३९ मध्ये उंबरावती, प्रांत वराड असाच उल्लेख या गावा संबंधी आढळतो. म्हणजे त्या वेळीही उंबरावती किंवा उमरावती हेच नाव या गावाला चालू होते.
(पहा, पेशवे दप्तर क्र. २० पत्र क्र. १९ व ५३ इ. सन १७३८–३९)

इ. सन १४७३-७४ : प्रांत उजाड झाला : इ. सन १४७३ व १४७४ या दोन वर्षांत वऱ्हाडात मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी सर्व लोक माळवा व गुजरातेकडे गेले. त्यानंतर काही वर्षे सर्व प्रांत उजाड झाला होता. काही वर्षांनी हळूहळू लोक परतले[१]. उमरावतीवरही या दुष्काळाचा परिणाम झाला असावा व वस्ती घटली असावी.

मशिदीस औरंगजेबाचो सनद, (सतरावे शतक) : उमरावतीच्या त्या वेळच्या मजरे औरंगपुऱ्यातील (हल्लीचे साबणपुऱ्यातील) जुम्मा मशिदीस इ. स. १६५८ साली अलमगीर बादशहा औरंगजेब यांनी जमीन दान दिली[२]. त्याचे मूळ सनदपत्र उपलब्ध आहे, त्यावरून इ. स. १६५८ मध्ये किंवा त्या सुमारास, उमरावतीला हिंदु सोबतच मुसलमान नागरिकांचीही वस्ती होती हे दिसून येते. ही मूळ सनद पर्शियन लिपीमध्ये असून, तिचा इंग्रजी अनुवाद एका न्यायालयीन प्रकरणी कोर्टाने करविला होता. (तो याच प्रकरणाचे शेवटी परिशिष्ट क्र. १ मध्ये दिला आहे.)

इ. सन १६५८ मध्ये उमरावती हे ग्राम साधारण प्रतीचे असावे व येथे हिंदूसोबतच मुसलमान ग्रामवासीयांची थोडी वस्ती असावी. या उमरावती ग्रामात त्या वेळी जुम्मा मशीद, मजरे औरंगपूर (उमरावतीची वाडी) मध्ये होती हे सनदेवरून सिद्ध होते. हिंदूचे मंदिरापैकी देवीचे मंदिर वस्तीपासून दूर असावे. इतर मंदिरापैकी वर उल्लेख केलेले जैन मंदिर होते. पण अन्य मंदिराबद्दल तूर्त पुरावा उपलब्ध नाही.

---

१ : वऱ्हाड प्रांताचा इतिहास : या. मा. काळे : पा. १११

२ : 'बादशहा औरंगजेब ह्याने दि. १० जून १६५८ इ. रोजी, उघडपणे दरबार भरवून सर्व सत्ता ताब्यात घेतली होती. नंतर २१ जुलै १६५८ रोजी, दिल्ली बाहेरील शालीमार बागेत स्वतः तख्तारूढ होऊन "अलमगीर गाझी" अशी पदवी धारण केली. राज्यारोहण समारंभ मात्र ५ जून १६५९ रोजी करण्यात आला. तो दोन महिने चालू होता. या प्रसंगी त्याने "अलमगीर गाझी मुहियोद्दीन मुहंमद औरंगजेब" असे लांबलचक नाव धारण केले. २५ लाखापर्यंत देणग्या व बक्षिसे दिली. हिजरीवर्ष सुरू केले; जालुस (तख्तारूढ सरकारी वर्ष) २३ मे १६५८ हा धरण्यात आला.' (भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश: चित्रावशास्त्री : पृ. १७९-८५) याचेळीच वर नमूद केलेली सनद उमरावतीचे जुम्मा मशिदीला मिळाली असे त्यावरील तारखेवरून दिसते.

उमरावतीत श्री एकवीरेची प्राणप्रतिष्ठा : सतराव्या शतकाचे मध्यात, इ. स. १६४० चे सुमारास, पुढे जनार्दन स्वामी या नावाने प्रसिद्धिस आलेले एक वैराग्यशाली सत्पुरुष आले व त्यांनी श्री जगदंबेचे मंदिरालगतच्या नाल्याचे दक्षिण तीरावर पर्णकुटी बांधून तेथे आपले निवासस्थान केले. दररोज जगदंबेची पूजा केल्या खेरीज अन्न ग्रहण करायचे नाही असा त्यांचा परिपाठ होता. एकदा पावसाळ्याचे दिवसात नाल्याला पूर आला आणि हा पूर तीन दिवस पावेतो उतरला नाही. स्वामीचा परिपाठ तर देवीचे दर्शनाखेरीज अन्न ग्रहण न करण्याचा होता. त्यामुळे स्वामींना उपोषण घडले. तेव्हा स्वत: जगदंबेने त्यांचे स्वप्नात येऊन दृष्टान्त दिला व सांगितले की, ज्या विहिरीचे पाणी स्नानसंध्येसाठी तुम्ही वापरता त्या विहिरीत अगदी वर जो बाण (पाषण) आहे ती मीच आहे. त्याची प्राणप्रतिष्ठा करा. तिचे दर्शन घेतले म्हणजे माझे दर्शन घेतल्यासारखे होईल.

महाराजांनी तसे केले. तीच श्री एकवीरा देवी होय. स्थानिक लोक तिला मोठी अंबा म्हणतात. याप्रमाणे श्री एकवीरा देवीची प्राणप्रतिष्ठा इ. स. १६६० चे सुमारास झाली. पुढे मोठे मंदिर बांधण्यात आले. आज हे श्री एकवीरा–देवी–संस्थान म्हणून ख्यातनाम आहे. नवरात्रात येथे मोठा उत्सव होतो व श्री अंबादेवीचे पालखीतच श्री एकवीरा देवीची मूर्ती दसऱ्याचे दिवशी थाटाने सीमोल्लंघनास निघते. मंदिरात वर्षभर धार्मिक कार्यक्रम होतात.

या एकवीरा देवीचे मंदिरात एक भुयार आहे. ते मंदिराबाहेरच्या विहिरीपर्यंत आहे. धोका होऊ नये म्हणून ते सध्या बंद केले आहे. या भुयारालगतच दुसऱ्या दोन लादनीवजा खोल्या आहेत व तेथे मूर्ती आहेत. या वरून असे अनुमान निघते की इ. स. १४९९ मध्ये किंवा त्यापूर्वीही उत्तरेकडील यवनांनी जेव्हा वऱ्हाडवर कब्जा केला, त्यावेळी उध्वस्त केलेल्या हिंदु मंदिरात हे मंदिरही उध्वस्त झाले असावे व कालांतराने इ. स. १६६० चे सुमारास श्री जनार्दनस्वामींनी या देवळाचा जीर्णोद्धार केला असावा. पूर्वी येथे मंदिर होते आणि त्यापैकीच लेण्यावजा जागेचा शोध जीर्णोद्धार करताना लागल्याने स्वामींनी त्याचाही मंदिरासारखा उपयोग केला असावा. अर्थात हा संशोधनाचा स्वतंत्र विषय आहे.‡

‡ : श्री वसंतराव उमदीकर व श्री कुळकर्णी मास्तर यांनी दिलेल्या माहितीचे आधारे.

विव्दानांची वस्ती : या सतराव्या शतकात उमरावतीला विव्दा-नांचीही वस्ती असावी. कारण या काळात 'उमरावतीकर रामकृष्ण' या नावाचा विव्दान ग्रंथकार या ग्रामात होऊन गेला असा उल्लेख सापडतो. अमरावतीचे हे घराणे बरेच प्रसिद्धीस आले होते असे दिसते.

रामकृष्ण याचा आजा नृसिंह दैवज्ञ आणि बाप लक्ष्मण हेही विव्दान ज्योतिषी होते. रामकृष्ण हा आपल्याला, दहिगाव – पूर्णा येथील प्रख्यात ज्योतिर्विद घराण्यातील मुनीश्वर यांचा शिष्य म्हणवत असे.

रामकृष्ण याची बीजगणितावर " बीज प्रबोधिनी " या नावाची टीका व " गणितामृत लहरी " या नावाचा दुसरा एक ग्रंथ हे प्रसिद्ध ग्रंथ होत. याशिवायही त्याचे आणखी काही ग्रंथ असावेत पण त्याची माहिती मिळत नाही. रामकृष्ण याचे वरील ग्रंथ सोळाव्या किंवा सतराव्या शतकातील (अंदाजे इ. स. १६४८ चे आसपास) असावेत[१]

या वरून सतराव्या शतकात उमरावती ग्रामात व्यापाऱ्यांसोबत विव्दान ब्राम्हणांचीहि वस्ती असावी.

या प्रमाणे हिंदु, जैन, व मुस्लिम अशा भिन्न धर्मीयांची वस्ती असलेले हे लहानसे उमरावती ग्राम इ. स. १७०० पर्यंत आबाद होते व येथील ग्रामस्थ सुखाने कालक्रमणा करीत होते.

ओसाड गाव उमरावती : पण दुर्दैवाने कोणत्यातरी कारणाने उमरावती ग्राम हळू हळू लोकसंख्येचे दृष्टीने घटू लागले व शेवटी इ. स. १७०७–८ मध्ये उमरावती व मजरे औरंगपूर उजाड बनले. या बाबत एक लेखी दस्तावेज उपलब्ध आहे तो असा–

---

१ : " ..... उमरावतीस्थ नृसिंहदैवज्ञात्मज लक्ष्मणसुत रामकृष्ण याची बीज प्रबोध नामक टीका आहे. हा रामकृष्ण आपल्यास मुनीश्वर शिष्य म्हणवितो. यावरून ती सुमारे शके १५७० (इ. स. १६४८) ची असावी " (भारतीय ज्योतिःशास्त्र : शं. बा. दिक्षित, पा. २५२)

अमरावतीच्या निम्मे मोकदमीचे खरेदीखत.

शिक्का हरफ फारशी असल बमोजिब नकल

श्री

खरेदीनामा राजेश्री राणोजी वल्द बापूजी भोसले यांसी लक्ष्मण गोविंद देशपांडिय व बाबाजी वलद आपाजी व भिलजी वलद वायाजी इंगोले व देऊजी वलद सकलाजी बाखडे व कोंडजी वलद उदाजी गुरव मोकदम प्रो. उमरावती व मजरे अवरंगपूर प्रो. बडनेर बीबी सरकार गायल सुभे वराड पायाघाट सु ा तिसन सन ११२९ कारणें खरेदीनामा लेहून दिधला ऐसाजे प्रो. मजकुरावरी वस्ती मुतलकीन[१] नाही. वैरान बेचिराख दहा बारा वर्षे पडिला आहे. आपला शिखस्त दाल नादार हैरान परेशान[२] होतो. जागीरदारे आपणाशी हजुर बोलावून इस्तमालती[३] बद्दल ताकीद केली गावीची वस्ती करणे यासी आपले नादारी सबब गावीची तरदूद होऊन नये म्हणोन आपण रजाबंद होऊन प्रा ा. मो व मजरे अवरंगपुर वतन मोकदमी निमे हजीर व गयाळ तुम्हास फरोख्त चेले असे रुपये ३०० तिनसे आपण तुम्हा पासून घेतले आणि वतन तुम्हास खुस रजा बंदीने दिल्हे असे मोकरा × × × नेतणे ६०५॥८८॥३ वजा इनाम २६ नेनणे देशपांडिय ११८ब॥ शिवाय जाबीता[४] बद्दल मठ मकरंद भारथी गोसावी नेतन १५८ बाकी नेतन ५८९८८॥३

याची नेमे नेतन २८९८८॥॥१॥ ताा
प्रेा उमरावती बंजर नेतन २४२८४०१
मजरे अवरंगपूर बंजर व गयाळी ३७३८४
वजा इनाम शिवाय जाबीता बदल वजा इनाम

नेतन १८८७८१ त ा
मठ मकरंद भारथी गोसावी ७८१. ॥ा ४
देशपांडिया

नेतन शिवाय जाबीता

बदल मठ ७८७८१

बाकी नेतने ३५४८६।४ या प्रे॥

१ मुळीच. २ चिंतातूर, हतबुद्ध. ३ लावणी, संचणी. ४ अधिकारपरत्वे.

बाकी नेतने ३५४८६(४ या प्रो॥
बाकी २२५८२८४ या प्रे॥ निमे निमे नेतन १७७८३। ब॥
नेतने ११२८५ ॥ २ त॥

बाबाजी इंगोले	सयाजी इंगोले	देऊजी बोधडिया ?	कोंडजी गुरव गयाळ
३७८४॥। ३	१८८१॥	नेतने ४४८१८	नेतने २५८२॥
मीलजी इंगोले	मुंड खास	बालनी (?) मुंड	इंगला गयाळ
३७८४॥।२	×××	१०८१।३	४२८॥२

आंबुलकार गयाळ

नेतन ६५८८८३

मुंड खास	बालनी गुरव
४५८५।२	२०८२ ।।। १

××× (फाटले) ××× निमे नेतने राहिली १७७८३।४

उमरावती हजीर मोकदम	मजरे अवरंगपुर हजीर व गयाळ मोकदम	
नेतन त॥ ११२८५॥२	नेतन त॥ १७७८३।४	
बाबाजी इंगोले	सयाजी इंगोले	मोकदम नेतने त
३७८४।।। ३	३७८४।।। १	१७७८३।४
मीलजी इंगोले	देऊजी बोदलिया	कोंडजी गुरव बमै बिरादर
३७८८।।। २	बंजर नेतने	गयाळ नेतने
	४४८१	२५८२॥

मुंड ××	घालजी गुरव	इंगळा गयाळ
३३८८॥	१०८१।३	नेतन ५०८१८२

मुंड आंबुलकर
गयाळ नेतन
४५८५।२
मुसलमान नेतन
२३८२॥
वजा इनाम देशपांडे
११
बाकी १२८२॥ मुंड
देशपांडे

हे आमचे ताली असे काळी पांढरी जो भोगवटा आंबली व विश्वादान आणि कलाली व घाणे वगैरा उडत पान मोकदमीचा लवाजमा आहे तो सुदामत प्रै।। निमे लेकराचे लेकरी खाणे पान मान व जागीर जे होळीस पोळी आधी तुम्ही घेणे मग आपण घेऊ प्रे।। मौ।। मोकदमी निमे × आपणाशी अर्थाअर्थी संबंध नाही सामीन दाल आपण निमे वतनाचा दायाकरू तरी झूटे व वाकीयाचे गुणेगार होऊं आपला कोणी सेवक व भाऊबंद तुमशी दावा धक्का करील त्याचा जाब आपण खुद निसबत करूं आमल मोकदमीच्या निमे तुम्ही करणे व निमे आपण करू टका पैसा बाबदु गांव मि।। जो पडेल तो निमे तुम्ही देणे व निमे आपण देऊ मुशारा व बाबे जमा व इनाम वगैरा देशमुख व देशपांडिये व डांगीया निमे तुम्ही देणे व निमे आपण देऊ दाखरी इनामा आपला सही बी।। लक्ष्मण गोविंद देशपांडिय प्रे।। म।। र त।। छ २१ साबान

सही

भोपत निशाक
नामू देशमुख प्रो। नांदगांव
काजी

गंगाराम देशमुख
प्रो। म/र
त्रिबकजी व पुंजाजी
मोकदम मौजे कवीट

हा दस्तावेज (खरेदीनामा) सु।। तिसन ११२९ छ. २१ साबान–११४० हि. – (दि. २९ जुन १७१९ इसवी) चा आहे[१].

यावरून राणोजी वलद बापुजी भोसले (हिंगणी–बेरडी) यांनी उमरावती व मजरे अवरंगपुरची निमे पाटीलकी रु. ३०० ला दि. २९ जुन १७१९ रोजी खरेदी केली होती व त्यावेळी ही गावे उजाड होती हे वरील खरेदीनाम्यावरून सहज दिसुन येते.

मुळ मोकदमांना (खरेदी देणारांना) जहागीरदाराने ही गांवे बसविण्याचा आदेश दिला पण त्यांचे कडून ही गावे आबाद न होऊ शकल्याने उमरावती व मजरे अवरंगपूर हे दहा बारा वर्षे ओसाड होते याचा पुराव वरील खरेदीनाम्यात आहेच. शिवाय उमरावतीत मकरंद भारती गोसावी याचा मठ होता असे त्यावरून दिसते.

---

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेख संग्रह : खंड पहिला (उमरावतीकर भोसले संग्रह) : विदर्भ संशोधन मंडळाचे प्रकाशन : १९५९ : पान १३०–१३३



चित्र क्र. ८ : श्री आदिनाथ दिगम्बर जैन मंदिर (ऋषभदेव संस्थान) भाजीबाजार, अमरावती. (पृष्ठ ९ पहा)



चित्र क्र. ६ : श्री पार्श्वनाथ (पृष्ठ ८ पहा)



चित्र क्र. ७ : श्री अजितनाथ (पृष्ठ ८ पहा)

नाग व हत्तीचे चिन्ह दिसते त्या बैठकीवर लेख कोरलेला आहे.

भोसल्यांची उमरावती : राणोजी भोसले यांनी उमरावतीची पाटीलकी इ. स. १७१९ मध्ये याप्रमाणे प्राप्त केल्यानंतर, छत्रपती शाहु महाराजांनी याच राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले यांना मौ. उमरावती प्र. बडनेर बीबी हे गाव दि. ९ आक्टोबर १७२२ रोजी वंशपरंपरेने मोकासा (इनाम) दिले होते. त्याचे अस्सल कागद त्यांच्या वंशजाकडे आहेत[१]. या भोसल्यांना 'उमरावतीकर भोसले' असेच म्हणत व त्यांच्या येथील वास्तव्यामुळे उमरावतीला 'भोसल्याची उमरावती' असे म्हटले जाई. (या उमरावतीकर भोसले घराण्याचा इतिहास पुढील प्रकरणांत दिला आहे.)

या प्रमाणे उपलब्ध साधनांवरून, म्हणजे कोरलेली अक्षरे, जुने ग्रंथ व ऐतिहासिक कागदपत्रे, सनदा वगैरे वरून उमरावती गांवाचे अस्तित्व इसवी सनाच्या अकराव्या शतकापासून सिद्ध होत आहे. अर्थात त्याकाळी हे एक लहान ग्राम असावे. सतराव्या शतकाचे अखेरीस, मुसलमान आमदनीत देखील लहानसे खेडे यापलीकडे या गावाला महत्त्व नव्हते. पण त्यावेळी या शेजारचे मौजे तारखेडा हे वस्तीचे गाव असावे. उमरावतीचे गावठाण आणि मजरे औरंगपूर ही वाडी ओसाड होण्याचे मार्गावर असावी. (त्याप्रमाणे १७०७–८ मध्ये ही गावठाणे ओसाड झालीच.)

राणोजी भोसल्यांनी येथील निमे पाटीलकी खरेदी केल्यानंतर व १७२२ मध्ये त्याला हे गांव शाहु महाराजानी इनाम दिल्यानंतर राणोजीनेच उमरावतीला पुनर्वसाहत करविली. इतकेच नव्हे तर उमरावती हे गाव 'कसबा' व नंतर 'पेठ' बनले. याप्रमाणे उमरावती हे गांव वसविण्याचे व ते गाव भरभराटीला आणण्याचे सर्व श्रेय राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले यांनाच असून, या गांवचे अस्तीत्व वरील सर्व पुराव्यावरून किमान नऊशे वर्षे इतके आहेच.

त्यापूर्वी देखील हे गाव अस्तित्वात असावे. कारण त्याचे वैशिष्ट्यपूर्ण अशा संस्कृत नावावरून संस्कृत भाषेच्या प्रभुत्वाचे काळी म्हणजे

---

१ : पुणे आर्काइव्हज्, पुणे येथील शाहु दप्तरात राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले यांचे संबंधीचे एकूण १०८ कागद (वेगवेगळी पत्रे, सनदा वगैरे) आढळतात. त्यांतील कांही निवडक कागदाचे प्रकाशन झालेले आहे. (शाहु दफ्तरातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची : खंड १)

राष्ट्रकुटाचे[1] व दुसऱ्या चालुक्याचे काळात असावे. यादवाचे काळात हे गाव अस्तित्वात होते याबद्दल शंका नाहीच.

प्राचीन व पौराणिक काळ : रामायण–महाभारत काळापूर्वी विदर्भात एक सुसंस्कृत शासनव्यवस्था अस्तित्वात होती. ऋषी अगस्ती यांचे नेतृत्वाखाली उत्तरेकडून आर्यांनी दुर्गम असा विंध्य पर्वत ओलांडून, विदर्भात प्रवेश केला, त्या वेळी विदर्भाचा भाग दंडकारण्यात मोडत असे. हा प्रवेश बहुधा हल्लीच्या मोर्शी तहसीलमधूनच झाला असावा. तेथूनच वर्धा नदी वाहते. तेव्हा हा सर्व आर्यांचा समुदाय वर्धेच्या पश्चिम तीराने खाली उतरला व त्यांनी वर्धा, पूर्णा व चंद्रभागा या नद्यांच्या अंतर्प्रदेशांतील जंगले तोडून नवीन जमिनी लागवडीखाली आणल्या व ठिकठिकाणी लहान मोठ्या वसाहती स्थापन केल्या. वर्धा नदीचे काठावर विदर्भा नगरी उर्फ कुंडिनपुर हे राजधानीचे शहर उभे झाले, उत्तरेतील आर्यांच्या यदूवंशातील भोज शाखेतील विदर्भ नावाच्या क्षत्रियाने येथे आपले राज्य स्थापन केले. या विदर्भराजाच्या अनेक पिढ्यांनी राज्य केल्यानंतर याच घराण्यातील इंदुमती नांवाच्या कन्येचा विवाह प्रभु रामचंद्राचे पितामह अज नृपती याचेशी झाला. अगस्ति ऋषींची पत्नी लोपामुद्रा आणि नळराजांजी पत्नी दमयंती या देखील विदर्भाच्याच राजकन्या आहेत हेही या संदर्भात लक्षात घ्यावे. आणि नंतर याच राजघराण्यातील राजा भीष्मक याची कन्या रुक्मिणी हिचे हरण, ती कुलनेमाप्रमाणे देवीचे दर्शनास आली असता भगवान श्रीकृष्णानी केले. हे देवीचे देऊळ म्हणजेच उमरावतीच्या तटा-बाहेरील जगदंबेचे मंदिर होय, अशी आख्यायिका फार पूर्वीपासून प्रचलित आहे. रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याने श्रीकृष्णाशी त्यावेळी युद्ध केले पण त्यात त्याचा पराभव झाला. म्हणून त्याने कुंडिनपुर राजधानीस न जाता उमरावतीच्या पश्चिमेकडे १५।१६ मैलावर भोजकट (हल्ली भातकुली) नावाचे नवे नगर वसवून तेथे आपली राजधानी केली. त्यामुळे उमरावती जिल्ह्यातील अर्धा विभाग 'भोजकट' राष्ट्र या नावाने ओळखल्या जाऊ लागला.

---

१ : मागे पृष्ठ २ वर राष्ट्रकूट कालीन भांदक, ताम्रपटातील गावाची संस्कृत नावे तळ टीपेत दिली आहेत त्या नावात आणि 'उदुंबरावती' या नावात साम्य आहे. यावरून हे गाव राष्ट्रकूटाचे काळी अस्तित्वात असण्याचा संभव वाटतो.

यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, वऱ्हाडात ठिकठिकाणी फार जुन्या वस्त्या (वसाहती) होत्या. ह्या वस्त्या कदाचित फार मोठ्या नैसर्गिक आपत्तीने नष्ट झाल्या असाव्यात व पुढे त्याच जागी नवी नगरे किंवा गावे कालांतराने वसविल्या गेली असावीत[१]. उमरावतीनगर कदाचित रुक्मिणी-हरणाचे काळी अस्तित्वात असेलही. नंतर ते नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट झाले असावे व पुढे कालांतराने पुन्हा येथे वस्ती वसली असावी. अर्थातच ह्याचा पुरावा नाही, हा केवळ तर्क आहे. परंतु रुक्मिणी-हरणाची आख्यायिका उमरावतीच्या तटाबाहेरील देवीच्या मंदिराशी निगडीत आहे, ती काही केवळ कवि-कल्पना मात्र नाही. तर पिढी दर पिढी या घटनेची माहिती मिळत राहिली व पुढे तिला आख्यायिकेचे स्वरूप आले असावे हे शक्य आहे. हरिवंशात रुक्मिणीचे हरण कुंडिनपूरच्या तटाबाहेरील देवीच्या मंदिरातून केले, असा उल्लेख आहे.

कुंडिनपूर ह्या पुरातन राजधानीचा घेर सव्वीस कोसाचा होता असे म्हणतात. कैक शतके कुंडिनपूर हे राजधानीचे शहर होते. इतकेच नव्हे तर कैक शतके या भागात शांतता असल्याने सर्व प्रकारे समृद्धी व सांस्कृतिक विकास झालेला होता. त्यामुळे शहराची वाढ झाली असण्याची शक्यता आहे. सभोवार वाड्या व पेठा असतील. त्यामुळे हे मोठे शहर असणे आणि एवढ्या मोठ्या शहराचा तट मोठा असणे शक्य आहे. त्या तटाबाहेर देखील बरीच वस्ती असून त्या पलीकडे देवीचे मंदिर असले पाहिजे. हाच याचा अर्थ आहे. ते काहीही असले आणि एवढा जुना पुरावा उपलब्ध नसला तरी उमरावतीच्या अंबेच्या मंदिराशी निगडीत रुक्मिणी-हरणाची आख्यायिका ही केवळ दंतकथा म्हणून नजरेआड करता येणार नाही. या आख्यायिकेचा उगम मूळ सत्य घटनेत असलाच पाहिजे. तो एका पिढी-कडून दुसऱ्या पिढीला याप्रमाणे सांगितला जाणे व पुढे त्याचे आख्यायिकेत रूपांतर झाले असणे शक्य आहे. अर्थात उमरावतीचे पौराणिक काळचे अस्तित्व नाकारता येणार नाही.

---

१ : भूगर्भ शास्त्रज्ञांचे मते, उमरावतीच्या पूर्वेकडील टेकड्या ह्या केव्हातरी घडलेल्या भूकंपामुळे उध्वस्त झाल्या असाव्यात. कारण या टेकड्यातील कातळ हा आडव्या थराचा नसून उभे सुळके आहेत. यावरून कधीतरी नैसर्गिक आपत्तीत हे गाव सापडले होते असे दिसते.

या संदर्भात रुक्मिणी–हरणाच्या कथेचा महत्त्वाचा भाग येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. कारण तो या आख्यायिकेशी निगडीत असा भाग आहे. भागवत पुराणात त्याचे वर्णन आहे. जुन्यात जुना असा हा एक पुरावाही होय.

रुक्मिणी–हरणाची आख्यायिका : विदर्भाधिपती राजा भीष्मक याची कन्या रुक्मिणी हिचे हरण भगवान श्रीकृष्णाने उमरावतीच्या अंबेचे मंदिरातून केले अशी आख्यायिका फार पूर्वी पासून प्रचलित आहे, अंबेचे मंदिराचा उल्लेख इ. स. १८७० चे गॅझेटियर फॉर दि हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् यात केलेला असून हे भवानीचे मंदिर अंदाजे एक हजार वर्षापूर्वी बांधले असावे[१], असे म्हटले आहे. नंतर इ. स. १९११ व १९६८ मध्ये उमरावती जिल्ह्याचे जे गॅझेटीयर प्रसिद्ध झाले त्यातही असाच उल्लेख केला आहे. उमरावतीच्या सेटलमेंट रेकार्ड मध्येही हे मंदिर 'हजार वर्षापूर्वीचे आहे' अशीच नोंद आहे[२]. अर्थात सन १८७० पूर्वी किती तरी अगोदर पासून ही आख्यायिका प्रचलित असावी.

श्री गोविंद प्रभुंचे दौऱ्याचा मागे उल्लेख आलेला आहेच. त्यावेळी तेरावे शतकात, ते उंबरावतीस आले असता त्यांनी 'रुक्मिणी हरण स्थान पाहिले' अशी नोंद आहे[३]. यावरून तेरावे शतकातही ही आख्यायिका प्रचलित होती असे दिसते. अर्थात (उमरावतीच्या) देवीचे मंदिरातून रुक्मिणीचे हरण झाले, ह्या आख्यायिकेचा उगम फार पुरातन आहे हे दिसून येईल.

या आख्यायिकेचा मूळ घटनेशी कितपत संबंध आहे याची कल्पना करता यावी म्हणून मूळ भागवत पुराणातील रुक्मिणीस्वयंवराचे कथेपैकी जरुरी पुरता भाग येथे दिला आहे. ही कथा श्रीमद् भागवत या पौराणिक ग्रंथाच्या दशमस्कंधात आलेली आहे. (जिज्ञासूंनी ती कथा मुळांतच वाचावी.)

रुक्मिणीस्वयंवराची कथा : श्री शुक सांगतात– "परिक्षिता! ..... आता श्रीकृष्ण व रुक्मिणी ह्यांचा विवाह कसा घडून आला ते ऐक.

---

१ : गॅझेटियर फॉर दि हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पृ. १५४
२ : सेटलमेंट प्रकरण क्र. ८५४ : १९२७–२८, अमरावती.
३ : 'स्थान–मार्ग–दर्शक' : ले. महंत दत्तराज शेवलीकर : पृ. १३४

भीष्मक नावाचा महाविख्यात पुरुष विदर्भ देशाचा राजा होता. त्याला पाच पुत्र व एक लावण्यवती कन्या होती. वडील पुत्राचे नाव रुक्मी व कन्येचे नाव रुक्मिणी असे होते.

रुक्मिणी ही सद्‌गुणसंपन्न असून प्रत्यक्ष लक्ष्मीचा अंश होती. ती उपवर झाली, तेव्हा तिचा विवाह, तिच्या वडील बंधूचे-रुक्मीचे-आग्रहावरून, चेदी देशाचा राजपुत्र शिशुपाल याचेशी ठरला. परंतु द्वारकेचा राजा श्रीकृष्ण याचे रूप, पराक्रम व गुणानुवाद ऐकून रुक्मिणीने त्याचेशीच लग्न करावे असा निश्चय केला होता. तिकडे श्रीकृष्णानेही रुक्मिणीची लोकोत्तर बुद्धी, मनोहर रूप इ. सद्‌गुण ऐकून तिलाच वरण्याचा निश्चय केला होता. रुक्मिणीला, जेष्ठ बंधूने ठरविलेला शिशुपालाचा संबंध पसंत नसल्याने तिने एक पत्र लिहून (निरोप पाठवला असा उल्लेख इतरत्र आहे. तो निरोपाचा मजकूरच पुढे 'रुक्मिणी-पत्रिका' म्हणून मानला गेला.) ते पत्र एका सुदेव नावाच्या ब्राम्हणाच्या हस्ते श्रीकृष्णाला (द्वारकेस) पाठविले. पत्रात तिने श्रीकृष्णाच्या रूप–गुणांची स्तुती करून, त्याचेशीच लग्न करण्याचा तिचा निर्धार कळविला व लग्नाचे आदले दिवशी देवीच्या दर्शनाला जेव्हा नव वधू कुलनेमाप्रमाणे जाईल तेव्हा तुम्ही माझे हरण करावे असे सुचविले होते. पत्रातील त्या संबंधीचा भाग असा–

श्वोभाविनि त्वमजितोद्वहने विदर्भान्
गुप्तः समेत्य पृतनापतिभिः परीतः ।
निर्मथ्य चैद्यमगधेन्द्रबलं प्रसह्य
मां राक्षसेन विधिनोव्दह वीर्यशुल्कम् ॥
अन्तःपुरान्तरचरीमनिहत्य बन्धून्
त्वामुव्दहे कथमिति प्रवदाम्युपायम् ।
पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा
यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात् ॥

(भागवत– दशमस्कंधः अध्याय ५३)

भावार्थ– हे श्रीकृष्णा ! विवाहाच्या आदल्या दिवशी तू गुप्त रूपाने विदर्भ देशास ये, बरोबर सैन्य व सेनापति आण, शिशुपाल व जरासंध यांचा पराजय कर आणि पराक्रमरूप मूल्य देऊन राक्षसविधीने मला घेऊन जा. मी अंतःपुरात असल्यामुळे, माझ्या बंधूंना मारल्याशिवाय

माझे हरण करता येणार नाही ही एक अडचण आहे खरी. परंतु यास उपाय असा आहे की, विवाहाच्या आदल्या दिवशी आमच्या येथे (कुलाचाराप्रमाणे) नगराच्या बाहेर श्री अंबिकेची मोठी यात्रा असते व तेथे नवऱ्या मुलीस अंतःपुराबाहेर पडून अंबिकेच्या दर्शनास जावे लागते. त्यावेळी तू माझे हरण कर म्हणजे झाले.

वरील पत्रात 'नगराबाहेरील श्री अंबिकेच्या[१]' हा शब्द आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. ज्या अंबेचे दर्शनाला विवाहाचे आदले दिवशी रुक्मिणी जाणार होती ते अंबेचे देऊळ कुंडिनपूर नगराचे बाहेर होते, असा याचा अर्थ आहे.

पुढे याच कथेत रुक्मिणी जेव्हा विवाहाचे आदले दिवशी अंबेचे मंदिरात दर्शनास जाते त्याचे वर्णन आहे ते असे,–

"कुळाचाराप्रमाणे विवाहाच्या आदल्या दिवशी रुक्मिणी भवानी देवीचे दर्शनास जावयास निघाली. ती अंतःपुरातून निघाल्यापासून तिच्या रक्षणाकरिता कवचे व आयुधे धारण केलेले शूर योद्धे तिच्या बरोबर होते. शिवाय तिच्या घरच्या व आजोळच्या वऱ्हाडी मंडळीतील असंख्य स्त्रिया आणि त्यांच्या दासी तिच्या सभोवती होत्या. नाना प्रकारची मंगल वाद्ये वाजत होती. अनेक प्रकारच्या पूजा साहित्यांनी, पक्वान्नांनी व फळफळावळांनी भरलेली ताटे बरोबर घेऊन हजारो स्त्रिया तिच्या बरोबर चालत होत्या, शेकडो वारांगनाही बहुमोल वस्त्रे परिधान करून त्या मंडळीबरोबर उत्तम प्रकारे नृत्य, गायन करीत चालल्या होत्या. सूत, मागध व बंदिजन स्तुतिपाठ करीत होते. अशा थाटाने ती रुक्मिणी देवी अंबिकेच्या दर्शनाकरिता जाण्यास निघाली. यावेळी श्रीकृष्णाचे ध्यान करीतच ती मौनव्रतस्थ नववधू **चालत चालतच** गेली.

वरील दोन गोष्टीवरून असे दिसून येते की, कुंडिनपूरच्या नगराबाहेरील श्रीअंबेचे मंदिरात, विवाहाचे आदले दिवशी रुक्मिणी मोठ्या मिरवणुकीने पण **चालत चालतच** गेली.

---

१ : विदर्भात इंद्रायणीचे मंदिर आहे. रुक्मिणी आपल्या विवाहापूर्वी याच मंदिरात पूजेसाठी गेली होती. (भागवत पुराण : १०.५३. ४९-५०)

यावरून कुंडिनपूर – नगराबाहेर अंबेचे मंदिर विशिष्ठ अंतरावर असावे.

नंतर रुक्मिणी देवीचे दर्शन घेऊन देवालयाबाहेर आली त्यावेळी, लग्नासाठी आलेले पाहुणे, राजे-रजवाडे लोक, जे भीष्मक राजाचे निमंत्रणावरून कुंडिनपूरास आले होते ते, रुक्मिणीस पाहण्यासाठी देवालयाबाहेर होते. त्यातच एका रथात श्रीकृष्णही होता. रुक्मिणीने श्रीकृष्णास पाहिले व ती त्याचे रथाजवळ गेली, तेव्हा श्रीकृष्णाने तिला हात देऊन रथावर बसविले आणि तो गरुडध्वजांकित रथ हजारो लोकादेखत रुक्मिणीसह तेथून निघाला. तेव्हा श्रीकृष्णाचा बंधु बलराम व त्यांचे यादव सैन्यही निघाले. नंतर युद्ध झाले, वगैरे वर्णन आहे.

वरील कथेतील वर्णन पाहता, कुंडिनपूरबाहेर देवीचे मंदिर होते व ते पायी चालत जाण्याइतपत दूर होते असा बोध होतो.

कुंडिनपूर नगर : वऱ्हाडचे इतिहासकार कै. या. मा. काळे यांनी 'वऱ्हाडचा इतिहास' या ग्रंथात कुंडिनपूरचे वर्णन केले आहे ते असे :– 'अगदी भरभराटीत असताना कुंडिनपूरचा घेर २६ कोसाचा होता असे' म्हणतात. यात जरी अतिशयोक्ती असली तरी विजयनगरासारख्या अर्वाचीन शहराचा विस्तार लक्षात घेतल्यास हे अगदीच असंभाव्य नाही. कुंडिनपूर हे त्यावेळी असामान्य शहर होते. कैक शतकापर्यंत विदर्भासारखे प्रसिद्ध राज्य व राजघराणे दक्षिणेत दुसरे नव्हते. विदर्भातील सारस्वत पाहिले म्हणजे फार काळपर्यंत शांतता व समृद्धी या राज्यात नांदत असली पाहिजे हे उघड आहे. अशा प्रख्यात देशाची राजधानीही फार मोठी वाढली असेल. भोवताली वाड्या, पेठा अनेक असतील. लहान खेड्यांचा त्यात समावेश झाला असेल''

टीप : रुक्मिणीदेवी दर्शनार्थ रथातून गेली. देवालय मात्र इंद्राचे, असे विष्णूपर्व अ. ५९ पा. २५३ श्लो. ३३ मध्ये म्हटले आहे. हरिवंशात रुक्मिणीच्या प्रेमपत्राचा (लेखी वा तोंडी) उल्लेख नाही. फक्त दोघांना एकमेकांविषयी अभिलाषा उत्पन्न झाली एवढेच म्हटले आहे. (विष्णूपर्व : अ. ५९. पा. २५२ श्लो. १६ व १७), रुक्मिणीने श्रीकृष्णास पत्रिका पाठविली असा उल्लेख भागवतात नाही. निरोप पाठविला असा उल्लेख आहे. (भागवत दशमस्कंध अ. ५३), रुक्मिणी इंद्र–इंद्राणीचे दर्शनास गेली असे हरिवंशात आहे. तर ती शंकर–पार्वतीचे दर्शनास गेली असे भागवतात आहे. (१०–५३).

"कुंडिनपूरच्या वरील विस्ताराबाबत[१], एक दंतकथा प्रसिद्ध आहे. कुंडिनपूरच्या वेशीबाहेरच्या अंबेच्या देवळात रुक्मिणी कुलनेमाप्रमाणे पूजेस गेली असता कृष्णाने तिचे हरण केले ही गोष्ट प्रसिद्ध आहे. ते अंबेचे देऊळ म्हणजे सध्या उमरावतीच्या तटाबाहेरील प्रसिद्ध अंबेचे देऊळ होय व रुक्मिणी स्वयंवरातील अंबिकापूर हीच उमरावती होय अशी पूर्वापार दंतकथा आहे. उमरावतीहून हल्लीचे कौडिण्यपूर १२ कोस आहे. हल्ली ते ४०० : ५०० वस्तीचे एक खेडे असून पूर्वीचे कुंडिनपूर जमिनीखाली दबलेले आहे. ज्या तऱ्हेने कुंडिनपूर वाढत गेले त्याच्या उलट तऱ्हेने मोडत जाऊन हल्लीचे खेडे राहिले आहे. अंबिकापुराची वस्ती पुढील राजकीय वातावरणात वाढत गेली व ते हल्लीच्या रूपास आले आहे... हिंदुस्थानात पूर्वीच्या नावानेच जी स्थळे कायम आहेत, त्यातील एक कुंडिनपूर अथवा कौंडिण्यपूर हे आहे[२]".

याप्रमाणे उमरावतीच्या श्री अंबेचे मंदिराशी रुक्मिणी–हरणाचे कथेचा जो संबंध येतो त्या विषयीची कथा व इतिहासज्ञांचे मत, वर दिले आहे. आख्यायिका या आधारेच कित्येक वर्षापासून प्रचलित आहे. हे वाचकांच्या लक्षात येईलच[३].

---

१ : सूर्यवंशातील ५६ वा राजा दशरथ याच्या वेळेस अयोध्या ही नगरी १२ योजने लांब व ३ योजने रुंद होती असे वाल्मिकी रामायणात म्हटले आहे. (बालकांड, सर्ग ५). त्याच प्रमाणे आठव्या शतकातील, गुजराथेतील प्राचीन अनहिलवाड नगरीचे वर्णन, कुमारपाळ चरित्रात दिले आहे. त्यात त्या शहराचा अफाट विस्तार (बारा कोस), त्यातील ८४ आपण स्थाने, तेथील सोन्यारूप्याच्या टाकसाळी, राजवाड्याचे वैभव, असंख्य परंतु सुव्यवस्थित कचेऱ्या, देवळे, पाठशाळा, निरनिराळ्या वृक्षराजीतून होणारा वेदावरील वादविवाद वगैरे शेकडो गोष्टीसंबंधी फार बारकाइने माहिती दिली आहे. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर : भाग ६ : पृ. (अ) १९४)

२ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे : पृ. ५२–५३

३ : "गुजरात मध्ये बनासकाठा जिल्ह्याच्या दांता तहहीलीतील अरसुर या गावी असलेल्या 'अंबाजी' या देवीचे मंदिरातून रुक्मिणी हरण झाले" अशी आख्यायिका तिकडे प्रसिद्ध आहे. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : भाग ६ केतकर : पृ. (अ) ४०३)


अमरावती इ.स.१६५८
विस्तार व अस्तित्व दाखविणारा नकाशा.
उत्तर
खुलासा...
• देऊळ..
• मस्जीद..
• लोकवस्ती..
• झाडे..
• रस्ता..
प्रमाण :- २० गुंठे = १ इंच.
शेती
लष्करास
चांदुरास
बडनेरास
अमीन


श्री. मंगेशवर मारोती
श्री जैन दि. मंदीर
श्री हनुमान मंदीर
जकी
होले
श्री रेडे मंदीर
उमीन
होले
होले
होले

उमरावतीच्या तटाबाहेरील जगदंबा ही कुंडिनपूरच्या राजघराण्याची कुलदेवता असेल तर, या जगदंबेचे मंदिरात पुजारी आणि झाडलोड करणारा सेवक वर्ग असला पाहिजे. हा सेवक वर्ग मंदिरात किंवा मंदिराचे जवळपास राहत असावा. त्यामुळे या जगदंबेचे मंदिराजवळ वस्ती नव्हती असे म्हणता येणार नाही.

भौगोलिक स्थिती : उमरावती हे गाव समुद्र सपाटीपासून १११८ फूट उंचीवर असून, २०.५६ दशांस उत्तरेकडे व ७७.४७ रेखांश पूर्वेकडे वसलेले आहे. उमरावती हे शहर नागपूरच्या दक्षिण-पश्चिम दिशेने ११३ मैल (रेल्वेने), ९६ मैल मोटर रोडने आणि मुंबई पासून उत्तर-पूर्व दिशेस ४१८ मैल (रेल्वेने) आहे. या भागातील हवा उष्ण असून पावसाचे प्रमाण सरासरी ३४ ते ४० इंच आहे. उमरावती हे गांव हल्ली मौजे गंभीरपूर, मौजे तारखेडा, मौजे महाजनपूर व मौजे राजापेठ एवढ्यांचे मिळून बनलेले असले तरी, ही वस्ती मुळात मौजे उमरावती, मौजे महाजनपुर, मौजे गंभीरपूर आणि मौजे तारखेडा[1] यांच्या एकत्र गावठाणावर वसलेली आहे. इ. सन १८६२ नंतर वऱ्हाडात जेव्हा जमाबंदीसाठी जमिनीची मोजणी झाली त्यावेळचे प्रत्येक गावाचे नकाशे (व्हिलेज मॅप्स्) तयार करून छापण्यात आले होते. ते नकाशे महसूल खात्यात पाहायला मिळतात. त्यावरून वर नमूद केल्याप्रमाणे चारही गावचे एकत्र गावठाण नकाशात दाखविले आहे. याच एकत्र गावठाणावर ह्या चारही वस्त्या एकमेकास लागून वसल्या होत्या असे दिसते. कालांतराने महाजनपुरा, तारखेडा व गंभीरपूर किंवा गमरापूर ही गावे उमरावतीचे मोहोल्ले गणल्या जाऊ लागले व या गावांनी आपले अस्तित्व उमरावतीत विलीन करून टाकले.

वर्णन:– उमरावती हे गाव बेनोडा डोंगराच्या पश्चिमेला सपाट जमिनीवर वसलेले असून, या गावच्या उत्तरेस आणि दक्षिणेस, पूर्वेकडून पश्चिम दिशेकडे वाहणारे दोन नाले आहेत. उत्तरेकडील नाल्यास 'दलेलपूरी' नाला असे म्हणतात. दलेलपूरी या नावाचे एक गोसावी फार पूर्वी त्या भागात होऊन गेले, त्यांचे नाव या नाल्यास मिळाले आहे. दक्षिण बाजूने

---

१ : मौजे तारखेडा प्र. बडनेर बिबी हे गाव, मनसबदार युसुफ उद्दौला यांस सैन्याचे बेगमी साठी जहागीर दिले होते. उत्पन्न सालीना रु. ५२५९-१०-० (आसफिया रेकार्ड : हैद्राबाद दप्तर : क्र. १३१६ ऑफ् १८५१)

(आता शहराचे मध्य भागातून) वाहणारे नाल्यास अंबानाला म्हणतात. कारण हा नाला देवीच्या दोन मंदिराचे मधून वाहतो. या दोन्ही नाल्यास आणखी काही नाले मिळून पुढे ह्या नाल्याचे पात्र महाजनपुऱ्याजवळ रुंद झाले आहे. तेथेच श्री भोलेश्वर महादेव मंदिराजवळ या नाल्याला 'साखरडोह' म्हणून डोह आहे. हा डोह पूर्वी बराच खोल होता. हा नेहमी पाण्याने भरलेला असे, आणि या डोहातून लग्नासाठी भांडी मिळत अशी दंतकथा प्रचलित होती. आता हा डोह पूर्वीसारखा राहिलेला नाही. तेथून हा नाला भातकुली रोड ओलांडून पुढे पेढी नदीला जाऊन मिळतो. वरील दोन्ही नाले पावसाळी आहेत. आता सर्व गावाची घाण वाहून नेणाऱ्या मोठ्या नाल्यासारखा यांचा उपयोग होतो.

उमरावती गावाची मूळ वस्ती दक्षिणोत्तर (महाजनपूर ते तारखेडा) अशी होती. परंतु आता हे गाव विशेषतः दक्षिण व पूर्व असे अफाट पसरले आहे आणि यापुढे शहराची वस्ती दक्षिण दिशेने बडनेराच्या बाजूने वाढण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.

इ. स. १७२२ नंतर : उमरावतीतील काही मोहल्ले फार जुने आहेत. शिवाय येथील जुम्मा मसजीद (हल्ली साबणपुरा), लिंगायत पंथाचे काही मठ, देवीची आणि काही वैष्णव-मंदिरे, तसेच जैन मंदिर ही फार जुनी आहेत. अमरावती-अचलपूर व्हाया वलगाव हा मार्ग आणि अमरावती-हैद्राबाद किंवा औरंगाबाद व्हाया बडनेरा हा मार्ग, हे फार जुने रस्ते आहेत. फार पूर्वीचे काळापासून या मार्गाचा दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे जाण्यासाठी उपयोग होत आहे. किंबहुना या मार्गावर उमरावती हे गाव स्थित असल्यामुळेच या गावाची आज आपण पाहतो तेवढी भरभराट होऊ शकली. वऱ्हाडचे राजकीय केंद्र फार पूर्वीपासून (इ. सन १०००) इलिचपूर हे असले तरी व्यापारी व आर्थिक केंद्र म्हणून उमरावतीला इ. सन. १७५० नंतर दर्जा प्राप्त झाल्याचे दिसून येते.

उमरावतीचे पूर्वेला बऱ्याच उंच टेकड्या आणि पोहऱ्याचे जंगल आहे. ह्या टेकड्या आणि शहर याचे मध्येच सपाट जमिनीवर एक उंच टेकडी आहे. तिला मालटेकडी म्हणतात. हल्ली रेल्वे स्टेशन आहे त्याचे पूर्वेकडील जमीन थोडी उंच व पश्चिमेकडील त्यामानाने सपाट आहे. जुन्या

शहरात एक मोठी गढी होती ती उध्वस्त झाली. तेथे आता कुंभारवाडा हा मोहल्ला वसला आहे. मूळ वस्ती या गढीच्या पूर्वेला व उत्तरेला होती. शेजारच्या महाजनपूर मध्येही गढी होती. ती देखील उध्वस्त झाली आहे. अंबादेवी आणि एकवीरा देवींची मंदिरे मूळ गावाच्या बाहेर होती. (आता शहराचे मध्यभागी आलीत. कारण मंदिराचे चोहोभोवताली वस्ती वाढली आहे.)

ऐतिहासिक काळात उमरावतीचा प्रगणा बडनेर बिबी हा होता आणि सरकार (म्हणजे जिल्हा) गावेल (गाविल गड) आणि प्रांत वऱ्हाड (सुभा वऱ्हाड) होता. बडनेरा परगण्याचे ठिकाण असल्याने त्याला राजकीय महत्त्व होते. उमरावतीला तसे राजकीय महत्त्व त्यावेळी नव्हते.

कसबे उमरावती : पेठ उमरावती : प्रगणे बडनेरबिबी मध्ये उमरावती हा 'कसबा[१]' होता. कसबा म्हणजे आठवडी बाजार जेथे भरतो आणि आजूबाजूच्या बऱ्याच खेड्यापाड्यातील लोक या आठवडी बाजारासाठी जेथे येतात असे गाव. कसब्याचे हे खास वैशिष्ट्य. शिवाय तेथे कारागीर असायचेच. या उमरावतीच्या वैशिष्ट्यामुळे फार पूर्वी पासूनच बडनेर परगण्यात उमरावती हे महत्त्वाचे गाव मानले जाई. पुढे उमरावती हे गाव 'पेठ[२]' झाले. पेठ म्हणजे, त्या गावच्या प्रमुखाने किंवा सत्ताधाऱ्याने प्रोत्साहन देऊन आणि आवश्यक ती जमीन व सवलती देऊन कायम स्वरूपाने निरनिराळ्या व्यवसायासाठी ज्या गावात दुकाने ओळ वसविली असे गाव. त्या गावाला पेठ म्हणत. याप्रमाणे पुढे (इ. स. १७२२ नंतर) हे गाव 'पेठ अमरावती' या नावाने सर्वपरिचित झाले. यावरून परगण्याचे ठिकाण जरी बडनेरा तरी व्यापार–उदीमाचे केंद्र मात्र उमरावती बनू लागले होते असे दिसते. पुढे उमरावती व्यापार-उदीमाचे बाबतीत आणि सावकारीचे बाबतीत संपूर्ण वऱ्हाडात अग्रगण्य असे केंद्र बनले, ते वर्णन पुढे येईल.

उमरावतीत निर्वासित ? : इ. सन १७४५ चे सुमारास एक अशी घटना घडली की त्यामुळे उमरावतीचे लोकसंख्येत एकदम हजारोंची भर पडली.

---

१ व २ : शिवाजी कालीन महाराष्ट्र : अ. रा. कुळकर्णी : पृ. २५
गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : लॉयल १८७० : पा. २०८

अकोल्याच्या तालुकदाराने तेथील लोकांना हाकून दिले. ते सर्व लोक उमरावतीस आश्रयासाठी आले. त्यावेळी रघूजी भोसल्यांनी त्यांना संरक्षण दिले. त्यासाठी रघूजीने सुमारे दीड लक्ष रूपये खर्चून शहराला भित बांधली[1]. त्यामुळे गावची लोकसंख्या एकदम वाढली. नवे मोहोल्ले वसवल्या गेलेत*.

वरील गोष्टीवरून असे दिसून येते की, हल्ली शहराला जो परकोट आहे तो बांधण्यापूर्वी शहराला भित होती. परंतु तिचा घेर लहान असावा. आणि ती भित हळूहळू नष्ट झाली असावी किंवा १८०५–१८०६ मध्ये परकोट बांधण्यास सुरवात झाली त्यावेळी, जुनी भित पाडून टाकली असावी. उमरावतीला संरक्षणासाठी भोसल्यांनी भित बांधली होती. ह्यावरून, उमरावतीकर भोसल्याकडून या गावची आबादी व व्यापार उदीम वाढविण्याचे, गावची भरभराट करण्याचे कसोशीने प्रयत्न होत होते हे दिसून येते. इ. सन १८५० चे आसपास उमरावतीचे जे मोहोल्ले होते ते खरकाडीपुरा, ब्राम्हणवाडा, तारखेडा, जुनीटाकसाळ, बुधवारा, नालसाहेबपूरा, तलावमोहल्ला, आणि या मोहोल्ल्यापासून बऱ्याच अंतरावर पूर्वेकडे मजरे औरंगपुर (हल्ली साबणपुरा). त्यानंतर इ. सन १९०० पावेतो उमरावतीची वस्ती झपाट्याने वाढली. व्यापार–उदीम खूप वाढला. त्यामुळे नवे मोहल्ले वसलेत ते जुन्या मोहोल्ल्यांना खेटूनच वसले. त्यात भाजीबाजारपासून सक्करसाथ पर्यंतचा भाग, जुनाबजाजा, धनराजलेन, पटवीपुरा आणि साबणपुऱ्याचे पश्चिमेकडे वस्ती वसली गेली. तसेच गावाचे पश्चिमेला माळीपुऱ्याकडे वस्ती वाढली असे दिसते.

या मोहोल्ल्यापैकी, जुनी टाकसाळ नावाचे मोहोल्ल्यात नाणे पाडण्याचा कारखाना (टाकसाळ) होता. हा कारखाना त्या काळच्या रिवाजाप्रमाणे खाजगी सावकाराचा असावा (उमरावतीचे टाकसाळीबद्दल तिसऱ्या प्रकरणात माहिती दिली आहे). बुधवारा – माताखिडकी या मोहोल्ल्यात

---

१ गॅझेटियर फॉर हैद्राबाद अ. डि. १८७० : पा. १५४

* इ. स. १७२२ ते १७७५ या काळात वस्तुतः राणोजी भोसले यांचा उमरावती हा 'इनाम' होता, व त्याची सत्ता या गावावर चालत असे. त्यामुळे वरील घटनेत 'रघूजी' हे नाव कसे आले? ते कळत नाही. कदाचित राणोजी ऐवजी 'रघूजी' हे चुकन आले असावे.



चित्र क्र ४ : श्री अंबादेवी संस्थानचे महाद्वार व दर्शनी भाग.

लिंगायत व्यावसायिकांची राहण्याची घरे मोठ्या प्रमाणात होती. त्याचे मागील पटवीपुऱ्यात पटवी जातीची वस्ती होती. तसेच ब्राह्मणवाडा हा भाग ब्राह्मणांचा होता. खरकाडीपुऱ्यात आणि टाकसाळ मोहोल्ल्यात मात्र विविध जातीतील लोकांची व विशेषत: श्रमिकांची वस्ती होती. जुना बजाजा ते सक्करसाथ हा भाग मुख्य व्यापाराचा होता. आणि त्याचे सभोवारच व्यावसायिकांची घरे व गोदामे होती.

इ. सन १८०५ मध्ये शहराला परकोट बांधण्याचे काम सुरू झाले. तेव्हा परकोटाचे आत, परकोटाचे भितीपासून बराच भाग मोकळा होता. पण नंतर थेट परकोटाच्या भितीपावेतो वस्ती झाली. सक्करसाथ ते भुसारी गेटपावेतो आणखी व्यापाराची दुकाने वाढली. परकोटाचे आत दाट लोकवस्ती होती. घरांची दाटी होण्याचे कारण हेच की, त्याकाळी उमरावतीचा व्यापार-उदीम झपाट्याने वाढत होता. त्यामुळे कामधंदा शोधणारांचा उमरावतीकडे ओढा असे. असे असले तरी येणारे नवे लोक, दाटीवाटीने का होईना, पण मुख्य वस्तीला खेटूनच राहत. कारण सुरक्षिततेचा प्रश्न याकाळी महत्त्वाचा होता. त्यामुळे ही जुनी वस्ती दाट झाल्याचे दिसून येईल. परकोट बांधल्यानंतर तर, कामकाजासाठी येणारे नवे लोक परकोटाचे आतच जागा मिळेल तेथे वस्ती करीत. परकोटाचे बाहेर खुले मैदान व पलीकडे जंगल व शेते होती. देवीच्या देवळात दर्शनाला जायचे म्हणजे १०-२० लोक जमून जात. रेल्वे स्टेशन १८५९ चे सुमारास झाले, त्यानंतर रेल्वे स्टेशनावर जायचे झाल्यास ४:६ माणसांना तेथपर्यंत सोबत करावी लागे. परकोटाचे बाहेर असा निर्जन भाग होता.

जागा मिळेल तेथे घरे बांधल्यामुळे जुन्या उमरावती शहराची रचना फार अव्यवस्थित झाली. रस्ते, गल्ल्या सरळ नाहीत, गल्ल्या जास्त, घरांची दाटी बेसुमार झालेली, ही स्थिती.

परकोटाच्या आंतील वस्तीत, विठ्ठल, दत्त, सोमेश्वर, लक्ष्मी-नारायण, मुरलीधर, गणपती, हनुमान, नीळकंठेश्वर, राधाकृष्ण, नृसिंह इत्यादी देवांची मंदिरे आहेत. पण देवीचे मंदिर नाही. (आता थोड्या दिवसांपूर्वी खरकाडीपुऱ्यात एकवीरा देवीचे नवे मंदिर बांधले आहे.) शिवाय तीन मसजिदा व एक बोहरा मसजीद, काही वैष्णव मंदिरे व ५-६ जैन मंदिरे आहेत.

गावच्या वाढत्या वस्ती सोबतच गुजरी बाजार आला. तो भाजी बाजार व दहिसाथ येथे भरत असे. दहिसाथीजवळील गुळतक (हल्ली बसवेश्वर चौक) येथे गुळाचा व साडयांचा ठोक व्यापार होई. परकोटाचे आत सेठ पुरणमल यांचा मोठा गाथवाडा होता[१]. नंतर तेथे इंद्रभुवन थिएटर झाले. परकोटाचे आतच जुन्या व्यायाम शाळा (आखाडे) होत्या. हनुमान व्यायाम शाळेची सुरुवातही परकोटाचे आत राजा बिसनचंद यांचे हवेलीत अंदाजे सन १९१४ चे सुमारास झाली.

उमरावतीत फार पूर्वी गोसाव्याचे आखाडे होते असे सांगतात, पण अलीकडचा सर्वात जुना आखाडा श्री तुकाराम न्हाव्याचा आखाडा. हा पटवीपुऱ्यात इ. स. १९०० च्या पूर्वीपासून आहे.[२] नंतर इ. स. १९०७-८ साली जोग चौकाचे एका भागात महाराष्ट्र तालीमखाना[३] या नावाने एक आखाडा चालू होता. १९१४ मध्ये हनुमान व्यायाम शाळा परकोटाचे आंतच सुरू झाली[४]. तुळजागीर बाबाचा आखाडा याच काळातील असावा. १९२० च्या नंतर श्रीराम व्यायाम शाळा, शिवाजी आखाडा, जुगलकिशोर व्यायाम शाळा, बालाजी आखाडा, प्रताप व्यायाम शाळा, बाहुबली व्यायाम शाळा, उदासी बाबाचा आखाडा, अंबादेवी तालीम, याशिवाय इंद्रभुवन थिएटर समोर एक व नागपूरी गेट जवळ एक याप्रमाणे दोन मुस्लिम आखाडे होते. त्यातील काही आजही चालू असून, हनुमान व्यायाम शाळेची आज मोठी विशाल संस्था बनली आहे. हिंदु हायस्कूल मध्येही श्री. देवभानकर हे हेडमास्तर असताना त्यांनी एक व्यायाम शाळा सुरू केली होती.

पूर्वीच्या काळी मालाची वाहातुक मुख्यतः बैलाचे पाठीवरून करीत असत. बैलगाडया, घोडे यावरूनही वाहातुक चालत असे. पण वाहातुक व्यवसाय मुख्यतः बैलाच्या पाठीवर गोण्या टाकून होत असे. त्यामुळे हजार-पाचशे बैलाचा तांडा बाळगून वाहातुकीचाच (ट्रान्सपोर्ट) व्यवसाय काही लोक करीत असत. असे लोक उमरावतीत होते. कारण उमरावती ही मोठी

---

१ : नगर वाचनालय : ६९ वर्षाचा अहवाल : १९३६ : पृ. ६

२ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र पा. ८१

३ : उदय दि. ११ ऑक्टोबर १९२७

४ : उदय दि. २९ नोव्हेंबर १९२१

पेठ असून पश्चिम किनाऱ्यावरून मालाची ने-आण केली जात असे. त्यामुळे हा धंदा करणारे लोक उमरावतीत होते.

असे दिसते की, तेराव्या शतकाचे अखेरीस उमरावतीत जैन व लिंगायताची वस्ती बरीच असावी. इ. स. १६०० चे आसपास येथे मुसलमानांची वस्ती झाली. इ. स. १७०७–८ ते १७२२ या काळात हे उजाड गाव होते. त्यानंतर मात्र राणोजी भोसल्यांनी ही वस्ती बसवली; इतकेच नव्हे तर चांगली भरभराटीला आणली. म्हणजे हल्ली जी जुन्यांत जुनी वस्ती–मोहल्ले– आहे. ती इ. स. १७२२ नंतरची आहे.

परिशिष्ट क्र. १

(पान ११ पहा)

Exhibit D-20

Translation of Sanad (Jalcos 1068 A. H.)

Jaloos 1068 A. H.

Ben
Miran
Shah.

Bin
Amir
Temur

Alamgir
Badshah Ghasi
Mohiuddin Mohammad
Abdul Mujaffar

1068 A. H.

Ban
* § (* Ille-
gible)

Bin
Shah
Jahan.

Bin
(* Ille-
gible.)

Bin
Jahan
Gir

Bin
(* Ille-
gible

Bin
Humayun

Bin
Akbar
Shah.

Bin
Mohammad
Babad Sha

Be it known to the presennt and future administrators, the present and future **Jagirdars**, the present and future desh-mukhas, the present and future **Desh. Pandias** and the present and future **Sadar-Pandias** of the province of Berar payanghat (probably rafers to lands below the ghat) and Behroot that as a report of piety and relience upon God of Farid Shah Darwesh and Noor Mohammad Darwesh and their services to the mosque has reached the ears of his August Majesty who has heard it personally by his own royal ears, it is hereby made konwn to pargana Badnera Bi Bi Sarkar Gawel, Subha-i-Berar, Payanghat and to the Mukaddams (headmen) and **rayats** (subjects) to mouja Amraoti Tarkheda, Gumrapur, Aurangpur etc., that for the services of Muazan (i. e. calling for prayers), for the salary of Pesh Imami (i. e. conducting prayers) for defraying the charges of brooming the inside of mosque, for matting thereon and for meeting the expenses of the (lamp) oil, lighting the mosque during the said month of Ramzan, and for (meeting) the expenses of illuminating the mosque on the night of Shabi-Qadar, that is, the 27th twenty seventh night (of the said month) and for meeting the expenses incurred in feeding travellers and wayfarers; in the mosque constructed by Noor Mohammad Shah Darwesh and Farid Shah Darwesh in the said mouza Amraoti in Talug and Mohalla Aurangpur, the following grant has been made in pursuance of a signed order and sealed mandate:— Two **Netans** of black soil free from Government assesment, situate in the said mouza Amraoti in the taluga of Tarkheda, and 7 seven **bighas** and 15 fifteen Pands of Pandhari (i. e. white soil) for purposes of planting a garden situate in Mohalla Aurangpur and six rupees per day.....(Torn*) [*In torn condition Readable as **bagicha** meaning garden.] and an allowance of rupees five per day from the net income of Amraoti from

the black soil, that is from cultivated land of ilaqa Tarkheda; all of which is to be in current coins. Besides this, other **Siwai Rasums** (i. e. additional dues) pertaining to Qa zi-ship in the said pargana and a right to receive rupee one and four annas as fee for solemnization of marriage and rupee five as **nazarana** at the time of both the Id Festivals**(torn) have been granted to them in perpetuity. Moreover, the administrators and officers aught to know that the said annual emoluments granted to the said persons for carrying **out the** services of **Pesh.Imam** (i. e. conductor of prayers), **Muzaam** (called for prayers), cleaner of the mosque and **Khatib** (preacher) in the Jama Masjid of of the said mouja should be considered as permanent and dues attached thereto, should, in accordance with the order given above be continued to the said Shah-Sahibs from year to year, **generation after** generation, herediatarily so long as (the said **Jama Masjid**) is* (*torn), so that the said Shah Sahibs may engage themselves day and night in praying to the Almighfy for the continuance of eternal empire and knowing this arder as imperative should act according to it.

Written in 1068 A. H. on the 7th. †

---

† : नागपूर हॉयकोर्ट अपील क्र. १० ऑफ १९४० : एक्झिबीट नं. डी–२०; (हिजरी १०६८ = १६५८ इसवी.)

प्रकरण दुसरे

अनुक्रमणिका

अमरावतीकर भोसले ..... पूर्व पीठिका
रूपाजी भोसले ..... परसोजी भोसले
राणोजीची कामगीरी व सवाई संताजी पदवी.
दिल्ली मोहीम ..... माळव्याचे स्वारीत .....
बुदेलखंडाचे स्वारीत ..... दिल्लीचे स्वारीत
वसईची मोहीम ..... निर्वासितांना आश्रय
राणोजीची वतने, सरंजाम वगैरे .....
रघूजी व राणोजीची कान्होजीवर स्वारी
राणोजीचा मृत्यु ..... अमरावतीकर
भोसल्यांची वंशावळ ..... जिजाजी भोसले.
कुंभारीची लढाई ..... उमरावतीस दंड .....
उमरावतीकर शिवाजी भोसल्याचे बंड .....
शेवटचे उमरावतीकर भोसले .....
श्रीमंत माधवराव पेशवे उमरावतीत.....
वेलस्लीची उमरावतीत छावणी .....
अमरावतीत इंग्रजांच्या पलटणी.....
परिशिष्ठ क्र. १.....

प्रकरण दुसरे

उमरावतीकर भोसले

उमरावतीचा संस्थापक व वर्धक राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले : मौजे उमरावती व मजरे अवरंगपूर या गांवची निम्मे पाटिलकी इ. स. १७१९ मध्ये राणोजीने खरेदी केल्या नंतर छत्रपती शाहु महाराज यांनी दि. ९ ऑक्टोबर १७२२ इ. रोजी राणोजीला मौजे उमरावती प्र. बडनेरबिबी हे गाव वंशपरेने इनाम दिले होते[१]. या शिवाय पुढे राणोजीला शाहु महाराजांनी आणखी कित्येक गावे लष्करी खर्चासाठी मोकासा म्हणून दिली होती. या प्रमाणे राणोजी हा उमरावतीचा इनामदार, पाटील मोकादम आणि मोकासदार झाला.

राणोजीने नंतर आपले मुख्य ठाणे उमरावतीसच ठेवले. त्याने उमरावतीस गढी बांधली[२] आणि हे ओसाड गाव वसविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यामुळे थोडयाच काळात उमरावती प्रथम 'कसबा[३] व नंतर पेठ[४]' बनले. राणोजीमुळेच उमरावतीची उन्नती झाली, ती इतकी की, पुढे सतराव्या शतकाचे शेवटल्या दशकात उमरावती हे गाव व्यापार

---

१ : शाहूने राणोजीस दिलेली उमरावतीची सनद परिशिष्ठ क्र. एक मध्ये दिली आहे.

२ : भोसल्यांची ही गढी उमरावतीत, हल्ली कुंभारवाडा मोहोल्ला आहे तेथे होती. त्या भागाला अजूनही 'गढी'च म्हणतात. ही भोसल्यांची गढी इ. स. १८७० पावेतो पडक्या स्थितीत कायम होती. नंतर ती नष्ट झाली व तेथे मोहोल्ला वसल्या गेला.

३ व ४ : 'कसबा' व 'पेठ' चा अर्थ पहिल्या प्रकरणाचे पान २७ वर दिलेला आहे.

उदीम व सावकारीचे बाबतीत वऱ्हाडप्रांतात अग्रगण्य असे बनले होते[१]. या ओसाड गावाची पुनर्वसाहत करून ते भरभराटीला आणण्याचे सर्व श्रेय राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले यांसच आहे.

उमरावतीकर भोसले घराण्याचा संस्थापक मूळ पुरुषही राणोजीच होय. या घराण्याच्या चार पिढ्यांनी उमरावतीची इनामदारी व पाटिलकी भोगली आहे. सुमारे पाऊणशे वर्षे हे घराणे उमरावतीस नांदले व नंतर राणोजीचा पणतु सखोजी, याचा नातु बाळासाहेब हा सुमारे इ. स. १८०० मध्ये नागपुरास राहायला गेला. या घराण्याचा वंशज आजही नागपूरात विपन्नावस्थेत राहत आहे.

पूर्व पीठिका : उमरावतीकर राणोजी भोसल्यांची थोडी पूर्व पीठिका येथे कथन केल्यास, राणोजीच्या घराण्याची व त्याच्या पराक्रमी पूर्वजांची ओळख होऊन या प्रकरणातील हकीकत समजणे सोयीचे होईल म्हणून ती येथे देणे उचित ठरेल.

राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले हे मूळचे 'हिंगणी–बेरडी' तर्फ पाटस, प्रगणे पुरंदर, प्रांत पुणे येथील राहणारे असून, हे 'हिंगणीकर' भोसले घराणे त्याकाळी बरेच प्रसिद्ध होते. या हिंगणीकर भोसले घराण्याचे नाते, शिवाजी महाराजांच्या प्रसिद्ध वेरुळकर भोसले घराण्याशी असावे.

'हिंगणी–बेरडी' या गावची पाटिलकी राणोजीच्या पूर्वजांकडे होती. त्यांना 'हिंगणीकर भोसले' असे म्हणत. या घराण्यात काही इतिहास प्रसिद्ध असे पराक्रमी पुरुष जन्माला आलेले आहेत. त्यांची माहिती पुढे दिली आहे.

या हिंगणीकर भोसले घराण्याची सुरुवात मुधोजी व रूपाजी भोसले–बंधु पासून धरतात. हे दोघे बंधु शहाजी राजाचे समकालीन होते व त्यांच्या प्रमाणेच ते आपल्या वडिलासोबत अहमदनगरच्या निजामशाहीत चाकरीला होते असे दिसते. कारण रूपाजीला एकनिष्ठ सेवक म्हणून

---

१ : 'कन्फेशन ऑफ ए ठग' : कॅ. मेडोज टेलर : पान ७६ . ७७ व कर्नल वॅलेसचे पत्र क्र. ११ : दि. २२-६-१८०५ (एल्फिस्टन पत्र व्यवहार, भाग १ पा. २४४-४५)

अहमदनगरच्या निजामशाहीकडून वऱ्हाडांतील 'भाम' (हल्ली यवतमाळ जिल्हा) हे गाव जहागीर मिळाले होते.[१] पुढे ही निजामशाही बुडाल्यानंतर व शिवाजी महाराजांचा उदय झाल्यानंतर, मुधोजी हा हिंगणीस राहून शेती व घरचा कारभार पाही तर रूपाजी हा आपले पुतणे परसोजी व साबाजी यांचेसह शिवाजी महाराजांचे सैन्यात पागांचा सरदार[२] होता. मुधोजी व रूपाजी यांची सांपत्तिक स्थिती चांगली होती. ते धार्मिक वृत्तीचे व श्रीमंत होते असे दिसते. त्यांनी खंडेरायाची व देवीची अशा दोन सोन्याच्या मूर्ती, प्रत्येकी सव्वापांच मणाच्या केल्या होत्या अशी आख्यायिका आहे[३].

या हिंगणीकर भोसले घराण्यात रूपाजी, परसोजी, कान्होजी, राणोजी (उमरावतीकर), व रघूजी (नागपूरकर) असे पराक्रमी वीर निर्माण झाले. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व शाहु महाराज यांच्या कारकिर्दीत या हिंगणीकर भोसले घराण्यातील पुरुषांची कामगिरी मोठी आहे.

---

१ : नागपूर प्रांताचा इतिहास : या. मा. काळे : पा. ४४

२ : **पागांचा सरदार** : "बरेच बारगीर व घोडे एकत्र केले म्हणजे त्याची पागा बने. पागेवरच्या अंमलदारास पाग्या म्हणत. एका पागेत दहा पासून पांच सातशे पर्यंत घोडे ठेवण्यात येत. पाग्याचा दर्जा त्याच्या हाताखालच्या घोड्याच्या संख्येप्रमाणे चढता असे. ज्याचे पागेत पांच–सातशेपर्यंत घोडा त्याची गणना पुढे सरकारात होऊन त्याला लवाजमा सरदाराप्रमाणे मिळे. त्याच्या पागेकडे नौबत, निशाण, पालख्या वगैरे इतमाम; फडणीस, पोतनीस वगैरे दरकदार; मशालजी, शिग्ये, पखाली, खासदार, नालबंद, दाणेकरी, जासूद, गारदी, फरास, डेरे, राहुटया इत्यादी सरंजाम; औझ्याची व दाणा वैरणाची तट्टे, बैल, ऊंट, हत्ती इत्यादी जनावरे असत. त्याचा सर्व कच्चा खर्च सरकारातून चाले. एक पागा म्हणजे हजारो लोकांचे पोट भरण्याचे साधन. (हरिवंशाची बखर : खरे : पा. ८) सारांश मोठा पाग्या म्हणजे सरदार.

३ : मध्ययुगीन चरित्रकोश : चित्राव शास्त्री : पा. ६४४

रूपाजीला संतती नव्हती. मुधोजीला बापूजी, परसोजी व साबाजी हे तीन पुत्र होते. बापूजी हा वृत्तीवर घरी राही तर, परसोजी व साबाजी हे आपला चुलता रूपाजी याचे सोबत शिवाजीचे सैन्यात राहून पुढे आलेत. बापूजी, परसोजी व साबाजी हे शिवाजीचे समकालीन होते.

रूपाजी भोसले : हा हिंगणीकर भोसले घराण्याच्या मूळ पुरुषापैकी एक असून, तो प्रथम अहमदनगरच्या निजामशाहीत व नंतर शिवाजी महाराजांचे सैन्यात पागांचा सरदार होता. शिवाजी महाराजांचे काळात, नंतर संभाजी राजांचे काळात व स्वराज्यावर संकट आले तेव्हा राजाराम महाराजांचे काळात रूपाजीने अनेक प्रसिद्ध लढायात मर्दुमकी गाजविली आहे.

शिवाजी महाराजांचे काळातील, विजापूरच्या सरदाराशी झालेले उमराणीचे युद्ध, साल्हेरीचे भयंकर युद्ध, संभाजीचे काळांतील रुहिल्ला-खानाशी कोल्हापुर–पन्हाळ्याचे दरम्यान झालेले युद्ध, रामसेज किल्ल्याची लढाई, कल्याण – भिवंडीची प्रसिद्ध भयंकर लढाई इत्यादी प्रसिद्ध युद्धात त्याने पराक्रम गाजविला आहे. इतिहासात त्याची नोंद आहेच.

संभाजी राजांचे अमानुष वधानंतर स्वराज्यावर मोठे दुर्घट संकट आले. राजाराम महाराजांना दक्षिणेत चंदीचे किल्ल्यात राहून तेथून औरंग-जेबाशी लढा द्यावा लागला. राजाराम महाराज जिंजिस जाण्यासाठी दि. २६ सप्टेंबर १६८९ रोजी पन्हाळगडावरून निघाले. त्यावेळी प्रवासात त्यांच्या जीवास जीव देणारी पुष्कळ मंडळी होती. त्यांत रूपाजी भोसले हाही होता. या प्रवासात विजापूरच्या मोगल सरदाराने त्यांचा पाठलाग केला तेव्हा, लक्ष्मेश्वराजवळ रूपाजी भोसल्याने त्या सरदारास जखमी केले, त्यावेळी झालेल्या लढाईत रूपाजीसह ७० आसामी मोंगलांनी पकडले[१]. पण राजाराम महाराज सुखरूप पुढे गेले.

इकडे महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण सचिव यांचे नेतृत्वाखाली मराठ्यांनी औरंगजेबाला कोठेही ठाणे बसवू दिले नाही.

---

१ : मराठी रियासत : सरदेसाई : खंड १ : पा. २४–२६

रूपाजी जिंजीकडून परत आल्यानंतर त्याला पराक्रमासाठी मोठे क्षेत्र मोकळे होते. या धामधुमीला 'भालेराई'[१] म्हणत.*

या भालेराई पद्धतीच्या युद्धाचे उत्पादक व कल्पक रूपाजी भोसले व बाबाजी भालेराव हे होते. गनीमी काव्याने अचानक हल्ले करून शत्रूची दाणादाण ते उडवून देत. यावेळी रूपाजी हा बराच वयस्क होता. हे लक्षात घेतले तर, त्याच्या पराक्रमाची कल्पना येईल.

शिवाजी महाराजांचे निधनानंतर गादीवर कोणास बसवावे याचे सल्लामसलतीसाठी मातोश्री सोयराबाईनी जे मुत्सद्दी व सरदार बोलाविले होते त्यांत रूपाजी भोसले हा होता. यावरून स्वराज्यात रूपाजी भोसल्याचा दर्जा काय होता हे दिसून येते. बराच वयस्क झाल्यानंतर रूपाजी हा आपल्या जहागिरीचे गावी 'भाम' येथे जाऊन राहिला होता.

परसोजी भोसले : हिंगणीकर भोसले घराण्यातील दुसरा प्रसिद्ध व पराक्रमी पुरुष राणोजीचा चुलता परसोजी भोसले हा होय. सुरवातीला तो आपला चुलता रूपाजी याचे हाताखाली सैन्यात काम करीत असे. परसोजी व त्याचा भाऊ साबाजी हे दोघेही रूपाजीचे घोडदलात होते. रूपाजीचे हाताखाली व शिवाजी महाराजांच्या तालमीत हा परसोजी तयार झाला होता. आपल्या चुलत्यासोबत परसोजीने अनेक लढायात भाग घेतला होता. संभाजी राजाचे काळात बापूजी, परसोजी व साबाजी या तिन्ही बंधूंनी एकत्र व स्वतंत्र असे सैन्य बाळगले होते असे दिसते[२].

राजारामाचे काळात, दक्षिणेत तळ देऊन बसलेल्या औरंगजेबाला दिल्लीकडून येणारी मदत तोडण्यासाठी राजारामाने परसोजीला वऱ्हाडात पाठविले होते. तेव्हा परसोजी प्रथम उमरावती नजीकचे 'भानखेड' येथे काही काळ तळ देऊन होता व नंतर त्याने 'भाम' येथे चुलत्याचे जहागिरीचे गावी ठाणे दिले होते.

---

१ : सुलभ विश्वकोश : दाते : पा. १८११

* "बाबाजी व रूपाजी भोसले हे दोघे बंधू हातात भाले घेऊन एकटेच युद्धास निघाले. त्यांच्या या पराक्रमावरून शिवाजीचे आमदानीत त्यांस 'भालेराव' ही पदवी मिळाली होती (सरदेसाई खंड १ : पा. ३१)

२ : नागपूरकर भोसल्यांची बखर : गुप्ते : पा. १७

राजारामाचे गंगथडीवरील मोहिमेतही परसोजी होता. त्यानंतर इ. स. १६९९ मध्येच परसोजी भोसले यांस, "बहुत कर्ते मर्द जाणून सेनासाहेबसुभा" असे पद व सेनापतीप्रमाणे सरंजाम देऊन, गोंडवण, वऱ्हाड वगैरे प्रांतात अंमल त्यांनी बसविला, तो प्रांत त्याजकडे सोपविला व वऱ्हाडातील चौथाई व सरदेशमुखी यांच्या वसुलीचे काम राजारामाने त्याजकडेसच ठेवले.' त्यासाठी परसोजी पुन्हा वऱ्हाडात आला व 'भाम' येथेच त्याने आपले ठाणे ठेवले.

औरंगजेबाचे मृत्यूनंतर त्याचा मुलगा आजमशहा याने झुल्फिकार-खानाचे सल्लेनुसार दि. १ मे १७०७ रोजी शाहूस मुक्त करून दक्षिणेत पाठविले. त्यावेळी त्यांना प्रथम जे सरदार मिळाले त्यांत परसोजी भोसले हा आपल्या १५००० सैन्यासह मिळाला होता. शाहूंनी देखील, ते गादीवर बसल्यानंतर परसोजीस सेनासाहेबसुभा हे पद आणि चौथ व सरदेशमुखी वसुलीच्या सनदा कायम करून दिल्या होत्या. परसोजीने वऱ्हाड-गोंडवाना भागात मराठ्यांच्या सत्तेचा पाया मजबूत करण्याचे कार्य केले. परसोजी इ. स. १७०९ मध्ये वारला, तेव्हा त्याचा मुलगा कान्होजी यास हे पद व सनदा देण्यात आल्या होत्या.

शिवाजी महाराजांचे नामांकित सरदारांचे यादीत रूपाजी भोसले व परसोजी भोसले यांची नावे आहेत[1].

शाहु महाराज मोंगलाचे कैदेतून सुटून स्वराज्यात आले तेव्हा शाहूस तोतया ठरविण्याकरिता ताराबाईने (राजारामाची विधवा) बापूजी भोसले हिंगणीकर यांना धाडून दिले होते. त्याची व शाहूची भेट गोदावरी-तीरी झाली. तेव्हा शाहू खरा, अस्सल आहे, तोतया नव्हे अशी त्याची पूर्ण खात्री झाली. नंतर उभयता भावांनी (बापूजी व परसोजी यांनी) शाहूच्या ताटात सर्वासमक्ष भोजन केले. या योगाने सर्वांचे संशय दूर झाले. अशा प्रकारे परसोजी शाहूच्या उपयोगी पडला.[2] त्यामुळे या हिंगणीकर भोसले बंधूंचे स्वराज्यात वजन वाढले.

त्याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांचे निधन झाले त्यावेळी संभाजी महाराज हे पन्हाळगडावर कैदेत होते. तेव्हा "महाराजांची

---

१ : सभासद बखर : शं. ना. जोशी : पा. ९८

२ : काव्येतिहास संग्रह (३१) (नागपुरकर भोसल्या संबंधीची कागदपत्रे) : सांं : पान २ लेख १.

क्रिया साबाजी भोसले याजपासून करवून समाप्त केली.....[१]" (यावरून वेरुळकर व हिंगणीकर भोसल्यांचे नाते लक्षात यावे.)

शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि राजाराम महाराज यांचे कारकिर्दीत रूपाजी, परसोजी व साबाजी भोसले हिंगणीकर हे प्रसिद्धीला आले तर, शाहु महाराजांचे कारकिर्दीत परसोजीचा मुलगा कान्होजी बापूजींची मुले संताजी व राणोजी आणि राणोजीचा पुतण्या व बिंबाजीचा मुलगा रघूजी हे प्रसिद्धीला आले.

रघूजी हा आपला चुलता राणोजी याचे सैन्यात काही काळ नोकरीला होता. त्याबद्दलचा करारनामा उपलब्ध आहे. (परिशिष्ट पहा)

या प्रमाणे उमरावतीकर राणोजी भोसले याचे पूर्वज पराक्रमी होते व त्यांनी आपली शक्ती स्वराज्याचे सेवेसाठी खर्च केली हे वरील माहितीवरून दिसून येईल.

राणोजीची कामगिरी व 'सवाई संताजी' पदवी.

दिल्लीचे मोहिमेत : इ. स. १७१९ च्या फेब्रुवारीमध्ये, शाहू महाराजांनी पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ पेशवे यांना दिल्लीस रवाना केले. त्यावेळी दिल्लीचे पातशाहीत सय्यद बंधूंचे वजन होते व त्यांना दिल्लीच्या पातशाहीचे राजकारणासाठी मराठ्यांच्या मदतीची गरज होती. म्हणून शाहूराजाशी सय्यदांनी दक्षिणेतील सहा सुभ्याच्या चौथ व सरदेशमुखीच्या सनदा आणि मोगलाच्या कैदेतील मातोश्री येसूबाई वगैरे मंडळींना सोडण्याचा करार करून मराठा सैन्य दिल्लीस नेले होते, त्यावेळी पेशव्याबरोबर जे सरदार देण्यात आले त्यात राणोजी व त्याचा वडील भाऊ संताजी हे आपल्या सैन्यासह होते[२].

---

१ : मल्हार रामराव विरचित, संभाजी राजे यांचे चरित्र : साने : पा. ३

२ ".....बालाजी पंताची दिल्लीस रवानगी केली. त्याज बरोबर कान्होजी भोसले, सेनासाहेब सुभे फौजेसुद्धा देण्यासाठी बोलावू पाठविले. हरवक्त त्यांचे पोहोचणे न झाले. सबब संताजी भोसले व राणोजी भोसले हे सेनासाहेबांचे सख्खे चुलत बंधू तेही आपले हुजुरात मा तबरीने होते. त्याजला जमावासहीत पेशवे यांचे बरोबर दिल्हे." (नागपूरकर भोसल्यांची बखर पा. ३६-३७)

मराठ्यांची ही सेना बाळाजी विश्वनाथ यांचे नेतृत्वाखाली दिल्लीनजीक पोचली व दिल्लीपासून काही अंतरावर या फौजने तळ दिला. त्यावेळी संताजी भोसले हा, पंतप्रधान बाळाजी विश्वनाथ यांना न सांगताच आपल्या फौजेसह दिल्ली शहरात शिरला.

त्यावेळी सैय्यदाचे सैन्यापैकी अमीनखान चीन बहादूर, झकरियाखान व हुसेनअलीखान हे आपल्या सैन्यासह सय्यदाचे दरबाराकडे निघाले होते. वेळ सकाळची होती. चांदणी चौकात मोगलांच्या या सैन्याबरोबर संताजी भोसल्याच्या सैन्याची चकमक उडाली. आणि चकमकीत संताजीसह १५०० मराठा सैन्य ठार झाले. हा प्रकार दि. २८ फेब्रुवारी १७१९ रोजी घडला+.

महंमद पातशहाला हा प्रकार जेव्हा कळला तेव्हा तो भयचकित झाला व त्याने ताबडतोब पुढील परिणामांची कल्पना करून, जरी मराठ्यांनी आपलेकडून युद्ध सुरू केले होते तरी, समेट घडवून आणला व ही चकमक बंद पाडली. या प्रसंगी संताजी सोबत राणोजी होताच. त्यानेही चकमकीत तलवार गाजविली होती. बादशहाने चौकशी केली व शाहुराजा हाही भोसले आणि राणोजी हाही भोसले. तेव्हा दूरवर दृष्टी ठेवून बादशहाने राणोजीस 'सवाई संताजी' ही पदवी, कलगी व सवाईढाल, खिलात बहुमान देऊन, पंतप्रधान बाळाजीपंतांना सांगून पाठविले की, शाहु राजास सांगावे की, याचा (राणोजीचा) सांभाळ सर्व प्रकारे करावा[१] या प्रमाणे राणोजीचा सन्मान झाला व पदवी मिळाली.

+ लेटर मुघल्स : इरविन : भाग १ : पा. ३८२–८३ वर, या घटनेची विकृत माहिती दिलेली आहे. त्यासाठी मुस्लिम इतिहासकार खाफीखान याचा आधार घेतला असून, मराठ्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ते साफ चूक असून, संताजीचे पाठीशी मराठ्यांचे चाळीस हजार सैन्य दिल्लीचे सीमेवर होते. अशा स्थितीत मराठा सैन्याला घाबरण्याचे काहीच कारण नव्हते. झालेला प्रकार गैर समजुतीमुळेच झाला यात शंका नाही. कारण मराठ्यांची फौज ही महंमद पातशहाला मदत करण्यासाठी काही अटीवर दिल्लीस आलेली होती.

१ नागपूरकर भोसल्यांची बखर : पा. ३७–३८



चित्र क्र. १५ : वसईचा किल्ला (पृष्ठ ४९ पहा)





चित्र क्र. १६ : राणोजीच्या सनदा (पृष्ठ ६७ पहा)



चित्र क्र. १७ : राणोजीच्या सनदा (पृष्ठ ६७ पहा)

चित्र क्र. १८ : श्रीमंत माधवराव पेशवे (पृष्ठ ६३–६४ पहा)

माळव्याचे स्वारीत : (इ. स. १७२३ ते ३०) बाजीराव पेशव्यांनी चिमाजी आप्पास माळव्यात पाठविले. चिमाजी आप्पा खान्देशातून सरळ उत्तरेला गेले व बाजीराव पेशवे मागाहून वऱ्हाड-नागपूर मार्गाने, देवगडच्या बाजूने बुंदेलखंडात गेले.

चिमाजीआप्पा माळव्यात पोचण्यापूर्वीच पिलाजी जाधव, राणोजी भोसले उमरावतीकर, कृष्णाजी हरि, केसो महादेव वगैरे सरदार माळव्यात पोचले होते. त्यात रघूजी भोसले हाही गेला होता. परंतु या सरदारांना दाबणारा कोणी नसल्यामुळे ते आपसात भांडत राहिले व मुख्य शत्रू, माळव्याचा सुभेदार दयाबहादूर हा मोकळाच राहिला.

चिमाजीआप्पा माळव्यात पोचण्यापूर्वी या मराठा सरदारांची आपसातच एकमेकावर कुरघोडी करण्याची कशी शर्यत लागली होती या संबंधीची अनेक पत्रे उपलब्ध आहेत. पण नमुन्यादाखल एक पत्र येथे उधृत करीत आहे.

कृष्णाजी हरि हा सरदार चिमाजी आप्पास लिहितो–

"..... राजश्री सवाई संताजी भोसले खालते देवासप्रांती आले त्यास सामील होऊन आम्हास गांठावे अैसा इत्यर्थ केला. कुसाजी गणेश, राजश्री पिलाजी जाधवराऊ यांकडील इंदूरचा कमाविसदार, आम्ही रा. सवाई संताजी भोसले याजकडे पाठविला होता. त्याचे लिहीले आले कीं, उभेयताची फौज तुम्हावर येते तुम्ही लांब करणे.....याचा शह टाळोन जावे याजकरता धारेच्या किल्लेदाराशी सख्य संपादोन आठ रोज किल्लेनजीक राहिलो. तो इतकीयात केसो महादेऊ, रघोजी भोसले, सवाई संताजी भोसले याज पासौन फुटोन दयाबहादूरास सामील जाले. त्यास दयाबहादूराचे हरोळ होऊन राजश्री सवाई संताजी याजवर चालोन आले. रा. सवाई संताजी भोसले धारेवर आम्हापासी येऊन गला पडोन सामील करुन घेतले की, तुम्ही आम्ही एकत्र येऊन स्वामीकार्येकरुन च्यारदिवस मुलुखगीरी करुन यैसा आती आग्रह करुन चालले. बदनावर नवलाईप्रांते आलो. सवेच पाठीवर दयाबहादूर आला. .....सर्वत्र उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. सवाई संताजी भोसले यास कितेक स्वामीचे होतेचे (हातेचे?) इमानप्रमाण देऊन दर्शनास आणिले. देऊलगांवीहुन ते स्वामीकडे आले आम्ही मिनरांस आलो

निमित्य की समागमे बरखदाज व कर्जदार यैशा कटकटा बहुत याकरता याच्या समजाविशी करुन वाटे लावावे आणि आम्ही स्वामीच्या दर्शनास यावे...राजश्री सवाई संताजी भोसले याजसमागमे केसो महादेऊ आला आहे. त्याज कित्येक लबाडी करतील याकरता सेवेशी विनंती लिहीली आहे... हे विज्ञप्ती[१]."

या पत्रावरून माळव्यात चिमाजीआप्पा पूर्वी पोचलेल्या मराठा सरदाराची स्थिती दिसून येते. अर्थात या सरदारानी मुलुखगिरी शिवाय दुसरे काही केले नाही. राणोजी उर्फ सवाई संताजी भोसलेची माळव्याचे स्वारीतील भूमिका प्रथम मुलुखगिरीची होती हे वरील पत्रातून दिसते. मुलुखगिरी करावी, पैसा मिळवावा, त्यांतच काही सरदार शत्रूशी सामील होऊन आपल्या पैकीच्या सरदारावर चालून आले. असा हा बेशिस्त कारभार या मराठा सरदारात चिमाजीआप्पा माळव्यात येण्यापूर्वी होता.

शेवटी चिमाजीआप्पा माळव्यात पोचल्यावर त्यांनी या सर्व मराठा सरदारांना एकत्र करून गिरिधर व दयाबहाद्दूर या माळव्याचे सुभेदारांचा एका मागून एक, याप्रमाणे पराभव केला. या युद्धात ते दोघेही ठार झाले व माळवा प्रांत मराठ्याचे ताब्यात आला. राणोजी ऊर्फ सवाई संताजी भोसले हा या स्वारीत शेवटपर्यंत चिमाजीआप्पाचे हाताखाली काम करीत होता. कारण तसा तहनामा राणोजी भोसले व बाजीराव बल्लाळ प्रधान यांचेत झालेला होता.

बुदेलखंडाचे स्वारीत : माळव्यातून राणोजी भोसले निघाला तो नागपूर–देवगडचे बाजूस आला. वास्तविक बाजीरावाबरोबर बुदेलखंडाचे स्वारीत जाण्यासंबंधी राणोजी व बाजीराव यांचेत करार झाला होता आणि त्याप्रमाणे राणोजीची फौज सोबत घेऊन त्याचेसह बुदेलखंडात जाण्याचा बाजीरावांचा बेत होता व तसे ठरलेही होते.

धोंडजी महादेव ह्याने बाजीरावाचे या स्वारीसंबंधी चिमाजीआप्पास जी पत्रे लिहिली त्यावरून हे सिद्ध होते. तो आपल्या पत्रात लिहितो ".....सांप्रत श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीची स्वारी नांदेडप्रांती आली आहे. त्यास रा. कान्होजी भोसले व सवाई संताजी भोसले या

---

१ : पेशवे दप्तर भाग १३ : पत्र क्र. ९

उभेयताची भट झाली म्हणजे देवगड प्रांती यावे ऐसी वार्ता आहे[१]." "..... राजश्री सवाई संताजी भोसले फौजेनिशी देवगडचे सदरेस आहेत. त्यास सामील करून पुढे देवगड गढे प्रांती पुस वद्य अमावश्ये[२]" चे सुमारास जावे. असा बाजीरावाचा विचार असल्याचे या पत्रात लिहिले आहे. ही दोन्ही पत्रे जानेवारी १७२९ मधील आहेत.

परंतु राणोजी जरी बाजीरावासोबत जाण्याचे हेतूने देवगडचे बाजूने गेला होता. तरी तेथे त्याचा विचार बदलला असावा आणि म्हणून तो तेथून निघून पुन्हा माळव्यात फौजेसह शिरून लुटालूट करू लागला. तेव्हा बाजीरावांनी माळव्यात मुक्कामाला असलेले चिमाजीआप्पांना दि. ९ जानेवारी १७२९ रोजी मु. आष्टे प्रगणे गिरड प्रांत वऱ्हाड येथून लिहिले की, "……येथील तह जाहालीयावरी बुदेलखंडाकडे जातो. तुम्ही या उपरी कागदपत्र तिकडे पाठविणे. राजश्री राणोजी भोसले फौजेसह वर्तमान मालवा प्रांते जाणार. सांप्रत घाट उतरून नेमाडाकडे गेले. कदाचित मालवियात आले तरी लुटून टाकणे.[३]"

बाजीरावाने नंतर देवगडच्या गोंड राजाशी तह केला व तेथून तो बुदेलखंडास गेला. राणोजी हा मागाहून बुदेलखंडात जाऊन त्यास मिळाला व नंतर तो शेवटपर्यंत बुदेलखंडाचे स्वारीत बाजीरावाबरोबर आणि पुढे चिमाजीआप्पा यांच्या हाताखाली काम करीत होता.

दिल्लीचे स्वारीत : इ. स. १७३७ मध्ये बाजीराव पेशवे माळव्यातून दिल्लीकडे स्वारीसाठी गेले. त्यावेळीही राणोजी भोसलेनी बाजीरावासोबत जाण्याचे टाळले असावे कारण बाजीरावांनी दि. १९ डिसेंबर १७३७ रोजी चिमाजी आप्पास लिहिले "... निजामउल्मुल्क माळव्यात रवाना झाल्यावर आम्हीही त्वरा करून नबाबाच्या मुकाबलियास आलो. नबाबाच्या फौजा सलाबत खाऊन भूपाळ (भोपाळ ?) किल्ल्याच्या आश्रयास गेले..... नबाबाचे साहित्य दुसरा कोणी करणार नाही.....हे ठिकाणी लागल्यावर दक्षिण निर्वेध होईल.....राजश्री आवजी कवडे बरे समयास आले आहेत. राजश्री राणोजी भोसले.....कडे आल्याचे वर्तमान आहे. जरी ते आले

---

१ : पेशवे दफ्तर १३ पत्र क्र. ३८ व २८

३ : पेशवे दफ्तर १३ पत्र क्र. ३३

तरी ते आमचे जाहले न येती तरी ते गोष्टीचा मुजाबा काय आहे. एक तो राजेश्री स्वामी जवळ मोहिमेस असावयास पाहिजे होते ते तो नाही. तेव्हा या प्रसंगास तरी त्यांनी यावे येथेही न येत. तेव्हा सरंजाम मुलुख खाऊन अप्रयोजक होतील.....राणोजी आम्हाकडे आले तरी बरे. नाही तर तुम्ही त्यांस गाठणे ते फौज तुमचे कामाची आहे.....[१]" परंतु राणोजी नंतर बाजीरावास जाऊन मिळाला व पुढे दिल्लीचे मोहिमेत राणोजी बाजीरावासोबत होता. बाजीरावांनी आपल्या सेनेतील गोविंद बल्लाळ व इतर सरदारांना यमुनेचे पलीकडील मुलुखात स्वारीसाठी पाठविले. तेथून बाजी भीमराव यांनी बाजीरावास लिहिले:–"रा. रुपराया समागमे राणोजी भोसले व राणबा कडील व मल्हारबा कडील देवजी हंबीर बुणगीयात आहेत ते कुल देऊन व बुंदेल्याची फौज देऊन अंतर्वेदित रवाना आज्ञेप्रमाणे करणे म्हणून आज्ञा. ऐशास वडिलांचे आज्ञेप्रमाणे बुंदेल्यास सांगोन त्याची दोन हजार फौज व आम्हा कडील राणोजी भोसले याजकडील व रा. राघो गोविंदचे सव्वाशे स्वार व रा. तुकोजी पवार व येष्याची सतकर व घालवडे वगैरे मिळून दोन अडिचशे स्वार ऐसे रा. गोविंद बल्लाळ या समागमे देऊन रवानगी केली.....[२]"

त्यानंतर पुन्हा दुसरे पत्र की..."आम्हा बरोबर फौज म्हणावयास एक रा. राणोजी भोसले कोठे जामदारीस अगर कामकाजास पाठवावयास व समागमे चालावयास इतकेच. आणखी घोडे म्हटले तर लष्करात बहुत आहेत परंतु कोठे पाठवावयास व समागमे चालावयास कोण्ही नाही ऐसा प्रसंग आहे ... ...[३]" याप्रमाणे बाजीरावाच्या दिल्ली मोहिमेतही राणोजी भोसले यांनी आपले कर्तव्य बजावले हे दिसून येते.

वसईची मोहीम : इ. स. १७३७ ते ३९ या तीन वर्षात चिमाजी आप्पांनी कोकण पट्टीची मोहीम हाती घेतली होती. कोकणातील अनेक ठाणी व प्रदेश घेतल्यावर प्रथम तारापूर व नंतर वसईचे किल्ल्याचे मोर्चे लागले. हे दोन्ही किल्ले मजबूत व अभेद्य असे होते व त्यावर पोर्तुगीजांचा कबजा होता. राणोजी भोसले उमरावतीकर याने या किल्ल्याचे मोर्च्यात

---

१ : ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर : चरित्र व पत्र व्यवहार : पारसनिस : पा.४३-४७
२ : पेशवे दफ्तर क्र. १५ पत्र क्र. ३२
३ : पेशवे दप्तर क्र. १५ पत्र क्र. ३५

बराच पराक्रम गाजविला आहे. दिल्लीचे स्वारींतून परतल्यावर राणोजी लगेच या मोहिमेत सामील झाला होता. कोकणच्या या महत्त्वाच्या मोहिमेत राणोजी हजर होता. तटास छिद्र न पडल्यामुळे त्याने शिडघा लावून व हातात तलवार घेऊन स्वतः आपले जमावानिशी हल्ला केला. पोर्तुगीज फार शौर्याने लढले पण शेवटी त्यांचा मोड होऊन ते शरण आले. या तारापूरच्या लढ्याबद्दल चिमाजी आप्पा लिहितात "... ... हुजुरातीच्या निशाणाच्या उजवीकडे मल्हारबाची निशाणे सारी होती. तैसीच राणोजी भोसले यांची होती. त्याणीही शर्थ करावयाची तैसी केली. कुसा अलीकडे सात आठ (हात) खंदक खोल होता आठ हात रुंद होता तो खंदक उतरोन जावे त्या उपरी कोटावरी चढावयाची बहुत अडचण होती. वरले लोकांनी आत मेढा कोटावरी तयार केला होता. त्यामुळे कोटावरीही चढल्यावरी दोन घटका तेथे तुंब पडला तेथेच जागा.....जागा.....सारे झुंज नजरेस पडले.....राणोजी भोसले यांनी बरे बाकोन घातले.....सारांश स्वामीचा पुण्यप्रताप थोर तेणे करून जागा फते जाहली.[१]" या प्रमाणे तारापूरच्या वेढ्यात राणोजी भोसले उमरावतीकर यांनी मर्दुमकी गाजविली होती.

खुदः वसईचे वेढ्यातही राणोजीकडे तटाच्या काही भागास सुरुंग लाऊन तट पाडण्याचे काम दिले होते.

वसई किल्ल्याचे तिन्ही बाजूस समुद्र असून केवळ उत्तरेच्या बाजूने जमीन आहे. या बाजूनेच मोर्चे बसले होते. शत्रूंच्या तोफांनी आग ओकून फार माणसे ठार मारली किंवा जखमी केली होती. परंतु हिमत न सोडता मराठ्यांनी ही सारी आग पिऊन साहस केले. होता होता एप्रील महिन्याचे शेवटी मराठ्यांचे सुरुंग शेवटी किल्ल्याच्या तटास पोचले '.....राणोजी शिंदे यांचे पांच सुरुंग डावे बाजूने येके बुरुजास लागले. रा. यशवंतराऊ पवार व राणोजी भोसले यांचे सुरुंग दोन सफेलिस लागले. परंतु लाहान उजवे बाजूस संताजी वाघ दिमत मलारजी होळकर याचे सुरुंग दोन–एक लहान एक थोर–मलारबा पलिकडे विभुतराऊ सतकर दि॥ हशम याचा सुरुंग बाजु वाटून दिल्या.....सुरुंग उडताच येल्गार करुन जागा फते करावा ऐसा करार केला. सुरुंगाचे वर्तमान फिरंगीयास (कळले) यावरी फिरंगी यांनी सफिलीचे आं × × × मेढा बुरुजा देखिला घातला.

---

१ : ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर : चरित्र व पत्रव्यवहार : पारसनिस : पा. ७४-७६

पेटीच ××× ता।। वसईची इमारत दाहा दाहा हात बारा हात रुंदी इमारत पुरकार उंच गची दुसरे वसईच बुरुज नव आहेत ते बाजया[1] एक एक कोटच. वसई सुरंग चालावे ऐसा पदार्थ नाही. तथापि लोकांनी मेहेनत म्हणावी तैसी करुन सुरुंग पोचविले. बुधले भरुन सिद्धता केली. छ४ सफरी बुधवारी दोन घटिका दिवस आलियावरी सुरुंगास बत्या दिल्या. राणबा कडील च्यार सुरुंग उडाले एक उडायचा होताच तो लष्करच्या लोकांनी व हशमाच्या लोकांनी डावे बाजुनी राणबाकडेस उतावळी करुन तबके[2] सोडून हलके उठले, इतकियात राणबाचा पांचवा सुरंग उडाला. निमे बुरुज उडोन गेला. सुरंगाचे धोंडे उडाले ××××××चे व हशमाचे लोक दड ××× जाले. येशवंतराऊ पवार ×××× यांचे सुरंग लहान हो ××× उडाले. काम गारेगार जाले. ×××××× बा याचे दोन सुरंग (मुळ पत्रातील दोन ओळी फाटल्या आहेत.) ऐसी केली आपल्याही लंकी ××× सुन हिंमत व अंगे ××× युध्ये प्राप्त जाहली पर ××× सारीखे युद्धे मराठी फौजेस पडिले नाही सिमा सिमाच केली याचा विस्तार लिहीता विस्तार आहे मागाहून सविस्तर लेहून पाठऊन ... ... तुम्हास लिहीत जाऊं छ सफर[3]" चिमाजी आप्पाने या पत्रात वसईच्या रण–संग्रामाची हकीकत थोडक्यात दिलेली आहे. त्यावरून वसई किल्ल्याची लढाई जशी झाली तशी पूर्वी 'मराठी फौजेस पडिले नाही' म्हणजे या लढाईचा, त्यातील तंत्राचा अनुभव नवा होता. अशा या लढाईत राणोजी भोसल्याचा पराक्रम बराच मोठा आहे. त्याचे वर्णन इतर पत्रांतही आहे. पेशवे दप्तरात ही पत्रे आहेत.

शाहीराने देखील वसईच्या इरेच्या संग्रामाचे जे वर्णन केले त्यात राणोजी भोसल्याचा हा पराक्रम काव्यपंक्तीत लिपीबद्ध केला आहे.

बावटा धरुनी तोंडात,
भोसले चढे जोमात,
आगीच्या वर्षावात,
सामना भयंकर झाला – मोहरा इरेला पडला ।।

असे समर्पक वर्णन तिवारी शाहीरांनी उमरावतीकर राणोजी भोसल्याच्या वसईचे रणसंग्रामातील कामगिरीबद्दल केलेले आहे.

---

१ : स्वतः २ घर ३ : पेशवे दप्तर क्र. १६ पा. १२६–२७

याप्रमाणे उमरावतीकर राणोजी भोसले यांनीही आपल्या पूर्वजाप्रमाणे पराक्रम गाजविला आहे. राणोजी हा इ. स. १७६० पर्यंत फौज बाळगून होता. दि. ३ जानेवारी १७६० इसवीचे, नागपूरकर भोसल्याकडील मुत्सद्दी दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे याचे एका पत्रांत "राणोजी भोसले पाठवून व वेंकटराम जाऊन धरविला आहे.....[१]" असा उल्लेख आहे. त्यावरून राणोजी हा तो पावेतो सैन्य बाळगून होता असे दिसते. याप्रमाणे राणोजीने जवळ जवळ ४०–५० वर्षे सैनिकी जीवनात घालविले हे दिसून येते पेशव्यांचे हाताखाली त्याने अनेक युद्धात भाग घेऊन पराक्रम गाजविला आहे.

राणोजी जरी मुलुखगिरीवर किंवा युद्धाचे मोहिमेवर राहत असे तरी त्याने उमरावती गावाची उन्नती करण्याकडेही लक्ष दिले होते. तसे नसते तर एवढ्या अल्पावधीत हे गाव भरभराटीस आले नसते.

निर्वासितांना आश्रय गावास भित बांधली : सुमारे इ. स. १७४०–४५ मध्ये आकोल्याचा तालुकदाराने तेथील हजारो लोकांना जुलुमाने हाकून दिले होते. तेव्हा ते सर्व लोक उमरावतीच्या आश्रयास आले. त्यावेळी राणोजी भोसल्यांनी त्यांना आश्रय देऊन उमरावतीस वसविले. आणि तेथील नागरिकांचे संरक्षणाकरिता गावास चारी बाजूंनी भित बांधली, भित बांधण्यासाठी सुमारे दीड लक्ष रुपये खर्च आला होता[२].

---

१ : पेशवे दप्तर क्र. २० पा. १०० ते १०३

२ : गॅझेटीयर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस्, १८७० मध्ये "रघूजीने भित बांधली" असे म्हटले आहे. परंतु उमरावती हा राणोजीचा इनाम गाव होता व राणोजी हयात होता आणि गावाची उन्नती करण्याकडे राणोजीचे लक्ष होते. यावरून 'रघूजी' हे नाव चुकीने आले असावे.

तद्वतच यावरून असेही दिसते की, भोसल्यांनी उमरावती गावास सन १७४०–४५ चे सुमारास एक भित, दीड लक्ष रुपये खर्च करून बांधली होती. ही भित पुढे पडली असावी किंवा १८०५–१८०६ मध्ये निजामाने या शहरास परकोट बांधला त्यावेळी ती भित पाडून त्याचे सामानाचा उपयोग परकोटाचे कामी केला असावा.

राणोजीची वतने, सरंजाम वगैरे : इ. स. १७१९ मध्ये मौजे उमरावतीची निम्मे पाटिलकी राणोजीने खरेदी केली व नंतर सन १७२२ मध्ये उमरावती हे गाव छत्रपती शाहु महाराज यांनी राणोजीस, वंशपरंपरागत इनाम दिले. त्यानंतर शाहु महाराजांनी राणोजीस, प्रगणे आर्वी, सरकार गावेल, प्रांत वऱ्हाड; प्रगणे कुऱ्हे, सरकार गावेल, प्रांत वऱ्हाड; प्रगणे मलकापूर–पोहरे, सरकार नरनाळा, प्रगणे नाचणगाव सरकार कळंब;

प्रगणे विरूर अकाचे, सरकार गावेल, प्रांत वऱ्हाड; प्रगणे गिरड–माडगाव, सरकार कळंब, प्रांत वऱ्हाड; प्रगणे केळझर, सरकार कळंब; प्रगणे राळेगाव, सरकार कळंब; प्रगणे सुरजी अंजनगांव, सरकार गावेल, प्रांत वराड; प्रगणे गिरवली, सरकार माहुर, प्रांत वऱ्हाड; प्रगणे लालखेड, सरकार कळंब, प्रांत वराड; इत्यादी परगण्याचे मोकाशे फौजेच्या बेगमीकरिता दिले होते[१].

या शिवाय महंमद बादशहाने राणोजीस इ. स. १७२८ मध्ये प्रगणे जामगड जहागीर दिला होता[२]. तसेच नागपूरकर रघूजी भोसले यांनी आपल्या अधिकारातील, उमरावती विभागाचे २७ महाल राणोजीला दिले होते[३]. व भंडारा जिल्ह्यातील आंबेगड किल्ल्याची सनद राणोजीकडे होती[४]+.

इ. स. १७५२ मध्ये राणोजीची चुलती रामाऊ (साबाजी भोसलेची बायको) ही मृत्यू पावली. तिला मुलबाळ नव्हते. म्हणून रामाऊची वतने जप्त झाली होती. 'ही वतने रामाऊचा पुतण्या म्हणून मला मिळावीत' असा दावा राणोजीने केला होता. पेशव्यांनी त्याचा दावा कबूल करून व रु. १५००० नजराणा घेऊन मौजे कुमठे, समत कोरेगांव, प्रांत वाई (पुण);

---

१ व २ : विदर्भातील ऐतिहासिक लेख संग्रह : खंड पहिला : पा. १२२–२३

३ व ४ नागपूर प्रांताचा इतिहास : काळे : पृ. ५४७

+ "...राणोजी भोसले याजला सरकारची सनद संताची भोसले दिल्लीत कामास आल्यावर त्रेचाळीस महालाची करून दिली होती व सेना साहेबाकडून सत्ताविस महाल, सेना सुभा पैकी राणोजी भोसले याजकडे ठेवले. त्रेचाळीस महालांकी वालिभित– मलाड हे सरकार हंडिया, प्रांत खानदेश, येथील राणोजी भोसले यांचे नावे करून दिले होते" (नागपुरकर भोसल्यांची बखर पा. ५३)

मौजे मुठे, ता।। हवेली, प्रांत कराड व मौजे मरळी, ता।। देवली, प्रांत कराड, ही गावे निमे निमे त्यास इनाम दिली होती[1].

राणोजी दिल्लीचे मोहिमेतून परतल्यावर, रघूजी व राणोजी यांचा एकविचार होऊन ते कान्होजीजवळ वतन व सरंजाम यामध्ये हिस्से मागू लागले. हे भांडण शाहु महाराजांपर्यंत गेले. तेव्हा शाहु महाराजांनी प्रथम बाळाजी विश्वनाथ पेशव्यामार्फत व नंतर स्वतः इ. स. १७२७ मध्ये त्या तिघांत सरंजामाची वांटणी करून दिली[2]. त्यानुसार राणोजीस आणखी काही गावे मिळाली.

याप्रमाणे राणोजीची वतने व सरंजाम वगैरे मोठा असून, उत्पन्नही बरेच असावे असे दिसते. राणोजीचा माळवा व राजपुताना भागातही संबंध असावा. कारण इंदूरच्या नंदलाल मंडलोई या गृहस्थाशी (हा बहुधा सावकार असावा) पैशाचे वसुलीसंबंधी आणि राणोजीने जी माणसे उदेपुरच्या राण्याकडे पाठविली होती त्यांना मदत करावी अशी आज्ञावजा सूचना केल्याबद्दलची दोन पत्रे इ. स. १७२५ ची उपलब्ध आहेत. (परिशिष्ठ पहा) त्यावरून राणोजीचा माळव्यात आर्थिक व लष्करी संबंध होता असे दिसते. शिवाय उदेपूरच्या राण्याशी राजकीय संबंध असावेत.

राणोजी भोसले मराठा सैन्यातील मातब्बर व पराक्रमी पागाचा सरदार होता. त्याचे सैन्य व लष्करी सरंजामाचा अंदाज खालील पत्रावरून लक्षात येईल.

खमस अर्बैन मया व अलफ जिल्हेज १५

पागा दिमत राणोजी भोसले यासी गोविंद हरि याजकडून देवविले. रोजमुरा दीड महीन्याने देत जावा "४१३ बारगीर (४४ करोल, ४६ भालेकरी) २५५ बाजे लोक (२८ रिकिबदार ९, १८ नालबंद ५, २४ साखान असामी ८, ८ खितमतगार ४, ६ हुलसार २, ११ नगारची ३, १० कोठावळे ५, ६ जामदार २, ५० भोई १३, ५ जिनगर २, ३ परिट १, ६ चौपदार २, २ चांभार १, ३ हलालखोर १, ४ ढोल २, ८ जासूस ४, २ दिवटया १, २ न्हावी १, २ शिंपी १, २१ पखाली ७, ८ आफतागीरे २, ७ कर्णेकरी २, १८ माहात गडकरी ४, ३ पोतदार १,) १९८ खासदार

---

१ : काव्येतिहास संग्रह : ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे : साने : (५९)
२ : शाहु महाराज यांची रोजनिशी : वाड–पारसनिस : (१६३) पां. ८०-८१

आसामी ९९ दर २, ५२ कारकून (८ विठ्ठलकाळी ६,) ६ गणेश महादेव, ८ रघुनाथ केशव, २० राघो गोविंद, १० खंडो रघुनाथ), ६० मुदपाख, १४० पीलखाना हत्तीस रतिबा दाखल एकूण १११८

सदरहु रुपये छ १ मोहरम पासुन देत जाणे म्हणून पत्र १

पागेस दाणा इस्तकबील छ १ मोहरमा पासून देत जावा. दाणा कैली मापे :– ३– १ नर घोडे १०६, १ १ मारवान ९१, वासरे, १ उंटे १५, १ पखालाचे बैल सर ८ दर प्रमाणे. एकूण १ १ तपशील– हरभरे कैली, १ १ राजगुरे, एकूण १ १ सदरहु दाणा दररोज देत जाणे म्हणून पत्र १

रोजमुरा आठवडा नेमणूक स्वार आसामी ७०० पैकी पागास्वार ९० नव्वद बाकी स्वार ६१० सहाशे दहा यास रोजमुरा रुपये १२०० आठवडा करार केला असे. तरी छ १ मोहरमा पासूत गणती घेऊन दर राऊतास सरासरी रुपये दोन प्रमाणे दरमाहे रोजमुरे चार एकूण रुपये ४८०० चार हजार आठशे प्रमाणे पावीत जाणे. पुढे लुट लागल्यावर सहाशे दाहा राऊता पैकी करोल असामी १२४ एकशे चोविस आहेत यास दीड माहा रोजमुरा रुपये ४५४ चारशे चोपन्न प्रमाणे गणती घेऊन देत जाणे. बाकी राऊतास रोजमुरा न देणे म्हणून पत्र १[1]"

---

१ : बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी (इ. स. १७४४-४५) : संग्राहक : वाड : संपादक : पारसनिस : १९०७ : खंड १ : परिच्छेद क्र. २५७

(257) This document gives the particulars of a detachment of cavalry under Ranoji Bhonsle the salaries of the men, the daily ration of the horses and other animals etc

There were in this detachment 90 Bargirs (44 horse musketeers and 46 speersmen) and their salary was Rs 413 - for a month and a half.

There were 610 Sowars and their weekly salaries Rs. 1200/- or Rs. 4800/- a month.

The detachment had 5 Karkuns and 181 attendents. Daily rations by kaiti measure, khandis, maunds, pailies.

There were	106 horsemen	--	0-8 - 1½
	91 Mares	--	0-6 - 4½
	15 Camels	--	0-1 - 4½
	8 Bullocks	--	0-0 - 4

Balaji Bajirao Peshwa Diary. Page No. 166.

सरदार राणोजी भोसले उमरावतीकरांचा लष्करी सरंजाम वरील पत्रातून दिसून येतो. त्याची पागा ७०० घोडे स्वाराची असावी असे दिसते.

याशिवाय शाहु दप्तरातील कागदपत्रावरून वरील अनुमानास समर्थन मिळते. सन १७२५–२६ मध्ये शाहूंनी कृष्णाजी सामराज यास राणोजीकडे सबनीस नेमले होते. नंतर १७३० मध्ये त्या जागी विनाजी निळकंठ याची शाहु राजांनी नेमणूक केली. सयाजी गुजर यास राणोजी भोसलेकडे सरनोबत म्हणून नेमण्यात आले होते. अशी अनेक आज्ञापत्रे व पत्रे वगैरे शाहु दप्तरातून पाहावयास मिळतात. यावरून राणोजी हा मराठा सैन्यातील महत्त्वाचा सरदार असल्याचे दिसून येते.

रघूजी व राणोजीची कान्होजीवर स्वारी : कान्होजी व शाहु महाराज यांचे काही कारणाने वितुष्ट आलेवरून शाहूंनी कान्होजीचे "सेनासाहेब सुभे, वऱ्हाड–गोंडवाना" हे पद व चौथ आणि सरदेशमुखी वसुलीच्या सनदा काढून घेतल्या व हे पद आणि सनदा रघूजी भोसल्यास देऊन, कान्होजीला पकडून आणण्याची कामगिरी रघूजीवर सोपविली.

रघुजीला पद मिळाल्यानंतर तो वऱ्हाडात येण्यापूर्वीच कान्होजी हा 'भाम' येथे येऊन मजबूतीने राहिला होता. मागाहून रघूजी हा सेनासाहेब सुभे या नात्याने सैन्यासह वर्तमान वऱ्हाडात आला व प्रथम उमरावती आणि नंतर तळेगाव येथे राहिला.

कान्होजीला या परिस्थितीची कल्पना होती म्हणून तो निजामाकडे जाण्याचे खटपटीस लागला. पण याच सुमारास रघूजी व त्यांचा चुलता राणोजी भोसले उमरावतीकर हे एक होऊन त्यांनी कान्होजीवर चाल केली आणि भाम च्या गढीस वेढा घातला यावेळी रघूजी–राणोजीसोबत सुमारे ३० हजार फौज होती. लढाईस तोंड लागले. त्यात कान्होजीचा सरदार तुकोजी गुजर हा मारल्या गेला व कान्होजी भामवरून निघून माहुरच्या बाजूने पळाला, तेव्हा रघूजी व राणोजी त्याच्या पाठीस लागले[१]. या दोन्ही सैन्याची लढाई वणी जवळील मंदार नावाचे गावाशेजारी होऊन शेवटी त्यांनी कान्होजीस कैद केले (इ. स. १७३०) व साताऱ्यास शाहु महाराजाकडे नेले. आन्होजी पुढे नजरकैदेतच मरण पावला.

---

१ : पेशवे दप्तर भाग १० पा. ७, २३, ६९ व ७०

पुढे कान्होजीचा मुलगा रायाजी व राणोजी उमरावतीकर या दोघांनी रघूजी भोसल्यांशी, सरंजामाबद्दल व वतनाबद्दल वाद उपस्थित केला तो बराच काळ चालू होता[१]. नंतर पुढे रायाजी व रघूजी यांचेत मिलाफ झाला. रायाजी हा हिंगणीसही आपल्या वतनाचे बंदोबस्तासाठी जात असे.

राणोजी पुणे दरबारला अनेकदा जात असे. प्रसिद्ध लढायात तो स्वसैन्यासह पेशव्यांचे मदतीला होता. या पराक्रमी पुरुषाचा जो ज्ञात इतिहास आहे, त्यापेक्षा त्याची कामगिरी बरीच जास्त असावी.

राणोजीला दोन किंवा तीन बायका असाव्यात. या शिवाय तत्कालिन पद्धतीप्रमाणे राणोजीजवळ येसू नावाची एक कुणबीण होती. तिच्याशीही राणोजीने लग्न केले होते असे दिसते. कारण येसू आणि राणोजी यांचेतील वाद शाहु महाराजापर्यंत गेला होता. त्यावर शाहु महाराजांनी "……येसू बटीक म्हणून राहू शकत नाही. जर येसूला राणोजीकडे रहावयाचे नसेल तर तिने आपल्या मर्जीनुरूप रहावे. तुझा वारसा पोचत नाही." असा निर्णय दिला होता[२].

राणोजीस एकूण पाच मुले होती. त्यापैकी संताजी, बापूजी व कुसाजी यांची माहिती मिळत नाही. जिजाजी आणि सखूजी याची उपलब्ध माहिती पुढे दिली आहे.

राणोजी हा इनामदार, पाटील मोकादम आणि मोकासदार तर होताच शिवाय मातब्बर सरदारही होता. याची उमरावतीत शेतीही असावी. कारण उमरावती मौजे मध्ये 'भोसल्याची आंबराई' या नावाचे शेत व आंबराई होती.+

बाजीराव पेशवे इ. स. १७४० साली वारले व त्यांचा वऱ्हाडातील सरंजाम त्याचे पुत्र बाळाजी बाजीराव यांना मिळाला. हा सरंजाम सुरळीत चालावा म्हणून खुद: शाहु महाराजांनी रघूजी भोसले नागपूरकर

१ : पेशवे दप्तर भाग २० लेख ४२ व ४८, भाग २१ पा. २५
२ शाहु महाराजांची रोजनिशी : वाड : पा. २१३
+ पेठ उमरावतीचे, सरकारी मोजणी बुकांत, सर्वे नं. १७१ 'वाडी भोसल्याची' ही निशाणी आजही कायम आहे. व ती बागायती जमीन दाखविलेली आहे.

व राणोजी भोसले उमरावतीकर यांना खाजगी पत्रे लिहिली होती[१]. यावरून वऱ्हाडातील बंदोबस्तासंबंधी शाहु महाराज रघूजी व राणोजी यांचेवर अवलंबून राहत असे असे दिसते.

राणोजीचा मृत्यु : "इ. सन १७१९ पासून इ. सन १७६० पर्यंत तरी या पुरुषाची कारकीर्द कर्तबगारीने भरलेली आहे. मरणाचे वेळी त्याचे वय ६०–७० तरी असले पाहिजे." या प्रमाणे राणोजी भोसल्यांनी, उमरावतीकर भोसले घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. त्याचे काळातच उमरावतीची भरभराट सुरू झाली. इ. सन १७६० पर्यंत राणोजी जिवंत असल्याचा लेखी दाखला सांपडतो, परंतु यानंतर इ. स. १७७० पर्यंत त्याबद्दल दाखला मिळत नाही. ता. २६ मे १७७० इ. रोजी साबाजी भोसले यांनी, उमरावतीचे (पेशव्यांतर्फेचे) कमाविसदार[२] अनंतभट चितळे यांस हुकूम पाठविला आहे. त्यांत तो म्हणतो "मौजे मजकूर (उमरावती) हा गाव पेशजी तीर्थ स्वरूप कैलासवासी राणोजीबुवा भोसले याजकडे मोकासा होता. तो हल्ली (फसली) सन ११८३ चे सालापासून चिरंजीव राजेश्री राणोजी[३] भोसले याजकडेस मोकासा दिला आहे. तरी मौजे मजकूरचे मोकाशाबद्दल सुदामत प्रमाणे मशार निल्हेकडे अमल देणे[४]." नेहमीप्रमाणे अमल या हुकुमावरही दिला गेला नाहीच. म्हणून साबाजीने दुसरा खरमरीत हुकूम ता. २६ जून १७७१ रोजी अनंतभटास पाठविला[५].* यावरून राणोजी हा इ. सन १७७० चे सुरवातीला किंवा त्यापूर्वी मरण

---

१ : शाहु महाराज यांची रोजनिशी : वाड : पा. ५१

२ : कमाविसदार :– 'रेव्हेन्यू कलेक्टर' (रेव्हेन्यू ॲन्ड फिनान्स इन् मराठा ॲडमिनिस्ट्रेशन : वशिष्ठ : पृ. ३४)

३ : हा राणोजी भोसल्याचा नातु व जिजाजी भोसल्याचा मुलगा. जिजाजी हा कुंभारी चे इ. स. १७७३ चे लढाईत मारला गेला होता. म्हणून त्याचा मुलगा राणोजी यास हे वतन वारस म्हणून मिळायला पाहिजे होते.

४ व ५ : परिशिष्टातील क्र. १५, १६ व १७ ही पत्रे पाहावीत.

* एके ठिकाणी वरील पत्रांची तारीख १७७३ इसवी मधील दिलेली आहे. व तीच बरोबर असावी. कारण जिजाजी हा १७७३ मध्ये युद्धात कामी आला होता. तेव्हा त्यानंतरच त्याचे मुलास गादी मिळणार हे उघड आहे.

पावला असावा. याप्रमाणे सुमारे ५० वर्षे उमरावतीची पाटिलकी, इनामदारी व मोकासदारी केल्यानंतर वयाच्या सुमारे ७० व्या वर्षी या कर्तबगार पुरुषाचा अंत झाला.

अमरावतीकर भोसल्यांची वंशावळ

राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले

संताजी	बापूजी	जिजाजी	सखूजी	कुसाजी
		राणोजी	शिवाजी	रामचंद्र उर्फ बापूजी
		कृष्णाजी	सखोजी	
		(हा लहान असता दागिन्याकरता मारला गेला.)	कृष्णराव	(पुढे माहिती मिळत नाही.)
			बाळासाहेब+	
			बाबासाहेब	

+ हा सन १८०० मध्ये नागपुरास राहायला गेला.

जिजाजी भोसले उमरावतीकर (१७७०–१७७३) : राणोजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा जिजाजी हा गादीवर आला. त्याची कारकीर्द फार थोडी आहे. इ. स. १७७३ मध्ये जिजाजी हा कुंभारीच्या लढाईत कामी आला. त्याची हकीकत अशी–

इ. स. १७७२ मध्ये नागपूरचे जानोजी भोसले मरण पावले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधू साबाजी व मुधोजी यांचेत नागपूरचे गादीसाठी भांडणे सुरू झालीत. हे प्रकरण नंतर पुण्यास पेशव्यापर्यंत गेले. साबाजीने मोठा नजराणा देऊन पेशव्याकडून नागपूरची गादी मिळविली आणि वस्त्रे

व सनद घेऊन[1] तो नागपूरला यायला निघाला. उमरावतीकर जिजाजी भोसले हा साबाजी सोबत होता.

कुंभारीची लढाई १७७३ : साबाजी भोसले नागपूरकर हा पुण्या-वरून सनद घेऊन ससैन्य नागपूराकडे येत असतानाच आकोला–बाळापूर जवळील कुंभारी या गावानजीक त्यांची मुधोजी भोसले याचे सैन्याशी गाठ पडली. लढाईला तोंड लागले. हे युद्ध दोन दिवस चालू होते. या लढाईत उमरावतीकर जिजाजी भोसले हा गोत्र पुरुष मारल्या गेला. त्यामुळे साबाजी व मुधोजी या दोघासही सुतक लागले. म्हणून लढाई बारा दिवस बंद होती[2].

नंतर उभयतांकडील सरदारांनी समेट घडवून आणला. युद्ध संपले. तेव्हा साबाजी भोसल्यांनी २३ एप्रील १७७३ व ५ जून १७७३ रोजी, उमरावतीचे पेशव्यातर्फेचे कमाविसदार[2] अनंतभट चितळे म्हणून होते, त्यांना पत्र लिहून उमरावतीचा हक्क जिजाजीचा मुलगा राणोजी यास द्यावयास सांगितले[3] कारण तसा वंशपरागत अधिकार होता. पण तसे घडले नाही. आणि उमरावतीची गादी जिजाजीच्या सावत्र भावाचा मूलगा शिवाजी यास मिळाली.

अमरावतीस दंड : कुंभारीचे लढाईनंतर, झालेल्या तहाने साबाजी व मुधोजी यांचेतील वितुष्ट मिटले नाही. मुधोजीचा एलिचपूरचे नबाब ईस्माईलखान यांचेशी फार दोस्ताना होता. म्हणून मुधोजी एलिचपूरला ईस्माईलखानचे आधाराने तेथे जाऊन राहिला.

त्याला सैन्याचे खर्चासाठी वारंवार पैशाची अडचण पडू लागली. तेव्हा त्याने एकदा ससैन्य उमरावतीस येऊन उमरावतीच्या सर्व गावकऱ्या-

---

१ व २ : नागपूरकर भोसल्यांची बखर : पृ. १०९–१०

२ : "कमाविसदार, मामलेदार, सरसुभेदार यांच्या नेमणूका, बदल्या, बढत्या व बढतफी पुणे दरबाराकडून होत. त्यांचा मान मरातब चांगला असे व त्यांच्या तैनातीला चोपदार, दिवटचा, अबदागिऱ्या असे." (पेशवे कालिन महाराष्ट्र : भावे : पृ. ४६०)

३ : परिशिष्टातील क्र. १५, १६ व १७ ही पत्रे पाहावीत.

पासून सक्तीने दंड वसूल केला[१]. वास्तविक उमरावतीकर भोसले हे साबाजीच्या बाजूने लढले म्हणून मुधोजीस उमरावतीकर भोसल्यास त्रास द्यायचा होता असे दिसते. त्यामुळेच त्याने अशा रीतीने उमरावतीच्या गावकऱ्याकडून दंड घेऊन अप्रत्यक्षतः उमरावतीकर भोसल्यांना त्रास दिला असावा.

अमरावतीकर शिवाजी भोसल्याचे बंड : माधवराव पेशव्यांचे मृत्यूनंतर पुण्यात बारभाईचे कारस्थान यशस्वी झाले. नाना फडणीस हे प्रमुख होते. माधवराव पेशव्यांचे कारकिर्दीत नागपूरकर भोसल्यांनी पुण्याच्या पेशवाईविरुद्ध बंड केले होते. इतकेच नव्हे तर नागपूरकर भोसल्यांनी एकदा पुणे देखील लुटले होते. त्यामुळे साहाजिकच नागपूरकर भोसल्यांचा प्रभाव घटविण्याचा विचार पुणे दरबारात चालू होता. तशातच पाचगावचे लढाईत साबाजी भोसले मारल्या गेला. आणि त्यांचे बाजूचा प्रसिद्ध मुत्सद्दी भवानी शिवराम हा, मुधोजीचा विजय झाला हे पाहून, पळाला व उमरावतीकर शिवाजी भोसल्याकडे येऊन त्याने त्यास मुधोजीविरुद्ध बंड करण्यासाठी भडकवले. तिकडे पुणे दरबारनेही नागपूरकर भोसल्यांना डावलून 'वऱ्हाड–नागपूरचे वतन' आणि 'सेना साहेब सुबे' हे पद उमरावतीकर शिवाजी भोसल्यास देण्याचे ठरविले आणि नागपूरकर भोसल्याविरुद्ध उठविले. दिनांक ७ एप्रील १७७५ रोजी ह्या पदाची सनदही शिवाजी भोसल्यास दिली. (परिशिष्टातील पत्र क्र. २० पहा)

शिवाजी भोसल्याने आपले नवीन आसन टिकविण्यासाठी सैन्य उभारले आणि साबाजी भोसल्यांची माणसे आपल्याकडे आणण्याचा प्रयत्न चालविला. पुणे दरबार शिवाजी भोसल्याचे पाठीशी होता. भवानी शिवराम याची व नबाब निजाम अलीखान, रुक्नुदौला दिवाण यांचेशी दोस्ती होती. त्यांची मदत शिवाजी भोसल्यास मिळावी म्हणून भवानी शिवराम हा हैद्राबादला गेला. त्यांचेशी बोलून त्यांना तयार केले. त्याप्रमाणे त्यांनी आपल्या सैन्यानिशी नागपूरचा रोख धरला.

नागपूरकर मुधोजी भोसल्यांनी वेळीच, प्रसंग ओळखून, नबाबाकडे माणसे पाठविली व प्रत्यक्ष भेट घेऊन त्याचेशी तह केला. तसेच नागपूर दरबारातील पेशव्यांचा प्रतिनिधी बाबूराव वैद्य यासच पुण्याला पेशव्याकडे

---

१ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे : पृ. ४०६

पाठवून, नजराणा देऊन, सेनासाहेब सुभे हे पद व वस्त्रे आणविली[१]. त्यामुळे शिवाजी भोसले उमरावतीकर हे निराधार झाले. पैशाअभावी ते सैन्य उभारू शकले नाहीत. तसेच हैद्राबादच्या निजामाकडूनही मदत मिळू शकली नाही. याप्रमाणे नागपूरकर भोसल्याविरुद्धचे, उमरावतीकर शिवाजी भोसल्याचे बंड पूर्णपणे फसले.

या बंडामुळेच उमरावतीकर भोसल्यांचा व नागपूरकर भोसल्यांचा बेबनाव झाला व उमरावती वगैरे गावे मुधोजी व रघूजी (दुसरा) यांनी उमरावतीकरापासून हिसकून घेतली[२].

शेवटचे उमरावतीकर भोसले : इ. स. १७९४ मध्ये सवाई माधवराव पेशवे यांनी उमरावतीकर सखोजी भोसले यांस तीनशे स्वार घेऊन बोलाविले. तेव्हा सखोजीने पेशव्याकडे तक्रार केली की, "उमरावती हा गाव आमचेकडे चालत होता, तो अलीकडे चालत नाही. यास्तव रा. रघूजी भोसले, सेनासाहेब सुभा याजकडील कुशाबा[३] यासी बोलून उमरावती व ऐवज महाल निसबत हिस्सा वाटणीप्रमाणे पावत होता तो देऊन आमचे आम्हाकडे चालते करावे. येविसी राजश्री दाजिबा फडके व गोविंदराव पिंगळे यांस पत्रे लिहिली आहेत : त्यास ते बोलतील. त्याप्रमाणे कामकाजाचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. हे झाले म्हणजे आपण स्वारासुद्धा येतो." असे सखोजीने कळविले. त्यावर नाना फडणीसांनी दि. ४-११-१७९४ रोजी उत्तर दिले की, "त्याप्रमाणे पत्रे लिहीत आहोत. व सेनासाहेबांचे येणे इकडे होईल त्यावेळेस त्यांस समक्ष सांगू. तुम्ही हुकुमाप्रमाणे तीनशे स्वारांनिशी यावे[४]."

या पत्राप्रमाणे सखोजी गेला होता की नाही हे नक्की समजत नाही. परंतु बहुधा तो गेला असावा असे वाटते. या वेळेस निजामाचा व पेशव्यांचा बेबनाव झाला होता व लढाई होईल असा अंदाज दिसत होता. त्याप्रमाणे खर्ड्याची प्रसिद्ध लढाई- दि. ११-३-१७९५- झालीच. या

---

१ : नागपूरकर भोसल्यांची बखर : पृ. १४९

२ : परिशिष्टांतील क्र. १५, १६ व १७ ही पत्रे पहावीत.

३ : हा भोसल्याकडील 'चिटणीस' होता. (कृष्णराव माधव चिटणवीस असावे)

४ : परिशिष्टांतील क्र. ११ व १९ ही पत्रे पहा.

लढाईसाठीच नाना फडणविसांची ही लष्कराची जमवा – जमव चालली होती. नागपूरकर रघूजी भोसल्यांची फौज सुद्धा या लढाईत पेशव्यांचे मदतीला आली होती.

वरील आश्वासनानंतरही उमरावती वगैरे गावे उमरावतीकर सखोजी भोसल्यास मिळाली नाहीत. उलट नागपूरकर भोसल्यांनी, उमरावतीकर सखोजी भोसले व त्याचा मुलगा कृष्णराव यांस पकडून आणून, नागपूर येथे भंडार दरवाजाजवळ अटकेत ठेवले होते.

सखोजीचा पुत्र कृष्णराव आणि नातू बाळासाहेब हे इंग्रजी आमदानीत पोलिटिकल पेन्शनर होते. बाळासाहेब हा इंदूरासही राहत असून त्यास तेथील दरबारातून काही नेमणूक मिळे[1].

त्याचे मागे त्याचा पुत्र बाबासाहेब हा नागपुरास राहत होता. त्यास त्याच्या वडिलांचे पेन्शन वगैरे काहीच मिळत नव्हते व सांपत्तिक दृष्ट्या त्याची स्थिती फार हलाखिची झाली होती

जिजाजी हा कुंभारीचे लढाईत पडल्याबद्दल मागे उल्लेख आला आहे. त्याचा पुत्र धाकटा राणोजी यास, थोरल्या राणोजीनंतर उमरावती वगैरे गावाची सनद मिळाली होती. पुढे याच्याही वंशात कोणी न राहिल्याने तिसरा भाऊ सखोजी याच्या शाखेत उमरावतीची सनद गेली व ते बरेच दिवस या गावाचा उपभोग घेत होते. शिवाजी भोसल्याच्या बंडानंतर हे गाव नागपूरकरांनी त्याचे कडून काढून घेतले व त्यांना नागपूर येथे आणून ठेवले ते वर आलेच आहे[2].

इ. स. १८०३ च्या अडगावच्या तहाने वऱ्हाडचा कब्जा नागपूरकर भोसल्यांनी इंग्रज सेनापती वेलस्ली यास दिला. नंतर इंग्रजांनी वऱ्हाडचा मुलुख निजामास मैत्रीचे बक्षीस म्हणून दिला. याप्रमाणे नागपूरकर भोसल्यांची वऱ्हाडवरील सत्ता संपुष्टात आली. आणि उमरावतीकर भोसले घराण्याचा देखिल अस्त झाला.

---

१ व २ : विदर्भातील ऐतिहासिक लेख संग्रह (प्रस्तावना) पा. १३

३ : नागपूरप्रांताचा इतिहास : या. मा. काळे : पा. ५५०

अशा रीतीने सुमारे पन्नास वर्षांचे उमरावती वरील, उमरावतीकर भोसले घराण्याचे प्रभुत्व संपले, परंतु त्यांचे काळात उमरावतीची जी उन्नती झाली त्यामुळेच पुढे हे शहर वऱ्हाडचे आर्थिक व व्यापारी केंद्र बनू शकले.

भोसल्यांची उमरावती येथील (कुंभारवाडयातील) गढी नष्ट झाल्या नंतर, उमरावतीला या भोसल्यांचे कोणतेही स्मारक शिल्लक राहिले नाही. उमरावतीकर भोसले घराण्यात राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले हाच एकमेव कर्तबगार व प्रभावी पुरुष होता.

हल्ली नागपूरला या उमरावतीकर भोसल्यांचा एक वंशज बाळासाहेब व त्याची आई अत्यंत विपन्नावस्थेत राहतात.

उमरावतीकर भोसले घराण्याच्या इतिहास हा असा आहे.

श्रीमंत माधवराव पेशवे उमरावतीत : इ. सन १७६८ मध्ये श्रीमंत माधवराव पेशवे आणि राघोबा दादा पेशवे यांच्यात गृहकलह उत्पन्न होऊन माधवरावांनी राघोबा दादांना पकडून कैदेत टाकले. त्या प्रसंगी नागपूरचे जानोजी भोसले यांनी पेशव्यांच्या गृहकलहाचा फायदा घेण्यासाठी आपली मदत राघोबादादांना देण्याची तयारी केली. या अगोदरही जानोजींनी पेशव्यांचे गृहकलहात हस्तक्षेप केला होता. पण त्यावेळी प्रसंग निभावला. मात्र हा पुन्हा तसाच प्रयत्न जानोजीने केला तेव्हा माधवरावांनी जानोजीला धडा शिकविण्याचा निश्चय करून फौजेसह वर्तमान नागपूरकडे निघण्याची सन १७६९ इसवी मध्ये तयारी सुरू केली. पेशवे आपल्यावर चालून येत आहेत हे कळताच जानोजी घाबरला आणि त्याने प्रथम आपला वकील चिमणाजी रखमांगद चिटणीस यास पेशव्याची समजूत घालण्यासाठी पाठविले, पण माधवरावांनी भोसल्यांना क्षमा करण्याचे नाकारून, भोसल्याकडील मुत्सद्दी दिवाकरपंत चोरघडे यांना पाठविण्यास जानोजीस कळविले आणि दुसरीकडे स्वारीची तयारी करून ते पुण्याहून निघाले.

जानोजीने दिवाकरपंत (देवाजीपंत) यांना पेशव्यांकडे रवाना केले. देवाजीपंतांची व पेशव्यांची भेट वाशिमजवळच झाली. देवाजीपंताबद्दलही पेशव्यांचे मन कलुषितच होते. हाच जानोजीला आपल्या-विरुद्ध सल्ला देतो ही पेशव्यांची समजूत होती. त्यामुळे पेशव्यांनी देवाजी-

पंतांना कैद करून आपल्या बरोबर फौजेत ठेवले व मजल दर मजल कूच करीत पेशवे वऱ्हाडात शिरले. यावेळी पेशव्याबरोबर साठ हजार फौज, गारदी व तोफखाना होता. पेशव्यांचे हे सैन्य पोहाली नरे, प्र. बीड; धनेगाव कसूळमही, प्र. पाथरी, कुराडी, प्र. नरसीबामणी; जडेपूर, येवती, प्र. नरसीबामणी; कळंबी, पाठीमागे वाशिम दोन कोस, पांचापिराचे मंगरुळ, प्रांत वऱ्हाड, पिंजरी; (पिंजर) कारंजेचे, पुढे प्रांत वऱ्हाड, पिंपरी निंबसडे, उमरावती, प्रांत वऱ्हाड[१]" या मार्गाने दि. ११ जानेवारी १७६९ रोजी उमरावतीस आले व येथे त्यांचा मुक्काम झाला.+ या मुक्कामातच देवाजी पंतांनी पेशव्यांना, भोसल्याकडून १५ लक्ष रुपये देवविती, मोहीम थांबवावी[२]. अशी विनंती केली, पण पेशवे ऐकेनात. यावेळी जानोजी भोसले १४ हजार फौजेसह नांदगाव पेठ जवळ होते. देवाजीपंत कैदेत होते तरी सर्व बातम्या राखून जानोजीस सूचना देतच होते. शेवटी भोसले नांदगाववरूनच परतले. ते चांद्याकडे गेले आणि देवाजीपंताचे चातुर्यामुळेच पुढे पेशव्यांना भोसल्याशी कनकपुरचा तह करणे भाग पडले. पेशव्यांचे लष्कराचा उमरावतीस मुक्काम होता तेव्हा उमरावतीकर राणोजी भोसले हयात असावेत.

प्रसिद्ध इंग्रज सेनानी ऑर्थर वेलस्ली याची उमरावतीत छावणी : इ. सन १८०३ मध्ये, देवगाव आणि अंजनगाव (सुर्जी) चे तहानंतर आणि गाविलगड सर केल्यावर प्रसिद्ध इंग्रज सेनानी जनरल ऑर्थर वेलस्ली हा एलिचपूरहून उमरावतीस आला होता व त्याची छावणी उमरावतीस काही काळ (१८०४) हल्लीचे कॅम्प विभागात होती. वेलस्लीने आपल्या डायरीत (वेलस्ली डिस्पॅच्) उमरावतीचे वर्णन दिलेले आहे. वेलस्लीच्या

१ ऐतिहासिक लेख संग्रह, भाग ३ : वासुदेवशास्त्री खरे : पत्र क्र. ७८१ : पा. १३४७

+याच संदर्भात पेशव्यांचे सैन्यातील हरि बल्लाळ यांचे एक पत्र आहे "राजश्री जानोजी भोसले अलजपूर जवळ आहेत. श्रीमंत उमरावतीच्या रोखे जात आहेत. भोसल्यांचा जुंजावयाचा सुमार दिसत नाही" असे त्यात म्हटले. हे पत्र कारंजावरून दि. ७ जानेवारी १७६९ रोजी लिहिले आहे (नागपूरकर भोसल्यांची कामगिरी : सरदेसाई : पत्र क्र. २१३)

२ "..... देवाजीपंत लष्करात आहेत पंधरा लक्ष रुपये देवविती म्हणतात. पण श्रीमंत ऐकत नाहीत. (सरदार कुरुंदवाडकरांचे उमरावतीहून मुलास पाठविलेले पत्र—ऐ. ले. सं. भाग ३ : पत्र क्र. ७८२)

या छावणी–पासूनच संबंधीत विभागाला छावणी (कॅम्प) हे नाव रूढ झाले असावे+.

उमरावतीत इंग्रजांच्या पलटणी : उत्तरेत यशवंतराव होळकरांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. उत्तर हिंदुस्थानातील सर्व देशी राजे–रजवाडे यांची एक अभूतपूर्व एकजूट यशवंतराव होळकरांनी घडवून आणली त्यामुळे इंग्रजाचे धाबे दणाणले. होळकराशी तह करण्याचा इंग्रजांनी खूप प्रयत्न केला, पण होळकर त्यांचे या जाळ्यात सापडले नाहीत. शेवटी इंग्रजांनी भेदनीती सुरू केली. काही राजांना यातून फोडले. पण त्याच वेळी होळकर – शिंदे – व नागपूरकर भोसले यांची एकजूट झाल्यास फार बिकट प्रसंग निर्माण होईल, म्हणून निरनिराळ्या क्लृप्त्या इंग्रजांनी अमलात आणल्या. भेदनीतीचा वापर चालू असतानाच दक्षिण हिंदुस्थानातील तळावरून काही पलटणी उत्तर हिंदुस्थानात बोलावल्या. हेतू हा की, उत्तर हिंदुस्थानातील राजे–रजवाड्यांना असे वाटावे की आता इंग्रज सर्व शक्ती-निशी होळकराविरुद्ध आघाडी उघडतील, म्हणून आपण इंग्रजांचे विरुद्ध जाऊ नये. शिद्यांना तर इंग्रजांनी आपले नादी लावले होतेच. राहता राहिले नागपूरकर भोसले. त्यांची अजीजी चालू होती की त्यांनी होळकरास मदत करू नये, पण यदाकदाचित भोसले मदत करतील तर वेळी प्रसंगी तयारी असावी म्हणून इंग्रजांनी नागपूर–पासून चाळीस कोसावर उमरावतीला दोन पलटणी आणि बंगालजवळ आरपूर येथे चार पलटणी सज्ज ठेवल्या होत्या.

+ "पूर्वी सिव्हिल मिलिटरी स्टेशन असलेली व नंतर पेस्तनजी कंपनी व सुरुवातीचे ब्रिटिश अंमलदार यांनी उपयोगात आणलेली जागा, सध्या परकोटा बाहेर वायव्येस आहे.

या जागेवर सध्या, पूर्वीचे काहीच शिल्लक नाही. फक्त जुन्या चांदमारीची भित, एक मोठी विहीर, छोटी स्मशानभूमी, मोडकळीस आलेली थडगी व वर क्रॉस लावलेले एक थडगे या भागात शिल्लक आहे.

शक्य आहे की, ही थडगी वेलस्लीच्या सैन्यातील लोकांची असावीत. कारण गाविलगडच्या पाडावानंतर लार्ड वेलस्ली उमरावतीस काही काळ थांबला होता. त्याचा मुक्काम याच भागात असावा". (अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ : पा. ३५८)

याबाबतचे एक पत्र दि. ३१ मार्च १८०९ चे उपलब्ध आहे. त्यावरून असे दिसते की, इंग्रजांच्या दोन पलटणी उमरावतीस होत्या. हे पत्र पुण्याच्या बातमीदाराने मिरजेस पाठविले होते. पत्र असे :–

श्री ३१ मार्च १८०९

पा. छ. १९ सफर. सन तिस्सा.

"...सदाशिवपंत भाऊ व मोदी वगैरे स्वारी समागमे गेले आहेत. शिरुर कुकडीहून[१] चार पलटणे व कर्णेल वालिस साहेब हिंदुस्थानात चैत्र व. ९ स निघून जाणार आहेत. याचे कारण की, हिंदुस्थानातील राजे रजवाडे यास आवई पडावी की, दक्षिणेतून इंग्रजी पलटणे येत आहेत. सबब इंग्रजांचा जोर आहे. सबब इंग्रजास सामील असावे असे राजेरजवाडे यास वाटावे सबब ही पलटणे जात आहेत. भोसले काही गडबड करतील सबब इंग्रजांनी नागपूरपासोन चाळीस कोसावर उमरावतीस दोन पलटणे व पूर्वेकडे बंगालच्या लगत्यास आरपूर येथे चार पलटणे ठेविली आहेत ती अद्याप नेहमी तशीच आहेत.....[२]"

---

१ : होळकरांशी लढण्याकरता इंग्रजांनी लढाईची तयारी अवाढव्य प्रमाणावर केली होती ... पन्नास साठ हजार फौज रणांगणावर उभी होती इंग्रजांच्या दक्षिणेत पांच मोठमोठ्या टोळ्या होत्या. त्या अशा :–
१ : पुण्यानजीक शिरुर – कुकडीवर. २ : अहमदनगरास.
३ : जाफराबाद (निजामाचे दक्षिणेस) ४ : मुख्य फौज मुंबईस.
५ : गुजरातेत.
दक्षिणेतील फौजेवर ज. वेलस्ली हा मुख्य सेनापती होता.
(ऐ. ले. संग्रह : भाग १५ : पृ. ७९९७)

२ : ऐतिहासिक लेख–संग्रह : भाग १५ : य. वा. खरे : पृष्ट ८३५२ : पत्र क्रमांक : ७१९६

परिशिष्ठ क्र. १

१ : छत्रपती शाहूने राणोजीस दिलेली सनद.



स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृत संवत्छरे आश्विन शुद्ध एकादशी भौमवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा छत्रपति स्वामी यांनी राजश्री राणोजी बिन बापुजी भोसले यांस दिल्हे इनामपत्र ऐसाजे तुम्ही स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक तुमचे चालवणे स्वामीस आवश्यक जाणोन स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हास इनाम मौजे उमरावती, प्रगणे बडनेर बिबि चे हा गांव कुलबाब कुलकानू देखील हालीपाटी व पेस्तर पटी खेरीज इनामदार व हाकदार तुम्हास तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम करुन दिल्हा असे तरी तुम्ही मौजे म । र चतु:सिमा पूर्व मर्यादे प्रो ॥ आपले दुमाले करुन घेऊन तुम्ही तुमचे वंशपरंपरेने इनाम अनभऊन सुखरुप रहाणे लेखनालंकार.

मर्यादियं
राजते

तेरीख ९ मोहरम सुरु सलास आरबैन
बार सुद सुरु सुद बार बार[1]

इंग्रजी तारीख ९ आक्टोबर १७२२ इ.

---

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला : उमरावतीकर भोसले संग्रह पान ११८, व पुणे आर्किव्हज् : शाहुदप्तर क्र. ३१ इनाम सनद : क्र. ४४२६४

२ : रघोजी भोसले प्रथम याने राणोजी भोसले यास लिहून दिलेला करारनामा

रघोजीचा प्रथम शिक्का अष्टकोणी→

श्री
पार्वतीकांत
विश्रांती मनसाती
यशस्वीनबिबात्मज
तस्य मुद्रैषा

श्री

राजश्री राणोजी बाबा भोसले गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजेश्री स्ने।। रघोजी भोसले राम राम विनंती सु।। सन सीत असर मया आलफ (११२६) तुम्ही आम्हास फौजे मध्ये ठेविले आणि तहनामा करुन दिल्हा बी. ता.।।

तह हली फौजेमध्ये आपण ××× रहावे आणि जे महाल आहे ××× नेमून घेतले आहेत खर्चवेच पडेल तो या खेरीज आणखी जो टका पैका येईल त्या पैकी तुम्हाकडील ×× रहातील त्याजकडे दोन तकसीमा घ्याव्या एक तकसीम आपण घेऊन यासी तजावत[1] व तफावत[2] करुं नये तुम्हाकडील जो राहील त्यानी दोनं तकसीम फौज ठेवावी एक तकसीम तिजाईची ठेवावी फौजेमुळे व कर्जवाम होईल तरी तुम्ही मशारनिले कडे दोन तकसीमा ×× एक तकसीम आपले फौजेस होईल ते कर्ज × एक मते राहोन तफावत करुं नये

रुजेवातीने एक तकसीम आपण देऊ दोन तकसीमा तुम्ही घ्याव्या. सरमजामात घालमेल एकंदर परगणी याची जागा ××× जमा माळवे पैकी××× जो टका पैसा येईल तो बिला उजूर घेऊ तुम्हास × द्यावी तफावत करु नये.

कलम १ कलम १

---

१ : उल्लंघन, अतिक्रमण. २ : बदल, अंतर

पेशजीचे सरंजामा खेरीज ज्याजती सरंजाम
दरबारी होऊन करुन घ्याल त्यास
खर्चवेच पडेल तो एक तकसीम आपण देऊ
दोन तकसीमा तुम्ही द्यावा. सरंजाम तिजाई
आम्ही घेऊन तफावत करुं नये,

एकून कलमे पांच ब॥ तहनामा प्रो॥ आम्ही ×× ऐवजी तफावत करणार नाही छ २४ रमजान बहुत काय लिहिणे हे विनंती[1].

(दि. १२ ऑगस्ट १७१५)

मोर्तब
सुद

३ : बाजीराव बल्लाळ पेशवे यांनी सवाई संताजी यास लिहून दिलेला तहनामा

श्री

तहनामा राजश्री सवाय संताछी भोसले यांसी बाजीराऊ बलाळ प्रधान सुदर सन तिसा अशरीन मया व आलफ चिरंजीव राजेश्री चिमाजी फौज सहवर्तमान रेवा उत्तर तिरी स्वारीस जात आहेत त्यास तुम्ही आपले फौजेनशी सामील होऊन त्यानी तुम्ही यणे तह प्रो॥ वर्तावे कलमे बी त॥

माळवा मोकासा आमचा आहे
त्यामध्ये तुम्हास काही तालुका नाही
कलम १
नर्मदे अलीकडे तुमचे मोकासे

पर मुलकात गेलीयावर फौजेतून
जो टका आकारेल त्यापैकी
दिवाणचा बाब दर सदे रुपये
२० विस काढून बाकी रुपये
८० ऐंसी ते फौजेवर वाटून घ्यावे
कलम १

सदरहु प्रमाणे उभयतानी वर्तन एक दिचारे मनसबा कराचा छ १४ रबिलावल अज्ञा प्रमाण[1].

(दि. ७ आक्टोबर १७२८)

लेखन
सीमा

१

---

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेख संग्रह : खंड पहिला : पा. १२८

४ : छत्रपति शाहूचे राणोजी भोसले यास मोकासा दिल्याबद्दल आज्ञापत्र

शिक्के दोन पंतप्रधान व पंतप्रतिनिधि

श्री

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंगनाम संवत्छरे श्रावण शुद्ध पंचमी सौम्यवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यानी देशमुख व देशपांडे प्रगणे आरवी सरकार गावेल प्रा। वराड यासी आज्ञा केली ऐसी जे प्रगणे मजकूर पेशजीच्या मुकासीया कडून दुर करुन हली राजेश्री राणोजी भोसले याजकडे जमावाचे बेगमी बद्दल मुकासा दिल्हा असे तरी तुम्ही यासी रुजू होऊन प्रगणे म।र मुकास बाबेचा ऐवज मशार निल्हेकडे वसूल देणे. लेखनालंकार

मर्यादेयं विराजते

(शेरे वर प्रमाणे)

तेरीख ३ जिलहेज सु।। समान आसरीन[१]

(दि. १२ जुलै १७२०)

टीप– त्याच दिवशी प्रगणे आरवी प्रमाणेच (१) प्रगणे नाचनगाव, सरकार कळंब, (२) प्रगणे कुन्हे, सरकार गावेल, प्रांत वराड, (३) प्रगणे मलकापूर पोहरे, सरकार नरनाला (४) प्रगणे विरुर अकाचे, सरकार गावेल, प्रांत वराड, (५) प्रगणे गिरड माडगाव, सरकार कळंब, प्रांत वराड आणि (६) प्रगणे केळझर, सरकार कळंब या सहा परगण्याचे मोकाशे फौजेच्या बेगमीकरिता राणोजी भोसले यास दिले आहेत. त्यांच्या बद्दल अलग अलग अशा सनदा आहेत.[२]

---

१ व २ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला : पा. १२० व १२१

५ : छत्रपति शाहु : राणोजी भोसले यास मोकासा

शिका : बदामी बाजीराव बलाळ यांचा
व अष्टकोणी पंत प्रतिनिधीचा

श्री

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ५३ पराभव नाम सवत्छरे भाद्रपद सुद नवमी सौम्य वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यानी देशमुख व देशपांडे प्रो । रालेगाव, सरकार कळंब, प्रां । वराड यासी आज्ञा केली ऐसीजे प्रां । म र × व मुकासे वजा करुन राजश्री राणोजी भोसले याजकडे मोकासा आहे तेणे प्रां । साल मजकूरी करार केला आहे. तरी तुम्ही यासी रुजू होऊन मोकास बाबेचा वसूल सुरळीत देणे. जाणीजे लेखनालंकार

मर्यादियम्
राजते

सुरु सुरनविस
संमत सरकार

समत सुमंत संमंत मंत्री

(दि. २४ ऑगस्ट १७२६) वार सुद, सुरु सुद बार बार बार बार[1]

६ : छत्रपति शाहु : राणोजी भोसले यास मोकासा

श्री

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ५४ किलक सवंत्सरे जेष्ट सुद्ध सप्तमी इंदुवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यानी देशमुख व देशपांडे प्रां । सुरजी अंजनगांव सरकार गावेल प्रां वराड यासी आज्ञा केली ऐसीजे प्रां मा राजेश्री राणोजी भोसले याजकडे मोकासा आहे तेणेप्रमाणे करार केला आहे. तरी तुम्ही मशारनिल्हेशी रुजू होऊन प्रां मांर मोकासबाबेचा वसूल सुरळीत देणे जाणीजे लेखनालंकार

मर्यादियं
राजते

रुजू समत सुमंत समती मंत्री समत सरकार
बार सुद सुरु सुद बार बार बार बार[2] (दि. ३ जुन १७२८)

१ व २ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला पा. १२१ ते १२३

टीप– या आज्ञापत्राप्रमाणेच (१) प्रां गिरवली, सरकार माहूर, प्रांत वऱ्हाड व प्रां लाडखेड, सरकार कळंब, प्रांत वऱ्हाड हे दोन प्रगणे राणोजी भोसले यास मोकासा दिल्याबद्दल त्या त्या प्रगण्याच्या देशमुख देशपांड्यांना आज्ञापत्रे शाहु महाराजांनी त्याच तारखेस दिली आहेत. मूळ पत्रावर शिरोभागी बाजीराव बल्लाळ प्रधान आणि श्रीनिवासराव प्रतिनिधि यांचे अनुक्रमे बदामी व आष्टकोनी शिक्के आहेत.[१]

७ : महंमदशहा बादशहाने राणोजीस दिलेली सनद

शिका वाटोळा फारशी
महमुदशाहा बादशाचा

श्री

राजश्री सवाई संताजी भोसले गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी अलंकृत सदा राजमान्य स्नेह प्रतिपूर्वक त्याहवेया कारण ऐसाजे तुम्हास प्रगणे जामगड जागीर दिधले असे शिवाये अदाब[२] प्रतापसाही जमीदार प्रांा मोजे चवकीगड वगैरे देह १२ व व्रिती ब्रगुजी

जोशी याची वावर ६ व विश्वा अंबीयाची झाडं व परगावी रुपया हे सुदामत आहे. हे अल्हादे असून बाकी प्रगणा माल व सायर दरोबस्त मोकास दिधली असे तेथ आपला आमल करणे मोर्तब सुद

मोर्तब ←फारशी

तेरीख १३ सुध माहे माध सां १७८६ (२० जाने १७३०)[३]

---

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला पा. १२३
२ : प्रतिष्ठा, सन्मान
३ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला पा. १२९ व ३०

१ : (१३६) अस्सल वरून नक्कल.
(५८) श्री गजानन

८ : राजश्री राणोजी भोसले गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित पाराशर दादाजी आशिर्वाद विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असले पाहिजे, विशेष श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींनी तुम्हाकडून मौजे कुमठे वगैरे याचे नजरे बाबत ऐवज

याची खांदेबंदी येणे प्रमाणे रु. १५०००
५००० कार्तिक वद्य ५
५००० पौष वद्य ५
५००० चैत्र वद्य ५

एकूण पंधरा हजार रुपये देविले ते खांदे येणे प्रमाणे परभारे देविले ते बितपशील. रुपये ५०० रदकर्ज देणे नारो गणेश.

७२५० ताजा कलम राजश्री गोविंदराव.
६००० हवाल्या बद्दल चिठ्ठी.
१२५० वसुल कुमठे बद्दल रुजु होणे बद्दल गोविंदगड.
———
७२५०
५३७३ निसबती पंडित मिरजकर तुकोजी शामराव.
१८७७ रकम कर्ज देणे. गणेश कृष्ण दामले.
———
१५०००

एकूण सदरहु रुपये पंधरा हजार भरुन पावले, दुकान पुणे हस्ते नारो गणेश बेहरे रुपये पंधरा हजार पावले. छ १ माहे रबिलावल समान खमसेन मया व अल्फ बहुत काय लिहीणे ही विनंती[१].

१ : काव्येतिहास संग्रह : ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे : का. ना. साने, पा. १५४

९ : बाळाजी बाजीराव प्रधान : राणोजी भोसल्यास दिलेली सनद.

(५१) श्री अस्सल प्रमाणे नक्कल

राजश्री राणोजी भोसले गोसावी यांस

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीणे विशेष. तुम्ही हुजूर येऊन विदित केले कीं, आपली चुलती रमाबाई (रामाऊ) भोसली ईस राजपत्री गांव चालत आहेत बितपशील–

१ मौजे कुमठे सदरहु वगैरे गांव प्रांत वांई दरोबस्त
१ मौजे दुसे तालुके हवेली प्रांत कराड निमे इनाम
१ मौजे मरली ता. हवेली प्रांत कराड निमे इ.

एकूण तीन गाव इनाम राजपत्री आहेत त्यांत साल मजकुरी, रमाबाईस देवाज्ञा जाहली तरी सदरहु गाव आमचे नावे करार करुन देऊन चालविले पाहिजेत, म्हणून त्याजवरुन तुम्ही रमाबाईचे पुतणे हे जाणोन तुम्हास तीन गाव सदरहु प्रमाणे करार करुन दिले असेत, तर रमाबाईचे राजपत्रा प्रमाणे तुम्ही इनाम अनुभवून सुखरुप रहाणे, तीन गाव वंशपरंपरेने अनुभवीत जाणे. छ ७ माहे रबिलावल सन समान खमसेन मया (व) अल्लफ. बहुत काय लिहीणे[१]. (दि. ११ दिसेंबर १७५५)

१० : शाहूने कान्होजी, रघुजी व राणोजी यांच्या सरंजामाची केलेली वाटणी.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३, प्लवंगनाम संवत्सरे, जेष्ठ शुद्ध नवमी, गुरुवासरे. क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी यांणी राजमान्य राजश्री राणोजी भोसले यांसी आज्ञा केली ऐसीजे :– राजश्री कान्होजी भोसले स्वामीच्या दर्शनास आले. तुम्ही हुजुर होतेत. त्यास, तुम्हा उभयताचे समाधान करुन सरंजामाची वाटणी करुन दिल्ही आहे. बितपशील मसूरचे मुक्कामी राजश्री बाळाजी पंत प्रधान यांचे विद्यमाने सरंजाम करार करुन दिल्हा आहे. त्यापैकी दोन तक्षिमा (एक तक्षिम) राजश्री कान्होजी भोसले व एक तक्षिम तुम्ही व रघोजी भोसले यांसी सरंजाम कलम १

---

१ : काव्येतिहास संग्रह : ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे : का. ना. साने, पा. ११४

हल्ली पराभव नाम संवत्सरी सातारियाचे मुक्कामीं स्वामींनी हुजुरुन सरंजाम दिला आहे. त्यापैकी तीन तक्षिमा राजश्री कान्होजी भोसले बाकी चौथी तक्षिम तुम्ही व रघोजी भोसले यांसी.

कलम १

येणे प्रमाणे सरंजामाची वाटणी करुन देऊन तुम्हास रघोजी भोसले देखिल राजश्री कान्होजी भोसले यांचे बरोबर दिल्हे आहे. तुम्ही मान्य करुन स्वामींच्या पायाची शपथ केलीत.

या उपरी सदरहु वाटणी प्रमाणे तुम्ही सरंजाम घेऊन कान्होजी भोसले यांचे विचारे वर्तणूक करणे. तुम्ही त्याचे महालांत दखल न देणे. ते तुमच्या महालात दखलगीरी करणार नाहीत. सरंजामा खेरीज परमुलुखात खंडण्या होतील, त्यापैकी सरदारी वाटा चौथाई काढुन, बाकी राहील त्यापैकी तुमचे व त्यांचे फौजेबरहुकूम वाटून देतील. तुम्ही व रघुजी भोसले राजश्री कान्होजी भोसले यांचे बरोबर राहोन, एक विचारे स्वामीकार्य करणे. तुमचा मुक्काम कान्होजी भोसले यांचे बरोबर होईल. तुम्ही सदरहू लिहिल्या प्रमाणे वर्तणूक करणे राजश्री कान्होजी भोसले चालवावयास अंतर करणार नाही. जाणीजे[1].

(दि. १८ मे १७२७)

११ : तेरीख ४ रोज इंदूवासरे भाद्रपद शुद्ध सप्तमी सरंजाम किमत राजश्री कान्होजी भोसले सन्दा विद्यमान प्रतिनिधि बाबत राणोजी भोसले

सरकार गावेल	:	कुरम्, कुन्हे, आर्वी, आष्टी, विरुर, सुलगांव
सरकार नरनाळा	:	धारुर, बार्शी टाकळी, निमगांव, माभंज
सरकार खेडला	:	सातारे, शहापूर, धाबे.
सरकार कळंब	:	लालखेड, बोरी, पालेगांव, वेलीवाकडी, सालवड, बाबगांव.
सरकार पवनार	:	केळझर, गिरडी, मार्डी, नांदूरा, गिरोली.

१ : छत्रपती श्री शाहु महाराज यांची रोजनिशि : भाग १ ला : राजकीय महत्त्वाच्या गोष्टी : वाड–पारसनिस : १९१७ : पा. ८०–८१.

सरकार हंडिया : कोलीभीत.

दिसरे तक्षिमेचे मदात – चांदे, नेमाड, मांडवा, देवगड, मुलतापी, अंजनगांव सुर्जी, अचलपूर.[1]

१२ : माहे जिलकाद खेरिज १४ बहुळ प्रतिपदा इंदूवासरे सनदा मोकासे राजश्री राणोजी भोसले. महाल ११

तपशील–

सरकार गावेल : (१) खोलापूर (२) रिद्धपूर ३ येवदे ४ नांदगांव ५ मानेखुर्द ६ मालखेड.

सरकार नरनाळे : १ वाडेगांव २ राजुरवाडे ३ लाजरकुंड ४ जेपूर परगडे, अमळनेर सरकार खेडला. एकूण ११ महाल[2]

१३ : राणोजी उर्फ सवाई संताजीचे नंदलाल मंडलोई, इन्दूर यास पत्र

ता. १ मार्च १७२५

श्री शंकर

शिक्का ... श्री राजाशाहुचरणी तत्पर संताजी भोसले निरंतर

शके १६४६ फाल्गुन व ॥ १२

म ॥ अनाम नंदलाल मंडलोई प ॥ इन्दूर प्रांत माळवे यासि सवाई संताजी भोसले सु॥ सन खमस अशरीन मया व अलफ फौजेच्या उस्तवारी-बद्दल त्या प्रांतात थोडीयच रोजांत येत असो त्यास सांप्रत आपाजोपंत व राजश्री गोपाळपंत याजपासी कागदपत्र देऊन महाराणाकडे उदेपुरास रवाना केले आहेती हे तुम्हापासी येतील यासी खर्चास रुपये ५०० पांचसे परगणे मजकूरपैकी नाजूक काम समजोन आधी यांचे पदरी घालून समागमे माणसे आपली देऊन पलीकडे पोहोचावणे या कार्यास एक घडीचा विलंब न लावणे साल गुदस्ता रुपये १५००० हजार पडले होते त्यापैकी राजश्री बिसाजी हरी याजवळ घोडी व कापड ५ पाच हजार रुपयेचे पाठविले

१ व २ : शाहु दप्तर क्र. २ पुडके क्र. ४ पत्र. क्र. १७८६ व १९७३



चित्र क्र. १९ : निजामाचे सैनिक (पृष्ठ ८८ पहा)



चित्र क्र. २० : निजामाचे पोलिस (पृष्ठ ८८ पहा)

चित्र क्र. २१ : ठगांची टोळी (पृष्ठ ८५, १५३-५४ पहा)

चित्र क्र. २२ : पेंढारी सामान्य वेषात (पृष्ठ ८९ पहा)

चित्र क्र. २३ : अमरावतीचा तत्कालीन मुख्य बाजार, सक्करसाथ नव्या स्वरुपात (पृष्ठ ९३ पहा)

चित्र क्र. २४ : निजाम सिकंदरजहाँ (इ. सन १८०३–१८२९) (पृष्ठ ८९ पहा)



. २५ : अमरावतीचा तत्कालीन मुख्य कापड बाजार
जुना बजाजा
(आता तेथे निवासोपयोगी घरे आहेत.)

बाकी रुपये १०००० हाजार हे म ॥ निल्हेस पाठवून देणे. रुपयेही आखर देणे लागेल परंतु पाठविले यामधी उत्तम आहे. कळले पाहिजे. छ. २६ चनादिलाखर[१].

(मोर्तब सुद)

४ : राणोजी उर्फ संताजी भोसले यांचे नंदलाल मंडलोई, इन्दूर यास पत्र

श्री शंकर

शिक्का— श्री राजशाहुचरणी तत्पर संताजी भोसले निरंतर

शके १६४६
फाल्गुन व ॥ १४
(२ मार्च १७२५ इसवी)

छ म ॥ अनाम नंदलाल मंडलोई व कानगो प ॥ इंदूर प्रांत माळवे यासि सवाई संताजी भोसले सु ॥ खमस असरीत मया व अलफ राजश्री गोपाळपंत व आपाजीपंत महाराणाकडे उदेपुरास कांही नाजुक कार्य भाग प्रसंगामुळे रवाना केले आहेती त्यास हे तुम्हाजवळ येतील तैशास आमच्या नजरेबाबत घोडा यक व वस्त्रे तुम्हाकडीलयांचे स्वाधीन करुन यांस पलीकडे मार्गस्त करणे या कार्यास विलंब न लावणे—विलंबाखाले घातले आणि कार्यास अंतर पडिले म्हणजे जबाब तुम्हास करणे लागेल हे स्पष्ट समजा. लिहिल्याप्रमाणे वर्तणूक करणे छ २७ जमादिलाखर[२].

(मोर्तब सुद)

१५ : द्वितीय राणोजी भोसले

श्री लक्ष्मीकांत

शिक्का अष्टकोणी. श्री शाहुराज पदांभोज भ्रमरायित चेतस : बिम्बात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते

ता. २६ मे १७७० इ.

राजश्री अनंतभट चितळे कमाविसदार मौजे उमराव्ती प्र ॥ वडणेर बी. बी. गोसावी यासी

---

१ व २ : राजवाडे खंड ६ पा. ६४८ : पत्र क्र. ५९५ व मराठ्यांच्या इतिहासाची साधने : पुरंदरे : पा. ६५८ पत्र क्र. ५९५

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्ने ।। साबाजी भोसले सेना साहेब सुभा दंडवत सु ।। सलास सबैन मया व अलफ मौजे मजकूर हा गाव पेशजी तीर्थस्वरुप कैलासवासी राणोजी बाबा भोसले याजकडे मोकासा होता येणे प्रमाणे हल्ली ११८३ चे सालापासून चिरंजीव राजश्री राणोजी भोसले याजकडेस मोकासा दिल्हा असे तरी मौजे मजकूरचे मोकासीयाचा अमल सुदामत प्रमाणे मशार निलेकडेस देणे जाणीजे छ ३० माहे मोहरम

मोर्तब सुद [१]

१६ : द्वितीय राणोजी भोसले

श्री लक्ष्मीकांत ता. २६ जून १७७१ इ.

(शिक्का प्रथम रघुजीचाच)

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने ा साबाजी भोसले सेना साहेब सुभा दंडवत सुा आर्बा सबैन मया अलफ मौजे उमरावती पाा वडणेर बीबी प्रांत वराड येथील मोकासा चिरंजीव राजश्री राणोजी भोसले याजकडे दिला आहे याच्या सनदा पेशजी सादर केल्या असता मौजे मजकूरचे मोकासीयाची अमल अद्याप मशार निलेकडे देत नाही म्हणौन हुजूर विदीत जाहाले आहे तरी हे गोष्ट कार्याची नाही याउपरी देखत पत्र याचे सनदे प्रमाणे यांचा अमल देणे पेशजी बरात[२] यांची आहे. त्या वराती बमोजीव ऐवज झाडून देणे विसी फिरोन बोभाट येऊ न देणे जाणीजे छ १३ माहे रबिलावल बहुत काय लिहिणे

मोर्तब सुद

टीप– याच तारखेचे साबाजी भोसले यांचे वऱ्हाडचे सुभेदार विठ्ठल बल्लाळ यास राणोजी द्वितीय याला अमरावतीच्या मोकाशाचा अमल देण्याविषयीचे पत्र आहे[३].

---

१ व ३ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला पा. १४२ ते १४४

२ : सरकारी वसूलावर हुंडी.

१७ : व्दितीय राणोजी भोसले

शिक्का राणोजीचा = शाहुराज पदांभोज संवर्धित मनोरथ राणोजी भोसले स्यैषा

पत्रात सन व तारीख नाही.

राजश्री कोनेरपंत गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने ॥ राणोजी भोसले दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे. विशेष तुम्हाकडील वर्तमान बहुत दिवस कळत नाही. तेणेकरुन चित्त उदास आहे तर आपणाकडील सविस्तर वृत्त आलिया जासुदाबरोबर पत्रीय परामृष करीत गेले पाहिजे यानंतर आम्हाकडील वर्तमान पेशजी.....काळो आले असेल. सांप्रत आमचे सरंजामात तीर्थस्वरुप राजेश्री रघोजी बावानी अमलास खलील करुन आम्हावर मोगलानी फौज ऐसे आम्हावरी रवाना केली असे कळले पाहिजे तेथे दरबारी आपण आहेत याजवरी आपण चित्तावरी घेतल्याखेरीज याचे पारपत्ते होत नाही. तीर्थरुप राजेश्री बाबासाहेब तेथे गेले आहेत ते व आपण मिळून पेशजीप्रमाणे सरंजाम वाजवी प्रमाणे ठीक करुन राजपत्रें द्यावी सर्व भरोसा तुमचा आहे. तुम्ही चित्त पुरविल्याखेरीज होत नाही. या कामकाजात आपण चित्त घातले म्हणजे आमचे बरे होईल. हा भरोसा पूर्ण आहे[१].

१८ : सवाई माधवराव नारायण पेशवे : सखोजीस आज्ञापत्र

श्री

राजेश्री सखोजी भोसले गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने ॥ माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकिय कुशल लिहित जाणे विशेष तुमचे प्रयोजन असे तरी तिनसे स्वारानशी निधोन देखत पत्र हुजूर येणे लोकांची बोली फौजेची शिरस्ते

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला : पा. १४४

प्रो. होईल जाणीजे छ १५ रबिलाखर सु॥ खमस तिसेन मया व अलफ बहुत काय लिहिणे.

शिक्का गोल
(दि. ३० नोव्हेंबर १७९२)

श्री राजाशाहू नरपति
हर्षनिधान माधवराव
नारायण मुख प्रधान

(लेखन सिमा[१])

१९ : सखोजी भोसले

ता. छ. १० रविलाखर

श्री सु॥ सन दिला नाही

राजेश्री सखोजी भोसले गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ बालाजी जनार्दन+ आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकिय कुशल लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले. आम्हाकडे उमरावती गांव चालत होता तो आलीकडे चालत नाही. यास्तव राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा यांजकडील कुशाबा[१] यासी बोलून उमरावती गाव वहीत लाख ऐवज महाल निसबत हिसावाटा प्रां॥ पावत होता तो देवऊन आमचे आम्हाकडे चाले ते करावे येविषी राजेश्री दाजीबा फडके व गोविंदराव पिंगळे यास पत्रे लिहिली आहेत त्यास ते बोलतील त्या प्रां॥ कामकाजाचा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे × × × येविषी पत्र आल्यास स्वार सरंजामा सुद्धा तयार होऊन येतो. म्हणून लिहिले ते उभयता सांगितल्यावरून सविस्तर कळले ऐशास तुमचे काम काजाचा मजकूर तरी सेनासाहेब सुभा याचे येणे इकडे होईल तेव्हा त्यासी बोलण्यात येईल. स्वार सरंजाम सुद्धा तयार होऊन येण्याविषयीचा मजकूर लिहिला त्यास सरकारचे पत्र ३०० स्वारानशी तयार होऊन यावयाविषी आहे त्या प्रां॥ यावयाचे करावे रा॥ छ १० रबीलाखर बहुत काय लिहिणे लोभ असू दिजे[२].

---

१ : विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह : खंड पहिला पा. १४६

+ बाळाजी जनार्दन म्हणजे नाना फडणीस.

२० : उमरावतीकर शिवाजी भोसले यांस सनद

".....छ ४ सफर खमस सबैन मया व अलफ ११८४ फसली, चैत्र शु. ६ गुरुवार शके १६९७ मन्मथ नाम संवत्सरे ता. ७ एप्रील सन १७७५ इसवी, शिवाजी भोसले यासी साबाजी भोसले सरकार कामास आले सबब सेना साहेब सुभा सांगोन वस्त्रे देऊन सरदारीस उभे केले त्या समयी हात रोखे प्रो।

नांवाचे मुसलमान सरदार
शंभर स्वारावर त्यास
मुलीमाना सुजा आतशाआर

१ हस्तखान मस्तखान
१ महमद अमीरखान
१ हैदर अगा
१ जोरावरखान
१ कादर दादखान
१ रसुलखान
१ जैतबखान
१ बिलंदखान
१ रोशनखान
१ तेजेखांन

१०

मराठे सरदार राजेश्री

१ गोविंदराव मुकुंदराव
१ काशीराव व मुकुंदराव व रामचंद्रराव पाटणकर
१ बहिरराव पाटणकर
१ जागोजी यादव
१ सुभानराव पाटणकर
१ बाळकृष्णराव पाटणकर
१ केशरसिंग व बहिरसिंग
१ राणोजी कराडे
१ हैबतराव बाबर
१ लक्ष्मणराव पाटणकर
१ गंगाराम जाधव
१ गंगाजी शिर्के
१ भवानजी आटोळे
१ निंबाजी भोसले
१ येशवंतराव यादव

१५

जाणीजे छ ४ सफर खमस बहुत काय लिहीणे दकारी[1]—कागद लिखितवार लेहून राजमान्य उपरी तेरीख साल बहुत काय लिहीणे.

---

१ : दकारी कागद म्हणजे 'छ' या चिन्हेकरून युक्त.

शिवाजी भोसले यासी सेना साहेब सुभा सांगीतला असे तरी तुम्ही त्याजवळ राहुन स्वामिचे लक्ष धरुन सेवा एक निष्ठेने करून बजावून दाखविणे.

१ रामचंद्र नाईक निंबाळकर
१ जगदेवराव नाईक निंबाळकर
गोसावी यासी
१ जोत्याची घाटगे
वगैरे मंडळी [१]"

१। काव्येतिहास संग्रह क्रमांक ३१ : ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे : साने : पान ४४३ (नवीन आवृत्ति ले. नं. २३०)

प्रकरण तिसरे

अनुक्रमणिका

१९ व्या शतकातील उमरावती ..... ठग व पेंढाऱ्यांचा उपद्रव.....उमरावती शहरावर चित्तू पेंढाऱ्याचा हल्ला ..... नंतरही बंदोबस्त नाही.....माल टेकडी.....उमरावतीचा परकोट..... खुनारी खिडकी.....आठवडी बाजार.....राजा बिसनचंदची हवेली ..... दुष्काळ आणि शेठ धनराज याची हत्या..अमरावती टाकसाळ. उमरावतीचे शेटे.....निजामाचे काळातील वऱ्हाड आशिया खंडातील कापसाची मुख्य पेठ ..... उमरावतीचा कापूस व्यवसाय.....उमरावती कॉटन यार्ड ..... कॉटन मार्केटची सुरवात कॉटन मार्केट हटविण्याची योजना..... मॅचेस्टर मध्ये ख्यातीप्राप्त "उमरावती कॉटन" प्राचीन 'कापूस भूमी' वऱ्हाड ..... परिशिष्टे १ ते १०

प्रकरण तिसरे

१९ व्या शतकातील "उमरावती" : उमरावतीकर भोसले घराण्याचे कारकिर्दीत उमरावती हे गाव प्रथम 'कसबा' व नंतर 'पेठ' बनले. आणि अठराव्या शतकाच्या शेवटचे दशकात 'उमरावती'ची गणना शहरात होऊ लागली, कारण त्यावेळी उमरावतीचा व्यापार उदीम इतका वाढला की, त्या काळात उमरावती एवढे व्यापार उदीमात व श्रीमंतींत वऱ्हाडात दुसरे शहर नव्हते. उमरावतीचे उन्नतीला, हैद्राबाद ते इंदौर व हैद्राबाद ते जबलपूर (नागपूर मार्गे) व्हाया उमरावती, हे दोन, त्याकाळचे राजमार्ग देखील कारणीभूत ठरले होते. कारण वऱ्हाडातून जाणाऱ्या या मार्गांनी उत्तर व दक्षिण हिंदुस्थान जोडल्या गेले होते व त्या काळातील दळणवळणाचे वऱ्हाडातून जाणारे हे मुख्य मार्ग होते.

उमरावतीस तेव्हा, उत्तरेतून अनेक व्यापारी जिन्नस दक्षिणेत व्यापारासाठी पाठविण्याकरिता तसेंच दक्षिणेकडील अनेक पदार्थ उत्तरेस व्यापारासाठी पाठविण्याकरिता येत असत आणि येथून मग ते रवाना केले जात. म्हणजे उमरावती हे त्याकाळी 'ठोक' व्यापाराचे केंद्र बनले होते. त्यामुळे उमरावतीला अनेक सावकारांनी आपल्या पेढ्या उघडल्या होत्या. हे पेढीवाले व्यापाऱ्यांना धंद्यासाठी व्याजाने पैसा पुरवीत. त्यामुळे दिवसेंदिवस येथील व्यापार वृद्धिगत होऊ लागला होता. असे म्हणतात की, त्याकाळी उमरावतीच्या निदान १०–१२ सावकारी पेढ्या तरी एवढ्या श्रीमंत होत्या की त्यांच्या १५ ते २० लाखापर्यंतच्या हुंड्या त्याकाळी चालत असत.

ठग व पेंढाऱ्यांचा उपद्रव : अठराव्या शतकाचे अखेरीस किंवा थोडे आधीपासून, ठग[१] व पेंढारी[२] यांचा मोठा उपद्रव या भागात सुरू होता. हे ठग आणि

---

१ व २ : या व्यक्तींची माहीती परिशिष्ट क्र. ३ मध्ये दिली आहे.

पेंढारी प्रामुख्याने शिंदे–होळकरांच्या राज्यात व त्यांच्याच आश्रयाने राहत असत. पुढे सन १८२७ ते १८३५ या काळात हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल लार्ड बेंटिंग[१] म्हणून होता. त्याचे कारकिर्दीत त्याने ठगांचा बंदोबस्त केला. त्या मोहिमेत पकडण्यात आलेल्या अमीर अली[२] नावाच्या ठगाने जी जबानी दिली होती ती, कॅ. फिलिप मेडोज टेलर[३] या, त्यावेळी 'टाईम्स' पत्राचा बातमीदार असलेल्या एका अंग्लो–युरोपियनाने सन १८३९ साली 'कन्फेशन ऑफ ए ठग' या नावाच्या पुस्तकात लंडनमध्ये प्रसिद्ध केली आहे. त्यात या अमीर अली ठगाचे, चित्रविचित्र घटनांनी भरलेले जीवन चित्रित केले असून, अमीर अली ठगाने त्यात ज्या गावांचे वर्णन केले त्यात उमरावती (Oomraotee) चे त्याकाळचे वर्णन दिलेले आहे. या चक्षुर्वै सत्यम् वर्णनात अमीर अली म्हणतो. "उमरावती नगरीच्या वरवर दिसणाऱ्या वैभवाने व समृद्धीने मी आश्चर्यचकित होऊन गेलो. पण ती आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नव्हती, कारण तेथे सर्व उत्तरेकडील व्यापारी-माल दक्षिणेत व्यापारासाठी पाठविण्याकरिता एकत्र केला जात असे, तसेच सर्व मसाल्याचे पदार्थ, औषधे व इतर व्यापारी जिन्नस दक्षिणेकडून येथे येत व ते सर्व उत्तर हिंदुस्थानात व्यापारासाठी पाठविले जात असत."

"सावकार–पेढीवाल्यांच्या हवेल्यांनी व विशाल दुकानांनी नगरी भरून गेल्यासारखी वाटत होती व माझ्या माहितीची प्रत्येक वस्तू व इतरही किती तरी युरोपियनांनी पाठविलेल्या चिजा बाजार पेठेत मांडून ठेवल्या होत्या की, ज्या मी पूर्वी कधीच पाहिल्या नव्हत्या. दररोज मी आपल्या बापाबरोबर येथे भटकत असे व जे जे दिसे त्याचे त्याचे कौतुक व आश्चर्य करीत असे." (ठगाची जबानी : पृ ७६–७७) +

वरील वर्णनावरून इ. सन १७९० च्या आसपास उमरावती शहराच्या श्रीमंतीची व व्यापारी वैभवाची कल्पना करता येईल. पुढे एके ठिकाणी हा अमीर अल्ली असेही म्हणतो की, "हैद्राबादपेक्षाही उमरावतीला पैसा जास्त आहे." यावरून त्याकाळी उमरावती शहर हे आर्थिक व व्यापारी दृष्टचा बरेच संपन्न शहर होते असे दिसून येते.

१, २ व ३ : या व्यक्तींची माहीती परिशिष्ट क्र. ३ मध्ये दिली आहे.

+ हे वर्णन अंदाजे इ. स. १७९० च्या आसपासचे असावे.

वरील वर्णनाचे काळी किंवा त्याचे थोडे आगेमागे देशाची स्थितीही फार अशांततेची होती. अर्थात वऱ्हाडही त्यास अपवाद नव्हताच "...नेहमी कोणत्याना कोणत्या लष्कराचा तळ देशात पडलेला असे. त्या लष्काराने आपल्या खर्चाकरिता अगर खंडणी म्हणून प्रत्येक मोठ्या गावातून रकमा वसूल करव्यात. ग्रामाधिकारी अगर देशमुख – देशपांडे यांच्या भोवती ही एक मोठीच धोंड असे. आपल्या गावच्या अगर परगण्याच्या रयतेस वाचविण्याकरता त्यांना आधीच पूर्वीच्या मुक्कामावर जाऊन लष्कराच्या अधिकाऱ्यांशी ठराव करून रुपये द्यावे लागत. नाही तर सदर्हू लष्कर गावी आले म्हणजे ग्रामाधिकाऱ्यास व गावातील शेट सावकारास धरून जबरीने पैसे घेत. नाही तर पकडून "वला" (ओळीस) म्हणून धरून नेत व पैसे आले म्हणजे सोडून देत. "दो अमली कारकिर्दीमुळे"+ खरा बंदोबस्त कोणीच करीत नसे व कोणीही हे आपले कर्तव्य समजत नसे. निजामाचे अगर भोसल्यांचे असे कायमचे लष्कर वऱ्हाडात राहत नसे. कोणीही यावे व लुटावे हा क्रम चालू असे. त्यामुळे कोणाचेही लष्कर आले की लोक गाव सोडून पळून जात व दूर अंतरावरून बातमी ठेवीत. मोगल, मराठे पैकी पेशवे, भोसले यापैकी शत्रू कोण व मित्र कोण, खरा राजा कोणता व रक्षणाकरता दाद कोणास मागावी हे वऱ्हाडच्या रयतेस समजत नसे[१]."

"...या प्रमाणे इलिचपूरचे नबाब सलाबतखां, देवजी गवळी, चैनसिंग, समशेर बहादूर आटोळे, पंचोत्रेकर वगैरे लहान मोठ्या सरदारांना व बंडखोरांचा नेहमी उपद्रव असे. खुद नागपूरकर भोसल्याचे फौजेबद्दलही हीच तक्रार होती. "श्रीमंत राजश्री सेना साहेब सुभे यांनी महालात* मनस्वी उपद्रव करून पायमाली केली व रु. सहा हजार घेतले. मागाहून

+ 'दो अमली कारकिर्द' म्हणजे नागपूरकर भोसले व निजाम या दोघांची सत्ता.

वऱ्हाडचे एकूण उत्पन्नापैकी भोसल्यांना साठ टक्के व निजामाला चाळीस टक्के उत्पन्न मिळत असे. परंतु वऱ्हाडावर मालकी मात्र निजामाचीच मानली जाई. नागपूरकर भोसले हे हक्का प्रमाणे साठ टक्के वसुलीचे मालक. भोसल्यांचा हा हक्क देवगावचे १८०३ चे तहाने नष्ट झाला होता.

१ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे. पृ. २१४

* परगण्याएवढा प्रदेश :

तोफखाना वगैरे नित्यशा रेज लागली आहे. त्याचा उपद्रव काही लिहिन्यांत येत नाही. "अशा तक्रारी तत्कालित खाजगी पत्रातून आढळतात. इतकेच नव्हे तर" प्रांत अगदी निर्वीर झाला, रक्षणाकरता कोणी नाही. ईश्वर लाज ठेवील ते खरे[१]." असे अगदी निराशेचे उद्‌गारही त्याकाळच्या खाजगी पत्रातून आढळतात. तर त्याच वेळी "...शिंदे, होळकर व फिरंगी यांच्या मध्ये जे हल्ली युद्ध चालू आहे तेणे करुन देशात सर्वत्र घोटाळा व गर्दी होऊन गेली आहे. अशा संधीत होईल तेवढा फायदा करुन घ्यावा असा आम्ही निश्चय केला आहे[२]." असे विचार तत्कालिन ठग–पेंढाऱ्यांचे आढळतात.

एकूण या अठराव्या शतकाचे अखेरीस आणि एकोणीसाव्या शतकाचे आरंभी देशात व वऱ्हाडात सर्वत्र अशांततेचे व भीतीचे साम्राज्य होते, हे वरील गोष्टीवरून दिसून येईल. अशा स्थितीत उमरावतीसारख्या वैभवसंपन्न नगरीवर केव्हा लष्कराची किंवा पेंढाऱ्याची धाड येईल आणि ही नगरी बेचिराख होईल याचा नेम नव्हता व तशी भीती येथील व्यापारी सावकारच नव्हे तर इतर सामान्य नागरिकातही होती+.

वऱ्हाडातील "दो अमली शासनामुळे त्यावेळी उमरावतीस नागपूरकर भोसले व निजाम या दोघाचेही महसुली अधिकारी राहत असत. आणि या अधिकाऱ्यासोबत थोडे सरकारी कर्मचारी व थोडे शिपाई असत. संरक्षणासाठी ही व्यवस्था अगदीच कुचकामी होती[३].

---

१ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे : पृ. २१८

२ : ठगाची जबानी : मेडोज टेलर : अनु. मोरभकर : पा. ३५

+परिशिष्ट क्र. २ मधील पत्रे पहा. उमरावतीवर हल्ला करण्यासाठी पेंढारी इ. स. १७९९ पासून प्रयत्नशील होते हे त्यावरून दिसून येते.

३ : **पोलिस** : सर सालारणंग दिवाण होण्यापूर्वी पोलिस खाते (निजाम राज्यात) नव्हते. रेव्हेन्यू खाते आपल्या सोईप्रमाणे व जरुरी प्रमाणे कमी–जास्त शिपाई नोकरीला ठेवीत असे. इ. स. १८६६ मध्ये प्रथमच पोलिस खाते सुरू झाले व त्याचे नियंत्रण इन्स्पेक्टर जनरल ऑफ डिस्ट्रिक्ट पोलिस या नावाचा स्वतंत्र अधिकारी नेमून त्याकडे या खात्याची व्यवस्था सोपविली होती. राज्याचे रक्षणाकरता स्वतंत्र फौज होती. या फौजेचे चार विभाग होते. १) रेग्युलर ट्रुप्स २) अिपीग्अिल सर्व्हिस ट्रुप्स, ३) गोवलकोंडा ब्रिगेड, ४) अिरेग्युलर ट्रुप्स असे भाग असत. (मराठ–वाड्याचा इतिहास : (मराठवाडा परिचय) विश्व भारतीय प्रकाशन : मालेगाव : पा. ३९–४०

अशी एकूण परिस्थिती असतानाच दि. २९–११–१८०३ रोजी इंग्रजी सैन्याशी भोसले व शिंदे यांच्या सैन्याची लढाई वऱ्हाडात अडगाव येथे होऊन तीत मराठ्यांचा पराभव झाला. या पराभवापाठोपाठ इंग्रजांनी गाविलगडावर दि. १३ ते १५ दिसेंबर १८०३ रोजी हल्ला करून हा किल्लाही घेतला. त्यामुळे नागपूरकर भोसल्यांना इंग्रजांशी तह करणे भाग पडले. दि. १७ दिसेंबर १८०३ रोजी गाविलगडचे पायथ्याशी असलेल्या 'देवगाव' या खेडचात हा तह होऊन भोसल्यांना वऱ्हाड प्रांत इंग्रजाचे स्वाधीन करावा लागला. या तहाने इंग्रजांना मिळालेला वऱ्हाडप्रांत इंग्रजांनी मैत्रीचे बक्षीस म्हणून १८०४ मध्ये हैद्राबादचे निजामांस देऊन टाकला. त्यामुळे वऱ्हाडवर एकटचा निजामाची सत्ता सुरू झाली.

उमरावतीचे सावकारांनी आणि व्यापाऱ्यांनी या संधीचा चतुरपणे उपयोग करून घेतला. त्यावेळी हैद्राबादचे गादीवर शिकंदरजहां हा निजाम होता. उमरावतीचे व्यापारी आणि सावकार यांनी त्याचेकडे शहराचा परकोट बांधण्यासाठी अर्ज केला. अनेक वर्षानंतर एकटचा निजामाकडे वऱ्हाडप्रांताचा कब्जा आला होता आणि वऱ्हाडच्या पूर्ण उत्पन्नावर एकटचा निजामाचीच मालकी राहणार होती (त्यापूर्वी वऱ्हाडचे उत्पन्नातून साठ टक्के भोसल्यांना व फक्त ४० टक्के निजामाला मिळत असत.) त्यामुळे व शिवाय वऱ्हाडवर आपली मालकी दाखविण्याची ही संधीही निजाम दवडू इच्छित नव्हता, म्हणून, निजाम शिकंदरजहाँ याने उमरावती शहरातील सावकार व व्यापारी यांचे पेंढाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी फसली सन १२१४–१५ मध्ये परकोट बांधण्याचा आदेश दिला. (हा परकोट पुढे सतरा अर्षानंतर बांधून पूर्ण झाला.) हा परकोट बांधण्यापूर्वी इ. सन १८०५ मधील दसऱ्यानंतर दि. १३ नोव्हेंबर १८०५ रोजी किंवा त्या सुमारास उमरावती शहरावर पेंढाऱ्यांचा हल्ला आला[1]. चित्तू पेंढाऱ्यांचे या हल्ल्यात, त्याचा एक सरदार अमीर अल्ली म्हणून होता, तो प्रथम पांचशे सशस्त्र पेंढाऱ्यासह शहरात घुसला होता. हा अमीर अली पुढे १२ वर्षे इंग्रजांचे कैदेत होता. काही अटीवर त्याची सुटका होऊन त्याला मेडोज टेलर या इंग्रज अधिकाऱ्याचे दिमतीला देण्यात आले. तेव्हा मेडोज टेलर याने अमीर अलीकडून त्याच्या आयुष्यातील हकीकत विचारली आणि

---

१ : परिशिष्ट क्र. १ व २ पहा.

अनेक चित्रविचित्र घटनांनी भरलेले आपले जीवन अमीर अलीने मेडोज टेलर या अधिकाऱ्यापुढे निवेदन केले. (जबानी दिली.) या जबानीचा उपयोग करून मेडोज टेलर यांनी इ. सन १८३९ मध्ये 'कन्फेशन ऑफ् ए ठग' हे इंग्रजी पुस्तक लिहून ते इंग्लंडमध्ये प्रसिद्ध केले. नंतर हे पुस्तक हिंदुस्थानांत येऊन त्याचा अनेक भाषांत अनुवाद झाला. या पुस्तकातच अमीरअलीने उमरावती शहरावरील पेंढारी हल्ल्याचे जे वर्णन केले ते येथे जसेच्या तसे दिल्यास, या हल्ल्याची खरी हकीकत वाचकास कळण्यास फार उपयोगी ठरेल. म्हणून तेवढा अनुवादित भाग जसाच्या तसा येथे देत आहोत.

उमरावती शहरावर चित्तू पेंढाऱ्याचा हल्ला.

सावकार–व्यापाऱ्यांकडून लाखो रुपयांचा नजराणा !! गाव बचावले :

" ... शेवटी दसरा उत्सव मोठ्या उत्साहाने व वैभवाने साजरा झाला. सर्व पेंढारी जमले होते, एक भव्य दृश्य होते. सर्वांची हजेरी घेण्यात आली. पाच हजार घोडेस्वार होते आणि ही संख्या, त्यांचे साथीदार व मदतनीस मिळून निश्चितपणे आठ हजारच्या जवळपास असेल. एक विशाल सैन्य, आपल्या स्वामीचे ताबेदार आणि स्वामीच्या हुकुमानुसार वाटेल ते कृत्य करावयास स्वखुशीने तयार असलेले, तसेच कोणत्याही प्रदेशाचा विनाश करावयास सज्ज असे हे विशाल सैन्य उभे होते.

असे ठरविण्यात आले की, नर्मदा नदी पार केल्यानंतर दोन टोळ्यांत विभागून वेगवेगळ्या दिशेने निघून जावे. दक्षिणेत कृिश्ता नदी पर्यंत घुसावे, आणि अडथळा न झाल्यास दक्षिणेपर्यंत जावे, आणि हे सर्व फिरंग्यांना न कळत व त्यांच्यापासून जपून करायचे, शक्यतो फिरंग्यांशी संघर्ष टाळायचा, कारण आज जरी ते स्वस्थ असले तरी केव्हातरी पाठलाग होणारच ! पहाट झाली व सर्व ताफा शिबिरातून निघाला. पथकामागे पथके आपआपल्या प्रमुखासमवेत सेनापतीला मुजरा देत जोराने धावत होती. नर्मदेवर होडीची व्यवस्था होती. आम्ही त्याच दिवशी नर्मदापार केली आणि हांडिया शहराजवळच्या मैदानात नर्मदेच्या दक्षिण पठारात उतरलो.

येथे आमचे सैन्य विभागले गेले. मी चित्तूच्या समवेत राहिलो आणि दुसऱ्या दिवशी आम्ही तापी नदीच्या पश्चिमेकडे जोमाने निघालो. सायंकाळपूर्वी आम्ही नागपूरच्या राजाच्या प्रदेशात पोहोचणार होतो, कारण त्यांच्याशी आमचा मुक्त प्रवासाचा तह झाला होता; फक्त त्यांचा प्रदेश लुटायचा नाही असे ठरले होते. दुसरी टोळी भिकूच्या नेतृत्वाखाली नर्मदेच्या पूर्वेकडे गेली. भिकू देखील चित्तूसारखा प्रभावी पेंढारी होता.

आम्ही जोराने धावत होतो, कारण आम्हांला आमच्या उद्दीष्ट स्थळी लवकर पोचायचे होते. पैसा नव्हताच. जर लूट मिळविली नाही तर उपाशी मरण्याची पाळी येणार होती. अशी खबर मिळाली की फिरंगी सैन्याची एक तुकडी मेजर फ़ाजरच्या हाताखाली आमच्यावर पाळत ठेवीत आहे, त्यांची संख्या फक्त तीनशेच्या आसपास असेल आणि आमच्या हजारोच्या सैन्यावर हल्ला करण्याची त्यांची हिम्मत होणार नाही अशी आम्हाला खात्री होती.

शेवटी फिरंग्यांनी आमच्यावर हल्ला केला. आम्ही तापी नदीच्या काठी एका खेड्याच्या जवळील मैदानावर आराम करीत होतो. काही जण तर घोड्यावर स्वारच होते, काही फिरत होते, काही सकाळचे जेवण शिजवीत होते. अशा वेळी अचानक सूचना मिळाली की फिरंग्यांनी हल्ला केला आहे. एकच धावपळ झाली. सर्वत्र धांदल उडाली. ते दृश्य अवर्णनीय होते. माणसे इकडे तिकडे धाऊ लागली, स्वारांनी घोड्यावर बसून त्वरित प्राण वाचविण्याकरिता पळ काढला. काही क्षणांत एकदम सुमसाम झाले. तेथे एकही व्यक्ती दिसत नव्हती. माझ्यासोबत असलेल्या माझ्या सैनिकांना मी माझ्या बरोबर राहावयास सांगितले. कारण फिरंग्यांचा हल्ला आमच्याच बाजूने होता. निष्फळ का होईना, पण प्रतिकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला, कारण फिरंगी–तोफा एकामागून एक आग ओकीत होत्या. माझ्या सैनिकांनी प्रतिकार करण्यास उत्साह दाखविला नाही. बाकी काहींनी मरेपर्यंत लढण्याचे आश्वासन दिले, पण माझे दोन चार सैनिक कामी आले आणि ते पाहून आम्ही घोड्यावर बसून पळ काढला. आमचा पाठलाग झाला नाही. काही घोडेस्वार मागे येताना दिसले, पण त्यांनी देखील नंतर पाठलाग सोडून दिला.

आमच्या नशिबाने संकट संपले होते. जर शत्रू जवळ मोठे पायदळ आणि जास्त तोफा असत्या तर आमचा निकाल सहज लागला असता आणि नवीन शहरे लुटण्याची व धन मिळविण्याची सर्व स्वप्ने धुळीस मिळाली असती. आम्हाला एक तर मृत्यू पत्करावा लागला असता किंवा आपआपल्या घरी जाऊन बसावे लागले असते. शेवटी पुनः हजेरी घेण्यात आली आणि आम्ही शंभरापेक्षा जास्त माणसे गमाविली नाहीत असे कळले. तीन दिवस आराम केला आणि पुनः सर्व एकत्र आलो व आपल्या लुटण्याच्या मुख्य स्थळी जाण्याच्या पूर्वीच्या निर्धाराचे स्मरण करून पुनः घोडेस्वार झालो व आपल्या नियोजित दिशेने निघालो.

आमचा मार्ग सातपुड्याच्या पहाडाखालून लहान वाटांनी व जंगलातून जात होता. आम्ही एलिचपूरच्या पूर्व दिशेने जात होतो. शेवटी आम्ही निझामच्या राज्यात प्रवेश केला. वर्धा नदी पार केली, आणि पंचवीस कोसाचे अंतर पार करून आम्ही उमरावतीला पोहोचलो, आमच्या पुढाऱ्याचे मनात हेच शहर लुटण्याचा मानस असावा. मी पूर्वी या शहराच्या भरभराटीचे आणि वैभवाचे वर्णन केले आहे. **"ते शहर त्यावेळी, आज आहे त्यापेक्षाही अधिक समृद्ध होते."**

आम्ही जोमाने आणि निर्धाराने पुढे जात होतो, आमचा ताफा जणू काही खवळलेला सागर दिसत होता. आमच्या स्वाराची बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली होती. मार्गावरील सर्व खेडी निर्मनुष्य दिसत होती, लोक पळून गेले होते. सर्व खेडी आमच्या दयेवर सोडून माणसे जंगलात लपून होती. एकामागून एक खेडी लुटण्यात आली, अनेक जाळण्यात आली. अमाप लूट मिळत होती. यावेळी मी आपल्या पथकाच्या आघाडीच्या तुकडीत होतो. मला पूर्णपणे आठवते की आम्ही पहाडावरून उतरलो आणि मैदानात आलो. मी सर्वाच्या पुढे होतो, मला तो दिवस आजही आठवतो, मी घोड्यावर बसून धावत होतो, माझी तलवार हवेत उडवीत होतो, माझ्या साथीदारांना पुढे जावयास प्रोत्साहित करीत होतो, त्यांची संख्या देखील पांचशेच्या जवळपास होती, पाठीमागचे सैनिक पुढे मिळत होते, माझे साथीदार वाढत होते. आम्ही जणू हवेत धावत होतो. मी साथीदारांना वऱ्हाडचे खुले मैदान दाखविले आणि आता आपल्या अमर्याद शक्तींनी अमाप लूट मिळविण्याचे प्रशस्त दार उघडे असल्याचे त्यांना सांगितले. लूटा !– साथीदारांनो, मनसोक्त लूटा !!

गफूरखान त्या दिवशी माझी ईर्षा करीत होता. कारण त्याला चित्तूबरोबर मागे राहावे लागले होते. माझे पथक वाढले होते, कारण आमच्या आघाडीच्या पथकाला तर उमरावतीला वेढा द्यावयाचा होता. आम्ही वेगाने धावत होतो. काही खेड्यांना आम्ही अचानकपणे वेढले होते आणि लोकांची दाणादाण उडाली होती. काही ठिकाणी तर सोने, रूपे, कलदार दागिने आमच्या पायाशी ठेवण्यात आले व लोक प्राणांची भीक मागत होते. हे सर्व न मागताच मिळत होते. जसे जसे आम्ही पुढे जात होतो तसतशी खेडी उजाड होत होती. लोक घरे दारे सोडून, गाव सोडून जीव वाचविण्याकरिता पळत होते. हे सर्व मजेशीर दृश्य आम्ही पाहत होतो. काही खेड्यात एक दोन माणसे जाणून बुजून राहिली होती, विनवीत होती, वाटेल ते घ्या, सर्व घ्या, पण गाव जाळू नका. बिचारे विनवणी करीत होते. हे सर्व आम्हाला न मागताच मिळत होते. काही खेडी आम्ही जाळली होती. मागे वळून पाहिले. आमचे मुख्य पथक खूपच मागे होते, परंतु ते आमच्या पेक्षाही अधिक क्रूर होते. कारण आम्ही खेडी जळताना, आगीचा डोंब उसळताना पाहत होतो. सायंकाळी आम्ही उमरावतीला पोहोचलो. एवढ्या मोठ्या शहराच्या रक्षणाकरिता फक्त थोडे सैनिक होते आणि ते देखील आमच्या आगमनाची चाहुल लागताच पळून गेले. शहरात आमचा प्रवेश निर्विरोध झाला.

मी शहरातील प्रमुख मार्गाकडे वळलो, कारण मला माहीत होते की सर्वप्रथम मला सावकारांना भेटायचे होते. रस्त्यातील प्रमुख चौकावर व मार्गावर मी माझे सैनिकांच्या चौक्या बसविल्या. मी मुख्य चौकावर आलो किंवा ती जागा मुख्य बाजाराची असावी असे दिसले. मी प्रमुख माणसांच्या जमावामध्ये आपला घोडा उभा केला आणि खाली उतरलो. त्यांनी सतरंजी आंथरून ठेवली होती. आमच्या आगमनाची त्यांना अगोदरच कल्पना होती आणि आमचा सन्मान करण्याकरिता यथोचित स्वागताची त्यांनी पूर्वीच तयारीही केली होती. स्वागताचे दोन शब्द झाले. तशी आमची ही काही खुषीची भेट नव्हती. दोन्ही पक्ष जास्तीत जास्त फायदा करून घेण्याच्या बेतात होते.

"सन्माननीय सज्जनांनो, महाशयांनो! या" मी म्हणालो "आम्ही गरीब आहोत आणि अशाच शब्दांनी आपल्या दारिद्र्याचे वर्णन का करता?

समजा, तुम्ही एक लक्ष रुपये दिले तरी तो महान चित्तू काय एवढ्याशा रकमेने चूप बसणार आहे ? मी कुराणाची शपथ घेऊन सांगतो, तो अशा क्षुद्र मनोवृत्तीला आणि दरिद्री बोलण्याला मुळीच भीक घालणार नाही. हे सर्व सैन्य अंधार होण्यापूर्वीच येथे पोहोचणार आहे, आणि जर का तुम्ही चुकारपणा केला तर मग बघा, ह्या तुमच्या उंच हवेल्या, ही विशाल दुकाने, हे वैभव ! पेंढारी आपले कौशल्य कसे दाखवितात ते तुम्ही आपल्या डोळ्यांनी बघाल. मार्गातील खेड्यांची दुर्दशा काय सांगू ! अनेक खेडी जळून खाक झाली. कित्येक घरांना छप्परे राहिली नाहीत, तर कैक झाडे देखील खाली पडली आहेत. आमच्याशी दगा केला तर तुमच्या शहराचे देखील तेच भविष्य होईल. फक्त शहर जाळण्यात येईल एवढेच समजू नका, आमच्या माणसांच्या नजरेला जे जे दिसेल ते ते सर्व लुटण्यात येईल, तुमच्या बायका मुली यांची काय दशा होईल ? म्हणून सांगतों दगा मात्र करू नका.

आता जा आणि शांत मनाने व बुद्धीने योग्य असा निर्णय त्वरित द्या. हे पहा, या वृक्षाची सावली माझ्या तलवारी इतकी असेल त्यापूर्वी (मी जमीनीवर तलवार ठेवून दाखवितो.) आपला चतुर–योग्य निर्णय आपल्या नावाला व कीर्तीला शोभेल असा मला कळवा, नाहीतर एका क्षणाचा विलंब न होता माझे पेंढारी साथीदार कामाला लागतील; तशी तुमची घरे देखील मला जवळच दिसतात."

"खरे बोललात" माझे साथीदार सर्व माझ्याभोवती गराडा घालून ओरडले. "पण मीर साहेब ! आपण स्वतःची मदत का करू नये ? या कंजुष व्यापाऱ्यांना आपणासारख्या सन्माननीय माणसांच्या गरजा कळत नसतात, आणि आपणांस अजून फार मोठा प्रवास करावयाचा आहे."

"ते काय म्हणतात ते प्रथम आपण ऐकू या," मी म्हणालो "त्यांना शांतपणे विचार करून निर्णय घेऊ द्या. तोपर्यंत आपण त्यांच्या चर्चेत दखल देऊ नये आणि शहरात हिंसाचार होणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे."

दिलेली वेळ निघून गेली होती. माझ्या नागव्या तलवारीचे पाते उन्हात चमकत होते. व्यापारी मसलत करीत होते. आपसात जोराने बोलत होते. त्यांच्या चेहऱ्यावर भीती आणि क्रोध यांचे संमिश्र भाव दिसत



चित्र क्र. २६ : अंबागेट (पूर्व दरवाजा) (पृष्ठ ११२ पहा)



चित्र क्र. २७ : नागपुरी गेट (उत्तर दरवाजा) (पृष्ठ ११२)



चित्र क्र. २८ : खोलापुरी गेट. (पश्चिम दरवाजा) (पृष्ठ ११२ पहा)



चित्र क्र. २९ : महाजनपुरी गेट. (दक्षिण दरवाजा) (पृष्ठ ११२ पहा)

होते. दिलेली वेळ निघून गेली, सावली वाढतच होती. मी ओरडलो "वेळ संपलेली आहे." माझ्या तलवारीचे पाते मी जोराने म्यानात घातले. त्याच बरोबर माझे साथीदार 'हुश्श' म्हणून ओरडले. व्यापाऱ्यांनी हा देखावा पाहिला आणि ते सर्व माझ्याकडे धाऊन आले.

"मीर साहेब ! जरा खाली बसा", त्यांच्यापैकी लठ्ठ सावकार आर्जवाने बोलला. तो सावकारांचा प्रमुख होता. आपण जरा शांत मनाने निश्चयपूर्वक विचार करून निर्णय घेऊ या. घाईने वा क्रोधाने घेतलेले निर्णय समाधानकारक कधीच नसतात.

"नाही" मी उत्तरलो, "मी असाच उभा राहील आणि तुम्हाला काय म्हणायचे ते असेच ऐकणार आहे. लक्षात असू द्या, ज्या क्षणी मी माझी तलवार बाहेर काढेल त्याक्षणी एकदम लुटालुटीला सुरुवात होईल. आणि जरी माझा माझ्या साथीदारावर ताबा असला तरी आणि ते देखील तुमच्याकडून योग्य प्रतिसाद मिळेल याची अपेक्षा करीत आहेत, पण ज्याक्षणी त्यांची निराशा होईल, माझी शक्ती देखील संपुष्टात येईल, तसे ते शूर शिपाई आहेत, मग होणाऱ्या विनाशाला मी जबाबदार राहणार नाही."

"माझ्या सोबत जरा बाजूला या" प्रमुख सावकार म्हणाला "मला फक्त तुमच्याशी बोलायचे आहे, तुम्ही सावकारापासून दगा होण्याची भीती ठेवू नये."

आम्ही मनापासून खूब हंसलो "छे छे ! मी कधीच भीत नसतो" मी म्हणालो. "मी येतो." आणि आपल्या शूर साथीदाराकडे वळून मी म्हणालो, "हे बघा, यांच्यापैकी कोणीही पळून जाता कामा नये."

"ठीक, आता बोला", काही अंतर दूर गेल्यानंतर मी म्हणालो "जे काय सांगायचे आहे ते लौकर बोला, माझे साथीदार आता उतावीळ झाले आहेत आणि तुमची दुकाने आणि घरे तर अगदीच जवळ आहेत." मी मिष्किलपणे हसत बोलो.

"हे पहा, ऐका", तो म्हणाला. "तुम्ही यांचे पुढारी आहात, तुमच्या व्यवहारावरून आणि बोलण्यावरून या सर्व पेंढाऱ्यावर तुमचे प्रभुत्व दिसते. तुमच्या सोबत पाचशे पेक्षा जास्त माणसे नसतील. आम्ही

तुम्हाला दहा हजार रुपये तुमचा स्वत:चा हिस्सा देतो. एक हजार प्रत्येक सरदाराला, आणि प्रत्येक शिपायाला शंभर रुपये, असे एकूण एक लक्ष रुपये होतील. जेव्हा प्रमुख सैन्य येईल तेव्हा त्यांना देखील आम्ही अशाच रीतीने बोलून घेऊ. बोला, काय म्हणता ? त्वरित उत्तर द्या. कारण पैसे हातात आहेत आणि मुख्य सैन्य येण्यापूर्वी वाटणी करता येईल''.

मी क्षणभर विचारात पडलो. मला माहीत होते की चित्तू स्वत:ची मागणी वेगळीच करणार आहे. तो येण्यापूर्वी जास्तीत जास्त उकळण्यात काहीही नुकसान नव्हते. चित्तूला येथून दहा लक्ष रुपये हवे होते आणि तो सरळ नाही तर नेहमीच्या मार्गाने वसूल निश्चित करणार यात शंका नव्हती. "आणि हे बघा. तुम्ही तर प्रथम पथकाचे मानकरी आहात. तुम्हाला तर पैसा घ्यावयाचे आणि पुढे जावयाचे व रात्री जे गाव लवकर येईल तेथे आराम करावयाचा आहे. चित्तूला यातले, काहीच कळावयाचे नाही." सावकार म्हणाला.

"नाही", मी म्हणालो, "आम्ही येथेच राहणार आहोत. चोवीस कोसाचा प्रवास केल्यानंतर पुढे जाण्याचा मूर्खपणा आम्हांला करावयाचा नाही. मी एक लक्ष रुपयांची वाटणी करण्याकरिता माझ्या साथीदारांना शहराच्या बाहेर घेऊन जातो. पण, हे पण लक्षात असू द्या. एक तृतीयांश भाग तर प्रमुखाला द्यावा लागतो. आणि मग उरलेला आमचा हिस्सा. काही फारसा मोठा नाही."

"एकदम मान्य". तो म्हणाला, "आता तुमच्या साथीदारांना चूप करा. त्यांना लूटीने जितका पैसा मिळणार होता त्यापेक्षा जास्त प्रेमाने मिळत आहे".

आम्ही पुन: पूर्वीच्या ठिकाणी आलो, आणि मी माझ्या साथीदारासमोर बोलणे सांगितले. ते सर्व अत्यानंदाने बेहोष झाले आणि पैशाकरिता ओरडू लागले.

पैसा पूर्वीच एकत्र करण्यात आलेला होता. कारण काही मिनिटांतच, आम्ही बसलो होतो त्याच्या लागूनच्या, जवळच्या ओळीतून माणसांची रीघ खांद्यावर रुपयांच्या थैल्या घेऊन येताना दिसली. प्रत्येक

दफादाराला हजार रुपये व शिपायाला शंभर रुपये मोजून मिळाले व ते त्यांनी आपआपल्या घोड्याच्या खोगिरामध्ये ठेवले.

"तुम्ही स्वत: करिता तर काहीच घेतले नाही", पीरखान म्हणाला.

"माझी चिंता करू नका" मी म्हणालो, "माझा हिस्सा मी घेतला आहे. थैली जरी लहान दिसत असली तरी त्यांत सोने भरले आहे".

त्याचे डोळे चमकले, "बरोबर आहे, पण हे कोणालाही कळावयास नको" तो म्हणाला.

"एक अक्षर देखील कळणार नाही, हे तुमच्यात आणि माझ्या मध्येच राहणार आहे. आता आपण, आपले हरामखोर या शहरात गुंडगिरी करणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे".

"ते समाधानी दिसतात" तो म्हणाला, "मी तर खचितच समाधान मानीत आहे. आणि हे बघा. मीरसाहेब, मी अल्लाला स्मरून सांगतो, आज घडले ते काही तरी औरच आहे. एका दिवसाच्या प्रवासानंतर एक हजार रुपये सहज मिळणे हे आपल्या धंद्यापेक्षा जास्त मोलाचे आहे. आपण योग्य वेळी अगोदर आलो हे आपले भाग्यच समजा"

"चूप ! खबरदार !" मी म्हणालो. "आपले गुपित उघड करण्याची ही वेळ नाही. समजलात, आणि हे पहा. आपली माणसे मैदानात शांत असावयास पाहिजेत आणि चित्तू आल्यानंतर त्यांनी काहीही गैर करू नये".

सर्व पेंढारी एका मागून एक मला सोडून गेले, फक्त काही माझ्यासोबत मी ठेवले होते व आम्ही चित्तूच्या आगमनाची वाट पाहत होतो.

"चित्तू काय मागणार आहे ?" माझा लठ्ठ साक्कार दोस्त मला विचारीत होता.

"मी काय सांगू ?" मी उत्तरलो, "पण सुरवातीपासूनच जरा शांत आणि उदार राहा, नाही तर तो तुमचे शहर जाळून टाकेल.

तुम्हाला माहीत आहे पेंढारी कोणाला म्हणतात ते! काही तर अतिशय जहाल आहेत. तुमच्यापैकी अनेकांचा येथेच नाश होईल"

सर्व व्यापाऱ्यामध्ये संभाव्य अत्याचाराविषयी एकच थरकाप उडाला, त्यांचा मृत्यू त्यांचासमोर दिसत होता. मी योग्य वेळी मर्मी बसेल असा हल्ला केला होता. मी बोलत होतो "पेंढाऱ्याचे कौशल्य विविध प्रकारचे आहे. काही तुमचे फुगलेले ढुंगण कापून काढतील, काही बोट आवळून गळा बंद करण्यात तरबेज आहेत. या थैल्या तुमच्या तोंडाला बांधून मग मार दिला जाईल. मला तर पेंढाऱ्याचे अजून अनेक विचित्र प्रकार माहीत आहेत. हट्टी आणि कंजुष सावकाराचे तोंड कसे उघडावे ते कसब आम्हाला बरोबर येते. परंतु तुम्ही तर चतुर सावकार आहात, तुम्हाला त्याची जाणीव करून दिलेली आहे." मी मिष्किलपणे हसत बोलत होतो.

"एकदम बोला, मीर साहेब!" ज्याने आतापर्यंत बोलण्याचे धाडस केलेले नव्हते असा दुसरा एक व्यापारी म्हणाला. "बोला, आम्ही काय द्यावे? किती पेंढारी आहेत. आम्ही ऐकले आहे, कमीत कमी पाच हजार तरी निश्चित असतील."

"संख्या थोडी कमी असेल, शेठजी" मी म्हणालो, "आम्ही जवळपास दहा हजार आहोत, आता लवकर पेंढारी येणार आहेत. तुम्ही स्वत:च बघाल, मग तुम्हीच निर्णय घ्याल. आता पैशाविषयी बोलायचे, तर सांगतो, सुरुवातीला, एक लक्ष रुपये चित्तूला, मी समजतो यापेक्षा काही कमी तो घेणार नाही. मग तीन प्रमुख सरदार आहेत– हीरु, गफूरखान आणि राजन! पन्नास हजार प्रत्येकाला. मग दुसरे काही दफादार आहेत. त्यांना प्रत्येकी एक हजार आणि प्रत्येक इमानदार पेंढाऱ्याला फक्त शंभर रुपये–बोला– मी योग्य तेच बोललो की नाही?"

"ईश्वर आमचे रक्षण करो," सर्वच व्यापारी सावकार एकदम ओरडले; "आमचा सत्यानाश झाला. आम्ही मेलो. हे तर सर्व आठ लक्ष रुपये होतील. एवढे पैसे कोठून आणणार? आमचा तर नाश झाला. यापेक्षा आम्हाला **गोळी घालून** येथेच ठार मारा."

"नाही, नाही. माझ्या प्रेमळ मित्रांनो! असे बोलू नये" मी म्हणालो "सर्व जगाला माहीत आहे की **उमरावती हे वैभव संपन्न शहर आहे, हे तर हैदराबादपेक्षा देखील समृद्ध शहर आहे आणि येथे तर पैसा लाखांनी नव्हे तर कोटींनी मोजला जातो.** म्हणून चित्तूसमोर आपल्या दारिद्र्याचे रडगाणे गाऊ नका, कारण तो मग स्वत:च तुम्ही खरे बोलता की खोटे ते सिद्ध करून दाखवील."

"मी तुम्हाला सांगतो" तो लठ्ठ सावकार म्हणाला, "मीर साहेब म्हणतात ते खरे आहे. ईश्वराने आपणावर संकट लोटले आहे ते सहन केलेच पाहिजे. आपल्या स्त्रिया व मुलींची विटंबना आपल्या डोळ्यांदेखत बघण्यापेक्षा आपल्या जवळ असलेला पैसा न पैसा दिलेला बरा."

"बरोबर," मी ओरडलो, "आता कसे हुशार माणसासारखे बोलला, आणि मी अजून उपदेशाचे दोन शब्द सांगतो, चित्तू महान आहे, तो थोर पुरुष आहे, त्याला आदर सन्मान आवडतो, त्याच्या इतमामाप्रमाणे आगत-स्वागत मात्र झाले पाहिजे, तसेच इतर सरदारांचे आहे. आता तयारीला लागा आणि–पान, इत्र व स्वागताचे दुसरे सामान याची थाळी तयार करा–काही जरीच्या किंमती शाली आणा आणि तो आसनावर आरूढ होईल तेव्हा एक किंमती शाल त्याच्या खांद्यावर टाका. तसेच इतर सरदारांचे स्वागत करा–मग आपला नजराणा त्याच्यासमोर ठेवा, पाहा–स्वागत अशा प्रकारे करा की जणू काही तुमच्यासमोर स्वत: नबाब शिकंदरजहाँ बसला आहे असे समजा. अल्लांची जर मेहेरबानी असेल तर चित्तूची तुमच्यावर मेहेरनजर होईल व कदाचित तुम्हाला कमी पैसा द्यावा लागेल व शहराचे रक्षणही होईल; तो फायदा वेगळाच आहे." "खरे आहे, बरोबर आहे" सर्व व्यापारी एकदम ओरडले. "मीरसाहेब! तुम्ही तर ईश्वराचे देवदूत आहात. खरा सल्ला दिला."

"अजून एक सांगतो" मी म्हणालो, "हे तुमचे उदास चेहरे सोडून द्या, चित्तू आल्याबरोबर प्रसन्न वदनाने हसत, मनापासून त्याचे स्वागत करा. कारण नसताना असे सुतकी चेहरे का राखता? पैसे तर द्यावयाचे आहेतच. मग उदार मनाने दिलेले योग्य होईलना?"

माझे बोलणे सावकारांच्या गळी उतरत होते, मी अक्षरश: खरे बोलत आहे हे त्यांना पटले होते. वेळ अशा रीतीने बोलण्यात गेला.

घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येऊ लागले होते. अंधार झाला होता, मशाली दिसत होत्या–चित्तूचे आगमन झाल्याची ही खूण होती.

"आता आम्हाला सोडून जाऊ नका" सावकारांनी मला चोहोबाजूंनी घेरले होते. "आता आमची बाजू तुम्हीच सांभाळा. सर्व अगदी काकुळतीने विनवीत होते. सर्वांचे चेहरे पडले होते, पाय थर–थर कापत होते. एकाचे दात कडकडताना मी पाहत होतो. पेंढारी प्रमुखाच्या नावाने सर्वत्र थरकाप उडाला होता.

चित्तू आला. प्रमुख चौकात उतरला, क्रूर चेहऱ्याचे काही सरदार त्याच्या सोबत होते, त्यांचे चेहरे पाहून कैक घाबरले होते. सर्व सरदारांनी मिळून चित्तूच्या मोठेपणाचे वर्णन करीत जयघोष सुरू केला. अंधार पडला होता. त्यात ती गर्जना भयानक वाटत होती.

काही सावकार माझ्यासोबत आले. आम्ही चित्तूजवळ गेलो. प्रमुख सावकार आपले मस्तक चित्तूच्या पायावर वासू लागला. त्याला खाली उतरण्याची मी विनंती केली. "महाराज, सावकारांनी तुमच्या स्वागताची तयारी केली आहे व नजराणा देखील तयार आहे." मी सावकारांना दुजोरा देत होतो.

"हा कोण सैतान बोलत आहे?" चित्तू म्हणाला.

"मी, तुमचा गुलाम अमीर अली, खुदाबंद" मी म्हणालो. "मग, सर्व काही ठीक आहे," तो म्हणाला, "हे सावकार कसे बदलले? हे परिवर्तन कसे घडले मीर साहेब?"

"ही माझी करतूत आहे," खुदाबंद, मी म्हणालो. "मी स्वतः या सावकारामध्ये मिसळलो आणि ते तर तुमचे नाव ऐकून गर्भगळित झाले होते, मीच त्यांना धीर दिला आणि आपली येण्याची वाट पाहण्यास सांगितले."

"तूं योग्य तेच केलेस" चित्तू म्हणाला, "सर्व काही तयार आहे?"

"तयार आहे" सर्व सावकार एकदम ओरडले. "महाशयांनी खाली उतरावे, आम्ही स्वागतास तयार आहोत." चित्तू घोड्यावरून खाली

उतरला. त्या लठ्ठ सावकाराने त्याचा एक हात धरला व तो त्याला जवळच्या एका प्रमुख व्यापाऱ्याच्या घरांत घेऊन गेला. घराच्या दालनात पांढरी शुभ्र चादर आंथरलेली होती. एका बाजूला सुंदर गालिचा होता. चित्तूला सन्मानाने तेथे बसविण्यात आले. दालनात अनेक दिवे होते. चित्तूने चहू-बाजूने नजर फिरविली. त्याच्या चेहऱ्यावर राक्षसी समाधान होते. विजयाचे हास्य होते. जाळपोळ न करता सहज मिळविलेल्या विजयाचे क्रूर समाधान होते.

"हे लोक सुशिक्षित दिसतात" चित्तू राजनकडे वळून म्हणाला. राजन त्याचा प्रमुख सरदार व मित्र होता. आपल्याला अशा स्वागताची अपेक्षा नव्हती".

"मुळीच नव्हती" राजन उत्तरला. माझ्या कल्पनेप्रमाणे तर संपूर्ण रात्र शहरात लूट करीत घालवावी लागली असती, ही तर अमीरअलीची बहादुरी आहे".

"अगदी बरोबर", चित्तू म्हणाला. "तो एक खरोखर सभ्य पुरुष आहे. आणि सभ्य पुरुषांना आपल्या स्वामीचे स्वागत कसे करावे ते माहीत असते. नाहीतर ही सावकार डुकरे, घरात लपून बसली असती आणि आपल्याला त्यांना घरांतून ओढून आणावे लागले असते". सावकार मला सारखे खुणावीत होते, आणि चित्तूने त्वरित नजराणा स्वीकारावा यासाठी मी त्याला तसे सांगावे असे ते वारंवार बोलत होते. "पांचशे रुपये खास तुम्हाला याकरिता" असे तो लठ्ठ सावकार म्हणाला. "ठीक आहे" मी म्हणालो "पण पहा, दगा होता कामा नये".

"गंगेची, यमुनेची शपथ घेऊन सांगतो, तसे काही नाही. उलट मी ते दुप्पट करणार. अर्थात चित्तूचे समाधान झाले तर, मीरसाहेब तुम्ही आता आमचे मित्रच नसून भावासारखे आहात." सावकार म्हणाला, "हो गाढवे काय बोलत आहेत?" चित्तू ओरडला, "ते स्वतःच का बोलत नाहीत?"

'खुदाबंद' मी म्हणालो, "तुमच्या नावाचा दरारा इतका आहे की ते गर्भगळीत झाले आहेत." चित्तू मनात हसत होता, "तुमचा चेहरा पाहून तो दरारा जास्त वाढला आहे. ईश्वराची शपथ घेऊन सांगतो ते बिचारे मुके बनले आहेत. ते स्वखुशीने नजराणा सादर करणार

आहेत, पण ते सांगताना काय बोलावे या करिता त्यांच्या तोंडातून शब्द निघत नाही, म्हणून ते मला सांगतात की मीच तुमच्याशी बोलावे".

"कबूल, कबूल, मी मान्य करतो" चित्तू ओरडला. "नजराणा त्वरित येऊ द्या. उमरावतीच्या प्रसिद्ध सावकारांचा नजराणा देखील बघण्यासारखाच असेल".

पंधरा पराती भरून आणण्यात आल्या. त्यांच्यावर रेशमी चादरी झाकलेल्या होत्या. एकामागून एक रेशमी आवरणे काढण्यात आली. खरोखरच तो ऐश्वर्ययुक्त देखावा होता. खजुर, काजू, किशमीश, मिठाई भरून चार पराती होत्या. बाकीच्या, मखमल, रेशमी शालू यांनी भरलेल्या होत्या. एका राजपुत्राला शोभेल असा तो नजराणा होता. चित्तू एकदम प्रसन्न झाला.

मी सावकारांना म्हणालो, "हा खरोखरच आनंदाचा क्षण आहे. ती शाल आणि अश्रफी कोठे आहेत ? लवकर आणा आणि लग्नात आपल्या जावयाचे जसे स्वागत करता त्याप्रमाणे ती शाल चित्तूच्या खांद्यावर टाका." सावकाराने एका मदतनीसापासून शाल घेतली, आणि त्यावर पांच अश्रफी ठेवून तो चित्तूच्या चरणाकडे वळला. तीनदा त्याने त्याच्या पायावर लोटांगण घातले आणि नंतर अश्रफी चित्तूच्या हातावर ठेवून शाल उघडी केली. ती अतिशय सुंदर कलाबतुची होती. ती चित्तूच्या खांद्यावर पसरून, तो सावकार दोन्ही हात जोडून अतिशय विनम्रतेने उभा राहिला.

ते स्वागत बघून चित्तूला अतिशय आनंद झाला. शालूचा एकेक भाग पाहून त्याला नवल वाटत होते व तो एकसारखा हसत होता.

"या लोकांना अक्कल आहे," तो गफूरखानाला म्हणाला. "योग्य माणसांची दखल कशी घ्यावयाची याची त्यांना सवय दिसते. असा नागरिक सन्मान आपणास माहीत नाही, इतक्या प्रवासानंतर असे स्वागत आनंददायी असते, नाही ? पण गफूरखान ते तुम्हाला विसरलेले दिसतात." "असे नाही, चित्तू महाशय!" सर्व सावकार एकदम ओरडले आणि अनेक शाली हातात घेऊन सावकार एकदम आले व प्रत्येक सरदाराला भेट देऊ लागले. सरदारांनी प्रेमाने त्याचा स्वीकार केला.

"आता सर्वजण जा पाहू" चित्तू म्हणाला, "आम्हाला या सावकारांशी कांही प्रेमाचे बोलायचे आहे. आणि तसे बोलल्याशिवाय मी अन्नाला शिवत देखील नसतो हे सर्वांना माहीत आहे." काही सावकार, चित्तू व सरदार वगळता बाकीचे पेंढारी निघून गेले. अंधार पडल्यानंतर जशी भूते एकत्र येतात तसे आम्ही एकत्र आलो.

"जरा जवळ या" चित्तू म्हणाला "आपणाला बोलायचे आहे" सावकार उठले आणि भीतभीत चित्तूजवळ बसले.

"आता" चित्तु म्हणाला, "तुम्हाला आमच्या हेतूबद्दल माहिती असेलच. आम्हाला पैसा पाहिजे, पैसा आम्ही घेणारच. मग तो सरळ मार्गाने मिळो की मग दुसऱ्या मार्गाने मिळो. या माझ्या नरसंहारी साथीदारांना चूप करण्याइतके तुम्ही मला खात्रीने द्याल, अशी आशा आहे. तसे तुम्ही चतुर दिसता. ही राक्षस माणसे आहेत. तुमचा नाश व्हावा, तुमची डोकी उडवली जावी, शहराचा नायनाट व्हावा असे मलाही वाटत नाही. आता बोला, तुम्ही किती द्यावयास तयार आहात?"

"बरोबर" साहुकार म्हणाला, "तुमच्या आगमनाची आम्हाला पूर्ण कल्पना होती, आपला अनादर करावा असे आमच्या मनात नव्हते म्हणूनच आम्ही येथे आहोत. आम्ही आपले मनापासून स्वागत केले आहे. तुमचा सरदार मीरसाहेब यांनी आम्हांला पूर्ण माहिती दिली आहे आणि त्याच्या सल्ल्यानुसार आम्ही यादी सुद्धा तयार केली आहे. सावकाराने पार्शियन भाषेत लिहिलेली यादा चित्तूच्या हातावर ठेवली.

"हे तर मूर्खपणाचे काम आहे" चित्तू म्हणाला, "यादी वाचायला मी काय मुनशी आहे? बरं, तुम्हाला तरी वाचता येते का?" चित्तू सरदाराकडे वळून म्हणाला.

"मी मुनशीला बोलावू का? आमच्या जवळ एक आहे," सावकार म्हणाला.

"आज्ञा असेल तर मी वाचून दाखवू का?" मी विचारले, "अरे व्वा! तू तर कारकून आणि सिपाही दोन्ही कामे करतोस. आश्चर्य

आहे". चित्तू म्हणाला. "घे कागद आणि आधी वाच बघू, आम्हाला आमचे भविष्य लवकर कळू दे."

" सर्वप्रथम " जसा मी तो कागद वाचू लागलो, आणि जसे यांत लिहिले होते, मी म्हणालो, "उमरावती शहराचे सर्व सावकार व्यापारी, एकत्र येऊन चित्तूच्या आगमनाची बातमी ऐकताच प्रसन्न झाले आहेत. चित्तूचे आणि त्याच्या सैन्याचे ते मनःपूर्वक स्वागत करीत आहेत. जो काही पैसा नगदी स्वरूपात हाताशी आहे तो सर्व चित्तू महानच्या चरणी सादर करण्याची त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. चित्तूने देखील संहार टाळून त्याचा स्वीकार करावा अशी ते प्रार्थना करीत आहेत. "

"छान, भाषा तर सुंदर आहे पण जरा कामाचे ते लवकर वाच, कारण सकाळपासून पोटात काहीच नाही. यांच्या घरच्या बायकांनी आमच्याकरिता निश्चित पक्वान्ने बनविली असतील. आम्हाला त्याचाही स्वीकार करायचा आहे". चित्तु म्हणाला. "ते देखील तयार आहे, चित्तू महाराज" सावकार ओरडले. "आणि आमच्या हिंदूचे मिळमिळीत जेवण तुम्हाला आवडणार नाही म्हणून आम्ही खास गावातील खाटकाकडून खमंग मांसाहार शिजवला आहे".

"चुप खबरदार ! फाजील बोलू नका. ही काय विनोद करण्याची वेळ आहे ?" चित्तू रागाने म्हणाला.

सावकार खाली मान घालून बसले व मी वाचू लागलो. सर्वप्रथम, सुरुवातीला, तुमच्याकरिता, पन्नास हजार रुपये आहेत.

"बस एवढेच ?" चित्तू आपल्या भुवया वर करून आश्चर्याने पाहू लागला.

"जरा धीर धरा, अजून येत आहे." एक परात भरून सोने, दागिने व चांदी किंमत पंधरा हजार रुपये आणि तीन परात भरून मखमल, शाल, जरी कापड किंमत दहा हजार रुपये, सर्व मिळून चित्तू महानकरिता एकूण पंच्याहत्तर हजार रुपये नजराणा आहे. त्यानंतर प्रत्येक मोठ्या सरदाराला दहा हजार रुपये आणि दहा हजार रुपये किंमत असलेले सोने, दागिने प्रत्येकाला एक परात भरून असे प्रत्येक सरदाराला वीस हजार रुपये".

"लवकर वाच" चित्तू ओरडला.

"प्रत्येक दफादाराला एक हजार रुपये. असे तीस दफादार आहेत असे मी त्यांना सुचविले आहे".

"बरोबर आहे". चित्तू ओरडला "पुढे"

आणि प्रत्येक पेंढाऱ्याला पन्नास रुपये नगदी, असे चार हजार आहेत असे मी त्यांना सुचविले आहे. तसे जितके दिवस चित्तू उमरावतीला राहील तितके दिवस त्याला सुग्रास भोजन द्यायचे त्यांनी ठरविले आहे.

"आता, काय हुकूम आहे बोला, महाराज !"

"यादी तशी बरोबर आहे, पण थोडी चूक होत आहे". चित्तू म्हणाला "आपणासोबत पन्नास दफादार आहेत. नाही का गफूरखांन "

"बरोबर आहे" गफूरखान म्हणाला.

"लिहा तसे. मीरखान ! आणि आपणासोबत पाच हजार पेंढारी आहेत. खरे आहे ना ?" चित्तू म्हणाला. "खरे आहे स्वामी" सरदारांनी दुजोरा दिला. "निमाडहून निघताना आपण मोजणी केली होती."

हे धादांत खोटे होते. पेंढारी सुरुवातीला फक्त चार हजार होते व त्यातील काही दक्षिणेकडे निघून गेले होते. संख्येला नाही तरी फारसे महत्त्व नव्हतेच, कारण चित्तूला जेवढे धन हवे होते ते तो घेणार होता.

"पाच हजार लिहा" चित्तू म्हणाला "आणि आता किती होतात ते सांगा पाहू."

कशी तरी मी गोळा बेरीज करूं लागलो. आणि म्हणालो "चित्तू महानकरिता पंच्याहत्तर हजार रुपये, सरदारांना साठ हजार रुपये, दफादारांना पन्नास हजार रुपये, व पेढाऱ्यांना एकूण दोनशे हजार रुपये. सर्व मिळून एकूण होतात बघा–तीन लक्ष आणि पंच्यांशी हजार रुपये.

"आणि" चित्तू गफूरखानला म्हणाला, "घोड्याच्या नाला फार जुन्या आहेत नवीन बदलल्या पाहिजेत."

"बरोबर" गफूरखान गालांत हसत म्हणला.

"लिहा"! पंधरा हजार रुपये नवीन नाल घेण्याकरिता. असे एकूण चार लक्ष रुपये. – मीरसाहेब ! पूर्ण आंकडा आता बरा दिसतो नाही ? साव–

कारांकडे वळून चित्तू ओरडला, "क्षणाचा विलम्ब नको. पसे आणा, नाही तर आम्हाला सांगा म्हणजे आम्ही कामाला लागतो."

एकदम शांतता पसरली, सावकार उठले आणि आपसात कुजबुजू लागले. भीती आणि क्रोध त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. इतक्यात तो प्रमुख सावकार मित्र, चित्तूजवळ आला–दोन्ही हात जोडून विनम्रतेने म्हणाला "पैसा तयार आहे फक्त गोळा करावयास थोडा वेळ द्यावा, महाराज !"

"छान, कबूल !" चित्तू म्हणाला, "आता माझे जेवण आणा पाहू ! आणि हे पहा, पहाटे सर्व दफादार आपला व आपल्या सैनिकांचा पैसा घ्यावयास येथे येतील."

सरदार निघून गेले. मी पण त्यांच्या सोबत जावयास निघालो परंतु त्वरित चित्तूने मला बोलावून घेतले. तुला तर माझ्याबरोबर जेवले पाहिजे, तुझ्या सावकार मित्रांनी आपल्या दोघांचे जेवण निश्चित बनविले असेल" चित्तू म्हणाला.

मी हुकुमाप्रमाणे गालिच्यावर बसलो, जेवण वाढण्यात आले. विविध प्रकार बनविले होते. आम्ही प्रत्येक वस्तूला न्याय दिला. खरे बोलायचे म्हणजे चोवीस तासाच्या एकसारख्या प्रवासामुळे जमून भूक लागली होतो. जेवणानंतर आम्ही हुक्का पीत होतो. नंतर मी येथे आल्यानंतर जे काही घडले त्याचा वृत्तान्त चित्तूला सांगितला. मी स्वतः-करिता दहा हजार रुपये मागून घेतले आहेत हे मात्र सांगितले नाही. नाहीतर चित्तूने अर्धा हिस्सा काढून घेतला असता. पीरखानला काय ते माहीत होते.

चित्तू सर्व वृत्तान्त ऐकून प्रसन्न दिसला. त्याला जास्त धन हवे होते व ते मी मुद्दामच सावकाराकडून पहिलेच मंजूर करवून घेतले होते. "आज तर कमाल केली, मीरखान ! चार लक्ष रुपये लूट, आणि पेंढाऱ्यांपासून सरदारापर्यंत सर्व एकदम खुश. सुरवात मात्र बरी आहे. काय मीरखान ! – खरे ना ?" चित्तू म्हणाला.



चित्र क्र. ३० : भुसारी गेट (हल्लीचा जवाहर गेट) (पृष्ठ ११२ पहा)



चित्र क्र. ३१ : माल टेकडी (पृष्ठ ११४ पहा)



चित्र क्र. ३२ : खुनारी खिडकी (पृष्ठ ११४ पहा)

"थोर–महान–चित्तूचे ऐश्वर्य वाढो महाराज ! मी आपला एक सेवक आहे, आपले भाग्य उजळत राहील. अमाप लूट मिळेल" मी म्हणालो.

"तुम्हाला काय मिळाले, मीर साहेब ?"

मी तर अग्रिम पथकाचा सरदार होतो, मी स्वत: करिता हाव करणे मला आवडले नसते. सावकारांनी मला पांच हजार दिले आहेत, मला त्यातच समाधान आहे" मी म्हणालो.

"चूक आहे हे तर अतिशय कमी आहे, माझ्या मित्रा !" चित्तू म्हणाला. पुढच्या खेपेला तू आपला हिस्सा जास्त घे, तू तर आघाडीचा लढावू सरदार आहेस, तू कमी घेऊन कसे चालेल ? यानंतर अग्रिम पथकावर नेहमी तूच राहणार, गफूरखान तसा शूर सिपाही आहे परंतु जरा जड डोक्याचा आहे, तो नेहमी स्वत:ची चिंता प्रथम करता आणि शहर जाळणे, लुटणे यात त्याला अधिक आनंद वाटतो. त्यामुळे त्याला लूट नेहमी अपेक्षेपेक्षा कमी मिळते. अशा सावकारापासून तर चलाखीने पैसा काढावा लागतो आणि ते त्याला कधीच जमणार नाही.

"तुमचे ऐश्वर्य वाढो, खुदाबंद !" मी नम्रतेने म्हणालो "हा बंदा तुमचा गुलाम तुम्हाला कधीही बेइमान होणार नाही."

चित्तूची परवानगी घेऊन मी उठलो आणि सावकारासमवेत जाऊन बसलो. कलदार रुपयांचा ढीग लागला होता. पैसे आणणारे एकसारखे धावत होते. सावकार ते मोजण्याचे काम करीत होते. तो लठ्ठ सावकार माझी पाठ थोपटीत होता. सर्व सावकार माझ्याकडे पाहत होते. चित्तूशी समाधानकारक तडजोड घडवून आणल्याबद्दल जणू काही मी त्यांच्यावर अतोनात उपकार केले, असे त्यांना म्हणायचे होते. " तुमचे पांचशे रुपयाचे बक्षीस आम्ही विसरलो नाही " माझा मित्र सावकार हळूच बोलला.

मीच नकार दिला...मी म्हणालो. "तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला आणि मोबदल्यात मी तुमचे काम केले यात दोन्ही बाजू बरोबर होतात. एक मात्र करा, माझ्या रुपयाच्या किंमती इतक्या मला सोन्याच्या चिपा द्या

म्हणजे त्या मला सहज लपविता येतील, वरखर्चाला पाचशे रुपये पुरे."

'मंजुर' सावकार म्हणाला. माझी थैली मी घेतली व वाट दाखविण्याकरीता सावकारांची दोन माणसे बरोबर घेऊन मी तंबूकडे निघालो. शहराबाहेरील मैदानात तंबू लावले होते, थंडीची रात्र होती. शेकोट्या पेटवून लोक त्याभोवती हात शेकीत बसले होते. गोंगाट पसरला होता, मी माझ्या तंबूत आलो. तीन काठ्यांवर तो पसरविलेला होता. मी सोने घोड्याच्या खोगीरामध्ये भरले. नंतर ते शिवून टाकले. पीरखान ते पहात होता. मी एका रात्रीत दहा हजाराचा धनी बनलो होतो.

"आज तर कमाल झाली" पीरखान म्हणाला. "याच पद्धतीने जर लूट मिळत गेली तर आपण लवकरच लक्षाधीश होणार यात शंका नाही. परंतु हजार ठगी करण्यापेक्षा आजसारखी एकच ठगी चालेल."

"चित्तूने मला कायमचे आघाडीचे पथकात राहावयास सांगितले आहे आणि मी माझा हिस्सा नेहमी जास्त घ्यावा असे चित्तूने मला सांगितले आहे." पीरखानने कां कूं करू नये म्हणून मी म्हणालो.

पहाटे उठून मी चित्तूकडे गेलो. सावकारांनी पैसा रातोरात शहरातून गोळा केला होता. पेंढारी दफादारांनी आपआपला हिस्सा घेतला व नंतर तो सर्व पेंढाऱ्यांना बरोबर वाटण्यात आला. एक जरी सिपाही उपेक्षित राहिला असता तर दफादाराचे काय झाले असते हे ज्याचे त्याला माहीत होते.

काही तासात हे सर्व आटोपले, आम्ही घाईघाईने जेवलो. प्रत्येक जण स्वार झाला, पेंढारी जत्था निघाला, जे दिसेल ते लुटावयासाठी ते सज्ज होते. निघण्यापूर्वी मात्र चित्तूने सर्वांसमक्ष उमरावतीच्या सावकारांना आश्वासन दिले की, ज्याअर्थी तुम्ही स्वतःहून आम्हाला मनाजोगती लूट दिली आहे, त्याअर्थी पुनः कधीही या शहराची लूट होणार नाही. चित्तूने आपले हे शब्द नंतर इमाने इतबारे पाळले. उमरावतीस पुन्हा पेंढाऱ्यांचा उपद्रव पोचला नाही[1].

---

१ : 'कन्फेशन ऑफ ए ठग' : मेडोज टेलर : १८३९ : पा. ३३७ ते ३६२.

अशा प्रकारे उमरावती शहरावर आलेले मोठे भीषण संकट, येथील दूरदर्शी, वेळ पाहून वागणाऱ्या, व्यापारी व सावकारामुळे किंवा त्यावेळी जो कोणी त्यांचा पुढारी असेल त्याच्या समयसूचकतेमुळे टळले. त्यासाठो सावकार व व्यपाऱ्यांना सुमारे सात लक्ष रुपये पेंढाऱ्यांस द्यावे लागले. पण हे धन देऊन त्यानी या शहराचा विध्वंस तर टाळलाच, शिवाय स्त्रियांची होणारी संभाव्य विटंबना देखील टाळली. उमरावतीच्या तत्कालिन सावकार व व्यापाऱ्यांचा हा चतुरपणा उमरावतीच्या इतिहासात रूंजू झाला आहे.

हा सावकारांचा पुढारी कोण असावा : वरील पेंढाऱ्यांचे हल्ल्याचे वेळी व्यापारी व सावकाराचे नेतृत्व करून, आपल्या चातुर्याने ज्याने या शहराचा विध्वंस व स्त्रियांची विटंबना टाळली तो कोण असावा ? काहींचे मते हा पुढारी म्हणजे तत्कालिन नगरशेट व सावकार सेठ धनराज पोखरमल हेच होत. अर्थात हे केवळ अनुमान आहे.

या बिकट प्रसंगी येथील व्यापारी व सावकारांनी किंवा त्यांचा जो पुढारी असेल त्याने, जर समय सूचकता व उदारता दाखविली नसती तर या शहराचे काय झाले असते ? याची थोडी कल्पना करता यावी म्हणून हा, त्यानंतर घडलेला भीषण व अमानुष प्रकार येथे देत आहोत.

"अमीर अली म्हणतो, आम्ही पुढे निघालो. घोडे धावू लागले. मी यावेळी देखील अग्रिम पथकाचा सरदार होतो. आता माझा आत्मविश्वास दुणावला होता. प्रत्येक खेडयातून लूट मिळविली. काही खेडी अमानुषपणे जाळली.

सायंकाळ होण्यापूर्वी आम्ही कारंज्याला पोहोचलो. तेथील काही रक्षकांनी आमच्यावर गोळ्या झाडल्या. माझी दोन माणसे घायल केली. मी चिडलो आणि त्यातले बरेच सैनिक आम्ही ठार मारले.

चित्तूने शहर लुटण्याचा व जाळण्याचा आदेश दिला. मी माझ्या तंबूकडे आलो. लवकरच आगीचा डोंब दिसू लागला, शहरातील चारही बाजूने जाळ उडाला होता. मी क्रूरता पाहत होतो. रडण्याच्या, ओरडण्याच्या किंकाळ्या ऐकू येत होत्या. अंधार होण्यापूर्वी सर्व शहर जळायला लागले होते. पेंढारी धावत होते. . . . लूट एकत्र करीत होते.

नागरिकांचे किंचाळणे आणि स्त्रियांचे ओरडणे ऐकू येत होते. एक भयंकर दृष्य माझ्या समोर होते. मृत्यूचा नंगा नाच मी बघत होतो. अशा कृत्यामध्ये पेंढाऱ्यांना विशेष आनंद मिळत असे. काही ठग माझ्याजवळ येऊन बसले. त्यांना मात्र अशा क्रूरतेत प्रसन्नता वाटत नसावी.

आम्ही शांतपणे बसलो होतो. माझा तंबू जरा बाजूने होता. आमचे लक्ष एका व्यक्तीकडे गेले. अंधार होता म्हणून स्पष्ट दिसत नव्हते, परंतु एक धिप्पाड पेंढारी एका तरुण मुलीला फरफटत ओढीत आणत होता. ती मुलगी ओरडत होती व आपल्या शक्तीप्रमाणे जबरदस्त प्रतिकार करीत होती. मुलीची सुटका करण्याकरिता मी धावून गेलो. जवळ गेल्यावर बघितले. तो गफूरखान होता. त्याच्या क्रूर चेहऱ्यावर तो करीत असलेल्या अत्याचाराची प्रतिक्रिया झळकत होती.

"अरे, कोण ? मीरखान", गफूरखान ओरडला. "खरा पेंढारी कोणते कृत्य करतो हे तू पाहत आहेस ना ?" तो हसत होता. "मी आणलेली लूट बघितली की नाही ? बघ तिच्याकडे ! स्वर्गातील परी ! हुर-आहे. बघ मी घरातून ओढून आणली आहे. तिच्या आईने प्रतिकार केला तर पहिले तिचा निकाल लावला. आणि आता कार्य साधल्यानंतर हिला देखील तिच्या आईकडे पाठवून देईल." गफूरखान तिला ओढीत जवळच्या झाडीत निघून गेला. मुलीच्या रडण्याचा आवाज थोडा वेळ ऐकू आला, पण नंतर सामसूम झाले[१]."

पेंढाऱ्यांच्या या अत्यंत क्रूरतेमुळे त्या काळी कित्येक निरपराध गोरगरीब लोकांचे नाहक प्राण गेले असतील, गावाची व घरादारांची राख-रांगोळी झाली असेल, अनेक स्त्रियांच्या अब्रूची होळी झाली असेल. वरील 'कारंजा' लुटीचा अमानुष प्रकार हेच दर्शवितो. सुमारे पावणे दोनशे वर्षापूर्वी आपल्या देशात व प्रांतात ही परिस्थिती अस्तित्वात होती.

... ...

उमरावती शहरावरील चित्तू पेंढाऱ्याचे हल्ल्याचा हा, एकाद्या कथा-कादंबरीत शोभेल असा प्रसंग, पावणे दोनशे वर्षा पूर्वी उमरावतीत प्रत्यक्ष घडलेला आहे. याप्रसंगाची हकीकत, त्या हल्ल्यात भाग घेणाऱ्या प्रमुख व्यक्तीनेच स्वमुखाने कथन केलेली असून, ती हकीकत आपल्या

१ : 'कन्फेशन ऑफ ए ठग' : मेडोज टेलर : १८३९ : पा. ३३७ ते ३६२.



चित्र क्र ३३ : राजा बिशनचंद यांची हवेली (पृष्ठ ११६ पहा)



चित्र क्र. ३४ : राजा बिशनचंद हवेलीतील
मुख्य दिवानखान्याचे दृश्य. हल्ली येथे शाळा भरते.

'कन्फेशन ऑफ ए ठग' या पुस्तकातून लिपीबद्ध करणारा कॅ. मेडोज टेलर हा केवळ लेखक नव्हता तर तो तत्कालिन उच्च पदस्थ असा एक जबाबदार सरकारी अधिकारी होता ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. त्याने या प्रसंगाच्या खरेखोटेपणाची शहानिशा करून घेतली असेल हे खास. कॅ. मेडोज टेलर हा दिनांक १४ सप्टेंबर १८५७ ते फेब्रुवारी १८५८ या काळात उत्तर वऱ्हाडचा व त्या नात्याने उमरावतीचाही डेप्युटी कमिश्नर होता. त्यापूर्वी तो निजामाच्या लष्करी व मुलकी खात्यात होता. **"पुढील ग्रंथात वर्णिलेली दुष्ट कृत्यांची हकीकत बहुतेक खरी आहे; फक्त निरनिराळ्या प्रसंगांच्या गोष्टी संगतवार जुळवून अमीरअल्लीचे वृत्त, त्याच्या घोर आचरणाच्या मानाने होईल तितके वाचकास मनोरम करावे, एतदर्थ मात्र जी काही कल्पनेची योजना करावी लागली, तेवढाच काय तो कल्पित भाग."** असे खुद मेडोज टेलर यानेच सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद करून ठेवले आहे.

... ...

वरील चित्तू पेंढाऱ्याच्या उमरावतीवरील लुटीची तसेच कारंजा शहरावरील क्रूर व अमानुष अत्याचाराची हकीकत वाचल्यानंतर असे दिसून येते की, त्याकाळी देशातील राजधानीची शहरे सोडून, कोणत्याही गावाला संरक्षण नव्हतेच. खेडीपाडी तर केवळ ईश्वरावर हवाला ठेवूनच काळ कंठीत असावीत असे दिसते. रयतेला कुणीही लुटावे, अत्याचार करावेत, कोणी म्हणणारा, बोलणारा नव्हता. पावणे दोनशे वर्षांपूर्वी आपल्या देशात ही स्थिती होती.

नंतरही बंदोबस्त नाहीच : पेंढाऱ्यांनी उमरावतीवरून अमाप लूट दिवसाढवळ्या नेली, कारंजा शहर जाळून पोळून खाक केले. शेकडो खेडीपाडी लुटली व जाळली, तरी निजाम सरकारकडून प्रजेच्या संरक्षणाची व्यवस्था होऊ शकली नाही, ती नाहीच. कारण इ. सन १८०९ मध्ये पुन्हा पेंढारी लोकांनी एलिचपूरापर्यंत मुलुख लुटला. वाशिम, जळगाव व पिंपळगाव ही वेळोवेळी लुटली. १८०८ मध्ये पातुर लुटून जाळून टाकले. १८१३ मध्ये दोघा मराठे सरदारांनी फतेखेडा गाव व भोवतालचा भाग लुटून नेला[१].

पेंढाऱ्याप्रमाणेच दक्षिण वऱ्हाडात नाईक लोकांच्या दंग्यामुळे सर्व मुलुख त्रस्त झाला. रोहिले लोकांचा देखील चोहोकडे दंगा चालू होता. याप्रमाणे वऱ्हाडात उपद्रव सुरू होताच[२].

---

१ व २ : वऱ्हाड प्रांताचा इतिहास : या. मा. काळे : पृ. २३०, २३३ व नागपूर रेसिडेन्सी रेकार्डस् : भाग २ : सिन्हा : पा. ९१ ते १५८ पहा.

इ. सन १८१५ मध्ये ब्रिटिशांचा हैद्राबाद येथील रेसिडेंट लिहितो "वऱ्हाडात २६,००० हजार पर्यंत सैन्य वाढविले, परंतु ते देखील कमी पडते. भिल्ल, नाईक, पेंढारी यांचा उपद्रव भयंकर आहे. हे सैन्य देखील प्रशिक्षित केले पाहिजे[१]." निजामाचे राज्य नावालाच होते. प्रजेला लुटारूंच्या दयेवर जगण्यासाठी सोडून दिले, अशी त्या काळातील वऱ्हाडची परिस्थिती दिसून येते. इंग्रजांच्या ताब्यात वऱ्हाड जाईपर्यंत हीच परिस्थिती कायम होती.

उमरावतीचा परकोट : निजाम सरकारने इ. सन १८०६ मध्ये उमरावतीच्या सावकार व व्यापाऱ्यांचे संरक्षणासाठी परकोट बांधण्यास मंजुरी दिली, हा उल्लेख मागे आलेला आहेच. या परकोटाचे बांधकाम इ. स. १८०६ मध्ये सुरू झाले आणि ते सोळा-सतरा वर्षानंतर म्हणजे इ. सन १८२१ मध्ये पूर्ण झाले. या परकोटाचे बांधकामास त्यावेळी चार लक्ष रुपये खर्च आला. हा परकोट एकूण ३७५० यार्ड किंवा सव्वा दोन मैल लांब असून, भितीची उंची २० ते २६ फूट आहे. परकोटास एकूण पाच महाद्वारे असून चार लहान खिडक्या आहेत. या दरवाजांना अनुक्रमे अंबागेट, भुसारीगेट, नागपूरीगेट, खोलापुरीगेट व महाजनपुरीगेट म्हणतात. (स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भुसारीगेटला 'जवाहरगेट' हे नाव देण्यात आले.) चार खिडक्यापैकी एकीस माताखिडकी व दुसरीस खुनारी खिडकी म्हणतात. याशिवाय पटेल खिडकी व छत्रपुरी खिडकी या आणखी दोन खिडक्या होत. महाव्दारे बंद झाल्या नंतर पादचाऱ्यांना आत घेण्यासाठी ह्या खिडक्या ठेवलेल्या होत्या[२].

हा परकोट भव्य असून महाद्वाराचे कामही पाहण्यासारखे आहे. ही महाद्वारे त्याकाळी सायंकाळपासूनच बंद केल्या जात व सकाळी उघडली जात. प्रत्येक महाद्वारावर काही पहारेकरी असत. 'निजामाचे कारकिर्दीत उमरावती शहराचे रक्षणासाठी ११५० शिपाई येथे ठेवलेले असत[३]' त्याकाळी परकोटाचे बाहेर मुळीच वस्ती नव्हती. सर्वत्र जंगल व शेते होती.

---

१ : गॅझेटिअर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टम् : १८७० : पा. १३०

२ व ३ : गॅझेटियर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७०

टीप : परकोट १८०४ मध्ये बांधणे सुरू झाले, असे गॅझेटियर मध्ये म्हटले आहे.

उमरावती शहरास परकोट बांधण्यासाठी येथील व्यापारी आणि सावकारांनी निजाम सरकारकडे अर्ज केला होता हे वर आलेले आहेच. पण त्यानंतर कर्नल क्लोज हा इंग्रज अधिकारी उमरावतीस आला असावा. त्याने या शहराची व्यापारी भरभराट व श्रीमंती पाहिली असावी, आणि पेंढाऱ्याचे लुटीचीही माहिती त्यास मिळाली असावी, कारण नंतर या कर्नल क्लोजनेच हैद्राबादचा तत्कालिन इंग्रज रेसिडेंट कर्नल किर्क पॅट्रिक यास 'उमरावती शहराला भित बांधण्याबद्दल व्यक्तीशः सल्ला दिला' आणि कर्नल किर्क पॅट्रिक याने त्यानुसार निजामाचा दिवाण मीरआलम यास सांगून, तसा सरकारी हुकूम त्यावेळचा वऱ्हाडचा निजामाचा सुभेदार राजा महीपतराम याचेकडे पाठवावयास लावला. याचा लेखी पुरावा कर्नल किर्क पॅट्रिक याने तत्कालिन गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया यास दि. ७ जुलै १८०५ रोजी जे पत्र पाठविले त्यावरून मिळतो. सदर पत्रातील सतराव्या परिच्छेदात त्याने लिहिले– "उमरावती शहराला भित बांधण्याबद्दल कर्नल क्लोज यांनी मला व्यक्तिशः सल्ला दिला होता व त्याप्रमाणे मी पुढाकार घेऊन, निजाम सरकारने तसा हुकूम द्यावा असा प्रयत्न केला. (आता) निजामचा दिवाण मीर आलम याने वऱ्हाडचा सुभेदार राजा महीपतराम यास त्याबद्दल हुकूम पाठविला आहे.*"

यावरून ही गोष्ट सिद्ध होते की, उमरावती शहरावर पेंढाऱ्यांचा हल्ला होण्यापूर्वी, या व्यापारी–समृद्ध शहराला संरक्षणासाठी भित बांधावी हा सल्ला निजामाला इंग्रजांनी दिला व निजामाचा दिवाण मीरआलम याने उमरावती शहराला भित बांधण्याचा हुकूम जुलै १८०५ मध्ये, वऱ्हाडचा त्यावेळचा सुभेदार राजा महीपतराम यांचे कडे पाठविला. त्याप्रमाणे इ. स. १८०५ चे अखेर किंवा १८०६ चे सुरुवातीला उमरावतीचा परकोट बांधण्याचे कामास सुरवात झाली असावी. दरम्यान पेंढाऱ्यांनी शहरावर हल्ला करून शहर लुटले होते.

---

* : 17. The order which I applied for and have been promised for surrounding the town of Umraoty with a wall as Your Excellency may probably recollect, in compliance with a suggestion made to me some time since by Colonel Close, this order, the Minister assures me through Meer Abdool Luttoor,

माल टेकडी : उमरावतीवर पेंढाऱ्यांचा हल्ला येणार हे कळल्यामुळे शहरातील अनेक श्रीमंतांनी आपले धन शहराबाहेरील एका टेकडीवर नेऊन पुरून ठेवले होते. म्हणून त्या टेकडीला नंतर 'माल टेकडी' असे म्हटले जाऊ लागले, अशी दंतकथा आहे. तेव्हापासून या टेकडीस 'माल टेकडी' हे नाव पडले ते अद्याप चालू आहे. ही टेकडी बरीच उंच असून आता वस्तीचे मध्य भागी आली आहे. कारण त्या सभोवार बरीच वस्ती झालेली असून, अनेक लोक टेकडीवर हवा खाण्यासाठी जातात. या टेकडीवरून उमरावती शहराचे विहंगम दृष्य दिसते.

खुनारी खिडकी : परकोटाचे बांधकाम चालू असतानाच इ. सन १८१६ मध्ये (१० मुहरम १२२६ फसली+) ज्या खिडकी जवळ,

---

+**फसली सन :** हे पिकाच्या हंगामाचे वर्ष अकबराने सुरू केले. प्रथम हिजरी सनाचाच वर्षाकि यास लावला. परंतु हिजरी वर्ष केवळ चांद्र (३५४ दिवसाचे) आहे. व फसली हे सौर आहे. त्यामुळे पुढे वर्षाच्या अंकात फरक पडत चालला. हिजरी सन ९६३, इसवी सन १५५६ या वर्षी म्हणजे अकबर राज्यावर बसला त्यावर्षी, उत्तर हिंदुस्थानात फसली सन सुरू झाला आणि दक्षिण हिंदुस्थानात शहाजहान बादशहाने इसवी

---

has since been actually dispatched to Raja Mahipat Ram. (Letter No. 6. From Colonel Kirk Patrick, Resident AT Hyderabad, To The Governor General : Dt. 7th July 1805 : (Nagpur Residency Records : Vol. I : R. M. Sinha : P. 285.)

"The above subject being here concluded, I reminded Meer Allum of the promise he had given you to sanction the construction of a wall round the town of Amraoti. Meer Allum immediately sent for Ishmail Yar Jung and directed him to prepare a draft of the necessary order both from His Highness and from himself to Raja Mahipat Ram." (Translation of Moonshy Uzeer Oollah's Report o. his conference with Meer Allum on the 9th of July 1805 : Nagpur R. R. P. 286)

मोहरमचे वेळी जातीय दंगा होऊन सातशे माणसे मारल्या गेलीत त्या खिडकीला तेव्हा पासून 'खुनारी खिडकी' हे नाव पडले ते आज तागायत चालू आहे[१].

आठवडी बाजार : उमरावती हा 'कसबा' असल्याने येथे अनेक वर्षापासून मोठा आठवडी बाजार भरत असे. आणि या बाजारासाठी भोवतालच्या खेड्यापाड्यातून लोक येत असत. हा आठवडी बाजार त्यावेळी, हल्ली भुसारी गेट आहे, त्याचे समोरच खुले मैदान होते, तेथे भरत असे. बाजाराकरिता पक्की बांधलेली जागा नव्हती[२]. खुल्या मैदानात बाजार भरायचा.

इ. सन १८२१ चे सुमारास शहराच्या परकोटाचे बांधकाम पूर्ण झाले. आणि प्रत्येक महाव्दाराचे देवडीवर पहारेकरी शिपायांची व्यवस्था करण्यात आली. दरवाजे रात्री बंद करणे व सकाळी उघडणे सुरू झाले. तेव्हा हळू हळू वस्ती भुसारीगेट व अंबागेटचे बाजूने वाढू लागली. भुसारी-गेटचे बाहेर खुले मैदान होते तेथे आठवडी बाजार भरविला जाऊ लागला.

सन १६२६ म्हणजे हिजरी सन १०४६ यावर्षी तो सुरू केला. प्रथम त्यास वर्षांक हिजरी सनाचा म्हणजे १०४६ लागला. आणि त्यावेळी उत्तरेकडील फसली सन १०४४ होता. यामुळे दक्षिणेकडील फसली वर्षाचा अंक उत्तरेच्या अंकापेक्षा जास्त झाला. (हिजरी वर्ष केवळ चांद्र म्हणून असे झाले.) वर्षारंभ दोहोकडे भिन्न धरल्यामुळे आणखी काही महिन्याचे अंतर पडले. हे वर्ष केवळ सरकारी असल्यामुळे आणि याचा धर्माशी संबंध नसल्यामुळे ह्याचा वर्षारंभ अनियमित झाला असे दिसते...

दक्षिणेतील फसली सनाच्या वर्षात ५१२–१३ मिळवून शक निघतो आणि ५९०–९१ मिळवून इसवी सन निघतो. (भारतीय ज्योतिः शास्त्रः शं. बा. दिक्षितः १८९६ : पा. ३७६)

१ व २ : गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७०
("....आपसातील दंग्यामुळे इ. स. १८१६ मध्ये या परकोटाच्या एका खिडकीजवळ ७०० माणसे मेली म्हणून या खिडकीस 'खुनारी खिडकी' म्हणू लागले" असा उल्लेख अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ मध्ये पृष्ठ ९९ वर केलेला आहे.)

त्यामुळे भुसारीगेट ते सक्करसाथ पर्यंत दुकानांची लाईन झाली. औरंगपुरा मसजीद (हल्लीचा साबणपुरा) चे आजूबाजूला बगिचा (वाडी) होता. तेथेही हळूहळू मोहोल्ला वसू लागला.

याप्रमाणे परकोट बांधून पूर्ण झाल्यानंतर शहर पूर्वेकडे परकोटाचे भितीपर्यंत वाढले असे दिसून येते. अर्थातच भुसारीगेटचे आतील सक्करसाथ पर्यंतचा भाग, साबणपुरा मोहल्ला आणि अंबागेटचे आतील काही भाग हा इ स. १८२१ नंतर वसला असावा.

राजा बिशनचंद याची हवेली : इ. सन १८३१ चे सुमारास वऱ्हाडचा सुभेदार हैद्राबादचा, राजाबिशनचंद हा झाला. त्यानेच उमरावती येथे (लक्ष्मीनारायण मंदिरा शेजारी) मोठी हवेली बांधली ही हवेली सन १८३१ ते ३५ चे दरम्यान बांधली गेली असावी. परंतु या हवेलीचा पुरेसा उपयोग राजा बिशनचंद याने घेतल्याचे दिसत नाही. ही हवेली पाहण्यासारखी आहे. या हवेलीत फेरफार झाल्याने आता मूळ हवेलीचे वास्तविक दर्शन घडत नाही. मूळ हवेलीस एक भव्य दरवाजा व आत मोठा दरबारी थाटाचा दिवाणखाना होता. आणि त्यावर दुसरा मजला. त्या मजल्यास एक सज्जा होता. या दिवाणखान्याचे लाकडी काम हे तत्कालिन कारागिरीचा नमुना आहे. आता तेथे प्रा. शाळा भरते. दिवाणखान्यासमोरच पटांगण होते. त्या पटांगणातून आत राहण्याच्या जागेत जाण्यासाठीही मोठा दरवाजा होता. त्यामागे चौक असलेला आणि लाकडी कामाने युक्त असा दुमजली-वाडा होता. त्याला एकूण तीन चौक होते. आंत विहीर होती. बाहेरून दर्शनी भाग एकाद्या राजवाडयासारखा आहे. भिंती उंच आहेत. गेल्या १०० वर्षापासून येथे प्राथमिक शाळा भरते. बिसनचंद यांच्या वंशजाकडून या वाडयाचा मुख्य हिस्सा नगरपालिकेने विकत घेतला असून, त्या मागील भागाचे अनेक हिस्से पडून ते काही लोकांनी विकत घेतले आहेत. आता ही इमारत बरीच शिकस्त झाली, तरी पाहण्यासारखी आहे. उमरावतीत जुन्या वास्तूपैकी आज ज्या शिल्लक आहेत त्यात 'राजा बिशनचंद याची हवेली' ही एक जुनी वास्तू होय.

" हा राजा बिशनचंद सन १८५० मध्ये उमरावतीतून सैन्य घेऊन ईलिचपूरच्या हंसुमियाँ नबाबावर चालून गेला होता. पण तेथे त्याचा पराभव

झाला. पुढे बिशनचंद हा रिद्धपूरचा तालुकदारही होता. त्याच्या त्रासाने लोक कंटाळून गेले होते[1].

दुष्काळ आणि सेठ धनराज याची हत्या : इ. सन १८४५ मध्ये या भागात मोठा दुष्काळ पडला. ज्वारी ५ रुपये खंडीवरून २० रुपये खंडीपर्यंत† विकल्या जाऊ लागली. उमरावतीचे प्रसिद्ध सावकार व नगरसेठ धनराज पोकरमल गनेडीवाल याने नफ्यासाठी इतर प्रांतातून तांदूळ आणून त्याचा साठा केला होता. शेवटी दुष्काळ ग्रस्त लोकांनी त्याच्या घरास गराडा घातला, व एकाने गोळी घालून त्यास ठार मारले. (१२५५ फसली[2])

ज्या सावकारांच्या नेत्याने पेंढाऱ्याचे तावडीतून मोठया चातुर्याने ह्या शहराचा विध्वंस व स्त्रियांची इज्जत वाचविली तो हाच असावा. त्याचा अशा रीतीने खेदजनक अंत झाला. उमरावतीत त्याच्या नावाने 'धनराज लेन' आजही प्रसिद्ध आहे. कोणतेही दान करण्यापूर्वी, गावातील व्यापारी मंडळी, प्रथम याच्या कुटूंबाच्या दानाच्या आकडयापासून सुरवात करतात. ही प्रथा आजतागायत चालू आहे.

सेठ धनराज यांचा नातू रायसाहेब रामबिलास पोकरमल याने आजोबाची जागा व हुद्दा घेतला. त्यानें अनेक धार्मिक कृत्ये केलीत. यामुळे शहरात, समाजात त्याला अतिशय आदराने सन्मान मिळतो[3].

इ. सन १८४५-४६ चे दुष्काळात ज्वारीचा भाव आठ पैसे शेर व गहूं १२ पैशाला शेरभर या प्रमाणे धान्याचे भाव झाले होते. पण पुढच्याच वर्षी मात्र इतकी सुबत्ता झाली की, दीड पैशाला पायलीभर (दोन शेर) धान्य मिळू लागले[4]. या दुष्काळात कुत्र्याचे मांस बोकडाचे मांस म्हणून विकल्या गेले[5]. असा हा भयंकर दुष्काळ होता.

---

१ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पृ. २३१, ३७५, ४६१.

† दोन शेराची पायली, आठ पायलीचा कुडव आणि वीस कुडवाची एक खंडी. असे माप त्यावेळी धान्याचे होते.

२ व ३ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० व अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ : पृ. १७६ व पृ. २७४.

४ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पृ. ३६९-७०

५ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११ : पा. २७४

उमरावती टांकसाळ : हैद्राबाद रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार, खंड ७९ पा. १५७ वरुन असे दिसते की, इ. स. १७२५ मध्ये उमरावती येथे तांबे आणि पितळेची नाणी ढाळणारी टांकसाळ प्रथमच सुरु करण्यात आली होती.

इ. स. १७२५ म्हणजे राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले यांचा काळ होय. राणोजीला इ. स. १७२२ मध्ये उमरावती हे गाव शाहु महाराजाकडून मोकासा मिळाले होते व राणोजीने इ. स. १७१९ मध्ये उमरावती आणि मजरे औरंगपुरच्या निमे पाटीलकीचा हक्कही मिळविला होता. अर्थात राणोजीने उमरावती हे गाव बसविले, येथे गढी बांधली तो काळ १७१९ ते १७२५ चे दरम्यानचा होय. व त्यानेच तत्कालिन पद्धतीनुसार परवानगी मिळवून ही टाकसाळही सुरू केली असावी.

राणोजी भोसल्याचा मृत्यु १७६० चे आसपास झाला व त्याचे घराण्याला उतरती कळा लागली. आणि अंदाजे इ. स. १८०० मध्ये या घराण्याचा वारस नागपूरला राहावयाला गेला या दरम्यान उमरावतीची ही टाकसाळ सुरू होती की नव्हती याचा पत्ता लागत नाही. परंतु राणोजीचे हयाती पर्यंत म्हणजे इ. स. १७७०–७२ पर्यंत ही टांकसाळ चालू असावी.

नंतर इ. स. १८०८ चे पूर्वी केव्हातरी येथे टांकसाळ सुरू होती व तीत तांब्याची नाणी ढाळली जात असत.+ त्या काळच्या रिवाजा प्रमाणे ही टांकसाळ खाजगी मालकीची असावी. उमरावतीच्या

+ : "……इ. स. १८१० पूर्वी चलनात असलेले सर्व पैसे वऱ्हाडातील टाकसाळीत तयार झालेले असत. त्या पैशाचे वजन पुढील प्रमाणे होते.

१ दारव्हा वजन १८ मासे
२ आकोट वजन १४ मासे
३ उमरावती वजन २० मासे
४ एलिचपूर, वजन २० मासे
५ बैतुल वजन १२ मासे

या शिवाय वऱ्हाडात इतर गावीही टांकसाळी होत्या व त्या त्या गावच्या नाण्याचे वजनामध्ये फरक होता. पुढे ह्या टांकसाळी सरकारी नियंत्रणाखाली आणल्या गेल्या". (भोसला ऑफ नागपूर : दि लास्ट फेस : सिन्हा : ११६० पान ७८)

ज्या भागांत ही टांकसाळ होती त्या भागाला नंतर जुनी टांकसाळ असे नाव पडले ते आजतागायत चालू आहे. जुनी टाकसाळ या नावाचा उमरावतीत एक मोहोल्लाच आहे. हा मोहल्ला, पूर्वी जेथे भोसल्याची गढी होती त्याला लागूनच आहे.

इ. स. १८२१ मध्ये, आवश्यकता लक्षात घेऊन, उमरावती येथे सोन्याची नाणी तयार करण्यासाठी दि. १२ मार्च १८२१ रोजी परवानगी देण्यात आली होती.[१]

इ. स. १८४७ मध्ये निजाम सरकारने आपल्या राज्यातील सोन्या व चांदीची नाणी पाडण्याची व्यवस्था हैद्राबाद येथे केली व सर्व टांकसाळी बंद केल्या. त्यावेळी उमरावती येथील टांकसाळ चालू रहावी म्हणून, निजाम सरकारच्या उमरावती येथील अधिकाऱ्याने निजाम सरकारकडे अर्ज केला होता.[२]

या वरुन उमरावतीची टांकसाळ ही इ. स. १७२५ ते १८४७ पावेतो चालू होती असे दिसते.+

उमरावतीचे 'शेटे' : वऱ्हाडवरील निजामाचे कारकिर्दीत, वऱ्हाडच्या उत्पन्नाचा ठेका निजाम सरकारकडून दिला जाई. असा ठेका घेणारा मग पोट मक्तेदार किंवा स्वतःचे अधिकारी वसुलीसाठी नेमत असे. त्यांना पगार नसे तर, वसूल होणाऱ्या उत्पन्नापैकी ठराविक टक्के रक्कम पोट मक्तेदार किंवा नेमलेल्या अधिकाऱ्यांना दिली जाई. 'पेठ' असेल अशा गावात विक्रीसाठी येणाऱ्या मालावर जकात आकारीत व ही जकातवसुली वरप्रमाणेच दिली जाई. उमरावतीला असा जो अधिकारी ठेकेदाराकडून नेमण्यात येई त्यास 'शेटे' असे नाव होते. हा शेटे, शहरात येणाऱ्या वस्तू-

---

१ व २ : हैद्राबाद रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार : खंड ७९ : पान १५७

+ इ. स. १९४० चे सुमारास, जुनी टांकसाळ मोहल्ल्यातील श्री देवरणकर सराफ यांनी आपल्या घराचे बांधकामासाठी इमारतीचा पाया खोदला तेव्हा तेथे जस्ताच्या बऱ्याच लाद्या सांपडल्या होत्या. जस्त ही धातू नाण्यात वापरत असत. यावरुन या भागात पूर्वी टांकसाळ होती हे सिद्ध होते.

वरील जकात आपले नोकरामार्फत वसूल करीत. ही जकात नगदी स्वरूपांत किंवा मालाचे रूपात देखील घेतली जाई.

उमरावतीला पर्वतआप्पा शेटे या नावाचे लिंगायत गृहस्थाला जकात वसुलीचा पोटमक्ता होता असे दिसते. हे गृहस्थ तत्कालीन नियमाप्रमाणे शहरात येणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर आपली माणसे ठेवीत व त्या रस्त्याने शहरात विक्रीसाठी येणाऱ्या वस्तूवरील जकात वसूल करीत. उदाहरणार्थ: शहरात विक्रीसाठी कडब्याची एक गाडी आली तर त्या कडब्यातून २ किंवा ३ पेंड्या जकातीचे स्वरूपात घेण्यात येत. किंवा नगदी, तत्कालिन नाण्याचे स्वरूपात वसूल केल्या जाई.

अशा रीतीने वर्षभराचा वसूल शेटे वसूल करीत व नंतर त्यातून स्वत:चा हिस्सा वगळून उरलेली रक्कम ठेकेदारास द्यावी लागे. परंतु बहुधा अशी रक्कम ठेकेदारांना सहजासहजी शेटे देत नसत असे दिसते. त्यामुळे ठेकेदाराकडून या रकमेच्या वसुलीसाठी रोहिले पाठविले जात. ते सशस्त्र असत. तरीही सहजासहजी शेटे रकम देत नसे. मग केव्हा तरी काही रकम जमा करावी, पुन्हा बाकी रकमेसाठी रोहिले यावेत असे चाले.

उमरावतीचे पर्वतआप्पा हे शेटे होते ते वर सांगितले आहेच. या पर्वतआप्पाची उंच हवेली बुधवारा–दत्तमंदिर रोडवर पडक्या स्थितीत आहे. या शेटे घराण्याचे त्या काळचे वैभव आता राहिले नाही. त्यावेळची त्यांची उंच तिमजली मजबूत, आत चौक असलेली इमारत आणि परकोटासारख्या भिंती, तसेच भव्य दिवाणखाना, त्यासमोर अनेक खंडी जनावरे व त्यांचा गोठा, शेती वगैरे वैभव शेटे यांचे होते. आता ते वैभव लयाला गेले असून केवळ उंच इमारतीचे भग्नावशेष गतकाळाची व गत वैभवाची आठवण देत उभे आहेत. उमरावतीचे हे शेटेपण केवळ पर्वतआप्पाचे काळातच होते असे दिसते. नंतर त्यांचे बंधू शिवरामआप्पाचे वेळी त्यांचेकडे शेटेपण नव्हते.[१]

---

१. ऐकीव माहितीचे आधारे.

पेठ उमरावतीतून निजामास मिळणारे उत्पन्न : इ. स. १८४८ (फसली सन १२५८) मध्ये पेठ उमरावतीतून सरकारला एकूण रुपये ५१,१५५-१५-३ पै इतके उत्पन्न मिळत असे[१].

वऱ्हाडवर निजामाची कारकिर्द १८५३ पर्यंत झाली. त्यानंतर दि. ११ मे १८५३ रोजी झालेल्या इंग्रज व निजाम यांतील तहाने वऱ्हाड हा इंग्रजाकडे वहिवाटीस आला. इंग्रजी आमदनीत वऱ्हाडची (आणि उमरावती शहराची) परिस्थिती कशी सुधारली ते पुढे **प्रकरण ४ मध्ये** दिले आहे.

निजामाचे काळातील वऱ्हाड

(इ. सन १८०३ ते १८५३)

१८०३ मध्ये नागपूरकर भोसल्यांचा व शिद्यांचा पराभव झाल्यानंतर शिंदे व भोसले यांचे ताब्यातील वऱ्हाडचा मुलुख निजामास इंग्रजाकडून मिळाला व त्यावर प्रत्यक्ष निजामाचा एकट्याचा अंमल सुरू झाला.

पूर्वीच्या 'दो अमली' कारकिर्दीमुळे जी अंदाधुंदी होती ती आता नाहीशी होऊन एकमुखी सत्ता सुरु झाली, परंतु वऱ्हाडच्या कमनशिबाचा फेरा अद्याप संपला नव्हता. उलट तो जास्त वाढला. पूर्वीच्या कारकिर्दीत भोसल्यांचा अंमल कबूल करणाऱ्या प्रदेशास मराठ्यांकडून त्रास न होता, निजामाकडील अधिकाऱ्यांचाही ते बहुधा त्रास होऊ देत नसत, परंतु निजामाच्या कारकिर्दीत मुख्य सत्ता दुर्बळ असल्यामुळे रक्षण होण्याचे तर दूरच परंतु निजामाचेच अधिकारी व मक्तेदार रयतेचे भक्षण करीत.

मराठ्यांच्या वेळची व त्यापूर्वीची मलीकंबरची जमीनधाऱ्याची सुरक्षित पद्धती मोडून मक्तेदारी पद्धती सुरू झाली. त्यात सरकारास त्रास नाही एवढाच फायदा असे. परंतु मक्तेदार नफ्या करिता मक्ता करीत असल्यामुळे रयतेच्या कल्याणाची त्यांना फिकीर नसे. राज्य हे पैसा मिळविण्याचे एक साधन एवढाच अर्थ त्यांना अभिप्रेत असे. त्यामुळे

१ : हैद्राबाद अफेअर्स : खंड दुसरा : मौलवी सय्यद मेहंदीअली : १८८३ : पा ५०२.

मक्तेदार, पोट मक्तेदार व त्यांचे हस्तक यांपासून प्रजेस फार पीडा होत असे. निजामअल्ली मरण पावल्या नंतर शिकंदरजहा[१] हा निजाम झाला. निजामाच्या राज्यात अंदाधुंदी फार. निम्मे प्रांत निरर्थक जहांगिरींनी अडविल्यामुळे उत्पन्न थोडे व खर्च फार, अशी नेहमीची स्थिती. संस्थान नेहमी कर्जे बाजारी व त्यामुळे सावकारांचे वजन दरबारात ! परिणामतः राज्यकारभार अत्यंत अव्यवस्थित असे[२].

"निजामाच्या ताब्यात वऱ्हाड आल्यापासून त्या मुलखाचा वसूल मक्त्याने देण्याची वहिवाट पडली होती. वऱ्हाडचा मक्ता बावनलाख रुपयास दरसाल दिला जात असे, त्यामुळे फार दिवसापासून दूरवर "बावन्न वऱ्हाड" असे प्रसिद्ध नाव असे. "वऱ्हाड व सोन्याची कराड" या म्हणी प्रमाणे हा सधन प्रांत असल्यामुळे मक्तेदारास फार नफा होत असे. त्यामुळे वऱ्हाडचा मक्ता घेण्याकरिता उड्या पडत, व ज्याचा वशिला लागेल तो भाग्यवान बनत असे. लांचलुचपतीचाही प्रकार राजरोस चाले. पुष्कळदा असेही होत असे की, एका मक्तेदारास मक्ता देऊन त्यास तसा लेखी हुकूम वगैरे दिला म्हणजे मागाहून दुसऱ्याने कारवाई करून पहिला मक्ता रद्द करवून घ्यावा व नवीन मक्ता दिल्याबद्दलचा नवा हुकूम घेऊन पहिल्याचे पाठोपाठ जावे व त्यास जबरीने हुसकून लावून आपण ताबा घ्यावा[३].

मोंगलाई : अशा अजब राज्यकारभारामुळे निजामाचे राज्याला 'मोंगलाई' म्हणण्याची प्रथा सुरू झाली होती. सर्व राज्यात अंदाधुंदी फार त्यामुळे लोक निजामाच्या प्रदेशाला व कारभाराला 'मोंगलाई' म्हणत. हा शब्द अजूनहि प्रचलित आहे.

१ : शिकदरजहाचा जन्म १९ ऑगष्ट १७७१ चा. त्याचे मूळ नाव अकबरअली होते. वडील त्याला शिकंदरजहां या टोपण नावाने बोलावीत असत. त्याचे दुसरे नांव 'फौलादजंग' असे देखील होते. गादीवर आल्यानंतर त्याने स्वतःला शिकंदरजहां हेच नाव चालू ठेवले. त्याची कारकिर्द १८२९ पर्यंत झाली. ('दि निजाम' : ब्रिग्ज : पा. १०४)

२ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पृ. २१९–२२०

३ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पृ. २२३–२२४



चित्र क्र. ३५ : शेटचाची हवेली भग्नावशेष (पृष्ठ ११९ पहा)

चित्र क्र. ३६ . निजाम नासिरुद्दौला आसफजहाँ
(इ. सन १८२९–१८५७) (पृष्ठ १२७ पहा)



चित्र क्र. ३७ : अमरावतीच्या छत्रपुरी लोकांचे धार्मिक स्थल. (पृष्ठ १२४)
'लाला हरदौल मंदिर', मराठी नार्मल स्कूलचे मागील शेतात.

उमरावतीत छत्रपुरी (बुंदेलखंडी) लोकांची वस्ती सव्वाशे–दिडशे वर्षापासून आहे. या लोकांचे एक धार्मिक स्थल तेव्हापासून "लाला हरदौल मंदीर" या नांवाचे शहराचे उत्तरेचे बाजूने एका शेतात असून, या समाजातील नुतन वधुवर या मंदीरात लग्नानंतर दर्शनास जाण्याची पूर्वी पासूनच प्रथा आहे. पृष्ठ १२४ वर दिलेली घटना येथेच घडली असावी.

लाला हरदौल हा ओरछा संस्थानच्या राजाचा भाऊ होता. ओरछाचा राजा एकदा लढाईपाठी गेला असता राज्याचा कारभार त्याने भावावर सोपविला होता. कालांतराने राजा लढाई वरून परतुन राजधानीत आला तेव्हा, कांही लोकांनी राजाचे मनांत असे भूत भरविले की महाराज युद्धांत गुंतले असतानाचे काळात राजाच्या बंधूचे संबंध महाराणीशी होते. राजाला ते खरे वाटले व त्याने 'महाराणीचे हातून जहर प्राशन करून आपले पावित्र्य सिद्ध कर' असे भावास सांगितले. भावाने आपल्या वडील बंधूच्या पत्नीच्या (महाराणीच्या) हातून विषाचा पेला घेऊन प्राशन केला व महाराणी आणि स्वत:चे पावित्र्य सिद्ध करण्यासाठी आपले बलिदान केले. तेव्हा पासुन, बुंदेल खंडी लोक लाला हरदौल यास देवाप्रमाणे पूजतात आणि नूतन वर–वधु लग्नानंतर त्याचे दर्शनास जातात. अशी आख्यायिका व प्रथा सांगीतली जाते.

निजामाचे काळातच उमरावतीवर पेंढाऱ्यांचा हल्ला झाला, दिवसा ढवळ्या लक्षावधी रुपयांची लूट पेंढाऱ्यांनी जबरदस्तीने केली. कारंजा शहर जाळले, लुटले, अनेक निरपराध स्त्री-पुरुषांची कत्तल केल्या गेली आणि नंतर हे पेंढारी अशी लुटालूट-जाळपोळ करीतच खुद: निजामच्या राजधानी असलेल्या मोगलाई भागा पर्यंत गेले. परंतु त्यांना अटकाव झाला नाही. यावरुन निजाम सरकारच्या कारकिर्दीची कल्पना करता येते. त्या कारकिर्दीत प्रजेला संरक्षण मुळीच नव्हते फक्त प्रजेकडून पैसा तेवढा उकळायचा. अशी ही निजामाची कारकीर्द. म्हणूनच लोक त्या राज्यास 'मोंगलाई' म्हणत.

सुभेदार : इ. सन १८०३ मध्ये राजा महिपतराम हा वऱ्हाडचा सुभेदार होता. नंतर राजा चंदूलालचा भाऊ गोविंदबक्ष याला वऱ्हाडची सुभेदारी मिळाली. त्यानंतर १८३१ चे सुमारास राजा बिशनचंद हा सुभेदार झाला. या बिशनचंदाचे कारकिर्दीत वऱ्हाडचे रयतेस फार त्रास झाला. "...त्याने जुलूम केला. कुणबी लोक त्याचे नाव ऐकताच घाबरतात. आणि जर सकाळी त्याचे नाव ऐकले तर दिवसभर अन्न मिळणार नाही असे ते समजतात.[१] "अशी त्याची किर्ती होती. त्याचे नंतर हैद्राबाद संस्थानचा सावकार पुरणमल याचे कर्जात काही दिवस वऱ्हाड लाबून दिले होते. नंतर १८३९ मध्ये पेस्तनजी नावाच्या पारशी सावकारास वऱ्हाड मक्त्याने दिले. या पेस्तनजीचे कारकिर्दीत पूर्वी दंग्यामुळे ओस पडलेली गावे आबाद झालीत व सोडून दिलेल्या जमिनी वहीत झाल्या.[२] एकूण निजामाची कारकीर्द वऱ्हाडी जनतेस फार कष्टाची गेली. दंगे, धोपे, लुटमार, जुलूम जबरदस्ती फार होई. प्रजेला संरक्षण नसे. शेतकऱ्यावर जुलूम झाल्याने त्यांनी जमिनी वहीत करणे सोडून दिले व ते इतरत्र निघून गेले होते. पेंढारी, नाईक, रोहिले यांचा उपद्रव फार. "पुष्कळ प्रांत ओस पडला. वतनदार वतने सोडून पळून गेले. शेतकरी लोक शेते सोडून निघून गेलीत.[३]" असा हा ५० वर्षाचा काळ गेला. निजामाचे काळात वऱ्हाडात कोणत्याच सुधारणा झाल्या नाहीत. पेस्तनजीने मात्र थोड्या सुधारणा स्वत: केल्या होत्या. कापूस पेरण्यास त्याने प्रोत्साहन दिले होते. शेतकऱ्यांना शेतीसुधारणे-साठी कर्जही दिले.

---

१ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७०

२ व ३ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पान २३१, २३२ व २३९

या काळात उमरावती शहराला केवळ व्यापारी महत्व होते. सावकारी धंदाही मोठ्या प्रमाणात चाले पण राजकीय महत्व नव्हते. वऱ्हाडचे राजकीय केंद्र ईलिचपूर होते तर आर्थिक व व्यापारी केंद्र उमरावती होते. उमरावतीला निजाम सरकारने परकोट बांधून संरक्षणाची सोय केली. एवढे एक काम सोडले तर, निजामाकडून वऱ्हाडचे रयतेस सुख असे मिळाले नाही. उमरावती हे वऱ्हाडातच असल्याने निजामाच्या कारकिर्दीतील अंदाधुंदीचे बरे वाईट चटके येथील नागरिकांना भोगावे लागले.

निजामाच्या कारकिर्दीचे काळात एकंदर वऱ्हाडची परिस्थिती कशी होती याचे सर्व साधारण चित्र वरील वर्णनावरुन दिसून येते. या काळात खुद्द: उमरावती शहराची परिस्थिती काय होती याची कल्पना करता यावी म्हणून, वऱ्हाडवरील निजामी राजवटीच्या अखेर अखेरच्या वर्षातील काही घटनांची माहिती खाली दिली आहे.

१ : **छत्तरपुरी लोकावर भयंकर अत्याचार** : दिनांक १७ दिसेंबर १८५१ रोजी उमरावतीतील छत्तरपुरी लोकांची एक धार्मिक मिरवणूक निघाली व ती प्रमुख मार्गाने, छत्तपुरी लोकांच्या मालकीचा एक बगीचा होता तेथे नेण्यात आली. तेथे मूर्तीच्या पूजेचा कार्यक्रम होता. सर्व स्त्री-पुरुष एकत्र जमले होते. हा कार्यक्रम रात्री देखील चालू होता. अशा रात्रीच्या वेळी काही रोहिले आणि अरबांनी मिळून या समारंभातील लोकांवर हल्ला केला व सात लोकांना ठार मारले, स्त्रियांवर बलात्कार करण्यात आले.

उमरावतीचा निजामाचा अधिकारी ज्याला 'नायब' म्हणतात, त्याला लगेच या अत्याचाराची वर्दी देण्यात आली. परंतु त्याने या अत्याचाराची दखल घेणे तर दूरच उलट मूर्ती फोडून टाकण्याचा आदेश दिला'.

२ : **उमरावतीस आलेल्या प्रवाशांची लुट** : दि. १८ दिसेंबर १८५१ रोजी हुबळीचे काही यात्रेकरु व्यापारी उमरावतीला आले होते. त्यांनी रात्री येथेच मुक्काम केला. रात्री रोहिले व अरबांनी त्यांचेवर हल्ला करुन त्यांची सर्व चिजवस्तु लुटली.

दुसऱ्या दिवशी नायबाला ही बातमी देण्यात आली. परंतु त्याने कांहीही केले नाही. गावातील सावकार व दुकानदारांनी त्यामुळे आपआपली दुकानें बंद ठेवून या अत्याचाराचा निषेध केला होता.

---

१ : हैद्राबाद रेसिडेन्सीचा पत्रव्यवहार : खंड ७९४ पृ. १००

या बाबत ईलिचपूर येथील ब्रिटिश फौजेच्या अधिकाऱ्याने हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेंटला पत्र लिहून वरील अत्याचारांची माहिती दिली होती आणि उमरावतीच्या लोकांनी ईलिचपूरच्या इंग्रज सैन्याकडे मदतीची याचना केली आहे, असे कळविले होते[१].

३ : बंडखोर रामू नाईकाने उमरावतीचा आश्रय घेऊन भयानक धुमाकूळ माजविला : दि. ३० मार्च १८५२ इसवी रोजी, ईलिचपूर येथील 'रसेल ब्रिग्रेड' चा प्रमुख सैनिक अधिकारी ब्रिगेडियर मेकेन्झी याने हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेन्टाकडे पत्र पाठवून कळविले होते की,–

"रामू नाईकाने वऱ्हाडात अतिशय उपद्रव माजविला आहे. खेडी व गावे लुटतो, जाळतो किंवा याच प्रकारचा इतर उपद्रव देतो. त्याचे जवळ रोहिले व अरब सैनिक आहेत. अंदाजे ५०० साथीदार असावेत.

त्याने उमरावती शहरात आश्रय घेतला असून, शहरात व आजुबाजूने गावात लूटमार चालू आहे. उमरावतीचा नायब हा, रामू नायकाला मदत करीत आहे असे सांगितले जाते. लूटीचा हिस्सा त्यालाही मिळतो. सावकार त्रस्त झाले आहेत. सावकारांनी ईलिचपूरला संरक्षणाकरिता याचना केली आहे. कॅप्टन हॅमिल्टन याला मी दोन कंपनी सैन्यासह उमरावती येथे पाठविले आहे.

रामू नाईकाचा बाप देखिल लुटमार करीत होता, म्हणून त्याला इंग्रज सैन्याने पकडून गोळी घालून ठार मारले होते. त्याचा बदला म्हणून रामू नाईक लुटमार करीत आहे असे बोलले जाते. उमरावतीच्या नायबाचे वर्तन संशय घेण्यासारखे आहे. निजाम सरकारने त्याला ताकीद दिली पाहिजे[२].

त्याच सैनिक अधिकाऱ्याने नंतर दुसरे पत्र पाठवून 'उमरावती येथे इंग्रज सैन्याची कारवाई यशस्वी होऊन, रामू नाईक हा उमरावती सोडून वणीच्या दिशेने पळून गेला.' असे हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेन्टास कळविले होते[३].

---

१ : हैद्राबाद रेसिडेन्सीचा पत्र व्यवहार : खंड ७९४ पृ. १०१

२ व ३ : हैद्राबाद रेसिडेंसीचा पत्रव्यवहार : खंड ७९४ पृ. ५५१ व ६८३

४ : शांतता व सुव्यवस्थेसाठी नेमलेल्या निजामी अधिकाऱ्यांचे अरेरावी व अत्याचारी वर्तन : खोलापूर या गावच्या नायब पदावर निजाम सरकारने अंबादास या नावाचे इसमास नेमले होते. ही गोष्ट उमरावतीचा निजामाचा अधिकारी मोहंमदअली, सरनायब आणि मोहंमद बूदाखान, तालुकदार उमरावती या दोघांना आवडली नाही. म्हणून या दोन्ही अधिकाऱ्यांनी मिळून अंबादास याला खोलापूरला टिकू द्यायचे नाही, असे ठरविले. अंबादासने खोलापूरच्या नायब पदाची सूत्रे हाती घेताच, उमरावतीच्या वरील दोन्ही अधिकाऱ्यांनी काही रोहिले आणि अरबांना खोलापूरला पाठवून ते गाव लुटायला लावले. त्यांनी त्या गावच्या लोकांवर अनन्वित अत्याचार केलेत. स्त्रियांवर बलात्कार केले. कित्येकांच्या कत्तली केल्या.

या बाबत ईलिचपूरच्या इंग्रज सैन्याचा अधिकारी, ब्रिगेडियर मेकेन्झी याने दि. २ जून १८५२ इसवी रोजी हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेन्टास पत्र लिहिले की,

"मोहंमदअली, सरनायब उमरावती आणि मोहंमद बूदाखान, तालुकदा उमरावती यांनी काही रोहिले व अरब खोलापूरास पाठविले. रोहिल्यांनी गाव लुटले, अनेकांच्या कत्तली केल्या. स्त्रियांवर बलात्कार केलेत. रोहिलें व अरबांनी भयंकर अत्याचार केले म्हणून भीतीने नागरिक पळून गेले. गाव रिकामे झाले आहे.

अंबादास याला खोलापूरचा नायब नेमले म्हणून ही कारवाई करण्यात आली. अंबादास हा आपला मित्र आहे.

निजामाचे दफ्तराकडून दुसरी सनद आली आणि खोलापूरच्या नायबाचे जागी अंबादासला नेमावे असा त्यांत आदेश होता. सदरहु हुकुमात उमरावतीच्या निजामाचे सैनिक अधिकाऱ्याने अंबादासला मदत करावी, असेही लिहिले होते पण अंबादासला कोणीही मदत केली नाही.

मोहंमदअली व मोहंमद बूदाखान अजूनही खोलापूरवर आक्रमण करीत आहेत. अंबादास आज माझ्या आश्रयाला आला आहे. त्याच्या सांगण्यावरून खोलापूर पूर्ण लुटले आहे. आणि रोज अत्याचार सुरू आहेत.[१]"

---

१ : हैद्राबाद रेसिडेंसीचा पत्रव्यवहार : खंड ७९४ पृ. ८३८

याप्रमाणे निजामाचे काळातील उमरावतीची स्थिती होती. निजामाचे येथील अधिकारी भ्रष्ट, न्यायाची यत्किंचितही चाड न बाळगणारे व प्रजेकडे लक्ष न देणारे असेच होते हे वरील थोड्या घटनांवरूनही सहज कळून येण्यासारखे आहे.

(पुढे इंग्रजांनी इ. सन १८५३ मध्ये निजामाकडून वऱ्हाडचा कारभार आपल्या हाती घेतला व इंग्रजांनी फार थोड्या अवधीत येथे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. लोकांना संरक्षण मिळू लागले. लोकांची लूट थांबली, न्यायालये सुरू होऊन शांततेच्या मार्गाने न्याय मागण्याचा मार्ग उपलब्ध झाला. लोक निर्भय होऊन आपापला व्यवसाय करू लागले. या सर्व परिस्थितीचा परिणाम असा झाला की, इ. सन १८५७–५८ च्या बंडाचे काळात वऱ्हाडातील जनतेने बंडाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. पन्नास वर्षे निजामाच्या कारकिर्दीत अतोनात हाल आणि अपमान भोगलेल्या लोकांना इंग्रजांची राजवट एकाद्या देवदूतासारखी वाटली तर त्यात आश्चर्य नाही.)

'नवा निजाम' : निजाम शिकंदरजहाँ हा दि. २१ मे १८२९ रोजी मरण पावला. आणि त्याचा मुलगा नासिरुद्दौला हा 'निजाम' झाला. याची पदवी "आसफजहाँ, मुजफ्फर–उल-मुमालिक, निजाम उल् मुल्क, निझाम–उद्दौला, मीर फरखुन्द अलीखान बहादूर, फत्तेजंग, सिपह सालार, आयरन्वफादार रुस्तमे दौरा, रुस्तुमजहाँ, मुहम्मद अकबर शहा, बादशहा-ए-गाझी[१]." अशी लांब लचक होती. हा इ. सन १८५६ पर्यंत गादीवर होता. नव्या निजामाचे स्वास्थ्यासाठी त्यावेळी उमरावतीत मशिदीतून 'दुवा' पढण्यात आला होता. या निजामाचे काळातच इ. स. १८५३ मध्ये, वऱ्हाड-प्रांत इंग्रजांना वहिवाटीला दिला गेला.

निजामचे वऱ्हाडवर राज्य आले तेव्हापासून, पर्शियन लिपी, पर्शियन भाषा आणि हैद्राबादी पोषाख यांची चलती झाली होती. त्यापूर्वी देखील वऱ्हाडात सरकारी भाषा व लिपी पर्शियन असायची पण व्यवहारात स्थानिक वऱ्हाडी बोलीची व मोडी लिपीची चलती होती, असे दिसून येते. उमरावतीचा व्यापार उत्तर हिंदुस्थान व दक्षिणेत पश्चिम किनाऱ्या-पर्यंत कोंकण, मुंबई, तसेच निजामाचे राज्यात सोलापूरपर्यंत चालत असे. त्यामुळे पर्शियन लिपी प्रचारात असावी.

---

१ : दी निजाम : ब्रिग्ज : भाग १ : १८६१ : पृ. १०४

उमरावती आशिया खंडातील कापसाची मुख्यपेठ बनते.

इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या मध्यापासूनच उमरावती शहर कापड, किराणा, मसाल्याच्या चिजा, पितळी भांडी इत्यादी मालाच्या ठोक व्यापाराची मोठी पेठ बनू लागले आणि हे शतक संपेपावेतो या शहराची ठोक व्यापार आणि सावकारीत चांगलीच भरभराट होऊन श्रीमंत व्यापारी पेठ म्हणून ते गणल्या जाऊ लागले. एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या १५-२० वर्षात या शहराला एक नवा व्यवसाय मिळाला तो म्हणजे कापसाचा व्यापार. पुढे या व्यापारातही हे शहर फार प्रसिद्धीला आले. हंगामात कोटयावधि रुपयांची उलाढाल होऊ लागली व सबंध आशिया खंडात कपाशीचे व्यापारात या शहराची प्रथम क्रमांकात गणना होऊ लागली.

कपाशीचा व्यापार वाढू लागला त्याबरोबर उमरावतीतील इतर धंद्यातही तेजी आली, अशा तऱ्हेने दिवसेंदिवस भरभराट होऊन कापूस व्यवसाय हा उमरावतीच्या आर्थिक जीवनाचा कणा बनला. मात्र ही स्थिती प्राप्त होण्यासाठी बराच काळ जावा लागला. ती हकीकत पुढे दिली आहे.

उमरावतीचा 'कापूस' व्यवसाय : उपलब्ध माहितीप्रमाणे, उमरावतीचा कापूस व्यवसाय सुमारे १५० वर्षे इतका जुना आहे. मात्र त्यावेळी या धंद्याची पद्धत वेगळी होती. उमरावतीचे सावकार सेठ, धनराज पोखरमल यांनी या धंद्यात विशेष लक्ष घातले होते असे दिसते. ते आपली माणसे खेडोपाडी ठेवीत, शेतकऱ्यांना कर्ज देत, आणि कापूस निघाल्यानंतर तो या माणसाचे ताब्यात शेतकऱ्याना द्यावा लागे. अशा तऱ्हेने कापूस गोळा करून उमरावतीत रेचांवर आणला जाई, व रुई अलग करून बोजे बांधले जात. हा कापूस नंतर इंग्रज व्यापारी विकत घेत व उमरावतीहून ५०० मैल दूर असलेल्या मिर्झापूर येथे हा माल बैलगाडीने नेत व तेथून गंगानदीतून नावेने ४५० मैल दूर कलकत्त्यास पाठविला जात असे. नंतर जहाजाने हा कापूस परदेशात रवाना होई. याबाबतीत हैद्राबाद येथील इंग्रजांचा रेसिडेन्ट कॅ. रेनॉल्ड याने इ. स. १८४५ साली, ईस्ट इंडिया कंपनीला एक अहवाल पाठविला होता. त्यांत तो लिहितो, "उमरावती शहर हे एक व्यापारी

चित्र क्र. ३८ : उमरावतीचा कापूस बाजार : कापसाचे तोल चालू असून तत्कालीन वऱ्हाडी पोषाखातील शेतकरी दिसत आहेत.

(पृष्ठ १२८ पहा)



चित्र क्र. ३९ : (पृष्ठ १८३ पहा)

श्री विठ्ठलगीर बोवा उर्फ विठ्ठलानंद सरस्वती

भरभराटीचे शहर असून, या ठिकाणी मारवाडी व काही उत्तर भारताचे सावकार आहेत. शेठ धनराज येथील प्रसिद्ध व्यापारी आहें. त्याने कापसाचा व्यापार हाती घेतला होता. आपली माणसे त्याने खेडोपाडी ठेवली होती. तो शेतकऱ्यांना कर्ज देत असे. कापूस आल्यानंतर तो या माणसांच्या ताब्यात (शेतकऱ्यांना) द्यावा लागे. उमरावती ही कापसाची फार मोठी बाजारपेठ होती. या ठिकाणी अनेक गोदामे होती. कापूस येथे स्वच्छ करण्यात येत असे व नंतर तो येथून मिर्झापूरमार्गे कलकत्याला पाठविला जात होता. कापसाची किंमत ७५० पौंडाला ५४ रु. होती. एका बंजाऱ्याला एका बैलगाडीचे (२४० पौंड) ७ रुपये उमरावती ते मिर्झापूर पावेतोचे गाडी भाडे मिळत असे.

उमरावतीहून इंग्लंडला कापूस पाठविला जाई. त्याची सरासरी किंमत खालील प्रमाणे पडत असे :–

एक पौंड कापसाची किंमत–	
कापसाचे मूल्य	१.०५
कर	०.१
दर मैलाचा प्रवास खर्च	०.३७
जहाजात माल चढविण्याचा खर्च	०.२
इंग्लंडपर्यंत जहाज भाडे	०.५२
१ पौंड कापसाची एकूण किंमत...	२.६९

याप्रमाणे उमरावतीहून कापूस खरेदी करून, प्रथम खुष्कीचे मार्गाने व नंतर जलमार्गाने इंग्लंड पावेतो पोचविणे इत्यादी खर्चासह, एक पौंड कापसाला २.६९ इतकी किंमत त्यावेळी पडत असे[१]."

त्याचप्रमाणे जनरल वेलफोर सी. बी. यानेही इ. स. १८४७ मधील आपलें रिपोर्टात हेंच नमूद केले होते की " ...वऱ्हाडच्या बऱ्याच मोठ्या

१ : कॅप्टन रेनॉल्डस् रिपोर्ट, १८४५ (दी निजाम : ब्रिग्ज : १८६१ : भाग दुसरा : पा. ३७)

क्षेत्रातील कापूस बैलावरून ५०० मैल दूर मिर्झापूर येथे व तेथून ४५० मैल बोटीने गंगानदीतून कलकत्याला पाठविला जात असे...[१]"

इ. स. १८१३ नंतरच्या काळात याच पद्धतीने कापसाचा धंदा होत असे. इ. स. १८१३ पासूनच हिंदुस्थानातून कापसाची परदेशात निर्यात होऊ लागली होती. त्यामुळे या धंद्याकडे तत्कालिन सावकारांनी लक्ष दिले. त्या काळी कापसाचा स्वतंत्र बाजार असा वऱ्हाडात नव्हताच. वरप्रमाणे सावकार लोक शेतकऱ्यांना कर्ज देऊन, कापूस घेत असत. यात सावकारांचा दुहेरी फायदा होता. शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाचे व्याजही मिळे आणि कापूस हमखास त्यांचे वखारीत शेतकरी आणून देत, कारण त्यांनी त्या सावकाराचे कर्ज घेतलेले असे. हीच पद्धत खामगावला देखील होती. कापूस खरेदीबाबत एका इंग्रज व्यापाऱ्याने समक्ष पाहिलेली पद्धत वर्णन केली आहे. त्यात तो म्हणतो–

"कापसाची भारतातून निर्यात फक्त काही मंबईच्या मोठ्या व्यापारी मंडळी मार्फत होते. त्यांचे काही गुमास्ते आहेत. ते खामगावला राहतात. तेथून ते आपली माणसे परगण्यात व इतर गावी पाठवितात. गावातील पाटलाला आगाऊ रकमा दिल्या जात असत. पाटील आपल्या गावातील शेतकऱ्यांना दरमहा दरशेकडा दोन रुपये व्याजाने. कापूस निघण्यापूर्वी, दोन महिने अगोदर पैसे देत असे. गावातील सावकार शेतकऱ्यांची जमानत घेई. कापूस आल्यानंतर तो गावातील सावकार खरेदी करी व आपले कर्ज व्याज कापून उरलेली रक्कम शेतकऱ्यांना देत असे. अशा रीतीने कापूस गोळा केल्या जाई[२]."

अशा रीतीने खामगाव, उमरावती व आकोटला कापूस खरेदी होत असे. इ. स. १८२६ साली मुंबईच्या विकाजी पेस्तनजी फर्मने सर्वप्रथम वऱ्हाडच्या कापूस क्षेत्रात प्रवेश केला. तेव्हापासून मुंबईला येथून कापूस जाऊ लागला. याबद्दल जनरल वेलफोर सी. बी. याने इ. स. १८४७ मध्ये केलेल्या रिपोर्टात लिहिले आहे.

---

१ : जनरल वेलफोर सी. बी. यांचा रिपोर्ट : १८४७ (गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. १२६)

२ : दि. इंडियन कॅपिटालिस्ट क्लॉसेस : व्हि. आय्. पॉवलाव : १९६४ पा. १३९

"...प्रत्येक खेपेला ५०० बैल गाड्यांनी १,२०,००० पौंड वजनाचा व पंचवीस हजार रुपये किंमतीचा कापूस, ४५० मैल दूर मुंबईला पाठविणे सुरू झालें. प्रमुख केंद्रावर कापूस खरेदी केला जाई व तो वरप्रमाणे पाठविला जाई. एका बैलगाडीचे भाडे अंदाजा ५ ते १६ रुपये पडत असे. आणि कापसाचा एक बोजा अंदाजे २५० पौंड असे. पण एवढ्यावरच खर्च संपत नव्हता तर, अपरोक्षपणे अधिक खर्च होई. कारण बैल कापूस खाऊन नासाडी करीत, पुष्कळसा चोरला जाई, रस्त्यावरील झाडी व कांटे यांनी फाटला जाई. धूळ व हवेमुळे खराब होत असे. आणि रोज चढविणे व उतरविणे आणि पाणी, चिखल यामुळे अतिशय खराब होत असे. या सर्व कारणामुळे अपरोक्ष खर्च वाढत होता[१]."

विकाजी पेस्तनजी फर्मने देखिल 'शेतकऱ्यांना आगाऊ पैसे देऊन कापूस पिकविण्याचा प्रघात पाडला होता' व त्यांनी खामगाव येथे रेचे बसविलें होते[२].

याप्रमाणे वऱ्हाडच्या कापसाला मागणी वाढल्याने वऱ्हाडात कापसाचा पेरा वाढून सर्व हिंदुस्थानात वऱ्हाड प्रांत हा कापसाचा मुख्य प्रांत होऊन बसला. वऱ्हाडच्या कापसाची प्रतही उत्तम असे.

इ. सन १८१३ साली हिंदुस्थानातून एकूण ९० लक्ष रतल कापूस निर्यात झाला व १८३३ पावेतो कापसाची परदेशातील निर्यात ३ कोटी २० लक्ष रतलांवर पोंचली[३] (पुढे १९१४ साला पर्यंत ही निर्यात ९६ कोटी ३० लक्ष रतल एवढी झाली होती.)

"सर्वात चांगला कापूस वऱ्हाडच्या खोऱ्यात पिकतो. खामगाव, उमरावती व आकोट ही गावे कापसाचे व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत. शेतकरी हा मागासलेला व कर्जबाजारी आहे. सावकाराकडून कर्ज घेतल्याशिवाय

---

१ : जनरल वेलफोर सी. बी. याचा रिपोर्ट : १८४७ (गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७० : पा. १२६)

२ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे : पा. २३१–२३२

३ : पोर्टर : प्रोग्रेस ऑफ दी नेशन : १८४७ : पा. ७५०

त्याला गत्यंतर नव्हते. दुसरा मोठा अडथळा म्हणजे कापूस बाजार नसणे हा होय.....[१]"

याबाबतीत हैद्राबाद अफेअर्स या ग्रंथात पुढील माहिती दिली आहे.

"उमरावती आणि खामगाव ह्या निजाम राज्यातील कापसाच्या दोन प्रमुख बाजारपेठा आहेत. परंतु उमरावती हे कापूस व्यापाराचे सर्वात मोठे केंद्र असल्यामुळे, उमरावतीचे नाव संपूर्ण कापूस भागाकरिता वापरले जाते. मध्यप्रांत–वऱ्हाड समुद्र किनाऱ्यापासून दूर असून देखील मिर्झापूरला स्वस्त दरात कापूस पुरवितात, हे आर्थिक क्षेत्रातील एक आश्चर्य मानावे लागेल.

मि. मसेर यांनी १८४३ इ. मध्ये उमरावतीचा कापूस मिर्झापूर येथे तपासला. जो नमुना दाखविण्यात आला होता त्यात कोणत्याही तऱ्हेची भेसळ तव्हती. चांगला रंग, मृदू व लांब धाग्याचा होता. आपल्या निवेदनात ते म्हणतात की, त्यांनी हजारो गाड्या उमरावतीहून मिर्झापूरला कापूस नेताना पाहिल्या आहेत.

एलिचपूर ते उमरावती यामध्ये कापसाशिवाय दुसरे कोणतेही पीक होत नाही. लहान बाजारात देखिल कापसाचे ढिगारे कसल्याही प्रकारच्या संरक्षणाशिवाय ठेवलेले असतात.

कॅप्टन डोरिन जो वऱ्हाडचा रोड सुपरिन्टेन्डेंट आहे, त्याने इ. स. १८४८ मध्ये आपल्या निवेदनात असे म्हटले आहे की, वऱ्हाडचा कापूस, मुंबई जवळ असताना देखील मिर्झापूरला का नेतात ? याचे प्रमुख कारण असे की, निजामच्या राज्यात प्रत्येक नगरात कर द्यावा लागतो. परंतु मिर्झापूरला नेताना त्याचा बचाव होतो, कारण उमरावतीहून तीस मैलाचा प्रदेश सोडला की, नागपूर राज्याची सरहद्द लागते.

कापूस काढताना व स्वच्छ करताना, फार कष्ट घ्यावे लागतात. जो पैसा आगाऊ दिला जातो त्याचा फार दुरुपयोग होतो व शेतकऱ्याला वाटेल त्या मोबदल्यात संपूर्ण पीक द्यावे लागते. त्यामुळे शेतकरी, पैसा अपुरा पडत असल्याने कापूस वेचताना स्वच्छतेकडे लक्ष पुरवू शकत नाही.

---

१ : गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. १२६

सावकार हा चांगला व वाईट कापूस एकत्र करतात व मग तो विकतात. त्यामुळे कापूस चांगला असून देखील तो सुरतच्या कापसाची बरोबरी करू शकत नाही[१]."

हळू हळू या धंद्याला बाजाराची गरज भासू लागली, पण शेतकऱ्याचे हाती ही गोष्ट नव्हती. कारण कर्ज घेतल्याशिवाय ते शेती करूच शकत नव्हते. आणि कर्ज घेतले तर सावकारांला कापूस द्यावा लागे. म्हणून बरीच वर्षे हा धंदा खाजगी सावकारांच्या हाती राहिला असावा.

इंग्रजांना कच्चा माल पाहिजे होता. त्यामुळे ते खाजगी सावकारांशी व्यवहार ठेवीत. इ. स. १८२६ पासून मेसर्स विकाची पेस्तनजी फर्मने खामगाव केंद्र करून तेथून हा कापूस मुंबईला पाठविणे चालू केले, ते वर दिले आहेच.

इ. स. १८५३ मध्ये वऱ्हाड इंग्रजांच्या वहिवाटीसाठी त्यांचे ताब्यात आला आणि दुसरीकडे याच वर्षी मुंबई ते ठाणे रेल्वे सुरू झाली+ व फार तांतडीने ही रेल्वे नंतर १८५९ मध्ये कापूस पिकविणाऱ्या वऱ्हाड प्रातांत आणण्यात आली. कापसाची पेठ म्हणून त्याकाळी प्रसिद्ध असलेल्या उमरावती येथे रेल्वेचा फाटा नेण्यात आला.

---

१ : हैद्राबाद अफेअर्स : खंड दुसरा : १८८० : पा. ८८३

+भारतात इ. स. १८५३ साली प्रथमच मुंबई ते ठाणे अशी रेल्वे सुरू करण्यात आली. त्याबेळी जागतिक कीर्तीचे श्री कार्लमार्क्स यांनी लिहिले होते. "मला ठाऊक आहे की, हिंदुस्थानात रेल्वे सुरू करण्यात इंग्लिश गिरणी–मालक कंपूचा उद्देश स्वतःच्या गिरण्यासाठी कमी खर्चाने कापूस व इतर कच्चा माल मिळविणे हाच आहे. पण लोखंड व कोळसा असलेल्या देशाच्या वाहतुकीत यंत्राचा उपयोग एकदा सुरू झाला म्हणजे त्या देशात यंत्रे तयार करण्याच्या धंद्याला मनाई करणे शक्य होणार नाही. एकाद्या अफाट देशात रेल्वेचे जाळे पसरविले तर रेल्वे वाहतुकीच्या निकडीच्या व चालू गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेले उद्योगधंदे

(पुढील पानावर)

हे केवळ मालाची खराबी न होता सुलभपणे मुंबईला कापूस नेण्यासाठीच करण्यात आले होते. त्यावेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर-जनरल लॉर्ड डलहौसी याच्या रेल्वे संबंधीच्या खलित्यात तो म्हणतो ".....हिंदुस्थानात सध्या काही प्रमाणात कापसाची पैदास होत आहे, व परदेशात पाठविण्यासाठी दूरवरच्या आंतल्या भागातून बंदरापर्यंत कापूस पोचविण्यास वाहातुकीची योग्य साधने जर पुरविली तर चांगल्या जातीचा भरपूर कापूस हिंदुस्थानात होऊ शकेल. इंग्लंडमध्ये या कापसाला अतोनात मागणी आहे. व्यापाराच्या सोयीत जेवढी वाढ करण्यात येते तेवढी हिंदुस्थानातील अगदी दूरवरच्या बाजार पेठात युरपच्या मालाला जास्त मागणी येते.....[१]"

यावरून हे दिसून येते की, केवळ कापूस नेण्यासाठीच इंग्रजांनी वऱ्हाडात रेल्वेचा फाटा आणला होता. युरोपियन माल येथील बाजार पेठात पोहोचावा हाही हेतू त्यामागे होता.

'उमरावतीचा कॉटन यार्ड' : याप्रमाणे कापसाचा धंदा वाढू लागला. रेल्वे सुरू झाल्याने लहान गावापर्यंत व्यापाऱ्यांची माणसे हंगामापूर्वी जाऊन कापसाचा सौदा करीत. कापूस निघाल्यानंतर ते तेथून उमरावती केंद्रावर कापूस आणत. तेथे बोझे बांधले जात असत. येथे मुंबईच्या इतर कंपन्यांचे एजंटही हंगामात बोजे खरेदीला येत असत. असा हा धंदा वाढू लागल्याने व कापूस धंद्याला प्रोत्साहन देण्याचे इंग्रजांचे धोरण असल्यामुळे, उमरावतीला 'कॉटन यार्ड' सुरू करण्याचा उपक्रम तत्कालिन येथील डेप्युटी कमिश्नरनी सुरू केला होता असे दिसते. उमरावतीचा कॉटन यार्ड इ. सन १८६७ मध्ये अस्तित्वात आला. 'डेप्युटी कमिश्नरनी ही जागा इ. सन १८६७ मध्ये

अस्तित्वात आल्यानंतर त्याचा अपरिहार्य परिणाम रेल्वेशी प्रत्यक्ष-संबंध नसलेल्या धंद्यात सुद्धा यंत्राचा उपयोग करण्यात येणे हाच होईल. म्हणून हिंदुस्थानात सुरू झालेली रेल्वे खरोखरी आधुनिक उद्योग धंद्याची अग्रदूतच ठरेल". (मार्क्स : 'हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीचे भावी परिणाम' : न्यूयार्क डेली ट्रिब्युन, दि. ८ ऑगष्ट १८५३) कार्ल मार्क्सचे हे भविष्य पुढे अक्षरशः खरे ठरले.

१ : लार्ड डलहौसी (गव्हर्नर जनरल १८४८-५६) रेल्वे संबंधी खलिता. १८५३

कॉटन यार्डकरिता निवडली[१] व त्याच वर्षी कॉटन यार्ड तयार करण्यात आला.

इ. सन १८७० च्या गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् मध्ये उमरावतीच्या सरकारी व सार्वजनिक इमारतींची जी यादी दिली आहे, त्यांत 'कॉटन यार्ड' चा उल्लेख आहे. तसेच धंद्यानुसार उमरावतीची जी लोकसंख्या दर्शविलेली आहे त्यांत 'कापूस व्यापाऱ्यांची संख्या ९३' दर्शविलेली आहे. यावरून सन १८६७ मध्ये उमरावतीचा कॉटन यार्ड सुरू झाला हे सिद्ध होते. त्यातच पुढे "त्यावेळी उमरावतीच्या कापूस बाजारात मुंबईचे भाटीये आणि युरोपियन व्यापारी कापसाचा व्यापार करीत असत[२]" असे नमूद केले आहे. यावरून इ. सन १८६७ चे सुमारास तत्कालिन पद्धतीनुसार सावकाराकडून केली जाणारी कापसाची खरेदी बंद होऊन, कापूस बाजारातच शेतकऱ्यांचे कापसाची खुले आम खरेदी-विक्री सुरू झाली होती असे दिसते.

"इ. सन १८६८-६९ व १८६९-७० या वर्षात उमरावतीच्या कापूस बाजारात खालील प्रमाणे उलाढाल झाली-

	१८६८-६९	१८६९-७०
बोजा	६२,०००	४६,१०७
चालू स्थितीत असलेले पूर्ण प्रेस करणारे	६	६
अर्ध प्रेस करणारे	३५	२२
पूर्ण प्रेस केलेल्या बेलस्	१९,९८४	३०,६८९
अर्ध प्रेस केलेल्या बेलस्	३५,४०८	४९,३९२[३]"

यावरून इ. सन १८६७ ते १८७० या दरम्यान उमरावतीचा कापूस व्यवसाय वाढत होता. याच काळात येथे कापूस दाबण्याचे प्रेस सुरू झाले. गाठी बांधल्या जाऊ लागल्या हे दिसून येते.

"याच काळात १८७० मध्ये उमरावती ला पहिली 'बँक ऑफ बॉम्बेची' शाखा सुरू झाली. हीच उमरावतीची पहिली बँक. रॅली ब्रदर्स

---

१ · मौजे तारखेडा सर्व्हे नं. २८ (इ. स. १८६९ चे सर्वे प्रमाणे) जुना सर्व्हे नं. ८२ क्षेत्रफळ ९ एकर १० गुंठे ही जागा कॉटन यार्ड साठी निवडली. ती सरकारी पडित जमीन होती.

२ व ३ : गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् १८७० : पा. २३२ व २२८

या फर्मने देखील या काळात उमरावतीला कपाशीचा व सावकारीचा (बँकिंगचा) धंदा सुरू केला.

इ. सन १८७० मध्ये वॉलकार्ट ब्रदर्स या इंग्लिश फर्मने उमरावतीला जिनिंग प्रेस सुरू केला[1]. कापूस धंद्याला वरील गोष्टी पोषक ठरल्या.

कपाशीचे भाव वाढले : पेरा वाढला : इ. सन १८६२ मध्ये अमेरिकन युद्धामुळे इंग्लंडला अमेरिकन कापूस मिळणे बंद झाले[2]. त्यामुळे मॅन्चेस्टर व लँकेशॉयरच्या कापड गिरण्या बंद पडण्याची वेळ आली. तेव्हा हिंदुस्थानच्या कापसाला मागणी वाढली, त्यामुळे कपाशीचे भावही वाढले. '२३ रुपये खंडीचा कापूस एकदम १७५ रु. खंडी झाला[3].' मुंबईला 'कापसाचा भाव ८०–९० रुपये खंडीवरून एकदम ४००–५०० रुपये खंडीवर गेला. या कापसाचे व्यापारात मुंबईचे कित्येक व्यापारी लक्षाधीश बनले[4].'

या भाववाढीचा परिणाम कापसाचे पेऱ्यावर झाला. 'विजेच्या गतीने कापसाच्या धंद्याला वेग मिळाला व कापसाचा पेरा अतोनात वाढला.....[5]' आणि मग हंगामात उमरावतीच्या कापूस बाजारात कापसाची आवकही अतोनात वाढली.

---

१ : अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ : पा. २३७

२ : अमेरिकन यादवीयुद्ध (दक्षिण विरुद्ध उत्तर अमेरिका) इ. स. १८६१ साली सुरू होऊन १८६५ साली संपले. त्यावेळी अमेरिकेतील कापसाचा इंग्लंडचे गिरण्यांना कापूस पुरवठा होईनासा झाला. त्यांतच निग्रो गुलामांची अमेरिकेत मुक्तता झाल्याने सक्तीची शेतमजूरी बंद झाली. त्याचा अमेरिकेचे कापूस उत्पादनावर परिणाम झाला. या सर्व कारणांमुळे इंग्लंडला कापसासाठी भारतावर अवलंबून राहणे अपरिहार्य झाले होते. तेव्हा हिंदुस्थानातील वऱ्हाड, गुजरात व खानदेश येथील कापसास जोराची मागणी आली. त्यावेळी नेहमी दहा कोटीचा कापूस परदेशात जात असे, तो इ. स. १८६४ मध्ये ३५ कोटी रुपयांचा जाऊ लागला होता.

३ : गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. २२८

४ : मुंबईचे वर्णन : माडगांवकर : १८६३ : पा. १२१

५ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पा. २४४

उमरावतींत लाईट 'ट्राम वे' बांधण्याची योजना : कॉटन मार्केट ते रेल्वे स्टेशन पर्यंत कापूस वाहून नेण्यासाठी 'लाईट ट्राम-वे' बांधण्याची योजना इ. स. १८७६ साली मि. हक्सर कॉंट्रॅक्टर याने आखली होती व त्यासाठी त्याने म्यु. कमेटीला परवानगी मागितली होती आणि म्यु. ने त्याला ट्रॉम-वे बांधण्याची परवानगी दिली होती[१]. पण असे दिसते की, नंतर तो 'ट्रॉम-वे' बांधला गेला नाही.

उमरावती कॉटन मार्केट कमेटीची जागा, सुरवात व नगरपालिकेशी संबंध दर्शविणारा अहवाल : उमरावतीचे कॉटन मार्केट हे सर्वे नं. २८ (जुना सर्वे नं. ८२) मौजे तारखेडा या जागेवर आहे. इ. सन १८९६ मध्ये नगरपालिकेने पाटलाला कॉटन मार्केट संबंधी संपूर्ण माहिती मागितली. पाटलाने दिलेले उत्तर खालील प्रमाणे होते :–

"कॉटन मार्केट सर्व्हे नं. २८ वर असून, जमीन ९ एकर १० गुंठे आहे. जमीन शेतीला उपयोगी नव्हती म्हणून रेव्हेन्यू आकारलेला नाही. खातेदाराचे नाव बाळकृष्ण जयराम असे होते व त्याच्या नावावर जमीन १८ बिघे होती. त्यांतील १० बिघे मि. बेल यांनी कॉटन मार्केट करता घेतली आणि ८ बिघे मालकाकडे राहिली. इ. स. १८६८ च्या पेरेपत्रकात ही माहिती होती."

या निवेदनाला फारसा पुरावा उपलब्ध नाही. जुना पुरावा फेर सर्व्हेच्या वेळी नष्ट करण्यात आला. ज्यावेळी नवीन सर्व्हे करण्यात आला. त्यावेळी ही जागा 'अनुपयुक्त (Waste)' जमीन म्हणून दर्शविलेली असून मालकी हक्क सरकारचा नमूद आहे. हे निवेदन अधिक विश्वसनीय असून, पाटलाच्या निवेदनाला पुरावा नसल्यामुळे ते फारसे महत्त्वाचे नाही. इ. स. १८६७ मध्ये ही जागा डेप्युटी कमिश्नर साहेबांनी कॉटन यार्ड साठी स्वतः निवडली. आणि ते वर्ष संपण्याचे सुमारास तेथे कॉटन यार्ड अस्तित्वात आला. ही जागा रेसिडेन्ट यांचा हुकुम क्रमांक २१७ प्रमाणे नगरपालिकेला देण्यात आली होती.

---

१ : उमरावती म्यु. कमेटीचे सभेचा ठराव नं. २ दि. २५-९-१८७६ व ठराव नं. ३ दि. १-११-१८७६

इ. स. १८६७ रोजी पत्र क्रमांक १५७ प्रमाणे उमरावती जिल्ह्याच्या डेप्युटी कमिश्नरनी, कमिश्नरला लिहिलेल्या पत्रात कॉटन यार्ड बनविण्याचे सुचविले होते. या पूर्वी कापूस, शहराला लागून भोवताल ठेवल्या जात असे. आणि (ज्या जमीनीवर कापूस ठेवला जाई) त्या जमिनीचे मालक स्क्वेअर यार्ड जागेला एक आणा याप्रमाणे कर वसूल करीत. हे योग्य नव्हते म्हणून डे. कमिश्नरांनी शहराच्या बाजूने कॉटन यार्ड बांधण्याची व्यवस्था केली. प्रत्येक यार्ड प्लॉटला १० रु. दर होता आणि एक आणा प्रत्येक बोजावर कर वसूल केला जात असे. लेआउटची किंमत १९६०४ होती. रेसिडेन्टनी पत्र क्र. ३९८ दि. १७ आक्टोबर १८६७ नुसार लेआऊट मंजूर करून परवानगी दिली. इ. स. १८७५ मध्ये मार्केट बांधून पूर्ण झाल्याचे डे. कमिश्नरनी कॉटन कमिश्नर ऑफ इंडिया यास लिहिलेल्या पत्रावरून दिसून येते. तसेच व्यवस्था पाहण्याकरिता कॉटन यार्ड कमेटी स्थापन केली होती. खर्चाकरिता दलालांकडून लायसेन्स फी घेतल्या जात होती. दि. १३ जून १८७१ रोजी नगरपालिकेने सेस लावला व तो १ आणा दरबोजा असा होता आणि त्यास रेसिडेन्टची मान्यता होती. दि. ५ जून १८७४ रोजी गव्हर्नर जनरलची या कॉटन यार्ड कमेटीला व सेसला अधिकृत मान्यता मिळाली.

कागदपत्राचे आधारे हे स्पष्ट होते की, अगदी सुरवातीपासून तो कापसाचा कायदा पास होईपर्यंत कॉटन यार्ड कमेटीवर नगरपालिकेचा अधिकार होता व इ. स. १८७४ च्या कायद्याचे आठव्या कलमानुसार 'एक अध्यक्ष व चार सभासद नगरपालिकेद्वारा निवडून दिलेले असावेत' असे नमूद केलेले आहे. कॉटन मार्केट हे नगरपालिकेच्या खर्चाने बांधलेले नाही तर, ते मुख्यत्वेकरून, प्लॉट विकून आलेला पैसा व कॉटन कमिश्नरनी दिलेला पैसा याद्वारे बनविलेले आहे.

नगरपालिकेने इ. स. १८८५ साली रु. ५६०० हॉल बांधण्याकरता, सन १८९१ मध्ये रु. २३८५ ऑफिस बांधण्याकरता, व सन १८९७ मध्ये रु. २१२८ गोदाम बांधण्याकरता दिलेत. ज्यावेळी कॉटन मार्केट कमेटीला पैसा अपुरा पडत असे, त्यावेळी नगरपालिका तो देत असे. कॉटन मार्केट कमेटी नगरपालिकेपासून विभक्त करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केल्यामुळे, एक मुद्दा उपस्थित होतो की कॉटन मार्केटची

जागा कोणाच्या मालकीची आहे ? जर नगरपालिकेची असेल तर कॉटन कमेटी नगरपालिकेला भाडे देत असावयास पाहिजे. जुन १८९४ च्या पत्र क्र. ६०२ च्या आधारे कमिश्नरला असे दिसून आलेले दिसते की, धान्य व कापूस बाजाराची जागा नगरपालिकेच्या मालकीची नाही. त्यामुळे नगरपालिकेशी कॉटन मार्केट कमेटीने संबंध तोडावयास हरकत नाही. मागे ही जागा सरकारच्या मालकीची आहे असे स्पष्ट नमूद केले आहे. तेव्हा सरकारी मालकीचा प्रश्न वादातीत आहे.

यावरून निष्कर्ष असा की, जागा जरी सरकारी मालकीची असली तरी ती नगरपालिकेच्या हद्दीत आहे. इ. सन १८९८ मध्ये वेगळा कायदा होई-पर्यंत, नगरपालिका कॉटन यार्ड कमेटीवर आपले नियंत्रण ठेवीत असे. १८९८ च्या कायद्यानुसार कॉटन मार्केट कमेटी पाच सभासदांची राहील, त्यापैकी दोन नगरपालिकेने निवडलेले असतील व उरलेले तीन, सभासदामधून बहुमतांच्या आधारे निवडलेले राहतील.

याप्रमाणे दोन्ही कमेटीमध्ये सलोख्याचे संबंध असून, कॉटन मार्केट कमेटी सालीना उरलेला पैसा जो अंदाजे रु. ३४३२ होतो. तो गेल्या पाच वर्षापासून नगरपालिकेत जमा करीत आहे[1]"

मूळ इंग्रजी अहवालातून मुद्यांच्या बाबींचा उल्लेख वर दिलेला आहे. त्यावरून हे सिद्ध होते की,

---

१ : याच प्रकरणाचे परिशिष्ट क्र. ५ पहा.

टीप : अमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीच्या १८७० पासूनच्या प्रोसिडिंग बुकातील वेळोवेळी झालेल्या ठरावावरून असे स्पष्ट दिसून येते की, उमरावतीचे कॉटन मार्केट हे १८६९ पासूनच उमरावती म्यु. कमेटीच्या मालकीचे होते. कारण या कॉटन यार्डवर नगरपालिकेने इमारती, गोदामे, कंपौंड वॉल बांधण्या-साठी खर्च केला आहे. तेथील मालावर पट्टी (सेस) बसविली आहे व विशेष कर्मचारी वर्ग नेमला आहे. 'कॉटन मार्केट कमेटी' ही म्यु. सभासदांचीच निवडली जात असे. तसा ठराव म्यु. प्रोसिडिंग मध्ये आहे. नंतर व्यापाऱ्यांचे दोन प्रतिनिधी या कमेटीवर घेण्यात येऊ लागले होते.

म्यु. प्रोसिडिंग बुकावर सन १८६९ ते १८८१ पावेतो कॉटन यार्ड संबंधी सुमारे ३५ ठराव वेळोवेळी केलेले आढळून येतात.

१) उमरावतीला कॉटन यार्ड होण्यापूर्वी येथील व्यापारी आपला माल (कापूस) शहराच्या सभोवारच्या जागातून, जागा भाड्याने घेऊन ठेवीत असत.

२) ही गोष्ट धोक्याची अतएव अयोग्य असल्याने तत्कालिन उमरावतीचे डेप्युटी कमिश्नरनी इ. सन १८६७ मध्ये, मौजे तारखेडा येथील सर्वे नं. २८ क्षेत्रफळ ९ एकर १० गुंठे, ही सरकारी पडीत जमीन कॉटन यार्डसाठी निवडली व त्याच वर्षी कॉटन यार्ड अस्तित्वात आले. उमरावतीस १८६९ मध्ये नगरपालिका स्थापन होऊन, नगरपालिकेची सीमा दर्शविणारे जे नोटिफिकेशन डिसेंबर १८६९ मध्ये रेसिडेन्टकडून प्रसिद्ध करण्यात आले होते त्या म्यु. सीमेचे आतच ही जागा होती. इ. सन १८७० मध्ये ही जागा रेसिडेन्टने नगरपालिकेस त्यावर वार्षिक सेस आकारून दिली होती आणि 'कॉटन यार्ड कमेटी' नगरपालिकेचे प्रतिनिधी व व्यापाऱ्याचे प्रतिनिधी यांची मिळून असे. प्रथम इ. सन १८७१ च्या कॉटन व धान्य बाजार कायद्यानुसार व नंतर १८९७ चे बेरार कॉटन व ग्रेन मार्केट लॉ अनुसार या कॉटन मार्केटचा कारभार चालत असे. (नंतर १९३२ मध्ये मध्यप्रांत वऱ्हाड कॉटन मार्केट ॲक्ट व, १९४२ चे तद्विषयक रुल्स प्रमाणे कारभार सुरू होता, आणि आता हा कारभार कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यानुसार चालतो.)

कॉटन मार्केट हटविण्याची योजना : उमरावतीचे कॉटन मार्केट हल्लीच्या जागेवरून, जुन्या कलकत्तावाला जीनचे उत्तरेला, सरकारी जागेवर नेण्याची योजना उमरावती नगरपालिकेने इ. सन १९२१ मध्ये आंखली होती[१]. व त्यानुसार हल्लीच्या कॉटन मार्केटची एकूण ९ एकर १० गुंठे जमीन नगरपालिकेचे कार्यालय, इतर इमारती आणि इंग्रजी शाळेची इमारत (ए. व्ही. स्कुलची इमारत) यासाठी घ्यावी, कॉटन मार्केट कलकत्ता जीनचे मागील जागेत न्यावे, तेथे कंपौंड वॉल, बिल्डिंग इत्यादीचा खर्च नगरपालिकेने करावा, शिवाय म्यु. कार्यालयाची जागा सरकारला द्यावी अशा तऱ्हेची ही योजना होती. पण त्यास तत्कालिन डेप्युटी कमिश्नरनी व व्यापारी वर्गाने विरोध केला. तरीही नगरपालिकेने हे प्रकरण सरकारपर्यंत रेटले. कांही अटीवर ते मंजूरही झाले; परंतु पुढे ही योजना अंमलात आली नाही.

... ...

१ : अमरावती नगरपालिकेचा ठराव नं. ५ दि. २३-११-१९२१

उमरावतीच्या कॉटन मार्केटमध्ये इ. सन १८६८–६९ व १८६९–७० या वर्षात कापसाच्या किती बेल बांधल्या याची माहिती वर दिलेली आहेच. इ. सन १८७०– ते १८८५–८६ पर्यंतचे आंकडे मिळू शकले नाहीत. इ. सन १८८६–८७ पासून, दर हंगामात या मार्केटमध्ये किती कापूस गाडचा आल्या त्याची व कॉटन बोजे-बेल्सची माहिती याच प्रकरणातील परिशिष्ट क्र. ८ मध्ये दिलेली आहे.

कापसाचे भाव : इ. सन १८७८ रु. २३० खंडी
इ. सन १८८८ रु. २०३ खंडी
इ. सन १८९८ रु. १९० खंडी असे होते[१].

कापसाचे भाव : "दर खंडी (७८४ पौंड)
इ. स. १८७२ ते ७६ रु. १७५
इ. स. १८७७ ते ८६ रु. १६५
इ. स. १८८७ ते ९६ रु. १४६[२]"

याप्रमाणे अठरावे शतक संपण्यापूर्वीच उमरावती हे शहर आशिया खंडातील कापसाची सर्वात मोठी बाजार पेठ म्हणून गणल्या जाऊ लागले असे दिसून येते.

इ. स. १८९८–९९ मध्ये उमरावतीत २,०७३५१ बोजे बांधल्या गेले. हा या धंद्यातील विक्रम होता.

मॅन्चेस्टरमध्ये ख्यातीप्राप्त 'उमरावती कॉटन' : उमरावती मार्केट-मध्ये, परदेशात पाठविण्यासाठी खरेदी केला जाणारा कापूस हा परदेशातील 'मॅन्चेस्टर' या गिरण्यांचे शहरात 'उमरावती कॉटन' या नावाने ओळखला जात होता, अशी माहिती ११५ वर्षापूर्वी एका प्रख्यात इंग्रज लेखकाने त्याच्या 'दि निजाम' या ग्रंथात दिली आहे. ती अशी "वऱ्हाडचे जिल्हे कापसाकरिता प्रसिद्ध आहेत, आणि ज्यावेळी ब्रिटिश राज्यातील इतर भागात प्रयोगादाखल देखील न्यू आरलियन्सचे बी पेरणे कठीण होते, अशा वेळी त्याचा यशस्वी प्रयोग निजामच्या राज्यात सर सालारजंग यांनी करून दाखविला उमरावतीचा

---

१ व २ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११, व १९६८ : पा. २७४, ४८२

कापूस याच नावाने 'मॅंचेस्टर' या गिरण्यांचे शहरातील लोकांना माहीत आहे. 'घोलेरा' सारखा जरी तो नसला तरी, एक दिवस तो त्याच्या बरोबरीने येईल, इतकेच नव्हे तर, त्याला देखील मागे टाकील, यात मला शंका वाटत नाही[१]."

" वऱ्हाडात दोन प्रकारच्या कापसाच्या जाती प्रसिद्ध होत्या. १) बन्नी २) जरी. 'बन्नी' हलक्या जमिनीत पेरल्या जात असे व तो वऱ्हाडातील उत्कृष्ट कापूस समजल्या जाई. एका एकरात ३२० पौंड हे या कापसाचे उत्पन्न होते. परंतु साफ केल्यानंतर फक्त ऐशी पौंड कापूस राहत होता. बन्नी हिंगणघाट विभागात मुख्यत्वेकरून पिकविला जाई.

'जरी' पूर्णा नदीच्या खोऱ्यात पिकविला जात होता. त्याला खोल काळी जमीन लागत असे. एकरी उत्पादन जवळ जवळ बन्नी सारखे होते. 'जरी' हा कापूस लांब धाग्याचा, जाडा व मजबूत असे. व्यापारी हा कापूस जास्त पसंत करीत असत.

कापूस साफ करताना, कापसाच्या दोन्ही जाती एकत्र करून नंतर प्रेस केल्या जात असत आणि परदेशी विकण्यासाठी पाठविल्या जात. या कापसाला एकच 'उमरावती कॉटन' हेच नाव होते[२]."

"वऱ्हाडात उत्तम प्रतीचा कापूस पैदा होत असे. पूर्वी हिंगणघाट या वर्धा नदीचे पूर्व तीरावरील भागात 'बनी' नावाचा कापूस पैदा होई व या कापसाच्या सुताचे कापड मुद्दाम 'हिंगणघाटी रूईना बनावेला माल' असे छापून नागपूरची एम्प्रेस मिल बाजारात पाठवी. पण पुढे जेझीया कापसाचा कृत्रिम प्रचार करून 'बनी' कापसाची गळचेपी करण्यात आली[३]."

उमरावतीच्या कापूस व्यवसायाचा इतिहास व कॉटन मार्केटची निर्मिती आणि उमरावती शहर हे आशिया खंडातील कापसाची मुख्य पेठ कसे बनले याचा संक्षिप्त इतिहास वर दिलेला आहे. शेवटी, वऱ्हाडात

---

१ : दि निजाम : ब्रिग्ज : १८६१ : भाग २ : पा. २५४

२ : गॅझेटियर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७० पान ७२–७३

३ : कॉंग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास : १९३५ : पा. ४८

कापसाचा पेरा केव्हा सुरू झाला याची हकीकत देऊन हे प्रकरण पूर्ण करू.

प्राचीन काळीही वऱ्हाड 'कापूस भूमी' होता : वऱ्हाडात फार प्राचीन काळापासूनच कापसाची पैदास होत आहे. किंबहुना कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड करणे व या कापसाचे सूत काढून त्याचे कापड विणणे याचा जो मूळ संशोधक तो वऱ्हाडचाच होता असे एका प्राचीन ऋषी संबंधीच्या माहितीतून दिसून येते. हा महान संशोधक म्हणजे ऋषी 'गृत्समद' होय.

"ऋग्वेदातील द्वितीय मंडळातील काही भाग या गृत्समदाचेच नावावर आहे, त्यात ४३ सूक्ते असून मंत्रसंख्या चारशेच्या वर आहे... हे ऋषी गृत्समद मोठे ज्ञानी, भक्त, कवी, गणिती, विज्ञानवेत्ते, विणकर आणि कृषी–संशोधक होते. 'आम्ही प्रत्येक व्यवहारात विजयी झालोच पाहिजे.' हा त्यांचा स्फूर्तिमंत्र होता. ते महान प्रयत्नवादी होते. प्रथमतः ह्या विदर्भात कापसाची लागवड करण्याचा यशस्वी प्रयोग ऋषी गृत्समदानीच केला. लोकर कातण्याचा शोधही त्यांचाच. 'मा ऽहं अन्य कृतेन भोजय' दुसऱ्याच्या श्रमावर मी जगता कामा नये, अशी त्यांची शिकवण होती. त्यांचे जवळ उत्तम शेती आणि कापसाचे सूत तयार करून त्याचे वस्त्र तयार करण्याचे माग होते. बाया–माणसे कामावर ठेवून कापड तयार करण्याचा उद्योग लोकांना प्रथम त्यांनीच शिकविला. सर्व जगात सुती वस्त्र तयार करून लोकावर अनंत उपकार करणारा महापुरुष म्हणजे ऋषी गृत्समद[१]. त्यांच्या आधी बेरीज व वजाबाकी हे दोनच प्रकार

---

१ : गृत्समद : ऋग्वेदाच्या द्वितिय मंडलाचा द्रष्टा (seer) सूक्तकार, असून, त्यातील (सुक्त ४ सोडून) ४२ सूक्ते गृत्समदांची आहेत. दशमान पद्धती ही गृत्समदाने पुरस्कारिली असे सूक्त १८ वरून दिसून येते. सूक्त ३२ मध्ये, शिवणकलेचा उल्लेख आहे.

हा अंगिरस कुलातील शुनहोत्राचा मुलगा होता, असे सर्वानुक्रमणी वरून दिसते. भृगुकुलातील गोत्रकार, प्रवर व मंत्रकार शौनक हे ही त्याचे नाव होते. (ऋग्वेद.) कारण हा शौनकाचा दत्तकपुत्र असून, शूनहोत्राचा औरसपुत्र होय.

हा दंडकारण्यात राहणारा एक ऋषी असून, त्याला १०० पुत्र होते. (अ. रा. ८) (पुढील पानावर)

गणितात होते, पण भागाकार–गुणाकार याचा शोध त्यांनी लावला. चंद्र किरणांचा स्त्रीच्या गर्भावर आणि त्याच्या वाढीवर विशिष्ठ स्वरुपाचा परिणाम होतो, हा शोधही त्यांचाच[१]."

यावरून वऱ्हाडात कापसाची पैदास आणि त्याचा उपभोग फार प्राचीन काळापासून केला जातो असे दिसून येते.

आणि १९ व्या शतकाचे सुरुवातीला : त्यानंतरच्या काळातही भारतात सुती व रेशमी वस्त्रे वापरली जात होती. याचा अर्थ येथे कापसाची पैदास होत होती पण ती जरुरी पुरती होई. वऱ्हाडात कापूस पिकविण्याची अशी अखंड परंपरा होती.

इ. स. १८१३–१४ पासून भारतातून कापसाची परदेशात निर्यात होऊ लागली. तो पावेतो भारत हा सुती व रेशमी कापड निर्यात करणारा देश होता. त्यानंतर भारत हा कापड आयात करणारा देश बनला. ब्रिटिशांनी भारतातील सुती व रेशमी कापड उद्योग नामशेष करून टाकला, आणि मग पुढे फक्त कच्च्या मालाची निर्यात भारत करू लागला[२].

अशा तऱ्हेने परदेशाला कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्या बाजार पेठा भारतात निर्माण होऊ लागल्या.

"गृत्समद हा कदंबक्षेत्री होता की, भद्रावतीला होता याबद्दल मतभेद आहेत. कदम्ब क्षेत्राचे ताम्रपत्र (५ वे शतक) कदंब गीरीचे = दुगृ (हल्लीचे द्रुग) याचे वर्णन देते. त्याप्रमाणे, गृत्समदाचा आश्रम हा द्रुगचे आसपास असावा."

---

१ : श्री क्षेत्र कदंब (कळंब) माहात्म्य : पुंड शास्त्री : पा. १०

२ : इ. स. १८१४ साली भारतातून विलायतेला १२,५०,००० कापडाचे तागे निर्यात करण्यात आले होते तर हेच प्रमाण १८३५ साली ३०,०६,००० तागे व १८४४ मध्ये केवळ ९३००० तागे एवढे घटले. उलट १८१४ साली ब्रिटन मधून भारताला फक्त १० लक्ष वाराहून कमी कापड आले तर १८३५ साली ५ कोटी १० लक्ष वार. (आजचा हिंदुस्थान : रजनी पामदत्त : १९४६ : पा. १९७)

उमरावती शहराचा आर्थिक कणा : एकाधिकार कापूस खरेदी योजना अमलात येण्यापूर्वी पर्यंत... उमरावतीचा कापूस बाजार हा आशिया खंडातील सर्वात मोठा कापूस बाजार होता[१]. दर हंगामात उमरावतीच्या कापूस बाजारात वऱ्हाडच्या निरनिराळ्या भागातून लक्षावधी कापूसगाडचा येत असत आणि कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असे. सकाळी कापूस तोलून खरेदीदाराला दिला की, सायंकाळी शेतकऱ्याचे हाती त्याच्या कापसाची रकम पडत असे, असा येथील रिवाज होता. मुंबईच्या स्थानिक मिलचे अडते कापसाची खरेदी करीत व येथेच जीनिंग-प्रेसिंग होऊन कापसाच्या गाठी मुंबई, अहमदाबाद, कोचीन इत्यादी ठिकाणी रवाना होत. या कापूस धंद्यावर लहान-थोर अशा हजारो लोकांची वर्ष भराची कमाई होत असे. आणि या धंद्याचे आधाराने उमरावतीचे इतर धंदेही तेजीत राहत असत. उमरावतीचा कापूस व्यवसाय हा येथील आर्थिक व्यवस्थेचा मुख्य कणा होता असे म्हणायला हरकत नाही.

---

१ : अमरावती जिल्हा गॅझेटीयर १९६८ पा. ३९१

परिशिष्ट क्र. १

(पान ८९ पहा)

[एल्फिन्स्टनचा पत्र व्यवहार (१८०४–१८०८) : सिन्हा : १९६१]

मार्फत– एम् एल्फिन्स्टन,
रेसिडेन्ट, नागपूर,

प्रति– मार्कीस ऑफ वेलेस्ली,
गव्हर्नर जनरल

"…काल मला जसवंतराव येऊन भेटले. आणि पेंढारी नागपूर राजाच्या प्रदेशात आले असल्याचे सांगितले. त्यांची संख्या अंदाजे दहा हजारापेक्षा जास्त असावी. चित्तू, हिरु, बुन्हान आणि करिम हे त्यांचे पुढारी आहेत. तो म्हणाला की, पेंढारी हल्ली होशंगाबादला आले आहेत व तेथे त्यांचा पडाव आहे.

शहापूर नगर लुटण्यात आले व नंतर पेंढारी पळून गेले. त्यांच्या हालचालीबद्दल अनेक प्रवाद आहेत.

तेथून ते सातपुडा ओलांडून उमरावतीला जाणार आहेत. वर्धा नदी पार करून ते पुढे जाणार आहेत असे कळते."

(पा. २०४)

मार्फत– एम्. एल्फिन्स्टन, रेसिडेन्ट, नागपूर,
दि. १७ नोव्हेंबर १८०५

प्रति– सर जी. एच्. बार्लो,
गव्हर्नर जनरल,

आपल्या सेवेसी मी पहिले पत्र पाठविले व त्या पत्रात पेंढारी मेहेंडी येथे आले आहेत असे कळले आहे असे म्हटले होते. त्यांचा इरादा उमरावती शहर लुटण्याचा आहे. कदाचित ते बुन्हाणपूरास जातील.

टीप : एल्फिन्स्टन हा नागपूरचा इग्रजांचा रेसिडेन्ट होता.

आज दुपारी मला उमरावतीहून एक पर्शियन पत्र मिळाले. १३ नोव्हेंबर रोजी पेंढाऱ्यांनी शहर लुटले. निजामाच्या सैन्याने त्यांचा प्रतिकार केला. त्यांनी शहरातील काही भाग जाळला आणि चकमकीत निजामाच्या सैन्यातील बीस माणसे कामी आली. पेंढारी अजून उमरावतीच्या आजूबाजूला आहेत.

आज रोजी मला एलिचपूरहून सुद्धा पत्र आले. त्यानुसार दहा हजार पेंढारी एलिचपूरला ता. १२ ला रात्री आले. त्यांनी देवळवन व एलिचपुर शहर लुटले.

त्याच पत्रात भिष्णुर येथून आलेली माहिती कळविली आहे की, पेंढाऱ्यांनी सालबर्डी (वर्धानदी काठी) हे गाव लुटले आणि तेथील एका सावकाराचे घर लुटले. तेथून ते उमरावतीला गेले.

मागे बैतुलहून आलेल्या एका पत्रानुसार पेंढाऱ्यांनी प्रदेश पार केला असून, गुप्त बातमीनुसार ते उमरावतीच्या दिशेने गेले आहेत, असे कळविले आहे. या दलाचे प्रमुख हीरु व करीम आहेत. चित्तू मागे आहे.

(पान २५०)

... ...

नं. ७१२५ ४ दिसेंबर १८०५

उतारा–पत्र पुण्याहून मिरजेस धोंडो बापूजी जोशी यांचे मार्ग. शु. १३ (सनसीत) चे.

... ... अमरावती नागपूर नजीक आहे, त्या नजीक पेंढार आले. अमरावतीच्या दोन तीन पेठा लुटून नेल्या असे बोलतात. (ऐ. ले. सं. भाग १५ : य. वा. खरे पा. ८३०५)

टीप : उमरावती शहरावर चित्तू पेंढाऱ्याचा हल्ला दि. १३ नोव्हेंबर १८०५ रोजी झाला हे, नागपूरचा रेसिडेन्ट मि. एल्फिन्स्टन यांच्या दि. १७ नोव्हे. १८०५ च्या पत्रावरून दिसून येते. त्या काळच्या परिस्थितीप्रमाणे ही बातमी पुण्याला दिसेंबर १८०५ मध्ये, म्हणजे सुमारे १५ दिवसांनी पोचली. तेव्हा पुण्याच्या मिरज दरबारच्या माणसाने ती दि. ४ दिसें. १८०५ रोजी पत्राने मिरजेस कळविली. ते वरील पत्रावरून दिसते.

एल्फिन्स्टनचे पत्रावरून असेही दिसते की, चित्तू पेंढाऱ्याचा उमरावतीवर हल्ला करण्याचा विचार जून १८०५ पासूनच होता. पण त्यावेळी त्याने (त्यावेळच्या) नागपूरच्या राजाच्या म्हणजे नागपूरकर भोसल्यांच्या प्रदेशातील हुशंगाबाद, शहापूर ही गावे लुटली व पावसाळा संपल्यानंतर, थाटाने दसरा साजरा करून तो दिवाळीपूर्वी उमरावतीवर हल्ला करायला आला. चित्तू लुटीसाठी निघाला तेव्हा त्याचे बरोबर सुमारे आठ हजार पेंढारी होते. त्याने नर्मदा व तापी पार केल्यानंतर त्यांच्या दोन टोळ्या करण्यात येऊन, पाचहजार पेंढाऱ्यासह चित्तू उमरावतीकडे आला ब उरलेले पेंढारी घेऊन त्याचा एक सरदार भिकू हा नर्मदेच्या पूर्वेकडे दुसरी टोळी करून लुटालुटीसाठी गेला.

उमरावतीवर चित्तू पेंढाऱ्याचा हल्ला झाला. तेव्हा उमरावतीला असलेल्या निजामाचे सैन्याने त्याचा प्रतिकार केला. त्यांत २० सैनिक मारल्या गेले व जाळपोळ केली असा उल्लेख एल्फिन्स्टनचे दि. १७ नोव्हे. चे पत्रात आहे. पण अमीरअलीने आपल्या जबानीत "एवढ्या मोठ्या शहराच्या रक्षणाकरिता फक्त थोडे सैनिक होते आणि ते देखील आमच्या आगमनाची चाहुल लागताच पळून गेले" असे म्हटले आहे. यांचे कारण बहुधा असे असेल की, अमीरअली चित्तूसोबत उमरावतीला आला त्यानंतर तो ब्रिटिशांचे कैदेत बारा वर्षे होता. त्यामुळे ही गोष्ट त्याचे स्मरणात राहिली नसावी. परंतु चित्तू पेंढाऱ्याने उमरावती शहरावर हल्ला केला व येथून चार लाख रुपयांची लुट नेली ही सत्य घटना आहे. याचे पुरावे वरील दोन पत्रावरूनही मिळतात.

परिशिष्ट क्र. २

(पान ८९ पहा)

".....होळकराचा अनौरस पुत्र यशवंतराव याने पेंढारी जमविले असून, वऱ्हाडवर त्या पेंढाऱ्यांचा हल्ला होण्याची शक्यता आहे..... भोसल्याचा सूड घेण्यासाठी त्याने ही तयारी चालविली आहे". (नागपूर रेसिडेन्सी रेकार्ड, भाग १ पा. २३७ ते २३८ पत्र क्र. ३ दि. २०-११-१७९९ : कोलब्रुक याचे मार्निगटनला पत्र.)

... ...

"पेंढाऱ्यांनी वऱ्हाडातील नाचनगाव लुटले. त्यांना पेंढाऱ्याच्या मुख्याने परत बोलाविले आहे असे कळते." (नागपूर रेसिडेन्सी रेकार्डस् पा. २४१–४२, भाग १ : एल्फिन्स्टनचे कर्नल हॅलिबर्टनला दि. २-१-१८०४ चे पत्र)

... ...

"१३००० पेंढारी नर्मदा पार करण्याच्या विचारात आहेत. त्यापैकी १०,००० वऱ्हाडात व नागपूर भागात पाठविले जाण्याची शक्यता आहे". (ना. रे. रे. भाग १ : पा. २४४ दि. २२–६–१८०५ चे पत्र.)

".....नागपूरहून एल्फिस्टनचे पत्र आले आहे की, हिरू, शितू (चित्तू), बुऱ्हान आणि नागू हे चार पेंढारी प्रमुख ६००० पेंढाऱ्यासह वऱ्हाडात प्रवेश करीत आहेत. एलिचपूर व उमरावती (AMARAWOTTE The excellent Town) ही गावे आणि भोवतालचा परिसर लुटण्याचा त्यांचा विचार दिसतो. उमरावती हे गाव असुरक्षित (Secured by no fortification) आहे. तसेच त्याच्या संरक्षणासाठी पुरेसे सैन्यही नाही. म्हणून ते गाव लुटणे त्यांना अतिशय सोपे आहे.

यास्तव उमरावतीच्या रक्षणासाठी १५०० सैनिकांची तुकडी मी निजामाकडून मागविली आहे. सध्या पेंढारी इलिचपूरच्या परिसरात दिसत

आहेत. ते लौकरच उमरावतीवर हल्ला करतील असे दिसते....." (नागपूर रे. रे. भाग १ : पा. २४४–४५ : दि. २२–६–१८०५ : कर्नल वॅलेस याचे कर्नल क्लोज यांस पत्र.)

"... उमरावतीहून आलेल्या पत्रावरून असे दिसते की, दि. १३ ला पेंढाऱ्यांनी उमरावतीवर हल्ला केला. काही घरे जाळली. पण शहराचे विशेष नुकसान मात्र झालेले नाही. निजामाच्या फौजेने हा हल्ला यशस्वीपणे परतवून लावला. अजूनही पेंढारी उमरावतीच्या परिसरात असून जवळपासची खेडी हल्ला करून लुटत आहेत.

दि. १२ च्या रात्री ८ ते १० हजार पेंढाऱ्यांनी एलिचपूर जवळील देऊळवाडा गाव लुटले आहे.

उमरावतीच्या रस्त्यावर असलेल्या सालबर्डीवर ५०० पेंढाऱ्यांनी हल्ला केला व तेथील सावकारास लुटले. याच पेंढाऱ्यांनी तिवसा, निंबलपूर, महमदपूर आणि ढोलपूर ही गावे लुटली असे कळते.

दुसऱ्या एक हजार पेंढाऱ्यांच्या जमावाने टोनी गाव, कोंडाली या गावांची लूट केली....." (ना. रे. रे. भाग १ : पा. २४७–४८ दिनांक १७–११–१८०५ पत्र क्र. १३ रेसि. एल्फिन्स्टनचे गव्हर्नर जनरलला पत्र.)

... ...

" ... ... पांच हजार घोडेस्वार व दोन हजार पायदळ असलेली पेंढारी टोळी नरनाळा मार्गाने दि. १३ ला वऱ्हाडात घुसली व त्याच दिवशी रात्री ते उमरावतीस आले व दुसरे दिवशी सकाळी दि. १४ ला त्यांनी लूट मिळविण्यासाठी उमरावतीवर हल्ला केला. पण निजामाचे तेथील सैन्याने हा हल्ला परतवून लावला. त्यामुळे विशेष नुकसान झालें नाही. कारण उमरावतीच्या रक्षणासाठी नबाब सलाबतखान वेळीच ससैन्य येऊन पोहोचला.

या प्रमाणे उमरावती व तिचा परिसर सुरक्षित आहे. फक्त पेंढाऱ्यांनी दोन घरे जाळली आणि पिकांचे व आजूबाजूंच्या गावाचे बरेच नुकसान मात्र केले आहे.

उमरावतीच्या संरक्षणासाठी मी येथून निजामाच्या सैन्याची तुकडी पाठविली आहे, ती उमरावतीला दि. १६ ला पोचेल. कर्नल डोव्हेटनही उमरावतीस लवकरच पोहोचेल व तेथेच तळ देऊन राहील.

या हल्ल्यात काही पेंढारी पकडले. ते सांगतात की:– "हा हल्ला चित्तूच्या हाताखाली असलेल्या लोकांनी केला. आम्ही सर्व रात्रंदिवस प्रवास केला, कारण आम्हाला अकस्मात्पणे उमरावतीवर हल्ला करून ते शहर लुटायचे होते." (ना. रे. रे. भाग १ : पा. २४८–४९ पत्र क्र. १४ दिनांक १८–११–१८०५ : कर्नल वॅलेसचे कर्नल क्लोज यांस पत्र.)

"कर्नल डोव्हेटनने आमनेर जवळ नदी पार केली असून आपले सैन्याचा तळ त्याने अशा ठिकाणी ठेवला आहे की, प्रसंग पडल्यास येथून ससैन्य जाऊन उमरावती व ईलिचपूर या शहराचे रक्षण करणे शक्य व्हावे. उमरावतीसही फार मोठ्या सैन्याचा तळ तयार ठेवला आहे. नबाब सलाबतखान हाही ससैन्य अमरावती–ईलिचपूर भागातच तळ देऊन आहे. उमरावतीच्या संरक्षणास ही व्यवस्था पुरेशी आहे". (ना. रे. रे. भाग १ : पा. २५४ : दि. ४ दिसे. १८०५ इ. कर्नल डोव्हेटनचे एल्फिन्स्टन यांस पत्र.)

... ...

"पेंढाऱ्याचे पुढारी ज्योतिबा, दोस्त महंमद, चित्तू व करीम यांच्यात मतभेद व लढाई सुरू आहे. चित्तूची परिस्थिती वाईट आहे.

या दोन गटातील भांडणाचा परिणाम काहीही झाला तरी, त्यापैकी कोणीही अगर दोघे मिळून वऱ्हाडवर केव्हा हल्ला करतील याचा

टीप १ :–वरील पत्रे पाहता एक गोष्ट स्पष्ट दिसते की, पेंढाऱ्यांचा वऱ्हाडला भयंकर व सतत उपद्रव होत होता. आणि दुसरी गोष्ट अशी दिसून येते की, खालचे अधिकारी वरच्या अधिकाऱ्यांना सत्य परिस्थिती लपवून ठेवून माहिती देत असत. उमरावतीतील चित्तू पेंढाऱ्याचे हल्ल्याचे बाबतीत, बरेच साम्य आढळते. पण हल्ला करून गावांची लुट केली ती माहिती या अधिकाऱ्यांनी, 'जणू काहीच घडले नाही' अशा स्वरूपात वरिष्टाकडे पाठविली असे दिसून येते.

अंदाज बांधता येत नाही". (ना. रे. रे. भाग १ : पा. २५७ ते २५९ पत्र क्र. २७, २८ व २९ : दि. १७ दिसे., १८ दिसे. व २८ दिसे. १८०५)

त्याच प्रमाणे कर्नल क्लोज यांना कर्नल वॅलेस याने पाठविलेल्या पत्रात पहा (पत्र दि. २२-६-१८०५) उमरावतीचे वर्णन AMARAWOTTE The excellent Town असे केले आहे. या वरून त्याकाळचे मानाने उमरावती हें गाव समृद्ध व सुंदर होते असे सिद्ध होते. अमीरअली ठगाने उमरावतीचे केलेले वर्णनास यामुळे पुष्टी मिळत आहे.



चित्र क्र. ४० : उमरावती रेल्वे स्टेशन. (पृष्ठ १८५ पहा)



चित्र क्र. ४१ : रेल्वे प्लॅटफार्म.



चित्र क्र. ४२ : स्मॉल कॉज कोर्ट. (पृष्ठ १८५ पहा)
(हल्लीचे S. D. O. कार्यालय)



चित्र क्र. ४३ : तहसील कचेरी. (पृष्ठ १८५ पहा)

परिशिष्ट क्र. ३

(पृष्ट ८५, ८६ पहा)

(१) **ठग** : "……लार्ड विल्यम बेंटिंक या गव्हर्नर जनरलच्या कारकिर्दीत "ठगां" चा नायनाट होण्यापूर्वी, पुष्कळ वर्षांपासून या संप्रदायाचा प्रसार हिंदुस्थानात सर्वत्र झाला होता. त्यांची मुख्य देवता हिंदूची काली (ठाकुराणी), दुर्गा अथवा भवानी नावाची देवी असे, या पंथात हिंदु–मुसलमान दोघेही समाविष्ट होत असत. व भांडण तंटा न करता भावाप्रमाणे राहात. त्यांच्यात शिस्त उत्तम असून, ते गुप्तपणा फार राखीत. देवीला रक्तपाताशिवाय माणसाचा बळी देणे हा ते धार्मिक विधी मानीत व बळी देऊन मग ते त्या माणसाचा माल लुटीत. देवीवर त्यांची फार निष्ठा असे. त्यांना माणसाचा प्राण घेण्याबद्दल काहीच क्षिती किंवा पाप वाटत नसे. आपले हे एक धार्मिक कृत्यच होय अशी त्यांची खरोखरीची समजूत असे. याच कृत्यांवर त्यांची उपजीविका चाले. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या ठगांचा प्रसार फार झाला होता. त्या सुमारास दरवर्षी हजारो लोकांचा प्राण या ठगांनी घेतला होता. एका ठगाने तर आपल्या आयुष्यात एकंदर ७१९ माणसांचा जीव घेण्यात आपला हात होता असे कबूल केले होते. या ठगांच्या संस्था फार गुप्तपणे चालत असत. कोंकणाशिवाय बाकीच्या सर्व हिंदुस्थानात हे लोक पसरले होते. त्यांची भाषा सांकेतिक असे. ती इतरांना समजत नसे, त्यांच्या काही खुणाही होत्या…… त्यांची शिस्त कडक असे…… हे लोक मोठमोठ्या टोळ्या करुन प्रवास करीत, त्यांना देशांतील काही व्यापारी, सावकार, जमीनदार, जहागीरदार, शेतकरी, पोलिस यांचा गुप्त आसरा राही, असे म्हणतात. लुटलेला माल वरील लोकांच्या मार्फत ते विकीत. त्याकाळी प्रवासाचे रस्ते निर्भय नव्हते. पोलिस बंदोबस्तही नाममात्रच होता. त्यामुळे ठगांना रस्त्यावर लूट करण्यात अडथळा येत नसे. यात्रेकरु, व्यापारी यांच्या वेषाने ठगांच्या टोळ्या मोठमोठ्या रस्त्याने फिरत व मार्गात आढळणाऱ्या श्रीमंत व व्यापारी प्रवाशांना गांठून लुटीत व गळफास घालून ठार करीत. अशा लोकांना त्यांच्या मालासह नाना प्रकारच्या युक्त्यांनी फसवून ते आपल्या गोटात आणीत, व ठरलेल्या पद्धतीने, धोक्यातच त्यावर रुमालाचा फांस टाकून ठार करीत. हे कृत्य

दोन मिनिटात उरके. लगेच ते प्रेत अगोदर खोदून ठेवलेल्या खड्ड्यात गाडून टाकीत. माणसाचे गळ्यात रेशमी रुमालाचा फास टाकून दोन सेकंदात त्याचा जीव घेण्याचे कामात हे ठग लोक फार तरबेज होते... "सन १८१८-१९ पासून या ठगीचा मोड करण्यास इंग्रजांनी प्रारंभ केला. सन १८२९ साली जेव्हा त्यांच्यापैकी एका प्रख्यात (फरिंग्या नावाच्या) ठगाने माफीचा साथीदार बनून आपल्या मार्गाच्या व पंथाच्या सर्व गुप्त माहितीचा स्फोट केला, तेव्हा मात्र ठगीचा नायनाट लौकर झाला. कर्नल स्लीमन याला, त्याच्या हाताखाली सैन्य देऊन केवळ याच कामासाठी नेमले होते. वरील फितूर ठगाने दिलेल्या माहितीमुळे भराभर ठग लोक पकडल्या गेलेत. त्यासाठी खास कायदे बनविण्यात आले होते. सन १८३१-३२ पावेतो ३२६२ ठगांचा नायनाट करण्यात आला. कबूली जबाब देणाऱ्या ४८३ ठगांना पुष्कळ दिवस पर्यंत जबलपूर जेलमध्ये ठेवण्यात आले होते. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर भाग १४ : पृ. (ठ) १ व २.)

(२) **पेंढारी** : हे लोक मोगलशाहीच्या पडत्या काळांत (औरंगजेबाच्या शेवटच्या वीस वर्षात) प्रथम पुढे आले. हे वाटेल त्या राजाच्या सैन्याबरोबर असत. बाजार बुणगे ज्याला म्हणतात ते व हे साधारण एकच. यांना सरकारकडून पगार नसे. मात्र शत्रूच्या प्रदेशात खंडणी वसूल करताना, त्यापैकी काही ठराविक भाग यांना मिळे. शत्रूची धान्य-सामुग्री लुटणे व त्यांच्या देशाची नासधूस करणे हे काम यांच्याकडे असे. यांचे मुख्य हत्यार भाला असे. हे घोडेस्वार असून, फार चपळ असत. कधीकधी हे रोजी ३० कोसाची मजल मारीत. यांना डेरे, तंबू वगैरे लागत नसत. एकोणीसाव्या शतकात हिंदुस्थानातील देशी राज्ये खालसा होऊन इंग्रजांचा अंमल जसजसा दृढावत गेला, तसतसे यांचे आश्रयस्थान (देशी राज्यांची सैन्ये) नाहीसे होत चालल्याने यांनी आपली स्वतंत्र पथके बनविली. त्यांना थोडा फार आश्रय शिंदे - होळकरांचा असे ..... अमीरखान, करिमखान, वासीलमहंमद, छट्टू (चित्तू) वगैरे धाडसी लोक या पेंढाऱ्यांचे नाईक होते. त्यांनी मध्यप्रांत, माळवा, गुजरात, महाराष्ट्र, मद्रास, बिहार वगैरे प्रांतात धुमाकूळ घातला. देशी संस्थानिक त्यांना आतून मदत करीत.....लार्ड हेस्टिंगने (पेशवे, शिंदे, होळकर, भोसले.) राजे रजवाड्यांचे साहाय्य घेऊन व स्वतःची सव्वालाख फौज घेऊन, बंगाल, महाराष्ट्र व गुजरात अशा तिन्ही बाजूंनी चालून

येऊन माळव्यात असलेल्या पेंढाऱ्यांच्या आसऱ्याच्या जागांना वेढा दिला. अमीरखान व करीम यांना जहागीर देऊन फोडले. छट्टूचा पाठलाग केला. (त्यात तो वाघाकडून मारला गेला.) व प्रमुख पुढाऱ्यास कैद अथवा ठार करण्यात आले याप्रमाणे सन १८१७-१८ मध्ये पेंढाऱ्यांचा नाश केला गेला.

गावकऱ्यांना आगाऊ सूचना देऊन हे आपला दंड वसूल करीत. त्यांनी तो तसा दिला नाही तर मग त्यांचा छळ करीत व गावास आगीही लावून देत. पेंढाऱ्यांचे टोळ्यांतून मुख्यत: सैन्यातून हत्यारबंद लोक कमी केले ते असत. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर : भाग १७ : पृ. (प)१६६)

(३) **लार्ड विल्यम बेंटिंग** : (१७७४-१८३९) हिंदुस्थानचा एक गव्हर्नर जनरल. सन १८२७ ते १८३५ पावेतो तो या हुद्यावर होता... त्याने हिंदुस्थानात उपयुक्त सुधारणा घडवून आणल्या. त्यापैकी काही:- १ सतीची चाल बंद केली. २ ठग लोकांचा पुरा नायनाट करून, अनेक ठग लोकांस पकडून ठार मारले. ज्यांनी अपराध कबूल केले त्यांना क्षमा करून शेतीभाती देऊन उद्योगास लावले. ३ हिंदुस्थानांतील जनतेला पाश्चात्य पद्धतीचे शिक्षण देऊन तिला विद्यासंपन्न करण्याचा त्याने निश्चय केला... त्यासाठी इंग्रजी शाळा अनेक ठिकाणी उघडल्या. (महा. ज्ञानकोश : केतकर : भाग ११ : पृ. (ब)१५९.)

(४) **अमीरअली ठग** : हा शिंदे सरकारच्या राज्यातील 'मरणी' या गावी राहणारा होता. त्याचा बाप ठग असल्याने वयाच्या १८ व्या वर्षापासूनच हाही ठगीच्या धंद्यात पडला. याने एकट्यानेच ७१९ माणसांचे खून केल्याचे त्याने कबूल केले होते. पुढे तो चित्तू पेंढाऱ्याचे हाताखाली पेंढारी सरदार म्हणून होता. नंतर इंग्रज सरकारचे ठगाविरुद्धचे मोहीमेत हा हाती लागला. त्यांत तो १२ वर्षे जेल मध्ये होता. नंतर काही अटी मान्य केल्यावरून त्याची जेल मधून सुटका झाली. तेव्हा त्याला कॅ. मेडोज टेलर यांचे दिमतीला देण्यात आले. कॅ. मेडोज टेलर यांनी या अमीर अलीच्या चित्रवैचित्र्याने व सत्य माहितीने भरलेल्या जीवनावर आधारलेले "ठगाची जबानी" (कन्फेशन ऑफ ए ठग) हे पुस्तक ई. सन १८३९ मध्ये इंग्लंडमध्ये प्रसिद्ध केले होते. या पुस्तकाचे नंतर अनेक भाषेत भाषांतर होऊन ते वाचकांचे आवडते पुस्तक बनले.

(५) **फिलिप मेडोज टेलर** : हा लिव्हरपूल मध्ये जन्मला. १५ व्या वर्षी एका व्यापाऱ्याकडे नोकरी करण्यासाठी विलायतेतून इकडे

मुंबईस आला. परंतु तेथे नोकरीचे न जमल्यामुळे तो निजामाचे पदरी लष्करी नोकरीत राहिला. त्याचे सर्व आयुष्य निजामाचे पदरी गेले. नंतर तो मुलकी कामावर नेमला गेला. त्याने दक्षिणेतील मुख्य भाषांचा, तसेच कायदेशास्त्र, भूगर्भशास्त्र, भारतीय प्राचीन कलाकौशल्य यांचा अभ्यास केला. १८३९ साली 'कन्फेशन ऑफ ए ठग' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. इतरही पुस्तके लिहिली. १८४० ते १८५३ या काळात तो 'दी टाइम्स' पत्राचा बातमीदार होता. पुढे निजामाने त्याला, त्याच्या संस्थानातील सोरापूरच्या अज्ञान राजपुत्राच्या राज्याची व्यवस्था पाहण्याकरिता नेमले. हे काम त्याने पुष्कळ वर्षे उत्तम प्रकारे व सचोटीने केले. कर्नल टेलर याच्या अंगचे गुण नंतर इंग्रजांचे लक्षात येऊन इंग्रजांनी त्याला डे. कमिश्नरचे हुद्यावर नेमले. तो १८६० साली विलायतेला परत गेला. तेव्हा त्यास सी. एस. आय. ची पदवी देऊन त्याचा तेथे गौरव करण्यात आला. तो १३ मे १८७६ रोजी वारला. (महा. ज्ञानकोश : केतकर : भाग १४ : पा. (ट) ४२)

(हा कर्नल मेडोज टेलर उमरावती येथे दि. १४–९–१८५७ ते फेब्रुवारी १८५८ या काळात डे. कमिश्नर होता.)

(६) **चित्तू (किंवा छट्टू)** : हा पेशवाई अखेरीच्या पेंढाऱ्यात एक प्रमुख 'पेंढारी नाईक' होता. त्यावेळी करीमखान, बासीलमहंमद व चित्तू हे तीन (पेंढाऱ्यांचे) प्रमुख पुढारी होते. हा जातीने मेवाती होता. करीमखान ग्वाल्हेरास शिंद्याचे अटकेत असताना पेंढाऱ्यांचे आधिपत्य याच्याकडे आले. (१८१०). पुढे जेव्हा करीमखान कैदेतून सुटला तेव्हा याला मत्सर वाटून, त्याला सोडून हा दौलतराव शिंद्याचे पदरी राहिला. इ. सन १८१७ त माळव्यातून पेंढारी हुसकून लावले व १८१८ त त्यांचा पुरा मोड झाला. करीमखान शरण गेला व बासील महमदने कैदेतच आत्महत्या केली. चित्तू हा इंग्रजाचे हाती लागेना व शरणही येईना. म्हणून त्याचा सारखा पाठलाग सुरू झाला. त्यावेळी तो पळत पळत अशीरगड जवळ जंगलात शिरला असता तेथे एका वाघाचे मुखात त्याची आहुती पडली असे म्हणतात. मध्यभारतातील सतवास व नेमावर ही चित्तूची मुख्य ठाणी होती. या जिल्ह्यातून चित्तूने पेंढाऱ्यांचा मोठा जमाव तयार केला होता. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर : भाग १३ : पान (छ) १ व (न) ३८९)

परिशिष्ट क्र. ४

(पान ४ पहा)

Genl. No. 217 of 1870.
Department No. 35.
From,

The Offg. First Assistant Resident,

To,

The Commissioner,

Sir,

In reply to your letter No. 2547 dated 22nd November 1869, enclosing copy of a letter from the Deputy Commr. Oomrowtty and stating your views in regard to the manner of taking up land, paying revenue or otherwise, within the Municipal limits of the town of Oomrowtty, as lately published, I am directed to convey the Resident's sanction to all such land paying revenue to Government being taken up as for a public purpose as proposed by you in para 7 of the letter under reply and to authorise payment of compensation under the rules*, sanctioned by Govt. letter 1095, d/29th June 1868, Foreign Dept. in force for the same and for such other agricultural improvements as also on account of trees and standing crops, where there may be found to exist and I am to add that such compensation will of course be a charge against the Town Funds and the land so taken up will be struck off the Government Reni Roll, whereever it may be necessary to do so The Municipality will then be at liberty to dispose of the same to the best advantage.

Hyd. Residency,
24th January 1870

I have & c.
Sd/- A. L. Fouler,
for Offg. 1st Assistant Resident

परिशिष्ट क्र. ५

(पान १३९ पहा)

HYDERABAD RESIDENCY ORDERS,

NOTIFICATION

HYDERABAD RESIDENCY, the 1st April 1898.
No 79-A

In exercise of the powers conferred by section 2 of the Berar Cotton and Grain Markets Law, 1897, the Resident is pleased to declare the following places to be markets for the sale of all kinds of cotton from the date of this notification :—

District	Seriel No.	Name of town where the cotton market is situated.	Area of the site occupied by the cotton market	Boundaries
			Square Yds. ft.	
Amravati	1.	Amraoti...	38217-0	North- Fields Nos. 31 and 82 and the Chandur road. South- Road to Sudder station. East- Volkart's United Press Company's compound. West- Branch road passing New Berar Press Company's compound and the Chandur road.

परिशिष्ट क्र. ६

(पान १४० पहा)

ame of own where tton or ain or both ive been tablished	Whether the town is a Municipal Town or is subject to the authority of the District Board	Area of the site occupied by		Whether the sites are the property of the Municipal Committee/or the District Board as the case may be	If so by what means Mnnicipal Committee or District Baord have acquired the sites	Whethrr the markets established at the expense of thc Mpl. fund or the Dist. fund as the case may be	The annua letting value of the site
		Cotton Market	Grain Market				
		Sq.Yds.	Sq.Yds.				
nraoti	Municipal	38,217	5,366	Municipal	The site occupied by the Cotton Market is one of those assigned t·· Municipality vide Offg. 1st assistant Resident — General Letter No. 217 Departmental No. 35 date 24-1-70 to the address of the Commissioner & that occupied by the grain market was accuired by Govt. grant same as Cootton Market.	Municipal fund	Cotton Market Rs. 4-4-9 Grain Market Rs. 0-9-7

परिशिष्ट क्र. ७

(पृष्ट १३७ ते १३९ पहा)

Note on the site and origin of the Cotton Market Amravati and the relation of the Cotton Market Committee to the Town Municipal Committee.

Site of The Cotton Market : The Cotton Market at Amraoti is situated on S. No. 28 (old Survey No. 82) of Tarkheda. In 1896 the Municipal Committee asked the Patel of Amravati to report, the S. No. in which the Cotton Market was held, the name of the Khatedar and the area of the S. No. The Patel's reply is as follows—

"The Cotton Market is held in S. No. 28 measuring 9 acres and 10 gunthas. As this field was uncultivable (potkharab) it was not assessed to Land Revenue. The Khatedar of S. No. 82 was Balkrishna Jairam and its area was 18 bighas of which 10 bighas were acquired by Mr. Ball for the Cotton Market and 8 bighas remained in the possession of Balkrishna. This information was found in the crop statement of 1868." This report is not supported by the evidence existing. The crop statement of 1868 is no longer in existence. It was destroyed at the time of the Revision Survey. In the field measurement book prepared in 1869, S.No. 28 is shown as waste at the time of survey and belonging to Government. These survey papers are authentic authority and must be considered more reliable than the Patel's report of the 20th June 1896 which is unsupported by any official papers. The site was selected by the Deputy Commissioner, Amraoti, for the Cotton Yard in 1867 and the Yard was completed on the site selected before the close of The year. The surveyor at the time of the preparation of the survey papers in 1869 found this

field uncultivated and accordingly recorded it as waste belonging to Government, even though some buildings in connection with the Cotton Yard had been constructed on it. It would, therefore, appear that S. No. 28 measuring 9 acres and 10 gunthas was, at the time that it was appropriated by the Deputy Commissioner for the Cotton Yard, an uncultivated, unassessed waste site belonging to Government. The site (S. No. 28) was subsequently included among the 108 S Nos., handed over to the Municipal Committee by Resident's letter no. 217 dated, the 24th January 1870. These 108 S. Nos. constitute the limits of the Municipal area. It is thus clear that the site was appropriated to the Cotton Market beore the boundaries of the Municipal Comittee were fixed or any land was handed over to the Committee.

Origin of the Cotton Market : In local Funds Department letter no. 157 of 2nd August 1867 to the address of the Commissioner, Berar, the Deputy Commissioner submits proposals for making a yard for the cotton trade at Amraoti and states that, in the past, cotton used to be stored in any open spots around the city and sellers charged one anna per square yard for the ground occupied. (The receipts in the previous two years at this rate totalled Rs. 1246-15-3). This was unsatisfactory in many ways and he therefore proposed to make a yard outside the City and to charge ground rent on all merchants using the yard at the rate of Rs. 10!- per plot and a cess at the rate of one anna per cart or per Boja, on all cotton, brought into the yard. The cost of the layout was Rs. 19,604!- which he proposed to get from the Local District Funds and not from The Municipal Funds. In letter no. 1416, dated the 20th of August 1867, the Resident sanctioned the estimate for the layout of the yard and the cess proposed on all cotton, brought into it for sale and in

another letter No. 398, dated the 17th of October 1867, he sanctioned the debitting of the expenses of the cost of the layout of the Cotton Yard to The General District Funds and not to the special Municipal Funds. "Since the whole district is deeply interested in the trade of that place," the Resident adds that the cess should be held in abeyance until the necessity for its imposition is proved. Finally, in letter no. 797 of the same year, the Cotton Commissioner (the department was established by the Government of India before 1875) reported to the Resident that the Market was completed and that the Deputy Commissioner is taking steps for arranging the management of the yard. Subsequent letters show that the cess was not at first imposed and that the Cotton Commissioner provided certain funds and the rest of the cost of the yard was made good from the license-fees paid by Dalals. The Municipal Committee, however, resolved on the 13th of June 1871 that the cess of one anna per boja should be imposed and again on the 10th November 1873, that the cess be imposed at once pending the Resident's sanction. After long correspondence the sanctin for the imposition of the cess was conveyed by his Excellency, the Governor General in Council, in a letter, dated, the 5th June 1874. With the imposition of the cess the Cotton Market really came into full existence.

Reaction of the Cotton Market Committee and the Municipal Committee : The records in this office make it quite clear that from the outset until the passing of the Cotton Market Act, the Amraoti Town Municipal Committee had entire control over the Cotton Yard. In the rules drawn up on the 13th May 1874 for the management of the Yard, it is laid down in Rule 8 that the yard Committee should consist of a Chairman and four members to be

elected annually by the Municipal Committee and this arrangement continued until 1898. The cotton Market, as already shown, was not constructed at the cost of the Municipal Committee and in the very early days, the funds for its maintenance were provided partly from the funds at the disposal of the Cotton Commissioner and mainly from leasing out plots to Cotton merchants. The Secretary of the Municipal Committee, at my request, has searched the old Municipal records for any records of expenditure incurred be the Committee on the Market. Earliest reference, which he has been able to find, was in 1885, when the Committee spent Rs. 4600/—on the construction of the Exchange Hall. In 1890-91 it spent Rs. 2385/- on the construction of the new office and in 1897 Rs. 2128/- on a godown. These are the only figures available, but they are sufficient to show that, while the initial outlay on the Yard was not met from Municipal funds, the upkeep and managemennt has been in the hands of the Municipal Committee, working through an elected Sub-Committee which only applied for grants, when the Cotton Market funds were unable to meet the required expenditure. In 1891 the question ot the separation of the management of the Cotton Market from the Municipal Committee was raised at the instance of traders who objected strongly to Municipal control. At about the same time enquiries were started within Muuicipal Limits in Berar. The enquiry about the Cotton Market site was couducted both as a part of the general issue and also owing to the demand made by the merchants for separation, since, should the site be found to be Municipal property, the Cotton Market would have to pay the committee rent. In letter No. 6693, dated the 6th November 1891, the Commissioner (Mr. Plowden) enquires whether Cotton Market site belongs

to the Municipal Committee and if so how they acquired it and whether the Market was established on this site at the cost of Municipal fuuds. The next reference in this connection is letter no. 602, dated the 28th June 1894, in which the Commissioner states that Mr. Plowden, (now apparently Resident), after enquiring as Commissioner, found that the grain and cotton Market sites do not belong to the Municipal Committee and that he (the Commissioner) agreed that there was no need to continue the connection of the Municipal Committee with the Cotton Market. There are several other letters on the point, some (e. g Commissioner's letter No. 96, dated the 24th June 1896) inconsistent with the letter above quoted. The position of the Committee is argued in Secretary's letter no. 909 of the 14th September 1898, but the question must be considered settled in Resident's letter No. 1440, dated the 25th April 1899, in which in paragraph 9 the Resident lays down that the lands placed at the disposal of the Municipal Committee in Resident's letter No. 217, dated the 24th January 1870 of which the Cotton Market site was one, belong to Government, since the lands were not taken up by the Committee as for a public purpose and no compensation was paid by them for their acquisition and that, therefore, the conditions, under which they were handed over to the Committee, were not complied with and the title of Government remains unaffected. The letter only deals in detail with the question of title to the occupied S. No. inside Municipal limits, but the argument in favour of the title of Government to the unoccupied waste sites handed over at the same time to the Committee applies a fortiori, and there can be no doubt that Government is as much the owner of this waste field No. 28 as it is of the other waste lands (Now Nazul since 1912) situated within the town limits. The conclusion, therefore

which is thus reached, is that the Cotton Market was not established on S. No. 28 at the cost of Municipal funds but was from the outset managed by the Municipal Committe through an annually elected Sub-Committee, this procedure continuing until the framing of the rules under the Cotton Market Act of 1897 by which in Rule VI of the Rules published in Notification No. 79-B of the Ist of April 1898, it is laid down that the Committee shall consist of five members, two of whom shall be elected by the Municipal Committee and the remainder by vote. Since then the connection between the two committees has remained a very close one and the surplus funds of the Cotton Market, averaging annually Rs. 3432/- for the last five years are at the close of each year credited to the Municipality.

परिशिष्ट क्रमांक ९

(पान १३६ पहा)

परदेशात वऱ्हाडचा कापूस निर्यात होऊ लागला. अमेरिकन युद्धामुळे कापसाचे भाव वाढले. त्यामुळे वऱ्हाडात कापसाचा पेरा वाढला आणि अर्थातच या कापूस–धंद्यात लोकांना कामही मिळू लागले. तरीही या भाववाढीचा फायदा मात्र शेतकऱ्यांना पुरेपूर मिळू शकला नाही.

"इंग्रजांनी कापसाची खरेदी सुरू केल्यापासून कापसाचे भाव मर्यादेबाहेर वाढत गेले. या भाववाढीचा फायदा मात्र वऱ्हाडातील शेतकरी किंवा मध्यम वर्गाला मुळीच मिळाला नाही. कारण शेतीच्या लाव–लागवडीची जुनी पद्धत आणि गरजेच्या वस्तूंचे भाव वाढल्यामुळे व धान्याचे उत्पादन हळूहळू कमी होत गेल्यामुळे खर्च वाढला. पण त्या प्रमाणात उत्पन्न न वाढल्यामुळे शेतकरी पूर्वी इतका दरिद्रीच राहिला. धान्याचे उत्पादन घटले व कापसाचे उत्पादन वाढले. त्यातच इ. स. १८६१ मध्ये मोठा दुष्काळ पडला आणि सर्वत्र दळणवळणाची चांगली साधने नसल्यामुळे इतर प्रदेशातून धान्य आणता आले नाही. कापसांचे भाव वाढल्यामुळे इंग्रजांनी कर वाढविला, सावकारांची पिळवणूक होतीच. म्हणून कापूस भाववाढीचा फायदा शेतकऱ्यांना मुळीच मिळाला नाही. " (दी इंडियन कॅपिटलिस्ट क्लॉस : व्हि. आय्. पावलोव : १९६४, पा. ३२५–३२६,"

आणि शेतकऱ्याप्रमाणेच कोष्टी व मजुरांना देखील त्याचा लाभ झाल्याचे दिसत नाही. उलट त्याकाळी कशी भयानक बेकारी होती त्यावर मात्र चांगला प्रकाश पडतो. तो असा–

"कापसाचे भाव वाढले, त्यामुळे सूताचे भाव वाढले. सावकारांनी सूत अधिक भावात विकावयास सुरुवात केली, कोष्टी अधिक कर्ज घेऊन सावकारापासून सूत घेऊ लागला, त्यामुळे देशी कापडाचे देखील भाव वाढले. परंतु त्याचा फायदा शेतकऱ्याप्रमाणे कोष्टयांना देखील मिळाला नाही. कोष्टी सुद्धा शेतकऱ्याप्रमाणे दरिद्री राहिले"

परिशिष्ट क्र – ८

Statement showing the Arrival of the Kapas Carts and Cotton Bojas during the following seasons.

No.	Yeaa	Cotton Carts	Cotton Bojas.
1.	1886-87	0	86,416
2.	1887-88	70	39,889
3.	1888 89	5,037	1,06,392
4.	1889-90	7,203	1,02,565½
5.	1890-91	13,231	95,858
6.	1891-92	7,537	82,396
7.	1892-93	7,925	62,252
8	1893-94	13,397	63,829
9.	1894-95	8,676	43,656
10.	1895-96	28,833	82,289½
11.	1896-97	14,582	66,130
12.	1897-98	15,831	74,907
13.	1898-99	55,137	2,07,351
14.	1899-1900	3,973	15,637½
15.	1900-01	67,794	1,15,121½
16.	1901-02	54,864	86,237
17.	1902-03	62,329	71,117
18.	1903-04	48,093	45,868½
19.	1904-05	84,583	87,685
20.	1905-06	65,827	49,405½
21.	1906-07	58,268	39,554
22.	1907-08	65;341	35,582
23.	1908-09	70,983	27,808
24.	1909-10	1,20,947	42,487
25.	1910-11	69,711	20,864
26.	1911-12	1,45,217	46,989
27.	1912-13	93,225	38,330
28.	1913-14	1,11,227	25,264
29.	1914-15	1,19,920	17,716
30.	1915,16	1,34,239	18,107

No	Year	Cotton Carts	Cotton Bojas.	Rain Fall
31.	1916-17	73,594	12,572	
32	1917-18	66,469	9,397	
33.	1918-19	1,31,277	23,085	
34.	1919-20	1,63,176	18,257	
35.	1920-21	58,560	13,536	
36.	1921-22	1,55,832	17,173	
37	1922-23	1,34,599	1,62,005½	
38.	1923-24	1,50,548	11,726	
39.	1924-25	1,17,926	11,637	
40.	1925-26	1,30,548	2,534	
41.	1926-27	1,36,041	2,284½	
42.	1927-28	1,73,725	2,935	
43.	1928-29	1,53,757	3,631	
44.	1929-30	1,36,824	3,521	
45.	1930-31	1,15,463	2,179½	
46.	1931-32	65,297	764	
47.	1932-33	1,03,943	368	
48.	1933-34	1,13,013	691	
49.	1934-35	90,152	316	
50.	1935-36	89,442	274½	
51	1936-37	1,41,465	2,445	
52.	1937-38	1,07,720	211	31.65 ▪▪
53.	1938-39	64,309	341	40.16 ▪▪
54.	1939-40	1,23,832	681	25.27 ▪▪
55	1940-41	1,34,592	693	43.91 ▪▪
56.	1941-42	1,58,978	796	24.22 ▪▪
57.	1942-43	1,13,367	1,051	24 30
58.	1943-44	1,08,048	130	46 40
59.	1944 45	78,952	402	29 72
60.	1945-46	96.958	250	35.49
61.	1946-47	92,820	315	31.75
62.	1947-48	1,05,785	376	33.86
63.	1948-49	71,219	188	43.91
64.	1949-50	72,878	30	23.28
65	1950-51	1,17,722	450	23 00

"इ. सन १८७१ मध्ये 'लंडन टाईम्स' मध्ये एक कथा प्रसिद्ध झाली. कापूस उत्पादन वाढल्यामुळे सरकी वेगळी करण्यासाठी हात मशिनवर काम करणारे मजूर त्या कामी लावण्यात आले. तीन ते चार महिने चालणाऱ्या या उद्योगात मजूर स्त्रिया रोज वीस तास काम करीत असत. त्यांना दिवसात दोन किंवा तीन तास विश्रांती मिळत असे. त्या विश्रांतीचे काळात देखील त्या स्त्री-मजुराने आपला मित्र किंवा नातेवाईक कामाला दिला पाहिजे, असा नियम असे. स्त्रियांची तान्ही मुले सोबत असायची व जवळच खाटेवर किंवा झाडाला झोळी करून निजविली असायची. दोन-तीन तास तरी काम मिळावे म्हणून नातेवाईक किंवा मित्र मोठ्या प्रमाणात मिळत असत. यावरून त्याकाळी मजूर किती स्वस्त होते व बेरोजगारीचा प्रश्न किती बिकट होता हे दिसून येते. हा सर्व ब्रिटिश साम्राज्यवादाने केलेल्या निरंकुश शोषणाचा परिणाम होय". (दी इंडियन कॅपिटॅलिस्ट क्लॉस : १९६४ : व्हि. आय्. पावलॉव. पा. ३३८)

परिशिष्ट क्र. १०

उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीने कॉटन मार्केट संबंधी मंजूर केलेल्या ठरावांच्या संक्षिप्त नोंदी–

दि. २५ जुन १८७२ : ठराव नं. ४ : "जुनी इमारत पाडून तेथे नवी इमारत बांधण्यासाठी रु. ५०० मंजूर"

दि. २८ जुन १८७२ : ठराव नं. ७ : " कॉटन मार्केट दरोग्यास नगरपालिकेच्या नोकरीत कायम करावे वगैरे बाबत."

दि. २६ आक्टो. १८७२ : ठराव नं. ९ :(अ)"पुढील ७ महिन्यासाठी कॉटन गार्ड नेमावा. (ब) कॉटन यार्ड कमेटीही नेमावी."

दि. ४ जाने. १८७३ : ठराव नं. ६ : "कॉटन यार्ड कमेटीच्या ठरावांना संमती."

दि. २६ मे १८७३ : ठराव नं. १ : "दि. १–७–१७७३ नंतर कॉटन मार्केटचे आवारात कापसाचे गंज करण्यास परवानगी देऊ नये."

दि. १५ ऑगस्ट १८७३ : ठराव नं. २ : "कॉटन यार्डची दुरुस्ती व सुव्यवस्था राखणे यासाठी कापसाच्या प्रत्येक बोझ्यावर एक आणा कर बसवावा व तो फाटकाजवळ वसूल करावा."

(२) "आजतागायत कॉटन यार्ड व इमारती यावर होणारा खर्च नगरपालिका करीत असे."

(३) "यापुढे कॉटन यार्डचे उत्पन्न सुव्यवस्थेसाठी आवश्यक आहे. म्हणून हा कर आवश्वक आहे."

दि. १५ ऑगष्ट १८७३ : ठराव नं. ५ : "इ. सन १८६९ जुनमध्ये कॉटन यार्डवर रु. ६६६–१५ आणे खर्च झाले आहेत. नगरपालिकेने सराय बांधण्यासाठी रु. २००० मंजूर केले आहेत. त्या खर्चाची आता गरज नसल्यामुळे त्या रकमेतून कॉटन यार्डची रकम नगरपालिकेने वापस करावी."

दि. १५ जुन १८७४ : ठराव नं. ९ : "कॉटन यार्डच्या प्रवेश मार्गावर तीन पूल बांधावेत. त्याचा खर्च रु. ८०० कॉटन सेसच्या निधीतून करावा.....हे काम ताबडतोब करावे."

ठराव नं. १४ : "कॉटन यार्डला समांतर असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. १३८ मंजूर करावेत (एस्टिमेट क्र. ११)"

दि. ८ ऑगस्ट १८७४ : ठराव नं. २ : "तूर्त कार्यकारिणीचा ठराव मंजूर करावा.

१) यापुढे कॉटन मार्केटमधील इमारत परवानगीशिवाय भाड्याने देऊ नये.

२) मात्र कार्यकारिणीच्या ठरावाप्रमाणे तूर्त फक्त ४ महिन्यासाठी कॉटन मार्केट मधील इमारत (कॉटन एक्स्चेंज) द. म. १५ प्रमाणे भाड्याने द्यावी."
दि. १५ मार्च १८७५ : ठराव नं. ४ : "कॉटन मार्केटच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील रस्ता बांधणीचे कामास मंजुरी. हे काम पावसाळ्यात सुरू करावे."

ठराव नं. ९ : (१) दलालास कार्डावर परवानगी पत्र पुढील जानेवारी १५ पासून द्यावेत. (२) कॉटन मार्केट एक्सचेंजसाठी नकाशे व स्टेशनरी घेण्यासाठी रु. १०० पर्यंत मंजूर.

दि. ६ सप्टें. १८७५ : ठराव क्र. २ : "कॉ. मा. कमेटीवर दोन व्यापारी सदस्य घेण्यात यावेत आणि या समितीने कापूस व्यापाऱ्यास योग्य मार्गदर्शन करण्यासाठी एक उपसमिती नेमावी."

ठराव नं. ११ ".....कॉटन यार्डचे कुंपणासाठी रु. ४२५६ मंजूर (एस्टिमेट नं. १०)

दि. २० एप्रील १८७६ : ठराव नं. ९ : "कॉटन यार्ड भोवती काँक्रिटची भित बांधण्यास कॉन्ट्रॅक्टर मिळत नसल्यामुळे, ठरलेल्या प्लॅनप्रमाणे साधी विटांची भित बांधावी".

दि. १५ दिसें. १८७६ : ठराव नं. ५ : "कापूस व्यापाऱ्यांच्या सभतील सूचनेप्रमाणे कॉटन मार्केट रविवारी बंद ठेवावे".
– वरील आदेश अध्यक्षांनी. आकोट व मुर्तिजापूर येथील संबंधितांना द्यावा.

दि. १५ नोव्हें. १८७७ : ठराव नं. ३ : "कॉटन मार्केट दरोग्यास सहा महिन्यासाठी दरमहा रु. ३० न देता संपूर्ण वर्षासाठी त्याला दरमहा रु. २० देण्यात यावेत."

दि. २७ फेब्रुवारी १८७८ : ठराव नं. ४ : "कापूस साठविण्यासाठी गोडाऊन (कोठार) बांधणे. प्लॅन व खर्चाचा अंदाज (Estimate) विचारात घेऊन असा ठराव करण्यात आला की:--

"येणारा खर्च रु. ५००/- हा इ. सन १८७८-७९ च्या अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यास परवानगी मागण्यासाठी रेसिडेंटकडे मंजुरीसाठी पाठवावा". दि. २७ फेब्रुवारी १८७८ ठराव नं. ५ : "कॉटनसेस फंडाच्या जमा खर्चाचा सुरवातीपासून आजतागायतचा तक्ता तयार करण्यात यावा."

दि. २ आक्टोबर १८७८ : ठराव नं. २ : कॉटन यार्डला जाणारे ४ रस्ते दुरुस्तीसाठी रु. ३०७ मंजूर करावेत (२) दोन बाजूंच्या जागांच्या दुरुस्तीची तरतूद पुढील अंदाजपत्रकात करण्यात यावी (३) कॉटन यार्डचे दप्तर सांभाळण्यासाठी दरमहा रु. ३० पगारावर इंग्रजी-मराठी जाणणारा मनुष्य नेमावा."

दि. ८ मे १८७९ : ठराव नं. १ : "कॉटन मार्केटवरील रस्त्यावर रु. १४११० अंदाजपत्रकानुसार खर्च करून छप्पर (Shed) टाकावे :"

उपसूचना- १ : रस्त्याची रुंदी १० फूट लक्षात घेऊन तयार केलेला आराखडा बदलवावा. छप्पर कवेलूचे असावे.

उपसूचना- २ : छप्पराची उंची १० फू. व रूं. १४ फूट असावी. छपरावर मंगलोरी कौले घालावीत. (दुसरी उपसूचना मंजूर)

दि. २ जुलै १८७९ : ठराव नं. ६ : कॉटन मार्केटच्या गोडाऊनमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक बोजावर कार्यकारिणीच्या ठरावाप्रमाणे तीन आणे भाडे द. महा आकारावे."

दि. २ सप्टेंबर १८८९ : ठराव नं. १४ : कॉटन मार्केट गोडाऊनमध्ये ठेवलेल्या कापसाबद्दल मालकास पुढील मजकुराची पावती द्यावी:-

- पावतीचा नमुना -

अमरावती नगरपालिका, कॉटन गोडाऊन अमरावती.

दि:-

रा. रा. ..... यांच्यापासून गोडाऊनमध्ये ठेवण्यासाठी कापसाचे...बोझे मालकाच्या जबाबदारीवर मिळाले. कोणत्याही नुकसानीस कमेटी जबाबदार नाही. (स्ट्रेम्प्-लांचा निर्णय होईपर्यंत ही सूचना मागे घेण्यात आली.)

परिशिष्ट क्र. ११

संक्षिप्त कॉटन रिपोर्ट इ. सन १८७८-७९-८० : स्वच्छ केलेल्या (सरकी काढलेल्या रुईची) कापसाची किंमत साधारणत: पुढील प्रमाणे असे. :-

८० पौंडाच्या १ मणास-	नोव्हेंबरमध्ये रु. १८
	जूनमध्ये रु. २३

कापसाचे कारखाने : इ. सन १८७६ साली उमरावतीला प्रेसिंग फॅक्टरीज १० व जिनींग १

उमरावतीहून मुंबईस पाठविलेल्या कापसाच्या गठाणी (Bales)

	वर्ष	गठाणी	वर्ष	गठाणी
इ. स.	१८७०	१७१-१६४	१८७५	२७४-४४४
	१८७१	२०५-२९३	१८७६	२१५-३३२
	१८७२	१४८-३६३	१८७७	२८३-४०२
	१८७३	२०४-६०९	१८७८	३५५-६८७
	१८७४	२६२-९२०	१८७९	२२०-४२७

उमरावती कॉटन मार्केट : विकल्या गेलेल्या कापूस बोजांचा तपशील :-

महिना	एकूण बोजे
दिसेंबर १८७८	३०६२२
जानेवारी १८७९	७०९२६
जून १८७९	१४६५४

इ. सन १८८० मध्ये उमरावतीहून झालेली कापसाची निर्यात:-

	मुंबई	बंगाल	इंदोर	मध्यप्रदेश
गठाणी	४५९७०	१०८२	१००	७५४४

१८८२ मध्ये उमरावती येथील प्रेसिंग फॅक्टरीज-

१ बॉलकर्ट युनायटेड प्रेस कंपनी

२ मोफ्यूसल कंपनी
३ न्यू बेरार कंपनी लिमिटेड
४ हार्वे अॅन्ड सभापति
५ वेस्ट पेटंट प्रेस कंपनी.

इ. सन १८८१ मध्ये कापसाच्या उत्पादनात ५० टक्के वाढ झाल्याची नोंद आहे.

कापसाची एकूण किंमत रु. २,८६,९४१७९ होती. कापसाचा दर मणाचा सर्वसाधारण भाव रु. २० होता.

इ. सन १८८२ : सरकी न काढलेल्या कापसाची किंमत रु. १,२३८,३६३[१]

१ : कॉटन रिपोर्टस् : हैद्राबाद रेसिडेन्सी रेकार्ड. नॅशनल आर्काइव्ह, दिल्ली.

प्रकरण चवथे

अनुक्रमणिका

इंग्रजी अमदनीची सुरूवात : वऱ्हाडच्या पहिल्या ... कमिश्नरची कचेरी उमरावतीला ... ... उमरावतीचा पहिला डे. कमिश्नर ... ... राजधानीचा मान ... ... उमरावती जिल्हा झाला. १८५७ चे बंडात उमरावती .. .. दळण वळणाचे क्षेत्रात क्रांती ... ... टपाल सेवा, चलनी नोटा; पहिली बँक ... ... टाऊन म्युनि सिपल कमेटी ... ... उमरावती १८६७ ते १८७० उमरावतीची पहिली मराठी प्रा. शाळा ... ... उमरावतीचे पहिले हायस्कुल ... ... नेटिव्ह जनरल लायब्ररी ... ... वकिली धंद्याचा उदय ... ... कॅम्प म्युनिसिपॅलिटी ... ... १८९६ चा भयंकर दुष्काळ ... ... उमरावतीचा पहिला भूक मोर्चा ... ... इंडियन नॅशनल काँग्रेसचे अधिवेशन ... ... लो. टिळकांच्या अभिनंदनाची सभा ... ... उमरावतीची पहिली गायन शाळा ... ... पहिली नाटक मंडळी– ... ... पहिला सार्वजनिक गणेशोत्सव ... ... १९ व्या शतकातील वाहने ... ... घंटाघर, ... जुनी कोतवाली ... ... इंद्रभुवन थिएटर ... ... नेकोलेट पार्क इत्यादी ... ...
परिशिष्ट क्र. १ ते ५

प्रकरण चवथे

१९ व्या शतकातील 'उमरावती' (पुढे चालू)
(इ. सन १८५३ ते १९००)

इ. सन १८५० मध्ये ब्रिटिश सरकारचे निजामावर पन्नास लक्ष रुपयांचे कर्ज झाले. सब्सीडियरी सैन्याचा पगार सहा सहा महिन्यांचा तुंबला. दोन रुपये शेकडा व्याज देऊनही निजामास कोणी कर्ज देईना. शेवटी इंग्रजी खजिन्यातून सैन्यास पगार देणे सुरू झाले, व निजामाचे पाठीमागे सदर्हु रकमेसाठी तगादा लागला.

वऱ्हाडात इंग्रजी अमदानीस सुरवात : शेवटी दि. ११ मे १८५३ रोजी इंग्रज व निजाम यांच्यात तह होऊन, वऱ्हाड प्रांत ईस्ट इंडिया कंपनीस सदर्हु कर्जापोटी वहिवाटीस देण्यात आला. "वऱ्हाडच्या राज्यव्यवस्थेचा आणि सब्सीडियरी फौजेचा खर्च करून निजामास हिशेव द्यावा व शिल्लक रक्कम निजामास देत जावी." असे ठरले[१].

---

१ : **इ. सन १८५३ च्या, निजाम व इंग्रज तहाचे सहावे कलम:–** "हैद्राबादच्या निजाम सरकारच्या तैनाती फौजेला नियमित पगार मिळावा म्हणून, तसेच बाकी कर्जाचे सहा टक्के व्याज मिळावे म्हणून, तसेच सैन्याची बाकी, खर्च व कर्ज जोपर्यंत परत फेड होत नाही व ज्या कर्जाची आणि थकबाकीची रक्कम एकूण पन्नास लक्ष रुपये आहे त्याचे भरपाईसाठी; निजाम स्वत: स्वखुषीने वऱ्हाडातील सहा सरकार (गावेल, माहुर, वुन, वाशिम, कळंब व बाळापूर) ज्यांचे उत्पन्न सालीना रु. पन्नास लक्ष आहे, ते ब्रिटिश रेसिडेन्ट, 'हैद्राबाद यांच्याकडे वहिवाटीकरिता सोपवीत आहे. जोपर्यंत कर्ज परतफेड होत नाही तोपर्यंत हे जिल्हे (सरकार) रेसिडेन्टच्या स्वाधीन राहतील. याला 'हैद्राबाद असाईन्ड डिस्ट्रिक्टस्' असे नाव राहील. ह्या प्रांताचा कारभार हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेन्टने वेळोवेळी नेमलेल्या कमिश्नर

(पुढील पानावर)

या तहाने वऱ्हाडप्रमाणेच नलदुर्ग व रायचूर दुआब हे दोन प्रदेशही इंग्रजांकडे वहिवाटीस आले होते. या सर्व मुलुखाचा मुख्य अधिकार इंग्रजांच्या हैद्राबाद येथील रेसिडेंटकडे असे.

नलदुर्ग व रायचूर दुआब हा प्रदेश विस्ताराने वऱ्हाडच्या निम्मे होता म्हणून, वऱ्हाडचे दोन जिल्हे व नलदुर्ग, रायचूर हे दोन जिल्हे करून कारभार सुरू झाला. वऱ्हाडचे दोन जिल्हे उत्तर वऱ्हाड व दक्षिण वऱ्हाड असे केले. उत्तर वऱ्हाडात सर्व पाईनघाट म्हणजे ज्यास 'वऱ्हाड' म्हणतात तो येत असून, मुख्य ठाणे बुलढाणा येथे होते व तेथे छावणीही होती. दक्षिण वऱ्हाडचे मुख्य ठाणे हिंगोली येथे होते व त्यात साधारणपणे, ज्यास 'घाट' म्हणतात तो सर्व भाग होता. (त्यावेळी हिंगोली वऱ्हाडात होती. नंतर १८६० च्या तहाने ती निजामाकडे परत गेली. त्याचवेळी नलदुर्ग व रायचूर देखील निजामाला परत देण्यात आले. कारण १८५७ चे बंडाचे काळात निजामाने इंग्रजांना मदत केली होती.)

उमरावतीचा पहिला डेप्युटी कमिश्नर : उत्तर वऱ्हाडात उमरावती येत असे. त्यामुळे उत्तर वऱ्हाडचा पहिला डेप्युटी कमिश्नर हाच उमरावतीचाही डेप्युटी कमिश्नर मानावा लागेल. श्री. टी. एच. बुलक हा उत्तर वऱ्हाडचा पहिला डेप्युटी कमिश्नर होता. इ. सन १८५३ ते दि. १३-९-१८५७ एवढा याचा कार्यकाल आहे. त्यानंतर दि. १४-९-१८५७ ते फेब्रुवारी १८५८ या काळात कॅप्टन मेडोज टेलर[1] हा,('कन्फेशन ऑफ ए ठग' या जगप्रसिद्ध पुस्तकाचा लेखक.) उत्तर वऱ्हाडचा व त्या नात्याने उमरावतीचा डे. कमिश्नर होता. आणि फेब्रुवारी १८५८ ते दिसेंबर १८५८ पर्यंत पुन्हा टी. एच. बुलक हाच त्या जागेवर आला. (नंतरच्या डेप्युटी कमिश्नरांची यादी परिशिष्ट क्र. १ मध्ये दिलेली आहे.)

व इतर अधिकाऱ्यांच्या मार्फत चालविला जाईल."

या १८५३ चे तहाचे दस्तैवजावर ईस्ट इंडिया कंपनीतर्फे हैद्राबादचा इंग्रज रेसिडेन्ट कर्नल जॉन लो यांनी सही केली तर निजाम सरकार तर्फे स्वत: निजाम-उल्-मुल्क आसफजहाँ बहादूर नासिरुद्दौला यांनी सही केली होती. (हैद्राबाद अंडर सर सालारजंग : १८८० : मौ. चिरागअली : पा. ४०८)

१ : कॅ. मेडोज टेलर याचा परिचय, तिसऱ्या प्रकरणाचे परिशिष्ट क्र. ३ मध्ये दिला आहे.

उमरावती'ला वऱ्हाडच्या राजधानीचा मान : इ. सन १८५८ मध्ये वऱ्हाडची पुनर्रचना होऊन, पूर्व वऱ्हाड व पश्चिम वऱ्हाड असे दोन भाग करण्यात आले. त्यावेळी पूर्व वऱ्हाडच्या राजधानीचा मान उमरावती शहरास मिळाला. उमरावतीला आतापर्यंत केवळ व्यापारी महत्त्वच होते, आता राजकीय महत्त्व प्राप्त झाले. पूर्व वऱ्हाडचे मुख्य केंद्रासोबतच संपूर्ण वऱ्हाडच्या ज्युडिशिअल कमिश्नरची कचेरी उमरावतीला ठेवण्यात आली.[१] त्यामुळे उमरावतीला एक प्रकारे वऱ्हाडच्या राजधानीचा मान प्राप्त झाला होता.

इ. सन १८६० मध्ये निजाम व इंग्रजांचा पुन्हा एक तह झाला. त्यानुसार, इंग्रजाचे निजामाकडे असलेले ५० लक्ष रुपयाचे कर्ज माफ करण्यात येऊन, नलदुर्ग, रायचूर, हिंगोली, सुरापुर, धाराशीव वगैरे प्रांत निजामाला परत देण्यात आले. फक्त वऱ्हाड व आपखी थोडासा मुलुख इंग्रजांकडे वहिवाटीस म्हणून राहावा ब वऱ्हाडच्या जमाखर्चाचा हिशेब निजामाने मागू नये, असे ठरले. या तहाने वऱ्हाडची जी हद्द कायम झाली ती आज पर्यंत कायम आहे.

---

१ : "१८५३ मध्ये वऱ्हाड निजामाकडून इंग्रजांनी घेतला. आता तेथे हैद्राबादच्या इंग्रज रेसिडेन्ट मार्फत कारभार चालविला जातो. मेजर सी. बी. साऊन्डर हा वऱ्हाडचा पहिला कमिश्नर नेमला गेला. त्याचे मुख्य कार्यालय उमरावती येथे आहे. कमिश्नर हाच प्रांताचा मुख्य कारभारी आहे. सिव्हिल व मिलिटरी ही खाती त्याच्या हातात आहेत व हैद्राबादच्या रेसिडेन्टच्या आदेशानुसार तो कार्य करतो. हा कमिश्नर मुख्य न्यायाधिशाचे काम देखील पाहतो. तो जेल व पोलिस विभागाचा देखील प्रमुख आहे.

त्याला मदत करण्यासाठी खालील अधिकारी नेमण्यात आले आहेत. ६ डेप्युटी कमिश्नर, १२ असि. कमिश्नर, ९ एक्स्ट्रा असि. कमिश्नर्स.

जेलची व्यवस्था सिव्हिल सर्जन पाहतो. सॅनिटरी कमिश्नर स्वच्छतेकडे लक्ष पुरवितो." (हैद्राबाद अफेअर्स खंड दुसरा : पा. ५०१)

"ज्युडिशिअल कोर्ट उर्फ हायकोर्ट हे वरिष्ट कोर्ट उमरावतीलाच असल्यामुळे वऱ्हाडातील बहुतेक सर्व कामे उमरावतीलाच येत. त्यामुळे ठिकठिकाणची वकील मंडळी धंद्यानिमित्त उमरावतीला वास्तव्यासाठी आली. ज्यु. क. कोर्टावर अपील हैद्राबादचे रेसिडेंटाकडे असे." (कै. मोरोपंत जोशी यांचे चरित्र : प्रस्तावना.)

उमरावती 'जिल्हा' झाला[1]

डिव्हिजन	जिल्हे	तालुके
ईस्ट बेरार डिव्हिजन	उमरावती	उमरावती, मोर्शी, मुर्तिजापूर, चांदूर
	एलिचपूर	दर्यापूर, एलिचपूर, मेळघाट
	वणी	वणी, यवतमाळ, दारव्हा
वेस्ट बेरार डिव्हिजन	आकोला	आकोला, बाळापूर, खामगाव, आकोट व जळगांव.
	बुलढाणा	मलकापूर, चिखली, मेहेकर
	वाशिम	वाशीम व पुसद.

(आधार : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. २४६)

'परगणा' उमरावती ? : इ. सन १८५३ मध्ये वऱ्हाडचे जे परगणे निजामाकडून ब्रिटिशांना वहिवाटीसाठी मिळाले त्यांत 'उमरावती' हा 'परगणा' होता. त्यावेळी वऱ्हाडचे एकूण ९२ परगणे होते. उमरावती परगण्याचे उत्पन्न त्यावेळी रु. ५२,४४२ इतके होते[2].

'उमरावती' हा त्याही पूर्वी परगणा असावा. कारण इ. सन १६४३–४४ मध्ये, कृष्णाजी सर्जेराव गाढे या तत्कालिन मोंगलांच्या सेवेत असलेल्या बड्या सरदाराला "सुभे वऱ्हाड येथील चिखली, औंढा, मुर्तिजापूर, उमरावती व मांडव वगैरे परगण्यात एकूण ४५,५०,००० दामांची जहागीर...होती" असा उल्लेख, हैद्राबाद दप्तरखान्यातील कित्ता क्र ४४८, ४७१ दिनांक १६ मार्च १६४३ व दि. २६ एप्रील १६४४ प्रमाणे मिळतो[3].

त्याच प्रमाणे इ. सन १८५३ मध्ये वऱ्हाडात 'सायर अॅन्ड टाऊन ड्यूटी' या नावाचा कर होता. तो इंग्रजांनी १८५५ मध्ये रद्द केला. या कराचे उत्पन्न रु. ७१, १४४ होते[4].

---

१ : असे दिसते की, वऱ्हाडची सहा जिल्ह्यात विभागणी इ. सन १८५९–६० मध्येच केली गेली. परंतु नंतर काही जिल्ह्यांच्या हद्दी व नांवे बदललीत, काही तालुके एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात टाकण्यांत आलेत.

२ : 'दी निजाम' : ब्रिग्ज : भाग १ : १८६१ पा. ३१३

३ : 'मुघलाच्या सेवेतील काही प्रसिद्ध व अप्रसिद्ध शिवकालीन मराठे सरदार' : गो. त्र्यं. कुळकर्णी : मा. रा. कंटक : भारतीय इतिहास–संस्कृति : पुस्तक ४८ वे. जानेवारी १९७६.

४ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. २६३

No.	Year	Cotton Carts	Cotton Bojas.	Rain Fall
66.	1951.52	1,84,104	787	18.36
67.	1952.53	1,30,043	94	29.69
68.	1953.54	1,40,352	31	35.10
69.	1954.55	1,33,257	140	47.18
70.	1955.56	1,12,520	792	32.34
71.	1956.57	1,75,593	30	25.90
72	1957.58	1,72,417	640	27.81 ■
73.	1958 59	1,49,840	953	45.46 ■
74.	1959.60	1,07,309	837	60 85 ■
75.	1960.61	1,74,589	3,447	34.27 ■
76.	1961-62	1,08,380	3,377	55.27 ■
77.	1962.63	1,48,715	12,770	32.67 ■
78.	1963.64	1,64,779	4,149	26.79 ■
79.	1964-65	1,60,127	25,749	29.42 ■
80.	1965.66	1,44,666	8,658	20.99 ■
81.	1966.67	1,20,379	13,153	31.42 ■
82.	1967.68	1,54,585	2,591	36.12 ■
83.	1968.69	1,81,432	14,112	27.85 ■
84.	1969.70	1,27,032	833	24.29 ■
85.	1970.71	61,947	511	52.90 ■
86	1971.72	1,14,893	280	19.73 ■
87.	1972.73	58,388	—	25.66 ■
88.	1973.74	84,209	—	38.44 ■
89.	1974.75	80,640	—	29.38 ■
90.	1975.76	41,693	—	42.79 ■

■ Indicates the figures for a period from 1st June to 31st May-every year.

(कॉटन मार्केट कमेटी, अमरावतीचे कागदपत्राचे आधारे)

उमरावती जिल्ह्यांतील त्यावेळची प्रमुख गावे : अमरावती, बडनेर बिबी, अंजनगाव बारी, अळणगाव, भातकुली, खोलापूर, मुर्तिजापूर, कारंजा (लाड), तळेगाव, उम्बरडा, चांदूर (रेल्वे) ही होती[1].

कसबा व पेठ : इ. सन १८७० मध्ये उमरावती शहर 'कसबा आणि पेठ' अशा रीतीने दोन भागात विभागलेले होते[2].

'कसबा' म्हणजे शहराचा जुना भाग[3] आणि 'पेठ' म्हणजे शहरात नवीन बसलेला व ज्यात दुकान ओळ आहे असा भाग, हा येथे अर्थ घ्यायचा. याच अर्थाने त्यावेळी 'कसबा आणि पेठ' मानले जात असत[4].

इ.स. १८५७ चे बंडाच्या काळातील उमरावती

तात्या टोपे उमरावतीवर येऊन हल्ला करणार या भीतीने–
इंग्रजांनी केलेली संरक्षणाची जय्यत तयारी.

"इंग्रजांचे ताब्यात आलेल्या वऱ्हाड प्रांतात या बंडाचे काळात पूर्ण शांतता होती. जनतेने राज्यसत्ता बदलण्याची कोणत्याच प्रकारे इच्छा व्यक्त केली नाही. इंग्रजी राज्यात शांतता होती व जनता प्रगती करीत होती. इ. सन १८५८ मध्ये नोव्हेंबर महिन्यात जेव्हा तात्या टोपे वऱ्हाडच्या उत्तर सीमेवर आला त्यावेळी एकाएकी बंडाचे वातावरण व भीती निर्माण झाली. त्यावेळी लहान–थोर प्रत्येक जण इंग्रजी सैन्याला स्वखुशीने व कष्ट सहन करून मदत करीत होता.

यावेळी इंग्रज सैन्याची कुमक पाठविण्यात आली व वऱ्हाडातील सर्वात मोठे व्यापारी शहर उमरावती (Oomraotee) च्या संरक्षणाची जय्यत तयारी करण्यात आली[5]."

---

१ व २ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७० : पा. २६३
३ : रेव्हेन्यू अॅन्ड फिनान्स इन् मराठा अॅडमिनिस्ट्रेशन : वशिष्ट : पा. १५४
४ : कसबा व पेठ'चा अधिकृत अर्थ, प्रकरण १ मध्ये पान २७ वर दिलेला आहे.
५ : दि निजाम; हेन्री जॉर्ज ब्रिग्ज; भाग दुसरा; १८६१ : पृष्ट ८७–८८

"दि. १ नोव्हेंबर १८५८ रोजी खाली नमूद केल्याप्रमाणे इंग्रज व निजामाच्या फौजा ब्रिगेडियर हील याच्या हाताखाली उमरावती येथे एकत्र जमल्या.

१ : बोलारामहून – पहिल्या पायदळ रेजिमेन्टच्या तीन पलटणी, दुसऱ्या घोडदळ कम्पनी व तोफखान्याची एक तुकडी.

२ : औरंगाबादहून – दोन पायदळ बटालियन, दोन मोठ्या तोफा व तोफांची तुकडी.

३ : हिंगोलीहून– तिसऱ्या पायदळ रेजिमेन्टच्या तीन कम्पनी, एक घोडेस्वाराची तुकडी व दोन तोफा.

४ : मोमिनाबादेहून – घोडेस्वारांची एक तुकडी.

५ : ईलिचपूरहून – तोफखान्याची एक तुकडी व बारा तोफा.

तात्या टोपे मुलताईला आला अशी बातमी मिळताच वऱ्हाडातील महत्त्वाचे शहर उमरावतीच्या संरक्षणासाठी ही कारवाई करण्यात आली होती. तात्या टोपे दक्षिणेकडे आला नाही व त्याचा सामनाही झाला नाही. रोहिले आणि अरब यांचेशी सामना झाला. ही सैनिक कारवाई मार्च १८५९ पर्यंत चालू होती...[१]"

उमरावती शहराच्या संरक्षणासाठी इंग्रजांनी एवढी जय्यत तयारी केली. शहराला सुमारे चार–पांच महिने युद्धक्षेत्राचे स्वरूप आले होते. तोफा आणि फौजेचे सभोवार मोर्चे बांधले होते. परंतु तात्या टोपे सातपुड्यातून खाली उतरलाच नाही. तो परस्पर मेळघाटात व तेथून नर्मदा पार करून उत्तरेला गेला. उमरावतीला फौजेचा मुक्काम होता त्या काळात येथील लोक इंग्रजी फौजेला स्वखुषीने मदत करीत होते.

याचे कारण संभवतः वऱ्हाडचे जनतेला इंग्रजी सत्तेचा अल्प काळातच आलेला चांगला अनुभव हेच असावे. केवळ ४–५ वर्षांचे इंग्रजांचे कारकिर्दीत वऱ्हाडी रयतेला शांतता व सुरक्षितता लाभली. त्या पूर्वी निजामाचे काळातील पन्नास वर्षात वऱ्हाडी प्रजेचे जे हाल झाले त्या पार्श्वभूमीवर ही चार–पांच वर्षे सुखासमाधानाची गेली. त्यामुळे पुन्हा अराजक निर्माण होईल या भीतीने वऱ्हाडच्या रयतेने या बंडाकडे दुर्लक्ष केले असावे.

---

१ : हैद्राबाद पलटणीचा इतिहास : मेजर आर. जी. बर्टन : १९०५ : पृ. २४०

या बंडाचे काळात जरी उमरावती शहर आणि वऱ्हाड प्रांतातून काहीही घडले नसले तरी, जनतेतून इंग्रजाविरुद्ध उठाव व्हावा असा प्रयत्न मात्र झाला होता.

"१८५७ च्या बंडाचा वीर सेनानी तात्या टोपे हा १८५८ मध्ये मध्यभारतातून मेळघाट विभागात आला व त्याने तेथील भिल्ल, कोरकू, गोंड या लोकांना इंग्रजाविरुद्ध चिथावले, कॅप्टन मेडोज टेलर हा त्यावेळी या विभागाचा डेप्युटी कमिश्नर होता. त्याने मेळघाटच्या राजाच्या इंग्रज भक्ती बद्दल प्रशंसा केली आहे[१]."

पुढे "उमरावतीला एकत्र झालेली इंग्रजांची फौज घेऊन, ब्रिगेडियर हील हा गाविलगडला गेला आणि कॅप्टन स्कॉटला त्याने वरुडच्या दिशेने पाठविले[२]."

बंडवाल्यापासून उमरावती शहराचे संरक्षण व्हावे म्हणून इंग्रजांनी उमरावतीचे सभोवार प्रचंड फौज व तोफा उभ्या केल्या होत्या. त्यावेळी उमरावतीचे लोक इंग्रज सैन्याला स्वखुषीने शक्य ती मदत करीत होते. कारण त्यांना पुन्हा निजामी किंवा त्या प्रकारची कोणतीही राजवट नको होती असे दिसते.

उमरावतीत १८५७ चे योद्धे ? : इ. सन १८५७ च्या बंडानंतर सर्वत्र धरपकड सुरु झाली. बंडवाल्या लोकांबरोबर साधु, बैरागी, सन्याशी अशाही लोकांना संशयित व्यक्ति म्हणून कंपनी सरकारने पकडण्याचा सपाटा सुरू केला. त्याला कारणही तसेच होते. बंडात भाग घेणारे कित्येक लोक आपण पकडले जाऊ नये म्हणून वेष पालटून साधु-सन्यासी बनले होते. त्या सुमारास वऱ्हाडात जी सार्वत्रिक धरपकड झाली तीत आळंदीचे स्वामी नृसिंह सरस्वती व त्यांच्या सहवासात नेहमी असणारे दादा दांडेकर हे दोघेही पकडल्या गेले. त्यांना गाविलगडच्या किल्ल्यात कोंडून ठेवण्यात आले.

---

१ : अमरावती जिल्हा गॅझेटियर : १९११ : द्वितिय आवृत्ति : १९६८ : पृ. ११५-१६

२ : हैद्राबाद पलटणीचा इतिहास : बर्टन : पृ. २४०

ज्या ठिकाणी या दोघांना ठेवण्यात आले होते त्याच ठिकाणी आणखी एक तिसरा इसमही होता.

बंदीवासाचा कंटाळा आला व रात्रीचे वेळी बरे वाटेना. तेव्हा एके दिवशी रात्री साडेतीन–चार वाजताचे सुमारास स्वामी दादांना म्हणाले 'दादा आपल्याला येथे राहण्याचा कंटाळा आला. आपले सामान गुंडाळ, आपण निघू.' स्वामींची ही आज्ञा ऐकून दादांनी सामान गुंडाळले व बाहेर पडण्याची तयारी केली. हे लोक खरेच जाणार असे वाटून खोलीतील तिसरा इसम स्वामींना म्हणाला 'महाराज बाहेर अंधार फार. जंगलचा रस्ता व जंगली जनावरांची भीती. तेव्हा तुम्ही कसे जाणार?' हे ऐकून स्वामी म्हणाले 'आमचे करता बाहेर घोडे तयार आहेत' त्यावर तो तिसरा इसम पुन्हा म्हणाला, 'मग महाराज मी येऊ काय?' स्वामी म्हणाले 'येणार असलास तर ये. पण मला जास्त विचारायचे नाही व मी सांगेन ते ऐकले पाहिजे.' ते सर्व त्या इसमाने कबूल केले. त्याप्रमाणे बोलणे झाल्यावर तिघे बाहेर जाण्यास निघाले. पाहतात तो सर्व पहारेकरी गाढ झोपलेले व सर्व दरवाजे उघडे; तेव्हा त्यांना अडविणार तरी कोण? हा देखावा पाहून तो तिसरा इसम आश्चर्यचकित झाला. बाहेर पडतात तो एक इसम दोन घोडे व एक मशाल घेऊन उभा होता. हे पाहून तर त्या तिसऱ्या इसमास अधिकच नवल वाटले. नंतर स्वामी म्हणाले "मी एका घोड्यावर बसतो व दुसऱ्या घोड्यावर दादा बसेल. त्याच्या मागे डोळे मिटून तू त्याला धरून बैस." या प्रमाणे दोन घोड्यावर तिघे जण स्वार झाले. रस्ता पहाडी, किर्रं जंगल, पण घोडे इतक्या वेगाने निघाले की, उजाडण्याचे आत ते परतवाड्यास व तेथून दिवस उजाडण्याचे आत तिघही उमरावतीत– लक्ष्मीनारायण मंदिर आहे तेथे– दाखल झाले.

गाविलगड ते उमरावती हे अंतर सुमारे ६५ मैलाचे आहे. एवढे अंतर तीन तासात घोड्यावरून येणे शक्य नाही असे वाटून त्या तिसऱ्या इसमाने स्वामीस म्हटले 'महाराज, आपण येथपर्यंत तर आणले पण पुन्हा मी पकडला गेलो तर काय करू?' तेव्हा स्वामी त्यास म्हणाले 'तू येथेच राहिलास तर ईश्वर तुला सांभाळेल'. नंतर स्वामी जवळच दत्तमंदिरात उतरले व हा तिसरा इसम, त्यास उतरवून दिले

होते त्या ठिकाणीच, अखेर पर्यंत राहिला. पुढे त्याने तेथेच समाधी घेतली. वरील हकिकतीतील तिसरा इसम म्हणजे विठ्ठलगीर बोवा. त्यांची समाधी उमरावतीस लक्ष्मीनारायण मंदिरात आहे.[१]"

विठ्ठलगीर बोवा हे १८५७ च्या बंडातील योद्धे होते अशी भावना त्यांचे हयातीतच येथील लोकांत होती. कारण बोवा स्नान करताना बंद जागेत स्नान करीत असत, असे सांगितले जाते. बोवांचा जेव्हा मृत्यू झाला आणि स्नानासाठी अंगावरील कपडे काढले, तेव्हा त्यांच्या सर्वांगावर जखमांचे व्रण होते असे म्हणतात.

आळंदीचे स्वामी नृसिंह सरस्वती यांना संशयावरून पकडून इंग्रजांनी त्यांना जेव्हा गाविलगडच्या किल्ल्यात नजरबंद केले तेव्हा, त्यांच्या पूर्वीच पकडलेलें विठ्ठलगीर बोवा हे गाविलगडच्या किल्लघात इंग्रजांचे कैदी होते हे वरील हकीकतीत आले आहेच. त्यावरून त्यांचा बंडाशी संबंध होता असे वाटते. त्यांच्या शरिरावरील जखमांचे व्रण हा त्याला पुष्टी देणारा पुरावा होय. अर्थात विठ्ठलगीर बोवा हे १८५७ च्या बंडातील योद्धे आहेत ही जी भावना त्याकाळी लोकांत होती ती अस्थानी नव्हती असे म्हणायला हरकत नाही.

विठ्ठलगीर बोवांची समाधी व एक मोठी तसवीर श्री लक्ष्मीनारायण मंदिर (भाजीबाजार) येथे आहे. त्यांचे वास्तव्य बहुतेक या मंदिरातच होते असे सांगितले जाते.

"दुसरे एक साधु पुरुष अंबादेवीचे मंदिराजवळील एका वाड्यात राहत असत. त्यांचे नांव नित्यानंद स्वामी. त्यांचे बद्दलही लोकात अशीच कल्पना होती की ते १८५७ च्या बंडातील कोणीतरी असावेत. त्यांचे जवळ गुप्ती वगैरे हत्यारे असत[२]."

१८५७ चे बंड अयशस्वी ठरले. या बंडाशी ज्यांचा ज्यांचा संबंध होता किंवा तसा संशय आला त्यांना इंग्रजांनी फासावर चढविले किंवा तोफेच्या तोंडी दिले अथवा अन्य शिक्षा दिल्या. या भयाने घाबरून कित्येक

१ : श्री आळंदीचे स्वामी : पाळेकर : १९६२ : पृ. १०८–९
२ : कै. टिकेकर मास्तरांची आठवण.

बंडवाले लोक देशाच्या निरनिराळ्या भागात जाऊन, वेष पालटून अज्ञातवासात राहत असत. त्यामुळे वरील साधु पुरुषांचे बाबतीतही लोकांची शंका खरी असावी व हे साधु १८५७ च्या बंडाशी संबंधित व्यक्ती असावेत, असे मानल्या जात होते. उमरावतीतील वरील दोन साधूबद्दल लोकांची हीच धारणा होती व अखेर पावेतो ती कायम होती.

'वऱ्हाड' भरू लागला : निजामाचे वऱ्हाडावरील कारकिर्दीत जे लोक शेती–जमिनी वगैरे सोडून पळून गेले होते ते, इंग्रजांची सुव्यवस्थित कारकीर्द सुरू झाल्यानंतर लवकरच जन्मभूमीच्या स्वाभाविक आकर्षणामुळे परत येऊन आपापल्या जमिनी वाहू लागले व वऱ्हाड पुन्हा भरत चालला. वऱ्हाडच्या जमिनीच्या सुपीकपणाची लांबवर ख्याती होती. सन १८७० मध्ये अमेरिकन लढाईमुळे वऱ्हाडचे कापसास अतोनात भाव आल्याने विजेच्या गतीने कापसाच्या धंद्यास वेग मिळाला व कापसाचा पेरा फार वाढला+ त्यांत शेतकऱ्यांस उत्तेजन मिळून सर्व जमिनी वहीत झाल्या. कापसाच्या पेऱ्याबरोबरच वऱ्हाडात जीन प्रेस सुरू झालेत, मजुरांना नवा रोजगार मिळाला. बाहेरच्या प्रांतातून लोक मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या आशेने वऱ्हाडात येऊ लागले. त्यांतच शिक्षणाला सुरुवात झाली. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील पुणे–मुंबई–मद्रास कडील अनेक लोक वऱ्हाडात आले. रखवालीसाठी पुरभय्ये आले. मारवाडी व्यापारी मोठ्या प्रमाणात आलेत. याप्रमाणे वऱ्हाडची आबादी आबाद अशी स्थिती होऊन लोकांनी इंग्रजी राजवटीचे स्वागतच केले. न्यायालये उघडली गेली. शाळा, हायस्कुले सुरू झाली. पोलिस विभाग सुरू झाला. जमिनीचा नवा बंदोबस्त करण्यात आला. वऱ्हाडात रेल्वे लाईन आली, अशा अनेक सुधारणांनी वऱ्हाड गजबजून गेला. वऱ्हाडातील रयतेला राजसत्तेचा हा नवा अनुभव येऊ लागला होता.

उमरावती'ची आणखी भरभराट : वऱ्हाडात वरील सुधारणा, सोई वगैरे सर्वत्र झाल्या. त्यांत उमरावतीला अग्रक्रम होता. पूर्व वऱ्हाडच्या कारभाराचे आणि वऱ्हाडच्या ज्युडिशिअल कमिश्नरचे उमरावती हे केंद्र

+ "इ. सन १८७० पावेतो, वऱ्हाडमध्यप्रांतातील जास्तीत जास्त शेतजमीन कापसाच्या पेऱ्या खाली आणण्यात आली. त्यामुळे धान्य उत्पादन घटले." अशी माहिती, मध्यप्रांत गॅझेटीयर १८७० मध्ये पान ३३५ वर दिलेली आहे.

होते. त्यामुळे उमरावतीला अनेक सरकारी दप्तरे उघडली गेली. शिवाय उमरावती जिल्हा झाल्यानंतर उमरावती हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाणही झाले. १८७० मध्ये कापसाला अतोनात भाव आला, तेव्हा उमरावतीचा कापूस व्यवसाय एकदम भरभराटीस आला. त्यासाठी मुंबईच्या युरोपियन फर्मच्या व भाटिये व्यापाऱ्यांच्या कापूस खरेदीच्या शाखा येथे सुरू झाल्या[१]. जीन-प्रेस तेलघाण्या इत्यादी उद्योग सुरू झाले.

सरकारी इमारती : उमरावती शहराला जेव्हा प्रशासकीय महत्त्व मिळू लागले, तेव्हा इ. सन १८५९ ते १८७०-७१ पावेतो येथे अनेक सरकारी इमारती झपाट्याने बांधण्यात आल्या. रेल्वे स्टेशन इ. स. १८५९ मध्ये बांधले गेले. डेप्युटी कमिश्नरचा बंगला १८६० मध्ये बांधला. स्मॉल कॉज् कोर्टाची इमारत (हल्लीचे एस. डी. ओ. कोर्ट) इ. सन १८६८ मध्ये बांधण्यात आली. त्याला खर्च रु. ४५,१८३ आला. तहसील कचेरीची इमारत १८७० मध्ये बांधली. त्यास खर्च रु. ३४,४४७ आला. हेड पोस्ट ऑफिसची आणि त्या शेजारची तार व टेलिफोन खात्याची इमारत इ. स. १८७१ साली बांधल्या गेली. त्यास खर्च रु. १६,८७१ आला. याशिवाय कापूस बाजार, कमिश्नर कचेरी (हल्लीचे कलेक्टोरेट), डे. कमिश्नर कचेरी, एक्झीक्युटिव्ह इंजिनिअरचा बंगला, कॅम्प पोस्ट ऑफिसची इमारत, सिव्हिल दवाखाना कॅम्प, पोलिस रिझर्व्ह लाईन, प्रवासी बंगला (माल टेकडी रोड) आणि १८६६ मध्ये ४९४ कैद्यासाठी जिल्हा कारागृहाची इमारत इत्यादि इमारती (कॅम्प विभागात) बांधल्या गेल्या. कॅम्प विभागात एकूण १७ बंगले होते.[२]

---

१. "अमेरिकन स्वातंत्र्य युद्धामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेवर फार मोठा परिणाम घडून आला. महाराष्ट्रात मुख्यत्वेकरून 'वऱ्हाड' कापूस निर्यातीचे केन्द्र बनले. वऱ्हाडचा कापूस इंग्लंडला निर्यात होत असे. तसेच मुंबईच्या गिरण्यांना देखिल वऱ्हाडच्या कापसाचा पुरवठा केला जाई. नागपूर-मुंबई मार्गावर सर्व प्रथम लोहमार्ग निर्माण झाल्यामुळे वाहातुकीची अडचण फार मोठ्या प्रमाणात दूर झाली व त्यामुळे कापसाची निर्यात बेसुमार वाढली." (दी इंडियन कॅपिटालिस्ट क्लॉस : व्ही. जे. पावलॉ : १९६४, पा. ३२४).

२. गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७०

दळणवळणाचे क्षेत्रात क्रांती : इ. सन १८५३ साली भारताच्या दळणवळणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व अशी क्रांती घडून आली. दिनांक १६ एप्रील १८५३ रोजी मुंबई ते ठाणे या मार्गावर रेल्वे सुरू झाली आणि तेथून केवळ ६ वर्षाचे आतच ही रेल्वे वऱ्हाडात आणि खुद्द उमरावती शहरापर्यंत येऊन पोचली.

बैलगाडीने किंवा घोड्याने प्रवास करण्याखेरीज प्रवासाचे दुसरे साधन ज्या लोकांना कधी कल्पनेतही माहीत नव्हते, अशा भारतीय प्रजेला १६ एप्रील १८५३ चा हा रेल्वेचा चमत्कार पाहून फार आश्चर्य वाटले. बैल किंवा घोडे जोडल्या शिवायच हा 'अग्निरथ' जेव्हा वेगावे धावू लागला, तेव्हा लोकांनी अक्षरक्षः तोंडात बोटेच घातली.

उमरावतीला इ. सन १८५९–६० मध्ये प्रत्यक्ष रेल्वे आली तेव्हा ती पहाण्यासाठी लोकांनी गर्दी केली असावी. असे सांगतात की इंजिनासमोर अनेकांनी नारळे फोडली. उमरावतीत रेल्वे आली त्यावेळी लोकांच्या मनाची स्थिती कशी झाली ह्याची माहिती मिळत नाही आणि त्यावेळी प्रत्यक्ष रेल्वे पाहणारी उमरावतीची एकादी व्यक्ती आज हयात असण्याचा संभवही नाही. कारण त्या घटनेला आज ११७ वर्षे होत आहेत. आणि एवढा दीर्घायू पुरुष मिळणे शक्य नाही. तरीपण त्यावेळी उमरावतीस काय घडले असावे, लोकांच्या मनाची स्थिती, रेल्वे इंजिन व डबे पाहून कशी झाली असावी, याचा कयास करता यावा म्हणून दि. १६ एप्रील १८५३ रोजी मुंबई येथे आगीची गाडी प्रथम सुरू झाली त्यावेळचे वर्णन येथे देत आहोत–

"त्या दिवशी सर्व सरकारी व सावकारी कामगारास सुटी मिळाली होती. हा समारंभ पाहण्यास गावोगावाहून हजारो लोक मुंबईस जमले होते. गाडी चालू होण्यापूर्वी दोन तीन तास बोरीबंदरापासून परळपर्यंत लोकांचा समुदाय जमला होता. आणि जेव्हा गाडी चालताना लोकांच्या दृष्टीस पडली, तेव्हा तिचा वेग पाहून ते मोठे चकित झाले आणि घडीघडी टाळ्या पिटून आपला हर्ष दाखवू लागले[१]."

मुंबईच्या लोकांची ही स्थिती तर, वाफेच्या भीमकाय इंजिनाला जोडलेले हे डबे, जेव्हा रुळावरून इंजिन ओढू लागले तेव्हा उमरावतीच्या

१ : मुंबईचे वर्णन : माडगांवकर : १८६३ : पा. २३०–३१

लोकांनीही घडीघडी टाळ्या पिटून हर्ष व्यक्त केला असेल, आणि हा चमत्कार पाहून ते अक्षरशः आश्चर्य चकित झाले असतील, यात मुळीच शंका नाही.

आगगाडीवर त्यावेळी केलेला हा 'कटाव' पहा. रेल्वे सुरू झाल्यानंतर किंवा रेल्वे पाहिल्या नंतर, त्यावेळच्या लोकांच्या मनाची स्थिती काय झाली होती ते या 'कटावा'त उत्तम रीतीने वर्णन केले आहे.

कटाव.

हिंदुस्तानी आगीची गाडी,
तिला बांधला मार्ग लोखंडी,
मनाचाही वेग मोडी,
मग कैची हत्ती घोडी,
पाहुन झाली माणसे वेडी,
पाऊण तासात ठाण्यास धाडी,
वृद्ध तथापि म्हणती लबाडी,
गरिबांचा व्यापार मोडी,
हिंदुस्थाना दरिद्र जोडी,
ऐसे म्हणती हिंदु खंडी.[१]

यात त्यावेळच्या जनतेच्या मनाची स्थिती उत्तम रीतीने दाखविली आहे. उमरावतीकर नागरिकांची स्थिती यापेक्षा वेगळी असेल असे वाटत नाही. ज्या दिवशी अमरावती स्टेशनवर रेल्वे आली असेल त्यादिवशी तेथे ती पाहण्यासाठी हजारो लोक जमले असतील, त्यांनी हा चमत्कार पाहून तोंडात बोटे घातली असतील, तर कित्येकांना हयात इंग्रजांची लबाडी दिसली असेल.+

---

१ : मुंबईचे वर्णन : माडगावकर : १८६३ : पा. २३१

+ आगगाडी सुरू झाल्यावर अनेक गीते रचल्या गेली. अशाच एका लोक गीतातील पुढील ओळी पाहण्यासारख्या आहेत–

साहिबाचा पोर्गा मोठा नकली रे । बिन बैलान गाडी कशी 'धकली' रे ॥

यातील 'धकली' हा खास वऱ्हाडी शब्द आहे. चालू होणे, सुरू होणे या अर्थी 'धकणे' हे क्रियापद फक्त वऱ्हाडी बोलीतच आढळते. यावरून, वरील ओळी ज्या लोकगीतातील आहेत, ते गीत वऱ्हाडातच आगगाडी सुरू झाली त्या काळात रचले असावे. (प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी दिलेली माहिती)

इ. सन १८५३ साली सर्व प्रथम मुंबई–ठाणे अशी रेल्वे सुरू झाली आणि तेथून ५–६ वर्षांतच ती वऱ्हाडापर्यंत आणण्याचा इंग्रजांचा मुख्य हेतू "... इंग्लिश गिरणीमालक कंपूला स्वतःच्या गिरण्यांसाठी कमी खर्चाने कापूस व इतर कच्चा माल मिळविणे ..." हाच होता. पण भारतातील परंपरागत दळणवळणाचे क्षेत्रांत जी रेल्वेमुळे क्रांती झाली ती पाहून "...हिंदुस्थानात सुरू झालेली रेल्वे खरोखरी आधुनिक उद्योगधंद्याची अग्रदूतच ठरेल...[१]" अशी भविष्यवाणी त्याच वेळी महर्षी कार्ल मार्क्स यांनी एका लेखातून व्यक्त केली होती, ती पुढे अक्षरशः खरी ठरली.

हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर रेल्वे तयार करण्यास गव्हर्नर–जनरल लार्ड डलहौसी याने १८५३ साली चालना दिली. "रेल्वे अस्तित्वात आणल्याने व्यापारी व सामाजिक दृष्टीने हिंदुस्थानचा जो फायदा होईल, त्याचा आज कितीहि अंदाज केला तरी तो अपुराच ठरेल, असे मला खरोखरीच वाटते..... हिंदुस्थानात सध्या काही प्रमाणात कापसाची पैदास होत आहे व परदेशात पाठविण्यासाठी दूरवरच्या आतल्या भागातून बंदरापर्यंत कापूस पोचविण्यास वाहातुकीची योग्य साधने जर पुरविली तर चांगल्या जातीचा भरपूर कापूस हिंदुस्थानात होऊ शकेल. इंग्लंडमध्ये या कापसास अतोनात मागणी आहे. व्यापाराच्या सोयीत जेवढी वाढ करण्यात येते तेवढी हिंदुस्थानातील अगदी दूरवरच्या बाजार पेठात युरपच्या मालाला जास्त मागणी येते, हे आपण पाहिलेच आहे. पृथ्वीच्या या भागात अशा परिस्थितीमध्ये आपणाला नव्या बाजारपेठा खुल्या होत आहेत की आज त्याचे महत्त्व किती व पुढे त्यांचा विस्तार किती वाढणार याचा अंदाज करणे अत्यंत दूरदर्शी लोकांना सुद्धा अशक्य आहे[२]." यावरून हिंदुस्थानात रेल्वे सुरू करण्यामागील इंग्रजांचा हेतू स्पष्ट होतो. वऱ्हाडात व उमरावतीला रेल्वे आणण्यातही इंग्रजांनी हीच दूर दृष्टी ठेवली होती.

उमरावती शहरात रेल्वे आली आणि थोड्या वर्षांतच येथील उद्योगधंदे वाढीला लागले. ज्या उद्योगात यंत्रे आहेत असे जीन–प्रेस, तेल–घाण्या शहरात सुरू झाल्या त्यांत कामगारांना हंगामी वा कायम

१ : मार्क्स : 'हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवटीचे भावी परिणाम' : न्यूयार्क डेली ट्रिब्युन, दि. ८ ऑगस्ट १८५३

२ : लार्ड डलहौसी (गव्ह.-जनरल १८४८–५६) 'रेल्वे संबंधी खलिता,' १८५३

रोजगार मिळू लागला. ज्या ज्या भागातून रेल्वे गेली त्या त्या भागाचा कायापालट होऊ लागला.

टपाल (डाक) सेवा : निजामाचे काळात : पत्रे नेणाराला 'हरकारा' असे म्हणत. निजाम आसफजहाँ (१७६३–१८०३) याने डाक विभाग स्वतंत्र केला व 'दरोगा–ए–हरकारा' या एका व्यक्तीची (अधिकाऱ्याची) नेमणूक केली. प्रत्येक जिल्ह्यांत यासाठी एक प्रमुख अधिकारी नेमला जात असे. त्याला 'वाकिया–बिगार' असे म्हणत.

वऱ्हाडात सिकंदरजहाँने खालील डाक चौक्या स्थापन केल्या होत्या व त्यांचा वार्षिक खर्च खालील प्रमाणे मंजूर केला होता.

१)	वाशिम (किंवा बासन)	रु. १४०
२)	एलिचपूर	रु. ३२७
३)	बाळापूर	रु. १५०
४)	खोलापूर	रु. १३०
५)	माहूर	रु. १३७[१]

नबाब शिकंदरजहाँने जुनी पद्धत मोडून नवीन लायसेन्स पोस्ट पद्धत सुरू केली. डाक व्यवस्थेसाठी, संपूर्ण निजाम राज्याकरिता एका व्यक्तीला ठेका दिला जात असे. हा ठेकेदारच सर्व डाक चौक्यांची व्यवस्था पाहत असे. याचा पहिला ठेकेदार राजा गिरधारीलाल हा होता. तत्कालिन पद्धतीप्रमाणे राजा गिरधारीलाल याला वऱ्हाड सुभ्यात 'धामोरी' या गावची जहागीर देण्यात आली होती.[२] या गावचे वार्षिक उत्पन्न १८००० रु. होते.

या डाक पद्धतीनुसार (१) चार तोळे वजनाचे पत्राला ४ आणे व (२) पार्सल ९० तोळे पर्यंत दोन रुपये, असा दर होता.

निजाम– इंग्रज संयुक्त डाक व्यवस्था : इ. स. १८३८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने निजाम सरकारशी टपाल ने–आण करण्यासाठी एक

---

१ : आसफिया रेकार्ड : डाक्युमेंट नं. ४१११;
२ : डाक्युमेंट नं. ४२

करार केला होता. त्यानुसार, निजाम सरकारच्या वऱ्हाड प्रांतातून खालील टपाल मार्ग होते–

१ मुंबई–एलिचपूर (४२६ मैल) मार्गे पुणे, औरंगाबाद, जालना.
२ मुंबई–उमरावती (४३९ मैल) मार्गे पुणे, औरंगाबाद, जालना.
३ हैद्राबाद–उमरावती मार्गे हिंगोली, वाशिम, कारंजा.
४ हैद्राबाद–शहाजहांपूर (दिल्ली) मार्गे हिंगोली, वाशिम, कारंजा, एलिचपूर, इंदोर.
५ उमरावती ते बैतुल, मार्गे एलिचपूर[१].

या काळात देशातील ज्या ज्या भागावर इंग्रजांचा ताबा होता त्या त्या भागात त्यांनी इंग्रजांच्या पद्धतीने टपाल ने–आण करण्याची व्यवस्था केली होती.

"इ. स. १८६१ साली सर्व हिंदुस्थानात एकूण ९१४ पोस्ट ऑफिसे होती. एकूण ४३,५५१ मैल मार्गावरून टपाल ने–आण होई. त्यापैकी १,०१६ मैल रेल्वेमार्ग, ५७४ मैल गाड्यातून आणि २६,७८५ मैल जासूद अगर बोटीतून व जहाजाने डाक नेली जाई[२]."

उमरावतीत इ. स. १८७० मध्ये पोस्ट आणि टेलिग्राफ विभागाने कार्यालये उघडली. "काशी ते रामेश्वरापर्यंत भरतखंडाच्या कोणत्याही भागात पत्र पाठवायचे असले तर, दर पावतोळा वजनास अर्धा आणा (दान पैसे) पडे, व ते पत्र एका पासून दहा दिवसाचे आत, जसे अंतर असेल त्या प्रमाणे, नेमलेल्या ठिकाणी जाऊन पोहोचे. त्याच प्रमाणे पुस्तके वगैरे दुसरा माल टपालातून पाठविता येई[३]."

त्या काळी उमरावती ते एलिचपूर तांग्याने टपाल ने आण होई.

या प्रमाणे जुनाट पद्धतीचे टपाल सेवेत क्रांती घडून आली. इंग्रज सरकारच्या या उपक्रमाचेही लोकांनी स्वागत केले. उमरावतीच्या नागरिकांची अल्प खर्चात दूर दूरवर टपालाने खुशाली कळविण्याची सोय झाली

१ : डाक्युमेंट नं. ४२१३ : राज्य अभिलेखागार, हैद्राबाद.
२ व ३ : मुंबईचे वर्णन : माडगांवकर : १८६३ : पा. २०७



चित्र क्र. ४४ : कमिश्नर कचेरी (हल्लीचे कलेक्टोरेट) (पृष्ठ १८५ पहा)



चित्र क्र. ४५ : जुनी बँक बिल्डिंग, धनराज लेन (पृष्ठ १९१ पहा)

या इमारतीत 'बँक ऑफ बॉम्बे' ची शाखा होती व
नगरपालिकेची सुरुवातीची कचेरीही येथेच होती.



चित्र क्र. ४६ : उमरावती टाऊन म्यु. कमेटी. (पृष्ठ १९४ पहा)



चित्र क्र. ४७ : श्रीनारायण रामबिलास चाळ. (पृष्ठ १९४ पहा)
एक भाग (पूर्वी येथे जेल होता. नंतर येथे म्यु. कार्यालय आले.)

इंग्रजी राजवट सुरू होऊन अल्प काळ झाला तोच, उमरावतीत रेल्वे, पोस्ट, तार सेवा, इंग्रजी पद्धतीची न्यायालये, सरकारी मुख्यालये इत्यादी सुरू झाली. निजामाचे कारकिर्दीचा पन्नास वर्षे अनुभव घेतलेल्या उमरावतीच्या (आणि वऱ्हाडच्या) जनतेच्या मनाची स्थिती या सुधारणांनी काय झाली असेल याची कल्पना केलेलीच बरी. सन १८५९ ते १८७१ हा काळ उमरावतीकर जनतेच्या दृष्टीने चमत्काराचे युग बनला होता.‡

उमरावतीची पहिली बँक व चलनी नोटा : या सुधारणा सोबतच चलनी नोटा सुरू करण्यात आल्या. तेव्हा लोकांनी प्रथम प्रथम त्या नोटा सराफ बाजारात बट्टा देऊन त्याचे कलदार घेतले. सुरवातीला लोकांचा नोटांवर विश्वासच बसेना. नंतर इ. स. १८६८ मध्ये उमरावतीला 'बँक ऑफ बॉम्बे' या बँकेची शाखा उघडली. ही उमरावतीची पहिली बँक. कर्ज मिळण्याची व ठेव ठेवण्याची लोकांची सोय झाली+.

इ. सन १८६६ साली उमरावती येथे रॅली ब्रदर्स या युरोपियन व्यापारी फर्मने कापूस खरेदी सुरू केली व त्या सोबतच बँकिंगचा धंदाही सुरू केला. इतर खाजगी सावकारी पेढ्या चालू होत्या. त्यात धनराज

‡ "पेशवाई मोडून टोपीवाल्याच्या राज्याची जेव्हा स्थापना झाली तेव्हा म्हणजे पेशवाईच्या अखेरच्या सावळ्या गोंधळात वाढलेल्या लोकांचे लक्ष स्वभावतःच साहेब लोकांच्या टापटीपेकडे वेधले गेले. आगगाड्या, तारायंत्रे, यांचे त्यावेळी सर्व लोकांस मोठे कौतुक वाटून टोपीवाल्यांच्या हुशारीने ते सर्व चकीत होऊन गेले. स्वराज्य गेल्याबद्दल जरी काही थोड्या लोकांना खेद वाटत होता व इंग्रजाकडून कोणत्याही प्रकारचे इनाम अगर बक्षीस न घेण्याचा त्यांचा संकल्प होता तरी, एकंदरीत सामान्य जन-समुदायात ही क्रांती त्यावेळी फायदेशीर व संतोषदायी ठरली....."
("आशेची निराशा आणि निराशेची आशा" ले. लोकमान्य टिळक : विश्ववृत्त मासिक : अंक १ ला : एप्रील १९०६)

+ **बँक ऑफ बॉम्बे**ची शाखा धनराज लेन मध्ये, हल्ली ज्याला जुनी बँक म्हणतात (व जेथे म्यु. प्राथमिक हिंदी शाळा भरते) त्या जागेत इ. सन १८६८ मध्ये उघडली होती. नंतर या बँकेला नगरपालिकेने तार ऑफिसचे शेजारी इ. सन १८८८ मध्ये जागा दिली. पुढे ही बँक १९२१ मध्ये इम्पिरियल बँकेत विलीन करण्यात आली.

पोकरमल, व बंसीलाल अभिरचंद[1] या सावकाराचे नाव आहे. इतर सावकारांची १८७० पूर्वीची नावे, उपलब्ध नाहीत.

उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटी : इ. सन १८६९ च्या ६ दिसेंबरचे, हैद्राबाद रेसिडेन्सी ऑर्डर, नोटिफिकेशन नं. १०८ अन्वये उमरावती येथे टाऊन म्यु. कमेटीची स्थापना करण्यात आली.

त्यावेळी वऱ्हाडात कोणताच म्यु. कायदा नव्हता, म्हणून १८६७ चा पंजाब म्यु. ॲक्ट वऱ्हाडला लागू करण्यात येऊन त्यातील तरतुदीनुसार ही नगरपालिका स्थापन केली गेली, त्यामुळे व सदर कायद्यातील तरतुदीनुसार, उमरावती टाऊन म्यु. कमेटीचा पहिला अध्यक्ष हा जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर, कॅ. जे. जी. बेल झाला. आणि या नवोदित नगरपालिकेची पहिली निवडणूक इ. सन १८७० मध्ये घेण्यात आली. (इ. सन १८६९ पासूनच्या, म्यु. अध्यक्षांची यादी, परिशिष्ट क्र. २ मध्ये दिलेली आहे.)

---

१ : **उमरावतीची बंसीलाल अभिरचंद फर्म :–** १९ व्या शतकात उमरावतीला जे सावकार आणि व्यापारी होते, त्यांचे पैकी 'बंसीलाल अभिरचंद फर्म' ही फार मोठी सावकारी व व्यापारी पेढी होती.

बंसीलाल अभिरचंद फर्मचा संस्थापक इन्द्रभान हा इ. सन १८२० मध्ये मारवाडातून पश्चिम महाराष्ट्रात आला. यावेळी सर्व महाराष्ट्र प्रांत इंग्रजांच्या सत्तेखाली आला होता. इंद्रभानने आपला भाऊ बंसीलाल याच्या मदतीने उमरावतीला दुकान उघडले. या फर्मने सावकारीचा व धान्याचा धंदा सुरू केला, आणि सावकारीत त्याने अमाप पैसा मिळविला व त्या सोबतच त्याचा धान्याचाही मोठा धंदा होता.

१८५७ च्या पूर्वी ही फर्म उमरावतीत फार मोठी फर्म म्हणून गणल्या जाऊ लागली. त्यामुळे या फर्मने १८५७ च्या बंडाच्या वेळी ईस्ट इंडिया कंपनीला आवश्यक ते धान्य पुरविण्याचा ठेका मिळविला. बंसीलालच्या मुलाने बंडाच्या वेळी इंग्रजांना धान्य पुरविण्याचे कार्य व्यवस्थितपणे केले. त्यामुळे इंग्रजांनी नंतर त्याला 'राय बहादुर' ही पदवी दिली. नंतर ही पदवी बंसीलालच्या मुलास देखील देण्यात आली होती. कारण त्याने देखील इंग्रज सैन्याला १८७८–८० च्या अफगाण–इंग्रज युद्धाचे वेळी धान्य पुरवठा

(पुढील पानावर)

उमरावती नगरपालिकेची पहिली निवडणूक : या निवडणुकीसाठी शहराची विभागणी एकूण तीन विभागात (वॉर्डात) करण्यात आली होती. नॉर्थ वॉर्ड, साऊथ वॉर्ड व ईस्ट वॉर्ड या प्रत्येक वॉर्डातून सहा सभासद लोकांनी निवडून द्यायचे, (त्यापैकी दरवर्षी दोन सभासद रिटायर्ड होऊन, तेवढ्या दोन जागा वॉर्डमधून पुन्हा निवडून द्यायच्या) याप्रमाणे तीन वॉर्डातून एकूण १८ सभासद लोकांनी निवडलेले व सहा सभासद सरकार नियुक्त, अशा एकूण २४ सभासदांची नगरपालिका होती. जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर हा पदसिद्ध अध्यक्ष असे, मात्र निवडून आलेल्या सभासदांनी आपल्यापैकी दोघांना उपाध्यक्ष म्हणून निवडून द्यायचे, शिवाय म्यु. सेक्रेटरी व जॉ. सेक्रेटरी हे देखील सभासदातूनच निवडलेले असत. त्यांनी हे काम ऑनररी करावे अशी व्यवस्था होती. सभासदांचा कार्यकाल तीन वर्षाचा असे. मॅनेजिंग कमेटी असे.

त्याप्रमाणे १८७० साली नगरपालिकेची पहिली निवडणूक झाली परंतु शहरातील एकूण मतदारांपैकी केवळ वीस टक्के मतदारांनीच मतदानात भाग घेतला. बाकीचे मतदार घरी बसले राहिले. त्यावेळी मतदारांची पात्रता शेतसारा भरणारा किंवा घरपट्टी भरणारा व २१ वर्षे वयाचे वरचा, अशी होती[1].

केला होता. या उद्योगामुळे ही बंसीलाल अभिरचंद फर्म अतिशय भरभराटीला आली व नंतर महाराष्ट्रातील सर्वात मोठी सावकारी पेढी म्हणून प्रसिद्धीला आली. (मध्यप्रांत सावकारी कर्ज पद्धतीचा सरकारी रिपोर्ट, भाग २, पा. ४९७) अमरावतीच्या याच बंसीलाल अभिरचंद फर्मने निजाम सरकारला दि. २ जुलै १८५१ रोजी पन्नास हजाराचे कर्ज दिले होते. असा उल्लेख, हैद्राबाद अफेअर्स, खंड २, पान ५४७ वर आलेला आहे.

१ : कै. टिकेकर मास्तर यांची आठवण.

टीप : 'इ. सन १८७७ साली उमरावती नगरपालिकेच्या निवडणूकीचे वेळी झालेले मतदान–

	एकूण मतदार	झालेले मतदान
नॉर्थ वॉर्ड	४६९	१३०
साऊथ वॉर्ड	९८२	३९६
ईस्ट वॉर्ड	४६४	१८७

त्यावेळी उमरावतीची लोकसंख्या २४०८८ होती.'
(हैद्राबाद रेसिडेन्सी रेकार्ड (म्यू. अडमिनिस्ट्रेशन)

नगरपालिकेचे कार्यालय : इ. सन १८६९ मध्ये उमरावतीला नगरपालिका स्थापन झाली तेव्हा, सुरवातीला नगरपालिकेचे कार्यालय धनराज लेनमध्ये होते. नंतर १ जानेवारी १८७७ चे सुमारास वकील लाईन मधील श्रीनारायण रामबिलास गनेडीवाला फर्मच्या जागेत ते नेण्यात आले. ही जागा पूर्वी 'जेल' म्हणून उपयोगात आणली जात असे, परंतु 'जेल' ची नवी इमारत बांधल्यानंतर ही जुनी इमारत सरकारने गनेडीवाल फर्मला विकली, ती नगरपालिकेने आपल्या कार्यालयासाठी भाड्याने घेतली होती. तेथे नगरपालिकेचे कार्यालय सुमारे दहा–बारा वर्षे होते[१]. नंतर इ. सन १८९२ चे सुमारास नगरपालिकेने (हल्लीची) स्वतःची इमारत बांधली व तेथे कार्यालय नेण्यात आले. सुरवातीला मुख्य हॉल व त्याच्या दोन बाजूंनी दोन खोल्या एवढीच इमारत होती. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी आणखी दोन उभ्या खोल्या बांधल्याने इमारतीला आजचे स्वरूप आले. याशिवाय या कार्यालयाचे इमारती शेजारीच बेंच मॅजिस्ट्रेटचे कोर्टासाठी बंगलीवजा इमारत नगरपालिकेने बांधली. तेथे हल्ली आरोग्याधिकाऱ्याची कचेरी आहे.

नगरपालिकेच्या स्थापनेनंतर, शहरातील धान्य व कापूस बाजार, आठवडी बाजार आणि गुजऱ्या नगरपालिकेचे नियंत्रणाखाली आल्या.

व्हॉईसरॉय लॉर्ड मेयोचा खून.

उमरावती नगरपालिकेची सभा स्थगित : दि. १४ फेब्रुवारी १८७२ रोजी, उमरावती नगरपालिकेची आमसभा चालू असतानाच, हिंदुस्थानचा व्हॉईसरॉय अर्ल मेयो याचा खून झाल्याची बातमी आली. तेव्हा सभेचा अध्यक्ष कॅप्टन ए. फेअरर, नगरपालिकेचा उपाध्यक्ष, याने ताबडतोब सभेपुढील कामकाज बंद करून श्रद्धांजली अर्पण करण्याचा ठराव सभेपुढे मांडला होता. सभेला ९ सदस्य उपस्थित होते.

(हिंदुस्थानचा त्यावेळचा व्हॉईसरॉय अर्ल (नंतर लार्ड) मेयो हा अंदमानला तेथील कैद्यांची स्थिती पाहण्यासाठी गेला असताना एका मुसलमान कैद्याने त्याचा खून केला होता.)

उमरावती : सन १८६७ ते १८७० : इ. सन १८६७ ते १८७० या काळात उमरावतीची लोकसंख्या व घरांची संख्या, धंदा करणाऱ्या लोकांची

१ : कै. टिकेकर मास्तर यांची आठवण. (व म्यु. ठराव नं.५ दि. २५सप्टें.१८७६)

संख्या, क्षेत्रफळ वगैरे माहिती, 'गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस्, १८७०' चे आधारे खाली दिली आहे.

लोकसंख्या : अठराव्या शतकाचे आरंभी उमरावतीची लोकसंख्या बारा ते पंधरा हजार असावी. त्यानंतर इ. सन १८६७ मध्ये प्रथम शिरगणती होऊन, उमरावतीची लोकसंख्या २३,४१० एवढी ठरली. त्यापैकी–

पुरुष	स्त्रिया	जातवार लोकसंख्या	
मोठे ९३४९	७८८२	हिंदु	१७,२६५
लहान ३३१३	२८६६	मुसलमान	४,४१०
		युरोपियन	३१
एकूण १२६६२	१०७४८	इतर	१७०४
एकूण २३,४१०			२३,४१०

घरांची संख्या : ६२१७

धंद्यानुसार संख्या :

शेतीवाहणारे	५५९,	कापड व्यापारी			३३५,
कापूस व्यापारी	९३,	बँकर्स व भांड्याचे व्यापारी			३६,
धान्य विक्रेते	२९३,	दलाल	२८५,	सोनार	१५८,
बनिया	६०,	सराफ	११६,	सुतार	७८,
धोबी	३५,	मोची	१३७,	लोहार	५२,
वकील	३१,	तेली	११५,	शिंपी	११७,
न्हावी	१११,	खाटीक	४५,	कुंभार	६९,
रंगारी	५३,	दूधविक्रेते	४८,	कुली	१७५३,
दारु व्यापारी	१६,	सरकारी नोकर	४२२,	खाजगी नोकर	१८९५,
विटा बनविणार	६७,	बैलगाडीवाले	२४,	साहेबाचे नोकर	१७,
छपाईकाम करणारे	५,			एकूण	७०२५

त्यानंतर वाढलेली लोकसंख्या : इ. सन १८८१ : २३,५५०, इ. सन १८९१ : २८,९४६; इ. सन १९०१ : ३४,२१६ (पैकी : हिंदु २६,७७३,

मुसलमान ६२९५, जैन ७८१, ख्रिश्चन ११२, पारशी ३८, सिख ३१, इतर ११६ = ३४,२१६) (१९०१ नंतरची लोकसंख्या परिशिष्ट क्र. ३ मध्ये दिली आहे.)

टीप : "इ. स. १८८० मध्ये उमरावती येथे कारागिरांची संख्या ८२२५ होती." (प्रशासन रिपोर्ट, हे. अ. डि. पा. १२०)

इ. सन १८७० मध्ये ईलिचपूर शहराची लोकसंख्या २७,७८२ होती. तर त्याच वेळी उमरावतीची लोकसंख्या २३,४१० होती. म्हणजे १८७० पावेतो उमरावतीची लोकसंख्येचे बाबतीत वाढ ईलिचपूर एवढी देखील झालेली नव्हती.

क्षेत्रफळ : इ. स. १८७० मध्ये उमरावती शहराचे क्षेत्रफळ ३६१ एकर ३८ गुंठे एवढे होते. (आता १९७६ मध्ये शहराचे क्षेत्रफळ ६८५८ एकर किंवा २७८० हेक्टर अथवा ३६३४ किलोमिटर एवढे आहे. व घरांची संख्या ३३,७९२[१] किंवा प्रापर्टी संख्या २५,७७०[२] आहे.)

शहरांतील मुख्य रस्ते : भुसारी स्ट्रीट, धनराज स्ट्रीट, बझार स्ट्रीट, सराफा स्ट्रीट, बोहरा स्ट्रीट, साहुकार स्ट्रीट, कुंभार स्ट्रीट, माळीपुरा स्ट्रीट, लकडगंज स्ट्रीट, धान्यबाजार स्ट्रीट.

मंदिरे : दोन देवींची, एक बालाजीचे व पांच इतर. देवीचे मंदिर हजारो वर्षापूर्वीचे असून, इतर १०० वर्षाची आहेत.

हे शहर रघूजी भोसल्याने वसविले.‡ व येथे भोसले आणि निजाम या दोघांचेही प्रतिनिधी राहत असत.

व्यापार : उमरावती हे शहर कापसाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असून, इतर व्यापार देखील मोठ्या प्रमाणात चालतो. भांडी, कापड व इतर वस्तूंचा या ठिकाणी मोठा साठा आहे. हा सर्व माल पश्चिम किनाऱ्यावरून आणला जातो.

---

१ : प्रायमरी सेन्सेस अॅब्स्ट्रॅक्ट : १९७१

२ : म्यु. असेसमेंट : १९७५–७६

‡ अपुऱ्या माहितीवर हे विधान केलेले दिसते.

संपत्ती आणि व्यापारी क्षेत्रातील प्रतिष्ठा उमरावतीच्या व्यापाऱ्यांची जास्त आहे. परंतु वऱ्हाडच्या सीमेपलीकडे त्यांचे नाव गेलेले नाही.

धंद्यातील जाती : इंग्रजी माल, कापड, भांडी, देशी कापड, लोखंडी सामान, इत्यादी क्षेत्रात उमरावतीचे व्यापारी प्रसिद्ध आहेत. परंतु त्यातही विशिष्ट जाती आहेत. जशी मारवाडी, बोहरा, छत्रपुरी हेच प्रमुख आहेत.

व्यापार फार मोठ्या प्रमाणात होतो. प्रामुख्याने कर्नाटकचे लिंगायत, बोहरा, मारवाडी, छत्रपुरी हेच लोक सर्व व्यापारात घुसलेले आहेत.

मीठ बहुधा कच्छी, मुसलमान विकतात. अफू फक्त मारवाडी विकतात. तेल, तूप फक्त लिंगायत विकतात.

कापसाचा व्यापार युरोपियन किंवा मुंबईचे भाटिया व्यापारी करितात. सिल्कचा व्यापार मारवाडी आणि बोहेरा लोक करतात.

सिल्क कापडाचे कोष्टी मोठ्या प्रमाणात खोलापूर, अंजनगाव-बारी आणि ईलिचपूर येथे आहेत. देशी कापड मुख्यत्वे करून नागपूरहून येते, तसेच दिल्ली आणि बनारसहून मागविले जाते.

उमरावती बाजारात कापसाची आवक

	१८६८–६९	१८६९–७०
बोजा	६२,०००	४६,०१७
पूर्ण प्रेस केलेल्या बेल्स.	१९,९८४	३०,६८९
अर्ध प्रेस केलेल्या बेल्स.	३५,४०८	४९,३९२
या काळात चालू स्थितीत असलेले :		
पूर्ण प्रेस करणारे	६	६
अर्ध प्रेस करणारे	३५	२२

ह्या प्रमाणे फॅक्टरीज चालू होत्या.

इ. सन १८६६ पूर्वी वऱ्हाडात एकही कॉटन प्रेस नव्हता.

इ. सन १८७० मध्ये वॉलकट जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी सुरू झाली. (या फॅक्टरीत १८९४ पर्यंत फक्त एक हजार कामगार काम करीत होते. १९०४ मध्ये ही संख्या ६००० झाली[१].) नंतर आणखी प्रेस सुरू झाले.

---

१ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर : १९११ :

उमरावती बाजाराची १८७० ची आयात-निर्यात,

वस्तु	आयात (टनामध्ये)	निर्यात (टनामध्ये)
साखर	१८२५	५५८
मीठ	२२३६	७३८
धान्य	१०,९५५	४८४
तेल बिया	१५८५	१८९
भांडी	१९१४	२४०
विदेशी कापड	१७५२	५७४
देशी कापड	१४१६	१९५७
तंबाखू	३८१	२५
मसाल्याचे पदार्थ	५९२१	६१०३
अफू	१४	६
लाकूड	२२६४	१२९२
तूप	६५८	७७८
इतर वस्तू	७०५३	२१६१

न्याय व्यवस्था :	सन	संख्या
दिवाणी दावे दाखल झाल्याची एकूण संख्या	१८५५	१४२८
	१८६९	१५,६१०
दिवाणी दाव्यांची किंमत.	१८५५	६,९५,१७८
	१८६९	१,७९९,१४९
प्रत्येक दाव्याची सरासरी काल मर्यादा	१८५५	२५ दिवस
	१८६९	३० दिवस

१ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७० : पा. २३३

– गुन्हेगारीचा तपशील –

(फौजदारी विभाग)

	कायद्यात बसणारे गुन्हे (हस्तक्षेप्य) कॉग्नायसेबल–गुन्हे		कायद्यात न बसणारे गुन्हे (नॉन–कॉग्नायसेबल)		एकूण–		जप्त केलेल्या मालमत्तेची शेकडेवारी (पर्सेंटेज ऑफ रिकव्हर्ड प्रॉपर्टी)	
	१८६८	१८६९	१८६८	१८६९	१८६८	१८६९	१८६८	१८६९
१. घडलेल्या गुन्ह्याची संख्या	१३५१	१८४१	५२०	८८९	१८७१	२७३०		
२. कोर्टासमोर आणलेले गुन्हे	०८९३	१०८७	५२०	८८९	१४१३	१९७६	२	२
३. कोर्टासमोर आलेल्या गुन्ह्यांची शेकडेवारी	६६	५९	१००	१००	७५.५	७२.४	७	७
४. बंदिस्त (पकडलेले) गुन्हेगार–	१६८५	२२२५	८६२	१७३८	२५४७	३ .६३	२५	२०
५. शिक्षा झालेले गुन्हेगार	११२५	१७५७	४०९	९०७	१५३४	२६६४	१	१
६. शिक्षा ठोठ वण्यात आलेल्या गुन्हेगारांचे केवळ बंदिस्त केलेल्या (पकडलेल्या) गुन्हेगाराशी शेकडा प्रमाण	६६.७	७८.९	४७.४	५२ १	६२.२	६७.२		

(गॅझेटियर फॉर है. अ. डिस्ट्रिक्टस् १८७० पा. २७५)

शिक्षण : इ. सन १८५३ पूर्वी उमरावतीला केवळ काही खाजगी संस्कृत पाठशाळा होत्या. तेथे संस्कृत, गणित व व्याकरण शिकविले जाई. त्याच प्रमाणे खाजगी व गैर सरकारी अशा अरेबिक व पर्शियन वगैरे शिकविणारे मदरसे होते.

"मुसलमानी अमदानीत काही शाळा होत्या, परंतु तेथे कुराण, अरेबिक, पर्शियन आणि उर्दू भाषा शिकविली जात होती. अशा शाळांना सरकारी मदत मिळत नसे, परंतु स्थानिक धनवान लोक ती दान देऊन चालवीत होते. शिक्षकाला सुमारे चार रुपये दरमहा वेतन मिळत असे. जे कोणी शिकायला येत अशा विद्यार्थ्यापासून पैसा घेतला जात नसे. सदर मुसलमान विद्यार्थी फी देत नसत, परंतु हिंदु विद्यार्थ्यास फी द्यावी लागत असे. धनवान मुसलमान लोक आपल्या घरीच शिक्षक बोलावीत असत आणि अशा वेळी एकाद–दुसरा मुसलमान विद्यार्थी शिकायला सोबत आला तर त्याला परवानगी देत.

बहुधा चांगले पटवारी, पाटील, लेखक किंवा काझी हे घरीच अभ्यास करून शिकलेले होते.

कारकुनी करणारा वर्ग फारसा विद्वान नव्हता.

इ. सन १८६६ मध्ये इंग्रज सरकारने शिक्षण विभाग आपल्याकडे घेतला व शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. (१८६६ साली वऱ्हाडात एकूण ३० प्राथमिक शाळा होत्या व ५ मिडिल स्कूल होते. त्यामध्ये १८८१ विद्यार्थी शिकत होते. इ. सन १८७० मध्ये शाळांची संख्या ३४१ व विद्यार्थ्यांची संख्या १४८८९ झाली. याच वर्षी उमरावती येथे एक हायस्कूल निघाले. इ. सन १८६९ मध्ये आकोला येथे एक नॉर्मल स्कूल स्थापन झाले.)

इ. सन १८७० साली उमरावती जिल्ह्यात १ हायस्कूल, ८ मिडिल स्कूल, ५८ प्रायमरी शाळा, ८ हिंदु मुलींच्या शाळा होत्या.

इ. सन १८७० मध्ये संपूर्ण वऱ्हाडात १४८९८ विद्यार्थी शिकत होते. त्यापैकी १०,३८३ मराठी शिकणारे, १८९५ उर्दू शिकणारे, १६३९ इंग्रजी शिकणारे, ८८१ संस्कृत शिकणारे होते.[१] "

---

१ : गॅझेटीयर फॉर दी हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७०, पान २७४

"वऱ्हाड इंग्रजांच्या ताब्यात येण्यापूर्वी (इ. सन १८५३ पूर्वी) सरकारी शाळा नव्हत्या. खाजगी शिक्षण संस्था ब्राम्हणांना संस्कृत व सवर्ण हिंदूना मराठी शिक्षण देत. अस्पृश्यांना या शाळात प्रवेश नव्हता.

मुसलमानांना अरेबिक, उर्दू, पर्शियन आणि कुराण मुनशी शिकवीत असे.

मि. जे. एच्. बर्न लिहितो–

"इ. सन १८६१ मध्ये शिक्षण हा सरकारचे चिंतेचा विषय झाला. यावेळी शिकवणाऱ्याकडे गुराख्यासारखे पाहिले जाई. त्यामुळे शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार झाला नाही.

काही इंडिजेनस शाळा व खाजगी शिकवण्या यामुळे उत्तम कारकून व हिशेबनीस तयार झाले."

अव्यवस्थित खाजगी शिक्षण संस्था शासनाने इ. सन १८६१ मध्ये आपल्या नियंत्रणाखाली आणून सुव्यवस्थित करण्यास सुरुवात केली.

इ. सन १८६६ मध्ये शिक्षणखाते सुरू झाले. याच वर्षी १ आक्टोबरला उमरावती येथे सरकारी हॉयस्कूल सुरू झाले. तसेच प्राथमिक व माध्यमिक शाळा उघण्यात आल्या.

सध्या (इ. सन १९११) उमरावतीत शाळेत जाणारांची संख्या इतर ठिकाणापेक्षा जास्त आहे.

उमरावती हॉयस्कूलमध्ये ४०० विद्यार्थी आहेत. त्यापैकी ४० विद्यार्थी वसतिगृहात राहतात. मराठी ए. व्हि. स्कूल मध्ये २५३ विद्यार्थी आहेत तर उर्दू ए. व्हि. स्कूल मध्ये ५७ आहेत. या शिवाय उमरावती येथे व्हिक्टोरिया टेक्निकल स्कूल सुरू करण्यात आले.

संपूर्ण जिल्ह्यांत मुलांच्या २७३ व मुलींच्या २२ शाळा असून त्यांत १८००० विद्यार्थी शिकत आहेत.

स्त्रियांचे नार्मल स्कूल : इ. स. १९०५ मध्ये नागपूरहून उमरावतीस आणण्यात आले.[१] "

---

१ : उमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ : पृ. ३३६ ते ३८.

त्रौटक शैक्षणिक अहवाल, इ. सन १८७१ ते १८८४

चिमणाजी राजाराम पाठक हे उमरावती जिल्हा शाळा निरीक्षक इ. सन १८७३ मध्ये असून त्यांचे दरसाल वेतन रु. २०० होते.

शाळा–मास्तरांचा पगार सरकारी खजिन्यातून मिळत असे. त्यासाठी त्यांना खेडयातून तहशीलच्या गावी जावे लागे. या करता पावसाळयात दोन दोन दिवस शाळा बंद राहत असत.

उमरावतीला इ. सन १८७३ मध्ये एकूण शाळा ६.

माध्यमिक विद्यार्थ्यांची संख्या–

वर्ग	१	२	३	४	५	६	एकूण
संख्या	३०४	१३४	८८	६५	५२	४२	६८५

प्राथमिक चवथ्या वर्गाचा निकाल (इ. सन १८७५)

	परीक्षेस बसले	उत्तीर्ण
मराठी	४७	७
हिंदी	१५	१

इ. सन १८७५ मध्ये जेलच्या विद्यार्थ्यांसाठी एक शाळा सुरू करण्यात आली.

इ. सन १८७५ मध्ये उमरावतीच्या हायस्कूल मध्ये एकूण विद्यार्थी ८० होते.

गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांना सलग तीन वर्षे स्कॉलरशिप्स् देण्यात आली. परंतु एकदाही ते पास झाले नाहीत.

इ. सन १८७६ मध्ये हायस्कूल मधील विद्यार्थी संख्या–

वर्ग	८ वी	९ वी	१० वी	११ वी	एकूण
संख्या	२६	११	६	५	४८

इ. सन १८७७ मध्ये श्री. नारायण बी. दांडेकर हे उमरावती येथे शिक्षण विभागाचे डायरेक्टर होते आणि श्री. डी. जे. मॅकिन्टॉश हे सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर होते.

इ. सन १८७७ मध्ये बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झालेले श्री. हरि रामचंद्र रोहिणखेडकर हे वऱ्हाडातील पहिले पदविधर (Graduate) होत.

सरकारमान्य (अनुदान मिळणाऱ्या) शाळांना अनुदान ७ % मिळत असे.

इ. सन १८७९ साली उमरावती जेल मध्ये ३० कैद्यांना लिहिण्या-वाचण्याचे शिक्षण दिले गेले.

पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेला उमरावतीहून ३७ विद्यार्थी बसले होते. पैकी फक्त १२ उत्तीर्ण झालेत.

रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर हे सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून इ. सन १८८० मध्ये नियुक्त झाले.. उमरावतीचे यशस्वी हेडमास्तर म्हणून त्यांची ख्याती होती.

बजाबा रामचंद्र प्रधान हे हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्ट'चे शिक्षण अधिकारी (Inspector of Schools) म्हणून इ. सन १८८४ साली नेमले गेलेत.

हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् मधील शिक्षकांची पहिली सभा उमरावती येथे इ. सन १८८४ साली कमिश्नरांच्या अध्यक्षतेखाली झाली होती.

उमरावती येथे मिशन स्कूल (कॅथॉलिक स्कूल) इ. सन १८८० मध्ये मुलांची व १८९४ मध्ये मुलींची शाळा सुरू झाली.

इ. सन १८६९ मध्ये उमरावतीला मराठी नार्मलस्कूल सुरू झाले[१].

उमरावतीची पहिली मराठी प्राथमिक शाळा : "इ. सन १८५३ मध्ये वऱ्हाडप्रांत इंग्रजांनी निजामाकडून घेतला तेव्हा, उमरावती येथे प्राथमिक शाळा निघावी, या नागरिकांच्या मागणीला इंग्रजांनी मान्यता देऊन, राजा बिशनचंद यांची हवेली शाळेच्या उपयोगाकरिता मिळविली." आणि इ. सन १८६०-६१ मध्येच या हवेलीत पहिली मराठी गैर सरकारी प्राथमिक शाळा सुरू झाली.

---

१ : रिपोर्ट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्स्, डब्ल्यु. ली. वार्नर : (हैद्राबाद रेसिडेन्सी रेकार्ड : नॅशनल आर्काइव्ह्, दिल्ली.)

ही शाळा म्यु. प्राथमिक मुलांची शाळा नं. १ या नांवाने आजही त्याच ठिकाणी चालू आहे.

इ. सन १८७३ साली ही शाळा उत्तम प्रकारे चालू होती, असे म्यु. कागद पत्रावरून दिसून येते. यावरून १८६०–६१ साली चालू झालेली ही गैरसरकारी शाळा, नंतर म्यु. ने आपले ताब्यात घेतली असे दिसते.

इ. सन १८८५ साली या शाळेत एकूण सात वर्ग होते आणि १८८७ साली ही शाळा पूर्णपणे प्राथमिक झाली. चौथ्या वर्गावर सर्व प्रथम श्री. कृष्णराव वैद्य या नावाचे हेडमास्तर आले.

ही शाळा दिवसें दिवस भरभराटीला येऊ लागली. या शाळेवर मुसलमान शिक्षक असल्याचा उलेख सांपडतो. या शाळेत श्री. विष्णुपंत नावाचे शिक्षक होते. त्यांनी त्या काळात पुनर्विवाह केला होता.

त्याकाळी इंग्रजी सत्तेचा फार दरारा असे. सरकार विरुद्ध बोलणे किंवा शिवाजी महाराजांचा फोटो लावणे हे राजद्रोहाचे लक्षण समजले जाई. अशा काळी या शाळा नं. १ मधील श्री. भागवत या नावाच्या शिक्षकांने विदेशी कापडाची होळी करणे, स्वदेशी कापड वापरणे, इत्यादि गोष्टीचे चाळकडू मुलांना पाजण्यास सुरुवात केली होती.

या शाळेचे माजी विद्यार्थ्यात कै. दादासाहेब खापर्डे[1]. वीर वामनराव जोशी, कै. गोविंददास छबिलदास, श्री. लेंघे सराफ, श्री. गणोजेकर मास्तर, श्री. गंगाने पेन्टर, श्री. गोविंदहरे अशा किती तरी प्रख्यात व्यक्ती आहेत[2].

(इ. स. १९५०–५१ मध्ये या शाळेचा हीरक महोत्सव साजरा करण्यात आला होता. त्यानिमित्त पाच दिवस विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले होते.)

या शाळेचे आवारातच इ. स. १९१४ साली हनुमान व्यायाम शाळेची सुरवात श्री. वैद्य बंधूंनी केली.

---

१ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पान ६०५–६०६

२ : अमरावती नगरपालिकेच्या शिक्षण खात्यातील माहिती.



चित्र क्र. ५० : नेटिव्ह जनरल लायब्ररी (पृष्ठ २०७ पहा)
(हल्लीचे नगर वाचनालय)



चित्र क्र. ५१ : (पृष्ठ २०५ पहा)
रावसाहेब रघुनाथ बाळकृष्ण उर्फ अण्णासाहेब तळवलकर
हिंदु हायस्कूलचे हेडमास्तर व
एकेकाळी नगरपालिकेचे ऑनररी सेक्रेटरी होते.

चित्र क्र. ५२ : महर्षि अण्णासाहेब पटवर्धन व लो. टिळक (भाषण देतांना) (पृ. २०७ ची तळटीप पहा)

चित्र क्र. ४८ : हिंदु हायस्कूलची इमारत. वलगांव रोड (पृष्ठ २०५ पहा)

(या इमारतीचे उद्घाटन जुलै १८७६ मध्ये झाले. त्या संबंधीचा वृत्तांत
'वऱ्हाड शाळा' पत्रकाच्या आगस्ट १८७६ चे अंकात आलेला आहे.)



चित्र क्र. ४१ : हिंदु हायस्कूल १८६३ (हल्ली येथे शासकीय मराठी हायस्कूल [ए. व्ही. स्कूल विभाग] आहे.)

उमरावतीचे पहिले हायस्कूल : इ. स. १८६० साली इंग्रज निजाम यांचेत दुसरा तह झाल्यानंतर दोनच वर्षांनी इ. स. १८६२ मध्ये उमरावती येथे एक इंग्रजी शाळा सुरु झाली. इ. स. १८६६ मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचे एक प्रोफेसर डॉ. सिक्लेअर यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाडात प्रथमच स्वतंत्र शिक्षण खाते सुरू झाले. त्याच वेळी मि. एटकिन् हे हेडमास्तर म्हणून येथे येऊन या इंग्रजी शाळेचे रूपांतर हायस्कूलमध्ये करण्यात आले[१].

दि. १ नोव्हेंबर १८६६ रोजी उमरावतीला प्रथमच हायस्कूल सुरू करण्यात आले. त्यावेळी या हायस्कूलमध्ये ४०० विद्यार्थी होते. त्यात ४० बाहेरगावचे होते. ही शाळा इ. स. १९०४ मध्ये अलाहाबाद विश्व विद्यापीठाशी जोडण्यात आली होती. त्याच वेळी मिशनतर्फेहि दोन इंग्रजी शाळा उमरावतीत सुरु करण्यात आल्या होत्या[२].

उमरावतीच्या या सरकारी हायस्कूलचे पहिले हिंदी हेडमास्तर श्री. श्रीराम भिकाजी जठार हे होते. सन १८८५ पासून पुढे नऊ वर्षे-पर्यंत त्यांनी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्ट्रक्टरच्या हुद्यावर काम केले.

रा. ब. विष्णू मोरेश्वर महाजनी हे एम्. ए. होते. त्यावेळी उमरावतीत एम्. ए. ची पदवी प्राप्त असे हेच एक गृहस्थ होते.

नंतर श्री रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर हे या हायस्कूलवर हेडमास्तर झाले. ते बी. ए. होते. त्यांनी २२ वर्षे काम केल्यानंतर, रा. सा. देवभानकर, श्री. देशमुख, देशबंधु चित्तरंजनदास यांचे जामात प्रो. भास्कर मुकर्जी व सरदार ईश्वरसिंग आणि नंतर रा. सा. गोरे हे या हायस्कूलचे हेडमास्तर होते[३].

यापैकी श्री. रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर हे इ. सन १८८९ च्या म्यु. निवडणुकीत नॉर्थवॉर्ड मधून नगरपालिकेवर निवडूनहि आले होते. नगरपालिकेत काही काळ ते ऑ. सेक्रेटरीचे जागेवर कामही करीत असत. ते नेटिव्ह जनरल लायब्ररीचे कामातही उत्साहाने भाग घेत असत.

---

१ : उदय : दि. १६ नोव्हेंबर १९२६

२ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११ पा. ३३८

३ : उदय दि. १६ नोव्हेंबर १९२६

उमरावतीचा पहिला शिक्षणाधिकारी श्री. मॅकेन्टाश या नावाचा इंग्रज गृहस्थ होता. त्याचा दरारा फार असे[१].

इ. सन १९०५ चे सुमारास या सरकारी हायस्कूलचे बोर्डिगातून राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, ते राजकीय सभेला उपस्थित राहिले या कारणास्तव हायस्कूलमधून काढून टाकण्यात आले, तेव्हा श्री.दादासाहेब खापर्डे यांच्या प्रयत्नाने उमरावतीत प्रायव्हेट हायस्कूल सुरू करण्यात आले होते[२].

या सरकारी हायस्कूलला प्रथम 'गव्हर्मेंट हायस्कूल' म्हणत असत. नंतर कॅम्प विभागात जेव्हा 'मॉहामेडन हायस्कूल' सुरू झाले तेव्हा, गव्हर्मेंट हायस्कूलचे नाव 'हिंदू हायस्कूल' असे झाले. पुढे श्री. डि. सिल्व्हा हे एज्युकेशन इन्स्पेक्टर असताना हिंदु हायस्कूलचे नाव 'मराठी हायस्कूल' व मॉहामेडन हायस्कूलचे नाव 'उर्दू हायस्कूल' असे करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात, हिंदू हायस्कुल किंवा मराठी हायस्कूलचे नाव 'अॅकेडेमिक हायस्कूल' व उर्दू हायस्कूलचे नाव 'सायन्स कोअर हायस्कूल' असे झाले आहे[३].

धंदे शिक्षण : इ. सन १८९४ साली उमरावती नगरपालिकेच्या आवारातील टीन शेडमध्ये, रा. ब. तात्यासाहेब मुधोळकर यांच्या प्रयत्नाने धंदे शिक्षणाची शाळा (इंडस्ट्रिअल स्कूल) सुरू झाली होती. पुढे याच शाळेचे रूपांतर बेरार व्हिक्टोरिया टेक्निकल ईन्स्टिटचूटमध्ये झाले व इ. सन १९०९ साली मे.शॉ रोडवर या संस्थेसाठी बांधलेल्या भव्य इमारतीत ही शाळा नेण्यात आली[४].

पोलिस : इ. सन १८७० मध्ये उमरावती जिल्ह्यातील पोलिसांची एकूण संख्या ५६४ होती. व त्यानुसार ६.७ चौरस मैल क्षेत्रास किंवा ९५० व्यक्तीमागे १ पोलिस असे पोलिसांचे प्रमाण होते.

---

१ : कै. टिकेकर मास्तर यांची आठवण.

२ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र. पान २२८–२३१

३ : प्रा. मा. ल. व्यवहारे यांच्या आठवणी.

४ : उमरावती नगरपालिकेच्या दप्तारातील माहितीचे आधारे.

नेटिव्ह जनरल लायब्ररी : इ. सन १८६७ साली उमरावतीतील काही सरकारी व गैरसरकारी सुशिक्षित मंडळींनी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन केली. ही संस्था भुसारी गेटचे आत सक्करसाथ रोडवर सेठ पुरणमलजी (वलगाव जहागीर) यांच्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर होती.

त्यावेळी शहरातील सर्व सुशिक्षितांची वस्ती भाजीबाजार–बुधवारा या भागातच असे व हे सुशिक्षितही बोटावर मोजण्या इतकेच असत. गावातील सर्व सुशिक्षितांची मोकळेपणाने बसण्या–उठण्याची जागा एकच व ती म्हणजे, सुशिक्षितांचे त्याकाळचे अग्रेसर श्री. श्रीराम भिकाजी जठार, श्री. बापूजी रंगनाथ उडगीकर. श्री. आत्माराम भिकाजी प्रभु, श्री. चिमणाजी राजाराम पाठक, श्री. एकनाथ तात्या ओक वकील, इत्यादी मंडळींनी स्थापन केलेली लायब्ररी ही होय. हे सर्व सज्जन येथील मोठ मोठे इ. ए. सी., डेप्यु. एज्यु. इन्स्पेक्टर असे अधिकारी व वकील होते. त्यावेळी क्लब व लायब्ररी एकच असे. पुढे या लायब्ररीला नगरपालिकेने इ. स. १८८६ मध्ये जागा दिली. तेथेच 'नगर वाचनालय' या नावाने ही संस्था आज उभी असून तिचा व्याप वाढलेला आहे. (या वाचनालयाची शताब्दि इ. स. १९७० मध्ये थाटाने साजरी झाली. त्या वेळी काढलेल्या स्मरणिकेत वाचनालयाचा इतिहास दिलेला आहे.)

वऱ्हाड परत मिळविण्यासाठी निजामाची खटपट : एकीकडे वऱ्हाडात इंग्रजी राजवटीने लोकांना ज्या सुखसोयी, न्याय आणि संरक्षण यांची हमी दिली, त्याच वेळी दुसरीकडे निजामाकडील मुत्सद्दी सर सालारजंग याने वऱ्हाडप्रांत निजामाला परत मिळावा म्हणून विलायते–पर्यंत खटपट चालू केली'. त्याचा एक फायदा असा झाला की, 'इंग्रजी

---

१ : **वऱ्हाड गहाण खरेदी करण्याचा धाडसी प्रयत्न**:– इ. सन १८८० चे सुमारास निजाम राज्याचे दिवाण सर सालारजंग हे असताना श्री. विनायक रामचंद्र उर्फ अण्णासाहेब पटवर्धन, पुणे, यांनी निजामाकडून बारा चौदा कोटी रुपयांना वऱ्हाड गहाण खरेदी करण्याचा धाडसी प्रयत्न केला होता.

असे ठरले की, हैद्राबादेत एक भली थोरली बँक काढून, दहा बारा कोटींचे कर्ज तिच्यामार्फत निजाम सरकारास द्यावे आणि त्याचे बदल्यात

(पुढील पानावर)

अमदानीत वऱ्हाडच्या लोकांना अमुक प्रकारे त्रास झाला किंवा होत आहे' अशी तक्रार करायला निजामाला जागा राहू नये म्हणून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी, वऱ्हाडचा कारभार जास्तीत जास्त चांगला व्हावा याची काळजी घेणे सुरू केले.

"वऱ्हाडातील लोक निजामाच्या राज्यात परत जाण्यास खुष आहेत काय ? अशी त्यावेळी सरकारी अधिकाऱ्यामार्फत रयतेपैकी कित्येक लोकांना विचारपूस केली होती. परंतु मोडक्या तोडक्या का होईना, इंग्रजी सुधारणेची व शांततेची फळे चाखल्यानंतर निजामासारख्या त्या वेळच्या विशेष मागासलेल्या 'मोगलाई' राज्यात जाण्याची खुषी कोणीही दाखविली नाही□. कारण निजामाच्या ताब्यात असलेल्या मोगलाई राज्यात बंदोबस्त कसा आहे हे वऱ्हाडच्या लोकांना नित्य दिसतच होते. शिवाय निजामशाहीच्या कारभाराचा अनुभव वऱ्हाडचे जनतेने चाखला होता.

वऱ्हाडचा कारभार अण्णासाहेबांनी आपलेकडे घ्यावा. अर्थात सालारजंगाने ब्रिटिशांची या कर्जास सिक्युरिटी नको ही अट घातली. त्यासाठी प्रथम अण्णासाहेबांनी फ्रेंच बँकेमार्फत जे कर्ज काढले त्याचे व्याज व मि. स्मिथ म्हणून मध्यस्त दलाल होते. त्याची दलाली, हे कर्ज त्यांना जन्मभर फेडावे लागले. कारण सर सालारजंग मृत्यू पावल्याने सारा घोटाळा झाला. हा व्यवहार अण्णासाहेबांनी फार गुप्तपणे सालारजंगाशी चालविला होता तो अशा रीतीने फसला.

सत्ताधाऱ्याशी टक्कर खेळताना कशाही स्वरूपाची का होईना पण सत्ताच जवळ असली पाहिजे, या अण्णासाहेबांच्या कल्पनेतूनच त्यांनी हा वऱ्हाड गहाण खरेदीचा खटाटोप केला होता व त्यासाठी काही मंडळींना हैद्राबादला ठाणे देऊन बसविले होते. तेथील भाऊ निरुळकर व भिकाजीपंत देशपांडे हे या कामी अण्णासाहेबातर्फे गुप्तपणे सर सालारजंगाशी संधान ठेवीत असत.

निजामाचे कचाट्यातून वऱ्हाड मुक्त करण्याचा प्रयत्न असा फसला.

श्री. विनायक रामचंद्र उर्फ महर्षि अण्णासाहेब पटवर्धन : (जन्म १८४७ इसवी व मृत्यु २ फेब्रुवारी १९१७) हे पुण्यातील राजकारणी वृत्तीचे सुप्रसिद्ध साधु पुरुष होते. (ब्रम्हर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र : अप्रबुद्ध पान ६४–६५)

□ हैद्राबाद रेसिडेन्सी आर्डर १९०२

आर्थिक परिवर्तनाची चुणुक : निजामाची कारकीर्द वऱ्हाडी जनतेस कष्टाची गेली आणि इंग्रजांचे अमदानीत अनेक सुधारणा सुरू होऊन सुरक्षितता वाढली हे खरे असले तरी आर्थिक परिस्थितीत मात्र फार परिवर्तन झाले. अमेरिकन यादवी युद्धामुळे ब्रिटनच्या मॅन्चेस्टर आणि लिव्हरपूलच्या कापडगिरण्यांना अमेरिकन कापूस मिळणे बंद झाले. त्यामुळे तेथील व्यापारी व उद्योगपती यांच्या समोर मोठा प्रश्न निर्माण झाला. अशा वेळी ब्रिटिश सरकारचे लक्ष भारताकडे गेले. कापूस विभाग उघडण्यात आला व त्यासाठी खास कमिश्नर नेमला गेला. कापससंबंधी कायदे तयार करण्यात आले आणि कापसाचे तऱ्हे-तऱ्हेचे बी-बियाणे लोकांना मोफत देण्यात येऊन, कापूस उत्पादनाला प्रोत्साहन देण्यात आले. हिंदुस्थानचा कापूस विलायतेस मोठ्या प्रमाणात जाणे सुरू झाले. सन १८२५ मध्ये सर्व प्रथम पेस्तनजी अॅन्ड कं. ने वऱ्हाडचा कापूस बैलगाडयांनी मुंबईस नेला होता.+ परंतु. १८५९-६० नंतर रेल्वे सुरू झाली आणि सोबतच इंग्रज व्यापारी कंपन्यांनी कापूस खरेदी मोठ्या प्रमाणात सुरू केली व जिनिंग-प्रेसिंग फॅक्टरीज चालू केल्या. त्यामुळे कापूस पाठविणे सुलभ झाले. येथून कच्चा माल जाई व इंग्लंडहून त्याचा पक्का माल तयार होऊन हिंदुस्थानच्या पेठेत विकण्यासाठी आणला जाई. या परिस्थितीमुळे हिंदुस्थानातील कारागिरांची अवस्था फारच शोचनीय होऊ लागली. देशातील सर्व विचारवंतांनी ही परिस्थिती पाहून त्याकडे लोकांचे लक्ष वेधले. वऱ्हाडातील आकोल्याहून प्रसिद्ध होणाऱ्या "वऱ्हाड समाचार[१]" या वृत्तपत्राने या प्रश्नावर अनेक अग्रलेख लिहिले. त्यातील एकदोन अग्रलेखात त्यांनी उमरावती व खामगावच्या सावकारांना आवाहन करून

+ त्यापूर्वी १८१३ पासून, बैलगाडीने कापूस मिर्झापूरला व तेथून गंगेतून बोटीने कलकत्त्यास नेण्यात येऊन, नंतर जहाजाने समुद्रमार्गे इंग्लंडला रवाना होत असे. या संबंधीची माहिती 'कापूस व्यवसाय' या सदरात पूर्वी दिलेली आहेच.

१ : 'वऱ्हाड समाचार' हे वृत्तपत्र कै. गणेश नारायण कोल्हटकर यांनी उमरावती येथे सुरू केले होते. राजकीय हालचालीच्या दृष्टीने त्यावेळी उमरावतीपेक्षा आकोल्याला महत्त्व असल्यामुळे, तेथील रहिवाशी खंडेराव बाळाजी फडके यांना भागीदार करून, नंतर त्यांनी आपले वर्तमानपत्र व छापखाना उमरावतीहून आकोल्यास आणला. (बहुरूपी : पृ. ७)

अशी विनंती केली होती की, "……आमचे उमरावतीस १० : २० सावकार चांगले आहेत. तसेच खामगावासही आहेत. त्यांनी यावेळी स्वस्थ बसू नये, अशी आमची त्यांस प्रार्थना आहे. या दोन ठिकाणी कापडाच्या गिरण्या सदहू लोकांनी स्थापन कराव्यात. निदान एक तरी करावी." (ता. २४ मे १८७४) याच विषयावर त्याच वृत्तपत्राने पुन्हा ७ जून १८७४ चे अग्रलेखात "……याजकरता उमरावतीस व खामगावास साहुकार लोकांनी आपले मंडळीची सभा करावी. त्यात चार विद्वान व वकील लोक यास बोलवावे व साहु साहु मध्ये खाजगी काही द्वेष असले तर ते बाजूस ठेवावे आणि सारे वऱ्हाडातील लोक मिळून हे काम उभारावे ……" असे आवाहन केले होते[१].

यावरून त्यावेळच्या उमरावतीच्या सावकारांची कल्पना येते‡ त्याच बरोबर इंग्रजी आमदनीत हिंदुस्थानच्या कारागिरांची कशी अवस्था झाली आणि देशाच्या आर्थिक परिस्थितीत कसा बदल झाला, याचीही कल्पना येते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उमरावती येथे कापडाची गिरणी सुरू करावी हे आवाहन इ. स. १८७४ मध्ये या वृत्तपत्राने केले आहे.

---

१ : क्या आप जानते है ? क. कि. बियाणी : पा. २८ ते ३०

‡ **हंबर्डे सावकार** : उमरावतीला श्री. रावजीपंत हंबर्डे नावाचे सावकार होते……ते कर्तबगार पुरुष होते. त्यांनी दरमहा बारा आण्याच्या नौकरी पासून आयुष्याला प्रारंभ केला आणि ते स्वकष्टाने स्वतःच्या हयातींत लक्षाधीश झाले. ते पैशाला फार जपत … त्यांचे, पुढे कापडाचे दुकान होते… रावजीपंत वारल्यानंतर त्यांच्या धनदौलतीची वाताहत झाली. (कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्रांत, पा. ४७०–७१ वर, वरप्रमाणे हंबर्डे सावकारांबद्दल माहिती दिलेली आहे. असे सांगतात की, एकदा तत्कालिन डेप्युटी कमिश्नरला वेतन चुकविण्यासाठी पैशाची गरज पडली तेव्हा हंबर्डे सावकाराकडून त्याने कर्ज घेतले. हंबर्डे सावकाराने एका शिवयाचे कलदार या कर्जात दिले होते. इ. सन १९०० चे आसपास हंबर्डे सावकार उमरावतीत सावकारी करीत असावेत. हंबर्डे हॉस्पीटल हा धर्मार्थ दवाखाना त्यांचे देणगीतूनच चालतो.)

उमरावतीत 'वकीली' व्यवसायाचा उदय

इ. सन १८५३ मध्ये वऱ्हाड प्रांतात इंग्रजांची कारकीर्द सुरू झाली आणि इंग्रजांच्या न्यायालयीन कामकाजाचे पद्धतीमुळे, 'वकिली' व्यवसायाची सुरवात झाली.

त्यापूर्वी प्राचीन न्यायपद्धतीत 'वकील' वर्गाचे अस्तित्व मुळीच नव्हते. 'वकील' हा शद्व फारशी असून मुसलमानी न्याणधिशांना हिंदु कायद्याची माहिती सांगण्याकरिता हा वर्ग प्रथम अस्तित्वात आला असे दिसून येते. कारण अकराव्या शतकातील 'स्मृति चंद्रिकेतही' याचा उल्लेख नाही[१].

मुस्लिम राजसत्तेचे काळात न्यायालयीन पद्धतीत वकील वर्ग वर प्रमाणे अस्तित्वात आला तरी वादी–प्रतिवादी तर्फे वकील देण्याची पद्धती मात्र या काळातही नव्हती किंवा नंतर 'स्वराज्यात' आणि नंतर 'पेशवाईतही' वकील वर्ग या अर्थाने अस्तित्वात नाही.

इ. सन १८०३ ते १८५३–५४ या काळात वऱ्हाड प्रांत बहुधा मक्त्याने दिला जात असल्याने, मक्तेदार आपले तालुकदार वगैरे अधिकारी नेमत. शिवाय न्यायाच्या कामाकरिता 'मीर अदल व मुनसफ' असे अधिकारी असत. गाव पंचायतीकडे बरेच तंटे जात व तेथे साधारणपणे समाधान-कारक रीतीने त्यांचा निकाल होत असे. कारण गावचे गावी खरी वस्तु-स्थिती लपत नसे[२].

वऱ्हाडवर इंग्रजी कारकीर्द सुरू झाली आणि या इंग्रजी न्याय-पद्धतीत वकील हा आवश्यक मानला असल्याने, त्यांनी वादी–प्रतिवादीसाठी 'वकील' हा वर्ग येथे प्रथमच अस्तित्वात आणला.

मुंबईला इंग्रजांची राजवट होती. त्यांनी १० फेब्रुवारी १७२८ रोजी तेथे 'मेयर्स कोर्ट' ची स्थापना केली. त्यात एक न्यायाधिश व नऊ पंच

---

१ : संस्कृत स्मृति ग्रंथ, गुजराजाराव–एन्शंट हिन्दु ज्युडिकेचर.

२ : वऱ्हाडचा इतिहास : काळे : पा २२९.

असत. नंतर १७७४ ते १८०५ रेकार्डस कोर्ट व १८०६ ते १८३० मेयर्स कोर्ट होते[१]. यात वादी–प्रतिवादीला वकील असत असे दिसते. याप्रमाणे जेथे इंग्रजी पद्धतीचे कोर्ट तेथे वकील असायचाच.

वऱ्हाडात आणि अर्थात उमरावतीतही १८५४ पासूनच वादी-प्रतिवादीसाठी वकील देण्याची पद्धत सुरू झाली. सुरवातीला मराठीचे उत्तम ज्ञान असणारांना वादी किंवा प्रतिवादीकडून 'एजंट' म्हणून काम करण्याची परवानगी (सनद) देण्यात आली. हाच वऱ्हाडातील किंवा उमरावतीतील वकिली धंद्याचा प्रारंभ होय. सुरवातीला अशा सनदा देणे ठीकही होते, कारण इंग्रजी भाषा आणि न्यायविषयक ज्ञान येथील लोकांना नव्हते. नंतर इंग्रज सरकारने हळूहळू ही प्रथा बंद करून वकिलीची परीक्षा चालू केली[२].

इ. सन १८६२ साली प्रथमच वकिलीची परीक्षा वऱ्हाडात सुरू झाली. ह्या परीक्षा वऱ्हाडच्या ज्युडिशिअल कमिश्नरकडून घेतल्या जात. या परीक्षेत उत्तीर्ण होणारांना ज्यु. कमिश्नरकडून खालील प्रकारचे सर्टिफिकेट दिले जाई[३]. व अशा सर्टिफाईड लोकांनाच नंतर कोर्टात वकिली करण्याचा अधिकार होता. त्यांना 'मराठी वकील' म्हणत असत.

Certificate

I hereby certify that.....was examined at the Examination held at Ellichpur in the month of.....and I consider him duly qualified from the knowledge of the Nativ Language and of the Law and Rules of Practice for the guidance of the Court of Civil Justice to Act as a pleader Agent in the Court of the Hyderabad Assigned Districts.

Commissioner

असे सर्टिफिकेट मिळणाराना 'वकील' (एजंट) म्हणत. परंतु त्यांची एल्. एल्. बी. प्राप्त उपाधीत गणना नसे. अशाप्रकारच्या 'सर्टिफाईड'

---

१ : मुंबईचे वर्णन : माडगांवकर : १८६३ : पा. ७७ व १७९

२ व ३ : क्या आप जानते है ? क. कि. बियाणी : पा. १२

वकिलीच्या परीक्षा इ. सन १८६३, १८६४ आणि १८६७ मध्ये घेण्यात आल्या होत्या. त्यानंतर १८८० पावेतो कोणत्याच परीक्षा झाल्या नाहीत. १८८० नंतर मात्र दरवर्षी किंवा दर दोन वर्षांनी वकिली'ची परीक्षा ज्यु. कमिश्नरांनी पुन्हा सुरू केली. हा क्रम ई. सन १९०८ पावेतो चालू होता.

दरम्यानचे काळात मुंबई विश्वविद्यालयाच्या एल्. एल्. बी. उत्तीर्ण अशा काही लोकांनी वऱ्हाडात वकिली सुरू केली. त्यांना 'इंग्रजी वकील' म्हणत.

"अमरावतीत इ. सन. १८७० मध्ये ३१ व १८८४ चे सुमारास सुमारे ४० वकील कोर्टात काम करीत होते‡. त्यापैकी बहुतेक 'मराठी वकील' होते. 'इंग्रजी वकिलां' पैकी प्रमुख म्हणजे रा. ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर, प्रल्हाद नारायण जोग, पांडुरंग गोविंद आळशी, गोपाळराव खुशाल आणि रा. ब. देवराव विनायक दिगंबर हे होते. सन १८८४ मध्ये दादासाहेब खापर्डे यांनी काही काळ वकिली केली व नंतर ते सरकारी नोकरीत शिरले. पुढे सन १८८९ पासून मात्र त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन नियमित वकिली सुरू केली. सन १८८४ चे थोडे पूर्वी पासूनच सर मोरोपंत जोशी ह्यांनीही उमरावतीत वयाच्या २३ व्या वर्षी वकीली सुरू केली[१].

कै. दादासाहेब खापर्डे यांचे हाताखाली ज्युनियर म्हणून सर्वश्री दादासाहेब करंदीकर, बाबासाहेब पाळेकर, के. वा. ब्रम्ह, भाऊसाहेब दुराणी आणि नारायणराव गोडबोले हे वकील काम करीत असत[२].

"१८८४ सालात विश्वविद्यालयात नैपुण्य मिळवून कायद्याचे ज्ञान प्राप्त करणारे वकील वऱ्हाडात बोटावर मोजण्याइतके सुद्धा नव्हते[३].

कोर्टाच्या इमारती जरी सन १८६० ते १८७० या दरम्यान बांधण्यात आल्या तरी, कोर्टाचे कामकाज मात्र १८५३–५४ मध्येच वऱ्हाडात

---

‡ इ. सन १८७८ मध्ये उमरावतीत वकिलांची संख्या ९२ होती. (प्रशासन रिपोर्ट : हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् : १८७८ : पान १६)

१ व ३ : मोरोपंत जोशी यांचे चरित्र : पृ. २१ व २

२ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पृ. ४००

सुरू झाले होते. ही कोर्टे सुरवातीला एकाद्या सार्वजनिक शाळेच्या इमारतीत किंवा तत्सम इतर खाजगी इमारतीत भरविली जात असत[१].

'भाऊसाहेब असनारे हे स्मॉल कॉज कोर्टात वकिली करीत. त्या कोर्टात त्यांची मिरास होती म्हटले तरी चालेल. ते कोणत्या तरी एका पक्षकाराकडून त्या कोर्टात वकील नाहीत असा त्या कोर्टात खटला असायचा नाही[२].'

'उमरावतीला ज्युडिशियल कमिश्नरचे कोर्ट असून, शेवटचे अपील कोर्ट हैद्राबाद येथे रेसिडेंटचे होते. उमरावतीलाच फक्त वरिष्ट कोर्ट असल्यामुळे, वऱ्हाडातील बहुतेक सर्व कामे उमरावतीलाच येत असत[३].' (इ. स. १९०६ साली वऱ्हाड हा प्रांत राज्यकारभाराकरिता मध्यप्रांतास जोडण्यात आला. उमरावतीचे हायकोर्ट उर्फ ज्युडिशिअल कमिश्नरचे कोर्ट बंद होऊन नागपूरच्या ज्यु. कमिश्नरच्या कोर्टाचा अंमल वऱ्हाडवर सुरू झाला[४].)

त्याकाळी वकिलीच्या धंद्याकडे वळणारांची संख्या फार कमी असे. आताप्रमाणे शेकड्यांनी मोजण्याइतकी कायद्याच्या विद्यार्थ्यांची संख्या त्यावेळी नव्हती. विशेष बुद्धिमान आणि सधन विद्यार्थीच प्रायः कायद्याच्या अभ्यासाकडे वळत. त्यावेळी वऱ्हाडात बहुतेक मराठी वकीलच असत. त्यांना इंग्रजीचा गंधही नसे. यापैकीच काही महत्वाकांक्षी मराठी वकिलांनी आपल्या धंद्यात काही वर्षे घातल्यानंतर इंग्रजी शिकावयास सुरुवात केली व ते नावारूपास चढले, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे[५].

---

१ : इ. स. १८८२ च्या पूर्वी पासून भाजीबाजारात स्पेशल बेंच मॅजिस्ट्रेटचे कोर्ट होते असे दिसते. कारण हे कोर्ट भरत असे ती इमारत नगरपालिकेने कोर्टासाठी भाड्याने घेतली होती असे म्यु. ठराव नं. ३, दि. १६ मे १८८२ वरून दिसून येते.

बहुधा हीच–इमारत ज्याचा घर नं. ४६७ व मालक फतेचंद होता, नगरपालिकेने पुढे इ. स. १९२० साली विकत घेतल्याची नोंद म्यु. रेकॉर्डमध्ये आहे.

यावरून परकोटाचे आंत कोर्ट होते हे दिसून येते.

२ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पृ. ६३२

३, ४ व ५ सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र पा. २२, ३, १९

अमरावतीच्या दिवाणी न्यायालयाचे दप्तरखान्यात आजही सन १८५४ पासूनच्या दिवाणी स्वरूपाच्या केसेस पाहावयास मिळतात. कोर्टाचे कामकाज मुख्यतः मोडीतून चालत असे.

फौजदारी कोर्टातील खटल्यात सरकारी वकील त्यावेळी नसत. पुलीस सब् इन्स्पेक्टर स्वतःच सरकार तर्फे मुकदमा चालवीत. एखादे गुंता-गुंतीचे फौजदारी मुकदम्यात मात्र, सरकार तर्फे एखादे मॅजिस्ट्रेटला ते काम सोपविले जाई. हा मॅजिस्ट्रेट जेव्हा सरकारी वकील या नात्याने मुकदम्याचा युक्तिवाद जज्जासमोर करी तेव्हा त्या मॅजिस्ट्रेट समोरील केसेस, तो त्या कामातून मुक्त होई पावेतो, तहकूब केल्या जात. केव्हा केव्हा एकाद्या खास केसमध्ये, एकादे प्रमुख वकिलाची सरकारतर्फे नियुक्ती केली जाई. परंतु असे क्वचितच होत असे. आणि हा वकील सरकारी वकील म्हणून मानला जात नसे. सरकारी वकील (पब्लिक् प्रॉस्युक्युटर) ची नियुक्ती ही प्रथमच सन १८७३ पासून चालू झाल्याचे दिसून येते.

(वऱ्हाडप्रांत मध्यप्रांतास १९०५–६ मध्ये जोडल्या नंतर 'डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन्स् जज्जाची' नियुक्ती करण्यात येऊ लागली. तो पावेतो फक्त सेशन्स् जज्ज् असत.)

या प्रमाणे वऱ्हाडात व उमरावतीत वकिली धंद्याचा व वकील वर्गाचा उदय झाल्याचे दिसून येते.

उमरावती येथील कोर्टातील न्यायाधिश : इ. स. १८९५ साली उमरावती येथील कोर्टात खालील न्यायाधिश काम करीत होते.

१ श्री. एफ्. एस्. बुलक सी. एस्., हे इ. स. १८९१ ते १८९७ या काळात, उमरावती येथे, हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् साठी ज्युडिशियल कमिश्नर म्हणून काम करीत होते.

२	श्री. बंधूजी जनार्दन	सिविल जज्ज
३	श्री. सुरज नारायण	—,,—
४	श्री. अजिमुद्दीन	एक्सट्रा ॲसि. कमिश्नर
५	श्री. प्रिडॉनस	असि. कमिश्नर
६	लेफ्टनंट हेग	—,,—
७	श्री. रामचंद्र नारायण	एक्स्ट्रा असि. कमिश्नर

८	श्री. बिलग्रामी	एक्स्ट्रा असि. कमिश्नर
९	श्री. अर्देसर दिनशा	—,,—
१०	श्री. त्रिबक गणेश	स्मॉल कॉज कोर्ट

उमरावतीची जलदेवता : छत्री तलाव : इ. सन १८८८ सालापर्यंत उमरावती शहरास पाणी-पुरवठा निव्वळ खाजगी आणि सार्वजनिक विहिरींनीच होत होता.

उमरावतीची लोकसंख्या जसजशी वाढू लागली आणि उद्योग-धंदे वाढू लागले तसतसा शहराला पिण्याचे पाण्याचा तुटवडा जाणवू लागला. विशेषतः उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असे. उमरावतीत खाजगी व सार्वजनिक अशा अनेक विहिरी आहेत, परंतु त्या देखील आटून पाण्याने दुर्मिक्ष फारच तीव्र होई. अशा स्थितीत इ. सन १८७९ मध्ये पावसाचे अभावी पुन्हा दुष्काळ सुरू झाला. त्यामुळे १८८० साली उमरावती शहरात पाण्याचा भयंकर दुष्काळ पडला. त्यावेळी, कोठून तरी पाणी आणून गावास पाणी पुरवठा करण्याची योजना पुढे आली व त्याप्रमाणे इ. सन १८८८ साली दोन लक्ष छत्तीस हजार रुपये खर्चून हा छत्री तलाव बांधण्यात आला.

वास्तविक या तलावाचे मूळ नाव 'काला पाणी तलाव' असे आहे. कारण हा तलाव ज्या पावसाळी नाल्यावर (नाला अडवून) बांधला. त्या नाल्याचे नाव 'काली नदी' असे आहे. तेच नाव तलावासही मिळाले पण तलाव बांधल्यानंतर तेथे जी छत्री बांधण्यात आली त्यावरून मग हा 'छत्री तलाव' म्हटल्या जाऊ लागला. (हा 'काली नदी' नावाचा नाला छत्री तलावातून निघून, राजापेठ व दसरा मैदानाच्या दक्षिणेकडून, स्मशान भूमीतून वाहतो व पुढे माताखिडकी बाहेर अंबानाल्यास मिळतो.)

छत्री तलाव तयार झाला त्यावेळी ३.६६ चौरस मैल जमिनीवरील पावसाचे पाणी त्यात जमा होईल अशी योजना होती. हा प्रदेश म्हणजे छत्री तलावाचे आतील कालापाणी नाल्याचे दोन्ही बाजूचे टेकड्यांचा भाग होय. या टेकड्यांचे दुसऱ्या बाजूचे पाणी तलावात घेण्याकरिता आठ मैल लांबीच्या कच्च्या नाल्या मागाहून खोदल्या व त्यामुळे तलावास पाणी देणाऱ्या जमिनीचे एकंदर क्षेत्रफळ (कॅचमेंट एरिया) ५.३४ चौरस मैलाचे झाले.

तलाव बांधला त्यावेळी तलावाचे पाणी पंचवीस हजार लोकसंख्येला पुरेल, म्हणजे दररोज पांचलक्ष गॅलन पाणी शहरास देता येईल असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात असे दिसून आले की, एकदा तलाव भरला म्हणजे दररोज सुमारे सव्वातीन लक्ष गॅलन पाणी, दीड वर्ष पावेतो या तलावातून देता येते. या शिवाय हा तलाव भरण्यासाठी एकावेळी सतत चोवीस तासात सात ते नऊ इंचापर्यंत पाऊस पडल्याखेरीज तो भरत नाही. तरी पण हा तलाव बांधल्याने शहराला त्याकाळी बराच दिलासा मिळू शकला हे खरे आहे.

हा कालापाणी ऊर्फ छत्री तलाव शहराच्या पूर्वेकडील टेकड्यांचा आश्रय घेऊन व तेथून वाहणाऱ्या नाल्याचे पाण्याचा प्रवाह तलावाचे पोटात राहील अशा रीतीने बांधलेला असून तो मौजे जेवडचे हद्दीत आहे. तलावाचे क्षेत्रफळ बरेच मोठे आहे. या तलावाला दोन बाजूंनी टेकड्या आहेत आणि दुसऱ्या दोन बाजूंनी मातीचा भराव टाकून पाळ बांधण्यात आलेली आहे. तलावाचे पाणी शहराला पुरविता यावे म्हणून मोठा पाईप पाळेचे खालून बाहेर काढलेला आहे, तेथेच छत्री बांधण्यात आली आहे. या छत्रीपावेतो जाण्यासाठी फळ्यांचा पूल आहे. छत्रीचे खालीच पाणी सोडण्याच्या चाब्या आहेत. तलावाचे तळापासून १५ फूट उंचीवर पाईप असल्याने पंधरा फुटापेक्षा जास्त पाणी तलावात असेल तरच त्याचा शहराला उपयोग होतो.

या तलावाचे पाणी त्यानंतर लौकरच म्हणजे १८९०–९१ मध्ये शहराला नळाद्वारे उपलब्ध करून देण्यात आले होते व त्यासाठी नियमही करण्यात आले होते. तलाव पूर्ण भरलेला असला म्हणजे दररोज सव्वा तीन लक्ष गॅलन या प्रमाणात दीड वर्षे पावेतो पाणी पुरवू शकतो. जास्त पाणी दर दिवशी गावास दिल्यास वर्षभर पुरते.

हा तलाव शहराचे वस्तीपासून दूर, निसर्गरम्य अशा ठिकाणी असल्याने, पूर्वी गावात प्लेगचा प्रादुर्भाव होई तेव्हा, अनेक लोक या तलावाशेजारी झोपड्या बांधून रहायला जात असत. अनेक लोक तेथे हल्ली सुटीच्या दिवशी वनभोजनाला जातात.

पहिली आहुती युरोपियनांची : हा छत्री जलाशय सुरवातीला जेव्हा तुडुंब भरून वाहू लागला तेव्हा दोन युरोपियनांना त्यात बोटिंग करण्याची स्फूर्ती आली आणि शेवटी बोट उलटून या दोन युरोपियनांची

पहिली आहुती या जलदेवतेने घेतली. नंतर त्यांची प्रेते सापडेनात. शेवटी जमालसाहेबांनी गळ टाकून प्रेते बाहेर काढली. या घटनेमुळे छत्री तलावाकडे जायला लोक भीत असत. ही घटना १८९०–९१ मधील असावी[१].

युरोपियनांची शाळा : हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस्मध्ये (म्हणजे वऱ्हाडात) युरोपियन विद्यार्थ्याकरिता सर्वप्रथम उमरावती येथे दि. १ एप्रील १८७९ मध्ये एक शाळा सुरू करण्यात आली होती. या शाळेत सुरवातीला एकूण ८ विद्यार्थी होते व त्यांचे सरासरी वय देखील आठ वर्षे होते.

एकही युरोपियन विद्यार्थी त्यापूर्वी खाजगी किंवा सरकारी शाळेत जात नव्हता.

ग्रँट–इन–एड् चे नियमानुसार युरोपियनांची शाळा चालविल्या जाऊ शकत नव्हती, म्हणून त्याकरता स्वतंत्र व्यवस्था करावी अशी मागणी उमरावती येथील कमिश्नरने हैद्राबादच्या रेसिडेन्टकडे केली होती[२].

कॅम्प म्युनिसिपल कमेटी : अमरावती म्युनिसिपल कमेटीच्या सीमा (म्यु. बाऊंड्री) निर्धारण करणारे सन १८६९ चे नोटिफिकेशन प्रमाणे जेवढे क्षेत्र ठरवून दिले होते त्या क्षेत्रातून सन १८८९ साली, रेल्वे लाईनच्या पलीकडील (मालटेकडीच्या मागील कुऱ्हा रोडचे उत्तरेकडील व मोर्शी रोडच्या पूर्वे कडील.) क्षेत्र, उमरावती म्यु. हद्दीतून वगळण्यात येऊन कॅम्प म्युनिसिपल कमेटी स्थापन करण्यात आली.

या कॅम्प विभागात बहुतेक सर्व सरकारी कचेऱ्या, युरोपियन व इतर अधिकाऱ्यांची तसेच सरकारी कचेऱ्यांतून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने होती. शिवाय वडाळी हे गावही त्यातच घेतले गेले. अशा रीतीने कॅम्प म्यु. कमेटी इ. स. १८८९ मध्ये अस्तित्वात आली.

रेसकोर्स : याच कॅम्पचे भागात 'पोलिस लाईन ॲन्ड रिझर्व्ह इन्फन्ट्री लाईन फॉर वन् कंपनी[३],' होती. रायफल रेंज व पोलिस परेड

---

१ : कै. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.

२ : प्रशासन रिपोर्ट, १८७९ : पा. ५९

३ : गॅझेटीयर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रीक्टस् : १८७०

खाली बसलेले (डावीकडून) १ कॅ. के. जी. देशपांडे, २. कॅ. बा. म. उर्फ बाबाजी दिक्षित. ३ कॅ. पेंडसे, ४. कॅ. गोविंदराव काळे

खुर्चीवर बसलेले : १. व २., ३. कॅ. दादासाहेब खापर्डे, ४. लिं. एडवर्डस् E. A. C., ५. लिं. बॅरि. रेनॉल्डस्, ६. कॅ. तात्यासाहेब मुधोळकर, ७. कॅ अनगळ.

उभी रांग पहिली : १., २. कॅ. पंडितराव जोशी, ३., ४. कॅ विनायकराव ओक, ५. कॅ. करंदीकर, ६. कॅ. नारायराव केतकर, ७. कॅ संजाना, ८. कॅ. कट्टेगिरी, ९. कॅ. म. ख. चिटणीस, १०., ११. कॅ. भा. गो. दामले.

उभी रांग दुसरी : १. कॅ. विश्वनाथपंत काळे, २., ३. श्री. वासुदेव नारायण जोग, ४. कॅ. पद्मनाथ दंडे, ५. कॅ मोरोपंत जोशी, ६. कॅ. प्रल्हाद ना. जोग. (टीप : ज्यांचा परिचय मिळाला नाही ती जागा कोरी सोडली आहे.)



चित्र क्र. ५४ : उमरावती बार रुमची इमारत.

चित्र क्र. ५५ : निजामशाहीतील कोर्टाचे दृश्य.

ग्राऊंड होते. या ग्राऊंडचा वेळी प्रसंगी 'रेस कोर्स' म्हणूनही उपयोग केला जात असे. (आजही ही रिझर्व्ह पोलिस लाईन कायम आहे.)

लोकसंख्या : कॅम्प म्यु. कमेटी स्थापन झाली त्यावेळी, त्या म्यु. हद्दीतील लोकसंख्या ५२८५ एवढी असून त्यापैकी ४०३९ हिंदु, ७०८ मुसलमान, ४६१ ख्रिश्चन व इतर ८७ याप्रमाणे जातवावर संख्या होती.

वडाळी तलाव : कॅम्प म्यु. क्षेत्रात बऱ्याच विहिरी होत्या. शिवाय शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून वडाळी गावाशेजारचे तलावाचा विकास करण्यात येऊन, जुन्या पद्धतीने या तलावाचे पाणी शुद्ध करून ते या भागाला पुरविण्यात येऊ लागले. वडाळी तलावाची क्षमता १५ लक्ष क्युबिक फूट पाणी सांठविण्याची असून, त्याचे क्षेत्रफळ एकूण दोन चौरस मैल एवढं आहे. इ. सन १८९९ चे दुष्काळात, दुष्काळ निवारणाचे कार्य म्हणून दोन लहान तलाव बांधण्यात आले होते. परंतु ते १९०३ चे पुरात वाहून गेले.

कंपनी गार्डन : कॅम्प क्षेत्रातच कचेरीच्या मागील भागात एक सुंदर बगिचा होता. ईस्ट इंडिया कंपनीचे स्मरणार्थ त्याला 'कंपनी गार्डन' असे नाव होते. सायंकाळी तेथे लोक करमणूक म्हणून फिरायला जात असत. हा गार्डन आजही कायम असून, हल्ली ह्या बगिच्याचे नाव 'राजेंद्र बाग' असे करण्यात आलेले आहे.

याशिवाय कॅम्प विभागातच चिलमशाह वलीचा दर्गा, सिमेट्री व एक चर्च आहे.

(एकाच गावात अशा रीतीने शहर व कॅम्प नगरपालिका ठेवण्याचे इंग्रजांचे धोरण होते व कॅम्प नगरपालिका ही ब्रिटिश साम्राज्यशाहीची खूण होती, म्हणून स्वातंत्र्यानंतर "कॅम्प नगरपालिका रद्द करून सर्व शहराला एकच नगरपालिका असावी" अशी मागणी प्रस्तुत लेखकाने इ. सन १९४८ साली केली होती. त्यानुसार अमरावती नगरपालिकेने ठराव ही मंजूर केला व सरकारकडे पाठविला. त्याप्रमाणे इ. सन १९४९ साली ही कॅम्प नगरपालिका, शहर नगरपालिकेत विलीन केली गेली.)

दादासाहेब खापर्डे यांचा पराभव : इ. सन १८८९ पासून दादासाहेब खापर्डे यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन उमरावतीला वकिली

सुरू केली होती. आणि १८९० मध्ये जेव्हा डिस्ट्रिक्ट कौन्सिले अस्तित्वात आली[१]. तेव्हा उमरावती डिस्ट्रिक्ट कौन्सिलचे ते अध्यक्ष नेमल्या गेले[२].

त्याच वर्षी दि. १ एप्रील १८८९ ला उमरावती म्युनिसिपालिटीच्या निवडणुकी झाल्या. त्यात दादासाहेब खापर्डे हे नमुना विभागातून उभे होते. परंतु या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. तेव्हा अनेक सनातन्यांनी दादासाहेबांना सांगितले की, "तुमचा संबंध दारू पिणारे व मटन खाणारे यांच्याशी असल्यामुळेच तुमचा हा पराभव झाला आहे, म्हणून तुम्ही सुधारकांशी संबंध सोडून सनातनी लोकांत मिसळून राहा[३]." (पुढे दादासाहेब निवडून आले होते व ते उमरावती म्यु. कमेटीचे १९०७ पावेतो उपाध्यक्षही होते.)

या १ एप्रील १८८९ च्या म्यु. निवडणुकीत खालील लोक निवडून आले होते.

नार्थ वार्ड : १ बाळकृष्ण बळवंत; २ मोरो विश्वनाथ जोशी; ३ केवलचंद गंभीरचंद; ४ अंताजी गोविंद केसकर; ५ रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर; ६ श्री. किसनदास गोवर्धनदास राठी.

साऊथ वार्ड : १ विष्णू हरि जोशी; २ एकनाथ लक्ष्मण; ३ कोंडो बालाजी; ४ बाळकृष्ण जे. पेंडके; ५ रघुनाथ एन्. मुधोळकर; ६ प्रल्हाद ना. जोग.

ईस्ट वार्ड : १ बलवंत व्हि. खोत; २ यशवंत गोविंद केसकर ३ रामचंद्र एन्. मुधोळकर; ४ जनार्दन नारायण; ५ नारायण गोविंद केसकर; ६ डिसा.

या निवडणुकीचा निकाल दि. ६ एप्रील १८८९ रोजी लागला होता[४].

काँग्रेसचे विलायतेला जाणारे शिष्ट मंडळात उमरावतीचे दोन नेते : इ. सन १८९० साली काँग्रेसने आपली बाजू इंग्लंडच्या जनतेसमोर मांडण्यासाठी

---

१ : उमरावती जिल्हा गॅझेटियर : १९११
२ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. ८
३ : कै. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.
४ : म्यु. प्रोसिडिंग बुक; ठराव नं. १ दि. ६-४-१८८९.

एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविण्याचे ठरविले होते.

या शिष्टमंडळाचे नेते बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे होते व त्यांचे सोबत उमरावतीचे रा. रंगनाथपंत मुधोळकर आणि रा. मोरोपंत जोशी यांचीही निवड झाली होती.

इंग्लंडमध्ये या शिष्ट मंडळातील लोकांनी गावोगाव फिरून व्याख्याने दिली आणि हिंदुस्थानचे राजकीय गा-हाणे तेथील जनतेसमोर मांडून तिकडील लोकमत हिंदुस्थानच्या बाजूने वळविण्याचे भरीव देशकार्य केले होते.

या शिष्ट मंडळासोबत जाणारे उमरावतीचे तरूण वकील श्री. मोरोपंत हे त्यावेळी केवळ २९ वर्षाचे होते. त्यामुळे त्यांच्या या शिष्टमंडळासोबत जाण्याच्या घटनेचे लोकांनी कौतुक केले होते[१].

उमरावतीचे परकोटावर रोषणाई : दि. १ जानेवारी १८९० हा महाराणीचा वाढदिवस होता. त्याच दिवशी रेसिडेन्टही शहराला भेट देणार होते. त्या निमित्त उमरावती शहराचे परकोटावर आणि शहर विभागात रोषणाई करण्यात आली होती. त्यासाठी नगरपालिकेने पांचशे रुपये खर्च मंजूर केला होता[२].

त्यापूर्वीहि महाराणीच्या ज्युबिली समारंभाचे दिवशी, म्हणजे दि. १६ फेब्रुवारी १८८७ रोजी उमरावतीतील सर्व इमारतीवर रोषणाई करण्यासाठी नगरपालिकेने रु. १३०० मंजूर केले होते व सर्वश्री गिरिराव, एकनाथ लक्ष्मण, कोंडो बालाजी, रामबिलास, विष्णू हरि, कबूरमल, बलवंत खोटे, मो. बि. जोशी व अयोध्याप्रसाद या सद्गृहस्थांची एक उपसमिती नेमली होती.[३]

संमतिवयाचे बिलावर पश्चिसंवाद : पेशवाई बुडाली आणि देशात इंग्रजांचे राज्य सुरू झाले; तेव्हा साहाजिकच राज्यकर्त्यांच्या आचार-विचारांचा प्रजेवर परिणाम होऊ लागला. एतद्देशीयांत नवे वैचारिक वारे वाहू लागले. हे प्रथम मंद वाहत असले तरी इ. सन १८७० नंतर त्याने प्रचंड स्वरूप

---

१ : सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र : पा. २६ व ५२
२ : म्यु. ठराव नं. १ दि. २९ दिसें. १८८९
३ : म्यु. ठराव नं. २ दि. २४-१-१८८७.

धारण करून, लोकांच्या आचार–विचारात अभूतपूर्व संक्रमण घडवून आणले. व्यक्तिविकास आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या पाश्चात्य संस्कृतीच्या सान्निध्यात महाराष्ट्रीय जनसमाज येताच, त्याच्या ठिकाणी प्रक्षोभ निर्माण होऊन त्याने जोराने हालचाल करायला सुरूवात केली..... त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून काही नवीन चळवळी महाराष्ट्रात सुरू झाल्या. त्यात स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, विधवाकेशवपननिषेध, बालावृद्धविवाहनिषेध, पुनर्विवाह, हुंडानिषेध, मदिरापाननिषेध, वेश्यागमननिषेध, कन्याविक्रयनिषेध व संमतिवयाचा कायदा इत्यादी चळवळी सुरू झाल्या.

स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबरोबरच बालविवाहाचा निषेध व प्रौढविवाहाच्या अप्रत्यक्ष निषेधाचा एक प्रकार म्हणूनच पुढे संमतिवयाच्या बिलाचा पुरस्कार काही मंडळींनी केला, आणि या प्रसंगी बिलाच्या पुरस्कर्त्यांत आणि निषेधकर्त्यांत एक प्रकारची रणे माजली. मलबारी शेठ यांच्या बिलात संमतिवयाची मर्यादा दहा वर्षाच्या ऐवजी सुधारून बारा वर्षाची सुचविण्यात आली होती. "स्त्रीची संमति असो वा नसो, बारा वर्षाच्या आतील मुलीशी तिच्या पतीनेही संभोग केल्यास तो जबरी संभोग समजून त्याला शिक्षा व्हावी" अशा स्वरूपाच्या बिलावर महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानात त्यावेळी तीव्र स्वरूपाचा मतभेद प्रदर्शित करण्यात आला. दि. ७ फेब्रुवारी १८९१ रोजी पुण्यात व दि. ८ फेब्रुवारी १८९१ रोजी मुंबईत विराट सभा भरून त्यांत बिलाचा निषेध करण्यात आला होता. 'आमच्या धार्मिक व सामाजिक बाबतीत सरकारला दखलगिरी करून कायदा करण्याचा मुळीच हक्क नाही' या मुद्यावर लोकमान्य टिळकांनी या बिलाचा निषेध केला तर, 'सामाजिक सुधारणा कायद्याच्या मदतीने केल्यास त्यांची गती वाढेल' या मुद्यावर प्रिं. आगरकर, डॉ. भांडारकरादिकांनी त्याचा पाठपुरावा केला होता[१].

याच खळबळजनक प्रश्नावर सर्वत्र निषेध आणि पुरस्कार जाहीर होत असताना उमरावती शहरात त्याची प्रतिक्रिया न उमटती तरच नवल! उमरावतीतही फेब्रुवारी १८९१ मध्ये नगरवाचनालयाचे दिवाणखान्यात 'संमतिवयाचे बिलावर' एक परिसंवाद आयोजित करण्यात येऊन, या विषयावर श्री. दादासाहेब खापर्डे, श्री. रंगनाथपंत मुधोळकर आणि

१ : मराठी साहित्याची रुपरेषा : डॉ. दांडेकर : पृ. २१०–११



चित्र क्र. ५६ : डिस्ट्रिक्ट अॅन्ड सेशन्स् कोर्टाची इमारत. उमरावती. (इ. स. १८८९)



चित्र क्र. ५७ : उमरावतीची जलदेवता. छत्री तलाव (पृष्ठ २१६ पहा)



चित्र क्र. ५८ : छत्री तलावातील 'छत्री'.

कर्ते सुधारक म्हणून ख्यातनाम असलेले श्री. मोरोपंत जोशी यांची परिसंवादात रोचक अशी भाषणे झाली होती. या परिसंवादाला नागरिकांची खूप गर्दी जमली होती. (पुढे हे संमतिवयाच्या कायद्याचे बिल कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदे कौन्सिलात दि. १९ मार्च १८९१ रोजी मंजूर झाले. नंतर ३७ वर्षांनी इ. सन १९२८ साली मध्यवर्ती असेम्ब्लीत आणलेल्या डॉ. सर हरिसिंग गौर यांचे 'एज् ऑफ् कन्सेन्ट बिल' व श्री. हरबिलास सारडा यांचे 'बालविवाह प्रतिबंधक बिलाचे संदर्भात भारत सरकारने एक 'एज् ऑफ् कॅन्सेंट कमेटी' नेमली. तिचे अध्यक्ष श्री. मोरोपंत जोशी हेच होते. या कमेटीचा रिपोर्ट दि. २० जुन १९२९ रोजी तयार झाला व त्यात वयोमर्यादा १५ वर्षे असावी अशी शिफारस केली होती,)

सन १८९६ चा भयंकर दुष्काळ : एकोणविसाव्या शतकात अवर्षण आणि त्यामुळे पडणाऱ्या भयंकर दुष्काळाला जनतेला वारंवार तोंड द्यावे लागले. याचे मुख्य कारण म्हणजे इंग्रजांनी हिंदुस्तानातून इतर औद्योगिक कच्च्या मालासोबतच अन्नधान्याची केलेली प्रचंड निर्यात होय.

इ. सन १८४९ मध्ये ८,५८,००० पौंड किंमतीचे अन्न–धान्य (मुख्यत: तांदूळ व गहूं) निर्यात झाले तर इ. सन १८५८ मध्ये ३८,००,००० पौंड, १८७७ मध्ये ७९,००,००० पौंड, व १९०१ मध्ये ९३,००,००० पौंड किंमतीचे अन्न–धान्य निर्यात करण्यात आले. (१९१४ पावेतो हा आंकडा १,९३,००,००० इतका वाढला होता.) याप्रमाणे एकीकडे हा प्रकार सुरू असतानाच दुसरीकडे एकोणविसाव्या शतकाचे उत्तरार्धात दुष्काळांची संख्या व तीव्रता फारच वाढली.

एकोणविसाव्या शतकाचे पूर्वार्धात देशात एकूण ७ दुष्काळ झाले व त्यांत सुमारे १५ लाख माणसे मृत्यू पावलीत. उत्तरार्धात एकूण २४ दुष्काळ झाले (त्यापैकी १८५१ ते १८७५ पर्यंत पहिल्या २५ वर्षात ६ दुष्काळ झाले व १८७५ ते १९०० पर्यंतच्या पंचवीस वर्षात १८ दुष्काळ झाले) व त्यांत सरकारी आकडचाप्रमाणे तीन कोटीहून अधिक माणसे मृत्युमुखी पडली. शंभर वर्षापूर्वीच्या मानाने १९ व्या शतकाच्या शेवटच्या तीस वर्षात दुष्काळांची संख्या चौपट झाली व त्यांचा विस्तार चौपट वाढला. (डिग्बी : प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया, १९०१) डब्ल्यू. एस्. लिली

यांच्या 'इंडिया ॲन्ड् इटस प्रॉब्लेम्स्' या पुस्तकात सरकारी माहितीच्या आधारे पुढील आकडे दिले आहेत.

वर्ष	दुष्काळामुळे मृत्यू
१८०० ते १८२५	१० लक्ष
१८२५ ते १८५०	४ लक्ष
१८५० ते १८७५	५० लक्ष
१८७५ ते १९००	२ कोटी ६० लक्ष

वाढत्या दुष्काळांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १८७८ साली एक दुष्काळ कमिशन नेमण्यात आले. या कमिशनचा रिपोर्ट १८८० साली प्रसिद्ध झाला. त्यांत पुढील उद्‌गार काढले आहेत.

"जनतेच्या प्रचंड बहुसंख्येला शेतीवर अवलंबून राहावे लागते व दुसरा कोणताही धंदा नाही की जो जनतेच्या मोठ्या विभागाला पोसू शकेल. हिंदुस्थानातील दुष्काळांचे परिणाम एवढे भीषण होण्याचे एक मुख्य कारण हे होय. दुष्काळग्रस्त लोकांना परिणामकारक रीतीने मदत देण्यात एक मोठी अडचण येते तीसुद्धा हीच होय.

"हिंदुस्थानच्या लोकांचे दारिद्र्य व दुष्काळाच्या प्रसंगी त्यांच्यावर ओढवणारे संकट याचे मूळ कारण मुख्यतः हे आहे की दुर्दैवाने शेती हाच बहुतेक लोकांचा एकमेव धंदा आहे. शेतीच्या धंद्यातून वरकड लोकसंख्येला बाहेर काढण्यासाठी व तिला चरितार्थाचे साधन म्हणून उद्योगधंदे वगैरेत काम मिळवून देण्यासाठी विविध प्रकारचे उद्योगधंदे सुरू केले पाहिजेत. या गोष्टीचा जिच्यात समावेश केलेला नाही अशी कोणतीही उपाययोजना सध्याची अनिष्ट परिस्थिती दूर करण्यास पुरेशी होऊ शकणार नाही".

त्यावेळी देशाची जी परिस्थिती होती तिचे विदारक चित्र वरील अहवालात स्पष्ट दिसून येते. अशा पार्श्वभूमीवर इ. सन १८९६ चा दुष्काळ सुरू झाला. लोकांची अक्षरशः अन्नान्न दशा झाली. त्यावेळी श्री. दादासाहेब खापर्डे हे उमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते. सर्वत्र दुष्काळ असताना उमरावती शहर त्यातून कसे सुटणार ? येथेही तीव्र दुष्काळ जाणवू लागला. अन्नाची टंचाई व भाववाढ सुरू झाली.+

+ परिशिष्ट क्रमांक ५ पहा.



चित्र क्र. ५९ : वडाळी तलाव. (पृष्ठ २१९ पहा)



चित्र क्र. ६० : बागवे स्विमिंग पूल, वडाळी.



चित्र क्र. ६१ : (पृष्ठ २२३-२४ पहा)

वऱ्हाडातील भीषण दुष्काळ : लोकांची झालेली दुर्दशा.

चित्र क्र. ६२ : दुष्काळाने जनावरे मेली. माणसे तिफण ओढतात.

अमरावतीतील पहिला भूक मोर्चा : "इ. स. १८४५ मध्ये जो दुष्काळ पडला होता त्यावेळी शेठ धनराज यांचे घरावर लोक गेलेत याबद्दलची माहिती मागे आलेली आहेच. परंतु त्यावेळी लोक जमावाने गेले होते, मोर्चाने नव्हे.

परंतु या १८९६ चे भयंकर दुष्काळाचे वेळी जनतेचे जे हाल झालेत त्यावेळी, उमरावतीचे एक तरुण कार्यकर्ते श्री. दादा जोग यांनी दोनशे माणसांचा शिस्तबद्ध मोर्चा 'हाताला काम व पोटाला अन्न' अशा घोषणा देत अमरावती शहरातून काढला होता. उमरावती शहरातील हा पहिला भूक मोर्चा होय.

हा मोर्चा दादासाहेब खापर्डे यांचेकडे नेण्यात आला. कारण त्यावेळी उमरावती शहराचे पुढारी दादासाहेबच होते.

दादासाहेबांनी मोर्चेवाल्यांना दुसरे दिवशी डेप्युटी कमिश्नरांचे कोर्टात येण्याचा सल्ला दिला.

ठरल्या प्रमाणे दुसरे दिवशी सुमारे ४०० लोक कोर्टाजवळ 'काम आणि अन्न' मागण्यासाठी जमले.

त्यावेळी मि. ए. लुकास, आय. सी. एस; या नावाचा एक इंग्रज डे. कमिश्नर होता. दादासाहेबांनी त्याची भेट घेऊन जमलेल्या लोकांची मागणी त्यास सांगितली. पण त्या अधिकाऱ्याला तर असेच वाटत होते की, (वऱ्हाडात) मुळी दुष्काळच नाही. ही माणसे केवळ देखाव्यासाठी जमा करून आणलेली आहेत. "दुष्काळ खरोखर लोकांना भासत आहे" हे सांगितल्यानंतरही त्यास खरे वाटेना. त्याचा भरवसा तहसिलदाराचे रिपोर्टावर होता असे दिसले वरून, दादासाहेबांनी तहसिल-दाराविरूद्ध लोकांच्या तक्रारी आहेत असेही सांगितले. शेवटी डे. कमिश्नरने "मी उद्या काही धान्याचे व्यापारांना भेटतो" एवढेच आश्वासन दिले. 'धान्याचे भाव ठरवायचे नाहीत किंवा दुष्काळी कामेही सुरू करायची नाहीत' हे देखील डे. कमिश्नरने स्पष्ट केले.

कामधंदा नाही आणि धान्याची टंचाई व भाववाढ झालेली. अशा वेळी लोक सरकारकडे जाणार नाहीत तर जाणार कोठे ? आणि सरकारचा जाब वरप्रमाणे मिळाला. त्यामुळे खालच्या अधिकाऱ्यांना आणि

त्यांचेशी हात मिळवणी करणाऱ्या व्यापाऱ्यांना तर अस्मान ठेंगणे वाटू लागले.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. तहसिलदाराने सर्व धान्य-व्यापाऱ्यांना दुकाने बंद करण्यास भाग पाडले.

शेवटी दादासाहेब खापर्डे यांनी सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून नगरपालिकेतच स्वस्त धान्याचे दुकान उघडण्याचे ठरविले. शिवाय आणखी लहान लहान दुकाने काढून, माणशी दोन पायली ज्वारी, दोन आणे पायली या दराने देणे सुरू केले. ह्या दुकानातून लोकांची तोबा गर्दी होऊ लागली. या कामात श्री. मुधोळकर यांनी मनःपूर्वक मदत केली.

याशिवाय तीन चारशे लोकांना शिजविलेले अन्न दोन्ही वेळ स्वतः दादासाहेबांनी स्वखर्चाने देणे चालू केले.

तसेच काही धनाढ्य लोकांकडूनही लोकांना स्वस्त धान्य देण्याची व्यवस्था करविली. आणि पेवातील धान्य माफक दराने विकण्याची सोय केली.

या दुष्काळ प्रसंगी, एकीकडे असा मदतीचा प्रयत्न चालू असतानाच दुसरीकडे, सरकारी नोकरांनी स्वतःच्या स्वार्थासाठी, तिप्पाईताच्या मार्फत बाहेरून धान्य आणवून व ते अधिक दराने विकून नफेबाजी केली. आणि ह्या संधीचा भरपूर फायदा घेता यावा म्हणून, दादासाहेब खापर्डे यांच्या प्रयत्नांनी जी दुकाने उघडली होती ती स्वार्थी सरकारी अधिकाऱ्यांनी बंद करविली. ही गोष्ट वरिष्ट अधिकाऱ्याकडे कळविल्यानंतरही त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे जनतेचे फार हाल झाले[१].

"१८९६ साली सर्व देशातच, पण विशेषतः दक्षिणेत मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळावर लोकमान्य टिळकांनी 'केसरी' तून अनेक लेख लिहून 'हिंदुस्तानच्या संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे अव्याहतपणे वाहत असल्यामुळेच हे दुष्काळ इतके वारंवार पडतात व इतके तीव्रतेने जाणवतात" ह्यांची लोकांना जाणीव करून दिली होती. याशिवाय लोकमान्य टिळकांनी स्वतः फंड वगैरे गोळा करून दुष्काळी भागाला बरीच मदत केली होती. सारांश, एवढा दुष्काळ पडला तरी सरकार झोपलेले होते. लोकांसाठी नेत्यांनाच शक्य त्या हालचाली कराव्या लागल्या. अशा रीतीने हा दुष्काळ कसाबसा एकदाचा पार पडला[२].

१ व २ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र : पा. १२ ते १९



चित्र क्र. ६३ : दुष्काळाने झालेली मानवाची दुर्दशा.

चित्र क्र. ६४ : सर सी. शंकरन नायर, मद्रास (पृष्ठ २३०)
इंडियन नॅशनल काँग्रेसच्या
उमरावती अधिवेशनचे अध्यक्ष



चित्र क्र. ६५ : श्री. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे (पृ. २२८ पहा)
इंडियन नॅशनल काँग्रेसच्या १३ व्या 'अमरावती'
अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष

देशातील अनेक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर भरलेली

इ. सन १८९७ ची 'उमरावती काँग्रेस'

देशातील दुर्धर दुष्काळ, वऱ्हाड–महाराष्ट्रात उद्‌भवलेली प्लेगच्या तापाची साथ, बंगाल प्रांतात झालेला धरणी कंप व भयंकर वादळाने तेथील प्रजेची उडविलेली धुळधाण आणि अनन्वित नुकसान, पुण्यातील प्लेगच्या साथीचे प्रकरणातून ऐन राणीच्या ज्युबिली महोत्सवाचे रात्री झालेलें रॅन्ड व आयर्स्ट साहेबांचे खून व त्या खुनाचे आरोपाखाली पकडण्यात आलेल्या चाफेकरावरील सुरू असलेला खटला, याच प्रकरणी संशयावरून पकडण्यात आलेल्या नातु बंधूंचा छळ व त्यांच्या मालमत्तेची जप्ती आणि या खुनाचे प्रकरणी लोकमान्य टिळकांना अडकवण्याचे न साधल्याने त्यांनी एक वर्षापूर्वी शिवजयंत्युत्सवात केलेले व केसरीत प्रसिद्ध झालेले एक भाषण; त्या खाली त्यांना सरकारने केलेली अटक व शिक्षा.+ अशा या अनेक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर, १८९७ च्या दिसेंबरच्या २७, २८ व २९ तारखांना उमरावती येथें राष्ट्रीय सभेचे (ऑल इंडिया काँग्रेसचे) तेरावे अधिवेशन मद्रासचे सर शंकरन् नायर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

उमरावतीत त्याकाळी श्री. मोरोपंत जोशी, श्री. रंगनाथपंत मुधोळकर व श्री. दादासाहेब खापर्डे ही पुढारी मंडळी काँग्रेसची कार्यकर्ती होती.

त्यापैकी श्री. मोरोपंत जोशी व श्री. मुधोळकर हे तर काँग्रेसच्या वतीने १८९० साली इंग्लंडला जे डेप्युटेशन पाठविण्यात आले होते त्यात गेले होते व त्यांनी तीन महिने भारतीय जनतेचे दृष्टीने गावोगावी प्रचार करून इंग्लंडमधील लोकमत भारतास अनुकूल करण्याचा उद्योग केला होता. अर्थातच उमरावतीस काँग्रेस अधिवेशन भरवायचे तर सर्वात तरुण

+ लो. टिळकांना शिक्षा झाली त्यामुळे महाराष्ट्रात दसरा–दिवाळीचे सण अत्यंत निरुत्साहाने पार पडले होते. कित्येक देशी वृत्तपत्रांनी टिळकांचा फोटो व इतर पानावर फक्त जाड काळ्या रेषा देऊन अंक प्रसिद्ध केले होते. पुण्याच्या चतुःशृंगीची दसऱ्याचे दिवशी निघालेली मिरवणूक, सोबत वाजंत्री असताही वाद्ये न वाजविता निघाली होती. सुतकासारखा दुखवटा व्यक्त केला जात होता.

म्हणून रा. मोरोपंतावर त्यासाठी बैठक बोलावण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

"काँग्रेसचे अधिवेशन उमरावतीस भरविण्याचे ठरविले.....आणि त्यांनी (अण्णासाहेब मोरोपंत जोशी) लागलीच कार्याची रूपरेषा आखण्यासाठी बाररूममध्ये सभा बोलाविली. पैसे जमविण्याचे काम अर्थातच अण्णासाहेबावरच पडले. अण्णासाहेबांनी वर्गणीचे आकडे घाला म्हणून सहकाऱ्यांना सांगितले. त्यावेळचे एक मोठे वकील रा. प्रल्हादपंत जोग हे सर्वात वयोवृद्ध म्हणून त्यांनी प्रथम आकडा टाकावा असे अण्णासाहेब म्हणाले. तेव्हा 'तुम्हीच प्रथम आकडा घाला' असे प्रल्हादपंतांनी सुचविले आणि रा. मोरोपंत जोशी यांनी पहिला पंधराशे रुपयांचा आकडा टाकला. त्याचा परिणाम होऊन त्याच बैठकीला दहा हजाराचा निधी जमला.[१]"

काँग्रेस अधिवेशन भरण्याचे नक्की झाल्याने सर्व मंडळी त्या दृष्टीने तयारीला लागली. स्वागत मंडळ निवडण्यात आले. त्याचे अध्यक्षस्थान श्री. दादासाहेब खापर्डे यांना देण्यात आले. तयारी चालू असतानाच उमरावतीत प्लेगची साथ सुरू झाली. देशात झालेल्या व होत असलेल्या घडामोडी आणि उमरावतीत सुरू झालेली प्लेगची साथ इत्यादीमुळे उमरावतीचे हे अधिवेशन भरणार की नाही ? याची शंका सर्वत्र निर्माण झाली‡. पण उमरावतीचे काँग्रेस नेते सर्वश्री दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, रंगनाथपंत मुधोळकर व रा. प्रल्हादपंत जोग इत्यादी प्रमुख मंडळींनी या परिस्थितीने खचून न जाता नेटाने अधिवेशन भरविण्याची तयारी चालू ठेवली. त्यासाठी निधि जमविण्यात आला. सर्व वऱ्हाडातून वर्गण्या जमल्या. प्रतिनिधींच्या उतरण्या-राहण्याची सोय, पेंडॉल, स्वयंसेवक इत्यादी व्यवस्था होऊ लागली.

---

१ : सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र : पा. ५३

‡ ".....१८९७ सालची काँग्रेस उमरावतीला झाली. त्यावर्षीचा दुष्काळ कल्पनातीत झाला.....त्यापूर्वी थोडेच दिवस अगोदर रँड आणि आयर्स्ट साहेबांचे खून झाल्यामुळे वातावरण क्षुब्ध झाले होते व काँग्रेसचे अधिवेशन होते की नाही अशी काळजी वाटली. पण तसे झाले नाही. तरी प्रतिनिधींच्या संख्येवर त्याचा अनिष्ट परिणाम झालाच. (काँग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपुर प्रांताचा इतिहास : १९३५ : पा. ४१)

अधिवेशनाला आणले गेलेले अडथळे : उमरावतीत काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यासाठी नोव्हेंबरचे सुरुवातीला उमरावतीच्या डेप्युटी कमिश्नरकडे परवानगी मागण्यात आली. तेव्हा येथे काँग्रेस भरविण्यासाठी निजामाची परवानगी आवश्यक आहे[१], असे डे. कमिश्नरने स्वागत मंडळाला कळविले आणि डे. कमिश्नर मि. बुलक यांनी मुधोळकरांना पत्र पाठवून 'उमरावतीला काँग्रेस घेऊ नये कारण प्लेग जोरात आहे[२]'. असेही कळविले होते. त्यातच उमरावतीत अशी एक अफवा उठली की, "मि. बुलकने हैद्राबादला रेसिडेन्टला तार पाठवून काँग्रेसला बंदी घालावी अशी मागणी केली आहे[३]" त्यामुळे दादासाहेब, मुधोळकर व दादा जोशी हे नागपूरला कमिश्नराकडे गेले. नागपूरला जाताना प्रत्येक पॅसेंजर गाडी डॉक्टर तपाशीत होते[४] नागपूरला ही मंडळी कॅ. हार्सब्रुक यांना भेटली तेव्हा 'साथीचा जबर प्रसार असेल तर काय नियम आहेत ते मी कळवितो' असे त्याने सांगितले[५].

उमरावतीला पुन्हा दुसरीही एक अफवा उठली की "जर काँग्रेस भरली तर बाहेरून येणाऱ्या लोकांमुळे प्लेग वाढेल, म्हणून लोक कमिश्नरकडे अर्ज करीत आहेत[६]" ही गोष्ट तरुण जोशी (लोक त्याला पंडित म्हणत) यांनी येऊन दादासाहेबांना सांगितली. तेव्हा डॉ. खोत यांना घेऊन दादासाहेब स्वत: गावात गेले आणि चौकशी केली. ही अफवा चुकीची होती[६].

कॅप्टन हॉर्सब्रूक याने काँग्रेस भरविण्यास मनाई केली नाही. पण एक सरकारी आदेश काढून काँग्रेसला हजर राहणारांना सावध केले होते[७].

याप्रमाणे या अधिवेशनाला प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष अडथळे निर्माण करण्याचे प्रयत्न बरेच झाले. पण उमरावतीच्या नेत्यांनी त्यावर मात करून अधिवेशनाची तयारी मोठ्या प्रमाणात केली.

दि. २१ दिसेंबर रोजी, राष्ट्रीय सभेचे जनक श्री ह्यूमसाहेब यांनी एक पत्रक काढून "सर्व राष्ट्रभक्तांनी कोणत्याही संकटास न भिता,

---

१ व २ : कै. दादासा. खापर्डे यांचे डायरीतील नोंदी. ता. २ नोव्हे. ते २७ दिसे. १८९७.

३ ते ७ : कै. दादासा. खापर्डे यांच्या दिनांक २–११ ते २७–१२–१८९७ पावेतोच्या, डायरीतील नोंदी.

उमरावतीच्या काँग्रेस अधिवेशनाला हजर राहावे." असे आवाहन केले[१]. त्यामुळे उमरावतीचे अधिवेशन होणारच अशी भावना सर्वत्र निर्माण होऊ लागली.

प्लेगच्या साथीमुळे ठिकठिकाणी सरकारने क्वॉरंटाईन कॅम्पस् उघडले होते. संशयीतांना तेथे काही दिवस उपचाराचे नावाखाली अडकवून ठेवीत असत. बडनेरा ते भुसावळ या रेल्वे मार्गावर मलकापूरला क्वॉरंटाईन होते. भुसावळमार्गे उमरावतीस येणाऱ्या प्रतिनिधींना मलकापूरला अडकवून ठेवल्या जाऊ नये म्हणून दादासाहेबांनी श्री. दादा जोगांना तेथे पाठविले[२].

श्री. बॅनर्जी यांना प्लेग खाली मलकापूरला अडकवून ठेवले होते. त्यांनी तारेने ही माहिती दादासाहेबांना कळविली. तेव्हा दादासाहेब डे. कमिश्नरला भेटले व बॅनर्जी वगैरेंना सोडण्यासाठी तेथील अधिकाऱ्यांना आपण तार करा अशी त्यांना विनंती केली. पण नंतर खुदः दादासाहेब, श्री. मुधाळकर व मोरोपंत जोशी हे स्वतः मलकापूरला गेले व तेथील क्वॉरंटाईन कॅम्पमध्ये ना. गोखले, श्री. न. चि. केळकर व श्री. बॅनर्जी यांना अडकवून ठेवले होते, त्यांची चौकशी केली व त्यांना सोडवून सोबत घेऊन आले. नियोजित अध्यक्ष ना. सर शंकरन् नायर हे स्वतंत्र कोच मध्ये येणार होते. त्यांना अडविणार नाही असे क्वॉरंटाईन कॅम्प अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले होते[३]. या प्रमाणे अनेक अडचणींशी टक्कर देत अखेर अधिवेशन २–३ दिवसावर आले.

ठरल्या प्रमाणे काँग्रेसचे अध्यक्ष ना. सर शंकरन् नायर हे स्वतंत्र कोच मधून आले. त्यांचा बडनेरा रेल्वेस्टेशनवर जाऊन भव्य सत्कार करण्यात आला[३]. व त्यांना उमरावतीस आणण्यात आले.

टिळकांचे चित्राचा वाद : 'काँग्रेसचा मंडप सजविण्याचे काम एका लहानशा कमेटीकडे सोपविले होते. अर्थात खुदः राजाची तसबीर अटळच होती. दादासाहेबांनी असे सुचविले की, व्यासपीठावर प्रमुख ठिकाणी लो.

---

१ : साप्ताहिक 'केसरी' पुणे, दि. २१ दिसेंबर १८९७.

२ व ३ : कै. दादासा. खापर्डे यांची डायरी दि. २५-१२-९७ ते २७-१२-९७

टिळकांचे चित्र लावावे. पण या सूचनेचा काही लोकांनी उपहास केला. नंतर त्याला उपेक्षेचे स्वरूप आले..... काँग्रेसचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसा दादासाहेबांनी आपल्या सूचनेला पाठिंबा मिळवून त्या सूचनेस आग्रहाचे स्वरूप आणले..... प्रसंग आणिबाणीचा निर्माण झाला होता. कारण दुसरे दिवसापासून पाहुणे येणार, आणि अजून टिळकांच्या चित्राचा वाद मिटलेला नव्हता. नव्हे त्यास तीव्र आग्रहाचे स्वरूप प्राप्त झाले होते. अखेर दि. २५ दिसेंबरला अध्यक्ष श्री. शंकरन् नायर आले, हळू हळू डब्ल्यु. सी. बॅनर्जी आले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी आले, बिपीनचंद्र पॉल आले, महादेव गोविंद रानडे आले, टागोर आले आणि हिंदुस्थानांत असे कोणी लौकिकवान उरले नाही की, जे आले नाहीत. टिळक आले नाहीत हे सर्वांच्या मनास खटकले. टिळकांच्या चित्राचा वाद अध्यक्षापर्यंत गेला व मोठा घोळ पडला. हा हट्ट सोडून द्यावा असा अनेक हितचिंतकांनी दादासाहेबांना सल्ला दिला..... शेवटी अध्यक्षांच्या निवासस्थानी प्रमुख नेत्यांची एक लहानशी सभा झाली. त्या सभेस सुरेंद्रनाथ बॅनर्जी, शंकरन् नायर, डब्ल्यू. सी. बॅनर्जी, दादासाहेब, तात्यासाहेब मुधोळकर, मोरोपंत जोशी इत्यादी मंडळी उपस्थित होती. बराच वेळ वाटाघाट झाली, विचार विनिमय झाला. व्यासपीठावर टिळकांचे चित्र लावावे की नाही, या संबंधाने साधक-बाधक प्रमाणे सांगण्यात आली. टिळकांचे चित्र मंडपात लावल्यास काँग्रेस राजद्रोहास साथ देते असे सिद्ध होईल असे प्रतिपादन करण्यात आले, तर उलट, 'मायभूमीकरता हे दुर्धर कष्ट करणाऱ्यांचे आपण एवढेही बाधचिन्ह मंडपात लावण्याचे धैर्य दाखवणार नाही व त्याच्या कष्टाचे आपण चीज करतो व त्याला मोल देतो असे उघड दाखवणार नाही तर काँग्रेसला प्रयोजनच उरत नाही', असे दादासाहेबाकडून स्वागताध्यक्ष या नात्याने प्रतिपादन करण्यात आले. अखेर या वादातून सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी मार्ग काढला. ते म्हणाले की, "चित्र लावण्याचे प्रयोजन हेच जर असेल व राष्ट्र या नात्याने राष्ट्राची सेवा करीत असताना टिळक जे कष्ट करीत आहेत व मनोधैर्य दाखवीत आहेत त्याची राष्ट्राला जाणीव आहे व राष्ट्राची त्यांना सहानुभूती आहे, हेच जर आपणाला उघड माथ्याने जगाला दाखवावयाचे आहे तर मी माझ्या स्वतःच्या भाषणात त्यांचा गौरवपूर्ण शब्दाने उल्लेख करतो म्हणजे सर्व साधेल[१]." दादासाहेबांनी ही

१ : कै. दादासा. खापर्डे याचे चरित्र : पा. २६-२७

तडजोड मान्य केली व हा वाद मिटला.+

दुसरे दिवशी दि. २७ दिसेंबर रोजी अधिवेशनाला सुरुवात होणार होती....."हजारो प्रतिनिधि सकाळपर्यंत उमरावतीत येऊन पोचले. पेंडॉल भरणार नाही, लोक येणार नाहीत ही अफवा चुकीची ठरली[१]."

याप्रमाणे अनेक अडी-अडचणीवर मात करून हे उमरावती अधिवेशन दि. २७ दिसेंबर १८९७ रोजी नाताळच्या सुटीत, दुपार पासून, भव्य व सुशोभित अशा काँग्रेस पेंडॉलमध्ये सुरू झाले.

काँग्रेस अध्यक्षांची मिरवणूक : काँग्रेस अध्यक्ष सर शंकरन् नायर यांचे निवासस्थानापासून त्यांची मिरवणूक दुपारी काढण्यात आली. "श्री. दंडे हे सर्व रक्षकांचे मुख्य होते. म्हणून ते सर्वांच्या पुढे चालले होते. त्यांच्या मागे सर्व रक्षक चालले होते. श्री. वाच्छा, श्री. मुधोळकर, आणि श्री. करंदीकर हे चिटणीस म्हणून चालले होते. त्यांच्या मागे अध्यक्ष सर शंकरन् नायर आणि स्वागताध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे हे हातात हात घालून चालत होते. त्यांच्या मागे श्री. डब्ल्यु. सी. बॅनर्जी, श्री. आनंदा चार्लू, श्री. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आणि इतर प्रतिनिधी होते. श्री. घोषाल हे सर्वांच्या पुढे

+ "लोकमान्य टिळकांचा फोटो मंडपात लावण्यासंबंधी त्या प्रसंगी जो वाद झाला त्या संबंधी दादासाहेब खापर्डे आपल्या डायरीत लिहितात... "मी मुधोळकरांकडे गेलो. तेथे सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि वाच्छा यांच्याशी काही तात्पुरत्या अडचणीसंबंधी बोलणे झाले. सेटलवाड, कामा व आनंदा चार्लू हेही तेथे होते.....आम्ही सगळेजण काँग्रेस मंडपात (दुपारी) एक वाजता परत आलो". हा उल्लेख लोकमान्यांचे चित्र मंडपात लावण्या संबंधीचा आहे हे उघड आहे..... लोकमान्यांचे चित्र व्यासपीठावर लावले नाही तर ते का लावले गेले नाही यासंबंधी मी माझ्या भाषणात स्वागताध्यक्ष या नात्याने विचार प्रगट करीन असा दादासाहेबांनी धाक घातल्यानंतरच सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी तोड सुचविली होती व ती मान्य झाल्यानंतरच काँग्रेसची बैठक चालू करण्याकरिता ही सर्व मंडळी मंडपात आली. तोपर्यंत बैठक स्थगित ठेवली होती." (कै. दादासा खापर्डे चरित्र पा. २८-२९)

१ : कै. दादासा. खापर्डे यांचे डायरीतील नोंदी : ता. २ नोव्हें. ते २७ दिसे. १८९७

'मास्टर ऑफ सेरिमनिज' या नात्याने चालत होते[1]. या प्रमाणे अध्यक्षांची मिरवणूक उमरावती शहरात निघाली व ती पेंडॉलमध्ये पोचली तेव्हा पेंडॉल संपूर्ण भरला होता[2]. एका भागात बायकांना बसण्याची व्यवस्था होती. तेथेही पुष्कळ बायका बसल्या होत्या. त्यामुळे सर्व देखावा रंगी बेरंगी आणि चित्रासारखा दिसत होता[3]."

अधिवेशनासाठी देशाच्या सर्व प्रांतातून प्रतिनिधी आले होते. न्यायमूर्ती रानडे, डब्ल्यु. सी. बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपीनचंद्र पाल, टागौर, सर दिनशा वाच्छा, आनंदा चार्लू, घोषाल, पं. मदनमोहन मालवीय, ना. गोपाळ कृष्ण गोखले, सुब्रम्हण्यम् अय्यर, बाबू वैकुंठनाथ सेन, लाहोरचे श्री. जयसिराम, पं. श्यामनारायण, वीरेंद्रनाथ दत्त, पार्थसारथी नायडू, नागपूरचे श्री. केशवराव जोशी, मद्रासचे बॅरिस्टर ॲडम, सदाशिवराव भागवत, नरसिंह चिंतामण केळकर, आकोल्याचे राजिदेकर, मि. उमेशचंद्र बॅनर्जी, बिसन नारायण खार, अंबिकाचरण मुजुमदार, गोविंदराव काणे, पांडुरंग गोविंद वकील, शिवरतनसिंग, गुलाम अहंमद, रामजस नायडू, प्रो. साठे, भूपेंद्रनाथ बोरा, सुब्राय अय्यर, मि. सेटलवाड, इत्यादी अनेक नेते अधिवेशनाला उपस्थित होते. पण लोकमान्य टिळकांची अनुपस्थिती सर्वांनाच खटकत होती.

काँग्रेस पेंडॉल : गावात प्लेग चालू असल्यामुळे काँग्रेस अधिवेशनासाठी मुद्दाम उभारलेला भव्य व सुशोभित मंडप, कॅम्प रोड वरील श्री. मोरोपंत जोशी यांच्या बंगल्याचे खुल्या आवारात उभारण्यात आला होता[4]. व्यासपीठावर राजाची तसबीर लावण्यात आली होती.

मिरवणूक पेंडॉलमध्ये पोहचली. पेंडॉल प्रतिनिधींनी व प्रेक्षकांनी भरला होता. स्त्रियांचीही उपस्थिती बरीच होती. स्वागताध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या स्वागतपर भाषणाने अधिवेशनाची सुरुवात झाली.

स्वागताध्यक्ष श्री दादासाहेब खापर्डे यांचें भाषण[5].

कुलीन स्त्रिया व सभ्य गृहस्थहो !

आपले स्वागत करण्याचे काम, स्वागत कमेटीने मजकडे सोपविले

---

१ : २ व ३ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र : पान २९

४ : कै. सर मोरोपंत यांचे चरित्र : पान ५४

५ : हे भाषण तत्कालिन परिस्थितीचे उत्तम चित्र दर्शविणारे असल्याने त्यांचे भाषणातील जरूर तेवढा भाग येथे दिला आहे.

आहे. मी आपल्या स्वत:च्या, स्वागत कमेटीच्या व या प्रांतातील लोकांच्या वतीने आपणा सर्वांचे अंत:करणपूर्वक स्वागत करतो. आपली बडदास्त योग्य रीतीने ठेवणे आमच्या हातून झाले नाही हे मला ठाऊक आहे. तथापि आपली बडदास्त ठेवण्यास कोणत्याही प्रकारची कसूर करावयाची नाही या आमच्या इच्छेकडे लक्ष देऊन आमचा पाहुणचार गोड मानून घ्याल अशी मला आशा आहे. आपण आमचे मनाई पाहुणे जरी आहात तरी राष्ट्रीय सभेकरिता आमच्या प्रमाणेच मेहनत करणारे आपण असल्यामुळे आमच्या अडचणी त्या आपल्या अडचणी आहेत. आमचे सुखदु:ख ते आपले सुखदु:ख आहे. म्हणून आमच्या आदरातिथ्यातील न्यूनतेकडे आपण दुर्लक्ष कराल अशी आशा आहे.

गेल्या वर्षासारखे भयंकर वर्ष आज पावेतो ४० वर्षात आले नव्हते. ३२ वर्षांपूर्वी ज्या चळवळीस सुरुवात झाली ती राष्ट्रीय सभेची चळवळ किती जोराची व भरीव आहे, त्याची परीक्षा करण्याकरिताच जणू काय गेल्या वर्षात सर्व खलदेवता आम्हास कोणत्या रीतीने त्रास देता येईल याचा विचार करीत होत्या असे भासते. प्रथम दुष्काळाने सर्व राष्ट्रभर आपली काळी छाया पसरली. चोहोकडे नासाडी, हाहा:कार व दु:ख यांचा बाजार माजला. असह्य यातना व अस्थिपंजर देह चोहोकडे दृष्टीस पडू लागले, परंतु ह्यामुळे राष्ट्रीय सभेच्या चळवळीला काहीच धोका बसला नाही. कारण लोकांच्या पुढाऱ्यांनीही सरकार प्रमाणेच दुष्काळाने ग्रासलेल्या लोकांना मदत करण्यास मागेपुढे पाहिले नाही...दुष्काळाबरोबरच आमचे दुर्दैव संपले नाही. दुष्काळाचा शेवट व्हावयाच्या आंतच प्लेगचा ताप उद्भवला. या साथीवर डॉक्टर लोकांना पूर्वी कधीही औषध सापडले नाही व आजही या रोगावर डॉक्टरांपाशी काही औषध नाही.....प्लेगच्या हकीकतीबरोबरच आमच्या दुर्दैवाची कहाणी संपली नाही. लगेच सरहद्दीवर लढाई सुरू झाली.....आमच्या संकटाचा येथेच शेवट झाला नाही. भयंकर धरणीकंप व पादळ हीही आमच्या दु:खात भर घालण्यास पुढे सरसावली. या दु:खाच्या व यातनांच्या कल्लोळातच अविश्वासरूपी राक्षस देशात चोहोकडे फिरू लागला.....पुणे शहरी अत्यंत शोचनीय जे खून झाले व जे गूढ अंध:काराने गुरफटून टाकलेले आहे त्या खुनांना या राक्षसासह जन्मास घातले.....अशी आमच्या देशाची स्थिती झाली. अशा स्थितीत चोहोकडे घोटाळा माजून राहावा हे अगदी साहाजिक आहे. मुल आईस विचारीनासे झ ले, आई मुलास ओळखीनाशी

झाली, मित्र शत्रू समजले गेले व शांतपणाने विचार करावयाचा एका बाजूस राहून जागच्या जागी तत्क्षणी घाईघाईने चुकीचे वर्तन पोक्त व विचारी लोकांच्या हातून घडले. राजकीय व्यूह चोहोकडे पसरून राहिला असावा अशी भीती उत्पन्न झाली. पत्रककर्त्यांवर फिर्यादी झाल्या व पुण्यातील काही गृहस्थांना एकदम उचलून कैदेत टाकण्यात आले. या सर्वांचे खरे कारण काय आहे, ते अद्याप बाहेर आले नाही.

अमरावती शहर पुराण-प्रसिद्ध आहे हे आपणास माहीत असेलच याच ठिकाणी महालक्ष्मीचा अवतार असलेल्या रुक्मिणीदेवीने श्रीकृष्णास निरोप पाठविला. याच ठिकाणी श्री अंबेच्या देवालयात भगवान श्रीकृष्णाचा रुक्मिणीदेवीशी विवाह झाला. रुक्मिणीच्या प्रार्थनेला याच ठिकाणी भगवंतांनी मान दिला. आमची राष्ट्रीय सभा श्री अंबेच्या दर्शनास आज आली आहे. जयप्राप्ती विषयीच्या तिच्या प्रार्थनेला परमेश्वर मान देण्यास चुकणार नाही अशी आशा आहे ..... आमच्या मनातील इच्छा आमच्या राज्यकर्त्यांला न समजल्या तरी आदिशक्तीला आमच्या इच्छा समजल्याच पाहिजेत.....तेरा वर्षांची राष्ट्रीय सभा कर जोडून भक्तिपुरःसर श्री जगदंबेच्या भेटीस आली असता रुक्मिणीदेवी व विजयी श्रीकृष्ण यांना आशीर्वाद देणारी श्री अंबा राष्ट्रीय सभेला प्रेमाने उचलून घेईलच घेईल अशी मला खात्री आहे.

राष्ट्रीय सभेची आवश्यकता आज जशी दृष्टीस पडते तशी पूर्वी कधीही दृष्टीस पडली नाही. सरकारचे विचार प्रजाजनांना कळविणे व लोकांची गाऱ्हाणी सरकारचे कानावर घालणे ही राष्ट्रीय सभेची मुख्य कामे आहेत. हे काम नेहमी कठीण असते व यंदा तर फारच कठीण झाले आहे. या संबंधाने खालील श्लोक ध्यानात ठेवण्यासारखा आहे.

– नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
– जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन।
– इति महति विरोधे दृश्यमाने समाने
– नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता॥

.....आम्ही नेहमी तडजोडीचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कडक टीका, कठोर भाषण यांचा त्याग करून जर आम्ही आमच्या उद्धो-

गास लागलो तर विरुद्धपक्षही आमच्या मागण्यांचा योग्य विचार करण्यास प्रारंभ करील असे मला वाटते.[१]+

स्वागताध्यक्षांचे भाषणानंतर ना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी सूचना केल्यावर ना. सर शंकरन् नायर यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले व त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण सुरू केले.

अध्यक्ष ना. सर शंकरन् नायर‡ यांचे भाषण.

सभ्य गृहस्थहो–

राष्ट्रीय सभेचे अध्यक्षस्थान आपण मला दिले याबद्दल आपला मी फार आभारी आहे. हिंदुस्थानातील इंग्रज सरकारच्या राज्याच्या इतिहासात ज्या वर्षाला महत्त्व मिळाले त्या वर्षाच्या अखेरीस आज आम्ही येथे जमत

---

१ : सा. केसरी पुणे, दि. ४ जाने. १८९८.

+ स्वागताध्यक्ष या नात्याने, काँग्रेसला प्रारंभ होत असताना दादासाहेबांनी जे भाषण केले त्याबद्दल ते आपल्या डायरीत लिहितात 'माझे भाषण फार आवडले आणि वारंवार टाळ्या झाल्या. बॅनर्जींनी मला धन्यवाद दिले. डेमन ऑफ डिस्ट्रक्ट, हे माझे शद्व मदनमोहन मालवीय यांनी उचलून घेऊन अशा रीतीने त्यांनी धन्यवाद दिले. मुधोळकर देखील म्हणाले की, जो मर्तबा सांभाळून मी भाषण केले, तसे दुसऱ्या कोणास सहज करता आले नसते. (दादासा. खापर्डे चरित्र : पा. ३२)

‡ : **सर सी. शंकरन् नायर** : (जन्म १८५७ मृ. १९३४) मद्रास हायकोर्टाचे न्यायमूर्ती, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, हिंदुस्थान सरकारचे एक्झीक्यूटिव्ह कौन्सिलर व स्वाभिमानी गृहस्थ. अनेक मोठ्या पदावर कामे केली. पंजाब प्रकरणाच्या निषेधार्थ त्यांनी व्हॉइसरॉयच्या एक्झीक्यूटिव्ह कौन्सिलर पदाचा राजीनामा देऊन लोकप्रियतेचे शिखर गाठले होते. 'गांधी व अराजकता' नावाचे त्यांनी पुस्तक लिहिले. त्यात म. गांधीवर ते तुटून पडले होते. पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर सर मायकेल ओड्वायर यांनी त्यांच्यावर या पुस्तकाबाबत फिर्याद केली. तेव्हा त्यांना खर्चाबद्दल व अब्रुनुकसानीबद्दल तीन लाख रुपये भरावे लागले. मद्रास रिव्हयू, मद्रास लॉ जर्नल, मद्रास स्टॅन्डर्ड या पत्रांचे जनक व काही काळ संपादक होते. (अर्वाचीन चरित्र कोश : चित्रावशास्त्री : पा. ३९४)

आहोत. आमच्या महाराणीसाहेब व्हिक्टोरिया यांचा डायमंड ज्युबिली महोत्सव आम्ही पाहिला व आम्ही केलाही. महाराणीसाहेबांच्या विस्तीर्ण राज्याच्या भरभराटीबद्दल इतर लोकांप्रमाणे आम्हास आनंद होत आहे. या अवधीत आम्हास महत्त्वाचे राजकीय हक्क मिळाले, याबद्दल आम्ही आपणास धन्य मानीत आहोत. १८५८ साली महाराणीसाहेबांनी आम्हाला स्वातंत्र्य व शांतताही दिली. त्याबद्दल आम्ही त्यांस दुवा देत आहोत. जातीजातीतील वैरामुळे व शिपायांच्या बंडामुळे संतापलेले इंग्रज आम्हास भयंकर शिक्षा करावी म्हणून ओरडत असताही महाराणीसाहेबांनी आपण होऊन आमचे अपराध पोटात घातले, आम्हास क्षमा केली व १८५८ सालचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यथेच्छ सूड उगविला पाहिजे म्हणून ओरड करणाऱ्या लोकांना यामुळे खरमरीत ताकीद मिळाली आणि आजमितीलाही तो जाहीरनामा आम्हास सारखे हक्क न देणाऱ्या युरोपिअन लोकांची चांगली कान उघाडणी करीत आहे. इंग्रजी साम्राज्यातील सर्व चांगुलपणाची महाराणीसाहेब सजीव मूर्ती आहेत. १८५७ साली व त्यानंतर वेळोवेळी महाराणीसाहेबांनी आमच्या संबंधाने जी काळजी वाहिली ती कधीही कमी होणार नाही अशी आम्हास आशा आहे. सर्व हिंदुस्थानभर तिचे नाव पवित्र समजले जाते. प्रत्येक भाषेत तिचे चरित्र लिहिले आहे. तिच्या संबंधाचे पोवाडे सर्व भाषेत दृष्टीस पडतात व काही वर्षांनी आमच्या या पवित्र भूमीतील अवतारामध्ये तिची गणना केली जाईल.

आम्ही राजनिष्ठ आहोत : महाराणीसाहेबांनी मुत्सद्दीपणाने औदार्याचा व शहाणपणाचा जो मार्ग स्वीकारला तो योग्य होता हे गेल्या ४० वर्षांतील शांतता व प्रगती यावरून दिसत आहे. परंतु यंदा एकाएकी राजद्रोहाची आरोळी चोहोबाजूंनी ऐकू येत असल्यामुळे आम्ही..... एका विवक्षित व्यक्तीवर ठेवलेला नाही किंवा एकाद्या समुदायासंबंधानेही पुढे आणलेला नाही. गेल्या अर्धशतकातील राज्यकारभारात दृष्टीस पडणाऱ्या औदार्यामुळे उत्पन्न झालेल्या सुशिक्षित वर्गावर हा आरोप आणलेला आहे. 'काही वर्षांपूर्वी राष्ट्रीय सभा राजद्रोही आहे' असे काही लोक कुजबुजत होते. या आरोपाचा पोकळपणा वेळोवेळी सिद्ध झालाच आहे. हाच आरोप यंदा पुन्हा सुशिक्षित लोकांवर अँग्लोइंडियन वर्तमानपत्रांपैकी काहींनी आणलेला आहे. 'ज्या निकृष्ट दशेतून इंग्रज सरकारने आम्हास सोडविले त्या निकृष्ट स्थितीची खात्री करून घेण्याकरिता तुम्ही तुमचा पूर्वीचा इतिहास पहा व

हल्लीच्या सुखाशी त्या दुःखाची तुलना करा. अशाप्रकारे आम्हास टोमणे मारण्यात येत आहेत. आमच्या पूर्वीच्या स्थितीची आम्हास आठवण करण्याची जरूरी नाही. इंग्रज राज्यापूर्वी आमची स्थिती काय होती हे आम्हास माहीत आहे. हल्लीच्या स्थितीबद्दल आम्ही सरकारचे ऋणी आहोत. इंग्रज राज्यात आम्हास कोणत्या सवलती मिळाल्या आहेत ह्या विषयी आम्ही आज विचार करीत नसून आमच्या देशाच्या भावी उत्कर्षाविषयी आमची खटपट चालली आहे. हे आमचे प्रतिस्पर्धी विसरतात. इंग्रजी राज्यापूर्वीची अंदाधुंदी आम्ही विसरलो नाही, व राज्यकारभारास सुव्यवस्थित स्वरूप देण्यास सरकारास किती त्रास पडला हेही आम्हास माहीत आहे. त्यावेळी राज्यकारभारात आमचा हात अधिक असू देणे शक्य नव्हते. इंग्रजी राज्यामुळे प्रगतीचा मार्ग खुला झाला. इंग्रजी शिक्षणामुळे कित्येक शतकांच्या आमच्या झोपेतून आम्ही जागे झालो. धार्मिक, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणण्यास ज्या शिक्षणाची जरूरी आहे, ते शिक्षण सरकारने आम्हास दिले हे आम्हास माहीत आहे. इंग्रजीराज्य नाहीसे झाले तर चोहोंकडे अंदाधुंदी माजन तटबखड होतील, हिंदु–मुसलमान व इतर जाती आपापसात भांडू लागतील, निकृष्ट ज्ञातीचे लोक पूर्वीप्रमाणे उच्च वर्गाचा अंमल स्वीकारण्यास तयार होणार नाहीत. फ्रान्स व रशिया हे तर टपून बसले आहेतच. अशिक्षित लोकांना ह्या संकटाचे महत्त्व कदाचित समजणार नाही. परंतु सुशिक्षितांच्याही लक्षात हे संकट येणार नाही असे म्हणणे हास्यास्पद आहे. ग्रेटब्रिटनने आम्हास शांतता दिली व परक्यांच्या स्वाऱ्यापासून आमचे रक्षण केले, याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले पाहिजेत. इंग्लंडच्या मदतीने आमचे राष्ट्र आम्ही उच्च पदवीस नेऊन पोहोचवू ह्या आशा–तंतूंनी इंग्रजांशी आम्हास जखडून टाकले आहे. उदार अंतःकरणाने व मुत्सद्दी धोरणाने सरकार आम्हास शिक्षण देत आहे, ह्या गोष्टीवरून आमची आशा निष्फळ होणार नाही असे सिद्ध होते. सरकारने आम्हास पुष्कळ वचने दिली आहेत व काही हक्कहो दिले आहेत, ह्यावरून केव्हा ना केव्हा तरी आम्ही आमच्या महत्त्वाकांक्षेच्या शिखरास पोहोचू अशी आशा करणे व्यर्थ होणार नाही.

दुष्काळ : त्यानंतर त्या वर्षी भारतात पडलेल्या दुष्काळाबद्दल व त्यावरील उपायाबद्दल तसेच तत्कालिन पुण्याच्या प्लेगच्या व्यवस्था प्रकरणाबद्दल, व रँड साहेबांच्या खुनाबद्दल विवेचन करीत असता ते म्हणाले...

...अशा रीतीने प्लेग कमेटीचे काम चालले असताना ज्युबिली महोत्सवाचे रात्री रँड साहेबांचा खून झाला. सर्व नेटिव्हांना अत्यंत भीती वाटली. दुर्दैवाने हा कुयोग जुळवून आणला असे हिंदुस्थानी जनांना वाटले. परंतु ह्या गोष्टीचा परिणाम अँग्लो इंडियनावर निराळा झाला..... रँड साहेबांचा खून, सहेतुक, सरकाराने प्लेग हटविण्याच्या उपायाकरता झाला. देशी वर्तमानपत्रांनी कमेटीस दूषण दिले, एवढ्यावरून आपली कल्पना बरोबर आहे असे त्यांनी समजावे व एका अत्यंत मोठ्या महोत्सवाचे दिवशी (झाला) असल्यामुळे पुणे शहरात एखादा सुशिक्षित लोकांचा व्यूह आहे अशी त्यांची समजूत व्हावी या सर्व गोष्टी त्यांच्या अज्ञानामुळे ओघानेच होणाऱ्या आहेत.....देशी वर्तमानपत्रे राजद्रोही असून त्यांना रॅन्डसाहेबांचे खुनाबद्दल जबाबदार धरले पाहिजे असा काहींनी हट्ट धरिला. अँग्लो इंडियन पत्रांपैकी काहींनी रा. रा. टिळक यांना शिक्षा ठोठावली पाहिजे अशी ओरड केली..... एका जुनाट कायद्याचे साहाय्य घेऊन सरकाराने नातू बंधूना कैद केले, रा. टिळक व इतर दोन देशी वर्तमानपत्राचे संपादक यांजवर खटले झाले व पुणे शहरावर जादा पोलिस लादण्यात आले. नातू बंधूंना कैद करण्यात सरकारने चूक केली आहे, त्यामुळे जुलमी बेबद-शाहीची आठवण होते. भर कोर्टात कोणत्याही प्रकारची चौकशी न होता जर सरकार आम्हास धरून नेऊन कैद करू लागले, आमची मालमत्ता जप्त करण्यात आली तर आम्हास ह्या बाबीतील स्वातंत्र्य आहे असे म्हणणे म्हणजे निव्वळ फार्स आहे.....

सभ्य गृहस्थ हो !

माझे भाषण संपले. माझ्या लांबलचक भाषणाचा तुम्हास कंटाळा आला असेल अशी मला भीती वाटते. आमची हल्लीची राजकीय स्थिती कशी आहे, यासंबंधीचे काही प्रश्न मी आपणापुढे मांडले आहेत. जोपर्यंत इंग्लंडवर आम्ही विसंबून राहू तोपर्यंत आमच्या भावी स्थितीबद्दल निराश होण्याचे कारण नाही. आम्ही आमची जबाबदारी ओळखली पाहिजे. आम्ही कधी निराश होता कामा नये. रागाने वर चढलेल्या भुवया किंवा कपटाने चेहऱ्यावर खुलविलेले हास्य यामुळे कर्तव्यकर्माच्या उच्च मार्गापासून आम्ही ढळता कामा नये. आमच्या देशाची प्रगती व कल्याण ही आमच्या पुढे सतत ठेऊन, आमची जबाबदारी ओळखून, देशावरची आमची पवित्र निष्ठा कायम ठेऊन पुढे मिळणारी कीर्ती संपादण्यासाठी श्रम करू या, म्हणजे

आमचे श्रम फलद्रूप झाल्याशिवाय कधीही राहणार नाहीत[१]."

दुसऱ्या दिवशी दि. २८ ला काँग्रेस अधिवेशनाला सुरुवात झाली. उपस्थित समुदाय कालच्या प्रमाणेच मोठा होता. ना. सर शंकरन् नायर, प्रसिद्ध काँग्रेस भक्त व कार्यकारी मंडळी योग्य स्थळी बसल्यानंतर मि. घोषाल यांनी काँग्रेसचे काम ज्या नियमाप्रमाणे चालणार ते नियम वाचून दाखविले. नंतर मि. वाच्छा यांनी पहिला ठराव सभेपुढे मांडला. हा ठराव हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील स्वारी संबंधीचा होता. ठरावावर त्यांनी आपले भाषण केले. श्री. सुब्रम्हण्यम् अय्यर यांनी या ठरावास पाठिंबा दिला व भाषण केले.

दुसरा ठराव बाबू वैकुंठनाथ सेन यांनी मांडला. त्यांत सरहद्दीवरील युद्धामुळे हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीवर बोजा पडला आणि प्लेग व दुष्काळ यामुळे वाईट स्थिती करून सोडली. म्हणून पार्लमेन्टने हिंदुस्थान सरकारला मदत करावी अशा आशयाचा हा ठराव होता. त्यास लाहोरचे श्री. जयसिराम यांनी अनुमोदन दिले होते.

तिसरा ठराव रा. देव यांनी मांडला. वरील ठराव नं. एक व दोन मधील आशयाचा अर्ज पार्लमेन्टकडे पाठविण्याची परवानगी अध्यक्षांना असावी असा हा ठराव होता. या ठरावास पं. श्यामनारायणजी यांनी पाठिंबा देऊन भाषण केले.

चवथा ठराव पं. मदनमोहन मालवीय यांनी मांडला. रॉयल कमिशनचे काम उघडपणे चालविले याबद्दल राष्ट्रीय सभेला आनंद होत आहे अशी सुरुवात करून त्यांनी या ठरावात राष्ट्रीय सभेच्या सूचना मांडल्या व अती जोरदार भाषण केले. या ठरावाला श्री. वीरेन्द्रनाथ दत्त यांनी पाठिंबा देऊन भाषण केले. मद्रासचे पार्थसारथी नायडू यांनीही ठरावावर समर्थनात्मक भाषण केले. आणि नागपूरचे श्री. केशवराव जोशी यांनी ठरावाचा सारांश मराठीतून सांगितल्यानंतर ठराव पास करण्यात आला.

नंतर अध्यक्षाकडून एकूण तीन ठराव मांडण्यात आलेत व ते पास झाले. या पैकी पांचवा ठराव उर्फ कंठाळी ठराव यात सरकारच्या अबकारी

---

१ : सा. केसरी दि. २८ दिसेंबर १८९७

कायद्याची अमलबजावणी, जंगलखात्याचे सक्त नियम, सरकारने लष्करी कॉलेज स्थापन करावे, हुंडणावळीचा भत्ता बंद केला जावा, स्टेट सेक्रेटरीचे कौन्सिल अजिबात बंद करणे, पंजाबात हायकोर्टाची स्थापना, शिक्षण खात्याच्या नवीन रचनेबद्दल निषेध, सिव्हिल आणि मिलिटरी वैद्यक खात्यासंबंधी सूचना, शिक्षण खात्याची सुधारणा, आसामातील चहाच्या लागवडी संबंधी झालेल्या वसाहतीचा कायदा रद्द करणे, इत्यादी विषयांवर चर्चा वगैरे होती.

सहाव्या ठरावात, कोणत्याही राजपुत्राला वाईट कारभारामुळे एकदम पदच्युत न करता, अपराध सिद्ध होईपर्यंत त्याचे अधिकार न काढणे व ज्युरीची पद्धत अमलात आणणे.

सातव्या ठरावात, पूर्वी भरलेल्या काँग्रेसने केलेले सर्व ठराव या काँग्रेसला मंजुर आहेत असे म्हटलें होते व या ठरावाचा सारांश रा. विष्णू हरि करंदीकर यांनी मराठीतून थोडक्यात समजावून सांगितला.

सहावे ठरावात राणी सरकारला विनंती करण्यात आली व सातव्या ठरावात नेटिव्ह संस्थानातील मुद्रण स्वातंत्र्य कायम राहावे असे म्हटले होते.

आठवा ठराव कायम पद्धतीचे शेतसाऱ्यासंबंधीचा होता. हा ठराव मद्रासचे श्री अॅडम् यांनी मांडला होता.

रा. सदाशिव भागवत वकील व आकोल्याचे रा. राजिंदेकर यांनी या ठरावावर मराठीतून सुरस भाषणे केली व हा ठरावही मंजूर झाला.

अधिवेशनाचा तिसरा दिवस : अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी साडे अकरा वाजता बैठकीला प्रारंभ झाला. पहिल्या दोन दिवसाप्रमाणेच प्रतिनिधी व प्रेक्षकवर्ग उपस्थित होता. ठराव बैठकीसमोर मांडण्याचे काम सुरू झाले.

नववा ठराव दुष्काळात लोकांना ज्यांनी (देशी व परदेशांतील लोकांसह) मदत केली त्या सर्वांचे राष्ट्रीय सभेने आभार मानले. आणि या मदतीचे स्मारक इंग्लंडला केले जावे व त्यासाठी हिंदुस्तानातील लोकांनी पैसा पाठवावा अशी देशांतील लोकांना विनंती करणारा हा ठराव होता.

दहावा ठराव श्री. सुब्रम्हण्यम् यांनी मांडला व भाषण केले. सरकारला सल्ला देणारा स्थानिक सल्लागार असावा अशी मागणी करणारा हा ठराव होता. या ठरावाला पुण्याचे रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनी अनुमोदन देऊन भाषण केले.

अकरावा महत्त्वाचा ठराव ना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी आणला. नातु बंधूस कैद करून पांच महिने झालेत. त्यांची कोर्टात चौकशी व्हावी अशा आशयाचा हा ठराव होता. या ठरावावर भाषण करताना ते म्हणाले–

"आमच्या सरकारने केलेला राईचा डोंगर खरा असता तर आम्ही खास त्याच्या पायथ्याशी अत्यंत नम्रपणे बसून काही बोललो नसतो. पण रा. टिळकांस मिळालेला न्याय व रा. नातूंची उचलबांगडी आम्हास समाधानकारक व अवश्य वाटत नसल्यामुळे आम्ही त्याचा निषेध केल्याबद्दल व्यक्तिस्वातंत्र्याची महती गाणारे राष्ट्र आम्हास दोष देणार नाही असे वाटते. आणि असे म्हटल्याबद्दल मजकडून राष्ट्रद्रोह होत नाही अशी मला आशा आहे.

रा. टिळक खरोखर निरपराधी आहेत आणि माझ्या आत्म्यास त्यांच्या तुरुंगातील कोठडीत जाणे शक्य असेल तर माझा आत्मा खात्रीने तेथे जात आहे ..... रा. टिळक हे पूर्ण देशाभिमानी आहेत, हे प्रत्येक मनुष्यास माहीत आहे. इंग्रजांचा मॅग्ना चार्टा आमचाच आहे. परंतु हे त्यास कबूल नाही. त्यामुळे आमच्यावर साशंक भीती आपला पूर्ण पगडा बसवीत आहे.

मनुष्यप्राण्याचे सर्व नैसर्गिक हक्क आम्हास मिळाले पाहिजेत. इंग्रजांविषयी पूर्ण पूज्यता ठेवून आम्ही म्हणतो स्वातंत्र्याचा उपभोग त्यांनी आम्हास घेऊ दिला पाहिजे..... रा. टिळक यांच्यावर खटला केला ही मोठी चूक केली, रा. नातु बंधूंना कैद केले ही अत्यंत मोठी चूक झाली. राजकीय कट पुण्यात आहे म्हणतात. तो कोठे आहे ? चाफेकराच्या कबूली जबाबाने सर्व भुरळ नाहीशी व्हावयाला नको काय ?"

ना. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या या ठरावावरील भाषणाबाबत कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्रकार श्री बाबासाहेब खापर्डे लिहितात–

".....तडजोडीप्रमाणे सुरेंद्रनाथांनी आपले वचन अक्षरशः पाळले. ते स्वतः सरकार पक्षाचे होते हे खरे. पण आपण सरकारचे मिंधे नाही व निर्भीड वृत्तीचे आहोत, सरकारवरही आपण निर्भयपणे टीका करू शकतो, व लोकपक्षाची कड घेऊन बोलू शकतो, असे त्यांस सिद्ध करावयाचे होते. त्यांनी टिळकांविषयी त्या प्रसंगी काढलेले उद्‌गार केवळ वरवरचे औपचारिक नसून ते त्यांचे टिळकांविषयीचे खरे मनोगत होते ..... ठरावावर भाषण करताना सुरेंद्रनाथांनी अशा आशयाचे उद्‌गार काढले की, 'टिळकांना तुरुंगात डांबून धरणाऱ्या भिंती ओलांडून माझे मन टिळकांकडे ओढ घेते.' मी स्वतः सुरेंद्रनाथ बॅनर्जी बोलत असताना स्वयंसेवक या नात्याने मंडपात उपस्थित होतो. सुरेंद्रनाथांची ती कृश, बंगाली थाटाचा पोषाख केलेली ठेंगणी मूर्ती मला आजही माझ्या डोळ्यापुढे दिसते. त्यांचा तो मेघगर्जना करणारा पहाडी आवाज आजही माझ्या कानाला ऐकू येतो. त्यांनी लोकमान्यासंबंधीचे हे शब्द उच्चारल्याबरोबर मंडपाच्या सर्व भागांतून, कोपऱ्या-कोपऱ्यांतून जो टाळ्यांचा प्रचंड गजर झाला, अनेकांच्या तोंडावाटे जे धन्यवाद बाहेर पडले आणि सर्वांच्या चेहऱ्यावर जी नवी टवटवी आली ते दृश्य आज इतक्या वर्षानंतरही मला माझ्या मनश्चक्षूपुढे स्पष्ट दिसते[१].....".

त्यानंतर राजद्रोहाचे व्याख्येत सुधारणा करावी असे सुचविणारा मि. उमेशचंद्र बॅनर्जी यांचा ठराव चर्चेला आला. मि. उमेशचंद्रांनी आपल्या ठरावावर मोठे मुद्देसूद, रसाळ व अस्खलित भाषण केले. या ठरावाला रा. मुधोळकर यांनी अनुमोदन दिले व रा. बिसन नारायण खार यांनी त्यावर विस्तृत आणि मुद्देसूद भाषण केले. त्यांचे नंतर रा. अंबिकाचरण मुजुमदार यांनी मोठ्या जोरदार भाषणाने या ठरावाला पाठिंबा दिला. श्री. गोविंदराव काणे यांनी 'हा ठराव व त्यावर झालेली भाषणे लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करावीत' असा ठराव मांडला व तो पास झाला.

नंतर मद्रासचे बॅरिस्टर मि. ॲडम यांनी तेरा नंबरचा ठराव मांडला व त्यावर परिश्रमपूर्वक तयार केलेलें स्वतःचे भाषण केलें. या ठरावाला अनुमोदन मिळाले नंतर, रा. पांडूरंग गोविंद वकील यांनी उर्दू भाषेत या ठरावाचा विषय समजावून सांगितला व ठराव पास झाला.

---

१ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र, पा. २७-२८

चौदा नंबरचा ठराव, सरकारने पंजाबला लेंजिस्लेटिव्ह कौन्सिल दिले याबद्दल आभार, तसेच या प्रांतासही कौन्सिल द्यावे अशी विनंती करणारा ठराव होता.

पंधरा क्रमांकाचे ठरावाने वऱ्हाडचे कायदे, ब्रिटिश सरकारच्या पद्धतीप्रमाणे करावेत अशी मागणी करण्यात आली होती. हा ठराव उमरावतीचे प्रसिद्ध वकील रा. प्रल्हाद नारायण जोग यांनी मांडला होता. आणि रा. शिवरतनसिंग व मि. गुलाम अहंमद या वऱ्हाडातील प्रतिनिधींनी त्यास अनुमोदन दिले होते. नंतर ठराव पास झाला.

सोळावा ठराव मद्रासचे श्री. रामजस नायडू यांनी मांडला. दुष्काळाची कारणे शोधून काढण्यासंबंधीचा हा ठराव होता. त्यास प्रो. साठे यांनी अनुमोदन दिले.

यानंतर अध्यक्षांनी मि. ग्लॅडस्टन यांचे वाढदिवसानिमित्त त्यांचे तारेने अभिनंदन करावे अशा आशयाचा मांडलेला ठराव पास करण्यात आला.

मद्रासचे आनंदा चार्लू यांनी नंतर एक ठराव मांडला. ना. दादाभाई हे आमच्या देशातर्फे विलायतेतील खरे खरे प्रतिनिधी आहेत व गेल्या वेळेप्रमाणे या वेळीही विलायतच्या लोकांनी त्यांची निवड करावी अशी आशा प्रकट करणारा हा ठराव होता. तो टाळ्यांचे गजरात पास झाला.

नंतर 'विलायतेतील काँग्रेसची ब्रिटिश कमेटी व सर डब्ल्यू. वेडरबर्न यांवर आमचा पूर्ण विश्वास आहे व ब्रिटिश कमेटीच्या वार्षिक खर्चासाठी आमच्या सर्व स्टॅन्डिंग कमेट्यांनी मिळून साठ हजार रुपये विलायतेला पाठवावे.' असा ठराव अध्यक्षांकडून मांडण्यात येऊन तो जयघोषात पास करण्यात आला.

त्यानंतर मि. ए. ओ. ह्यूम यांना पुढील वर्षासाठी काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी व रा. दिनशा एदलजी वाच्छा यांना दुय्यम जनरल सेक्रेटरी नेमण्याचा ठराव मांडण्यात येऊन तोही मोठ्या जयघोषात पास झाला.

ना. आनंदा चार्लू यांनी पुढील वर्षाचे काँग्रेसचे अधिवेशन मद्रासला भरवावे असे आमंत्रण दिले.

त्यानंतर स्वागत कमेटीचे मि. भुपेंद्रनाथ बोरा, मि. सुब्राय अय्यर, व मि. सेटलवाड यांनी प्रतिनिधीतर्फे आभार मानले. मि. बिपीनचंद्र पाल यांनी अध्यक्षांचे मोठ्या कळकळीने आभार मानले. त्यानंतर अध्यक्षांचे नावाचा व महाराणी व्हिक्टोरिया यांचे नावाचा त्रिवार जयघोष होऊन उमरावती काँग्रेसचे सूप वाजले[१].

काँग्रेसचे हे अधिवेशन येथे भरविण्याचे व ते अनेक संकटांना तोंड देऊन यशस्वी रीतीने पार पाडण्याचे सर्व श्रेय सर्वश्री दादासाहेब खापर्डे, रंगनाथपंत मुधोळकर, मोरोपंत जोशी आणि प्रल्हादपंत जोग वकील यांनाच आहे[२]. अधिवेशन अपेक्षेबाहेर यशस्वी झाले आणि सर्व मंडळी उमरावती-करांच्या आदरातिथ्याचा लाभ घेऊन आपापल्या गावी उमरावतीकरांना धन्यवाद देत परतली[३].

टाईम्स'काराला केसरीची थप्पड : उमरावतीला भरलेल्या काँग्रेसला प्रतिनिधींची गर्दी नव्हती, या एका गोष्टीवरून, मुंबईच्या टाईम्सकारांनी 'राष्ट्रीय सभेवरील लोकांची भक्ती कमी झाली' असे म्हटले होते. त्यावर 'केसरी'कार दि. ११ जानेवारी १८९८ च्या केसरीत लिहितात.

"अमरावतीच्या राष्ट्रीय सभेची पूर्ण हकीकत गेल्या दोन अंकात दिली आहे. राष्ट्रीय सभेचे काम उत्तम प्रकारे पार पडले याबद्दल खऱ्या राष्ट्रभक्तास आनंद झाल्यावाचून राहणार नाही. नेहमी प्रमाणे गेल्या राष्ट्रीय सभेस प्रतिनिधींची गर्दी नव्हती, या एका गोष्टीवरून मुंबईच्या टाईम्सकारांनी राष्ट्रीय सभेवरील लोकांची भक्ती कमी झाली असे अनुमान काढले आहे. मुंबई इलाख्यात व्यापून राहिलेला प्लेगचा रोग, ठिकठिकाणी असलेले क्वॉरन्टाईन, दुष्काळाने सर्व राष्ट्राची झालेली दुर्दशा, धरणीकंपाने व भयंकर वादळाने बंगालचे केलेले अतर्क्य नुकसान, या सर्व अडचणींचा विचार केला असता वऱ्हाडप्रांताबाहेरचे शे-दिडशे प्रतिनिधी उमरावतीस जमले होते, ही

---

१ : साप्ताहिक 'केसरी' पुणे, दि. २८ दिसेंबर १८९७ व ४ जाने. १८९८
२ व ३ : सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र; पा. ५३-५४

सर्व राष्ट्राने अभिमान बाळगण्याजोगीच गोष्ट आहे. स्वागत कमेटीचे अध्यक्ष रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व खलदेवतांनी राष्ट्रीय सभेस चिरडून टाकण्याचाच प्रयत्न चालविला असता राष्ट्रीय सभेस काही धोका बसला नाही व सरकारास ग्रासून सोडणाऱ्या संशयरूपी पिशाच्चाचे तडाख्यातून व खलदेवतांच्या वरील झुंजीतून राष्ट्रीय सभा सुखरूपपणे निभावून बाहेर पडली, ही अमरावतीच्या मेहनती व स्वार्थत्यागी लोकांना स्वतःच धन्य मानावयास लावण्याजोगी गोष्ट आहे, यात संशय नाही. अमरावतीच्या राष्ट्रीय सभेतील अत्यंत महत्त्वाचा ठराव म्हटला म्हणजे कायदे पंडित बॅनर्जी यांनी सभेपुढे मांडलेल्या चामर्स साहेबांच्या कायद्यासंबंधीचा ठराव होता. या शिवाय राष्ट्रीय सभेतील महत्त्वाचे ठराव म्हटले म्हणजे सरहद्दीवरील लढाई, कायमधारा व नातूबंधूसंबंधीचा होय. नातूबंधूसंबंधीचे ठरावावर बाबू सुरेन्द्रनाथ बॅनर्जी बोलत असता रा. टिळक यांना राष्ट्रीय सभेने दिलेल्या माना विषयीचे वर्णन अमृतबझार पत्रिका–आदि बंगाली पत्रात आले आहे.

ता. ४ च्या अमृतबझार पत्रिकेत खालील आशयाचा मजकूर आला आहे. रा. टिळक ह्यांच्या संबंधाने राष्ट्रीय सभेने जरी स्वतंत्र ठराव केला नाही तरी रा. टिळक यांच्या कारागृहवासाबद्दल सर्व देशास किती वाईट वाटत आहे हे राष्ट्रीय सभेने स्पष्टपणाने दर्शविले. रा. टिळक याजवरील खटल्यासंबंधाने अध्यक्षांनी आपले जेव्हा दुःखाचे उद्‌गार काढले तेव्हा सर्व सभासदांनीही अध्यक्षांच्या मताप्रमाणेच आमचेही मत आहे असे टाळचांनी व्यक्त केले. नातूबंधूंच्या ठरावासंबंधाने बोलताना खालील उद्‌गार बाबू सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी ज्यावेळी काढले, त्यावेळच्या राष्ट्रीय सभेच्या देखाव्यासारखा देखावा, सभेच्या मंडपात पूर्वी कधीही दिसला नसेल.

"रा. टिळक निरपराधी आहेत असे आमच्या हृदयातील अंतरात्म्याला वाटते हे मी सर्व देशी वर्तमानपत्राच्या वतीने व माझे मत म्हणून म्हणतो. कायदेशीर न्याय रा. टिळकांना मिळाला असेल पण खरा न्याय मिळाला नाही. ज्या टिळकाकरिता सर्व राष्ट्र अश्रू ढाळत आहे त्या टिळकांच्या तुरुंगाच्या कोठडीकडे माझे अंतःकरण धाव घेत आहे. रा. टिळकासारखा योग्यतेचा व गुणवान कोणताही पुरुष राजद्रोही असणे शक्य नाही. कारण राजनिष्ठा व स्वदेशाभिमान याची पूर्ण सांगड झाली आहे." – बाबूसाहेबाचे

चित्र क्र. ६६ : सर मोरो विश्वनाथ उर्फ अण्णासाहेब जोशी. (पृष्ठ २२८ पहा)



चित्र क्र. ६७ : रा. ब. रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकर (पृष्ठ २२८ पहा)

हे भाषण ऐकताच राष्ट्रीय सभेतील सर्व सभासद उभे राहिले व त्यांनी कित्येक मिनिटे रा. टिळकांच्या नावाचा जयघोष केला. टाळ्यांच्या गजरामुळे वक्त्याचा आवाज ऐकू येईनासा झाला[1]..."

वऱ्हाडातील पाटील, पटवा-यांची कान्फरन्स् : दि. १ जानेवारी १८९८ रोजी काँग्रेसच्या पेंडॉलमध्येच वऱ्हाडातील पाटील व पटवारी लोकांची प्रांतिक कान्फरन्स् भरली होती. श्री. पांडुरंग गोविंद वकील हे या कान्फरन्स्चे अध्यक्ष होते. पांडुरंग गोविंद हे त्या काळचे व त्याही पूर्वीच्या पिढीतले फार नामांकित व लोकप्रिय वकील होते. या कान्फरन्स् मध्ये प्रामुख्याने पाटील–पटवारी लोकांच्या अडिअडचणींचा विचार होऊन ठराव झालेत.

कान्फरन्स् मध्ये काही भाषणे फार आवेशाची झाली, त्यामुळे ही कान्फरन्स नोकरशाहीच्या डोळ्यात खुपली होती. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या प्रेरणेने ही कान्फरन्स भरली व ते स्वतः या कान्फरन्सला दिवसभर हजर होते.[2]

चाफेकरांचे बंधू उमरावतीत : इ. सन १८९७ च्या जुन महिन्यात पुण्याला प्लेगचे साथीचे काळात प्लेग नियंत्रण अधिकारी मि. रॅन्ड या गोऱ्या अधिकाऱ्याचे खुनाचे आरोपावरून फांशी गेलेला हुतात्मा दामोदर चाफेकर याचा एक भाऊ व वडील हरिभाऊ कीर्तनकार हे उमरावतीला काही काळ राहत असत.

२१ दिसेंबर १८९८ च्या दादासाहेब खापर्डे यांचे डायरीत या संबंधी खालील उल्लेख आढळतो.

---

१ : काँग्रेस मधील 'जहाल व मवाळ' हे शब्द उमरावतीच्या काँग्रेस पासूनच रूढ झालेत. त्याबद्दल ॲनी बेझंट म्हणतात "उमरावतीला भरलेल्या काँग्रेस मध्ये लो. टिळकांना झालेल्या शिक्षेबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यात आली आणि एका अर्थाने भावी जहाल पक्षाचा अंकुर या काँग्रेस मध्येच फुटला. असे म्हणावयास हरकत नाही." (काँग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास १९३५ पान ४१)

२ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र, पान : ३२

चाफेकरांचा (हरिभाऊ कीर्तनकार) आता एकुलता एक उरलेला मुलगा आज सकाळी काही मित्रांसह मला भेटायला आला. चाफेकर स्वतः (हरिभाऊ) दुपारी आले आणि अदमासे दोन तास माझ्याशी बोलत बसले. हरिभाऊ चाफेकर असाधारण धैर्याचे गृहस्थ आहेत आणि आपल्या आयुष्यातील सर्व दुर्घटनांना ते आपल्या कर्माचे फळ समजून, त्या अनिवार्य होत्या आणि म्हणून त्याचा शोक करण्यात अर्थ नाही, अशा पद्धतीने ते बोलत होते. चाफेकर पूर्वी होते तसेच प्रेमळ, विनोदी आणि तत्त्वनिष्ठ असे आजही आहेत..... आपली मुले दोषी होती असे त्यांना वाटत नाही[१].

हुतात्मा दामोदर चाफेकरांचे वडील हरिभाऊ चाफेकर हे कीर्तनकार होते व त्यांचा उमरावतीशी बराच संबंध होता असे दिसते.+

लो. टिळकांच्या अभिनंदनाची सभा : इ. सन १८९७ मध्ये पुण्याला प्लेग झाला, त्या संदर्भात लो. टिळकांनी केसरीतून काही लेख लिहिले होते. नंतर मि. रॅन्ड नावाच्या गोऱ्या अधिकाराचा पुण्यात खून झाला. त्याबद्दल संशयावरून चाफेकर व नातूबंधू यांना अटक करण्यात आली. परंतु सरकारला या प्रकरणी लो. टिळकांना अडकवायचे होते, पण पुरावे मिळेनात, म्हणून शेवटी शिवाजी उत्सवातील व्याख्याने केसरीत प्रसिद्ध केली, हे कारण पुढे करून, १२४ अ कलमाखाली टिळकावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यावेळी उमरावतीतून टिळक बचाव फंड उभारून सर्वश्री दादासाहेब खापर्डे, रंगनाथपंत मुधोळकर व मोरोपंत जोशी यांनी काही रक्कम लो. टिळकांचे खटल्यासाठी मदत म्हणून पाठविली होती. परंतु शेवटी या खटल्यात लो. टिळकांना १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात येऊन जेलमध्ये डांबण्यात आले. (म्हणूनच लो. टिळक उमरावतीस भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास उपस्थित राहू शकले नव्हते.)

पुढे दि. ७ सप्टेंबर १८९८ रोजी लो. टिळक कारागृहातून सुटले. तेव्हा त्यांचे याप्रसंगी उमरावतीकर जनतेच्या वतीने अभिनंदन

१ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र पा. ३५–३६

+ चाफेकर बंधूंची माहिती परिशिष्ट क्र. ४ पहा.



चित्र क्र. ६८ (पृष्ठ २२८ पहा)

श्री प्रल्हाद नारायण उर्फ दादासाहेब जोग, वकील



चित्र क्र. ६९ : सर मोरोपंत जोशी यांचा बंगला. (पृष्ठ २३३ पहा)

या बंगल्याचे आवारातच १८९७ ची काँग्रेस भरली होती.

चित्र क्र. ७० : उमरावतीला १८९७ साली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनासाठी आलेली कांही प्रमुख नेते मंडळी.

वरची रांग : १) राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूमसाहेब, २) डब्ल्यू. जी. बॅनर्जी, ३) पं. बिशन नारायण धार, ४) पी. आनंदा चार्लु, ५) दिनशा ए. वाच्छा.

दुसरी रांग : ६) ना. जे. कै. गोखले, ७) सुरेंद्रनाथ बॅनर्जी, ८) पं. मदन मोहन मालविय, ९) बिपीनचंद्र पॉल, १०) अंबिकाचरण मुजुमदार.

करण्यासाठी लक्ष्मीनारायण मंदिरात दादासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली दि. ११ सप्टेंबर १८९८ रोजी नागरिकांची सभा भरून, लोकमान्यांचे अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.+

त्याकाळी 'राजद्रोही' माणसाच्या अभिनंदनाची सभा घेणे म्हणजे मोठेच धाडस होते. वरील सभेचे महत्त्व त्यामुळे आहे.□

उमरावतीची पहिली गायन शाळा : प्रसिद्ध गवई कै. नामदेव बुवा जोशी यांनी इ. सन १८९४ चे सुमारास उमरावतीचे दहिसाथ चौकात गायनशाळा उघडली. बडोद्याचे राजगायक पै. मौलाबक्ष यांच्या घराण्याची गायकी त्यांनीच येथे आणली. अनेक प्रतिष्टित लोक या गायन शाळेत गायन–वादन शिकायला जात असत. उमरावतीत उघडलेली ही पहिली गायन शाळा होय. तेथे शास्त्रोक्त गायनासोबत तबला, पेटी,

---

+ दि. ७ सप्टेंबर १८९८ रोजी सकाळी लो. टिळवांची सुटका झाल्याची बातमी येताच प्रथम लोकांचा विश्वासच बसेना. पण पुढे खात्री होऊन लोकांनी अनेक प्रकारे आपला आनंद व्यक्त केला.

दीपोत्सव, गुढ्या उभारणे, सत्यनारायण, फटाके फोडणे, मिरवणुकी इत्यादी प्रकारांनी हा आनंद सर्व देशभर व्यक्त झाला होता. अनेक पुढारी लो. टिळकांस येऊन भेटले.

टिळकांची मुक्तता मुदतीपूर्वीच झाली होती. (केसरी दिनांक १३ सप्टेंबर १८९८)

□ रॅन्डच्या खुनाशी लो. टिळकांचा, दूरान्वयाने का होईना, संबंध असावा. ही त्याकाळी लोक चर्चा होती. म्हणूनच तत्कालीन एका स्त्रीगीतात तसा उल्लेख आल्याचे दिसून येते.

रॅन्ड साहेब मीच मारिला
जबानी देतो । जबानी देतो ॥
त्या टिळकांसाठी चाफेकर
फांशी जातो. ॥

गावगप्पातून जे त्याकाळी बोलल्या जात होते ते या ओळीत लिपीबद्ध झाल्याने ह्या ओळी बोलक्या झाल्या आहेत

(प्रा. मा. ल. व्यवहारे यांची आठवण)

सतार वगैरे वाद्यकलाही शिकविल्या जात. कै. नामदेव बुवांचे शिष्य कै. नत्थुबुवा तावडे, श्री. बाबासाहेब कासलीकार व कै. वामनबुवा जोशी हे देखील उत्तम गायक होते. या शिवाय नत्थुबुवांचे सहवासात कै. बिटघाबुवा कै. मुकुंदबुवा आणि कै. विष्णूपंत तांबे हे होते. (इ. सन १९०५ मध्ये (बालगंधर्व) नारायणराव राजहंस हे जेव्हा उमरावतीला होते, तेव्हा त्यांना नामदेवबुवा गाण्याची तालीम देत असत. नामदेव बुवाचे शिष्य नत्थुबुवा तावडे हे पुढे मुंबईला गेले व तिकडेच स्थाईक झाले. त्यांचे शिष्य दत्तूबुवा तावडे हे देखील मुंबईलाच स्थाईक झालें होते. याच परंपरेत पुढे कै. प्रल्हादबुवा खोलापूरकर व कै. नामदेव बुवा वऱ्हेकर हे नामवंत गायक व वादक तयार झाले होते.

उमरावतीच्या संगीत कलेचे मूळ केंद्र कै. नामदेव बुवा यांची ही गायनशाळा होय.

तुकाराम आखाडा : याच काळात उमरावतीला दादासाहेब खापर्डे यांचे आश्रयाखाली 'तुकाराम आखाडा' अंबागेटचे आत सुरू झाला. तुकाराम वस्ताद हे पुण्याच्या नगरकर तालमीतील वस्ताद होते. उमरावतीत त्याकाळी काही गोसाव्यांचे आखाडे होते असे सांगतात. पण तुकाराम आखाड्याला महत्त्व मिळू लागले होते. पुढे पुणे–साताऱ्याकडील दामोदर बळवंत भिडे गुरूजी उर्फ भटजी हे भूमीगत असताना येथे येऊन राहिले. त्यांनी तुकाराम आखाडा चालविण्याची जबाबदारी घेतली. भिडे गुरूजी नंतर, दे. भ. पाटील यांनी जबाबदारी घेतली. या आखाड्यात दे. भ. पन्नालालजी व्यास, श्यामराव पंत देशपांडे व वीर वामनराव दादा हे असत[१]. या शिवाय त्याकाळी सरकारी हिंदु हायस्कूलचे हेड मास्तर श्री. देवभानकर यांनीही तेथेच आखाडा सुरू केला होता.

रामलीला : रामायणावर आधारित रामलीला हा एक नाट्य प्रयोग उत्तर प्रदेशात फार पूर्वीपासून चालू आहे. ही रामलीला उमरावतीच्या रामभक्तासाठी उमरावतीला व्हावी या इच्छेने, इ. सन १८८०–८५ चे सुमारास एका रामलाल नावाच्या गृहस्थाला उत्तर प्रदेशातून (त्यावेळचा संयुक्तप्रांत) उमरावतीच्या रामप्यारीबाई या रामभक्त महिलेने बोलावले

१ : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उमरावती अधिवेशन : १९६४ स्वागताध्यक्षाचे भाषण.



चित्र क्र. ७१ : बी. पी. वाडिया, डॉ. ॲनीबेझंटबाई (पृष्ठ २५२ पहा)
उभे : जॉर्ज एस्. अरुंडेल



चित्र क्र. ७२ : श्री. गोपाळराव उर्फ बाबासाहेब बेडेकर (पृष्ठ २५४ पहा)
उमरावतीकर संगीत नाटक मंडळीचे संपादक



चित्र क्र. ७३ : उमरावतीचे 'घंटाघर' (पृष्ठ २५५ पहा)
(क्लॉक टॉवर)

होते. त्यानेच येथे प्रथम रामलीला सुरू केली. पुढे या रामलीलेसोबतच रावण–दहनाचा कार्यक्रमही सुरू करण्यात आला. नवरात्रारंभापासून ही रामलीला सुरू होऊन दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्याची रावण–कुंभकर्ण–पुतळ्यांच्या दहनाने समाप्ती होई. हा उपक्रम येथे गेली सुमारे ९० वर्षे चालू आहे. रावणदहनाचे दिवशी शहरा व्यतिरिक्त शेजारच्या खेड्यापाड्याचे लोक येत असत.

उमरावतीतील पहिला पुनर्विवाह : इ. सन १८९८ साली उमरावती येथे श्री. भास्करराव थत्ते यांनी पहिला पुनर्विवाह केला. या विवाहाचे पौरोहित्य श्री. बाबासाहेब बेडेकर यांनी केले होते[१].

श्री. भास्करराव थत्ते हे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नातलग असून दि. ६ ऑगस्ट १८९० पावेतो उमरावती नगरपालिकेच्या नोकरीत होते. त्यानंतर त्यांची सेवा जिल्हा बोर्डाकडे सुपूर्त करण्यात आली होती, व तेथे ते सेक्रेटरीच्या पदावर काम करीत होते.

पुनर्विवाहाबद्दल आज परिस्थिती बदललेली आहे. परंतु त्याकाळी समाजाला पुनर्विवाह मंजूर नसल्याने, असा पुनर्विवाह करणे म्हणजे मोठेच धाडस होते. प्रसंगी समाजाकडून बहिष्कृत म्हणून जीवन जगणे भाग पडत असे. त्यामुळे कोणीही समाजाच्या रूढी–चालीरीती–परंपरा या विरुद्ध जाण्याची हिंमत करीत नसे.

पुन्हा दुष्काळ : इ. सन १८९६ साली वऱ्हाडात दुष्काळ पडला. त्याची आठवण विरते न विरते तोच अवर्षण होऊन इ. सन १९०० मध्ये पुन्हा दुष्काळ सुरू झाला. उमरावतीत धान्य टंचाई व भाववाढ सुरू झाली.

यावेळीही श्री. दादासाहेब खापर्डे यांनी पुढाकार घेऊन, शहरात स्वस्त धान्याचे दुकान व पुअर हॉऊस काढून गोरगरीबांची सोय केली. या शिवाय नगरपालिकेतर्फे गरिबांना कपडे व घोंगड्या वाटण्यात आल्या[१]

दुष्काळग्रस्त लोकांना काम पुरविण्यासाठी राजापेठ तलावाचे काम सुरू केले होते. हा दुष्काळ वर्षभर होता.

थिऑसाफिकल सोसायटी : दि. २१ जानेवारी १९०० इ. रोजी खापर्डे वाड्यात भरलेल्या सभेत ही संस्था स्थापन करण्यात आली. सर्वश्री

१ : नगरवाचनालय : शताब्दि स्मरणिका १९७० : पा. ४६

दादासाहेब खापर्डे, वासुदेवराव जोग, बाळकृष्णपंत करंदीकर, विश्वनाथ काशीनाथ काळे, नसरवानजी देसाई, बाबासाहेब खापर्डे व बाळकृष्णपंत बोधनकर ही मंडळी या संस्थेची सभासद बनली.

डॉ. ॲनी बेझंट : या संस्थेचे उद्घाटनासाठी पुढे, फेब्रुवारी १९०१ मध्ये प्रख्यात डॉ. ॲनी बेझंटबाई ह्या उमरावतीस आल्या. त्यांचे भाषण दि. २८-२-१९०१ रोजी इंद्रभुवन थिएटर मध्ये झाले. इंग्रजबाई भगवद् गीतेवर प्रवचन करते, ते ऐकायला अमाप गर्दी जमली होती.

ब्रम्हविद्या मंदिर : थिऑसाफिकल सोसायटीच्या उमरावती शाखेतर्फे जोग चौकात इ. सन १९०५ मध्ये ब्रम्हविद्या मंदिर या नावाचे एक मोठे सभागृह बांधण्यात आले होते. त्यावेळी एवढे मोठे सभागृह उमरावतीत हेच एक असावे या इमारतीच्या उद्घाटनासाठी डॉ. ॲनी बेझंटबाई[१]

१ **डॉ. ॲनी बेझंट** : (जन्म १८४७ मृ. १९३३) जगातील सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्या, वक्त्या व थिऑसॉफिल सोसायटीच्या अध्यक्षा.
शिक्षण : इंग्लंड, जर्मनी व फ्रान्स येथे. सुरुवातीला नास्तिक होत्या. इंग्लंडच्या फेबीयन सोसायटी व मजुर पक्षाचे स्थापनेतील प्रमुख व्यक्ती १८९३ साली भारतात आल्या. व नंतर थिऑथाफीचा जगभर प्रसार केला. बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेज स्थापन करून, धर्म-शिक्षणाचा प्रत्यक्ष अभ्यासक्रमात समावेश करून, तो यशस्वी करून दाखविला. गीता, उपनिषदे, रामायण, महाभारत वगैरेवर व्याख्याने देऊन ती ग्रंथ रूपाने प्रसिद्ध केली. बनारसचे सेंट्रल हिंदू कॉलेज ही दहा लाख रुपये किंमतीची व एक हजार विद्यार्थी असलेली संस्था त्यांनी १९१५ साली पंडित मदनमोहन मालवीय यांना, त्यांच्या भावी हिंदू विश्व विद्यालयाचा पहिला घटक म्हणून अर्पण केली. १९०७ साली त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष झाल्या. अड्यार येथील आश्रमाचा व्याप त्यांनी वाढविला. १९०९ साली पृथ्वी-पर्यटन. १९१३ साली त्यांनी हिंदी राजकारणात प्रवेश केला. मद्रासच्या काँग्रेस अधिवेशनात होमरूलचा ठराव मंजूर करवून घेतला व त्यासाठी त्यांनी देशभर प्रचार केला १९१६ साली होमरूललीगची स्थापना केली. १९१७ साली कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. जगाच्या सर्व भागातील लोक त्यांचे अनुयायी होते. (अर्वाचीन चरित्रकोश : चित्राव : पा. ४६१)

ह्या पुन्हा ९ फेब्रुवारी १९०५ रोजी उमरावतीस आल्या होत्या. त्यावेळी वनिता समाजातही त्यांचे भाषण झाले.

ह्या ब्रम्हविद्या मंदिराचाच नंतर १९४१ मध्ये डॉ. जोशी हॉल झाला. कै. श्री. डॉ. जोशी यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. बाळासाहेब जोशी यांनी दिलेल्या देणगीतून मूळ सभागृहाचे आधुनिक सभागृहात रूपांतर करण्यात आले व या नव्या सभागृहाचे उद्घाटन दिनांक २ एप्रील १९४१ रोजी थिऑसाफिस्ट श्री. सी. जिनराजदास एम्. ए. यांच्या हस्ते झाले.

मिस् गार्लंडबाई : दि. २० फेब्रूवारी १९०० रोजी इंडियन नॅशनल काँग्रेसचे प्रचारार्थ मिस गार्लंड नावाची बाई उमरावतीस आली होती. रा. ब. तात्यासाहेब मुधोळकरांचे बंगल्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांची सभा घेण्यात आली. चर्चा झाली. इतर विषयासोबतच दुष्काळी परिस्थितीसंबंधी तेथे चर्चा करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी इंद्रभुवन थिएटरमध्ये मिस गार्लंडबाईचे व्याख्यान झाले[१]

उमरावतीच्या हौशी नटाचे मुद्राराक्षस : उमरावतीचे १ विद्वान वकील श्री. भाऊसाहेब असनारे यांनी संस्कृत मुद्राराक्षस या नाटकाचे भाषांतर केले होते. हे नाटक रंगभूमीवर कसे वठेल, हे पाहण्यासाठी काही हौशी कलावंताचे सहकार्याने दादासाहेब खापर्डे यांनी हे नाटक बसविले व त्याचा पहिला प्रयोग आकोला येथे दि. १६ मार्च १९०० रोजी करण्यात आला. या नाटकात हल्ली उमरावतीचे प्रख्यात व वयोवृद्ध ॲडव्होकेट रा. ब. रा. मो. खरे यांनी सिद्धार्थाचे काम केले होते. या शिवाय बनाजी नावाच्या दोन पार्शी मुलांनी व अ. हमीद नावाच्या एका मुसलमान मुलाने काम केले हेही याचे एक वैशिष्ट्य होते. अ. हमीदने मलयकेतूचे आणि बनाजीने मलयकेतू समागमेच्या प्रतिहारीची कामे केलीत. सर्व पात्रांची कामे उत्तम वठली. ह्याच नाटकाचा प्रयोग नंतर उमरावतीलाही केला गेला. यवतमाळचे शामराव देशपांडे यांनीही या नाटकात काम केले होते[२].

---

१ व २ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. १०४–५ व १०१

उमरावतीची पहिली नाटक मंडळी : उमरावती नगरपालिकेत श्री. गोपाळराव बेडेकर या नावाचे एक सद्गृहस्थ कारकून होते. जुन्या कोतवालीचे मागे त्यांचे राहणे असे. ते उत्तम कीर्तन करीत असत. त्यांचा आवाजही उत्तम होता. त्यांनी नगरपालिकेतून रजा घेऊन "उमरावती अमॅच्युअर कंपनी" या नावाची एक नाटक कंपनी काढली. स्थानिक कलाकारांचे सहकार्याने निघालेली उमरावतीची ही पहिली नाटक कंपनी असावी. या कंपनीचे शारदा हे पहिले नाटक रंगभूमीवर आले होते. गोपाळराव यांची कोदंडाची भूमिका अप्रतिम वठत असे. या नाटक मंडळीने बराच दौरा केला, परंतु कंपनी जास्त दिवस चालू शकली नाही. 'उमरावतीकर संगीत नाटक मंडळी' या नावाने काही काळ बेडेकरांची ही कंपनी चालू होती.

"सन्मित्र समाज" या नावानेही काही मंडळींनी नाटके बसवून ती रंगभूमीवर आणली होती.

उमरावतीचा पहिला सार्वजनिक गणेशोत्सव : उमरावतीत खाजगी रीतीने काही सधन लोक आपल्या दिवाणखान्यात गणपती बसवून गणेशोत्सव साजरा करीत असत. काही लोकांकडे परंपरागत असा उत्सव व्यक्तिशः साजरा केला जाई. त्यानिमित्त पानसुपारी वगैरे करीत.

पण इ. सन १९०० मध्ये पहिला सार्वजनिक गणेशोत्सव श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांनी साजरा केला. हा उत्सव इंद्रभुवन थिएटरमध्ये साजरा झाला. त्यावेळी पोवाडे, गायन, मेळे व व्याख्याने इत्यादी कार्यक्रम झालेत. लोकांनी या उत्सवात मोठ्या उत्साहाने भाग घेतला. कै. दादासाहेब जोशी (कै. मोरोपंत जोशी यांचे वडील) यांनी या उत्सवात प्रामुख्याने भाग घेऊन उत्सवाला खऱ्या अर्थाने सार्वजनिक स्वरूप आणले होते[१].

१९ व्या शतकातील वाहने : एकोणीसाव्या शतकात उमरावतीत जी वाहने होती ती म्हणजे घोड्याचे तांगे, दमणी, छकडा, बैलगाड्या आणि घोड्यावरून प्रवास हा सर्व साधारण होता.

त्याकाळी उमरावती ते ईलिचपूर तांगा–सर्व्हिस होती. बत्तीस

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे चरित्र : पा. ९५

मैलाचा हा प्रवास तांग्याने चार तासात होत असे. माणशी भाडे सुमारे तीन रुपये पडे[1].

आधुनिक वाहनांची सुरूवात : आधुनिक युगाचे प्रतीक असे सायकल हे वाहन उमरावतीत प्रथम सर मोरोपंत जोशी यांनी आणले. मोटार हे वाहन देखील **प्रथम** मोरोपंतांनीच उमरावतीत आणले.[2] अशा रीतीने आधुनिक वाहनांची उमरावतीत सुरवात झाली.

घंटाघर : उमरावती शहरातील प्रसिद्ध घंटी घडयाळ उर्फ क्लॉक टॉवर ही तत्कालिन इंग्रज अधिकाऱ्यांनी दिलेली देणगी होय. त्या काळात सिव्हिल सर्जन व चीफ एक्झीक्युटीव्ह इंजिनीअर हे अधिकारी सरकारनियुक्त नगरपालिकेचे सभासद असत.

इ. सन १८७०-७१ चे सुमारास मेजर जे. टी. ब्युसबॉय हा डेप्युटी कमिश्नर व त्या नात्याने नगरपालिकेचा अध्यक्ष असताना, त्या वेळचा पी. डब्ल्यु. डी. खात्याचा चीफ इंजिनीअर आर. डब्ल्यु. वुडहाऊस हा होता व तो सरकारनियुक्त नगरपालिकेचा सभासदही होता. 'मुंबईच्या राजाबाई टॉवरप्रमाणे येथेही एक टॉवर बांधावा' ही कल्पना त्यानेच मांडली आणि त्यासाठी हल्ली जेवढा जोग चौक आहे ती चौरस जागा त्यानेच रिझर्व करायला लावली. मध्ये घडयाळ असलेले टॉवर व त्या सभोवती बाग असावी अशी त्याची मूळ कल्पना होती. त्याप्रमाणे त्यावेळी सुमारे दोन हजार रूपये खर्चून नगरपालिकेने पण, पी. डब्ल्यू. डी. च्या देखरेखीखाली हे घंटी घडयाळ बांधविले. त्यावर जी मोठी घडयाळे बसविली ती उमरावतीत गणपतराव मिस्त्री म्हणून एक गृहस्थ होते, त्यांचे ते कर्तृत्व आहे. ही घडयाळे प्रत्येक तासाला गजर (घंटा) देत असत. बगिचा मात्र शेवटी झाला नाहीच; कंपौंडवॉल फक्त बांधल्या गेली. त्यावेळी शहराच्या अगदी नजीक असा हा सुंदर बगिचा व तासातासाला किती वाजले हे सांगणारे घडयाळ असलेले उंच टॉवर अशी वुडहाऊसची कल्पना होती पण ती तशीच राहिली आणि पुढे या जागेचे तुकडे पडून ४-५ संस्थांना ते देण्यात आले. घडयाळ बंद पडले. त्याला कित्येक वर्षे

---

१ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. ९१

२ : सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र : पा. ४

लोटलीत पण ते कधीही दुरुस्त होऊ शकले नाही. आणि शहराच्या शोभेची व उपयोगाची ही मूळ कल्पना या टॉवर प्रमाणेच खिन्न मनाने शहराकडे "कधीतरी जीर्णोद्धार होईल" या आशेने आजही पाहत आहे‡.

लोकांचे मनोरंजनासाठी, घंटी घड्याळ जवळ आठवड्यातून दोनदा बँड वाजविला जाई. परंतु एप्रील १८९३ नंतर हा बॅन्ड आठवड्यातून फक्त एकदाच, दर शनिवारी सायंकाळी वाजविण्यात यावा असा नगरपालिकेने निर्णय घेतला होता.[१] पण पुढे हा निर्णयही बदलून मे १८९४ मध्ये, बॅन्ड वाजविणे बंद करावे असा ठराव करण्यात आला.[२]

जुनी कोतवाली : वऱ्हाडची वहीवाट इंग्रजाकडे आल्यानंतर, इंग्रजांनी उमरावती शहराला महत्त्व दिले. इ. सन १८५९ ते १८७२ या काळात उमरावतीला अनेक सरकारी इमारती बांधण्यात आल्या. त्यावेळी सर्व वस्ती परकोटाचे आतच होती. परकोटाचे बाहेर त्यावेळी जंगल होते.

शहराचे संरक्षणासाठी परकोट होता तरी इतर व्यवस्थेसाठी पोलिसांची गरज होतीच. म्हणून वऱ्हाडात इंग्रजांनी पोलिस विभाग सुरू केल्यानंतर, इ. स. १८७७ मध्ये उमरावती वस्तीत, परकोटाचे आत, लक्ष्मीनारायण मंदिरा शेजारी, कोतवालीसाठी इमारत बांधली. हीच "जुनी कोतवाली[३]". इ. सन १९१० नंतर शहरासाठी कोतवालीची नवी इमारत (सिटी कोतवाली, जोशी मार्केटजवळ) बांधल्यामुळे तिला 'नवी कोतवाली' आणि या शहरातील कोतवालीला "जुनी कोतवाली" असे म्हणण्याचा प्रघात पडला. १९१० पावेतो संपूर्ण शहराची एकच कोतवाली होती ती म्हणजे जुनी कोतवाली.

---

‡ : दि. २६ ऑक्टों. १८७२ रोजी टॉवर क्लॉक दुरुस्त करावे आणि त्याला किल्ली देणे व इतर देखभाल करणे या कामासाठी दरमहा रु. ५ वर मनुष्य नेमावा असा ठराव नं. ४ उमरावती नगरपालिकेच्या प्रोसिडिंग बुकात आहे. यावरून उमरावतीचे घंटी घड्याळ हे १८७२ च्या पूर्वी बांधून तयार झाले होते हे स्पष्ट आहे.

१ व २ : म्यु. ठराव नं. २ दि २० एप्रील १८९३, ठराव नं. १ दि. २ मे १८९४

३ : पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट पत्र क्र. १३५७, दि. १४ मे १९२७, रे. के. नं. ९२७ : २६-२७ नि. ता. ५-३-१९२८



चित्र क्र. ७४ : जुनी कोतवाली (पृष्ठ २५६ पहा)



चित्र क्र. ७५ : इंद्रभुवन थिएटर (दर्शनी भाग) (पृष्ठ २५७ पहा)



चित्र क्र. ७६ : गंभीरपुर हनुमान संस्थान. मुख्य प्रवेश द्वार (पृष्ठ २५८ पहा)

चित्र क्र. ७७ : गंभीरपुर हनुमान मंदिर

या कोतवालीत पोलिस क्वॉर्टर्स, इन्स्पेक्टर्स क्वॉर्टर्स, एक-दोन ऑफिस रूम्स् व सभोवार कंपाऊंड एवढी जागा आहे. या इमारतीमुळे या वार्डला 'जुनी कोतवाली वार्ड' हे नाव मिळाले. कोतवालीची ही इमारत व संलग्न इमारती ह्या पोलिस खात्याकडे जरी वापरात आहेत तरी त्या इमारती मात्र पी. डब्ल्यू. डी. खात्याकडे व्यवस्थेसाठी आहेत.

नागपुरीगेट बाहेर पोलिस स्टेशन झाल्यानंतर, ही जुनी कोतवाली फक्त पोलिस क्वॉर्टर्स म्हणूनच उपयोगात आणली जात असे. परंतु आता वर्ष-दीड वर्षापूर्वीपासून येथे 'पोलिस चौकी' सुरू करण्यात आली आहे.

इंद्रभुवन थिएटर : इ. स. १८९० पूर्वी उमरावतीत एकही थिएटर नव्हते असे दिसते. हल्ली इंद्रभुवन थिएटर म्हणून ओळखल्या जाणारी जागा ही इ. स. १८८९ पावेतो सेठ पुरणमल यांचा गोखाना (गोठा किंवा गायवाडा) होता. इ. स. १८९० नंतरच येथे थिएटर बांधण्यात आले असे दिसते. हा गायवाडा फार मोठा होता. एका बाजूला गोडाऊन वजा इमारत होती असे दिसते. कारण १८८९ सालापावेतो उमरावतीच्या वक्तृत्वोत्तेजक सभांचे कार्यक्रम येथे होत असत. म्हणजे तेथे पुष्कळ लोक बसू शकतील एवढा मोठा हॉल किंवा गोडाऊन त्यावेळी असले पाहिजे. "ह्या वक्तृत्वोत्तेजक सभा सेठ पुरणमल यांचे गोखान्यात भरत असत". असे एके ठिकाणी नमूद आहे. ही वक्तृत्वोत्तेजक सभा इ. स. १८८९ मध्ये बंद पडली. म्हणजे १८८९ पावेतो येथे इंद्रभुवन थिएटर अस्तित्वात नव्हते. १८९० नंतरच त्याला थिएटरचे स्वरूप देण्यात आले असावे. त्या नंतरच इंद्रभुवन थिएटरचा उल्लेख आढळतो.

किर्लोस्कर नाटक मंडळी दि. १ जानेवारी १८९८ रोजी उमरावतीस आली. त्याकाळी नावाजलेली अशी संगीत नाटक मंडळी म्हणून हीच पहिल्यानें उमरावतीत आली असे दिसते. त्यावेळी इंद्रभुवन थिएटर होते व तेथे या कंपनीचे खेळ होत असत. म्हणजे इंद्रभुवन थिएटर हे इ. सन १८९० नंतरच बांधण्यात आले असावे. हें उमरावतीचे पहिले थिएटर. या थिएटरचे महत्त्व त्याकाळी फार होते. कारण सर्व वस्ती मुख्यतः परकोटाचे आत असल्याने, या थिएटरमध्ये कार्यक्रम झाला तर लोकांना हजर राहण सोयीचे होत असे. म्हणून कार्यक्रम येथे होत व नाटक कंपन्या येथेच खेळ करीत. शहरात दुसरे थिएटर नव्हते. गणेश थिएटर हे १८९७ मध्ये बांधण्यात आले

असे दिसते की हे थिएटर नंतर येथील सुप्रसिद्ध वकील कै. जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे व त्यांचे बंधू अनंत केशव असनारे यांनी सेठ पुरणमल यांच्याकडून विकत घेतले होते. १९१० मध्ये या थिएटरची व्यवस्था श्री. बाळाभाऊ आसरकर हे पाहत असत. दि. २० जुलै १९२० रोजी असनारे बंधूंनी हे थिएटर श्री. देवीदास मारोती पाटील, बोके, मालगुजार, रा. वरखेड यांना विकले. तेव्हापासून या इंद्रभुवन थिएटरचे नविनीकरण केले असे दिसते. कारण कागदपत्रावरून थिएटरच्या दक्षिणेकडील काही जागा त्यांनी नंतर विकत घेतली असा उल्लेख आहे. अर्थात ही जागा घेऊन थिएटरचे क्षेत्र वाढविले असावे.

इंद्रभुवन थिएटर श्री. बोके यांनी १९२० साली, विकत घेतल्यानंतर त्यांनी हे थिएटर १९२३ साली पुन्हा बांधून काढले व नाटक कंपन्याना सोयीस्कर अशी त्यात व्यवस्था केली होती.

या नवीन थिएटरचा उद्घाटन समारंभ दि. १२ मे १९२३ रोजी मोठ्या थाटानें साजरा झाला होता. या प्रसंगी पाटणकर संगीत नाटक मंडळीने आपला 'श्रीकृष्ण लीला' ह्या नाटकाचा प्रयोग करून दाखविला होता[१].

गंभीरपूर हनुमान संस्थान : शहराच्या पश्चिमेकडील भिती बाहेर (खोलापुरीगेट बाहेर) एक उंच परकोटासारख्या भिती व मोठाले दरवाजे असलेली चौकोनी जागा आहे. त्यास "गंभीरपूर हनुमान संस्थान" म्हणतात. या उंच भितीचे आत हनुमान मंदिर असून काही जिराईत व काही बागाईत जमीन आहे. हे संस्थान फार जुने म्हणजे इ. स. १६६० मधील असावे.

नंगाबाबा नावाच्या एका साधूने हे मंदिर बांधले असे दिसते. नंतर त्याचा मुलगा अमरदास व अमरदासची बायको काशीबाई यांचेकडे हे संस्थान होते. त्यांना मुलबाळ नसल्याने त्यांनी चन्नीबाई नावाची मुलगी दत्तक घेतली. तिचे गुरुमुखदासशी लग्न झाले. ही दोघेही मृत्यु पावल्यानंतर, चन्नीबाईची बहीण राधाबाई या जागेची मालक झाली असे दिसते. असा हा या संस्थानचा थोडक्यात इतिहास आहे.

---

१ : उदय दि. १५ मे १९२३

गणेश थिएटर : गणेश थिएटर (म्हणजे हल्लीचे प्रभात टॉकीज) हे इ. सन १८९७ मध्ये बांधण्यात आले आहे.

श्री. अभ्यंकर यांनी हे थिएटर बांधण्यासाठी नगरपालिकेकडे अर्ज देऊन परवानगी मागितली होती. त्याप्रमाणे ठराव नं. ११, दिनांक ३ नाव्हें. १८९६ अन्वये, तहसील कचेरीजवळ त्यांना थिएटर बांधण्याची परवानगी देण्यात आली.

सिनेमा अस्तित्वात येण्यापूर्वी हे थिएटर नाटकासाठीच प्रामुख्याने वापरले जात असे. शिवाय सभा संमेलनासाठी या थिएटरचा फार उपयोग होई. सध्या या थिएटरचा उपयोग बोलपटासाठी होतो. असे दिसते की, इ. सन १९२१ नंतर या थिएटरमध्ये 'पिक्चर पॅलेस' या नावाने मूक चित्रपट दाखविणे सुरू झाले होते.

नेकोलेट पार्क : उमरावतीचा सर्वांत मोठा हा नेकोलेट पार्क, म्हणजे हल्लीचे 'नेंहरू मैदान' होय. काही काळ याला खापर्डे मैदानही म्हणत असत. स्वातंत्र्य आंदोलनाचे सुरुवातीचे काळात म्हणजे इ. सन १९२० चे आसपास या मैदानाला 'शिवाजी मैदान' हें नाव होते. म. गांधीजी उमरावतीला प्रथमच इ. सन १९२१ मध्ये आलें तेव्हा त्यांचा भव्य सत्कार याच शिवाजी मैदानात करण्यात आला होता.

नगरपालिकेचा ठराव नं. २ : दि. १४-९-१८९३ प्रमाणे ही त्रिकोणी जागा लोकांच्या करमणुकीसाठी व विश्रांतीसाठी रिझर्व करण्याचे ठरविण्यात आले होते. नंतर या जागेला ठराव क्र. ४ : दि. २७-२-१८९६ प्रमाणे 'नेकोलेट' पार्क' आणि या मैदानासह, हल्लीचे अंबापेठ या सर्व भागाला 'नेकोलेटपुरा हे नाव देण्यात आले होते.

श्री. एच्. एस्. नेकोलेट या नावाचा एक इंग्रज अधिकारी त्याकाळी उमरावती जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर व त्या नात्याने म्यु. अध्यक्ष होता. त्याने अंबापेठ हा मोहोल्ला वसविण्यासाठी खटपट करून येथे प्लॉटस् पाडले व ते काही वकिलांना व काही सरकारी कर्मचाऱ्यांना दिलें होते. त्यामुळे अंबापेठला बरीच वर्षे 'गुलामपुरी' असेही लोक म्हणत असत.

याच नेकोलेटने आपल्या कार्यकालात म्यु. कमेटी समोरच्या भव्य त्रिकोणी जागेला 'पार्क'चे स्वरूप दिले. त्यावेळी या पार्कच्या काठाने झाडे

होती. तसेच सभोवार अष्टकोणी पिलर व सांखळी होती. सायंकाळी येथे लोक फिरायला व मुले खेळायला येत असत. दर शनिवारी या पार्कवर सायंकाळी पोलिस बँड वाजत असे. त्यासाठी नगरपालिका ५० रुपये ग्रँट देत असे. इ. स. १९१८ पावेतो या पार्कचे हे स्वरूप होते. या पार्कला 'नेहरू मैदान' हे नाव नंतर देण्यात आले. या पार्कचे एका कोपऱ्यावर म्यु. सराय (धर्मशाळा) होती. (ती अजूनही आहे पण तेथे आता शाळा भरते.) नंतर या पार्कपैकी काही जागा वकील लोकांना क्लबसाठी दिली. नंतर अनेक लोकांना या मैदानातील, रस्त्याच्या बाजूंची जागा घरासाठी देण्यात आली. १९२८ मध्ये या मैदानातील काही जागेवर म्यु. ए. व्ही. स्कूलची इमारत बांधली. याप्रमाणे डेप्युटी कमिश्नर एच्. एस्. नेकोलेट याच्या मूळ 'पार्क'च्या उत्कृष्ट कल्पनेचा निकाल लागला. स्वातंत्र्योत्तर काळात या मैदानाचे खुल्या दोन्ही बाजूंनी निर्वासितांसाठी दुकाने बांधण्यात आलीत. त्यामुळे मैदान बंदिस्त झाले. पूर्वीचा 'कोरोनेशन गार्डन' व हल्लीचा 'कस्तुरबा गार्डन' याच मैदानात एका टोकाला असून त्याचा लोकांना उपयोग होतो.

"इंग्लंड मधील 'हाईड पार्क' प्रमाणेच उमरावतीतही एक पार्क असावा ही कल्पना दादासाहेब खापर्डे यांनी डे. कमिश्नर नेकोलेट यांस सुचविली होती. श्री. मुधोळकरांनी या कल्पनेला साथ दिली, आणि श्री. मुधोळकरांचे सूचनेवरूनच या पार्कला 'नेकोलेट पार्क' हे नाव देण्यात आले होते.

श्री. नेकोलेट यांनी सांगितले होते की, ही जागा कायम सार्वजनिक खेळण्याकरता ठेवावी आणि कोणासही यातील जागा दिली जाऊ नये[१]."

जुम्मा मसजीद : उमरावतीच्या त्यावेळच्या औरंगपुऱ्यातील (हल्लीचा साबणपुरा) ही मसजीद इ. स. १६४०–५० चे दरम्यान फरिदशाह दरवेश आणि नूरमहंमद दरवेश[२] यांनी बांधली. या मशिदीला इ. स. १६५८ मध्ये

---

१ : कै. टिकेकर मास्तरांच्या आठवणी.

२ : दरवेशी : हा पर्शीयन शब्द असून त्याचा अर्थ भिक्षेकरी असा आहे. हे मुसलमान व काही ख्रिश्चन जातीचे लोक काम न करता भिक्षावृत्तीवर चरितार्थ चालविणे हा त्यांचा धंदा असतो. तथापि काही दरवेशी काम करून आपली वृत्ती सांभाळतात... ... ... दरवेशास फकीर अशीही संज्ञा देतात. मौलवी दरवेशी तालसुरावर प्रार्थना करतात. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर : भाग १५ : पा. (द) २५)

बादशाह अलमगीर औरंगजेब याने, त्याचे राज्यारोहण समारंभाचे प्रसंगी, मौजा तारखेडा येथील दोन निटन्स सरकारी करमुक्त काळी जमिन व बगिच्यासाठी, मजरे औरंगपुर येथील ७ बिघे व १५ पांड[1] पांढऱ्या जमीनीची सनद दिली आहे. (ही मूळ सनद पर्शीयन लिपीत असून त्याचा इंग्रजी अधिकृत अनुवाद याच पुस्तकातील भाग १ मधील परिशिष्ट क्र. १ मध्ये दिलेला आहे.)

मुसलमानी अमदानीनंतर उमरावतीत बांधलेली हीच पहिली व सर्वात जुनी मशीद असावी.

इ. स. १६६० चे सुमारास, उमरावती गावापासून पूर्वेच्या बाजूने काही अंतरावर ही मसजीद होती. तसेच गावच्या पश्चिमेला काही अंतरावर गंभीरपूरचे मारोती मंदिर होते असे दिसते.

हल्लीचा साबणपुरा मोहल्ला या मशिदीला मिळालेल्या जमिनीवरच वसलेला आहे. या भागाला १८ व्या शतकात 'मजरे औरंगपूर' असे नाव होते.

उमरावती जेल : उमरावतीचा सुरुवातीचा जेलखाना, हल्ली वकील लाईन आहे त्या भागात होता. (हल्लीची रामबिलास चाळ[2]). १८६६ मध्ये वडाळी जवळ ४९४ कैद्यांसाठी डिस्ट्रिक्ट जेल बांधल्यानंतर जेलची जुनी इमारत सरकारने गनेडीवाल फर्मला विकली. (ती जागा गनेडीवाल फर्मने म्यु. कमेटीस ऑफिससाठी भाड्याने दिली होती व तेथे १८७७ पासून म्यु. ऑफिस पुढे बरीच वर्षे होते.)

अमरावती डिस्ट्रिक्ट जेल मध्ये इ. स. १८७१ मध्ये ११० पुरुष व ४१ स्त्री कैदी होते व त्यापैकी ७१ लोकांना लिहिता वाचता

---

१ : दोरी हे मोजणीचे माप काढून टाकून सांखळी उपयोगात आणली. 'पांड' हे एकंचे प्रमाण ठरविले. पांच हात व पांच मुठी (शिवाजीच्या) याची एक काठी तयार केली. ही काठी मोजणीत उपयोगात आणत. (जमीन महसुल–मराठा अंमल – महाराष्ट्रीय ज्ञानकोश : केतकर : भाग १३ पा. (ज) ११३)

२ : कै. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.

येत होते. बाकीच्या लोकांना शिक्षण देण्याची सोय करण्यात आली[१]. इ. सन १९०२ च्या प्रशासनिक रिपोर्टानुसार, या जेलमधील कैद्यांनी केलेल्या कामाचे उत्पन्न रु. १७९८४ एवढे मिळाले होते.

स्त्रियांचा जेल : अमरावतीत निजामाचे कारकिर्दीत स्त्रियांचा जेल होता. हल्ली मोठे बालाजीचे मंदिर आहे, त्याचे समोर किंवा गांधी चौकातील जोश्यांची चाळ म्हणून ओळखल्या जाते ती इमारत, मुळांत स्त्रियांचा जेलखाना होता. पुढे सुमारे १८६६ नंतर, उमरावतीला डिस्ट्रिक्ट जेल बांधण्यात आला व ही इमारत जागेसह इंग्रजांनी गनेडीवाल फर्मला विकली. तेव्हा या इमारतीला धर्मशाळेचे स्वरूप देण्यात येऊन तेथे धर्मशाळा सुरू करण्यात आली होती.

त्याकाळी गोसाव्याचे सशस्त्र आखाडे उमरावतीत येत ते तेथे उतरत असत.

त्यानंतर धर्मशाळेचा दर्शनी भाग पाडून तेथे दुकान ओळ बांधण्यात आली. ती दुकाने हल्ली आहेत, परंतु आतील भाग अजूनही मूळ इमारतीचाच आहे[२].

उमरावती रेल्वे : इ. स. १८८३ साली उमरावती रेल्वेचे उत्पन्न रु. ९६,१६०, खर्च रु. ५१,७७३, निव्वळ नफा रु. ४४,३३७ होता[३]

इ. स. १९०२ साली उमरावती रेल्वेचे उत्पन्न वगैरे[४].

भांडवल	जमा	खर्च	नफा	नफ्याची टक्केवारी
४,५१,८२६	१,०८,५७८	५८३४१	५०२३७	११.१२

उमरावतीत ख्रिश्चन धर्माचा प्रचार-प्रसार : १९ व्या शतकातील शेवटच्या २५ वर्षात नागपूरचे रेव्हरंड स्टेफेन हिस्लॉप यांनी नारायण शेषाद्री या ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या ब्राम्हण गृहस्थास

---

१ : प्रशासन रिपोर्ट, हैं. अ. डि. खंड २, पा. २४.

२ : श्री. श्री. पु. हिर्लेकर यांच्या आठवणी.

३ व ४ : प्रशासन रिपोर्ट १८८३, पा. १९ व इ. स. १९०२, पा. ६४.

धर्मप्रचारासाठी उमरावतीला पाठविले होते. नारायण शेषाद्रीने सदोबा मिसाळ यांच्या हाताखाली उमरावतीला धर्मप्रचार व प्रसाराचे कार्य केले. उमरावतीला ख्रिश्चन धर्म स्वीकारणारा पहिला गृहस्थ बलदेवसिंग राजपूत हा होता. त्याला कमिश्नर कर्नल मॅकेन्झी यांनी पोरका म्हणून उमरावतीस आणले होते[1].

१९ व्या शतकाची अखेर : १९ वे शतक सुरू झालें तेव्हा वऱ्हाडवर निजामाची राजवट आली आणि त्याचे कारकिर्दीतच उमरावतीचा परकोट बांधून, शहराच्या संरक्षणाची व्यवस्था झाली. शतकाचे सुरवातीला त्या काळाला अनुसरून हा शहराचा लाभच होता. या शतकाचा निम्मे काळ हा निजामशाहीत आणि निम्मा काळ इंग्रजी अमदानीत गेला. त्याचे तुलनात्मक परिणामाचा विचार केला तर, इंग्रजी अमदानीने उमरावती शहराचे विकासाला व भरभराटीला हातभार लावला असे दिसून येते.

इंग्रजी अमदानीत उमरावतीला बरेच लाभ मिळालेत. उमरावतीला राजकीय महत्त्व मिळाले. संपूर्ण वऱ्हाडचे शासकीय केंद्र एकप्रकारे उमरावतीच झाले होते. रेल्वे आली, शिक्षण आले, हॉस्पिटल्स् उघडलीत, कोर्ट आले, पोलीस खाते आले. विद्वान व सुशिक्षित मंडळींच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीने मूळ धरले. जनतेची राजकीय जागृती व हालचाल सुरू झाली. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शांतता व सुरक्षितता लाभली.

व्यापार–उदीमात उमरावती कधी मागे नव्हतीच. त्याप्रमाणे या काळातही उमरावतीचा व्यापार–उदीम चांगला चालू होता. त्यातच कापसाची मुख्य पेठ म्हणून उमरावतीला याच काळात महत्त्व मिळाले. उमरावतीची लोकसंख्या या शतकाचे अखेरीस सुमारे ३४ हजार झाली म्हणजे या शंभर वर्षात उमरावतीच्या लोकसंख्येत दुपटीपेक्षा जास्त वाढ झाला. या शतकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उमरावतीला नाटक मंडळ्या येऊ लागल्या आणि येथेही नाटकाचे हौशी आणि शौकी लोक निर्माण झाले.

या पन्नास वर्षाचे अवधीत आणखी एक गोष्ट घडली. सरकारची

१ : गॅझेटीयर ऑफ इंडिया : महाराष्ट्र स्टेट : अमरावती डिस्ट्रिक्ट : १९६८ पा. ११६–११७

विविध खाती उघडल्यामुळे सुशिक्षितांना रोजगाराचे एक दालन खुले झाले. त्या मागोमाग कारखाने, फॅक्टरीज येऊ लागल्याने कामगाराला हंगामी व कायम स्वरूपाचा कामधंदा मिळाला. थोड्या प्रमाणात का होईना, पण केवळ शेतीवरच लोक अवलंबून होते. त्यातील काही लोक इतर उद्योगात आल्याने शेतीवरील माणसाचा भार थोडा हलका होऊ लागला.

इंग्रजी काळातील पन्नास वर्षात शांतता लाभल्याने लोकांना सांस्कृतिक, साहित्यिक आणि राजकीय विचार करायला फुरसत मिळाली आणि आपली सांपत्तिक स्थिती सुधारायला सवड मिळाली.

इंग्रजांनी जरी स्वतःच्या स्वार्थासाठी रेल्वे आणली तरी त्या मागोमाग ज्या गोष्टी अपरिहार्य ठरल्या त्याने देशाच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन घडून आले. दळणवळणाचे क्षेत्रात झालेल्या या क्रांतीने देशाच्या विविध भागातील बांधवाशी संपर्क साधणे सुलभ झाले. विचारांची घेवाणदेवाण सुरू झाली. देशाच्या अभ्युदयाची पार्श्वभूमी तयार झाली. १९ व्या शताब्दितील या घटनांचे पुढे दूरगामी परिणाम घडून आले.

परिशिष्ट १

(पान १७६ पहा)

उमरावती जिल्ह्याच्या व त्या नात्याने उमरावती शहराच्या, डेप्युटी कमिश्नरांची यादी[1] :–

	नाव	कार्यकाल
डी. सी. नार्थ बेरार	१) टी. एच. बुलक	१८५३ ते १३–९–१८५७
	२) कॅ. मेडोज टेलर	१४-९-१८५७ ते फेब्रु. अखेर १८५८
	टी. एच. बुलक फेब्रु. अखेर १८५८ ते दिसें. अखेर १८५८	
	३) कॅ. जे. अलरडेसी	जाने. १८५९ ते ११–२–१८६२
	४) जे. जी. बेल	१२–२–१८६२ ते १३–५–१८६२
	५) जे. टी. ब्युसबाय	१४–५–१८६२ ते नोव्हें. १८६३
	जे. अलरडेसी	नोव्हें. १८६३ ते २–२–१८६६
	६) लिट. एच्. सी. ए. झ्येपन्क्सी	३-२-१८६६ ते १-४-१८६६
	कॅ. जे. अलरडेसी	२-४-१८६६ ते दिसें. १८६६
	कॅ. जे. जी. बेल	दिसें. १८६६ ते १२–४–१८६८
	७) कॅ. जे. फीज्जेराल्ड	१३–४–१८६८ ते १२–६–१८६८
	कॅ. जे. जी. बेल	१३–६–१८६८ ते २०–४–१८७०
	८) मेजर एच्. सी. मेंझीज	२१-४-१८७० ते ११-५-१८७०
	९) कॅ. डी. डब्ल्यु. लॉग्टन्	१२-५-१८७० ते २०-७-१८७०
	कॅ. जे. जी. बेल	२१-७-१८७० ते ६-३-१८७१
	१०) लेफ्ट. एच. डी. पी. रेनीक	७-३-१८७१ ते १५-३-१८७१
	मेजर जे. टी. ब्यूसबाय्	१६-३-१८७१ ते २-१०-१८७२
	११) सी. हार्डरन्	३-१०-१८७२ ते ८-५-१८७५
	मेजर डी. डब्ल्यु. लॉग्टन	९-५-१८७५ ते ६-८-१८७५
	सी. हार्डरन्	७-८-१८७५ ते ११-१२-१८७५
	१२) कॅ. के. जे. एल्. मॅकेन्झी	१२-१२-१८७५ ते २-४-१८७६
	१३) कॅ. आर. बुलक	३-४-१८७६ ते ४-९-१८७६
	१४) ए. जे. डनलाप्	५-९-१८७६ ते १३-११-१८७६
	कॅ. आर. बुलक	१४-११-१८७६ ते ४-१-१८७७
	सी. हार्डरन्	५-१-१८७७ ते ३१-३-१८७७

१ : उमरावती जिल्हा गॅझेटियर : १९११ इ.

१५)	एच्. एस्. नेकोलेट	१-४-१८७८ ते १५-४-१८७८
	लेफ्ट. कर्नल एच्. सी. मेंझीस	१६-४-७८ ते १२-११-१८७
	मेजर डी. डब्ल्यु. लॉग्टन	१३-११-७८ ते १३-१-१८७९
	लेफ्ट. कर्नल एच्. सी. मेंझीस	१४-१-७९ ते २४-३-१८८०
	एच. एस्. नेकोलेट	२५-३-१८८० ते १८-११-८०
	मेजर आर. बुलक	१९-११-८० ते ७-७-१८८३
१६)	लेफ्ट. कर्नल एफ. डब्ल्यु. ग्रँट	८-७-१८८३ ते २९-७-१८८३
	,, आर. बुलक	३०-७-८३ ते ३०-४-१८८४
	,, एफ्. एफ्. डब्ल्यु. ग्रँट	१-५-८४ ते ३१-७-१८८४
	,, आर. बुलक	१-८-८४ ते १४-४-१८८५
	,, एच्. एस्. नेकोलेट	१५-४-८५ ते १-५-१८८५
	लेफ्ट. आर. बुलक	२-५-८५ ते १६-२-१८८६
	एच्. एम्. नेकोलेट	१७-२-८६ ते १९-६-१८८६
	लेफ्ट्. कर्नल आर. बुलक	२०-६-८६ ते १४-८-१८८८
१७)	ए. ईलियट	१५-८-८८ ते ४-१-१८८.
	ले. क. आर. बुलक	५-१-८९ ते ८-४-१८८९
	ए. इलियट	९-४-८९ ते २६-३-१८९०
१८)	कॅप्टन डब्ल्यु. हेस्टींग	२७-३-९० ते १५-९-१८९०
१९)	कर्नल इ. जे. गनथॉप	१६-९-९० ते १४-३-१८९३
	एच्. नेकोलेट	१५-३-९३ ते ५-५-१८९४
२०)	एच्. गुडविन आस्टेन	६-५-९४ ते ६-८-१८९४
	एच्. एस. नेकोलेट	७-८-९४ ते १-९-१८९५
२१)	एफ्. डब्ल्यु. ए प्रिडीयाक्स	२-९-९५ ते ३०-९-१८९५
	एच्. एस्. नेकोलेट	१-१०-९५ ते १-४-१८९६
२२)	ए. लुकास आय्. सी. एस्.	२-४-९६ ते २९-१०-१८९७
२३)	कॅप्टन आर. पी. हॉर्सब्रुक	३०-१०-९७ ते २-२-१८९८
	ए. लुकास आय. सी. एस.	३-२-९८ ते २१-४-१८९८
	कॅप्टन आर. पी. हॉर्सब्रुक	२२-४-९८ ते १३-४-१९००
२४)	मेजर आर. पी. कोलम्ब	१४-४-१९०० ते १०-७-१९००
	कॅप्टन आर. पी. हॉर्सब्रुक	११-७-१९०० ते ५-३-१९०१

२५)	मेजर आर. व्ही. गॅरेट	६–३–१९०१ ते १०–३–१९०१
२६)	कॅप्टन डी. ओ. मॉरिस	११-३-१९०१ ते १९–७–१९०१
	मेजर आर. पी. कोलम्ब	२०-७-१९०१ ते ७–५–१९०२
	लेप्ट. कर्नल आर. व्ही. गॅरेट	८–५–१९०२ ते ६–३–१९०३
२७)	आर. एस. सिम्प्सन	७–३–१९०३ ते २८–५–१९०३
	मेजर एफ्. आर. एम. सी. डिई आर. मॉन्डघुट	१९–५–१९०३ ते १–७–१९०३
	कॅप्टन डी. ओ. मॉरिस	२–७–१९०३ ते २४–७–१९०३
	एच. गॉडविन ऑस्टेन	२५–७-१९०३ ते २८–७–१९०४
	कॅप्टन डी. ओ. मॉरिस	२९–७–१९०४ ते ३०-१०-१९०४
	एच. गॉडविन ऑस्टेन	३१-१०-१९०४ ते १४–४–१९०५
२९)	मी. बी. क्ले.	१५–४–१९०५ ते ३१–८–१९०५
	मेजर आर. पी. कोलम्ब	१–९–१९०५ ते २६-११-१९०५
	एच्. गॉडविन ऑस्टेन	२७-११-१९०५ ते १४–३–१९०६
	मेजर आर. पी. हॉर्सब्रुक	१५–३–१९०६ ते ३०–३–१९०८
३०)	जे. टी. चेम्बरलेन, आय. सी. एस.	३१–३–१९०८ ते २५-११-१९०८
	लेप्ट. कर्नल एफ. आर. एम. सी. डीइ. आर. मॉडघुट	२६-११-१९०८

परिशिष्ठ क्र. २

(पान १९२ पहा)

उमरावती नगरपालिकेच्या अध्यक्ष–उपाध्यक्षांची उपलब्ध यादी. (इ. सन १८७०–७१ ते इ. स. १९१० पावेतो; तत्कालिन कायद्याप्रमाणे नगरपालिकेचा पदसिद्ध अध्यक्ष डेप्युटी कमिश्नर हाच असे. १९११ मध्ये कायद्यात झालेल्या दुरुस्तीमुळे १९११ पासून अध्यक्ष हा गैरसरकारी निवडला जाऊ लागला.)

इसवी सन	नांव	पद.	
१८६९ ते ७१	कॅ. जे. जी. बेल	अध्यक्ष	
१८७१–७२	कर्नल जे. बुशबॉय	अध्यक्ष	
	कॅप्टन ए. फूरर	उपाध्यक्ष	
१८७२ ते ७५	सी. हार्डरन	अध्यक्ष	
१८७५ ते ७६	कॅ. मॅकेन्झी	अध्यक्ष	
१८७६–७७	कॅ. आर. बुलक	अध्यक्ष	
१८७७–७८	लेफ्टनंट मेंझीस	अध्यक्ष	
१८७८–८०	कॅ. आर. बुलक	अध्यक्ष	
	ले. कर्नल मेन्झीस	उपाध्यक्ष	
	आर. डब्ल्यु. वुडहाऊस	उपाध्यक्ष	
१८८०	एच्. एस्. नेकोलेटस	अध्यक्ष	
१८८० ते ८५	कर्नल आर. बुलक	अध्यक्ष	
१८८६	एफ्. जी. स्ट्रॅनेक	अध्यक्ष	
१८८८	कॅप्टन गॅरेट	अध्यक्ष	
१८८९	इ. जे. इलीयट	अध्यक्ष	
	मोरो विश्वनाथ जोशी	उपाध्यक्ष	
१८९०	कॅ. वॉरन हेस्टींग	अध्यक्ष	
	सदाशिव नारायण	उपाध्यक्ष	
	एन्. जी. केतकर	उपाध्यक्ष	
१८९२	कर्नल इ. जी. गनथॉरपी	अध्यक्ष	
	एस्. जी. केसकर	उपाध्यक्ष	एक वर्षासाठी
	आर. बी. तळवलकर	उपाध्यक्ष	एक वर्षासाठी

१८९२	वामनराव बापट	उपाध्यक्ष	एक वर्षासाठी
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	एक वर्षासाठी
१८९३	एच्. एस्. नेकोलेट	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	१८९३ ते १८९४
	पी. एन्. जोग	उपाध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	१८९५ ते १८९६
	आर. एन. मुधोळकर	उपाध्यक्ष	
१८९६–९८	ए. लुकस	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
	आर. एन्. मुधोळकर	उपाध्यक्ष	
१८९८–१९००	कॅ. हॉर्सब्रुक	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
	सदाशिव नारायण	उपाध्यक्ष	
१९०१	कॅ. मॉरीस	अध्यक्ष	
१९०१–२	मेजर आर. पी. कोलम्ब	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
	सदाशिव नारायण	उपाध्यक्ष	
१९०२–४	कॅ. आर. व्हि. गॅरेट	अध्यक्ष	
	वाय्. जी. केसकर	उपाध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
१९०४–५	एच्. गॉडविन ऑस्टीन	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
	जे. एफ्. दायर	उपाध्यक्ष	
१९०५–६	मि. बी. क्ले	अध्यक्ष	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	
	जे. एफ् दायर	,,	
१९०६–७	कॅ. आर. पी. हॉर्सब्रुक	अध्यक्ष	
	बी. एच्. करंदीकर	उपाध्यक्ष	१ वर्ष
	जी. एस्. खापर्डे	,,	
	जी. एस्. खापर्डे	उपाध्यक्ष	१ वर्ष
	एम्. जी. दामले	,,	

१९०८	व्हि. फिट्झरोल्ड	उपाध्यक्ष	
	तुराब अली खान	उपाध्यक्ष	
१९०८	जे. टी. चेम्बरलेन, I. C. S.	अध्यक्ष	
	व्ही. फिट्झरोल्ड	उपाध्यक्ष	
	एन्. के. गोडबोले	,,	
१९०९–१०	मि. मॉउन्टघूड	अध्यक्ष	
	व्हि. फिट्झरोड	उपाध्यक्ष	१ वर्ष
	एन्. के. गोडबोले		
	रा. ब. मुधोळकर	,,	१ वर्ष
	एम्. व्ही. जोशी	,,	
१९११	मि. रुस्तुमजी फरदुमजी	अध्यक्ष	
१९११	रा. ब. आर. एन्. मुधोळकर	अध्यक्ष	
	एम्. व्ही. जोशी	उपाध्यक्ष	
	के. व्ही. ब्रम्ह	,,	
१९१२	रा. ब. आर. एन्. मुधोळकर	अध्यक्ष	
	एम्. व्ही. जोशी	उपाध्यक्ष	
	के. व्ही. ब्रम्ह.	,,	
	आर. आर. डोळे	,,	
१९१४–१५	मीर मेहेदेअलीखान	,,	
	वाय्. जी. देशपांडे	,,	
१९१५–१६	एस्. बी. तांबे	,,	
	वाय्. जी. देशपांडे	,,	
१९१६–१७	एम्. जी. दामले	अध्यक्ष	
	वाय्. जी. देशपांडे	उपाध्यक्ष	
	एस्. बी. तांबे	,,	
	बी. जी. खापर्डे	,,	
१९१९	वाय्. जी. देशपांडे	अध्यक्ष	
	डॉ. भट	उपाध्यक्ष	१ वर्ष
	म. सुफी	,,	

१९१९	आर. ए. देशपांडे	उपाध्यक्ष	१ वर्ष
	सय्यद मुजफ्फर हुसेन	,,	
	शेख महंमद	,,	
	फत्तेचंद	,,	
१९२२	एस्. व्ही. गोखले	अध्यक्ष	
	आर. एम्. खरे	उपाध्यक्ष	१ वर्ष
	समीरमल बहिरोद्दीन	,,	
	डी. आर. देशमुख	उपाध्यक्ष	१ वर्ष
	गुल महंमद	,,	
	खा. ब. तुराबअली	उपाध्यक्ष	१ वर्ष
	एच्. के. देशपांडे	,,	
१९२४	देवराव रंभाजी देशमुख	अध्यक्ष	
१९२५ ते २८	डी. आर. कलोती	अध्यक्ष	
	पी. आर. हिरुरकर	उपाध्यक्ष	
	संगाप्पा रे. मुचलंबे	,,	
१९२८ ते ३०	एस्. एस्. केतकर	अध्यक्ष	
	हिदायत अली	उपाध्यक्ष	
१९३१	मिनामल मनभरदास	अध्यक्ष	
	पी. आर. हिरुरकर	उपाध्यक्ष	
	सीताराम मारोती जाधव	,,	
११३५ ते ३८	डी. आर. कलोती	अध्यक्ष	
	डॉ. डि. बी. सोमण	उपाध्यक्ष	
	गोविंद तानबा	,,	
१९३९	छक्कीलाल गिरधारीलाल	अध्यक्ष	
	मीरा मोहियोद्दीन	उपाध्यक्ष	
	टी. एम् ठाकुर	,,	

इ. स. १९४० ते १०–४–१९४४ पर्यंत ऑफिसर–इन्.–चार्ज.

१९४४–४५	रा. सा. जी. एन्. टांक	उपाध्यक्ष (सरकारनियुक्त
१९४५–५३	वीर वामनराव जोशी	अध्यक्ष
	पु. का. देशमुख	उपाध्यक्ष ४५ ते ८४

१९४५–५३	अबूल हसन शे. गुलाब	उपाध्यक्ष ४५ ते ५३
	सुखाप्पा जगन्नाथ	,, ४९ ते ५३
१९५३ ते ५९	उमरलाल मथुरादास केडिया	अध्यक्ष
	नानासाहेब बोंडे	उपाध्यक्ष
१९५३ ते ५९	शे. अहंमद शे. पन्नू	उपाध्यक्ष
	अ. सत्तार शे. हुसेन	,,
१९५९ ते ६२	अबुलहसन शे. गुलाब	अध्यक्ष
	गोपाळ दत्तात्रय कलोती	उपाध्यक्ष
१९६२–६३	घासीराम फुलचंद गुप्ता	अध्यक्ष
	शशिकुमार रामराव देशमुख	उपाध्यक्ष
१९६३ ते ६७	उमरलाल मथुरादास केडिया	अध्यक्ष
	सिद्रामप्पा शंकरआप्पा मेंडसे	उपाध्यक्ष
१९६७ ते ७४	ओंकारराव राजाराम वाठोडकर	अध्यक्ष
	देवराज मिश्रीलाल बोथरा	उपाध्यक्ष
१७-१२-७४ पासून	हरिभाऊ दत्तात्रय कलोती	अध्यक्ष
	प्रा. बी. जी. कडू	उपाध्यक्ष (१७ °
	वसंतराव कोल्हटकर	,, ,,
	जुगलकिशोर पटेरिया	,,

परिशिष्ट क्र. ३

(पान १९६ पहा)

अमरावतीची लोकसंख्या : १८६७ ते १९७१

इ. स.	१८६७	२३४१०	वाढीचे शे. प्रमाण
,,	१८८१	२३५५०	००.५९
,,	१८९१	२८९४६	२२.४८
,,	१९०१	३४२१६	१८.२२

(पैकी, हिंदु २६७७३, मुसलमान ६२९५, जैन ७८१, ख्रिश्चन ११२, पारशी ३८, सिख ३१, इतर १८६)

इ. स.	१९११	४०६१०	वाढीचे शे. प्रमाण	२.७८
,,	१९२१	४५४६९	,,	११.९७
,,	१९३१	५७१००	,,	२५.५८
,,	१९४१	७४३०९	,,	३०.१४
,,	१९५१	१,०२,८०६	,,	३८.३५
,,	१९६१	१,३७,८७५	,,	३४.११
,,	१९७१	१,९३,८००	,,	४१.१७

(पैकी पुरुष १,०३,२१७, स्त्रिया ९०,५८३ : साक्षर आणि सुशिक्षित पु. ६८,८७७, स्त्रिया ४४,०२६ : अनुसूचित जाती जमाती पु. ३८६६, स्त्रि. ३५७०).

इ. स. १८८१ च्या शिरगणतीचें आधारावर माहिती :

१) उमरावतीची एकूण लोकसंख्या २३५५० पैकी मुसलमान पुरुष २४६४ व स्त्रिया २०६१ एकूण ४७२५ (एकूण लोकसंख्येचे प्रमाणांत २०.१ प्रमाण) (मुसलमानांमध्ये एकूण १०० मागे ९९ सुन्नी आहेत व उमरावती येथील २७१६ लोकांचे जन्मस्थान हैद्राबाद आहे.)

२) इतर जाती : वैष्णव– पुरुष ६२६, स्त्री ३९२, एकूण १०१८; जैन– पुरुष ४८८, स्त्री ३६३, एकूण ८५१; लिंगायत पुरुष ७५७, स्त्री ६६७, एकूण १४२४; सोनार– एकूण ४००.

३) दहा हजार लोकसंख्येमागे, पुरुष ५३२४, स्त्रीयां ४६७६ एकूण १०,०००. अविवाहित– पुरुष ७०१६, स्त्रियां ५६९६, विधुर ८८३, विधवा २३२४.,

---

१: हैद्राबाद अंडर सर सालारजंग : मौलवी चिरागअली : १८८० : पा. ४०७

परिशिष्ट क्र. ४

(पान २४८ पहा)

चाफेकर बंधू : पुण्याला हरिभाऊ कीर्तनकार होते. त्यांचे आडनाव चाफेकर. परंतु कीर्तनकार म्हणून ते प्रसिद्ध होते व त्याच नावाने लोक त्यांना ओळखत. कीर्तनासाठी ते उमरावतीला येत असत. हरिभाऊंना एकूण चार मुले होती. सर्वात मोठा दामोदर, दुसरा बाळकृष्ण, तिसरा वासुदेव आणि चवथा गणेश.

पैकी दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव यांनी पुण्याला आखाडा काढला होता. त्याला 'चाफेकर क्लब' म्हटल्या जाई. दामोदर हा कीर्तनही करीत असे.

इ. स. १८९६ अखेर पुण्याला प्लेगचा कहर उसळला, तेव्हा प्लेगचे रोगी शोधून रुग्णालयात नेण्यासाठी व रोग्यांची घरे जंतूनाशक द्रव्यांनी धुऊन काढण्यासाठी गोऱ्या सोजिरांची पथके सरकारने नेमली. त्याचा मुख्य वॉल्टर चार्लस रँड नावाचा एक इंग्रज अधिकारी होता. या शोध पथकांनी पुण्यातील लोकांना सळोकीपळो करून सोडले. सोल्जर देवघर, स्वयंपाकघर यांचा मुलाहिजा न ठेवता वाटेल तेथे शिरून धुमाकूळ घालत असत. त्यामुळे लोकात भयंकर प्रक्षोभ उसळला होता. तेव्हा दामोदरपंत चाफेकर व त्यांचे सहकारी यांनी सोजिरांचा प्रतिशोध घ्यायचा निश्चय केला व पांच सहकारी यासाठी निवडले. त्यात बाळकृष्ण चाफेकर, महादेव विनायक रानडे, विनायक आपटे, खंडेराव साठे ही मंडळी होती.

दि. १२ जुन १८९७ रोजी पुण्याच्या लकडी पुलाजवळील विठ्ठल मंदिरात शिवाजी उत्सवात लो. टिळक आदी पुढाऱ्यांचो व्याख्याने झाली. त्यावेळी चाफेकरांनी संस्कृत श्लोक म्हटले. त्यांत श्लेषार्थाने व्याख्यान देणा-रांना षंढ म्हणून संबोधिले होते. कार्यक्रम संपल्यावर टिळकांनी चाफेकरांना बाजूला नेऊन म्हटले की "आज भाषणे करणारांना तुम्ही षंढ म्हणालात पण श्लोक म्हणणाऱ्यांत पौरुष असते तर रँड एव्हाना जिवंत राहिला नसता." या शब्दांनी चाफेकरांच्या अंत:करणातील आंग्ल द्वेषाग्नीवर ठिणगी पडली[१].

---

१ : भारतीय स्वातंत्र्य युद्धाचे रणझंझार : सं. श. ना. दाते : १९७० पा. २५

दि. २२ जुन १८९७ ला राणीच्या हीरक महोत्सवानिमित्त गणेश-खिंडीत मुंबई गव्हर्नराचे बंगल्यावर मेजवानी होती. या मेजवानीला रँड वगैरे युरोपियन येणार होते. त्यावर पाळत ठेवून चाफेकरांनी आपल्या सहकाऱ्यासमवेत, रँड मेजवानीहून परतत असताना सायंकाळी ७–३० चे सुमारास गोळ्या घालून रँन्डला ठार केले. त्याच वेळी आयर्स्ट नावाचा एक इंग्रजही परतत होता त्याचा चुकून वध झाला.

या खुनाने फार खळबळ उडाली. सरकारी चक्रे फिरू लागली. पुढे दामोदर चाफेकर यांस पकडण्यात आले व अभियोग चालून फांशीची शिक्षा देण्यात आली. त्यांना दि. १८ एप्रील १८९८ रोजी येरवडा तुरूंगात फांसावर लटकविण्यात आले. उरलेल्या पैकी बाळकृष्ण व वासुदेव चाफेकर हे फरार होते. पण पुढे दोघांनाही पकडून फांशीची शिक्षा झाली. तिसरा सहकारी महादेव विनायक रानडे यांसही तीच शिक्षा झाली. या तिघांनाही अनुक्रमे ८ मे १८९९, १० मे व १२ मे १८९९ या तारखांना फांशी देण्यात आले होते.

या प्रमाणे हरिभाऊ कार्तनकार (चाफेकर) यांच्या चार मुलां-पैकी तिघेजण या रँन्ड व आयर्स्ट यांचे खुनाबद्दल फांसावर चढले. चवथा मुलगा गणेश व त्याचे वडील हरिभाऊ कीर्तनकार त्यानंतर, उमरावतीस येऊन राहिले होते असे वरील माहिती वरून लक्षात येईलच.

परिशिष्ट क्र. ५

(पान २२४ पहा)

वऱ्हाडांत पडलेल्या दुष्काळाची अधिक माहिती :–

१) महंमदशहा बहामनीच्या राजवटीत (इ. स. १३७८ ते ९७) दुष्काळ पडला. त्यावेळी बादशहाने ईलिचपूर येथे अनाथालय Poor House सुरू केले होते.

२) इ. स. १४१७ मध्ये दुष्काळ पडला होता.

३) इ. स. १४७२–७३ चा दुष्काळ. हा दुष्काळ दोन वर्षे होता.

४) इ. स. १६३०–३१ मधील शहाजहानचे राजवटीतील दुष्काळ. या दुष्काळात कुत्र्याचे मांस विकल्या गेले व हाडाचे चूर्ण पिठात मिसळल्या गेले. आई–वडीलांनी स्वतःच्या मुलाचे मांस खाल्ले.

५) इ. स. १८०३ चा दुष्काळ. या दुष्काळाची आठवण लोकांना पुढील ५० वर्षे राहिली.

६) इ. स. १८३३ चा दुष्काळ, फार त्रासदायक होता.

७) इ. स. १८३९ चा दुष्काळ फारच भयंकर होता. स्थानिक सरकारने दुष्काळ निवारणार्थ कांहीच केले नाही. पुष्कळ लोक परप्रांतात निघून गेले.

८) इ. स. १८४५ मध्ये ज्वारीचे भाव खंडीस रु. ५ वरून रु. २० वर गेले. त्यामुळे चिडून जाऊन लोकांनी धनराज साहूचा खून केला.

९) इ. स. १८७८–७९ या वर्षी धान्याचे भाव फक्त वाढले होते.

१०) इ. स. १८९३ मध्ये कमिश्नरांनी कळविले होते की, वऱ्हाडात दुष्काळ निवारण सहाय्याची गरज नाही.

११) इ. स. १८९६–९७ च्या दुष्काळाचे काळांत वऱ्हाडची स्थिती बरी असली तरी संपूर्ण भारतातील दुष्काळाचा या भागावर परिणाम झाला. अन्न धान्याच्या किंमती वाढल्या.

ज्वारीचे भाव

ऑक्टोबर १८९६	१ रुपयाला १९ शेर ते १२ शेर.
ऑक्टोबर १८९७	१ रुपयाला १० ते ७ शेर.

दुष्काळ निवारणाचे कामासाठी सरकारने रु. ३३००० खर्च केले. पण त्याचा उपयोग फक्त ००.९ लोकांना झाला. रस्ते बांधणे तलाव खोदणे, गिट्टी फोडणे इ. कामे काढलीत. याशिवाय पुअर हाऊस उघडण्यात आले. नियंत्रित दराची धान्य दुकाने उघडण्यात आली. उमरावती शहरात नागरिकांनी वर्गणी करून एक पुअर हाऊस चालविले. त्यावर ८००० रु. खर्च झाले.

१२) एप्रिल–मे मध्ये कॉलऱ्याने कहर केला. पावसाळ्यात हगवणीचा आजार सुरू झाला. या काळात दुष्काळाने व आजाराने बरेच लोक मरण पावले.

१३) इ. स. १८९८–९९ मध्येही पाऊस कमी पडला. या काळात धान्य मिळविण्यासाठी लहान–सहान दंगे झाले. उमरावती जिल्ह्यात ५३% जनावरे मेली. चोरीच्या गुन्ह्याची संख्या वाढली. (उमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११ : पा. २७४ ते ८२)

प्रकरण पांचवे : २० वे' शतक

अनुक्रमणिका

भारतीय असंतोषाचे जनक उमरावतीत.
कारोनेशन मंडपाची होळी.....टाईल भट,
तिखे व खापर्डे.....टिळकांना मानपत्र
उमरावतीत पुन्हा प्लेगचा कहर.....राष्ट्रीय
शाळेची सुरूवात...बाल गंधर्व उमरावतीत...
व्यायामाचार्य.....दामोदर बळवंत भिडे.....
उर्फ भटजी..... कादंबरीकार
आपटे...इतिहासाचार्य राजवाडे...उमरावतीचे
परकोट प्रकरण ..... दादा
साहेब खापर्डेचे सभासदत्व रद्द.....
उमरावतीची पहिली राजकीय अटक.....
उमरावतीच्या कलावंतीणी.....बाबू
अरविंदाचे स्वागत.....खापर्डेचे
इंग्लंडला प्रयाण.....राक्षसी महत्त्वाकांक्षा...
दे. भ. स्वामी शिवानंद.....१९१८ चा
इन्फ्ल्यूएंझा....जालीयानवाला बागेचे हत्याकांड
उमरावतीत हरताळ.....इत्यादी.
परिशिष्ट क्र. १ ते ४



चित्र क्र. ७८ : गणेश थिएटर (पृष्ठ २५९ पहा)
(नव्या स्वरुपातील हल्लीचे प्रभात टॉकीज.)



चित्र क्र. ७९ : खापर्डे वाडयात लो. टिळक व खापर्डे. (पृष्ठ २८१ पहा)

चित्र क्र. ८० : भारतीय असंतोषाचे जनक (पृष्ठ २८१ पहा)
उमरावतीत लो. टिळक व दादासाहेब खापर्डे.

प्रकरण पांचवे

२०' वे शतक : १९ वे शतक संपून विसाव्या शतकाची सुरवात झाली ती राजकीय जागृतीची पहाट घेऊनच. विसावे शतक म्हणजे, देश स्वातंत्र्याच्या आंदोलनाची सुरवात, स्वातंत्र्यप्राप्तीची आणि लोकशाही मार्गाने देशाच्या प्रगतीची वाटचाल करणारे शतक होय.

भारतीय असंतोषाचे जनक उमरावतीत : दि. ३ जानेवारी १९०२ रोजी भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे उमरावतीला शुभागमन झाले. रेल्वे स्टेशनवर त्यांच्या दर्शनासाठी अमाप गर्दी जमली होती. उमरावतीच्या विद्यार्थ्यांनी रेल्वे स्टेशनवरच त्यांचे स्वागत करून त्यांना मानपत्र दिले होते. कारण त्यांचा मुक्काम उमरावतीत फारच थोडा वेळ होणार होता[१].

श्री. दादासाहेब खापर्डे यांनी लो. टिळकांना आपल्या बग्गीतून सन्मानाने घरी आणले. लोकमान्यांना भेटण्यासाठी शेकडो लोक खापर्डेवाडयावर आले होते. त्यांना एक दिवसही थांबता आले नाही. ज्या दिवशी आले त्याच दिवशी सायंकाळी ५ च्या गाडीने ते परत गेले. श्री. दादासाहेब खापर्डे आणि इतर मंडळी त्यांना पोहचविण्याकरिता बडनेरा स्टेशन पर्यंत गेली होती[२].

याच वर्षात रॅग्लर परांजपे आणि भगिनी निवेदिता‡ यांची उमरावतीत व्याख्याने झाली होती.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र

२ : खापर्डे रेकार्ड : डायरी : ३–१–१९०२

‡ : भगिनी निवेदिता :– (जन्म १८६८ मृ. १९११) यांचे खरे नाव मिस मार्गारिट नोबल. यांचे वडील आयर्लंडमधील धर्मगुरु होते. लंडनमध्ये एका

(पुढील पानावर)

निजाम व इंग्रज यांचा १९०२ चा तह : इ. स. १९०२ च्या डिसेंबर मध्ये त्या वेळचा हिंदुस्तानचा व्हाईस रॉय लार्ड कर्झन याने जातीने हैदराबादला जाऊन वऱ्हाडचे प्रश्नाचा कायमचा निकाल लावला. निजामास वऱ्हाडचे उत्पन्न अनिश्चितपणे येत होते व मागील १८६० च्या तहाच्या शर्तीप्रमाणे त्यास हिशेब मागण्याचाही हक्क नव्हता. म्हणून एकतर वऱ्हाड परत द्यावा अगर दुसरा काही तरी समाधानकारक निकाल लावावा असे निजामाने मागणे केले. लार्ड कर्झन याने समक्ष मुलाखतीत ठरविले की, पन्नास वर्षाच्या इंग्रजी सुधारलेल्या अमलानंतर वऱ्हाडातील लोकांना परत निजामाचे राज्यात जाणे आवडणार नाही. सबब वऱ्हाडप्रांत निजामाने कायमचे कौलाने इंग्रज सरकारास द्यावा, आणि त्याचे स्वामित्वाबद्दल इंग्रज सरकारने दरसाल पंचवीस लक्ष रुपये निजामास द्यावेत. (त्यातील काही रक्कम इंग्रजांनी कर्जापोटी वजा करावी.) तसेच दरसाल १ जानेवारी रोजी वऱ्हाडची राजधानी उमरावती येथे निजामाचे निशाण उभारून त्यास तोफांची सलामी देण्यात यावी[१].

या प्रमाणे तह होऊन कायदेशीर करारनामे झालेत. वऱ्हाड इंग्रजांकडे कायम वहिवाटीला आला.

या करारात दरसाल १ जानेवारीला उमरावती येथे निजामाचे निशाण उभारून त्यास तोफांची सलामी देण्याची" जी अट ठरली त्याचे मुख्य कारण म्हणजे उमरावतीला संपूर्ण वऱ्हाडाचें ज्युडिशिअल कोर्ट होते आणि एक

(मागील पानावरून)
शाळेच्या मुख्याध्यापिका असतानाच यांची स्वामी विवेकानंदाशी सन १८९५ मध्ये भेट झाली. स्वामीजींच्या विचारांचा त्यांच्यावर इतका परिणाम झाला की, त्या शेवटी १८९८ मध्ये भारतात आल्या. त्यांनी स्वामिजीबरोबर भारताचा दौरा केला. नंतर त्यांना औपचारिक रीत्या रामकृष्ण परमहंसाच्या शिष्यात समाविष्ट करण्यात आले. त्यांनी कलकत्त्याच्या कर्मठ हिंदू मोहल्ल्यात राहायला सुरुवात केली. 'आपला देश, आपले बंधू' अशी हिंदुस्थान संबंधी बोलायची त्यांची पध्दत असे कोठेही दुष्काळ, रोगराईच्या साथी येताच त्या तेथे धाऊन जात असत. भारताविषयी १९०४ साली त्यांनी "The Webs of Indian Life" हे, भारतावरील सर्वश्रेष्ठ पुस्तक लिहिले. इतर त्यांचे ग्रंथही प्रसिध्द आहेत. भारतीय संस्कृतीची पाश्चात्य देशाला ओळख करून देणाऱ्या ज्या व्यक्ती आहेत त्यांत भगिनी निवेदिता यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे.

१ : वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे. पा. २४२–२४३

प्रकारे त्यामुळे उमरावतीला वऱ्हाडचे प्रशासकीय केंद्राचा (राजधानीचा) दर्जा आला होता.

हा करार होण्याचे थोडे अगोदर "वऱ्हाडाचे लोक निजामाचे राज्यात परत जाण्यास तयार आहेत काय?" अशी विचारणा सरकारी अधिकाऱ्यामार्फत वऱ्हाडातील अनेक गावी, अनेक लोकांना केली गेली होती, परंतु इंग्रजी सुधारणेची व विशेषत: शांततेची फळे चाखल्यानंतर निजामाच्या त्या वेळच्या विशेष मागासलेल्या राज्यात जाण्याची इच्छा कोणीही दाखविली नाही. कारण पूर्वी निजाम सरकारच्या कारकिर्दीचा वऱ्हाडचे जनतेस चांगलाच अनुभव आला होता. शिवाय निजामाचे मोंगलाई राज्यातील बंदोबस्त व कारभार कसा सुरू आहे हे वऱ्हाडी लोकांना दिसतच होते.

याप्रमाणे वऱ्हाड निजामाचे तावडीतून सुटला तरी थोड्याच दिवसात, वऱ्हाड हा राज्यकारभाराचे दृष्टीने मध्यप्रांताला जोडण्याची सरकारी हालचाल सुरू झाली. एकूण वऱ्हाडची रयत एखाद्या वस्तूप्रमाणे खरेदी-विक्रीची गोष्ट बनली होती. यात वऱ्हाडचे अतिशय नुकसान झाले. वऱ्हाडच्या उत्पन्नातून कोटयावधी रुपये निजामाला फुकट द्यावे लागले. त्यामुळे वऱ्हाडच्या विकासावर खर्च होऊ शकला नाही. वऱ्हाडच्या विकासाला वरील गोष्टीमुळे खीळ बसली'.

वऱ्हाडचे उत्पन्नातून निजामास दिलेल्या रकमा : इ. स. १८५३ साली इंग्रजांकडे वऱ्हाड वहिवाटीला आला व वऱ्हाडचे उत्पन्नातून कारभारावर होणारा खर्च करून आणि इंग्रजांचे कर्जापोटी काही रक्कम कापून ठरेल ती रक्कम निजामास द्यावी असे ठरले होते. परंतु १८६६-६७ पर्यंत अशी ठरलेली रक्कम निजामास देता आली नाही, पण पुढे दरवर्षी जी रक्कम वऱ्हाडचे उत्पन्नातून निजामाला दिली ती येणेप्रमाणे+ :

---

१ : वऱ्हाडचे उत्पन्न : इ. स. १८५३ मध्ये इंग्रजांकडे वऱ्हाड वहिवाटीला आला तेव्हा वऱ्हाडचे एकूण उत्पन्न चाळीस लक्ष रुपये होते. इ. स. १८७० मध्ये ते उत्पन्न सत्तर लाख झाले. इ. १८८० मध्ये ८८ लाख, १८९० मध्ये एक कोटीच्यावर गेले आणि १९०३ मध्ये सव्वाकोटीचे वर झाले आणि १९२० चे सुमारास ते दोन कोटी रुपयावर पोहोचले.

+ वऱ्हाडचा इतिहास : या. मा. काळे : पा २४६ व २५०-५१

सन	रक्कम (पौंडात)	सन	रक्कम (पौंडात
१८६६–६७	५०, ०००	१८८५–८६	१, ८२, ०५०
६८–६९	१,००,०००	८६–८७	१, ८२, ३३२
७०–७१	९९,४८८	८७–८८	१, ९७, ३३८
७२–७३	१,००,०००	८८–८९	१, ७३, ६५०
७४–७५	१,६५,४४०	८९–९०	१, ४२, ४९४
७५–७६	१,६३,८९९	९०–९१	१, ४६, ४७३
७६–७७	१,३५,०००	९१–९२	१, ३०, ६९७
७७–७८	१,४७,५००	९२–९३	८३, १०४
७८–७९	१,२७,५००	९३–९४	६५, ०००
७९–८०	१५,०००	९४–९५	१, १६, २०५
८०–८१	१,६२,२५९	९५–९६	२९, १७३
८१–८२	१,२९,११५	९६–९७	७२, ४८१
८२–८३	१,६८,८८४	९८–९९	४७, २२९
८३–८४	१,१९,३१९	९९–१९००	१, ८५, ००८
८४–८५	१,३८-२८८		

या नंतर दरसाल २५ लक्ष रूपये निजामाला पुढे सुमारे पन्नास वर्ष मिळत होते.

या तहाने वऱ्हाड कायम वहिवाटीसाठी इंग्रजांकडे राहिला. त्यामुळे वऱ्हाडचा आणि अर्थात उमरावतीचाही बराच फायदा झाला. निरनिराळ्या सुधारणांची, विचारांची व राजकीय जागृतीची हवा वऱ्हाडात खेळू लागली.

दिल्लीतील लार्ड कर्झन साहेबांचा दरबार व उमरावतीत कॉरोनेशन मंडपाची होळी.

दिनांक १ जानेवारी १९०३ रोजी दिल्लीला व्हॉईसरॉय लार्ड कर्झन[१] यांचा दरबार सातव्या एडवर्डचे राज्यारोहण समारंभानिमित्त भरला.

---

१ **लार्ड कर्झन** : (जन्म १८५९ : मृ. १९२५) कारकीर्द १८९९ ते १९०५, हिंदुस्थानचे प्रसिद्ध व्हॉईसरॉय व राजकारणतज्ज्ञ, सन १९०१ मध्ये व्हिक्टोरिया राणी वयाच्या ८२ व्या वर्षी मृत्यू पावली व सातवे एडवर्ड गादीवर आले. त्यानिमित्त लॉर्ड कर्झन यांनी १ जानेवारी १९०३ रोजी दिल्लीस

(पुढील पानावर)

या दरबारासाठी सर्व देशातून प्रमुख लोकांना निमंत्रित केले होते. उमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे यांनाही निमंत्रण असल्याने तेही या दरबारासाठी दि. २५ दिसेंबर १९०२ रोजी दिल्लीस गेले होते.

(मागील पानावरून)

मोठा दरबार भरविला होता. या काळातच ब्रिटिशांनी तिबेटवर स्वारी करून तिबेटी लोकांचा पराभव केला होता. इ. सन १९०० साली हिंदुस्थानात मोठा दुष्काळ पडला होता. दहा लाख लोक मेले व १९०४–५ मध्ये भारतात प्लेगचा कहर होऊन नऊ लक्ष लोक मेलेत. तेव्हा दुष्काळ व प्लेगसंबंधी यांनी कमिशन नेमून चौकशी केली. "दुष्काळाचे कारण जबर शेतसारा होय, असे मत रमेशचंद्र दत्त यांनी दिले. तेव्हा, १ कालव्याची वाढ, २ शेतकऱ्यांसाठी पतपेढ्या, ३ शेतकी कॉलेजे, ४ लांब मुदतीने सारा वाढवावा, वाढ हप्त्याने करावी व दरसाल आणेवारी करून सारा बसवावा असे ठरविले व ५ व्यापारी खाते निर्माण करून त्यावर स्वतंत्र अधिकारी नेमला... याशिवाय यांनी मिठावरील कर कमी केला, सोने हे कायदेशीर चलन ठरविले, पुराण वस्तूंच्या संरक्षणाचा कायदा पास केला. जुन्या ऐतिहासिक इमारतीचे डागडुजीसाठी व जमिनीत पुरल्या गेल्या होत्या त्या उकरून काढण्यासाठी, "पुराण वस्तु संशोधन खाते" स्थापन केले. शिक्षणासंबंधीचे यांचे धोरण लोकांना पसंत पडले नाही.

बंगालची फाळणी : लार्ड कर्झन यांनी, बंगाल प्रांत फार मोठा आहे म्हणून त्याची फाळणी करून दोन भाग पाडले. आणि त्यावर स्वतंत्र लेफ्टनन्ट गव्हर्नरची नेमणूक करण्यात आली. या फाळणीमुळे बंगाली लोक फार चिडले. त्यातूनच बंगभंगाची देशव्यापी चळवळ जनतेत उभी झाली. खून अत्याचारांना बंगालमध्ये ऊत आला. शेवटी १९११ साली दिल्ली दरबारात बादशहा पंचम जार्ज यांनी ही फाळणी रद्द केल्याचे जाहीर केले. तेव्हा लोकक्षोभ संपला.

... ...

"हिंदुस्थानातील प्रागतिकांच्या सनदशीर राजकारणाचा पायाच उखडून टाकण्याचे काम लार्ड कर्झनने केले. राणीचा जाहिरनामा म्हणजे राजा व प्रजा यामध्ये झालेला कायदेशीर करार नव्हे, हे स्पष्टपणे तो सांगत असे. तद्वतच "हिंदी लोक कितीही शिकले तरी इंग्लिश नोकर–

(पुढील पानावर)

ज्यावेळी दिल्लीचा दरबार भरणार, त्याच वेळी जिल्ह्याच्या ठिकाणीही छोटया साहेबांचा दरबार भरवून, रयतेच्या मनावर ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाची छाप पाडण्याचा उपक्रम करण्यात आला होता. उमरावती हे एक प्रकारे वऱ्हाडच्या राजधानीचे शहर असल्याने येथेही असा दरबार भरविण्यात इंग्रजांना औचित्य वाटत होते. त्याप्रमाणे नेकोलेट पार्कवर (हल्लीचे नेहरु मैदान) मोठा सुशोभित कोरोनेशन मंडप त्यासाठी टाकण्याचे ठरले. या मंडपात कमिश्नरांचा दरबार भरणार होता. तिकडे दिल्लीचा दरबार चालला असतानाच इकडे हा उमरावतीला दरबार चालावा अशी ही योजना होती.

उमरावतीच्या या दरबारासाठी फार मोठा व सुशोभित मंडप उभारण्याचे काम चालु झाले. गावातील दुकानदाराकडून काचेच्या हंडया, झुंबरे, बहुमोल गालिचे, किंमती सतरंज्या व इतर मुल्यवान सामान आणून मंडपाला भव्यता व शोभा आणली होती. नक्षीदार सामान, खुर्च्या, टेबले यांची गणतीच नव्हती. याप्रमाणे मौल्यवान सामानाने मंडप गच्च भरला होता. मंडपात एक मोठा मंच उभारून त्यावर शोभीवंत सिंहासन केले होते. खुद: राजे साहेबांची तसबीर तेथे ठेवायची होती.

कृष्णाजी अनंत उर्फ आप्पासाहेब तहसिलदार हे या मंडपाची सर्व व्यवस्था पाहत होते. तहसिलदारसाहेबांनी सरकारी अधिकाराचे जोरावर सर्व सामान दुकानदारांकडून व इतरांकडून गोळा केले होते. तहसिलदारसाहेबांना दरबारानंतर रावसाहेबी मिळण्याची आशा होती, आणि त्यासाठी हे कष्ट होते. मंडपाचे काम चालू असताना तहसिलदारसाहेब रात्रंदिवस तेथेच मुक्काम ठोकून होते. मंडप सुशोभित करण्यासाठी ५०-६० माणसे सतत खपत होती.

(मागील पानावरून)
शाहीच्या अंगी जी कार्यक्षमता आहे ती हिंदी सुशिक्षितांचे अंगी कधीच येणार नाही, म्हणून देशातील सर्व वरिष्ठ अधिकार इंग्रजांच्या हातातच ठेवले पाहिजेत." असे त्यांचे मत होते. टिळकांच्या केसरीने यांची औरंगजेबाशी तुलना केली होती." (अर्वाचीन चरित्रकोश : चित्राव : प. १०१-२)

ह्या मंडपावर होणारा खर्च, त्याची शान इत्यादी पाहून त्यावेळी श्री. दादासाहेब खापर्डे यांचे तरुण चिरंजीव श्री. बाबासाहेब यांनी त्यांचे सहाध्यायी श्री. गोपाळराव डोरले यांचेजवळ सहजच असे उद्‌गार काढले की, "...आणि अशा वेळी ह्या मंडपाला आग लागली तर काय होईल?" आणि या उद्‌गाराने ठिणगी पडली.

गोपाळराव डोरले हा तरुण होता. नुकताच बनारसच्या सेंट्रल हिंदू कॉलेजमधून आलेला होता आणि त्याने या मंडपाच्या काही भागाच्या कामाचा लहानसा ठेका घेतलेला होता. याचा फायदा घेऊन, मंडप जाळण्याची योजना त्यानेच मनाशी ठरवून त्या प्रमाणे केले. मंडप तट्ट्याचा व आतून कापडानें आच्छादिलेला होता. मंडपाचे आंत गालिचे, सतरंज्या, हंड्या, झुंबरे व इतर मूल्यवान वस्तूंचे दीग लागले होते. राजेसाहेबांची मोठी तसबीरही होती. दरबाराला अजून दोन दिवस अवकाश होता, म्हणून सामान मंडपात रचून ठेवलें होते. इतर सामानासोबतच, आतषबाजीसाठी पुष्कळशी चक्रे, भुईनळे व चद्र-ज्योतीची दारुही आणली होती. हे सर्व सामान बाहेर ठेवणे धोक्याचे असल्याने तेही आत ठेवले होते. हे आतषबाजीचे सामान आत ठेवण्याचे काम गोपाळराव ने स्वत:कडे घेतले व माणसाकरवी मंडपातील भिंतीशी (कनातीशी) ठेवले; काही मंडपामध्ये ठेवले. दिव्यासाठी असेलिटनच्या खडयांचे डबे आणले होते. ते इतस्तत: पेरून ठेवण्यात आलेत. हे सर्व झाल्यावर, गोपाळरावच्या हाताखाली काम करणाऱ्या वडगावच्या एका मजूराला गोपाळरावने गुप्तपणे पैसे वगैरे देऊन काय कामगिरी करायची ते सांगून त्याला राजीही करून ठेवले.

संध्याकाळी अंधार पडल्यावर, लग्नविला बसण्याचे निमित्ताने तो मजूर ठरल्या जागेवर गेला व भिंतीकडे तोंड करून बसला आणि कोणाचे लक्ष नाही, हे पाहून त्याने कनातीला लावून ठेवलेल्या आतील चक्राला बत्तीने (सुरुंगाच्या दारूच्या वातीने) आग लावली. चक्रे फिरू लागली आणि सर्व बाजूंनी मंडपाच्या भिंती एकदम पेटल्या. भुईनळे पेटले व त्याच्या वर उसळण्या मुळे मंडपाचे छतही पेटले. सर्व मंडप एका क्षणात चोहोकडून पेटला. त्या मुळे हंड्या, झुंबरे वगैरे काचेचे सामान तडातड फुटू लागले. याच वेळी गोपाळराव दुरून धावत येत होता व तोंडाने 'पाणी आणा, पाणी आणा' असे ओरडत होता. सर्व काम बेमालम ठरल्याप्रमाणे झाले होते. मंडप विझविण्यासाठी घमेले,

पपांनी पाणी फेकणे चालू झाले. त्यामुळे असेलिटनचा भयंकर धूर झाला व दुर्गंधी इतकी सुटली की मंडपाजवळ जाणे कठीण झाले.

असेलिटनने पेट घेतला व सतरंज्या, गालिचे, फर्निचर, हंडया, झुंबरे व मूल्यवान सामान मंडपासह स्वाहा झाले. राज्यारोहण मंडपाची अशा रीतीने होळी झाली.

आप्पासाहेब तहसिलदारांच्या पदवी व बढती मिळण्याच्या सर्व आशा अपेक्षा धुळीला मिळाल्या. त्यांचे मनःस्वास्थ्य आणि आयुष्यातील श्रमांचे सार्थक हे सर्व काही मंडपात जळाले. कारण ते स्वास्थ्य–सार्थक या मंडपात होते. आप्पासाहेब मंडपाबाहेर असल्याने देहाला चटका न बसता बचावले.

मंडप पेटला तेव्हा आप्पासाहेबांना भयंकर धक्का बसला. त्यांचे स्वतःचे घर पेटले असते तरी त्यांना एवढा धक्का बसला नसता. त्यांच्या राजनिष्ठेचे प्रतीक मंडपाच्या रूपाने जळाले. मंडपात त्यांचा प्राण–म्हणजे राजेसाहेबांची तसबीर होती. ती वाचविण्यासाठी आपल्या स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता व लोक नको नको म्हणत असताही ते वाढत्या आगीत शिरले आणि आगीच्या ज्वालात व धुराच्या लोटात क्षणभर अदृश्य होऊन राजेसाहेबांचे चित्र उराशी धरून प्रकट झाले. तोपर्यंत त्यांची सर्व शक्ती संपली होती. पाय लटपटत होते. झोक जात होता आणि जीव घाबरला होता. तीन चार माणसांनी त्यांना ओढून बाहेर काढले व बाजेवर निजवले. त्याही स्थितीत ते म्हणाले की, "मी राजेसाहेबांची तसबीर बाहेर काढली हे कोणी तरी डे. कमिश्नरांना कळवा." आप्पासाहेबांच्या हितचिंतकांनी त्यांची इच्छा पूर्ण केली. पण त्याचा उपयोग झाला नाही व त्यांना पेन्शन घेणे भाग पडले. मंडपाचे संरक्षण योग्य प्रकारे केले नाही असा आप्पासाहेबावर ठपका ठेवण्यात आला.

ज्यांचे सामान या मंडपाचे सजावटीसाठी मागून आणले होते त्यांनी, आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर, अधिकाऱ्याकडे तगादा लावला. पण त्यांनी कानावर हात ठेवले. शेवटी दादासाहेब खापर्डे यांनी मध्यस्थी करून हे प्रकरण कसेबसे मिटविले[१].

---

१ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र पा. १७५

(पुढील पानावर)

"कोरोनेशन मंडपाची वरप्रमाणे होळी झाली, तरीही इंग्रजांनी कार्यक्रम पार पाडलाच. ठरलेल्या दिवशी सातव्या एडवर्ड बादशहाच्या फोटोची मिरवणूक हत्तीवरून काढण्यात आली व ती शहराच्या प्रमुख मार्गावरून नेण्यात आली. नंतर १०१ तोफा डागून सलामी देण्यात आली. इतर कार्यक्रम नगरपालिकेच्या आवारामध्ये करण्यात आला.

तहसिलदार श्री. आप्पासाहेब यांना या प्रकरणी डे. कमिश्नर बुलक यांनी नंतर सस्पेंड केले होते[१]."

जोग चौक : इ. सन १९०१ चे मे मध्ये प्रल्हादपंत जोग वकील वारले. त्यांनी स्वत:च्या काही इस्टेटीचा ट्रस्ट केला होता. त्याचे मुख्य ट्रस्टी दादासाहेब खापर्डे हे होते. या ट्रस्टच्या पैशातूनच जोग धर्मार्थ दवाखाना बांधण्यात आला व जोगांचे स्मरणार्थ या चौकाला 'जोग चौक' हे नाव देण्यात आले. या चौकातील खुल्या जागेत मोठाल्या सभा भरत असत. आता हा चौक राहिलेला नसून- त्याचे भाग, अनुक्रमे जोशी हॉल, न्यु हायस्कूल, महिला महाविद्यालय, जोग दवाखाना व महाराष्ट्र व्यायाम शाळा यांचेकडे आहेत.

उमरावती नगरपालिकेने ठराव क्र. २४ : दि. २५-४-१९०२ प्रमाणे जोग धर्मार्थ दवाखान्यासाठी जागा दिली व 'जोग चौक' हे नाव दिले होते.

(मागील पानावरून)

टीप : श्री दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या डायरीत दि. २७ जानेवारी १९०३ रोजी खालील मजकूर लिहून ठेवला आहे.

"अमरावती येथील दरबार पेंडॉल जाळला. माझ्याशी कमिश्नरने चर्चा केली. कर्नल करेटचे म्हणणे असे की, ही घटना आकस्मिक होती. मोबदला देणे अशक्य होते.

नोट : ही घटना अकस्मात नव्हती. गोपाळराव डोरले यांनी हा कार्यक्रम घडवून आणला. वलगावच्या एका महाराला पैसे देऊन एका विशिष्ट जागी आग लावावयास सांगितले. त्यामुळे मंडपातील दारु कामाला व साहित्याला आग लागून मंडपाने भयंकर पेट घेतला, म्हणून आगीचा विस्तार झाला. आग इतकी भयंकर होती की, विझविणे अशक्य होते".

१ : कै. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.

अशा रीतीने हा जोग चौक जन्माला आला. उमरावती शहराचे जीवनात ह्या जोग चौकाचे महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. गेल्या सुमारे ७५ वर्षातील सभा सम्मेलने–खळबळजनक व्याख्याने या जोग चौकाने पाहिली आहेत–ऐकली आहेत. आता मात्र हा जोगचौक जाहीर सभांना मुकणार असे दिसते.

'टाईल भट' तिखे आणि दादासाहेब खापर्डे : क्रांतीच्या विचारांनी भारलेल्या मन:स्थितीत १९०१ च्या कलकत्ता अधिवेशनाला लो. टिळक व वासुकाका जोशी कलकत्त्यास गेले असता, तेथे त्यांना एका बंगाली मुलींच्या शाळेला भेट देण्याचा योग आला. या शाळेची व्यवस्था माताजी नावाच्या एक बाई पाहत असत.

या दोघांशी माताजी मराठीत बोलू लागल्या, तेव्हा टिळक व वासुकाका आश्चर्यचकित झाले. अधिक आश्चर्य हे की लोकमान्यांच्या अंगीकृत कार्याच्या दृष्टीनेच माताजीने नेपाळचे बोलणे काढले आणि नेपाळ नरेशांची ओळख करून देण्याची तयारी दाखवून महाराष्ट्रातून कोणीतरी नेपाळला जावे असे सुचविले. नेपाळात शस्त्राचा कारखाना काढण्याची मूळ कल्पना होती.

माताजी मूळ तंजावरच्या. वैधव्यदशेत त्या पशुपतीश्वराच्या यात्रेला गेल्या असता, नेपाळनरेश वीर समशेरजंग बहादुर यांनी त्यांना आपल्या जवळ ठेवून घेतले. पुढे या नरेशाचा खून झाल्यामुळे त्या, जवळचे जडजवाहिर घेऊन, कलकत्त्यास आल्या व तेथे त्यांनी मुलींची शाळा काढली. नेपाळचे कर्नल इंजि. कुमार नृसिंह यांची व माताजींची चांगलीच ओळख होती. या ओळखीच्या जोरावर हिंदुस्थानच्या हिताचे काहीतरी काम नेपाळात व्हावे, असे माताजींना सदैव वाटत असे. याचवेळी नेपाळला जाण्यासाठी लो. टिळक व वासुकाका यांनी प्रयत्न केला, पण सरहद्द ओलांडून नेपाळात जाण्याचा परवाना जवळ नसल्याने त्यांना परतावे लागले. वासुकाका जोशी यांनी परत आल्यावर काकासाहेब खाडिलकर यांना आपली हकीकत सांगितली व त्यांच्या सूचनेवरून या क्रांतीकारी कार्यात भाग घेण्याचे काकासाहेबांनी ठरविले.

या काळात नेपाळचे सेनापती चंद्र समशेरजंग बहादूर होते. महाराज केवळ नामधारीच असल्यामुळे पत्रव्यवहारात सेनापतींचीच गाठ घेण्याची व्यवस्था करावी लागली. वासुकाका व खाडिलकर या वेळी कलकत्त्याला गेले. कालांतराने त्यांची सेनापतीशी भेट झाली.

या मुलाखतीत सेनापतींनी विचारले "अहो तुम्हाला कौले तयार करता येतील का?" वासुकाका जोशींनी बेधडक होकार दिला. नेपाळ नरेशांच्या राजवाड्यावर घालण्यासाठी मंगलोरी कौले पाहिजे होती. ती तयार करण्याच्या निमित्ताने उभयता काकांनी (वासुकाका व काकासाहेब खाडिलकर) नेपाळात जावे असे ठरले.

पण पुढे वासुकाकांच्या सूचनेप्रमाणे श्री. काकासाहेब खाडिलकर एकटेच नेपाळास गेले. त्यांच्या बरोबर सेवेसाठी म्हणून लो. टिळक यांच्या सूचनेवरून श्री. दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या आश्रितापैकी रंगनाथ तिखे (उमरावती) या तरुणाला पाठविला होता.

नेपाळला जाण्यापूर्वी रायफली तयार करण्याच्या यंत्राची माहिती घेऊन पुढील व्यवस्था करावयाची होती. यंत्राचे नकाशे त्यावेळी ग्वाल्हेरला असलेले मेकॅनिकल इंजिनीअर श्री. केतकर यांचेकडे होते. उमरावतीहून दादा साहेब खापर्डे यांचेकडून २५० रुपये मागवून ते श्री. केतकर यांना देऊन यंत्राचे नकाशे काकासाहेबांनी हस्तगत केले. आणि यंत्रासाठी लागणारी रक्कम छत्रे सर्कस बरोबर राहून त्यांनी उभी केली. सर्कसबरोबर असतानाच काकासाहेब घोड्यावर बसायला शिकले, बंदूक चालविण्याचे शिक्षण सांगलीस शिनप्पा कोतवाल व गाडगीळ वकील यांचेकडून घेतले. नेपाळात कौलाचा कारखाना काढायचा असल्यामुळे, जबलपुरास राहून ती विद्या ही हस्तगत केली. टाईल्स साठी लागणाऱ्या मातीचा नमुना ते जवळ बाळगीत. शिवाय माताजीकडे राहून नेपाळची भरपूर माहितीही काकासाहेबांनी मिळविली.

नेपाळला जाताना माताजींनी कर्नल इंजिनीअर कुमार नरसिंग राणा यांना ओळखपत्र दिले होते. "कौलाचे कारखानदार उर्फ 'टाईल भट' म्हणून त्यांना नेपाळातले लोक ओळखत.

नंतर बऱ्याच घडामोडी झाल्या, परंतु शेवटी इंग्रज सरकारला या प्रकारणाचा (कोल्हापुरच्या दामू जोशी खटल्यातून) कोल्हापूर दरबारने सुगावा दिल्यामुळे पुढील योजना थंडावल्या[1]. या प्रकारणात उमरावतीच्या दादासाहेब खापर्डेंनी काकासाहेब खाडिलकरांना बरींच मदत केली व दादासाहेबांकडील रंगनाथ तिखे हा तरुण बराच काळ नेपाळात होता.

---

१ : पुरुषार्थ : १९५७: वीर कथा अंक : पा. ४३०–३१

'(रंगनाथ तिखे) तेथून परत आल्यावर पोलिसांची त्याचेवर पाळत होती. नंतर तो एकदम अदृश्य झाला. त्याची दोन वर्षे खबर नव्हती. मध्ये एकदा आला आणि नंतर गेला तो पुन्हा कधी दिसलाच नाही[१]'

दादासाहेबांकडील या रंगनाथ तिखे नावाचे तरुणाने नेपाळात श्री. काकासाहेब खाडिलकर उर्फ टाईल भट यांचे बरोबर राहून त्यांचे अंगीकृत कार्यात मदत केली होती. उमरावतीच्या तरुणाला हा मान मिळाला होता. पुढे तिखे बेपत्ता झाला. त्याने जर नेपाळातील आपली वास्तव्यातील हकीकत लिहून ठेवली असती तर, देशाच्या स्वातंत्र्यासाठी लो. टिळकांच्या साहाय्याने नेपाळात शस्त्रे तयार करण्याची जी योजना कार्यान्वित होऊ लागली होती, त्याची साहसपूर्ण, रहस्यमय अशी माहिती देशवासीयांना मिळू शकली असती. परंतु रंगनाथ तिखे हा पुढे बेपत्ता झाला आणि या प्रकरणाचे गूढ तसेच आजपर्यंत कायम आहे. या संबंधी कै. कविभूषण अण्णासाहेब यांची आठवण " नेपाळ प्रकरणाचे गूढ " या मथळ्या खाली मुंबईच्या 'नवाकाळ' मध्ये, दि. ३१ मे १९४९ चे अंकात प्रसिद्ध झाली आहे, त्यानुसार " रंगनाथ हा साधूंचे वेषाने बऱ्याच वर्षांनी खापर्डे यांचेकडे आला होता. तिखे हा खामगाव कडील राहणारा होता."

या प्रमाणे देशाच्या स्वातंत्र्याचे कार्यात उमरावतीचा वाटा मोठा आहे हे दिसून येईल.

लोकमान्य टिळकांना मानपत्र : दि. १९ जुन १९०३ रोजी लोकमान्य टिळक, त्यांचेवरील एका खटल्याचे संदर्भात, उमरावतीस आले होते. त्यांचा मुक्काम दादासाहेब जोग वकील यांचेकडे होता. त्या खटल्यातील साक्षीचे काम आठ दिवस चालू होते. ता. २८ ला लो. टिळकांना गणेश थिएटरमध्ये विद्यार्थ्यातर्फे मानपत्र देण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

उमरावतीत प्लेगचा कहर : इ. सन १९०३ च्या एप्रील महिन्या-पासून सप्टेंबर – ऑक्टोबरपर्यंत उमरावतीत प्लेगचा कहर झाला. शेकडो माणसे या काळात मृत्युमुखी पडलीत. गाव जवळ जवळ निर्मनुष्य झाले

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र पा. : १६८–६९

चित्र क्र. ८२ : प्लेगचे काळातील क्वॉरंटाईन कॅम्पचे दृश्य. (पृष्ठ २९९ पहा)



चित्र क्र. ८३ : संत श्री गुलाबराव महाराज. (पृष्ठ २९६ पहा)

होते. लोकांनी शेतात, रानात झोपड्या बांधल्या व ते तेथे राहू लागले. काही लोक परगावी गेलेत. यावेळी क्वॉरंटाईनवरून आणि प्लेगची लस टोचण्याचे सरकारी उपायावरून बराच जनक्षोभ माजला होता व व्यापाऱ्यांनी त्यासाठी हरताळ देखील पाळला. अशा तंग परिस्थिती शहरात निर्माण झाली होती. डिसेंबरमध्ये प्लेगची लागण कमी झाल्याने लोक पुन्हा शहरात येऊन राहू लागले. या काळात प्लेगने मनुष्य हानी फार झाली.

"या प्लेगचे वेळी सरकारने नेकोलेट पार्कवर क्वॉरंटाईन उघडले होते. संशयीतांना सक्तीने तेथे नेऊन ठेवीत. त्यामुळे लोकांत फार असंतोष पसरला होता. प्लेगने दररोज सुमारे शंभर लोक मरत. त्याकाळी प्लेगवर औषध नव्हते. प्रो. गज्जर यांचे औषध प्रसिद्ध होते. प्लेग सोल्यूशन, आइंटमेन्ट व जर्मीसाइड ही औषधे नगरपालिकेने फुकट वाटली होती. सर्व गाव रिकामे झाले होते व शाळा तीन महिने बंद होत्या. या काळात मेहतरांना पिसवांचा त्रास होऊ नये म्हणून गम् बूट देण्यात आले होते. या प्लेगचे काळात नगरपालिकेतर्फे 'बिल्ली पालो चूहे मारो, अपनी जान बचाव' अशी गाणी म्हणत फिरणारी मुले प्रचारार्थ नेमली होती.

त्यानंतर पुन्हा १९०७ व १९१० साली प्लेग आला. त्यावेळी या रोगावर औषध मिळाले होते. प्लेगने संपूर्ण देशात साठ लक्ष लोक मरण पावले. दहनक्रिया संयुक्त रीतीने करीत असत, कारण एकाच वेळी १० किंवा २० प्रेते स्मशानभूमीवर पोहोचत असत आणि त्यांची दहनक्रिया आटोपते न आटोपते तोच पुन्हा १०–२० प्रेते येत. त्यामुळे संयुक्त दहना-शिवाय उपायच नव्हता[१]. इ. सन १९२५ मध्ये शेवटचा प्लेग झाला होता. तेव्हापासून भारतात अजून तरी हा रोग मोठ्या साथीचे स्वरूपात आलेला नाही."

हैद्राबाद ते उमरावती : बैलगाडीने एक लाख रुपये आणले : उमरावतीला श्री. पांडूरंग गोविंद आळशी वकिली करीत असत. त्यांचे संबंधी रा. ब. खरे यांनी एक मजेदार आठवण सांगितली. ती अशी:–

"श्री. पांडूरंग गोविंद आळशी यांनी एकूण ५२ वर्षे वकिली

---

१ : कै. टिकेकर मास्तर याच्या आठवणी.

केली. इ. सन १९१३ मध्ये त्यांचे सन्मानार्थ ज्युबिली साजरी करण्यात आली. त्यांनी अंदाजे तेरा लाखापेक्षा जास्त रुपये या कालावधीत कमावले होते. हैद्राबादच्या एका नबाबाकडून त्यांना दीड लक्ष रुपये एका केसमध्ये मिळाले होते. पन्नास हजार रुपये आगाऊ घेतलें होते व बाकीचे एक लक्ष त्यांनी केस जिंकल्यानंतर हैद्राबादहून आणले. ही केस कलकत्त्याच्या सुप्रीम कोर्टात जिंकली होती. एक लक्ष रुपये त्यांनी हैद्राबादहून बैलगाडीत आणले ते सर्व इंग्रजी कलदार रुपये होते. निजाम सरकारने सोबत रक्षणाकरता पोलिस दिले होते[१]." ही घटना सुमारे १९०२ सालची असावी.

सन १९०३ ची अल्पायुषी भाषिक चळवळ : इंग्रजांचे ताब्यात असलेला निजामाचा वऱ्हाडप्रांत हा वेगळा न ठेवता कोणत्या तरी प्रांताला जोडावा असा विचार सरकारात चालू होता. ही वार्ता बाहेर फुटली आणि वऱ्हाड हा मुंबई प्रांताला, म्हणजेच मराठी भाषी प्रांताला जोडावा अशी चळवळ उमरावतीत चालू झाली. या चळवळीत उमरावतीच्या सर्व प्रमुख नागरिकांनी भाग घेतला होता. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली अनेक खाजगी व जाहीर सभा फेब्रुवारी–मार्च १९०३ मध्ये घेण्यात आल्या.+ परंतु सरकारने जनमताकडे दुर्लक्ष करून अखेर वऱ्हाड हा सेंट्रल प्राविन्सेस (जुना मध्यप्रांत) ला जोडलाच, याचे मुख्य कारण असे होते की, त्यावेळी वऱ्हाड संपन्न प्रांत होता. आणि सेंट्रल प्राविन्स हा तुटीचा प्रांत होता. व्यवस्थेच्या व राज्य कारभाराच्या दृष्टीने हेच न्याय्य व सोयीस्कर होते असे सरकारचे म्हणणे होते[२]

वऱ्हाडप्रांत मध्यप्रांताला जोडण्यासंबंधीच्या या नवीन व्यवस्थेला काही मुसलमान जमीनदार व जहागीरदार यांनी विरोध केला. त्यासाठी त्यांनी दि. २१ फेब्रुवारी १९०३ रोजी उमरावती येथे जाहीर सभा घेतली.

---

१ : रा. ब. आर. एम्. खरे यांच्या आठवणी : (उमरावती बार असोसीएशन, शताब्दी महोत्सव स्मरणिका :)

२ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. १८७.

+ "नगरपालिकेत गेलो, सभा होती. ठराव करून वऱ्हाड कोणत्याही प्रांतात समाविष्ट करू नका असे कळविले" (दादासाहेब खापर्डे यांच्या डायरीतील नोंद दि. २१–२–१९०३ ची.)

याच वेळी लार्ड कर्झन, व्हाईसराय यांनी बंगालचे विभाजन केले होते व त्या विरुद्ध भारतात चळवळ चालू होती. या सभेत बंग-भंगाचे चळवळीला पाठिंबा देण्यात येऊन, वऱ्हाडप्रांत मध्यप्रांताला जोडण्याचे निर्णयाला विरोध दर्शविण्यात आला[१].

वऱ्हाडप्रांत हा मध्यप्रांताला जोडण्यात आला त्यावेळी, वऱ्हाडचे क्षेत्रफळ १७७०० चौरस मैल असून त्याचा ८/११ वा भाग शेतकऱ्यांचे कबजात वहितीखाली होता. आणि वऱ्हाडचे (४ जिल्हे) वार्षिक उत्पन्न ७८ लक्ष रुपये होते. त्याच वेळी मध्यप्रांताचे (अठरा जिल्हे) उत्पन्न मात्र सालीना फक्त ८५ लाख होते. चार जिल्ह्याच्या वऱ्हाडचे उत्पन्न जास्त तर अठरा जिल्ह्याच्या मध्यप्रांताचे उत्पन्न कमी. त्यामुळे वऱ्हाड ऐवजी मध्यप्रांताचा आर्थिक दृष्ट्या फार फायदा झाला.

या व्यवस्थेमुळे उमरावतीचे मोठेच नुकसान झाले ते म्हणजे ज्युडिशिअल कमिश्नरचे कोर्ट उमरावतीऐवजी नागपूरला गेले. (नागपूर हायकोर्ट नंतर बऱ्याच वर्षांनी झाले.) आणि या जोडप्रांताला सी. पी. अँड बेरार प्राविन्सेस (मध्यप्रांत व वऱ्हाड) असे नाव देण्यात आले.

ज्यावेळी वऱ्हाडप्रांत मध्यप्रांताला जोडला आणि ज्यु. कमिश्नरचे कोर्ट नागपूरला गेले त्या सुमारास उमरावती येथे श्री मृगेंद्रशंकर स्वामी या नावाचे एक जंगम (लिंगायत पथाचे गुरु), बुद्धीस्वामीचा मठ म्हणून मुधोळकर पेठच्या अलोकडे आहे, तेथे राहत होते. त्यांचे कन्नड व मराठी भाषेतून बरेच साहित्य आहे. ते मराठीतून अभंग व पदें करीत. राष्ट्रीय आंदोलनात ते काँग्रेसचे समर्थक होते. त्यांनी वरील घटनेला उद्देशून एक मजेदार अभंग रचला होता. ज्यु. कमिश्नरचे कोर्ट उमरावतीहून नागपूरास गेले, त्यामुळे उमरावतीचे वैभव कमी झाले अशी खंत त्यावेळी जनतेत निर्माण झाली होती, त्याचे प्रतिबिंब या अभंगात दिसून येते :-

बुडालीरे उमरावती.
आली हीन देशा स्थिती ॥१॥
वऱ्हाडची राजधानी
आजवरी होती म्हणती. ॥२॥

---

१ : अमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११ : द्वितीय आवृत्ति : १९६८ : पा. ११७

आता कुंकुवीना भाळ
दिसे वाईट अमंगळ ॥३॥
तैसे जावोनिया रती
फिकी पडली उमरावती ॥४॥
अंबाबाई झाला त्रास
थोरपणाचा निशी दिवस ॥५॥
म्हणोनिया हायकोर्ट
फणींद्रपुरा[१] गेला स्पष्ट ॥६॥
आजवरी 'अमरावती'[२]
आता म्हणूया उमरावती ॥७॥
या नावासारखे त्याचे गुण
तेची खरे वस्तु जाण ॥८॥
नाही तरी थोरपणा
नको मृगेंद्र म्हणे जना ॥९॥□

संत गुलाबराव महाराज : इ. सन १९०४–५ चे सुमारास, दोन्ही डोळ्यांनी आंधळा असलेल्या तथापि संस्कृतांतील तत्त्वज्ञान व वाङ्मयाचा अत्यंत अभ्यास केलेल्या अशा एका कुणब्याच्या लहान मुलाने उमरावतीकरांचे लक्ष वेधून घेतले होते व तो सर्वांचे कौतुकाचा विषय बनला होता.

पुढे "संत गुलाबराव महाराज" म्हणून प्रसिद्धीस आलेला हा मुलगा अचलपूर तहसीलमधील माधानचा राहणारा होता. व दोन्ही डोळ्यांनी अंध असूनही भारतीय तत्त्वज्ञानाचा त्याचा अभ्यास दांडगा होता.

कालांतराने संत गुलाबराव महाराज म्हणून ते प्रसिद्धीला आलेत. उमरावती येथील जुन्या कोतवालीचे पाठीमागे त्यांचे ज्ञानेश्वर मंदिर आहे ते

---

१ : नागपूर. २ : इंद्राची "अमरावती" हा अर्थ.

□ वरील स्वामीबद्दल इतर माहिती मिळत नाही. तरी त्यांनी लिंगायत पंथाचे प्रवर्तक महात्मा बसवेश्वर यांची जयंती इ. सन १९११ मध्ये पहिल्या प्रथम उमरावतीत सुरू केली. त्याप्रसंगी दादासाहेब खापर्डे हे समारंभाचे अध्यक्ष होते. मृगेंद्र स्वामींची त्यांच्या हस्तलिखितातील १९०५ इसवीची एक वही उपलब्ध आहे. त्यांतच वरील अभंग मिळाला.

सर्व दूर प्रसिद्ध असून, त्यांची ग्रंथसंपदा तेथे आहे. त्यांची शिष्य मंडळी या संस्थानचा कारभार पाहतात. संभवतः त्यांचे जाहीर स्वरूपाचे पहिले भाषण दि. १७ एप्रील १९०५ रोजी शिवजयंत्युत्सवात उमरावतीला झाले होते. संत गुलाबराव महाराजांचे पहिले दर्शन उमरावतीकरांना याच वेळी घडले.

लोकमान्य दोषमुक्त : अभिनंदनाची सभा : लोकमान्य टिळक हे एका महत्त्वाचे खटल्यात दोषमुक्त ठरल्याची तार दि. ३ मार्च १९०४ रोजी उमरावतीस दादासाहेबांना आली. दादासाहेबांना आनंद झाला व दोषमुक्त ठरल्याबद्दल त्यांनी लो. टिळकांना तार पाठवून त्यांचे अभिनंदनही केले.

लोकमान्यांचे जाहीर अभिनंदन करण्यासाठी दि. ५ मार्च १९०४ रोजी उमरावती येथे लक्ष्मीनारायण मंदिरासमोरील पटांगणात श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. सभा मोठी होती. जनतेला टिळकांविषयी खूप आदर होता. श्री. मोरोपंत जोशी यांची वाट पाहिली पण ते सभेला आले नाहीत. तात्यासाहेब मुधोळकरांनी पत्र पाठवून या सभेला येता येणार नाही असे कळविले होते. या सभेत लोकमान्यांचे अभिनंदन करण्यात आले होते[1].

कीर्तनकार श्री. वामनराव जोशी : उमरावतीत इ. स. १९०० पासून सार्वजनिक गणेशोत्सव होऊ लागला होता. सन १९०४ मधील सार्वजनिक गणेशोत्सव, जोग चौकातील ब्रम्हविद्या मंदिराचे हॉलमध्ये साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी उमरावतीचे, त्यागनिष्ठ वीर वामनराव दादा म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले, श्री. वामनराव जोशी यांनी प्रथमच कीर्तन केले. द्रौपदी–वस्त्र–हरणाचे आख्यान हा कीर्तनाचा विषय होता. "ते चांगले गातात, वक्ते चांगले आहेत, आणि मूळ कथेला धरून चालतात" अशी प्रतिक्रिया त्यांच्या या प्रथम कीर्तनासंबंधी त्यावेळी थोरामोठ्यांनी व्यक्त केली. दादांच्या ह्या कीर्तनाला श्रोते मोठ्या संख्येने हजर असत.

ना. गोपाळ कृष्ण गोखल्याचे सभेत शेम शेम : म. गांधी ज्यांना गुरुस्थानी मानीत असत असे त्या काळचे प्रख्यात ना. गोपाळ कृष्ण गोखले हे

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. २११

दि. ९ डिसेंबर १९०४ रोजी उमरावतीला आले होते[१]. त्यांची ही उमरावती भेट मुख्यतः न्यायमूर्ती रानडे यांचे स्मरणार्थ जो निधी उभारला जात होता त्या संबंधी होती. त्याच वेळी त्यांचे उमरावतीत भाषणही झाले. तेव्हा उमरावतीच्या त्या सभेतील श्रोत्यांनी ना. गोखले यांच्या भाषणात शेम शेम च्या घोषणा दिल्या.

याचे कारण असे होते की, मुंबईचे दिनशा वाच्छा व ना. गोपाळ कृष्ण गोखले हे काँग्रेस मधील मवाळांचे पुढारी होते. त्यांनी मुंबईच्या एका सभेत लो. टिळकांवर टीका केली होती. त्यानंतर थोडयाच दिवसांनी ना. गोखले वर प्रवासाने उमरावतीला आले, तेव्हा उमरावतीच्या टिळक भक्तांनी 'शेम शेम च्या घोषणा दिल्या[२].

लोकमान्य टिळकांचे पुन्हा आगमन : मे १९०५ मध्ये लोकमान्य टिळक उमरावतीस आलेत. जगन्नाथ महाराज व बाळमहाराज यांचेतील खटल्यात दादासाहेब खापर्डे यांची साक्ष कमिशनवर होती, त्यासाठी लो. टिळक उमरावतीस आले होते.

या वेळी लोकमान्यांचा उमरावतीस एक आठवडा मुक्काम होता. या मुक्कामात दि. ५ मे रोजी लो. टिळकांनी ब्रम्हविद्या मंदिरास भेट दिली व तेथे जमलेल्या मंडळीशी ते बराच वेळ बोलत बसले होते. दि. ६ मे रोजी छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव येथील श्री दत्तमंदिरात थाटाने साजरा करण्यात आला. त्या उत्सवाला लो. टिळक उपस्थित होते. त्या प्रसंगी लो. टिळकांचे फार उद्‌बोधक व विद्वत्ताप्रचुर भाषणही झाले होते. भाषणाला प्रचंड गर्दी झाली होती.

दि. ७ ला गणेश नाटकगृहात श्री शिवजयंत्युत्सव फार मोठया प्रमाणांत करण्यात आला. त्या उत्सवासाठी लो. टिळक आणि श्री. दादासाहेब खापर्डे या दोघांची लोकांना थाटाची मिरवणूक काढून सभारंभपूर्वक त्यांना गणेश नाटक-गृहात नेले होते. तेथे लोकमान्यांचे एक तास भाषण झाले. या भाषणाबद्दल दादासाहेब आपल्या डायरीत लिहितात "लोकमान्यांचे हे भाषण वक्तृत्व-

---

१ व २ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र पा. २११ व २०४ आणि
कै. टिकेकार मास्तर यांच्या आठवणी.

पूर्ण, विचारपरिप्लुत आणि काळजीपूर्वक विचार करून ठरविलेले असे झाले, त्यात माहिती पुष्कळ होती".

या मुक्कामात लो. टिळकांना गावात अनेक ठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या. या उत्सवाचा एक भाग म्हणून मुलांनी 'पानीपतचा मुकाबला' हे नाटक रंगभूमीवर करून दाखविले होते. या नाटकाला लोकमान्य टिळक प्रथमपासून शेवटपर्यंत उपस्थित होते.

दि. ८ मे रोजी लो. टिळक पुण्यास रवाना झाले. त्या वेळी त्यांना निरोप देण्यासाठी विद्यार्थी वर्ग फार मोठ्या संख्येने स्टेशनवर हजर होता. दादासाहेब खापर्डे लोकमान्याच्या समागमे वऱ्हाडच्या शेवटच्या रेल्वे स्टेशनपर्यंत (मलकापूरपर्यंत) त्यांना पोचविण्यासाठी गेले होते[1]. पुढे आगस्ट महिन्यात लो. टिळक पुन्हा उमरावतीस आले होते.

उमरावतीत राष्ट्रीय शाळेची सुरुवात : लोकमान्य टिळकांच्या वेळोवेळी झालेल्या आगमनामुळे आणि उमरावतीचे त्या काळातील जननेते असलेले दादासाहेब खापर्डे हे टिळक मतानुवर्ती असल्यामुळे, त्या काळच्या मानाने शहरात राष्ट्रीय जागृती सुरू झाली होती. राजकीय सभा होत असत. या एकंदर वातावरणात विद्यार्थी अलिप्त राहणे शक्य नव्हते. त्यामुळे राजकीय सभांना विद्यार्थी हजर राहत. उलट राजकारणापासून विद्यार्थी अलिप्त कसे राहतील याची दक्षता शिक्षण खात्याचे अधिकारी घेत असत. त्याकाळी सरकारी हायस्कूल व त्या हायस्कूलचे वसतिगृह होते, आणि वसतिगृहात राहणाऱ्या मुलावर नियंत्रण ठेवण्याचे व बंधने घालण्याचे त्यांचेजवळ अधिकार व साधने होती.

त्याच सुमारास वंगभंगाची चळवळ सुरू झाली. शहरात सभा होत असत. या सभांना सरकारी हायस्कूलच्या बोर्डिंग मधील विद्यार्थ्यांनी जाऊ नये असा सक्त हुकुम हायस्कूलचे हेडमास्तरांनी काढला. पण त्याची प्रतिक्रिया उलट झाली. बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांनी एकजूट करून सभांना जायचे ठरवले व त्याप्रमाणे ते सभांना गेलेही, पण ही गोष्ट अधिकाऱ्यांना कळताच त्यांनी या सर्व मुलांना बोर्डिंगमधून काढून टाकण्याचे ठरविले व त्याप्रमाणे काढून टाकले गेले. तेव्हा ही सर्व मुले गावातील नेते मंडळींना भेटली.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे चरित्र : पा. २२३

याच वेळी उमरावतीत एक प्रायव्हेट हायस्कूल काही मंडळी स्वार्थत्याग-पूर्वक चालवीत होती[१]. पण अशी शाळा चार-दोन लोकांना चालविणे शक्य नसल्याने, एक स्वतंत्र शिक्षण संस्था उमरावतीत काढावी हा विचार सुरू झाला. या कामी वामनराव दादा, बल्लाळ, शामरावपंत देशपांडे आदी मंडळींनी पुढाकार घेतला. श्री. दादासाहेब खापर्डे यांचे नेतृत्वाखाली कामास सुरवात झाली.

संस्था काढण्याचा विचार पक्का झाल्यानंतर 'बेरार एज्युकेशन सोसा टी' हे संस्थेचे नाव ठरविण्यात आले आणि या सस्थेने सुरू करावयाच्या हायस्कूलला 'काशीबाई प्रायव्हेट हायस्कूल' असे नाव देण्याचे ठरले. कारण हायस्कूलची इमारत बांधण्यासाठी कारंजाचे श्रीमंत काण्णव यांनी २० हजाराची देणगी संस्थेला दिली होती. या कामी रा. ब. मुधोळकर, सर मोरोपंत जोशी यांनीही सहकार्य दिले. इतरही वकील मंडळी सहकार्य देत होती. संस्था उभी झाली. संस्थेसाठी देणग्या मिळवण्याकरता संस्थेचे अध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे व त्यांचे सहकारी यांनी वऱ्हाडभर दौरा काढून पैसा जमवला. बोर्डिंगातून काढलेल्या विद्यार्थ्यामुळे अशी ही संस्था दिसेंबर १९०५ मध्ये उभी झाली[२]. राष्ट्रीय शिक्षण सुरू झाले. वीर वामनराव दादा व बापूजी अणे यांच्यासारखे, पुढे जननेतृत्व करणारे लोक या शाळेत शिक्षक होते, एवढे सांगितले म्हणजे या शाळेतील राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना सहज येईल.

पुढे पैशाअभावी ही शाळा, संस्थेकडून वीर वामनराव जोशी यांचे नेतृत्वाखाली शिक्षकांनी चालवायला घेतली होती[३]. (दिसेंबर १९०८)

उमरावतीचे पहिले 'प्रायव्हेट' हायस्कूल : अंदाजे इ. सन १९०० चे आधी मागे हिंदु हायस्कूल मधील नापास झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रयत्नाने व श्री. दादासाहेब खापर्डे यांचे मदतीने उमरावतीत पहिले राष्ट्रीय वृत्तीचे 'प्रायव्हेट' हायस्कूल सुरू झाले होते व हे हायस्कूल, त्यातील शिक्षकवर्ग अत्यंत स्वार्थत्याग-पूर्वक चालवीत असे. हायस्कूलच्या स्थापनेची व शैक्षणिक दर्जाची हकीकत श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी प्रसिद्ध केली आहे ती अशी.

"……नवे हायस्कूल काढल्यास कढी हे त्याचे उत्तम शिक्षक होऊ शकतील अशी माझ्या मनांत कल्पना घोळू लागली. माझा मित्र

१, २ व ३ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र पा. २३१, २३३ व ३१०

मालज याला तो सांगितली. डांगे नावाचा एक मुलगा होता. त्याने ती नापासात पसरविली आणि एक लहानसे राजकारण करण्याचे ठरले. सर्व नापास म्हणून एक डेप्युटेशन तयार केले व ते दादासाहेबांकडे आले. नवी शाळा काढल्यास इतक्या विद्यार्थ्यांचे कल्याण होईल असे पाया पडून सांगण्यात आले. दोघा-तिघांना रडण्याची कला साध्य झाली होती. त्यांनी दादासाहेबांचे समक्ष प्रत्यक्ष रडून दाखविले. कढींनी हेडमास्तर होण्याचे मान्य केले व मी नागपूराहून साथीदार आणू शकतो असे आश्वासन दिले. फीचा दर सरकारी शाळेपेक्षा कमी ठेवण्याचे ठरल्यामुळे नापासांच्या संख्येवरून गणित करता, मास्तरांचे पगार कितीही कमी दिले तरी ते मागणार नाहीत असे गणिताने अंदाज केले आणि शाळा स्व-समर्थ (Self Sufficient) होईतो निदान एक वर्ष उणे पडेल ते भरून काढण्याचे दादासाहेबांनी पत्करले. आमच्या येथील तीन टेबले, तीन खुर्च्या, दोन आलमाऱ्या व दोन सतरंज्या शाळेला देणगी म्हणून मिळाल्या. आपटे व भालेराव असे दोघे (उभयता बेकार बी. ए.) नागपूराहून आले. व एक सुमुहूर्त पाहून त्या मुहूर्तावर वर्ग सुरू झाले.

वर्ग प्रथम गावात एका भाड्याच्या घरात सुरू झाले. हे घर आमच्या घरापासून खूप दूर होते. पुढे ही शाळा आत्माराम भिकाजीच्या बगिच्यात, कॉटन मार्केटचे मागे आली. आता तेथे सराईवजा गोडाऊन आहे. याच शाळेत पुढे अत्रे नावाचे कर्तबगार गृहस्थ शिक्षक म्हणून आले व नागपूरचे अत्यंत विख्यात वैय्याकरणी व वेदान्ताचे फार मोठे अधिकारी पंडित, श्री. गुलाबराव महाराजांचे शिष्य, प्रख्यात विद्वान श्रीनिवास शास्त्री हे संस्कृतचे अध्यापक म्हणून आले व सातारचे प्रसिद्ध मल्ल व तिरंदाज 'भटजी'[1] आखाडा शिक्षक म्हणून आले व पुढे लौकिकास चढलेले प्रसिद्ध नाटककर्ते व अव्वलदर्जाचे स्वार्थत्यागी देशभक्त वामनराव जोशी, शिक्षक म्हणून आले. तसेच याच शाळेत प्रसिद्ध नट श्री. जयवंत (बी. ए.) इंग्रजीचे मास्तर म्हणून आले. या शाळेची पुढे फार भरभराट झाली. शाळेवर सरकारची गैरमर्जी होतीच, पण चाफेकरांनी रँडचा खून करीपर्यंत सरकारची नजर करडी नव्हती.

या प्रमाणे प्रायव्हेट हायस्कूल सुरू झाले.

---

१ : भटजी उर्फ भिडे गुरुजी यांची माहिती पुढे दिली आहे.

या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या पहिल्या गटात मी होतो. या हायस्कूलात मुलांच्या शारीरिक, नैतिक व धार्मिक शिक्षणाकडे लक्ष दिले जाणार होते. देशप्रेम व देशभक्ती शिकविण्याचे आयोजन होते व सरकारी शाळेच्या कोंदट वातावरणाऐवजी स्वातंत्र्याचे खुले मैदान विद्यार्थ्यांना वावरावयास मिळावे असे उद्दिष्ट होते.....प्रस्तुत व भावी देशभक्तांचे हे केंद्र झाले[१].

.....नवी शाळा सुरू झाली ती अत्यंत उत्साहाने पुढे पाऊल टाकू लागली. चालकांनी सरकारी अनुदान घेण्याचे नाकारले. दादासाहेबांनी गावो गाव दौरे काढून द्रव्यसाहाय्य मिळविले. सर्व मास्तरांनी झीज सोसून व अंगमोडून दक्षतेने आपले कर्तव्य केले. ही शाळा चालविणे म्हणजे खरी देशसेवा आहे अशी चालकांची व मास्तरांची मनोमन खात्री होती व सरकारी दडपण नसल्यामुळे एक प्रकारचे सर्वत्र स्वतंत्रतेचे वातावरण होते. या शाळेतून भावी देशभक्त उत्पन्न होतील अशी जनतेची आशा होती आणि ही आशा सफल करणे आपले पवित्र कर्तव्य आहे अशी विद्यार्थ्यांत ईर्षा होती. तालिमबाजी, आखाडे, मोकळ्यावर व्यायाम, दांडपट्टा, छडीपट्टा, बोथाटी वगैरे मर्दानी खेळांचे शिक्षण, कवायतीचे धडे, निशाणबाजी वगैरे तरुणांना उत्साहाचे भरते आणणारे कार्यक्रम उघड व गुप्त रीतीने दोन्ही प्रकारे सुरू झाले. शालेय अभ्यासक्रम चालू होताच.....श्री शिवछत्रपतींचा जन्मोत्सव प्रथम उमरावतीत किंवा या प्रांती या शाळेने सुरू केला. हल्लीचे बिहारचे माजी गव्हर्नर लोकनायक अणे एके काळी याच शाळेत शिक्षक होते.....[२]"

नटसम्राट बालगंधर्वांचे उमरावतीत वास्तव्य : आपल्या गायनाने आणि नाट्यकलेने अखिल महाराष्ट्रातील नाट्य रसिकांना मंत्रमुग्ध करून सोडणारे नटसम्राट श्री. नारायणराव राजहंस उर्फ 'बालगंधर्व' ह्यांचे बालपणाचा काही काळ या उमरावती नगरीत व्यतीत झाला आहे. त्यावेळी ते श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांचेकडे राहत असत व त्यांना उमरावतीचे प्रख्यात गवई नामदेवबुवा हे गाण्याची तालीम देत असत. कै. बाबासाहेब खापर्डे यांनी या प्रसंगाची आपली आठवण प्रसिद्ध केली ती अशी–

---

१ व २ : प्रसाद मासिक पुणे, दिसेंबर १९५७ व जाने. १९५८

" बालगंधर्वांचे आजोबा आश्रित या नात्याने श्रीमंत बाबाजी महाराज+ (पुणे) यांचे परिवारात असल्यामुळे, नारायणचे वाड्यात जाणे-येणे सहजच होत असे. माझ्या कुटुंबाने मला वारंवार सांगितले की, 'आम्ही म्हणजे मी आणि नारायण (बालगंधर्व) एके ठिकाणी पुष्कळ दिवस बालपणाचे खेळ खेळलो. त्यावेळी नारायण आम्हाला गाणी म्हणून दाखवीत असे..... गौरीची गाणी आम्ही त्याच्याकडून म्हणवून घेत असू.' काही निमित्ताने बालगंधर्वांचे नावाचा उल्लेख आला म्हणजे वरील विधान मला वारंवार ऐकावे लागत असे.

बालगंधर्वांना, मी प्रथम वाड्यात जेवणास गेलो असताना पाहिले.....मी कॉलेजमधून उन्हाळ्याच्या सुटीत एके वर्षी घरी आलो असता, अकस्मात नारायण आम्हाला, एके दिवशी सकाळी आमच्या घरच्या व्हरांड्यात एकटा बसलेला आढळला. त्यावेळी त्याला बालगंधर्व ही पदवी मिळाली नव्हती. ती पुढे मिळाली. म्हणून मी त्याचा येथे एकेरी नावाने उल्लेख केला आहे. आम्ही त्यावेळी त्याला नारायणबुवा अशा नावाने हाक मारीत असू. बुवा म्हणण्याचे कारण असे की, त्याचे गळ्यात रुद्राक्षाची माळ होती. आणि गायकास बुवा ही पदवी साधारणत: लावतात. तेव्हा हे नारायणबुवा आमच्या घरी एके दिवशी का आले, हे मला त्यावेळी कळले नाही. परंतु कालांतराने असे कळले की, घरच्या मंडळीवर काही कारणाने रुसून बालसुलभ रागाच्या आणि अविचाराच्या तडाख्यात सापडून ते घर सोडून निघाले व कोठे जावे याचा विचार करीत असता, आपण आपल्या बाल मैत्रिणीच्या म्हणजे मनुताईच्या घरी जावे असे सुचले, व धुळ्यावरून ते जे तडक निघाले ते उमरावतीस आले. उमरावतीस आमच्या घरी आल्यानंतर त्यांचे मन:पूर्वक प्रेमाने स्वागत झाले हे सांगणे नकोच आणि चार सहा दिवसात ते आमच्या कुटुंबातील एक बनून सर्वांशी समरस झाले व आमच्या धाकट्या बंधूचा म्हणजे अण्णासाहेबांचा विशेष लोभ जडला, कारण अण्णासाहेबांना स्वत:ला गाण्याची आवड फार. आणि नारायणबुवा त्यांची ती हौस मनसोक्त पुरवीत. उन्हाळ्याचे सायंकाळी गच्चीवर बसून गोड गाण्याच्या लहरी घरभर पसरविणे हा नित्याचा क्रम होऊन बसला आणि हळू हळू

+ श्रीमंत बाबाजी महाराज (पुणे) हे श्री. बाबासाहेबांचे श्वसुर होत.

कुटुंबातली सर्व मंडळी भोवताली बसू लागली व त्याला बारक्याशा मैफिलीचे स्वरूप येऊ लागले. त्यावेळी नारायणबुवांना फारशी गाणी येत नव्हती आणि जी येत होती ती वारंवार ऐकण्याला आम्हाला कधी कंटाळा आला नाही.....एके दिवशी दादासाहेबांनी नारायणबुवांचे गाणे ऐकले व हा मुलगा पुढे लौकिक मिळविल परंतु त्याला योग्य शिक्षण मिळाले पाहिजे असे उद्‌गार त्यांनी काढले. दादासाहेब एवढे म्हणूनच थांबले नाहीत, तर त्यांनी.....गावातील प्रसिद्ध गवई नामदेवबुवा यांना बोलावून आणले आणि या मुलाला तुम्ही शिक्षण द्या असा आदेश दिला. अर्थात या आदेशात व्यावहारिक भाग होताच.....नामदेवबुवा हे प्रख्यात मौलाबक्षांचे शिष्य होते व त्यांनीच उमरावतीला गायन शिकविण्याचा वर्ग प्रथम सुरू केला होता.....(ही घटना मार्च-एप्रील १९०५ मधली आहे.)

नारायणबुवांनी नामदेवबुवांजवळ काही दिवस किंबहुना काही महिने अभ्यास केला. पण पुढे तो परिस्थितीमुळे अनायासे बंद झाला.

त्याचे असे झाले की, नारायणबुवा आमचे येथे आहेत ही बातमी कशीबशी त्यांच्या घरी पोहोचली आणि त्यांचे कोणीतरी जवळचे आप्त... एके दिवशी सकाळी आमचे येथे येऊन दाखल झाले. त्यांची दादासाहेबांशी प्रथम भेट झाली. पाहुण्यांनी 'आमचा नारायण राजहंस आपलेकडे आहे काय ? याची चौकशी करायला मी आलो आहे' असे सांगितले.....मी धुळ्यास असतो. नारायण एके दिवशी रुसून घर सोडून निघून गेला आणि तो आपल्या आश्रयास आहे असे आम्हास कळले वरून, त्याला घरी नेण्याचे उद्देशाने मी आलो.' असेही पाहुण्यांनी सांगितले.....आम्ही वरच्या मजल्यावर गप्पा मारीत बसलो असतानाच निरोप आलेवरून नारायणबुवासह आम्ही खाली आलो. नारायणबुवांना पाहिल्याबरोबर पाहुण्यांनी त्याला आपल्या जवळ बसवून घेतले. नंतर घरी परत चलण्याविषयी पाहुण्यांनी नारायणबुवांचे मन वळविले आणि त्याच दिवशी संध्याकाळच्या गाडीने ते दोघे आमच्या येथून धुळ्यास रवाना झाले. नारायणबुवा जातांना आम्हा सर्वांनाच वाईट वाटले. आणि ते साहाजिकच होते. नारायणबुवांनाही आमचे घर सोडताना दुःख होत आहे असे स्पष्ट दिसले.

त्यानंतर बरेच दिवस त्यांच्या संबंधी आम्हाला कोणतीही माहिती मिळाली नाही. काही दिवसांनी त्यांच्या संबंधानें प्रथमच माहिती ऐकू

आली की, लोकमान्य टिळकांनी त्यांना 'बालगंधर्व' ही पदवी दिली आहे आणि ते किर्लोस्कर नाटक कंपनीत नायिकेचा स्त्री पार्ट करीत असतात. ..... त्यावेळी किर्लोस्कर नाटक कंपनीची कीर्ती शिखरावर होती व कंपनीचे स्थान स्थिर करण्यास नारायणाची मदत होईल अशी आमची अपेक्षा होती व ती खरीही ठरली.

..... पुढे बऱ्याच वर्षांनी बालगंधर्वाची नाटक कंपनी उमरावतीस आली व त्यांची नाटकेही सूरू झाली. त्या मुक्कामातच प्रारंभीच नारायणराव (बालगंधर्व) एके दिवशी आमचे कडे आले आणि बराच वेळ बसून आपुलकीने सुखदु:खाच्या गोष्टी बोलून गेले.

..... कंपनीच्या उमरावतीच्या या मुक्कामात पैशाच्या आणि कीर्तीच्या दृष्टीने त्यांना विपुल लाभ झाला आणि कंपनीला मुंबईच्या सावकाराचे झालेले कर्ज अदमासे एक लक्ष रुपयाचे फिटले असे कळले. त्यानंतरही बालगंधर्वाची नट हचा नात्याने कीर्ती उत्तरोत्तर वाढतच गेली आणि एकाकाळी कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन ते पोहचले होते.

..... कदाचित, हा लेख बालगंधर्व नारायणराव राजहंस + यांच्या नजरेखालून गेला..... तर ते म्हणतील देवा, हे सर्व खरे आहे.[१]"

---

१ : प्रसाद : जुलै १९५९.

+ बालगंधर्व : महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अभिनय निपुण गायकनट, जन्म पुण्यास सन १८८८ मध्ये. मूळ नाव नारायण श्रीपाद राजहंस. यांना १८९८ साली 'बालगंधर्व' ही पदवी लो. टिळकांनी दिली. १९०५ साली किर्लोस्कर नाटक मंडळीत त्यांचा प्रवेश झाला. पुढे त्यांनी गोविंदराव टेंबे व गणपतराव बोडस यांच्या भागीदारीत गंधर्व नाटक मंडळी काढली. आणि नंतर या कंपनीचे ते मालक झाले. नाटकात स्त्रियांच्या भूमिका ते करीत. त्यांचे हे काम इतके सरस होई की लोक पुन्हा पुन्हा वन्समोअर देत. त्यांच्या शारदा, सुभद्रा, भामिनी, रूक्मिणी, द्रौपदी व सिंधू वगैरे भूमिका अप्रतिम होत. सुमारे दोन तपे त्यांनी मराठी रंगभूमीवर प्रभुत्व गाजविले. त्यांची स्त्री वेषातील चित्रे त्या काळी घरोघरी दिसत. महाराष्ट्रातील स्त्रियांना लुगडी नेसणे, नथ घालणे, व प्रसाधने वापरण्याचा नवा

(पुढील पानावर)

व्यायामाचार्य दामोदर बळवंत भिडे उर्फ 'भटजी' : उमरावतीला एक प्रायव्हेट हायस्कूल इ. स. १९०३–४ मध्ये काही व्यक्तींनी स्वार्थत्यागपूर्वक चालविले होते व या हायस्कूलमध्ये तालीममास्तर म्हणून भटजी हे होते, असा उल्लेख मागे आलेला आहेच. परंतु हे भटजी साधेसुधे नव्हते तर ते तत्कालिन इंग्रजाविरुद्ध सुरू झालेल्या गुप्त राजकारणातील एक क्रांतिकारकही होते. पुण्याला चाफेकराने रँन्डचा १८९७ साली खून केला त्या चाफेकर बर्तुळापैकी भटजी होते, आणि पुढेही अशा राजकारणात ते असत असे दिसते. हे भटजी, अशाच गुप्त राजकारणातून त्यांचेवर पोलिसांची पाळत होती म्हणूनच, पुणे सातारा सोडून गुपचुप उमरावतीस आले होते, याचा त्यांचे आत्मचरित्रांत उल्लेख आहे.

भटजी + उमरावतीला सुमारे १९०३ मध्ये आलेत. येथील वास्तव्यातील हकीकत त्यांनी स्वतःच आपल्या आत्मवृत्तात लिहून ठेवली आहे. ती उमरावतीच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने तद्वतच त्यातील काही व्यक्तींचा उल्लेखही महत्त्वाचा असल्याने भटजीचे शब्दातच ती माहिती येथे देणे उचित ठरेल––

"……मलकापुरास गेलो. तेथे तालमीचे सर्व लोक भेटले. पुण्याहून गणपत जाधव, नरहरपंत भिडे सर्व मंडळी मिळून विचार ठरला की, सुशिक्षित लोक हाताशी धरून, त्यांच्यामध्ये शिपाईगिरीचे वारे उत्पन्न करून मुसलमानास पहिल्याने शह देऊन, समाज–बंधनाचा प्रयत्न करावा. पुढे,

---

(मागील पानावरुन)

प्रकार बाल गंधर्वांनी शिकवला. त्यांचा सुरेल आवाज रसिकावर मोहिनी घालत असे. बालगंधर्वांनी नाटकावर जेवढा पैसा कमावला तेवढा कोणी कमावला नसेल. त्यांनी खेळाच्या उत्पन्नातून लक्षावधी रुपये महाराष्ट्रातील विविध संस्थांना दिलेत. परंतु या गुणी कलावंताला मरतांना मात्र फार आर्थिक विपत्ती सोसावी लागली. उमरावतीचे मुक्कामात त्यांना वऱ्हाडच्या जनतेने भरपूर आश्रय दिला व रसिकवृत्ती सोबतच बालगंधर्वाच्या कलेचे व स्वराचे चीज केले. (अर्वा, चरित्र कोशः चित्राव शास्त्री : पृ ४५६)

+ भटजीचे पूर्वज सातारा जिल्हांतील महागाव येथे राहत असत. पण भटजींचे वडील बळवंतराव हे पुण्यास येऊन राहिले होते व भटजीचा जन्मही पुण्याचाच आहे.

गणपतने सर्व हकीकत पुण्यास कळवावी. याप्रमाणे ठरले व आपले उद्योगाकरिता गणपत गेला. मी पुन्हा एकवार जाऊन ब्रम्हचारी दिक्षित स्वामी, सच्चिदाश्रय महाराज यांना अनुभव व बेत कळवून परत आलो व पुढे अमरावतीस जूनमध्ये बंधू वासुअण्णा यांजकडे जाऊन उतरलो.

माघारी काय घडले ? : इकडे पुणे, सातारा, या ठिकाणी पोलिस तपास जारीने सुरू होताच. घरी मातोश्रीस बराच त्रास होत असे. वारंवार मी कोठे आहे, याची चवकशी होत असे. मातोश्री खंबीर असलेकारणाने कधीच पत्ता लागला नाही. उलट पोलिसलाच धमकी देऊन सांगत, की 'तुमचे भीतीने माझा मुलगा गेला आहे. त्याचा पत्ता लावून द्या.' एकवेळ कलेक्टर साहेबांकडे अर्जही केला होता. त्याचा उपयोग होऊन पुन्हा पोलिस माझे शोधाकरता केव्हाही मातोश्रीकडे गेले नाहीत व मी अमरावतीस गेल्यावर एक वेळा मातोश्रीचे भेटीकरता दोन दिवस तेथे असताना बिलकुल पत्ता लागला नाही किंवा कोणतेही प्रकारचा त्रासही झाला नाही. याप्रमाणे सर्व गोष्टी घडल्या.

उमरावतीचे कार्य आणि उपजीविका : आता यापुढे अमरावतीस धंदा सुरू. अमरावतीस गेलेवर बंधु वासूअण्णा यांची भेट झाल्यावर, दुसरे दिवशी, लगेच, रा. बापट मास्तर यांची गाठ घालून दिली व आपण शिकवणीस गेले. रा. बापट पहिल्यापासून देशभक्तीच्या वळणातलेच होते. पैशाकरिता नौकरी करीत. राहणी सर्व जुन्या तऱ्हेची, धार्मिक वगैरे अशी. त्यांचेपाशी माझी सर्व हकीगत सांगणे प्राप्त झाले. सर्व साद्यन्त हकीकत ऐकून त्यांना आनंद झाला व आता आपण काम करू या, असे ठरून दुसऱ्या दिवशी जवळच एक जागा मोकळी पाहून काठी खेळण्यास सुरवात झाली. हा संध्याकाळचा उद्योग सुरू झाला व त्याबद्दल त्यांनी दहा रुपये महिना देण्यास सुरवात केली. मावसबंधूंनी दोन शिकवण्या मिळवून दिल्या. रा. दामले वकील यांचे मुलास पांच रुपयावर एक शिकवणी सुरू केली. दोन मुले केशव, दामू. दामू: जातीचाच हुशार असल्यामुळे मला फार सोयीचे पडू लागले. आठ दिवसांनी दुसरी शिकवणी आली. रा. चिटणीस वकिलांची दोन मुले: बाबू व वसंत. दोन्ही मुले हुशार व धाडसी. चार मुले व मी मास्तर. सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत तीन तास शिकवीत बसावे व नंतर १० चे पुढे घरी जाऊन स्नानसंध्या

वर्गरे आटोपून बाराचे सुमारास जेवावे. नंतर पुन्हा दासबोध, गीता–यथार्थबोधिनी यांचे वाचन. नंतर घरात सौ. वहिनींनी काही बाजार सांगितल्यास तो करावा. या क्रमाने महिना गेला. रा. बापट यांचेकडे संध्याकाळी पाच वाजता जावे. तेथे रात्री साडेसातपर्यंत रोज नित्य नवीन लोकांनी यावे. रा. बापटांचा व माझा प्रयत्न एक मार्गानेच सुरू झाला. अमरावतीस आलेपासून बापट हेच माझे मार्गदर्शक झाले. कोणतीही गोष्ट करणे ती एकविचारे व्हावी.

अमरावतीस रोशन महंमद हा हायस्कूलमध्ये तालीममास्तर असे. त्याचेभोवती मुसलमान तालीमवाले. त्यांत पट्टा, काठी, कुस्ती, मल्लखांब करणारे लोक असत. मी मधून मधून हायस्कूलात जाई. तेव्हा सदर मास्तरनी माझी रा. बापटांजवळ चौकशी करून थोडीशी थट्टेची भाषा वापरली. ते सर्व बापटांनी मला सांगून, त्यांचेतील चांगल्या कुस्तीगीराची कुस्तीत व बाकीची मारात परीक्षा पाहू, असे म्हणाले. मला हे हवेच होते. दुसरे दिवशी, संध्याकाळी सर्व गोष्टीत परीक्षा झाली त्यांच्यातील बडे मिय्या यासीनखान एक मिनिटात हातास हात लावताच भुईस मिळाले. पट्ट्यात मास्तराची राळ उडाली. सर्व लोक खजील झाले. ताबडतोब बातमी सर्व मुसलमानात झाली. भटजीबाबाची प्रसिद्धी झाली.

त्याच वेळी तेथे मुसलमान फौजदार होता. त्यास बातमी समजताच त्याने माझे बंधूपाशी चवकशी केली. बंधू घाबरून गेले. पण फौजदारास मागचा धागा न दाखविता तो नौकरीकरता आला आहे व बापट त्याचे खटपटीत आहेत, असे त्यास सांगितले. त्या वेळी इंग्रजी शिकगारास फार मान होता, व मला घरी येऊन खूप रागावले. माझा इलाज नव्हता. मी सर्व रा. बापटांचेवर लोटले. दुसरे दिवशी बापटांना सर्व हकीगत कळवली. बापट घाबरले नाहीत. उलट फोजदारापाशी सर्व चौकशी केली. त्यांनी सांगितले "असा कोण माणूस आहे तो पाहावा व जमेल तर पोलिसमध्ये घेऊ." त्या वेळी हैदराबादचे अमलाखाली वऱ्हाड होता. रा. बापटांनी सर्व हकीगत समजावून सांगितली. तेव्हा आनंद झाला व मजा जमेल तर पोलिसात नौकरी करावी, असे सांगू लागले. माझे या ठिकाणी गुरू अण्णा बापट. त्यांचे धोरणाने वागू असे बंधूना कळविले.

चित्र क्र ८४ : नटसम्राट बालगंधर्व (पृ. ३०२ व ३०५ पहा)
श्री नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व (स्त्री वेषात)



चित्र क्र. ८५ : व्यायामाचार्य (पृष्ठ ३०६ पहा)
दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी

वरील हकीगत, पुण्याचे नगरकरांचे तालमीतील तुकाराम न्हावी, याने अमरावतीस तालीम काढून चांगले नाव मिळविले होते, त्यास समजली व त्याने मुद्दाम माझी गाठ घेऊन तालमीत बोलावले. मी लगेच रा. बापटांना बरोबर घेऊन तालमीत गेलो. त्या तालमीत नाशिकचे बन्या व शामू दोघेही प्रसिद्ध लढणारे सोनार येत असत. दोघांनीही पुष्कळ कुस्त्या मारल्या होत्या. शामूची व माझी कुस्ती लावली. मला वाटले, मी शामूस मारीन पण तो चलाख असलेमुळे ताबडतोब मला खाली आणलें. मी जमीन धरणार इतक्यात मला तुकारामाने खुणावले. मी ताबडतोब वर येऊन स्वारी टाकली ..... शामूचा हात उखडला व पुनश्च नाव घेणार नाही असे म्हणाला व तसेच झाले. दुसरे दिवशी बन्या आखाड्यात उतरला पण रामराम घेताच सावकाश मला सांभाळून घ्या असे म्हणून काही न करता मागे सरून राहिला. त्यामुळे खेळ झाला नाही. सर्वांची खात्री झाली. मग मीच तालीम चालवू लागलो. तुकाराम वस्ताद मला वाढवण्या करता दमछाकी देत असे. सकाळ संध्याकाळ परदेशी, मुसलमान, बुंदेले, मारवाडी व हायस्कूलातील विद्यार्थी बरेच लोक येत व फायदा घेत.

याप्रमाणे तालमीचे काम व संध्याकाळी साडेपाच ते साडेसहा वाजेपर्यंत काठी, लाठी, पट्टा, फरिगदगा मिळून पंचवीस विद्यार्थी असत. संध्याकाळचे कामाबद्दल रा. बापट मास्तर दहा रु. परस्पर खाणावळ-वाल्यास देत असत, व पूर्वीच्या दोन शिकवण्या असत. त्यात अकरा मुले झाली. त्यांचा मी खाजगी वर्ग बनविला व त्यांचे मला बावीस रुपये मिळत. याप्रमाणे माझे व्यवस्थित चालू झाले.

वऱ्हाडप्रांतात पोळ्यास (बेदरास) दंगल भरे. त्यांत आमची तालीम एका बाजूस व बाकी तालमी आमच्या उलट. आमच्या गड्यांनी शेकडा ९० कुस्त्या जिंकल्या. सर्व लोक 'भट के छोकरे अच्छे लढते' म्हणत. तेव्हा, आमचे तालमीपैकी कोणीही असो, त्यास भट किंवा बम्मन हे नाव मिळे. तालीमवाले चढेल लोक. त्यांनी आमचा काटा काढावा, असे ठरविले. नागपंचमीस मालटेकडीखाली दंगल असे. तेथे आम्ही गेल्यावर दोन कुस्त्या, एक परदेशी व एक मुसलमान यांच्या झाल्या. लगेच हातघाईवर काम आले. मी तुकारामास मागे घालून 'जा घरी' म्हणून सांगितले. सबंध दंगा शामराव देशपांडे आदी वीस मंडळींनी अंगावर घेतला. सर्व मंडळी कुस्ती, पट्टा याचे

जाणते असल्याने शंभर माणसांना तोंड देत हमालपुऱ्यापर्यंत आलो. त्या ठिकाणी यादू आमचे मदतीस आलेबरोबर सर्व लोक पळून गेले. ताबडतोब बातमी पसरून पोलिस आले. तेथे ठिकाणावर काही नाही. पोलिस मजकडे आले. चौकशी केली. तालीमबाजी मारामाऱ्या यात काही अर्थ नाही, एवढ्यावर गेले. त्याने आमचा आत्मविश्वास वाढला व शामरावशी दृढ परिचय झाला. श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांना ही बातमी समजताच, मला घरी बोलावून शाबासकी दिली व दहा रु. बक्षिस दिले. मी त्याचा पट्टा विकत घेतला. हे दादास समजल्यावर फार रागावले. सामान मी वाटेल तितके...कृती अशी आहे, की तुम्हाला आम्ही...वाटेल. नारायणराव इन्स्पेक्टर ऑफ पोलिस यास.....आहे. झाले; मी सर्व अमरावतीच्या प्रेमातला झालो. सर्वत्र माझे आईबाप. खाणावळ नावाला. माझे बंधूना नवल वाटले. याप्रमाणे क्रम चालू होता. एक वर्ष चालला.

दुसऱ्या वर्षापासून, म्हणजे सरासरी जुलई–ऑगष्टपासून, प्रायव्हेट हायस्कूलचे हेडमास्तर रा. मुळे व असिस्टंट दोघांचा परिचय फार पडून 'नवीन वर्षापासून आम्ही बोर्डिग काढणार, तेव्हा सुपरिटेंडेंट पाहिजे, तो तुम्ही चार्ज घ्या व चालू क्लास बंद करा' असे ते म्हणू लागले. हीच कल्पना त्यांनी दादासाहेब, शामराव, बापट यांना पटवली. माझे बंधु कबूल नव्हते. पण त्यांना विचारतो कोण? आमच्या क्लॉसच्या मुलांच्या पालकांना सांगून क्लास संपवला. त्यावेळी नविन वर्ष नोव्हेंबरपासून असावे, अशी समजूत आहे. बोर्डिग सुरू झालें. आमचे गावातील तुकारामची तालीम बंद झाली. बोर्डिगात आखाडा केला व सर्व खेळ सुरू झाले. सकाळी सहा वाजता अर्धातास ड्रील व संध्याकाळी ५ ते ७ सर्व प्रकारची तालीम. सर्व ऑफिसर, शहरवासी तेथे जाऊन धन्यवाद देत. नागपूरपासून तो थेट पुण्यापर्यंत सर्व लोक येऊन कौतुक करीत.

याच संधीस माझे नावावर एक मुसलमान पैलवान फैजी कुस्तीस आला. त्याची कुस्ती जुन्या बँकेत ठरली. सर्व लोक तेथे गेलो. त्या वेळी जुना पहिलवान महंमदसाहेब हा कंत्राटी होता. त्यानी पहिल्याने मित्र पन्नालालच्या कुस्तीचे नाव काढले. आमचे लोक. लावीनात. मी पुढे होऊन सांगितलें, मी पहिल्याने खेळतो. मागून व्यासजींची लावू. त्यावर लगेच हालचाली सुरू. आम्ही आत कोंडलेलें. फैजी आला नाही. पैसा लाव,

म्हणून सुरवात झाली. आम्ही सापडलो. मारखात होतो पळालो. पण व बाहेर सुटलो. या मारामारीमुळे आमचे तालमीची मुले धीट झालो व मुसलमान लोक भिऊ लागले व अमरावती गावात माझा दरारा सुरू.

अमरावतीस लोकांना पोहण्याची कल्पना देखील नव्हती. परंतु दादासाहेबांनी आम्हाला राजापेठ तलावाची परवानगी दिल्यामुळे पोहण्याची कला अमरावतीचे लोकास प्राप्त झाली. आमचे बोर्डिंगचा आखाडा जोरात चालू असल्यामुळे हायस्कूलातील मुले आमचेकडे येत. याच सुमारास वऱ्हाडात टूर्नामेंटस् सुरू झाल्या. त्यात तालमीचे खेळ होतेच. त्या सर्व खेळात आमचे लोक विजयी झाले. त्यामुळे त्या शाळेचे हेडमास्तर व असिस्टंट मजवर खुश होऊन बहुमान केला.

लढाई करा, दोन हजार माणसे देतो : याप्रमाणे आमचा क्रम सुरू असता एके दिवशी श्री. अण्णासाहेब याजबरोबर रावसाहेब पेशवे मुलांची ड्रील वगैरे पाहणेस आले. आमच्या ओळखी पटल्या. परंतु बंगल्यावर भेटून बोलू असे ठरले. त्या दिवशी जेवणास बंगल्यावर गेलो; औरंगाबादेहुन फरारी झाल्यापासूनची सर्व हकीकत एकमेकांस समजली. पुढे काय, हा प्रश्न निघाला. त्यांचे म्हणणे, वऱ्हाडात पुन्हा दरवडे सुरू करावेत व पैसे रावसाहेबास द्यावेत. ते मला पटेना. श्री शिवाजीराव होळकर यांचा या कार्याशी संबंध जोडू लागलें. पण मला ते पटेना. एक महिनाभर बोलणे

टीप :– श्री भिडे गुरूजी उर्फ भटजी यांच्या उमरावतीतील वास्तव्यात ज्या गोष्टी घडल्या त्याची माहिती त्यांनी वरप्रमाणे आपल्या आत्मवृत्तात लिहून ठेवली आहे. या माहितीतून आणखी काही माहिती आपणास मिळते ती अशी :–

१. उमरावतीत त्याकाळी कुस्त्यांचे दंगल मालटेकडी जवळ आणि गावात जुन्या बँकेचे आवारात भरत असत २. हायस्कूल मधून मुलांना व्यायामविषयक शिक्षण कंपल्सरी होते व त्यासाठी खास तालीम मास्तर नेमले जात. ३. उमरावतीत पोहण्याची लोकांना कल्पना नव्हती, भटजींनी हीं कला उमरावतीकरांना दिली. ४. रावसाहेब पेशवे या नावाचे गृहस्थ क्रांतिकारक कटाचे नेते होते व ते अण्णासाहेबाकडे येत.

(पुढील पानावर)

सुरू होते. त्यास मी अण्णासाहेबांसमक्ष सांगितले 'लढाई सुरू करा. माझ्या दोन हजार माणसांनिशी वऱ्हाडात तयार आहे. इतर गोष्टीत मी पडणार नाही. मी सर्व अनुभव घेतला आहे. आपण भित्रे आहात व वेळ आली की पाय काढता. विनाकारण जगून काय करावयाचे?' माझे शब्द शहाजी पाटलास ..... त्या वेळी त्याचे शिख रिसालदार होते ..... राग आला. ठोकर खाऊन पूर्ण अनुभव घेतला पण हजार रुपये घेतल्यामुळे लोकमान्यांना तोंड ..... मी त्यांचाच असल्यामुळे नेमका ..... बंद झाले. वऱ्हाडचे लोकास या गोष्टी मुळीच माहित ..... ते मला नेहमी संभाळून घेऊन बोलत ..... त्या काळचे मला विचारल्याशिवाय काही करावयाचे नसत. पैशाची...वऱ्हाडकर भागवीत. श्रीमान विष्णू शेट सावजी अत्यंत स्नेही. त्यांचा तर ठराव, की असे काम पडले की मला ताबडतोब बोलवावे व मग काय ते करावे. रावसाहेब वारंवार पंजाबात जात. पंजाबी मिलिटरी त्यांना थाप देत असें. करता करता

(मागील पानावरून)

(हे अण्णासाहेब म्हणजे मोरोपंत जोशी असावेत. त्यांचा उल्लेख कै. दादासाहेब खापर्डे यांच्या चरित्रात पान ११० वर 'अज्ञात रावसाहेब' म्हणून आलेला असून ते मोरोपंतांकडे उतरत असत व मोरोपंत, रावसाहेब व दादासाहेब खापर्डे यांच्या, खापर्डे वाड्यात गुप्त खलबते चालत असत 'असे म्हटले आहे. तसेच मोरोपंताचे चरित्रातही पान ५५ वर "..... आपल्या घरी क्रांतीकारक म्हणून संशय असलेल्या लोकांना थारा देता. त्यामुळे तुमच्यावर पोलिसांची सक्त नजर आहे. असे, प्रिस्टले नांवाचे वरिष्ठ अधिकाऱ्याने मोरोपंतास म्हटल्याचे नमूद आहे') या वरून 'भटजी' ज्या क्रांतीकारांचे संपर्कात होते. त्यापैकीच हे रावसाहेब पेशवे असावेत व उमरावतीतील श्री. मोरोपंत जोशी आणि श्री. दादासाहेब खापर्डे हे त्या कटाला अप्रत्यक्ष मदत करणारे असावेत असा संकेत मिळतो. या क्रांतिकारी कटाचे धागे साताऱ्या, पुणे, उमरावती, इंदोर व पंजाबपर्यंत असावेत असे वाटते. तसेच भटजींनी शेगांवचे श्री गजानन महाराजांचा 'पूर्ण विदेही' असा उल्लेख केला आहे. भटजी त्यांच्याकडे जात असत. ५. वऱ्हाडांत क्लिवलॅन्ड या नावाचा एक इंग्रज अधिकारी इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलिस या अधिकारावर होता. त्यानेच वऱ्हाडातील आखाडे बंद पाडले. कारण या आखाड्यातून क्रांतिकारक तरूण

(पुढील पानावर)

शेवटी कंटाळले व काली खड्गाची प्राप्ति करावी म्हणून सरदारपूरला बसले. ४० दिवस उपोषण केले; एकेचाळीसाव्या दिवशी गुप्त पोलिसाने त्यास धरल्यानंतर चार तासांनी प्राण सोडला. आपल्या कृत्यापैकी काही एक सांगितले नाही. ही गोष्ट १९०५ साली घडली असावी. ही बातमी वऱ्हाडात गुप्तपणे येताच मी स्वतः जाऊन सर्व शोध करून आलो व त्यांच्या सर्व अनुयायास ते लढाईवर गेले अशी थाप उडवून दिली. फार लोक त्यांच्यापैकी होते. त्यांच्यापैकी कोणी जिवंत असतील तर त्याची.....

याच सुमारास डॉ. मुंजे यास गाठून राजकीय पक्षात ओढण्याचे काम श्री. दादासाहेबांचे चालू होते. त्यात दोन वेळ मी गेलो होतो. मंडळीच्या बैठकी नेहमी रात्री दादासाहेब यांच्याकडे किंवा अण्णासाहेब यांच्याकडेच होत असत व सर्वांची समजूत की, परकीय राजकारणात केव्हा तरी हात साधता येईल.

रावसाहेब गेल्याने कामात शिथिलता उत्पन्न झाली. बोलण्यात गोड, कावेबाज असा होता. रावसाहेब गेल्यावर त्याचा फायदा घेऊन आण्णासाहेब वऱ्हाडात पहिल्याने सावजीच्या बरोबर आला. रावसाहेबांनी ७ हजार... सभा झाली...पासून माहिती...यामुळे शहाजी बोलेना...करू म्हणू लागला. मी सांगितले...आमचे पायावर उभे आहोत...खुशाल आपल्या प्रांती जावे. सभा विसकटली. जे आबासाहेब लबाड माणूस. सबब घरात नको. सर्वांना तोंडघशी देईल, अशी माझी खात्री होती. त्यानेच पुढे पां. म. बापट यांना फसविले. हा माणूस माडगाव, गोवे प्रांती होता. स्वतःकरिता दुसरे बळी देऊन आपण इंग्रजांचा हेर बनला व पुढे काही दिवसांनी मेला. याने आरंभी हैद्राबाद प्रांती लोकांस फसवून कित्येकांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या व लांबविल्या त्याने ७ लग्ने केली होती. मी अमरावतीला सुपरीटेंडेंटचे काम करीत असल्यामुळे स्वार्थ व परमार्थ दोन्ही उत्तम. प्रांती बरेच साधुसंत असत. त्यांत परतवाड्याचे योगानंद हा योगी...व्यवहारचतुर, शेगावचे श्री गजानन

(मागील पानावरून)
तयार होतात असे त्याचे मत होते. त्यांच्या कारकिर्दीला 'क्लिवलॅन्डशाही' असे म्हणत असत. त्या काळी उमरावतीत मुसलमानांच्या तालमी होत्या, पण हिंदूची एकच, –तुकाराम न्हाव्याची– तालीम असावी असे दिसते.

महाराज पूर्ण विदेही. मलकापुर...गोपाळखेड येथे ५७ चे बंडातील एक नाव कळले नाही. मला साधूचा नाद असल्यामुळे मी त्यांचेकडे वारंवार जाई. कोणाला काही मागावयाचे नव्हते.

गुरुजींचा उर्फ भटजींचा उमरावतीच्या बोर्डिंगमधील आखाडा चांगला जोरात चालला होता. या सुमारास वऱ्हाडांत खेळांचे सामने सुरू झाले होते. या सामन्यामधील विजयी झालेले वीर बहुतेक सर्व उमरावतीचेच असत. अर्थात बक्षिसे उमरावतीसच येत. असे सारखे होऊ लागले. तेव्हा याचे कारण मे. कॅंडीसाहेबांनी हायस्कूलच्या हेडमास्तरास विचारले. हेड-मास्तरांनी भटजीकडे बोट दाखवून, त्यांचे हे सर्व लोक शिष्य आहेत, असे सांगितले आणि भटजींचा आखाडा पाहून साहेब फार खुष झाले. त्यांनी भटजीसंबंधी चौकशी केली. नंतर भटजीस सरकारी नोकरीत घ्यावे असे त्यांचे नक्की ठरले व भटजींचे मावसबंधु जोगळेकर याजजवळ त्यांनी तसे बोलूनही दाखविले. भटजीस प्रथम ही कल्पना पसंत नव्हती. परंतु बापट मास्तर वगैरे सर्वांचाच आग्रह पडल्याने त्यांनी अखेर तालीममास्तरची आलेली नोकरी पत्करण्याचे ठरविले. अकोल्याची जागा रिकामी होती. कारण येथील मास्तर रजेवर गेले होते. मे. कॅंडीसाहेबांनी भटजीस भेटीस बोलाविले व भेटीत अकोल्यास नेमणूक केल्याचे सांगितले. अशा रीतीने प्रथमतः भटजी अकोल्यास सरकारी हायस्कूलमध्ये २५ रुपयावर तालीम-मास्तर म्हणून रुजू झाले. (१९०४) इकडे उमरावतीचा आखाडा त्यांनी जयराम पाटलांचे हवाली केला. जयराम पाटील मूळचे अशक्त, परंतु भटजींच्या सान्निध्यात राहून उत्तम पहिलवान शिपाई बनले. जयराम पाटलांनीही पुढे उत्तम कार्य करून दाखविले. पुढे, उमरावतीच्या हनुमान व्यायाम शाळेने वऱ्हाडात व इतरत्र जे कार्य चालविले. त्याचा पाया अप्रत्यक्षरीत्या घातल्याचे श्रेय जर कोणाकडे जात असेल तर ते भटजीकडेच होय, असे म्हटले असता वावगे होईलसे वाटत नाही.

.....इतक्यांत वऱ्हाडला 'क्लीव्हलॅंडशाही'चा फटकारा बसला व वऱ्हाडामधील सर्व आखाडे एका फटकाऱ्याने बंद झाले. यामुळे त्या क्षेत्रांत झालेले व्यायामविषयक कार्य जवळ-जवळ धुळीस मिळाले. परंतु असे जरी झाले होते तरी खुद्द भटजींना मात्र लाठी, पट्टा, फरीगदगा इत्यादि विषय शिकविण्यास क्लीव्हलॅंड साहेबांनी स्वतः परवानगी दिली होती.

अकोल्यास असताना भटजी सुट्टीच्या दिवसात इंदौर, उज्जयिनी, बडोदे, रतलाम, उमरावती वगैरे दूरजवळच्या ठिकाणी जाऊन तेथील परिस्थिति पाहत व कार्याला चालना देत. अशा भेटीत, त्यांना पूर्वपरिचित असलेल्या राजरत्न प्रो. माणिकराव बडोदा, वीर वामनराव जोशी इत्यादि व्यक्तींशी त्यांचा अंगीकृत कार्याविषयी विचारविनिमय होई.

१९४६ साली उमरावतीस अखील महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाच्या परिषदेच्या वेळीच अखील भारतीय शारीरिक शिक्षण महामंडळाचे अधिवेशन झाले. त्या वेळी उमरावतीकरबंधूंनी आंतरविभागीय सामन्यांचे क्रीडांगणास गुरुजींचे नाव देऊन सामन्यांच्या उद्घाटनाचा मान त्यांस दिला. गुरुजींचा त्या वेळी जाहीर गौरव केला. याच वेळी गुरुजीच्या सातारच्या शिष्यांचा कुस्तीच्या खेळाडूंचा एक संघ अखिल भारतीय सामन्यात दाखल झाला होता. त्या संघाने अखील भारतीय अग्रेसरत्वाचा मान मिळवून गुरुजीच्या थोर कीर्तीत भर घातली[१].

कादंबरीकार आपटेंची उमरावतीस भेट : प्रख्यात कादंबरीकार श्री हरि नारायण आपटे इ. सन १९०५ च्या फेब्रूवारी महिन्यात उमरावतीला आले. त्यांचा मुक्कम उमरावतीला बरेच दिवस दादासाहेब खापर्डे यांचेकडे होता. त्यांच्या 'जयध्वज' नाटकाचा पहिला प्रयोग महाराष्ट्र नाटक मंडळी, उमरावतीचे मुक्कामात सादर करणार होती. त्यासाठी ते उमरावतीस आलेले होते.+

---

१ : कै. व्यायामाचार्य दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी यांचे आत्मवृत्त व चरित्र : १९५७ पा. ३१ ते ३८, ४१ ते ५४.

+ : हरि नारायण आपटे : (जन्म १८६४ : मृ. १९१९) मराठी भाषेतील प्रख्यात कादंबरीकार, लघुकथा लेखक, नाटककार व सार्वजनिक कार्यकर्ते. वयाच्या चवदाव्या वर्षी इंग्रजी चवथीत असतानाच त्यांनी मेडोज टेलरच्या एका कादंबरीचे मराठीत भाषांतर करून वाङ्मय क्षेत्रात पदार्पण केले. ते पुणे नगरपालिकेचे २० वर्षे सभासद व ३ वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या शांत व मिळूनमिसळून वागण्याच्या स्वभावामुळे त्यांनी तेथे बरीच महत्त्वाची कामे केलीत. लोकल बोर्डाचेही ते कित्येक वर्षे उपाध्यक्ष होते. पुण्याच्या

(पुढील पानावर)

इतिहासाचार्य राजवाडे : हे जानेवारी १९०६ मध्ये उमरावतीस आले होते. इतिहास संशोधक मंडळ त्यांनी पुढे १९१० मध्ये काढले. परंतु तत्पूर्वी त्यांचे इतिहास विषयक बरेच व नव्या दृष्टीने लिहिलेले लिखाण प्रसिद्ध झाल्याने त्यांची दूरवर ख्याती झाली होती. त्यामुळे उमरावतीला त्यांचे भेटीचा जो लाभ झाला तो महत्त्वपूर्ण होता.

लोकमान्य टिळकांनी १९०६ मध्ये उमरावतीस दिलेली धूळभेट : दे. २० दिसेंबर १९०६ रोजी लो. टिळक उमरावतीस आले होते. उमरावतीच्या स्टेशनवर टिळकांचे फार मोठया थाटाचे स्वागत झाले. वंदेमातरम्'च्या प्रचंड घोषणा झाल्या. या स्वागता करिता शाळांचे विद्यार्थी, श्री. केशवराव ब्रम्ह, श्री. बाबा पाळेकर, श्री. दुराणी, श्री. शामराव देशपांडे (महागांवचे) व दादासाहेब खापर्डे हे उपस्थित होते. इतरही जनता फार मोठया प्रमाणात उपस्थित होती.

लोकमान्यांचा मुक्काम दादासाहेब खापर्डे यांचे कडेच होता[१].

लोकमान्य टिळक हे कलकत्ता काँग्रेसला जाण्यासाठी निघाले होते । जाताना श्री. दादासाहेब खापर्डे यांना सोबत न्यावे म्हणून उमरावतीस उतरले होते.

(मागील पानावरून)

द्यमान निषेध मंडळाचेही ते सभासद होते. ते सुधारक व प्रागतिक गणले जात. 'करमणूक' हे साप्ताहिक त्यांनी २८ वर्ष चालविले. त्यांच्या कादंबऱ्या- धली स्थिती, गणपतराव, पण लक्षात कोण घेतो, यशवंतराव खरे, मी, यंकर दिव्य, मायेचा बाजार, जग हे असे आहे, आजच, कर्मयोग, इत्यादि सामाजिक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत शिवाय म्हैसूरचा वाघ, उषःकाल, र्योदय, सूर्यग्रहण, केवळ स्वराज्यासाठी, रूपनगरचो राजकन्या, चंद्रगुप्त, ड आला पण सिंह गेला, माध्यान्ह, कालकूट, वज्राघात, वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून त्यांनी मोठा लौकिक मिळवला. सन्त सखुबाई, पिंगळा, गैरे नाटके, अनेक गोष्टी, पत्रे, निबंध लिहिलेत. महादेव चिमणाजी आपटे यांच्या आनंदाश्रम संस्थेचे ते व्यवस्थापक होते. (अर्वा; चरित्र कोश: त्रराव शास्त्री पृ. ४७)

१ : कै. दादासा. खापर्डे च. पा. २६०–६१

त्यावेळी काही तरुण मंडळी लोकमान्यांच्या भेटीस खापर्डे वाडयावर आली तेव्हा, कलकत्ता काँग्रेसमध्ये 'स्वदेशी – बहिष्कार' मुख्यत्वेकरून चर्चेस यावयाचा असल्यामुळे या भेटीच्या प्रसंगी त्या संबंधानेच बोलणे निघाले होते. सदर संभाषणात लोकमान्यांनी स्वदेशी बहिष्कारासंबंधी असे सांगितले होते की–

"बहिष्काराचे तत्त्व पाच वर्षे देशाने इमाने–इतबारे पाळले तर युरोपात लढाई उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाही. आजचे युरोपीय राजकारण व्यापाराच्या खुंटाभोवती घुटमळत आहे. युरोपातील प्रत्येक प्रबळ राष्ट्रे जगातील बाजारपेठा काबीज करण्यासाठी रात्रंदिवस धडपडत आहेत. हिंदुस्थानची बाजारपेठ इंग्रजांनी सर्वस्वी व्यापून टाकली आहे, ही गोष्ट युरोपातील प्रत्येक बलाढय राष्ट्राच्या मनात शल्यासारखी बोचत आहे. आपल्यात इंग्रजांशी लढण्याचे सामर्थ्य नाही. तेव्हा इंग्रजांशी लढण्यास जे समर्थ आहेत त्यांना तरी आपण चिथावू या[१]."

लोकमान्यांनी तरुणाबरोबरच्या संभाषणात १९०६ मध्ये ही गोष्ट सांगितली होती व पुढे स्वदेशी आंदोलनाचे काळात त्याचा चांगला प्रत्यय आला होता.

उमरावतीहून नंतर लो. टिळक हे दादासाहेब खापर्डे यांना घेऊन दुसरेच दिवशी मेलने कलकत्त्यास रवाना झाले होते.

कमिश्नरांची उमरावतीस भेट : इ. स. १९०६ मध्ये मध्यप्रांत वऱ्हाडचे कमिश्नर मि. ऱ्हॅडॅक यांनी उमरावतीस भेट दिली. त्या प्रसंगी त्यांनी मुसलमान नागरिकांना बोलावून, त्यांनी राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहावे आणि काँग्रेला साथ देऊ नये असे सांगितले. त्यावेळी वऱ्हाडात मुसलमानांचे प्रमाण केवळ ४ टक्के होते[२].

उमरावतीत आलेली पहिली सर्कस : इ. स. १९०५–६ चे सुमारास श्री. छत्रे+ यांची सर्कस उमरावतीस आली, आणि नेकोलेट पार्कवर या

---

१ : 'उदय' दि. २ आगस्ट १९३२

२ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर १९६८ : पा. ११८

+ **श्री. विष्णुपंत मोरोपंत छत्रे** : (जन्म १८४० मृ. १९०६.) कृष्णा-

(पुढील पानावर)

सर्कशीचे खेळ सुरू झाले. उमरावतीला आलेली ही पहिलीच सर्कस असल्याने, केवळ शहरातीलच नव्हे तर खेडयापाडयातील लोकांनीही या 'सर्कस' ला चांगला आश्रय दिला[१].

उमरावतीचा परकोट पाडण्याचे कारस्थान : उमरावती शहराला फार जुनी १०० वर्षांपूर्वी बांधलेली परकोटाची भित आहे. या भितीला (परकोटाला) चारही दिशांना मोठाले, विस्तीर्ण व शोभिवंत लढाऊ बुरूज आणि पांच महाद्वारे असून मुख्य वस्ती परकोटाचे आत आहे. असा हा परकोट पाडून टाकून आत बाहेरचे गाव एक करावे, म्हणजे गावात चांगली हवा खेळेल व स्वच्छतेच्या दृष्टीनेही ते योग्य होईल; असे इंग्रज अधिकाऱ्यांचे म्हणणे होते व तसे त्यांनी नगरपालिकेस कळवून जनमत अजमावून कळवावे असे सुचविले होते.

त्याप्रमाणे नगरपालिकेचे चिटणीसांनी दि. २८ जून १९०७ रोजी नगरपालिकेचे हॉलमधे नागरिकांची सभा बोलावली. त्यासाठी जाहीर नोटीस काढण्यात आली होती. सभेला सुमारे दोन हजार लोक उपस्थित होते. जमनादास पोद्दार फर्मचे स्थानिक एजंट श्री. ओंकारजी, हे या सभेचे सर्वानुमते अध्यक्ष निवडले गेले.

(मागील पानावरून)

काठचे राहणारे... ग्वाल्हेरच्या सुप्रसिद्ध अश्वहृदयज्ञ बाबासाहेब आपटे यांचेकडे अश्वविद्या व श्री. हद्दूखां यांचेकडे गायन विद्या शिकले.

मुंबईला 'चेअनी विल्सन' या युरोपियन गृहस्थाची सर्कस आली होती. त्यातील घोडयांचे खेळ पाहून व प्रेरणा घेऊन त्यांनीही सर्कस काढली. पुढे विल्सनच्या सर्कशीचे सामान छत्रेनी विकत घेतले व त्यांनी आपली 'ग्रँट इंडियन सर्कस' सर्व हिंदुस्थानभर फिरविण्यास सुरुवात केली. पुढे त्यांनी आपली सर्कस चीन, जापान, ब्रम्हदेश वगैरे देशास नेऊन यशस्वी दौरे केले.

नंतर त्यांनी आपली सर्कस आपले बंधु काशीनाथपंत यांच्या स्वाधीन केली. त्यांनी तर सर्कस अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को पर्यंत फिरविली.

छत्र्याचे सर्कशीत तयार झालेल्या देवलबंधूंनी नंतर आपली स्वतंत्र सर्कस काढली. छत्रे हे भारतातले पहिले सर्कसवाले होत.

१ : कै. टिकेकर मास्तरांच्या आठवणी.

या प्रसंगी श्री. वामनराव जोशी यांनी एकूण दोन हजार सह्यांचे १४ अर्ज (परकोट पाडण्यास विरोध करणारे) या सभेला सादर केलेत.

'शहराची सफिल पाडू नये[१]' अशा अर्थाचा ठराव सभेत श्री. डोळे यांनी मांडला. त्याला श्री. भांगले यांनी अनुमोदन दिले. आणि ठरावाचे समर्थन श्री. शिवाप्पा गुराप्पा कॉन्ट्रॅक्टर आणि श्री. वामनराव जोशी यांनी केले. हा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

या प्रकरणात त्यावेळचे नगरपालिकेचे उपाध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे यांनीच लोकांना 'सफिल पाडू देऊ नका' अशासाठी भडकविले असा इंग्रज अधिकाऱ्यांचा ग्रह होऊन आणि नागरिकांच्या सभेचे वृत्त

---

१ : उमरावतीच्या परकोटाशी येथील जनतेच्या भावना निगडित झालेल्या आहेत. त्यामुळेच ज्या ज्या वेळी हा परकोट पाडण्याचा प्रश्न उद्‌भवला त्या त्या वेळी ह्या लोकभावना उचंबळून वर आल्याचे दिसून आले.

इ. स. १८७५ च्या सप्टेंबर महिन्यात या परकोटाचे लांकडी भव्य दरवाजे काढून तेथे हलके लोखंडी दरवाजे बसवावेत असा ठराव नगरपालिकेच्या सभेत आला तेव्हा त्याला विरोध झाला होता. शेवटी "जूने दरवाजे दुरुस्त करावेत" असाच ठराव मंजूर करावा लागला[१]

त्यानंतर इ. स. १८८९ साली परकोट पाडण्यासंबंधीचा प्रश्न पुढे आला. त्यावेळी सरकारने लोकमत अजमावले होते. आम जनतेने या गोष्टीस आपला विरोध नोंदविला होता. व "नागरिकांचा तो मानदंड आहे" असा निर्णय कमिश्नरांनी दिला. होता.

पुन्हा असाच प्रश्न इ. १८९३ मध्ये उपस्थित करण्यात आला. तेव्हाही लोकांनी विरोध दर्शविला. इ. स. १९०७ मध्ये हा परकोट पाडण्याचा प्रश्न पुन्हा सरकारने उपस्थित केला. त्यावेळीही लोकांनी विरोधच केला होता. इतकेच नव्हे तर यावेळी तत्कालीन म्यु. उपाध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे यांनी परकोट पाडू देऊ नका यासाठी लोकांना भडकविले असा सरकारचा समज होऊन शेवटी त्यात दादासाहेबांचे म्यु. सभासदत्व रद्द केले आणि उपाध्यक्षपदावरून त्यांना काढून टाकण्यात आले होते. ती माहिती वर दिली आहेच[२]. (१ व २ : म्यु. ठराव नं. ५, दि. ६ सप्टेंबर १८७५ व ठराव नं. ३, जुलै १९०७)

ऐकून, एका इंग्रज अधिकाऱ्याचा आणि दादासाहेब खापर्डे यांचा, नागरिकांची सभा संपून लोक परतत होते त्याचवेळी, सर्वांदेखत अत्यंत कडाक्याचा वाद झाला. हा इंग्रज अधिकारी म्हणजे त्यावेळचा डे. कमिश्नर व त्या नात्याने नगरपालिकेचा अध्यक्ष होता.

श्री. दादासाहेब खापर्डे यांचे सभासदत्व रद्द : नंतर हे परकोट प्रकरण फार चिघळले. दादासाहेब ही व्यक्ती " डेन्जरस टु पीस अॅन्ड ऑर्डर " अशी आहे म्हणून श्री. दादासाहेब खापर्डे यांचे म्यु. सभासदत्व रद्द करण्यात आले व त्या नात्याने त्यांचेकडे असलेल्या उपाध्यक्ष पदावरून त्यांना काढून टाकण्याचा आदेश चीफ कमिश्नर, सी. पी. अॅन्ड बेरार, यांनी दिला. आणि अशा रीतीने श्री. दादासाहेब खापर्डे यांना अधिकाराचे जोरावर सरकारने नगरपालिकेतून बाहेर काढले. पण श्री. दादासाहेब यांना सरकारने जरी अशा रीतीने नगरपालिकेतून काढले तरी जनमत त्यांच्या बाजूचे होते. त्यामुळेच नंतर म्यु. सभासदांनी दि. २२ डिसेंबर १९०७ रोजी नगरपालिकेच्या सभेत ठराव करून, सरकारच्या कृत्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली व दादासाहेबांच्या कार्याचा गौरव केला. इतकेच नव्हे तर "दादासाहेबांचे सभासदत्व रद्द करण्याचे सरकारचे या कृत्याचे निषेधार्थ पंधरा म्यु. सभासदांनीही आपापले राजीनामे डे. कमिश्नरकडे पाठविले[१]." अशा प्रकारे खरे जनमत प्रगट झाले.

उमरावतीचा हा ऐतिहासिक परकोट पाडण्यासंबंधीचे हे प्रकरण त्यावेळी फार गाजले होते. लोकांच्या विरोधामुळे इंग्रज शासनाला हा परकोट पाडण्याची नंतर हिंमतच झाली नाही[२].

उमरावतीत पहिली राजकीय अटक व खटला : ज्या दिवशी परकोट प्रकरणी उमरावतीच्या नागरिकांची म्यु. हॉलमध्ये जाहीर सभा झाली त्याच दिवशी, म्हणजे दि. २८ जून १९०७ रोजी, सार्वजनिक ठिकाणी " वंदेमातरम् " च्या घोषणा दिल्याबद्दल उमरावतीचे श्री. जयराम पाटील व यवतमाळचे श्री. शामराव देशपांडे या दोन स्वदेशी कार्यकर्त्यांना पोलिसांनी

१ : श्री. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र: पा. ३११

२ : दादासाहेबांचे म्यु. सभासदत्व रद्द करणारा चीफ कमिश्नरचा आदेश वगैरे परिशिष्ट क्र. १ वर पहा.



चित्र फ. ८६ : उमरावतीच्या परकोटाचे दृश्य.



चित्र क्र. ८७ : बाबू अरविंद घोष (१९०८) (पृ. ३२७-२८ पहा)

अटक करून हवालातीत नेऊन बसविले होते. 'वंदेमातरम्' घोषणेसाठी म्हणजे राजकीय कारणासाठी उमरावतीत झालेली ही पहिली अटक होय. नंतर या दोघांविरूद्ध खटला भरण्यात आला.

या खटल्यात 'उमरावतीचा परकोट पाडू न देण्याविषयी जी चळवळ व सार्वजनिक सभा झाली तिच्या मुळाशी दादासाहेबच होते' हे सिद्ध करण्याचा सरकारतर्फे आटोकाट प्रयत्न झाला. हा खटला दादासाहेब खापर्डे यांनी चालविला व त्यांना तात्यासाहेब मुधोळकर यांनी सहकार्य केले होते.

अखेर दि. १६ जूलै १९०७ रोजी या खटल्याचा निकाल लागून, जयराम पाटील यांना १ रू. व शामराव देशपांडे यांना आठ आणे दंड झाला. वऱ्हाडातील या तऱ्हेचा हा पहिलाच खटला होता.

उमरावतीचे श्री. जयराम पाटील : श्री. जयराम पाटील हे बांध्याने ठेंगू होते. अंगाने पिळदार असले तरी कृशच होते. पाहिल्याबरोबर मूर्ती एकदम मनांत भरण्याजोगी नव्हती. परंतु ते मनाने जाज्वल्य देशभक्त होते. दादासाहेब खापर्डे यांचे ते अनुयायी मानले जात. सातारच्या भिडे मास्तरांच्या (भटजींच्या) तालमीत ते तयार झालेले होते आणि लाठी, काठी, दांड पट्टा, छडी, गदगा, व तलवार इत्यादीत ते कुशल होते. उमरावतीची महाराष्ट्र व्यायाम शाळा ही त्यांचे प्रतीक मानावी लागेल. त्यांचे प्रयत्नानेच ती जागा मिळाली व आखाडा उभा झाला. त्यांचा व्यवसाय इन्शुअरन्स एजंटाचा होता. ते मनाने धाडशी व निर्भय होते. बोलण्यात व वादात आपली बाजू बिनतोड मांडीत असत[१].

'वंदेमातरम्' खटल्यामुळे जयराम पाटील व शामराव देशपांडे हे एकदम प्रकाशात आले.

उमरावतीचे प्रसिद्ध दरवडेखोर : अली आणि उमर नावाचे उमरावतीचे दोन प्रसिद्ध दरवडेखोर होऊन गेलेत. पोलिसांची भीती न बाळगता ते राजरोसपणे दरवडे घालून येत असत. त्यांना नंतर सकाळ-संध्याकाळी पोलिस ठाण्यावर हजेरी द्यावी लागे. परंतु तरीही त्यांचा

---

१ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पृ. २९२

उद्योग चालूच होता. एके दिवशी उमरने सायंकाळी ठाण्यात हजेरी दिली आणि रात्रीतून नागपूरला दरवडा घालून तो सकाळी उमरावतीत परत आला, अशी त्याच्याबद्दल आख्यायिका सांगितली जाई. पुढे त्यांना हद्दपार करण्यात आले.

रायली प्लॉट म्हणून जी जागा उमरावतीत आहे व जेथे आता चार चार मजली अनेक इमारती व व्यापारासाठी मार्केटस् उभारलेली दिसतात ती शहरातील मध्यवर्ती अशी जागा त्यांच्याच मालकीची होती. त्यांना हद्दपार केले तेव्हा त्यांनी ती जागा केवळ १४ रुपयांना रॅली ब्रदर्सला विकली होती. त्यावेळी या भागात सर्व जंगल होते. वस्ती फारच तुरळक होती[1].

दोन दरवडे : उमरावतीत घबराट : उमरावतीच्या नमुना विभागात घडचाळजी या नावाने ओळखले जाणारे एक गृहस्थ राहत होते. इ. सन १९०७ मध्ये पाहुणा आहो असे सांगून एक इसम आला. व दागिन्यांची पेटी घेऊन पळाला. त्यावेळी घडचाळजी घरी नव्हते, त्यांची पत्नी एकटीच घरात होती. ती घाबरली आणि या धक्याने त्या बाईचा नंतर एक महिन्याने मृत्यू झाला.

या प्रकाराची वार्ता सर्व शहरात वाऱ्याच्या वेगाने पसरली. सर्व गावात घबराट माजली. कारण यापूर्वी असा प्रकार उमरावतीत घडला नव्हता. त्यामुळे एक महिना शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला.

त्याचवर्षी दुसरा दरवडा नोव्हेंबर महिन्यात श्री. बापट मॅजिस्ट्रेट यांचे घरावर पडला.

या प्रकारामुळे सर्व शहरात घबराट वाढली. पोलिस देखील रात्री एकटा फिरायला घाबरत असे. कारण येथील मोठे मोठे सावकार सुटले आणि इतरांचे घरावर दरवडे पडले. यावरून या घटनांचे मागे स्वदेशी चळवळचांचा हात असावा अशी शंका सरकारने घेतली होती. वरील घटनामुळे त्या वर्षी लोकांनी दिवाळी साजरी केली नाही[2].

---

१ व २ : कै. टिकेकर मास्तरांच्या आठवणी.

उमरावतीच्या कलावंतिणी

एके काळी उमरावती हे शहर मोठे रंगेल आणि रगेल होते. त्यामुळेच येथे विविध प्रांतातून उपजिविकेसाठी अनेक कलावंतिणी येऊन राहिल्या होत्या विशेषत: विसाव्या शतकाचे सुरवातीपासून तो इ. सन १९४० पावेतो, अंबागेटचे आतील भागात सीताराम बिल्डिंग ते दहिसात या रस्त्यावर, सातखिराडी रोडवर आणि साबणपुरा या भागात मिळून सुमारे ४०० कलावंतिणी राहत असत. त्याचप्रमाणे सारंगी व तबला वाजविणारे कलावंतही बरेच होते. एवढ्या मोठ्या संख्येच्या ह्या कलावंतिणींची उपजीविका नाच–गाण्यावर होई. यावरून उमरावतीच्या रंगेल जीवनाची कल्पना यावी. १९४० मध्ये जो जातीय दंगा उमरावतीत झाला त्यानंतर

बऱ्याच कलावंतिणी उमरावतीतून निघून गेल्या. उरलेल्या १९४६–४७ च्या जातीय दंगलीचे वेळी परागंदा झाल्या.

इंदूर, बंगलोर, आंध्र प्रदेश, पुणे – सातारा अशा दूरदूरच्या भागातील उत्तम गाणाऱ्या स्त्रिया या काळात उमरावतीत स्थायिक झाल्या होत्या. दररोज सायंकाळी ७ नंतर रात्री १२ पावेतो अंबागेटचे आतील रस्ता, नृत्य व संगीत गायनाचे मंजूळ स्वरांनी निनादलेला असे. उमरावतीच्या जीवनाचा हा एक भाग होता असे म्हटले तरी चालेल.

या कलावंतिणीपैकी सातारकरीण, गंगू जळगावकरीण, धोंडूबाई पुणेकर, शांताबाई जतकर, सोनूबाई आणि अफजलबाई ह्या ख्यातनाम गायिका होत्या. त्यातही वैशिष्ट्य असे की लावण्या गाण्यात धोंडूबाई पुणेकरीण, तर शास्त्रोक्त गायनात शांताबाई जतकर व श्रीमती सोनूबाई आणि ठुंबरी–गजलमध्ये श्रीमती अफजलबाई यांची ख्याती होती. गाण्याच्या याच मैफलीतून उत्तम वादकही निर्माण झालेत. त्या काळचे महान तबला वादक मरहूम अलादियाखां (त्यांचे अनेक शिष्य आजही पुणे–मुंबईकडे आहेत.) तसेच आकाशवाणीचे सुप्रसिद्ध सारंगी – वादक श्री. रमजानखां हे वरील कलावंतिणींना गाण्याचे वेळी साथ करणारे कलावंत होते. उमरावतीच्या ह्या कलावंतिणींनी – गणिकांनीच–संगीतनृत्य–कला जगविली आणि जागविली असे म्हणायला हरकत नाही. उमरावतीची एक कलावंतिण – नायकीण – गुलाबबाई ही पुढे सिनेमात नटी म्हणून काम करीत असे. सिनेसृष्टीचा तो अगदी प्रारंभीचा काळ. सिनेमात नटी म्हणून काम करायला स्त्रिया मिळत नसत. अशा वेळी उमरावतीच्या ह्या गुलाबबाईने 'नटी' होण्याचे साहस केले होते.

" ..... झुंवर नायकीणीची मुलगी अफजल अन् पापामियांच्या दोन मुली ह्या उमरावतीच्या उत्तम गायिका व नर्तिका म्हणून एका काळी खूपच गाजल्या होत्या. त्याचप्रमाणे निशाद हुसेन नावाचा उत्तम गवईही त्याकाळी खूप प्रसिद्धीस आला होता[१]. " गीत, वाद्य आणि नृत्य म्हणजे संगीत. उमरावतीत हे संगीत अनेक वर्षे अव्याहत चालू होते. गॅसबत्त्यांचे प्रकाशात, अत्तर–लवेंडराचे सुवासात, अंबागेटचे आंत संध्याकाळ अक्षरशः संगीताने न्हाऊन निघत असे.

---

१ : नगरवाचनालय : शताब्दि स्मरणिका : १९७० : पा. १९

त्याकाळी या नायकिणी–कलावंतिणींना एक प्रकारचा मानही असे. नवरात्राचे नऊ दिवस, अंबादेवीचे मंदिरात दररोज रात्री कोणत्याना कोणत्या तरी गणिकेची 'हजेरी' लागली नाही असे होत नसे[१]. तद्वतच देवीचे देवळामागील 'तकियात' मोहरमचे सणाचे वेळी देखील उत्तमोत्तम गाणारणी,–गजल–कव्वाली–ठुंबरी म्हणणाऱ्या – हजेरी देत असत. शिवाय कित्तेक सधन लोक त्यांचेकडील खाजगी समारंभाचे वेळी देखील गायन–नृत्यांचे कार्यक्रम ठेवून या गणिकांना बिदागी देत असत त्याकाळी मनोरंजनाचे साधन दुसरे नव्हते. नाटक मंडळचा मुख्यतः हंगामात उमरावतीला येत. सिनेमा नव्हताच. त्यामुळे या नृत्य–गाण्यांचे मैफिलींना मान होता. त्यास कोणी तुच्छ लेखले नाही. उमरावती ही श्रीमंत व्यापारी नगरी होती. त्यामुळे या गाणारणींना आश्रय बरा असे. म्हणूनच शेकडो गाणारणी व वादक उमरावतीला स्थायिक झाले होते. उमरावती यासाठीही एकदा प्रसिद्ध होती हे आज सांगूनही कुणास खरे वाटणार नाही. पण हे सत्य होय.

इ. सन १८९७ साली उमरावतीला काँग्रेसचे तेरावे अधिवेशन भरले तेव्हा आलेल्या मोठमोठ्या पाहुण्यांचे करमणूकीसाठी श्री. दादासाहेब खापर्डे यांचेकडे नृत्याचा कार्यक्रम घडवून आणला होता. त्याबद्दल दादासाहेबांचे डायरीत खालील उल्लेख आहे.

"रात्री मि. डब्ल्यू. सी. बॅनर्जी, मि. आनंदा चार्लू, आणि शंकरन् नायर व इतर माझ्या निवासस्थानी आले. मी त्यांच्याकरिता एक नाच करविला (नायकिणीचा) आणि काही अल्पोपहाराची व्यवस्था केली. आणि सर्वजण अत्यंत संतुष्ट होऊन परत गेले[२]."

उत्सवाचे वेळी प्रतिष्टितांचे घरी कसे कार्यक्रम होत आणि त्यात गणिकांचे काय स्थान होते त्याचेही हे वर्णन पहा–

"...इ. सन १८९८ च्या पोळा सणाचे वेळी १६ ऑगस्टला, रात्री महिपतराव पोलिस इन्स्पेक्टर एका तरुण गवयाला घेऊन माझेकडे आले. तो फार चांगला गातो अशी त्याची कीर्ती होती. मी, नामदेवबुवा आणि

---

१ : अंबादेवी संस्थानचा दि. १३-९-१९१४ चा ठराव.

२ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पान ३२

वेडेकर यांना बोलावणे पाठविले. जोगीण नावाची पूर्वी वेश्येचा धंदा करणारी बाईही आली आणि गोष्टी सांगण्याचा धंदा करणारा एक ब्राम्हणही आला, या सगळ्यात आणखी एका जलतरंग वाजवणाराची भर पडली तोही आला आणि आमच्या येथे आम्ही उत्सवाकरिता मंडळी जमविली होती त्यांच्या समोर मी एका मागून एक त्यांचे करमणुकीचे प्रयोग करविले,.....आलेल्या गवयापैकी सगळे गायले. आणि गोष्टी सांगणाराने सुरत सुधन्याचे आख्यान फार चांगले सांगितले जोगीण फार चांगली गायली[1]."

यावरून प्रतिष्टितांकडेही गणिकांच्या कार्यक्रमाची पद्धत त्याकाळी होती. त्यास कोणीही हीन लेखत नसे. उलट अशा कार्यक्रमामुळे प्रतिष्टितांचा समाजात मान वाढत असे. त्यामुळेच उमरावतीत शेकडो नृत्यांगना, कलावतिणी, गायक, वादक यांना चांगला आश्रय मिळाला होता हे दिसून येते.

उमरावतीच्या ह्यापैकी अनेक कलावंतिणींनी आपल्या वृद्धापकाळी आपली इस्टेट अंबादेवीस अर्पण केली आहे.

लाला लजपतराय[2] बंधमुक्त : उमरावतीत दिवाळी : भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील लाल, बाल व पाल ह्या त्रिमूर्ती प्रसिद्ध आहेत. लाल म्हणजे लाला लजपतराय. इ. सन १९०७ मध्ये लालाजी जेलमध्ये शिक्षा

---

१ : कॅ. दादासा. खापर्डे यांचे चरित्र : पा. ५२

२ : **लाला लजपतराय :** (जन्म १८६५ : मृ. १९२८) पंजाबचे सुप्रसिद्ध राजकारणी मुत्सद्दी, पत्रकार, वक्ते व कार्यकर्ते. लाहोरच्या डी. ए. व्ही. कॉलेजचे संस्थापक. शेतकऱ्यांना चिथवणी देतात या आरोपाखाली लालाजींना इंग्रज सरकारने मंडाले येथे हद्दपार केले होते. सहा महिन्यांनी सोडून देण्यात आले. १९२८ च्या ३० ऑक्टोंबर रोजी सायमन कमिशन लाहोरला गेले तेव्हा लालाजींच्या नेतृत्वाखाली हजारो तरुणांनी काळी निशाणे दाखविली. त्यावेळी पोलिसांनी लालाजीवर दंडुक्यांचा मारा केला व त्यांत झालेल्या जखमेमुळे अखेर त्यांचे निधन झाले. लालाजींचा खून सरकारने केला या समजूतीवरूनच पुढे सरदार भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु या क्रांतिकारकांनी, लालाजींच्या मृत्यूनंतर १ महिन्याचे आंतच, लालाजींच्या मृत्यूस जबाबदार समजल्या गेलेल्या पोलिस अधिकाऱ्याचा खून करण्याचा प्रयत्न केला होता.

भोगत होते. त्यांची सुटका त्याच वर्षी १८ नोव्हेंबरला झाली. त्या प्रीत्यर्थ उमरावती येथे त्यांचे अभिनंदनाची विराट सभा दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, इंद्रभुवन थिएटरमध्ये झाली. या सभेत लालाजींचे अभिनंदनासोबतच, काँग्रेसचे नागपूरला भरणारे अधिवेशन नेमस्तांचे अडेलतट्टू व दांडगाईचे धोरणामुळे दुसरीकडे भरवावे लागणार याबद्दल नेमस्त पुढाऱ्यावर ठपका ठेवण्यात आला होता. उत्सवाप्रीत्यर्थ गावात लोकांनी दीपोत्सव केला होता. घरोघरी चिरांगणे लावून खरी दीपावली साजरी केली होती.

त्याच महिन्याच्या २४ तारखेला इंद्रभुवन थिएटरमध्ये पुन्हा विराट जाहीर सभा होऊन, लाला लजपतराय यांनाच येत्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष निवडण्यात यावे अशी लोकेच्छा व्यक्त करणारा ठराव करण्यात आला होता[१].

बाबू अरविंद घोष यांचे उमरावतीत भव्य स्वागत. वंगभंगाच्या चळवळीला पाठिंबा देणारी प्रचंड जाहीर सभा.

तत्कालीन भारताचे गव्हर्नर जनरल, व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी दि. २० जुलै १९०५ रोजी बंगालच्या फाळणीची घोषणा केली व त्याची अंमलबजावणी दि. १६ ऑक्टोंबर १९०५ पासून करण्याचे जाहीर केले होते. या घोषणेने सारा बंगाल खवळून उठला. वंगभंगाचे आंदोलन सुरू झाले. त्यावेळी बाबू अरविंद घोष हे बडोद्याच्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते.

बंगालच्या फाळणीची घोषणा होताच अरविंद बाबूंनी‡ आपल्या प्राचार्य-पदाचा राजिनामा दिला व वंगभंगाच्या चळवळीत उडी घेतली. याच वेळी त्यांचे बंधू बारिंद्रकुमार हेही कलकत्त्यास आले होते व त्यांनी 'युगांतर' नावाचे वर्तमानपत्र सुरू करून माणिकतोळा विभागात एक आश्रम

---

१ : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पृ. ३००-३०१

‡ : **बाबू अरविंद घोष** : (जन्म १५ ऑगस्ट १८७२ : मृत्यु ४ दिसेंबर १९५०) केंब्रिज विद्यापीठाच्या उच्च परीक्षेत ते प्रथम श्रेणीने पास झाले. आय. सी. एस. परीक्षेत मात्र अश्वारोहणांत अनुत्तीर्ण झाल्याने नापास झाले होते. १९०१ मध्ये ते बडोद्याच्या कॉलेजमध्ये प्रिन्सिपॉल पदावर नियुक्त

(पुढील पान ३२८, ३२९ वर)

सुरू केला होता. हा आश्रम म्हणजे सशस्त्र क्रांतिकारक निर्माण करण्याचे केंद्र बनले होते. बाबू अरविंद यांनीही 'वंदे मातरम्' नावाचे वृत्तपत्र सुरू केले आणि वंगभंगाचे चळवळीकरिता सशस्त्रक्रांतीसाठी गुप्त संघटना, स्वातंत्र्यासाठी व जनमत तयार करण्यासाठी उघड प्रचार, स्वदेशी आंदोलन व परदेशी वस्तूवर बहीष्कार आणि निशःस्त्र प्रतिकाराच्या चळवळीस पाठिंबा ह्या कार्यक्रमाचा त्यांनी प्रचार व प्रसार चालविला होता.

या कार्यक्रमाला व वंगभंगाचे चळवळीला सर्व प्रांतातून पाठिंबा मिळविण्यासाठी देशातून त्यांनी वेळोवेळी दौरे केले. या दौऱ्यातच दि. २८ जानेवारी १९०८ रोजी बाबू अरविंद हे उमरावतीस आले होते. त्यावेळी उमरावतीच्या तरुण मंडळींनी त्यांची शहरातून मोठी मिरवणूक काढली व त्यांचा सत्कार केला होता. बाबू अरविंद हे त्याकाळी जहाल विचारांच्या तरुणांचे नेते मानले जात असत. त्यांचा मुक्काम उमरावतीला दोन दिवस होता.

झाले. परतु बंगालच्या फाळणीच्या घटनेमुळे अरविंदांनी राष्ट्रकार्यास सर्वस्वी वाहून घेतले होते.

बाबू अरविंदानी ७ ऑगस्ट १९०६ रोजी वंदेमातरम हे वृत्तपत्र कलकत्त्याहून सुरू केले. त्यांचें धाकटे बंधु बारिंद्रकुमार यांनीही युगांतर पत्र सुरू केले होते. या वंगभंगाचे चळवळीतूनच स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चळवळीची चतु सूत्री उत्पन्न झाली या चतु सूत्रीची चळवळ देशव्यापी झाली. वरील वृत्तपत्रांनी तरुणांत जागृती निर्माण केली होती.

वंगभंगाच्या चळवळीत सरकारी जुलुमाला सुरुवात होऊन त्यांत बंगालची तरुण पिढी मोठ्या प्रमाणात भाजून निघाली. याच चळवळीत बाबू वंकिमचंद्रांच्या आनंदमठ कादंबरीतील वंदेमातरम् हे राष्ट्रगीत म्हणून रस्त्याने गाइले जाऊ लागले होते.

बाबू अरविंद यांचे बंधू बारिंद्रकुमार घोष यांनी अनुशीलन समिती स्थापन करून गुप्त स्वरूपाच्या सशस्त्र क्रांतिकारी तरुणांचे संघटन उभे केले होते व त्यासाठी माणिकतोळा येथील स्वतःचे इमारतीत एक आश्रम सुरू करून तेथे बॉम्बचा कारखाना उघडण्यात आला होता.

मुजफ्फरपूर येथील एक इंग्रज मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड याने अनेक देशभक्त तरुणांना जबर शिक्षा दिल्यावरून त्याचेकडे क्रांतिकारकांचें लक्ष

इंद्रभुवन थिएटर मध्ये बाबू अरविंद यांचे जाहीर व्याख्यान झाले. त्या व्याख्यानास प्रचंड गर्दी झाली होती. नंतर दुसऱ्या दिवशी जोग चौकात त्यांचे जाहीर भाषण झाले. त्या सभेला देखील प्रचंड गर्दी होती. वंगभंगाच्या चळवळीला जनतेने पाठिंबा द्यावा असे आवाहन त्यांनी या सभेत केले होते.

वेधल्या गेले व त्याचा वध करण्यासाठी खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चाकी या दोन तरुणांची योजना क्रांतिकारकांनी केली. दि. ३० एप्रील १९०८ रोजी खुदीराम व प्रफुल्ल यांनी किंग्ज फोर्ड याची गाडी समजून त्यावर बॉम्ब फेकला. परंतु ही गाडी त्यांची नव्हती. बॉम्बने गाडीचा चक्काचूर होऊन त्यातील दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. बॉम्ब फेकणारे फरार झाले.

या प्रकरणी पोलीसांनी शोधाशोध करून खुदीरामला पकडले परंतु प्रफुल्लने पिस्तुलाने आत्महत्या करून घेतली. या केसमध्येच बाबू अरविंद घोष, त्यांचे बंधू बारिंद्रकुमार, एक महाराष्ट्रीय तरूण बाळकृष्ण काणे व इतर ३४ लोकांना अटक करण्यात आली होती. याच चौकशीत माणिकतोळा आश्रमाची झडती होऊन तेथेही बॉम्बचा कारखाना सापडला होता.

या गाजलेल्या खटल्यात बाबू अरविंद व बारिंद्रकुमार यांचे तर्फे देशबंधु चित्तरंजनदास हे वकील होते. खटला चालून त्यांत १९ लोकांना निरनिराळ्या शिक्षा झाल्या. बाबू अरविंद निर्दोष सुटले. त्यांनी नंतर पांदेचरी येथे (फ्रेंच वसाहत) योगाश्रम उघडून अध्यात्माकडे लक्ष देणे सुरू केले. बारिन्द्रकुमार यास काळ्यापाण्याची शिक्षा झाली. अंदमानचे जेलमध्ये त्यांचे अत्यंत हाल झाले. खुदीराम बोस फासावर लटकला. अलीपूर बॉम्ब केस व माणिकतोळा बॉम्ब केस या नावाने हा खटला प्रसिद्ध आहे. अरविंदाचा योगाश्रम जगप्रसिद्ध आहे.

बाबू अरविंदाच्या वंदेमातरम् मधील तेजस्वी लिखाणाने बंगाली युवकांची अंतःकरणे चेतल्या गेली होती व त्याचे पहिले स्फूर्लिंग हुतात्मा खुदीराम बोस यांनी फेकलेल्या बॉम्बमुळे पेटल्या गेले. या घटनेचे मागोमाग बंगालच्या काना-कोपऱ्यात बॉम्ब, पिस्तुले व इतर स्फोटाचे प्रतिध्वनी एकसारखे उमटू लागले होते. वंगभंगाचे चळवळीतून सशस्त्र क्रांतीचे संघटन उभे झाले व पुढे त्याचा विस्तार झाला.

लो. टिळकांसाठी, श्री. दादासाहेब खापर्डे इंग्लंडला : लोकमान्य टिळकांना दि. २२ जुलै १९०८ रोजी राजद्रोहाचे आरोपावरून मुंबई येथे शिक्षा सुनावण्यात आली. त्यावेळी मुंबईला दंगे झाले होते. लोकमान्यांचा खटला फुल बेंचसमोर यावा अशी खटपट झाली पण अर्ज नामंजूर झाला तेव्हा दाद मागण्याचा मार्ग खुंटला. शेवटी प्रिव्ही कौन्सिलकडे इग्लंडला अपील करण्याखेरीज गत्यंतर उरले नाही. त्यासाठी श्री. दादासाहेबांना तातडीने ऑगस्टमध्ये इंग्लंडला रवाना व्हावे लागले. या प्रिव्ही कौन्सिल अपीलासाठी दादासाहेबांना सुमारे दोन वर्षे इंग्लंडला राहावे लागले. (नोव्हे. १९१०) या काळात दादासाहेबांच्या घरची आर्थिक परिस्थिती फार बिघडली. दादासाहेबांनी मित्र कार्यासाठी (लो. टिळकांसाठी) फार कष्ट घेतले. हे या प्रकरणी स्पष्ट दिसून येते.

(शेवटी प्रिव्ही कौन्सिलने हा अर्ज फेटाळला. लो. टिळक सहा वर्षे मंडालेच्या जेलमध्ये होते.)

श्री. नानासाहेब गोखलेंचे सभासदत्व रद्द : इ. सन १९०९ मध्ये श्री. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले यांना, त्यांनी काँग्रेस चळवळीत भाग घेतल्याबद्दल शिक्षा झाली होती. त्यांची केस सर मोरोपंत जोशी यांनी चालविली होती.

इ. सन १९१३ साली अमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीच्या निवडणुका झाल्या. त्यांत श्री. नानासाहेब हे सर्वात जास्त मते मिळवून निवडून आले होते. परंतु या निवडीला खुद: डेप्युटी कमिश्नरनी हरकत घेतली. कारण नानासाहेबांना शिक्षा झाली होती व ते जेलमध्ये होते. शेवटी नानासाहेबांचे म्यु. सभासदत्व सरकारने रद्द केले होते.

प्रामाणिक व चोख सॅनिटरी इन्सपेक्टर : श्री. आनंदराव दिनकर या नावाचे, जातीने ख्रिश्चन असलेले एक सॅनिटरी इन्सपेक्टर उमरावती नगरपालिकेत नौकरी करीत होते. ते सकाळी ६ वाजता घोडयावर बसून गावाची साफसफाई पाहण्यासाठी निघत. प्रामाणिक व चोख काम करणारा म्हणून त्या काळी त्यांची कीर्ती होती. इ. स. १९१८ च्या इन्फ्लुएंझाचे साथीत त्यांचा मृत्यू झाला. वयोवृद्ध लोक अजूनही त्यांच्या सचोटीबद्दल प्रशंसोद्‌गार काढतात.



चित्र क्र. ८८ : महाराजा पंचम जार्ज व महाराणी मेरी. (पृष्ठ ३३१ पहा)



चित्र क्र. ८९ : कारोनेशन गार्डन. हल्लीचा कस्तूरबा बाग. (पृष्ठ ३३४ पहा)
पलीकडे नेहरु मैदान व ए. व्ही. स्कूल दिसत आहे.

नवी कोतवाली (सिटी कोतवाली) : उमरावतीची वस्ती दिवसेंदिवस वाढू लागल्याने पोलिस खात्याला सर्व शहरासाठी कोतवालीची गरज भासू लागली. त्या साठी मध्यवर्ती अशी जागा (जोर्शी मार्केट जवळ) मागण्यात आली. ती संपूर्ण जागा त्यावेळी नगरपालिकेकडे 'व्हाल्व्ह हाऊस' साठी होती. आणि सभोवार मं.ठे तारेचे कम्पौंड होते. पी. डब्ल्यू. डी. विभागाने सिटी कोतवालीसाठी या व्हॉल्व्ह हाऊस कम्पौंड मधील अर्धी जागा मागितली व ती जागा नगरपालिकेने ठराव क्र. ७ दि. २२-३-१९१० अन्वये सिटी कोतवालीसाठी दिली. त्यानंतर तेथे नवी कोतवाली किंवा 'सिटी कोतवाली' ची इमारत १९१२ चे सुमारास बांधला असे दिसते.

१९११ चा 'दरबार डे' : इ. स. १९११ मधे इंग्लंडचा राजा पंचम जार्ज यांचा राज्यारोहण सोहळा सर्व भारतवर्षात साजरा झाला. डिस्ट्रिक्ट सज्ज श्री. मॉरिश यांनी सर्व वकिलांना गाऊन तयार करावयास सांगितले. सर्व वकिलांनी ते त्वरित तयार केले. कॉटन मार्केटच्या कंपाऊंड मध्ये मोठा दरबार भरविला होता. दरबारच्या दिवशी सकाळी ७ वाजता सर्व प्रमुख न्यायधिश व सर्व वकील सभारंभपूर्वक बाररूममधून निघाले व कॉटन मार्केटपर्यंत पायी चालत गेले. सभारंभ संपल्यानंतर पायी चालत परत आले. उमरावतीच्या लोकांनी असा भव्य सभारंभ यापूर्वी कधीच बघितला नव्हता[1].

त्या दिवशीच्या दिल्ली दरबारचे समारंभ.निमित्त उमरावतीत शाळातून मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्री दिवाळी साजरी करण्यात आली आणि मनोरंजनाचे अनेक कार्यक्रम झालेत.

केडगांवचे संत नारायण महाराज : दि. १२ नोव्हेंबर १९११ रोजी श्री. संत नारायण महाराज उमरावतीला आले होते व त्यांचा मुक्काम उमरावतीला १९ नोव्हेबर १९११ पावेतो होता.

संत नारायण महाराज उमरावतीला आले तेव्हा त्यांना घ्यायला स्टेशनवर पुष्कळ लोक गेले होते. श्री. दादासाहेब खापर्डे हेही स्टेशनवर गेले होते.

---

१ : श्री रा. ब. आर. एम. खरे, ॲडव्होकेट, यांच्या आठवणी, (अमरावती बार असोसिअेशन, शताब्दी महोत्सव स्मरणिका.)

उमरावतीत असेपर्यंत संत नारायण महाराज यांचे भोवती लोकांची खूप गर्दी राहत असे[१].

दहीसात सब् पोस्ट ऑफिस : इ. स. १९१२ चे पूर्वी पासूनच दहिसातीतील विहिरीजवळ सब् पोस्ट ऑफिस होते. कारण त्या वेळी मुख्य वस्ती परकोटाचे आतच असल्याने लोकांच्या सोयीसाठी हे सब पोस्ट ऑफिस ठेवण्यात आले होते.



' मार्जीपाजार मैच पोस्ट ऑफिस ' बाबत

जाहीर विनंती

[illegible]

परंतु १९३८ मध्ये हे सब् पोस्ट ऑफिस, पोस्ट खात्याने एकाएकीच बंद केले[२]. त्यामुळे गावातील लोकांची फारच गैरसोय झाली.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र पा. ४१७

२ : उदय दि. १० फेब्रु. १९३९

पोस्ट विषयक कामासाठी हेड पोस्ट ऑफिसमध्ये जाणे भाग पडू लागले.

त्याकाळी सबंध शहरात एकूण तीन पोस्ट ऑफिसेस होती. १ हेड पोस्ट ऑफिस, २ कॅम्प सब् पोस्ट ऑफिस व ३ दहिसातीतील सब् पोस्ट ऑफिस.

पुढे १९५०–५१ मध्ये या भागात सब् पोस्ट ऑफिस असलेच पाहिजे यासाठी प्रस्तुत लेखकाने नगरपालिकेमार्फत पोस्ट खात्याकडे मागणी करायला लावली. तेव्हा "या सब् पोस्ट ऑफिससाठी जो तोटा येईल तो भरला तर हे सब् पोस्ट ऑफिस चालू करू" अशा आशयाचे उत्तर पोस्ट खात्याने दिले होते. शेवटी बरेच प्रयत्न केल्यानंतर १९५२. साली भाजी बाजारमध्ये पुन्हा सब् पोस्ट ऑफिस उघडण्यात आले व लोकांची सोय झाली. ते सब् पोस्ट ऑफिस अद्याप कायम आहे.

श्री गडगडेश्वर संस्थान : उमरावतीच्या पश्चिम–दक्षिण बाजूने माताखिडकीचे बाहेर, शेते व बागायतीचे सान्निध्यात हे महादेवाचे मंदिर कित्येक वर्षांपासून अस्तित्वात असून त्यास 'श्री गडगडेश्वर संस्थान' असे नाव आहे. कित्येक लोक त्यास 'झाडखंड महादेव' असेही म्हणतात.

महाशिवरात्रीला येथे मोठा उत्सव होतो. वनात मंदिर असल्याने अनेक लोक नित्यही दर्शनास जातात. हे मंदिर येथे पाच–सहाशे वर्षांपासून आहे असे संस्थानचे वहिवाटदार पंच श्री. गणेश केशवभट चेंडके यांचे १९२८ चे स्टेटमेंटवरून दिसते. इ. स. १८६६ पासून या मंदिराची वहिवाट श्री नंदपुरी बाबा गोसावी हे करीत असत. नंतर वहिवाटदार पंच श्री. गणेश केशवभट चेंडके, श्री. बुलाखिदास कल्याणदास, श्री. मार्तंड रामचंद्र, श्री. देवीदास अंताजी, श्री. महादेव देवीदास चिकाटे व श्री. पांडुरंग विष्णू हे होते. मौजे उमरावतीचे शेत सर्वे नं. ७९ पोटहिस्सा नं. २ या २८ गुंठे जमिनीवर हे मंदिर आहे. महादेवाची पिंड गाभाऱ्यात असून समोर सभामंडप आणि सभोवार बाग आहे.

कोरोनेशन गार्डन : इ. स. १९११ साली बादशहा पंचम जार्ज यांचा दिल्ली दरबाराचा सोहळा सर्व भारतभर साजरा करण्यात आला. शाळातून मुलांना खाऊ वाटण्यात आला. उमरावती येथेही हा सोहळा साजरा करण्यासाठी वर्गणी गोळा करण्यात आली. त्यांतून या समारंभासाठी

खर्च झाला आणि बराच पैसा शिल्लक उरला, तेव्हा त्या पैशातून १९१४ साली नेकोलेट पार्कचे एका भागात बगिचा तयार करण्यात आला व त्या बगिच्यास 'कोरोनेशन गार्डन' हे नाव देण्यात आले. हा बगिचा एके काळी फार सुंदर होता. सायंकाळी लोक तेथे बसायला जात असत. या बगिच्याला नंतर 'कस्तुरबा गार्डन' हे नाव देण्यात आले. आजही हा बगिच्या अस्तित्वात असून लोकांचे उपयोगासाठी सायंकाळी खुला असतो.

या बगिच्यात, मधोमध असलेल्या सुंदर कारंजावर संगमरवरी दगडाची पाटी असून त्यावर खालील अक्षरे कोरलेली आहेत.

"CORONATION MEMORIAL : A. D. 1911"

अ. भा. मराठा शिक्षण परिषद : इ. स. १९०९ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अधिवेशन श्री. संपतराव गायकवाड (बडोदा नरेश सयाजीराव यांचे बंधू) यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीस भरले. श्री. माधवराव देशमुख हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. त्यानंतर इ. स. १९३९ साली रावबहादूर ठुबे यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन भरले होते.

'राक्षसी महत्वाकांक्षा' : उमरावतीचे वामनराव दादा यांच्या गाजलेल्या 'राक्षसी महत्वाकांक्षा' या नाटकाचा पहिला प्रयोग उमरावती येथेच, ललितकलादर्श नाटक मंडळीने दि. ८ डिसेंबर १९१४ रोजी सादर केला. श्री. केशवराव भोसले हे त्याकाळी गाजलेले नट हेच या कंपनीचे मालक होते.

श्री. वामनराव दादाचे एक मित्र श्री. जयराम पाटील यांनी या प्रसंगी दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते वामनराव दादाना नगदी ४०० रुपये आणि एक उत्तम शाल भेट म्हणून दिली. यावेळी एक अत्यंत हृदयद्रावक अशी गोष्ट घडली ती अशी :–

नाटकाचा शेवटला अंक सुरू होण्यापूर्वी वामनराव दादाच्या सत्काराचा लहानसा समारंभ स्टजवरच करण्यात आला. दादासाहेब खापर्डे यांनी वामनराव दादासंबंधी गौरवपर भाषण करून, नगदी ४०० रुपयांनी भरलेले ताट वामनराव दादाच्या हाती दिले व अंगावर शाल टाकली.

चित्र क्र. १० : दे. भ. स्वामी शिवानंद (पृष्ठ ३३६ पहा)

वामनराव दादांचा कंठ या हृदयस्पर्शी सत्काराने भरून आला. ते उत्तरा दाखल दोन चार शब्द बोलले व हा सत्काराचा कार्यक्रम संपला.

नंतर ग्रीनरूममध्ये वामनराव दादांचे अभिनंदन करण्यासाठी बाबासाहेब खापर्डे आणि जयराम पाटील हे गेले, तेव्हा तेथे त्यांना जे दृश्य दिसले ते पाहून दोघांनाही धक्का बसला.

बाबासाहेब खापर्डे यांच्या शब्दांतच त्या हृदयस्पर्शी घटनेची हकीकत अशी आहे. ते म्हणतात–

"चारशे रुपयांनी भरलेले व भारावलेले ताट सूत्रधाराप्रमाणे पुढे धरून वामनराव उभे होते. नाटकातील वेषधारी पात्रें आपापल्या वेषात उभी होती. वामनरावांच्या समोर पुरोहित नावाचे, आमच्या परिचयाचे गृहस्थ उभे होते आणि संवाद चालू होता. पुरोहित वामनरावांना म्हणत होते 'माझे तुझ्याकडे येणे आहे त्याच्या फेडीत हे सगळे चारशे रुपये आत्ताचे आत्ता मला दे' वामनरावांना पुरोहितांचे देणे आहे हे मला किंवा जयराम पाटलांना माहीत नव्हते. 'तुमचे घेणे असेल तर सध्या काही रक्कम यापैकी घ्या. फार तर निम्मे घ्या. पण वामनरावांकरिता काही तरी राहू द्या, असे मी व इतरांनी अनेक प्रकारे पुरोहितांना सांगितले. पण सर्व रक्कम घेण्याचा हट्ट त्यांनी सोडला नाही. अखेर वामनरावांनी सर्व रक्कम जशीच्या तशी, तिला स्पर्शही न करता, पुरोहितांच्या पदरात ओतली. 'पदरात ओतली' हे अक्षरशः सत्य आहे. पुरोहितांनी आपले वस्त्र पुढे केले व तोंडावाटे अक्षर न काढता वामनरावांनी त्या ताटातले सर्व रुपये (कलदार) त्यांत ओतले. जयराम पाटील पाहतच राहिले. वामनरावांच्या औदार्याची मला कमाल वाटली. पुरोहितांसारखे नीच वृत्तीचे निकष नसते तर, औदार्याच्या सोन्याचा भाव जगाच्या बाजारात चढू लागला नसता हेही खरेच आहे.

यावेळी वामनराव दादांची आर्थिक परिस्थिती फार हलाखीची होती. अशाही अवस्थेत दादांनी जे औदार्य दाखविले ते, पुढे जन्मभर त्याच फकिरी वृत्तीनें त्यांनी जी देशसेवा केली, त्याची ही नांदी होती[१]."

१९०८ मध्ये वामनराव दादावर नागपूर येथे राजकीय खटला झाला होता.

---

१ : कै. दादासा. खापर्डे चरित्र पा. ४६१

देशभक्त स्वामी शिवानंद : स्वामी शिवानंद यांचे पूर्वाश्रमीचे नाव गणपतराव देशमुख. त्यांचे बंधु सदाशिवराव देशमुख हे अंबागेटच्या आत राहत असत. राष्ट्रीय पक्षाचे दैनिक 'संदेश' चे ते एजंट होते.

श्री. गणपतराव देशमुख हे उमरावती नगरपालिकेत क्लार्क होते. आणि पुढे उमरावती येथील गोपाळराव उर्फ बाबासाहेब बेडेकर यांनी जी उमरावतीकर संगीत नाटक मंडळी काढली त्यात गणपतराव तबला वादनाचे काम करीत असत. बाबासाहेब बेडेकर हे देखील नगरपालिकेत क्लार्क होते.

गणपतराव जरी क्लार्क होते, तरी त्यांचा पोषाख मात्र असा असे की, ते क्लार्क आहेत हे सांगूनही कोणास खरे वाटत नसे. पांढरे शुभ्र इस्त्री केलेले कपडे ते वापरीत. डोक्यावर मखमलीची टोपी ठेवीत आणि कपड्यास अत्तर लावीत.

अशा या छानछोकी माणसाचा स्वामी शिवानंद झाला ही मोठी मनोरंजक हकीकत आहे. अमरावतीस त्याकाळी योगानंद स्वामी या नावाचे सत्पुरुष संन्यासी होऊन गेले. त्यांचे वास्तव्य अंबादेवीचे मंदिराशेजारी एका वाड्यात असे. गावातील बरेचशे सुशिक्षित लोक स्वामी योगानंदाचे शिष्य झाले होते. स्वामी योगानंदांचा संबंध १८५७ चे स्वातंत्र्य युद्धात होता अशी त्यांचेबद्दल बोलवा होती.

योगानंदांचो शरीर–प्रकृती मजबूत होती. त्यांच्या दर्शनाला जाणारे त्या आनंदी वातावरणात रमून जात. स्वामी योगानंदांच्यामुळे गणपतरावांचा क्रांतिकारकांशी संबंध आला. स्वदेशी चळवळीचे काळात एके दिवशी गणपतरावांनी स्वामीजींचा उपदेश ग्रहण करून संन्यास घेतला. आणि स्वामी शिवानंद हे नाव धारण केले. नंतर स्वामी शिवानंद यांनी हिरिरीने स्वदेशी चळवळीत संगीत व्याख्याने राजकीय विषयावर द्यावीत. त्यांचा आवाज गोड होता. त्यामुळे त्यांची व्याख्याने लोकांना आवडत. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली.

त्याकाळी भारताचे व्हॉइसराय लार्ड मिंटो व भारतमंत्री (सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया) सर जॉन मोर्ले हे होते.

स्वामी शिवानंदांनी या सर्वोच्च अधिकाऱ्यावर कविता रचल्या. "लार्ड मोर्ले, कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले तरी ते कडूच कडू" आणि "अरे, अरे एडवर्डा तुझा अंमल मोठा करडा. कुठे गेले तुप, मिळेना ज्वारीचा हुरडा" अशी त्या कवितांची सुरूवात होती. ह्या पदावरूनच स्वामी शिवानंदांवर खटला भरला गेला. आणि त्या खटल्यात त्यांना आठ वर्षाची सश्रम शिक्षा देण्यात आली. पण ती पुढे साधी शिक्षा झाली.+

स्वामी शिवानंदांनी, दादासाहेब शेवडे, वीर वामनराव, बाबासाहेब खापर्डे यांच्या बरोबर होमरूल च्या चळवळीकरिता वऱ्हाडभर दौरे काढले. ते टिळक-खापर्डे यांचे भक्त होते आणि हाडाचे खरे देशभक्त होते. म्हातारपणी त्यांना अत्यंत दारिद्र्यात दिवस काढावे लागले. परंतु त्यांनी आपला राष्ट्रीय बाणा सोडला नाही.[१]

उमरावतीचा गणेशोत्सव : इ. स. १९१४ मध्ये उमरावतीच्या ब्रम्हविद्यामंदिरात सालाबादप्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात आला होता.

त्या निमित्त झालेल्या कार्यक्रमात कीर्तन, पुराण, भजन, मंत्रजागर वगैरे होऊन रा. माधवराव अणे यांचे 'हिंदुस्थान विषयी स्फुट विचार' या विषयावर भाषण झाले. तसेच श्री. अण्णासाहेब हरकरे यांचे 'भगवान श्रीकृष्ण,' श्री. दादासाहेब खापर्डे यांचे 'वेदान्ताचा पहिला धडा' या विषयावर व्याख्याने झालीत. प्रो. मौलाबक्ष यांचे शिष्य नामदेवबुवा व प्रो. अब्दुल करीम यांचे शिष्य श्री नारायणराव टिळक यांनी उत्सवातील गायनाचा

+... १९०७ साली स्वदेशीवर पंधरावीस पदांचे काव्य रचून ते प्रसिद्ध केल्याबद्दल उमरावतीचे स्वामी शिवानंद यांचेवर १२४-अ कलमाखाली खटला होऊन त्यांना ७ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. दिल्ली दरबारचे प्रसंगी जबलपूर जेल मधून, शिक्षेची मुदत संपेपर्यंत वऱ्हाडचे हद्दीत पाय ठेवू नये या अटीवर त्यांना मुक्त करण्यात आले. स्वामीजींना अंदमान न दाखविता उमरावती, नागपूर, अलाहाबाद, बनारस जबलपूर इ. प्रमुख तुरुंगामध्येच सरकारने काळ्या पाण्याची शिक्षा भोगावयास लावली म्हणतात. (केसरी दि. २९ दिसेंबर १९१४ पान ७)

१ : दै. हिंदुस्थान : दिवाळी अंक १९७३ पृ. ४२-४३

कार्यक्रम पार पाडण्याचे कामी चांगली मदत केली. याप्रमाणे अनेक विद्वान व गुणी मंडळींनी गणेशोत्सवाचा कार्यक्रम एक दिलाने पार पाडला होता.

भुसारी गेट बाहेरील गणेशोत्सवात देखील कीर्तन, पुराण, गायन वगैरे कार्यक्रम झाले होते व उत्सव थाटाने पार पडला[1].

स्त्रियांचा गायन वादनाचा जलसा : दि. ३ दिसेंबर १९१४ रोजी गणेश नाटक गृहात ' स्त्रियांच्या गायन वादनाचे जलशाचा ' कार्यक्रम झाला होता. या जलशाचे खर्च वजा जाता रु. ६०० उत्पन्न आले ते, शहरातील आंधळे, पांगळे लोकांना थंडीचे निवारणार्थ उबदार कपडे देण्यासाठी खर्च करण्याचे जाहीर करण्यात आले होते.

हा जलसा पुरुष वर्गाच्या मदतीची अपेक्षा न करता, केवळ स्त्रियांनीच पार पाडला होता, हे त्याचे वैशिष्ट्य होते. व्यवस्था करणाऱ्या सर्व स्त्रियाच होत्या.

प्रथमत: मॅजिक लॅटर्न दाखविण्यात आला होता. व नंतर, विलायतेहून बॅरिस्टर होऊन आलेले रा. भास्करराव काणे यांच्या युरोपियन पत्नी सौ. इंदिराबाई काणे यांनी व्हायोलिन व मॅंडोलिन वादन केले. नंतर येथील फिमेल हायस्कूल व नार्मल स्कूल मधील मुलींनी काही गद्य – पद्य मिश्रित संवाद करून दाखविले, त्यानंतर ईशस्तवनपर पद्याचे गायन व निबंध वाचन होऊन हा समारंभ संपला[2].

रा. ब. मुधोळकर : उमरावतीचे रा. ब. रंगनाथ नृसिंह मुधोळकर[3] वकील, यांचे अध्यक्षतेखाली इ. स. १९१२ चे काँग्रेस अधिवेशन बांकीपुरा

---

१ : केसरी दि. ८ व २२ सप्टेंबर १९१४

२ : केसरी दि. ८ दिसेंबर १९१४

३ : **श्री. रं. न. मुधोळकर** : (जन्म १८५७ इ. मृ. १९२१ इ.) शिक्षण धुळे व मुंबई येथे झाले. उमरावतीला वकिली करीत. वऱ्हाडातील सुप्रसिद्ध पुढारी व काँग्रेस भक्त. अलाहाबाद काँग्रेस (१८८८) मध्ये त्यांनी पोलिस खात्याच्या सुधारणासंबंधीचे ठरावावर भाषण केले होते. औद्योगिक शिक्षण या विषयावर त्यांचा विशेष जोर होता. उमरावतीचे व्हिक्टोरिया बेरार

(पुढील पानावर)

येथे भरले होते. काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान उमरावतीचे नागरिकास मिळाला आहे.

मध्यप्रांत वऱ्हाडचें कायदे कौन्सिल : वऱ्हाड मध्यप्रांताला इ. स. १९०४ मध्ये जोडण्यापूर्वी वऱ्हाड हा कमिश्नरीचा प्रांत होता. मध्यप्रदेशाला जोडल्यानंतर मध्यप्रांत–वऱ्हाड हा चीफ कमिश्नरचा प्रांत झाला व नंतर गव्हर्नर हा अधिकारी या प्रांतावर नेमण्यात आला होता. इ. स. १९१३ साली मध्यप्रांत वऱ्हाडचे कायदे मंडळ स्थापन झाले व त्याबाबतचा जाहीरनामा दि. ८ नोव्हेंबर १९१३ रोजी प्रसिद्ध झाला होता. या कायदे मंडळाची पहिली बैठक दि. १७ ऑगष्ट १९१४ रोजी भरली, त्याच्या ८–१० दिवसांपूर्वीच पहिल्या जागतिक युद्धाला सुरुवात झाली होती.

या मध्यप्रांत–वऱ्हाडच्या पहिल्या कायदेमंडळावर उमरावतीचे रा. ब. रंगनाथ नृसिंह मुधोळकर व श्री. मोरोपंत जोशी हे सभासद होते. त्यावेळी या कायदेमंडळावर वऱ्हाडचे एकूण तीन प्रतिनिधी असत. त्यापैकी वऱ्हाडातील नगरपालिकातर्फे एक, जिल्हाबोर्डातर्फे एक आणि जमीनदार वर्गातर्फे एक असे तीन निवडले जात[१].

(मागील पानावरून)
टेक्नीकल स्कूल त्यांच्या प्रयत्नानेच सुरू झालेले आहे. उमरावती नगरपालिकेचे पहिले गैरसरकारी अध्यक्ष. १९१२ च्या बांकिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष. त्याकाळी नेमस्तात हे प्रमुख समजले जात. नागपूरला ॲलडिशन ज्युडिशिअल कमिश्नरचे जागेवर १९२० साली नियुक्त झाले होते. १९१३–१४ मध्ये मध्यप्रांत–वऱ्हाडचे कायदे मंडळावर सभासद म्हणून वऱ्हाडतर्फे निवडले गेले. इ. स. १८९० साली काँग्रेसने इग्लंडला जे प्रतिनिधी मंडळ पाठविले होते. त्यात मुधोळकरांचा समावेश होता. अनेक लोकोपयोगी कामे केली. उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेज (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) च्या स्थापनेचे श्रेयही त्यांनाच आहे. उमरावती येथे इ. स. १८९७ साली काँग्रेस अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनाचे यशाचे श्रेय त्यांना आहे. राष्ट्रीय औद्योगिक परिषदेचे ते १९०६ पासून दहा वर्षे जनरल सेक्रेटरी होते. उमरावतीचे विकासात रा. ब. तात्यासाहेब मुधोळकर यांचा मोठा वाटा आहे.

१ : काँग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास : १९३५ पा. ५८-५९

पहिले जागतिक महायुद्ध : दि. ४ ऑगस्ट १९१४ पासून पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले[१]. हे महायुद्ध युरोपच्या भूमीवर आणि अरबस्थान-तुर्कस्थान या भागात चालू होते. त्यामुळे प्रत्यक्षात जरी हिंदुस्थानाला युद्धाची झळ पोचली नाही तरी या महायुद्धासाठी भारतातून १२ लाख रिक्रूट्स्, कोटयावधी रुपयांची माल-सामुग्री-आणि मदत केल्या गेली होती.

ह्या युद्धात काँग्रेसने ब्रिटिश शासनाला मदत केली व युद्धास पाठिंबा जाहीर केला होता. अमरावती शहरात रिक्रूट भरती केंद्र होते. वॉरलोन्स (युद्धकर्ज) शेतकऱ्यांना तहसिलदारामार्फत सक्तीने देण्यात आले होते. त्याकाळी वृत्तपत्रे फारच कमी होती. इतर बातम्या देणारी साधने मव्हतीच. तरीही युद्धस्य वार्ता रम्या या उक्तीनुसार, त्यावेळी युद्धाच्या

---

१ : **पहिले जागतिक महायुद्ध** : युगोस्लाविया सेरोजेव्हा नावाचे शहर आहे. दि. २८ जून १९१४ रोजी या ठिकाणी आस्ट्रिया-हंगेरी साम्राज्याचा युवराज आर्चडयुक फ्रांझ फर्डिनांड याचा खून झाला. या खुनामधूनच पहिले जागतिक महायुद्ध भडकले. हे महायुद्ध चार वर्षे तीन महिने व अकरा दिवस चालले होते. एकूण तीस राष्ट्रे त्यात ओढल्या गेली होती. चार साम्राज्ये या युद्धामुळे उलथून पडली तर सात नवी राष्ट्रे जन्माला आली. १ कोटी ३० लक्ष सैनिक या युद्धकाळात धारातीर्थी पडले. आणि तेवढेच नागरिक अन्नान्नदशा, रोगराई व क्रांत्या यांना बळी पडले. संपत्तीचा विध्वंस किती झाला याची मौजदाद अशक्य झाली. या युद्धात हिंदुस्थानने आपले लक्षावधी सैनिक ओतले होते. युद्धाची सुरवात इ. सन १९१४ च्या ऑगस्ट महिन्यातील पहिल्या आठवडयात झाली आणि त्याची अखेर दि. ११ नोव्हेंबर १९१८ रोजी सकाळी ११ वाजता झाली. या युद्धासाठी भारताने बारा लक्ष रिक्रूटस् पुरविले होते. आणि व्हिक्टोरिया क्रॉस हे शौर्याचे सर्वोच्च पदक मिळविण्याचा पहिला मान १२९ 'बलुच रेंजिमेंट मधील शिपायी खोदादाद या हिंदी सैनिकास मिळाला. दुसरा व्हिक्टोरिया क्रॉस ३९' गढवाल रायफल्स मधील नाईक दरवारसिंग नेगी याला आणि तिसरा गढवाल पलटणीचा गोबरसिंग नेगी व चवथा क्रॉस गुरखा पलटणीचा कुलवीर थापा यास मिळाला. या युद्धात भाग घेणाऱ्या हिंदी सैनिकांना एकूण १६ व्हिक्टोरिया क्रॉस व ९९ मिलिटरी क्रॉस मिळाले (पहिले महायुद्ध : दि. वि. गोखले : पा. १,२०८, ३६४-६५, २६६, २७२, २७७)

म्हणून ज्या काही बातम्या भारतात येत, त्या सर्वत्र पसरत असत. उमरावतीतही या युद्धाचे बातम्यावर लोक चर्चा करीत असत.

युद्धामुळे साहजिकच महागाई वाढली, टंचाई निर्माण झाली. उमरावतीकरांना ती जाणवली पण ब्रिटिशांची लोकांना भीती फार वाटत असे. सरकार विरूद्ध उघड बोलणे कठीण होते. लोकमान्यांचे केसरी हे एकच वृत्तपत्र प्रामुख्याने त्याकाळी वाचले जात असे.

या युद्धकाळातच इ. स. १९१७ साली व्हाइसरॉयने दिल्लीत भरविलेल्या युद्धपरिषदेला म. गांधी स्वत: हजर राहिले (लो. टिळक, बेझंट बाई व अलीबंधू यांना मात्र या परिषदेचे निमत्रण नव्हते.) व जुलै १९१८ मध्ये सुद्धा त्यांनी रिक्रूट भरती मोहीम चालवून गुजरातच्या शेतकऱ्यांना 'सैन्यात दाखल होऊन स्वराज्य मिळवा' असा उपदेश केला होता[1]. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या या विचाराचा व धोरणांचा लोकात त्याकाळी बराच वादविवाद होत असे. उमरावती त्याला अपवाद नव्हती. या युद्ध काळातच ७ नोव्हेंबर १९१७ रोजी रशियातील जगद्विख्यात ऑक्टोबर क्रांती घडून आली.

ब्रिटिशांच्या विजयासाठी प्रार्थना : इ. सन १९१५ सालचा पहिला रविवार, दि. ३ जानेवारी रोजी, सर्व धर्मातील नागरिकांतर्फे युद्धात ब्रिटिशांचे विजयासाठी उमरावतीत प्रार्थना करण्यात आल्या. अनेक मंदिरे, मसजिदी, चर्च वगैरे पूजास्थानातून त्या दिवशी प्रार्थना करण्यात आल्या होत्या.

पुन्हा प्लेग : पहिल्या जागतिक महायुद्धाचे काळातच म्हणजे एप्रील १९१५ मध्ये उमरावतीस पुन्हा 'प्लेग' सुरू झाला. त्यापूर्वीच्या प्लेगचे साथीचे वेळी जो अनुभव आला होता त्यामुळे यावेळी लोक सावध होते. प्लेगची सुरवात होताच लोकांनी आपली निवासस्थाने रानावनात केलीत. कित्येक लोक परगावी गेलेत. तरीही शहरातील व्यवहार चालू असत.

लोकमान्यांचा हीरक महोत्सव : दि. २३ जुलै १९१६ रोजी लोकमान्य टिळकांचे एकसष्ठाव्या वाढ–दिवसानिमित्त त्यांचा हीरक महोत्सव साजरा करण्याचे ठरले होते व या प्रसंगी लोकमान्य टिळकांना एक थैली जनतेतर्फे अर्पण करण्याचा निर्णय झाला होता. त्यासाठी श्री. न. चि.

---

१ : आजचा हिंदुस्थान : रजनी पामदत्त: १९४६ : पा. ३१९

केळकर हे उमरावतीस आले. श्री. दादासाहेब खापर्डे आणि श्री. केळकर यांनी फिरून टिळक फंड उमरावतीतून गोळा केला होता. त्याकाळी उमरावतीला लोकमान्य टिळकांच्या अनुयायांची संख्या जास्त होती. दादासाहेबांनी टिळक फंडाला रु. २००० दिले[१].

प्रांतिक राजनैतिक परिषद : दि. ७ व ८ नोव्हेंबर १९१६ रोजी उमरावतीला डॉ. हरिसिंग गौर (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रांतिक राजनैतिक परिषद' भरली होती. सर मोरोपंत जोशी हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते.[२]

खापर्डे व मुधोळकर खटका : स्वागताध्यक्ष सर मोरोपंत जोशी यांनी आपल्या भाषणात डॉ. ॲनीबेझंट बाईंचा, त्यांनी हिंदुस्थानच्या स्वराज्याकरिता केलेल्या कामगिरीबद्दल गौरवपूर्ण असा उल्लेख केला, ही गोष्ट अनेकांना खुपली. (ही परिषद मुख्यतः नेमस्त पक्षाचे लोकांची होती) ..... श्री. दादासाहेब खापर्डे हे प्रकृती ठीक नसतानाही अनेकांच्या आग्रहावरून या परिषदेला उपस्थित राहिले होते.

परिषदेत पहिल्याच दिवशी रा. ब. मुधोळकरांचे भाषण झाले तेव्हा दादासाहेबांनी त्यांचे भाषणाला (त्यांचे विधानाला) विरोध दर्शविला. रा. ब. मुधोळकरांना त्याचा राग आला. पण नंतर मुधोळकरांचे भाषणात उपस्थित श्रोत्यांकडून सतत अडथळे आणल्या गेले होते. शेवटी मुधोळकरांना आपले भाषण थांबवणे भाग पडले[३]

या परिषदेत प्रांतिक कार्यकारी मंडळ (मंत्री मंडळ) असावे, कौन्सिलात गैर सरकारी सभासदांचे बहुमत असलेले तीस प्रतिनिधी असावेत व प्रेस ॲक्ट रद्द व्हावा इत्यादी ठराव मंजूर झाले होते.

श्री. बी. पी. वाडिया : या प्रांतिक राजनैतिक परिषदेचे नंतर त्याच महिन्यात उमरावतीला, श्री. बी. पी. वाडिया हे आलेत व त्यांचे राजकारणावर व्याख्यान झाले. ते इतके सुंदर, विचार परिप्लुत व वक्तृत्वपूर्ण झाले की, त्यांचे भाषणाचा परिणाम, असा झाला की, नेमस्तांच्या नुकत्याच उमरावतीत भरलेल्या प्रांतिक परिषदेतील झालेली भाषणे व ठराव हे फारच मवाळ स्वरूपाचे होते, असे लोकांना वाटू लागले.

१, २ व ३ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. २९७–९८

उमरावतीत होमरूल लीगची स्थापना : लोकमान्य टिळकांनी होमरूल लीगची स्थापना करण्यासाठी दि. २२ दिसेंबर १९१५ रोजी पुण्याला सार्वजनिक सभेचे सभागृहात श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा भरविली होती. या सभेतच होमरूल लीगची स्थापना करण्यात आली. या सभेला सुमारे २०० जहाल (नॅशनॅलिस्ट) लोक हजर होते. लो. टिळक हेही उपस्थित होते[१].

नंतर दिसेंबर १९१६ साली लखनौ येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये डॉ. ॲनी बेझंट बाईंचा होमरूलचा ठराव मंजूर झाला होता.

या होमरूल लीगची स्थापना उमरावतीला करण्यात आली होती व या संस्थेचे सुरुवातीचे सभासद म्हणून सर्वश्री बी. जी. खापर्डे, जी. एस्. खापर्डे, एस्. व्हि. गोखले, एस्. के. दुराणी, एस्. व्हि. पुणतांबेकर, टी. एल्. शेवडे, जी. एम्. डोरले, एस् बी. तांबे, डी. व्ही. हरकरे, डॉ. डब्ल्यु. आर. शहाणे, एन्. एम् वेदरकर व डॉ. डब्ल्यु. आर. भट[२]. यांनी होमरूलच्या प्रतिज्ञापत्रावर सह्या करून ते या लीगचे सभासद झाले होते.

लोकमान्यांचे उमरावतीत आगमन : श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या नातीचे लग्नानिमित्त लो. बाळ गंगाधर टिळक हे दि. ७ फेब्रुवारी १९१७ रोजी उमरावतीला आले होते. त्यावेळी उमरावती भागात प्लेग चालू होता. तरीही दि. ८ फेब्रुवारी रोजी जोग चौकात भरलेल्या मोठ्या सभेत त्यांचे भाषण झालें. या सभेसाठी जोग चौकात खास ब्यासपीठ उभारण्यात आले होते.

मंडाले तुरुंगात सहा वर्षांची शिक्षा भोगून लो. टिळक १९१४ साली सुटले होते व त्यामुळे त्यांची लोकप्रियता आणि राजकीय वजन वाढले होते. अशा स्थितीत त्यांचे १९१४ नंतर उमरावतीत प्रथमच आगमन झाले असल्याने उमरावतीत त्यांना ठिकठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या व त्यांचा मोठा मान सन्मान करण्यात आला होता.

---

१ : कै. दादासा. खापर्डे चरित्र : पा. ४७३

२ : होमरूल लीग–प्रतिज्ञापत्र–परिशिष्ट क्र. ४ पहा.

बिगार–बलुत्याचे प्रथे विरुद्ध चळवळ : इ. स. १९१७ मधे दादासाहेब खापर्डे यांचे नेतृत्वाखाली बिगार–बलुत्यांचे पद्धतीविरुद्ध संघटित चळवळ उभारण्यात आली. पुढे १९२० चे जानेवारीत श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे संपादकत्वाखाली 'उदय' साप्ताहिक सुरू झाले. कुणावरही सक्तीची बिगार लादल्या गेली की लगेच नाव निशीवार त्याची माहिती 'उदय' मधून प्रसिद्ध होई. बाबासाहेब खापर्डे, बॅरि. रामराव देशमुख, शेवडे वकील, वीर वामनराव दादा, मोहरील वकील, भागवत वकील इत्यादी तत्कालीन तरुणांनी या बिगारीविरूद्ध जाहीर आंदोलन उभारले व त्यासाठी खेडोपाडी दौरे काढले. या आंदोलनाने हळू हळू बिगार पद्धत बंद झाली व बलुत्यांना[1] हक्क मिळू लागले. त्या बरोबरच संघटित चळवळींच्या शक्तीविषयी जनतेत आत्मविश्वास निर्माण झाला.

लेजिस्टेटिव्ह कौन्सिलसाठी
श्री. दादासाहेब खापर्डे यांची निवड

इ. स. १९१७ सालीच सुप्रीम लेजिस्टेटिव्ह कौन्सिलसाठी, मध्यप्रांत वऱ्हाड मतदार संघातून एका जागेची निवडणूक व्हावयाची होती. त्यावेळी दिल्लीच्या लेजिस्टेटिव्ह कौन्सिलसाठी सबंध वऱ्हाड – मध्यप्रांतातून फक्त एकच प्रतिनिधी निवडला जात असे.

लो. टिळकांनी डॉ. मुंजे यांना पत्र पाठवून या जागेसाठी श्री. दादासाहेब खापर्डे यांना उभे करावे असा सल्ला दिला होता. त्याप्रमाणे दादासाहेबांचा अर्ज भरण्यात आला. त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार श्री. दादाभाई हे नागपूरचे धनाढ्य गृहस्थ उभे होते व त्यांना सरकारचा पाठिंबा होता. डॉ. गौर यांनीही या जागेसाठी उमेदवारी अर्ज भरला होता.

---

१ : **बलुतेदार** :– १ वाढी, २ खाती (लोहार), ३ गारपगारी, ४ महार, ५ चांभार, ६ कुंभार, ७ म्हाली, ८ वठ्ठी, ९ गुरव (मंदिरासाठी). १० जोशी, ११ भाट, १२ मुल्ला. वस्तीला ही मंडळी असलीच पाहिजे. त्याचेच नाव वस्ती.

अलुतेदार :– १ सोनार, २ जंगम (लिंगायत गुरू), ३ मांग, ४ शिंपी ५ तेली, ६ कोळी, ७ गोसाई, ८ कुरकी, ९ बारी, १० गोंधळी

चित्र क्र. ९१ । (पृष्ठ ३४५ पहा)

श्री वाय. जी. उर्फ अण्णासाहेब देशपांडे, वकील
(कायदे मंडळाचे होमरुल लीगचे सभासद.)

परंतु शेवटी त्यांनी आपली उमेदवारी श्री. दादाभाई यांच्यासाठी वापस घेतली होती व त्यामुळे दादासाहेब व दादाभाई यांचेत सरळ सामना होऊन त्यात दादासाहेब खापर्डे हे दि. १२ नोव्हेंबर १९१७ रोजी विजयी घोषित करण्यात आले होते[१].

त्याच सुमारास मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदे कौन्सिलाच्या निवडणूकाही पार पडल्या होत्या व त्यांत उमरावतीचे सर्वश्री श्री. ब. तांबे वकील आणि वाय्. जी. देशपांडे हे दोन होमरूल मेंबर निवडून आले होते[२].

होमरूल लीगचे डेप्युटेशन इंग्लंडला : इ.स. १९१८ च्या मार्च महिन्यांत लो. टिळकांचे नेतृत्वाखाली इंग्लंडला होमरूल लीग तर्फे एक डेप्युटेशन नेण्याचे ठरले होते व त्यांत उमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांचा समावेश होता. त्यासाठी दि. २२ मार्च १९१८ रोजी श्री. दादासाहेब खापर्डे हे उमरावतीहून रवाना झाले तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी स्टेशनवर ५०० लोक हजर होते. श्री. वामनराव जोशी व श्री. बामणगावकर हेही दादासाहेबासोबत पुण्यापर्यंत गेले होते[३].

हे डेप्युटेशन भारतातून निघाले खरे पण ते इंग्लंडला पोचलेच नाही. कारण सरकारने या डेप्युटेशनमधील सर्वांचा पासपोर्ट रद्द केला, तेव्हा या डेप्युटेशनमधील लोकांना कोलंबोवरून परत यावे लागले होते.

काँग्रेस डेप्युटेशन : पुढे काँग्रेसचे एक डेप्युटेशन इ.स. १९१९ मध्ये इंग्लंडला गेले. त्यांत लो. टिळकांसोबत दादासाहेब खापर्डे हे होतेच, दि. ८ जुन १९१९ रोजी दादासाहेब खापर्डे हे लंडनला पोचले. तेथे लो. टिळक वगैरे पुढारी अगोदरच पोचले होते. सुमारे सहा महिने हे डेप्युटेशन इंग्लंडमध्ये होते. दि. १५ जानेवारी १९२० रोजी दादासाहेब खापर्डे इंग्लंडहून भारतात परत आले[४].

---

१ : कै. दादासा. खापर्डे चरित्र : पा. ५०५, ५११

२ : काँग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास १९३५ : पा. ६०

३ व ४ : कै. दादासा. खापर्डे चरित्र : पा. ५२४, ५५४, ५६९

महायुद्ध समाप्त झाल्याचा नगरपालिकेला आनंद : पहिले जागतिक महायुद्ध दि. ११ नोव्हेंबर १९१८ रोजी संपले+ व त्याबद्दलची माहिती डे. कमिश्नरने उमरावती टाऊन म्यु. कमेटीला तारेने कळविली. तेव्हा उमराबती नगरपालिकेने खालील ठराव दि. १८ नोव्हेंबर १९१८ च्या सभेत मंजूर केला होता.

"युद्ध समाप्त झाल्याचे ऐकून आम्हास अत्यंत आनंद होत आहे. मित्र राष्ट्रांच्या या निर्णायक विजयाबद्दल आम्ही ब्रिटिश सैनिक व भारतीय सैनिक यांचे, त्यांनी दाखविलेल्या शौर्य-धैर्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतो. जागतिक शांततेच्या दृष्टीने जर्मनांचा पराभव आणि ब्रिटिशांचे उज्ज्वल यश वाखाणण्यासारखे आहे.

हा ठराव चीफ कमिश्नरांनी, भारत सरकार व ब्रिटिश सरकार यांना कळवावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

हा ठराव तारेने चीफ कमिश्नरांकडे पाठवावा व ठरावाची प्रत डे. कमिश्नरांकडे पाठवावी असा आदेश देण्यात येत आहे." हा ठराव श्री. बी. जी. खापर्डे यांनी मांडला व त्यास रा. सा. के. व्ही. ब्रम्ह यांनी अनुमोदन दिले होते. ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला होता.

युद्ध आणि १९१८ चा इन्फ्लुएंझा : ".....युद्धाच्या खर्चासाठी हिंदुस्थानच्या दारिद्र्य पीडित जनतेच्या माथ्यावर फारच असह्य बोजा बळजबरीने लादण्यात आला होता. त्याच वेळी महागाई एक सारखी वाढत.

+ पहिले जागतिक महायुद्ध ऑस्ट्रियन युवराज फर्डिनॉन्ड यांच्या खुनातून भडकले. फर्डिनॉन्ड याचा खून करणारा ग्रॉब्रिएल प्रिन्सिप नावाचा इसम होता. या खुनी इसमाचे स्मारक 'स्वातंत्र्य पुकारणारा' म्हणून व तसे शब्द एका शिलेवर कोरून, त्याचा समारंभ जाहीरपणे १९३० मध्ये करण्यात आला होता.

ज्या खुनाने लक्षावधी लोकांचे रक्त सांडले, बलाढय राष्ट्रे कंगाल झालीत आणि फार मोठा विनाश घडला, त्या खुनी इसमाचे 'स्वातंत्र्य पुकारणारा' म्हणून युरोपात गौरव होतो, त्याचे स्मारक केले जाते. यावरून युरोपिय मनोवृत्तीचा पत्ता लागतो.

होती व बेसुमार नफेबाजीचा नंगानाच सुरू झाला होता. या सर्व गोष्टीमुळे बहुजन समाजाची परिस्थिती फारच हलाखीची झाली. त्याचाच एक भयानक परिणाम म्हणजे युद्धाचे अखेरीस इन्फ्ल्युएंझाची भयंकर साथ पसरून तिच्यात १ कोटी ४० लक्ष लोक प्राणास मुकले.....१" ही सर्व देशाची अवस्था होती. त्यांतून उमरावती शहर कसे अलिप्त राहणार ? येथेही इन्फ्ल्यूएंझाच्या साथीने शेकडो बळी घेतले होते.

जालियानवाला बागेचे हत्याकांड : १९१९ सालचे (Indian Criminal Law Amendment Bill no. (1) आणि १९१९ सालचेच Criminal Law Emergency Bill no. II of 1919 अशी दोन्ही बिलें सरकारने फौजदारी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी आणली होती. ती अन्यायाची व स्वातंत्र्य आणि न्याय यांच्यावर गदा आणणारी होती. त्याला 'रौलट कायदा' +म्हणत. या बिलाला विरोध दर्शविण्यासाठी महात्माजींनी सत्याग्रह करण्याचे जाहीर केले होते. आणि ६ एप्रिल १९१९ हा दिवस संपूर्ण भारतात हरताळ, उपोषण व सत्याग्रहाचा दिवस म्हणून जाहीर करण्यात आला होता.

परंतु दिल्लीला ६ एप्रील पूर्वीच दंगल झाली. पोलिसांनी गोळीबार केला त्यांत ९ इसम ठार झाले.

दिल्लीतील या दंगलीमुळे पंजाब प्रांतातील लोकमत खवळले होते. म्हणून तत्कालिन पंजाबचे एक नेते डॉ. सत्यपाल व दिल्लीतील सत्याग्रह आंदोलनाचे पुढारी स्वामी श्रद्धानंद यांनी गांधीजींना पंजाबचा दौरा करून सत्याग्रहींना ते व्रत नीट समजावून सांगावे अशी विनंती केली होती. त्यानुसार गांधीजी मुंबईहून निघाले. परंतु मथुरेनजीकच्या पलवल स्टेशनवर रेल्वेतच त्यांना अटक करण्यात आली व परत दुसऱ्या मार्गाने मुंबईस आणून सोडून देण्यात आले.

---

१ : आजचा हिंदुस्तान : रजनी पामदत्त : १९४६ : पा. ३२०

+ " हिंदुस्तानातील क्रांतिकारक चळवळीशी संबंध असलेल्या गुन्हेगार कटांची " चौकशी करण्यासाठी व दडपशाहीचे नवे कायदे सुचविण्यासाठी १९१७ साली रौलट कमिटी नेमण्यात आली. इंग्लंडमधील न्यायाधिश रौलट हे या कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनी सुचविलेल्या कायद्याला ' रौलट ॲक्ट ' म्हणत.

गांधीजींना अटक झाल्याची बातमी हां हां म्हणता पसरली. पण गांधीजींना कोठे नेले वा ठेवले ह्याची बातमी कोणालाच सरकारने लागू दिली नाही. त्यामुळे लोकांचा क्षोभ वाढला व अनेक ठिकाणी दंगल माजली अमृतसर येथे जालियानवाला बागेत दहा-बारा हजार लोकांची सभा भरली असताना पंजाबचा एक अधिकारी जनरल डायर याने त्या निःशस्त्र लोकांवर गोळीबार करून जवळ जवळ हजार लोक ठार मारले. हा प्रकार १३ एप्रील रोजी घडला.

या प्रकाराचे प्रतिध्वनी सर्व देशभर उमटले. ६ एप्रील १९१९ रोजी उमरावतीत उपोषणाचा व हरताळाचा कार्यक्रम शांततेने पार पडला. "……उमरावतीस त्यादिवशी आबालवृद्धांनी उपास केला व सर्व दुकान-



अमृतसर येथील जालियानवाला बागेतील
'हुतात्मा स्मारकाचे' रेखाचित्र.

दारांनी हरताळ पाळला. राजकारणात हा नवा पायंडा आहे असे वाटल्या-वाचून राहिले नाही.....[१]"

दि. १३ एप्रील १९१९ रोजी अमृतसरच्या जालीयनवाला बागेत वर उल्लेख केल्यानुसार हिंदी लोकांची जी अमानुष कत्तल केली, त्याची बातमी वाऱ्याच्या वेगाने सर्व देशभर पसरली. देशभर या घटनेचे निषेधार्थ हरताळ पडला. अमरावतीसही हरताळ पाळला गेला व जाहीर सभा होऊन निषेध करण्यात आला होता.

उमरावतीला गांधी युगाची सुरुवात येथूनच झाली असे म्हणावे लागेल.

वऱ्हाड परत मिळविण्याची निजामाची खटपट : इ. स. १९११ ते १९१९ या काळात निजामाने एका कार्यकारी मंडळाकडे (राज्याचा) कारभार सोपविला. मंडळाचे अध्यक्ष म्हणून सर अली इमाम यांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी कर्जापोटी, इ. स. १८५३ मध्ये गेलेला वऱ्हाडप्रांत परत मिळविण्याची खटपट केली. पण त्यांना या कामी अपयश आले व त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पण पुढे त्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नाने वऱ्हाडावरील निजामाचे स्वामित्व नाममात्र का होईना, पण ब्रिटिश सरकारने मान्य केले[२].

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा ५५१

२ : मराठवाड्याचा इतिहास: मराठवाडा परिचय: (व्यापार उद्योग सूची) विश्व भारतीय प्रकाशन: मालेगाव: १९६० : पा. ३९-४०

परिशिष्ट क्र. १

(पान ३२० पहा)

Copy of letter No. 1787 dated 1-6-1907 from the Civil Surgeon, Amravati to the Deputy commissioner, Amravati.

With reference to your letter No. 3349 dt. 6 th April 1907, I have the honour to inform you that I am not aware of any medical grounds which would make it advisable to remove the walls.

28-6-1907

At a public meeting of the inhabitants of Amraoti, there were over two thousand gentlemen present

Proposed by Mr. Dole and seconded by Mr. Devrankar that

Mr Onkar, agent of the firm of Jamnadas Potdar, should be elected president.

Resolve — I, carried unanimous

Mr Wamanrao Joshi presented 14 petitions signed by over two thousand people in the aggregate

Proposed by Mr. Dole
That the rampart should not be destroyed.
Seconded by Mr. Bhangle
Supported by Shivappa Gurappa.
Supported by Wamanrao Joshi.
Carried unanimously.

Copy of letter no C/628 dated 11 th December 1907 from S. A Slocock, Esqr. I. C. S. Chief Secretary to the Honourable, The Chief Commissner, Central

Province, appointments Department, to the Commissioner, Berar Division.

I am directed to refer to your predecessor's letter No. 9960, dated the 4 th November 1907, forward ing the explanation of the Municipal Committee of Amraoti Town in regard to the proceedings which took place at the public meeting, held on the 28 th of June last.

I am to request that you will inform the committee that the Chief Commissioner has read the reports of three Magistrates and of the Deputy Commissioner under whose ordors it was dispersed, he has perused the original notice, which was issued by the late Secretary, calling the public meeting and correspondence leading to up to it, and has interrogated the late Secretary and he regrets that he is unable to accept. The accounts of the proceedings given in the Resolution of the Committee. It is to Mr. Craddock a matter for regret that a leader of men should have so subordinated their judgments to influence of a single man as to render themselves incapable of giving an impartial account of the proceedings of the 28 th June This complete surrender of their will, be that of the vice—chairman G. S. Khaparde, makes the removal of that gentleman, whose continuance as a member of the Committee is dangerous to peace and order, the more essential, an order for his removal has accordingly been passed and a copy thereof is enclosed for your information and for comnunication to the Committee.

No. 11162 of 1907
Commissioner's office, Berar Division,
Dated, Amraoti Camp, the 19 th December 1907.

Copy forwarded to the D. C., Amraoti Dist.
Sd — A. Francis,
Office Supdt.
for Commissioner, Berar.

No. 55 of 1908
Dated, Amraoti, January 1908

Copy forwarded to the Secretary, Amraoti Town Municipality for information and communication to all members of the Committee.

Sd / —
E. A. C.
for Commissioner.

In exercise of the powers conferred on him under Section 13 (i) (d) of the Berar Municipal Law, the Chief Commissiner is pleased to remove Mr. G. S. Khaparde, Vice Chairman and member of the Municipal Committe of Amraoti Town from his office of member of that Committee.

Under Section 25 of the said Law it is hereby notified that the office of members hither to held by the said Mr. Khaparde is vacant.

Sd/ — F. S. A. Slocock,
Chief Secretary to the
Chief Commissioner, C. P.

True copy
Sd/ —
Head Clerk,
D. C. 's office, Amraoti Camp.

परिशिष्ट क्र. २

इ. सन १९११ च्या जिल्हा गॅझेटीयरची माहिती : "……ब्रिटिश राजवटीत उमरावती येथे दोन प्रसिद्ध वकील घराणी उदयास आली. त्यात रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर आणि श्री. मोरो विश्वनाथ जोशी हे वकील होते, दोघांची उमरावती कॅम्पमध्ये मोठी घरे आहेत. श्री. मुधोळकर हे जिल्ह्याच्या आर्थिक विकासाचे धनी समजल्या जातात."

"दोन प्रसिद्ध व्यापारी घराणी आहेत. त्यांत फत्तेलाल शालिग्राम, श्रीराम शालिग्राम हे धामणगावचे व श्रीनारायण रामबिलास हे धनराज पोकरमल या घराण्याचे मालक आहेत. दोघेही सन्माननीय मॅजिस्ट्रेट आहेत. धनराज पोकरमल हे वऱ्हाडातले पहिले साहुकार होते[१]."

"१८६८ मध्ये 'बँक ऑफ बॉम्बे'ची शाखा येथे काढण्यात आली. रॅली बंधू स्वतःचा बँकिंगचा व्यवहार करतात. राजा सेठ गोकुलदास आणि रायबहादुर बन्सीलाल यांचे सुद्धा एजंट येथे रहातात व ते सावकारी करतात.

प्रमुख सावकार श्रीराम शालिग्राम, धामणगाव, श्रीराम रूपराम धनराज पोकरमल (फर्म), रामरतन गणेशदास हे संपूर्ण जिल्ह्यात सावकारी धंदा करतात. एलिचपूर येथे 'लालसा मोतीसा' ही नत्थुसा पासुसा यांची फर्म आहे. प्रसिद्ध ब्राम्हण सावकार रामचंद्र रेणको डोळे हे आहेत[२].

कापसाचे भाव : इ. सन १८७८ … २३० रु. खंडी, इ. सन १८८८… २०३ रु. खंडी, इ. सन १८९८ …… १९० रु. खंडी.

कुशल मजूर मिळणे ही एक गंभीर समस्या आहे. शेतमजूर साधारणतः हंगामात रु. ९ ते १० मजुरी मिळवत असे[३].

उमरावतीला १५ जिनिंग आणि १३ प्रेसिंग कारखाने आहेत. सर्वात जूना जीन मेसर्स व्हॉल्कर्ट यांचा आहे. त्यांनी १८७० मध्ये प्रेसिंगचे कार्य प्रथम सुरू केले. इ. सन १८९४ पर्यंत फॅक्टरीत काम करणारांची संख्या फक्त एक हजार होती. इ. सन १९०४ मध्ये ती सहा हजार झाली.

१, २ व ३ : उमरावती जिल्हा गॅझेटीयर : १९११ : पा. १७६, २२८, २३६.

या शिवाय उमरावतीला दोन तेल घाण्या आहेत. एक न्यू मोफिसल कंपनी आणि दुसरी मेसर्स रामजी काण्णव आणि कंपनी. श्री. कस्तुरचंद डागा हा प्रमुख शेअर होल्डर आहे व त्याने बडनेरा येथे तेलाची गिरणी सुरू केली आहे.

निजामाचा ध्वज व २१ तोफांची सलामी : "निजामाला दरवर्षी २५ लक्ष रुपये इंग्रजांकडून वऱ्हाडबद्दल मिळत असत आणि त्याच्या जन्मदिनी, १ जानेवारीला त्याचे सन्मानार्थ २१ तोफांची सलामी दिली जात असे व निजामाचा ध्वज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जिल्हा कचेरीवर लावला जात होता[१]."

वृत्तपत्रे : अमरावती जिल्ह्यात पाच वृत्तपत्रे आहेत. (१९०५ मध्ये) (१) सफर-ए-बरार (उर्दू), (२) प्रमोद सिंधु (मराठी), (३) कर्तव्य, (४) व्यापार समाचार, (५) वाग्विलास, (६) प्रभात (पाक्षिक) एलिचपूर (सर्व मराठी)

रस्ते लहान, ड्रेनेज खराब.

नेकोलेट पार्क व जोग चौक हे पार्क आहेत. म्यु. सराय आहे. त्यावर रिपेरीचा खर्च सालीना रु. २०० होतो.

व्हिक्टोरिया टेक्निकल शाळेचा हॉल सर्वात मोठा आहे. तो दरबारच्या आणि सार्वजनिक परीक्षेच्या कामी येतो.

१ इंद्रभुवन २ गणेश ही दोन थिएटरे आहेत. कॉटन मार्केट विदर्भात मोठे आहे. इ. सन १९०८ मध्ये कॉटन मार्केटचे उत्पन्न रु. ९४१२ होते आणि खर्च ५२८१ होता. कापूस मुंबईला पाठविला जातो. १९०८ मध्ये ३७३, ६२६ मण कापूस ६० लक्ष रु. किंमतीचा प्रेस करण्यात आला.

३१ मार्च १९०८ रोजी शहर व कॅम्प नगरपालिकांचे उत्पन्न-खर्च इत्यादी.

उमरावती नगरपालिका : लोकसंख्या ३४,२१९ : सभासद २४ : टॅक्सचे उत्पन्न रु. ५३,४१० : इतर उत्पन्न रु. १४,४१८ : एकूण रु. ६७,८२८ : एकूण खर्च रु. ६७,२८५ : दरडोई उत्पन्न १ रु. १४ आणे ७ पै.

कॅम्प नगरपालिका : लोकसंख्या ५२९५ : सदस्य संख्या १० : टॅक्सचे उत्पन्न रु. ८१९६ : इतर उत्पन्न ९८११ : एकूण उत्पन्न रु. १८,००५ : एकूण खर्च रु. १४,००३ : दरडोई उत्पन्न ३ रु. ५ आणे ७ पै.[२].

---

१ व २ : अमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११ : पृ. ३२०, ३४१

परिशिष्ट क्र ३

१ : **इ. सन १९१४ मधील, युद्ध काळातील वृत्तपत्रातून आलेल्या काही बातम्या** : "युरोपीय युद्धात प्रत्यक्ष सामील होण्यासाठी निघालेले हिंदुस्थानातील निवडक हिंदु–मुसलमान सैन्य, गेल्या पंधरवाड्यात फ्रान्समध्ये उतरले व 'रूटर' ने तारेत म्हटल्याप्रमाणे जगाच्या इतिहासातील नव्या युगास प्रारंभ झाला.

ब्रिटिश साम्राज्याची सत्य, न्याय व राष्ट्रनीतीची बाजू उचलून धरण्यासाठी, मित्र व मदतगार या नात्याने हे सैन्य प्रथमच गेले असून हा प्रकार अपूर्वच म्हटला पाहिजे."

२ : युद्धातील हिंदी सैन्याच्या पराक्रमाची रसभरीत वर्णने.

३ : ब्रिटेनबद्दल सहानुभूती व तुर्कस्थानबद्दल निषेधाच्या मुसलमानांच्या सभा हिंदुस्थानात ठिकठिकाणी झाल्याच्या बातम्या.

४ : लढाईमुळे धान्याचे भाव कडाडले असल्यामुळे, रु. १२ चे आंत पगार असणाऱ्या नोकरांना दरमहा १ रु. महागाई देण्याचे सरकारने ठरविले.

५ : **इंपीरियल रिलीफ फंड** : (युद्ध फंड) नागपूर फंडात ज्या रकमा जमा झाल्या त्यात उमरावती जिल्ह्यातून रु. ११०१ ची रकम जमा झाली होती. (दि. २७ आक्टो. १९१४)

६ : युद्धावर गेलेल्या हिंदी सैनिकांची जमीन ते परत येईपर्यंत लिलावात काढली जाऊ नये असा सरकारने हुकूम काढला.

७ : **आचार्य परिषद** : इंग्रजाबद्दल निष्ठा प्रकट करण्यासाठी यवतमाळला श्री. दत्तात्रय कृष्ण दामले यांनी आचार्य परिषद आयोजित केली होती. तींत ५१ प्रमुख आचार्य सामील होणार असे प्रसिद्ध झाले होते व या परिषदेसाठी येणाऱ्या आचार्यांना प्रवासभाडे वगैरेसाठी आगाऊ पैसे पाठविण्याचे आश्वासन या परिषदेसंबंधी काढलेल्या विनंती पत्रकात दिले होते. (केसरी : दि. ८ दिसेंबर १९१४)

८ : **१९१४ मधील बातम्यांचे मथळे** : 'रणभूमीवरील हिंदुस्थानी शिपाई', 'बादशहाची हिंदी जखमी शिपायाचे इस्पितळास भेट', 'राणीने शिख

शिपायांचे पटक्यांसाठी मलमलचे तागे पाठविले.', 'दरबानसिंगाने पदक कसे मिळविले ?'

९ : **भाव वाढ** : पहिल्या महायुद्धाचे काळात ११ ऑगस्ट १९१४ पर्यंत साडे बारा ते पंधरा टक्के भाव वाढ झाली होती. (केसरी दि. ११-८-१९१४)

परिशिष्ट क्र. ४



होम रूलची प्रतिज्ञा : आम्ही खाली सह्या करणार जाहीर करतो की– "राष्ट्रीय महासभेच्या १९१६ च्या ठरावाप्रमाणे आम्ही स्वराज्याचे समर्थक असून, कोणतीही विपरीत परिस्थिती आली तरी त्या धोरणाला चिकटून राहू.

लार्ड पेन्टलॅन्ड यांनी जी विचारसरणी होमरूलच्या विरोधात व्यक्त केली आहे त्याचेशी आम्ही सहमत नाही.

मद्रास हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश सर सुब्रम्हण्यम्, एन्. सी. आय. ई., एल्. एल्. डी. यांनी पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे, होमरूलची चळवळ जरी गैरकायदेशीर ठरविली गेली तरी, किंवा आम्हाला कोणत्याही प्रकारे शिक्षा झाली तरी, आम्ही मागे हटणार नाही. उलट कोणतीही शिक्षा भोगावयास तयार आहोत."

जी. एम्. खापर्डे	बी. जी. खापर्डे
एस्. व्ही. गोखले	एस्. के. दुराणो
एस्. व्ही. पुणतांबेकर	टी एल्. शेवडे
जी. एम्. डोरले	एस्. बी. तांबे
डी. व्ही. हरकरे	डॉ. डब्ल्यू. आर. शहाणे
एन्. एम्. बेदरकर	डॉ. डब्ल्यु. आर. भट[१]

१ : खापर्डे दप्तर, क्र. ५, पा. ३७४ (वर, होमरूलचा ध्वज.)

वस्तूंच्या किंमती, कोष्टके वगैरे

टीप : त्या त्या शतकातील किंवा वर्षांतील वस्तूंच्या किंमती, जेथे उमरावतीच्या उपलब्ध झाल्या तेथे त्या, व उपलब्ध नसलेल्या काळातील देशातील किंमती, कोष्टके वगैरे दिली आहेत.

चित्र क्र. ९४ : इंडियन नॅशनल काँग्रेसच्या डेलिगेशनचे, ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांसह घेतलेले छायाचित्र. इ. सन १९१९. (पृष्ठ ३६९ पहा)

तेराव्या व चौदाव्या शतकातील धान्याचे भाव

एकमण	तेरावे शतक (खिलजीचा काळ)	चौदावे शतक (म. तुघलकाचा काळ)
गहू	७॥ टँटेलस्	१२ टँटेलस्
तांदुळ	५ टँटेलस्	१॥ टँटेलस्
बारली	४ टँटेलस्	८ टँटेलस्
डाळ	५ टँटेलस्	४ टँटेलस्
तूप	२० टँटेलस्	१ रु. ७ पैसे

त्यावेळचा टँटेलस् हा सध्याच्या एक पैशाबरोबरचा होता आणि मण हा १४॥ शेराबरोबर होता. म्हणजे तेराव्या शतकात गहू साडेसात पैसे मण, चौदाव्या शतकात १२ पैसे मण, तूप २० पैसे मण व १ रु. ७ पैसे मण असे वस्तूंचे भाव होते.

खिलजीचे काळात (तेरावे शतक) त्याने भावावर कडक नियंत्रण ठेवले होते. सुई पासून तो घोड्यापर्यंत प्रत्येकाची किंमत ठराविक होती. उलट १४ वे शतकात तुघलकाने नियंत्रण ठेवले नव्हते. तरीही त्याकाळी मेंढीची किंमत १ रुपया व बैल २ रुपये, आणि ३० वार कापड २ रुपये अशा किंमती होत्या.

तुर्ककाळात भारतात एक शहाबुद्दीन नावाचा प्रवासी आला होता. त्याने आपल्या रोजनिशीत दिलेले त्यावेळचे वस्तूंचे दर –

एक मण तांदुळाला तीन आणे, आणि ३ गंडा. याचा अर्थ रुपयाला पाच मण तांदुळ. या उलट गहू मात्र अडीच मणाला १ रुपया या दराने विकला जाई. १ मण मसाला ७ आणेहून १ आणा १ गंडा, म्हैस ४ रुपये २ आणे १ गंडा, बैल ४ रुपये २ आणे ४ गंडा.

सोळाव्या शतकात (मण २६ शेराचा होता.) वस्तूंच्या किंमती.

प्रत्येक मणाला	त्यावेळची किंमत	सध्याच्या पैशांत रूपांतर
गहू	१२ दामस्	३० नवे पैसे
वारली	०८ दामस्	२० नवे पैसे
चांगल्या प्रकारचा तांदूळ	२० दामस्	५० नवे पैसे
डाळ	०८ दामस्	२० नवे पैसे
तूप	८० दामस्	२०० नवे पैसे
राँ साखर	५६ दामस्	१६४ नवे पैसे
चांगली साखर	१२८ दामस्	३२० नवे पैसे
मीठ	१६ दामस्	३८ नवे पैसे

१७ व्या शतकात : औरंगजेबनाम्यानुसार दर : इ. सन १७२१ मध्ये सव्वामण तांदुळास १ रु., खाण्याचे तेल १ रुपयास २१ शेर आणि तूप रुपयाला १०॥ शेर.

ईस्ट इंडिया कंपनीचे काळात : डॉ. नटबकजन यांच्या अहवालानुसार पाटण्यामध्ये इ. सन १८०७ साली तांदूळ १ रुपयाला पावणे दोन मण मिळत असे. त्याची किंमत पुढच्या ६० वर्षांत वाढतच राहिली. शेवटी ती १० मण झाली. त्यानंतर वाढत गेलेल्या किंमतीचा आराखडा याप्रमाणे–

वर्ष	तांदुळाचा निर्देशांक	गव्हाचा निर्देशांक
१८६३	८३	८१
१९००	१४६	११०
१९१३	१५३	१०९
१९२०	३४०	१९९.६

इ. सन १७१२ साली निर्देशांक १०० धरून १९२० साली तो २४१ झाला होता. याची कारणे हीच की, लोकसंख्या, अपुरे उत्पादन, वाढती मागणी आणि जलद गतीने झालेले औद्योगीकरण.

औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलदारांचे हातात पैसा राहिला आणि त्याचे बाईट परिणाम झाले. सगळयाच देशांना ही झळ जाणवली असली तरी सुद्धा भारताला ती फार तीव्रतेने जाणवली आणि दुसऱ्या देशामध्ये खरेदी करणारांची शक्ती ही वाढत्या किंमती बरोबर वाढतच राहिली. परंतु भारतात मात्र तसे न झाल्याने त्याचा आर्थिक विकास मागे पडला.

त्यानंतर दोन महायुद्धे झाली. किंमती इतक्या वाढल्या की, भारताला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झालीत, तरी सुद्धा त्याचा मेळ घालता आला नाही. त्याला खालील गोष्टीमुळे पुष्टी मिळते.

प्रत्येक मणाच्या किंमती –

वर्ष	तांदूळ	गहू	साखर	कोळसा
१९२०	१ रु. ४ आ.	–	–	–
१९३९	४ रु. ८ आ.	–	१२ रु. ६ आ.	२ आणे.

स्वातंत्र्यानंतरच्या किंमती

१९५३	४० रु.	१४ रु.	३५ रु.	५ रु.
१९५६	५० रु.	१९ रु.	३५ रु.	७ रु.
१९५८	५० रु.	१८ रु.	३४ रु.	८ रु. ४ आ.
१९६०	५५ रु.	२० रु.	५० रु.	११ रु.
१९६५	७० रु.	३० रु.	६० रु.	१४ रु.
१९६७	८० रु.	६० रु.	१२० रु.	११ रु.

दूध व तूप : भारतात दुधा–तुपाच्या नद्या वाहत होत्या असे म्हणतात. कदाचित त्या नद्या आजही वाहत असतील, परंतु त्या सामान्य माणसाच्या नजरेला दिसत नाहीत आणि तेथपर्यंत त्याला जाता येत नाही. मनुस्मृतीत तर असा दाखला आहे की, भारतात दूध, तूप, लोणी, मध ई. वस्तू विकण्यात येत नसत. त्या मोफत मिळत.

खालील तक्त्यावरून या युगातल्या दुधातूपाची कल्पना येईल.

वर्ष	दूध	तूप	दर मणास
१८९१	रु. ३–८	–	,,
१९०१	रु. ४–४	–	,,
१९११	रु. ५–४	रु. १७	,,
१९३६	रु ५–८	रु. ५०	,,
१९५३	रु. २२–०	रु. २००	,,
१९५८	रु. ३०–०	रु. २१०	,,
१९६०	रु ३५–० ते रु. ४०–०	रु. २६०	,,
१९६५	रु. ५० ते रु. ६०	रु. ४००	,,
१९६७	रु. ६०	रु. ५००	,, +

+ दै. मातृभूमि, अमरावती : १६ मे १९६७ : पान २

दरमहा वेतन : हेडक्वार्टर्स : टाऊन–अमरावती.

सन	शेतमजूर	गवंडी	सुतार	लोहार
	रू. आणे	रू. आणे	रू. आणे	रू. आणे
१८९१	७.०१	२२.००	२२.००	२२.००
१८९२	६.१४	२४.००	२४.००	२४.००
१८९३	७.१२	२३.०४	२३.०४	२३.०४
१८९४	७.०१	२१.०४	२१.०४	२१.०४
१८९५	७.०१	२२.०१	२२.०१	२२.०१
१८९६	५.१०	२०.००	२०.००	२०.००
१८९७	७.०१	२२.०१	२२.०१	२२.०१
१८९८	७.०१	२१.००	२१.००	२१.००
१८९९	३.१२	८.१२	८.१२	८.१२
१९००	७.०१	२० ००	२०.००	२०.००
१९०१	७.०१	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०२	७.०१	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०३	११.०४	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०४	८.००	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०५	८.००	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०६	८.००	२२.०१	२२.०१	२२.०१
१९०७	११.००	२२.००	२२.००	२२.००
१९०८	१०.००	२०.००	२२.००	२२.००
१९०९	१०.००	२२.०८	२२.०८	२२.०८
१९१०	१०.००	२२.०८	२२.०८	२२.०८
१९११	१२ ००	२०.००	२०.००	२०.००
१९१२	१२.००	२०.००	२०.००	२०.००[१]

१ : पुरवणी : अमरावती जिल्हा गॅझेटीयर, १९११

धान्याचे भाव १८५३ ते ७० : दर रुपयास.....शेर.

इ. सन	१८५३-५४	१८५९-६०	१८६९-७०
ज्वारी	५३.३३	४०	२०
गहू	३२	२६.६६	१०
चनाडाळ	४०	३२	८
तांदूळ	४०	२६.६६	५.७१
जवस	२६.६६	१६	११.४२

अमरावती तालुका : धान्याचे भाव १८७६ ते १८९५ : ज्वारी-गहू १ रुपयास.....शेर.

	१८७६ ते ८०	१८८१ ते ८५	१८८६ ते ९०	१८९१ ते ९५
ज्वारी	१८.५८		२१.९६	१८.८६
गहू	११.९६	११.८७	१५.५६	१३.१०□

१ शेर = ०.९३३ किलोग्रॅम.

□ अमरावती जिल्हा गॅझेटीयर, १९६८ : पा. ४८० व ४८१

टेबल नं. ११ : धान्य बाजार भाव : अमरावती सिटी

इ. सन	दर रुपयास–		इ. सन	दर रुपयास	
	ज्वारी				
१८९२	१८.१	शेर	१९०३	२१.९	शेर
१८९३	१६.१	,,	१९०४	२१.१	,,
१८९४	१८.१	,,	१९०५	२०.८	,,
१८९५	१९.२	,,	१९०६	१५.७	,,
१८९६	१७.२	,,	१९०७	१५.१	,,
१८९७	९.५	,,	१९०८	१०.९	,,
१८९८	२४.३	,,	१९०९	१३	,,
१८९९	२३.३	,,	१९१०	१६.७	,,
१९००	१०.८	,,	१९११	१७.५	,,
१९०१	२०.४	,,	१९१२	१५.६२[1]	,,
१९०२	२१ २	,,			

अमरावती जिल्हा : टेबल नं. १२ : हेड क्वार्टर – अमरावती टाऊन. धान्याचें चिल्हर भाव

सन	गहू	तांदुळ	तूर डाळ	मीठ
१८९१	दर रुपयास	दर रुपयास	दर रुपयास	दर रुपयास
ते	११ ते १३	९ ते ९॥	८ ते १०	९ ते ११
१८९६	शेर.	शेर.	शेर.	शेर.
१९००	८॥ शेर	८। शेर	—	१० शेर
१९०१	७ ते १३	८ ते ११	—	११ ते १७॥[2]
ते	शेर.	शेर.		शेर.
१९१२				

१ व २ : पुरवणी : अमरावती जिल्हा गॅझेटीयर १९११

धान्य भाव १८९७ ते १९०० : दर रुपयास.....शेर.

वर्ष	ज्वारी	गहू	चन डाळ	तांदुळ	तूर	बाजरा
१८९७	९.५२	६.९२	७.८१	६.५६	६.९८	७.४१
१९००	१०.८२	८.८९	१०.०७	८.२६	७.८१	९.०३

धान्याचे भाव : १९१०–११ : १ रुपयास.....शेर.

ज्वारी	१३.१४
गहू	६.०७
चना डाळ	९.१०
तांदूळ	५.०७
तूर	६.०८
बाजरा	११.१३

धान्यचे भाव १९२१ ते १९३० : दर रुपयास.....शेर.

वर्ष	तांदुळ	ज्वारी	गहू	चना डाळ	कॉटन (जिन्ड) रू. पर बंगाली मण
१९२१	६.२	८.९	५.७	६.७	३१.१५
१९२२	७.५	१२.८	८.८	१२.२	४२.१५
१९२३	७.३	११.९	९.५	१३.२	५७.११
१९२४	६.४	९.२	७.०	१०.२	४४.१२
१९२५	६.३	९.८	७.३	९.९	३२.५०
१९२६	६.४	८.५	७.४	८.४	२६.१२
१९२७	६.७	११.३	८.०	८.७	३१.१२
१९२८	६.३	८.६	७.३	७.६	२८.३०
१९२९	७.३	११.६	९.४	९.३	२१.२०
१९३०	१०.८	२२.२	१६.६	१७.१	१५.६०

१ शेर = ०.९३३ किलो ग्रॅम.

अमरावती जिल्हा गॅझेटियर १९६८ पा. ४८२, ४८३.

मजुरीचे दर (दर दिवशी)[१]

	युद्धापूर्वी १९३८-३९	युद्धानंतर १९४८-४९
पुरुष	३१ ते ३७ पैसे	६२ ते ७५ पैसे
स्त्री	१० ते १२ पैसे	३७ ते ५० पैसे
मुले	६ पैसे	२५ पैसे

अमरावती जिल्हा : टेबल नं ३० : स्थानिक वजने-मापे : १९१२

धान्याची मापें

५ तोळे = १ छटाक
१० ,, = $\frac{1}{8}$ शेर (अर्धा पावशेर)
२० ,, = $\frac{1}{4}$,, (पावशेर)
४० ,, = $\frac{1}{2}$,, (अर्धा शेर)
८० ,, = १ ,,
२ शेर = १ पायली
८ पायली = १ कुडव
२० कुडव = १ खंडी.

वजने

२५ तोळे = १ सव्वाशेर
५० ,, = १ अर्धाशेर किंवा $\frac{1}{2}$ पासरी.
४ धडे = १ मण
१०० तोळे = १ पासरी
२०० ,, = १ धडा (किंवा २ पासरी)
२० मण = १ खंडी[२]

पहिला भाग समाप्त

१ : अमरावती जिल्हा गॅझेटीयर : १९६८ : पा. ४८४
२ : पुरवणी : उमरावती जिल्हा गॅझेटीयर : १९११

भाग दुसरा

▣ या दुसऱ्या भागातील माहीतीचे संकलन मुख्यत: जानेवारी १९२० पासून उमरावतीतून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक 'उदय' चे अंकातून केलेले असून, माहीतीची रचना सोईसाठी एकाद्या वार्षिक दैनंदिनी सारखी केलेली आहे. हेतू हा कीं, तत्कालिन परिस्थितीची त्याद्वारे कल्पना करता यावी.

तसेच इतर ग्रंथ किंवा वृत्तपत्रातून जी माहीती दिली त्याचा संदर्भ तळटीपेत दिला आहे.



चित्र क्र. ९५ : इंडियन नॅशनल काँग्रेसचे इंग्लडला गेलेले डेलिगेशन (स. १९१९) ब्रिटिश पार्लमेंटचे द्वारा समोर (पृष्ठ ३६९ पहा)
डावी कडून : १) सर्वश्री बिपीनचद्र पॉल, २) पी. जे. मेहता, ३) लो. टिळक, ४) दादासाहेब खापर्डे,
५) विठ्ठलभाई पटेल, ६) न. चि. केळकर.

इसवी सन १९२०

दि. १८ जानेवारी १९२० रोजी उमरावतीच्या स्वराज्य संघ शाखेच्या विद्यमाने राष्ट्रीय सभेचे महत्त्व सांगण्याकरिता रा. वामन गोपाळ जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती. यासभेत डॉ. वऱ्हाडपांडे व श्री. भाऊसाहेब असनारे यांची व्याख्याने झाली. अमृतसर राष्ट्रीयसभेचे महत्त्व व तींत पास झालेले ठराव या विषयी वक्त्यांनी माहिती देऊन त्यावर विवेचन केले होते.

श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांचा भव्य सत्कार व मानपत्रे : भारतीय काँग्रेसतर्फे इंग्लंडला गेलेल्या शिष्ट मंडळात, लो. टिळकांसोबत उमरावतीचे श्रीमत दादासाहेब खापर्डे हेही गेले होते. (सोबतचे चित्र पहा)

हे शिष्टमंडळ आपली कामगिरी आटोपून जानेवारी १९२० मध्ये भारतात परत आले. ना. श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांची स्वारी शिष्ट-मंडळातून आपली विलायतची कामगिरी आटोपून सोमवार दि. २२ जानेवारी १९२० रोजी उमरावतीस परत आली.

रेल्वे स्टेशनवर त्यांचे स्वागतासाठी श्रीयुत भाऊसाहेब दुराणी व स्वामी शिवानंद वगैरे मंडळी हजर होती. त्यांच्या आगमनाने उमरावती नगर आनंदित झाले आणि त्या आनंदाचे प्रतीक म्हणजे दि. २२ गुरुवार रोजी रात्रौ गणेश नाटक गृहात जी प्रचंड जाहीर सभा भरली ती होय.

या दिवशी गणेश नाटक-गृह श्रोतृसमुहाने चिक्कार भरले होते. सभागृह बलवंत नाटक मंडळीने चांगले सजवून शृंगारून दिल्यामुळे त्यास दरबारी थाट प्राप्त झाला होता.

या सत्कार समारंभासाठी आलेली पाहुणे मंडळी व्यासपीठावर विराजमान झाली होती. त्यात नागपूरचे पुढारी श्रीमंत उधोजीराव वकील,

डॉ. मुंजे, यवतमाळचे श्री. माधवराव अणे व स्थानिक पुढाऱ्यांपैकी ना. तांबे, ना. देशपांडे, श्री. अण्णासाहेब दामले, इत्यादी प्रमुख मंडळी आणि व्यापारी वर्गापैकी प्रमुख शेठ फत्तेचंदजी, शेठ बिसनदयालजी भिवापूरवाले, याशिवाय मे. मुजफ्फर हुसेन आणि हाजीसाहेब इत्यादी मुसलमान पुढारीही मुद्दाम उपस्थित होते.

आरंभी मास्तर नत्थुभाई यांनी वंदेमातरम् हे राष्ट्रगीत आपल्या गवई आलापांच्या मधुर स्वरांनी रंगवून सभास्थानी मातृभूमीचे दैवत जागृत केले. त्यानंतर महामहोपाध्याय श्री. केशवराव ताम्हणे यांनी श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या गुणवर्णनपर केलेला संस्कृत श्लोक, गायनपटू हरदास श्री. गोपाळराव बेडेकर यांनी सुस्वर आलापात म्हणून दाखविला. नंतर डॉ. वऱ्हाडपांडे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर श्री. बापुसाहेब दंडे यांनी ना. तांबे यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले. त्यास हाजी साहेब शेख महंमद यांनी अनुमोदन दिले. ना. तांबे टाळ्यांच्या गजरात अध्यक्षस्थानी स्थानापन्न झाल्यावर ते आपल्या भाषणात म्हणाले, "ना. खापर्डे यांची देशसेवा सर्वश्रुतच आहे. ते डेप्युटेशन मधून आज परत आले म्हणून त्यांचे अभिनंदन करणे आपले कर्तव्य आहे... त्यांनी स्वार्थत्यागपूर्वक बजावलेल्या राष्ट्रसेवेप्रीत्यर्थ त्यांना म्युनिसिपॅलिटीतर्फे मानपत्र देण्यात येत आहे."

नंतर श्री. भाऊसाहेब असनारे यांनी म्युनिसिपॅलिटीचे, श्री. अण्णासाहेब दामले यांनी नागरिकांतर्फेचे आणि श्री. हणमंतराव देशमुख यांनी हिंदी स्वराज्य संघातर्फे अशी तीन मानपत्रे वाचण्यात आल्यावर आणि मानपत्र देणाऱ्या संस्थातर्फे हार-तुरे व मानपत्रे अर्पण केल्यानंतर स्थानिक व जिल्हा यातील निरनिराळ्या ३५ संस्थातर्फे त्यांना हार-तुरे अर्पण करण्यात आले होते.

शेवटी उत्तराखल श्री. दादासाहेब खापर्डे यांचे व नंतर अध्यक्षांचे भाषण होऊन, हार-तुरे, अत्तर-गुलाब वगैरे समारंभ झाला आणि प्रसंग आटोपला.

दुसरे दिवशी दादासाहेबांना गावात ठिक-ठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या आणि नंतर ते दिल्लीस कामासाठी रवाना झाले होते.

'नेमस्त आणि जहाल'
उमरावतीत घडलेला मजेदार सामना.

श्री. अण्णासाहेब मोरोपंत जोशी यांचे दि. २५ जानेवारी १९२० रविवार रोजी रात्री, गणेश थिएटर मध्ये 'नवीन सुधारणा व त्यासंबंधी आपले कर्तव्य' या विषयावर डॉ. भट यांच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले होते. "बाहेरच्या चळवळीपेक्षा कौन्सिलातील कर्तबगारीवरच आपल्या लायकी–नालायकीचा प्रश्न अवलंबून आहे. तेव्हा नुसत्या टीकात्मक चळवळीकडे आपल्या शक्तीचा व काळाचा अपव्यय न करता, कौन्सिलातील घटनात्मक कार्य यशस्वी करून दाखवून आपली स्वराज्याची पात्रता आपण शाबित करून दाखविली पाहिजे" अशा आशयाची भूमिका त्यांनी मांडली होती.

या त्यांच्या भाषणास जबाब देण्यासाठी दि. ३१ जानेवारी १९२० रोजी गणेश नाटक गृहात, स्वराज्य संघ नगर शाखेचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा बोलावण्यात आली होती व या जाहीर सभेत 'प्रतिपक्षीयास बोलावयास सवड मिळेल' असे त्यासंबंधीचे जाहीर पत्रकात लिहिले होते.

सभेच्या वेळी प्रेक्षकांनी गच्च भरलेल्या सभागृहात रा. सा. ब्रम्ह, श्री. जयवंत आणि रा. ब. डॉ. भट यांच्याशिवाय कोणी प्रतिपक्षीय दिसून आले नाहीत.

सभेतील मुख्यवक्ते श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी सुमारे एक तास ओजस्वी, विद्वत्ता–प्रचुर व विनोदी भाषण केले व अण्णासाहेब मोरोपंत जोशी यांच्या भाषणास युक्तिवादाने सणसणीत व बिनतोड उत्तर दिले.

त्यांचे भाषणानंतर, अध्यक्षांनी कोणास बोलावयाचे आहे काय ? असा सवाल केला. त्यावेळेस दूर उभे असलेले रा. सा. ब्रम्ह म्हणाले, 'पुष्कळ बोलायचे आहे पण त्यासाठी ही वेळही नव्हे व स्थळही नव्हे.' श्री. जयवंतही बोलले नाहीत. तेव्हा श्री. शेवडे वकील बोलायला आले व त्यांनी आपल्या जोरदार व वक्तृत्वपूर्ण भाषणात बाबासाहेबांचा अनुवाद केला. त्यानंतर श्री. पुणतांबेकर बॅरिस्टर यांनीही भाषण करून, बाबासाहेबांचे समर्थन केले. नंतर नेमस्त श्री. जयवंत बोलले.

ही नेमस्त व जहांलाच्या 'कलगी तुऱ्याची' सभा तब्बल तीन तास चालली होती.

सन १९२० मधील भाडेकऱ्यांची सभा :– घरभाडे फार वाढले. त्याची काहीतरी व्यवस्था व्हावी म्हणून भुसारी दरवाजावरील व्यापारी भाडेकऱ्यांची सभा रविवार, दि. १ फेब्रुवारी १९२० रोजी रात्री ९ वाजता श्रीमंत लक्ष्मणराव डोळे यांच्या अध्यक्षतेखाली सक्करसाथच्या पटांगणात झाली. भाडेकरी व घरमालक यामध्ये तडजोड करण्याकरता एक कमेटी नेमावी अशी सूचना करण्यात आली. त्याचप्रमाणे जागेची सोय व्हावी म्हणून परकोटाचा काही भाग पाडावा असे सुचविण्यात आले. याप्रसंगी श्री. लढ्ढा वकील, डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. भाऊसाहेब असनारे, शेठ श्रीरामजी आणि श्री. वामनराव जोशी प्रभृतींची भाषणे झाली होती[1].

बॅरिस्टर पुणतांबेकरांना निरोप : उमरावतीचे एक विद्याव्यासंगी आणि सार्वजनिक चळवळीत काम करणारे नागरिक, बॅरि. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर यांनी, उमरावतीस वकिली करण्याचे सोडून, सुरत (गुजराथ) येथील सार्वजनिक एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजमध्ये राज्यशासनशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या विषयांचे प्रोफेसर म्हणून नौकरी पत्करली, त्यामुळे ते उमरावती सोडून जाणार असल्याने, त्यांच्या मित्र–मंडळींनी क्लबमध्ये त्यांचा सत्कार दि. ३० जानेवारी १९२० रोजी सायंकाळी त्यांना ' इव्हिनिंग पार्टी ' देऊन केला.

त्याचप्रमाणे दि. ३१ शनिवारी ब्रम्हविद्या मंदिरात, कोळी समाज सेवा समिती, हिंदी स्वराज्य संघ, वऱ्हाड प्रांतिक कॉं. कमेटी इत्यादी संस्थांतर्फेही ना. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली बॅरि, साहेबांचा सत्कार करण्यात आला, याप्रसंगी कोळी समाजातर्फे त्यांना मानपत्र देण्यात आले होते. या समारंभाला ना. देशपांडे, डॉ. भट, श्री. दादासाहेब बेदरकर वगैरे मंडळी हजर होती.

महार–बलुत्यांचे चौकशी कमिशन : वऱ्हाडातील महार–बलुत्यांसंबंधी सरकारने जे चौकशी कमिशन नेमले होते, त्या कमिशनने दि. २ फेब्रुवारी १९२० रोजी उमरावती येथे कमिश्नरांचे बंगल्यावर चौकशीचे कामकाजाला

---

१ : उदय : दि. १७ फेब्रु. १९२०

सुरुवात केली होती. या कमिशनचे सभासद १ मि. ए. मॅक्डोनाल्ड आय. सी. एस्. अध्यक्ष, २ रा. सा. धात्रक इ. ए. सी. एम्. बी. ई.. हे सरकारी सभासद, ३ रा. सा. वि. मो. महाजनी (आकोला) ४ रा. ब. के. जी. देशमुख (खामगांव), आणि ५ श्री. जगदेव भूताजी (म्हातोडी) हे बिन सरकारी सभासद व महार सभेमार्फत प्रतिनिधी श्री. गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई हे होते[1].

व्याख्याने : 'बोल्शेविकांची बंडाळी' या विषयावर दि. १५ फेब्रु. १९२० रोजी गणेश थिएटरमध्ये, एरंडोलचे उत्साही वकील रा.रा. पुरुषोत्तम गोपाळ जोशी यांचे व्याख्यान श्री. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते.

'संदेश' कर्ते रा. अच्युतराव कोल्हटकर यांचे व्याख्यान, दि. १६ फेब्रु. १९२० सोमवारी सायंकाळी गणेश थिएटर मध्ये, हिंदी तरुण स्वयंसेवक मंडळातर्फे आयोजित करण्यात आले होते.

उमरावतीचा डिस्ट्रिक्ट दरबार : शनिवार दि. २८ फेब्रुवारी १९२० रोजी, डेप्युटी कमिश्नर यांचा दरबार भरविण्यात आला. दरबारासाठी एक साधारण मंडप देण्यात आला होता. जिल्हातील ठिकठिकाणचे प्रमुख प्रमुख लोक व अधिकारी हजर होते. लोकसमूह सुमारे १००० असावा. दरबाराचे कामास दुपारी १२ वाजता सुरुवात झाली.

प्रथम काही जणांना, संकटातील लोकांचे जीव वाचविल्याबद्दल व काही जणांना पोलिसला मदत केल्याबद्दल, इनामे व सनदा देण्यात आल्या. त्यानंतर लढाईत कामी आलेल्यांचे वारसांना, सरकारकडून आलेल्या रकमा देण्यात आल्या.

डे. कमिश्नर साहेबास प्रश्न विचारण्याची मुभा दरबारास आलेल्या लोकांस होती. त्याचे उत्तर देण्यास डे. क. साहेबांनी सुरुवात केली व लोकांस कळण्याकरता मराठीत भाषण केले. त्यानंतर आणखी काही प्रश्नोत्तरे होऊन समारोप करण्यात आला. सुधारणांबद्दल बोलताना साहेबांनी सांगितले की (साहेब पाठक नावाचे पारशी गृहस्थ आहेत.) प्रतिनिधी निवडण्यापूर्वी त्याची मते पहा. केवळ तहसिलदार शिफारस करतो म्हणून अमुकास निवडू

१ : उदय : दि. ३ फेब्रु. १९२०

नका. गोड बोलणारे पुष्कळ मिळतील पण बोलल्याप्रमाणे वागणारे कोण आहे हे ओळखून त्यालाच निवडा.

याप्रमाणे समारोप केल्यावर थोडा उपहार देण्यात आला व दरबार विसर्जित झाला.

वऱ्हाडातील तालुका व जिल्हा बोर्डांच्या सभासदांची उमरावतीत परिषद.

दि. ६ व ७ मार्च १९२० रोजी, वऱ्हाडातील सर्व तालुका व जिल्हा बोर्डांच्या सभासदांची परिषद रा. ब. दामले (आकोला) यांचे अध्यक्षतेखाली उमरावतीला भरली होती. अशाप्रकारची परिषद भरविण्याची कल्पना प्रथम रा. सा. ब्रम्ह यांनी काढली व त्यांनीच ती प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे श्रेय संपादक केले. या परिषदेला कमिश्नर साहेब थोडा वेळ उपस्थित होते.

स्वागत समितीतर्फे रा. सा. ब्रम्ह यांनी सर्वांचे स्वागत केले. त्यांनी सुरवातीला लोकल बोर्डे म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचे जन्माचा व विकासाचा इ. सन १८७४ पासून तो इ. सन १८९२ पर्यंत क्रमाक्रमाने कसा विकास झाला त्याचा इतिहास सांगितला. 'पैशाचा मोबदला न घेता हिंदुस्तानचे लोक आपले सार्वजनिक कर्तव्य दक्षतेने बजावतात' असा लॉर्ड लॉरेन्स (हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय) यांचा इ. सन १८६४ साली लिहिलेला शेरा वाचून दाखविला व आणखीही तत्कालीन लेखकांचे व अधिकाऱ्यांचे आधार व शेरे वाचून दाखविले. आणि नवीन सुधारणा व त्याचे संभाव्य परिणाम, हक्क वगैरेची तपशीलवार अशी चर्चा त्यांनी केली.

दि. ७ रोजी मे. कमिश्नर यांचे परिषदेत भाषण झाले व नंतर रा. र. मोरोपंत जोशी यांचे भाषण झाले. श्री. जयवंत यांनी ठराव मांडला होता. याप्रमाणे अशा तऱ्हेची ही पहिलीच परिषद यशस्वीरीत्या पार पडली होती.

उमरावतीचा 'व्दितीय खिलापत दिन' : दि. १९ मार्च १९२० रोजी, व्दितीय खिलापत दिन हा अत्यंत गंभीरपणे, शांतपणे व कोठेही यत्किंचितही दंगाधोपा न होता पार पडला.

उमरावतीच्या सध्याच्या पिढीच्या किंवा या पूर्वीच्या एक दोन पिढींच्या इतिहासात किंवा स्मरणात, इतक्या उत्तम तऱ्हेने संपूर्ण हरताळ

पडलेला उमरावतीतील हा पहिलाच दिवस होय. त्यापूर्वी ६ एप्रील १९१९ हा व पहिला खिलापत दिन. त्या दोन्ही दिवशीही हरताळ पडला होता; पण ते दोन्हीही इतके यशस्वी झाले नाहीत. पूर्वी हस्तपत्रिका वाटताना हरताळ का पाळायचा याबद्दल बरीच वादावादी करावी लागत असे, पण यावेळी महात्मा गांधी यांच्या आदेशानुरूप छापील संदेश हाती दिला म्हणजे पुरे होत असे.

खिलापत दिनाचे पूर्वतयारीसाठी ता. १७ व १८ रोजी, अनुक्रमे सक्करसाथीत एक व गणेश थिएटरात एक, याप्रमाणे दोन सभा घेण्यात आल्या होत्या व या दोन्ही सभांना व्यापारी व हिंदु-मुसलमान-नागरिकांची प्रचंड उपस्थिती होती. ता. १९ चा हरताळ पूर्णपणे यशस्वी करण्याचा निर्धार या सभातून व्यक्त करण्यात आला होता.

ता. १९ चा दिवस उजाडला. संपूर्ण शहरातील हिंदु-मुसलमानांची दुकाने बंद होती. कॉटन मार्केट, मटन मार्केट, इतकेच नव्हे तर या हरताळाचे लोन बडनेरपर्यंत पोचून तेथील कापड गिरणी देखील बंद होती. कडकडीत हरताळ पाळला गेला.

त्याच दिवशी रात्री गणेश नाटकगृहात हिंदु – मुसलमानांची प्रचंड जाहीर सभा भरली. सर्व थिएटर गच्च भरले होते. श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले.

श्री. मुजफ्फर हुसेन वकील यांनी खिलापतीच्या संरक्षणासाठी कुराणातील आयती म्हटल्या. त्यावेळी सर्व समाज गंभीरपणे उभा राहिला होता.

अध्यक्षांनी खिलापतीचे संरक्षण व युरोपीय अन्याय याबद्दल सुंदर, मार्मिक व वक्तृत्वपूर्ण विवेचन केले. नंतर शेख अब्दुल अहमद यांनी ठराव मांडला. त्यास श्री. शेवडे यांनी भाषण करून अनुमोदन दिले आणि ठराव सर्वानुमते पास करण्यात आला. वरील ठराव व्हाईसरॉयकडे पाठविण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्याबाबतचा दुसरा ठराव डॉ. वऱ्हाडपांडे यांनी मांडला व त्यास डॉ. अब्दुल हफीज यांनी पाठिंबा दिला व ठराव मंजूर झाला. शेवटी अध्यक्षांचे समयोचित भाषण व आभार प्रदर्शन होऊन सभा संपली.

स्वखुषीने गोवध–बंदी : दुसरे दिवशीचे सभेत श्री. शेवडे अध्यक्ष असताना, श्री. मुजफ्फर हुसेन यांनी हरताळाबद्दलचा ठराव मांडून, हिंदु मुसलमानांचे ऐक्य चिरस्थाई व कायम व्हावे म्हणून, हिंदुमात्राला पूज्य अशा गाईचा वध मुसलमानांनी बंद करावा अशी अत्यंत कळकळीची विनंती आपले मुसलमान बांधवास केली. सभेतील सर्व मुसलमानांनी मोठ्या उत्साहाने ही विनंती मान्य केली. या प्रमाणे मुस्लिम लीगने केलेला ठराव मान्य करण्यात आला होता. उमरावतीच्या खिलापत दिनाचे हे वैशिष्ट्य होते.

शांतता स्मारक सभेचे, विजय स्मारकाच्या सभेत रूपांतर : डेप्युटी कमिश्नर श्री. पाठक यांचे निमंत्रणावरून, दि. १७ मार्च १९२० रोजी, म्युनिसिपल हॉलमध्ये शांतता स्मारकासंबंधी निमंत्रित नागरिकांची एक सभा भरली होती. सभेला सरकारी अधिकाऱ्यांसह सुमारे पन्नास लोक हजर होते.

सभेचे अध्यक्ष श्री. पाठक, डे. कमिश्नर, यांनी आजच्या सभेचे प्रयोजन सांगितले व शांतता स्मारक वऱ्हाडतर्फे व्हावे असे सुचविले.

त्यावर होमरूल नगर शाखेचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब असनारे यांनी 'अजून जगात शांतता मूर्त स्वरूपात आलेली नसल्याने हे स्मारक पुढे ढकलण्यात यावे' अशा आशयाचा ठराव मांडण्याची सूचना दिली. त्यावर बराच वादविवाद होऊन, हॉस्पिटल करायचे ते व्हिक्टरी हॉस्पिटल या नावाने करा, शांततेच्या नावाने नको, इत्यादी भवतिनभवती होऊन संभाव्य हॉस्पिटलला व्हिक्टरी हॉस्पिटल नाव द्यावे असे सर्वानुमते ठरले व या हॉस्पिटलसाठी वर्गणी गोळा करण्यासाठी जिल्हा कमेटी नेमण्यात आली. डॉ. भट यांना या कमेटीचे अध्यक्ष निवडण्यात आले व इतर सभासद निवडले गेले. या कमेटीचे सेक्रेटरी म्हणून नायब तहसिलदार श्री. जयवंत आणि राष्ट्रीय पक्षाचे कार्यकर्ते श्री. मोहरील वकील हे निवडले गेले होते.

अशा रीतीने युद्ध संपले, शांतता झाली, यास्तव शांततेचे स्मारक करा, यासाठी बोलाविलेल्या सभेचें रूपांतर व्हिक्टरी हॉस्पिटल या नावाने स्मारक उभारावे या विचारात झाले होते.

ऑलेम्पिक गेम्स : उमरावतीत जाहीर सभा : दि. २३ मार्च १९२० रोजी, येथील गणेश थिएटरमध्ये नवीन स्थापन झालेल्या स्वयंसेवक मंडळाच्या विद्यमाने ऑल इंडिया ऑलेम्पिक गेम्सच्या मदतीसाठी सभा भरविण्यात आली होती. सभेचे अध्यक्षस्थान येथील सुप्रसिद्ध नागरिक व राष्ट्रीय पक्षाचे पुढारी ना. श्रीमंत अण्णासाहेब देशपांडे यांनी सुशोभित केले होते.

स्वयंसेवक मंडळाचे स्थापनकर्ते व तरुण उत्साही कार्यकर्ते रा. रा. गुलाबराव बक्षी यांच्या सहीने हस्तपत्रके वाटली होती. त्यांनीच समयोचित असे छोटेसे भाषण केल्यावर, अध्यक्षांनी श्री. बाळासाहेब जयवंत यांस बोलण्याविषयी विनंती केली. त्यानंतर श्री. दादासाहेब शेवडे यांचे आवेशयुक्त भाषण झाले. नंतर श्री. मुजफ्फर हुसेन यांचे उर्दूत अस्खलीत व जोरदार भाषण झाले.

नंतर हकीम साहेब यांचे भाषण झाले. ते म्हणाले "मी पंजाबी आहे. पंजाबात बायका देखील व्यायाम करतात. व कुस्ती मारल्याखेरीज मुलाचे लग्न होत नाही. परंतु वऱ्हाडात मला हा धोक आढळत नाही. ज्या मनुष्यास तालमीचा नाद नसतो तो स्मैन बनतो, व नानाविध बदफैल, 'जीविताची माती करून घेतो." त्यानंतर त्यांनी हिंदु-मुसलमानांच्या एकीचा गौरव केला, ती कायम ठेवण्यासाठी कळकळीचा उपदेश केला.

यानंतर समयोचित चर्चा व भाषणे होऊन आभार प्रदर्शनानंतर सभा संपली.

उमरावतीत राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळाची स्थापना : रविवार दि. २८ मार्च १९२० रोजी, गणेश थिएटरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळ स्थापन करण्याकरता श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. वामनराव जोशी यांचे भाषण झाले. श्री. शास्त्री वकील यांनी प्रथम सुरवात केली. नंतर अध्यक्षांचे विनंतीवरून श्री. वामनराव यांनी भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले :- "आपल्या उमरावतीस राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळ स्थापावयाचे आहे. आपले येथे डॉ. पटवर्धन यांनी सामाजिक सेवेकरिता एक मंडळ स्थापन केले आहे. तें उत्तम कार्य करीत असून आपल्या शहरास ती अभिमानास्पद संस्था आहे. परंतु त्यांच्या मंडळास राष्ट्रीय काम करता येणे शक्य नाही. कारण कार्याची दिशा भिन्न

आहे. त्यांचे मंडळात सरकारी नोकर अगर राजकीय कार्याविषयी उदासिन असा मनुष्य स्वयंसेवक होऊ शकेल. त्याप्रमाणे आमच्या मंडळात होऊ शकणार नाही. रा. गुलाबराव बक्षी यांचे जे मंडळ आहे त्याचे व आमचे कार्यक्षेत्र एक होऊ शकते. तथापि ते केवळ तरुणांचेच असल्यामुळे माझ्या सारख्या पोक्त वयाच्या मनुष्याचा त्यात समावेश होईल किंवा नाही कोण जाणे. सबब हे मंडळ स्थापावयाचे आहे, व लोकमान्य जर लौकर आले तर या मंडळास लाभही बराच होईल."

त्यानंतर श्री. बाबासाहेब म्हणाले की, "श्री. वामनरावांनी या मंडळाचे बहिरंग वर्णन केले, मी आपणास अंतरंग सांगतो." बाबासाहेबांच्या भाषणानंतर स्वयंसेवकांची नावे नोंदण्यात आली. गावातील पुष्कळ प्रमुख पुढारी, वकील, डॉक्टर, व्यापारी व शेठ सावकार यांनीही उत्साहाने स्वयंसेवकात जागच्या जागी नावे नोंदविली. नंतर सभा बरखास्त झाली.

गांधी कमिशनच्या रिपोर्टासाठी जाहीर सभा : रविवार, ता. ४ एप्रील १९२० रोजी गणेश थिएटरात, वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटी, मुस्लिम लीग व हिंदी स्वराज्य संघाची स्थानिक शाखा यांच्या विद्यमाने श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली गांधी कमिशनचा निर्णय सर्व लोकांना समजावून सांगण्यासाठी, जाहीर सभा भरली होती. अध्यक्षाची सूचना श्री. भाऊसाहेब असनारे यांनी आणली व त्यास रीतसर अनुमोदन मिळाल्यावर श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले, व लहानसे प्रास्ताविक भाषण झाल्यावर श्री. दादासाहेब शेवडे यांना उद्दिष्ट विषयासंबंधी व्याख्यान देण्यासंबंधी विनंती केली. श्री. शेवडे यांचे भाषणानंतर श्री. शामराव देशपांडे यांचे व्याख्यान झाले. इतर वक्ते बोलल्यानंतर सभा संपली होती.

उमरावतीत मर्दानी खेळांचे सामने : उमरावती येथील तरुण व उत्साही डॉ. पटवर्धन यांच्या परिश्रमामुळे येथे 'सेवा समिती' स्थापन झाली असून, मुंबई बँकेचे, शाँफ श्री. वाडीलाल हे या समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीमार्फत श्री हनुमान जयंतीनिमित्त येथे शनिवार, ता. ३ एप्रील १९२० रोजी सायंकाळी व रविवारला सकाळ-संध्याकाळी मर्दानी खेळांचे सामने भरविण्यात आले होते. नेकोलेट पार्कच्या पटांगणावर प्रेक्षकांची बरीच गर्दी असून खेळ प्रेक्षणीय झाले होते.

या प्रसंगी दोन्ही दिवशी, गावातील सर्व प्रमुख व सभ्य गृहस्थ हजर होते. श्री. भाऊसाहेब असनारे, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. वामनराव जोशी, रा. ब. डॉ. भट, श्री. दादासाहेब शेवडे, को-ऑ. बँकेचे श्री. खरे व गावातील शेट सावकार हजर होते. येथील पोलिसचे डि. एस्. पी., मि. कॉव्हेली हे ही प्रथम पासून हजर होते. श्री. बाळासाहेब जयवंत, श्री. भागवत वकील, श्री. जयराम पाटील, वडाळीचे श्री. सुखाप्पा व येथील म्युनिसिपॅलिटीचे उत्साही, तरुण व क्रीडाप्रिय सेक्रेटरी श्री. साने हे व्यवस्था करीत असताना दृष्टीस पडत होते व सारखे उन्हातान्हात श्रम करीत होते.

दुसरे दिवशी वरील सद्ग्रहस्थाशिवाय, शेठ दत्तदयाल भिवापूरकर बॉम्बे बँकेचे येथील मुख्य अधिकारी मि. हॉचिसनसाहेब, धामकचे सुप्रसिद्ध उदार सेठ केशरीमलजी व ना. तांबे हे खेळास हजर होते. मि. कॉव्हेली साहेबांनी खेळ चालू असताना वारंवार ज्या उपयुक्त सूचना केल्या, त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत अधिक भर पडली आहे. शेवटचे दिवशी ते दोर ओढण्याच्या (टग ऑफ वॉर) खेळात स्वत. सामील झाले व कित्येक खेळाडूंना उत्तेजनार्थ त्यांनी स्वत: बक्षिसे दिली. श्री. हॉचिसन यांनीही बक्षिसे दिली व असे खेळ वारंवार व्हावेत अशी इच्छा प्रदर्शित केली.

श्रीमान शेठ केसरीमलजी यांनी जागचे जागी ३०-४० रुपयांची बक्षिसे देऊन शिवाय दोन हजार रुपयांची संस्थेस देणगी दिली. शेठ नंदलाल संघई यांनी बक्षिसाकरता रु. १०० दिले.

(उमरावती शहरात अशा प्रकारचे शिस्तबद्ध मर्दानी सामने संभवत: प्रथमच भरविण्यात आले होते व याचे सर्व श्रेय डॉ. पटवर्धन यांनाच आहे.)

उमरावतीच्या राष्ट्रीय सप्ताहातील
खिलापतदिन.

जालीयानवाला बाग सप्ताहातच म. गांधीच्या आदेशाप्रमाणे दि. ९ एप्रील १९२० रोजी आठवडी बाजारात श्री. चंद्राचार्य यतिमहाराज यांच्या अध्यक्षतेखाली खिलापत – दिनाची जाहीर सभा भरली. डॉ.

कृ. वा. बन्हाडपांडे यांनी 'अमरावतीच्या हिंदु-मुसलमानांच्या न्याय्य मागण्या व प्रधानांची वचने यास अनुसरून खिलापतीचा हिंदी मुसलमानास समाधानकारक असा निकाल न झाल्यास हिंदी लोक यापुढे सरकारशी सहकारीतेने वागणार नाहीत.' असा ठराव सभेपुढे मांडला व भाषण केले या ठरावास श्री. मुजफ्फर हुसेन यांनी अनुमोदन देताना, खिश्चन राष्ट्रांनी एका मशिदीत जमलेल्या मुसलमान स्त्री-पुरूष व मुलांस, मशिदीस आग लावून कसे जिवंत भाजून मारले याची हृदयद्रावक हकीकत सांगितली. हकीम मीर जाफरखान यांच्या भाषणानंतर ठराव सर्वानुमते पास झाला. अध्यक्षांचे भाषणानंतर आभार प्रदर्शन होऊन सभा संपली

अमृतसरच्या कत्तलीचा श्राद्धदिन : जालीयनवाला बाग स्मारक समितीने केलेल्या सूचनेनुसार, दि. १३ एप्रील १९२० रोजी, हा अत्यंत दु:खाचा श्राद्धदिन पाळण्यासाठी, तिकिटे लावून सभा झाली होती. अध्यक्षस्थानी श्री. बाबासाहेब खापर्डे हे होते. 'ही सुतकाची व श्राद्धदिनाची सभा असल्यामुळे सभेत कोणीही टाळ्या वाजवू नयेत.' अशी अध्यक्षांनी श्रोत्यांना सूचना केल्यानंतर, येथील वयोवृद्ध पुढारी श्री. भाऊसाहेब असनारे यांनी मुख्य ठराव सभेपुढे मांडून भाषण केले. त्यानंतर श्री. मुजफ्फर हुसेन एम्. ए. एल्. एल्. बी. वकील यांनी अस्सल उर्दूत सुंदर भाषण केले. नंतर श्री. दादासाहेब शेवडे यांनी ठरावास अनुमोदन देताना भाषण केले. नंतर श्री. वामनराव जोशी यांचे पाठिंबा देणारे भाषण झाले. शेवटी अध्यक्षांचे भाषण होऊन ठराव सर्वानुमते पास करण्यात आला व आभार प्रदर्शन होऊन सभेचे काम संपले.

जालीयानवाला बाग स्मारक फंडासाठी तिकिटे लावून ही सभा घेण्यात आली होती.

... ...

सक्करसाथीतील राममंदिरासमोर दि. १६ एप्रील १९२० रोजी राष्ट्रीय सप्ताहास पूरक अशी जाहीर सभा श्रीमान सेठ फत्तेचंद पुनमचंद यांचे अध्यक्षतेखाली भरली. डॉ बन्हाडपांडे यांनी हिंदीत भाषण केले. रौलट ॲक्टला लोकांनी केलेला विरोध कसा वाया गेला हे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

त्यानंतर वैद्य गुलाबचंद धामणगावचे, श्री. जसराज यांची भाषणे झाली व नंतर रा. वामनराव जोशी यांचे भाषण झाले. सर्वश्री गुलाबचंद, सदाशिव हिराचंद खत्री, गणपतराव गोविंदहरे, शेठ नथमलजी व शेठ मोतीलाल पुरुषोत्तम यांनी फंडाकरता स्वयंसेवकात आपली नावे दिली. श्री. भाऊसाहेब असनारे यांनी आभार मानले.

उमरावतीची शिवजयंती : दि. २१ एप्रील १९२० रोजी येथील गणेश थिएटरात शिवजयंतीचा मंगलकारक उत्सव साजरा करण्यात आला. तरुण स्वयंसेवक मंडळाचे सेक्रेटरी श्री. गुलाबराव बक्षी यांनी सभेला सुरवात केली. उत्सवाचा कार्यक्रम संपल्यावर पोवाडे झाले. त्यानंतर बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले. शेवटी गुलाल उधळण्यात आला व प्रसाद वाटण्यात आला.

'आम्ही निजाम राज्यात जाणार नाही.'
वऱ्हाडचे प्रश्नावर झालेली सभा.

शनिवार, दि. २४ एप्रील १९२० रोजी येथील गणेश थिएटरमध्ये नामदार यशवंत गोविंद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, वऱ्हाडच्या प्रश्ना-संबंधी विचार करण्यासाठी, जाहीर सभा भरली होती. बॅरिस्टर दाऊदखान सुफी व मेहेरबान मुजफ्फर हुसेन वकील यांनी ही सभा बोलाविली होती.

हिज एक्झल्टेड हायनेस, दि नायझाम हे आपला वऱ्हाड परत मागत आहेत. त्यासंबंधी विचार करणे हा या सभेचा उद्देश होता. श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी ठराव मांडताना ठरावावर भाषण केले. या ठरावास ईलिचपूरचे खतीबजी यांनी अनुमोदन दिल्यावर, श्री. काशीराव बापूसाहेब, एडिटर, सुबोध ग्रंथमाला, यांनी ठरावास पुष्टी दिली. नंतर दादासाहेब शेवडे यांचे भाषण झाले. शेवटी समारोपादाखल अध्यक्षांचे सुंदर व जोमदार भाषण झाले. आम्ही निजाम राज्यात जाणार नाही हा ठराव पास झाला.

स्वराज्य संघाचा ५ वा वाढदिवस : शनिवार, दि. ८ मे १९२० रोजी जोग चौकात श्री. परांजपे वकील यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्य संघाचा ५ वा वाढदिवस साजरा करण्यासाठी जाहीर सभा भरली.

डॉ. वऱ्हाडपांडे यांनी संघाच्या चार वर्षांतील कामगिरीचे सिंहावलोकन करून पुढील कार्याचे विवेचन केले. नंतर श्री. भाऊसाहेब असनारे यांनी काँग्रेस लोकशाही पक्षाचा जाहिरनामा वाचून दाखविला व त्याला संमती देणारा ठराव पुढे मांडला. त्यास श्री. वामनराव जोशी यांनी अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमते पास झाला.

दुसरा ठराव स्वामी शिवानंद यांनी, (म. गांधी हे भारतीय स्वराज्य संघाचे सभासद व अध्यक्ष झाल्याबद्दल, अभिनंदनाचा ठराव) मांडला व त्याला श्री. नीळकंठराव डांगे यांनी अनुमोदन दिल्यानंतर तोही पास झाला. आभार प्रदर्शन होऊन वाढदिवसाची सभा समाप्त झाली.

उमरावतीचा जालीयानवाला बाग सप्ताह : अमृतसर (पंजाब) येथील जालीयानवाला बागेत इंग्रज अधिकाऱ्यांनी निःशस्त्र, निरपराध व शांततावादी लोकांच्या सभेवर, कोणतीही पूर्व सूचना न देता, जो भयानक गोळीबार केला होता, त्यात शेकडो लोक शहीद झाले होते.

या भयानक व क्रूर हत्याकांडाचे निषेधार्थ सर्व देशभर १९१९ मध्ये लोकांनी सप्ताह पाळला आणि १९२० मध्येही सप्ताह पाळण्यात आला होता.

दि. ६ एप्रील १९२० पासून उमरावती शहरात जालीयानवाला बाग सप्ताह सुरू झाला व तो फार उत्साहाने पार पडला. या सप्ताहाच्या समारोपाची सभा, दि. १३ एप्रील १९२० रोजी, श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत रौलट बिलाचे निषेधाचा व सत्याग्रहाचे स्मरणार्थ रा. भाऊसाहेब असनारे यांनी ठराव मांडला व रा. दादासाहेब शेवडे यांनी त्यास अनुमोदन दिल्यावर दादासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले व ठराव मंजूर झाला.

त्यापूर्वी या सप्ताहानिमित्त भाजीबाजारचे भव्य पटांगणात, येथील सुप्रसिद्ध नागरिक श्री. बापूसाहेब दंडे यांचे अध्यक्षतेखाली, रा. बाबासाहेब खापर्डे यांचे पंजाब प्रकरणासंबंधी दोन तास भाषण झाले होते.

बुधवारातील भव्य पटांगणावर श्री. दादासाहेब शेवडे यांचे भाषण रा. वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. नंतर

रा. वामनराव जोशी यांचेही अत्यंत कळकळीचे व मनाला हलवून सोडणारे भाषण झाले.□

हंटर रिपोर्टाचे निषेधाची सभा : दि. २४ जुन १९२० रोजी जोग चौकात हंटर कमेटीच्या रिपोर्टाचा निषेध करण्यासाठी श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जंगी जाहीर सभा झाली. अध्यक्षांनी आपल्या भाषणात इंग्रज सरकारने कसकसे जुलमी कायदे तयार केले त्याचा सविस्तर वृत्तांत सांगितला व रौलेट ॲक्ट हा देखील त्याच मालिकेतील असून, हंटर कमेटीचा रिपोर्ट किती गचाळ आहे

□**कत्तलीची सभा** : ज्या जालीयानवाला बागेतील भयंकर कत्तलीने आज सगळ्या जगाच्या अंगावर थरारून काटा आला आहे, ती कत्तल एका सभेच्या वेळी झाली हे सर्वांना माहीत आहे. या सभेसंबंधाने एक अत्यंत आश्चर्यकारक व अत्यत महत्त्वाची गोष्ट आता बाहेर आली आहे व ती शोधून काढून प्रसिद्धीला देण्याचे श्रेय पंजाब प्रकरणावर अविश्रांत परिश्रम केलेल्या काँग्रेसच्या पंजाब सब् कमेटीसच आहे.

ही माहिती अशी की, ज्या सभेत ही अमानुष कत्तल उडविली गेली ती सभा हिंदी लोकांच्या हातून पंजाबात युरोपीयावर घडलेल्या अत्याचारांचे निषेधार्थ भरविली होती. त्या सभेपुढे जो ठराव मांडला गेला, तोही आता प्रसिद्ध झाला आहे.

" राजनिष्ठ व शांत अशा नागरिकांवर गोळ्या घालण्यात सरकारने जो अन्याय केला व असभ्य वर्तन केले, त्यामुळे नाईलाजास्तव स्वाभाविक परिणाम म्हणून जे व्यर्थ अत्याचार व दांडगाईचे प्रकार घडले त्याचा तर ही सभा बिनशर्त प्रतिकार करतेच पण अशा कृत्यांनी परिणामी ब्रिटिश साम्राज्याच्या हिताची कदाचित जबरदस्त हानी करणारे असे गंभीर दुष्परिणाम होण्याचा संभव आहे, अशी या सभेस वाटत असलेली भीती ही सभा व्यक्त करते. " असा तो ठराव होता. व गुरुबक्षराय अमृतसरच्या कटाच्या खटल्यातील आरोपी नं. १० यांनी हा ठराव त्या सभेपुढे मांडला होता. हा ठराव पास झाला व नृशंस जनरल डायरने बंदुक उचलुन तो ठराव करणाऱ्यांवर गोळ्या घातल्या.
(उदय : दि. २९ जुन १९२०)

याचे देखील वर्णन केले आणि पंजाबातील अत्याचारांचे हिडीस स्वरूप सांगितले.

हंटर रिपोर्टाच्या निषेधाचा ठराव श्री. भाऊसाहेब असनारे यांनी मांडला, व श्री. भागवत वकील, नागपूरचे श्री. चिंतामणराव मराठे व श्री. शास्त्री वकील यांनी त्यास, भाषणे करून, दुजोरा दिला. समारोप करताना दादासाहेब म्हणाले : 'जालीयानवाला बागेत जमलेली माणसे आपण होऊन आलेली नसून, हंसराज नावाच्या पोलिसाच्या हस्तकाने मुद्दाम गोळा केलेली होती. अत्यंत विलक्षण गोष्ट अशी की काही लोकांनी चार पांच युरोपीयनांना मारले किंवा त्रास दिला, त्या आपल्याच लोकांचा निषेध करण्याकरता ही सभा भरविण्यात आली होती व ही सभा चालू असताना बंड झाले अशी आवई उठवून जनरल डायर याने गोळीबार केला[१].'

जालीयानवाला बाग स्मारक फंड : जुन १९२० पर्यंतो उमरावतीतून जमलेल्या फंडापैकी ५०० रुपये अमृतसरचे लाला गिरधारीलाल यांचेकडे पाठविण्यात आले व लौकरच आणखी २०० रुपये पाठविण्यात येतील. सबब ज्यांनी आश्वासने दिलीत त्यांनी लवकर फंडास मदत करावी अशी विनंती डॉ. कृ. दा. वऱ्हाडपांडे, चिटणीस स्वराज्य संघ, यांनी एका पत्रकाद्वारे केली होती.

हिंदु विधवांच्या नीतिमत्तेविषयी केलेल्या अन्याय्य विधानांचे निषेधार्थ जाहीर सभा.

दि. ११ जुलै १९२० रोजी सकाळी 'गणेश थिएटरात श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, कलकत्त्याच्या ए पिकनी' नामक मिशनरी पत्राने हिंदु विधवांच्या नीतिमत्तेविषयी केलेल्या अन्याय्य विधानांचा निषेध करण्याकरता, नागरिकांची जाहीर सभा भरली होती.

या सभेत पास झालेल्या ठरावात निषेधाव्यतिरिक्त, सरकारने फौजदारी खटले करून अथवा अन्य उपायांनी अशी विधाने करणाऱ्यांचा बदोबस्त केला पाहिजे अशी विनंती केली होती.

---

१ : उदय : दि. २९ जुन १९२० पा. २



चित्र क्र. ९६ : श्री दादासाहेब खापर्डे (पृष्ठ ३६९ पहा)
यांना उमरावतीकरांचे मानपत्र.

चित्र क्र. ९७ : संदेशकार (पृष्ठ ३७३ पहा)
अच्युत बळवंत कोल्हटकर



चित्र क्र. १८ : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. (पृष्ठ ३८५ पहा)
मृत्यु दि. १ आगष्ट १९२०

या ठरावावर श्री. अण्णासाहेब देशपांडे, डॉ. वऱ्हाडपांडे, मोर्शीचे रा. बाबासाहेब देशपांडे, उमरावतीचे श्री. लढ्ढा वकील, व श्री. काशीराव बापु यांनी भाषणे केली. रा. भाऊसाहेब असनारे यांचेही भाषण झाले. ठराव अधिकाऱ्याकडे पाठविण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यात आला व समारोप होऊन सभा संपली.

जिल्हा काँग्रेस कमेटीची निवडणूक : रविवार, दि. २५ जुलै १९२० रोजी, येथील होमरूलचे ऑफिसात जिल्हा कॉं. कमेटीची सभा होऊन, पुढील सालाकरिता रा. ना. म. बेदरकर बी. ए. एल्. एल्. बी. हे अध्यक्ष, रा. ज. के. असनारे बी. ए. एल्. एल्. बी; रा. त्र्यं. ल. शेवडे बी. ए एल्. एल्. बी. व रा. शिवरामपंत पाटील हे तीन उपाध्यक्ष, रा. वा. दा. भागवत एम् ए. एल्. एल्. बी. व रा. वा. गो. मोहरील बी. ए. एल्. एल्. बी. हे दोन चिटणीस निवडण्यात आले.

'संदेश' व 'टाईम्स् ऑफ इंडिया' बंद : उमरावती : येथील नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या मेंबरांची सभा ता. २५ जुलै १९२० रोजी सकाळी भरून, लायब्ररीत 'संदेश' बंद करण्याचा ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला[१].

लोकमान्य टिळकांचे मृत्यूनंतर त्यांच्या विषयी खोडसाळ व अपमानजनक लिखाण लिहिल्यामुळे टाईम्स ऑफ् इंडियाचे 'टाईम्स' हे पत्र नगर वाचनालयात बंद करण्यात आले. श्री. ओझरकर यांच्या अध्यक्षतेखाली वाचनालयाची सभा होऊन बावन्न विरूद्ध दोन मतांनी ठराव मंजूर झाला.

लोकमान्य टिळकांचे निधनः वज्राघात.

उमरावतीत सर्वत्र दुःखाची कळा.

दि. १ ऑगस्ट १९२० रोजी सकाळी लोकमान्य टिळकांच्या निधनाची दुःखद वार्ता उमरावतीस तारेने कळली व ही वार्ता वाऱ्यासारखी सर्व शहरभर पसरून सर्व शहर शोकमय झाले. शहरात स्वयंस्फूर्त कडकडीत हरताळ पडला.

---

१ : उदय : दि. ७ सप्टेंबर १९२०

सायंकाळी ४ वाजता जोग चौकात दुःख प्रदर्शनार्थ नागरिकांची जाहीर सभा भरली. सर्व धंद्याचे, सर्व जातींचे व सर्व पक्षांचे लोक आले होते. समूह फारच मोठा होता. सभेचे अध्यक्ष रा. अण्णासाहेब देशपांडे हे होते. ना. तांबे यांनी दुखवटयाचा ठराव मांडला. त्यावर शे. मुजफ्फर हुसेन, सेठ कन्हैयालाल, रावसाहेब ब्रम्ह व रा. बाळासाहेब जयवंत यांची भाषणे झालीत. सभा उमरावतीत कधी पाहिली नाही इतकी उदास होती. दुःखाने अश्रुपात न आवरणारे श्रोते होते. स्वतः अध्यक्षास गहिवर न आवरल्याने भाषण करता आले नाही. गावात जिकडे तिकडे उदास व भयाण वाटत होते. सर्व दुकाने व व्यवहार अजिबात बंद होते. सर्वांचे चेहरे उतरले होते. व लोकमान्यांच्या पवित्र गोष्टी खेरीज व खेदजनक मृत्यूखेरीज दुसरे कोणीही कोठेही बोलताना आढळून आले नाही.

म्युनिसिपॅलिटीतर्फेही दुःख प्रदर्शक तारा करण्यात आल्या.

लोकमान्यांचे गुण संकीर्तन : लोकमान्यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवार, दि. ९ आगस्ट १९२० हा दिवस पाळण्याचे उमरावतीकरांनी ठरविले व त्या दिवशी सर्व नागरिकांनी कामकाज व दुकाने बंद ठेवली होती.

या पुण्यतिथीच्या पूर्वी तीन दिवस लोकमान्यांचे गुण संकीर्तन रोज सायंकाळी करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे दि. ६, ७ व ८ रोजी शहरातील निरनिराळ्या भागात सभा भरविण्यात आल्या होत्या.

पहिली सभा, दि. ६ ऑगस्ट रोजी जोग चौकात श्रीयुत भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली भरली व पहिल्या दिवसाचे गुण संकीर्तन येथील सुप्रसिद्ध वकील श्रीयुत दादासाहेब शेवडे यांनी केले.

दुसरी सभा, ता. ७ ऑगस्ट रोजी सक्करसाथीत शेठ फत्तेचंद यांच्या दुकानासमोर शेठ पन्नालाल यांच्या अध्यक्षतेखाली भरली. अध्यक्षांनी हिंदीत भाषण केले व नंतर सेठ कन्हैयालाल यांनी एका पत्रातील उतारा वाचून दाखविला. नंतर श्री. चाफेकर वकील यांचे सुश्राव्य भाषण झाले.

तिसरी सभा, दि. ८ रोजी रात्री ९ वा. बुधवारा चौकातील विस्तीर्ण पटांगणात श्री. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली भरली

व स्वामी शिवानंद, रा. गुलाबराव बक्षी, रा. दादासाहेब शेवडे, रा. दादासाहेब खापर्डे व रा. वामनराव जोशी यांची भाषणे झाली.

चौथी सभा ता. ८ रोजीच दहिसाथीतील वजनदार गृहस्थ रा. बापूसाहेब दंडे यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी साडे सहा वाजता भरविण्यात आली होती. ह. भ. प पोंक्षे शास्त्री, श्री. बापूसाहेब मेने, श्री. आबासाहेब ओझरकर, श्री. वामनराव जोशी व डॉ. वऱ्हाडपांडे यांची भाषणे झाली.

लोकमान्यांचे चौरंगाची मिरवणूक : सोमवार, ता. ९ रोजी जोग चौकातून लोकमान्यांच्या तसबिरीची मिरवणूक काढण्यात आली. रा अण्णासाहेब दामले, रा. तात्यासाहेब तांबे, रा. भाऊसाहेब असनारे, रा. दादासाहेब शेवडे, रा. वामनराव जोशी, रा. वासुदेव गणेश तांबे, रा. बापट वकील, रा. बाबासाहेब खापर्डे वगैरे नागरिकांनी प्रथम स्वतःच्या खांद्यावरून लोकमान्यांचा चौरंग वाहिला. चौरंगासाठी सारखी अहमहमिका चालू होती. रस्त्याने हिंदु-मुसलमान यांनी मिळून आळीपाळीने चौरंग फार आनंदाने वाहिला. सर्व मिरवणूकभर, 'पायी हळू हळू चाला, मुखाने टिळक नाम बोला' असा सारखा गजर चालू होता. लोकमान्यांचे तसबिरीवर होमरूलचे निशाण फडकत होते. पुढे दिंड्या चालल्या होत्या. मे. मुजफ्फर हुसेन स्वतः चामर ढाळीत होते. लोकमान्यांचे स्वारीमागे निदान बारापासून पंधरा हजारापर्यंत समाज असावा. सरासरी शंभर सव्वाशेपर्यंत कुलीन स्त्रियांही चौरंगाचे पाठीमागे चालत होत्या. एवढा मोठा व इतका मिश्र समाज उमरावतीकरांच्या स्मरणात असेल किंवा नाही त्याची वानवाच आहे.

सेवा समितीच्या स्वयंसेवकांनी फार उत्तम रीतीने शिस्तशीर व्यवस्था ठेवली होती. पोलिसची वर्तणूकही चांगली होती. स्वारीची मिरवणूक शहराच्या मध्यभागातून फिरून सायंकाळी सहाचे सुमारास पुन्हा ब्रम्हविद्या मंदिराच्या समोरच्या पटांगणात आली. लोकमान्याच्या तसबिरीचे दर्शन घेण्यास रस्त्याभोवतालच्या घरांतून खिडक्यांतून अतिशय गर्दी होती. एवढा मोठा सर्व समाज अनवाणी व उघड्या डोक्यांनी चालत होता. सभाही उघड्या डोक्यांनीच करण्यात आली.

रा. अण्णासाहेब दामले यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभेला सुरवात झाली. भाऊसाहेब असनारे यांनी अध्यक्षांचे नावाची सूचना आणली, त्यास हनुमंत मेघःश्याम देशमुख यांनी अनुमोदन दिल्यानंतर अध्यक्ष स्थानापन्न झाले. प्रसंगास अनुसरून अध्यक्षाचे भाषण झाल्यावर रा. दादासाहेब शेवडे यांचे मुद्देसूद व जोरदार भाषण झाले. त्यानंतर रा. काशीराव बापू, ना. देशपांडे, मे. मुजफ्फर हुसेन, पंडित सुभाषचंद्रजी, रा. वामनराव जोशी व शेवटी बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले व त्यांनी भगवद्गीतेतील 'यदा यदाहि धर्मस्य' वगैरे श्लोक म्हटले व श्रोतृवृंदाने त्यांच्या मागोमाग ते म्हटले. नंतर वामनराव जोशी यांनी केलेल्या लोकमान्यांच्या जीवनसाराचे वर्णन करणारे श्लोक म्हणून दाखविले. लोकमान्यांचे जयघोषात सभा समाप्त झाली. सभेच्या वेळी, श्रोतृवृंदाचे हृदय भरून येऊन लोक अश्रू ढाळीत होते. सभा केवळ अपूर्व झाली.

शोक सभा : लोकमान्य टिळकांच्या दुःखद निधनानिमित्त दुःख प्रदर्शित करण्याकरता दि. २२ आगस्ट रोजी स्त्रियांची सभा सौ. लक्ष्मीबाई खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सौ. शेवडे, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सिंधुताई गोळे इत्यादींची भाषणे झाली. टिळक स्मारकाकरिता फंड जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

उत्सव नको

(१) जालीयानवाला बाग मैदानात मारल्या गेलेल्या हिंदी बांधवांच्या विधवांचे अश्रू अजून वाळले नाहीत.

(२) तुर्कस्थानच्या शरिराचा भंग करून मुसलमान बांधवास दुखावले.

(३) खिलापत बाबतीत मुख्य मंत्र्यांनी वचनभंग करून ब्रिटिश साम्राज्याची बेअब्रू केली.

(४) गोवधबंदी करता प्रामाणिक प्रयत्न होत नाहीत.

(५) लोकमान्य टिळक नुकतेच सोडून गेले. म्हणून दसरा उत्सव करू नये.

— बा. ग. खापर्डे
— जयराम केशव असनारे
— वामन गोपाळ जोशी

टाईम्स'चा निषेध : मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या 'टाईम्स ऑफ् इंडिया' चे दि. २ ऑगस्ट १९२० चे अंकात लोकमान्य टिळकासंबंधी जो खोडसाळ लेख प्रसिद्ध झाला, त्यातील विधानांचा विरोध करण्यासाठी दि. ५ ऑगस्ट १९२० रोजी, जोग चौकांत रा. रा. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, रा. भागवत वकील यांनी मांडलेले टाईम्स चे निषेधाचे ठरावावर, रा. रा. भागवत वकील, रा. वामनराव जोशी, रा. भोळे वकील, व रा. बाबासाहेब खापर्डे यांची भाषणे होऊन ठराव मंजूर करण्यात आला. सभेला सुमारे १५०० लोक हजर होते.

ॲडिशनल ज्युडिशिअल कमिश्नरचे जागेवर श्रीमंत रा. ब. रंगनाथरंत मुधोळकरांची नियुक्ती.

उमरावतीचे सुविख्यात श्रीमंत रा. ब. रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकर, सी. आय. ई., यांची नागपूर येथील ॲडिशनल ज्युडिशियल कमिश्नरचे जागेवर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले[१].

सरकारी कसाईखान्याचे निषेधाच्या सभा : सागर येथे नव्या उघडण्यात येणाऱ्या गुरांचे सरकारी कसाईखान्याचा निषेध करण्यासाठी उमरावती येथील सक्करसाथ येथे, दि. १७ ऑगस्ट १९२० रोजी व भाजी-बाजारात, दि. १८ ऑगस्ट रोजी सभा भरविण्यात आल्या होत्या. पहिल्या सभेचे अध्यक्ष रा. श्रीकृष्ण नारायणदास लढ्ढा वकील हे होते व या सभेत रा. महाजन, मॅनेजर 'आर्यावर्त', रा. काशीप्रसाद, गोरक्षण उपदेशक, रा. बाबाबाहेब खापर्डे व रा. वामनराव जोशी यांची सुश्राव्य भाषणे झालीत. दुसरे दिवशी रा. भाऊसाहेब असनारे, वकील हे अध्यक्ष होते व या सभेत रा. ग. मो. वैद्य, रा. चंद्रभान श्रावगी, रा गुलाबराव बक्षी व रा. बाबासाहेब खापर्डे यांची श्रवणीय भाषणे झाली होती.

लोकमान्यांचा कित्ता

"आले शिरावरी जरी घनघोर घाले,
दारिद्र्य दुःख अपमानहि प्राप्त झाले,"

---

१ : उदय : दि. १७ ऑगस्ट १९२०

कारागृही सतत वास, जरी मरे मी.
पूजीन ही तरीहि निर्भय मातृभूमी."

वरील श्लोक अमरावतीचे प्रसिद्ध देशभक्त व नामांकित नाटककार रा. रा. वामन गोपाळ जोशी यांनी केला असून, येथील लोकमान्यांच्या दहाव्या दिवसानिमित्त भरलेल्या सभेत तो म्हणण्यात आला होता. रा. वामनराव यांच्या सूचनेवरून एका लहानशा कागदावर हा श्लोक सुटा छापून त्याच्या हजारो प्रती, 'उदय' कार्यालयातर्फे ऑफिसात येऊन मागणाऱ्याला फुकट वाटण्यात आल्या होत्या.

इतर वृत्तपत्र कर्त्यांनी अगर छापखान्याचे मालकांनी याप्रमाणे केलास लोकमान्यांचे चरित्राचे सार, त्यांचे ध्येय, व त्यांचा कित्ता पुढे ठेऊन वर्तन कसे करावे याविषयी घ्यावयाचा उपदेश हे सर्व या श्लोकाने उत्तमपणे सर्व महाराष्ट्रापुढे मांडले जाईल असे आम्हास वाटते. विशेषत. बालकाकडून हा श्लोक वडील माणसांनी पाठ करवून घ्यावा'.

हॉकी टुर्नामेन्टस् : मर्दानी खेळांकडे लोकांचे लक्ष लागावे म्हणून, अमरावतीचे नुकतेच ऑनररी मॅजिस्ट्रेट झालेले सेठ नारायणदास राठी यांनी हॉकीकरिता शिल्ड दिले असून, वऱ्हाडातील कोणत्याही शारीरिक व्यायामाकरता काढलेल्या संस्थेला, शाळांना अथवा पोलिस टीम्सना या शिल्डसाठी खेळावयाच्या टुर्नामेंटमध्ये भाग घेता येईल, असे जाहीर करण्यात आले आहे.

ही टुर्नामेंट, दि. १० नोव्हेंबर १९२० पासून दि. १५ डिसेंबर १९२० पर्यंत अमरावती येथे चालू राहील. तीत दाखल होण्याकरता १५ रु. प्रवेश फी ठेवली आहे. खेळाची व्यवस्था चांगली राहावी व खेळ नियमाप्रमाणे खेळले जावेत ह्या हेतूने, त्याच्यावर देखरेखीसाठी तज्ज्ञ लोकांची एक कमेटी नेमण्यात आली आहे. रा. बंबावाले, असिस्टंट पोलीस सुपरिन्टेन्डेन्ट व रा. साने ह्यास सदर टुर्नामेन्टचे सेक्रेटरी नेमले आहे.

हिंदी स्वराज्य संघ : अमरावती शाखा : हिंदी स्वराज्य संघाच्या नगर शाखेच्या सर्व सभासदांची सभा, दि. १९ ऑगष्ट १९२० रोजी

---

१ : उदय : दि. २४ ऑगस्ट १९२०

होमरूल ऑफिसात सायंकाळी भरली होती. या सभेत चालू वर्षाकरता नगर शाखेची कार्यकारिणी पुढील प्रमाणे निवडली गेली. अध्यक्ष : रा. रा भाऊसाहेब असनारे, बी. ए. एल् एल्. बी. वकील, उपाध्यक्ष : (१) शेठ पन्नालाल बन्सीलाल परवार (२) रा. रा. हनुमंत मेघःश्याम देशमुख, बी. ए. एल्. एल्. बी. वकील, (३) शेख मुजफ्फर हुसेन एम्. ए. एल्. एल्. बी. वकील (४) शेठ बाबू शिवनाथ. चिटणीस : (१) डॉ. कृष्णाजी दामोदर वऱ्हाडपांडे (२) डॉ. लक्ष्मण विठ्ठल देशपांडे (३) रा. रा. नारायणराव प्रल्हाद हिरुरकर वकील एम्. ए. एल्. एल्. बी. व (४) रा. रा. दत्तात्रय रामराव कलोती बी. एस्. सी. एल्. एल्. बी. वकील. हिशेब तपासनीस : रा. रा. केशव वामन ओझरकर, वकील. कार्यकारी मंडळाचे जादा सभासद : (१) रा. रा. रामचंद्र विश्वनाथ काळे (२) रा. रा. विठ्ठल माधव शिरबावीकर, (३) रा. रा. वामन नारायण खोतकर, (४) शेठ नगीनदास नथ्थुसाव (५) रा. रा. बळीराम नारायण आष्टीकर.....शेवटी पूर्वीच्या कार्यकर्त्यांचे व विशेषतः रा. रा. वामन गोपाळ जोशी यांनी नगर शाखेच्या कामाला अत्यंत मदत केल्याबद्दल त्यांचे आभार मानून सभेचे काम पूर्ण झाले[१].

गांधी चौक : दि. ८ ऑक्टोबर १९२० रोजी श्री. वीर वामनराव जोशी यांचे असहकारितेवर विचारपरिप्लुत व्याख्यान झाले.

ता. ९ ऑक्टोबर रोजी श्री जगदंबेच्या देवळाच्या वाटेवर डॉ. शहाणे यांचे घरासमोरील पटांगणात महात्मा गांधींच्या वाढदिवसा-निमित्त अनेक वक्त्यांची भाषणे होऊन त्यांचे जयंतीचा उत्सव साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी यवतमाळचे बाबासाहेब परांजपे होते. सदर पटांगणाचे नाव या दिवसापासून 'गांधी चौक' असे ठेवण्यात आले.

काल ता. ११ रोजी सायंकाळी चौकात पुन्हा असहकारितेवर स्पष्टीकरणात्मक व्याख्याने झाली.[२]

प्राणीदया : तेच दिवशी म्हणजे दि. १२ ऑक्टोबर १९२० रोजी रात्रौ गांधी चौकात येथील गोरक्षण संस्थेमार्फत सेठ पन्नालालजी यांच्या

---

१ : उदय : दि. २४ ऑगस्ट १९२०.
२ : उदय : दि. १२ ऑक्टोबर १९२०.

अध्यक्षतेखाली प्राणीरक्षक संस्थेच्या एका उपदेशकाचे व्याख्यान झाले. येत्या दसऱ्यात हेला मारला जाऊ नये व प्राणीमात्रांचे प्राणरक्षणाकरता झटले पाहिजे, असा व्याख्यात्यांनी उपदेश करून अहिंसेचे उदार तत्त्व अत्यंत सरस वाणीने सांगितले. श्री. वामनराव जोशी, श्री. भाऊसाहेब असनारे व हकीम साहेब यांचीही भूतदया प्रेरित भाषणे झाली. श्रीयुत शेठ पन्नालालजी यांनी समयास उचित असा शेवटी समारोप केला.

स्त्रियांची व्याख्याने : दि. १५ ऑक्टोबर १९२० रोजी श्रीयुत भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली गांधी चौकात सौ. ताराबाई मोडक यांचे अत्यंत सुश्राव्य व मननीय असे व्याख्यान झाले. श्रोतृसमुदाय ३००० च्या वर होता. ' ... ... कार्यक्रम व्यवहार्य की अव्यवहार्य या वादात देशाने आपली बुद्धी खर्च करू नये व सरकारशी असहकारिता करताना आपसात कोणीही देऊ केलेली सहकारिता ग्रहण करावी.' असे त्या म्हणाल्या. नंतर कुमारी चंद्राबाई शेवडे यांचे अत्यंत कळकळीचे व जोरदार असे भाषण झाले. त्यांनी असहकारितेचे तत्त्व अमलात न आणणारांस घरी गृहिणींनी बहिष्काराने धडे शिकवावेत असे सांगितले.

उमरावतीत मजुरांची पहिली सभा : दि. १९ ऑक्टोबर १९२० रोजी सायंकाळी जोग चौकात येथील मजुरांची सभा भरविण्यात आली होती. यवतमाळचे प्रसिद्ध पुढारी श्री. बाबासाहेब परांजपे हे अध्यक्षस्थानी होते.

या सभेत श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे एक तास भाषण झाले. 'गरिबी मनावर अवलंबून आहे, द्रव्यावर अवलंबून नाही. पृथ्वीवरचा गरीब देवाघरचा श्रीमंत असतो म्हणून गरिबीविषयी कोणी विषाद मानू नये, अगर द्रव्याच्या अभावामुळे आपण धनिकापेक्षा माणुसकीने अगर इभ्रतीने कमी आहोत असे मानू नये' असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षांनी उचित समारोप केला. ते म्हणाले 'जगात सर्वच मजूर आहेत. देवाने दिलेली मजुरी चोख बजावली की नाही हा खरा सवाल आहे. कोणती मजूरी केली हा प्रश्न गौण आहे.'

उमरावतीत भरलेली मजुरांची संभवतः ही पहिली सभा होती. या सभेत मजुरांची जागृती दिसून आली.

तपस्वी अर्जुनलाल सेठीचे आगमन : दि. १५ ऑक्टोबर १९२० रोजी सायंकाळच्या गाडीने तपस्वी अर्जुनलाल सेठी हे येथे आले होते. स्टेशनवर त्यांना घेण्याकरता गावातील बहुतेक प्रमुख मंडळी गेली होती. लोक समुदायही बराच होता. स्टेशनपासून तो शेठ पन्नालाल बन्सीलाल यांच्या घरांपर्यंत त्यांची थाटाने मिरवणूक काढण्यात आली होती.

त्याच दिवशी रात्री गांधी चौकात त्यांचे रा. वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. लोक समुदाय ४००० चे वर होता. व्याख्यात्यांचे दोन तासपर्यंत अत्यंत अस्खलित व जोरदार असे व्याख्यान झाले. 'महात्मा गांधी यांची असहकारिता' हा प्रतिपाद्य विषय होता. अध्यक्षांचे समारोपानंतर सभा संपली.

भंग्यांचा संप : दि. १५ ऑक्टोबर १९२० पासून येथील सर्व भंग्यांनी पगार वाढीसाठी संप केला होता. म्युनिसिपॅलिटी त्यांच्या इच्छेप्रमाणे पगार वाढविण्यास तयार होती. पण वाढीव पगार मागच्या दिसेंबरपासून मिळावा अशी भंग्यांची मागणी असल्याने संप चालू आहे.

'उमरावतीचा लोकोत्तर दसरा'

सोन्याऐवजी जालीयानवाला बाग भूमीची पवित्र माती तरुणांनी एकमेकास दिली. हिंदु मुसलमानांनी एकमेकास सोने वाटले.

इ. सन १९२० चा उमरावतीचा दसरा सण अत्यंत उदास व भयाण झाला. दसरा हा उत्सव यंदा उमरावतीत कोणीही केला नाही असे म्हटल्यास हरकत नाही. सर्व लोकांचे पोषाख अगदी–सीमोल्लंघनाचे वेळी देखील– अगदी साधे व नेहमी सारखे होते. विशेषत: विद्यार्थी वर्गापैकी तर एकाचेही अंगावर एकही नवा कपडा अगर उत्साहाचे चिन्ह दिसत नव्हते. इतकेच नव्हे तर विद्यार्थी भेटले की, जालीयानवाला बागेतील गतवर्षी काँग्रेसच्या वेळी आणलेली माती यावर्षी सोने म्हणून हाती देत. तेव्हा डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नसे. विद्यार्थ्यांचा मनोत्साह व त्यांचे, देशाच्या दु:खासाठी दसरा न करतानाचे मनाचे खरेखुरे औदासिन्य ही फार पाहण्याजोगी होती. ईश्वर या तरुण पिढीचे हिन्दुस्थानावरील अप्रतिम प्रेम असेच कायम ठेवो व या पिढीकडून हिंदुस्थानचे तो काम करवो.

बाहेर गावीही अनेक ठिकाणी, पंजाब, खिलापत, लोकमान्य वगैरे-च्या राष्ट्रीय दुःखामुळे यंदा दसरा झाला नाही.

उमरावतीत दसऱ्याचे दिवशी आणखी एक डोळचात आनंदाश्रू आणणारी गोष्ट म्हणजे हिंदु-मुसलमानांनी एकमेकांना सोने वाटले व मुसलमान बंधूही सोने देण्यासाठी व घेण्यासाठी घरोघर हिंडले.

उमरावतीत कामगार संघाची स्थापना : उमरावतीची पहिली 'ट्रेड युनियन'.

सोमवार, दि. २५ ऑक्टोबर १९२० रोजी रात्री साडे आठ वाजता येथील मालटेकडी जवळील भोळ्याचे शेतात रा. कृष्णाजी वामन मोडक यांचे अध्यक्षतेखाली मजूरांची सभा झाली. सभेत दोन ठराव पास झाले. पहिला ठराव मजूर संघाची स्थापना करणे व दुसरा ठराव मुंबईच्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या ऑक्टोबर अखेर होणाऱ्या परिषदेत वऱ्हाड मजूर संघातर्फे प्रतिनिधी निवडून पाठविणे. उमरावतीला स्थापन केलेल्या या मजूर संघाचे पहिले अध्यक्ष : श्री. कृ. वा. मोडक, उपाध्यक्ष : श्री. गोविंददास छबिलदास व चिटणीस : श्री. भोळे हे निवडले गेले होते.

वऱ्हाड मजूर संघाकडून मुंबईच्या ऑ इं ट्रे. यु. काँग्रेसच्या परिषदेसाठी पुढील चार प्रतिनिधी पाठविण्याकरिता निवडले. डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. वा. वा. भोळे, श्री. भैय्यादास ठाकुरदास, श्री. उमाजी गहनाजी पोवळे, मराठा.

सभेत सौ ताराबाई मोडक, डॉ. वऱ्हाडपांडे श्री. भोळे व म. जाफर हुसेन यांची सुश्राव्य भाषणे झाली. श्रोतृसमुदाय ५०० चे वर होता. अध्यक्षांचे समारोपानंतर सभा संपली[१].

विद्यार्थी असहकारिता. विद्यार्थ्यांनी आपण होऊन शाळा सोडाव्यात.

दि. २८ ऑक्टोबर १९२० रोजी रात्री साडे आठ वाजता गांधी चौकात, रा. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली, रा. वामनराव

---

१ : उदय : दि. २८ नोव्हेंबर १९२०

जोशी यांचे 'विद्यार्थी व असहकारिता' या विषयावर व्याख्यान झाले. ते म्हणाले "असहकारितेचा ठराव पास झाल्यामुळे शिक्षणाचा प्रश्न फारच महत्त्वाचा झाला आहे. नोकरशाही, आमची मने परतंत्र होतील, असे शिक्षण आम्हास तीन पिढ्यापासून देत आहे. या पुढे सरकारी व निमसरकारी शाळात आम्ही आमची मुले क्षणभरही ठेवणार नाही. राष्ट्रीय शिक्षणाची सोय लागेपर्यंत काही दिवस मुले रिकामटेकडी फिरलेली पुरवली. वकिलांनी वकिली सोडली पाहिजे व डॉक्टरांनी, आयुर्वैद्यकाचो अभिवृद्धी केली पाहिजे. उमरावतीस राष्ट्रीय शाळा काढण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु पालकांनी आपली मुले आधीच सरकारी शाळातून काढून घ्यावी. ते तसे न करतील तर विद्यार्थ्यांनी आपण होऊन शाळा सोडाव्या. मातृभूमीच्या कल्याणासाठी आईबापांची अवज्ञा करणे भाग पडल्यास खुशाल करावी. त्यात काही पाप नाही". दुसरे वक्ते मि. अहमद हुसेन यांनी उर्दूत भाषण करून वामनरावजींचे मताचा अनुवाद केला[1].

मजुरांचे कर्तव्य : उमरावतीतील सभा : दि. २९ आक्टो; १९२० रोजी रात्री 'मजुरांचे कर्तव्य' या विषयावर मजूर संघाचे विद्यमाने रा. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे व्याख्यान झाले. दुसरे वक्ते रा. वामनराव जोशी हे होते. ते आपल्या भाषणात म्हणाले 'पोटभर अन्न, नीटनेटके वस्त्र व राहण्यासाठी साधारण घर मिळविण्याचा प्रत्येकास जन्मसिद्ध हक्क आहे. विलायतेतील भांडवलाच्या द्वारा येथील लोकशाहीस आपल्या ताब्यात आणून आपल्या तंत्राने वागविण्यास मजूर संघ निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे." नंतर अध्यक्षांनी मजुरांस 'परदेशी जाणारा कच्चा माल, विशेषतः धान्ये, रेल्वेत व आगबोटीत भरु नये', असा निक्षून उपदेश केला. शेवटी रा. कृ. वा. मोडक यांनी सर्वांचे आभार मानले.

आयर्लंडचा देशभक्त मॅक्स्विनीचे निधनाबद्दल,
उमरावतीच्या जाहीर सभेत दुखवटा.

दि. ६ नोव्हेंबर १९२० रोजी रात्रौ श्री. भाऊसाहेब असनारे यांचे अध्यक्षतेखाली गांधी चौकात जाहीर सभा भरून, खालील ठराव पास करण्यात आले.

---

१ : उदय : दि. २ नोव्हेंबर १९२०

ठराव १ ला : देशभक्त जाफर अलिखान झापर–उल्–मुल्क, पं. रामनारायण लहीरा, श्री ताजुद्दीन (जबलपूर) व इतर देशभक्तांवर आलेल्या संकटाबद्दल या सभेची पूर्ण सहानुभूती आहे. वरील देशभक्त पूर्णपणे निर्दोष आहेत. त्यांना ईश्वराने या दिव्यातून पार पाडण्यास सामर्थ्य द्यावे अशी त्यास प्रार्थना आहे. असहकारितेच्या चळवळीस दडपून टाकण्याकरता सुरू केलेल्या हया दडपशाहीचा ही सभा निषेध करते.

ठराव २ रा : देशभक्त मॅबस्ट्रिनी याच्या मृत्यूमुळे आयर्लंडवर कोसळलेल्या आपत्तीबद्दल या सभेची सहानुभूती आहे. ब्रिटिश सरकारच्या निर्दय पाषाणहृदयीपणाचा ही सभा रागारागाने निषेध करते.

इ. सन १९२१ ची वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटी : दिनांक २८ नोव्हेंबर १९२० रोजी वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीची बैठक अमरावती येथे, पांढरकवड्याचे मे. अब्दुल रौफशहा यांच्या अध्यक्षतेखाली भरून :–

१) वऱ्हाड प्रा. काँ. कमेटीचे सर्व सभासदांना येत्या नागपूरला भरणाऱ्या राष्ट्रीय सभेकरता प्रतिनिधी निवडण्यात आले व आणखी प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार अध्यक्षास देण्यात आला.

२) श्री. बेदरकर, श्री. वामनराव जोशी, श्री. अब्दुल रौफशहा, श्री. सदाशिवराव केळकर, श्री. मामा जोगळेकर व श्री. चांदे यांना ऑल इंडिया काँ. कमेटीचे सभासद निवडण्यात आले.

३) नवीन वर्षाकरता श्री. दादासाहेब खापर्डे यांना अध्यक्ष, श्री. जयरामपंत असनारे, श्री. माधवराव अणे, श्री. जोगळेकर व श्री. वासुदेवराव पिंपरीकर यांना उपाध्यक्ष, व डॉ. कृ. दा. वऱ्हाडपांडे, डॉ द. ब. सोमण व श्री. सदाशिवराव केळकर हे तीन चिटणीस नेमण्यात आले[१].

उमरावतीचे खाजगी लवाद कोर्ट : गांधीजींच्या असहकार आंदोलनाने कोर्टावर बहिष्कार सुरू झाला आणि दुसरीकडे दिवाणी स्वरूपाचे मुकदमे खाजगी लवादामार्फत सोडवून घेण्याचे कारवाईस प्रारंभ झाला. त्याचा हा नमुना–

---

१ : उदय : दि. ३० नोव्हेंबर १९२०

रा. रा. उदयकर्ते यास –

आपल्या पत्रात पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे उमरावती येथे स्थापन झालेल्या पचायतीतील (लवाद कोर्टातील) पंचापैकी मी एक आहे. कोणीही पक्षकार मजकडे दावा दाखल करण्यास आला व कायद्याप्रमाणे त्याच्या मुकदम्यास मुदत असली तर, वादी मला पंच नेमण्यास कबूल आहे, तुम्हीही कबूल असल्यास कळवावे, अशा अर्थाची मी प्रतिवादीला रजिस्टर्ड नोटिस देतो. व मज जवळील नकलेवर वादीची सही घेतो. नोटिसीचा जबाब म्हणून मी प्रतिवादीने वरप्रमाणे, मला पंच कबूल केले असे त्याचे कडून लिहून घेतो. गेल्या महिन्यात माझ्याकडे दोन मुकदमे चालले. त्यापैकी एकाचा निकाल देऊन प्रतिवादीने माझ्या निकालाप्रमाणे पैसेही वसूल दिले. आणखी दोन मुकदमे नुकतेच सुरू झाले आहेत व पुष्कळ मुकदमे नोटिसीचा जबाब येण्यासाठी तहकूब आहेत.

एकंदर दोन्ही बाजूच्या पक्षकारांना हा प्रकार समाधानकारक वाटत आहे व यात खर्च कमी लागतो ही गोष्ट त्यांना स्पष्टपणे पटत आहे. झालेल्या व्यवहाराबद्दल हीच पद्धती जर जनतेने स्वीकारली व पुढे होणाऱ्या व्यवहाराबद्दल सिव्हिल प्रोसिजर कोड मधील आर्बिट्रेशन (पंचायत) प्रकरणातील रूल १७ प्रमाणे जर व्यापाऱ्यांनी व्यवहार सुरू केला तर, जास्तीत जास्त तीन वर्षांनी सरकारी दिवाणी कोर्ट बंद पडतील अशी माझी खात्री आहे.....कळावे[१].

आपला

ज. के. असनारे

नागपूरात कॉंग्रेस गंगा आली.

(जाहिरात)

वर्गणीचे दिवस ता. २७, २८ व २९ दिसेंबर ठरले आहेत.

ही संधी घालवू नका.

स्वागत कमेटी सभासद फी.....३० रु.

डेलीगेट (प्रतिनिधी) फी.....१० रु.

प्रेक्षकांची फी..... ८ ते १५ रु.

---

१ : उदय : दि. ७ दिसेंबर १९२०

जेवण खर्च निराळा लागेल.

सभा भरवून प्रतिनिधी निवडावेत व त्यांची नावे आमच्याकडे ता. २० दिसें. चे आत पाठवावीत[१].

वासुदेव दामोदर भागवत
वामन गोविंद मोहरील
सेक्रेटरी, डि. काँ. क.

स्पेशल निघणार : नागपूरला जाणाऱ्या काँग्रेस भक्तांच्या सोयीसाठी आम्ही स्पेशल काढली आहे. हीं बडनेऱ्यास शनिवार, ता. २५ डिसें. रोजी दुपारी ४ वा. २८ मि. येईल व ४ वा. ३८ मि. निघेल. फक्त तिसऱ्या वर्गाच्या २५० व दुसऱ्या वर्गाच्या १० उतारूंची सोय होईल. खर्चासह भाडे बडनेरापासून नागपूरपर्यंत तिसऱ्या वर्गाचे १ रु. १३ आणे व सेकंड क्लास ५ रु. ६ आणे पडेल. रकम २३ दिसें. पर्यंत आम्हाला मिळाली पाहिजे. वेळेवर रकम न मिळाल्यास जागा मिळणार नाही. त्वरा करावी[२].

रकम पाठविण्याचा पत्ता :
वामन गोविंद मोहरील
नमुना, अमरावती

आपले
वामन गोविंद मोहरील
वासुदेव दामोदर भागवत
चिटणीस, जि. काँ कमेटी

१९२० ची कौन्सिल निवडणूक दादासाहेब खापर्डेनी आता नव्या कौन्सिलचे निवडणुकीस उभे राहू नये असे सांगून सुद्धा दादासाहेब कौन्सिलसाठी उभे राहिले. बॅरि. रामराव देशमुख यांनी मात्र यावेळी दादासाहेबांना साथ दिली. बॅ. रामराव देशमुख हे देखील प्रांतिक कौन्सिलच्या निवडणुकीसाठी उभे होते.

३० नोव्हे. १९२० रोजी निवडणुकींचा निकाल जाहीर झाला. दादासाहेब खापर्डे दिल्लीच्या कौन्सिलसाठी व बॅरि. रामराव देशमुख प्रांतिक (नागपूरच्या) कौन्सिलसाठी निवडून आलेत[३].

---

१ व २ : उदय दि. १४ व २१ दिसेंबर १९२०
३ : कै. दादासा. खापर्डे यांचे चरित्र : पा. ५९८

श्री. मोरोपंतांना 'पहिला हिंदी गृहमंत्री' पदाचा मान : इ. स. १९२० मध्येच उमरावतीचे श्री. मोरोपंत विश्वनाथ उर्फ अण्णासाहेब जोशी हे मध्यप्रांताचे गृहमंत्री म्हणून नियुक्त झाले. भारतात हिंदी गृहमंत्री म्हणून कार्य करण्याचा पहिला मान अण्णासाहेबांना मिळाला. इ. सन १९२० ते १९२५ पांच वर्षे अण्णासाहेब गृहमंत्रीपदावर होते. या काळातच १९२३ मध्ये त्यांना 'सर' ही पदवी आणि १९२६ मध्ये के. सी. आय. ई. ही पदवी मिळाली होती.

परिचय : उमरावतीत 'सायकल' हे वाहन तसेच 'मोटार' हे वाहन प्रथम आणण्याचा मान अण्णासाहेबांना दिला जातो.

सर मोरोपंत जोशी हे सुरवातीला परकोटाचे आत, हल्ली राजीबाई धर्मशाळा म्हणून जी इमारत भाजीबाजारजवळ आहे, तेथे राहत असत. नंतर सन १९०० चे आगे मागे कॅम्प रोडवर त्यांनी मोठा बंगला बांधून तेथे ते राहावयास गेले.

अण्णासाहेब हे १८८४ मध्ये वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आले व त्यांनी अमरावतीला वकिली सुरू केली. त्याकाळी मराठी वकील असत. म्हणजे मराठीचे उत्तम ज्ञान असलेल्यांना त्या काळी कोर्टात वकिली करण्याची सनद दिली जाई, ते मराठी वकील. त्यांना इंग्रजीचा गंधही नसे आणि जे कायद्याची परीक्षा पास होऊन आले व वकिली सुरू केली ते इंग्रजी वकील. रावबहादूर मुधोळकर, दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी, प्रल्हादपंत जोग, पांडुरंग गोविंद आळशी, गोपाळराव खुशाल आणि देवराव वि. दिगंबर इत्यादि मंडळी इंग्रजी वकील होते.

सन १८९७ सालचे काँग्रेसचे अधिवेशन उमरावतीला भरले ते अण्णासाहेबांच्या बंगल्यासमोरील विस्तीर्ण जागेतच भरले होते. त्याचा उल्लेख मागे आलेला आहेच. सन १८८५ पासूनच अण्णासाहेब काँग्रेसचे कार्यात भाग घेत असत. १८९० मध्ये काँग्रेसतर्फे इंग्लंडला जे प्रतिनिधी-मंडळ गेले होते त्यात अण्णासाहेब जोशी हे होते. इ. सन १९१६ पासून अण्णासाहेबांनी नागपूरला वकिली सुरू केली होती. अण्णासाहेब हे गृहमंत्री पदावर असतानाच नागपूरचा प्रसिद्ध 'झेंडा सत्याग्रह' सुरू झाला होता. गाजावाजा न करता सामाजिक सुधारणा स्वत:च्या जीवनात अंमलात आण-

णारे जे लोक त्या काळी होते, त्यात अण्णासाहेबांची गणना करावी लागेल. अण्णासाहेब जोशी हे अमरावती नगरपालिकेचे सभासद व उपाध्यक्षही होते.

जोशी कमेटी : विशेष म्हणजे अण्णासाहेब त्या काळातील प्रागतिक मानले जात. इ. स. १९२८ च्या फेब्रुवारीमध्ये डॉ. हरिसिंग गौर यांनी आपले 'संमती वयाचे बील' मध्यवर्ती असेम्ब्लीपुढे मांडले. या बिलाचा आशय असा होता की, "सोळा वर्षाच्या आतील अविवाहित मुलीशी आणि तेरा व चौदा वर्षाच्या आतील विवाहित मुलीशी संभोग करणे हे कायद्याच्या दृष्टीने गुन्हा ठरवून त्याबद्दल गुन्हेगाराला शिक्षा करावी."

१९२५ सालच्या एका इंपिरीअल ॲक्टाप्रमाणे आधीच संमतिवय, विवाहित मुलींच्या बाबतीत तेरा आणि अविवाहित मुलींच्या बाबतीत चौदा असे लागू केले होते. डॉ. गौर यांना या वयाची मर्यादा आणखी वाढवावयाची होती म्हणून त्यांनी सहा हजार स्त्री पुरुषांच्या सह्यांचा अर्ज सरकारला सादर केला होता. बिलाच्या समर्थनार्थ, त्यांचे परिणामकारक भाषण झाले. श्री. हरबिलास सारडा यांनी गौर यांच्या बिलाला पाठिंबा दिला. ह्याच सुमारास श्री. सारडा यांचे 'बालविवाह प्रतिबंधक बिल' सिलेक्ट कमेटीसमोर होते.

त्यावेळी सर जेम्स क्रेरार हे हिंदुस्थान सरकारचे गृहमंत्री होते. उत्तरादाखल भाषण करताना ते म्हणाले :– "१९२५ च्या कायद्याप्रमाणे आधीच कायद्यात फरक केला आहे. धार्मिक बाबतीत सुधारणा करावयाच्या त्या मोठ्या धिमेपणाने, विचारपूर्वक आणि लोकमत प्रक्षुब्ध न होईल अशा रीतीने केल्या पाहिजेत. १९२५ च्या सुधारणांचा लोकमतावर काय परिणाम झाला, ह्याचे रिपोर्टस् प्रांतिक सरकारकडून मागविले आहेत. ते आल्यानंतर एक जबाबदार सरकारी व बिनसरकारी लोकांची समिती नेमली जाईल."

या आश्वासनाप्रमाणे समिती नेमली गेली. तिचे अध्यक्ष : सर मोरोपंत जोशी हे होते आणि श्री. एम्. डी. सगणे हे सेक्रेटरी होते.

या जोशी कमेटीचा रिपोर्ट २० जून १९२९ रोजी तयार झाला. व हा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतरच "बालविवाह प्रतिबंधक कायदा" पास

झाला. (हा जोशी कमिटी रिपोर्ट परिशिष्ट क्र. १ मध्ये दिला आहे.)

अण्णासाहेबांनी ही महत्त्वाची सामाजिक व राजकीय कामगिरी पार पाडली होती हे येथे नमूद करणे जरूर वाटते.

त्या काळातील मुलामुलींच्या विवाहासंबंधीच्या कल्पना लक्षात घेता हा जोशी कमेटीचा रिपोर्ट महत्त्वाचा होता.

वयोवृद्ध मंडळी अशी एक आठवण सांगतात की, हे बील येणार म्हणून त्यावर्षी हजारो लोकांनी आपल्या लहान मुलांमुलींची लग्ने लावून टाकलीत, कारण त्याकाळी बाल वयातच मुलामुलींची लग्ने करण्याची प्रथा होती.

इ. स. १८९० साली अण्णासाहेब विलायतेस गेले होते. परत आल्यानंतर ब्रम्हवृंदांनी त्यांना प्रायश्चित्त घेण्याचा आग्रह चालविला, परंतु त्यांनी प्रायश्चित्त घेतले नाही. त्यामुळे त्यांना फार त्रास झाला.

त्याचप्रमाणे अण्णासाहेब कधीच सोवळे नेसत नसत. एकदा लोकमान्य टिळकांकडे मौंज होती. अण्णासाहेबांना जेवणाचे निमंत्रण आले. सर्व मंडळी सोवळे नेसून जेवावयास आली. अण्णासाहेब ओवळ्यानेच गेले होते. ते पाहून लोकमान्य म्हणाले :– "अण्णासाहेब तुम्हाला सोवळे नेसावे लागेल." अण्णासाहेब उत्तरले :– "मजजवळ सोवळे नाही व मी नेसणार नाही. तुम्ही माझे पान खुशाल बाजूला मांडा. मी तेथे बसेन." त्याप्रमाणे त्यांचे पान बाजूला मांडले. अण्णासाहेबांनी जेवण उरकले.

अण्णासाहेबांनी सामाजिक सुधारणेच्या अनेक गोष्टी आपल्या घरात सुरू केल्या होत्या. स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, स्त्रियांनी जोडे घालणे, छत्र्या घेणे, व्याख्यानास जाणे, वादविवाद करणे, फिरावयास जाणे या सारख्या सुधारकी वळणाच्या गोष्टी सुरू केल्या. त्या त्यांच्या वडिलांना खपत नसत. बाहेर ब्रम्हवृंद व इतर सनातनी मंडळी हे अण्णासाहेबांवर टीकेची झोड उठवीत.

त्याकाळी अशा, समाजाच्या रूढीविरूद्ध गोष्टी करणे खरोखर मोठे धाडसाचे होते. ते धाडस अण्णासाहेबांनी केले. यातच त्यांच्या प्रगतिशील वृत्तीचे सार साठवले आहे.

आज काळ फारच बदलला आहे, पण ६०–७० वर्षापूर्वीचा काळ नजरेसमोर ठेऊन कल्पना केली तर वरील वागणूकीचे महत्त्व लक्षात येईल. उमरावती शहरातील एका नागरिकाने त्या काळी प्रवाहाविरुद्ध जाण्याचे जे धाडस केले त्याचे खरोखर कौतुक व्हावयास पाहिजे.

परिशिष्ट क्र. १

(पृ. ४०१ पहा)

मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा (Age of Consent) ठरविण्यासाठी भारत सरकारने नेमलेल्या 'जोशी कमेटी' (Age of Consent Committee) च्या शिफारसी :–

उमरावतीचे सर मोरोपंत उर्फ अण्णासाहेब जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीचे सदस्य खालील प्रमाणे होते.

१. सर मोरोपंत जोशी, के. सी आय. ई., अध्यक्ष
२. सर ए. रामस्वामी मुदलीयार, बी. ए. बी. एल्.
३. रायबहाद्दूर पंडित कन्हैयालाल, एम्. ए. एल्. एल्. बी.
४. खान बहाद्दूर महबूब मियां इमामबक्ष काद्री, बी. ए. एल्. एल्. बी., अ'. बी. ई.
५. मिसेस एम. ओब्रायन बीडन, एम्. बी. बी. एस्, एल्. एस्. ए.
६. मिसेस ब्रिजलाल नेहरू
७. श्री. सत्येंद्रचंद्र मित्र, एम्. ए. बी. एल्., एस्. एल्. ए.
८. पंडित ठाकुरदत्त भार्गव, एम्. ए. एऽ. एच्. बी., एम्. एल्. ए.
९ मौलवी महंमद याकूब, एम्. एल्. ए.
१०. मियां महंमद शहा नवाज, बार–एट्–लॉ., एम. एल्. ए.
सेक्रेटरी, एम. डी. सगणे, एम् ए. एल्. एल्. बी.

कमेटीच्या शिफारसी : १. पंधरा वर्षे वयापेक्षा कमी वयाच्या पत्नी बरोबर सहवास करणाऱ्या पतीला शिक्षा देण्यात यावी.

२. अठरा वर्षाचे वयापेक्षा कमी वयाच्या मुलीशी, तिच्या पति व्यतिरिक्त, इतर कोणीही तिच्यावर जबरदस्तीने समागम केला तर तो बलात्कार समजण्यात यावा.

३. बालविवाहाचे प्रमाण घटविण्याचे दृष्टीने मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा कमीत कमी १४ वर्षाची ठेवण्यात यावी.

४. सरकारमार्फत व्यवस्थित रीतीने लग्नाची नोंद ठेवण्यात यावी.

५. लग्नाचे सर्टिफिकेट सरकारमार्फत विनामूल्य देण्यात यावे.

६. शहर आणि खेडे विभागात जन्माची नोंद करण्यात यावी व जन्म तारीख, लिंग याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

७. अठरा वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलीवर जर बलात्कार झाला असेल तर, त्यासाठी गुन्हेगाराला, दहा वर्षापासून तो जन्मठेपेपावेतो शिक्षा देता यावी. परंतु मुलीचे वय १६ ते १८ वर्षाच्या दरम्यान असेल आणि संभोग तिच्या संमतीने घडला असेल तर शिक्षा दोन वर्षेपर्यंत व दंड अशी देता येईल.

८. बलात्कार झालेल्या मुलीची डॉक्टरी तपासणी आवश्यक राहील.

९. वरील सर्व दुरुस्त्या किंवा तरतुदी जर मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात बाधा उत्पन्न करीत असेल तर, त्या कायदाबाह्य समजण्यात याव्या.

सामाजिक परिवर्तन द्रुतगतीने होण्याच्या उद्देशाने हया शिफारसी त्वरित अंमलात येणे आवश्यक आहे. समितीसमोर हजारो स्त्री–पुरुषांनी साक्षी दिल्या आहेत. व त्यात बहुतांश लोकांनी सामाजिक परिवर्तनाचे आवश्यकतेचा पाठपुरावा केला आहे. बालविवाहाची प्रथा तावडतोब बंद करण्यात यावी, याबाबत मात्र लोकमत फारच तीव्र होते. बालविवाह विरोधी लोक पुष्कळच होते, परंतु समितीसमोर साक्ष देण्याची त्यांची हिम्मत झाली नाही. (मसुरी, दि. २० जून १९२९)+

(सर मोरोपंत जोशी हे सुप्रसिद्ध समाज सुधारक होते म्हणून त्यांची निवड या समितीचे अध्यक्षपदी करण्यात आली. त्यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली या सामाजिक परिवर्तनाला चालना देण्यात आली. रूढीवादी लोकांकडून त्यांची निंदा–नालस्ती होणे किंवा करणे स्वाभाविक होते.)

+ मूळ इंग्रजीचा स्वैर अनुवाद.

इसवी सन १९२१

जाहीर पत्रक : संक्रांतीचा हलवा अपवित्र परदेशी साखरेचा बनवून हिंदुस्तानच्या व्यापारावर संक्रांत ओढून आणू नका. परदेशी साखरेचा हलवा प्रेमाखातर एकमेकास देऊन देशद्रोहाच्या मार्गाने प्रेम व्यक्त करू नका.

परदेशी साखरेचा हलवा देऊन तुम्ही जे प्रेम व्यक्त कराल त्या प्रेमाला देखील त्या परदेशी साखरेच्या विटाळाने अपवित्रपणा येईल.

संक्रांतीच्या दिवशी वडिलांनी धाकट्यास हलवा द्यावयाचा असतो. आपल्याच हाताने आपल्याहून लहानाच्या तोंडात परदेशी साखर घालून त्यांची तोंडे विटाळू नका.

आजपर्यंत झाले ते झाले, आता आपणहून लहानास परदेशी साखरेचा हलवा देऊन हिंदुस्थानची भावी आशा ज्यांचेवर अवलंबून आहे त्या आपल्या भावी पिढीलाही परदेशी माल वापरण्याचे व्यसन जडवून देऊ नका.

बाळकृष्ण गणेश खापर्डे
जयराम केशव असनारे
बामन गोपाळ जोशी[1]

उमरावती शहरवासी समस्त अबालवृद्ध बंधु-भगिनींस जाहीर विनंती.

.....महात्मा गांधी यांचे पुण्य आगमन येथे लौकरच होणार आहे. महात्माजी हे स्वदेशीचे कट्टे अभिमानी व पुरस्कर्ते आहेत हे मशहूरच आहे. तरी त्यांच्या प्रेमळ उपदेशानुसार व हिंदी राष्ट्रीय सभेच्या पवित्र आदेशा-

---

१ : उदय : दि. ४ जानेवारी १९२१

नुसार सर्वांनी स्वदेशी व्रताचा आदरपूर्वक स्वीकार करून परदेशी कापडावर पूर्णपणे बहिष्कार घालावा अशी आपणास प्रेमादरपूर्वक आग्रहाची विनंती आहे. परदेशी कापडाचे कपडे अंगावर घालणारांना महात्माजी पातकी समाजात व त्याच्या पापी दर्शनाने महत्माजींच्या जीवास अत्यंत क्लेश होतात. तरी त्यांच्या आगमन प्रसंगी परदेशी कपडचांनी नटून त्यांच्या दर्शनार्थ जाण्याची पाळी आपणावर येऊ नये म्हणून मुद्दाम आगावू ही विनंती करण्यात येत आहे.

स्वदेशी कापड : हिंदी लोकांनी हाताने काढलेल्या सुताचे व हिंदी लोकांकडून हातमागावर विणलेले उत्तम स्वदेशी समजावे.

हिंदुस्थानातील कापसापासून हिंदी लोकांच्या गिरण्यात यंत्रांनी काढलेल्या सुताचे, हिंदी लोकांकडून हातमागावर तयार करण्यात आलेले कापड स्वदेशी समजावे.

हिंदुस्थानातील कापसापासून हिंदी लोकांच्या मालकीच्या गिरण्यात यंत्रांनी काढलेल्या सुताचे, यंत्रावर विणलेले कापड कनिष्ठ समजावे.

उत्तरोत्तर वरच्या दर्जाचे कापड वापरात आणण्याचा प्रयत्न करावा.

आपला कृपाभिलाषी
नम्र सेवक
वामन गोपाळ जोशी
अमरावती[१].

असहकारिता प्रचार : दि. ४ जानेवारी १९२१ रोजी 'पंजाबचे प्रसिद्ध पुढारी पंडित रामभुजदत्त चौधरी‡ व त्यांच्या पत्नी श्रीमती

---

१ : उदय दि. ११ जाने. १९२१

‡ : **पं. रामभुजदत्त चौधरी** : (जन्म सन १८६८ मृत्यु सन १९२३) पंजाबचे सुप्रसिद्ध पुढारी, लाहोरचे वकील, उत्तम वक्ते, सरकारच्या डोळ्यात सलणारे, असहकारितेच्या चळवळीतील पुढारी व आर्य समाजी सुधारक. असहकारितेच्या चळवळीत त्यांनी विशेष पुढाकार घेतला होता. पंजाब

(पुढील पानावर)

सरलादेवी चौधराणी* यांच्या स्वाऱ्या येथे आल्या होत्या. बडनेरहून त्यांस श्री. बाबू शिवनाथ यांच्या मोटारमधून उमरावती येथे आणण्यात आले. त्याच दिवशी रात्री उभयतांची जोग चौकात असहकारिते संबंधी व्याख्याने झाली. वकिलांनी बकिली सोडावी, घरगुती उद्योग धंदे वाढवावेत, सूत काढावे' यासंबंधी त्यांनी आपल्या भाषणातून उपदेश केला होता.

(मागील पानावरुन)

प्रकरणात त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. *सौ. **सरलादेवी चौधरी** : (ज. १८७२ मृ. स. १९४५) बंगाल मधील सुप्रसिद्ध समाज सेविका, गायिका, लेखिका आणि राष्ट्रीय कार्यकर्त्या.

कै. रवींद्रनाथ टागोर यांच्या ह्या भाची असून वयाच्या सतराव्या वर्षी कलकत्त्याच्या बेथ्यून कॉलेजातून बी. ए. झाल्या. रवीन्द्रनाथांच्या प्रेरणेने साहित्यसेवा त्यांनी सुरू केली. 'भारती' मासिकाच्या संपादिका.

सन १९०५ साली लाहोरचे सुप्रसिद्ध वकील व आर्य समाजी पुढारी पंडित रामभुजदत्त चौधरी यांचेशी त्यांचा विवाह झाला. या आन्तर्प्रान्तीय विवाहानंतर त्यांनी 'हिंदुस्तान' या उर्दू साप्ताहिकाचे संपादन केले... वंदेमातरम्' या गीताचे प्रान्तिक स्वरूप घालवून त्याला राष्ट्रीय स्वरूप त्यांनीच दिले. त्यासाठी वंदेमातरम् मधील 'सप्तकोटी' ह्या शब्दात त्यावेळच्या लोकसंख्येला उद्देशून त्यांनी 'त्रिशत्कोटी' असा बदल केला.

त्यांच्या साहित्यसेवेपेक्षाही त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य अधिक महत्त्वाचे आहे...बंगाल प्रांतात राष्ट्रवाद व स्वदेशीच्या प्रचारासाठी त्यांनी अविश्रांत श्रम केले.

१९१९ साली गांधीजींच्या सानिध्यात त्या आल्या. असहकारिता चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला. पंजाबात डायरशाही विरुद्ध निर्भयपणे प्रचार केला. अ. भा. काँग्रेस कमेटीच्या सरचिटणीस होण्याचा मान महिला वर्गात यांनाच फक्त मिळाला होता.

१९२५ साली कलकत्त्यास भरलेल्या ऑ. इंडिया सोशल काँग्रेसच्या त्या अध्यक्ष होत्या. बंगालमध्ये वीराष्टमीची प्रथा त्यांनीच सुरू केली होती. (अर्वाचीन चरित्रकोश : चित्राव शास्त्री : पा. २६०)

दुसरे दिवशी रात्री त्यांचे आठवडी बाजारात व्याख्यान झाले. सूत–कताई व हिंदु–मुसलमानांची एकी या संबंधी त्यांनी अत्यंत कळकळीने उपदेश केला होता.

ता. ३ जानेवारी रोजी अपूर्व यशस्वी काँग्रेस या विषयावर श्री. बाबासाहेब खापर्डे व दादासाहेब शेवडे यांची व्याख्याने झाली होती.

८ जानेवारी रोजी सक्करसाथीत प्रताप चौकात खामगावचे श्री. पृथ्वीराज व्यास, श्रीमती शूरता देवी व दमोहचे रावबहादूरी व वकिली सोडलेले पुढारी श्री. गोकुलचंदजी यांची दे. भ. वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली 'असहकारिता व काँग्रेस' या विषयावर व्याख्याने झाली होती.

नंतर त्यांचीच, त्याच विषयावर ता ९ रोजी नमुन्यातील खिलापत चौकांत व ता. १० ला भाजीबाजारात व्याख्याने झाली होती.

उमरावतीच्या विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्या : दि. २१ जानेवारी १९२१ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात उमरावतीतील हायस्कूल व ए. व्ही. स्कूलमधील विद्यार्थ्यांची श्री. दादासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली जंगी सभा झाली. काँग्रेसच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधाने विचार करण्याकरिता ही सभा बोलाविली होती. अध्यक्षांनी राष्ट्रीय सभेचा असहकारिता ठराव सर्वास उत्तम प्रकारे समजावून दिला व १६ वर्षाच्या वरच्या मुलांनी पुढे काय होईल ते होवो अशा बुद्धीने शाळा सोडायची असल्यास सोडावी अशी राष्ट्राची आशा आहे, असे सांगितले. नंतर दे. भ. वामनराव जोशी यांचे कळकळीचे व ओजस्वी भाषण झाले. त्यानंतर एक दोन मास्तरांची भाषणे झाली. सभेत 'राष्ट्राच्या आज्ञेनुसार शाळा सोडावी' अशा अर्थाचा ठराव सर्वानुमते पास झाला. जागच्या जागी कित्येक विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याबद्दल जाहीर केले व सह्या दिल्या.

शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे मदतीकरिता एक फंड उभारण्यात आला व अध्यक्षांनी त्यास १०१ रुपये दिले. कित्येकांनी बोटातील छल्ले व अंगावरील आभरणे दिली. दुसरे दिवशी २०० मुलांनी शाळा सोडली व त्यांची वाजत गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली होती. व मुलांमध्ये अत्यंत उत्साह दिसत होता.

चित्र क्र. ९९ : महात्मा गांधी (पृष्ठ ४१४-१५ पहा)
(इ. सन १९२१)

दारूच्या मक्तेदारांची सभा : दि. २४ जानेवारी १९२१ रोजी सकाळी लाला शिवप्रसाद यांच्या विहिरीजवळ, दारूचे मक्ते विकत घेण्याकरिता आलेल्या सर्व कलालांची सभा झाली होती. अध्यक्षस्थानी श्री. गुलाम हुसेन दस्तगीर हे होते. आकोल्याहून श्री. मामासाहेब जोगळेकर मुद्दाम आले होते. त्यांनी लहानसे भाषण करून महात्मा गांधींचा मुद्दाम आलेला संदेश वाचून दाखविला. नंतर खामगावचे शेठ सीतारामलाल, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री केशवराव शालीग्राम व डॉ. पटवर्धन यांची समयोचित भाषणे झाली. लिलावाचा आज पहिलाच दिवस असून 'यंदा मक्ते कोणीही घेऊ नयेत' असा सभेत सर्वानुमते ठराव पास झाला. आणखी दोन दिवस लिलाव चालणार असल्याने, सायंकाळी पुन्हा त्याच ठिकाणी याच विषयाचा विचार करण्यासाठी सभा भरली होती.

स्वराज्याची पहिली मजल : दारूचे गुत्ते घेऊ नका.
महात्मा गांधींचा संदेश.

"तुमच्या प्रांतात मद्यपान विरुद्ध चळवळ स्वयंस्फूर्तीने व आश्चर्यकारक रीतीने चालू असल्याचे मला दिसून आले आहे. आपल्या लोकांतील वाढत्या मद्यपानाबद्दल माझे अंतःकरण किती व्याकुळ होते हे सांगावयास नकोच. आत्मशुद्धीपर अशा असहकारितेच्या चळवळीचा परिणाम होऊन लोकांनी मद्यपानाचा त्याग केला तर त्या योगाने स्वराज्याच्या मार्गावर बरीच मजल मारल्यासारखे होईल. आपली जसजशी आत्मशुद्धी होईल तसतशी आपल्या कार्यावर आपोआप जागृत होणारे, आपल्या प्रांतातील लोकमत या बाबतीत इतके प्रबल होईल की, दारूचे मक्ते घेण्याकरिता हर्रासात कोणीही बोलणार नाही. आणि इतक्या उपरही एकादे दुकान उघडे राहिले तर त्या दुकानावर कोणीही जाणार नाही. अशी मला आशा आहे.

तुमच्या प्रांताने मद्यपानातून आपली सुटका करून घेतली तर/ आणि तो तशी सुटका करून घेईल अशी मला आशा आहे– त्या योगाने मद्यपान निषेधाच्या चळवळीस बरेचसे उत्तेजन मिळून ही चळवळ हिंदुस्थानात कानाकोपऱ्यात पसरेल."

आपला
मोहनदास करमचंद गांधी[१]

१ : उदय : दि. २५ जानेवारी १९२१

श्री. रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकरांचे निधन. उमरावतीचे नामांकित रहिवासी ना. श्रीमंत रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकर यांस अवघ्या चार दिवसांच्या सामान्य आजारानंतर, दि. १४ जानेवारी १९२१ रोजी रात्री, नागपूर मुक्कामी एकाएकी देवाज्ञा झाली.

कै. तात्यासाहेब हे ३०–३२ वर्षापासून उमरावती येथे वकिली करू लागले तेव्हापासूनच ते सार्वजनिक कामात लक्ष घालू लागले होते. त्यांनी आजन्म देशासाठी श्रम केले होते. तात्यासाहेबांनी स्वकर्तृत्वावर सबंध हिंदुस्तानात नांव लौकिक मिळविला होता आणि आपल्या धंद्यातही यश व कीर्ती मिळविली होती. त्यांना देशाच्या औद्योगिक प्रगतीची फार तळमळ होती व त्यासाठी उमरावतीस टेक्निकल इस्टिटचूटची स्थापना करून व औद्योगिक परिषदेच्या सेक्रेटरीचे अनेक वर्षे काम करून त्यांनी पुष्कळ कार्य केले आहे. तात्यासाहेब हे काँग्रेसचेही एकवेळ अध्यक्ष होते. सरकारनेही त्यांस प्रथम रावबहादूर व नंतर सी. आय. ई. हा किताब दिला होता. तीन चार महिन्यापूर्वीच ज्युडिशिअल कमिश्नरची जागा पत्करून ते नागपूरास राहण्यास गेले होते. तेथेच त्यांचा अंत झाला.

सरकारने त्यांस नव्या कौन्सिलचेही अध्यक्ष नेमले होते व तेच काम गेले ५–७ दिवस ते पाहत होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे, त्यांचे शव नागपुरहून उमरावतीस आणण्यात आले. ता. १५ जानेवारी सायंकाळी त्यांच्या स्मशानयात्रेच्या वेळी हजार दोन हजार माणसे बरोबर चालत होती..... येथील डे. कमिश्नर मि. विल्सन, डिस्ट्रिक्ट जज्ज मि. स्चेपल्स, डी. एस्. पी. रा. गोपाळराव रुस्तुम, हेही बरोबर होते.

दुखवटचाची सभा : दि. १७ जानेवारी १९२१ रोजी गणेश थिएटरमध्ये श्री. रंगनाथ नरसिंह उर्फ तात्यासाहेब मुधोळकर यांच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करण्यासाठी ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीवासीयांची जंगी जाहीर सभा भरली होती. सभेस सर्व जातीचे, सर्व धर्माचे लोक होते. नाटकगृह गच्च भरले होते. अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषणानंतर दुखवटचाचा ठराव मांडण्यात आला व त्यावर सर्वश्री यशवंत गोविंद उर्फ अण्णासाहेब देशपांडे, रा. आर. एम्. खरे,

श्री. अण्णासाहेब दामले, रा. ब. के. वा. ब्रम्ह, रा. त्र्यं. ल. शेवडे, रा. वामनराव जोशी, श्री. जयवंत आणि डॉ. वऱ्हाडपांडे यांची भाषणे होऊन ठराव मंजूर करण्यात आला व श्रद्धांजली अर्पण केली

असहकारितेवर स्त्रियांची जाहीर सभा : दि. २८ फेब्रुवारी १९२१ रोजी गणेश थिएटरमध्ये स्त्रियांची जाहीर सभा होऊन सौ. पार्वतीबाई पटवर्धन व कु. चंद्राबाई शेवडे यांची 'असहकारिता व स्त्रियांचे कर्तव्य' या विषयावर कळकळीची भाषणे झाली. व 'उमरावती महिला समाज' नावाची येथील स्त्रियांची संस्था स्थापन करण्यात आली होती.

गांधी कॅप की नोकरी ? (लेखक : वामन गोपाळ जोशी)

ता. २ फेब्रुवारी १९२१ रोजी उमरावती जिल्ह्याचे डेप्युटी कमिश्नर मि. वुइल्सन व त्यांच्या कचेरितील एक तरुण कारकून रा. आ. मा. गिरगावकर यांच्या मध्ये पुढील प्रमाणे मजेदार संवाद झाला.

मि. वुइल्सन :– तुमच्या डोक्यावर असलेली टोपी गांधी कॅप आहे काय ?

रा. गिरगावकर :– होय.

मि. वुइल्सन :– तुम्हाला गांधींची मते पसंत आहेत असे दिसते ?

रा. गिरगांवकर :– होय. मला महात्मा गांधी यांची मते सर्वतोपरी पसंत आहेत.

मि. वुइल्सन :– गांधी सध्याचे सरकार उलथून पाडणार आहेत. तुम्हास हे संमत आहे काय ?

रा. गिरगांवकर :– होय.

मि. वुइल्सन :– मग तुम्ही या सरकारची नोकरी का करता ?

रा. गिरगांवकर :– महात्मा गांधींनी सरकारी नोकरास नोकऱ्या सोडण्यास अद्यापी सांगितलेले नाही व राष्ट्रीय सभेचाही अजून तसा हुकूम सुटला नाही. तो सुटला म्हणजे नोकरी सोडण्याचे मी ठरवून ठेवले आहे.

मि. वुइल्सन :– जे सरकार उलथून पाडण्याच्या लायकीचे तुम्ही समजता त्याची नोकरी करणे तुम्हाला लज्जास्पद वाटत नाही ?

रा. गिरगांवकर :– निःसंशय वाटते. मला त्याबद्दल माझे मन खाते. परंतु परिस्थितीपुढे माझा निरुपाय झाला आहे.

मि. वुइल्सन :– तुम्ही वामनराव जोशींच्या व्याख्यानाला जात असता ?

रा. गिरगांवकर :– होय, जात असतो.

मि. वुइल्सन :– वंदेमातरम् घोषणा करीत असता ?

रा. गिरगांवकर :– होय, करीत असतो.

मि. वुइल्सन :– गांधीचा जयजयकार करीत असता ?

रा. गिरगांवकर :– होय, करीत असतो.

मि. वुइल्सन :– तर मग तुम्ही यापुढे एकतर टोपी टाकून दिली पाहिजे, नाही तर आपल्या नोकरीचा राजीनामा दिला पाहिजे.

रा. गिरगांवकर :– मी टोपी टाकणार नाही. मी राजीनामा देण्यास तयार आहे.

मि. वुइल्सन :– जा, तुमची धिटाई व सत्यवक्तेपणा पाहून मला तुमचे कौतुक वाटते.

वरील संवाद वाचून निरनिराळ्या लोकांच्या मनात निरनिराळ्या वृत्ती उठतील. कित्येक संतापतील, कित्येक हर्षित होतील व कित्येक चकित होतील. कोणी साहेब मजकुरांना असे करावयाचे नव्हते असा दोष देतील, तर कोणी त्या शूर कारकूनाची चांगली खोड मोडली म्हणून आनंद मानतील. तर कोणाला या बहादूर कारकूनाचे धैर्य पाहून सानंद कौतुक वाटेल. एवंच जे ते आपापल्या अंतःकरण प्रवृत्तीप्रमाणे आपापले विचार प्रकट करतील.

दुसरे दिवशी रा. गिरगांवकरांनी राजीनामा दिला व तो मंजूर झाला.[१]

हिंदी राष्ट्रीय शाळेचे उद्घाटन : उमरावतीतील छत्रपुरी खिडकी जवळील श्री. बालाजीचे मंदिरात श्रीमद् जगद्गुरू शंकराचार्य यांच्या हस्ते दि. १४ फेब्रुवारी १९२१ ला हिंदी राष्ट्रीय शाळेचे उद्घाटन झाले होते.

राष्ट्रीय शाळेसाठी व्यवस्थापक मंडळ : उमरावती शहरात राष्ट्रीय शाळा स्थापन करण्याकरता व स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळांची

१ : उदय दि. ८ फेब्रुवारी १९२१

व्यवस्था करण्याकरता विद्यार्थ्यातर्फे २, शिक्षकांतर्फे ३, पालकांतर्फे ३, व इतर सभ्य गृहस्थातून ४ असे १२ गृहस्थांचे एक मंडळ स्थापन झाले असून, त्याचे अध्यक्ष श्री. श्रीपाद बळवंत तांबे, उपाध्यक्ष श्री. शिवनाथ बाबू, सेक्रेटरी डॉ. शहाणे व रा. आवटे वकील असे निवडण्यात आले होते.[१]

उमरावती नगरकाँग्रेस स्थापनेसाठी सभा : उमरावती नगर काँग्रेस कमेटीच्या स्थापनेकरिता, ता. १ ते ८ मार्च १९२१ पर्यंत दररोज येथे वेगवेगळ्या मोहोल्यात सभा भरणार आहेत. तरी प्रत्येक मोहोल्यातील स्वयंसेवकांनी या कामी मदत करावी. सभासदांचे नमुने डॉ. पटवर्धन यांचेकडे मिळतील, अशी जाहीर विनंती करण्यात आली होती.

स्वयंसेवक पाहिजेत : येथील हिंदी युवक सेवा संघाचे स्वयंसेवकांनी ता. २७ पासून एक महिनापर्यंत दररोज रात्री साडे आठ वाजता गाणी म्हणत गावात हिंडून होळीतील अश्लाघ्य प्रकाराच्या बाबतीत व एकंदर राष्ट्रीय बाबतीत लोकजागृती करण्याचा उपक्रम सुरू केला आहे, पण स्वयंसेवक काही पुरेसे होत नाहीत. आणखी स्वयंसेवकांची गरज आहे तेव्हा आपली नावे आमचेकडे स्वयंसेवकांसाठी नोंदवावीत अशी. चिटणीस घासीराम नथ्थुलाल हे विनंती करतात.

लोकमान्यांचे अंत्य दर्शन : येथील अनेक-हुन्नरी व उत्साही तरुण गृहस्थ रा. व्हि. बी. आसरकर यांनी लोकमान्यांच्या अन्त्य दर्शनाच्या प्रसिद्ध फोटोवरून त्या प्रसंगाचे प्रत्यक्षाएवढे लोकमान्यांचे निव्वळ मातीचे चित्र तयार केले असून ते फारच प्रेक्षणीय झाले आहे व ते त्यांनी जोग चौकातील लायब्ररी समोरच्या इमारतीत एक आणा तिकिटाने सकाळी ७ ते १० व सायं. ५ ते १० लोकास पाहण्यासाठी ठेविले आहे. लोकमान्यांचे हे दुःखदायक पण अत्यंत पवित्र दर्शन सर्वांनी अवश्य घ्यावे.

उमरावतीत सोजिरांच्या लीला : दि. १२ मार्च १९२१ रोजी उमरावती येथील डे. कमिश्नर कचेरीतील जिल्हा दरबाराचे दिवशी, नागपूर वगैरे परगावाहून, मुद्दाम निजाम सरकाराचे वाढदिवसप्रसंगी तोफांची सलामी देण्यासाठी, युरोपीयन सोल्जर्स आणण्यात आले होते. सकाळी

---

१ : उदय : दि. १५ फेब्रुवारी १९२१

तोफांची सलामी देण्याचा कार्यक्रम झाला व दुपारचे वेळी १२ वाजता इकडे जिल्हा दरबार सुरू झाला आणि तिकडे, कामधाम न उरलेले ह्या सोल्जरापैकीचे सात आठ लोक गावात भटकण्यास निघाले. त्यावेळी त्यांतील काहींनी दारूही झोकलेली होती.

बुधवारा, दहिसात वगैरे मधील वारांगनांच्या भागातून ते भटकत होते. एका घरासमोर एक लहान सुमारे सहा वर्षाचा मुलगा उभा होता. या भटकणाऱ्या सोल्जरापैकी एकाला तो दिसला. तेव्हा काही शंका येऊन म्हणा किंवा उगीचच म्हणा, एका सोजिराने त्यास 'येथे का उभा आहेस' असे हिंदी भाषेत विचारले व त्या मुलास लाथ मारली. मुलगा कोलमंडून खाली पडला व त्याला थोडी दुखापत झाली.

या प्रकारामुळे भोवतालच्या लोकांत थोडी गडबड सुरू होताच, त्या सोल्जरांना चीड येऊन त्यांनी लोकांना मारण्यास सुरवात केली आणि नंतर पळून जाण्याच्या इराद्याने त्यांच्यापैकी काही भाडयाच्या टांग्यात घुसले व काहींनी वाट फुटेल तिकडे धूम ठोकली, परंतु त्यातील काही सोल्जर मात्र वेडया वाकडया गल्लीत शिरून काही घरांतून (नायकिणीच्या) लपून बसले. अशा रीतीने हे सोल्जर पळून जात असता त्यांपैकी एका दोघांना लोकांकडून मार मिळाला.

एवढयाशा प्रकारामुळे दुपारी अंडीचवे सुमारास सोल्जरांची तुकडी गावात शांतता आहे की नाही हे पाहण्याकरता व नसल्यास ती राखण्याकरता, गावात रवाना करण्यात आली होती. पण सर्वत्र शांतता असल्यामुळे सदर तुकडीला गावात ऐटीने काही वेळ फिरून परत जाण्यापलीकडे काही करावे लागले नाही.

या प्रकाराच्या दुसऱ्या दिवसापासून आता मोठमोठया अधिकाऱ्यांनी स्वत: गावात हिंडून या प्रकरणाची सरकारतर्फे बारकाईने चौकशी सुरू केली होती.

महात्मा गांधींचे उमरावतीस शुभागमन

गांधीजींचा जयजयकार : फुलांची वृष्टी : दागिन्यांचा वर्षाव

दि. १९ मार्च १९२१ रोजी नागपूर मेलने महात्मा गांधी नागपूरहून उमरावतीस आले होते. वाटेत निरनिराळया स्टेशनांवर त्यांचे

चित्र क्र. १०० : दे. भ. वीर वामनराव जोशी व दे. भ. नानासाहेब बामणगांवकर. (पृष्ठ ४२०-२१ पहा)

चित्र क्र. १०१ : (पृष्ठ ४५१ पहा)

स्वामी श्रद्धानंदजी.

स्वागत टाळ्यांच्या, वंदेमातरम्‌च्या, व "महात्मा गांधीकी जय – लोकमान्य टिळक महाराजकी जय." अशा गर्जनेत होत होते.

विशेषत: वऱ्हाडच्या हद्दीतील धामणगाव स्टेशनवर लोकांनी त्यांचेवर फुलांचा वर्षाव केला होता. मेल बडनेरा स्टेशनवर आली स्टेशनवर लोकांची अपार गर्दी झाली होती. या मनुष्य–समुद्रात महात्माजी आगगाडीच्या डब्यातून उतरले. स्वयंसेवकांची व्यवस्था उत्तम होती. त्यांनी गर्दीतून व्यवस्थित गांधीजींना मोटारपर्यंत आणले व मोटारने गांधीजी उमरावतीस आले.

उमरावतीला तिलक कँम्प वरील शिवनाथ बाबू याच्या बंगल्यावर त्यांची उतरण्याची व्यवस्था केली होती. शहरापासून हा बंगला दोन मैल लांब आहे. पण लोकांची सारखी दुतर्फा गर्दी होती.

सहाचे सुमारास गांधीजी मोटारीत बसून गावात यायला निघाले. त्याबरोबर त्यांचा जयजयकार आणि फुलांची पुष्पवृष्टी सुरू झाली. बुटीच्या जिनाजवळ मोटार थांबली. तेथे दे. भ. तात्यासाहेब अभ्यंकरांनी हार घातला. मोटार सुरू झाली. लोक जयजयकार करू लागले. शिवाजी चौकाच्या (नेकोलेट पार्कच्या) रस्त्यावर मोटार आली. जयजयकार सुरूच होता. गांधीजींची मोटार पुढे कँम्प विभागातील शेठ वाडीलाल यांच्या बंगल्यांवर (ते गांधीजीचे नातलग असल्यामुळे) गेली.

महात्माजींचे व्याख्यान रात्री आठ वाजता येथील भव्य शिवाजी चौकात (नेकोलेट पार्कवर) ठरले होते. जिल्हा काँग्रेस कमेटीने गांधीजींचा हा दौरा आयोजित केला होता. महात्माजी उमरावतीला येणार अशा तारा सर्व वऱ्हाडभर गेल्या होत्या. त्यामुळे यवतमाळ, आकोला, व बुलढाणा या जिल्ह्यांतील बहुतेक सर्व प्रमुख असकारितावादी येथे आले होते. उमरावती जिल्ह्यातील खेड्यापाड्यातूनही हजारो लोक गांधीजींचे दर्शनासाठी उमरावतीस आले होते.

दुपारी पाच वाजल्यापासूनच शिवाजी चौक (नेकोलेट पार्क किंवा हल्लीचे नेहरु मैदान) तुफान गर्दीने भरून गेला होता. ठीक आठ वाजता महात्मा गांधी सभास्थळी येऊन व्यासपीठावर विराजमान झाले. हांसरी

मुद्रा आणि पांढऱ्या खादीचा तो शृंगारिक पोषाख पाहून जनसमूह एकदम शांत झाला. सुमारे पंचवीस हजार लोक या सभेला उपस्थित असावेत.

प्रथम सौ. ताराबाई मोडक यांच्या महिला विद्यालयातील मुलींनी 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत म्हटले. गांधीजींना जिल्हा काँ. कमेटीतर्फे पुष्पमाला अर्पण करण्यात आली. नंतर स्वामी शिवानंद यांनी 'ले लेव मेरा वंदेमातरम्' हे पद म्हटले. अतिशय बहार आली. नंतर गांधीजींनी भाषणास सुरवात केली.

"बंधू-भगिनींनो" या वाक्याने गांधीजींनी आपल्या व्याख्यानास प्रारंभ केला आणि सर्वांनी शांतपणे भाषण ऐकून घ्यावे ही विनंती केली. भाषणाचे सूत्र सुरू करताना त्यांनी प्रारंभी सांगितले की, 'या शहरात माझा एक स्नेही पटवर्धन म्हणून होता. आपणा सर्वांना कदाचित त्याचे नावं माहीत नसेल, पण १९१५ साली जेव्हा मी दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्तानात आलो तेव्हा तो माझ्याजवळ, माझ्या मदतीला होता. त्याने आपले सर्वस्व भारताला अर्पण केले होते.'

'मी माझ्या बंधु भगिनींना सांगू इच्छितो की, राष्ट्रीय सभा, मुस्लिम लीग व शिख लीग यांनी जो परमेश्वरी धर्म म्हणून असहयोगाचा धर्म सांगितला, त्या धर्माचे आचरण करून, माझ्या पटवर्धन दोस्ताप्रमाणे जर आपण सर्वांनी आपल्या देशासाठी सर्वस्व अर्पण केले असते तर-निदान त्याच्या अर्धे जरी अर्पण केले असते तरी-चार महिन्याचे आतच आपल्याला स्वराज्य मिळाले असते.'

'मला मोठा खेद वाटतो की, आमचे बंधू दादासाहेब खापर्डे यांचे पाणी येथे बंद केले असे मी ऐकले होते. दादासाहेबात आणि माझ्यात मतभेद आहेत. त्यांचा स्वराज्य प्राप्तीचा मार्ग एक आहे तर माझा स्वराज्य प्राप्तीचा मार्ग दुसरा आहे. माझा मार्ग कठीण आहे हे मी जाणून आहे... असा जरी भेद असला तरी पाणी बंद करणे ही गोष्ट वाईट आहे. आपल्याला आपले बंधू दूर लोटावयाचे नाहीत तर जवळ करावयाचेही आहेत. मला उमेद आहे की, एक दिवस असा उगवेल की, दादासाहेब आपले होतील;

'माझा पटवर्धन मी बाँब गोळ्यानें स्वराज्य मिळवीन असे म्हणत होता, पण त्याला स्वतंत्रतेचा अर्थ पहिल्याने समजला नव्हता.....'

'मी तपास केला. मला कळले की, या उमरावतीत सारे १०० चरखे आहेत. चाळीस हजाराचे वस्तीत चाळीस हजार चरखे मला पाहिजेत. निदान आठ हजार घरे असतील किंवा सहा हजार असतील तर तितके तरी चरखे पाहिजेत.....'

"...आपल्या जवळ जर दागिने असते तर मी मागितले असते. जवळ जे असेल ते द्या. ऑक्टोबरात स्वराज्य मिळवू आणि डॉ. चोळकर व सावरकर बंधू वगैरे सर्व स्वराज्यवाद्यांना सोडून आणू."

याप्रमाणे महात्माजींचे पाऊण तास पर्यंत भाषण झाले. दे. भ. पन्नालाल व्यास यांनी झोळी फिरविणारांची यादी वाचून दाखविली. झोळ्या फिरल्या व फंड गोळा झाला. झोळी फिरविणाऱ्यांत स्वामी शिवानंद. फत्तेचंद मांगीलाल, राधाकिसनजी, बाबासाहेब खापर्डे, दादासाहेब शेवडे, भाऊसाहेब असनारे, वामनराव जोशी, भागवत, मोहरील व शेख हाजीसाहेब इत्यादी प्रमुख गृहस्थ होते.

ही सभा संपल्यानंतर क्लबमध्ये काही मंडळीशी वादविवाद झाला आणि नंतर श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या घरी विश्रांतीसाठी महात्माजींची स्वारी अर्ध्या तासापर्यंत बसली होती व अकस्मात झालेल्या आगमनाच्या प्रसंगी दादासाहेबांच्या नातवाने, टिळक स्वराज्य फंडास १०१ रुपयांची देणगी महात्माजींच्या चरणी अर्पण केली होती.

रात्रीच गांधीजी गाडीने शिवनी – जबलपूरकडे रवाना झाले होते.

महात्माजींचे स्त्रियांच्या सभेत व्याख्यान : ता. २९ मार्च रोजीच स्त्री समुदायापुढे महात्माजींचे व्याख्यान व्हावयाचे असल्यामुळे, सायंकाळी चार–साडेचार वाजतापासूनच स्त्रियांची गर्दी, वकीलांच्या क्लब हाऊस मध्ये होऊ लागली होती. पुरुषांची गर्दी होऊ नये म्हणून स्वयंसेवकांनी योग्य व्यवस्था ठेवली होती. स्त्रियांची नीट व्यवस्था ठेवण्याकरिता सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. मनुताई खापर्डे, कुमारी चंद्राताई शेवडे, सौ. विमलाबाई शेवडे वगैरे प्रमुख स्त्रियांनी पुढाकार घेऊन फारच खबरदारी घेतली होती. साडेसहा वाजेपर्यंत जवळ जवळ तीन हजार स्त्री समुदाय जमला होता. मध्यभागी उच्चासन मांडून त्यावर महात्माजीकरिता व सौ. कस्तुरीबाई गांधीकरिता दोन उत्तम खुर्चा मांडण्यात आल्या होत्या.

बरोबर ६–४५ मिनिटांनी गांधीजी क्लबमध्ये दाखल झाले. तेव्हा त्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत होऊन ते आपल्या आसनावर विराजमान झाले होते. महात्माजींच्या कुटुंबास खुर्चीवर बसण्याविषयी स्त्रियांनी पुष्कळ विनंती केली, परंतु आर्यस्त्रीच्या पतिव्रताधर्माप्रमाणे त्या पतीच्या चरणाजवळ विनयशील वृत्तीने खालीच बसल्या होत्या.

आसनस्थ होताना महात्माजींनी व सौ. कस्तुरीबाईंनी सर्व स्त्रीवर्गास अभिवादन करून, शांत वृत्तीने भाषण ऐकून घेण्याची विनंती केली होती.

सुरुवातीला मुलींनी 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत म्हटले. नंतर महात्माजी व सौ. कस्तुरीबाई यांना फुलांचे हार वगैरे घालण्यात आल्यानंतर महात्मा गांधींनी आपल्या भाषणास सुरवात केली. त्यांचे भाषण हिंदीतून झाले. त्याचा मराठी अनुवाद सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी केला व थोडक्यात गांधीजींचे उपदेशाचा सारांश सांगितला होता.

नंतर स्त्रीवर्गात 'टिळक स्मारक स्वराज्य फंडाची' झोळी फिरविण्यात आली त्या झोळीत द्रव्याबरोबर पुष्कळ स्त्रियांनी नथी, कुड्या, सोन्याच्या बांगड्या, वगैरे पुष्कळ मूल्यवान अलंकार टाकले होते.

सभेचे काम आटोपल्यावर सर्व स्त्रीवर्गाने महात्माजींची व सौ. कस्तुरीबाईची चरणधुली मस्तकी धारण केली होती व हळदी कुंकू होऊन सभा विसर्जित झाली.

नंतर महात्माजी डॉ. पटवर्धन यांच्या घरी काही वेळ जाऊन नंतर शिवाजी चौकातील जाहीर सभेकरिता आले होते.

टिळक स्वराज्य फंड : महात्मा गांधी येथे आले त्यावेळी येथील गुजराथी मंडळीनी ५०१ रुपयांची थैली, सेठ वाडीलाल यांच्या हस्ते टिळक स्वराज्य फंडास सभेत अर्पण केली होती. ते रुपये धरून एकंदर स्त्री व पुरुष समाजाकडून २१०० रुपये मिळाले होते व दागिन्यांची किंमत ठरावयाची असून ७०० रुपये वसूल व्हावयाचे होते.

अभिनव पद्धतीने शिमगा साजरा केला : या वर्षीचा उमरावतीतील शिमगा अभिनव पद्धतीने साजरा करण्यात येऊन सेठ शिवनाथ बाबू यांचे

नेतृत्वाखाली शिमग्याची मिरवणूक गावातून काढण्यात आली होती. मिरवणुकीत "टिळक महाराजकी जय, गांधीजीकी जय" अशा घोषणा होत होत्या.

जाती जमातीची सभा : महार, मांग, हमाल, भंगी अशा विविध जाती जमातींतील लोकांची सभा होऊन सेठ शिवनाथ बाबू व डॉ. सोमण यांची भाषणे झाली. जाती–जमातीत एकोपा राखण्याचे हेतूने अशा सभांचे आयोजन करण्यात आले होते.

मद्यपान विरोधी मोहिम : दि. २७ मार्च १९२१ रोजी रात्री प्रताप चौकात रा. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन सेठ फत्तेचंद, श्री. डांगे, श्री. राधाकिसनजी, डॉ. सोमण व दे. म. बामणगावकर यांची भाषणे झाली. मद्यपानाविरुद्ध वातावरण निर्माण करणे व दारु गुत्त्यांवर पिकेटिंग सुरू करणे असे ठरविण्यात आले होते.

... ...

दारु गुत्त्यांवर चाळीस स्वयंसेवक पिकेटिंग करीत आहेत. दारूचा खप कमी झाला आहे. जास्त स्वयंसेवकांची गरज भासत आहे.

सत्याग्रह सप्ताह साजरा करा : गांधीजींची आज्ञा : दि. ६ एप्रील ते १३ एप्रील पर्यंत – दि. ६ एप्रीलला रौलेट ॲक्टच्या प्रतिकारार्थ व दि. १३ एप्रील रोजी पंजाबात पोलिसांनी केलेल्या अमानुष कत्तलीच्या निषेधार्थ – सुतकी दिवस पाळावा. असे महात्मा गांधींनी आवाहन केले होते.

हरताळ पाडणे, पिकेटिंग करणे, असहकारितेवर व्याख्याने इत्यादी कार्यक्रम आंखण्यात आले होते.

प्रो. एकनाथमूर्तीचे शक्तीचे प्रयोग : आधुनिक भीम प्रो. राममूर्ती यांचे शिष्य प्रो. एकनाथमूर्ती यांच्या शक्तीचे प्रयोग येथे सुरू आहेत. शेठ नगीनदास सराफ यांनी आणलेला स्वतःचा साखळदंड तोडून त्यांनी शंभर रुपये मिळविले आणि ती रकम येथील गोरक्षण संस्थेला देणगी म्हणून दिली होती.

सार्वजनिक शांतता व एकोपा राखा, उमरावतीच्या नेत्यांचे पत्रक.

" महात्मा गांधी यांनी उत्पन्न केलेली चळवळ अत्यंत शांततेने आणि परमार्थ बुद्धीने चालविणे अवश्य असून, हल्ली चालू असलेले प्रकार

आणि त्यापासून उत्पन्न झालेली परिस्थिती ही सर्वांना अनिष्ट वाटत आहे, असे आमचे मत आहे.

सर्व लोकांनी सार्वजनिक शांततेचा भंग न करता योग्य रीतीने वागावे, आपल्या शरीरबलाचा किंवा संघ बलाचा उपयोग करू नये. बहुजन समाजात प्रेम व सलोखा वाढवावा. हे कार्य सिद्ध व्हावे म्हणून आम्ही आमची कामे (वकिली) बाजूस ठेवून काही दिवस हेच कार्य करणार आहोत. तरी सर्वांनी या उद्योगाला मदत करावी ही विनंती."

जयराम केशव असनारे
रामराव माधवराव देशमुख
यशवंत गोविंद देशपांडे
बाळकृष्ण गणेश खापर्डे
त्र्यंबक लक्ष्मण शेवडे

दे. भ. वामनराव जोशी यांना अटक.

उमरावतीचे पुढारी, कट्टे असहकारितावादी, खिलापतीचे पुरस्कर्ते व ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे सभासद दे. भ. वामन गोपाळ जोशी हे बेझवाडा येथे भरणाऱ्या सदर कमेटीच्या बैठकीस हजर राहण्यासाठी जात असताना, त्यांस यावलखेड येथे दि. २८ मार्च १९२१ रोजी मध्यरात्री क्रि. प्रो. कोडच्या कलम १२४-अ प्रमाणे रेल्वे गाडीतच कैद करण्यात आले व आकोल्यास आणण्यात आले होते.

खटल्याची तारीख १ एप्रील ठरली असून दे. भ. वामनरावांनी डिफेन्स न देण्याचे ठरविले होते[१].

दे. भ. वामनराव दादांना अटक झाल्याबद्दल शेकडो गावी सभा भरून दादांचे अभिनंदन करण्यात आले होते.

दादांच्या अटके नंतरची हकीकत... रात्री दीडच्या सुमारास आकोल्याहून श्री. केळकरांची तार उमरावतीस श्री. भाऊसाहेब असनारे यांना आली. त्यात वामनरावांना कैद केल्याचा मजकूर होता व श्री. भाऊसाहेब

१ : उदय : दि. ५ एप्रील १९२१

असनारे यांनी, वामनरावांचे मित्र श्री. बाबासाहेब खापर्डे व शेवडे, यांना सोबत घेऊन यावे असे लिहिले होते.

ही तार मिळताच श्री. असनारे तेवढ्या रात्रीच प्रथम श्री. बामणगांवकराकडे गेले व त्यांना सोबत घेऊन दोघेही नंतर श्री. अण्णासाहेब देशपांडे, भाऊसाहेब दुराणी व श्री. वामनराव मोहरीर इत्यादी. वामनराव जोशींच्या मित्रांकडे गेले व त्यांना उठवून ही बातमी डॉक्टर सोमण, वऱ्हाडपांडे, शेठ शिवनाथबाबू, शेठ फत्तेचंद व शेठ राधाकिसन इत्यादीकांना कळविली. आणि हां हां म्हणता मग ती बातमी सर्व गावभर पसरली, त्यावेळी साप्ताहिक 'उदय' चा अंक छापल्या जात होता तो थांबवून त्यांत तारेचा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला होता.

पहाटेच्या गाडीने श्री. मोहरीर आणि काही स्वयंसेवक यांना संपूर्ण माहिती आणण्यासाठी आकोल्यास रवाना करण्यात आले होते.

या वेळेपर्यंत ही बातमी श्री. वामनराव यांचे मातोश्रीस किंवा त्यांचे पत्नी व मुलाबाळांस, कोणालाच कळविण्यात आलेली नव्हती. फक्त त्यांचे चुलत बंधु श्री. रामचंद्र वासुदेव जोशी यांना कळवून ठेवली होती. कारण वेळ रात्रीची आणि अशा वेळी त्यांच्या कुटुंबात ही बातमी कळविण्यास कोणीच धजेना. तशात त्यांच्या मातोश्रीने गेल्या कित्येक दिवसापासून अंथरूण धरलेले !

शेवटी सकाळचे साडेपाच वाजले आणि श्री. बामणगावकर हे धाडस करायला तयार झाले. श्री. वामनराव यांचे मातोश्रींना, घरातील सर्व लोक व वामनरावाचे मित्र 'आई' म्हणूनच संबोधीत असत.

श्री. बामणगावकरांनी ही बातमी त्यांच्या कुटुंबात कळविण्याचे पत्करले होते हे खरे, पण दारात पाय ठेवताच बामणगावकरांच्या हृदयाने उलट खाल्ली. तरी पण उसने अवसान आणून त्यांनी 'आई दादांना पकडले, मला वाटते चांगले झाले.' एवढे उद्‌गार आवंढा गिळून त्यांनी कसे बसे काढले. आई म्हणाल्या 'वामनला पकडले तर ? ठीक झाले. त्याचे दुसरे दोन भाऊ आज हयात असते तर तेही मी काळाला पकडायला दिले, त्याऐवजी सरकारला पकडायला दिले असते.' हे उद्‌गार

काढताना त्या मातेच्या चेहेऱ्यावर कोणतीही दुःखाची छटा नव्हती. गांभीर्य व हास्य नेहमीप्रमाणे जसेच्या तसे त्यांच्या चेहऱ्यावर होते. त्यांच्या पत्नीचे, पत्नी म्हणून थोडे डोळे भरून आले, पण 'वहिनी हे काय ?' असे बामणगावकरांनी उद्‌गारताच, त्यांनी फुटणारे हृदय दाबले आणि नेहमीप्रमाणे त्या उद्योगास लागल्या. मुलेबाळे उठली. त्यांनाही हे समजले पण सर्व आनंदात होती.

देशभक्तीच्या खऱ्या हाडामासाचे हे घराणे, घरात अठरा विश्वे दारिद्र्य, लहानमोठ्या पंधरा माणसांचे कुटुंब, घरात कर्ते एकटे वामनराव. पण आमचे आता कसे होईल असा उद्‌गार चुकूनही कोणाच्या मुखातून निघाला नाही. बा, वऱ्हाडा ! निःस्वार्थवृत्तीच्या देशभक्ताला तू उन्हा-तान्हात, अन्नपाण्यावाचून आणि वस्त्रप्रावरणावाचून मरू देशील काय ? छे ! आमचा वऱ्हाड इतका निर्दय नाही, तो उदार आहे. वामनरावांच्या घरावर मोहरांचा लोक पाऊस पाडतील म्हणच आहे 'रंक करील ते राव करणार नाही[१].'

उमरावतीकरांचें आकोल्यास प्रयाण : श्री. बाबासाहेब खापर्डे हे व्याख्यानाचे दौऱ्यावर होते आणि दादासाहेब शेवडे हे बनारसला गेले होते, पण श्री. बाबासाहेब खापर्डे सकाळी ८ ला दौरा संपवून उमरावतीस आले आणि ही बातमी समजताच तसेच स्टेशनवर जाऊन ९-२० च्या गाडीने ते आकोल्यास गेले. श्री. भाऊसाहेब असनारे, रामाप्पा उडबळे, शेठ राधाकिसन, सुखाप्पा, सोमेश्वर सुपारे, पडोळे वगैरे शेकडो प्रमुख लोक श्री. वामनरावजींच्या दर्शनाला आकोल्यास याच गाडीने गेले होते.

उमरावतीत हरताळ व मिरवणूक : इकडे सकाळीच दादांच्या अटकेची बातमी सर्व शहरभर पसरली आणि शहरात स्वयंस्फूर्त हरताळ पडला. सर्व लहान मोठ्या व्यापाऱ्यांनी व टांगेवाल्यांनी सुद्धा, आपले व्यवहार बंद ठेवले होते. शहरात सर्वत्र उदासिनतेची भयानक छाया पसरली होती. डिस्ट्रिक्ट काँग्रेसने चोहोकडे तारा करून ही बातमी जिल्ह्यात दिली आणि फक्त उमरावतीला जाहीर सभा गांधी चौकात भरणार अशा जाहिराती काढल्या. कारण वामनरावजींची आज्ञा की,

---

१ : उदय दि. ६ एप्रील १९२१

मला पकडल्यावर हरताळ पाडू नका, शांत राहा आणि कार्य मात्र जुटीने पुढ चालवा. या आज्ञेनुसार कोणत्याही जबाबदार असहकारितावाद्याने हरताळ किंवा मिरवणूक यांविषयी काहीच सूचना दिल्या नव्हत्या. तरीपण हरताळ पडला व मिरवणूक निघाली.

मिरवणूक अत्यंत शांतपणाने चालली होती श्रीमान शेठ शिवनाथ बाबू हे येथील प्रसिद्ध व्यापारी आणि कट्टर असहकारितावादी, या मिरवणुकीबराबर काही वेळ होते. मिरवणुकीचे काही मंडळी वामनरावजींच्या घरी आली व सर्वांनी त्यांच्या मातोश्रीला नमस्कार केला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व वीर वामनरावजी यांच्या नावाचा जयजयकार करीत ही मिरवणूक टिळक चौकातून गांधी चौकात गेली आणि तेथून परतण्याचा विचार शेठ शिवनाथ बाबूंनी लोकांना सांगितला. लोकांनी हे मान्य केले होते. पण कोणीतरी 'कॅम्प वरून परतू' अशी कल्पना काढली आणि मिरवणूक पुढे निघाली. कॅम्प वरून मिरवणूक स्टेशनवर आली आणि तिथे लाला शिवप्रसाद कलालाच्या दारूच्या भट्टीला काही दखल केली गेली अशी तक्रार होती. पुढे मिरवणूक अंबादरवाजाच्या भट्टीकडे वळली. पण तेथे डॉ. शहाणे यांनी व केशवराव शालीग्राम यांनी सर्वांना थोपवून धरले आणि शांत राहण्याविषयी परोपरीने विनविले व लोकही मग परत गेले.

शहरात, कलम १४४ लागू केले : वरील प्रकारामुळे येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, श्री आर. ए. विल्सन यांनी दि. २९ रोजी एक हुकूम काढून, उमरावती म्यु. हद्द व त्याचे पांच मैलाचे परिसरात आणि बडनेरचे हद्दीत जाहीर सभा भरविण्यास प्रतिबंध केल्याचे व त्याची मुदत एक महिना असल्याचे जाहीर केले होते.

सरकारी हुकुमाविरुद्ध लोकात त्वेष : डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचा वरील हुकूम जाहीर होताच त्याची प्रतिक्रिया लोकांवर उलट झाली. लोक ठिकठिकाणी जमू लागले. कु. चंद्राताई शेवडे यांनी दत्त मंदिरात श्री. वामनरावांचे अभिनंदन करण्यासाठी स्त्रियांची सभा भरविण्याचे अगोदरच जाहीर केले होते. ही सभा भरवावी की नाही? हे विचारण्यासाठी त्या श्री. भाऊसाहेब दुराणी, श्री. अण्णासाहेब देशपांडे व श्री. बामणगावकर यांचेकडे गेल्या. 'सभा भरवू नका, सरकारी हुकूम मोडावा अशी राष्ट्रीय

सभेची आज्ञा नाही', असे त्यांनी सांगितले. लोकांचे थवे बामणगावकरांकडे आलेत, म्हणू लागले की, सभा भरवायची आणि हुकूम मोडायचा. बामणगावकर म्हणाले, 'मी तुमच्या हाताने मरेन आणि नंतर हुकूम मोडू देईन. तुम्ही घरी जा. जमाव करून फिरू नका व कोणाच्याही नावाचा जयजयकार करू नका. शांत रहा, शांतता ठेवणे आपले काम आहे.' लोक हटेनात, अधिकच जमाव जमू लागला. शेवटी श्री. बामणगावकर घराच्या बाहेर पडले आणि अंबा दरवाज्यावर गेले. तेथे हजारो लोक जमू लागले. 'हुकूम मोडा' असा एकच ध्वनी सर्व मुखांतून निघू लागला होता. तेथे बामणगावकरांनी लोकांना पुन्हा समजावून सांगितले आणि दुसरे दिवशी वलगाव येथे सभा भरविण्याचे आश्वासन दिले. लोक शांत झाले.

भुसारी दरवाज्यावर अशीच गर्दी होती. तेथेही जाऊन बामणगावकरांनी लोकांना विनविले. त्याचप्रमाणे सक्करसाथीतही गर्दी होती. तेथेही जाऊन लोकांना समजाविले व दुसरे दिवशी वलगावला सभा असल्याचे सांगितले. तेव्हा लोक शांत होऊन घरी परतू लागले. संध्याकाळी दे. भ. मोहरीर हे आकोल्याहून परत आले आणि त्यांनीही डिस्ट्रिक्ट काँग्रेस मार्फत सभा नाही असे जाहीर केले.

परंतु रात्री नऊ साडेनऊचे सुमारास, कोणाचे तरी चिथावणी वरून काही लोकांची एक टोळी 'आज सभा आहे' असे ओरडत सुटली आणि गावातील लोक पुन्हा जमू लागले. ही बातमी समजताच सर्वश्री बामणगावकर, मोहरीर व डॉ. वऱ्हाडपांडे हे गावात फिरले आणि त्यांनी लोकांना शांत केले. रात्री ११ चे सुमारास गाव शांत झाला.

वलगावची प्रचंड जाहीर सभा : दुसरे दिवशी सायंकाळी ६ वा. उमरावतीच्या नागरिकांची सभा उमरावतीहून ७ मैल दूर वलगाव येथे, श्री. वामनराव जोशी यांचे अभिनंदन करण्यासाठी भरविण्यात आली. त्यासाठी उमरावतीहून लोकांच्या झुंडीच्या झुंडी वलगावला पोचू लागल्या.

दे. भ. मोहरीर, श्री. बामणगावकर, डॉ. वऱ्हाडपांडे व वैद्य मुळे हे अगोदरच सभेची व्यवस्था करण्याकरिता तेथे गेले होते. सभेच्या वेळी रा. नारायणराव बेदरकर, श्रीपादराव तांबे, भाऊसाहेब दुराणी, पंजाबराव देशमुख, अग्निहोत्री, डॉ. शहाणे, बाबासाहेब खापर्डे, दादासाहेब

शेवडे, स्वामी शिवानंद, गुलाबराव बक्षी, शेठ राधाकिसन इत्यादी प्रमुख मंडळी हजर होती. कु. चंद्राताई शेवडे, सौ. मनुताई खापर्डे, सौ. विमलाबाई शेवडे, इत्यादी भगिनीही हजर होत्या शिवाय डेप्युटी सुपरिन्टेन्डेन्ट ऑफ् पोलिस मि. गोपाळ रुस्तम, सब् डिव्हिजनल ऑफीसर मि. धात्रक, आणि पोलिस रिपोर्टर हेही हजर होते.

सभेला साडेसहा वाजता सुरुवात झाली. लोक-समुदाय पाच हजारावर होता. आरंभी जिल्हा कॉ. कमेटीचे चिटणीस दे. भ. मोहरीर यांनी भाषण करताना, 'श्री बाबासाहेब खापर्डे व श्री. शेवडे वकील यांनी आपली वकिली आजपासूस तहकूब केली' असे सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

त्यानंतर डॉ. शहाणे यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरवात झाली. नंतर श्री. वामनराव यांचे अभिनंदन करणारा व त्यांचे स्वार्थत्यागाबद्दल आणि धैर्याबद्दल त्यांना 'वीर' ही पदवी अर्पण करणारा ठराव, श्री. दादासाहेब शेवडे यांनी मांडला, त्यावेळी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट व वंदेमातरम् ह्या घोषणा झाल्या होत्या. श्री. शेवडे यांचे ठरावाला श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी भाषण करून अनुमोदन दिले. त्यानंतर श्री. बामणगावकर व श्री. गुलाबराव बक्षी यांची भाषणे झाली. अध्यक्षांचे जोरदार उपसंहाराचे भाषणानंतर व डॉ. वऱ्हाडपांडे यांनी आभार मानल्यानंतर ही प्रचंड सभा रात्री साडे आठला संपली. व लोक उमरावतीस परतले.

दारु-भट्टीचे नुकसानी बद्दल अटक व हरताळ : दि. ३१ मार्च १९२१ रोजी सकाळी उमरावतीत शांतता होती, पण सकाळी ८ ते १० चे सुमारास श्री. शिवप्रसाद लाला यांचे भट्टीचे नुकसान झाल्यावरून ३९५ कलमखाली श्री. केशवराव शालीग्राम, श्री. वासुदेवराव गोडबोले, श्री. विष्णूपंत तांबे, श्री. बलदेव प्रसाद, श्री. घासीराम यांचे बंधु व श्री. हकीम अत्तरवाले वगैरे दहा लोकांना अटक करण्यात आली. त्यामुळे गावात पुन्हा हरताळ पडला होता. पकडापकडी सुरूच होती. शहरात अशांततेचे वातावरण निर्माण झाले होते.

आकोल्याचे जेल मध्ये वामनराव दादांची भेट : दि. २९ मार्चला जी मंडळी आकोल्यास गेली होती त्यातून नऊ लोकांना तुरुंगात वीर वामनराव दादांच्या भेटीची परवानगी मिळाली. भेटीच्या वेळी तुरुंगाच्या

पहिल्या लोखंडी गजाच्या दरवाजाचे आंत त्यांना उभे केले होते आणि भेटण्यास आलेली मंडळी बाहेर गजाजवळ उभी होती. पलीकडील दारातून अलीकडच्या दाराशी येत असताना, आपल्या स्वत:च्या किंवा स्नेह्याच्या घरी जात असल्याप्रमाणे ते सहज नेहमीच्या चालीने आले ... ... त्यांच्या चेहऱ्यावर मंद हास्य होते. चिंता किंवा फिकीर यांची यत्किंचितही छाया नव्हती. अशा या निःसीम देशभक्तावर, त्यांच्या जन्म दिवशीच असा प्रसंग आला हे पाहून सर्वांची अंत:करणे अत्यंत कष्टी झाली होती.

प्रथम त्यांना सर्वांनी 'वंदेमातरम्' म्हणून नमस्कार केला. त्यांनीही वंदेमातरम् असे स्पष्ट म्हणून हंसतमुखाने नमस्कार घेतला. यानंतर थोडा वेळ सर्व अगदी शांत होते. कोणी कोणाशी काय बोलावे ?..... शेवटी वामनरावांनी स्वत: पहिला प्रश्न केला. 'केव्हा आलात ?' त्यावर भेटीस आलेल्या प्रत्येकाने हळू अगर मोठ्याने काहीना काही उत्तर दिले. याप्रमाणे बोलण्यास सुरवात झाली. नंतर मुख्य प्रश्न– बचावासंबंधाने– निघाला. बचाव (Defence) करू द्यावा असा एकाने सर्वांतर्फे आग्रहाचा सल्ला दिला. त्यावर वामनराव म्हणाले– 'मला पकडले ते सोडण्याकरता थोडच पकडले ? माझा त्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास नाही. मग डिफेन्स (बचाव) करण्यात अर्थ काय ?' त्यावर 'ही गोष्ट आम्हीही जाणून आहोच, तथापि स्वत:करता नाहीतर आमच्याकरता, निदान ईश्वराकरता तरी तुम्ही ह्या गोष्टीला संमती द्याच'. तेव्हा क्षणभर स्तब्ध राहून, अत्यंत नाखुषीने 'ठीक आहे' असे श्री. वामनराव म्हणाले. नंतर 'घरी काही निरोप आहे काय ?' असे दादांना विचारण्यात आले. 'काही नाही' असे त्यावर त्यांनी हाताने उत्तर दिले. 'मागच्या मंडळींची, दादा ! बिलकुल काळजी ठेवू नका, आम्ही सर्व बंदोबस्त करू' असे जेव्हा शेठ राधाकिसनजी म्हणाले तेव्हा त्यांची तेजस्वी, निर्भय दृष्टी थोडी सौम्य झाली व त्यांनी एकदा वर मान करून आकाशाकडे पाहिले आणि 'मला काय फिकीर ? तुम्ही सर्वजण आहात.' असे ते गंभीर स्वरात म्हणाले.....ता. २९ ची ही तुरुंगातील भेट एवढ्यावरच आटोपली.

शंभर पोलिसांचे कडेकोट बंदोबस्तात वीर वामनराव जोशी यांचे खटल्यास सुरवात.

दि. ५ एप्रील १९२१ रोजी, सोमवारी वीर वामनराव जोशी याचे विरूद्ध कलम १२४–अ (इं पि. को.) अन्वये आकोला मुक्कामी

मे. सरंजामे, पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट यांचे समोर खटला सुरू झाला. ठीक ११ वा. पुकारा होऊन, आरोपी वीर वामनराव यांना बसण्यास खुर्ची देण्यात आली होती व त्यांचे शेजारी यशवंतमाळचे दे. भ. बापूजी व उमरावतीचे दे. भ. दादासाहेब शेवडे बसले होते. कोर्टाभोवती १०० पोलिसांचा सक्त पहारा होता. त्यांच्या हाती काठ्या होत्या. सर्व लोक कोर्टाचे बाहेर थोपवून धरण्यात आले होते. फक्त शेलक्या मंडळीस आत जाण्याचा परवानगी दिली होती.

खटला सुरू होण्यापूर्वी वामनरावजींनी खटल्याचे+ कागद स्वतः वाचण्याकरिता मागितले. ते त्यांस देण्यात आले होते. सरासरी पाऊण तास त्यांनी कागद तपासून पाहिल्यावर पावणे बारा वाजता खटल्यास सुरवात झाली. प्रथम मि. नेल्सन डी. एस्. पी. यांची साक्ष झाली व नंतर सर्कल इन्स्पेक्टर श्री. इंदूरकर यांची साक्ष होऊन खटला दुसरे दिवशीसाठी तहकूब करण्यात आला होता. कमिश्नरांचा मुक्काम या दिवशी आकोल्यासच होता.

वीर माता : या खटल्यात डिफेन्स द्यायचा नाही असे वीर वामनराव यांनी ठरविले होते. ही गोष्ट त्यांच्या वृद्ध मातोश्रींना कळली तेव्हा त्या म्हणाल्या 'त्याने खटला चालवू नये, जमानत देऊ नये, कोणताही पुरावा देऊ नये. जेलात जावे. त्याच्या कीर्तीला यत्किंचितही कलंक लागता कामा नये जेथे न्याय देणारा गोरा नसून काळा आहे तेथे काळा अधिकारी अन्यायी म्हणून उजेडात आणण्यात अर्थ काय ?'

+ दि. १३ एप्रील १९२१ च्या 'यंग इंडिया' चे अंकात महात्माजींनी वीर वामनराव जोशी यांच्या अटकेचा उल्लेख करून लिहिले होते—

"मध्यप्रांत सरकारने आपला बडगा आता दे. भ. वामनराव जोशी यांजकडे वळविला आहे. वामनराव हे निःस्वार्थ वृत्तीचे, अत्यंत उत्साही असे कार्यकर्ते आहेत व आपल्या भागात त्यांचे फार वजन आहे. उंच उंच वाढलेले तेवढे वृक्ष कापून काढावे असा मध्यप्रांत सरकारचा इरादा दिसतो. पण सरकारला सुखासुखी कापून काढता येणार नाहीत, इतके उंच वृक्ष वऱ्हाड–मध्यप्रांतात त्यांना आढळून येतील अशी मला उमेद आहे." (उदय, १९–४–२१)

(वरील उद्‌गार वीर मातेला साजेसे नाहीत असे कोण म्हणेल ?)

मदतीचे आवाहन : वीर वामनराव यांच्या कुटुंबीयांच्या मदती साठी जिल्हा काँ. कमेटीतर्फे आवाहन करण्यात आले होते.

उमरावतीत हरताळ : बडनेऱ्यास सभा : दि. ६ एप्रील १९२१ रोजी, गांधीजींचे आदेशाप्रमाणे उमरावतीस हरताळ पडला होता. सभाबंदी असल्यामुळे बडनेऱ्याजवळील वडोऱ्याचे मैदानात जाहीर सभा श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सुमारे पाच हजार जन समुदाय सभेला उपस्थित होता.

सभेत प्रजापक्षाचे संपादक दे. भ. बापट, शेठ राधाकिसन, कु. चंद्राबाई शेवडे, व दे. भ. बामणगावकर यांची भाषणे झाली होती.

दारु दुकानाचें नुकसानीची जबाबदारी नगरपालिकेवर.

'पांचशे माणसांच्या गर्दीने, येथील लाला शिवप्रसाद यांच्या दारूच्या भट्टीच्या दुकानाचे नुकसान केल्यामुळे ते सर्व म्युनिसिपल कमेटीने भरून द्यावे' अशा आशयाचे पत्र, दि. २९ मार्च १९२१ रोजी डेप्युटी कमिश्नरांनी शहर म्युनिसिपॅलिटीस पाठविले होते ... ... त्यास म्यु. कमेटीने खालील जबाब दिला.

"बाजार बुणग्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई करण्याची जबाबदारी ही कमेटी जोराने नाकारते व या नुकसानीस कमेटी कशी व कोणत्या कायद्याने जबाबदार होते हे जाणण्याची कमेटीची इच्छा आहे. शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम सरकारचे आहे; नगर पालिकेचे नाही" हा जबाबाचा ठराव नगर पालिकेच्या आम सभेत दि. ३१ मार्च १९२१ रोजी सर्वानुमते पास झाला होता.

होडी छाप टोपी : सरकारची धमकी : सरकारने एका परिपत्रकाद्वारे 'होडी छाप टोपी (Boat Shape)' घालणे हे असहकारितेचे द्योतक समजले जाईल व परिणाम म्हणून डिस्‌मिस् केले जाईल असे म्हटले असून, डोक्यात बसेल अशी गोल टोपी घालण्यास हरकत नाही' असे म्हटले आहे. हे परिपत्रक सरकारी नोकरासाठी काढले होते.

(यावरून 'गांधी टोपी' ने त्यावेळी ब्रिटिश सरकार कसे चिडून गेले होते ते दिसून येते.)

राष्ट्रीय सप्ताहाची नांदगावची जाहीर सभा : ता. १३ एप्रील १९२१ रोजी अमरावती शहरात सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांचा १४४ कलमाखालील सभाबंदीचा हुकूम चालू असल्याने सायंकाळी साडे सात वाजता शहरापासून आठ मैल लांब असलेल्या नांदगाव पेठ या गावी, जालीयानवाला बागेत बळी पडलेल्या वीरांचे वार्षिक श्राद्ध करण्याकरिता उमरावतीचे नागरिकांची जंगी सभा भरली होती. सभेला पांच हजाराचे वर समाज जमला होता. सभेत अपूर्व उत्साह होता. सभेचे अध्यक्षस्थानी उमरावतीचे श्री. ओझरकर हे स्थानापन्न झाल्यावर रा. मोहरीर यांनी भाषणास सुरवात करून जालीयानवाला बागेत प्रसंग कसा ओढविला हे समजावून सांगितले. यानंतर टाळ्यांचे गजरात श्री. रा. रा. बाबासाहेब खापर्डे हे बोलावयास उभे राहिले. त्यांनी जालीयानवाला बागेतील प्रसंगाचे अत्यंत हृदयस्पर्शी व अंतःकरणास हलवून सोडणारे भाषण करून, जनरल डायरचे निर्दय व अमानुष कृत्यामुळें झालेल्या भयंकर प्रकाराचे हिडीस स्वरूप असे उत्तम रीतीने वठविले की, प्रत्येकास आपण सर्व प्रकार डोळ्यापुढे प्रत्यक्ष पाहत आहोत असे वाटले व अंतःकरणाच्या वृत्ती थरारून डोळ्यात दुःखाश्रू आले.

यानंतर श्री. रा. रा. अण्णासाहेब देशपांडे यांनी आपले भाषणात सांगितले की 'आपण ज्याप्रमाणे महिषासुरादि दैत्यांची पूजा करतो तशा प्रकारे जनरल डायरसारख्यांची पूजा केली पाहिजे.' शेवटी अध्यक्षांचे समारोपादाखल भाषण होऊन सभा महात्मा गांधी की जय, वीर वामनरावकी जय, या जयघोषात समाप्त झाली. नांदगावकर बंधूंनी सभेची व्यवस्था फार उत्तम ठेवली होती.

मौ. शौकत अलींचे आगमन : खिलाफत चळवळीचे नेते मौ. शौकत अली हे दि. ४ मे १९२१ रोजी एलिचपूरहून उमरावतीस आले होते. त्याच वेळी सभाबंदीची मुदतही संपत होती परंतु लोकांचा उत्साह मारून टाकणे हा नोकरशाहीचा बाणा असल्यामुळे, ही मुदत पुन्हा वाढविण्यात आली.

मौ. शौकत अलींचे मोठ्या थाटाने व प्रेमाने स्वागत होऊन डॉ. हफीज बेग यांचेकडे त्यांच्या उतरण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यांचे बरोबर पांढरकवड्याचे वकिली सोडलेले श्री. अ. रौफशहा हेही होते.

गावात उत्साह दिसून येत होता. सभाबंदीची मुदत वाढल्यामुळे वलगाव येथे सभा घेण्याचे ठरले. सभेला जाण्यापूर्वी सायंकाळी मौलाना हे ना. दादासाहेब खापर्डे यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेले होते. त्यावेळी खापर्डे वाड्याजवळ लोकांची खूप गर्दी जमली होती. तेथून मौलाना हे वीर वामनराव जोशी यांचे घरी गेले व त्यांनी त्यांचे मातोश्रींचा व कुटुंबातील इतर माणसांचा क्षेम समाचार घेतला इतर काही ठिकाणी त्यांना पानसुपारी वगैरे सन्मान झाला. गावात त्यांना पाहण्याकरिता गर्दी होत होती व लोक त्यांचा सारखा जयजयकार करीत होते.

उमरावतीहून वलगावला सभेसाठी लोकांची सारखी गर्दी लोटत होती. मौलाना शौकत अली हे रात्री ९ वाजता वलगावला सभास्थळी पोचले. सभेला अंदाजे दहा हजार लोक होते. सभास्थळी येताच लोकांनी टाळघांचे गजरात व जयजयकारात त्यांचे स्वागत केले व त्यांना उच्चासनावर बसविण्यात आले. प्रमुख लोकांकरिता व स्त्रियांकरिता स्वतंत्र व्यवस्था होती. खेड्यापाड्यातून खूप लोक या सभेसाठी आले होते. सभेस अध्यक्ष कोणीही नव्हता. कार्यक्रम वाचून दाखविण्यात आल्यावर, स्वामी शिवानंद यांनी वंदेमातरम् व आणखी एक पद म्हटले. लोकांतून वंदेमातरमचा घोष होत होता.

नंतर डॉ. सोमण यांनी मौलानांचा परिचय करून देताना अली-बंधूंचा पूर्वेतिहास व इतर माहिती दिली. आणि नंतर मौलानांना अनेक संस्थांतर्फे व गावकऱ्यातर्फे हार अर्पण करण्यात आल्यानंतर मौलानांचे भाषणास सुरवात झाली. मौलानांचे भाषणानंतर अ. रौफशहा यांचा परिचय श्री. मोहरीर यांनी करून दिला व नंतर श्री. रौफशहा यांचे भाषण झाले. त्यानतर श्री. मोहरीर यांनी काँग्रेसच्या जिल्ह्यातील कार्याचा वृतान्त सांगितला. आभार प्रदर्शनानंतर सभा संपली.

याप्रसंगी मौ. शौकतअली यांनी स्वतः तर्फे ५० व आपल्या बंधू तर्फे ५० याप्रमाणे एकूण रु. १०० वीर वामनराव यांचे कुटुंबाचे मदतीसाठी दिलेत.

वीर वामनराव जोशी यांना सक्त मजुरीची शिक्षा : वीर वामनराव दादा यांचे विरुद्ध १२४–अ कलमाखाली आकोला कोर्टात खटला चालून दि. ९ मे १९२१ रोजी कोर्टाने, 'राजद्रोही' भाषण केल्याचे आरोपावरून

वीर बामनराव जोशी यांना अठरा महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली होती.

सहानुभूतीची प्रचंड जाहीर सभा : उमरावतीत सभाबंदी लागू असल्यामुळे, येथून सात मैल लांब बडनेरा येथील मैदानावर दे. भ. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली, दि. १५ मे रोजी नागरिकांची प्रचंड जाहीर सभा भरून, वीर बामनराव जोशी, डॉ. बाबासाहेब परांजपे व पं. अर्जुनलाल सेठी यांना झालेल्या शिक्षेबद्दल सहानुभूतीचा ठराव पास करण्यात आला होता. या सभेत श्री. अण्णासाहेब देशपांडे, श्री. फत्तेचंद मांगीलाल, आणि श्री. भाऊसाहेब असनारे यांची भाषणे झाली होती.

वीर बामनराव जोशी यांच्या मातोश्रीकडे एक प्रतिनिधी मंडळ पाठविण्याचेही याच सभेत ठरले. "वीर बामनराव जोशी की जय, महात्मा गांधीकी जय, लो. टिळक की जय" अशा जयघोषात सभा संपली होती.

होमरूल ऑफिसची जागा बदलली : उमरावती येथील स्वराज्य संघाच्या नगर शाखेची कचेरी पूर्वीच्या ठिकाणातून काढून, जवळच बुधवारापेठेत श्री. दत्तात्रय रामराव कलोती यांचे घरी नेली आहे, अशी जाहीर सूचना, दि. २४ मे १९२१ रोजी द. रा. कलोती, चिटणीस, हिंदी स्वराज्य संघ, अमरावती नगर शाखा, यांनी केली होती.

असहकारितेची मिरवणूक व जंगी जाहीर सभा : उमरावतीला लागू केलेल्या सभाबंदीची मुदत, दि. २९ मे १९२१ रोजी संपल्यामुळे दिनांक ३० मे रोजी सायंकाळी असहकारितेची मिरवणूक गावातून काढण्यात आली व रात्री गांधी चौकात दे. भ. माधवराव अणे यांच्या अध्यक्षतेखाली जंगी जाहीर सभा भरविण्यात आली होती. लोकांचा उत्साह अपूर्व होता. श्रोतृसमाज अंदाजे पांच हजार होता.

सभेत श्री. मोहरीर, श्री. असनारे, श्री. शेवडे, श्री. अण्णासाहेब देशपांडे, शेठ राधाकिसन, व श्री. वजीर बेग यांची अत्यंत स्फूर्तिदायक भाषणे झाली. सभेचा समारोप करताना दे. भ. बापूजी अणे म्हणाले 'युद्धामध्यें आपला मोहरा पडला असता त्याच्या सन्मानाकरिता धर्मशास्त्राप्रमाणे काही दिवस युद्ध बंद ठेवावे लागते. त्याचप्रमाणे आपले पुढारी

वीर वामनराव जोशी हे तुरुंगात गेल्यामुळे नोकरशाहीने गेल्या महिन्यात १४४ कलमान्वये अनायासे ही धर्माचरणाची संधी आणून दिली. वीर वामनराव यांचे मागे आता ही पुढारीपणाची जबाबदारी श्री. शेवडे यांनी घेतलेली आहे. आपण ही चळवळ नेटाने चालविली पाहिजे.....या नोकरशाहीची सत्ता केव्हा नष्ट होईल हे ह्या नोकरशाहीला स्वतःलाही समजणार नाही, असा एक दैवी दिवस येणार आहे.'

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीची सभा : दि. १२ जुन १९२१ रोजी वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीची सभा उमरावती येथे गणेश थिएटरमध्ये होऊन श्री. माधव श्रीहरी अणे हे अध्यक्ष, श्री. त्रिंबक लक्ष्मण शेवडे व आप्पाजी पिंपरीकर हे दोघे उपाध्यक्ष, आणि श्री. वामन गोविंद मोहरीर हे चिटणीस म्हणून निवडून आले होते.

याच सभेत ऑल इंडिया काँग्रेसकरिता श्री. अणे, श्री. अब्दुल रौफशहा, श्री. जतकर, श्री. बा. ग. खापर्डे, श्री. सदाशिवराव केळकर, श्री. पन्नालाल व्यास आणि डॉ. पारसनीस यांची निवड झाली होती.

अमरावती जिल्ह्यातील काँग्रेसचे कार्य : जानेवारी १९२१ पासून अमरावती जिल्ह्यातील निरनिराळ्या काँग्रेसच्या संस्थांचे मार्फत जी अनत्याचारी असहकारितेची चळवळ झाली तिचा अहवाल दि. १४ जुन १९२१ रोजी प्रसिद्ध झाला होता. त्यानुसार–

कोर्टावर बहिष्कार : पुढील वकीलांनी वकिली तहकूब केली. १) श्री. केशव वामन ओझरकर, २) श्री. वासुदेव दामोदर भागवत, एम्. ए. एल्. एल् बी. ३) श्री. वामन गोविंद मोहरीर, बी. ए. एल्. एल्. बी. ४) श्री. त्र्यंबक लक्ष्मण शेवडे, बी ए. एल्. एल्. बी. ५) श्री. यशवंत गोविंद देशपांडे, बी. ए. एल्. एल्. बी. ६) श्री. बाळकृष्ण गणेश खापर्डे, बी. ए. एल्. एल्. बी. ७) श्री. जयराम केशव असनारे, बी. ए. एल्. एल्. बी. ८) श्री. आर. एम्. देशमुख, बार–ॲट्-लॉ.

लवाद–ग्रामपंचायत : जिल्ह्यात सुमारे १२५ गावी पंचायती स्थापन झाल्या असून, दोन–तीन शहरी लवाद कोर्ट स्थापन झाले आहे. स्वावलंबनाचे तत्त्व रुजू लागले आहे. ग्रामपंचायतीमुळे जातीय

ऐक्य वाढत आहे. पुष्कळ ठिकाणी ग्रामपंचायतींनी आपापसात वर्गणी करून, फंड जमवून गरीब लोकांना हल्लीचे दुष्काळात मदत केली आहे.

बौद्धिक-शारीरिक शिक्षण : खेड्या-पाड्यातून लोकांना बौद्धिक-शिक्षण मिळून, प्रचलित राजकारणाची गोडी लागावी म्हणून आतापावेतो सुमारे १३० गावी वाचनालये उघडली आहेत. त्या ठिकाणी बहुतेक वर्तमान-पत्रे येत असतात व तेथील लोक सद्यःस्थिती समजावून घेण्याकरिता मोठ्या हौसेने वाचनालयात जातात.

त्याचप्रमाणे लोकांना शरीर सुधारणेची गोडी लागावी म्हणून आतापर्यंत १२० खेड्यात तालीमखाने उघडले आहेत.

तसेच आतापर्यंत ३० राष्ट्रीय शाळा जिल्ह्यात सुरू झाल्या असून, उमरावती येथे एक राष्ट्रीय हायस्कूल सुरू झालें आहे.

काँग्रेसच्या शाखा व सभासद : जिल्ह्यात काँग्रेसच्या शाखांचे जाळे झपाट्याने पसरत आहे. आतापर्यंत पुढील प्रमाणे शाखा स्थापन झाल्या आहेत. जिल्हा काँग्रेस कमेटी, ५ तालुका काँग्रेस कमेटया, २४ सर्कल कॉं. कमेटया, व २० गाव कॉं. कमेटया. जिल्हातील एकंदर सभासदांची संख्या ११,९०० आहे.

टिळक स्मारक-स्वराज्य फंड : जिल्हाभर ठिकठिकाणी फिरून फंड जमविण्याचे काम चालले आहे. आतापर्यंत ७६१६ रुपये ८ आणे जमले आहेत.

उमरावती जिल्ह्याच्या वाट्यास २५ हजार सभासद, २५ हजार रु. फंडाकरिता व ६ हजार चरखे येतात. त्यापैकी आतापर्यंस ११,९०० सभासद, ७६१६ रुपये ८ आणे टिळक फंड, व ३९०० चरखे याप्रमाणे काम करण्यात आले आहे.

...तत्त्वाचा प्रसार होण्याकरिता जिल्ह्यात पगारी व बिन पगारी सामान्य पन्नास प्रचारक काम करीत आहेत. आतापर्यंत २० परगणा परिषदा, ४०० जाहीर सभा झाल्या व सुमारे ३०० गावी प्रचारक जाऊन आले. आतापर्यंत काँग्रेसच्या असहकारितेच्या ठरावांची भाषांतरवजा १००० पुस्तके, काँग्रेस क्रीडसंबंधी १००० चोपड्या, व ग्रामसंस्थांवर लिहिलेली १००० पुस्तके छापून वाटण्यात आली.

श्री. रामभुज दत्त चौधरी, सौ. सरलादेवी, महात्मा गांधी व मौ. शौकतअली यांनी उमरावतीस भेट दिली व त्यांचे योग्य स्वागत करण्यात आले.

वरील सर्व परिषदा, वऱ्हाडचे सुप्रसिद्ध कट्टे असहकारितावादी वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली झाल्या. वीर वामनराव जोशी यांचेवर आकोला येथे १२४-अ कलमाखाली खटला होऊन त्यांना १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. ही वार्ता कळताच, जिल्ह्यातील कामे उत्साहाने सुरू आहेत.

स्वयंसेवक : लोकांना शिस्त व जनसेवा ह्या गुणांचे शिक्षण मिळावे म्हणून, ठिकठिकाणी स्वयंसेवक मंडळे अस्तित्वात येत आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात १०५ ठिकाणी स्वयंसेवक मंडळे स्थापन झाली असून एकंदर अदमासे ८०० स्वयंसेवक काम करीत आहेत.

परिषदा, सभा, मिरवणुकी, यात्रा अशा प्रसंगी स्वयंसेवकांनी फार मदत केली व शांतता राखण्याच्या व व्यवस्थेच्या कामात त्यांनी आतापर्यंत अत्यंत श्रम घेतले आहेत. स्वयसेवकांच्या मदतीमुळे दारुबाजीस जिल्ह्यातून चांगलाच आळा बसला आहे.

स्वदेशी प्रचार : जिल्ह्यात स्वदेशीचा प्रचार झपाटयाने होत असून, आतापर्यंत पुढील प्रमाणे चरख्याचा प्रचार झाला आहे.

चांदूर तालुका ७००, दर्यापूर तालुका ५००, एलिचपूर तालुका ५००, उमरावती तालुका ९००, मोर्शी तालुका १३०, ह्या प्रमाणे जिल्ह्यात ३९०० चे वर चरखे सुरू असून, २०० हातमाग सुरू आहेत. त्याचप्रमाणे ब्राम्हणवाडा थडी येथे दोन बांगडयांचे कारखाने अस्तित्वात आले आहेत.

इतर कामे : वऱ्हाडामध्ये प्रचलित असलेली बिगारीची अनीतिमान पद्धत जिल्ह्यातून नष्ट होत आहे. लोकांना आपले हक्क समजू लागल्याचा हा परिणाम आहे. पुष्कळ गावातून गोवधही हिंदु-मुसलमानांच्या एकोप्याने बंद झाला आहे. त्याच प्रमाणे चहा, विडया ह्यांचा खपही पुष्कळ खेडयातून नाहीसा होत आहे. दारूचा खप हया जिल्ह्यात पुष्कळच कमी झाला आहे व कित्येक गावी तर लोकांनी दारु अजिबात सोडली आहे.

दडपशाही : क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम १४४ प्रमाणे उमरावती शहरात व आसपास पाच मैलापर्यंत, दोन महिने सभाबंदी होती, ती ता. २९ मे रोजी संपली. दर्यापूर तालुक्यात दोन महिने सभाबंदी २५ जून पर्यंत आहे. चांदूर तालुक्यात दोन महिने सभाबंदी २५ जून पर्यंत आहे. या शिवाय जिल्ह्यात ९० लोकांवर खटले भरलेले आहेत.

अमरावती
दि. ७ जून १९२१

वा. गो. मोहरीर
वा. दा. भागवत
सेक्रेटरी, डि. कॉं. कमेटी.

स्वदेशीचा प्रचार व परदेशी मालावर बहिष्कार

उमरावतीत प्रचार सभा.

दि. ७ जुलै १९२१ रोजी रात्री गणेश नाटकगृहात, महात्माजींच्या आज्ञेप्रमाणे स्वदेशीचे कडकडीत व्रत व परदेशी कापडाचा बहिष्कार लोकांचे मनावर बिंबविण्यासाठी, डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन दे. भ. शामराव देशपांडे यांचे 'स्वदेशी' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले होते.

नगर कॉं. कमेटीतर्फे अशा प्रचार सभा मोहोल्या-मोहोल्यातून घेण्याचे ठरविले, त्यापैकी ही पहिली सभा होती.

श्री. खापर्डे यांचेवर आरोप : दि. १० जुलै १९२१ रोजी सक्करसाथीत स्वदेशी प्रचाराची सभा भरली असता एका वक्त्याने दादासाहेब खापर्डे हे इंग्रजांच्या गुलाम सभेचे सभासद आहेत असा आरोप केला होता पण हा आरोप किती खोटा आहे हे नंतरचे वक्ते दे. भ. बामणगावकर आणि डॉ. पटवर्धन यांनी श्रोत्यांना पटवून दिले होते. स्वदेशी प्रचाराची तिसरी सभा भाजी बाजारात झाली.

कापड व्यापाऱ्यांची सभा : दि. १७ जुलै रोजी शेठ फत्तेचंद पुनमचंद यांचे अध्यक्षतेखाली भरली. तींत डॉ. वऱ्हाडपांडे आणि शेठ राधाकिसन यांची अत्यंत स्फूर्तिदायक भाषणे होऊन, २५ व्यापाऱ्यांनी ३१ दिसेंबर १९२१ पर्यंत परदेशी कापड मागविणार नाही अशा शपथा घेतल्या होत्या. आणखी इतर व्यापाऱ्यांच्याही सह्या घेणे सुरू झाले होते.

निर्दोष सुटले : दि. २९ मार्च १९२१ रोजी, स्टेशन जवळील लाला शिवप्रसाद यांचे दारूचे दुकानातील नासधूस केल्याचे आरोपावरून येथील १७ लोकांवर अटक करून खटले भरण्यात आले होते. त्या खटल्याचा निकाल, दि. २० जुलै रोजी लागून सर्व लोक पुराव्या अभावी दोषमुक्त म्हणून सोडून देण्यात आले होते. निकाल ऐकण्यासाठी कोर्टाजवळ हजारो लोक जमले होते. ही बातमी गावात पसरताच सर्वांना फार आनंद झाला व मिरवणूक काढण्यात आली. वाटेने जमाव सारखा वाढतच होता.

अशा रीतीने मिरवणूक मोठ्या थाटाने व उत्साहाने घंटाघर, भुसारी गेट, सक्करसाथ सराफओळ वगैरे भागातून वीर वामनराव यांचे घरी गेली. वाटेने या विजयी लोकास पुष्पहार घालण्यात आले व ठिक-ठिकाणी त्यांचे फोटोही घेण्यात आले होते. मिरवणूक तीन-चार तास सुरू होती.

रात्री जोग चौकात डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, सुटलेल्यांचे अभिनंदन करण्यात आ ले. जमाव ३ ते ४ हजार उपस्थित होता.

या खटल्यात श्री. तांबे, श्री. ओक, श्री. मोडक, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. हिरूरकर, व श्री. सरनाईक इत्यादी वकिलांनी स्वार्थत्याग पूर्वक मदत केल्याबद्दल त्यांचे जाहीर आभार मानण्यात आले होते.

टिळक जयंत्युत्सवात श्री. अणे यांचे भाषण : दि. २४ जुलै १९२१ पासून टिळक-जयंती-उत्सव ब्रम्हविद्या मंदीरात सुरू झाला. त्यानिमित्त पहिलेच भाषण श्री. माधवराव उर्फ बापूजी अणे यांचे 'लोकमान्यांचे राजकारण' या विषयावर झाले होते. श्रोतृसमुदाय तीन-चार हजारापर्यंत होता.

लोकमान्यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक : दि. २६ जुलै रोजी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेची (बस्टची) सायंकाळी ५ वा. रथातून सोठया थाटाने मिरवणूक काढण्यात आली होती. गावातून मिरवणूक निघून ती रात्री आठ आजता गणेश थिएटरमध्ये आली. रथ उत्तम रीतीने पुष्पहारांनी शृंगारला होता. वाटेने ठिकठिकाणी

लोकांचे थवेच्या थवे दर्शनाकरिता जमले होते व जमाव सारखा वाढत होता. मिरवणुकीबरोबर गावातील सर्व लहान मोठे पुढारी, व्यापारी वगैरे होते.

रात्री ८ चे सुमारास श्री. शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरवात झाली. गर्दी खूप होती. प्रथम येथील मास्तर रघुनाथ आदि करून तीन चार मुलांनी ताल सुरावर लोकमान्य स्तुतीपर पद म्हटले. नंतर येथील प्रसिद्ध तरुण गवई रा. नथुराम यांनी वंदेमातरम् म्हटले त्यावेळी सर्व समुदाय रिपोर्टरासकट उठून उभा राहिला होता.

नंतर डॉ. सोमण, दे. भ. बाजणगावकर आणि श्री शेवडे यांची समयोचित भाषणे होऊन समारंभ संपला.



परदेशी कापडाची होळी.

परदेशी कापडाची होळी : लो. टिळक सप्ताहातील शेवटच्या म्हणजे दि. २ ऑगस्ट १९२१ रोजी, ब्रम्हविद्या मंदिरासमोरील पटांगणात

सायंकाळी सहा वाजता, परदेशी कापडाचे होळी निमित्त चार-पांच हजार पुरुष व अंदाजे २०० स्त्रिया यांची प्रचंड जाहीर सभा दे. भ. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

दे. भ. वामनराव मोहरीर यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर परदेशी कापडाचे बहिष्कारासंबंधी व होळी संबंधी सर्वश्री शब्बीर हूसेन, केशवराव शालिग्राम, गुलाबराव बक्षी, डॉ. वऱ्हाडपांडे, शेठ धरमचंद, व शेठ राधाकिसन यांची भाषणे होऊन अध्यक्षांचे समारोपाचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात "ही होळी कोणत्याही राष्ट्राविरुद्ध द्वेष म्हणून नसून स्वावलंबनाकरिता होत आहे..... १८९५ साली खुद अमरावती शहरात गणपती उत्सवाचे वेळी स्वदेशी संबंधीच्या व्याख्यानाची टर उडविण्यात आली होती. स्वदेशी अशक्य आहे असे त्यावेळी काही म्हणत." अध्यक्षांचे भाषणानंतर परदेशी कापडाचा ढीग रचलेला होता त्यास आग लावण्यात आली. त्यावेळी लोकांनीही होळीत आणखी आपापल्या जवळील परदेशी कापड, वस्त्रे इत्यादी टाकले. नंतर हा कार्यक्रम समाप्त झाला.

टिळक जयंती : लोकमान्य टिळक-जयंती निमित्त दि. १ आगस्ट १९२१ रोजी श्री लक्ष्मीनारायणाचे मंदिरात स्त्रियांची जाहीर सभा झाली. सौ. लक्ष्मीबाई खापर्डे ह्या अध्यक्षस्थानी होत्या. कु. लीलावती तळेगावकर, कु. सीतावाई ब्रम्ह, कु. दुर्गाबाई लोखंडे, कु. माणिकताई बापट यांनी आपले निबंध वाचून दाखविले. नंतर सौ. गंगूताई बापट, सौ. मनुताई खापर्डे, सौ. सावित्रीबाई भट यांची टिळकांच्या गुणगौरवपर भाषणे झाली. सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी आभार प्रदर्शन केले.

नगर महिला काँग्रेस : दि. ४ आगस्ट १९२१ रोजी श्री लक्ष्मीनारायण मंदिरात, नगर महिला काँग्रेस कमेटीचे कार्यकारी मंडळ निवडण्यासाठी स्त्रियांची जाहीर सभा भरली होती. सभेचे अध्यक्षस्थानी सौ. लक्ष्मीबाई खापर्डे ह्या होत्या. सौ. मनुताई खापर्डे, सविताबेन चोकसी, सौ. पार्वतीबाई पटनर्धन व श्रीमती परांजपे यांची 'स्त्रीयांचे सध्याचे कर्तव्य' या विषयावर भाषणे झाल्यानंतर, कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. अध्यक्ष सौ. लक्ष्मीबाई खापर्डे, उपाध्यक्ष सौ. गिरजाबाई देशपांडे व सौ. अमृतीबाई. कार्यकारी मंडळात गावातील गुजराती व मारवाडी स्त्रियांनी सुद्धा भाग घेतला हे विशेष होय.

अभिनंदनाची सभा : दि. ५ ऑगस्ट १९२१ रोजी गणेश थिएटर मध्ये दे. भ. वा. दा. भागवत यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, सुर्जी अंजनगाव सर्कल काँग्रेस कमेटीचे सेक्रेटरी दे. भ. मोतीराम नथ्थुजी महाजन यांचे अभिनंदन करण्यात आले होते. दे. भ. महाजन यांनी जमानत न देता, एक वर्षाची शिक्षा आनंदाने पत्करली होती व ती शिक्षा भोगून ते कारावासातून सुटले होते.

याप्रसंगी डॉ. वऱ्हाडपांडे, डॉ. सोमण व रा. कोकर्डेकर यांची समयोचित भाषणे झालीत. याच सभेत, ऑ. इं. काँ. कमेटीच्या मुंबईस भरलेल्या बैठकीहून परतलेले पांढरकवड्याचे कट्टे असहयोगी मेंबर. श्री. अ. रौफशहा यांनी मुंबई बैठकीतील ठरावावर भाषण केले. आणि त्यांचेच दुसरे दिवशी सक्करसाथीत डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले होते.

दौरे : लोकमान्य टिळक सप्ताहात उमरावतीच्या नेत्यांनी खालील प्रमाणे दौरे केले होते.

स्वामी शिवानंद— नांदगाव पेठ, चांदूर रेल्वे, मुर्तिजापूर.

श्री. दादासाहेब शेवडे— दर्यापूर, कापूसतळणी, अंजनगांव सुर्जी, मलकापूर व आकोट.

श्री. बामणगांवकर— मुर्तिजापूर, कारंजा, यवतमाळ, वर्धा, एलिचपूर, जळगांव–मेहेकर.

बकर ईदला गोवध बंद : मागील आठवड्यात खिलापत कमेटीची सभा उमरावतीला भरून, 'आजचे मुसलमानांचे कर्तव्य' या विषयावर भाषणे झालीत. आणि बकर ईद चे दिवशी गोवध न करण्याबद्दल ठराव पास झाला[१].

उमरावती म्युनिसिपॅलिटीचे अभिनंदन : अमरावती व आकोला या दोन म्युनिसिपॅलिटयांनी जवळ जवळ एकाच वेळी, आपल्या गावातून दारूची दुकाने उठवून देण्याचा ठराव पास केला हा अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे.

१ : उदय, दि. १६ आगस्ट १९२१

लोकांच्या प्रतिनिधींनी या प्रमाणेच लोकमत म्युनिसिपॅलिटीघातून अधिकाधिक व्यक्त करून योग्य त्या सुधारणा घडवून आणल्यास आहे. अशा स्थितीतही या संस्थांतून याहून अधिक लोकहिताचे काम करून दाखविता येईल.

उमरावती शहर म्युनिसिपॉलिटीने येथील राष्ट्रीय शिक्षण मंडळास चारशे पंचाहत्तर रुपयांची देणगी दिली ही पण या म्युनिसिपॉलिटीस फार भूषणास्पद व या गावास अभिमानास्पद गोष्ट होय. असे केल्याचे वऱ्हाडातील हे पहिलेच उदाहरण होय. किंबहुना गुजरात बाहेर या प्रकारचे काहीही व कोठेही हिंदुस्तानात सहसा केलेच नव्हते म्हटले तरी चालेल. अशा या कामगिरीबद्दल उमरावती म्यु. चे अभिनंदन करणे जरूर आहे[1].

नावे : नव्या चळवळीमुळे व नव्या आत्मतत्त्वाच्या जागृतीमुळे, उमरावतीत टिळकचौक, गांधीचौक, प्रतापचौक, ही नावे शहरातील काही भागास ठेवली जाऊन, 'नेकोलेट पार्क' चे ही जुने नाव बदलवून 'शिवाजी मैदान' तर झालेच पण ही चळवळ अशाचरीतीने इतरत्रही बाहेर गावी चालू आहे.....यात फार अर्थ आहे. या सर्व गोष्टी लहान वाटल्या व लहान असल्या तरी त्या, काळाच्या निदर्शक आहेत. यावरून राष्ट्राची वृत्ती दिसून येते, व वारे कसे वाहत आहे हे स्पष्ट कळून येते. नोकरशाहीने सुद्धा या गोष्टीपासूनच वेळीच बोध घ्यावा व सावध रहावे[2].

मेकॅनिकल इंजिनिअर्स परिषद : दि. ४ सप्टेंबर १९२१ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात 'मेकॅनिकल इंजिनिअर्स' परिषदेचे दुसरे अधिवेशन, मुंबईचे श्री. त्रिंबक मोरेश्वर पारधी एल्. एम्. ई. यांचे अध्यक्षतेखाली भरले होते. या परिषदेला मुंबई, सातारा, कोल्हापूर, पुणे इत्यादी ठिकाणाहून प्रतिनिधी आले होते.

यंत्र–कलेच्या शिक्षणावर जास्त भर दिला जावा अशी या परिषदेने शिफारस केली होती.

अली बंधूंचे अटचेके निषेधार्थ सभा : अलीबंधू (मौ. महंमदअली व शौकतअली) यांना सरकारने अटक केल्याची बातमी उमरावतीस

---

१ : उदय : दि. ३० ऑगस्ट १९२१

२ : उदय : दि. ६ सप्टेंबर १९२१

पोचताच त्यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी इंद्रभुवन थिएटरमध्ये सप्टेंबरचे तिसरे आठवडयात जाहीर सभा भरून सरकारचा निषेध करण्यात आला होता. या सभेंत दे. भ गुलशेरखाँ, श्री. मोहरीर व दे. भ. डॉ. सोमण यांची भाषणे झाली. सभेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

महात्मा गांधींचा वाढदिवस : महात्मा गांधींचा त्रेपन्नावा वाढदिवस साजरा करण्याकरिता व त्यानिमित्त गांधी चौकांतून त्यांच्या फोटोची मिरवणूक काढण्या करिता, नगर कॉं. कमेटीच्या विनंती प्रमाणे दि. २ आक्टोबर १९२१ रोजी सायंकाळी चार-पाच वाजता पासूनच गांधीचौकात लोकांची गर्दी जमू लागली होती. गांधीचौक तोरणे वगैरे लावून सुशोभित करण्यात आला होता.

ठीक सहा वाजता मिरवणूक निघाली. मिरवणूकी बरोबर गांधी कॅप घातलेला व खाकी युनिफार्मचा बँड व इतर वाद्ये होती. मध्यभागी उत्तम रीतीने श्रृंगारलेला रथ होता व त्यांत महात्मा गांधीं लो. टिळक व वीर वामनराव जोशी यांचे फोटो होते. मिरवणुकीसोबत गावातील बहुतेक प्रमुख मंडळी होती. बहुतेक सर्व लोकांनी गांधी टोप्या व खादीचे कपडे घातले होते. मिरवणुकीचे आघाडीस, लोकांकडून परदेशी टोप्या व कपडे होळी करण्याकरिता मागुन घेऊन त्या ऐवजी त्यांस गांधी टोपी देणारा एक कंपूही होता. एकंदर समाज अंदाजे दोन हजार होता.

मिरवणूक अंबा दरवाजा, टिळक चौक, दहिसाथ मार्गाने निघून मुख्य बाजारातून सिटी पोलिस स्टेशन व म्यु. कमेटी समोरून गांधी चौकात परत आली तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. एकंदरीत मिरवणूकीचा थाट चांगला होता. महात्मा गांधी, लो. टिळक, वीर वामनराव यांचा वाटेने सारखा जयजयकार होत होता.

गांधी चौकात नंतर परदेशी कपडयांची होळी करण्यात आली होती.

जाहीर सभा : दि. ४ आक्टोबर १९२१ रोजी रात्री गांधी चौकांत हिंदु-मुसलमानांची जंगी जाहीर सभा होऊन, तीत श्री. नजीर हुसेन बेग, अहमद हुसेन, दे. भ. बामणगावकर, डॉ, वऱ्हाडपांडे यांची

भाषणे होऊन, कराची काँग्रेसचा ठराव पुन्हा पास करण्यात आला होता. त्या ठरावाचा प्रत्येक शब्द उर्दूत व मराठीत उभे राहून श्रोतृवर्गाकिडून म्हणवून घेण्यात आला होता.

जगद्गुरू श्रीमच्छंकराचार्य उमरावतीत : जगद्गुरू श्रीमच्छंकराचार्यांनी उमरावतीचे मुक्कामात अनेक स्थळांना, संस्थांना भेटी दिल्या व त्यांची प्रवचने व भाषणे झाली होती.

दि. ५ आक्टोंबर १९२१ रोजी त्यांनी उसरावतीचे राष्ट्रीय शाळेला भेट दिली व रात्री लक्ष्मीनारायण मंदिरासमोरील पटांगणात 'शठं प्रति शाठ्यं' व 'शठं प्रति सत्यम्' या विषयावर त्यांचे प्रवचन झाले. श्रोतृसमाज अंदाजे तीन चार हजार होता.

दि. ६ आक्टोबर रोजी, येथील मराठी नार्मलस्कूल फॉर मेन मधील शिक्षक व विद्यार्थी वर्ग यांनी जगद्गुरूंस सायंकाळी ५ वा. स्वत:ची भजनी दिंडी घेऊन थाटाने मेण्यातून मिरवणूक काढून आणले होते. श्रींचे प्रवचनाकरिता येथील उर्दू नार्मल स्कूलचे सुपरिटेंडेंट छात्रवृंदासह आले होते. मे. किलरो साहेब, अॅ. इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स हेही मुद्दाम आले होते.

मुलांनी राष्ट्रगीत म्हटल्यानंतर काही मराठी व संस्कृत पदे म्हणण्यात आली व त्यानंतर प्रिन्सिपॉल श्री. दामोदरपंत ओक यांनी श्रींना ५१ रुपयांची थैली अर्पण करून, प्रवचन करण्याविषयी विनंती केली. त्यानुसार श्रींचे सुश्राव्य प्रवचन झाले होते.

दि. ७ आक्टोबर रोजी लक्ष्मीनारायण-मंदिरासमोरील पटांगणात भरलेल्या सभेत जगद्गुरू श्री शंकराचार्य यांचे प्रवचनानंतर, खामगावचे दे. भ. पन्नालाल व्यास यांचे भाषण झाले होते.

दि ८ आक्टोबर रोजी श्रींचे सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात स्त्री समाजापुढे प्रवचन झाले. या सभेत महात्मा भगवानदीन यांच्या पत्नी सौ. भाग्यवतीदेवी, आणि येथील सौ. मनुताई खापर्डे, सौ. मनोरमाबाई पटवर्धन, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. सखुताई भट व श्रीमती ताई गुर्जर यांचीही भाषणे झाली होती.



चित्र क्र १८३ : (पृष्ठ ४५५ पहा)

श्री जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे.



चित्र क्र. १०४ : महान क्रांतिकारक सरदार पृथ्वीसिंह. (पृष्ठ ४५७ पहा)

दि. ९ ऑक्टोबर रोजी श्रींचे अध्यक्षतेखाली डॉ. पटवर्धन यांचे व्याख्यान, लक्ष्मीनारायण मंदिराचे समोरील पटांगणात झाले.

दि. ११ आक्टोबर रोजी नगरवासीयांतर्फे वाजत गाजत मोठी मिरवणूक काढून श्रींस सीमोल्लंघनास नेण्यात आले. त्यावेळी वाटेत टिळक चौकात श्रींचे हस्ते, लोकमान्यांचे स्मारक म्हणून भगवा झेंडा उभारण्यात आला होता.

नंतर श्रींची स्वारी गावाबाहेर पोचली असता शेठ पन्नालालजी जैन यांनी जगद्गुरूंना आपल्या बंसी बागेत नेऊन त्यांस वस्त्रे वगैरे अर्पण करून त्यांचा उत्तम सत्कार केला होता.

दि. १२ आक्टोबर बुधवार रोजी येथील हिंदु हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे निमंत्रणावरून श्रींची स्वारी तेथे ५ वा. गेली होती. प्रथमतः विलायतेत बरीच वर्षे शिक्षकाचा धंदा करून परत आलेले, हिंदु हायस्कूलचे नवीन तरूण हेड मास्तर मि. बी. मुकर्जी यांनी श्रींच्या पायावर मस्तक ठेवून व श्रींस ७५ रू. ची विद्यार्थ्यातर्फे पर्स अर्पण केल्यानंतर श्रींच्या स्वागतपर, इंग्रजीत भाषण करताना म्हणाले 'श्रींची कीर्ती केवळ हिंदुस्तानातच ऐकू येत नसून, तिचा सुगंध इंग्लंड, अमेरिका वगैरे पाश्चात्य संस्कृतीच्या देशातही पसरलेला आहे'.

त्याच दिवशी ब्रम्हविद्यामंदिरात सायंकाळी 'टिचर्स असोसिएशन' तर्फे श्रींचे स्वागत करण्यात आले होते.

दि. १३ रोजी श्रींनी दुपारी ४ वा. मराठी नार्मल स्कूल फॉर मेन व नंतर उर्दू नार्मल स्कूलला भेट दिली. त्यावेळी तेथील विद्यार्थ्यांनी स्वतः मुद्दाम श्रींसाठी तयार केलेल्या लाकडी खडावा व पेपर कटर ई. वस्तू श्रीस अर्पण केल्या होत्या.

मुसलमान धर्मबंधूंनी, हिंदु धर्म गुरुविषयी इतका आदर व प्रेम दाखविणे स्तुत्य होय. नंतर श्रींची स्वारी साडे पाच वाजता ब्रम्हविद्या मंदिरात येऊन दाखल झाली. सभेस ना. दादासाहेब खापर्डे, रा. भाऊसाहेब असनारे, श्री. शेवडे, डॉ. पटवर्धन आणि गावातील विद्यार्थ्यांचे बरेचशे पालक वगैरे हजर होते.

उमरावती नगर काँग्रेसची शाऊबंदकी : दि. १० ऑक्टोबर १९२१ रोजी गांधीचौकात डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, वक्त्यांनी 'आपण होऊन काँग्रेस कमेटयातील अधिकार पदांचे राजीनामे द्यावेत' अशा अर्थाचा ठराव सभेपुढे आला. त्यास 'वकिला इतकेच परदेशी मालाचा व्यापार करणारे, कचेरीत खटले करणारे व सावकारही काँग्रेसचा ठराव मांडीत आहेत, सबब त्यांनीही काँ. कमेटीतील अधिकारपदाचा राजीनामा द्यावा.' अशी उपसूचना आणली गेली. त्यावेळी वादविवाद वाढून दंगा उत्पन्न झाला. तेव्हा पोलिसांनी हस्तक्षेप करून स्थिरस्थावर केले. नंतर सभा पार पडली व उपसूचने विरहित मूळ ठराव व आणखी एक दोन ठराव पास झाले.

पहिला ठराव येथील नेहमी मुकदमे लढणारे शेठ धरमचंद व्यापारी यांनी पुढे आणला होता, व त्याला उपसूचना श्री. जोशी व दे. भ. पानसे यांनी आणली होती.

या उपसूचनेला विरोध करताना शेठ धरमचंद यांनी धडधडीत असत्य विधान केले की, 'वकिलांनी काँ. कमेटयातील अधिकार पदे सोडावीत असा काँ. वर्किंग कमेटीचा ठराव झाला आहे व म्हणून यात आपल्याला काहीही फेरबदल करता येणार नाही. म्हणून आहे तसाच ठराव पास केला पाहिजे.'

मुळशी पेटा सत्याग्रह : दि. १२ आक्टोबर रोजी मुळशी पेटा सत्याग्रहासाठी माणसे व वर्गणी जमविण्याकरिता आकोल्याचे श्री. का. वि. सहस्त्रबुद्धे यांचे रात्री गांधीचौकात व्याख्यान झाले होते.

दि. १३ रोजी रात्री गांधीचौकात काँग्रेस वर्किंग कमेटीच्या फौज, व सरकारी नोकर वगैरे संबंधीचे ठरावांस पाठिंबा देण्यासाठी जाहीर सभा होऊन पाठिंब्याचा ठराव पास झाला होता.

सरकारी नोकरीचा राजीनामा : जाहीर स्वागत : उमरावतीच्या डेप्युटी कमिश्नर कचेरीतील एक कारकून श्री. रामचंद्र बालाजी शेळके यांनी दि. १४ आक्टोबर १९२१ रोजी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. त्यांची नोकरी १५ वर्षे झालेली होती. राजीनामा पत्रात

त्यांनी इंग्रज सरकारच्या सैतानी लीलांचा निषेध करून 'देशाभिमानासाठी राजीनामा देत आहे' असे नमूद केले होते.

श्री. शेळके यांच्या या देशाभिमाबद्दल, दि. १७ ऑक्टोबर रोजी जाहीर सभेत त्यांचे स्वागत करण्यात आले होते. सौ. भाग्यवती देवी यांचेही या प्रसंगी भाषण झाले होते.

श्रींनी व बामणगावकरांनी सरकारचे कान उपटले : ता. २० ऑक्टोबर १९२१ रोजी रात्री लक्ष्मीनारायण मंदिराचे पटांगणात हनुमान व्यायाम शाळेतर्फे श्रीमद् जगद्गुरू यांचे 'शारीरिक संपत्तीची आवश्यकता' या विषयावर प्रवचन झाले. श्रींची स्वारी येण्यापूर्वी दे. भ. बामणगावकर यांचे भाषण झाले. ते म्हणाले 'हे कदाचित माझे शेवटले भाषण होईल, कारण मजवर वारंट सुटले असल्याची पक्की बातमी आहे पण या नोकरशाहीला सत्याची चीड आहे. सरकारला जर वाटत असेल की, एक बामणगावकर गेल्याने सध्याची चळवळ बंद पडेल तर ती चूक आहे. एक बामणगावकर गेला तर त्याच्या जागेवर १०० बामणगावकर उभे राहतील. ता. ३१ डिसेंबर पर्यंत जरी आपल्याला स्वराज्य न मिळाले तरी या आमच्या महाराष्ट्राने पुढेही स्वराज्याकरिता काम करीत राहिले पाहिजे.'

दे. भ. बामणगावकरांचे सुंदर भाषण झाल्यावर डॉ. पटवर्धन यांनी दे. भ. बामणगावकरांचे लहानपणापासूनचे चरित्र सांगितले. दे. भ. बामणगावकर हे गरीब स्थितीत वाढले असून स्वत:च्या कर्तबगारीवर कसे पुढे आले हे त्यांनी दाखविले व पुढे म्हणाले 'सहगमन करण्यास आलेल्या सतीच्या पायावर सुवासिनी स्त्रिया ज्याप्रमाणे आपले मस्तक ठेवतात त्याचप्रमाणे आम्ही सर्वांनी त्यांचे चरणी आज वंदन केले आहे.' येथवर भाषण झाल्यावर श्रींची स्वारी सभास्थानी दाखल झाली व डॉ. पटवर्धनांनी हनुमाग व्यायाम शाळेचा रिपोर्ट वाचून दाखविल्यावर श्रींचे भाषण सुरू झाले.

तोतया काँग्रेस कमेटी : दि. १ नोव्हेंबर १९२१ रोजी शेठ फत्तेचंद यांचे माडीवर जमून फक्त उमरावतीच्याच काही मूठभर लोकांनी सबंध उमरावती जिल्ह्याकरिताच एक नवी जिल्हा काँग्रेस कमेटी स्थापन करून टाकली. याच त्यांच्या सभेत गजाधर नावाचा माणूस या कमेटीचा सेक्रेटरी नेमण्याची सूचना पुढे आली असता, भैय्यालाल नावाचा त्यांच्यातील

एक म्हणाला 'अहो हा रात्रंदिवस पोलिसात पडून असणारा माणूस तरी सेक्रेटरी नेमू नये.' पण धरमचंद म्हणाले 'हा पोलिसात रात्रंदिवस पडून असला तरी पोलिसांचा तो माणूस आहे याबद्दल तुमच्या जवळ काही पुरावा आहे काय ?' या बिनतोड उत्तराने सभा निरुत्तर होऊन मुळे वैद्या बरोबर गजाधरही या नव्या जिल्हा काँग्रेस कमेटीचा सेक्रेटरी नेमला[१].

दे. भ. अहमद हुसेनखान आझाद यांना अटक : तेथील तरुण, खिलापत चळवळीचे उत्साही कार्यकर्ते, दे. भ. अहमद हुसेनखान आझाद यांना, पत्रके वाटणे, सरकारविरोधी प्रचार करणे, इत्यादी आरोपावरून ६ नोव्हेंबर १९२१ रोजी उमरावतीत अटक करण्यात आली होती. त्यांचेवर खटला चालला. त्यांनी जामीन देण्याचे नाकारले. नंतर त्यांना दि. ५ दिसेंबर १९२१ रोजी एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली होती.

डॉ. वऱ्हाडपांडे : हे तोतया काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष केले गेले होते. पण, याच अलीबंधूच्या सभेत डॉ. वऱ्हाडपांडयांनी भाषणाची मुद्दाम परवानगी मागून आपण तोतया जिल्हा काँ. कमेटीचे अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचे जाहीर केले व आदले दिवशी आपल्या अध्यक्षतेखाली आपण गुत्तेफोडीच्या मुकदम्यात पोलिसांतर्फे साक्ष दिलेले महंमदसाहेब यांचे व्याख्यान होऊ दिले याबद्दल लोकांची जाहीर माफी मागितली होती. ही आदले दिवशीची सभा शिवीगाळ कंपूतर्फेची होती. आता तालुक्यातर्फे काँग्रेसला प्रतिनिधी निवडून आल्यावर डॉ. वऱ्हाडपांडयांची गती पुन्हा वाढू लागली आहे असे म्हणतात[२].

दौरा : सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी प्रांतिक काँग्रेस कमेटीतर्फे दौरा काढून, मोर्शी, चांदूर, धामणगाव, यवतमाळ, दारव्हा, कारंजा, आकोला, आकोट, शेगाव, खामगाव व मुर्तिजापूर इतक्या ठिकाणी व्याख्याने दिली होती[३].

इंग्लंडच्या राजपुत्राचे भारतातील आगमनानिमित्त उमरावतीत कडकडीत हरताळ.

इंग्लंडचे राजपुत्र हिंदुस्तानात आलेत त्या दिवशी, दि. १७ नोव्हेबर १९२१ रोजी सर्व देशभर हरताळ पाळण्यात आला होता. उमरावतीतही

१, २, व ३ : उदय : दि. ८ नोव्हेंबर १९२१

कडकडीत हरताळ होता. सर्व बाजार आणि कॉटन मार्केट बंद होते.

अभिनंदनाच्या सभा : दिनांक ५ दिसेंबर १९२१ रोजी गांधी चौकात डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जंगी जाहीर सभा भरून, दे. भ. लाला लजपतराय, जितेंद्रलाल बॅनर्जी, गंगाधरराव देशपांडे व उमरावतीचे श्री. अहंमद हुसेन आझाद यांच्या अटकेबद्दल त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले होते.

सभेला सुमारे पाच हजार लोक हजर होते. दे. भ. मोहरीर, भागवत, बामणगावकर, डॉ सोमण व भैय्यालाल यांची सुश्राव्य भाषणे झाली होती.

दि. ९ दिसेंबर रोजी पुन्हा डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली गांधी चौकात सभा होऊन, पकडलेल्या पुढाऱ्यांच्या अभिनंदनपर दे. भ. बामणगावकर व श्री. भैय्यालाल वगैरे वक्त्यांची भाषणे झाली व येथेच वडाळीस तयार झालेली राष्ट्रीय दंडार करून दाखविण्यात आली. यातील नकला गमतीच्या आहेत यात शंका नाही.

दे. भ. दास यांच्या अटकेबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी दि. १२ दिसेंबरला रात्री गांधी चौकात सभा भरली होती.

सत्याग्रह मेळा : दि. ११ दिसेंबर रोजी, गांधी चौकातच हल्ली उमरावतीस आलेल्या पुण्याच्या सार्वत्रिक मुळशी पेटा सत्याग्रहाच्या मेळाची सुश्राव्य पदे झाली व मुळशी पेटा सत्याग्रहासंबंधी डॉ. पटवर्धन, दे. भ. बामणगावकर व दे. भ. भागवत यांची भाषणे झाली होती.

अजब नोटीस : येथील हिंदु हायस्कूलमध्ये, दिनांक ९ दिसेंबर १९२१ रोजी एक नोटीस फिरविण्यात आली आणि हायस्कूलांतील सर्व विद्यार्थ्यांना असे सांगण्यात आले की, '३० जानेवारी १९२२ रोजी राजपुत्र नागपूरास येणार असून, त्यांना बघण्याकरिता ज्या मुलांना नागपूरला जाण्याची इच्छा असेल त्यांना रेल्वेचे रिटर्न तिकीट मोफत देण्यात येईल.' या प्रलोभनानंतरही केवळ दोनच मुलांनी यासाठी नावे नोंदविली होती.

वाङ्निश्चय : उमरावतीच्या हिंदु हायस्कूलचे तरुण हेड मास्तर (इंग्लंड रिटर्न) श्री. भास्कर मुकर्जी यांचा विवाह देशबंधू चित्तरंजनदास यांची जेष्ठ कन्या कु. कल्याणी देवी हिचेशी ठरला.

श्री. भास्कर मुकर्जी हे श्री. सर सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांचे दौहित्र असून, कर्नल यू. एन्. मुकर्जी, आय्. एम्. एस्. यांचे सर्वात वडील चिरंजीव होते.

परिशिष्ट क्र. १

लोकमान्य टिळक बाळाचा हिंदमातेने गाईलेला पाळणा.

(चाल–पाळण्याची) कवी : झयनोद्दीन, कारंजा.

निज निज बाळा झोप आली ही तुजला ।
टिळक बाळ माझा निजला ॥ धृ. ॥
कुणी म्हणती गे बाळ कृतांते नेला ।
त्या दग्ध करीन रसनेला ॥
कुणी धाऊनिया येति बाळ बघण्याला ।
लागेल दृष्ट बाळाला ॥
कुणी म्हणती गे अंत्यविधीही झाला ।
परि नसे अंत संताला ॥
चौपाटी नव्हे चौपाळा, मी त्यात निजविले बाळा,
अंथरूनो भूमि शय्येला, पांघरली चंदन ज्वाला,
दुःखाश्रूंचे स्नान घातले तुजला ॥ टिळक. ॥
बहू श्रमलासी खेळूनि बा वेल्हाळा ।
कधि न ये तुला कंटाळा ॥
बहु खेळ तुझे, कठिण केसरी–भाला ।
करी वार मदोन्मत्त करिला ॥
तुज खेळाया खंड आशिया न पुरे ।
म्हणुनी घे युरोपिय वारे ॥
तव खेळगडी भूप महा भुप सारे ।
कुंजराशी झुंजविणारे ॥
खेळणी तुझी का थोडी,
अती मत्त ब्युरॉक्रसी छेडी,
डंबेल मवाळी जोडी,
मतभेद भयंकर खोडी,

हो सर्व पुनः हाक मारिती तुजला ।। टिळक. ।।

निज कमलाक्षा, निज लागू दे डोळा ।
जो बाळा जो जो बाळा ।।
चळवळ सलिले धुउनि स्वच्छ अंगरखा ।
ठेविते तुझा बा तिलका ।।

कर्तव्याच्या लालबूंद रंगाची ।
रंगवीन पगडि बाळाची ।।
हृद्प्रेमाने पादत्राण तुज करिता
सजवीन शिशू मम उठता ।।

म्हणून का कुणी हो मेला
टोचतो बाण हृदयाला
ती झाला
टाकोनि जीर्ण देहाला

येईल पुन्हा बाळ रवी उदयाला ।। टिळक. ।।

(उदय, दि. २१ जून १९२१)

इसवी सन १९२२

सुप्रसिद्ध स्वामी श्रद्धानंदजींचे व्याख्यान : दि. १६ जानेवारी १९२२ रोजी स्वामी श्रद्धानंदजींचे उमरावतीत गणेश थिएटरमध्ये दिवसा चार वाजता, आर्य समाजातर्फे 'धर्म' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले होते. धर्माबाबतचे विवेचन केल्यानंतर स्वामीजी म्हणाले " कांगडीच्या गुरुकुलात आज तीस वर्षे राष्ट्रीय शिक्षणच चालू आहे व आमची असहकारिता तेव्हाच सुरू झाली आहे. त्यावेळी महात्मा गांधी स्वतः सहकारितावादी होते. इतकेच नव्हे तर, अमृतसर काँग्रेसपर्यंत ते सहकारितावादी होते आणि इतके पक्के सहकारितावादी होते की, त्यांनी सरकारला लढण्याकरिता गेल्या लढाईत रिक्रूटस् मिळवून देण्याची फार खटपट केली. त्यावेळी मी त्यांना प्रश्न केला की, 'महात्माजी आपण अहिंसेच्या तत्त्वाचे एवढे कट्टे भक्त व पुरस्कर्ते आहा आणि युद्धासारख्या घोर कृत्यात सरकारला शत्रूचे गळे कापण्याकरिता हे रिक्रूटस् कसे मिळवून देता?' तेव्हा महात्माजींनी त्याचे

स्वामी श्रद्धानंद : (जन्म १८५६ इ.; खून २३ डिसें. १९२६) सुप्रसिद्ध गुरुकुल विद्यालयाचे संस्थापक व हिंदु समाजाच्या उपेक्षित भागाकडे लक्ष वेधविणारे थोर गृहस्थ. जन्म पंजाबात. लाहोरला वकिली करीत. पण पुढे दयानंद सरस्वतीचे उपदेशाने पक्के आर्यसमाजी झाले. हरिद्वारजवळ गंगेच्या किनाऱ्यावर झोपड्या बांधून त्यांनी गुरुकुलाचे प्रत्यक्ष कार्य सुरू केले (सन १९०२) व नव्या पद्धतीची ही संस्था यशस्वी करून दाखविली. या संस्थेच्या अनेक शाखा निघून त्याला विश्वविद्यालयाचे स्वरूप प्राप्त झाल्यावर त्यांनी संन्यास घेतला. त्यापूर्वीच त्यांना 'महात्मा' ही पदवी प्राप्त झालीं होती.

रौलट ॲक्टच्या विरोधी चळवळीत भाग घेऊन, दिल्लीला गुरखा सैनिकांनी जमावावर बंदुका झाडण्यास सुरवात केली तेव्हा, ते पुढे झाले

(पुढील पानावर)

त्यावेळी काहीच उत्तर दिले नव्हते. आता ते त्याचे उत्तर देतात की, व्हायोलन्सवर विश्वास असणाऱ्या इतर पुढाऱ्यांचे, म्हणजे लो. टिळक वगैरेंचे वर्तन त्यावेळी कसे असावयास पाहिजे होते याचा त्यांस कित्ता घालून देण्यासाठी मी सरकारला लढण्यास रिक्रूटस् मिळवून देत होतो. पण माझे या उत्तराने समाधान होत नाही."

त्याच दिवशी रात्री स्वामीजींचे गांधी चौकात दुसरे व्याख्यान झाले. विषय अहमदाबाद येथे पास झालेला कायदेभंगाचा ठराव हा होता.

जालीयानवाला बागेच्या अत्याचाराची माहिती देऊन आणि हिंदु-मुसलमानांचे ऐक्यात आपली सारी शक्ती आहे असे सांगून शेवटी ते म्हणाले 'सर्वांनी कायदेभंग करण्यास तयार व्हावे... विद्यार्थ्यांनी विद्याजंन करून शरीरसंपत्ती मिळवावी, कारण शरीरसंपत्ती मिळविली तरच राष्ट्र उदयास येईल[१]'

(मागील पानावरून)

व निर्भयपणे त्यांच्या बंदुकासमोर उभे राहिले होते. त्यावेळी दिल्लीच्या जुम्मा मशिदीने त्यांना प्रार्थना चालविण्याचा मान दिला. हिंदूला असा मान दिल्याचे हे पहिलेच उदाहरण असावे. पूर्वी मुसलमान झालेल्या दिल्लीच्या आसपासच्या मलकाना रजपुतांना त्यांनी शुद्ध करून हिंदु-धर्मात घेतलें होते व त्यांचेशी रजपुतांना रोटी-बेटी व्यवहार करायला लावून शुद्धीकृतांना आत्मसात करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मलबारातील मोपल्याचे बंडात हिंदूंना बाटविल्याची व अत्याचाराची बातमी कळताच ते तेथे धावून गेले. मुसलमान समाजावर याचा परिणाम होऊन त्यांना धमक्यांची अनेक पत्रे आली. दिल्लीस आजारातून बरे होत असतानाच अब्दुल रशीद नावाचे एका मुसलमानाने, रुग्णशय्येवर पडलेल्या या वृद्ध सन्याशाचा गोळी घालून खून केला होता. अशाप्रकारच्या मृत्यूने हिंदुस्तानातील काना-कोपऱ्यापर्यंत जबरदस्त धक्का बसला आणि त्यांच्या नावाने जागोजाग अनाथ व महिलांकरिता आश्रम निघाले व त्यांनी सुरू केलेल्या कार्याला विलक्षण विधायक स्वरूप प्राप्त झाले. (अर्वाचीन चरित्र कोश : चित्रावशास्त्री : पा. ५५७)

१ : उदय : दि. २४ जाने. १९२२

उमरावतीत पिकेटिंग सुरू झाले : दि. १८ जानेवारी १९२२ पासून, दे. भ. मोहरीर, सेक्रेटरी प्रांतिक काँ. कमेटी, दे. भ. भागवत व डॉ. सोमण, सेक्रेटरी, उमरावती जिल्हा काँ. कमेटी, दे. भ. बामणगावकर, प्रांतिक प्रचारक मंडळ, टिळक स्वराज्य सघ, डॉ. शहाणे, अध्यक्ष, वऱ्हाड स्वयंसेवक मंडळ, श्री. पानसे, सेक्रेटरी वऱ्हाड स्वयंसेवक मंडळ, दे. भ. भाऊसाहेब असनारे, दे. भ. डॉ. पटवर्धन, श्री. सहस्रबुद्धे वगैरेंनी स्वत: येथील दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग सुरू केले होते.

उग्रमंगल : इंद्रभुवन थिएटर कोसळले : बलवंत संगीत मंडळीचा मुक्काम उमरावतीला होता. या मुक्कामातच कंपनीने श्री. वासुदेवशास्त्री खरे कृत 'उग्रमंगल' हे नवे नाटक रंगभूमीवर आणले होते. दि. २१ जानेवारी १९२२ रोजी इंद्रभुवन थिएटरमध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग करण्यात जाला. मास्टर दिनानाथ मंगेशकर यांची या नाटकात पद्मावतीची भूमिका होती. त्यामुळे हे नाटक रंगले व चांगलेच गाजले. उग्रमंगल पाहण्यासाठी लोक बेसुमार गर्दी करू लागले. शेवटी या गर्दीचा इतका कडेलोट झाला की, प्रयोग सुरू होण्याचे वेळी एक दिवस नाटकगृह कोसळले. अगदी स्वयंवर मोडण्यासारखा हलकल्लोळ माजला. कैक जखमी झाले. नगरीतील सर्व भीषग्वर्गांना धावत पळत यावे लागले. सुदैवाने एखादा अपघात घडला नाही. त्या प्रसंगाची शेवटची गोष्ट सांगायची म्हणजे, अपघातात सापडलेल्यांना बाजूला केल्यावर व मोडलेल्या भागातील थोडी गर्दी ओसरल्यावर, उरलेल्या प्रेक्षकांनी नाटक पाहण्याचा हट्ट धरला; नाटकातील सत्याग्रहाचा प्रसंग प्रेक्षागृहात सुरू झाला. (शेवटी) उरलेल्या प्रेक्षकासाठी मंडळीस प्रयोग करून दाखवावा लागला[१].

उग्रमंगल हे 'शठंप्रति शाठ्यम्' हे तत्त्व प्रतिपादन करणारे सुंदर नाटक होते. प्रयोग फार यशस्वी झाला. उमरावतीचे शेठ नंदलाल, शेठ नगीनदास व यवतमाळचे शेठ गोकुलदास यांनी श्रीयुत बाबासाहेब खापर्डे यांच्या हस्ते कंपनीतील नटांस पारितोषिके दिली व श्री. बाबासाहेबांचे समयोचित भाषण झाले होते[२].

---

१ : बहुरूपी : चि. ग. कोल्हटकर : पा. १९०

२ : उदय : दि. २४ जानेवारी १९२२

युवराजांचे स्वागतदिनी प्रांतात कडकडीत हरताळ पाळा. पुढाऱ्यांचे पत्रक

दि. ३० जानेवारी १९२२ रोजी सकाळी, इंग्लंडचे युवराज नागपूर येथे येणार असून, नोकरशाहीकडून होणाऱ्या त्यांच्या स्वागतावर पूर्ण बहिष्कार टाकण्यासाठी, संपूर्ण प्रांतात हरताळ पाळला जावा या उद्देशाने मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांताकडून दि. २४ जानेवारी रोजी जाहीरनामा काढण्यात आला होता. या जाहीरनाम्यात "युवराज आपले प्रांतात (नागपूर येथे) ता. ३० जानेवारी १९२२ रोजी येणार असून, काँग्रेसचे आज्ञेप्रमाणे त्या दिवशी प्रांतभर संपूर्ण हरताळ पाळणे हे आपले कर्तव्य आहे. सबंध प्रांतात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने नोकरशहाकडून केल्या जाणाऱ्या त्यांच्या स्वागताशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवू नये आणि दि. ३० जानेवारी रोजी सकाळपासून तो ३१ जानेवारी रोजी सकाळ पावेतो, पूर्ण २४ तास हरताळ पाळावा असे आमचे सर्वांस सांगणे आहे." असे म्हटले होते. या पत्रकावर श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. त्र्यंबकराव शेवडे, श्री. शामराव देशपांडे, श्री. रुस्तमजी बेमनजी, डॉ. माधव श्रीहरी अणे, श्री. नारायणराव गणोरकर, श्री. हीरालाल राधाकिसन, श्री. केशवराव अमीन, श्री. राधाकिसन चंद्रभान इत्यादी अनेक प्रमुखांच्या सह्या होत्या. या पत्रकाप्रमाणे ३० जानेवारी १९२२ रोजी सर्व प्रांतासोबत अमरावतीतही हरताळ पाळण्यात आला होता.

रावजी हंबर्डे हास्पिटल : अमरावतीचे प्रख्यात सावकार कै. रा. सा. हंबर्डे ह्यांनी पन्नास हजार रुपयांची रकम, धर्मार्थ दवाखाना चालवून लोकांची शस्त्रक्रियेची व औषधपाण्याची उत्तम सोय खाजगी डॉक्टरांच्या देखरेखीखाली करण्यासाठी सहा पंचाकडे ठेवली होती. पंचाचे अध्यक्ष ना. श्री. दादासाहेब खापर्डे व कार्यवाह रा. ब. ब्रम्ह हे होते. डॉ. शहाणे हे ऑनररी सर्जन व डॉ. बनसोड हे हाऊस सर्जन होते. या पंच मंडळाने इ. स. १९२२ साली नगरपालिकेमागचा सरकारी दवाखाना इमारतीसुद्धा सरकारकडून पांच वर्षाकरिता घेतला होता व त्यास 'रावजी हंबर्डे धर्मार्थ दवाखाना' हे नाव देऊन तो चालू केला. तो आजतागायत चालू आहे.

श्री. भाऊसाहेब असनारे यांचे दुःखद निधन

दि. २७ एप्रील १९२२ रोजी श्री. जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे यांचे अनपेक्षितपणे निधन झाले. त्याकाळी गावातील जी प्रमुख अशी पुढारी मंडळी होती त्यांत भाऊसाहेबांची गणना होत असे. श्री. बाबासाहेब खापर्डे, वीर वामनराव दादा यांचे सोबत भाऊसाहेब हे राजकारणात भाग घेत असत. इ. स. १९२१ साली वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे ते एक उपाध्यक्ष होते आणि तत्कालिन हिंदी स्वराज्य संघाच्या नगर शाखेचे अध्यक्ष होते. १९२१ च्या कोर्टावरील बहिष्कार मोहिमेत, ज्या वकिलांनी आपली वकिली तहकूब केली होती त्यात भाऊसाहेब हेही होते. इतकेच नव्हे तर कोर्टावरील बहिष्कार यशस्वी करण्यासाठी त्यावेळी काँग्रेसतर्फे लवाद कोर्टाचा स्वावलंबी असा प्रयोग करण्यात आला होता. त्यात भाऊसाहेब असनारे यांनी मोलाचे कार्य केले होते. याबाबत त्यांचे लेख व कार्याचा अहवाल त्या काळच्या स्थानिक उदयमधून प्रसिद्ध झालेला आहे. विदेशी वस्तूंवरील बहिष्कार, व मद्यपान विरोधी चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता. याप्रमाणे राष्ट्रीय आंदोलनाशी ते संबंधीत होते.

कै. दादासाहेब खापर्डे यांच्या बैठकीत भाऊसाहेब नसले तर ती बैठक रंगायची नाही, अशी परिस्थिती असायची. स्मॉलकॉज कोर्टात तर भाऊसाहेब कोण्यातरी एका पक्षकाराकडून वकील नाहीत अशी केस मिळायची नाही. त्यामुळे त्यांची प्राप्ती उत्तमोत्तम होती व खर्च खापर्ड्या सारखा होता. त्यामुळे त्यांना 'छोटे खापर्डे' म्हटले जाई. वेदान्ताचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. टेनिस उत्तम खेळत. सर्वांशी गोड वागत त्यामुळे ते सर्वप्रिय होते. स्वभावात विनोदाची लकेर होती.

भाऊसाहेबांना घरात हिंडतानाच ठेंच लागून पायांच्या अंगठ्यातून थोडे रक्त निघाले व पुढे तो आजार धनुर्वातावर जाऊन त्यातच त्यांचा अंत झाला होता. त्यांनी लिहिलेले 'हिंदुस्थानचा व्यापार' हे पुस्तक 'उदय' मालेतर्फे प्रसिद्ध झाले होतें. या शिवाय 'रासक्रीडेचे आध्यात्मिक स्वरूप' व इतर काही वेदान्तावरील पुस्तकेही त्यांनी लिहून प्रसिद्ध केली होती.

भाऊसाहेबांच्या निधनाने उमरावतीकरांना अती दुःख झाले. सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रांतील एक महत्त्वाचा कार्यकर्ता हरवल्या गेला.

देशबंधु चित्तरंजनदास यांचा उमरावतीत मुक्काम

दिनांक ३ नोव्हेंबर १९२२ पासून देशबंधु चित्तरंजनदास यांचा आठवडाभर उमरावतीत मुक्काम होता. त्याकाळी देशबंधु चित्तरंजनदास हे देशाचे एक मोठे नेते होते.

उमरावतीत त्यांचे जामात प्रो. भास्कर मुकर्जी हे हिंदु हायस्कूलचे हेडमास्तर होते. त्यांचे कडेच त्यांचा मुक्काम होता.

या उमरावतीचे मुक्कामातच त्यांनी महाराष्ट्रातील ठळक नेत्यांची एक बैठक उमरावतीस बोलाविली होती व या बैठकीत त्यांनी कौन्सिल प्रवेशाची आवश्यकता प्रतिपादन केली व आलेल्या पुढारी मंडळीशी विचार विनिमय केला आणि दि. ७ नोहेंवर १९२२ रोजी जोग चौकात भरलेल्या प्रचंड जाहीर सभेत त्यांनी आपले इतिहास प्रसिद्ध स्टेटमेंट केले आणि प्रातिनिधिक संस्था आणि कौन्सिल प्रवेशाची गरज आपल्या बिनतोड युक्तिवादाने आणि असामान्य वाक्चातुर्याने लोकांना पटवून दिली होती.+

+"...इ. स. १९२२ च्या नोव्हेंबर महिन्यात दे. दास उमरावतीला आले. त्यांनी अनेक व्याख्याने दिली. विशेषतः कॉलेजचे विद्यार्थी व

(पुढील पानावर)

वेगाने धांवणाऱ्या ट्रेन मधून उडी मारून उमरावतीस पोचलेला

महान क्रांतिकारक सरदार पृथ्वीसिंह

दि. २९ नोव्हेंबर १९२२ ची रात्र. भुसावळकडून नागपुरला जाणारी ट्रेन वेगाने धावत होती. या ट्रेन मधील एका डब्यात जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झालेले चार राजकीय क्रांतिकारक कैदी, सार्जंट व पोलिसांचे पहाऱ्यात झोपलेले होते. पं. जगतराम, सरदार पृथ्वीसिंह, सरदार कर्तारसिंह आणि सरदार धीरसिंह या चार क्रांतिकारकांपैकी तिघांना नागपूर सेंट्रल जेलमध्ये व पं. जगतराम यांना जबलपूर जेलमध्ये नेण्यात यावयाचे होते.

गाडी वेगाने धावत होती. रात्री बऱ्याच उशिरा सरदार पृथ्वीसिंह यास जाग आला. तीन शिपाई पत्ते खेळत होते आणि सार्जंट, इतर पोलीस व तिन्ही कैदी साथीदार झोपले होते.

पृथ्वीसिंह उठले आणि संडासला गेले. "जन्मभर जेलमध्येच सडायचे की, मुक्तीचा प्रयत्न करायचा" हा विचार पृथ्वीसिंहाचे डोक्यात धुमाकूळ घालू लागला. विचार पक्का झाला आणि क्षणाचाही विलंब न

(मागील पानावरुन)

प्राध्यापक यांच्या समोर त्यांचे भाषण अत्यंत उद्‌बोधक व परिणामकारक झाले. 'गांधीजींचा कौन्सिल बहिष्कार देशाला अहितकारक ठरला व पुढे चालू ठेवल्यास ठरेल' असे ते म्हणाले. 'आपण जनतेचे खरे प्रतिनिधी कौन्सिलच्या बाहेर राहिल्याने इंग्रजांचे काही नडत नाही. आपण तेवढे नाडले जातो व हा बॉयकॉट इंग्रजावर परिणाम करण्याऐवजी आपल्यावर उलटतो. त्याऐवजी खरी असहकारिता कौन्सिलात शिरून करावी व आत जाऊन तोड-मोड-फोड करावी' असे ते प्रतिपादित व गांधींचे उद्दिष्ट याच मार्गाने खरे सिद्ध होईल असा कोटिक्रम करीत. अर्थात श्रोत्यांना पटत असे. कारण गांधींचे राजकारण पुढे नेण्याची ही वरची पायरी आहे असे स्पष्ट वाटे. गयेची काँग्रेस पुढे होतीच, त्या ठिकाणी दास व नेहरू सभा जिंकणार असे उघडच झाले. (कै. दादासा. खापर्डे च. पृ. ६२८-२९)

करता, पृथ्वीसिंहाने आपल्या बलिष्ट बाहुंनी संडासच्या खिडकीचे तावदान बाजूला काढले, गज वाकविले आणि आपले शरीर मुष्किलीने खिडकीतून काढून खाली उडी फेकली. गाडी वेगाने धावत होती.

रात्र चांदणी होती. दिवस थंडीचे होते. खाली जमिनीवर पाय टेकताच पृथ्वीसिंहाने वेगाने धावणे चालू केले. मुलुख अपरिचित होता. त्याने रेल्वे लाईनच्या विरुद्ध दिशेने पळावयास सुरुवात केली खरी पण कोठे जायचे ? पृथ्वीसिंहाचे अंगावर पैजामा, शर्ट व डोक्यास पंजाबी पगडी होती. काळी लांब दाढी त्याचे भद्रपणाचा पुरावा देत होती. सकाळी चार वाजेपावेतो सरदार पृथ्वीसिंह चालतच होते. नंतर त्यांना पक्की सडक लागली. थोड्या अंतरावर त्यांना मैलाचा दगड दिसला. त्यावर 'अमरावती २ मैल' असे लिहिले होते. पुढे चालल्यानंतर 'अमरावती एक मैल' चा दगड दिसला. आपण अमरावती नावाचे गावास पोहोचत आहोत हे त्यांनी ओळखले. ते तसेच वेगाने चालत अमरावतीस पोचले तेव्हा सूर्योदयाचा समय झाला होता. गाव लागले पण कोणाकडे जावे ? हे कळेना. या विवंचनेतच ते शहराच्या एका टोका पासून दुसऱ्या टोका पावेतो चालत गेले. तेथे एका हॉलचे दरवाजावर एक मोठा साईनबोर्ड लटकलेला होता. एका खोलीत दिव्याचा उजेड दिसत होता. तेथेच एक विद्यार्थी सकाळचा अभ्यास करताना त्यांना दिसला.

पृथ्वीसिंहांनी विद्यार्थ्यास खुणेने बोलावले तेव्हा तो विद्यार्थी बाहेर आला. 'मला तुझ्या मदतीची गरज आहे' हे त्याला सांगताच त्याने कसलाही प्रश्न वगैरे न करता दोन मिनिट थांबण्यास सांगून परत गेला व कपडे घालून बाहेर आला. पृथ्वीसिंगाने त्याला गावातील खऱ्या देशभक्ताचे घरी मला घेऊन चल असे म्हटले.

विद्यार्थ्याने नंतर कोणताही प्रश्न न करता त्याच्या माहितीतील एक दोन देशभक्त पुढाऱ्यांकडे त्याने पृथ्वीसिंगास नेले पण त्या दोघांपैकी कोणीच घरी नव्हते. नंतर त्याने आणखी एका देशभक्ताचे घरी नेले ते म्हणजे डॉ. वऱ्हाडपांडे.

डॉ. वऱ्हाडपांडे घरी होते. आवाज देताच त्यांनी दरवाजा उघडला. पृथ्वीसिंहाने विद्यार्थ्याचे आभार मानून त्यास जाण्यास सांगितले. तो



चित्र क्र. १०६ : विदर्भ साहित्य संघाची स्थापना व प्रथमाधिवेशन, उमरावती. दि. १३, १४ जाने; १९२३ (पृ. ४६३ पहा)

खुर्चीवर (डावीकडून) : १) गु. ह. देशपांडे, २) दुर्गाप्रसाद तिवारी, ३) ना. के. बेहेरे, ४) श्री. कृ. कोल्हटकर, अध्यक्ष ५) न्या. केशवराव कोरटकर, ६) वा. के. ओक, ७)... ८) गो. अ ओगले, ९) या. मा. काळे, १०) नी. ब. भवाळकर, ११) आनंदराव टेकाडे.

उभीरांग पहिली : १) कविभूषण प्रो. ब. ग. खापर्डे, २)... ३)... ४) रामभाऊ पिटळे, ५) डॉ. य. स. देशपांडे, ६) रा. ब. रा. मो. खरे, ७)... ८) बा. स. गडकरी, ९) ना. न. फडणीस.

चित्र क्र. १०७ : किंग एडवर्ड कॉलेज (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) (पृष्ठ ४७२-७३ पहा)
उद्घाटन समारंभ दि. २८ जुलै १९२६.

गेल्यानंतर पृथ्वीसिंहाने आपली सर्व कथा डॉ. वऱ्हाडपांडे यांना सांगितली. डॉ. वऱ्हाडपांडे हे त्याकाळी उमरावतीतील प्रमुख देशभक्तांपैकी एक होते. त्यांनी सर्व हकीकत ऐकून काय मदत करू असे पृथ्वीसिंहास विचारले व त्यांनी सांगितल्याप्रमाणे डॉक्टर साहेबांनी पृथ्वीसिंहाची दाढी काढली, खादीचे कपडे घालावयास दिले व चप्पल दिली. जुने कपडे जाळून टाकण्यात आले. नंतर मुंबईला जाण्यासाठी ट्रेनचे तिकीट पृथ्वीसिंहाने काढून देण्याची विनंती केली पण डॉ साहेबांजवळ पैसे नव्हते. म्हणून त्यांनी आपल्या मित्राकडून पैसे घेऊन त्याच दिवशीचे मुंबईस जाणारे ट्रेनमध्ये त्यांना नेऊन बसवून दिले. त्यावेळी फरार कैद्याचे शोध घेणारे पोलिस वगैरेंची धामधूम स्टेशनवर सुरू असलेली त्यांना दिसली पण या सर्वांची नजर चुकवून ते डब्यात बसले. ट्रेन सुरू झाली. डॉ. वऱ्हाडपांडे यांना हायसे वाटले[१].

उमरावतीकरांना त्यावेळी ही घटना कळू शकली नव्हती. पण उमरावतीच्या इतिहासात या घटनेची नोंद झालीच. पहिल्या महायुद्धाचे काळात देशासाठी आपल्या सर्वस्वाचा हंसत हंसत होम करणाऱ्या एका महान देशभक्ताचे चरण या नगरीला अशा विपरित परिस्थितीत लागले होते.+

पुन्हा प्लेग : पहिल्या जागतिक महायुद्धाचे काळातच, म्हणजे एप्रील १९१५ मध्ये उमरावतीस पुन्हा प्लेग सुरू झाला. त्यापूर्वीच्या प्लेगचे साथीचे वेळी जो अनुभव आला होता त्यामुळे यावेळी लोक सावध होते. प्लेगची सुरूवात होताच लोकांनी आपली निवासस्थाने रानावनात केलीत. कित्येक लोक बाहेरगावी निघून गेले. तरीही शहरातील व्यवहार चालू असत.

---

१ : सरदार पृथ्वीसिंह: राहुल सांकृत्यायन: पा. ९१ ते ९६ (प्रकाशक: ज्ञानमंडळ, काशी)

+टीप:–तरदार पृथ्वीसिंह हे पंजाब प्रांतातील 'लालडू' या गावचे रहिवाशी होते. रोजगारासाठी ते अमेरिकेच्या कॅलिफोर्निया स्टेटमध्ये गेले असता, तेथे हिंदी मजुरात काम करणारे बाबा सोहनसिंह व बाबा ज्वालासिंह यांचे संपर्कात येऊन ते 'गदर पार्टी'चे सदस्य झाले होते. स्वा. सावरकर यांच्या '१८५७ चे भारतीय स्वातंत्र्य युद्ध' या

पुस्तकाने त्यांना स्फूर्ती व प्रेरणा दिली होती. इ. स. १९१४ साली अमेरिकेत भारतीय स्वातंत्र्यासाठी स्थापन झालेल्या गदर पार्टीचे आदेशाप्रमाणे सुमारे ३०० क्रांतिकारी हिंदी लोकांचा जत्था, 'कोता गारा मारू' नावाचे जापानी जहाज भाड्याने घेऊन भारतात यावयास निघाला. ही बोट दि. २९ ऑक्टोबर १९१४ रोजी कलकत्ता बंदरास लागली. त्यासंबंधी दि. ३ नोव्हेंबर १९१४ चे केसरी पत्रात खालील वृत्त प्रसिद्ध झाले होते.

"दि. २९ रोजी परदेशाहून आलेले सुमारे तिनशे उतारू घेऊन तोसामारू नावाची एक बोट कलकत्त्यास येऊन पोचली. या बोटीतील बरेच उतारू व्हँकोव्हर व यु. स्टेटस् मधून आलेले होते. या उतारूंच्या वर्तनासंबंधाने बऱ्याच भयप्रद सूचना प्रथम आलेल्या असल्याने फुजिसियर पलटण, गुरखे व हत्यारबंद पोलिस बंदरावर गेलेले होते. उतारूंची झडती घेतली. त्यावेळी ५ रिव्हाल्वर, २ ऑटोमॅटिक पिस्तुले व बरेचशे राजद्रोहात्मक वाङ्मय सापडले. १२ उतारूंना पकडण्यात आले असून बाकी सर्वांना स्पेशल ट्रेनने पंजाबात पाठविण्यात आले आहे." नंतर १५ डिसेंबर १९१४ च्या केसरीत "पतियाळा येथे राहणाऱ्या पृथ्वीसिंह नावाच्या इसमाने अंबाला जिल्ह्यातील अमरसिंग नावाच्या एका सब् इन्स्पेक्टरला लाठीचा तडाखा मारला. सब् इन्स्पेक्टरने उलट त्याच्यावर गोळी झाडली. दोघांनाही दवाखान्यात ठेवले आहे. पृथ्वीसिंह हा नुकताच अमेरिकेहून आला असून 'कोता गारा मारू' प्रकरणातला फरारी इसम आहे असा सब् इन्स्पेक्टरला संशय आल्यामुळे तो त्याला पकडीत असता ही मारामारी झाली." असे वृत्त प्रसिद्ध झाले होते. नंतर या अमेरिकेतून आलेल्या क्रांतिकारी जत्थ्यासंबंधी त्या वेळच्या वृत्तपत्रातून बऱ्याच बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

अंबाल्यास सब् इन्स्पेक्टरशी पृथ्वीसिंहाने मारामारी केली तेव्हा त्यास अटक करून दवाखान्यात ठेवण्यात आले होते. नंतर दुरुस्त झाल्यावर जेलमध्ये ठेवण्यात येऊन खटला भरण्यात आला. जेलमध्ये असतानाच पृथ्वीसिंहाला लाहोर कटातील एक आरोपी असेही ठरविण्यात येऊन त्यात गोवण्यात आले व शेवटी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. पण नंतर ही शिक्षा जन्मठेप काळे पाण्यात बदलविण्यात आली व अंदमानच्या कारागृहात त्याला पाठविण्यात आले. तेथे १९१५ ते १९२१ अशी सहा

वर्षे काढल्यावर तेथून (अंदमानातून) पृथ्वीसिंहासह काही राजकीय क्रांतिकारकांना राजमहेंद्री (आंध्र) चे जेलमध्ये आणून ठेवण्यात आले. परंतु आंध्र प्रांतातील सीताराम राजूचे इंग्रजाविरूद्धचे जे क्रांतिकारी सशस्त्र आंदोलन त्याकाळी सुरू होते त्याचे भीतीने सरकारला या पंजाबी क्रांतिकारकांना राजमहेंद्रीचे जेलमध्ये ठेवणे धोक्याचे वाटू लागले व शेवटी या क्रांतिकारक कैद्यांना नागपूर व जबलपूरच्या जेलमध्ये पाठविण्याचा सरकारने निर्णय घेतला. त्याप्रमाणे चार क्रांतिकारक कैद्यांना भुसावळ मार्गे नागपूरला रेल्वेने पाठवितानाच सरदार पृथ्वीसिंहाने ट्रेनमधून उडी मारून सुटका करून घेतली व ते उमरावती शहरात आले तो प्रसंग वर दिलेला आहेच.

सरदार पृथ्वीसिहांना उमरावतीहून ट्रेनमध्ये मुंबईसाठी बसवून दिल्यानंतर ते मुंबईस डॉ. सावरकरांकडे गेले. नंतर बेळगाव व शेवटी भावनगर येथे व्यायाम शिक्षक म्हणून राहिले. अर्थात हा सर्व काळ ते नाव बदलवून राहत असत. पुढे कराची काँग्रेसचे वेळी पंजाबात व तेथून अफगाणिस्तानमार्गे रशियात गेले. रशियातून त्याच मार्गाने परतताना त्यांना काबुल येथे जेल मध्ये राहावे लागले. पण रशियन वकिलातीचे प्रयत्नाने १९३४ मध्ये तेथून मुक्त झाले व शेवटी परदेश प्रवास करीत पाँदेचरीला येऊन उतरले. नंतर आडमार्गाने मद्रास व तेथून मुंबईस आले. पुढे १९३८ मध्ये गांधीजींची भेट, त्यांचेच सल्ल्यानुसार आत्मसमर्पण, पुन्हा जेल व मुक्ती असे विचित्र जीवन सरदार पृथ्वीसिंगाचे आहे. त्यांचे संपूर्ण चरित्र अत्यंत वाचनीय असे आहे.

चित्र क्र. १०८ : किंग एडवर्ड कॉलेजचे (पृष्ठ ४७२ पहा)
प्रिंसिपॉल : एफ. पी. टास्टविन्.



चित्र क्र १०९ : (पृष्ठ ४८२ पहा)
दे. भ. श्री वामनराव मोहगीर.



चित्र क्र. ११० : (पृष्ठ ४८२ पहा)

श्री बाळकृष्ण गणेश उर्फ बाबासाहेब खापर्डे.

इसवी सन १९२३

विदर्भातील साहित्यिकांचा अमरावतीत मेळावा.

विदर्भ साहित्य संघाची स्थापना व प्रथम अधिवेशन

आज नाव लौकिकास चढलेल्या 'विदर्भ साहित्य संघाची' मूळ कल्पना व स्थापना अमरावतीचीच आहे.

कविभूषण प्रा. बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे हे या कल्पनेचे जनक असून, या कल्पनेला त्या काळातील वऱ्हाडचे मान्यवर नेते आणि साहित्यिकांनी उचलून धरले होते. बुलढाण्याचे कौन्सिल सभासद व कौन्सिलचे अध्यक्ष आणि वऱ्हाडचा इतिहास कर्ते श्री. यादव माधव काळे, वकील, लोकनायक बापूजी अणे, वऱ्हाडचे प्रख्यात संशोधक व यवतमाळच्या शारदाश्रमाचे अध्वर्यू डॉ. य. खु. देशपांडे, श्री. बाबासाहेब खापर्डे इत्यादी प्रमुख मंडळींनी ही कल्पना साकार करण्यासाठी दि. १३ जानेवारी १९२३ रोजी उमरावती येथे ख्यातनाम साहित्यिक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे अध्यक्षतेखाली साहित्यिकांची बैठक भरविली. या बैठकीत विचार विनिमय होऊन दि. १४ जानेवारी १९२३ इ. रोजी, संक्रांतीचे सुमुहूर्तावर 'विदर्भ साहित्य संघा'ची घोषणा करण्यात आली होती. विदर्भ साहित्य संघाचे पहिले अधिवेशन हेच. (वि. सा. संघाचे दुसरे अधिवेशनही उमरावतीलाच श्री. या. मा. काळे यांच्या अध्यक्षतेखाली १९२४ साली भरले होते. ती माहिती १९२४ या वर्षात दिलेली आहे.)

... ...

आज विदर्भ साहित्य संघाला बरेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. दरवर्षी या संघाची अधिवेशने वेगवेगळ्या गावी भरविली जातात, त्यावेळी

विदर्भातील साहित्यिक, कवी, कलावंत, संशोधक वगैरे मंडळी या निमित्ताने एकत्र जमतात. आपापल्या विचाराचे आदानप्रदान करतात. आज नागपूरला विदर्भ साहित्य संघाची भव्य वास्तू राणी झांशी चौकात उभी आहे. अशा या साहित्य संघाचा जन्म, वर म्हटल्याप्रमाणे उमरावतीला १९२३ साली भरलेल्या साहित्यिकांच्या बैठकीत झाला आहे 'सारस्वतीजन्मभू :' अशी प्राचीन काळापासून कीर्ती असलेल्या या विदर्भाच्या भूमीत असे न घडते तरच नवल !

उमरावतीत 'स्वराज्य पक्षा' चा श्रीगणेशा : दि. ७ फेब्रुवारी १९२३ रोजी उमरावतीतीला गणेश नाटकगृहात दे. भ. माधवराव उर्फ बापूजी अणे यांचे वऱ्हाडचे दौऱ्यातील पहिलेच भाषण झाले. 'नव्या पक्षाची माहिती' असा त्यांच्या भाषणाचा विषय होता, सर्व लोकांत फार जिज्ञासा असल्यामुळे व वक्ते दे. भ. बापूजी अणे असल्यामुळे समाज चांगला जमला होता. सभेला माणसे जमणे ही आता उमरावतीत नवलाचीच गोष्ट होत चालली आहे. असहकारितावाद्यांच्या, चांगल्या चांगल्या असहकारितावादी पुढाऱ्यांच्याही सभेत दोन आकडचा पलीकडे माणसांची संख्या जमणे किंवा दोन आकडयांतील पुढच्या पुढल्या किंवा शेवटच्या शेवटल्या संख्या गाठणे हे बहुधा अती मुष्कील जाते. अशी स्थिती आहे आणि ह्याच उमरावतीत रोज सभा होऊन दोन ते तीन हजार समाज पूर्वी सतत दर सभेला जमलेला आहे. असो.

अध्यक्षस्थानी पूर्वीपासूनचे राष्ट्रीय पक्षाचे असलेले श्री. श्रीपाद बळवंत उर्फ तात्यासाहेब तांबे हे होते. दे. भ. बापूजींचे भाषण नेहमी प्रमाणेच अतिशय मुद्देसूद, बिनतोड नवीन युक्तिवादाने भरलेले, वक्तृत्वपूर्ण व परिणामकारक असे झाले होते. त्यांनी प्रथमतः मुंबईस ठरलेली व वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेली, सभेची माहिती सांगितली व नव्या पक्षाच्या अलाहाबादेस २० फेब्रुवारी रोजी भरावयाच्या सामान्य सभेत सर्व काही नक्की ठरेल असे सांगितले होते.

दे. भ. बापूजी अणे यांच्या ह्या भाषणाने उमरावतीत भावी स्वराज्य पक्षाचा श्रीगणेशा करण्यात आला होता. (पुढे दि. २०, २१ व २२ फब्रुवारी १९२३ रोजी अलाहाबाद येथे दे. भ. दास, दे. भ.

मोतीलालजी नेहरू यांच्या 'काँग्रेस खिलाफत स्वराज्य पक्षाची' सभा होऊन व पूर्णपणे वादविवादानंतर ह्या नव्या पक्षाचे 'स्वराज्य पक्ष' असे अन्वर्थक, सुटसुटीत व अर्थगर्भ नाव धारण करण्याचे ठरले होते.)

दे. भ. तात्यासाहेब केळकर . दि. ४ मार्च १९२३ रोजी स्वराज्य संघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक उमरावतीस असल्यामुळे, त्या बैठकीसाठी, दे. भ. तात्यासाहेब केळकर, श्री. बाबूराव गोखले. दे. भ. अण्णासाहेब भोपटकर वगैरे मंडळी पुण्याहून आली होती. त्याचप्रमाणे श्री. बापूजी अणे, तपस्वी बाबासाहेब परांजपे वगैरे वऱ्हाडातील प्रमुख मंडळीही आली होती.

ता. ४ रोजी रात्री साडे आठ वाजता जोग चौकातील भव्य पटांगणात श्री. तात्यासाहेब केळकर व श्री. अण्णासाहेब भोपटकर यांची सुश्राव्य व्याख्याने झालीत. श्रोतृसमाज तीन-चार हजार होता व सर्व पक्षांची मंडळी हजर होती. अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब परांजपे हे होते. श्री. केळकर सभेत भाषण करताना म्हणाले. "उमरावतीला हल्लीचे राजकारणात एक प्रकारचे महत्त्व येऊन बसले आहे कारण, केवळ योगायोगानेच का होईना नव्या पक्षाची मूळ आखणी दासबाबूंनी येथेच प्रथम जाहीर केली होती."

"आज या तहानंतर माझं येथे पहिलेच भाषण होय उद्या राजगोपालांचे येथे भाषण होईल. तेही त्याच तहानंतर जवळ जवळ पहिलेच भाषण होईल. आणि हल्लीचा तह हा काही खरा शेवटला एकीकरणाचा तह नाही."

सी. राजगोपालाचारीयर उमरावतीत : अलाहाबादच्या ऑ. इं. कॉं. कमेटीच्या बैठकीनंतर ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे, दि. ५ मार्च १९२३ रोजी दिवसा साडेतीन वाजता चक्रवर्ती राजगोपालाचारी व त्यांचे समागमे बाबू राजेंद्रप्रसाद आणि श्री. मोअज्झम अली हे उमरावतीत आले. त्यांच्या स्वागताकरिता आधी बरीच हॅन्डबिले वगैरे वाटण्यात आली होती. स्टेशनवर शे-सवाशे मंडळी स्वागतार्थ हजर होती. श्री. तात्यासाहेब केळकर याच गाडीने पुण्यास जाणार असल्याने तेही स्टेशनवर हजर होते.

सायंकाळी सरासरी ९ चे सुमारास नव्या पुढाऱ्यांच्या व्याख्यानास प्रारंभ होऊन, सर्व समारंभ साडेदहाचे सुमारास आटोपला व सर्व मंडळी स्टेशनवर रवाना झाली होती.

सायंकाळी व्याख्यानास समुदाय सुमारे आदले दिवशी इतकाच जमला होता. अध्यक्षस्थानी वीर वामनराव जोशी हे होते.

पहिले भाषण हिंदीत बाबू राजेंद्रप्रसाद यांचे झाले. नंतर श्री. मोअज्झम अलींचे उर्दूत भाषण झाले. त्यानंतर श्री. राजगोपालाचारी यांचे भाषण झाले. ते म्हणाले "ज्यांना कौन्सिलात जाणे असेल त्याने मनाची तशी तयारी ठेवावी व ज्यास बाहेर काम करणे असेल त्याने तुरुंगात जाण्याची तयारी ठेवावी".

श्री. राजगोपालाचारी यांचे भाषण सुरू असतानाच पर्जन्य सुरू झाल्याने सभा लौकर संपवावी लागली होती.

श्रीमद् जगदगुरुशंकराचार्यांनी वृत्तपत्रावर खटला भरला.

दि. १६ जानेवारी १९२३ च्या 'बहिष्कृत-भारत' या वृत्तपत्रात श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य, करवीर पीठ (डॉ. कूर्तकोटी) यांचे बद्दल काही अपमानजनक व खोटा मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्याविरुद्ध शंकराचार्यांनी उमरावतीच्या फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटचे कोर्टात क्रिमिनल केस दाखल केली होती. त्यासाठी ते मार्च १९२३ च्या तिसऱ्या आठवड्यात उमरावतीस येऊन ना. दादासाहेब खापर्डे यांचेकडे उतरले होते. तीन चार दिवस त्यांचा मुक्काम खापर्डे वाड्यात होता. श्री'च्या तर्फे श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. दादासाहेब शेवडे आणि बॅरि. रामराव देशमुख हे या केसमध्ये काम करीत होते.

सदर केस दाखल होऊन त्याची नोटिस संबंधित वृत्तपत्राचे संपादक व मुद्रक यांना गेली; तेव्हा दोघांनीही जाहीर माफी मागितली होती व ती मंजूर करून श्रींनी खटला काढून घेतला होता.

बहिष्कृत भारत' या वर्तमानपत्राचे संपादक श्री. गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई, सदस्य लेजिस्टेटिव्ह कौन्सिल, हे होते.

संन्यासी दे. भ. शाम यांची व्याख्याने : सुप्रसिद्ध राजकीय संन्यासी दे. भ. शाम हे येथे आले होते व त्यांची व्याख्याने दि. २९ व ३० मार्च १९२३ रोजी तालुका कॉं. कमेटीचे विद्यमाने उमरावतीचे गांधी चौकात अनुक्रमे डॉ. पटवर्धन व डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती.

संन्यासी दे. भ. शाम हे अत्यंत मनोरंजक, सरळ व स्पष्ट बोलणारे असल्यामुळे त्यांच्या व्याख्यानास अतोनात गर्दी होत असे.

येथील नाफेर पक्षाच्या नगर कॉं. कमेटीने प्रथम त्यांचे व्याख्यान करण्याचे नाकारले होते. परंतु गर्दीचा लोट पाहून मोह सुटला व तिसरे व्याख्यान नगर कॉं. कमेटीने दि. ३१ रोजी सक्करसाथीत एका नाफेरवाल्याच्या अध्यक्षतेखाली ठेवले होते. व्याख्यानास अडीच तीन हजार लोक उपस्थित होते. व्याख्यात्यांनी 'फेर नको असेल त्यांनी हात वर करावे' असा सरळ सवाल श्रोत्यांस केला. तेव्हा श्रोत्यांपैकी एकानेही हात वर केला नाही. उलट सर्वांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. दे. भ. शामची स्पष्टोक्ती पाहून नाफेरवाले अध्यक्ष घाबरले व त्यांनी काहीही न बोलता सभा बरखास्त केली होती.

राष्ट्रीय आठवडा : दि. ६ एप्रील १९२३ पासून राष्ट्रीय सप्ताह सुरू झाला. तालुका कॉं. कमेटी तर्फे दि. ६ रोजी रात्री ८ वा. गांधीचौकात दे. भ. डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सप्ताहाचा पहिला दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी दे. भ. बामणगांवकर व डॉ. सोमण यांची चांगली परिणामकारक भाषणे झाली.

येथील नाफेरवाल्यांनी या सप्ताहात भाग घेतला नाही, याचें कारण काय ते समजत नाही. दि. १३ एप्रील रोजी वीर वामनरावांचे तालुका कॉंग्रेस कमेटीतर्फे अखेरचे समारोपाचे व्याख्यान होणार आहे.

कै. असनारे वाचनालयातर्फे सभा : कै. भाऊसाहेब असनारे यांनी स्थापन केलेल्या वाचनालयातर्फे, दि. १६ एप्रील १९२३ रोजी, सायंकाळी दत्तमंदिरासमोरील पटांगणात, कै. भाऊसाहेब यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दे. भ. बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभा होऊन दे. भ. मोहरीर, डॉ. सोमण, श्री. बाबासाहेब खापर्डे व श्री. दौंडकर मास्तर यांची व्याख्याने झाली.

ना. मोरोपंत जोशी 'सर' झाले : बादशहाचे वाढदिवसानिमित्त ना. मोरोपंत जोशी यांना 'सर' हा किताब देण्यात आला (जुन १९२३) होता. त्याच प्रमाणे उमरावतीचे मीर तुराबअलीखान जहागिरदार यांना 'खान बहादुर' हा किताब मिळाला होता.

उमरावती नगरपालिकेचे सभागृहात लो. टिळक व महात्मा गांधी यांच्या तसबिरी.

उमरावती नगरपालिकेच्या सभागृहात पूर्वी पासून बादशहा पंचमजार्ज व राणी मेरी यांचा एकत्र असा एक फोटो लावलेला होता, पण भारतीय नेत्यापैकी कोणाचाच फोटो सभागृहात नव्हता.

इ. स. १९२३ मध्ये नगरपालिकेने आपल्या सभागृहात लोकमान्य टिळक व महात्मागांधी यांचे फोटो लावण्याचे एका ठराबाद्वारे ठरवून, दि. १७ जून १९२३ रोजी गांधीचौकात नगरपालिकेचे तत्कालिन अध्यक्ष दे. भ. सं. वि. गोखले बी. ए. एल्. एल्. बी. यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभा भरवून जाहीर केले होते की, उदईक दि. १८ रोजी सकाळी म्यु ऑफिसातून गावभर या फोटोंची मिरवणूक काढून, परत येताच त्यांची म्यु. हॉल मध्ये योग्य ठिकाणी स्थापना करण्यात येईल.

त्याप्रमाणे दि. १८ जून १९२३ रोजी सकाळी, म्यु. कचेरीतून बँड वगैरे लावून लो. टिळक व महात्मा गांधी यांच्या फोटोंची थाटाची मिरवणूक काढण्यात आली होती. गावभर प्रमुख रस्त्याने फिरून मिरवणूक परत नगरपालिकेत आली व लो. टिळक व गांधीजींचे फोटो म्यु. हॉलमध्ये लावण्यात आले होते.

'म्युनिसिपालिटीत लोकमताची काही माणसे असली तर ती राष्ट्राचे मत त्या संस्थेत कसे व्यक्त करू शकतात ह्याचे हे एक प्रत्यक्ष प्रत्यंतर आहे.'

नागपूरच्या 'झेंडा' सत्याग्रहात उमरावतीचे सत्याग्रही : दि. १३ एप्रिल जालीयानवालाबाग दिनानिमित्त नागपूरला मिरवणूक निघाली. तिच्याबरोबर राष्ट्रीय झेंडा होता. सिव्हिल स्टेशनमध्ये मिरवणूक जाताच

डे. कमिश्नर आणि पोलीस अधिकाऱ्यांनी मिरवणुकीला हरकत घेतली. तरीही मिरवणूक पुढे चालू लागल्याने पोलिसांनी मिरवणुकीवर हल्ला केला व तिच्यातील मंडळींना चोपण्यात येऊन, रस्त्यानजीकचे नाल्यात ढकलण्यात आले. जनरल आवारीजींसह अनेकांना पकडून प्रत्येकास दोन महिन्याची शिक्षा देण्यात आली होती.

या घटनेचा परिणाम म्हणून नागपुरात १ मे १९२३ पासून झेंडा सत्याग्रहाला सुरवात झाली होती.

दि. १८ जून १९२३ हा दिवस अखिल भारतीय स्वयंसेवकांच्या सत्याग्रहासाठी ठरविण्यात आला होता व हा प्रसंग पाहण्यासाठी पं. जवाहरलाल नेहरू, पुरूषोत्तमदास टंडन, दरबार गोपालदास देसाई व त्यांच्या पत्नी भक्तीबा, चित्रशाळेचे वासुकाका इत्यादी मंडळी मुद्दाम नागपूरात आली होती.

यात भाग घेण्यासाठी उमरावतीहून दहा पुरूष व एक बाई असे एकूण अकरा स्वयंसेवक पाठविण्यात आले होते. या सत्याग्रहींना निरोप देण्याचा समारंभ, दि. १६ रोजी टिळक चौकात जाहीर सभा भरवून करण्यात आला होता. या सत्याग्रहीसोबत राष्ट्रीय झेंडा देण्यात आला होता.

या सत्याग्रहींनी नागपूरच्या दि. १८ जूनच्या सत्याग्रहात भाग घेतला. त्यात पुरूषांना अटक झाली. स्त्री सत्याग्रहींना न पकल्यामुळे बाई उमरावतीस परत आली होती. या सत्याग्रह प्रकरणी दे. भ. बामणगांवकरांना ते स्टेशनवर सत्याग्रहीसोबत होते म्हणून सकाळी ४ वा. १०९ कलमाखाली अटक झाली होती. त्यांचे निकालपत्रात मॅजिस्ट्रेटने लिहिले होते, 'हे गृहस्थ इतक्या सकाळी आढळून आले ह्यावरून ह्यांची सत्याग्रहास संमती आहे व म्हणून ते शिक्षेस पात्र आहेत.' यात बामणगावकरांना एक वर्षाची शिक्षा झाली होती.

राष्ट्रीय शाळा. उमरावती : इ. स. १९२० साली नागपूर येथे बहिष्कार त्रयींचा ठराव पास झाल्यानंतर, उमरावती येथे दि. १ फेब्रुवारी १९२१ पासून राष्ट्रीय शाळेची स्थापना झाली. शाळेची व्यवस्था पाहण्याकरिता एक बोर्ड नेमून त्याचे देखरेखीखाली दोन अडीच वर्षे ही शाळा आपले काम करीत होती.

प्रथम या शाळेत २०० विद्यार्थी आले होते व तीन वर्षे मिळून या शाळेत महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रवेश परीक्षेला ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. १९२३ च्या एप्रिलमध्ये शाळेला सुटी लागली, त्यावेळी ह्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या बरीच होती. परंतु सुटी संपून दि. १५ जून १९२३ रोजी शाळा उघडली तेव्हांपासून या शाळेत केवळ १८–२० च विद्यार्थी हजर असतात. म्हणून पालकांनी आपली मुले राष्ट्रीय शाळेत पाठवावीत, अन्यथा शाळा बंद करणे भाग पडेल अशी विनंती राष्ट्रीय शाळेतर्फे, दि. २७ जून १९२३ रोजी करण्यात आली होती.

मुले चोरण्याची गप्प : मुले चोरी जात असल्याची गप्प गेल्या आठवड्यात उमरावतीतही उठली होती, पण पोलिसकडे केलेल्या चौकशीवरून प्रत्यक्ष कोणतेच मूल चोरीस गेल्याचा रिपोर्ट नाही. ता. ७ जूनला दुपारी संशयावरून बरेच लोक एका फकिराच्या मागे लागले होते, पण त्याने जो मुलगा चोरून नेल्याचा संशय होता तो दुसरीकडेच सापडला.

लो. टिळक जयंतीची प्रचंड सभा : सोमवार दि. २३ जून १९२३ रोजी टिळक जयंतीचा समारंभ साजरा करण्यासाठी सायंकाळी इंद्रभुवन थिएटरमध्ये प्रचंड जाहीर सभा दे. भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

सभेला पाच वाजतापासूनच गर्दी होण्यास सुरूवात झाली होती व सहा वाजता तर सर्व थिएटर नागरिकांनी फुलून गेले होते. गावातील बडी मंडळी व सर्व धंद्याचे लोक या प्रसंगी हजर होते. स्त्रियाही सभेस आल्या होत्या.

रंगभूमीवर लोकमान्यांची तसबीर उच्चासनावर विराजमान झाली होती. त्यांचे खालीच म. गांधी यांची तसबीर ठेवली होती. उदबत्यांचा पवित्र परिमल सभागृहात सर्वत्र पसरला होता.

प्रथम पाटणकर नाटक कंपनीतील दोन मुलांनी 'हा हिंद देश माझा'+ हे हृदयस्पर्शी गीत गाऊन दाखविले. नंतर 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत स्वामी शिवानंद यांनी आपल्या मधुर आवाजात म्हणून दाखविले.

+ हे गीत नागपूरचे कवि श्री. आनंदराव टेकाडे यांचे आहे. त्या काळी हे गीत फार लोकप्रिय होते.

सुरूवातीला डॉ. वऱ्हाडपांडे यांचे भाषण झाले. नंतर दे. भ. मोहरीर यांचे भाषण झाले. डॉ. सोमण यांनी आपल्या खड्या निर्भय आवाजात भाषण केले. त्यानंतर श्री. दादासाहेब शेवडे आपल्या सडेतोड आवाजात बोलले. नंतर श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण व अध्यक्ष वीर वामनराव दादा यांचे समारोपाचे भाषण होऊन समारंभ संपला.

प्रोफेसर मुकर्जींना पानसुपारी : दे. भ. सुरेंद्रनाथ बॅनर्जींचे नातू. देशबंधू चित्तरंजनदास यांचे जामात व उमरावतीच्या हिंदू हायस्कूलचे हेडमास्तर प्रो. मुकर्जी यांना येथील विद्यार्थ्यातर्फे, दि. १७ जुलै १९२३ रोजी सायंकाळी ५ वाजता, इंद्रभुवन थिएटरमध्ये मोठ्या थाटाची पानसुपारी झाली. साडेचार वाजताच सर्व थिएटर मुलांच्या गर्दीने चिक्कार भरून गेले होते. गावातील ए. व्ही. स्कूल, मराठी ट्रेनिंग स्कूल, ही सारी ३ वाजताच पानसुपारी निमित्त बंद केली होती. साडे चार वाजता गावातील प्रसिद्ध प्रसिद्ध मंडळी जमू लागली. सरकार पक्षा बरोबरच, हिंदु हायस्कूलच्या आजपर्यंतच्या परंपरेत योगायोगाने निराळाच राष्ट्रीय रंग चढला हे खरे व हिंदू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी ही एक अपूर्व गोष्ट घडवून आणली.

घरी आई अत्यवस्थ असताना देखील वीर वामनरावांनी येऊन विद्यार्थ्यांवरील आपले प्रेम व्यक्त केले. असहकारितावादी पक्षाची वीर वामनराव, संगाप्पा मुचलंबे वगैरे मंडळी व स्वराज्य पक्षाची श्री. बाबासाहेब खापर्डे. श्री. दादासाहेब शेवडे व बॅरि. रामराम देशमुख वगैरे प्रमुख मंडळी स्टेजवर चमकत होती. रा. ब. ब्रम्ह, श्री. कानिटकर वगैरेही मंडळी हजर होती.

प्रो. मुकर्जी साडे चार वाजता खादीच्या पोषाखात आले. त्यामुळे सरकार पक्षीय मंडळींना विशेष आश्चर्य वाटल्याचे दिसत होते. श्री. मुकर्जी साहेब येताच सभेला सुरवात झाली. हिंदु हायस्कूल विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री. विश्वनाथ आप्पा चौधरी यांनी विद्यार्थ्यातर्फे, आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले व म्यु. अध्यक्ष श्री. नानासाहेब गोखले यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. त्याला विद्यार्थी संघाचे सेक्रेटरी श्री. कानफाडे यांनी अनुमोदन दिले.

अध्यक्ष स्थानापन्न होताच सभेच्या कामाला सुरवात झाली. अध्यक्षस्थानी गोखल्यांना पाहताच... कित्येक मास्तरांना वाईट वाटले व कित्येकांना आश्चर्य वाटले. सरकारी हायस्कूलातील विद्यार्थ्यांचा ओढा लोक पक्षाकडे आहे हे सिद्ध झाले. विद्यार्थ्यांच्या मॅनेजिंग कमेटीच्या खाजगी बैठकीत रा. ब. ब्रम्ह व श्री. गोखले ही दोन नावे सुचविली असताना रा. ब. ब्रम्हांना एकही मत मिळू नये व गोखले हे एकमताने निवडून यावेत हे कशाचे लक्षण ?

पद म्हणणे झाल्यावर विद्यार्थी संघाचे अध्यक्षांनी हिंदू हायस्कूलच्या विद्यार्थ्यातर्फे श्री. मुकर्जी विषयींचे भाषण इंग्रजीत वाचून दाखविले. मास्तर मंडळीपैकी श्री. चिंचाळकर, श्री. गाडे, श्री. गडकरी व श्री. पराडकर यांची भाषणे झालीत. शेवटी श्री. मुकर्जी यांचे उत्तरादाखल समयास योग्य असे भाषण होऊन, श्री. नानासाहेब गोखले यांनी गोड समारोप केला. आभार मानल्यावर पानसुपारी, हारतुरे इत्यादी होऊन समारंभ संपला.

उमरावतीला 'किंग एडवर्ड कॉलेज'चे उद्घाटन

उमरावती येथे नवीनच बांधलेले किंग एडवर्ड कॉलेज, दि. १४ जुलै १९२३ पासून सुरू झाले होते व कॉलेज उघडण्याचा औपचारिक समारंभ नेक नामदार गव्हर्नरसाहेब (सर फ्रँक् स्लॉय्) यांच्या हस्ते, ता. २८ जुलै १९२३ रोजी मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला होता.

या समारंभासाठी वऱ्हाडमधून बरीच मोठी मंडळी आली होती. नामदार सर मोरोपंत जोशी, दिवाण बहादूर नामदार केळकर, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि. ओन्स, कमिश्नर मि. टर्नर, डे. कमिश्नर मि. विल्सन, डिस्ट्रिक्ट जज्ज् मि. स्चेपल्स, आकोल्याचे रावबहादूर दामले, व रा. ब. महाजनी वगैरे लोक उच्चासनावर प्रमुखपणे चमकत होते. शिवाय मोठमोठे जहागिरदार व पदवीधर लोकांपैकी आपापल्या पदव्या दर्शविणारे पट्टे गळ्यात घालून आपापल्या नियोजित ठिकाणी व्यवस्थित रीतीने बसले होते. एकंदर जनसमाज सहा-सातशेचे वर होता. सर्व समारंभ मोठ्या थाटाने व गंभीरपणाने पार पडला.

साडेतीन वाजल्यापासूनच आमंत्रित सद्गृहस्थ हळू हळू येऊ लागले. साडे चार वाजण्याच्या आत सर्व हॉल भरून गेला. गव्हर्नरसाहेबांची मोटार साडेपाच वाजता येऊन दाखल झाली. रावबहादूर ब्रम्ह आणि प्रिन्सिपॉल टॉस्ट्वीन वगैरे लोक सामोरे झाले.

गव्हर्नरसाहेबांनी प्रथम गार्ड ऑफ् ऑनरची पाहणी केली व नंतर समारभाने दिवाण, होम मेंबर, प्रिन्सिपॉलसाहेब वगैरे मंडळी समवेत गव्हर्नरसाहेबांची स्वारी हॉलमध्ये आली. हॉलमधील सर्व मंडळींनी उठून उभे राहून गव्हर्नरसाहेबांचे स्वागत केले. नंतर गव्हर्नरसाहेबासाठी मुद्दाम शृंगारून तयार केलेल्या खुर्चीवर गव्हर्नरसाहेब स्थानापन्न झाल्यावर इतर मंडळी आपापल्या ठिकाणी विराजमान झाली.

प्रथम, कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. टास्ट्वीन यांनी स्वागतपर भाषण केले. त्यात त्यांनी कॉलेजचा पूर्वेतिहास सांगून, रा. ब. मुधोळकर व किंग एडवर्ड मेमोरिअल कमेटी आणि इतर सभासद यांनी या कॉलेजकरिता किती परिश्रम केले त्याचे वर्णन केले. शिवाय कॉलेजच्या पैशाच्या जमा खर्चाची तपशीलवार हकीकत सांगून, वाढता वाढता हे कॉलेज १७ लाखावर कसे गेले आहे याचीही त्यांनी माहिती सांगितली. शेवटी स्वागत करून त्यांनी आपले भाषण संपविले.

नंतर गव्हर्नरसाहेबांची कॉलेजच्या सर्व प्रोफेसरांशी ओळख करून दिल्यावर गव्हर्नरसाहेबांनी प्रत्येकाशी हस्तादोलन केले.

त्यानंतर डिव्हिजनल कमेटीतर्फे मानपत्र, रा. ब. ब्रम्ह यांनी खडखडीत आवाजात वाचून दाखविले. म्हैसूरहून मुद्दाम तयार करून आणलेल्या चंदनी करंडकात घालून ते गव्हर्नरसाहेबांना अर्पण करण्यात आले होते. करंडकाचे काम फारच पाहण्यासारखे होते... करंडक ठेवण्या करिता शिसवाचा हत्ती केलेला होता. त्याचे सर्वच काम प्रेक्षणीय होते. हस्तिदंत झुलीवरील नक्षीकाम व सरस्वतीचे चित्र फारच रम्य होते. तसेच हत्तीच्या बैठकीवर उजव्या बाजूस कॉलेजचा दर्शनी देखावा दर्शविणारे फोटोवरून केलेले काम मनास थक्क करून सोडणारे होते... या स्वदेशी कारागिरीचा उत्कृष्ट नमुना पाहून कोणासही अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. ह्या मूल्यवान व नयनमनोहर करंडकातून, उंची कागदावर

छापून आणलेले मानपत्र रावबहादुर ब्रम्ह हे गव्हर्नर साहेबास अर्पण करीत असताना जमलेल्या मंडळींनी टाळ्यांचा गजर केला.

त्यानंतर शिक्षणखात्याचे दिवाण रा. ब. केळकर यांचे भाषण झाले व त्यानंतर ना. गव्हर्नर सर फ्रँक स्लॉय यांचे मानपत्राला उत्तरा दाखल भाषण झाले. त्यात त्यांनी कै. रा. ब. मुधोळकर वगैरेंचा गौरवपूर्वक उल्लेख केला व विद्यार्थ्यास उपदेशपर चार शब्द सांगून कॉलेजचे उद्‌घाटन झाल्याचे जाहीर केले होते आणि 'सरस्वतीकरिता आम्ही हे मंदिर बांधले आहे. तरी सरस्वती–देवीने येथे येऊन वस्ती करावी' असे सरस्वतीला आवाहन केले होते.

त्यानंतर डि. कमेटीतर्फे सर्वांना गार्डन पार्टी देण्यात आली व आनंदाचा समारंभ निर्विघ्नपणे पार पडला.

किंग एडवर्ड कॉलेज : इ. स. १९१० मध्ये बादशहा सप्तम एडवर्ड यांचे निधन झाले. त्याचे स्मरणार्थ वऱ्हाडात उमरावती येथे एकादे स्मारक उभारावे म्हणून वऱ्हाडच्या जनतेने– चारही जिल्ह्यांतून– इ. स. १९१२ पर्यंत, रु. १,२९,९१३ इतका निधी जमा केला. या पैशातून एकादे वाङ्मय विद्यालय (आर्टस् कॉलेज) उघडले जावे असा लोकांचा मानस होता, तो लक्षात घेऊन त्यावेळचे वऱ्हाडचे कमिश्नर सर फ्रँक स्लॉय यांनी महाविद्यालयाचे आगामी स्वरूप ठरविण्यासाठी वऱ्हाड प्रांतिक कमिटी स्थापन केली होती. पुढे सरकारने कॉलेजची इमारत बांधावी व जमलेला निधी होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देण्यासाठी खर्च करावा अशी कल्पना पुढे मांडल्या गेली व कमिश्नर सर फ्रँक स्लॉय यांनी ती उचलून धरली. सरकारनेही वऱ्हाडच्या जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी ही योजना मान्य केली व दि. २३ नोव्हेंबर १९१८ ला मध्यप्रांत वऱ्हाडचे चीफ् कमिश्नर सर बेंजामिन रॉबर्टसन् यांचे हस्ते इमारतीचा कोनशिला समारंभ पार पडला. पाच वर्षांत इमारत बांधून पूर्ण झाली.

सातवे एडवर्ड यांचे स्मरणार्थ या महाविद्यालयास 'किंग एडवर्ड कॉलेज' हे नाव दिल्या गेले, आणि देणगीचा उचित विनियोग करण्याचे दृष्टीने 'किंग एडवर्ड मेमोरियल सोसायटी' ही संस्था दि. १४ जानेवारी १९२५ ला स्थापन झाली.

या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य श्री. एफ्. पी. टॉस्ट्वीन हे होते. इ. स. १९२३ ते इ. स. १९४१ पावेतो त्यांनी या पदावर काम केले व त्यांचे काळातच हे महाविद्यालय प्रतिष्ठ पावले.

स्वातंत्र्योत्तर काळात या कॉलेजचे नाव 'विदर्भ महाविद्यालय' ठेवण्यात आले आहे. हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे सरकारी कॉलेज असून भाषा, संगीत, समाज शास्त्रे व विज्ञान यांच्या अध्ययन, अध्यापनाची एकत्र व्यवस्था, ती सुद्धा बहुतेक विषयात पूर्व विद्यापीठ वर्गापासून तो पदव्यूत्तर पातळी पर्यंत केली आहे साडे बाविसशे विद्यार्थी व १७० प्राध्यापक असा या महाविद्यालयाचा थाट आहे.

महाविद्यालयाचा परिसर ९० एकर एवढा असून, वेगवेगळ्या शाखांच्या भव्य इमारती, वसतिगृहे, क्रीडांगणे नयनमनोहर उपवने इत्यादींनी हा परिसर रम्य बनला आहे.

विदर्भ महाविद्यालयासाठी उमरावतीच्या सर्वश्री रावबहादूर ना. रं. न. मुधोळकर, सर मोरोपंत जोशी, दिवाण बहादूर केशवराव ब्रम्ह, यांचे परिश्रम कारणीभूत ठरले आहेत[१] (प्रा. पी. एन्. देशमुख : इतिहास विभाग : यांचे अप्रकाशित लेखातून साभार.)

---

१ : "……उमरावती येथे किंग एडवर्ड कॉलेज स्थापन होऊ नये म्हणून इंग्रजांनी सुरुवातीला विरोध केला. वऱ्हाडच्या चार जिल्ह्याकरता स्वतंत्र सरकारी महाविद्यालय असावे अशी जनतेची मागणी होती. उमरावतीला जर महाविद्यालय झाले तर नागपूरच्या मॉरिस कॉलेजवर त्याचा परिणाम होईल, कारण तेथील कॉलेजमध्ये वऱ्हाडच्या चार जिल्ह्यातील मुलांचे प्रमाण जास्त होते.

अनेक नागरिकांच्या परिश्रमामुळे शेवटी उमरावती येथे कॉलेज स्थापन झाले. वऱ्हाडचे वाळवंटात आता एक उच्च शिक्षणाचे केंद्र आहे ही एक समाधानाची बाब आहे.

वऱ्हाडचे उत्पन्न जर इतरत्र खर्च केले नाही तर वऱ्हाडात एक विश्वविद्यालय स्थापन करणे कठीण नाही. इंग्रज सरकार तसे करणार नाही.

जर वऱ्हाड निजामाला परत मिळाला तर उमरावती येथे सर्वप्रथम विश्वविद्यालय स्थापन करण्याचे आश्वासन दिले आहे……"

–निजामाचा वऱ्हाड परत मागण्याचा मेमोरँडम्, पा. ९०



'स्वतंत्र हिंदुस्तान'चे मुखपृष्ठ.

अमरावतीला नवे साप्ताहिक : 'स्वतंत्र हिंदुस्तान'

दि. १ ऑगस्ट १९२३ पासून अमरावतीत एका नव्या साप्ताहिकाचा जन्म झाला. डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या संपादकत्वाखाली आणि वीर वामनराव जोशी यांचे मार्गदर्शनाखाली 'स्वतंत्र हिंदुस्थान' साप्ताहिक सुरू झाले होते. तत्कालिन परिस्थितीनुरूप, या साप्ताहिकाचे धोरण असहकारवादी होते व गांधीजींच्या धोरणाचा प्रचार आणि प्रसार करणे हे उद्दिष्ट त्या साप्ताहिकाने ठरविले होते.

स्वतंत्र हिंदुस्तान'चे कार्यालय (बुधवारा)

(येथेच 'होमरुल लीग'चेही कार्यालय होते.)

स्थानिक काँग्रेस मधील दुही : येथील कट्टर असहकारितावादी पुढाऱ्यांनी उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीच्या झालेल्या निवडणुकीसंबंधी ऑल इंडिया काँ. कमेटीकडे बऱ्याच तक्रारी केल्या होत्या. त्याचा निकाल करण्याकरिता वर्किंग कमेटीचे चिटणीस रा. गोपाळकृष्ण अय्या हे ऑगस्ट १९२३ मध्ये उमरावतीस आले होते. नंतर त्यांचे समक्ष रा. मोहरीर, रा. भागवत आणि वीर वामनराव जोशी यांचेत तडजोड झाली होती.

रा. गोपाल कृष्ण अय्यांचे भाषण : ऑ. इं. काँ. कमेटीचे सेक्रेटरी श्री. गोपालकृष्ण अय्या यांचे वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर भाषण झाले. त्यांची ओळख श्री. मोहरीर यांनी करून दिली त्यानंतर वीर वामनराज दादा प्रास्ताविकात म्हणाले "....व्याख्यानापूर्वी ११६ रु. जमा झाल्याखेरीज ते व्याख्यान द्यावयाचे नाहीत. तसा व्याख्यात्यांचा परिपाठ आहे..." नंतर सभेतच वर्गणी गोळा करण्यात आली होती व १२६ रू. जमले. नंतर व्याख्यानास सुरवात झाली होती.

व्याख्याते हे इंग्लंडला एम्. ए. झालेले आहेत. त्यांचे व्याख्यानही इंग्रजीतच झाले. व्याख्याते सुमारे सव्वा तास बोलले होते.

नागरिकांची जाहीर सभा : दि. १८ आगस्ट १९२३ रोजी येथील गणेश थिएटरात दे. भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरून, दे. भ. लाला लजपतराय सुटल्या बद्दल त्यांचे व डॉ. किचलू आणि श्री. याकुब हसन यांचेही अभिनंदन करण्यात आले होते. यासभेत, डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. मोहरीर, श्री. भागवत, डॉ. सोमण, दादासाहेब शेवडे, बाबासाहेब खापर्डे यांची भाषणे झाली होती.

दि. १९ आगस्ट रोजी रात्री बुधवारा चौकात डॉ. शहाणे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन डॉ. सोमण, दे. भ. बामणगावकर व पांढरकवड्याचे अ. रौफशहा यांची 'स्वदेशी व बहिष्कार' या विषयावर भाषणे झाली होती. समाज दोन अडीच हजार होता.

हिंदु सभेची शाखा : हिंदू महासभेची माहिती सांगण्याकरिता व तिची शाखा उमरावतीला स्थापन करण्याकरिता दि. ३ सप्टेंबर रोजी येथील इंद्रभुवन थिएटरमध्ये डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून एक पोटकमेटी नेमण्यात आली होती.

दे. भ. बामणगावकर यांचा सत्कार : दि. ६ सप्टेंबर रोजी वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली गणेश थिएटरमध्ये दे. भ. बामणगावकर यांचे सन्मानार्थ सर्व पक्षाच्या व सर्व जातींच्या लोकांची जंगी जाहीर सभा भरली होती.

प्रारंभी स्वामी शिवानंद यांनी वंदेमातरम् पद म्हटले. नंतर श्री. मोहरीर यांनी दे. भ. बामणगावकरांचे चरित्र, त्यांचा स्वार्थत्याग व त्यांनी केलेले कार्य हे थोडक्यात फार परिणामकारक रीतीने सांगितले. मे. नजीर हुसेन यांनी मुसलमानातर्फे त्यांचे स्वागत केले. नंतर वीरशैव समाजातर्फे दे. भ. बामणगावकरांना एक संदर व योग्य गुणवर्णनपर मानपत्र अर्पण करण्यात आले. वेगवेगळ्या अनेक संस्थांनी आपापल्यातर्फे हार घातल्यावर दे. भ. बामणगावकरांनी समयास उचित असे लहानसे भाषण केले व सांगितले की "श्री वीर वामनरावांच्या मातोश्री अत्यवस्थ होत्या म्हणून

अध्यक्षांचे भाषणानंतर सर बी. पी. स्टँडन हे कायद्याचा मसुदा कमेटीपुढे मांडण्यासाठी उभे राहिले व त्यांनी जमीन महसूल कायद्याचे मसुद्यावर आपले भाषण केले.

त्यानंतर त्यास उत्तर देण्यासाठी श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. द. कृ. काणे, श्री. साने यांची मसुद्यावर भाषणे होऊन त्यादिवशीचे कामकाज संपले होते.

दुसरे दिवशी सुरवातीचे भाषण श्री. डायर यांनी केले, नंतर श्री. यादवराव काळे, श्री. माधवराव कोल्हे, शेठ श्रीराम सूरजमल आणि या कमेटीवरील सरकार नियुक्त सभासद श्री. ब्रम्ह यांची भाषणे झाली. बहुतेक वेळ वऱ्हाड जमीन महसूल कायद्याचे कलमांतील तरतूदींचा विचार करण्यात गेला.

तिसरे दिवशी श्री. कानिटकर प्रथम बोलले. नंतर श्री. कोर्डे, श्री. जानराव बाजीराव देशमुख, श्री. उमेदसिंग, बॅरि. रामराव देशमुख ह्यांची भाषणे झाली. बॅरि. रामरावांचे भाषणाचे वेळी त्यांची व सरकार-पक्षीय सभासदांची खूप खडाजंगी उडाली होती.

शेवटी सर स्टँडन यांनी समारोपाचे भाषण केले आणि मसुदा सिलेक्ट कमेटीकडे सोपविण्याची त्यांनी सूचना मांडली व ती सर्वांनी मान्य केली. नंतर त्यांनीच सिलेक्ट कमेटीतील सभासदांची नावेहि सुचविली. त्यावेळी दोन जागांवर मतदान झाले. कमेटी एकूण १२ लोकांची होती.

ना. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते लो. टिळक-स्मारक मंदिराचे उद्घाटन.

पुण्यास लो. टिळक स्मारक म्हणून जी इमारत बांधली होती त्या इमारतीचे उद्घाटन उमरावतीचे ना. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते झाले होते. याप्रसंगी झालेले समारंभाचे अध्यक्षस्थाची दे. भ. तात्यासाहेब केळकर हे होते. हा समारंभ दि. १ आगस्ट १९२५ रोजी लो. टिळकांचे पुण्यतिथीचे दिवशी झाला होता.

कृष्ण जन्मोत्सव : महिलांतर्फे ब्रम्हविद्या मंदिरात आठ दिवस कृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला होता त्या निमित्त ना. दादासाहेब खापर्डे, श्री. बाबासाहेब खापर्डे व श्री. दादासाहेब शेवडे, यांची व्याख्याने झाली होती.

उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटी : टाऊन म्यु. कमेटीसाठी निवडणूक होऊन, दि. ३ ऑगष्ट १९२५ रोजी निकाल जाहीर झाले. त्यानुसार प्रत्येक वार्डातून तीन याप्रमाणे एकूण सहा वार्डातून १८ सभासद निवडले गेले. त्यात, सर्वश्री मुजफ्फर हुसेन, गोविंद तानबा, वामनराव जहागीरदार, मोतीसावजी बिजवे, खोतकर, कलोती वकील, शिवनाथ बालकदास केतकर, म्हैसाळकर, लढ्ढा वकील ही मंडळी होती.

नंतर सरकारने म्यु. कमेटीवर सभासद म्हणून येथील सिव्हिल सर्जन, एक्झीक्युटिव्ह इंजिनियर, श्री. संपतराव नाईक व रावबहादूर ब्रम्ह यांची, दि. २२ सप्टेंबर रोजी नियूक्ती केली होती.

श्री हनुमान व्यायाम शाळेचा कोनशीला समारंभ : दि. २० सप्टेबर १९२५ रोजी, वऱ्हाडचे कमिश्नर श्री. जी. ए. खान यांच्या अध्यक्षतेखाली झाला होता. श्री. खान यांनी व्यायाम शाळेला २०० रुपयाची देणगी दिली होती. याप्रसंगी व्यायाम शाळेच्या विद्यार्थ्यांचे खेळहि झाले होते.

उमरावतीचा गणेशोत्सव : यावर्षीही उमरावतीत एकच मोठा गणेशोत्सव झाला नाही. जागोजागी जो उत्सव झाला तो उत्साहाने व आनंदाने पार पडला. विद्यार्थ्यांचे लहान लहान गणेशोत्सव किती तरी झाले. स्त्रियांचा गणेशोत्सवही थाटाने पार पडला. विशेष निर्देश करण्यासारखे गणेशोत्सव म्हणजे हमालपुरा, बेलपुरा व माताखिडकी या तीन ठिकाणी अस्पृश्यांनी आपापले गणपती बसवून उत्सव साजरे केले. या गणपतीसमोर सर्वश्री दादासाहेब शेवडे, डॉ. वऱ्हाडपांडे, डॉ. गर्दे, डॉ. भोजराज व श्री. सरंजामे यांची भाषणे झाली. सत्यशोधकांनीही गणेशोत्सवात आपले कार्यक्रम केले.

भुसारी दरवाजा गणेशोत्सवात गतवर्षी प्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांचे मर्दानी व मैदानी खेळांचा कार्यक्रम उत्तम पार पडला. मुलांच्या हस्त-कौशल्याचे प्रदर्शनही या गणेशोत्सवात भरविले होते. प्रियबंधू समाजातर्फे मुला-मुलींच्या वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. दत्त सिनेमा (हल्लीचे राजकमल थिएटरचे जागेतील टिनाचे थिएटर) गृहात केलेल्या उत्सवात हस्तलिखित मासिकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. नाट्यकला प्रवर्तक मंडळीचा मुक्काम हल्ली उमरावतीस आहे. त्यांनीही गणेशोत्सव

प्रारंभी स्वामी शिवानंद यांनी 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत सुस्वर आवाजात म्हटले त्यावेळीं सर्व लोक उभे राहिले होते. श्री. बामणगावकरांनी थोडक्यात सभेचे प्रयोजन सांगितल्यावर नामदार श्री. ब. तांबे, मध्यप्रांत कायदे कौन्सिलचे अध्यक्ष, यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी सूचना केली. त्यास श्री. जोग वकील व श्री. सं. वि. गोखले वकील यांनी अनुमोदन दिल्यावर श्री. तांबे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारून समयोचित असे भाषण केले. त्यानंतर ना. दादासाहेब खापर्डे यांनी मुख्य ठराव मांडला व भाषण केले. या ठरावास रा. ब. ब्रम्ह यांनी दुजोरा दिला.

नंतर प्रभु समाजातर्फे श्री. रणदिवे वकील, पारशी समाजातर्फे श्री. श्रॉफ वकील, मुसलमानातर्फे श्री. वहीद, आर्य समाजातर्फे डॉ. वऱ्हाडपांडे यांची ठरावास पाठिंबा देणारी भाषणे झाली व शेवटी अध्यक्षांचे सूचनेवरून सर्वांनी उभे राहून ठराव पास केला. कै. दास बाबूंचे कुटुंबीयांना अध्यक्षामार्फत सहानुभूती संदेश पाठविण्याचा दुसरा ठराव मांडण्यात आला व तोही सर्व संमतीने पास झाल्यानंतर आभार प्रदर्शन होऊन हा कार्यक्रम संपला.

उमरावतीचा तिलकोत्सव : दि. ६ ते १२ जुलै १९२५ पावेतो म्हणजे लोकमान्यांच्या निर्याणतिथीपासून जयंतीपर्यंत व एक दिवस पुढेही, उमरावतीचा तिलोकोत्सव मोठ्या उत्साहाने व भक्तिपूर्वक पार पडला. गणेश नाटकगृह या उत्सवाचे काळात दररोज चिक्कार भरून जात असे. सर्व व्याख्याने सुश्राव्य आणि कळकळीची झाली होती.

दररोज कार्यक्रम सायंकाळी साडेसहा वाजता सुरू होत असे. पंधरा मिनिटे स्वामी शिवानंद हे श्री. उपाध्ये यांच्या टिळक चरितामृतातील निवडक वेंचे सुस्वर रीतीने वाचून दाखवीत असत.

त्यातच यंदा या उत्सवात सौ. सरस्वतीबाई देशपांडे एम्. ए. (पूर्वीच्या विमलाबाई कोल्हटकर) यांचेही एक व्याख्यान झाले ही विशेष गोष्ट होय. तद्वतच ना. दादासाहेब खापर्डे व श्री. बापूजी अणे यांची मार्गदर्शक आणि बोधप्रद अशी व्याख्याने झाली होती.

उत्सवाचा समारोप ना. दादासाहेब खापर्डे यांचे भाषणांनी झाला व आभार मानल्यानंतर लोकमान्यांचे जयजयकारात उत्सवाची समाप्ती झाली होती

वऱ्हाड कायदे कमेटीची उमरावतीत बैठक : दि. १५ जुलै १९२५ रोजी ११ वा. उमरावतीच्या जिल्हा कौन्सिलचे दिवाणखान्यांत 'वऱ्हाड कायदे कमेटी'ची पहिली बैठक भरली होती. दोन दिवस या कमेटीचे काम चालून दि. १७ रोजी संपले.

या बैठकीपुढे वऱ्हाडच्या जमीनधाऱ्याचा नवा कायदा येणार असल्याने ही बैठक फार महत्त्वाची होती. श्री. पंजाबराव देशमुख खेरीज करून कमेटीचे सर्व सभासद या बैठकीला हजर होते. पुढे मागे ह्याच कमेटीचे वऱ्हाड प्रांताचे स्वतंत्र कौन्सिल कदाचित बनेल असे, वऱ्हाड हा सब् प्राव्हिन्स बनावा अशी इच्छा असलेल्या मंडळींना आशा वाटत असल्यामुळे, ते या कमेटीकडे त्या दृष्टीनेच पाहत होते. सध्या या कमेटीचे निर्णय शिफारस वजा राहणार आहेत.

दि. १५ रोजी प्रारंभी गव्हर्नर सर मांटेग्यु बटलर ह्यांचा संदेश अध्यक्षांनी सर्वांस सभे राहण्यास सांगून वाचून दाखविला. त्यात गव्हर्नर साहेबांनी म्हटले होते कीं, "१९०२ च्या तहाने निजाम साहेबांची मालकी कायम राहूनही वऱ्हाड इंग्रजाकडे स्वतंत्रपणे राज्य कारभार चालविण्यासाठी म्हणून आला. तेव्हापासून वऱ्हाडला तीन प्रकारचे कायदे चालू आहेत. एक म्हणजे दिल्लीच्या बडचा कौन्सिलात पास होऊन, गव्हर्नर जनरलांनी वऱ्हाडला लागू केलेले कायदे. ह्यापैकी पहिल्या प्रकारच्या कायद्याचे बाबतीत दिल्लीला तुम्ही पाठविलेल्या प्रतिनिधींचा सल्ला मिळत असे. दुसऱ्या प्रकारच्या कायद्यात तुमच्या मध्यप्रांत कौन्सिलातील प्रतिनिधींचा सल्ला मिळत असे. पण तिसऱ्या प्रकारच्या कायद्यास जी तुमची सल्ला घेतली जात नसे ती घेण्यासाठी ही कमिटी स्थापन केली गेली आहे व तिच्या स्थापनेचे श्रेय सर फ्रँक स्लॉय यांना आहे. आजच्या तुमच्या कमेटीचे अध्यक्ष हे मध्यप्रांत कौन्सिलचे अध्यक्ष तर आहेतच पण वऱ्हाडीच गृहस्थ आहेत. त्यामुळे मला फार आनंद होतो."

ह्याप्रमाणे ना. गव्हर्नर यांचे भाषण वाचून दाखवून, अध्यक्षांनी या कमेटीसमोर असलेल्या जमीन–महसूल बिलासंबंधी उल्लेख केला व देशबंधु दास आणि कैं. मोहरीर यांचे निधनाबद्दलही उल्लेख करून भाषण संपविले.



चित्र क्र. ११४ : (पृष्ठ ५११ पहा)
दे. भ. पं. मोतीलालजी नेहरु.



चित्र क्र. ११५ : दि. ४ एप्रिल १९२५ रोजी (पृ. ४९९ पहा)
उमरावतीत आलेले जगप्रसिद्ध 'गामा' पहेलवान.

चित्र क्र. ११६ : महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा, चित्रा चौक, अमरावती. (पृष्ठ ५१५ पहा)

(महात्मा ज्योतिबा फुले यांचा शत सांवत्सरिक उत्सव दि. २१ दिसेंबर १९२७ रोजी उमरावतीत साजरा करण्यात आला होता.)

श्री शिवजयंती उत्सव : दि. २४ एप्रील रोजी जोग चौकात 'शिवजयंत्युत्सव' साजरा करण्यात आला होता. शिवाजी महाराजांची मोठी रंगीन तसबीर मुख्यस्थानी ठेवली होती. समाज चांगला जमला होता.

श्री. नथ्थुबूवा गवई यांनी रागदारीत व सुस्वर आवाजात गाथिलेल्या 'वंदेमातरम्' या राष्ट्रगीताने उत्सवाची सुरवात झाली. नंतर स्वामी शिवानंद ह्यांनी श्री. वाटखेडकरांची 'गोंधळ' ही कविता म्हणून दाखविली. त्यानंतर नागपूरचे कवी श्री. ज. के. उपाध्ये हे योगायोगाने ह्यावेळी येथे होते. म्हणून त्यांस विनंती केल्यावरून त्यांनी स्वकृत 'लोकमान्य' चरितामृतातील, लोकमान्यांनी शिवजयंत्युत्सव कां व कसा सुरू केला या संबंधीचा अध्याय वाचून दाखविला. नंतर मुख्यवक्ते ना. दादासाहेब खापर्डे यांचे सुमारे चाळीस मिनिटे अनेक दृष्टांतांनी भरलेले सुरस भाषण झाले. श्री. बामणगावकरांचे आभार प्रदर्शनानंतर समारंभ संपला होता.

देशबंधू चित्तरंजनदास यांचे
निधनाबद्दल दुखवटयाची सभा.

देशबंधू चित्तरंजनदास यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दु:ख व्यक्त करण्यासाठी उमरावतीच्या नागरीकांची जाहीर सभा गणेश नाटयगृहात दि. १७ जुन १९२५ रोजी भरली होती. अध्यक्षस्थानी ना. दादासाहेब खापर्डे हे होते. नाटकगृह श्रोत्यांनी चिक्कार भरले होते. सर्व लोक अत्यंत खिन्नवदन होते.

दुखवटयाचा ठराव श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी मांडला. 'देशबंधू चित्तरंजन दास यांचा मृत्यू म्हणजे राष्ट्रावर कोसळलेली आपत्तीच होय' अशा अर्थाचा ठराव व त्यात दु:ख प्रदर्शन केले होते.

या ठरावावर श्री. बाबासाहेब खापर्डे, बॅरि. रामराव देशमुख, श्री. गो. शि. जोगळेकर व श्री. बामणगावकर यांची भाषणे झाली.

अध्यक्ष श्री. दादासाहेब यांनी समारोपाचे भाषण केले त्यात देशबंधूचा गुणगौरव करून, त्यांच्या मृत्यूने देश एका थोर माणसास मुकला आहे, असे सांगितले आणि सभा संपविली होती.

हरताळ : देशबंधू चित्तरंजनदास यांचे मृत्यूमुळे, उमरावतीचे व्यापाऱ्यांनी दु:ख प्रदर्शित करण्याकरिता शहरात ता. १८ जुनला हरताळ

पाळला होता आणि पुन्हा ता. १८ ला रात्री शोकसभा भरविण्यात आली होती. डॉ. पटवर्धन हे अध्यक्ष होते. सर्वश्री बामणगावकर, गुलाबराव बक्षी, डॉ. बन्हाडपांडे, केशवराव शाळीग्राम, काळे व श्री. वहाब यांची देशबंधूंचे गुणवर्णनपर व श्रद्धांजली अर्पण करणारी भाषणे झाली होती.

जिल्हा कौन्सिल व शाळा बंद : उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्षांचे आदेशानुसार, दि. १८ जून रोजी, जिल्हा कौन्सिल कचेरी व जिल्ह्यातील तालुका बोर्डाच्या सर्व कचेऱ्या देशबंधू दास यांचे निधनानिमित्त बंद ठेवण्यात आल्या होत्या व त्याचसाठी सर्व शाळा ता. १७ जुनला बंद ठेवण्याचा आदेश देण्यात आला होता.

कै. दास बाबू आणि उमरावती : उमरावतीकरांचा कै. दास बाबूंशी जिव्हाळ्याचा संबंध जुळला होता. एकतर दास बाबूंचे जामात प्रो. भास्कर मुकर्जी हे येथील हिंदू हायस्कूलचे हेडमास्तर होते व नंतर ते किंग एडवर्ड कॉलेजमध्ये प्रोफेसर होते. दुसरे कारण म्हणजे दि. ३ नोव्हेंबर १९२२ पासून दास बाबू उमरावतीस होते व याच काळात दि. ७ नोव्हेंबर १९२२ रोजी येथील जोग चौकात भरलेल्या प्रचंड जाहीर सभेतच त्यांनी आपले इतिहास प्रसिद्ध 'स्टेटमेंट' केले व प्रातिनिधिक संस्था काबिज करण्याची आणि कौन्सिल प्रवेशाची आवश्यकता जोर देऊन बिनतोड युक्तिवादाने व आपल्या असामान्य वाक्चातुर्याने प्रतिपादन केली होती.

देशबंधूचे हे इतिहास प्रसिद्ध आणि देशाच्या राजकारणाला कलाटणी देणारे स्टेटमेंट उमरावती येथेच केले गेले ही उमरावती शहराच्या इतिहासातील एक महत्त्वाची गोष्ट होय.

त्यामुळेच उमरावतीकरांना दास बाबूंच्या निधनाने धक्का बसणे स्वाभाविक होते.

देशबंधूसाठी उमरावतीत सभा : दि. १ जुलै १९२५ रोजी, कै. देशबंधू चित्तरंजनदास यांचे स्मरणार्थ व त्यांचे आत्म्याला सद्गती मिळावी म्हणून प्रार्थना करण्यासाठी, गणेश नाटकगृहात ५ वा. जाहीर सभा भरली होती. जनसमूहाने नाटकगृह गच्च भरून गेले होते व गावातील सर्व प्रमुख मंडळी हजर होती.

इसवी सन १९२५

कै. मोहरीर यांच्या रिकाम्या जागेसाठी

दे. भ. त्र्यंबकराव शेवडे.

कै. दे. भ. मोहरीर यांच्या निधनामुळे मध्यप्रांत कौन्सिलची उमरावती तालुक्याची जागा रिकामी झाली होती. ती पोट निवडणूक दि. १९ फेब्रुवारी १९२५ रोजी घेण्याचे जाहीर झाले. त्या जागेसाठी स्वराज्य पक्षाने दे भ. त्र्यं. ल. शेवडे यांना उभे करण्याचे ठरवून त्यांच्या नावाची घोषणा १० फेब्रुवारी रोजी केली होती.

पुढे १९ फेब्रुवारीला मतदान होऊन या पोट निवडणुकीत श्री. जानरावजी देशमुख हे केवळ १३ मते अधिक पडून निवडून आले होते.

प्लेग : दि. ३० दिसेंबर १९२४ ते १० मार्च १९२५ या काळात शहराच्या निरनिराळ्या मोहोल्यातून एकूण प्लेगच्या लागण १८३ व मृत्यू १३९ असे भयानक स्वरूप प्लेगने धारण केले होते

जगप्रसिद्ध 'गामा' पहेलवान उमरावतीत : दि. ४ एप्रिल १९२५ रोजी उमरावतीला कुस्त्यांचा दंगल भरविण्यात आला होता. हा दंगल श्री. हंबर्डे यांनी भरविला होता व त्यासाठी त्यांनी स्टेशन जवळील स्वतःचे जागेत भव्य मंडप उभारला होता. दंगल पाहण्यासाठी तिकीट ठेवण्यात आले होते.

या दंगलीत जगप्रसिद्ध 'गामा पहेलवान' यांची कुस्ती गंगासिंग पहेलवानाबरोबर ठरली होती. परंतु गंगासिंग आला नाही. इतर कुस्त्यांसाठी उत्तरेकडील पहेलवान आले होते. त्या कुस्त्या झाल्या.

गामा पहेलवान यांना पाहण्यासाठी अतोनात गर्दी झाली होती. श्री. गामा पहेलवान[१] हे प्रथमच उमरावतीस आले होते.

उमरावतीत पहिला बर्फाचा कारखाना : उमरावतीत प्रथमच एप्रील १९२५ मध्ये बर्फाचा कारखाना सुरू झाला. श्री. जटाशंकर व्यास या व्यापाऱ्याने हा कारखाना रामबिलास बगिच्यात सुरू केला होता.

उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्षपदी बॅरि. रामराव देशमुख

दि. ९ एप्रील १९२५ रोजी उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडण्यासाठी नव निर्वाचित जिल्हा कौन्सिल सभासदांची सभा उमरावती जिल्हा कौन्सिलचे सभागृहात भरून बॅरि. रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख हे बीन विरोध अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. उपाध्यक्ष पदासाठी, श्री. त्र्यं. ल. शेवडे व व श्री. जानराव बाजीराव देशमुख यांचेत सामना होऊन ८ विरूद्ध १७ मतांनी श्री. शेवडे हे उपाध्यक्षपदी निवडून आले होते.

उमरावतीत 'सर्व्हे-सेटलमेंट' सुरू झाले : "उमरावती शहर आणि कॅम्प या दोन्ही म्यु. हद्दीतील बीन शेतीच्या जमिनीची मोजणी (सर्व्हे) आणि धाराबंदी (सेटलमेंट) चे काम सुरू झाले असून या कामी सर्व कबजेदारांनी मोजणीदार (सर्व्हेअर) लोकांना शक्य तितकी मदत करावी आणि मोजणीचे कामात अडथळा आणू नये." अशा आशयाची नोटीस उमरावतीचे सेटलमेंट ऑफिसर श्री. आर. एन्. बॅनर्जी यांनी काढली होती.

---

१ : **गामा, थोरला-रुस्तुम-इ-हिंद-** (जन्म सुमारे इ. सन १८८०) जगप्रसिद्ध हिंदी पहेलवान. त्यांनी युरोपीयन पहेलवानात सर्वश्रेष्ठ ठरलेला, रशियन पहेलवान झिस्को यास बर्लिन येथे व नंतर पुन्हा पतियाळा येथे चीत करून विजय मिळविला होता. झिबोस्कि व पिटर्सन या जगप्रसिद्ध युरोपीयन पहेलवानांना गामांनी अनुक्रमे तीन व एक मिनिटात पतियाळास चीत केले होते. अमेरिकेतही त्यांनी विजय मिळवून हिंदी पहेलवानांचे सर्वश्रेष्ठत्व कायम राखले होते. त्यांचे धाकटे बंधु इमामबक्ष व हे, दोघेही पतियाळा संस्थानचे आश्रित होते. (अर्वाचीन चरित्र कोश: चित्राव शास्त्री : पा. १८१)

काळे, याशिवाय इतर तालुक्यातर्फेचे प्रतिनिधीमध्ये श्री. बाबासाहेब खापर्डे बॅरि. रामराव देशमुख, श्री. मोहरीर ही मंडळी आहेत[१]. ही मंडळी, दि. २१ दिसेंबरला येथून रवाना होईल.

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटी स्टँडिंग कौन्सिलची सभा : प्लेगमुळे श्री. शेवडे यांचे बंगल्यावर प्रां. काँ. कमेटीच्या स्टँडिंग कौन्सिलची सभा झाली...तीत खालील ठराव मंजूर करण्यात आला होता.

"ह्या प्रांतावर होणाऱ्या खर्चापेक्षा ह्या वऱ्हाड प्रांताचे उत्पन्न किती तरी अधिक असताही मध्यप्रांत सरकार वऱ्हाडचा जमीन महसूल वाढविण्याचा जो प्रयत्न करीत आहे तो राज्य व्यवस्थेच्या सर्व तत्त्वांच्या विरुद्ध असून त्याचा हे कौन्सिल निषेध करिते[२]."

प्लेगचे स्वरूप उग्र होऊ लागले : उमरावती शहराच्या बहुसंख्य मोहोल्यातून प्लेगच्या लागणीबद्दल रिपोर्ट मिळाले असून, प्लेगने उग्र स्वरूप धारण केल्याचे दिसून येत आहे. दि. १ नोव्हेंबर ते ८ दिसेंबर या दरम्यान एकूण ५४ लागण व ४५ मृत्यू झाले आहेत.

दे. भ. वामनराव मोहरीर यांचे निधन : देशभक्त वामनराव गोविंदराव मोहरीर हे दि. १८ दिसेंबर १९२४ रोजी हृदय विकाराने एकाएकी निवर्तले. ते वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे व वऱ्हाड स्वराज्य-पक्षाचे तरुण उत्साही, कर्तबगार व स्वार्थत्यागी चिटणीस, वऱ्हाडातील प्रमुख काँग्रेस कार्यकर्ते व मध्यप्रांत कौन्सिलचे स्वराज्यपक्षीय सभासद आणि वकील होते. मृत्यूसमयी त्यांचे वय केवळ ३४ वर्षाचे होते. दि. २१ दिसेंबर रोजी जाहीर सभा भरून उमरावती नगरवासीयांतर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली होती.

दुसरा शोचनीय मृत्यू : दे. भ. वीर वामनराव जोशी यांचे सर्वात वडील चिरंजीव रा. नारायणराव यांना दि. २६ दिसेंबर १९२४ रोजी गुरुवारी दुपारी प्लेगने देवाज्ञा झाली होती. त्याचे वय केवळ १७–१८ वर्षाचे होते पण त्यांची वीर वामनरावांना रामचंद्र प्रेस चालविण्याचे कामी व 'स्वतंत्र हिंदुस्तान' पत्र काढण्याचे कामी हरप्रकारे मदत होत असे.

---

१ व २ : उदय : दि. २ व ९ डिसेंबर १९२४

(वीर वामनराव दादांचे दुसरे पुत्र चि. हरी यास दि. ९ फेब्रुवारी १९२६ रोजी पुणे मुक्कामी अँपेंडीसायटिसच्या रोगाने मृत्यू आला होता. एक वर्षाचे आंतच दादांची दोन मुले काळाने नेली. दादांवरील दुःखाचा हा कडेलोट होता.)

प्लेग : दि. ९ दिसेंबर ते २९ दिसेंबर पावेतो शहरात एकूण ४२ केसेस लागल्या व त्यापैकी ३० लोकांना मृत्यू आला. प्लेगचा जोर कमी होण्याची लक्षणे दिसत नाहीत.

अध्यक्ष व श्री. मोतीराम तुकाराम वानखडे हे चिटणीस निवडण्यात आले होते.

श्री. सी. वाय्. चिंतामणींचे भाषण : संयुक्त प्रांताचे माजी दिवाण श्री. सी. वाय्. चिंतामणी यांचे उमरावती येथे ता. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी गणेश नाटकगृहात डॉ. भट यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर व्याख्यान झाले होते.

त्यांनी आपल्या भाषणात वादग्रस्त गोष्टी सोडून फक्त सर्वमान्य असे विषयच नीट नेटक्या भाषेत व काहीशा चटकदार रीतीने मांडल्यामुळे त्यांचे भाषण कोणासच अप्रिय वाटले नव्हते.

बेझंट बाईच्या स्वराज्य बिलाच्या योजनेस सर्वांनी पाठिंबा द्यावा असा त्यांच्या मनातील मुख्य प्रतिपाद्य विषय होता. गोऱ्या सिंहलीयनावर त्यांनी चांगलेच ताशेरे झाडले होते..

'प्लेग' मुळे लोक गाव सोडू लागले : दि. २१ ऑक्टोबर १९२४ रोजी संपणाऱ्या आठड्यात, प्लेगने खोलापूर दरवाजा भागात ४ व बुधवाऱ्यात १ असे एकूण पाच आसामी लागले व एकंदर ३ मेले.

तटाबाहेर वकील ओळीकडे दोन उंदीर आतापर्यंत पडल्याच्या अफवा उठल्या होत्या पण शोधाअंती त्यात तथ्य निघाले नाही.

लोक मात्र भराभर गाव सोडून बाहेर राहण्यास जात आहेत.

दि. ४ नोहेंबर १९२४ पावेतो उमरावतीचे विविध मोहोल्यात एकूण प्लेगने लागण १० व मृत्यू ५ होते.

बंगालमधील दडपशाहीचा निषेध : उमरावती जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने दि. ४ नोव्हेंबर रोजी जोग चौकात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, व्हॉईसरॉय लॉर्ड रिडिंग यांच्या फर्मानाअन्वये बंगाल प्रांतात सुरू झालेल्या दडपशाहीचे निषेधार्थ उमरावतीच्या नागरिकांची व सर्वपक्षीय लोकांची जाहीर सभा भरली होती.

उमरावतीत प्लेग सुरू असून बहुतेक लोक गावाबाहेर राहावयास गेले असूनही सभेला सुमारे ५०० लोक हजर होते. प्रमुख मवाळ उर्फ लिबरल पुढारी डॉ. भट, रा. ब्रम्ह वगैरे मंडळीस मुद्दाम आमंत्रणे पाठवून हया

प्रश्नावर त्यांनी स्वतःचे विचार व्यक्त करावेत अशी विनंती केली होती. तथापि कोणीही मवाळ हजर राहिले नाहीत. सायंकाळी ६ वा. सभेला सुरवात झाली. श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी प्रास्ताविक भाषण केले व श्री. दादासाहेब शेवडे यांस सभेपुढे ठराव मांडण्यास विनंती केली.

श्री. शेवडे यांनी 'व्हॉईसरॉय यांचे हुकुमाने बंगालमधील स्वराज्य पक्षाचे व काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते व इतर लोक पकडून जी दडपशाही सुरू केली' त्याचे निषेधाचा ठराव सभेसमोर मांडला व जोरदार भाषण केले. त्यानंतर ठरावावर सर्वश्री वासुदेवराव भोळे, डॉ. पटवर्धन, दे. भ. बामणगावकर, वीर वामनराव जोशी व बॅरि. रामराव देशमुख यांची भाषणे होऊन ठराव मंजूर करण्यात आला व आभार प्रदर्शनानंतर सभा संपली.

उमरावती नगरपालिका माजी गव्हर्नरांना मानपत्र देत नाही. सभासदांचे पत्रक.

"स्वतंत्र हिंदुस्तानच्या दि. २९ नोव्हेंबरचे अंकात 'उमरावती म्युनिसिपॅलिटी व मावळत्या गव्हर्नरच्या मानपत्राचा बूट' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला लेख आमचे वाचण्यात आला. उमरावती शहर म्युनिसिपॅलिटीत अशा प्रकारचा प्रश्न अजून पर्यंत उघड रीतीने आला नाही व पुढेही येईल असे आम्हास वाटत नाही. त्याच प्रमाणे तसा प्रश्न आलाच तर तो सिद्धीस जाणे मुळीच शक्य नाही. सबब मतदारांनी ह्या संबंधी भीती बाळगण्याचे कारण नाही.' असे पत्रक, नगरपालिकेच्या एकूण २० पैकी १४ सभासदांनी काढले होते. त्या सभासदात सर्वश्री, श्रीकृष्णदास लढ्ढा वकील, संभाजी विनायक गोखले वकील, राधाकिसन चंद्रभान, समीरमल भैरवदान, गुलमहंमद, वासुदेवराव देवरणकर, एस्. वाय्. देशमुख, के. एस्. चंदवासकर वकील, पी. बी. बापट, मोतीसावजी बिजवे, डी. आर. कलोती वकील, संगाप्पा सिद्धाप्पा, गोपीचरण भगवानदास, फत्तेचंद पुनमचंद हे सभासद होते[1].

बेळगाव काँग्रेसला उमरावतीचे प्रतिनिधी : उमरावती नगर काँग्रेस कमेटीने बेळगावच्या काँग्रेस अधिवेशनासाठी खालील प्रतिनिधी निवडले होते.

१) श्री. त्र्यं. ल. शेवडे, २) श्री. द. रा. कलोती, ३) श्री. वा. गो. जोशी, ४) श्री. वि. मा. शिरबावीकर, ५) श्री. पु. बा. बापट, ६) श्री. रा. वि.

---

१ : उदय : दि. २ डिसेंबर १९२४

खापर्डे यांनी आपले भाषणात प्रत्युत्तर देऊन सर साहेबांचे विधानांच खरपूस समाचार घेतला होता.

शिवाजी हायस्कूल : दि. २३ सप्टेंबर १९२४ रोजी, बॅरि. रामरा देशमुख यांचे अध्यक्षतेखाली उमरावतीत सभा होऊन श्री शिवाजी हायस्कू काढण्याकरिता विदर्भातून पैसा गोळा करावा असे ठरविण्यात आले होते

श्री. पंजाबराव देशमुख यांनी आपली शाळेची कल्पना सभेसमो मांडली. डॉ. खेडकर व इतर प्रमुख मंडळी या सभेला हजर होती.

श्री शिवाजी मराठा हायस्कूल कमेटी पुढील प्रमाणे निवडण्या आली होती.

अध्यक्ष– बॅरि. रामराव माधवराव देशमुख, सेक्रेटरी– श्री. गोपाळ बाजीराव देशमुख, खेडकर, जॉ. सेक्रेटरी– श्री. उद्धवराव गोविंदराव शिवनीकर सभासद– सर्वश्री दादासाहेब गायकवाड वकील मोर्शी, पंजाबराव शामरा देशमुख पापळ, शामराव यादवराव गुंड मोर्शी, माधवराव बाजीराव देशमुख मोर्शी, गुलाबराव रावजी पाटील परसोडा, भगवंतराव नारायणराव पाटील ता. चांदूर, नारायण रामराव चोरे ता. चांदूर, गुलाबराव जयरामजी ठाकरे ता. चांदूर, राजाराम गंगारामजी बोंडे.

कै. रावसाहेब मोटे : उमरावतीचे श्रीमंत, उदार व सज्जन असे नागरिक श्री. रावसाहेब रामकृष्ण मोटे हे दि. २७ सप्टेंबर रोजी दिवंगत झाले. त्यांचे शिक्षण फारसे झाले नव्हते तरी त्यांचे इतका मनाने सुसंस्कृत माणूस सुशिक्षितातही विरळा सापडतो.

उमरावतीच्या उत्तरेकडील स्मशानात लोकांच्या सोयीसाठी, सोळा सतरा हजार रुपये खर्चून एक 'सराय' व शेगाव येथे चाळीस पन्नास हजार रुपये खर्चून 'स्त्री रोग चिकित्सेचा दवाखाना' व इतर इमारती आणि कारंजा येथे 'आयुर्वेदिक दवाखाना' वगैरे उपयुक्त सत्कृत्यासाठी कै. मोटे यांनी सढळ हाताने दीड दोन लाख रुपये खर्च केले आहेत. रावसाहेबांचा गुप्त दानावर फार भर होता.

'रावसाहेब' हे सरकारी रावसाहेब नव्हते तर लोकांनीच त्यांना 'रावसाहेब' बनविले होते. इतकेच नव्हे तर त्यांना सरकारने 'रावबहादूर'

पदवी देऊ केली असता ती व पहिल्या वर्गाची ऑनररी मॅजिस्ट्रेटी देऊ केली असता तीही निःस्पृहपणे त्यांनी साफ नाकारली होती.

उत्तराची जाहीर सभा : दि. २६ सप्टेंबर १९२४ रोजी गणेश नाटकगृहात रात्री साडे आठ वाजता स्वराज्य पक्षाचे विद्यमाने सर मोरोपंत जोशी ह्याचे व्याख्यानास उत्तर देण्याकरिता श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली होती. श्रोतृसमुदाय सर साहेबांचे सभे इतकाच मोठ्या उत्साहाने जमला होता. प्रारंभी श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर श्री. दादासाहेब शेवडे व श्री. बामणगावकर यांची सडेतोड उत्तराची भाषणे होऊन सभा संपली.

प्लेग : हिंदू हायस्कूलच्या मागल्या भागात गेल्या आठवड्यात प्लेग उद्‌भवला असून दोन मुले प्लेगने मेली. लस टोचून घेण्याची गडबड गावात सुरू आहे.

हिंदू मुसलमानांची जाहीर सभा : काँग्रेस वर्किंग कमेटीचे आदेशाप्रमाणे दि. ८ ऑक्टोबर रोजी, शहरातील सर्व देवळातून, मशिदी व चर्च मधून हिंदू–मुसलमान ऐक्यासाठी प्रार्थना करण्यात आली होती व रात्री साडे आठ वाजता गांधी चौकात, उमरावतीचे रहिवाशी हिंदु–मुसलमान यांची सभा वीर वामनरावदादा यांचे अध्यक्षतेखाली भरून श्री बामणगावकर, श्री. मोहरीर, डॉ. पटवर्धन ह्यांची भाषणे झाली होती. गांधीजींचा २१ दिवसांचा उपवास सुटला त्याबद्दल, तसेच हिंदू मुसलमानांचे ऐक्यासाठी ही सभा घेण्यात आली होती. पर्व देशभर हा कार्यक्रम झाला होता.

उमरावतीत सक्तीचे मोफत शिक्षण : सक्तीचे मोफत शिक्षण कायद्यानुसार, दि. १ जुन १९२५ पासून अमरावती म्यु. हद्दीत, सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण लागू करण्यासाठी उमरावती नगरपालिकेने दि. २८ सप्टेंबर १९२४ रोजी जो ठराव केला होता तो लोकांचे माहितीसाठी, म्यु. ने ७ आक्टो. रोजी प्रसिद्ध केला होता.

सत्यशोधक समाजाची स्थापना : उमरावतीत दसऱ्याचे दिवशी श्री. सीतारामजी कुलट यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून 'सत्यशोधक समाज' स्थापन करण्यात आला होता. श्री. उदेभान तानबाजी वाघ हे

148

Nizam's Promise to Berar

(Editorial, Reproduced from the "Muslim Outlook", dated July 3, 1924)

The Nizam's offer of autonomy to Berar, in case the province is restored to him should gladden the hearts of all true patriots. If such a thing happens, Berar will be the first province of what constitutes British India to-day to get Swaraj. Distrust and suspicion are, however, poisoning the springs of Indian sentiments and a section of our countrymen has openly expressed its scepticism of the *bona fides* of His Exalted Highness. In order to convince these unbelievers, it has been almost decided, if the Nizam's claim is recognised by the British Government and the retrocession of Berar is effectuated, that the first Governor of autonomous Berar will be Sir Ali Imam. If this surmise of the "Voice of India" is true it should set all doubts at rest. The ex-member of the Viceroy's Council is as much responsible for the Nizam's promise as His Exalted Highness himself and as an honourable man and a convinced Swarajist, in the widest sense of the term, he may expected to discharge his duties in such a way as to redeem the pledge both in the letter and the spirit, Sir Ali Imam has been well-known for his wide outlook on public affairs and his worst enemies cannot accuse him of narrow sectarianism. The politicians of Berar would therefore do well to seize the present opportunity and lend their hearty support to the Nizam's rightful claim.

(निजाम सरकारचा वऱ्हाड परत मागण्यासंबंधीचा मेमोरँडम् १९२४)

टिळक जयंत्युत्सव : सालाबाद प्रमाणे याही वर्षी लो. टिळक जयंत्युत्सव इंद्रभुवन थिएटरमध्ये श्री. अण्णासाहेब देशपांडे, अंजनसिंगीकर यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला होता. सभेला मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते.

प्रारंभी श्री. नथ्थुबोवा यांच्या गायन समाजातील विद्यार्थ्यांनी 'वंदेमातरम्' व 'हा हिंद देश माझा' ही दोन राष्ट्रगीते म्हटली. नंतर स्वामी शिवानंद यांनी, टिळक स्मृतीपर पदे म्हटल्यावर, श्री. उपाध्येकृत 'लोकमान्य चरितामृतातील' पहिले तीन अध्याय वाचून दाखविले. त्यावेळी लोकमान्यांचे तसबिरीवर गुलाल उधळण्यात आला.

नंतर सर्वश्री बाबासाहेब खापर्डे, दादासाहेब शेवडे, वीर वामनराव जोशी यांची समयोचित भाषणे व आभार प्रदर्शन झाले. शेवटी स्वामी शिवानंद यांनी 'आजच्या महाराष्ट्रास' हा पोवाडा म्हटल्यावर पानसुपारी व खिरापत वाटण्यात येऊन समारंभ संपला.

हिंदू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा बाणेदारपणा : उमरावतीच्या हिंदू हायस्कूलमध्ये, विद्यार्थ्यांचे कार्यकारी मंडळ नेमून गणेशोत्सव दरवर्षी साजरा होत असतो. पण श्री. बाबासाहेब खापर्डे, शेवडे, वीर वामनराव जोशी व श्री. बामणगावकर या राष्ट्रीय पक्षाच्या व्याख्यात्यांची व्याख्याने यंदा होऊ द्यायची नाहीत असा हेडमास्तरांनी निश्चय व्यक्त केल्यामुळे, उत्सव मंडळातून विद्यार्थ्यांनी राजीनामे दिले होते.

दि उमरावती इलेक्ट्रिक सप्लाय कं. : दि उमरावती इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी' या नावाची वीज पुरवठा करणारी कंपनी स्थापन झाली असून, कंपनीच्या सहा डायरेक्टर्सपैकी तीन उमरावतीचे व एक आकोल्याचा आहे.

बहुतेक शेअर होल्डर्स स्थानिक असल्यामुळे उमरावती शहराची बिजेची सोय लौकरच पूर्ण होईल.

सर मोरोपंत : मध्यप्रांताचे गृहमंत्री सर मोरोपंत जोशी यांचे दि. २२ सप्टेंबर रोजी गणेश थिएटर मध्ये 'सद्यः परिस्थिती' या विषयावर जाहीर भाषण झाले होते. त्यांचे भाषणानंतर श्री. बाबासाहेब

विदर्भ साहित्य संघ परिषद.

दुसरे अधिवेशन.

दि. १९ व २० एप्रील १९२४ रोजी उमरावतीत ब्रम्हविद्यामंदिरात विदर्भ साहित्य संघ परिषदेचे, दुसरे अधिवेशन थाटात पार पडले होते. अध्यक्षपदी बुलढाण्याचे श्री. यादव माधव काळे हे होते.

दि. १९ ला अधिवेशनाची सुरवात सौ. ताराबाई साठे यांच्या शारदास्तवनाने झाली. त्यानंतर औरंगाबादचे ह. भ. प दत्ताबोवा पद्माकर यांनी या प्रसंगानिमित्त स्वत: रचलेले पद सुंदर रीतीने म्हटले.

परिषदेतील पहिले भाषण ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांनी केले. त्यांचे हे भाषण विव्दत्ताप्रचुर व विनोदाने भरलेले होते.

नंतर उमरावतीचे श्री. पु. बा. साठे यांनी अभिनंदनपर आलेल्या तारा वाचून दाखविल्या आणि श्री. अण्णासाहेब ओक यांनी अध्यक्षांची सूचना केली, त्यास हैद्राबादचे श्री. गोळेगावकर व नागपूरचे श्री. जयकृष्णपंत उपाध्ये यांनी दुजोरा दिल्यावर, टाळ्यांचे गजरात अध्यक्ष स्थानापन्न होऊन त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले.

त्यानंतर श्री. के. शा. देशपांडे, ह. भ. प. दत्ताबोवा यांनी भाषण केले व कविता वाचून दाखविल्या. नंतर संघाचे सरचिटणीस श्री. बळवंतराव खापर्डे यांनी गेल्या वर्षीचा अहवाल सादर केला. त्याच दिवशी विषय नियामक कमेटीची बैठकही झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ ते ११ व दुपारी ३ ते रात्री ८ पर्यंत प्रसिद्ध मंडळींची विचारपरिप्लुत अशी भाषणे व निबंध वाचन झाले. सुंदर अशा कविताही म्हटल्या गेल्या. त्यात सर्वश्री ना. म. घाटे, ना. त्र्यं. पांडे, दासोपंत अयाचित, गु. रा. देशपांडे, विनायक काळे, जयकृष्णपंत उपाध्ये, बळवंतराव खापर्डे, या. मा. काळे, गोपाळराव ओगले, आ. रा. देशपांडे, य. खु. देशपांडे, कु. गीता साने, गोळेगावकर, पिटके, शेषराव पांडे, यशवंत गोविंद देशपांडे, प्रि. ना. के. बेहरे, कृ. ग. सहस्त्रबुद्धे, बेडेकर, दामले आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची भाषणे, निबंध, संशोधनविषयक माहिती वगैरे संबंधीची भाषणे झाली.

शेवटी अध्यक्षांचें समारोपाचे भाषण होऊन, सरचिटणीसांनी आभार प्रदर्शन केले. त्याचप्रमाणे पाहुण्यांतर्फेही आभार प्रदर्शन झाले. नंतर अध्यक्ष व स्वागताध्यक्षांना हारतुरे अर्पण करण्यात आले व अधिवेशन संपले.

या अधिवेशनाचे वेळी, दुर्मिळ ग्रंथ, कागदपत्रे, चित्रे व वस्तूंचे एक लहानसे प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

निजाम राज्य व हिंदु समाज : दि. २१ एप्रील १९२४ रोजी जोग चौकात ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, हैद्राबादचे माजी वकील श्री. राघवेंद्रराव शर्मा यांचे सायंकाळी 'निजाम राज्य व हिंदु समाज' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले होते.

न्यू हायस्कूल : नवीन खाजगी हायस्कूलकरिता, न्यू एज्युकेशन सोसायटी ही संस्था एप्रील १९२४ मध्ये स्थापन करण्यात आली होती. या संस्थेतर्फे दि. १ जूलै १९२४ पासून 'न्यू हायस्कूल' या नावाने शाळा सुरू केली होती. श्री. न. ल इनामदार हे हेडमास्तर होते.

संस्थेचे अध्यक्ष रा. ब. के. वा. ब्रम्ह, उपाध्यक्ष श्री. संभाजीराव गोखले व सदस्य श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. तात्यासाहेब तांबे, श्री. खांडेकर, श्री. रानडे हे असून चिटणीस श्री. न. ल. इनामदार हे होते.

श्री शिवजयंत्युत्सव : दि. ५ मे १९२४ रोजी जोग चौकात श्री शिवजयंत्युत्सव बॅरि. रानराव माधवराव देशमुख यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या समारंभाने साजरा करण्यात आला होता. प्रारंभी स्वामी शिवानंद यांनी श्री बाबासाहेब वाटखेडकरांची 'गोंधळ' ही कविता अत्यंत सुरस म्हणून दाखविली. नंतर श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. बामणगावकर, श्री. दादासाहेब शवडे व श्री. पन्नालाल व्यास यांची जोरदार व सुश्राव्य भाषणे झाली होती.

गांधीजींचा निषेध : आर्यसमाजाच्या वऱ्हाड प्रांतिक शाखेने उमरावती येथे दि. १४ जून १९२४ रोजी, चांदूर रेल्वेचे श्री. मन्नालाल गुप्ता यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत, गांधीजींनी आर्य समाजाच्या संबंधी लिहिलेल्या मजकूराबद्दल त्यांचे निषेधाचा ठराव मंजूर केला होता. या सभेला आर्य समाजाचे बहुतेक सर्व लोक हजर होते. डॉ. कृ. दा. वऱ्हाडपांडे, संपादक, 'स्वतंत्र हिंदुस्तान' हे आर्य समाजाचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांनी हा ठराव सभेपुढे मांडला होता.

वाटतील ते ठराव पास करण्यास सुरवात केली आहे. मुष्किलीने शे-दीडशे लोक हजर असतील तेथे दोन हजार हिंदु-मुसलमान हजर असल्याच्या खोट्या तारा बिन माहितगार अशा दूरदूरच्या दैनिकास करण्यात येत आहेत पण अशा तारावर कोणीही विश्वास ठेवू नये व फसू नये. असे करणारी मंडळी कोण आहे ते तर्कनि शोधून काढणे मुळीच कठीण नाही. तेव्हा सर्वांनी सावध असावे.

उमरावतीत सिटी सर्व्हेचे कामाची सुरवात : उमरावतीच्या सिटी सर्व्हे (नझुल) चे कामाची पुन्हा सुरुवात करण्याबद्दल सरकारकडून विचारणा केल्यावरून उमरावती टाऊन म्यु. कमेटीने खालील ठराव दि. ११ जानेवारी १९२४ रोजी केला होता.

ठरावाचा सारांश :- वऱ्हाडातील सर्व शहरांतील नझुल जागांची पुन: मोजणी करण्याचे बाबतीत सरकारकडून विचारणा झाल्यावरून कमेटीने सदर्हू मोजणी होण्याबद्दल खाली लिहिलेल्या बाबी लक्षात घेऊन संमती दिली आहे. ती कारणे :-

१. या मोजणीने घरांच्या व जागांच्या मालकांचे त्यांच्या ताब्यातील जागांचे हक्क पूर्णपणे ठरवून घेतले जातील व पुढे कोणत्याही प्रकारचा तंटा उत्पन्न होणार नाही.

२. ह्या मोजणीमुळे म्युनिसिपॅलिटीला, ज्यांत खाजगी सरकारी अथवा म्यु. च्या जागा स्पष्टपणे दाखविल्या आहेत असा नकाशा तयार मिळेल व त्यावरून कोणी अतिक्रमण केले असल्यास ताबडतोब कारवाई करता येईल.

हा ठरावाचा सारांश म्यु. सेक्रेटरींनी लोकांचे माहितीसाठी दि. २६ फेब्रुवारी १९२४ रोजी प्रसिद्ध केला होता.

डॉ. वऱ्हाडपांडे : उमरावतीचे दे. भ. डॉ. वऱ्हाडपांडे हे मुळशी सत्याग्रहास गेले होते. तेथे त्यांना अत्यंत निर्दयपणे मारण्यात आले होते.

होळी सणाच्या वेळी मारामाऱ्या व खून : उमरावतीत यंदा होळीच्या वेळी अंगावर घाणेरडे पाणी वगैरे टाकण्याच्या प्रकारामुळे अनेक मारामाऱ्या झाल्या. त्यांत तीन मारामाऱ्या फार मोठाल्या होऊन त्यांतील दोहोत प्रत्येकी एक एक माणूस ठार मारला गेला.

वऱ्हाड : जरूर पडेल तेव्हा, वऱ्हाड निजामांना परत देण्याच्या बाबतीत इतर वर्गाशी बोलणे–चालणे करण्यासाठी म्हणून वऱ्हाडच्या मुसलमानांनी उमरावती येथे आपली एक सभा भरवून एक कमेटी स्थापन केली आहे. 'एक मुसलमान प्रेस बोर्डही' स्थापन होऊन दोघाजणांनी आपले लिथो प्रेस त्या कमेटीचे ताब्यात दिले आहेत[1].

उमरावतीत सावरकर पट्टी : पुणे येथील सावरकर–पट्टीची तिकिटे आमचेकडे आली असून ती १ ते ५ रुपये किंमतीची आहेत. ज्यांना तिकिटे घेऊन सावरकर–पट्टीस मदत करावयाची असेल त्यांनी ती आम्हा उभयतांपैकी कोणाजवळून किंवा आम्हापैकी कोणा एकाचा दाखला ज्याचे जवळ असेल त्याचे जवळून घ्यावीत.....'असे दि. ३० मार्च रोजी वामन गोपाळ जोशी व ना. रा. बामणगावकर यांनी जाहीर केले होते.

अमरावतीच्या स्मॉल कॉज कोर्टा संबंधी प्रश्न.

दि. ४ मार्च १९२४ पासून सुरू होणाऱ्या मध्यप्रांत कौन्सिलात श्री. वामनराव मोहरीर यांनी खालील प्रश्न विचारला होता.

२) अ) उमरावती शहर येथील स्मॉल कॉज कोर्ट हे उमरावती कॅम्पात नेण्याचे ठरविले आहे ही गोष्ट सरकारास माहीत आहे काय ?

आ) ह्या योजनेविरुद्ध उमरावतीतील ज्या लोकांचा कोर्टाशी संबंध येतो अशा लोकांनी काही रिप्रेझेंटेशन केले होते काय ?

इ) उमरावती कॅम्पात स्मॉल कॉज कोर्ट नेल्याने कोर्टाशी ज्यांचा संबंध येतो अशा लोकांना जास्त सोईस्कर होईल काय ?

प्लेग : दि. १ एप्रील १९२४ रोजी संपलेल्या आठवड्यात उमरावतीच्या महाजनपुऱ्यात २ आणि राजापेठ व खडकाडीपुऱ्यात प्रत्येकी १ याप्रमाणे चार लागण प्लेगच्या झाल्या. एकूण ४ लागण व ४ मृत्यू.

उमरावतीत नवा रोग : सारखी झोप लागायची, थोडा ताप यायचा व मनुष्य मरायचा असा रोग उमरावतीत दोघा तिघांस झाला असून, त्यातील एक मरण पावला होता.

---

१ : उदय : दि. १ एप्रील १९२४

इसवी सन १९२४

कायदे कौन्सिलात केलेल्या कार्याचा मतदारांना रिपोर्ट देण्यासाठी सभा.

दि. २२ जानेवारी १९२४ रोजी गणेश थिएटरमध्ये श्री. तात्यासाहेब तांबे यांच्या अध्यक्षतेखाली, मतदारांना कौन्सिलातील कामकाजाची माहिती देण्यासाठी जाहीर सभा भरविण्यात आली होती. थिएटर चिक्कार भरले होते. विशेषतः सुशिक्षित समाज व्याख्यानास पुष्कळ आला होता. हा उपक्रम उमरावतीकरांस नवा होता. त्यामुळे लोकांत उत्सुकता होती.

श्री. मोहरीर व श्री. बाबासाहेब खापर्डे या दोघांची व्याख्याने झाली होती. श्री. मोहरीर यांनी कौन्सिलच्या हॉलमध्ये खुर्च्या कशा मांडलेल्या असतात येथून तपशीलवार माहिती सांगण्यास सुरुवात करून, आम्ही कौन्सिलात गेलो कसे, अध्यक्ष आले कसे, गव्हर्नर आले व गेले कसे, शपथ विधी कसा झाला, पुढे तीन दिवस कामकाज कसकसे होत गेले इत्यादीचे, विनोदपूर्ण भाषणाने, फार चटकदार व हुबेहूब वर्णन करून सांगितले होते. लोकांना हा उपक्रम फार आवडला होता.

प्लेग : उमरावतीत गेल्या आठवड्यापासून प्लेग सुरू झाला. राजापेठेत सात माणसे लागली. एक मेला. सहा आजारी आहेत. म्युनिसिपल कमेटी उंदीर मारून नाहीसे करण्यासाठी झटत आहे. सर्वांनी टोचून घेणे (इनॉक्युलेशन करणे) अतिशय जरूरी आहे. अशी म्यु. क. च्या सेक्रेटरींनी विनंती केली आहे[१].

ह्या आठवड्यात राजापेठेत एक मनुष्य प्लेगने वारला. तो १०–१२ दिवस आजारी होता. संबंध आठवड्यात कोणी नवीन लागला नाही. आजारी असलेल्या प्लेगचे रोग्यापैकी सर्व दुरुस्त होत आहेत.

---

१ : उदय : दि. २९ जानेवारी १९२४

शहर म्यु. कमेटीत इनॉक्युलेशन दुपारी ३ ते ५ केले जाते. लोक त्याचा फायदा घेत आहेत; घाबरण्यासारखी परिस्थिती मुळीच नाही. एकादा उंदीर सापडल्यास व लोकांनी तो कमेटीत आणून दिल्यास किंवा कळविल्यास त्याची डॉक्टरकडून कमेटी तपासणी करील असे म्यु. कमेटीने कळविले आहे[1].

निजाम वऱ्हाड मागतात : 'वऱ्हाडला लष्कराखेरीज बाकी सर्व प्रांतिक स्वराज्य देतो. वऱ्हाड मला द्या' अशी निजामांनी इंग्रजांकडे पुन्हा मागणी केली आहे.

महात्मा गांधींच्या अभिनंदनाची सभा : गांधीजींची सुटका झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी, दि. ५ फेब्रुवारी १९२४ रोजी उमरावतीत जाहीर सभा वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. डॉ. वऱ्हाडपांडे व श्री. मोहरीर यांची भाषणे झाली. डॉ. वऱ्हाडपांडयांनी जरुरीवाचून वादग्रस्त विषय सभेत काढून थोडा औचित्यभंग केला पण श्री. मोहरीर व वीर वामनराव यांनी त्याकडे दुर्लक्ष करून सभेतील भाषणे केल्यामुळे सभा चांगली पार पडली.

सभेपूर्वी महात्मा गांधींच्या तसबिरीची मिरवणूक काढण्यात आली होती.

प्लेग वाढू लागला : दि. १९ फेब्रुवारी १९२४ रोजी संपलेल्या आठवडयात उमरावतीत प्लेगने सहा माणसे लागली व तीन मेली. फक्त राजापेठ – बेलपुऱ्याचा काही भाग येथेच काय तो प्लेग आहे. बाकी शहराच्या कोणत्याही भागात प्लेगची गडबड नाही, असे काल सायंकाळी म्यु. कमेटीत शोध केल्यावरून कळते.

मास्टर मनहर बर्वे : मास्टर मनहर बर्वे ह्यांच्या गायनाचे जलसे उमरावतीत चालू आहेत. गर्दी अतोनात लोटते. मुलगा वयाच्या मानाने फारच गुणी आहे, ह्यात शंका नाही. एकवेळ सर्वांनी ऐकण्याजोगे आहे.

सर्वांनी सावध असावे : वऱ्हाड निजामाकडे बिनशर्त जाण्यास तयार आहे. असे भासविण्यासाठी काही मुसलमान मंडळींनी गावोगाव कशा तरी सभा भरवून, हिंदू व मुसलमान ह्या दोघांच्याही नावाने

---

१ : उदय : दि. ५ फेब्रुवारी १९२४

८ व्या व ९ व्या इयतेतून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचीच सोय हायस्कूल-मधून होणे कठीण आहे. ही परिस्थिती जनतेसमोर मांडण्यासाठी मे. कमिश्नरसाहेब, प्रांत वऱ्हाड, यांनी दि. २० डिसेंबर रोजी एक सभा म्यु. हॉलमध्ये बोलाविली होती. सभेतील चर्चे अंती पाच पुढारी सद्गृहस्थांची एक कमेटी नेमण्यात आली. १, रा. सं. वि. गोखले, प्रे. म्यु. कमेटी, २. रा. ब. ब्रम्ह, ३. रा. तांबे, ४. रा. बा. ग. खापर्डे, ५. रा. वाय्. जी. देशपांडे हे वजनदार पुढारी या कमेटीवर होते.

चित्र क्र. १११ : (पृष्ठ ४८२ पहा)

बॅरि. रामराव माधवराव देशमुख (१९२३)

चित्र क्र. ११२ : (पृष्ठ ४८२ पहा)

दे. भ. माधव श्रीहरी उर्फ बापूजी अणे,
वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष.

चित्र क्र. ११३ : श्री यादव माधव काळे (पृष्ठ ४८९ पहा)
(वऱ्हाड प्रांताचा इतिहास कर्ते)
अध्यक्ष : विदर्भ साहित्य संघ परिषद १९२४.

व्हि. व्ही. भावे, एल्. जोगळेकर, डॉ. मा. श्री. अणे, के. देशपांडे, एन्. जी. सहस्त्रबुद्धे, एम्. व्ही. आमरकर, आर. व्हि. दांडेकर, ए. एम्. देशपांडे, टी. एल्. ओक, पन्नालालजी व्यास व भिकमसिंग.

नियमाप्रमाणे पुढील काँग्रेससाठी प्रां. काँग्रेसला दहा प्रतिनिधी निवडता येतात पैकी पांच पूर्वीच निवडून आलेत. उरलेले पांच पुढील प्रमाणे निवडण्यात आले. श्री. ना. रा. बामणगावकर, गं. बा. बापट, रा. अ. कानीटकर, अब्दुल रौफाशहा, दुर्गाताई जोशी.

हिंदु – मुसलमान

'उदय'ची टिपणी : मौ. शौकतअली यांच्या अभिनंदनाकरिता अहमदाबाद येथे भरलेल्या सभेत मौ. शौकतअली यांनी उद्‌गार काढले की, 'मी तुरुंगात गेलो तेव्हापेक्षा परिस्थिती बदलली आहे. आता बाहेर आल्यापासून पाहतो, जयजयकाराचे वेळी हिंदू 'अल्ला हो अकबर' म्हणून मुसलमानाबरोबर ओरडू लागत आहेत, पण मुसलमान हे हिंदूबरोबर 'वंदेमातरम्' म्हणून ओरडू लागत नाहीत ही स्थिती देशाला बरी नव्हे.'

मौ. शौकत अली यांनी हे वर्णन लाक्षणिक म्हणून केले की काही सभांची अशी प्रत्यक्ष स्थिती पाहून खरे म्हणून केले हे सांगता येत नाही पण एवढे मात्र खरे की, मौलाना शौकतअलींचे हे वर्णन लक्षाणिक अर्थाने हिंदु–मुसलमानांच्या एकीच्या आजच्या स्थितीला तंतोतंत लागू आहे.

हिंदु आज मुसलमानाबरोबर खिलापत वगैरे कामातही सहकार्य करण्यास तयार आहेत पण मुसलमान मात्र देशकार्यात हिंदूच्या खांद्यास खांदा लावून काम करण्यास तयार असलेले दिसत नाहीत[१].

मौ. शौकत अली : यांच्या बंधमुक्ततेबद्दल अभिनंदन करण्यासाठी येथील इंद्रभुवन नाटकगृहात सभा भरली होती.

स्वराज्य पक्षाचा सर्वत्र विजय : कायदे कौन्सिलच्या निवडणुकीत उमरावती शहरातील एकूण पाच उमेदवार स्वराज्यपक्षातर्फे कायदे कौन्सिलकरिता वेगवेगळ्या मतदार संघातून उभे होते.

---

१ : उदय : दि. ६ नोव्हेंबर १९२३

उमरावती तालुका खेडे विभाग	– श्री. मोहरीर
पूर्व वऱ्हाड म्यु. मतदार संघ	– श्री. तात्यासाहेब तांबे
वऱ्हाड जमीनदार संघ	– श्री. बाबासाहेब खापर्डे
मोर्शी–चांदूर तालुका	– श्री. पंजाबराव देशमुख (मोर्शीचे)
दर्यापूर–एलिचपूर तालुका	– बॅरि. रामराव देशमुख
मध्यवर्ती असेंब्लीकरिता	– श्री. माधवराव अणे

उमरावतीचे रहिवाशी असलेले पाचही उमेदवार आणि असेंब्ली उमेदवार निवडून दिल्याबद्दल, स्वराज्यपक्षाचे जिल्हा चिटणीस श्री. ना. रा. बामणगावकर व श्री. भागवत यांनी दि. १७ डिसेंबर १९२३ रोजी मतदारांचे आभार मानले होते.

विजयी उमेदवारांच्या सत्काराची सभा : दि. २० डिसेंबर १९२३ रोजी, गणेश नाटकगृहात रात्री दे. भ. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील निवडून आलेल्या स्वराज्यपक्षीय उमेदवारांचे स्वागतासाठी सभा भरली होती.

सुरुवातीला दे. भ. बामणगावकर यांचे भाषण झाले. नंतर श्री. दादासाहेब शेवडे बोलले. त्यानंतर श्री. बापूजी अणे यांचे हस्ते विजयी उमेदवारांना हार घालण्यात आले, त्यावेळी सारख्या टाळ्या श्रोतृवर्गातून पडत होत्या. विजयी उमेदवारांपैकी बॅरि. रामराव देशमुख, श्री. तांबे, श्री. मोहरीर व श्री. बाबासाहेब खापर्डे हे चार विजयी उमेदवार हजर होते. श्री. पंजाबराव देशमुख (मोर्शी) हे काही अपरिहार्य कारणामुळे हजर नव्हते.

त्यानंतर विजयी उमेदवारांची सत्काराला उत्तरे देणारी भाषणे झाली होती. शेवटी समारोप करताना बापूजी अणे यांनी समयोचित भाषण करून सत्कार समारंभाची सभा संपविली होती.

उमरावतीत दुय्यम शाळांची स्थिती : उमरावतीच्या सरकारी हिंदू हायस्कूलमध्ये मुलांची गर्दी होत असून, म्यु. च्या दोन्ही मिडल्स्कूल-मध्येही अशीच गर्दी आहे. त्यामुळे पुढील वर्षी म्यु. ए. व्ही. स्कूलमधील

मित्रकार्य म्हणून मी तुरूंगात गेलो. गांधी व दास एक होतील तर एक टिळक पुन्हा तयार होईल.''

शेवटी अध्यक्षांचे समारोपादाखल भाषण होऊन, शिवानंद यांनी पद म्हटले. सभेत इतर सत्याग्रहींचा देखील सत्कार करण्यात आला होता. हें सर्व सत्याग्रही नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे शिक्षा भोगून बाहेर आले होते.

जाहीर सभा : दि. २७ सप्टेंबर १९२३ रोजी इंद्रभुवन नाटकगृहात दिल्ली येथील काँग्रेसची हकीकत सांगण्याकरिता जाहीर सभा भरविण्यात आली होती. अध्यक्षस्थानी श्री. लिमये वकील हे होते.

प्रथम श्री. मोहरीर, प्रांतिक काँग्रेसचे सेक्रेटरी यांनी भाषण केले. त्यांनी आपले भाषणात दिल्ली काँग्रेसने कौन्सिल प्रवेशावरील बहिष्कार काढून घेतला; इत्यादी तडजोडीची माहिती सांगून भाषण संपविले. नंतर दे. भ. बामणगांवकर यांचे भाषण झाले. काही कट्टरच्या खेरीज इतर सर्वांना हा तडजोडीचा ठराव आवडला असे त्यांनी सांगितले. त्यानंतर अध्यक्षातर्फे डॉ. सोमण यांनी तडजोडीसंबंधी जनतेत किती आर्तता होती याचे वर्णन करून, या तडजोडीचे ठरावाविरुद्ध दोन चार कट्टराखेरीज कोणी गेले नाही, असे सांगून व समतेने वागून एकी करण्याचा उपदेश केला व सभा संपली.

दे. भ. बापूजी अणे यांचे भाषण : दि. २९ सप्टेंबर १९२३ रोजी सायंकाळी ७ वाजता गणेश नाटक गृहात तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली दे. भ. बापूजी अणे ह्यांचे 'स्वराज्य पक्षालाच का निवडावे' या विषयावर फार सुश्राव्य भाषण झाले. नाटकगृह अगदी चिक्कार भरले होते व लोकही भाषणाचे वेळी फार जिज्ञासेने व लक्ष देऊन ऐकत होते..... या सभेइतका उत्साह, लोकांची गर्दी व लोकांचे लक्ष असलेली यशस्वी सभा, गेल्या वर्ष–सहा महिन्यात किंवा गया काँग्रेसनंतर ही पहिलीच होती. श्री. बापूजी अणे यांनी तास सव्वा तास भाषण करून, स्वराज्य पक्षाच्या निवडणुकीसंबंधी विवेचन केले होते. शेवटी अध्यक्षांनी समारोपाचे समयोचित भाषण करून सभा संपविली.

कारकुनांचे पत्रक : "जे कौन्सिलचे उमेदवार कारकून लोकांच्या हितसंरक्षणाचा करार करतील त्यांसच कारकून वर्गाने निवडणुकीत मते द्यावीत" अशा आशयाचे पत्रक उमरावती कारकून संस्थेने काढले होते.

दे. भ. बॅरि. अभ्यंकरांचे भाषण : दि. २७ ऑक्टोबर १९२३ रोजी येथील इंद्रभुवन थिएटरमध्ये दे. भ. माधवरावजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली, नागपूरचे दे. भ. मोरोपंत अभ्यंकर यांचे कौन्सिलच्या निवडणुकीसंबंधी व्याख्यान झाले. प्रथम येथील प्रसिद्ध गायक नथ्थुबोवा यांनी वंदेमातरम् राष्ट्रगीत म्हटल्यानंतर श्री. अणे यांनी व्याख्यात्यांची ओळख करून देताना त्यांच्या निर्भिड व स्पष्टोक्तीचा उल्लेख केला. नंतर व्याख्याते म्हणाले "आम्ही चमडी दमडीने कष्ट व यातना सोसण्यास तयार आहो. फायदा तेवढा मवाळास मिळणार आहे व सरकारी नोकरास मिळणार आहे. ह्याकडे आपण लक्ष देऊन स्वराज्य पार्टीच्या उमेदवारासच मते द्यावीत अशी आग्रहाची सूचना आहे."

अध्यक्षांनी समारोप केला. सभागृह अगदी गच्च भरले होते व श्रोतृसमाजात उत्साह उत्तम होता.

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटी : दि. ४ नोव्हेंबर १९२३ रोजी वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटीची सभा होऊन खालील प्रमाणे निवडणुका झाल्या होत्या.

अध्यक्ष– श्री. माधवराव श्रीहरी अणे, उपाध्यक्ष– तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे, चिटणीस श्री. वामन गोविंद मोहरीर, खजिनदार– श्री. यशवंत गोविंद देशपांडे आणि हिशेब तपासनीस– श्री. कलोती वकील.

कार्यकारीमंडळात प्रत्येक जिल्ह्यातर्फे दोन प्रमाणे निवड– डॉ. बाबासाहेब परांजपे, टी. एस्. बापट, पुंडनाईक, गं. बा. बापट, वा. दा. भागवत, बाबासाहेब खापर्डे, रा. अ. कानीटकर, म. का. चांदे. ऑल. इं. काँ. कमेटीवर सात सभासदांची निवड – श्री. मा. श्री. अणे, डॉ. बाबासाहेब परांजपे, सदाशिवराव केळकर, या. मा. काळे, त्र्यं. ल. शेवडे, अण्णासाहेब जतकर, वामन गोपाळ जोशी.

स्टॅंडिंग कौन्सिलात प्रत्येक जिल्ह्यातर्फे चार–बॅरि. रामराव देशमुख, श्री. पानसे, बापूराव दुर्गे, विठ्ठलराव शिरवाडीकर, गं. ना. हूड,

साजरा केला होता. नाट्याचे वेगवेगळ्या विषयावर श्री. शेवडे, श्री. बळवंतराव खापर्डे, श्री. वासुदेवराव भोळे, श्री. बामणगावकर, श्री. न. ल. इमामदार व श्री. ना. प्र. हिरूरकर यांची व्याख्याने करविली होती.

ह्याशिवाय श्री. ब. ग. खापर्डे, डॉ. पटवर्धन, श्री. वासुदेवराव भोळे वगैरेंची जागो जागीच्या उत्सवांत अनेक व्याख्याने झाली होती.

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेससाठी
अमरावती जिल्हा कॉ. च्या प्रतिनिधिची निवड.

वऱ्हाड प्रांतिक कॉ. कमेटीवर उमरावती जिल्ह्यातर्फे खालील सभासद निवडून आले होते.

सर्वश्री बाळकृष्ण गणेश खापर्डे, रामराव माधवराव देशमुख, त्र्यंबक लक्ष्मण शेवडे, नारायण रामलिंग बामणगावकर, गंगाधर बाळकृष्ण दुर्गे, डॉ. दत्तात्रय बळवंत सोमण, धोंडो लक्ष्मण लिमये, यशवंत गोविंद देशपांडे, नारायण प्रल्हाद हिरूरकर, कृष्णाजी बलवंत भावे, सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्री. बळवंत गणेश खापर्डे[१].

हिंदु मिशन सोसायटी : दि. १ ऑक्टोबर १९२५ रोजी खापर्डे वाड्यात निमंत्रितांची सभा भरून, मागासलेल्या जातींच्या आर्थिक, औद्योगिक, नैतिक व सामाजिक उन्नतीसाठी 'हिंदु मिशन सोसायटी' ची स्थापना करण्यात आली होती.

या संस्थेचे अध्यक्षपदी बॅरि. रामराव देशमुख, उपाध्यक्ष– श्री. बाबासाहेब खापर्डे व एस्. वाय्. पाटील; खजिनदार–श्री. रणदिवे, जनरल सेक्रेटरी– श्री. द. बा. दीक्षित हे होते. सभासदात श्री. दादासाहेब शेवडे, डॉ. भोजराज, डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. द. ब. साने, आणि इतर मागास वर्गातील लोक होते.

उमरावतीचे शारदीय नवरात्रोत्सव : उमरावतीच्या श्री अंबादेवीचे नवरात्रोत्सवाची यात्रा उर्फ शारदीय नवरात्रोत्सव यंदाही उत्तम प्रकारे पार पडला. या उत्सवात उमरावतीच्या श्रीराम व्यायाम शाळा, हनुमान व्यायाम शाळा, अंबादेवी व्यायाम शाळा, हिंदु हायस्कूल, नार्मल स्कूल,

---

१ : उदय : दि. ८ सप्टेंबर १९२५

म्यु. ए. व्ही. स्कूल नं. १ व २ व न्यू हायस्कूल या संस्थातील विद्यार्थी स्वयंसेवकांनी व म्यु. कमेटी, पोलिस आणि इतरांनी साहाय्य केले. त्याबद्दल अंबादेवी संस्थानचे सेक्रेटरींनी आभाराचे पत्रक काढले होते.

श्री. तांबे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर होतात.

स्वराज्य पक्षातर्फे पूर्व वऱ्हाड म्युनिसिपॅलिटयांचे मतदार संघातून मध्यप्रांत कायदे मंडळावर निवडून गेलेले सभासद, उमरावतीचे श्री. श्री. ब. तांबे यांनी पक्षाला न विचारता किंवा पक्षाचा राजीनामा न देता गुपचुप मध्यप्रांताच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरची (मंत्रिपदाची) जागा स्वीकारली होती. त्यामुळे सर्वांना व विशेषत: स्वराज्य पक्षाला जबरदस्त धक्का बसला होता.

स्वराज्य पक्षाचे मध्यप्रांत कायदे मंडळात बहुमत असल्यामुळे पक्षाने त्यांना कायदेमंडळाचे अध्यक्षपदी (स्पीकर) निवडूनहि दिले होते. व ते कौन्सिलचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होते. परंतु तेवढयाने त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी असा हा पक्षाचा व मतदारांचा विश्वासघात केला होता.

या घटनेने मध्यप्रांत व वऱ्हाडातीलच नव्हेतर देशाच्या इतर प्रांतातील स्वराज्य पक्षाचे लोकांना व पुढाऱ्यांना मोठाच धक्का बसला होता.

गाजलेला शिराळा खून खटला : उमरावती जिल्ह्यातील शिराळा या गावी दि. २३ सप्टेंबर १९२५ रोजी श्री. रामराव देशमुख यांचा अमानुष खून काही मुसलमानांनी केला होता. श्री. रामराव हे येथील बेंच मॅजिस्ट्रेट श्री जानरावजी बाजीरावजी देशमुख यांचे पुतणे होते. त्यामुळे या प्रकरणी जेव्हा उमरावतीचे एस्. डी. ओ. श्री. माटे यांचे कोर्टात दि. ११ ऑक्टोबर रोजी खटला सुरू झाला तेव्हा, खटला ऐकण्यासाठी तहसीलजवळ बेसुमार गर्दी होऊ लागली होती. विशेषत: या खटल्यातील आरोपी मुसलमान होते त्यामुळे मुस्लिम लोकांची गर्दी फार होत असे.

या खटल्यात सरकार तर्फेचे प्रा. इन्स्पेक्टर श्री. साठे व रावसाहेब रा. मो. खरे हे होते; तर आरोपीतर्फे श्री. सैफुद्दीनखान, खान बहादूर

अब्दुल कादर, श्री. शर्फुद्दीन व श्री. हिदायतअली ही वकील मंडळी होती. शिवाय मुंबईचे बॅरिस्टर आझाद हे होते.

'देशाचे दुष्मन' विरुद्ध गृहमंत्र्याकडे तक्रार : मध्यप्रांत कौन्सिलचे सभासद श्री. कानिटकर यांनी, श्री. दिनकरराव जवळकर या लेखकाने लिहून प्रसिद्ध केलेल्या 'देशाचे दुष्मन' या पुस्तकाविरुद्ध मध्यप्रांताचे गृहमंत्री ना. सर मोरोपंत जोशी यांचेकडे तक्रार केली होती व या लेखकाविरुद्ध कारवाई करावी असे सुचविले होते.

"देशाचे दुष्मन" या पुस्तकात ब्राम्हण जातीची भयंकर निंदानालस्ती असून जातीय विद्वेष वाढविण्याचे हे कृत्य आहे असे या तक्रारीत म्हटले होते.

डॉ. सर प्रफुल्लचंद्र रॉय उमरावतीत : कलकत्याचे जगप्रसिद्ध डॉ. सर प्रफुल्लचंद्र रॉय यांची व्याख्याने, दि. ८, ९ व १० ऑक्टोबर १९२५ रोजी येथील किंग एडवर्ड कॉलेजचे हॉलमध्ये झाली होती. रसायन शास्त्रावरील किंवा इतरही त्यांची व्याख्याने ही विषयास सोडून व पाल्हाळिक होतात अशी या व्याख्यानासंबंधी टीका होत असे. नावाजलेल्या व्यक्तीकडून श्रोत्यांचा अपेक्षाभंग झाला होता.

वर्ण-विद्वेष बिलाचे निषेधाची सभा : दि. ११ ऑक्टोबर १९२५ रोजी सायंकाळी जोग चौकात, जिल्हा काँ. कमेटी व लिबरल लीग यांचे तर्फे उमरावतीच्या नागरिकांची जाहीर सभा श्री. अण्णासाहेब देशपांडे अंजनसिंगीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती.

निषेधाचा मुख्य ठराव ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांनी मांडला व त्यावर फार विनोदपूर्ण, माहितीने भरलेले व परिणामकारक भाषण केले. भाषणात त्यांनी इ. स. १८६० पासूनचा दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या वसाहतीचा सविस्तर इतिहास सांगून भाषण संपविले होते.

ही सभा, दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांविरुद्ध, तेथे पास झालेल्या वर्ण-विद्वेष बिलाचे निषेधार्थ, ऑ. इं. काँ. कमेटीचे आदेशानुसार भरली होती.

उमरावतीत मवाळांची परिषद : दि. २५ ऑक्टोबर १९२५ रोजी उमरावतीच्या टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या हॉलमध्ये, पंडित हृदयनाथ कुंझरू

यांच्या अध्यक्षतेखाली 'वऱ्हाड मवाळ परिषदेचे' तिसरे अधिवेशन भरले होते. कार्यक्रम दोन दिवस चालू होता. मुख्य भाषण श्री. कुंझरू यांचे झाले. स्वागताध्यक्ष म्हणून श्री जानरावजी देशमुख, ऑ. मॅजिस्ट्रेट, यांनी भाषण केले.

परिषदेत एकूण तेरा ठराव मंजूर करण्यात आले होते. मुडिमन कमेटीच्या बहुसंख्यांकांच्या रिपोर्टाचा व स्टेट सेक्रेटरी आणि व्हॉईसरॉय यांच्या सुधारणा विषयींच्या भाषणांचा परिषदेने निषेध केला होता.

म्युनिसिपल कमेटीचे को-ऑप्शन : उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीच्या जनरल मिटिंगमध्ये झालेल्या को-ऑप्शनमध्ये सर्वश्री सं. वि. गोखले, ह. कृ. देशपांडे, चंदवासकर वकील आणि श्री. चिमोटे हे को-ऑप्ट करण्यात आले होते.

ना. तांबे यांच्या निषेधाची जाहीर सभा : दि. २८ ऑक्टोबर १९२५ रोजी सायंकाळी जोग चौकात दे. भ. दादासाहेब शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली, ना. तांबे यांनी मध्यप्रांत सरकारच्या कार्यकारी मंत्र्याची जागा स्वीकारल्याबद्दल त्यांचा तीव्र निषेध करण्यासाठी उमरावतीतील कौन्सिलचे मतदारांची जाहीर सभा भरली होती. हजार दीड हजार लोक उत्सुकतेने जमले होते.

सर्वश्री या. मा. काळे, साने व पंजाबराव देशमुख या तीन कायदे मंडळाच्या सभासदांच्या आणि दे. भ. वीर वामनराव जोशी यांची, हया निषेधास संमती देणाऱ्या तारा आल्या होत्या, त्या अध्यक्षांनी प्रथम वाचून दाखविल्या. या शिवाय कोर्टाचे कामासाठी परगावी जाणे जरूरीचे असल्यामुळे श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी 'हजर राहता येत नाही' असे पाठविलेले पत्रही वाचून दाखविण्यात आले.

नंतर अध्यक्षांनी प्रास्ताविक भाषण केले आणि नंतर बॅरि. रामराव देशमुख यांनी ना. तांबे यांच्या निषेधाचा ठराव मांडून भाषण केले. त्यांचे नंतर दे. भ. बामणगावकर यांचे भाषण झाले आणि अध्यक्षांचे समारोपाचे भाषणानंतर निषेधाचा ठराव टाळ्यांचे कडकडाटात सर्वानुमते पास झाला होता.

ना. दादासाहेब खापर्डे यांची कौन्सिल ऑफ् स्टेटसाठी निवड.

दि. ९ नोव्हेंबर १९२५ रोजी वऱ्हाडतर्फेच्या कौन्सिल ऑफ् स्टेटच्या निवडणुकीतील उमेदवारांचे अर्ज येथील कमिश्नर कचेरीत तपासण्यात येऊन, श्री. दादासाहेब खापर्डे यांचा एकट्याचाच या जागेसाठी अर्ज असल्यामुळे व अर्ज बिनचूक असल्याने, कौन्सिल ऑफ् स्टेटवर वऱ्हाडचे प्रतिनिधी म्हणून दादासाहेब खापर्डे यांची निवड जाहीर करण्यात आली होती.

पं. मोतीलालजी नेहरु उमरावतीत

स्वराज्य पक्षाचे एक अध्वर्यु दे. भ. पं. मोतीलालजी नेहरू हे दि. १२ नोव्हेंबर १९२५ रोजी दुपारी ४ वा. उमरावतीस आले. बॅरि. रामराव देशमुख, बाबासाहेब खापर्डे आणि दादासाहेब शेवडे हे पं. मोतीलालजींना आणण्यासाठी बडनेरा स्टेशनवर गेले होते. उमरावतीच्या रेल्वे स्टेशनवरही बरेच नागरिक, कार्यकर्ते आणि स्वयंसेवक त्यांच्या स्वागतार्थ हजर होते. गाडीतून उतरताच, पं. नेहरूंचे हारतूरे घालून स्वागत करण्यात आले व लो. टिळकांचा जयजयकार करण्यात आला. पं. मोतीलालजी नंतर बॅरि. रामराव यांचे सोबत त्यांचे बंगल्यावर गेले.

सायंकाळी साडेसहा वाजता गणेश नाटक गृहात पंडितजींचे व्याख्यान होते, पण त्यापूर्वीच नाटकगृह इतके चिक्कार भरले की, उभे राहण्यासही जागा न राहिल्याने अखेर थिएटरची दारे बंद करून घ्यावी लागली होती. तरीही बाहेर शेकडो लोक उभे होतेच. पंडितजींना शेवटी नाटकगृहाच्या मागील दाराने आत न्यावे लागले. एवढी तुफान गर्दी त्यांच्या भाषणाला झाली होती.

पं. मोतीलालजी ठीक साडे सहाला आले व सुमारे पावणे दोन तास त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी श्री. दादासाहेब शेवडे हे होते. पं. नेहरूंनी आपले भाषण हिंदीतून केले. त्यांनी स्वराज्य पक्षाचे धोरण वगैरे सांगून तांबे प्रकरणाचाही उल्लेख केला व प्रतियोगी सहकारीतेबद्दलही त्यांनी आपले भाषणातून उल्लेख केला होता.

मराठा हायस्कूल : दि. १४ नोव्हेंबर १९२५ रोजी सायंकाळी, उमरावती येथे मराठा हायस्कूलचे उद्घाटनाचा समारंभ वऱ्हाडचे कमिश्नर

मि. खान यांचे हस्ते थाटाने साजरा झाला होता. याप्रसंगी हायस्कूलच्या मुलांनी मर्दानी खेळ करून दाखविले होते.

(दि. १ जुलै १९२५ पासून श्री शिवाजी मराठा हायस्कूल हे रेल्वे स्टेशन जवळील डाक बंगल्यानजीकच्या एका इमारतीत सुरू करण्यात आले होते. सदरहू हायस्कूलमध्ये इंग्रजी पहिली पासून मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था होती. शिवाय हायस्कूलला लागूनच बोर्डिंगची सोय होती.)

उमरावती टाऊन म्यु. कमेटीच्या अध्यक्ष–उपाध्यक्षांची निवडणूक.

दि. १४ नोव्हेंबर १९२५ रोजी उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीच्या अध्यक्ष–उपाध्यक्षांची निवड करण्यासाठी म्यु. हॉलमध्ये नवनिर्वाचित सदस्यांची सभा भरली होती.

अध्यक्षपदाकरिता राष्ट्रीय पक्षाचे श्री. अण्णासाहेब कलोती व मवाळ पक्षाचे रा. ब. ब्रम्ह यांचेत अटीतटीचा सामना होऊन दोघांनाही सम समान मते पडल्यामुळे अखेर चिठ्ठ्या टाकून सिव्हिल सर्जन श्री. बारविक यांचे हस्ते चिठ्ठी उचलण्यात आली व त्यात श्री. कलोती हे निवडून आले. नंतर उपाध्यक्ष पदाची निवडणूक होऊन राष्ट्रीय पक्षाचे श्री. हिरूरकर वकील व श्री. संगाप्पा रेवाप्पा मुचलंबे हे दोघे मताधिक्याने निवडून आले होते.

उमरावतीत वीज पुरवठ्याचे कार्याला सुरूवात : उमरावती शहराला विजेचा पुरवठा करण्याचा ठेका घेतलेल्या कंपनीतर्फे सदरहू कामाच्या प्रारंभा-प्रीत्यर्थ, दि. १८ नोव्हेंबर १९२५ रोजी, म्यु. हॉलमध्ये पानसुपारीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

उमरावतीची गीता जयंति : दि. २६ नोव्हेंबर १९२५ रोजी उमरावती हिंदू सभेच्या विद्यमाने श्री गीताजयंत्युत्सव मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. ना. श्री. दादासाहेब खापर्डे, प्रो. रामनाथन् आणि प्रो. हरिकृष्ण शास्त्री यांची त्या निमित्त व्याख्याने झाली होती.

शिराळा खून खटल्याचा निकाल : न्यायाधिश मि. बार यांनी दि. २७ नोव्हेंबर १९२५ रोजी शिराळा खून खटल्याचा निकाल दिला.

त्यानुसार नऊ आरोपी निर्दोष आणि ११ आरोपीपैकी दोघांना सात वर्षे व नऊ जणांना १० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली होती.

हचा खटल्यासाठी नागपूरहून सेशन्स–ट्रायलकरिता मुद्दाम मि. बार हे न्यायाधिश पाठविण्यात आले होते व उमरावतीच्या जिल्हा कौन्सिलचे हॉलमध्ये त्यांचे कोर्ट भरविले जात असे. दि. ९ ते २७ नोव्हेंबर १९२५ पावेतो ही केस, मि. बार यांचे समोर चालून, दि. २७ नोव्हेंबर रोजी त्यांनी वरप्रमाणे निकाल दिला होता. हा खटला ऐकण्यासाठी बरीच गर्दी होत असे. त्यांत विशेषत: मुस्लिम लोक जास्त असत. कारण सर्व आरोपी मुस्लिम होते.

पुढे या प्रकरणी सरकारने नागपूरला ज्युडिशिअल कमिश्नरचे कोर्टात अपील केले व त्या अपीलाचा निकाल फेब्रुवारी १९२६ मध्ये लागून सर्व वीसही गुन्हेगारांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती.

नागपूर विश्व विद्यालय व्याख्यानमाला : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजमध्ये दि. ३ व ४ डिसेंबर १९२५ रोजी, या मालेत रा. ब. हिरालाल, माजी डे. कमिश्नर, यांची माहितीने ओतप्रोत भरलेली व्याख्याने झाली होती. "त्रिपुरीचे कलचुरी राजे अर्थात जबलपूरचे बादशहा" ह्या विषयावर त्यांचे पहिले व्याख्यान झाले. "मध्यप्रांतातील संस्कृत भाषा बोलणारे नागवंशीय राजे" या विषयावर दुसरे व्याख्यान झाले. दोन्ही व्याख्याने फारच सुश्राव्य झाली होती.

त्रिपुरीच्या कलचुरी घराण्याची इ. स. २४८ पासून तो इ. स. १३०० पावेतोची माहिती त्यांनी सांगितली होती आणि मध्यप्रांतातील नागवंशीय घराण्याची पौराणिक काळापासूनची माहिती सांगून त्या वंशातील नागार्जुन या विद्वान राजाची आणि त्याच्या पुस्तकांची भाषांतरे तत्कालिन चिनी व तिबेटियन लोकांनी कशी करून नेली, याची मजेदार माहिती त्यांनी सांगितली होती. व्याख्यानानंतर शंकांचे समाधान ते करून देत असत.

वऱ्हाड प्रांतिक प्राथमिक शिक्षक परिषद : ही परिषद उमरावती येथे दि. २४ व २५ नोव्हेंबर १९२५ रोजी, म्युनिसिपल मराठी शाळा नं. १ चे इमारतीत श्री. बाबासाहेब खापर्डे, यांचा अध्यक्षतेखाली भरली

होती. परिषदेला सर्व वऱ्हाडातून अडीच-तीनशे प्रतिनिधी आले होते. या परिषदेला श्री. ओक, भवाळकर वगैरे शिक्षणाभिमानी व श्री. कानिटकर, साने वगैरे कौन्सिलचे मेंबरही उपस्थित होते.

न्यू हायस्कूलचे प्रथम वार्षिक संमेलन : नूतन शिक्षण समाजातर्फे उमरावतीत चालविल्या जाणाऱ्या न्यू हायस्कूलचे प्रथम वार्षिक संमेलन दि. ७ दिसेंबर १९२५ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात थाटाने पार पडले होते. समारंभासाठी हॉल चांगला शृंगारण्यात आला होता. समारंभाचे मुख्य पाहुणे, मध्यप्रदेशचे माजी दिवाण रा. ब. नारायणराव केळकर हे होते.

प्रारंभी संमेलनाच्या चिटणीसांचे स्वागताचे भाषण झाले, नंतर संस्थेचे चिटणीसांनी अहवाल वाचला. न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. इनामदार यांनी प्रास्ताविक भाषण केले व शेवटी मुख्य पाहुण्यांचे भाषण होऊन हा समारंभ संपला. त्यानंतर मुलांचे खेळ व इतर कार्यक्रमही झाले होते.

वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत हिंदु सामाजिक परिषद.

दि. १२ व १३ दिसेंबर १९२५ रोजी गणेश नाटकगृहात 'वऱ्हाड व मराठी मध्यप्रांत हिंदु सामाजिक परिषदेचे पहिले अधिवेशन' बॅरि. मुकुंदराव जयकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. परिषदेचे स्वागताध्यक्ष, नागपूरचे श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोसले हे होते. त्यांचा मुक्काम सर जोश्यांकडे होता तर बॅरि. जयकर हे खापडर्‍यांचे पाहुणे होते.

दि. १२ दिसेंबर रोजी दुपारी ३ वा. परिषदेला सुरवात झाली. स्वागत मंडळाचे सदस्य, प्रतिनिधी व प्रेक्षक यांनी थिएटर गच्च भरले होते. ना. दादासाहेब खापर्डे यांनी स्वागताध्यक्ष राजे लक्ष्मणराव भोसले यांचे गळ्यात हार टाकला व नंतर राजे साहेबांनी आपल्या स्वागतपर भाषणास सुरवात केली.

त्यानंतर नियोजित अध्यक्ष बॅरि. जयकर यांचे विद्वत्तापूर्ण असे भाषण झाले. शेवटी चिटणीसांचे भाषण होऊन पहिल्या दिवशीचे कामकाज संपले.

दुसऱ्या दिवशी ठराव मांडण्यात आलेत व त्यावर सर्वश्री भीकमसिंह, पन्नालालजी व्यास, दादासाहेब शेवडे, श्री. द. रणदिवे, डॉ. मुंजे, दाजीशास्त्री चांदेकर, ताम्हनकर शास्त्री, ना. दादासाहेब खापर्डे, रा. ब. के. वा. ब्रम्ह, इत्यादी वक्त्यांची समयोचित भाषणे होऊन ठराव मंजूर करण्यात आले. परिषदेचा समारोप बॅरि. जयकर यांच्या भाषणाने झाला. श्री. बाबासाहेब खापर्डे व श्री. वासुदेवराव भोळे यांनी आभार मानल्यावर लोकमान्यांचे जयजयकारात परिषदेचे सूप वाजले होते.

ना. तांबे यांनी मंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली : दि १७ दिसेंबर १९२५ रोजी सर मोरोपंत जोशी यांच्या गृहमंत्रीपदाची मुदत संपल्यानंतर ना. श्री. ब. तांबे यांनी गृहमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली होती दुसरे मंत्री श्री. जे. टी. मार्टिन हे झाले होते. (त्यावेळी फक्त दोनच मंत्री असत.)

बॅरिस्टर जयकर यांचे व्याख्यान : दिसेंबर १९२५ रोजी गणेश नाटकगृहात डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली 'तरुणांची चळवळ' (यूथ मुव्हमेंट) या विषयावर बॅरि. जयकर यांचे इंग्रजीत व्याख्यान झाले. नाटकगृह श्रोत्यांनी भरून गेले होते.

सत्यशोधक समाज आणि ब्राम्हणेतर चळवळ

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना इ. सन १८७३ साली केली. परंतु या चळवळीचे लोण अमरावती जिल्ह्यात पोचायला १९१० साल उजाडावे लागले. इ. सन १९१० साली सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते आणि प्रभावी वक्ते श्री. कृष्णराव पांडुरंग भालेकर व श्री. भीमराव विठ्ठलराव महामुनी हे उमरावतीला आले व त्यांनीच आपल्या प्रभावी वाणीने उमरावती शहर आणि खेड्यापाड्यातून प्रचार करून येथे सत्यशोधक चळवळीचे बीज पेरले. या प्रचारामुळे सत्यशोधक चळवळीला येथे खूप अनुयायी मिळाले आणि ही चळवळ या भागात फोफावू लागली.

अशा पार्श्वभूमीवर आणि पंधरा वर्षे सतत केलेल्या कार्याचा परिणाम म्हणून, इ. सन १९२५ साली दिसेंबरमध्ये, दि. २७, २८ व २९ रोजी उमरावती शहरात अखिल भारतीय ब्राम्हणेतर काँग्रेसचे, अ. भा. सामाजिक परिषदेचे, सत्यशोधक समाज परिषदेचे, अस्पृश्यता निवारक परिषदेचे व अ. भा. ब्राम्हणेतर महिला परिषदेचे अशी एकूण पाच भव्य

अधिवेशने भरविली गेलीत. या परिषदांना आलेल्या लाखो पाहुण्यांमुळे उमरावती शहर माणसांनी नुसते फुलून गेले होते. त्यावेळी उमरावतीची लोकसंख्या सुमारे पन्नास हजाराचे आसपास होती. अशा या पन्नास हजाराच्या वस्तीत तीन दिवस जवळ जवळ दीड दोन लाख लोक पाहुणे म्हणून राहिले, त्यामुळे या काळात खाणावळीतून जेवण मिळणे मुष्कील झाले होते. अशा ह्या अती भव्य परिषदांचे आयोजन करणारी स्थानिक व बाहेरची मंडळी सुमारे दोन महिने अगोदर पासूनच उमरावतीला तळ देऊन बसली होती. त्यांत वर्ध्याचे रावबहादुर के. एस्. नायडू, श्री. काशीराव बापू देशमुख, श्री. नारायणराव अमृतकर वकील, सेक्रेटरी, श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय ढोले हे या अधिवेशनाचे खजिनदार व मोतीराव तुकारामजी वानखडे हे जॉ. सेक्रेटरी होते. श्री. शामरावजी गुंड (मोर्शी), वेदशास्त्र संपन्न आनंदस्वामी, श्री. पंढरीनाथ पाटील (चिखली), श्री. प्रधान वकील (नागपूर), श्री. गुलाबराव पाटील नायगावकर हे प्रमुख होते आणि आणखी कितीतरी नेते व कार्यकर्ते झटत होते. उमरावतीला ५० वर्षापूर्वी गाजलेल्या ह्या परिषदांचा थोडक्यात वृत्तांत पुढे दिला आहे.

अखिल भारतीय ब्राम्हणेतर काँग्रेस : हिंदुस्थानचे त्यावेळचे स्टेट सेक्रेटरी, श्री. एडवीन सॅम्युअल मॉंटेग्यू आणि त्याकाळचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड फ्रेडरिक जॉन चेम्सफर्ड या दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दि. २० ऑगष्ट १९१७ रोजी हिंदुस्थानला क्रमाक्रमाने मिळावयाच्या हिंदी स्वराज्याचा जाहिरनामा तयार केला व तो पार्लमेंटने मंजूर केल्यानंतर, इ. स. १९२० पासून त्याची अंमलबजावणी करण्यात आली.

या हक्कांचा एक परिणाम असा झाला की, संपूर्ण महाराष्ट्रात ब्राम्हण–ब्राम्हणेतर–वाद वाढीला लागला आणि ब्राम्हणेतर काँग्रेस वेगळी स्थापन करण्यात आली. उरलेल्या काँग्रेसला 'राष्ट्रीय काँग्रेस' संबोधण्यात येई.

या अखिल भारतीय ब्राम्हणेतर काँग्रेसचे दुसरे अधिवेशन अमरावती येथे इ. स. १९२५ च्या नाताळच्या सुटीत, दि. २७, २८ व २९ दिसेंबरला भरविण्यात आले होते. अधिवेशनासाठी मालटेकडी नजीकच्या (हल्ली सायन्स कोअरच्या) मैदानावर विशाल मंडप टाकण्यात आला होता. या अधिवेशनासाठी सर्व देशातून सुमारे दोन लाख लोक त्यावेळी उमरावतीला आले होते.

या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानी मद्रासचे (पानागलचे) महाराज राजा पी. रामराय निमगार हे होते आणि रावबहादूर के. एस्. नायडू (वर्धा) हे स्वागताध्यक्ष होते.

त्यानंतर त्याच मंडपात अखिल भारतीय सामाजिक परिषद, छत्रपती श्री. राजाराम महाराज, कोल्हापूर, यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

त्यावेळी सत्यशोधक समाजाचे पहिले अधिवेशनही उमरावतीला श्री. केशवराव बागडे (पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

या सोबतच 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद' त्याच ठिकाणी, त्यावेळचे मुंबई इलाख्याचे शिक्षण मंत्री श्री भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व 'अखिल भारतीय ब्राम्हणेतर महिला परिषदेचे' पहिले अधिवेशन तेथेच सौ. लक्ष्मीबाई नायडू (वर्धा) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

या परिषदांसाठी मद्रास, कोल्हापूर, कलकत्ता इत्यादी ठिकाणाहून खास ट्रेन्सने लोक आले होते. त्यामुळे उमरावती माणसांनी नुसती फुलून गेली होती. खाणावळीत जेवणासाठी बेसुमार गर्दी व्हायची.

मद्रासचे त्या काळातील पुढारी कूर्मवेंकट रेड्डी, शक्तीचे प्रयोग करणारे व आधुनिक भीम म्हणून ज्यांचा लौकिक होता ते प्रो. राममूर्ती, ए. रामस्वामी मुदलीयार अशी भारदस्त मंडळी या अधिवेशनासाठी आली होती. कोल्हापूरचे छत्रपती आले होते. हया सर्व परिषदा उमरावतीचे इतिहासात नोंदल्या जातील अशा अती भव्य झाल्या. या परिषदांना विशाल जनसमुदाय जमला होता. त्याचा परिणाम म्हणून पुढे वऱ्हाडात सामाजिक चळवळींना जोर चढला.

त्यावेळी लाऊडस्पीकर नव्हते. लक्षावधी लोकांना वक्त्याचे भाषण कळावे म्हणून, श्रोत्यांत अंतरा-अंतरावर स्टूल ठेवून त्यावर माणसे उभी ठेवली होती आणि वक्ता जे काय बोलेल ते तसेच्या तसे, स्टूलवर उभ्या असलेल्या माणसाने पलीकडच्या लोकांना सांगावे अशी व्यवस्था असे. उजेडासाठी गॅसबत्त्या होत्या. वीज त्यावेळपावेतो उमरावतीत सुरू झाली नव्हती.

या सर्व परिषदा आणि प्रचाराचा परिपाक म्हणून उमरावती जिल्हा हा सामाजिक चळवळीचा बालेकिल्ला बनला होता[१].

साप्ताहिक 'उदय'ने दिलेला वृत्तांत : सा. 'उदय' मधून या परिषदांचा वृत्तांत आलेला आहे. "अ. भा. ब्राम्हणेतर काँग्रेसचे अधिवेशन उमरावती येथे दि. २७, २८ व २९ दिसेंबर १९२५ रोजी माँहेमेडन हायस्कूलचे ग्राऊंडवर भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष मद्रास सरकारचे दिवाण, जस्टीस पक्षाचे पानागलचे राजे हे होते.

अध्यक्षपदासाठी त्यांच्या नावाची सूचना श्री. चिंधूबुवा व श्री. डोंगरसिंग पाटील यांनी केली. त्यास अनुमोदन सर के. व्ही. रेड्डी, पुण्याचे सत्यशोधक रा. गायकवाड, रा. बागडे, रा. गणेश आकाजी गवई व कोल्हापूरचे रा. बाबूराव यादव यांनी दिले. स्वागताध्यक्ष वर्ध्याचे रा ब. नायडू हे होते.

पानागलचे महाराज अध्यक्षस्थानी विराजमान झाले व त्यांनी भाषण केले, त्यांत 'या अधिवेशनाला १२००० लोक आले आहेत' असाही उल्लेख केला. या अधिवेशनात रा. रामस्वामी मुदलीयार, रा. देसाई, रा. आनंदस्वामी, खा. ब. अब्दुल रहमानखां, रा. विश्वनाथ कौशिक व उमरावतीचे रा. शरफुद्दीन वकील यांची भाषणे झाली. शरफुद्दीन यांनी काही शेरही म्हणून दाखविले. शेवटी रा. अमृतकर वकील यांनी आभाराचे भाषण केले.

तेथेच अ. भा. ब्राम्हणेतर सामाजिक परिषदेचे अधिवेशन कोल्हापूरचे छत्रपति सर राजाराम महाराज यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. रावसाहेब निंबाळकर हे स्वागताध्यक्ष होते. त्यांचे भाषण रा. काशीरावबापू देशमुख यांनी वाचून दाखविले. नागपूरचे रा. प्रधान यांचेही भाषण झाले. रा. आनंद स्वामींचेही भाषण झाले.

त्यानंतर त्याच मंडपात अ. भा. सत्यशोधक परिषद भरली. अध्यक्ष पुण्याचे श्री. बागडे व स्वागताध्यक्ष श्री. आनंदस्वामी हे होते. त्यांचे स्वागताचे भाषण श्री. पंढरी पाटील यांनी वाचून दाखविले. नंतर प्रो. राममूर्ती,

---

१ : श्री. आनंदराव लढके यांच्या आठवणी.

रा. गवई, रा. काशीरावबापू, रा. जिरगे इत्यादींची व अध्यक्ष म्हणून श्री. बागडे यांचे अशी भाषणे झाली.

फीमेल नार्मलस्कूलचे (बोर्डिंग चे) पटांगणात अ. भा. ब्राम्हणेतर महिला परिषदेचे अधिवेशन सौ. लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. ता. २९ ला सकाळी अ. भा. ब्राम्हणेतर–अस्पृश्यता निवारक परिषद ना. भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली भरली. स्वागताध्यक्ष रा. गवई हे होते.

या शिवाय सत्यशोधक जलशांचे संमेलनही तेथेच भरले होते.

या अधिवेशनासाठी सरकारी इमारती देण्यात आल्या होत्या व सर्व ब्राम्हणेतर अधिकाऱ्यांना या परिषदांस हजर राहण्याची मध्यप्रांत सरकारने परवानगी दिली होती. इतकेच नव्हे तर, ता. २७ ला अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ४ तास अगोदर येथील डे. कमिश्नर मि. आर्मिटेज व एक बडे पोलिस अधिकारी हे स्वतः ह्या तमाशा–तंबू उर्फ बुरुडी तंबूत जाऊन सहानुभूती दाखवून आलेत. (पुढे डे. क. आर्मिटेज यांचा खुलासाही 'उदय' ने छापला आहे.) शिवाय येथील युरोपीयन एज्युकेशन इन्स्पेक्टर मि. किल्रो यांचे 'एक मोठे मदतगार' म्हणून सेक्रेटरींनी उघड आभार मानले होते.

अ. भा. ब्राम्हणेतर काँग्रेस व इतर परिषदांचे काळात, पुण्याचे श्री. ग. स. नलावडे यांनी स्वतः उमरावतीस राहून आठवडाभर 'सग्राम' नावाचे दैनिक वृत्तपत्र दि. २४ दिसेंबर १९२५ पासून सुरू केले होते, व सत्यशोधकांचे स्वरूप चव्हाट्यावर मांडले होते." (या सर्व अधिवेशनांची 'उदय' ने बऱ्याच अंकातून सतत टीका केली असून उपस्थिती फक्त शेकडयांनी दर्शविली होती.)

दि. २९ डिसेंबर १९२५ च्या 'उदय' चे स्फूट : सत्यशोधक परिषद : ठरल्याप्रमाणे विविध सत्यशोधक परिषदांसाठी कोल्हापूरचे महाराज पानागलचे राजेसाहेब, ना. भास्करराव जाधव व पुण्याचे रा. बागडे, वगैरे येथे आले व सरकारकडून या परिषदासाठी मिळालेल्या इमारतीत उतरले. कोल्हापूरचे महाराज आलेले नसता, ह्या बाकीच्यांची जी मिरवणूक

काढली गेली, तिच्यात, खूप धडधड वाजणाऱ्या जुन्या भाडचाच्या मोटारी दहा-पंधरा एका मागे एक होत्या, पण, माणसे मुष्किलने चार-पांचशे होती व ती सर्व एकाच पुढल्या मोटारी भोवती घोळका करून चालली होती. गावात या परिषदेमुळे उत्साह कांहीही कोठे उत्पन्न झालेला दिसत नाही. नक्की आकडा जरी अद्यापि कळला नाही, तरी 'अखिल भारतीय' व 'काँग्रेस' असल्या भ्रामक नावासारखे प्रतिनिधीहीं बाहेरून आलेले नाहीत. 'काँग्रेस' या नावाने फसूनच येथे आलेल्या पैकी पुष्कळसे अडाणी किंवा अर्धवट शिकलेले लोक आलेले होते.

सत्यशोधकी परिषदांच्या गोंधळाच्या वेळी येथे एकच समाधानाची गोष्ट झाली आहे की, पुण्याच्या प्रसिद्ध 'संग्राम' साप्ताहिकाचे संपादक स्वत: येऊन त्यांनी तात्पुरते आठवडाभर 'संग्राम' पत्र दैनिक स्वरूपात येथे ता. २४ पासून सुरू केले आहे. हया कर्तव्यतत्परतेबद्दल व त्यांच्या येथील अविश्रांत श्रमाबद्दल आम्ही श्री. ग. म. नलावडे हयांचे आमच्यातर्फे, उमरावतीकरातर्फे व वऱ्हाडकरातर्फे मन:पूर्वक आभारही मानतो व अभिनदनही करतो. संग्राम'च्या जंगी प्रसारामुळे व अत्यत लोकप्रियतेमुळे येथे झटदिशी सर्व वातावरण पालटून गेले, सत्यशोधकांचे खरे खिस्ताळलेले स्वरूप सर्वास पूर्णपणे दिसून येऊन पुष्कळ लोकांचे अनेक भ्रम दूर झाले. 'संग्राम'चा परिणाम इतका झाला व सत्यशोधकाचे खरे स्वरूप उघडकीस आणल्यामुळे ते इतके चिडले की, अखेर त्यांनी काल सकाळी 'संग्राम' वाटणाऱ्या एका मुलास बेताने मारले.

वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेंटी : वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटीची साधारण सभा येथील खापर्डे वाडयात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरून सन १९२५-२६ चे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे निवडण्यात आले.

अध्यक्ष- श्री. माधव श्रीहरी अणे, उपाध्यक्ष- श्री. बा. ग. खापर्डे व श्री. न. शि. परांजपे, चिटणीस- श्री. ना. रा. बामणगावकर, सदस्य- सर्वश्री बा. ग. खापर्डे, त्र्यं. ल. शेवडे, श्रीराम फडनाईक, डॉ. शं. रा. नाईक, ग. ना. हुड, त्र्यं. स. बापट, रा. अ. कानीटकर, भिकमसिंग बहादूरसिंग, ज. भा. साने, शं. गो. डबीर. शिवाय पदाधिकारी हे कार्यकारिणीचे सदस्य आहेतच.

इसवी सन १९२६

'संग्राम' चे संपादकाचा सन्मान : पुण्याच्या 'संग्राम' साप्ताहिकाच्या संपादकांनी मुद्दाम उमरावतीस येऊन, सत्यशोधक परिषदेचे वेळेला एक आठवडाभर परिश्रम पूर्वक 'संग्राम' पत्र, दैनिक म्हणून उमरावतीस चालवून लोकांना सत्यशोधक समाजाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पुराव्यासह पटवून देण्याची जी कामगिरी केली होती त्याबद्दल त्यांचा उमरावतीत ठिकठिकाणी सन्मान करण्यात आला होता.

श्री अंबादेवी संस्थान, शेठ भीमराज भागीरथजी, शेठ मुरलीधर नारायणदास धान्य व्यापारी, श्री. पांडुरंग सावजी कापड व्यापारी, शिवाजी मराठा बोर्डिंग, मेंढळी, ता. मलकापूर, येथील स्वयंसेवक मंडळ, गजानन क्लब, स्वामी शिवानंद, श्री. भालेराव वगैरे संस्था व व्यक्तींनी सन्मान केला. पानसुपाऱ्या वगैरे झाल्या होत्या.

हिंदु संघटण व ब्राम्हणेतर परिषद : दिसेंबर १९२५ मध्ये उमरावतीत भरलेल्या ब्राम्हणेतर परिषदा आटोपल्यावर, हिंदु सभेचे वतीने शिवाजी मैदानावर (नेकोलेट पार्क) दि. ४ जानेवारी १९२६ रोजी सायंकाळी, येथील सुप्रसिद्ध नागरिक व ब्राम्हणेतर पुढारी श्रीमंत दादासाहेब पाटील, आसेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरविली होती. सभेला सुमारे हजार-पंधराशे लोक हजर होते. सभेचा विषय 'हिंदु-संघटण व ब्राम्हणेतर परिषद' असा होता.

सुरूवातीला स्वामी शिवानंदांनी वंदेमातरम् म्हटल्यानंतर पुण्याचे श्री. हरि मोरेश्वर जोशी यांनी सुमारे अर्धा तास उत्कृष्ट वक्तृत्वाने हिंदु संघटणेची जरूरी श्रोत्यांना पटवून दिली. नंतर येथील ब्राम्हणेतर नागरिक व कार्यकर्ते श्री. गोपाळराव देशमुख, खेडकर, यांचे अस्खलीत भाषण झाले.

तेव्हा काही श्रोत्यांनी त्यांच्या भाषणात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता परंतु ना. जाधवांचे मद्रासच्या भाषणांचा पुरावा देऊन त्यांना वक्त्यांनी गप्प केले.

शेवटी उमरावती हिंदुसभेचे उपाध्यक्ष श्री. अण्णासाहेब देशपांडे यांचे भाषणानंतर सभा संपली.

मोफत वाचनालय : उमरावतीचे मागासवर्गातील उत्साही व उत्कृष्ट कार्यकर्ते रा. ल. कृ. ओगले यांच्या खटपटीने चाललेल्या 'हिंदु मिशन बोर्डिंग' तर्फे दि. ७ जानेवारी रोजी सायंकाळी, कविभूषण ब. ग. खापर्डे यांच्या हस्ते मोफत वाचनालयाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम थाटाने पार पडला. याप्रसंगी श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. दादासाहेब शेवडे, श्री. वासुदेवराव भोळे, श्री. पु. बा. साठे, महाराष्ट्र नाटक मंडळीचे मालक श्री. दाते व कलावंत श्री. औंधकर, प्रो. फरनॅन्डीस, श्री. गोपाळराव देशमुख खेडकर वगैरे बरीच मंडळी उपस्थित होती.

को–ऑपरेटिव्ह बँकेच्या इमारतीचे उद्घाटन : उमरावती येथील, को–ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ, दि. ९ जानेवारी १९२६ रोजी सकाळी १० वा. ना. नव्हर्नर श्री बटलर यांचे हस्ते थाटाने साजरा झाला होता. ना. तांबे, सर शंकरराव चिटणीस वगैरे बरीच प्रमुख मंडळी हजर होती. याप्रसंगी उमरावती जिल्ह्यातील पत्-पेढ्यांच्या सभासदांनी ना. गव्हर्नरांना रौप्यकरंडकातून मानपत्र दिले. नंतर ना. बव्हर्नरांचे भाषण व त्यांचे हस्ते इमारतीचे औपचारिक उद्घाटन झाले व गव्हर्नरांनी लगेच नागपूरला प्रयाण केले होते.

वऱ्हाड सहकारी परिषद : दि. १० रोजी सकाळी साडे आठ वाजता 'वऱ्हाड सहकारी परिषदेच्या' द्वितीय अधिवेशनाला सर शंकरराव चिटणवीस यांच्या अध्यक्षतेखाली, सेंट्रल बँकेच्या आवारात मुद्दाम घातलेल्या मंडपात सुरुवात झाली. परिषदेचे चिणणीस श्री. रणदिवे वकील यांनी सर्वांचे स्वागत केले.

त्यानंतर विविध वक्त्यांची भाषणे, चर्चा, ठराव होऊन ही परिषद संपली. या प्रसंगी शेतकी खात्यातर्फे सुधारलेल्या शेतीच्या अवजारांचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

गडकरी–स्मृतिदिन : कै. राम गणेश गडकरी उर्फ कवि गोविंदाग्रज यांचा 'स्मृतिदिन' दि. २३ जानेवारी १९२६ रोजी गणेश नाटक गृहात, महाराष्ट्र नाटक मंडळीचे विद्यमाने व श्री. त्र्यं. सी. उर्फ अण्णासाहेब कारखानीस यांच्या अध्यक्षतेखाली फार थाटाने साजरा झाला होता.

या प्रसंगी अध्यक्षांनी प्रास्ताविक भाषणात मोठी आश्चर्यकारक अशी हकीकत सांगितली. ते म्हणाले "प्लँचेटवर माझा विश्वास पूर्वीहा नव्हता व आजही नाही, पण थोड्याच दिवसांपूर्वी, माझी निवर्तलेली दोन वर्षाची मुलगी आज प्लंचेटमधून बोलत आहे असे कळल्याने, एके दिवशी गमतीने प्लँचेटवर बसलो तो ते चालू झाल्यावर अत्यंत अनपेक्षितपणाने 'कोण आहे ?' ह्या माझ्या प्रश्नाला 'ज्ञातीबंधु' असे आश्चर्यकारक व अगदी तेथे हजर असलेल्या कोणाच्याही ध्यानी मनी सुद्धा नसलेले उत्तर आले. कोण ज्ञातीबंधु ? ह्या दुसऱ्या प्रश्नाला 'अण्णाचा (माझा) स्नेही' असे दुसरे व अनपेक्षितउत्तर आले. तेव्हा विचार करता हे गडकरी असावेत असा तर्क करून, त्याप्रमाणे विचारताच प्लँचेटमधून होकारार्थी उत्तर आले व 'माझ्या स्मारक दिनाच्या वेळी तुम्ही माझ्या नाटकाविषयी आणि कविता विषयी बोलत जा' एवढेच त्यांनी त्यावेळी मला त्या प्लँचेटमधून सांगितले. म्हणून केवळ मी आज हे अध्यक्षस्थान स्वीकारले आहे".

अध्यक्षांच्या या आश्चर्यजनक प्रास्ताविकानंतर महाराष्ट्र नाटक मंडळीतील एक नट रा. भिडे ह्यांनी गडकऱ्यांची एक विनोदी कविता वाचून दाखविली. नंतर पहिले वक्ते श्री. ना. प्र. हिरूरकर वकील ह्यांनी गडकऱ्यांचा 'आयागो' ह्या विषयावर भाषण केले. नंतर औरंगाबादचे ह. भ. प. दत्तोबोवा पद्माकर यांनीही गडकऱ्यांच्या निधन दुःखपर एक स्वकृत सुंदर कविता सुस्वरात म्हणून दाखविली. त्यानंतर नाटक मंडळीतील एक नट, रा. ग. कृ. बोडस यांनी गडकऱ्यांचा पानीपतचा 'फटका' म्हणून दाखविला. 'गडकरी कवि की नाटककार' या विषयावर प्रा. कविभूषण ब. ग. खापर्डे यांनी आपले विचार व्यक्त केले.

शेवटी श्री. दादासाहेब शेवडे यांनी सर्वांचे आभार मानून पावणेचार तास चाललेला हा कार्यक्रम संपविला.

ब्राम्हणेतर काँग्रेसवर आक्षेप : 'उमरावतीला दिसेंबर १९२५ मध्ये भरलेल्या ब्राम्हणेतर काँग्रेसने शेतकऱ्यासंबंधी एकही ठराव पास केला नाही.

जमीनधाऱ्यासंबंधी होऊ घातलेली 'वाढ व दुष्काळाने ग्रस्त झालेल्या लोकांकरिता धारा तहकूब करा इतकी साधी मागणी सुद्धा या काँग्रेसमध्ये केली गेली नाही, त्यामुळे ब्राम्हणेतर काँग्रेस ही शेतकऱ्यांच्या हिताकडे ढुंकुनही बघत नाही' असा आक्षेप जाहीरपणे घेण्यात आला होता.

कार्लेकर ग्रँड सर्कस : जानेवारी १९२६ अखेर उमरावतीला कार्लेकर ग्रँड सर्कस संभवतः प्रथमच आली होती व तिचे खेळ फार प्रेक्षणीय होत असत. चौदा सिंह, सात हत्ती वगैरे ह्या सर्कसचा एकंदर सरंजामही खूपच जंगी होता. या सर्कसमध्ये काम करणारे १० युरोपीयन्स होते. दि. ३० जानेवारीला उमरावतीतील झाडून सारे युरोपीयन लोक ही सर्कस पाहण्यासाठी आले होते. भारतात उत्तम चाललेल्या दोन तीन महाराष्ट्रीय सर्कसपैकी कार्लेकर ग्रँड सर्कस ही एक होती.

ब्राम्हणेतर परिषदेचे खजिनदार : उमरावतीत दिसेंबर १९२५ मध्ये भरलेल्या ब्राम्हणेतर परिषदेचे खजिनदार श्री. ढोले हे परिषदेसाठी जमविलेला निधी घेऊन बेपत्ता झाले होते. त्यामुळे अनेकांची बिले अडकून पडली होती. त्यामुळे माल देणारे आणि परिषदेचे कार्यकर्ते दोघेही अस्वस्थ झाले होते. श्री. काशीराव बापू, श्री. अमृतकर वकील, श्री. मोतीरामजी वानखडे व श्री. ढोले हे या परिषदांसाठी सहकार्याने काम करीत असत. परंतु ढोले कोठे आहेत ह्याचे उत्तर त्यांचे जवळ नव्हते. गावात वदंता निरनिराळ्या होत्या. पांच सहा हजार रुपये नाहीसे झाले असे बोलल्या जाई. पुढे असे उघडकीस आले की, श्री. ढोले ही रकम घेऊन इंग्लंडला गेले आहेत. हा फार मजेशीर प्रकार होता. नंतर श्री. ढोले हे बॅरिस्टर होऊन उमरावतीस आले होते.

मालटेकडीवरून 'तोफेच्या आवाजाची' म्यु. योजना.

उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीने दररोज दुपारी १२ वा. मालटेकडीवर तोफा वाजविण्याचे योजनेसाठी सालीना ५० रुपयांचा खर्च दि. १४ जानेवारी १९२३ रोजी मंजूर केला होता.

बेंच मॅजिस्ट्रेट श्री. जानराव बापू यांचेवर उमरावतीत खुनी हल्ला.

शिराळा येथे दि. २३ सप्टेंबर १९२५ रोजी ज्यांचा खून

चित्र क्र. ११७ : ब्राम्हणेतर कॉंग्रेसचे (पृष्ठ ५१६ पहा)
एक अध्वर्यू श्री काशीराव बापू देशमुख
(संपादक : सुबोध ग्रंथ माला.)

चित्र क्र. ११८ : (पृष्ठ ५२७ पहा)
डॉ. शिवाजीराव पटवर्धन
इ. सन १९२६.

चित्र क्र. ११९ : संगीत चुडामणी (पृष्ठ ५२१ पहा)
श्री नामदेवबुवा जोशी
मौलाबक्ष प्रासादिक गायन समाजाचे संस्थापक.

चित्र क्र. १२० : श्री नथ्थुबुवा उमरावतीकर (पृ. ५२९ पहा)
कै. नामदेवबुवाचे शिष्य व नागपूरच्या
नॅशनल कॉलेज ऑफ म्युझिकचे प्रिंसिपॉल.



चित्र क्र. १२१ : न्यू हायस्कूलच्या प्रयोग शाळेचे गव्हर्नरांच्या हस्ते उद्घाटन. दि. ९ सप्टेंबर १९२६ (पृष्ठ ५४१ पहा)

हार घातलेले ना. गव्हर्नर मि. बटलर व त्यांच्या शेजारी लेडी बटलर. लेडी बटलरच्या डाव्या बाजूला ना. तांबे, ना. दादासाहेब खापर्डे, श्री. इनामदार.

चित्र क्र. १२२ : (पृष्ठ ५४१ पहा)
बॅरि. पंजाबराव देशमुख
१९२६.



चित्र क्र १२३ : सिघई पन्नालाल बंसीलाल (पृष्ठ ५४३ पहा)
(पूर्ण वऱ्हाड शहरी क्षेत्रांतून निवडून आलेले
स्वराज पक्षाचे उमेदवार.)

करण्यात आला त्या रामराव देशमुखांचे चुलते व उमरावतीचे बेंच मॅजिस्ट्रेट आणि प्रमुख नागरिक श्री. जानराव बाजीराव उर्फ बापूसाहेब देशमुख हे दि. २४ जानेवारी १९२६ रोजी उमरावतीतील डॉ. भट्ट यांचे घर आणि श्री. भोळे यांचे आवार यामधील रस्त्याने चालले असता अचानक त्यांचेवर दिवसा साडेदहाचे सुमारास एका मुसलमान तरुणाने कुऱ्हाडीने खुनी हल्ला केला होता. जानराव बापूंना मानेवर व डोक्यावर कुऱ्हाडीचे दोन घाव बसले. ते संरक्षणाकरिता ओरडून शेजारील सुखाप्पा बाबूंचे मकानात घुसले तेव्हा मारेकरीही त्यांचे मागोमाग त्या घरात घुसला होता. परंतु सुखाप्पा बाबूंचे नोकराने व आरडा ओरड ऐकून तेथे आलेल्या लोकांनी मिळून मारेकऱ्यास बाहेर ढकलले व दरवाजा बंद करून घेतला.

रामराव यांचे खुनातील आरोपींना येथील सेशन्स जज्ज श्री. बार यांनी मोकळे सोडले होते. त्यावर सरकारतर्फे हायकोर्टाकडे अपील केले त्यामुळे सुटलेले आरोपींना पोलिसांनी पकडले. त्याचा बदला घेण्याचा हा प्रकार असावा असा त्यावेळी लोकांचा कयास होता.

श्री. जानरावजी यांचेवरील हल्ला करणारा आरोपी नंतर फेब्रुवारी-मध्ये स्वत: होऊन पोलिसस्टेशनमध्ये हजर झाला. त्याचे विरूद्ध पोलिसने रीतसर खटला भरला. खालच्या कोर्टातून हा खटला सेशन्स कोर्टात दाखल होऊन दि. २२ एप्रिल ते २६ एप्रिल १९२६ पावेतो चालून, गुलाम मुर्तिजा यास न्यायाधिश मि. पोलक यांनी पांच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा दिली. शिवाय शिक्षा भोगल्यानंतर चांगल्या वर्तणुकी-बद्दल तीन वर्षेपर्यंत प्रत्येकी २५० रु. च्या दोन जमानती द्याव्या असा निकाल दिला होता. या खटल्यात सरकारी वकील रा. ब. अनगळ हे होते तर आरोपीचे वकील खा. ब. अब्दुल कादर हे होते.

श्री. शिवराम पाटील अविरोध : ना. श्री. ब. तांबे यांनी गव्हर्नरच्या एक्झीक्युटिव्ह कौन्सिलरची, म्हणजे गृहमंत्री पदाची जागा पत्करल्यामुळे त्यांना आपल्या कौन्सिल सभासदत्वाचा राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे पूर्व वऱ्हाड म्युनिसिपालिटयांतर्फे पोट निवडणूक होऊन तीत उमरावतीचे श्री. शिवरामपंत पाटील हे अविरोध निवडून आले होते. त्यांचे प्रतिस्पध्यांनी आपले अर्ज वापस घेतल्यामुळे ही निवड अविरोध झाली होती.

बॅरि. रामराव देशमुखांची अविरोध निवड : दि. ६ फेब्रुवारी १९२६ रोजी उमरावतीचे कमिश्नर कचेरीत लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीच्या दोन्ही उमेदवारांच्या अर्जाची तपासणी होऊन, ते बिनचुक असल्याने मंजुर करण्यात आले. दुसरे दिवशी अर्ज वापस घेण्याचा अंतिम दिवस होता. त्या दिवशी श्री. भाऊसाहेब दुराणी वकील यांनी आपला अर्ज वापस घेतला. त्यामुळे बॅरि. रामराव हे लेजिस्टेटिव्ह कौन्सिलवर निवडून आले होते. ही निवड वऱ्हाडतर्फची होती[१].

श्री. बाबासाहेब खापर्डे यांची निवड : वऱ्हाडच्या जमीनदार मतदार संघातर्फे मध्यप्रांत कौन्सिलसाठी श्री. बाबासाहेब खापर्डे हे उभे होते. या पोट निवडणुकीत ते एकटेच उमेदवार असल्याने तेही बिनविरोध निवडून आले होते.

वॉर बाँडच्या रकमा : इ. सन १९१७ व १९१८ सालात, म्हणजे पहिल्या महायुद्धाचे काळात ज्या ज्या लोकांनी वॉर बाँड खरेदी केले होते त्याची मुदत इ. सन १९२१ व १९२३ ही होती. परंतु आश्चर्य असे की, १९२१ किंवा १९२३ मध्ये संबंधित लोकांनी आपले वॉर बाँड वटविले नाहीत आणि त्या रकमा तशाच सरकारकडे पडून होत्या. याचे मुख्य कारण म्हणजे त्याकाळी इंग्रजी सत्तेचा दरारा फार होता. 'तहसिलदार म्हणतो, मग वॉर बाँड घेणे भाग आहे' अशा सक्तीच्या खुषीने लोकांनी बाँड घेतले पण बहुसंख्य अडाणी व अशिक्षित शेतकऱ्यांना ते मुदतीत वटविता आले नाहीत. किंबहुना तो पैसा आपण सरकारला युद्धासाठी दान दिला असे समजून संबंधित बहुसंख्य लोकांनी ते वॉर बाँडही सुरक्षित ठेवले नाहीत आणि असलेच तर ते वटविण्याचे भानगडीतही ते पडले नाहीत. शेवटी मध्यप्रांत सरकारच्या फायनान्स खात्याने फेब्रुवारी १९२६ मध्ये पुन्हा जाहीर केले की, ज्या वॉर बाँडची मुदत अनुक्रमे १९२१ व १९२३ ला संपली पण ते वटविल्या गेले नाहीत, अशांनी कोणत्याही ट्रेझरीतून हे

---

१ : स्वराज्य पक्षाची सभा, दि. १० जानेवारी १९२६ रोजी यवतमाळ येथे भरून स्वराज्य पक्ष बरखास्त करण्यात आला होता. त्यामुळे त्या पक्षाच्या नावावर मध्यवर्ती असेम्ब्लीवर निवडून आलेले दे. भ. बापूजी अणे यांनी आपल्या लेजिस्टेटिव्ह असेम्ब्ली सभासदत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे त्या जागेची ही पोटनिवडणूक लागली होती.

बाँड दाखल केल्यास पैसे परत मिळतील.

पुन्हा प्लेग : फेब्रुवारी १९२६ चे दुसरे आठवड्यात किंग एडवर्ड कॉलेजच्या भागात प्लेगची लागण होऊन प्लेगने एका नोकराचे घरातील आठ माणसे म्हणजे म्हाताऱ्या खेरीज, सर्वकुटुंब एका एकी गेल्या आठवड्यात मरण पावले. गावात इतरत्र कोठेही प्लेगबद्दल तकार नव्हती.

दे. भ. तात्यासाहेब केळकर अमरावतीत : दि. ११ फेब्रुवारी १९२६ रोजी दे. भ. तात्यासाहेब केळकर हे हनुमान व्यायाम शाळेचे वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष म्हणून उमरावतीस आले होते. दुपारी चार वाजता त्यांच्या अध्यक्षतेखाली व्यायाम शाळेचा वार्षिकोत्सव थाटाने पार पडला. तात्यासाहेबांचे भाषणानंतर व्यायाम शाळेतील मुलांनी अनेक मर्दानी व मैदानी खेळ करून दाखविले.

डॉ. पटवर्धनांची अचाट शक्ती : या वार्षिकोत्सव प्रसंगी डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी आपल्या अचाट शक्तीचे प्रयोग केले होते. त्यांत त्यांनी एका हाताने चालू मोटार अडवून दाखविली होती. ते पाहून सर्व लोक आश्चर्याने थक्क झाले होते.

दे. भ. तात्यासाहेब केळकरांनी दुसरे दिवशी किंग एडवर्ड कॉलेजमध्ये व्याख्यान दिले. शिवाय काही संस्थांना भेटीही दिल्या होत्या. त्याच दिवशी ते मेलने रवाना झाले होते.

कीचक वध : श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर कृत 'कीचक वध' या पौराणिक नाटकावर तत्कालिन सरकारने इ. स. १९१० चे सुमारास बंदी घातली होती. त्यामुळे या नाटकाचे प्रयोग गेल्या दीड तपापासून बंद होते. महाराष्ट्र नाटक मंडळीने बराच प्रयत्न करून मध्यप्रांत सरकारकडून परवानगी मिळविली, पण सरकारने या नाटकाचा प्रेक्षकांचे मनावर काय परिणाम होतो हे पाहण्यासाठी एक पाच लोकांची कमेटी नेमली होती. तीत रा. ब. ब्रम्ह, रा. सा. रा. मो खरे, श्री. व्ही. एम्. खरे, ॲडिशनल सेशन्स जज्ज; श्री. जोगळेकर, सब् डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट व रा. ब. अनगळ हे होते.

सोळा वर्षानंतर बंदी उठलेल्या या नाटकाचा पहिला प्रयोग महाराष्ट्र नाटक मंडळीने दि. २६ फेब्रुवारी १९२६ रोजी उमरावतीच्या गणेश

नाटकगृहात वरील कमेटीचे उपस्थितीत करून दाखविला होता. प्रयोग अप्रतिम वठला. या नाटकाला इतकी गर्दी झाली होती की त्या खेळाची तिकिटे तीन दिवस आधीच संपून गेली होती. उमरावतीत असे पूर्वी कधीही झाले नव्हते+.

संभवत: वरील कमेटीचे अहवालामुळे एप्रील १९२६ मध्ये, अखेर मध्यप्रांत सरकारने 'कीचक वध' नाटकाला कायमची परवानगी देऊन पंधरा वर्षांचा जुना अन्याय दूर केला व मराठी वाङ्मयाला पुन्हा एका उत्तम पुस्तकाची व मराठी रंगभूमीला एका उत्तम नाटकाची जोड करून दिली होती[1].

श्री शिवजयंत्युत्सव : यावर्षी नवीन तिथी प्रमाणे, दि. २ मार्च १९२६ रोजी गणेश नाटक गृहात श्री. दादासाहेब शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली श्री शिवजयंत्युत्सव थाटाने साजरा करण्यात आला.

सुरुवातीला महाराष्ट्र नाटक मंडळीतील दोन तरूण नटांनी शिवसंभवातील श्री शिवछत्रपतींचा पाळणा सुंदर म्हणून दाखविला. त्या नंतर श्री. नारायणराव बामणगावकर ह्यांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात अनेक ऐतिहासिक प्रसंग सांगून असे दाखवून दिले की, "मराठे सरदारांचे संघटण करून, निजामशाहीच्या बळावर मोंगलास दक्षिणेत शिरू न देणे एवढेच शहाजी महाराजांचे ध्येय होते तर, प्रसंग पडेल तसे वागून व बोलून सर्व मुस्लिम सत्तेचे उच्चाटण करणे हे शिवछत्रपतींचे ध्येय होते." त्यांनी अनेक प्रकारची ऐतिहासिक माहिती फार चांगली सांगितली व शेवटी 'विशिष्ट म्हणून जी महाराष्ट्र संस्कृती आहे तिचे उत्पादक श्री शिवाजी महाराजच होत' असे सांगून त्यांनी आपले भाषण संपविले.

अध्यक्षांनी फार योग्य असा समारोप केला व छत्रपतींच्या जयजयकारात सभा संपली होती.

+ श्री. बामणगावकरांचे 'धनुर्भंग' हे नाटकही सरकारने १९१७ मध्ये बंद केले होते. त्या नाटकावरील बंदी १९२४ मध्ये उठली व त्याची बंदी उठल्यानंतरचा पहिला प्रयोग दि. २५ ऑक्टोबर १९२४ रोजी उमरावतीलाच गणेश नाटक गृहात आनंद विलास संगीत नाटक मंडळीने केला होता.

१ : उदय : दि. २७ एप्रील १९२६

उमरावतीत इन्फ्ल्यूएंझा : उमरावतीत इन्फ्ल्यूएंझाचे साथीस मार्च महिन्यात सुरूवात झाली होती.

कापूस पेरू नका : उमरावतीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'सहकारी विदर्भ' या मासिकाचे मे १९२६ चे अंकात श्री रा. मो. खरे यांनी एक लेख लिहून शेतकऱ्यांना असा सल्ला दिला होता की, "वऱ्हाडात ज्या प्रकारच्या कापसाची निपज होते, त्याप्रकारचे कापसास जगाचे बाजारात काही महत्त्व राहिलेले नाही.....म्हणून शेतकऱ्यांनी कापसाचे ऐवजी भुईमूगासारखी, ज्यास किंमत आहे अशी, इतर पिके पेरावीत. वऱ्हाडच्या शेतकऱ्यांनी वेळीच या प्रश्नांचा विचार करावा. कारण अमेरिकेने तेथील जमिनीत हरसालपेक्षा लाखो गाठी कापूस अधिक पैदा केल्या आहे."

उमरावतीचे प्रख्यात गवई

श्री. नामदेव बुवा जोशी यांचे निधन

उमरावतीचे प्रख्यात गवई श्री. नामदेवबुवा हे अवघे दोन दिवसांच्या इन्फ्लुएंझाच्या आजाराने वयाच्या ६६ व्या वर्षी दि. २५ मार्च १९२६ रोजी, येथेच त्यांच्या गायन समाजात वारले.

श्री. नामदेवबुवा हे मोर्शीचे राहणारे होते व मूळचे अत्यंत गरीब स्थितीतील असूनही केवळ गायनकलेविषयीच्या आत्यंतिक प्रेमामुळे त्यांनी अत्यंत शारीरिक कष्ट सोसून आणि अतिशय हालअपेष्टेत दिवस काढून व प्रसंगी माधुकरीही मागून नागपूर, ग्वाल्हेर व बडोदा येथे सतत १६ वर्षे एकनिष्ठपणे गाण्याचा अभ्यास केला. प्रथम त्यांच्या गरिबीमुळे कोणी शिकवीत नव्हते. तेव्हा तर त्यांनी गवयांच्या खिडकीखाली उभे राहून व त्यांचे गाणे ऐकूनच अभ्यास करावा. पुढे बडोद्याचे प्रख्यात गवई मौलाबक्षसाहेब ह्यांचे ते फार आवडते शिष्य बनले व त्यांचे त्यांनी नुसते नावच राखले नाही तर वाढविले.

श्री. नामदेवबुवांना उमरावतीत आणण्याचे श्रेय श्री. बाबासाहेब बेडेकर यांनाच द्यावे लागेल. बोलांच्या तोडीचा गवई कोठेही पाहावयास मिळणे कठीण आहे इतके त्यांचे या विषयात प्राविण्य होते. विशेषत: तानेवर मुळीच भर न देता, केवळ सुंदर स्वरावर गाणे अती बहारीचे खुलविण्याची व सामान्य माणसांच्याही डोळ्यापुढे राग मूर्तिमंत उभा

करण्याची त्यांची जी हातोटी होती ती तर केवळ अप्रतिमच होती व ह्या बाबतीत मोठमोठे त्यांच्यापुढे हार गेले असते, असे बोवांचे खरे गाणे ऐकलेला कोणीही कबूल करील.

बोवांनी येथे उमरावतीस गेली सुमारे ३०–३५ वर्षे एक गायनशाळा उत्तमपणे चालवून अनेकास गाण्याच्या स्वरूपाची कल्पना दिली व येथील प्रसिद्ध नथ्थूबोवा, गोपाळराव बेडेकर, तसेच वामनराव, बळीरामपंत, मुकुंदराव वगैरे काही चांगले शिष्यही त्यांच्या हाताखाली तयार झाले.

बोवांचे अप्रतिम गायन वारंवार, जागोजागी ऐकण्याचे प्रसंग येऊन वऱ्हाडातील लोकांस खऱ्या गाण्याच्या स्वरूपाची कल्पना येत गेली हे त्यांनी केलेले लहान सहान काम नव्हे! बोवासाहेबांचा गुण इतका अप्रतिम व इतका कष्टाने मिळविलेला असूनही त्यांची वृत्ती अत्यंत निगर्वी व निर्मत्सरी होती...सर्वांना ते नेहमी बरेच म्हणत. अल्पसंतोषीपणा हा त्यांचा आणखी एक अलौकिक गुण होय. त्यांना कधी पैशाचा मोह झालाच नाही व जन्मभर त्यांनी आपली अगदी साधी व गरिबीची राहणी कधीही सोडली नाही. गवई झोक त्यांचेजवळ काडी इतकाही नव्हता. खरी गुणी माणसे अशीच असतात.

बोवांच्या निधनाने केवळ उमरावतीचेच किंवा वऱ्हाडचेच नव्हे तर मध्यप्रांताचेही एक मोठे भूषण गेले. बोवांना एका वृद्ध भावजयी खेरीज कोणी आप्त नव्हते पण सारा गावच त्यांचा आप्त होता. इतके ते सर्वांशी चांगले वागत.

कै. नामदेवबुवांची 'मौलाबक्ष प्रासादिक गायन समाज' या नावाची गायनशाळा दहिसाथ चौकात होती. उमरावती शहरातील महान गुणी माणूस या वर्षात हरवला[१].

सिनेमा : गेले सहा महिने बंद असलेला भारत सिनेमा या मार्च महिन्यात पुन्हा सुरू झाला होता. शेठ मन्नालाल शिवनारायण यांनी येथील रामकृष्ण सिनेमा विकत घेतला असून तोही पुन्हा चालू केला होता. उमरावतीत या महिन्यात मुक्कामास असलेली भोसले सर्कस उमरावतीहून गेली.

---

१ : उदय : दि. ३० मार्च १९२६

मौलाबक्ष गायन समाज : गायन–चुडामणी कै. नामदेवबुवा यांच्या नंतर त्यांच्या मौलाबक्ष गायन समाजाचे कार्य, बुवासाहेबांच्या इच्छेप्रमाणे पुढे चालविणे हे आपले काम आहे असे कृतज्ञपणे मानून उमरावतीतील त्यांच्या शिष्य मंडळींनी हाती घेतले. त्याप्रमाणे दि. ६ एप्रिल १९२६ रोजी रात्री ९ वा. सदर गायन शाळेचा उद्घाटन समारंभ दहिसाथ मधील समाजाचे जागेत साजरा करण्यात आला होता.

हा गायन समाज चालविण्यासाठी त्याच दिवशी नागरिकांची एक सभा होऊन श्री. ब. क. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली, सर्वश्री वामन गोविंद जोशी, नथ्थुराम चुन्नीलाल, मुकुंद गणपत शंकर खंडो कोतवाल, व्यंकटराव देशमुख, विष्णुपंत गो. तांबे व बाबासाहेब बेडेकर यांचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले होते व श्री. कोतवाल यांना गायन शाळेचे शिक्षक नेमले होते.

शिवाय सर्वश्री बाबासाहेब खापर्डे, भाऊसाहेब दुराणी (अध्यक्ष), प्रिं. अण्णासाहेब ओक आणि ब. क. पोतदार यांचे एक सल्लागार मंडळही नेमण्यात आले होते.

उद्घाटनाचे दिवशी बोवांच्या प्रमुख शिष्यांनी रात्री १२ पर्यंत बोवासाहेबांच्या तसबिरीपुढे गाण्याची हजेरी लावली होती.

अंध तरूणाचे प्रयोग : श्री. वाडेगावकर, रिटायर्ड ज्युडिशियल कमिश्नर नागपूर, यांचे द्वितीय अंध चिरंजीव श्री. वामनराव उर्फ तात्यासाहेब या तरुणाने दि. ५ एप्रील १९२६ रोजी, न्यू हायस्कूलचे विद्यमाने, ब्रम्ह विद्यामंदिरात ब्रेल पद्धतीने आपल्या लेखनाचे व वाचनाचे, त्याच प्रमाणे घडयाळातून वेळ सांगण्याचे वगैरे सुंदर प्रयोग करून दाखविले होते. विशेषत: त्यांनी सायकलवर बसून दाखविले त्याचे लोकास फार आश्चर्य वाटले होते. अंध शिक्षणासाठी स्वतंत्र संस्था असण्याची जरूरी तात्यासाहेबांनी शेवटी आपल्या भाषणातून प्रतिपादन केली होती.

उमरावतीत अंध तरुणाने करून दाखविलेला अशा प्रकारचा संभवत: हा पहिलाच प्रयोग होता.

पूर्णेचे पाणी उमरावतीला देण्यासाठी ग्रामस्थांचा विरोध : उमरावती नगरपालिका आणि सरकार यांनी पूर्णा नदीवर वाल्मिकतीर्थ या ठिकाणी

बांध घालून तेथून उमरावती नगरीला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची जी योजना आंखली होती त्यात पूर्णाकाठच्या ग्रामवासियांनी विरोध प्रकट केला होता.

"पूर्णानदीचे पाणी अलीकडे फारच कमी झाले आहे. ह्या नदीत डोहही मुळीच नाहीत. अशा स्थितीत त्या नदीचे पाणी उमरावतीत पुरेल असे वाटत नाही. अलीकडे वऱ्हाडात पाणी कमी होत चालल्यामुळे पूर्णेच्या काठी जी लहान मोठी शेकडो गावे आहेत ती सर्वथैव पूर्णेच्याच पाण्यावर अवलंबून आहेत. धरणाची योजना अमलात आणली तर ह्या शेकडो खेड्यापाड्यांचा पाण्यावाचून प्राण जाणार आहे. उमरावती नगरपालिका व सरकार ही दोघेही श्रीमंत आहेत. दहा लाखाच्या ठिकाणी पधरा लाख रुपये खर्चून त्यांनी दुसरीकडून पाणी आणावे पण प्रस्तुत योजना अमलात आणून हजारो लोकांना पाण्यासाठी मारू नये. शिवाय पूर्णेच्या काठची धार्मिक तीर्थेही पाण्याच्या अभावी नाहीशी होतील." असे ग्रामवासियांचे म्हणणे होते व त्यासाठी पूर्णेच्या काठच्या ग्रामस्थांनी निषेधाचे ठराव करावेत आणि अर्ज करावेत असा सल्ला त्यांना देण्यात आला होता.

(आज उमरावतीस पूर्णा नदीच्या पाण्याचाच मुख्य पुरवठा होतो. ५१ वर्षापूर्वी या योजनेचा विरोध ग्रामस्थांनी केला होता हे या बाबतीत लक्षात घेणे जरूर आहे.)

उमरावतीला आयुर्वेद विद्यालय : वऱ्हाडातील विद्यार्थ्यांना वैद्यकीचे शिक्षणासाठी परप्रांतात जावे लागते. त्यांची ही अडचण दूर करण्याचे उद्देशाने व वैद्यकीचे संपूर्ण ज्ञान देण्यासाठी, दि. १ जुलै १९२६ रोजी 'आयुर्वेद विद्यालय' उघडण्यात आले होते. या विद्यालयातील अभ्यासक्रम ३ व ५ वर्षाचा होता विद्यार्थ्यांचे अनुभवासाठी एक मोठा धर्मार्थ आयुर्वेदिक दवाखाना व रुग्णालय, शिवाय ऑपरेशनची सोय केली गेली होती. वैद्य दे. भ. पंढरीनाथ दामोदर मुळे यांच्या प्रयत्नाने हे विद्यालय उमरावतीत सुरू झाले होते. (हल्लीच्या उमरावतीच्या आयुर्वेदिक महाविद्यालयाची ही सुरुवात होय.)

इ. स. १९२४-२५ चा वऱ्हाड : वऱ्हाडच्या महसूल खात्याचा सन १९२४-२५ चा अहवाल १९२६ च्या जुन मध्ये प्रसिद्ध झाला होता त्या प्रमाणे- १: आकोला व अमरावती येथे जिल्हा दरबार भरविण्यात

आले होते. प्रांताचे गव्हर्नर सर फ्रँक स्लॉय यांच्या प्रयाणसमयी उमरावतीला सबंध वऱ्हाडचा मिळून एक दरबार भरविण्यात आला होता. नंतर दरबारा संबंधीचे हुकुमात फेरफार करण्यात आला व योग्य प्रसंगी आणि सोयीच्या ठिकाणी शेतकी प्रदर्शने उघडून बरेच लोक जमवीत जाण्याबद्दल अधिकाऱ्यांना हुकूम दिले होते. २: वऱ्हाडातील लोक पूर्वी प्रमाणेच सरकारी अधिकाऱ्यांशी साधारणतः चांगल्या रीतीने वागतात. (अ) लोकांतील जाती विषयक (Class Consciousness) व (ब) मतदानाविषयी आवड ह्या बद्दल मागचे वर्षी लिहिले होते. ब्राम्हणेतर चळवळ व हिंदु–मुसलमानातील विरोध ही पहिल्याचे निदर्शक असून, लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी दाखविलेला उत्साह हे दुसऱ्याचे निदर्शक आहे.

३: वऱ्हाडात एकूण २१ ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत. पैकी १० उमरावती जिल्ह्यात, ५ आकोला, १ बुलढाणा व ५ यवतमाळ जिल्ह्यात आहेत. याशिवाय ग्रामपंचायती स्थापन करण्यासाठी परवानगी मागणारे अर्ज उमरावती जिल्ह्यातून पांच व बुलढाणा जिल्ह्यातून दहा आले आहेत आणि त्यांची चौकशी होत आहे.

हा अहवाल वऱ्हाडचे कमिश्नर मि. एफ. सी. टर्नर, आय्. सी. एस्. यांनी प्रसिद्ध केला होता. वऱ्हाडच्या कमिश्नरीची मुख्य कचेरी उमरावतीला होती.

टेलीफोनसाठी कमिशन : आकोला व उमरावती येथे, आपल्या घरी टेलिफोन घेणारी गिऱ्हाईके मिळवून देणाराला प्रांतिक सरकारकडून पांच टक्के कमिशन देण्याचे जाहीर करण्यात आले होते. (१९२६ सालात टेलिफोन संबंधी ही परिस्थिती होती.)

ख्रिस्ती धर्म प्रचाराचा मासला : हेल्थ अॅन्ड लाँगेव्हिटी (आरोग्य व दीर्घायुष्य) ह्या नावाचे पुस्तक विकणारे, एक ख्रिश्चन गृहस्थ उमरावतीस आले आहेत. ह्या पुस्तकाचे नाव जरी इतके साळसुदपणाचे आहे व उघडता क्षणीच त्यांत प्रारंभी शरीरावयवांची चित्रे दिली आहेत, तरी हे पुस्तक मूलतः ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी लिहिले असून, त्या धर्मासंबंधी त्यात एक स्वतंत्र भागही छापलेला आहे. इतरत्रही बायबल व येशू ह्यांचा सर्वत्र सारखा हवाला दिलेला आहे.

हया पुस्तकासंबंधी नागपूरच्या वर्तमान पत्रातून पूर्वी सूचना दिली गेली आहे पण आता हे गृहस्थ वऱ्हाडात घुसले असल्यामुळे इकडील लोकांस त्यांच्या विषयी धोक्याची सूचना देऊन ठेवणे अत्यावश्यक झाले आहे.

हे पुस्तक ख्रिस्ती धर्म प्रचाराचे असल्यामुळे कोणीही विकत घेऊ नये. वैद्यकीय विषयाच्या नावाखाली ख्रिस्ती-धर्म-प्रसाराचे काम करण्या पर्यंत मिशनऱ्यांच्या लबाडीची मर्यादा आता जाऊन पोचली आहे[१].

किंग एडवर्ड कॉलेज : हया कॉलेजच्या इंटरच्या वाङ्मय शाखेच्या परीक्षेत यंदा ६४ पैकी ४५ जण नापास झाले. हया पंचेचाळीसापैकी ३८ जण इंग्रजीत व २४ जण इतिहासात नापास झाले आहेत.

त्याच परीक्षेच्या शास्त्रीय विभागात ३६ पैकी २० जण नापास झाले आहेत. १८ जण इंग्रजीत नापास झाले आहेत. फिजिक्स व केमिस्ट्री हया विषयात अनुक्रमे २ व ७ च मुले नापास झाली.

बी. ए. च्या परीक्षेत १४ पैकी जी १२ मुले नापास झाली त्यांतील ८ जण इंग्रजीत नापास झाले आहेत. इंटर व बी. ए. हया दोन्ही वर्गांना इंग्रजी विषयांचा महत्त्वाचा भाग सुप्रसिद्ध मि. टॉस्ट्वीनसाहेब शिकवितात.

नुकतेच परीक्षावरील शेरे प्रसिद्ध झाले आहेत त्यांत बी. ए. च्या वर्गातीलच मुले बिन अक्कल होती असे म्हटले आहे. मि. टॉस्ट्वीन यांचा माथा उजळ झाला. पण थत्ते आणि सुरे हयांना त्यांच्या कामाचे योग्य ते श्रेय दिल्यास शिक्षण खात्यावर मोठी आपत्ती ओढवेल म्हणून की काय? परीक्षावरील शेऱ्यात असे लिहिले आहे की, विद्यार्थ्यांच्या अगात हे दोन्ही विषय समजून घेण्याची पात्रता होती[१].

उमरावतीच्या डेप्युटी कमिश्नरना अपघात व मृत्यू : नागपूरच्या गोळीबारामुळे प्रसिद्धीस आलेले, उमरावतीचे डेप्युटी कमिश्नर मि. आर्मिटेज हे, ७ जुन १९२६ रोजी चिखलदरा येथे घोडयावरून पडून अपघात झाला. पाच दिवसपर्यंत ते बेशुद्ध होते. त्यातच त्यांना अर्धांगवायुचा झटका आला होता. शेवटी ता. २४ जुन १९२६ रोजी मि. आर्मिटेज यांचा अंत झाला.

---

१ : उदय, दि. १५ व २५ जुन १९२६ स्फूट.

श्री शिवराज्यारोहणोत्सव : प्रताप जयंती : दि. २३ जुन १९२६ रोजी जोग चौकात श्री शिवराज्यारोहणोत्सवानिमित्त व महाराणा प्रताप यांच्या जयंतीप्रीत्यर्थ श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. सभेत सर्वश्री गोपाळराव बाजीराव देशमुख, खेडकर व श्री. ब. ग. खापर्डे यांची भाषणे व अध्यक्षांचे समारोपाचे समयोचित भाषण झाले. डॉ. पटवर्धन यांनी आभार मानले.

प्रतिसहकारिता : दि. २५ जून १९२६ रोजी, दे. भ. माधवरावजी अणे यांचे, येथील भारत सिनेमाच्या 'पिक्चर पॅलेस' थिएटरात, सायंकाळी बॅरि. रामरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रतियोगी सहकारिता' या विषयावर जाहीर भाषण झाले. सभेला खूप गर्दी होती. "मधल्या चार पाच वर्षांत ज्या राजकारणाचा आपल्यापैकी बहुतेकांना विसर पडला होता, त्या राजकारणाची बापूजी आज आपणाला आठवण करून देणार आहेत" असे अध्यक्षांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर दे. भ. बापूजी अणे ह्यांनी आपल्या भाषणास सुरूवात केली. "शेवटी मला तुम्हाला हेच सांगायचे आहे की, आमचा प्रतियोगी सहकारिता पक्ष हा लोकमान्यांचे राजकारण पुनरुज्जीवित करणारा व गेल्या पाच वर्षांचा सर्व अनुभव विचारात घेऊन बनलेला पक्ष आहे व म्हणून तुम्ही येत्या कौन्सिलच्या निवडणुकीत याच पक्षाला निवडून दिले पाहिजे." वक्त्यांनी याच मुद्याचा विस्तार करून सुमारे दीड तास भाषण दिले. शेवटी अध्यक्षांनी समारोप केल्यानंतर लो. टिळकांचे जयजयकारात सभा संपली.

तडजोडीसाठी बोलणी : प्रतिसहकार पक्षाच्या यवतमाळला भरलेल्या सभेत, सर मोरोपंत जोशी यांच्या पत्राचा विचार होऊन ठरल्याप्रमाणे दि. १५ जुलै १९२६ रोजी उमरावती येथे सर मोरोपंत यांची भेट प्र. स. पक्षाचे दे. भ. मा. श्री. अणे, बॅरि. रामराव देशमुख, श्री. बाबासाहेब खापर्डे इत्यादी पुढाऱ्यांनी घेतली होती.

बरेच बोलणे झाल्यानंतर प्र. स. पक्षाचे आणि मवाळांचे एकत्र जमणे शक्य नाही व म्हणून निवडणुकीत हे पक्ष संगनमताने काम करू शकणार नाहीत असा निष्कर्ष निघाला पण मवाळांकडून मात्र 'तडजोड होणार' असा प्रचार होत होता.

टिळक सप्ताह : साऱ्याबादप्रमाणे या वर्षीही लो. टिळक सप्ताह भारत सिनेमाचे पिक्चर पॅलेस थिएटरात थाटाने साजरा करण्यात आला.

या सप्ताहात सर्वश्री. बाबासाहेब खापर्डे, डॉ. पटवर्धन, श्री. ना. रा. बामणगावकर, ब. ग. खापर्डे, य. गो. उर्फ अण्णासाहेब देशपांडे, अंजनसिंगीकर, दे. भ. बापूजी अणे इत्यादी वक्त्यांची वेगवेगळ्या विषयावर भाषणे झाली होती.

स्त्रियांचा टिळकोत्सव : ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांचा टिळकोत्सव साजरा झाला होता. या उत्सवात स्त्री समाजासमोर ना. दादासाहेब खापर्डे, श्री. ब. ग. खापर्डे, संपादक 'उदय' व डॉ. शि. ग. पटवर्धन यांची व्याख्याने व श्री. गुर्जर यांचे कीर्तन झाले होते.

विदर्भ साहित्य संघाची व्याख्यानमाला : वि. सा. संघाच्या व्याख्यानमालेत दि. १८ जुलै १९२६ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात उमरावतीचे प्रसिद्ध कादंबरीकार व लेखक आणि हिंदु हायस्कूलचे शिक्षक श्री. बाळकृष्ण संतुराम गडकरी यांचे, 'काव्य' या विषयावर, श्री. नानासाहेब रहाळकर, रिटायर्ड सबजज्ज, यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. 'भावनापूर्ण असून राष्ट्राच्या जीवनावर परिणाम करील ते उत्तम काव्य' असे व्याख्यात्यांनी तासभराच्या व्याख्यानानंतर सांगितले होते.

अध्यक्षांनी समयोचित समारोप केला व ब. ग. खापर्डे यांनी वि. सा. संघातर्फे आभार मानले होते.

वीरशैव प्राज्ञपाठशाळा : दि. ४ ऑगस्ट १९२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता श्री रामेश्वर मंदिराचे जागेत ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते 'श्री गुरु शिवायनमः' यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ स्थापन झालेल्या वीरशैव प्राज्ञपाठशाळेच्या इमारतीचा अनावरण समारंभ झाला.

या समारंभाला वीरशैव समाजातील उमरावती शहरातील सर्व गुरु-स्वामी व प्रमुख लोक हजर होते. त्याशिवाय स्वामी शिवानंद, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. दत्तोपंत कलोती, वगैरे प्रमुख मंडळीही समारंभाला आली होती.

दे. भ. बामणगावकर यांनी प्रास्ताविकात सर्व माहिती सांगितली. त्यांत 'इ. स. १९११ साली बसवेश्वर जयंती, ना. दादासाहेबांच्याच

अध्यक्षतेखाली जाहीरपणे केली होती; तेव्हापासून हिंदुस्थानात या जयंतीचा प्रसार वीरशैवात होऊ लागला. बसवेश्वर-जयंती सुरू करण्याचा पहिला मान उमरावतीलाच आहे. बसवेश्वराचे तसबिरीचा प्रसारही उमरावतीनेच केला' ही माहितीही सांगितली होती.

नंतर दादासाहेबांनी अनावरण करताना भाषण केले. त्यात 'माझा व वीरशैव समाजातील प्रमुख पुढाऱ्यांचा घरोबा १८७४ सालापासून आहे. त्यामुळे या धर्मासंबंधाने माहिती झाली व त्यांचे महत्त्वाचे काही धर्मग्रंथही पाहण्यात आले' असे सांगितले होते.

अनावरण विधीनंतर हारतुरे व पानसुपारी होऊन, श्री. रोडाप्पा शंकरआप्पा कोरे यांनी या पाठशाळेच्या इमारती व पाच हजाराची वर्गणी दिली त्याबद्दल ना. दादासाहेबांनी श्री. रोडाप्पा यांचे गळ्यात हार टाकून त्यांच्या सत्कार केला होता.

बंगाल सरकारच्या निषेधाची सभा : पं. मदनमोहन मालवीय यांचा कलकत्त्याला काही कार्यक्रम ठरलेला होता. त्यासाठी ते रेल्वेने कलकत्त्यास निघाले. तेव्हा बंगाल सरकारने रेल्वेतच त्यांचेवर नोटीस बजावून बंगालमध्ये त्यांना येण्याची मनाई केली होती. परंतु पंडितजींनी बंगाल सरकारच्या हुकुमाकडे दुर्लक्ष करून ते कलकत्त्यास पोचले. तो पावेतो पं. मदनमोहन मालवीय यांचेवर बंगाल सरकारने बजावलेल्या नोटिसीबद्दलची माहिती वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली होती. ती वाचून नागपूरचे डॉ. मुंजे हे तडक कलकत्त्यास गेले.

पं. मदनमोहन मालवीय यांचा ठरलेला कार्यक्रम पार पडला. डॉ. मुंजे त्यास उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर हे दोन्ही नेते आपापल्या गावी परतले. त्यानंतर बंगाल सरकारने वरील दोन्ही नेत्यावर खटले भरून त्याच्या नोटिसा दोघांनाही त्यांचे गावी बजावल्या होत्या.

वरील प्रकरणी बंगाल सरकारचा निषेध आणि वरील दोन्ही नेत्यांचे धैर्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी उमरावतीची हिंदु महासभा, प्रतिसहकारपक्ष आणि प्रां. काँ. कमेटी यांचे विद्यमाने, दि. १० ऑगस्ट, १९२६ रोजी, सायंकाळी सहा वाजता भारत सिनेमाचे थिएटरात उमरावतीच्या नागरिकांची जाहीर सभा, श्री. अण्णासाहेब देशपांडे अंजनसिंगीकर यांचे अध्यक्षतेखाली भरली होती.

या सभेत सर्वश्री बाबासाहेब खापर्डे, डॉ. सोमण व श्री. बामणगावकर यांची भाषणे होऊन बंगाल सरकारचे निषेधाचा आणि पं. मदनमोहन मालवीय व डॉ. मुंजे यांचे अभिनंदनाचा ठराव मंजूर झाला.

सभेचे दिवशी सारखा पाऊस सुरू होता तरीही सभेला उपस्थिती चांगली होती. शेवटी अध्यक्षांनी थोडक्यात समारोप केला व सभा समाप्त झाली.

उमरावतीचे परकोट–बुरूज प्रकरण : उमरावतीच्या परकोटाचे, भुसारी दरवाज्याच्या दोन्ही बाजूंचे दोन बुरूज पाडण्याचे काम, दि. १४ ऑगस्ट १९२६ चे आसपास म्यु. तर्फे एकाएकी सुरू करण्यात आले होते. त्याविषयी येथील नागरिकांनी निषेध व्यक्त करण्याकरिता दि. १५ ऑगस्ट १९२६ रोजी सायंकाळी, गणेश नाट्यगृहात शेठ धरमचंद राणीवाले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेऊन, हे बुरूज न पाडण्याचा ठराव शेठ श्रीकृष्णजी लढ्ढा वकील यांनी वाचून दाखविला. श्री. केशवराव शालीग्राम यांचे त्यावर भाषण झाले व श्री. संगाप्पा मुचळंबे यांनी त्यास दुजोरा दिल्यानंतर ठराव सर्वानुमते मंजूर झाला होता.

म्यु. पोट निवडणूक : दि. १६ ऑगस्ट १९२६ रोजी झालेल्या म्यु. च्या पोट निवडणुकीत चौघे उमेदवार उभे होते पण तिघास अंदाजे फक्त २ ते ६ इतकीच मते पडून बाकीची सर्व मते डॉ. शि. ग. पटवर्धन ह्यांसच पडली. अर्थात ते निवडून येतील असे लोकमत होते.

बुरूज प्रकरण : दि. १५ ऑगस्ट १९२६ रोजी भुसारी गेटच्या बाजूंचे बुरूज म्यु. कडून पाडण्याचे कामाला विरोध करण्यासाठी नागरिकांची सभा होऊन तसा ठराव केला गेला होता, पण त्यानंतर काही म्यु. मेंबर्सनी हे प्रकरण आपल्या इभ्रतीचे केल्यामुळे पुन्हा नागरिकांची दुसरी जाहीर सभा खुद्द त्या बुरुजासमोर भुसारी गेटवर, दि. २५ ऑगस्ट १९२६ रोजी रात्री ९ वाजता, श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेत उमरावतीचे वृद्ध संन्यासी व राष्ट्रीय कार्यकर्ते स्वामी शिवानंद यांनी ठराव मांडला व परकोट किंवा बुरूज पाडण्याचे कल्पनेचा विरोध करून त्याबाबतचे विचार त्यांनी व्यक्त केले. त्यानंतर श्री. चंदवासकर वकील, म्यु. सभासद यांनी त्या ठरावाला भाषण करून,

अनुमोदन दिले. नंतर डॉ. शिवाजीराव पटवर्धन, श्री. केशवराव शालीग्राम, व श्री. द्वारकादासजी यांची भाषणे झाली.

नंतर दुसरा एक ठराव श्री. बामणगावकरांनी मांडला. त्यात 'बुरूज पाडला तो दुरुस्त– जसाच्या तसा– केला जावा आणि नगरपालिकेने लोकक्षोभास पात्र ठरू नये' अशा आशयाचा इशारा दिलेला होता. त्यास श्री. महंमदसाहेब यांनी अनुमोदन दिले व दोन्ही ठराव टाळ्यांच्या गजरात मंजूर झालेत.

शेवटी अध्यक्षांचे समारोपाचे भाषण होऊन ही प्रचंड सभा संपली. उमरावतीत ऐन रस्त्यावर झालेली ही पहिलीच सभा असावी. सभेला सुमारे चार हजार लोक जमले होते.

वरील, नागरिकांच्या जाहीर सभानंतर म्यु. कमेटीची बैठक भरुन, बुरुज पाडण्याचे काम दोन महिने तहकूब ठेवून लोकांना या योजनेची माहिती नकाशासह देण्याचे ठरविण्यात आले होते.

मातृदिनोत्सव : सालाबादप्रमाणे अमरावतीच्या नॉर्मल स्कूलमध्ये मातृदिनाचा समारंभ श्री बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ४ सप्टेंबर १९२६ रोजी साजरा करण्यात आला होता.

'हिंदभूमि ही जननी अमुची' हे पद झाल्यावर श्री. अण्णासाहेब ओक, प्रिंसिपॉल, यांनी मातृका पूजनावरून मातृदेवतेची भावना आपल्या धर्मात आणखी कोणकोणत्या ठिकाणी करण्यास सांगितले आहे ते सांगितले. अध्यक्षांनी आपल्या समयोचित भाषणात माता आणि मातृभूमी यांचे ऋणाचा निर्देश केला. शेवटी 'वदे त्वां भूदेवीं आर्यमातरम्' हे पद होऊन हार-तुरे झाल्यावर समारंभ संपला.

उमरावतीचा गणेशोत्सव : १ : विद्यार्थी मंडळ गणेशोत्सव (जागा– अनसूया भवन, अंबा पेठ) वक्तृत्वोत्तेजक समारंभ (१) प्राथमिक मराठी शाळा :– नेहमीच्या व्यवहारातील, परंतु आयत्यावेळी पाहून त्यांची नावे स्मरणशक्तीने सांगणे. (बक्षीसे पहिल्या तिघांना देण्यात येतील) (२) ए. व्ही. स्कूलकरिता :– भेंडच्या प्रत्येक शाळेतून ११ विद्यार्थ्यांचे एक पथक घेऊन दुसऱ्या शाळेच्या पथकाबरोबर त्याचा सामना होईल. विजयी पथकाच्या शाळेला एक रौप्य पदक देण्यात येईल. (३) हायस्कूल व नार्मलस्कूल

(अ) प्रत्येक शाळेतून एक पथक ११ विद्यार्थ्यांचे घेऊन दुसऱ्या शाळेच्या पथकाबरोबर त्याचा सामना होईल. विजयी पथकाचे शाळेला १ रौप्य पदक देण्यात येईल. (आ) आयत्यावेळी दिलेल्या विषयावर भाषण करणे. (इ) आयत्यावेळी दिलेल्या विषयावर निबंध लिहिणे. (ई) वि. मं. उत्सवात होणाऱ्या व्याख्यानाचा सारांश व उत्सवाच्या कार्यक्रमाची इत्थंभूत माहिती फुलस्केप साईजच्या कागदावर दर तिसऱ्या दिवशी या प्रमाणे ३ वेळा कार्यक्रम सपेपर्यंत लिहून काढावी.

२ : प्रियबंधु समाज, दहावा गणेशोत्सव: ब्रम्हविद्या मंदिर. सालाबाद प्रमाणे वक्तृत्वोत्तेजक समारंभही होईल. यंदा विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांच्यासाठी सशास्त्र नमस्काराचे सामनेही ठेविले आहेत. वक्तृत्व समारंभाचे विषय पुढील प्रमाणे आहेत :–

(१) मराठी शाळा – मुलांसाठी, साभिनय पाठ म्हणण्यास मनाचे श्लोक १ ते १३ किंवा भीमरूपी स्तोत्र. मुलींसाठी तेच श्लोक किंवा तुळशीची आरती (२) ए. व्हि. स्कूल, टेक्निकल स्कूल व नार्मल स्कूल–मुलासाठी, रामरक्षा स्तोत्र किंवा अनंत फंदीचा (बिकट वाट वहिवाट) हा फटका: मुलींसाठी शिवस्तुती किंवा मंगळागौरीची आरती किंवा 'असार जीवित केवळ माया' हा फटका (३) हायस्कूल विद्यार्थ्यांसाठी, दासबोध ११ वे दशक, ३ रा समास किंवा गीता, अध्याय ३ रा, श्लोक १ ते ३२ : विद्यार्थिनीसाठी सासरची पाठवणी किंवा 'घनःश्याम सुंदरा' ही भूपाळी (४) कॉलेज–सर्वासाठी 'विद्यार्थी वर्ग व राष्ट्र' ह्या विषयावर निबंध. भाग घेऊ इच्छिणारांनी आपली नावे आगाऊ कळवावीत.

३ : बालोत्तेजक समाज, बुधवारा – सालाबादप्रमाणे गणेशोत्सवात वक्तृत्वोत्तेजक समारंभ होईल. त्यात सर्व लहान मोठ्या विद्यार्थ्यांस भाग घेता येण्याची व्यवस्था केली आहे. तसेच ए. व्ही. स्कूल, नॉ. स्कूल, व हायस्कूल मधील विद्यार्थिनी व साऱ्या वऱ्हाडातील हा. स्कूल व नॉ. स्कूल यामधील विद्यार्थी यांच्या करिता निबंध ठेवण्यात आले आहेत. परीक्षक मंडळ : श्री. एन्. एल्. इनामदार एम्. ए; श्री. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, सं. उदय, डॉ. कु. सु. जावळे एल्. एम्. ॲन्ड एस्. एल्. एम्. (रोटंडा), श्री. एन्. बी. जवादिवार एम्. ए. व श्री देवगावकर बी. ए.

निबंध व वक्त्यांनी आपली नावे ता. १५ चे आत पाठवावीत. (तत्कालिन गणेशोत्सवातील कार्यक्रम कसे व कोणत्या उद्देशाने आखले जात होते हे कळावे म्हणून वरील तीन नमुने दिले आहेत.)

न्यू हायस्कूलच्या प्रयोग शाळेचे उद्घाटन : दि. ९ सप्टेंबर १९२६ रोजी जोग चौकातील न्यू हायस्कूलच्या प्रयोग शाळेचे उद्घाटन मध्यप्रांताचे गव्हर्नर श्री. बटलर यांच्या हस्ते थाटाने पार पडले. त्याप्रसंगी धामकचे शेठ केसरीमलजी यांनी संस्थेला रु. एक हजार आणि श्री. ना. ब. देशपांडे यांनी रु. पांचशे देणगी दिली होती.

बॅरि. पंजाबराव देशमुख यांना पानसुपारी : दि. १३ सप्टेंबर १९२६ रोजी, श्री. पंजाबराव शामराव देशमुख एम्. ए., बार-ॲट-लॉ यांना, श्री शिवाजी बोर्डिंगमध्ये पानसुपारी झाली. याप्रसंगी अध्यक्षस्थान बॅरि. रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांनी मंडित केले होते. या समारंभाला लोक समुदाय बराच जमला होता.

लेजिस्टेटिव्ह असेम्ब्ली व प्रांतिक कौन्सिलच्या सार्वत्रिक निवडणुका १९२६.

इ. स. १९२६ च्या दिल्लीची लेजिस्टेटिव्ह असेम्ब्ली व प्रांताच्या कौन्सिलच्या सार्वत्रिक त्रैवार्षिक निवडणुकी जाहीर झाल्या. त्यामुळे पक्षोपपक्षांची हालचाल सुरू झाली. त्या काळात वऱ्हाडात प्रमुख पक्ष दोनच. एक स्वराज्यपक्ष व दुसरा प्रतिसहकारवादी पक्ष. दोन्हीही काँग्रेस अंतर्गत काम करणारे. निवडणुकीसाठी या दोन्ही पक्षांनी आपआपले उमेदवार जाहीर करून प्रचार सुरू केला. मतदान नोव्हेंबरच्या ९ ते १३ तारखांचे दरम्यान होणार होते. सप्टेंबरपासून ह्या दृष्टीने तयारी सुरू झाली व ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यात उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार, तत्कालिन मतदार संघाप्रमाणे उमरावतीतील उमेदवार खालीलप्रमाणे होते–

प्रांतिक कौन्सिलसाठी–

१ (अ) सेठ पन्नालालजी सिंघई (स्वराज्य पक्ष) पूर्व वऱ्हाड, शहर विभाग.

(ब) श्री. यशवंतराव गोविंद उर्फ अण्णासाहेब देशपांडे, अंजनसिंगीकर (प्रतिसहकार पक्ष) पूर्व वऱ्हाड : शहर विभाग.

२ (अ) श्री. बाळकृष्ण गणेश उर्फ बाबासाहेब खापर्डे (प्रतिसहकार पक्ष) वऱ्हाड जमीनदार मतदार संघ.

(ब) सेठ राधाकिसनजी तोष्णीवाल (आकोला)

३ (अ) बॅरि. रामराव माधवराव उर्फ अण्णासाहेब देशमुख (प्रतिसहकार पक्ष) उमरावती तालुका (खेडे विभाग)

(ब) श्री. देवराव रंभाजी देशमुख (स्वतंत्र) उमरावती तालुका.

लेजिस्टेटिव्ह असेम्बलीसाठी संपूर्ण वऱ्हाडतर्फे एक जागा होती व त्यासाठी प्रतिसहकार पक्षाने दे. भ. माधवराव उर्फ बापूजी अणे यांना उभे केले होते.

नंतर प्रचाराचा धूम धडाका सुरू झाला. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यातच स्वराज्य पक्षातर्फे सेठ पन्नालालजी सिंघई यांना पाठिंबा देण्यासाठी बॅरि मोरोपंत अभ्यंकर (नागपूर) यांना बोलावण्यात आले व जाहीर सभा घेण्यात आली होती.

नंतर दुसरी स्वराज्य पक्षाची सभा जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली होऊन तीत श्री. अण्णासाहेब कलोती वकील यांचे भाषण झाले.

तिसऱ्या सभेत स्वराज्य पक्षाचे वीर वामनराव जोशी हे अध्यक्ष आणि मवाळ पक्षाचे सर मोरोपंत जोशी हे मुख्य वक्ते होते. याबद्दल सर्वांनाच आश्चर्य वाटू लागले.

या विरुद्ध प्रतिसहकार पक्षानेही सभांचा धडाका लावला आणि टीकेचा भडीमार चालू केला. मवाळ आणि स्वराज्यपक्षाचे पुढारी हे एकत्र कसे ? कारण मवाळ हे सरकार पक्षीय समजले जात असत.

दि. १८, १९ व २० ऑक्टोबरला दररोज प्रतिसहकार पक्षाने सभा घेऊन उमरावतीला वेगवेगळ्या वक्त्यांची भाषणे घडवून आणली.

श्री. बापूजी अणे ह्यांनी शेवटचे भाषण केले. आरोप प्रत्यारोप आणि 'उदय' व 'स्वतंत्र हिंदुस्तान' मधून प्रचार हा सतत चालू होता. शेवटी मतदान होऊन या निवडणुकीचे निकाल उमरावती येथेच कमिश्नर कचेरीत लागले. त्यानुसार–

पूर्व वऱ्हाड शहरी क्षेत्रातून (म्हणजे अमरावती, यवतमाळ वगैरे म्यु. क्षेत्रातून) स्वराज्य पक्षाचे शेठ पन्नालाल सिंघई हे, प्रतिसहकार पक्षाचे श्री. अण्णासाहेब देशपांडे यांचा ३५५ मतांनी पराभव करून निवडून आले होते. श्री. सिंघई यांना १६८० व श्री. देशपांडे यांना १३२५ मते मिळाली होती. उमरावती तालुक्यातून प्रतिसहकार पक्षाचे बॅरि. रामराव देशमुख हे आपले प्रतिस्पर्धी श्री. देवराव रंभाजी (स्वतंत्र) यांचा ६१५ मतांनी पराभव करून निवडून आले. बॅरि. रामराव यांना १०२५ व श्री. देवरावजी यांना ४१० मते मिळाली होती. वऱ्हाड जमीनदार मतदार संघातून प्र. स. पक्षाचेच श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी ५८ मतांनी श्री. तोष्णीवाल यांचा पराभव केला. श्री. खापर्डे यांना २३१ तर श्री. तोष्णीवाल (आकोला) यांना १७३ मते मिळाली होती. पूर्व वऱ्हाड मुस्लिम राखीव खेडे विभाग जागेवर श्री. महंमद शर्फुद्दीन हे स्वतंत्र उमेदवार, इतर तिघांचा पराभव करून निवडून आले होते आणि लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीचे प्र. स. पक्षाचे उमेदवार श्री. माधव श्रीहरी अणे हे बिन विरोध निवडून आले होते.

(त्यावेळी वऱ्हाड–मध्यप्रांताचे कौन्सिलमध्ये एकूण ५५ लोकनियुक्त प्रतिनिधी निवडून येत. १९२६ च्या निवडणुकीत या ५५ जागासाठी निवडून आलेल्यांची पक्षवार संख्या खालीलप्रमाणे होती.

प्रतिसहकार पक्ष व स्वतंत्र काँग्रेस पक्ष–१९, स्वराज्य पक्ष १६, स्वतंत्र ७, मवाळ १, सत्यशोधक (ब्राम्हणेतर) ४, मुसलमान ७, युरोपीयन १.)

डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे पत्रक : "श्री हनुमान व्यायाम शाळेचा संबंध कौन्सिल इलेक्शनशी आहे अशा ज्या कंडया पिकविण्यास सुरूवात झाली आहे त्यावर लोकांनी मुळीच विश्वास ठेवू नये. ही संस्था व्यायाम प्रसारा व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही चळवळीशी संबंध ठेवीत नाही." असे डॉ. पटवर्धन यांनी कौन्सिल निवडणूकीचे काळांत एक पत्रक काढून स्पष्ट केले होते.

किंग एडवर्ड कॉलेजातील विद्यार्थ्यांचा बाणेदारपणा : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजमध्ये दि. २२ व २३ ऑक्टोबर रोजी सोशल गॅदरिंग घेण्याचे ठरले होते. पण त्यांत 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत म्हटल्या जाऊ नये असा हट्ट प्रिंसिपाल मि. टॉस्ट्वीन यांनी धरल्यामुळे आणि तेथील विद्यार्थ्यांनीही 'गतवर्षीचे गॅदरिंगचे वेळी जे राष्ट्रगीत म्हटल्या गेले ते यंदा मात्र म्हणू देण्यास मनाई केली जात आहे, सबब त्या गीताशिवाय गॅदरिंग न करण्याचा निश्चय केला असल्यामुळे,' त्या गॅदरिंगच्या व्यवस्थापक मंडळातील सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या जागांचे राजीनामे देऊन टाकले व आपला बाणेदारपणा दाखविला होता. शेवटी गॅदरिंग रहीत झाले होते.

अंबादेवीचे मंदिरात प्रवेश मिळावा.
अस्पृश्य मंडळीचा अर्ज.

'श्री अंबादेवीचे मंदिरात दर्शनासाठी आम्हास प्रवेश मिळावा' अशा आशयाचा अर्ज उमरावतीतील काही अस्पृश्य मानलेल्या वर्गातील मंडळींनी येथील अंब.देवी संस्थानकडे आक्टोबर १९२६ मध्ये केला होता. त्यावर संस्थानच्या व्यवस्थापक मंडळीचे सभेत विचार होऊन खालील ठराव मंजूर करण्यात आला होता.

"सर्व समाजाचे या प्रश्नासंबंधी एकमत झाल्याशिवाय पूर्वापार अनेक वर्षे चालत आलेली वहिवाट मोडून टाकता येत नाही व या प्रश्नाचा निकाल आजच करता येत नाही याबद्दल दिलगिरी वाटते."

उमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्य प्रवेशाचे जे आंदोलन पुढे झाले त्याची ही सुरूवात होती.

उमरावतीच्या हिंदू हायस्कूलचा
षष्ठी सांवत्सरिक महोत्सव.

दि. १२ नोव्हेंबर १९२६ रोजी येथील हिंदु हायस्कूलला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, या संस्थेने आपला षष्ठी सांवत्सरिक महोत्सव थाटाने साजरा केला होता. या समारंभासाठी मध्यप्रांताचे गव्हर्नर सपत्निक आले होते. शिवाय ना. तांबे, सर मोरोपंत इत्यादी प्रमुख मंडळी समारंभाला हजर होती.



अमरावती येथील हिंदु हायस्कूलची इ. स. १८६६ साली बांधलेली सरकारी इमारत.

प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागतपर पद व 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत म्हटल्यानंतर हायस्कूलचे हेडमास्तर रा. सा. गोरे यांनी शाळेचा साठ वर्षांचा इतिहास आणि शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर केला.

हिंदु हायस्कूलचा इतिहास : सांगतांना श्री. गोरे यांनी सांगितले– 'निजामाच्या मोगलाईत हा प्रांत असे तो पर्यंत वऱ्हाडात सरसकट हिंदु मुसलमानांकरिता सरकारी खर्चाने चालविलेली एकही शाळा नव्हती. त्यामुळे त्यांना उर्दू शाळेतच जावे लागत असे. १८६० च्या तहानंतर वऱ्हाड प्रांत अंशतः ब्रिटिश अमलाखाली आल्यावर दोनच वर्षांनी (इ.स.१८६२) उमरावती येथे एक इंग्रजी शाळा सुरू झाली. १८६६ मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचे एक प्रोफेसर डॉ. सिंक्लेअर यांच्या नेतृत्वाखाली वऱ्हाडात स्वतंत्र शिक्षण खाते सुरू झाले. सार्वजनिक शिक्षण खात्याचे वऱ्हाडातील पहिले नेते (I st Director of public Instructions)

म्हणून त्यांची प्रसिद्ध आहे. ह्याच वेळी मि. एटकिन् हे हेडमास्तर म्हणून येथे येऊन या शाळेचे रूपांतर हायस्कूल मध्ये झाले. त्या वेळेपासून आजपर्यंत कित्येक महाराष्ट्रीय विद्वान शिक्षक येथे येऊन गेले. त्यात ह्या शाळेचे पहिले हिंदी हेडमास्तर म्हणून कै. रा. ब. श्रीराम भिकाजी जठार यांची प्रामुख्याने गणना होते. सन १८८५ पासून पुढे नऊ वर्षेपर्यंत त्यांनी डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्टरच्या हुद्यावर काम केले. त्यानंतर महाराष्ट्राच्या परिचयाचे रावबहादूर विष्णू मोरेश्वर महाजनी ह्यांनी सन १८८५ पर्यंत हेडमास्तरचे काम केल्यावर त्यांची नेमणूक पुढे इन्स्पेक्टरच्या हुद्यावर झाली. त्यांच्या आमदानीतच वऱ्हाडात १८८३ मध्ये पहिली शिक्षण परिषद झाली होती.

त्यांचे नंतर रा. ब. तळवलकर ह्यांनी २२ वर्षे काम केल्यावर रा. सा. देवभाकर, श्री. देशमुख, श्री. देशबंधू यांचे जामात श्री. भास्कर मुखर्जी व सरदार ईश्वरसिंग ह्यांनी अनुक्रमे मुख्याध्यापक म्हणून कामे केली व हल्ली रा. सा. गोरे हे काम करीत आहेत. रा. ब. तळवलकर यांच्या अमदानीत शाळेची बरीच प्रगती झाली. वऱ्हाडचा मध्यप्रांतात समावेश झाल्यावर सन १९०४ सालापासून तो हल्लीचे हायस्कूल बोर्ड उदयास येईपर्यंत हिंदु हायस्कूलचे विद्यार्थी अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या परीक्षेसच बसत असत."

या अहवाल वाचनानंतर ना. तांबे यांच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांना (Old Boy's) शाळेची चिन्हे (School Colours) वाटण्यात आली. त्यावेळी त्या चिन्हावरील निरनिराळ्या रंगाचे महत्त्व सांगितले होते.

या शाळेतून आजपर्यंत जी कर्तृत्ववान, वाङ्मयसेवक व कायदेपंडित अशी विद्वद्रत्ने बाहेर पडली त्यात सर मोरोपंत जोशी, ना. तांबे, श्री. बाळकृष्ण गणेश खापर्डे रा. ब. ब्रम्ह, रा. सा. गणेश, नागेश सहस्त्रबुद्धे, मुंबईचे गणेश दामोदर पाध्ये, इतिहास संशोधक श्री. यादव माधव काळे, ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, संशोधक डॉ. य. खु. देशपांडे, कवी श्री. आ. रा. देशपांडे, (अनिल) वगैरे गृहस्थांची प्रामुख्याने गणना होते.

त्यानंतर सर मोरोपंत जोशी, माजी गृहमंत्री मध्यप्रांत, यांचे व ना. गव्हर्नरसाहेबांचे भाषण होऊन हारतुरे अर्पण केल्यानंतर हा समारंभ संपला.

पीकपाणी : उमरावती जिल्ह्यातील पिके यंदा अपूर्ण पर्जन्यवृष्टीमुळे असमाधानकारक झाली आहेत. कापसाची वेचणी व ज्वारीची कापणी सध्या सुरू असून रब्बीची पीके सध्या बरी आहेत..... गहू व तांदुळ ह्यांचा भाव रुपयास ९ शेराप्रमाणे असून, ज्वारी ११ शेराप्रमाणे विकल्या जात आहे...

कॅम्प म्यु. ची निवडणूक : श्री. बाबासाहेब खापर्डे ह्यांच्या कौन्सिलातील ठरावाप्रमाणे, उमरावती कॅम्प म्युनिसिपॅलिटी ही लोक नियुक्त करण्यात आली होती.

त्या प्रमाणे त्या नगरपालिकेची निवडणूक, दि. २७ नोव्हेंबर १९२६ रोजी होऊन, बॅरि. काणे, बॅरि. फॉर्ब्स, बॅरि. ई. एम्. जोशी, मि. सी. एम्. वाझ, श्री. हरिराम, श्री. सुखाप्पा, श्री. राजुरकर, ले. शे. कलंदर हे निवडून आले होते.

सर्वश्री साझा लतिफ अहंमद, सैफुद्दीन खान वकील यांना एकही मत मिळाले नव्हते.

काकड आरतीची समाप्ती : दि. २० नोव्हेंबर १९२६ रोजी येथील पाटीपुऱ्यात महारवर्गातर्फे काकड आरतीची समाप्ती थाटाने करण्यात आली. संध्याकाळी श्री. चंदवासकर वकील, म्यु. सभासद यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन श्री. बळवंतराव खापर्डे यांचे सुमारे अर्धा तास 'सत्यशोधक चळवळीचे दुष्परिणाम' या विषयावर परिणामकारक भाषण झाले होते.

मोटार स्टॅन्डची जागा बदलली : रहदारीच्या सोईसाठी शहर पोलिस खात्याने, येथील जोग टॉवर (घंटी घड्याळ) जवळील मोटार गाड्या उभ्या राहण्याची जागा बदलून ती तहसील कचेरीसमोरील रस्त्याचे बाजूस केली होती.

बऱ्हाडातील पिके : सरकारी रिपोर्टानुसार, गहू व तांदूळ दर रुपयास सहा शेर प्रमाणे विकला जात असून, ज्वारीचा भाव १० शेर

प्रमाणे आहे. तसाच कपाशीचा भाव ८१ रुपये खंडी प्रमाणे आहे. अशा परिस्थितीत शेतसाऱ्याची माफी अवश्य मिळाली पाहिजे अशी त्यावेळी मागणी होऊ लागली होती.

मराठा विद्यार्थी संमेलन : दि. ११ व १२ दिसेंबर १९२६ रोजी मराठा विद्यार्थी संमेलन यशस्वी रीतीने पार पडले. श्रीमंत खासेसाहेब पवार हे या संमेलनाचे अध्यक्ष ठरले होते परंतु ते न येऊ शकल्यामुळे बॅरि. डॉ. पंजाबराव देशमुख, एम्. ए. पी. एच्. डी., ह्यांना अध्यक्षस्थान देण्यात आले होते.

भाषणे, पानसुपारी, वक्तृत्वोत्तेजक समारंभ, मर्दानी खेळ, अल्पोपहार वगैरे सर्वच कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडले होते.

उमरावतीची गीता जयंती : गीता जयन्तीनिमित्त, दि. १५ दिसेंबर १९२६ रोजी गणेश नाटक गृहात ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली आकोल्याचे विव्दान वकील श्री. वा. ल. चिपळूणकर यांचे 'श्रीकृष्णाचा संदेश' ह्या विषयावर व्याख्यान झाले. त्याच दिवशी चार वाजता गीता जयंतीनिमित्त न्यू हायस्कूलमध्येही ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे व्याख्यान झाले होते.

उमरावती म्युनिसिपॅलिटी व लोकमत : उमरावतीच्या नागरिकांची जाहीर सभा, दि. १३ दिसेंबर १९२६ रोजी सक्करसाथीत श्री. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली रात्री साडे आठ वाजता भरली होती.

म्यु. ने भुसारीगेट दरवाजाच्या बाजूचे बुरुज पाडू नयेत आणि कर्ज काढू नये हें विषय सभेसमोर होते. सुरुवातीला अध्यक्षांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात, उमरावती शहराचे नागरिक म्युनिसिपल कारभारात लक्ष घालू लागल्याबद्दल नागरिकांचे अभिनंदन केले. नंतर म्यु. चे एक माजी सभासद श्री. घासीरामजी यांनी 'भुसारी दरवाजाच्या बाजूचे दोन्ही बुरूज पाडून तेथे कमानी उभारणे हें या सभेला संमत नाही' अशा अर्थाचा ठराव मांडून त्यावर भाषण केले. 'शहराला हल्ली पिण्याच्या पाण्याची जास्त गरज आहे म्हणून पाणी योजना आखून म्यु. ने लोकांचा दुवा मिळवावा; पण तिकडे लक्ष न देता बुरूज पाडणे वगैरे कार्यात पैसा खर्च



चित्र क्र. १२५ : श्री हनुमान व्यायाम शाळेच्या इमारतीचे उद्घाटन प्रसंगी महात्मा गांधी (१९२६) (पृष्ठ ५४९ पहा)



चित्र क्र. १२६ : (पृष्ठ ५५५ पहा)

महात्मा गांधी, इ. सन १९२७.



चित्र क्र. १२७ : (पृ. ५६०-६१ पहा)

श्री त्र्यंबक लक्ष्मण उर्फ दादासाहेब शेवडे, वकील
उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष.

करणे हे लोकांस नापसंत आहे'. या ठरावाला श्री. महंमदसाहेब यांनी अनुमोदन देऊन भाषण केले. सभेला म्यु. सभासद श्री. शेठ शिवनाथबाबू, श्री. मोतीसावजी व श्री. चंदवासकर हे हजर होते. शेवटी मते घेता ठराव सर्वानुमते पास झाला होता.

नंतर म्यु. ने चाळीस हजाराचे कर्ज काढण्याचा जो ठराव केला त्यावर श्री. चंदवासकर वकील म्यु. सभासद, यांनी ठराव मांडला व त्यावर भाषण केले. त्यास श्री. घासीराम शेठ यांनी दुजोरा देऊन भाषण केले तेव्हा या ठरावाला विरोध करण्यासाठी श्री. गुलाबराव बक्षी हे पुढे आलेत, त्यांना अध्यक्षांनी भाषणास परवानगी दिली.

श्री. गुलाबराव यांच्या विरोधाच्या भाषणाला उत्तर देण्यासाठी नंतर श्री. घासीरामजी उभे झाले. तेव्हा दोन तीन श्रोत्यांनी "त्यांनी बोलू नये, ते खोटे बोलतात", अशी ओरड केली पण घासीरामजींनी आपले भाषण पुर्ण केले. सभेत चार-पांच मिनिटे गोंधळ झाला. सभा उधळण्याचा हा प्रयत्न होता. पण लोक शांत राहिले. व नंतर महंमदसाहेब हे ठरावाला पाठिंबा देण्यासाठी उठले. व त्यांनी आक्षेपकांना उत्तरे दिली. नंतर अध्यक्षांनी ठराव मतास टाकला तेव्हा दोन तीन हात वर उचलले गेले आणि ठराव जंगी बहुमताने मंजूर झाला.

शेवटी अध्यक्षांनी समारोपाचे भाषण केल्यानंतर सभा संपली.

महात्मा गांधींची उमरावतीला दोन तासांची भेट.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नवीन इमारतीचे उद्घाटनासाठी महात्मा गांधी हे दि. २१ दिसेंबर १९२६ रोजी फक्त दोन तासासाठी उमरावतीला आले होते. त्यांना बडनेरा स्टेशनवरून आणण्यासाठी श्री. सुखाप्पा बाबू वगैरे मंडळी बडनेरला गेली होती. बडनेरहून गांधीजींना मोटारने उमरावतीस आणण्यात आले. वाटेत श्री. शिवनाथ बाबू यांनी त्यांच्या बगिच्यात गांधीजींना अल्पोपहार दिला होता व तेथेच गांधीजींना त्यांच्या खादी प्रसाराचे कार्यासाठी, शेठ शिवनाथ बाबू यांनी एक हजार रुपये व शेठ पन्नालालजी यांनी ५०० रुपये अर्पण केले होते.

श्री. गांधीजी हे शेठ जमनलालजी बजाज व श्री. महादेवभाई देसाई यांच्यासह समारंभाचे जागी दुपारी ठीक साडे अकरा वाजता आलेत. समारंभाला सुमारे पाच हजार लोक हजर होते. स्वागतपर भाषण डॉ. सोमण यांनी करून 'एक वर्षाच्या मौन व्रतानंतर, भाषणाचा लाभ उमरावतीकरासच प्रथम दिल्याबद्दल गांधीजींचे आभार मानले व इमारतीचे उद्घाटन करण्याची विनंती केली.' उद्घाटनाचा विधि गांधीजींचे हस्ते पार पडल्यावर, विद्यार्थ्यांनी प्रेक्षणीय असे खेळ करून दाखविले. नंतर, काँग्रेस, आर्यसमाज, हिंदुमहासभा वगैरे संस्थांच्या स्थानिक शाखांतर्फे गांधीजीस हार अर्पण करण्यात आल्यावर गांधीजींनी लहानसे भाषण केले.

गांधीजी आपल्या भाषणात म्हणाले..... "डॉ. पटवर्धन ह्यांनी माझ्याकडे येऊन मला आजच्या प्रसंगाकरिता बोलावले, त्यावेळी इतकी मुले या संस्थेचा फायदा घेत असतील याची मला कल्पना नव्हती. त्यातून येथे हिंदुमुसलमान असे दोन्ही जातीतील विद्यार्थी आहेत हे ऐकून मला फार आनंद झाला. मी फक्त या उद्घाटनाकरताच येथे आलो असल्याने दुसऱ्या बाबतीत मी बोलू इच्छित नाही. डॉ. पटवर्धनांनी मुलांकरवी करून दाखविलेले खेळ फारच चांगले आहेत..... गांधीजींचे भाषणानंतर आभार प्रदर्शन होऊन समारंभ संपला व गांधीजी लगेच १–१० च्या गाडीसाठी बडनेरला रवाना झाले होते.

स्वामी श्रद्धानंद यांचा खून : उमरावतीत सभा

महात्मा स्वामी श्रद्धानंद यांचा दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी दि. २३ डिसेंबर १९२६ रोजी दुपारी पावणे तीनचे सुमारास अब्दुल रशीद या नावाच्या दिल्लीच्या एका मुसलमानाने स्वामीजीवर गोळ्या झाडून त्यांचा खून केला ही बातमी दि. २४ रोजी मुंबई टाईम्सवरून उमरावतीला दुपारचे वेळी कळली होती. बातमी समजताच गावात ह्या घोर बातमीच्या तातडीने हस्तपत्रिका काढून वाटण्यात आल्या व त्याच दिवशी रात्री साडे आठ वाजता जोग चौकात, स्थानिक हिंदुसभा आणि आर्य समाज यांच्यातर्फे श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, स्वामीजींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली होती. सभेत श्री. बामणगावकर, श्री. दादासाहेब शेवडे, स्वामी शिवानंद, श्री. बागलकोटकर

यांची व शेवटी अध्यक्षांचे समारोपाचे भाषण होऊन दुःखी अंतःकरणाने लोक घरोघर परतले होते.

हरताळ व मिरवणूक : दुसरे दिवशी, ता. २५ रोजी शहरात सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. मुसलमानांची दुकानेखेरीज करून सर्व दुकाने बंद होती.

दुपारी ३ वाजता स्वामी श्रद्धानंद यांच्या फोटोची मिरवणूक काढण्यात येऊन सायंकाळी ५ वा. येथील गांधी चौकात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली दुखवटचाची प्रचंड जाहीर सभा भरली होती. नगराध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती यांनी दुखवटचाचा ठराव मांडला व त्यास श्री. नागरमलजी यांनी अनुमोदन दिले. नंतर श्री. गुलाबराव बक्षी यांचे आणि शेवटी अध्यक्षांचे समारोपाचे भाषण होऊन सभा दुःखी अंतःकरणाने संपली.

श्री. ल. कृ. ओगले यांची सरकारतर्फे कौन्सिलवर नियुक्ती.

उमरावतीच्या अस्पृश्य समाजाचें पुढारी व येथील हिंदु मिशन बोर्डिगचे चालक श्री. ल. कृ. ओगले यांची नियुक्ती सरकारने मध्यप्रांत कौन्सिलवर केली. त्यानिमित्त त्यांचे अभिनंदन व स्वागत येथील माताखिडकी मोहोल्यात भरलेल्या जाहीर सभेत करण्यात आले होते.

इसवी सन १९२७

उमरावती शहरातील बालमृत्यूचे प्रमाण व बाल-संगोपन संस्थेची सुरुवात.

उमरावती शहरात १९२७ पूर्वी बालमृत्यूचे प्रमाण सरासरी शे. २८ असे होते. त्यात सुधारणा व्हावी व हे प्रमाण घटावे म्हणून बाल संगोपन संस्थेची एक शाखा उमरावतीच्या आठवडी बाजाराजवळ उघडण्यात आली होती. ऑक्टोबर १९२६ पासून या शाखेचे कार्य सुरू झाले होते परंतु त्याची उपयुक्तता लोकांना पटावी व जास्तीत जास्त लोकांनी त्याचा फायदा घ्यावा म्हणून नगरपालिकेचे तत्कालिन आरोग्याधिकारी श्री. कुळकर्णी यांनी खालील पाच वर्षांची उमरावती शहरातील बालमृत्यूच्या संख्येची आंकडेवारी प्रसिद्ध केली होती–

सन	एकूण जन्म संख्या	मृत्युसंख्या	हजारी प्रमाण
१९२१	१७४४	४९३	२७७.९०
१९२२	१७२४	४५७	२६६.१३
१९२३	२०५०	४६२	३५५.३९
१९२४	१८५८	६५२	३४०.५०
१९२५	१८५७	४२४	२२८.४१

बाल संगोपन संस्थेच्या साहाय्याने हे मृत्यूप्रमाण घटविता येते व लोकांनी या संस्थेचा अवश्य फायदा घेऊन स्थानिक आरोग्यखात्यास सहकार्य द्यावे अशी विनंती करण्यात आली होती.

शिक्षण व्याख्यान माला : दुय्यम शिक्षक संघातर्फे ब्रम्हविद्या मंदिरात शिक्षण व्याख्यानमाला सुरू करण्यात आली होती. प्रत्येक शनिवारी एक, याप्रमाणे या व्याख्यान मालेत एकूण तेरा व्याख्याने मार्च पर्यंत होणार

होती. त्यापैकी पहिले व्याख्यान दि. २ जानेवारी १९२७ रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. अनंतराव मांडे एम्. ए. (कोलंबिया) यांचे 'नागरिकत्वाचे शिक्षण' या विषयावर झाले होते.

मुसलमानांची सभा : दि. ४ जानेवारी १९२७ रोजी उमरावतीतील मुसलमान नागरिकांची सभा होऊन तीत स्वामी श्रद्धानंदासंबंधी दुखवटचाचा ठराव करण्यात आला व खुनी इसमाचा निषेधही करण्यात आला होता.

निजामाला तोफांची सलामी : हैद्राबादचे निजाम मीर उस्मानअली खान यांच्या ४२ व्या जन्मदिनानिमित्त उमरावतीच्या कमिश्नरांचे कचेरी समोर त्यांस २१ तोफांची सलामी देण्यात आली होती.

श्रद्धानंद दिन : दि. ९ जानेवारी १९२७ रोजी स्थानिक आर्य समाजातर्फे 'स्वामी श्रद्धानंद दिना' निमित्त श्री. दादासाहेब शेवडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्री. अण्णासाहेब कलोती व इतर नेत्यांची व्याख्याने झाली होती.

त्याच दिवशी किंग एडवर्ड कॉलेजचे वसतिगृहात श्री. दामले यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची सभा भरून, हिंदु धर्माकरिता प्राणाची आहुती देणारे स्वामी श्रद्धानंदांचे आत्म्यास शांती मिळावी म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी प्रार्थना केली होती.

बॅरि. रामराव देशमुख यांना दिवाणगिरी : दि. ११ जानेवारी १९२७ रोजी मध्यप्रांत कौन्सिलने दिवाणांच्या पगाराला मंजुरी दिली व सरकारने, बिलासपूरचे श्री. ई. राघवेंद्रराव आणि उमरावतीचे बॅरि. रामराव देशमुख यांची दिवाणाच्या (मंत्र्याचे) जागी नेमणूक केली.

या मिनिस्ट्रिला 'राव-रामराव मिनिस्ट्री' म्हटले जाई.

'संग्राम' कर्ते श्री. नलावडे यांचे व्याख्यान : पुण्याच्या 'संग्राम' साप्ताहिकाचे संपादक श्री. गणपतराव नलावडे यांचे जोग चौकात दि. २७ जानेवारी रोजी 'ब्राम्हण-ब्राम्हणेतर' या विषयावर दे. भ. नारायणराव बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले होते.

बॅरि. रामराव देशमुख यांना मानपत्र : दि. ३० जानेवारी रोजी उमरावतीतील सर्व शाळातील व कॉलेजातील विद्यार्थ्यांतर्फे बॅरि. रामराव देशमुख हे दिवाण झाले त्या प्रीत्यर्थ त्यांना मानपत्र देण्यात आले होते.

त्याच दिवशी गणेश नाटकगृहात श्री. ल. कृ. ओगले यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य वर्गाची सभा भरून बॅरि. रामराव देशमुख ह्यांची दिवाण पदावर नेमणूक झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

वऱ्हाडातील मराठा समाजातर्फे बॅरि. रामराव देशमुख यांना मानपत्र देण्याचा विचार करण्यासाठी उमरावतीला इंद्रभुवन थिएटरात वऱ्हाडातील मराठा समाजाची जी सभा दि. ६ फेब्रु; रोजी भरणार होती त्याचे निमंत्रक सर्वश्री शंकरराव पाटील, गोपाळराव देशमुख, उत्तमराव इटकीकर, बॅरि., तिडके, बॅरि., पंजाबराव देशमुख व बॅरि. बागवे हे होते.

कॅम्प म्युनिसिपल कमेटीच्या अध्यक्ष–उपाध्यक्ष–पदाची निवडणूक.

उमरावती कॅम्प म्युनिसिपल कमेटीच्या अध्यक्ष–उपाध्यक्ष–पदाची निवडणूक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात अत्यंत चुरशीची होऊन, बॅरि. भास्करराव काणे हे, रावबहादूर ब्रम्ह यांचा पराभव करून अध्यक्षस्थानी निवडून आले होते.

उपाध्यक्षांचे जागेवर बॅरि. जोशी व शे. कलंदर हे निवडून आले होते. कॅम्प म्यु. कमेटीचे अध्यक्ष–उपाध्यक्ष पदावर ही प्रथमच लोकनियुक्त प्रनिनिधींची निवड झाली होती.

उमरावती नगरपालिकेचे महात्मागांधींना मानपत्र.

महात्मा गांधींनी खादी प्रचाराचा महाराष्ट्रात दौरा काढला होता व त्या दौऱ्यातच दि. ६ फेब्रुवारी १९२७ रोजी ते उमरावतीस आले होते.

याप्रसंगी उमरावती शहर म्युनिसिपॅलिटीतर्फे महात्मा गांधींचा सन्मान करून त्यांना मानपत्र अर्पण केले. नगराध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती यांनी समयोचित भाषण करून हे मानपत्र गांधीजींना अर्पण केले होते.

महात्मा गांधींना उमरावतीच्या या भेटीत सुमारे अडीच हजार रुपयांचा निधी खादी प्रजारार्थ व देशबंधू दास यांचे स्मारकासाठी उमरावतीतून देण्यात आला होता. बॅरि. रामराव देशमुख यांनी देशबंधू दास यांचे स्मारकासाठी काही अटीवर पांचशे रुपयांची देणगी दिली होती.

या मुक्कामात गांधीजींनी येथील हिंदू-मिशन वसतिगृहालाही भेट दिली होती.

शिशु सप्ताहाची सुरूवात : उमरावती नगरपालिकेचे आवारात दि. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी सकाळी साडे आठ वाजता शिशुसप्ताहास सुरूवात झाली. राष्ट्रगीत व ईशस्तवन झाल्यावर सेटलमेंट ऑफिसर श्री. बॅनर्जी यांनी प्रास्ताविक भाषण करून व आपल्या देशात बालमृत्यूचे प्रमाण किती जास्त आहे याची थोडक्यात माहीती देऊन सौ. मथुराबाई द्रवीड यांना प्रदर्शनाचे उद्घाटनाची विनंती केली. नगराध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती यांनी त्यास अनुमोदन दिल्यावर सौ. द्रवीडबाई यांनी स्थानापन्न होऊन उद्घाटनाचे भाषण केले त्यांनीही आपल्या भाषणात, देशातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी अशा प्रकारचे शिशु सप्ताह, प्रदर्शन भरविणे व बालसंगोपन गृहाची स्थापना यावर जोर दिला होता.

नंतर अध्यक्षांनी समारोप करताना पुढील कार्यक्रमाची माहिती दिल्यानंतर सकाळचा कार्यक्रम समाप्त झाला. दुपारी डॉ. डी. अब्रू यांचे भाषण झाले होते.

श्री. अण्णासाहेब हंबर्डे यांची आत्महत्या : उमरावतीचे प्रसिद्ध सावकार हंबर्डे यांच्या घराण्यांतील श्री. गणेश रामचंद्र उर्फ अण्णासाहेब हंबर्डे ह्यांनी दि. २ मार्च १९२७ रोजी ऐन शिवरात्रीचे दिवशी, दुपारी साडेतीनचे सुमारास, अमरावती – बडनेरा रेल्वे ट्रेन खाली उडी घेऊन आत्महत्या केली होती. या आत्महत्येची सर्व गावभर चर्चा त्याकाळी होत होती. नंतर हंबर्डे यांच्या इस्टेटीवर श्री. बाबासाहेब खापर्डे यांना रिसिव्हर नेमण्यात आले होते.

सौ. हीराबाई बडोदेकर : मार्च १९२७ मध्ये उमरावतीला गणेश थिएटर मध्ये सौ. हीराबाई बडोदेकर यांच्या मधुर गायनाचे जलसे झाले होते. बाईचे गायनकौशल्य उच्च दर्जाचे असून त्यांना आवाजाची ईश्वरदत्त

देणगी असल्याने जलशांना लोकाश्रय चांगला मिळाला होता. साधी राहणी व सभ्यतापूर्ण वागणूक यामुळे कार्यक्रमाला भारदस्तपणा येत असे.

मध्यप्रांत–वऱ्हाड शेतकरी संघाची स्थापना : दि. ६ मार्च १९२६ रोजी उमरावती येथे मध्यप्रांत व वऱ्हाडातील शेतकऱ्यांची सभा बॅरि. माधवराव बागवे यांच्या अध्यक्षतेखाली होऊन 'मध्यप्रांत–वऱ्हाड शेतकरी संघा'ची स्थापना करण्यात आली होती.

या संघाची पहिली कार्यकारिणी खालील प्रमाणे होती.

अध्यक्ष–बॅ. एन्. एम्. देशमुख, उपाध्यक्ष–बॅ. एम्. बी. तिडके व बॅरि. माधराव बागवे, ट्रेझरर–श्री. डी. एम्. बोके, सेक्रेटरी–डॉ. पंजाबराव देशमुख, श्री. डी. जे. चव्हाण, व श्री. गोपाळराव देशमुख.

इतिहास संशोधन : दि. १५ मार्च १९२७ रोजी येथील नार्मलस्कूल फॉर बॉयीज्मध्ये, श्री. दुर्गे, एम्. ए., एल्एल्. बी. यांच्या अध्यक्षतेखाली श्री. हिरूरकर वकील यांनी 'इतिहास संशोधन' या विषयावर उत्तम व्याख्यान दिले होते. ते म्हणाले–

"इतिहास संशोधन हे इतिहासकाराचे कार्याची पूर्व तयारी असते व संशोधक हा इतिहासकाराचा मदतनीस असतो." शिलालेख, जयस्तंभ, समाधी लेख, धर्मग्रंथ, पोवाडे, लेणी, ताम्रपट, सनदा, नाणी वगैरे इतिहासाच्या साधनांची रूपरेषा त्यांनी सांगितली. ह्या साधनांचा उपयोग करण्याकरिता संशोधकाला प्राचीन लेखन पद्धतीचे ज्ञान, प्रक्षिप्त भाग ओळखण्याकरिता चिकित्सक बुद्धी, तर्कशुद्ध अनुमाने आहेत की नाहीत हे समजण्याकरिता तत्कालिन समाजाची किंचित् कल्पना, कालनिर्णयाकरिता गृहगणितापुरते तरी ज्योतिषशास्त्र व व्यक्तिगत पुराव्यावरून समाजाची कल्पना करावयाची असते, म्हणून मानसशास्त्राचा थोडातरी अभ्यास, इतक्या साधनांची सामुग्री लागते. सत्य शोधून काढणे हे संशोधकाचे काम आहे. सत्य लपविण्याची प्रवृत्ती माणसामध्ये कोणत्या परिस्थितीत उत्पन्न होते, त्या परिस्थितीचे चार पांच दाखले देऊन संशोधकाच्या कार्यातील अडचणींचे त्यांनी विवेचन केले.

संशोधकाचे महत्त्व बहुसंख्य समाजास वाटत नसल्यामुळे या कार्याविषयी सार्वत्रिक अनास्था, थोड्या लोकांवर हा बोजा पडल्यामुळे द्रव्याची

अडचण, पुराणमताभिमान्यांनी ग्रंथाविषयीच्या अत्यादराने व पुढील पिढी अश्रद्ध आहे या भावनेने काही ठिकाणी केलेला पोथ्यांचा नाश, वगैरे परिस्थितीची माहिती देऊन विद्यार्थी, फिरतीवरील सरकारी व बिन सरकारी नोकर व प्रवासाचे सतत काम पडणारे इतर लोक ह्यांनी, त्यांना सहजासहजी मिळालेली कागदपत्रे वगैरे जरूर एकाद्या चांगल्या ठिकाणी (इतिहास संशोधन संस्था, म्युझीयम किंवा सरकारचे पुरातत्व खाते इत्यादी) पाठवावे आणि संशोधनाचे कामी अवश्य मदत करावी."

श्री. नानासाहेब हिरुरकरांचे विचार परिप्लुत भाषणानंतर व कळकळीच्या उपसंहारानंतर श्री. दादासाहेब शेवडे यांनी आपले विचार मांडून 'कठोर सत्यान्वेषणापायी समाजाची पिछेहाट होणार नाही अशी संशोधकांनी खबरदारी अवश्य घ्यावी'. असे सोदाहरण प्रतिपादन केले.

अध्यक्षांचा लहानसा चटकदार समारोप होऊन हा समारंभ संपला.

बेरार व्हिक्टोरिया टेक्निकल स्कूलच्या : विद्यार्थ्यांचे सामाजिक संमेलन, दि. २६ मार्च १९२७ रोजी सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने पार पडले होते. याप्रसंगी कै. रा. व. मुधोळकर यांच्या फोटोचे अनावरणही सरसाहेबांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांचे खेळ, रात्री गायन वगैरे कार्यक्रमही या निमित्ताने आयोजित केले होते.

पंजाब केसरी दे. भ. लाला लजपतराय यांचे उमरावतीस आगमन व मानपत्र.

दे. भ. लाला लजपतराय हे दि. २ एप्रिल १९२७ रोजी दुपारी १ वा. एक्स्प्रेसने बडनेरला आले. त्यांना घेण्यासाठी उमरावतीहून दे. भ. बामणगावकर, डॉ. म्हैसाळकर, डॉ. भोजराज वगैरे मंडळी गेली होती. विदर्भ प्रांतिक कॉ. कमेटीतर्फे श्री. बामणगावकर यांनी व हिंदुमहासभेतर्फे डॉ. भोजराज यांनी बडनेर स्टेशनवर त्यांचे हार घालून स्वागत केले व त्यांना मोटारने उमरावतीस आणले. त्यांचा मुक्काम श्री. खापर्डे यांचेकडेच होता.



दे. भ. लाला लजपतराय

सायंकाळी ५ नंतर लाला लजपतराय यांनी हिंदु-मिशन बोर्डिंग व श्रीराम व्यायाम शाळेला भेट दिली. श्रीराम व्यायाम शाळेच्या विद्यार्थ्यांनी खेळ करून दाखविले व तेथे लाला लजपतराय, ना. दादासाहेब खापर्डे आणि दे. भ. बापूजी अणे यांचा स्थानिक प्रमुख पुढाऱ्यांसह फोटो घेण्यात आला.

नंतर लालाजी हनुमान व्यायाम शाळेत गेले. तेथे या संस्थेचा वार्षिकोत्सव लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. त्यानंतर दे. भ. लालाजींनी येथील आर्य समाजाला भेट दिली. तेथे त्यांचे फार थाटाचें स्वागत होऊन मानपत्र अर्पण करण्यात आले.

रात्री साडे आठ वाजता जोग चौकात श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली लालाजींचे 'प्रचलित राजकारण' या विषयावर इंग्रजीत

सुश्राव्य व्याख्यान झाले. त्यापूर्वी उमरावतीच्या नागरिकांतर्फे दे. भ. लालाजींना हिंदीतून मानपत्र देण्यात आले. व्याख्यानाला सुमारे पाच हजार लोक उपस्थित होते.

लालाजींनी इंग्रजीत भाषण केल्यानंतर मानपत्राला उत्तर देतांना ते हिंदीतून बोलले.

"माझ्या भाषणाचा कोठेही विपर्यास होऊ नये म्हणून मी इंग्रजीत बोलतो" हे त्यांनी प्रथमच सांगून टाकले होते. सभेचा समारोप अध्यक्षांनी चांगला केला होता.

लालाजींनी येथील मुक्कामात जुगलकिशोर व्यायाम शाळेला भेट दिली व माहेश्वरी भवनात त्यांचे मारवाडी समाजासमोर लहानसे भाषणही झाले होते.

त्यानंतर लालाजी येथून आकोल्यास रवाना झाले.

संगीत-चुडामणी कै. नामदेवबुवांचा श्राद्धदिन : कै. गायन-चुडामणी नामदेव बुवा यांचा श्राद्धदिन, ता. ११ एप्रील १९२७ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता.

कै. नामदेव बुवांचे स्मारक म्हणून त्यांची 'मौलाबक्ष प्रासादिक गायन समाज' ही गायन शाळा त्यांच्या शिष्य मंडळींनी, गावातील काही प्रमुख लोकांच्या सहकार्याने चालू ठेवली होती. त्या काळातील अहवाल, श्राद्धदिनी वाचण्यात आला. त्यानुसार "संस्थेचे काम पद्धतशीर चालू आहे. गेल्या वर्षात संस्थेला दे. भ. बापूजी अणे, ना. रामराव देशमुख वगैरे नेत्यांनी भेटी दिल्या. याशिवाय प्रो. अब्दुल करीमखाँ यांचे शिष्य श्री. दशरथपंत मुळे व सौ. हीराबाई बडोदेकर यासारख्या संगीत विशारदांनीही भेटी दिल्या. संस्थेचे उत्पन्न फारच थोडे आहे" याप्रमाणे अहवाल वाचून झाल्यावर भाषणे व अध्यक्षांचे समारोपाचे भाषण झाले. नंतर कै. नामदेवबुवा यांच्या तसबिरी समोर त्यांच्या शिष्यांनी 'हजेरी' लावली.

जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्षांची निवड : उमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष बॅरि. रामराव देशमुख हे दिवाण झाल्यामुळे, या अध्यक्षपदाच्या जागेची निवडणूक दि. २४ एप्रील १९२७ रोजी पार पडली. या निव-

डणुकीसाठी श्री. दादासाहेब शेवडे व डॉ. पंजाबराव देशमुख हे उभे होते. परंतु डॉ. पंजाबराव यांचा नॉमिनेशन पेपर रद्द ठरल्याने श्री. शेवडे हे बिनविरोध अध्यक्ष म्हणून निवडून आले होते.

त्रिशतसांवत्सरिक शिवजयंत्युत्सव : त्रिशतसांवत्सरिक श्री शिवजयंत्युत्सव दि. १ मे १९२७ पासून ब्रम्हविद्या मंदिरात साजरा करण्यात आला होता. पहिल्या दिवशी सायंकाळी श्री अंबादेवी संस्थान व्यायाम शाळेतील विद्यार्थ्यांनी व्यायामाचे खेळ करून दाखविले.

दुसऱ्या दिवशी दि. २ मे रोजी सायंकाळी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. सोमण, श्री. ओगले, श्री. चौधरी वगैरे मंडळीची व्याख्याने झाली. रात्री पोवाड्यांचा कार्यक्रम झाला.

तिसरे दिवशी सायंकाळी श्री शिवरायांच्या तसबिरीची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती. ठिकठिकाणी लोकांनी महाराजांच्या तसबिरीला हार घातले. सायंकाळी साडे सात वाजता ब्रम्हविद्या मंदिरात ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन उत्सवाचा समारोप करण्यात आला होता. या उत्सवाचे आयोजन स्थानिक हिंदुसभेने केले होते.

एका रात्रीत ९ इंच पाऊस : भयंकर वृष्टि : बऱ्याच वर्षात झाली नाही अशी भयंकर वृष्टि दि. १८ जुन १९२७ रोजी होऊन एका रात्रीत सुमारे ९ इंच पाऊस पडला व छत्री तलावाला एका रात्रीत साडे सोळा फुट पाणी चढले उमरावतीत काही घरे कोसळून मनुष्य हानी झाली होती अंबा नाल्याला अपरात्री भयंकर पूर येऊन नाल्याच्या काठावरील गोर गरिबांच्या घरादारात-झोपड्यात पाणी शिरून फार नुकसान झाले. सामान सुमान बरेच वाहून गेले आणि त्यांना आश्रयासाठी इतरत्र जावे लागले. त्यापूर्वी कित्येक वर्षात असा प्रसंग उमरावतीवर आला नव्हता तो या वर्षी आला.

सदानंद गुरुकुल : एलिचपूरचे स्वामी विमलानंद यांनी उमरावती येथे भुसारी दरवाजाजवळ 'सदानंद गुरुकुल' या नावाची संस्था या वर्षात

सुरू करून, तेथे मुलांना काही उद्योगधंदे शिकविणे चालू केले होते. या गुरुकुलात सर्व कच्चा माल देशी वापरून त्याद्वारे संपूर्ण देशी मखमल करण्याचा व त्याच्या टोप्या करण्याचा उद्योग शिकविला जात असे. देशी हस्तोद्योगास उत्तेजन देण्याचे दृष्टीने हा प्रयत्न लोकांचे कौतुकाचा विषय बनला होता.

पं. हृदयनाथ कुंझरु यांचे भाषण : दि. २८ जुन १९२७ रोजी गणेश नाट्य गृहात सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे उपाध्यक्ष व लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीचे सभासद पं. हृदयनाथ कुंझरु यांचे 'सद्यःपरिस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले होते.

स्त्रियांची सभा : तीव्र निषेध : दि. ९ जुलै रोजी दुपारी ३ वा. ब्रम्हविद्या मंदिरात उमरावतीच्या हिंदु स्त्रियांची जाहीर सभा भरून 'मालिनी-खान' विवाहाचा आणि त्याला सहानुभूती दाखविणाऱ्या सर्व हिंदूचा आणि वर्तमानपत्रांचा तीव्र निषेध करण्यात आला होता.

(डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत पंडित व प्राच्यविद्या संशोधक यांची नात कु. मालीनी पाणंदीकर (M.A B T.) हिने पुण्याच्या एका गुलाब खान (B.A.B T.) नावाच्या मुस्लिम शिक्षकाशी रजिस्टर पद्धतीने विवाह (सिव्हिल मॅरेज) केल्यामुळे त्यावेळी सर्व देशात आणि विशेषत महाराष्ट्रात फार खळबळ माजली होती. काही सुधारकांनी या विवाहाचे अभिनंदन केले होते तर अनेकांकडून या बद्दल तीव्र निषेध करण्यात आला होता.)

श्री शिवछत्रपतींच्या निंदेच्या निषेधाची सभा : दिल्लीच्या ख्वाजा हसन निजामीच्या 'पेशवा' या उर्दू वृत्तपत्राच्या दि. २४ जून १९२७ च्या अंकात 'शिवाजी आणि हिंदु वर्तमानपत्रे' या मथळ्याखालील लेखात छत्रपती श्री शिवाजी महाराजांबद्दल तद्वतच जिजामातेबद्दल अत्यंत आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध झाला होता व त्यामुळे सर्व देशभर हिंदूत भयंकर संताप निर्माण होऊन ठिकठिकाणी निषेधाच्या सभा झाल्या.

दि. ३१ जुलै १९२७ रोजी उमरावती येथे गणेश नाटक गृहात नगराध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी प्रचंड

जाहीर सभा भरून सदर पेशवा वर्तमानपत्र आणि ख्वाजा हसन निजामी यांचा तीव्र निषेध करण्यात आला होता. या सभेला इतकी गर्दी झाली होती की शेवटी स्टेजवरील पडदे व बूइंग्ज काढून जागा करावी लागली.

श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी प्रथम खालील ठराव सभेपुढे मांडला होता.

"ख्वाजा हसन निजामी ह्यांच्या 'पेशवा' नावाच्या वर्तमान पत्रातून, दि. २४ जूनच्या अंकात, छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या संबंधी जी नीच व निराधार विधाने केली आहेत त्याबद्दल उमरावती येथील सर्व हिंदू नागरिकांची ही सभा तीव्र निषेध करते.

सदर्हू प्रकारची विधाने जातीजातीत द्वेष उत्पन्न करणारी असल्यामुळे पंजाब सरकारने सर्व कायदेशीर इलाजांनी त्याचा प्रतिकार करावा व ह्यापुढे असे प्रकार घडणार नाहीत अशी हरतऱ्हेची खबरदारी घ्यावी असेही या सभेचे मत आहे.

सदर्हू ठरावाच्या नकला प्रांतिक सरकार, पंजाब सरकार, हिंदुस्थान सरकार, श्री छत्रपति राजाराम महाराज, संस्थान कोल्हापूर, श्री शिवाजी महाराज भोसले, संस्थान सातारा, श्री. रघूजीराव भोसले, नागपूर ह्यांस अध्यक्षामार्फत पाठविण्यात याव्यात."

या ठरावावर त्यांनी भाषण केले. ठरावाला डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अनुमोदन दिले व भाषण केले. त्यानंतर श्री. बॅरि. माधवराव बागवे, श्री. ल. कृ. ओगले, श्री. काशीराव बापू देशमुख, डॉ. पटवर्धन, श्री. दादासाहेब शेवडे, यांची भाषणे होऊन शेवटी अध्यक्षांनी ठराव सभेपुढे मांडला असता टाळ्यांच्या प्रचंड गजरात सर्वानुमते मंजूर झाला.

त्यानंतर नगराध्यक्ष श्री. कलोती यांचे समारोपाचे भाषण होऊन छत्रपती शिवरायांच्या जयजयकारात सभा संपली.

समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव : धुळ्याचे प्रसिद्ध समर्थभक्त व विद्वान संशोधक श्री. शंकर श्रीकृष्ण देव ह्यांचे महाराष्ट्र खादी संघातर्फे काढलेले दौऱ्यात दि. २५ जुलै १९२७ रोजी उमरावती येथे आगमन झाले व त्याच दिवशी डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाटक गृहात सायंकाळी 'खादी व महाराष्ट्र' या विषयावर त्यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले होते.

पं. दिनकर शास्त्री कानडे यांचे व्याख्यान : दि. २६ जुलै रोजी गणेश नाटक गृहातच सायंकाळी ज्ञानप्रसारक मंडळाचे विद्यमाने पं. दिनकर शास्त्री कानडे, एम्. ए. (अमेरिका) यांचे '१९०५ व १९२० सालची राष्ट्रीय चळवळ' या विषयावर, डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले होते.

'रंगीला रसूल' विरुद्ध सभा : दि. २६ जुलै १९२७ रोजी श्री. शरफुद्दीन यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीच्या मुसलमानांची जाहीर सभा होऊन 'रंगीला रसुल' सारखी पुस्तके कायद्याने बंद करावी असा ठराव करण्यात आला होता.+

जाहीर सभा : वायव्य सरहद्दीवरील हिंदूंना व शिखांना आफ्रिडी लोकांनी हाकून लावल्याबद्दल व बरेलीच्या मुसलमान अधिकाऱ्यांनी आर्य समाजवेदी फोडल्याबद्दल निषेध करण्याकरिता हिंदुसभेतर्फे सायंकाळी गणेश नाटक गृहात श्री. दादासाहेब शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीच्या नागरिकांची जंगी जाहीर सभा होऊन, श्री. ओगले, श्री. बामणगावकर,

---

+ टीप : मुसलमान लेखकांनी लिहून प्रसिद्ध केलेल्या 'उन्नीसवे सदीका महर्षि' व 'सिताका छिनाला' या अत्यंत घाणेरड्या पुस्तकाविरुद्ध सरकार काहीच कारवाई करीत नाही म्हणून, त्याचा बदला घेण्यासाठी 'रंगीला रसुल' हे पुस्तक एका हिंदूने लिहून, लाहोरचे श्री. राजपाल यांनी प्रकाशित केले होते. परंतु १९२७ मध्ये 'धर्म संस्थापक रक्षणाचे कायद्यान्वये' फक्त हे रंगीला रसुल पुस्तक सरकारने दिल्ली, पंजाब वगैरे प्रांतातून जप्त केले.

त्याच सुमारास रंगीला रसुल या पुस्तकाविरुद्ध, मुसलमानांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील म्हणून पंजाबच्या हायकोर्टात एक खटलाही चालविण्यात आला होता परंतु तो खटला कोर्टाने काढून टाकला होता. दुसरीकडे, जाहीर सभा घेऊन रंगीला रसुलवर बंदीची मागणी सुरू झाली होती.

अशा परिस्थितीतच दि. २६ सप्टेंबर १९२७ रोजी या पुस्तकाचे प्रकाशक श्री. राजपाल यांचेवर लाहोरला एका खुदाबक्ष नावाचे इसमाने खुनी हल्ला केला. त्यांत राजपाल हे जखमी होऊन थोडक्यात बचावले होते. पण पुढे भर दिवसा सुरा खुपसून राजपाल यांचा खुन झालाच.



चित्र क्र. १२९ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा. (पृष्ठ ५६८ पहा)
इर्विन चौक, अमरावती.
बहिष्कृत अस्पृश्य परिषद दि. १३, १४ नोव्हेंबर १९२७ रोजी
यांच्या अध्यक्षतेखाली अमरावतीत भरली होती.

चित्र क्र १३० : ... (पृष्ठ ५१६ पहा)

श्री नानासाहेब अमृतकर, वकील

ब्राम्हणेतर काँग्रेसचे सेक्रेटरी.

श्री. गोपाळराव देशमुख, डॉ. सोमण, श्री. मोतीलालजी, पं. रामेश्वरजी व अध्यक्ष यांची समयोचित भाषणे झाली होती.

अंबादेवीचे मंदिरात हरिजन प्रवेशाची चळवळ

अस्पृश्य समाजाची मिरवणूक व जाहीर सभा

दि. २८ ऑगस्ट १९२७ इ. रोजी अस्पृश्य समाजाची एक मिरवणूक शहरातून काढण्यात आली होती. मिरवणुकीची समाप्ती शिवाजी मैदानात (नेकोलेट पार्क) होऊन, तेथेच बॅरि. तिडके यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी पाच वाजता जाहीर सभा भरली. "स्थानिक पुढाऱ्यांनी अस्पृश्यांच्या विषयींचे आपले कर्तव्य बजावले नाही" म्हणून अध्यक्षांनी दिलगिरी व्यक्त केली. नंतर "अंबादेवी संस्थानच्या पंचकमेटीने अस्पृश्यांचे मंदिर-प्रवेशासंबंधी जो ठराव केला त्याचा निषेध करणारा" पहिला ठराव श्री. अमृतकर यांनी मांडला आणि त्यावर भाषण केले. या ठरावास श्री. भटकर वगैरे मंडळींनी अनुमोदन दिले. श्री. एस्. वाय्. पाटील यांचेही ठरावावर भाषण झाले.

या ठरावावर, कोणास विरुद्ध बोलावयाचे असल्यास त्यास वेळ देण्यात येईल असे अध्यक्षांनी जाहीर केल्यावरून श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी 'ठरावावर सर्वांची मते घेण्यात येणार असतील तर आम्ही बोलतो' असे सांगितले. परंतु 'सर्वांची मते ठरावावर घेतली जाणार नाहीत' असा निर्णय अध्यक्षांनी दिल्यानंतर, निमंत्रित लोक वगळून ठराव सर्वानुमते पास झाल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.

दुसरा ठराव श्री. वामनराव घोरपडे यांनी मांडला "अंबा संस्थानात सत्याग्रह करून प्रवेश करावा." असा ठरावाचा आशय होता. आणि तिसऱ्या ठरावाने या कार्यासाठी मनुष्यबळ व द्रव्यबळ मिळविण्याकरिता श्री. नानासाहेब गवई एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमण्यात आली होती.

श्री. वामनराव घोरपडे यांनी सत्याग्रहाच्या परिणामांचे व त्याकरिता लागणाऱ्या शक्तीचे वर्णन केले. श्री. गवई यांनी आपले भाषणात "आमचा

जर देवस्थानात प्रवेश होऊ दिला नाही तर हिंदुधर्म आम्ही खड्डयात घालू व रक्तपात झाला तरी आम्ही सत्याग्रह चालवू" असे उद्‌गार काढले. नंतर श्री. चव्हाण, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. पटवर्धन, श्री. गोपाळराव देशमुख, खेडकर आणि श्री. ओगले यांचे भाषणे होऊन व ठराव मंजूर होऊन सभा बरखास्त झाली.

ही सभा अत्यंत खळबळजनक अशी होऊन तीत आव्हाने प्रति-आव्हाने वगैरे बरेच प्रकार घडले होते. उमरावतीतील अस्पृश्यांचे मंदिर प्रवेश आंदोलनाचा हा श्रीगणेश होता. या सभेतच उमरावतीच्या मांग समाजातील पन्नास साठ गृहस्थांच्या सहया असलेले एक हस्तपत्रक वाटण्यात आले होते. त्यात सर्व उमरावती नगरवासियांना अशी जाहीर विनंती करण्यात आली होती की "येथील काही महार पुढारी लोकांनी जाती सुधारणाचे नावावर आमच्या मांग लोकांच्या सहया घेतल्या. आम्ही त्याप्रमाणे गणेश थिएटर मध्ये सभेला गेलो. परंतु तेथे जातीचा काही एक संबंध नसून अंबेच्या देवळात जाऊन दर्शन घ्यावे असा तेथे विषय होता. त्यावरून आजपर्यंत सनातन धर्म जो चालत आलेला आहे त्या धर्मास धक्का पोहोचतो या कारणाने या सभेचा जो निश्चय होता तो आम्हास मंजूर नाही. आम्ही सदर्हू मांग लोक वाडवडीला पासून चालत आलेल्या धर्माप्रमाणे वागण्यास तयार आहोत.....तरी नगरवासी लोकांस आमची हात जोडून विनंती आहे की, आम्ही लिहिलेल्या विनंतीपत्रास आश्रय द्याल अशी आशा जाणून ही विनंती केली आहे."

स्पृश्य हिंदूची सभा : अस्पृश्यांना अंबेच्या देवळात येऊ देण्या संबंधाने देवी संस्थान कमेटीने आतापर्यंत चळवळया मंडळीस जी उत्तरे दिली त्याचा विचार करण्यासाठी दि. २३ सप्टेंबर १९२७ रोजी सायंकाळी हनुमान आखाडया समोरील देवीच्या पटांगणात जंगी जाहीर सभा श्री. अण्णासाहेब देशपांडे, अंजनसिंगीकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

सभेच्या हस्तपत्रकावर गावातील बहुतेक सर्व प्रमुख शेठ सावकारांच्या व व्यापाऱ्यांच्या सहया होत्या. व सभेलाही हा संबंध वर्ग, सुशिक्षित वर्ग, चळवळ उभी करणारे लोक व जवळ जवळ सात आठ हजार लोक समुदाय जमला होता.

अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषणानंतर श्री. बामणगावकर यांनी मंदिर प्रवेशाच्या चळवळीचे बाबतीत देवी संस्थानच्या कमेटीने दि. ७ ऑगस्ट व १८ सप्टेंबर रोजी केलेल्या ठरावास पाठिंबा देणारा ठराव मांडला. त्यास श्री. यशवंतराव देशमुख जनुनेकर यांनी अनुमोदन दिले. नंतर अध्यक्षांनी 'कोणीही स्पृश्य हिंदु या ठरावास विरोध करू इच्छित असेल तर त्यास बोलता येईल' असे जाहीर केले. तेव्हा येथील एक वकील श्री. हनुमंत मेघःश्याम देशमुख हे उठून म्हणाले "अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशांच्या ह्या प्रश्नावर विचार राजकीय व सामाजिक दृष्टीनेच केला पाहिजे. राष्ट्रीय सभेने व हिंदुमहासभेने ह्या गोष्टीस अनुकूल ठराव केलेले आहेत. शास्त्रात कालानुरूप बदल झालेला आहे व होतच असतो व तशा तऱ्हेचे हे या दोन सभेचे ठराव आहेत. ख्रिस्ती व मुसलमान धर्माचे लोक ज्याप्रमाणे एकाच देवळात जातात त्याच प्रमाणे आपणही आता एकाच देवळात जाऊ लागले पाहिजे.....(लोकांनी ह्या ठिकाणी शेम, शेम म्हणून वक्त्यास उद्देशून मोठ्याने ओरडण्यास सुरुवात केली. दोन-तीनदा याप्रमाणे बराच व्यत्यय आला. तरीही श्री. देशमुखांनी आपले भाषण अक्षरशः घसा बसेपर्यंत चालूच ठेवले व पुढील आशयाचे विवेचन केले) "अस्पृश्यांचे अर्जात वापरलेल्या भाषेचा विचार करू नका, त्यांच्या हक्काचा विचार करा. श्री. बामणगांवकर स्वराज्याच्या प्रतिपादनाचा व आजच्या त्यांच्या भाषणाचा कसा मेळ घालतील ?"

श्री. ह. मे. देशमुख हे आपले भाषण संपवून खाली बसताच प्रेक्षकातून एकाने प्रश्न विचारला की, काँग्रेसचे ठराव जर तुम्हाला इतके मान्य आहेत तर इ. सन १९२० साली काँग्रेसचा वकिली सोडण्याचा ठराव तुम्ही पाळला होता काय ? यावर श्री. देशमुख काही बोलले नाहीत.

अध्यक्षांनी श्रोत्यांना शांत करून समारोपाचे भाषण केले. ते म्हणाले "श्री. देशमुखांनी या ठरावाला विरोध कोठे केला हे कळत नाही. उमरावतीचे देवी संस्थान हे स्पृश्य हिंदूचे देऊळ आहे. हे सालबर्डीच्या स्थानाच्या अर्थाने सार्वजनिक किंवा सर्व हिंदूचे देऊळ नाही. या संस्थानच्या भारणीला पै न् पै स्पृश्य हिंदूनी दिलेली आहे. सार्वजनिक देवळात आम्ही तुम्हाला कोठेच मज्जाव करीत नाही." नंतर अध्यक्षांनी ठरावावर मते घेतली. ठराव पास झाला होता.

पुढे २७ ऑक्टोबरला एक मांग्या नावाचा अस्पृश्य देवीचे देवळात गेल्याबद्दल पोलिसांनी त्याचेवर खटला भरला. त्यास कलम ४४७ प्रमाणे एक महिन्याची शिक्षा झाली होती. त्याने या निकालावर अपील केले. त्यात तो निर्दोष ठरला. त्याच्या अभिनंदनाची सभा दि. ४ नोव्हे. १९२७ रोजी श्री. संभाजीवर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी मैदानात (नेकोलेट पार्क) भरून अस्पृश्य समाजातर्फे अभिनंदन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीत भरलेली 'वऱ्हाड अस्पृश्य परिषद'

दि. १३ व १४ नोव्हेंबर १९२७ रोजी डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली, इंद्रभुवन थिएटर मध्ये 'वऱ्हाड अस्पृश्य परिषद' भरली. ही परिषद फार थाटाने पार पडली होती. अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेबांचे अत्यंत तळमळीचे भाषण झाले. त्यांचे ते विचार परिप्लुत आणि तर्कशुद्ध भरलेले भाषण उमरावतीत कौतुकाचा व अभिमानाचा विषय झाले होते.

या परिषदेत श्री अंबेचे मंदिरप्रवेशासंबंधी सत्याग्रहाचा ठराव येईल असे वाटले होते. परंतु ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्याकडून परिषदेच्या काही प्रमुख मंडळींनी पत्र मागून आणले आणि हा सत्याग्रहाचा विचार तीन महिने पुढे ढकलण्यात आला[१].

मंदिर प्रवेशाची चळवळ अमरावतीचे अंबेचे देऊळ खुले : त्या नंतर हरिजनांना अंबेच्या देवळात जाऊन दर्शन घेण्याची बंदी उठविण्यात आली.

---

१ : याबाबत ना. दादासाहेब खापर्डे याच्या डायरीत दि. १४–११–२७ ला खालील नोंद आहे "विठ्ठल बंधूजी चौबळ आले आणि म्हणाले की, मतभेद मिटविण्याच्या कामी मी यत्न करीत आहे' असे जर मी पत्र लिहून दिले तर महारांनी ठरविलेला सत्याग्रह ते बरेच दिवस पुढे करणार नाहीत. त्याप्रमाणे मी त्यांना चिठ्ठी दिली." नंतर दि. १५–११–२७ च्या डायरीत "विठ्ठल बंधूजी चौबळ आले. त्यांना बहूधा बाबू म्हणतात. त्यांनी महाराची सभा झाल्याचे सांगितले आणि मी दिलेल्या पत्राबद्दल धन्यवाद दिले." (कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र, पा. ६६४)

दादासाहेब खापर्डे यांनी या कामी बरेच श्रम घेतले. व पुराणमतवाद्यांचे आक्षेप खोडून काढले व बोल सहन केले[1].

या प्रमाणे मंदिर प्रवेशाचे चळवळीची सांगता ना. दादासाहेब खापर्डे यांच्या मदतीने झाली. मंदिर प्रवेशाचे चळवळीला मुख्यत: डॉ. पंजाबराव देशमुख, रावसाहेब रणदिवे, श्री. चौबळ, बॅरि. बागवे इत्यादी मंडळी साहाय्य करीत होती.

१९२७ चा अपूर्व गणेशोत्सव : उमरावतीत १९२७ सालचा गणेशोत्सव पूर्वीच्या मानाने अपूर्व पद्धतीने साजरा झाला होता. त्या वर्षी बुधवारा गणपती व भुसार दरवाजा गणपती यांचा संयुक्त कार्यक्रम करण्यात येऊन कार्यक्रमात सर्वांना सामील होणे सोयीस्कर झाले होते.

यापुढे अमरावतीत सार्वजनिक गणपत्युत्सव साजरा करण्याचे दृष्टीने एक प्रकारे प्रोत्साहन मिळाले.

या साली गावात २२ ते २५ गणपत्युत्सव साजरे करण्यात आले होते. गावच्या व परगावच्या प्रमुख अशा विद्वान लोकांची या गणेशोत्सवात भाषणे झाली होती. शेवटचे दिवशी २२ गणपतींची मिळून एकच जंगी मिरवणुक निघाली. तीत सुमारे १८ ते २० हजार लोकांनी भाग घेतला. मिरवणुकीतील लहान मोठ्या प्रत्येकाचे हाती छोटी किंवा मोठी काठी होती. त्यामुळे उमरावतीत अपूर्व असा देखावा दृष्टीस पडला. ही मिरवणूक सायंकाळी साडे सहा वाजता जोग चौकातून निघून म्युनिसिपॅलिटी समोरून अंबापेठ, बुधवारा, दहिसाथ, सक्करसाथ व भुसारीगेट मार्गाने परत जोग चौकात आली व त्याच ठिकाणी विहिरीत सर्व गणपती शिरविण्यात आले.

मिरवणूकीत सर्व आखाडे आपापले तालीमबाज लोक घेऊन आले होते. ४०–४५ हजार लोक वस्तीत वीस बावीस हजार लोकांनी या मिरवणूकीत भाग घेतला. सिटी इन्स्पेक्टर श्री. परमेश्वरदयाल आणि फर्स्टक्लॉस मॅजिस्ट्रेट श्री. शुक्ल हे मिरवणूकीसोबत होते. हा विसर्जनाचा सोहळा अत्यंत शांततेने व उत्साहात पार पडला.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. ६६४

स्त्रियांचा गणेशोत्सव : ब्रम्हविद्या मंदिरात झालेल्या ह्या उत्सवात श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. शेवडे, स्वामी शिवानंद, डॉ. सावरकर, श्री. कानडे शास्त्री, श्रीमती दुर्गाताई जोशी इत्यादी लोकांची सुश्राव्य भाषणे, ह. भ. प. पातुरकर, ताई गुर्जर, रा. बेडेकर यांची रसाळ कीर्तने, मुलींची वक्तृत्वोजक सभा व गाणी आणि नाट्य प्रयोग वगैरे कार्यक्रम झाले होते.

राज्यपाल दिन : प्रो. इंद्र यांच्या सूचनेप्रमाणे दि. २ ऑक्टोबर १९२७ रोजी, 'राजपाल–दिना' निमित्त श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून स्वामी शिवानंद, पं. सत्यदेव विद्यालंकार व पं. रामेश्वर यांची समयोचित भाषणे झाली होती.

आर्य समाजाच्या चळवळी : दि. ४, ५ व ६ ऑक्टोबर १९२७ रोजी स्थानिक आर्य समाजातर्फे गणेश नाट्यगृहात प्रथम शुद्धी परिषद व नंतर दोन दिवस आर्यधर्म परिषद भरविण्यात आली होती. पहिल्या परिषदेचे अध्यक्ष पं. रामचंद्रजी देहलवी आणि स्वागताध्यक्ष श्री. पन्नालालजी व्यास हे होते तर दुसऱ्या परिषदेचे अध्यक्ष, स्वामी श्रद्धानंदाचे चिरंजीव प्रो. इंद्रजी हे होते. पण ते न येऊ शकल्यामुळे त्यांच्या ऐवजी ठाकुर गोविंदसिंगजी यांचे अध्यक्षतेखाली ही परिषद सुरू झाली. स्वागताध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे हे होते. ह्या दोन्ही परिषदा उत्तम प्रकारे हेतू प्रमाणे पार पडल्या.

पं. रामचंद्रजींची उमरावतीत गाजलेली व्याख्याने : वरील परिषदांच्या सकाळ–संध्याकाळच्या बैठकीच्या शिवाय ता. ४ व ५ रोजी जोग चौकात व ता. ६ रोजी जुगलकिशोर व्यायाम शाळेचे पटांगणात, पंडित रामचंद्रजी देहलवी यांची तीन–तीन, चार–चार हजार लोकांसमोर फार परिणामकारक, विद्वत्ताप्रचुर व विनोदपूर्ण व्याख्याने झाली. त्यांनी आपल्या व्याख्यानांनी भाव हलवून सोडले होते.

ता. ६ ला व्याख्यानाचे पूर्वी, उमरावतीच्या नागरिकांतर्फे पंडितजींना एक गौरवपूर्ण शब्दात लिहिलेले मानपत्र अर्पण करण्यात आले. प्रो. इंद्रजींनाही मानपत्र देण्यात येणार होते पण ते प्रकृतीमुळे येऊ न शकल्याने त्यांचे मानपत्र पं. रामचंद्रजींचे हवाली करण्यात आले होते.

महाराष्ट्र व्यायाम शाळेचे उद्घाटन : जोग चौकातील पूर्वीच्या महाराष्ट्र व्यायाम शाळेची इमारत उघडण्याचा समारंभ ना. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते दि. ५ ऑक्टोबर १९२७ रोजी विजयादशमीचे मुहूर्तावर करण्यात आला होता.

सुरुवातीला 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत होऊन, संस्थेचे अध्यक्ष डॉ. म्हैसाळकर यांचे प्रास्ताविक भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले "पूर्वी 'महाराष्ट्र तालीमखाना' ह्याच जागी होता. त्याची इमारत जळाल्यामुळे त्या संस्थेच्या काही विद्यार्थी मंडळींनी श्रीराम व्यायाम शाळा स्थापन केली व त्यामुळे संस्थेचा प्राण कायम ठेवला. फक्त थोडे दिवस नाव व रूप बाहेरून बदलल्यासारखे दिसले. नंतर येथील बेरार एज्युकेशन सोसायटीने ही इमारत आम्हास बांधून देऊन पुन्हा या ठिकाणी तीच जुनी संस्था चालविण्यास आम्हाला स्फूर्ती दिली....."

उद्घाटनाचे भाषणात ना. दादासाहेब म्हणाले "पूर्वी म्हणजे १९०७-८ इ. साली मी व माझे काही कार्यकर्ते स्नेही ह्यांनी मिळून येथे एक शाळा काढली होती व एक तालीमखानाही चालविला होता..... जवळ जवळ ८-१० वर्षे तो आखाडा नीट चालू होता. पुढे दुर्दैवाने तो मोडला, इमारत जळाली. पण श्रीराम व्यायाम शाळेचे नावाने त्याचा आत्मा अमर होता ... ... आता माझे कार्य पूर्ण झाल्याचे पाहून मला संतोष होतो."

ह्या भाषणानंतर दादासाहेबांनी व्यायाम शाळेचे उद्घाटन केले. नंतर मुलांचे खेळ झाले. या समारंभाला पं. रामचंद्र शर्मा आले होते. त्यांनी खेळ पाहून फार समाधान व्यक्त केले. याप्रसंगी आखाड्यास काही देणग्याही मिळाल्या. शेवटी डॉ. म्हैसाळकरांनी आभार मानले. नंतर समारंभ संपला.

कॉलेजातील चळवळी : दि. ८ ऑक्टोबरला येथील किंग एडवर्ड कॉलेज मध्ये सायंकाळी पं. रामप्रसाद शास्त्री यांचे ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली 'धर्मशास्त्र आणि विज्ञान' या विषयावर संस्कृतात दीड तास पावेतो अस्खलित व प्रौढ भाषेत व्याख्यान झाले. शेवटी अध्यक्षांनीही सुमारे २० मिनिटे संस्कृत मधूनच समारोप केला.

त्याच दिवशी 'राष्ट्रसंघ हे मोठे थोतांड आहे, व त्याच्या आकांक्षा सर्वस्वी फसणार हे निश्चित आहे.' या विषयांवर रात्री ९ पासून, येथील कॉलेज आणि नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजातील विद्यार्थी व प्रोफेसर्स यांच्यामध्ये फारच मनोरंजक असा वादविवाद झाला.

विद्यार्थ्यांपैकी वरील ठराव मांडणारे, हिस्लॉप कॉलेजचे एक विद्यार्थी मि. फ्रँकलीन यांचे भाषण सर्वांत उत्तम झाले. राष्ट्रसंघात कार्य करणारे व हल्ली हिंदुस्थानात दौऱ्यावर आलेले प्रो. अलेक्झांडर नावाचे इंग्रज गृहस्थांनीही राष्ट्रसंघाच्या बाजूने यात भाग घेतला होता. रा. ब. ब्रम्ह हे राष्ट्रसंघास अनुकूल असे बोलले. पण भाषेच्या, विचारांच्या, मांडणीच्या व वक्तृत्वाच्या दृष्टीने ह्या वादविवादातील सर्वांत उत्तम भाषण श्री. दादासाहेब शेवडे ह्यांचेच झाले. 'राष्ट्र–संघ' हे निव्वळ थोतांडच नसून विसाव्या शतकातील ठकबाजीचा सर्वांत मोठा खेळ कसा आहे हे उत्तम रीतीने त्यांनी दाखवून दिले होते. अखेर २४७ विरूद्ध ७७ मतांनी राष्ट्रसंघाविरूद्धचा हा ठराव मंजूर झाला.

दुसरे दिवशी कॉलेज विद्यार्थ्यांचे सकाळी खेळ झाले आणि दुपारी ४ वा. नागपूरचे रे. डॉ. रॉबर्टसन ह्यांचे श्री. हिरूरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली 'जनाबाई व सोयराबाई' ह्या दोन मराठी कवियत्रीविषयी इंग्रजीत व्याख्यान झाले आणि सायंकाळी रे. रॉबर्टसन यांचे 'राजनिष्ठेची तत्त्वमीमांसा' या विषयावर व्याख्यान झाले होते.

हायस्कूल विद्यार्थी : न्यू हायस्कूलला डॉ. सावरकर आणि श्री. यशवंत गोडबोले, आय. सी. एस्. कलेक्टर (बिहार) ह्यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.

सीमोल्लंघनाचे (दसऱ्याचे) दिवशी, संस्थेतील शिक्षक वर्ग व विद्यार्थ्यांची एक प्रचंड मिरवणूक निघून सीमेबाहेर शमीपूजन व ना. दादासाहेब खापर्डे यांचे विद्यार्थ्यांस उपदेशपर भाषण झाले.

येत्या संमेलनासाठी डॉ. मुंजे हे नियोजित अध्यक्ष येणार आहेत.

संदल : दरवर्षी निघणारी मुसलमानांची 'संदल' दि. ८ ला रात्री खूप मोठी, पांच सहा हजार माणसांची निघाली. प्रत्येकाचे हाती लाठी होती.

बॅरि. रामराव यांना मानपत्र : वऱ्हाडातील मराठा समाजातर्फे मध्यप्रांताचे दिवाण ना. बॅरि. रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांना दि. १६ ऑक्टोबर १९२७ रोजी, उमरावतीच्या मराठा हायस्कूलच्या आवारात, आकोल्याचे श्री. सातारकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली 'मानपत्र' देण्यात आले. या समारंभाला वऱ्हाडातील बरीच प्रसिद्ध व वजनदार मराठा मंडळी हजर होती. या शिवाय, ना. दादासाहेब खापर्डे, रा. ब. ब्रम्ह, डॉ. भट, श्री. शेवडे आणि येथील इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

या नंतर दि. १७ ला सकाळी उमरावती कॅम्प म्यु. ने दिवाण ना. बॅरि. रामराव देशमुख यांना 'मानपत्र' दिले. या समारंभाचे वेळी युरोपीयन अधिकारी खेरिजकरून इतर अधिकारी व प्रमुख मंडळी हजर होती.

किंग एडवर्ड कॉलेजचे गॅदरिंग : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे गॅदरिंग, दि. १३ ऑक्टोबर रोजी श्री. माधवराव अणे, एम्. एल्. ए. यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाने पार पडले. या गॅदरिंगच्या वेळी 'वंदेमातरम्' हे गीत, रा. धनागरे या विद्यार्थ्याने गंभीर पण गोड स्वरात म्हणून दाखविले. गॅदरिंगचे उद्घाटनाला गावातील प्रमुख मंडळी उपस्थित होती.

सुरुवातीला जनरल सेक्रेटरी रा. दामले यांनी स्वागतपर भाषण केले व कॉलिजच्या एकंदर चळवळींची सविस्तर माहिती सांगितली. नंतर याच वर्षी आलेले नवे प्रिन्सिपॉल श्री. राजू यांनी भाषण केले.

जमीन महसूल कायदा : 'वऱ्हाडच्या जमीन महसूल कायद्यावर' दि. २७ नोव्हेंबर रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. माधवरावजी अणे यांचे जोग चौकात भरलेल्या जाहीर सभेत भाषण झाले.

महाराष्ट्र व्यायाम शाळा : दि. ५ नोव्हेंबर रोजी श्री. माधवराव अणे व श्री. नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व यांच्या सन्मानार्थ या संस्थेतर्फे लाठी–काठीचे व लटक्या लढाईचे प्रात्यक्षिक करून दाखविले होते. या कार्यक्रमाला बरेच स्थानिक पुढारी व इतर पाहुणे मंडळी हजर होती.

त्याच दिवशी, श्री. माधवराव पटवर्धन यांचे 'आधुनिक कवितेचे विशेष' या विषयावर व्यायाम मंडळाचे विद्यमाने न्यू हायस्कूलचे हॉल मध्ये व्याख्यान झाले होते.

रशियन राज्यक्रांतीवर व्याख्याने : दिसेंबर १९२७ चे पहिल्या आठवड्यात पं. दिनकर शास्त्री कानडे एम्. ए. यांनी, उमरावती आणि नंतर यवतमाळ या ठिकाणी मिळून, एकून चार व्याख्याने 'रशियन राज्यक्रांती' या विषयावर दिली होती.

ही व्याख्याने सर्व प्रकारच्या लोकांना मनोरंजक व विचार करावयास भाग पाडणारी अशीच झाली होती.

महात्मा फुले उत्सव : उमरावतीच्या समाज क्रांतिकारक पक्षाने म. ज्योतिबा फुले यांचा 'शतसांवत्सरिक उत्सव' इंद्रभुवन थिएटरमध्ये दि. ११ दिसेंबर १९२७ रोजी थाटाने साजरा केला होता.

श्री. भाऊसाहेब दुराणी यांचे निधन : उमरावतीचे सुप्रसिद्ध वकील व राष्ट्रीय पक्षाचे पुढारी श्री. सदाशिव कृष्ण उर्फ भाऊसाहेब दुराणी हे वयाच्या ४९ व्या वर्षी, नागपूर येथे औषधोपचारार्थ गेले असता तेथेच त्यांचे दि. १५ दिसेंबर १९२७ रोजी रात्री निधन झाले.

त्यांचे वडील पोलिस खात्यात अधिकारी होते. समोरचे अन्नाचे भरलेले ताट लोटून भाऊसाहेबांच्या वडिलांनी बदमाष रोहिल्यांची टोळी पकडण्याकरिता अंधाऱ्या रात्री एकट्यानेच एका घरात उडी घेतली आणि त्या छोट्या लढाईत त्यांना मृत्यू आला. वडिलांचे पुण्याईने भाऊसाहेबावर उच्चाधिकाऱ्यांची कृपा होती व ते कलकत्ता युनिव्हर्सिटीचे बी. ए., एल्एल्. बी. झाल्यावर त्यांना बडी नोकरी चालून आली होती. पण त्यांनी नौकरीस लाथ मारली. ते विद्यार्थी दशेपासूनच लोकमान्यांचे एकनिष्ठ भक्त होते, स्वार्थत्यागी होते. वकील म्हणूनही त्यांचा दर्जा मोठा होता, पण धंद्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. म्युनिसिपल कमेटीचे ते सभासद होते व त्या कारभारात त्यांचे चांगले लक्ष होते. पुढे प्रकृतीमुळे ते कोणत्याही कार्यात भाग घेत नसत. श्री. माधवरावजी अणे हे त्यांचे सहाध्यायी होते.

वऱ्हाडातील क्विलक्लॅन्डशाही, १९१६ ची उमरावतीत भरलेली प्रांतिक परिषद आणि १९२३ व १९२६ च्या निवडणूकीत त्यांनी केलेली राष्ट्रीय पक्षास मदत इत्यादी प्रसंगी त्यांची कामगिरी महत्त्वाची होती.

कै. दुराणी यांच्या दुखवट्याची सभा दि. २० रोजी ब्रम्हविद्या मंदिरात श्री. अण्णासाहेब हरकरे यांच्या अध्यक्षतेखाली भरून, डॉ. भोजराज



कै. भाऊसाहेब दुराणी, वकील

श्री. डॉ. म्हैसाळकर, श्री. इनामदार, श्री. कलोती वकील, श्री. बामणगावकर, श्री. संभाजीराव गोखले, डॉ. पटवर्धन इत्यादी वक्त्यांची भाषणे झाली होती.

अस्पृश्यांसह सहभोजन आणि ग्रामण्य : उमरावतीच्या आर्य समाज मंदिरात डिसेंबर १९२७ मध्ये एक सहभोजन झाले होते. या सहभोजनात महार, मांग, चांभार, भंगी, यांचे सोबतच श्री. रणदिवे, श्री. व्हि. बी. चौबळ, श्री. जी. बी. चौबळ, श्री. दिक्षित, डॉ. बॅरि. पंजाबराव देशमुख, बॅरि. बागवे, श्री. जयराम पाटील, श्री. एस्. व्हि. गोखले, श्री. एम्. एस्. केतकर, डॉ. भागवत, डॉ. सबनीस, बॅरि. जोशी, श्री. जोगळेकर, श्री. पी. वाय्. देशपांडे, डॉ. श्रीधरपंत भट, श्री. रघनाथराव परांजपे,

डॉ. पटवर्धन, श्री. जोग, श्री. वैजनाथपंत ओक, श्री. पैठणकर, श्री. मुरलीधरपंत ओक इत्यादी स्पृश्य हजर होते.

या सहभोजनात जे ब्राम्हण वकील, डॉक्टर हजर होते त्यांच्यावर उमरावतीचे भिक्षुक वर्गाने 'ग्रामण्य' प्रकरण बोलण्याचा निर्धार केला होता व ग्रामण्य प्रकरण सुरू झाले. या सहभोजनात जे ब्राम्हण सामील झाले त्यापैकी एक दोनच व्यक्ती अशा होत्या की, ज्यांचा कुटुंब विस्तार फार मोठा होता. मराठ्यांपैकी तर अशी जबाबदार व्यक्ती एकही नव्हती. त्यामुळे ग्रामण्याची आस भोवली तर ती या एकदोन घरालाच भोवेल असे मानले जात होते. बाकीचे लोक भिक्षुकांची पर्वा न करणारे होते.

प्रौढ विवाहाचे कायद्यास पाठिंबा : दि. १५ दिसेंबर रोजी रात्री साडे आठ वाजता प्रताप चौकात श्रीमान शेठ शिवनाथ बाबू यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून असेम्ब्लीमधील सक्तीच्या प्रौढ विवाह कायद्यास एकमताने पाठिंबा देण्यात आला.

पं. कन्हैयालाल, श्री. लढ्ढा वकील, शेठ फत्तेचंद व शेठ पन्नालाल बन्सीलाल यांची बालविवाहाचा निषेध करणारी व सक्तीच्या प्रौढ विवाह कायद्याला पाठिंबा देणारी भाषणे झाली होती.

स्काऊट कॅम्प : बॅरि. ई. एम्. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या स्काऊट संस्थेतर्फे उमरावतीच्या छत्री तलावाजवळ स्काऊट कॅम्प भरविण्यात आला होता. या कॅम्पमध्ये एकूण १९ गृहस्थांनी भाग घेतला. दि. २४ डिसेंबर १९२७ रोजी कॅम्पची समाप्ती समारंभपूर्वक करण्यात आली होती.

प्रांतिक कारकून परिषदेचे ४ थे अधिवेशन : दि. २७ डिसेंबर १९२७ रोजी, गणेश नाट्य गृहात प्रांतिक कारकून परिषदेच्या चवथ्या अधिवेशनाला उमरावती येथे सुरुवात झाली. या परिषदेसाठी राज्य सरकारचे विविध खात्यातील कारकून व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने आले होते.

या परिषदेचे उद्घाटन ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांनी केले होते. त्यांचे भाषणही विद्वत्ताप्रचुर पण विनोदाने भरलेले असे झाले.

परिषदेचे चिटणीस श्री. पिल्ले यांनी सुरुवातीला सांगितले की प्रांतिक कारकून परिषदेचे पहिले अधिवेशन देखिल उमरावतीलाच भरले होते.

नंतर अध्यक्षाची निवणूडक झाली. श्री. एन्. एम्. रहाळकर यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून निवड होऊन त्यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सुरू झाले होते.

अखिल भारतीय पोस्टल परिषद : दि. ३१ डिसेंबर १९२७ रोजी उमरावती येथे हिंदू हायस्कूलच्या इमारतीत अखिल भारतीय पोस्टल परिषदेचे चौथे अधिवेशन, ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या परिषदेला सर्व हिंदुस्थानातून प्रतिनिधी आले होते.

स्वागताध्यक्ष श्री. डायस यांचे स्वागतपर भाषणानंतर ना. दादासाहेब खापर्डे यांचे इंग्रजीत अत्यंत विनोदयुक्त असे भाषण झाले होते. दि. १ जानेवारी १९२८ रोजी ही परिषद उत्साहपूर्ण वातावरणात संपली.

गिरिराव अण्णाचे विहिरीत बन्नूने विष्णूस लोटले : अमरावतीचे कार्यकर्ते पाटील यांचा धाकटा भाऊ विष्णू हा, रा. महादेव नारायण जोशी यांचेकडे कामासाठी रात्रौ ८ चे सुमारास चालला असताना त्याला बन्नू नावाचा इसम सरकीचे पोते चोरून नेताना दिसला. विष्णूने ही बातमी फोडू नये म्हणून बन्नूने त्यास लालूच दाखविली, परंतु विष्णू लालचीला बळी पडला नाही व ही गोष्ट मालकास सांगतो असे म्हणाल्यावरून बन्नूने विष्णूस उचलून व त्याचे पाय त्याच्या गळ्यात अडकवून जवळच असलेल्या, गिरिराव अण्णा तहसिलदाराच्या–रस्त्यालगतच्या विहिरीत टाकून दिले.

थोड्या वेळाने बन्नूने विहिरीत विष्णूस हाका मारल्या पण विष्णूने उत्तर दिले नाही. यावरून तो मेला असे समजून बन्नू निघून गेला.

रात्रीची वेळ. भाजीबाजार ते खोलापुरी गेट हा रस्ता जवळ जवळ निर्मनुष्य होता. थोड्या वेळाने त्या रस्त्याने जाणाऱ्या दोन माणसांचे बोलण्याचा आवाज ऐकून विष्णूने विहिरीतून हाका मारल्या. नंतर जयरामजी व माणिकराव या दोघा रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तींनी विष्णूस विहिरीतून वर काढले.

या घटनेची सर्व गावभर नंतर चर्चा झाली होती. पुढे बन्नूस आरोपी करण्यात आले होते. ही घटना दि. २८ डिसेंबर १९२७ रोजी घडली होती.

इसवी सन १९२८

देशाचे दुष्मन'कर्ते उमरावतीत.

'देशाचे दुष्मन' या खळबळजनक पुस्तकाचे कर्ते, ब्राम्हणेतर चळवळीचे एक नेते व 'महाकाली तोफ' म्हणून गाजलेले एक पुढारी श्री. दिनकरराव शंकरराव जवळकर यांचे, दि. २ जानेवारी १९२८ रोजी सायंकाळी जोग चौकात, 'ब्राम्हणेतर पक्ष व सत्य शोधक समाज' या विषयावर शेतकरी संघातर्फे जाहीर भाषण आयोजित करण्यात आले होते. सभेचे अध्यक्षस्थानी श्री. दलपतसिंग चव्हाण, संपादक 'महाराष्ट्र-केसरी' हे होते.

श्री. जवळकर यांनी आपल्या भाषणात जी विधाने केली त्याचे उत्तर देण्याकरिता डॉ. पटवर्धन हे उभे राहिले असता त्यांनी बोलू नये असे प्रयत्न डॉ.पंजाबराव, श्री. जवळकर आणि सभेचे अध्यक्ष श्री. चव्हाण यांनी केले व शेवटी भीतीने गांगरून जाऊन सभा बरखास्त केली[1].

उलट, ही मुलुख मैदानी तोफ बंद पडावी म्हणून काही स्थानिक सनातनी नेत्यांनी या सभेत दंगल घडवून आणण्याचे ठरविले होते पण व्यवस्थापकांच्या लक्षात ही गोष्ट येताच त्यांनीही तयारी केली. म्हणून प्रसंग निभावला व गडबड न होता सभा शांततेने पार पडली[2], असे सांगण्यात आले.

हिंदु-मुसलमानांच्या सभा : दि. ३ जानेवारी १९२८ रोजी आर्य-समाज मंदिराचे पटांगणात, डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली पं. अयोध्याप्रसाद बी. ए. यांचे हिंदु-संघटण या विषयावर व्याख्यान झाले होते. त्या व्याख्यानात कुराणापेक्षा वेद श्रेष्ठ आहेत असे त्यांनी प्रतिप्रादन

---

१ : उदय : दि. ३ जानेवारी १९२८

२ : श्री. आनंदराव लढके यांच्या आठवणी.

केल्यामुळे, काही मुसलमानांनी पंडितजींना वादास आव्हान दिले. पंडितजींनी त्यांचे आव्हान स्वीकारून त्याच ठिकाणी व त्याच वेळी वाद सुरू करण्याचा इरादा जाहीर केला; पण 'उद्या वाद करू' असे मुसलमान म्हणू लागले. 'उद्या मला राहता येत नाही' असे पंडितजींनी सांगूनही मुसलमानांनी त्यादिवशी वादाची तयारी दाखविली नाही. शेवटी दुसऱ्या दिवशी गांधी चौकात मुसलमानांनी आपली सभा घेऊन पंडितजींना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. दोन्ही सभांना प्रचंड लोकसमुदाय जमला होता.

अमरावतीचा शिशु सप्ताह : इन्फंट वेल्फेअर कमिटीतर्फे दि. ८ जानेवारी ते १४ जानेवारी १९२८ पावेतो, शिशु-सप्ताह पाळण्यात आला. यंदाचा हा सप्ताह अत्यंत उत्साहाने व दक्षतेने पाळला. त्यासाठी बरेच परिश्रम घेण्यात आले होते. त्याचे श्रेय कमिटीचे कार्यकारी मंडळ, डॉ. कुळकर्णी, मिसेस् सोमण व मिसेस् आठवले यांना होते.

या सप्ताहाचा कार्यक्रमही स्त्रीवर्गास मनोरंजक आणि उपयुक्त असाच आखण्यात आला होता. त्यामुळे स्त्रियांची पहिल्या दिवसापासून तो शेवटच्या दिवसापर्यंत विलक्षण गर्दी होत होती. शिशुसप्ताहासाठी मुद्दाम एक विस्तृत व शोभीवंत मंडप टाकून त्यात प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

स्त्रियांना आरोग्य शास्त्राची, रोगाच्या उत्पत्तीची आणि रोगास प्रतिप्रबंधक उपाय योजना या संबंधीची माहिती मिळावी हा, या प्रदर्शनाचा हेतू होता.

शिशुसप्ताहाचे उद्घाटन, दि. ८ रोजी ना. तांबे यांचे हस्ते थाटाने पार पडले. दुसऱ्या दिवशी, डॉ. कुळकर्णी यांचे, डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली, स्त्रियांकरिता, 'सध्या आपल्या देशात होत असलेली लहान अर्भकांची भयंकर मृत्यूसंख्या, शिशुसंगोपन काळजीपूर्वक करून टाळावी.' या विषयावर उपयुक्त व्याख्यान झाले. तिसरे दिवशी डॉ. म्हैसाळकर यांचे, डॉ. भट यांच्या अध्यक्षतेखाली, 'अर्भकांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले मृत्यू, त्याची कारणे व ते टाळण्याचे उपाय' या विषयावर आणि चौथ्या दिवशी डॉ. अन्नू यांचे, सौ. अन्नपूर्णाबाई शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली, 'सूतिका गृहाची व्यवस्था आणि बाळबाळंतिणीची प्रकृती' याविषयी माहितीपूर्ण भाषणे झाली.

नंतर सौ. चंद्राताई पटवर्धन यांचे, सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली, 'शिशुसंगोपन व त्याची आवश्यकता' या विषयावर व्याख्यान

झाले. 'आपल्या देशातील अर्भकांचे हे मृत्यूचे प्रमाण पाहून कोणत्याही देशभक्ताचे काळीज चरकल्या शिवाय राहणार नाही', असे त्यांनी सांगितले.

नंतरच्या दिवशी दुपारी दीड वर्षे वयाच्या आतील मुलांचे वजन व वैद्यकीय परीक्षण करण्यात येऊन, त्यांतील जी मुले वजनात उत्तम व सशक्त ठरली त्यांना व त्यांच्या मातांना दुसऱ्या दिवशी लेडी सौ. जोशी यांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली होती.

याप्रमाणे सात दिवस विविध कार्यक्रमांनिशी भाषणे, मॅजिक लॅन्टर्नस् व सिनेमाद्वारे भगिनींना शिशुसंवर्धनाबद्दल माहिती दिली गेली.

(तत्कालिन भारतात बालमृत्यूचे प्रमाण भयंकर होते ते रोखण्यासाठी त्याकाळी कसे प्रयत्न सुरू होते, त्याचा हा शिशुसप्ताह नमुना होय.)

धार्मिक वादविवादासाठी आव्हान : जुगलकिशोर व्यायाम शाळेचे पटांगणात फार मोठ्या प्रचंड जनसमुदायासमोर जानेवारीत, पं. धर्माभिक्षु यांचे व्याख्यान झाले असता, त्यांना मुसलमान धर्मगुरूंनी वादविवादासाठी आव्हान दिले' तेव्हा '१४४ कलम चालू आहे ते तोडून वाद करण्याची इच्छा असल्यास वादास या, असे पंडितजींनी उत्तर दिले पण मुसलमान धर्मगुरूकडून नकार आला होता.

पुढे फेब्रुवारी १९२८ मध्ये, दयानंद सप्ताहात पं. कालीचरण शर्मा यांची उमरावतीला व्याख्याने सुरू असताना, त्यांना मुसलमानांनी आपल्या सभेत वादविवादास पाचारण केले होते. तेव्हा पंडितजींनी त्यांच्या सभेत जाऊन खलीलदास बाबाशी सामना दिला. या सभेला हिंदू–मुसलमानांची अतोनात गर्दी होती. पोलिसचा बदोबस्त होता. पंडितजी संस्कृत, इंग्रजी, अरबी व पर्शियन इत्यादी भाषात प्रवीण असल्यामुळे, त्यांनी गरिब खलीलदास बाबास निरुत्तर केले होते.

स्पृश्य–अस्पृश्य भगिनींचा तीळगूळ समारंभ.

तीळसंक्रांतीनिमित्त सौ. विमलाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली, अस्पृश्यवर्गातील स्त्रियांनी स्पृश्य स्त्रियांना तीळगूळ देण्याचा समारंभ केला होता तर श्रीमती अन्नपूर्णाबाई शेवडे यांचे अध्यक्षतेखाली अस्पृश्य स्त्रियांना तीळगळ देण्याचा समारंभ येथील महिला समाजाने घडवन आणला होता.

कै. गडकरी स्मृतिदिन : विद्यार्थी वर्गातर्फे कै. राम गणेश गडकरी यांचा स्मृतिदिन, श्री. बालगंधर्व यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाट्यगृहात ता. २३ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. सर्वश्री गणपतराव बोडस, वसंतराव देसाई, वासुदेवराव भोळे व श्री. देशपांडे ह्यांची समयोचित भाषणे झाली. त्यानंतर श्री. गणपतराव बोडस ह्यांनी कै. गडकरीकृत राजसन्यास नाटकातील करूणरसप्रधान असा प्रवेश वाचून दाखविला.

श्री. नारायणराव वामणगावकर यांनी विद्यार्थी वर्गातर्फे आभार प्रदर्शन केले व शेवटी अध्यक्षांनी समारोपाचे चटकदार भाषण केल्यावर हारतुरे होऊन समारंभ संपला.

(याच वेळी मुंबईला सर्व कॉलेजेस तर्फे एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये जो कै. गडकरी स्मृतिदिनाचा कार्यक्रम झाला तो वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाला होता.)

ना. बॅरि. रामराव देशमुख यांना जिल्हा कौन्सिलचे मानपत्र.

उमरावती जिल्हा कौन्सिलतर्फे मध्यप्रांताचे दिवाण ना. रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांना जिल्हा कौन्सिलचे हॉलमध्ये, दि. ४ फेब्रुवारी रोजी मानपत्र अर्पण करण्यात आले. जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष श्री. दादासाहेब शेवडे यांनी रौप्य करंडकातून हे मानपत्र त्यांना दिले होते.

या प्रसंगी जिल्हा कौन्सिलचे सभासदांशिवाय, बहुतेक सर्व हिंदी अधिकारी हजर होते. व्यासपीठावर मध्यप्रांत कायदे कौन्सिलचे डेप्युटी चेअरमन श्री. बाबासाहेब खापर्डे व जिल्हा कौन्सिलचे माजी अध्यक्ष रा. ब. ब्रम्ह हे होते.

सायमन कमिशनचे निषेधार्थ उमरावतीत कडकडीत हरताळ.

दिनांक ३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन कमिशनचे निषेधार्थ उमरावतीत कडकडीत हरताळ पाळण्यात आला होता. कॉटन मार्केट, शहरातील सर्व हिंदु-मुसलमान व्यापाऱ्यांची दुकाने, इतकेच नव्हे तर जिनिंग फॅक्टरीज् व परदेशी भांडवलवाल्यांचे कारखाने देखील बंद होते.

ROYAL COMMISSION on Indian Constitutional reforms, with Sir John Simon, Chairman, in the centre, laid the foundations of the present constitution. They were received in certain parts of India with cries of "Simon Go Back."

सायमन कमिशन.

'सायमन् गो बॅक्' वदली जनता भारत वर्षात[१]

कारखानदारांनी, व्यापाऱ्यांनी आणि मजुरांनी हरताळ पाळला. म्यु. कमेटी, शाळा आणि कौन्सिल बंद होते. पावसामुळे जाहीर सभा मात्र होऊ शकली नव्हती. ती दि. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी जोग चौकात सर मोरोपंत जोशी यांचे अध्यक्षतेखाली होऊन, रा. ब. ब्रम्ह, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. निजामुद्दीन व श्री. अण्णासाहेब कलोती यांची भाषणे झाली होती.

श्री शिवाजी व्यायाम शाळा : उमरावतीच्या काही तरुण मंडळींनी स्वत:च्या बळावर चालविलेल्या श्री शिवाजी व्यायाम शाळेचा द्वितीय वार्षिकोत्सव, दि. ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी, श्री. अभ्यंकर, एक्झीक्युटिव्ह इंजिनीअर यांच्या अध्यक्षतेखाली उत्तम रीतीने साजरा झाला. याप्रसंगी मंडळाच्या तरुणांचे व्यायामाचे खेळही प्रेक्षणीय झाले होते.

'वऱ्हाडचा इतिहास' या विषयावर, वऱ्हाडचा इतिहास कर्ते श्री. यादवराव माधवराव काळे यांचे, किंग एडवर्ड कॉलेजमध्ये, दि. १३ फेब्रुवारी रोजी व्याख्यान झाले होते.

शवभूति स्मृतिदिन : १९ फेब्रुवारी रोजी येथील नार्मल स्कूल-मध्ये, श्री. बाबासाहेब खापर्डे, डेप्युटी स्पीकर, मध्यप्रांत कौन्सिल, यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या समारंभाने साजरा करण्यात आला होता.

---

१ : प्रा. मा. ल. व्यवहारे यांचे काव्यातून

रामकृष्ण परमहंस पुण्यतिथि : महिला समाजातर्फे ब्रम्हविद्या मंदिरात रामकृष्ण परमहंस यांची पुण्यतिथि, कु. कृष्णाबाई खरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली व त्यानिमित्त सौ. पार्वतीबाई पटवर्धन आणि सौ. जानकीबाई उपाध्ये यांची भाषणे झाली होती.

उमरावती नगरपंचायत, निवडून आलेले सभासद : इ. स. १९२८ च्या दि. ३० मे रोजी उमरावती नगरपंचायत (म्यु. कमेटी) ची निवडणूक होऊन तीत जे एकूण १८ सभासद निवडून आले होते त्यांत चार वकील, तीन व्यापारी, दोन दलाल, एक सुखवस्तु, एक पहेलवान आणि चौघे निरनिराळे व्यवसाय करणारे असे लोक होते.

त्यांत सर्वश्री मोतीरामजी बिजवे, महादाप्पा हुंडेकर, गुलाबराव बक्षी, चंदवासकर वकील, केतकर वकील, महंमद इद्रिस, गुलाम अली, डॉ. भोजराज वगैरे मंडळी निवडून आली होती.

नंतर सरकारनियुक्त सभासद म्हणून सर्वश्री वाय्. जी. देशपांडे वकील, डॉ. जोशी, सयाजी गोविंद आणि पी. डब्ल्यु. डी. चे एक्झीक्युटिव्ह इंजिनीअर यांची, सरकारने जुलैचे पहिल्या आठवड्यात सभासद म्हणून नियुक्ती केली.

या सर्व नवनिर्वाचित सभासदांची सभा होऊन श्री. केतकर वकील हे अध्यक्ष आणि श्री. हिदायत अली व श्री. मिनामलजी हे उपाध्यक्ष निवडण्यात आले होते.

अखेर उमरावतीत दिवे लागले : मे १९२८ च्या पहिल्या आठवड्यात उमरावती शहरात सार्वजनिक विजेचे दिवे सुरू झाले.

उमरावतीत विजेचे दिवे येणार म्हणून गेले कित्येक दिवस उमरावतीचे लोक हरखून गेले होते, शेवटी एकदाचे रस्त्यावर विजेचे दिवे सुरू झाले.

'समाज–बल–रक्षक' डॉ. पटवर्धन

उमरावतीचे सुप्रसिद्ध नागरिक डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी श्री हनुमान व्यायाम शाळेचे चालकत्व पत्करून तिचा लौकिक साऱ्या भारतवर्षात वाढविला व या संस्थेद्वारे शारीरिक शिक्षणप्रसाराचा जो



चित्र क्र. १३२ : अमरावतीचे इरविन हॉस्पिटल (हल्लीचे जिल्हा सामान्य रुग्णालय.) (पृष्ठ ५८५ पहा)

हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लार्ड इरविन यांच्या हस्ते या हॉस्पिटलचे उद्घाटन दिनांक २८ जुलै १९२८ रोजी झाले.



चित्र क्र. १३३ : दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस (पृष्ठ ५९८-९९ पहा)
आणि श्री दादासाहेब खापर्डे



'समाज–बल–रक्षक' डॉ. पटवर्धन.

कार्यक्रम त्यांनी प्रस्तुत केला त्याबद्दल ते वऱ्हाडातच नव्हे तर सर्व महाराष्ट्राच्या अभिनंदनास पात्र झाले होते. महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेचे अध्यक्षस्थान नुकतेच त्यांना देण्यात येऊन त्यांचा सबंध महाराष्ट्राने गौरव केला होता.

डॉक्टर मजकुरांनी व्यायामाचा जागता प्रसार केला त्यामुळे श्रीमद् शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनीही 'समाज-बल-रक्षक' अशी पदवी त्यांना नुकतीच देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला[१].

बार्डोली येथील शेतसाऱ्याचे सत्याग्रहास पाठिंबा : दि. ३१ मे १९२८ रोजी विदर्भ तरुण मंडळातर्फे दे. भ. डॉ. शहाणे यांच्या अध्यक्षतेखाली,

१ : उदय, दि. १५ मे १९२८

बार्डोलीस सुरू असलेल्या शेतसाऱ्याचे सत्याग्रहाला सहानुभूती व्यक्त करण्यासाठी उमरावतीच्या नागरिकांची जाहीर सभा, जोग चौकात रात्री ९ वा. भरली होती.

सभेत बार्डोलीच्या सत्याग्रहींचे अभिनंदन करण्यात येऊन शेतसाऱ्याबद्दल सरकारने जो अन्याय सुरू केला त्याचा प्रतिकार बार्डोलीचे शूर शेतकऱ्यांनी सत्याग्रहाचे रूपाने सुरू केला, त्यास पाठिंबा देण्यात आला.

सभेत श्री. बाबासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, श्री. गुलाबराव बक्षी आणि डॉ. भोजराज यांची भाषणे झाली होती.

अमरावती – नरखेड : दि. १२ मे १९२८ रोजी सिमला येथे भरलेल्या रेल्वे बोर्डाचे सभेत, उमरावती–नरखेड रेल्वे मार्ग तयार करण्यास संमती देण्यात आली, असे प्रसिद्ध झाले होते. पूर्वी इ. सन १९०६–७ साली ह्याच रेल्वे लाईनचा एक नकाशा करण्यात आला होता. त्यावेळी, उमरावतीहून ही रेल्वे लाईन सरळ मोर्शीला जावी अशी योजना होती पण आता मंजूर झालेल्या योजनेनुसार ७९ मैल लांबीचा रेल्वे फाटा उमरावती–चांदूरबाजार–मोर्शी–नरखेड असा नेण्याचे प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून दिसून येते.

'बार्डोली दिना'निमित्त उमरावतीत हरताळ : दि. १२ जुन १९२८ हा देशात 'बार्डोली दिन' म्हणून पाळण्यात आला होता. या दिनानिमित्त उमरावतीत सर्व दुकाने बंद ठेवून हरताळ पाळण्यात आला व रात्री श्री. फत्तेचंदजी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, हिंदु मुसलमान वक्त्यांची भाषणे झाली व सहानुभूतीपर ठराव मंजूर करण्यात आला होता.

रावबहादूर खरे : बादशहाच्या वाढदिवसानिमित्त यावर्षी झालेल्या पदवीदानात उमरावतीचे रावसाहेब रा. मो. खरे यांना 'रावबहादूर' ही पदवी मिळाली होती.

सर मोरोपंत जोशी यांची नियुक्ती : डॉ. गौर यांच्या संमतिवयाचे बिलावर लोकमत पाहण्यासाठी हिंदुस्थान सरकारने, उमरावतीचे सर मोरो विश्वनाथ उर्फ अण्णासाहेब जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जुलैमध्ये एक 'Age of Consent' कमेटी नेमली होती[१]. (या कमेटीचा रिपोर्ट मागे पृष्ठ क्र. ४०३ वर दिलेला आहे.)

---

१ : उदय : दि. ३ जलै १९२८

जिल्हा कौन्सिलचे अध्यक्षपदी बॅरि. पंजाबराव देशमुख यांची निवड.

दि. २ जुलै १९२८ रोजी उमरावती जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्ष–उपाध्यक्ष–पदांची निवडणूक होऊन बॅरि. पंजाबराव देशमुख हे अध्यक्ष व श्री. एस्. वाय. पाटील हे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले. हा शेतकरी संघाचे वाढत्या शक्तीचा विजय होता.

अमरावती जिल्हा हिंदु परिषद : दि. २१ जुलै १९२८ रोजी गणेश नाटकगृहात उमरावती जिल्हा हिंदु परिषद भरविण्यात आली होती. अध्यक्षस्थान, बॅरि. सावरकर यांचे जेष्ठ बंधु डॉ. गणेशपंत उर्फ बाबासाहेब सावरकर यांनी भूषविले होते. परिषदेला जनसमुदाय बराच जमला होता. परिषदेचे स्वागताध्यक्ष शेठ पन्नालालजी यांनी सुरुवातीला सर्वांचे स्वागत केले. चिटणीस डॉ. भोजराज यांनी परिषदेला आलेले शुभ संदेश वाचून दाखविले.

अध्यक्ष डॉ. सावरकर यांचे पुष्पमालांनी स्वागत केल्यावर ते बोलावयास उभे राहिले आणि सुमारे पावणे दोन तास त्यांनी अस्खलित व वक्तृत्वपूर्ण भाषण केले.

दुसरे दिवशी परिषदेत अनेक ठराव होऊन व श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी सर्वांचे आभार मानल्यानंतर परिषद संपली.

भारताचे गव्हर्नर जनरल व व्हॉईसरॉय लार्ड इरविन यांचे अमरावतीत आगमन इरविन हॉस्पिटलचे उद्घाटन.

हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल लार्ड इरविन हे उमरावतीला बांधलेल्या हॉस्पिटलचे इमारतीच्या उद्घाटनासाठी, दि. २८ जुलै १९२८ रोजी उमरावतीत आले होते. सुमारे साठ वर्षांपूर्वी इ. स. १८७० साली व्हॉइसरॉय लार्ड मेयो हे खामगाव–जलंब रेल्वेचे उद्घाटनासाठी वऱ्हाडात आले होते. त्यानंतर वऱ्हाडात आलेले दुसरे व्हाइसराय लार्ड इरविन हेच होत.

व्हाईसरॉयच्या स्वागतासाठी स्टेशनपासून तो व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटपावेतोचे रस्त्यावर कमानी उभारण्यात आल्या होत्या व तोरणे लावून रस्ता शृंगारण्यात आला होता.

व्हाईसरॉय सकाळी साडे सात वाजता खास गाडीने उमरावती रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफार्मवर उतरले, त्यावेळी त्यांना ३१ तोफांची सलामी देण्यात आली होती. प्लॅटफार्मवर त्यांचे स्वागत वऱ्हाडचे कमिश्नर व अनेक रावसाहेब, खानसाहेब व रावबहादूर लोकांनी केले.

रेल्वे स्टेशनवरून व्हॉईसरॉय सरळ व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूट-मध्ये गेले. प्रवेशद्वारावर ना. तांबे, ना. नेल्सन, ना. रावबहादूर देशमुख व ना. खापर्डे यांनी त्यांचेशी हस्तांदोलन केले आणि तेथून मध्यप्रांत सरकारचे मंत्री गणांसह व गव्हर्नरांसह व्हाईसरॉय मुख्य स्थानाकडे गेलेत. तेथे गव्हर्नरांचे विनंतीवरून वऱ्हाडतर्फे मुद्दाम तयार करून आणलेला मूल्यवान हार, ना. खापर्डे यांनी व्हाईसरॉय यांचे गळ्यात नजराण्यादाखल घातला.

नंतर व्हाईसरॉय हॉस्पिटलचे उद्घाटनासाठी आलेत, तेथे त्यांनी समारंभपूर्वक हॉस्पिटलच्या नव्या भव्य इमारतीचे उद्घाटन केले. या हॉस्पिटलचे नाव 'इरविन हॉस्पिटल' असे ठेवण्यात आले होते.

हॉस्पिटलचे या इमारतीला बांधण्याचा खर्च पावणे चार लक्ष रुपये आला असून, इमारत कॉंक्रिटची आहे. वऱ्हाडात ही पहिलीच कॉंक्रिटची इमारत होय. सर्व प्रकारच्या आधुनिक साधनांनी युक्त अशा या इमारतीत इरविन हॉस्पिटल, दि. २८ जुलै १९२८ पासून सुरू झाले होते.

अस्पृश्योद्धारक कर्मवीर श्री. विठ्ठल रामजी शिंदे : महाराष्ट्रातील प्रसिद्ध अस्पृश्योद्धारक कर्मवीर श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे, दि. २१ ऑगस्ट १९२८ रोजी, उमरावतीस आले होते. त्याच दिवशी गणेश थिएटरमध्ये श्री. ह. मे. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे जाहीर भाषण झाले. नंतर किंग एडवर्ड कॉलेजात 'शिक्षणाची विफलता' या विषयावर त्यांचे भाषण झाले. श्री. शिवाजी मराठा हायस्कूल मध्येही त्यांनी व्याख्यान दिले होते.

बॅरि. रामराव यांचा राजिनामा : मध्यप्रांत सरकारच्या राव-रामराव मंत्रीद्वयात वाद निर्माण होऊन शेवटी ऑगष्ट १९२८ मध्ये उमरावतीचे बॅरि. रामराव देशमुख यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. (त्यानंतर राव–केदार मंत्रीमंडळ अस्तित्वात आले होते.)

गणपती विसर्जन : टिळक पंचांगानुसार उमरावतीत जे गणपती बसविण्यात आले होते त्या गणपतींचा उत्सव थाटाने साजरा होऊन

विसर्जनाचे दिवशी सुमारे तीस-चाळीस गणपतींची एकत्र भव्य मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीसोबतचा लोक समुदाय शिस्तीने चालत होता. सर्व प्रमुख लोक मिरवणुकीत सामील झाले होते. मिरवणुकीबरोबर पोलिस दक्षतेने सहकार्य करीत होते. गावातील प्रमुख रस्त्यांनी फिरून ही मिरवणूक जोग चौकात आली व तेथे विसर्जनाचे प्रसंगी रा. ब. ब्रम्ह यांचे समारोपाचे भाषण होऊन श्रीं चे विसर्जन करण्यात आले होते.

दिवाणपदाचा त्याग का केला ?
बॅरि. रामराव यांचे जाहीर भाषण.

दि. ५ सप्टेंबर १९२८ रोजी उमरावतीच्या गणेश थिएटरमध्ये, मध्यप्रांताचे माजी दिवाण बॅरि. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिसहकार पक्षातर्फे सायंकाळी जाहीर सभा होऊन, श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे 'मध्यप्रांत कायदे मंडळ व दिवाण' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. नाटकगृह श्रोत्यांनी चिक्कार भरले होते. नंतर बॅरि. रामराव देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्या राजीनाम्याचा खुलासा केला होता.

श्री. पाचलेगावकर महाराज : दि. ८ सप्टेंबर १९२८ रोजी श्री संत पाचलेगावकर महाराजांचे उमरावतीस आगमन झाले. श्री. चिमोटे सावकार यांचेकडे, भाजी बाजारात त्यांचा मुक्काम होता. त्यांचे दर्शनासाठी स्त्री-पुरुषांची अतोनात गर्दी होत असे. दि. ९ व १० रोजी महाराजांची जाहीर व्याख्याने झालीत. त्यांनी 'समाज परिस्थितीवर' पहिले व 'अस्पृश्यता निवारण व शुद्धि' यावर दुसरे व्याख्यान दिले होते. व्याख्यानासही हजारो लोकांचा समुदाय उपस्थित राहत असे. महाराजांचे वक्तृत्व अस्खलित व सहजसुगम होते. त्यांचे पहिले व्याख्यान जोग चौकात श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले व दुसरे व्याख्यान लक्ष्मीनारायण मंदिरासमोरील पटांगणात, श्री. सहस्त्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते.

दसरा : टिळक पंचांगाप्रमाणे हिंदुसभा व ब्राम्हण सभा यांचे विद्यमाने छत्रपतींची जंगी मिरवणूक, दि. २४ सप्टेंबर रोजी दसऱ्यानिमित्त काढण्यात येऊन शमीपूजन व श्री. पन्नालाल बन्सीलाल यांचे बगिच्यात पाच हजार हिंदु-समुहाची सभा डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली होऊन, श्री. बा. ग. खापर्डे, श्री. सं. वि. गोखले व पं. वर्मा यांची भाषणे झाली होती.

स्वदेशी प्रसारक मंडळी : शुद्ध खादी अगर इतर स्वदेशी कपडा व वस्तू वापरण्यास उत्तेजन देण्याच्या पवित्र हेतूने, उमरावतीला सप्टेंबर १९२८ मध्ये 'स्वदेशी प्रसारक मंडळ' स्थापन करण्यात आले होते. या मंडळाचे अध्यक्ष : श्री. राधावल्लभजी हेडा, उपाध्यक्ष : श्री. अण्णासाहेब कलोती वकील व श्री. पन्नालालजी सिंघई आणि चिटणीस : वैद्य पं. दा. मुळे, श्री. पन्नालाल गांधी व श्री. रतनलालजी जैन हे होते.

सर्व प्रकारच्या स्वदेशीस उत्तेजन द्यावे व ब्रिटिश मालावर कडकडीत बहिष्कार घालावा यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला होता.

उमरावती नगरपालिकेच्या अध्यक्षांचे
कारभाराबद्दल प्रतिसहकार पक्षाचा निर्वाळा.

ऑक्टोबर १९२८ पासून स्वराज्य पक्षीय श्री. अण्णासाहेब कलोती यांची कारकिर्द संपून, अपक्ष श्री. केतकर वकील यांची कारकीर्द सुरू झाली होती. श्री. कलोती यांच्या तीन वर्षाच्या कारकिर्दीबद्दल, प्रतिसहकार पक्षाचे वृत्तपत्राने "त्यांची कारकीर्द निःपक्षपाताची अशी सोज्ज्वल झाली याबद्दल वाद नाही. ते निवडणुकीतील पक्षाभिमानास बळी न पडता व त्याबद्दल उपकाराचे ओझे लादणारांच्या हातात न खेळता, त्यांनी सर्वांस सारखे मानून जो तीन वर्षे पर्यंत कारभार केला" याबद्दल तोंड भरून स्तुती केली होती.

बाबू सुभाषचंद्र बोस यांचे शुभागमन

सुप्रसिद्ध वंग नेते दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस हे दि. ६ आक्टोबर १९२८ रोजी उमरावतीस आले. त्यांच्या स्वागतासाठी बडनेर स्टेशनवर येथील प्रमुख मंडळी गेली होती. उमरावतीत त्यांचा मुक्काम ना. दादासाहेब खापर्डे यांचेकडे होता. या तरुण व स्वार्थत्यागी देशभक्ताचे अकस्मात आपल्या वाड्यात आगमन झालेले पाहून, ना. दादासाहेब खापर्डे यांना अतिशय आनंद झाला. वाड्यासमोर 'उदय' कार्यालयातर्फे बाबू सुभाषचंद्र यांना पुष्पमाला अर्पण करून स्वागत करण्यात आले.

सायंकाळी पांच वाजता, दे. भ. सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते नगरपालिकेने बांधलेल्या म्यु. ए. व्ही. स्कूलच्या भव्य इमारतीचे उद्घाटनाचा

कार्यक्रम थाटाने साजरा झाला. नगराध्यक्ष श्री. केतकर, खापर्डे वाडयात येऊन बाबू सुभाषचंद्र बोस व ना. दादासाहेब यांना, कार्यक्रमाचे जागी घेऊन गेले. इमारत लतापल्लवांनी आणि ध्वजापताकांनी सुशोभित केली होती. मुख्य समारंभ इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यात पेशवाई पद्धतीची बैठक मांडून तेथे केला होता.

'बाबू सुभाषचंद्र बोस व इतर पाहुण्यांचे आगमन होताच सर्वांनी त्यांचे उभे राहून स्वागत केले. नगराध्यक्ष श्री. केतकर यांनी सन्माननीय पाहुणे सुभाषबाबू व दादासाहेब यांना व्यासपीठावर नेऊन बसविले. या समारंभाला शहरातील सर्व पक्षाचे पुढारी व प्रतिष्ठित नागरिक हजर होते.

प्रारंभी 'वंदेमातरम्' हे गीत झाल्यावर, श्री. अण्णासाहेब देशपांडे यांनी सुभाषबाबूंची 'ते मातृभूमीचे निस्सीम सेवक व स्वार्थत्यागी देशभक्त' अशा शब्दात ओळख करून दिली. नंतर सेक्रेटरी श्री. गोसावी यांनी इमारतीचा इतिहास निवेदन केला. त्यात 'या इमारतीची कल्पना, श्री. संभाजी विनायक गोखले हे अध्यक्ष असताना निघाली व श्री. अण्णासाहेब कलोती यांच्या कारकिर्दीत त्या कल्पनेला मूर्तस्वरूप आले आणि सरकारनेही सदर इमारतीसाठी सढळ हाताने मदत केल्याचे' नमूद केले होते.

त्यानंतर नगराध्यक्ष श्री. केतकर यांनी उमरावती नगरपालिकेतर्फेचे मानपत्र वाचून दाखवून बाबू सुभाषचंद्र बोस यांना अर्पण केले. त्यात विदर्भाचा आणि बंगालचा पौराणिक संबंध वर्णन करून, देशबंधु चित्तरंजनदास यांचेही यापूर्वी स्वागत करण्याचा मान[१] या नगरपालिकेस प्राप्त झाल्याचे नमूद केले होते. सदर मानपत्र एका सुंदर चौकटीतून टाळचांचे गजरात सुभाषबाबूंना देण्यात आले होते.

नंतर बाबू सुभाषचंद्र बोस यांनी श्री हनुमान व्यायाम शाळेला भेट दिली. तेथेही हजारो लोकांच्या उपस्थितीत त्यांचे स्वागत करण्यात आले व व्यायामाचे प्रयोग खेळाडूंनी करून दाखविले. व्यायाम शाळेच्या

१ : देशबंधू चित्तरंजनदास यांना नगरपालिकेचे सभागृहात म्यु. तर्फे पान-सुपारी देण्यात यावी, असा ठराव अमरावती नगरपालिकेने, ठराव नं. २ दि. ४-११-१९२२ रोजी केला होता. त्यावेळी दासबाबूंचा मुक्काम अमरावतीला आठवडाभर होता.

'मुद्रण मंदिराची' कोनशिला बसविण्याचा समारंभ याच वेळी बाबू सुभाषचंद्र यांचे हस्ते झाला.

रात्री साडे आठ वाजता गणेश नाटकगृहात बाबू महाशयांचे तिकीट लावून व्याख्यान, विदर्भ युवक संघातर्फे ठेवण्यात आले होते. व्याख्यानास सारा सुशिक्षित वर्ग लोटला होता. अध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे हे होते. बाबू सुभाषचंद्र बोस यांचे तासभर व्याख्यान झाले त्यांनी तरुणांस राष्ट्रसेवेसाठी आवाहन केले होते. नंतर अध्यक्षांनी समारोप केला व चिटणीसांनी आभार मानले.

रविवारी सकाळी विदर्भ विद्यार्थी संघातर्फे बाबू सुभाषचंद्र बोस यांचे, न्यू हायस्कूलच्या पटांगणात रा. ब. डॉ. भट यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे जाहीर व्याख्यान झाले. त्यांत तरुणांवरील जबाबदारी त्यांनी प्रतिपादन केली व ते सांगताना जगातील तरुणांच्या संघटणांचा इतिहास त्यांनी कथन केला व तरुणांना स्वदेशी व बहिष्कार याविषयी उपदेश केला होता.

विदर्भ युवक परिषदेचे १ ले अधिवेशन

विदर्भ युवक परिषदेचे पहिले अधिवेशन, दि. २० ऑक्टोबर १९२८ रोजी सायंकाळी गणेश नाटकगृहात डॉ. हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली, थाटाने पार पडले. या परिषदेला वऱ्हाडच्या चारही जिल्ह्यांतून प्रतिनिधी आले होते आणि या परिषदेत सर्व धर्माच्या, जातीच्या व पक्षांच्या लोकांनी भाग घेतला होता. बहुतेक सर्व स्थानिक पुढारी परिषदेला हजर होते.

प्रारंभी शाहीर श्री. खाडीलकर यांनी पोवाडा म्हटला. नंतर डॉ. म्हैसाळकर यांनी 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत म्हटले. मुलांचे एक स्वागतगीतही झाले व त्यानंतर डॉ. भोजराज यांचे युवकांना उत्तेजनपर व देशभक्तीपूर्ण असे सुंदर भाषण होऊन नंतर अध्यक्षांचे भाषण झाले.

परिषदेचे कार्य चालू असतानाच, ना. दादासाहेब खापर्डे यांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई उर्फ आईसाहेब यांच्या निधनाचे वृत्त मिळालेवरून परिषदेतच त्यांचे निधनाबद्दल दुखवटयाचा ठराव अध्यक्षांकडून मांडण्यात आला व सर्वांनी उभे राहून तो पास केला. नंतर नागपूर युवक संघाचे प्रवर्तक श्री. बहेरामजी यांचे भाषण होऊन त्या दिवशीचा कार्यक्रम संपला.



चित्र क्र. १३४ : अमरावती नगरपालिकेची ए. व्ही. स्कूलची भव्य इमारत. (पृष्ठ ५१०-११ पहा)

या इमारतीचे उद्घाटन बाबू सुभाषचंद्र बोस यांचे हस्ते दि. ६ ऑक्टो. १९२८ रोजी झाले.



चित्र क्र. १३५ (पृ. ५१७-१८ पहा)

बॅरि. इ. एम्. जोशी

दुसरे दिवशी विविध ठराव मंजूर करण्यात आले. त्यांत राजकीय व सामाजिक ठराव होते. या ठरावावर सर्वश्री डॉ. पटवर्धन, मे. हिदायतअली, श्री. बंकटसिंग, श्री. राधावल्लभ लढ्ढा, श्री. गुलशेरखॉं, श्री. ह. वा. देशपांडे, श्रीमती दुर्गाताई जोशी, श्री. रणदिवे वकील, श्री. धनसुखदास, श्री. भोळे, श्री. दादासाहेब शेवडे, श्री. बामणगावकर, डॉ. नंदूरकर, श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. शर्फुद्दीन, श्री. हिरूरकर वकील, कु. गोदूताई केतकर, श्री. आ. रा. देशपांडे वकील, कु. कृष्णाताई खरे, श्री. विश्वनाथराव ब्रम्ह, डॉ. सोमण, श्री. चौबळ, श्री. सं. वि. गोखले वकील, यांची सूचक म्हणून किंवा अनुमोदक म्हणून भाषणे झाली.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी बॅरि. जोशी, बॅरि. मुधोळकर, श्री. आ. रा. देशपांडे, डॉ. पातुरकर, डॉ. भोजराज, डॉ. म्हैसाळकर, श्री. पी. वाय्. देशपांडे, श्री. कोकर्डेकर वगैरे सुशिक्षित तरुण मंडळींनी बरेच परिश्रम घेतले होते.

पैसा फंड मेळा : पैसा फंड मेळ्याचे उमरावतीत एकूण तीन कार्यक्रम, दि. २७ व २८ ऑक्टोबर रोजी गणेश नाटकगृहात होऊन, त्यात सुमारे ९०० रुपयांचे उत्पन्न झाले होते.

दसरा उत्सव : दसऱ्याचे दिवशी जगदंबेच्या मिरवणूकीसोबतच श्री. शिवाजी बोर्डिंगतर्फे छत्रपतींची मिरवणूक निघाली होती. या मिरवणूकीचे रूपांतर, शेठ पन्नालाल यांचे बगिचात, जाहीर सभेत होऊन काही वक्त्यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी बॅरि. बागवे हे होते. या सभेतच महाराष्ट्र व्यायाम शाळेचे एका प्रसिद्ध चालकांना, व्यायाम विद्येत निष्णात म्हणून 'गुरूवर्य' ही पदवी देण्यात आली व एक सुवर्ण पदक मराठा समाजातर्फे अर्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे श्री. मोहोड यांनाही 'शरीर-बल-वर्धक' ही पदवी व सुवर्णपदक देण्यात आले होते.

उमरावती शहराचा पाणी प्रश्न : उमरावती शहराला पाण्याची तीव्र टंचाई सतत जाणवत असे. त्यासाठी रा. ब. अभ्यंकर, एक्झीक्युटिव्ह इंजिनीयर यांच्या देखरेखीखाली उमरावतीसाठी ज्या सहा-सात पाणीपुरवठा योजना त्यांनी सुचविल्या होत्या त्यांत सर्वोत्तम अशी 'माडू' नदीची योजना होती परंतु त्यास खर्च त्रेपन लक्ष रुपये येणार होता. नगरपालिकेच्या

उत्पन्नाच्या दृष्टीने एवढ्या खर्चाची योजना परवडण्यासारखी नव्हती तेव्हा उमरावती नगरपालिकेने सरकारला अशी विनंती केली की, या योजनेसाठी सरकारने उमरावती नगरपालिकेला साडे सव्वीस लक्ष रुपये अनुदान व तेवढेच कर्ज, शेकडा ५ टक्के व्याजाने द्यावे. या कर्जाची मुदत ४० वर्षाची, राहावी. याप्रमाणे ही ५३ लाखाची योजना हाती घेता येईल. नोव्हेंबर १९२८ मध्ये ही विनंती सरकारकडे करण्यात आली होती.

पंजाब केसरी लाला लजपतराय यांचा दुःखद मृत्यू.

उमरावती शहरातील दुखवटचाच्या सभा, हरताळ.

सायमन कमिशन लाहोरला गेले असता त्याविरुद्ध प्रचंड जनसमुहाने विरोधी निदर्शन केले. त्याप्रसगी पोलिसांनी केलेल्या लाठी मारात, दे. भ. लाला लजपतराय यांना जबर मार बसून त्यातच त्यांचे आकस्मिक निधन झाले. ही वार्ता सर्व देशभर वेगाने पसरून, देश दुःखसागरात बुडून गेला. ब्रिटिश नोकरशाहीने या महान देशभक्ताचा बळी घेतला.

उमरावतीला ही वार्ता येताच, दि. १८ नोव्हेंबर १९२८ रोजी जोग चौकात आर्य समाज, हिंदुसभा व काँग्रेस यांची संयुक्त जाहीर सभा ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरून, उमरावतीच्या नागरिकांनी आपले दुःख जाहीर केले व दुखवटचाचा ठराव मंजूर केला. उमरावती नगर पालिकेनेही लालाजींचे मृत्यूसंबंधी शोक प्रस्ताव पास केला व दुसऱ्या दिवशी कार्यालय आणि शाळा, दुःखप्रदर्शनार्थ बंद ठेवल्या होत्या.

लालाजीच्या दुःखद निधनाची वार्ता कळताच उमरावती शहरात स्वयंस्फूर्त हरताळ पडला. कॉटन मार्केटही बंद होते. त्याच दिवशी दि. २९ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वा. रथातून लाला लजपतराय यांच्या तसबिरीची मिरवणूक शहरात काढण्यात आली. मिरवणूकीत सर्व प्रमुख लोक हजर होते. मिरवणूक व हरताळ यशस्वी करून दाखविण्यासाठी श्री. केशवराव शालीग्राम व श्री. रतनलालजी काळे वगैरे मंडळींनी बरेच परिश्रम घेतले होते. या मिरवणूकीत भाग घेता यावा म्हणून नगरपालिकेने शाळांना व ऑफिसला सुटी दिली होती.

दि. २४ नोव्हेंबर रोजी महिला समाजाची ब्रम्हविद्या मंदिरात सौ. मनुताई खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून लालाजींना श्रद्धांजली वाहण्यात आली.

किंग एडवर्ड कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दि. २९ नोव्हेंबर रोजी प्रो. सुरे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरवून लालाजींचे मृत्यूबद्दल श्री. बाळासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी आणलेला दुखवटचाचा ठराव मंजूर करण्यात आला.

युवक संघाने 'लाला लजपतराय दिन' म्युनिसिपल शाळेत व्याख्याने देऊन व लालाजींचे फोटो वाटून साजरा केला तर बॉय स्काऊट संस्थेने आपला ध्वज अर्धा उतरवून दुखवटचाची सलामी दिली. याप्रसंगी श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले.



वऱ्हाड जमीन महसूल कायद्याचे व्यंग्य चित्र.

काळीचा काळा दिन : मध्यप्रांत सरकारने दि. १ नोव्हेंबर १९२८ पासून वऱ्हाडला 'वऱ्हाड जमीन महसूल कायदा' लागू केला होता. वऱ्हाडचे लोकमत लाथाडून, रयतेच्या नैसर्गिक हक्कावर हचा जमीन महसुल कायद्याने

गदा घातली, त्यासाठी निषेध म्हणून दि. १ दिसेंबर १९२८ रोजी वऱ्हाडभर निषेध सभा व हरताळाचे आवाहन करण्यात आले होते.

उमरावती येथे नगर काँग्रेस कमेटीचे विद्यमाने श्री. अण्णासाहेब देशपांडे वकील यांच्या अयक्षतेखाली, दि. १ दिसेंबर रोजी सायंकाळी साडे सहा वाजता जोग चौकात जाहीर सभा होऊन, मालकाळीच्या (जमीन महसूल कायद्याच्या) नव्या कायद्याचा व त्या कायद्याचे समर्थन करणाऱ्या वर्तमानपत्रांचा आणि व्यक्तींचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला.

या ठरावावर श्री. बामणगावकर, संपादक 'उदय', श्री. हिरूरकर वकील व श्री. भोळे यांची भाषणे झाली होती.

उमरावती नगरपालिकेचे सभेत पोलिस : दि. २२ नोव्हेंबर १९२८ रोजी नगराध्यक्ष श्री. केतकर यांचे अध्यक्षतेखाली नगरपालिकेची आमसभा 'नेहरू योजने' चे विषयाचा विचार करण्यासाठी भरली तेव्हा, या विषया वरील वादविवाद आणि ठराव ऐकण्यासाठी लोकांची खूप गर्दी झाली होती. त्यादेळी म्यु तर्फे पोलिसांना पाचारण करण्यात आले होते. नगरपालिकेचे तो पावेतोचे इतिहासात, म्यु. सभेचे वेळी पोलिस बोलावण्याचा हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा.

'नेहरू योजना' या विषयावरील ठराव जरी एकमताने मंजूर करण्यात आला तरी त्यांतील 'स्वातंत्र्य' शब्दाबद्दल खुलासे प्रतिखुलासे वगैरेमुळे सभेला एक प्रकारे तंग वातावरणाचे स्वरूप आले होते. शेवटी पोलिस पहाऱ्यात ही सभा पार पडली होती.

वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद : दि. १६ डिसेंबर १९२८ रोजी 'वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद', बॅरि. ई. एम्. जोशी (सर मोरोपंतांचे चिरंजीव) यांच्या अध्यक्षतेखाली उमरावती येथे भरली होती. त्याच वेळी 'अस्पृश्य महिला परिषद' ही कु. कृष्णाबाई खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.[१]

हया परिषदा खोलापुरी गेट जवळ भरल्या होत्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खास अनुयायी श्री. संपतराव गणपतराव नाईक (उमरावती) यांच्या प्रयत्नाने हया परिषदा भरल्या होत्या.

---

१ उदय : दि. १८ दिसेंबर १९२८

सर मोरोपंत जोशी यांचे चिरंजीव बॅरिस्टर एकनाथपंत उर्फ आबासाहेब जोशी हे या परिषदेचे अध्यक्ष होते, हेच या परिषदेचे वैशिष्ठ्य होते. त्यांनी या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले म्हणून सनातन्यांनी त्यांचेवर बरीच टीका केली होती[1].

दि. १७ डिसेंबर १९२८ रोजी श्री शिवाजी व्यायाम शाळेचा तृतीय वार्षिकोत्सव आचार्य कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. त्याच प्रमाणे त्याच दिवशी रात्री त्यांचे 'खादी व अर्थशास्त्र' या विषयावर प्रश्नोत्तरात्मक व्याख्यानही झाले होते.

बॉय स्काऊट रॅली : दि. २० डिसेंबर १९२८ रोजी उमरावतीत बॉय स्काऊटचे 'विदर्भ संमेलन' भरविण्यात आले होते. सकाळी दुसऱ्या वर्गाच्या बाल चमूचे जे सामने झाले त्यात उमरावती, यवतमाळ व वणी येथील पथकांनी अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसरे बक्षिस मिळविले.

दुपारी दोन वाजता ना. श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते ध्वजारोपण समारंभ झाला. त्यावेळी ना. दादासाहेबांना ७५० बाल चमूंनी सलामी दिली. सायंकाळी ना. दादासाहेबांच्या हस्ते आकोला बाल चमूंना डिस्ट्रिक्ट सिव्हिल इन्स्पेक्टर ह्यांनी जरीचे निशाण बक्षिस दिले. ह्या रॅलीचा विशेष हा होता की, उमरावती असोसिएशनने निर्माण केलेले नवे निशाण राष्ट्रीय आहे, पण यंदा नवे निशाण करण्यात आले. या निशाणात पूर्वीच्या होमरूल निशाणाची कल्पना आहे. एका बाजूस स्टार ऑफ इंडिया, दुसऱ्या बाजूस गुलाबी रंगात स्काऊट चिन्ह, तिसऱ्या टोकास हिरव्या रंगावर चांद तर चवथ्या टोकास भगव्या रंगावर उगवता सूर्य, जरीचे स्वस्तिक व बाण असा देखावा. सर्वत्र जरीची किनार असल्यामुळे ते शोभीवंत दिसत असे. ही कल्पना बॅरि. जोशी आणि डॉ. म्हैसाळकर यांची होती.

ह्या संमेलनात आग विझविण्याचा प्रयोग उमरावती स्काँऊटने चांगल्या प्रकारे करून दाखविला होता. ह्या बाल चमूंत उमरावती हनुमान व्या. शाळा व महाराष्ट्र व्या. शाळेतील अनुक्रमे ३२ व १६ विद्यार्थी

---

१ : श्री. आनंदराव लढके यांची आठवण.

शिक्षण घेत होते. उमरावतीत बाल चमूंच्या चळवळीस व्यापक स्वरूप येऊ लागले असून या चळवळीची भरभराट होत होती.

कलकत्ता काँग्रेसमध्ये उमरावतीच्या खेळाडूंचा लौकिक.

भारतीय राष्ट्रीय महासभेच्या कलकत्ता येथे पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ डिसेंबर १९२८ पासून भरलेल्या अधिवेशनात उमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम शाळेचे खेळाडूंनी आपल्या नेत्रदीपक खेळांनी सर्वांनाच चकित केले व लौकिक संपादन केला होता. ही उमरावतीला भूषणास्पद गोष्ट आहे.

डॉ. शिवाजीराव पटवर्धनांनी फोर्ड मोटार अडविण्याचा व साखळदंड तोडण्याचा, प्रकृती चांगली नसताही, प्रयोग करून दाखविला व सन्मानाच्या टाळ्या मिळविल्या होत्या.

परिशिष्ट–१

उमरावतीचा महिला समाज : उमरावतीचा हा महिला समाज १९२६ साली स्थापन झाला होता. सुरूवातीला या समाजाचे कार्य, सर्व साधारण बायकांना एकंदर देशस्थिती विषयी माहिती देणे व दर शनिवारी सामाजिक बाबींवर चर्चा करणे एवढेच असे. दरवर्षी गणेशोत्सव, कोजागिरी व संक्रांतीचे हळदीकुंकू हे तीन समारंभ समाज करीत असे.

नंतर १९२७ मध्ये समाजातर्फे एक शिवण शिक्षणाचा वर्ग दर बुधवारी सुरू करण्यात आला होता. समाजाचे नियम पुढील प्रमाणे होते. (१) सर्व जातींच्या कुलीन स्त्रियांना समाजाचे सभासद होता येई. (२) समाजाची वर्गणी दोन आणे, चार आणे, आठ आणे व एक रुपया अशी असे. (३) दर शनिवारी समाजात व्याख्यान, निबंधवाचन. अगर वादविवाद असा कार्यक्रम असे. (४) दर बुधवारी शिवणे, बेतकाम व विणकाम, हया सदराखाली लोकर सूत वगैरे सर्व तऱ्हेची कामे येत.

संस्थेचे कार्यकारी मंडळ, १९२९

अध्यक्ष–सौ. ताई ब्रम्ह, उपाध्यक्ष–सौ. सावित्रीबाई भ , खजिनदार–सौ. सत्यभामाबाई जोशी, चिटणीस–सौ. रमाबाई निमदेवकर व सौ. कमलाबाई शहाणे.

समाजातर्फे शिशुसंगोपन संस्थेला दरमहा चार रुपयांची मदत दिली जात असे आणि दर महिन्यातून एक दिवस आरोग्यावर माहिती दिली जात असे. दर शुद्ध एकादशीला भजन अगर किर्तन ठेवले जाई.

केवळ शिवण वर्गाचे सभासद होण्याचीही सवलत होती व वर्गणी देण्याचे सामर्थ्य नसलेल्या भगीनींना सभासद करून घेण्याचीही सवलत या समाजाने ठेवली होती[१].

उमरावतीत समाजसेवा करणाऱ्या स्त्रियांच्या संस्थामध्ये वनिता समाजानंतर हा महिला समाज उत्तम प्रकारे कार्य करू लागला होता असे दिसून येते. परंतु स्त्रियांच्या सामाजिक हक्काचा आवाज मात्र वरील दोन्ही संस्थांनी या कालापावेतो उठवलेला नव्हता हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. (उमरावतीचे 'स्त्री–जीवन' हयाबद्दलची माहिती भाग २ चे परिशिष्टात दिली आहे.)

---

१ : उदय : दि. ११ डिसेंबर १९२८

इसवी सन १९२९

वऱ्हाड कायदे कमिटी : दि. ३ जानेवारी १९२९ रोजी 'वऱ्हाड कायदे कमिटीची' सभा उमरावती जिल्हा कौन्सिलचे दिवाणखान्यात, श्री. सर शंकरराव चिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सरकारतर्फे ना. नेल्सन्, ना. ई. राघवेंद्रराव, वऱ्हाडचे कमिश्नर मि. डे., रा. ब. ब्रम्ह, इत्यादी मंडळी हजर होती आणि या कमेटीवरील १७ लोक-प्रतिनिधीपैकी दहा जण शेवटपर्यंत हजर होते. ही बैठक अर्ध्या तासातच संपविण्यात आली होती.

वऱ्हाडचा 'कोर्ट ऑफ वार्डस्' कायदा, जो सिलेक्ट कमेटीकडून आला तो तसाचे तसाच सरकार पक्षास मान्य असल्यामुळे वादच नव्हता. त्यामुळे या कायद्याचे काम लागलीच आटोपले. कॉटन मार्केट बिल मात्र वादग्रस्त होते. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी कॉटन मार्केट कमेटीत असावे असे श्री. कोल्हे यांनी सुचविले होते. राव यांचा हयास विरोध होता. त्यांनी ते लोकमत अजमावण्यासाठी प्रसिद्ध करण्याचे ठरविले. एवढे कामकाज होऊन कमेटीची बैठक संपली होती.

उमरावतीचे मुक्कामात ना. ई. राघवेंद्रराव यांनी श्री हनुमान व्यायाम शाळेसही भेट दिली होती.

विदर्भ साहित्य संघ : दि. ७ जानेवारी १९२९ रोजी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात विदर्भ साहित्य संघाचे विद्यमाने भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांचे, ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत मनोरंजक असे व्याख्यान झाले होते.

'अनुच्चारित अनुस्वार काढावेत, पण अनुच्चारित कोणते ?' असा प्रश्न उत्पन्न करून, 'शिष्टसंमत नसलेले अनुस्वार काढावेत.' असे त्यांनी प्रतिपादन केले होते.

त्यानंतर कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे, श्री. हिर्लेकर शास्त्री, आणि श्री. जोशी यांचीही त्याच विषयावर भाषणे झालीत. शेवटी अध्यक्षांनीही मनोरंजक रीतीनेच समारोप केला होता.

प्रो. दिवेकर : योग शक्तीचे प्रयोग करून दाखविणारे प्रो. दिवेकर यांनी, चितेत जाळून घेणे, विष प्राशन करणे, स्टीम रोड रोलर छाती-वरून नेणे, इत्यादी अद्‌भुत प्रयोग, हनुमान व्या. प्र. मंडळाच्या मदतीसाठी केले होते. या तीनही प्रयोगास चिक्कार गर्दी होती.

प्रो. दिवेकर यांनी विदर्भ साहित्य संघ व हनुमान व्या. शाळेला, अनुक्रमे एक हजार व तीस हजार रुपये देणगी देण्याचे अभिवचन दिले होते.

विद्यार्थी संपास पाठिंबा : अहमदाबादच्या विद्यार्थ्यांचे संपाला पाठिंबा देण्यासाठी दि. ३० जानेवारी १९२९ राजी जोग चौकात, युवक संघातर्फे डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली व मुख्य ठरावावर श्री. भोळे, डॉ. भोजराज, व श्री. बामणगावकर यांची आणि इतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली होती.

उमरावतीचे रेल्वे स्टेशन हटवा : "उमरावती शहर वाढत असून रहदारीही फार वाढली आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशन हे शहराच्या मध्यभागी येऊन रहदारीस अडथळा होऊ लागला आहे. शिवाय उमरावती–नरखेड रेल्वे होत असल्याने ह्या स्टेशनचा व्याप वाढेल व रहदारीही वाढेल आणि त्यामुळे स्टेशन रहदारीस अधिकच तापदायक होईल. म्हणून हल्लीचे स्टेशन हलविणे व ते रेल्वेचे मुख्य मार्गावर येईल अशी व्यवस्था करून बसविणे अगत्याचे व शहराच्या सर्व प्रकारच्या सोयीचे होईल" अशी सूचना साप्ताहिक 'उदय' मधून दि. १२ फेब्रुवारी १९२९ ला केली होती.

एक लक्ष नमस्कार : उमरावतीच्या राष्ट्रवीर संघाने आपल्या दास नवमी उत्सवात दहा दिवस पर्यंत सतत पहाटे येऊन, १५० मुलांनी एकलक्ष नमस्काराचे पुरश्चरण समर्थ चरणी अर्पण केले होते.

भाषावार प्रांत रचनेचा श्री. खापर्डे यांचा ठराव.

मध्यप्रांत–वऱ्हाडच्या कायदे मंडळाच्या जानेवारीत भरलेल्या बैठकीत जे बिनसरकारी ठराव चर्चेस होते, त्यांत 'वऱ्हाड–मध्यप्रांताची मराठी व

हिंदी अशी भाषावार प्रांत रचना करावी' असा श्री. बाबासाहेब खापर्डे यांचा ठराव पुढे येऊन "त्यावर हिंदी विभाग काय म्हणतो व सरकार काय म्हणते हे कळले, हेच आज त्याचे महत्त्व होय. कारण भाषावार प्रांत रचनेचा प्रयोग आज ना उद्या, केव्हा ना केव्हा तरी अमलात येणे जरुरीचे आहे, हे सर्वांसच पटत असल्यामुळे विचार प्रदर्शनाला ज्या ठरावाने संधी मिळाली तो भावी परिस्थितीचे दृष्टीने सुद्धा महत्त्वाचा आहे." अशी प्रतिक्रिया त्यावेळी व्यक्त केल्या गेली होती. मध्यप्रांत कौन्सलमध्ये आलेला अशा तऱ्हेचा हा बहुधा पहिलाच ठराव असावा.

महात्मा गांधींचे अभिनंदन : दि. १० मार्च १९२९ रोजी, उमरावती जिल्हा काँ. कमिटीच्या विद्यमाने जोग चौकात, श्री. शेठ पन्नालालजी सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून कलकत्ता येथे महात्मा गांधीवर जो खटला उभारण्यात आला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. ह्या अभिनंदनाच्या ठरावावर श्री. हरिहर वामन देशपांडे, डॉ. सोमण, व श्री. वाटवे शास्त्री इत्यादींची भाषणे झाली. याच सभेत श्री. बामणगावकर यांचे 'राष्ट्रीय सभेचा संदेश' या विषयावर व्याख्यानही झाले होते.

उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटी : इ. स. १९२९ सालासाठी डॉ. भोजराज हे अध्यक्ष, श्री. राधावल्लभ लढ्ढा व श्री अण्णासाहेब कलोती हे उपाध्यक्ष, डॉ. पातुरकर व श्री. त्र्यंबकराव जोशी वैद्य हे चिटणीस याप्रमाणे निवड करण्यात आली होती.

कार्यकारी मंडळात सर्वश्री शेठ पन्नालालजी सिंघई, श्री. बामणगावकर, डॉ. पटवर्धन, वैद्य मुळे, श्री. ब. ग. खापर्डे, श्री. वा. वा. भोळे, श्री. ग. बा. दुर्गे, श्री. ना. प्र. हिरूरकर वगैरे मंडळी घेण्यात आली होती.

एकाच वेळी दोन सर्कशींचा उमरावतीत मुक्काम : कार्लेकर ग्रँड सर्कस आणि प्रो. परशराम सर्कस या दोन नामांकित सर्कशींचा मुक्काम जानेवारीचे पहिल्या आठवड्यापर्यंत उमरावतीला होता. पैकी कार्लेकर सर्कस नेकोलेट पार्कवर तर प्रो. परशराम सर्कस अंबापेठच्या ग्राऊंडवर होती.

दोन्ही सर्कशीला तुफान गर्दी राहत असे.

स्वदेशी व बहिष्कार दिन : जिल्हा काँ. कमिटीचे विद्यमाने दि. १७ मार्च १९२९ रोजी रविवारी जोग चौकात सायंकाळी श्री. बाबासाहेब

खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, तींत स्वामी शिवानंद हयांचे पद्यगायन, व स्वामी शीतल प्रसादजी, श्री. बामणगावकर, पं. सत्यदेव आणि डॉ. भोजराज यांची 'स्वदेशी व बहिष्कार' या विषयावर भाषणे झाली होती.

उमरावती नगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम : उमरावती नगरपालिकेच्या शाळांनी शिमग्यात विद्यार्थ्यांचे शारीरिक खेळ व त्यांची भाषणे करून त्यांना बक्षिसे देण्याचा स्तुत्य उपक्रम यावर्षी सुरू केला व विद्यार्थ्यांना शिमग्याच्या बीभत्स प्रकारापासून दूर ठेवले होते.

फिचर बाजार : 'उमरावतीत चालू वर्षी फिचर नावाचा जुगार फार जोरात सुरू असून त्यामुळे पुष्कळ लोक या नादाने बुडू लागले आहेत. सरकार व पोलिसने त्याकडे लक्ष द्यावे' अशी तक्रार मार्च १९२९ मध्ये प्रसिद्ध झाली. यावरून फिचर हा प्रकार या काळात येथे मोठ्या प्रमाणात असावा.

कॅम्प नगरपालिकेची नवी इमारत : कॅम्प नगरपालिकेच्या कार्यालयाच्या नव्या इमारतीचे अनावरण, दि. २४ मार्च १९२९ रोजी ना. तांबे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वा. झाले होते.

ह. भ. प. गाडगेबुवा : दि. २९ मार्च १९२९, तारखेडा येथील श्री. हरिश्चंद्र पाटील यांच्या घरासमोर ह. भ. प. गाडगेबुवा यांचे आठ-नऊ हजार लोकासमोर कीर्तन झाले होते.

विदर्भ साहित्य संघ : विदर्भ साहित्य संघाने यावर्षी एक नवा उपक्रम सुरू करून व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. पहिले व्याख्यान श्री. चिंतामणराव वैद्य यांचे झाले तर शेवटचे व्याख्यान येथील व्यासंगी वकील, श्री. ना. प्र. हिरूरकर यांचे 'नाटकाचे साध्य व साधन' या विषयावर झाले. ह्या मालेत परगावच्या व स्थानिक विद्वानांची भाषणे झालीत. वादविवादही मनोरंजक व बोधप्रद झाला होता. उमरावतीला हा उपक्रम नवीनच होता.

दडपशाहीचा निषेध : दि. २८ मार्च १९२९ रोजी सायंकाळी, जिल्हा कॉं. कमेटीतर्फे जोग चौकात श्री. केतकर वकील यांच्या

अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध करण्यात आला होता.

राष्ट्रीय सप्ताह : जिल्हा काँग्रेसचे नवे चिटणीस डॉ. पातुरकर व वैद्य त्रिंबकराव जोशी यांचे प्रयत्नाने बंद पडलेला राष्ट्रीय सप्ताह यावर्षी दि. ६ एप्रिल ते १३ एप्रिल पावेतो पाळण्यात येऊन, त्यानिमित्त शहराच्या निरनिराळ्या भागात जाहीर सभा घेण्यात आल्या होत्या. या सभांतून सर्वश्री गुलाबराव बक्षी, संभाजीराव गोखले, डॉ. सोमण, वीर वामनराव जोशी, डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज, सेठ पन्नालालजी सिंघई, श्री. बामणगावकर यांची भाषणे झाली होती.

या काळातच राष्ट्रीय सभेचे कार्याच्या प्रचारार्थ वीर वामनराव जोशी व श्री. बामणगावकर यांनी मोर्शी तालुक्याचा दौरा केला होता.

राजपाल यांना श्रद्धांजली : 'रंगिला–रसुल' या पुस्तकाचे मुद्रक व प्रकाशक महाशय राजपाल यांचा लाहोरला भर दिवसा एका मुसलमान तरुणाने खून केला त्याबद्दल, खुनाचा निषेध करून राजपाल यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. ११ एप्रील रोजी आर्य समाज मंदिरात डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन सर्वश्री डॉ. भोजराज, डॉ. सबनीस व स्वामी विमलानंद यांची भाषणे झाली होती.

त्याच दिवशी रात्री जोग चौकात युवक संघाचे विद्यमाने जाहीर सभा झाली. तीत वीर वामनराव जोशी आणि श्री. बामणगावकर यांची तरुणांना राष्ट्रीय संदेश देणारी स्फूर्तिदायक भाषणे झाली होती.

पं. मदनमोहन मालवीय यांचे आगमन

पं. मदनमोहन मालवीयजी एप्रीलच्या शेवटच्या आठवड्यात उमरावती येथे श्री. माधवरावजी अणे यांचे सोबत आले होते. त्यांचा मुक्काम सर मोरोपंत जोशी यांचेकडे होता.

त्याच दिवशी सायंकाळी उमरावती नगरपालिकेतर्फे पं. मालवीयजींना मानपत्र अर्पण करण्याचा समारंभ झाला. या समारंभासाठी नगरपालिकेचे कार्यालयावर विजेच्या दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती. नगराध्यक्ष

श्री. केतकर यांनी मानपत्र वाचून दाखविले आणि ते चांदीच्या करंड्यातून मालवीयजींना अर्पण करण्यात आले. श्री. मुजफ्फर हुसेन यांनी आभाराचे भाषण केले. या समारंभाला ना. दादासाहेब खापर्डे व इतर प्रतिष्ठित मंडळी हजर होती व लोकांचीही खूप गर्दी झाली होती.

रात्री ९ वा. जोग चौकात हिंदुमहासभेतर्फे ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली मालवीयजींना, शेठ पन्नालालजी सिंघई यांचेहस्ते मानपत्र देण्यात आले होते. या समारंभालाही लोकांची अतोनात गर्दी झाली होती. यावेळी पं. मालवीयजी यांचे भाषण झाले.

वरील समारंभापूर्वी पं. मालवीयजींनी, महाराष्ट्र व्यायाम शाळा, गोरक्षण संस्था व हनुमान व्यायाम शाळेला भेट दिली होती. हनुमान व्या. शाळेत त्यांचे शारीरिक शिक्षणावर भाषणही झाले. महाराष्ट्र व्या. शाळेचा पहिला वाढदिवस समारंभही त्यांचे अध्यक्षतेखाली झाला. पं. मालवीयजी त्याच दिवशी रात्री श्री. अणे यांचेसह यवतमाळला रवाना झाले होते.

श्री. पाचलेगावकर महाराज : दि. २६ एप्रील रोजी संत पाचलेगावकर महाराजांचे जोग चौकात श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुसभेतर्फे जाहीर व्याख्यान झाले होते. सभेला दोन हजार लोक उपस्थित होते.

याप्रसंगी विषारी सर्प चावून दाखविण्याचा प्रयोग महाराजांनी करून दाखविला होता. याशिवाय खाजगी तऱ्हेने यथील प्रसिद्ध डॉक्टरांशी चर्चा करून महाराजांनी खात्री पटविली होती.

स्वातंत्र्य दिन : युवक संघातर्फे दि. १० मे रोजी रात्री जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली मे–स्वातंत्र्य–दिन साजरा करण्यात आला.

स्वामी शिवानंद यांचे वंदेमातरम् हे गीत झाल्यानंतर श्री. बामणगावकर, श्री. संभाजीराव गोखले, डॉ. सोमण, डॉ. भोजराज व श्री. जोशी आणि श्री. रामण्णा यांची भाषणे झाली होती.

याच प्रसंगी प्रियबंधु समाजातर्फे पोवाडेही झाले. लोकसमुदाय दोन हजार होता.

महात्मा बसवेश्वर जयंती : वीरशैव शिक्षण प्रसारक मंडळातर्फे वैशाख शु. तृतीयेस, बसवेश्वर चौकात एलिचपूरचे नायब तहसीलदार श्री. जतकर बी. ए. यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी श्री. दादा नागपूरकर यांचे प्रवचन, श्री. गाढवे यांचे पद्यगायन व सर्वश्री हेगू, कापसे, कल्याणकर, आवंके आणि श्री. बामणगावकर यांची भाषणे झाली होती.

श्री प्रताप जयंती : हिंदुसभा व आर्य समाजातर्फे दि. १० जुन १९२९ रोजी स्वामी शिवानंद यांच्या अध्यक्षतेखाली महाराणा प्रताप जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्त श्री. जोशी, डॉ. भोजराज व डॉ. पटवर्धन यांची व्याख्याने झाली होती.

झेंडा वंदन व जाहीर व्याख्यान : दि. ३० जून १९२९ रोजी सकाळी, जिल्हा कॉं. कमेटीचे विद्यमाने वीर वामनराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली, हनुमान व्या. शाळेचे पटांगणात झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला.

त्याच दिवशी सायंकाळी गणेश नाटकगृहात वीर वामनराव यांचे अध्यक्षतेखाली, जिल्हा कॉं. कमेटीतर्फे जाहीर सभा होऊन, श्री. संभाजी विनायक गोखले, श्री. बामणगावकर, श्री. जोशी, श्री. गांधी, श्री. बच्चू महाराज इत्यादींची स्वदेशी व कॉंग्रेसचे सभासद वाढविणे यासंबंधी भाषणे झाली होती.

कॉंग्रेस प्रचार : दि. ४ जुलै १९२९ रोजी सायंकाळी सहा वाजता श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाटकगृहात जिल्हा कॉं. कमेटीतर्फे जाहीर सभा होऊन तीत दे. भ. माधरावजी अणे यांचे, 'कलकत्ता कॉंग्रेसचा ठराव आणि कार्यक्रम' या विषयावर, व्याख्यान झाले, सभेला चांगली गर्दी होती. परदेशी कापडावरील बहिष्कार, स्वदेशीला उत्तेजन, विशेषत: खादीचा वापर यांवर व्याख्यात्यांनी भर दिला होता.

सरदार भगतसिंग व श्री. दत्त यांचे अभिनंदन.

दि. १२ जुलै १९२९ रोजी श्री. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाटकगृहात, जिल्हा कॉंग्रेस व युवक संघाचे विद्यमाने जाहीर सभा

सरदार भगतसिंग व श्री. बटुकेश्वर दत्त.

होऊन, दे. भ. सरदार भगतसिंग व श्री. बटुकेश्वर दत्त ह्यांनी जेलमध्ये चालविलेल्या अन्नसत्याग्रहा बद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

याप्रसंगी वैद्य त्र्यंबकराव जोशी, श्री. गुलाबराव बक्षी, डॉ. भोजराज डॉ. पटवर्धन व वीर वामनराव जोशी यांची भाषणे झाली होती.

गव्हर्नराचे मानपत्रास जनतेचा विरोध : उमरावती नगरपालिकेत गव्हर्नरास मानपत्र द्यावे असा प्रश्न अकस्मात उत्पन्न झाल्यामुळे, तो प्रयत्न करणारांचा निषेध करणारा व देऊ नये असे स्पष्ट मत दर्शविणारा ठराव, दि. १२ जुलै १९२९ रोजी रात्री गणेश नाटकगृहात, श्री. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली, उमरावती म्युनिसिपल रिफार्म असोसिएशनच्या विद्यमाने भरलेल्या जाहीर सभेत पास करण्यात आला होता.

या ठरावावर श्री. गुलाबराव बक्षी, श्री. मोतीसावजी आणि श्री. बामणगावकर यांची भाषणे झाली होती.

नाटककारांचा गौरव : संगीत धर्म–सिंहासनच्या पहिल्या प्रयोगाचे वेळी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या हस्ते, नाटककार दे. भ. वीर वामनराव जोशी यांचा, नाट्यकला प्रवर्तक मंडळीने योग्य असा गौरव केला होता. 'धर्म–सिंहासन' हे वीर वामनराव यांचे नाटक, नाट्यकला प्रवर्तक संगीत मंडळीने उमरावतीत प्रथमच, दि. १९ जुलै रोजी रंगभूमीवर आणले होते. पहिल्या प्रयोगाचे वेळी ना. दादासाहेब खापर्डे हे अध्यक्ष होते.

गव्हर्नर उमरावतीत : मध्यप्रांत वऱ्हाडचे गव्हर्नर मि. बटलर यांचा मुक्काम दि. २४ ते २८ जुलै १९२९ पावेतो उमरावतीस होता.

या उमरावतीच्या मुक्कामात गव्हर्नरांना उमरावती जिल्हा कौन्सिल व कॅम्प म्युनिसिपॅलिटीतर्फे मानपत्रे देण्यात आली होती.

गव्हर्नराच्या स्वागतासाठी रेल्वे स्टेशनपासून तो सर्किट हाऊस पावेतोचा रस्ता कमानींनी व ध्वजापताकांनी शृंगारण्यात आला होता.

प्रतिष्ठित नागरिकांतर्फे व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटमध्ये गव्हर्नरांना फलाहार देण्यात आला होता आणि वऱ्हाड सहकारी संघाच्या कचेरी रोडवरील इमारतीचे उद्घाटनही ना. गव्हर्नर यांनी केले होते.

टिळकोत्सव : सालाबादप्रमाणे याही वर्षी ब्रम्हविद्या मंदिरात दि. २६ जुलै ते १ ऑगस्ट पावेतो टिळकोत्सव साजरा करण्यात आला होता. या सप्ताहात सर्वश्री बामणगावकर, डॉ. सोमण, वीर वामनराव जोशी, सौ. चंद्राताई पटवर्धन, शेठ जमनालाल बजाज आणि श्री. बाबासाहेब खापर्डे यांची विविध विषयावर भाषणे झाली होती.

बॅरि. रामराव पुन्हा मंत्री झाले : उमरावतीचे बॅरि. रामराव देशमुख हे मध्यप्रांत वऱ्हाडचे, दि. १ ऑगस्ट १९२९ पासून पुन्हा मंत्री झाले होते. त्यांच्या जोडीला ना. बोस हे दुसरे मंत्री होते. बॅरि. रामराव हे पूर्वी 'राव–रामराव' मिनिस्ट्रीत सुमारे आठ महिने मंत्री होते. पण दोन मंत्र्यांत निर्माण झालेल्या वादामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला होता.

कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांची नियुक्ती : ना. दादासाहेब खापर्डे यांचे कनिष्ठ चिरंजीव कविभूषण श्री. बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे यांची बनारस हिंदु युनिव्हर्सिटीत मराठीचे प्रोफेसर म्हणून या महिन्यात नेमणूक झाली होती.

श्री. अण्णासाहेब हे साप्ताहिक 'उदय'चे सुमारे सात आठ वर्षे संपादक होते. 'काव्य कांतार' हे काव्य, 'गाणे आता कशाचे ?' ही राष्ट्रीय कविता, इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितेवर खूष होऊनच शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) यांनी त्यांना 'कविभूषण' ही पदवी दिलेली होती. या शिवाय विदर्भ साहित्य संघाची स्थापना व जोपासना

अण्णासाहेबांनीच केली आहे. या व्यतिरिक्त त्यांचे इतर विषयांवरील लिखाणही बरेच आहे. थिऑसॉफिकल सोसायटीचेही ते निष्ठावान कार्यकर्ते आहेत.



कविभूषण श्री. अण्णासाहेब खापर्डे

हिंदु युनिव्हर्सिटीमध्ये मराठी अभ्यासाची सोय याच वर्षापासून करण्यात आली होती व त्यासाठीच प्राध्यापक म्हणून अण्णासाहेबांची नियुक्ती करून युनिव्हर्सिटीचे चालक मंडळाने जी गुणग्राहकता दाखविली त्याबद्दल त्यांची प्रशंसा करण्यात आली होती.

उमरावती म्युनिसिपॅलिटी व मानपत्रे : उमरावती म्युनिसिपॅलिटीने (इ. स. १९२९ सालापावेतो) जी मानपत्रे दिलीत ती फक्त महात्मा गांधी, लाला लजपतरॉय, बाबू सुभाषचंद्र बोस आणि पं. मदनमोहन मालवीयजी यांच्या सारख्या अन्य देशसेवकांनाच दिली होती. पण ही

परंपरा सोडून याच वर्षी (१९२९ मध्ये) ना. गव्हर्नरांना मानपत्र देण्याची जी खटपट या म्युनिसिपॅलिटीत केली गेली ती कोणी केली? यावर नागरिकात त्यावेळी फार चर्चा झाली होती.

या नगरपालिकेने ना. गव्हर्नरास (म्हणजे सनदी सरकारी नोकरास) मानपत्र द्यावे असे रिक्विझीशन मुसलमान म्यु. सदस्यांनी दिले होते व रिक्विझीशनवर सही करणारेच तेवढे त्या मिटिंगला हजर राहिले होते. या बाबत नागरिकातून बरीच गरमागरम चर्चा व जाहीर सभाही झाली होती. शेवटी गव्हर्नरांचे मानपत्राचा हा प्रश्न जागच्या जागीच जिरला. तीव्र लोकमतामुळेच हा प्रयत्न फसला होता.

उमरावती नगरपालिका आणि गोवध बंदी : जुलै १९२९ मध्ये उमरावती नगरपालिकेच्या सभेत, एका डिस्ट्रिक्ट बोर्डाकडून आलेल्या पत्रावरून गोवध बंदीच्या सूचनेवर कडाक्याचा वाद निर्माण झाला होता.

म्यु. सभासद डॉ. भोजराज आणि श्री. द्वारकादास यांनी हा प्रश्न धार्मिक नसून, ज्या गाई दुधाच्या व बैल शेतकामाच्या उपयोगी असतील ती गुरे व तीन वर्षा खालील गुरे म्यु. हद्दीतील कसाई खान्यात मारली जाऊ नयेत असे सांगितले, तरीही श्री. मुजफ्फर हुसेन यांनी आपल्या भाषणात हिंदु-मुसलमानातील गोवधासंबंधी व वाद्यासंबंधीच्या धार्मिक बाबीवरील वाद उकरून काढून त्यावर लांबलचक व्याख्यान दिले. व एकंदर आर्थिक स्वरूपाच्या या प्रश्नास अनिष्ट असे धार्मिक रूप दिले होते. त्यामुळे इतर मुसलमान सभासदांनीही तशीच भाषणे देऊन या वादास चिडीचे स्वरूप आणले. त्यामुळे श्री. द्वारकादास या म्यु. सभासदांनीही मग मोहरमातील कानठाळ्या बसविणाऱ्या ढोल ताशांनो त्रस्त न होणारा तुमचा देव आमच्या टाळ मृदंगांनी कसा रागावतो असा रोकडा जबाब मुजफ्फर हुसेन व त्यांचे साथीदारास विचारला. शेवटी बऱ्याच वादविवादानंतर काही सभासदांच्या सूचनेवरून हया प्रश्नांचा विचार तहकूब करण्यात आला होता.

शुद्ध पाण्याचा पुरवठा : जुलै १९२९ पासून, क्लोरीन गॅसने शुद्ध केलेल्या पाण्याचा पुरवठा शहराला होऊ लागला होता. म्यु. सभासद असलेल्या दोन डॉक्टराचे आग्रहामुळे नगरपालिकेला ही व्यवस्था करावी लागली होती.

सन्मित्र मेळा : श्री. माधवराव अग्निहोत्री यांनी १९२९ च्या गणेशोत्सवासाठी सन्मित्र मेळा तयार केला होता. या मेळ्याचे कार्यक्रम भुसारी गेट, पोष्ट, जुगलकिशोर, बारदान बाजार इ. ठिकाणच्या गणेशोत्सवात झाले होते.

हुतात्मा यतिन्द्रनाथ दास

स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर यतीन्द्राची आत्माहुती.

उमरावतीत कडकडीत हरताळ व प्रचंड मिरवणूक.

भारत मातेचा सुपुत्र, बंगालचा, लाहोर कटाचा आरोपी जतींद्रनाथदास हा त्रेसष्ट दिवसाचे अन्न सत्याग्रहानंतर, दि. १३ सप्टेंबर १९२९ रोजी अखेर



चित्र क्र. १४१ : कविभूषण बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे (पृष्ठ ६०९ पहा)
यांची दोन छायाचित्रे.

इ. सन १९२७ इ. स. १९३१, प्राध्यापक झाले तेव्हा



चित्र क्र. १४२ : (पृष्ठ ६०५ पहा)
डे. भ. पं. मदनमोहन मालवीय

चित्र क्र. १४३ : दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस (पृष्ठ ६१८ पहा)
दि. १ दिसेंबर १९२९, उमरावतीस पुन्हा भेट.

हुतात्मा झाला. त्यांच्या पंजाब जल मधील आत्माहुतीचे हे वृत्त बाहेर येताच सर्व देशभर हरताळ पडला.

दि. १९ सप्टेंबर १९२९ रोजी हुतात्मा जतींद्रनाथदास यांचे निधनानिमित्त उमरावतीतही कडकडीत हरताळ पडला होता. सर्व शाळा कॉलेज, बाजार बंद होते. सर्व शहर यतींद्राच्या जयजयकाराने दुमदुमून गेले होते. सर्व धर्मांचे, सर्व पक्षांचे, सर्व संस्थांचे व पंथांचे पुढारी पुढे सरसावले होते. हरताळ पाळा अशी या सर्वांनीच विनंती केली होती. तरुणांनी त्या दिवशी कडकडीत उपवास केला होता. सायंकाळी साडे पांच वाजता जोग चौकातून हुतात्मा जतींद्राच्या फोटोची मोटारीतून प्रचंड मिरवणूक निघाली. शोक निदर्शक काळी निशाणे मिरवणुकीत होती. स्वातंत्र्याचा सारखा जयजयकार होत होता. 'साम्राज्यशाही नष्ट होवो क्रांती चिरायू होवो' अशा गगनभेदी गर्जना सुरू होत्या. त्याच अर्थाच्या घोषणा–फलकेही मिरवणुकीत होती. सात–आठ हजार लोकांची ही मिरवणूक अत्यंत शिस्तीने व शांततेने निघाली होती. मिरवणुकीत कोणाच्याही डोक्यावर टोपी नव्हती. सर्व लोक बोडक्या डोक्यानेच मिरवणुकीत सामील झाले होते. मिरवणुकीत भगिनी वर्गानेही आस्थापूर्वक भाग घेतला होता. सुमारे दोन तास ही प्रचंड मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांनी फिरून रात्री ८ चे सुमारास परत जोग चौकात आली. तेथे तर माणसांचा नुसता समुद्र पसरला होता. बेसुमार गर्दी उसळली होती. जोग चौकात हुतात्मा जतींद्रांची प्रतिमा लोकांचे दर्शनार्थ उच्च स्थानी ठेवण्यात आली. तिला निरनिराळ्या संस्थांनी पुष्पहार घातले. भगिनी वर्गातर्फे सौ. मनुताई खापर्डे यांनी यतीन्द्रनाथास ओवाळले व त्याचे पूजन केले.

नंतर तेथेच दे. भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली. बॅरि. जोशी, बॅरि. मुधोळकर, शेठ पन्नालालजी, श्री. चौबे, बॅरि. काणे इत्यादी वक्त्यांनी सभेचा उद्देश समजावून सांगितला. स्वामी शिवानंदांनी प्रसंगोचित काव्य म्हटले. नंतर यतींद्राच्या आत्मत्यागाचे अभिनंदन करणारा, त्यांच्या देहविसर्जनाबद्दल दुःख व्यक्त करणारा आणि तरुणांनी आदर्शभूत हो म्हणून प्रार्थना करणारा ठराव डॉ. सोमण यांनी मांडला. त्यावर श्री. शर्फुद्दीन वकील, सौ. चंद्राताई पटवर्धन, श्री. बाबासाहेब खापर्डे, डॉ. पटवर्धन, डॉ. सोमण व अध्यक्ष वीर वामनराव यांची भाषणे झाली.

ठराव पास झाला. सभा संपली. सर्व लोक जड अंत:करणाने घरोघर परतले. सर्वत्र यतींद्राचा जयजयकार झाला.

यतींद्रनाथ दासाचे या मिरवणुकीपुढे त्याच दिवशीचा गणपती विसर्जनाचा सोहळा फिका पडला. कारण सारा तरुणवर्ग या मिरवणुकीत सामील झाला होता. उमरावती शहरात झालेली हुतात्मा जतींद्रनाथ दासाचे प्रतिमेची ही प्रचंड मिरवणूक, कडकडीत हरताळ आणि अती भव्य जाहीर सभा, सर्वच अभूतपूर्व होते[१].

उमरावती नगरपालिकेनेही स्व. जतींद्र यांस श्रद्धांजली अर्पण केली होती.

मराठीचा हिरा हरपला : दुखवटयाची सभा : महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध देशभक्त, फर्डे वक्ते व लेखक, 'काळ' पत्राचे संपादक, शिवराम महादेव उर्फ अण्णासाहेब परांजपे (पुणे) हे दि. २७ सप्टेंबर १९२९ रोजी निधन पावले. त्या बद्दल उमरावतीत श्री. संभाजीराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून दुखवटयाचा ठराव पास करण्यात आला होता.

महात्मा गांधी हीरकोत्सव : दि. २ आक्टोबर १९२९ रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली म. गांधी हीरकोत्सवानिमित्त जाहीर सभा होऊन तीत, श्री. हरिहरराव देशपांडे, श्री. केशवराव शालीग्राम, श्री. गुलाबराव बक्षी, श्री. बामणगावकर, सौ पार्वतीबाई पटवर्धन व

---

१ : **जतींद्रनाथ दास :** (जन्म १९०४, मृ. १३ सप्टेंबर १९२९) त्यांनी शिक्षण सोडले व देशसेवा पत्करली. दक्षिण बंगाल जेव्हा महापुराच्या आपत्तीत सापडला तेव्हा गरीब आणि अनाथ लोकासाठी हा तरुण झिजला. बंगालात राष्ट्रीय सभेच्या कार्यासाठी कायदेभंग करून दोनदा तुरुंगवास पत्करला होता. त्याने तरूण समिती या संस्थेस जन्म दिला व ते कार्य जीवेभावे करीत असता बंगाल ऑर्डिनेन्स खाली त्यास १९२५ साली पकडले व अनेक तुरुंगात त्यांचे हाल हाल केले. शेवटी तुरुंगाधिकाऱ्याशी भांडण करावे लागले व २३ दिवस अन्न सत्याग्रह केला. दि. १४ जुन १९२९ इ. रोजी त्यांस लाहोर कटातील गुन्हेगार म्हणून पुन्हा पकडण्यात येऊन लाहोर जेलमध्ये डांबण्यात आले. जेलमध्ये हिंदी व युरोपीयन कैद्यांना जी वेगवेगळी वागणूक दिली जाते त्याविरूद्ध त्याने ६३ दिवसाचा अन्न–सत्याग्रह केला व त्यातच जतींद्रनाथ हुतात्मा झाला.

डॉ. सोमण यांची भाषणे झालीत व हा दिवस थाटाने व उत्साहाने साजरा करण्यात आला होता.

श्री. सतींद्रसेन यांचे अभिनंदन : श्री. सतींद्रसेन यांनी सुरू केलेल्या अन्न-सत्याग्रहाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी, उमरावती जिल्हा काँ. कमिटी-तर्फे, दि. ६ ऑक्टोबर रोजी श्री. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा होऊन सतींद्राच्या जयजयकारांत अभिनंदनाचा ठराव पास झाला. या ठराबावर सर्वश्री डॉ. पटवर्धन, श्री. त्र्यंबकराव जोशी, वगैरेची परिणामकारक भाषणे झाली होती.

दसरा : सालाबाद प्रमाणे १९२९ सालचा दसरा-उत्सव उमरावतीत आनंदाने पार पडला. दरवर्षीप्रमाणे श्री. अंबेचे पालखीसोबतच छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक, मराठा हायस्कूल मधून निघून बंसीबागेपर्यंत गेली व सायंकाळी बंसीबागेतच श्री. चौबळ यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, श्री. बामणगावकर, बॅरि. बागवे, स्वामी शिवानंद व श्री. शालीग्राम ह्यांची व्याख्याने झाली. व्याख्यानानंतर मराठा हायस्कूलमधील यशस्वी खेळाडूंना अध्यक्षांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली होती.

राष्ट्रीय निशाण : उमरावती नगरपालिकेच्या, दि. १३ ऑक्टोबर रोजी भरलेल्या सभेत श्री. व्दारकाप्रसाद मिश्र ह्यांनी नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण उभारावे असा ठराव आणला होता. उपाध्यक्ष श्री. हिदायतअली ह्यांना राष्ट्रीय निशाणाचा अर्थच कळला नाही तर मि. मुजफ्फर हुसेन विरूद्ध गेले. एकाही मुसलमान सभासदाने अनुकूल मत दिले नव्हते. हिंदु सभासद तेवढे अनुकूल होते. शेवटी बहुमताने हा ठराव पास झाला होता.

उमरावती जिल्हा कौन्सिलच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण ना. रामराव देशमुख यांच्या हस्ते उभारावे असा ठराव जिल्हा कौन्सिलच्या दि. २१ ऑक्टोबरच्या आम सभेने मंजूर केला होता.

बाजार ट्रेन : उमरावतीच्या रेल्वे स्टेशनवर बाजार ट्रेन ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवडयात आली होती. त्यावेळी जि. काँ. कमेटीतर्फे या ट्रेनमधील परदेशी माल कोणीही घेऊ नये अशी चळवळ अत्यंत शांतपणे

करण्यात आली. त्यामुळे मुर्तिजापूरसारख्या ठिकाणीही जितका परदेशी माल खपला तेवढाही उमरावतीस खपला नव्हता.

जाहीर सभा : याच काळात दि. २३ ऑक्टोबर रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने, परदेशी कापडावरील बहिष्काराचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली होती.

शारदा बिलास पाठिंबा : उमरावतीच्या आर्य समाजातर्फे दि. २७ ऑक्टोबर रोजी गणेश नाटकगृहात सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली शारदा बिलास पाठिंबा देण्यासाठी जाहीर सभा घेण्यात आली होती.

सभेत मि. सुफी, सौ. चंद्राताई पटवर्धन, प्रो. सुरे, श्री. लढ्ढा, डॉ. सबनीस व डॉ. भोजराज यांची भाषणे होऊन पाठिंबा देणारा ठराव मंजूर करण्यात आला होता.

महिला समाज : दि. २६ ऑक्टोबर रोजी ब्रम्हविद्या मंदिरात सौ. सावित्रीबाई ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांचो सभा होऊन, तींत यवतमाळच्या स्त्री शिक्षण परिषदेत झालेल्या ठरावांची माहिती सौ. ताराबाई रणदिवे, सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्रीमती मथुराबाई द्रविड यांनी समजावून सांगितली होती.

कॅम्प म्युनिसिपॅलिटीची निवडणूक : उमरावती कॅम्प म्युनिसिपॅलिटीची त्रैवार्षिक निवडणूक, दि. २८ ऑक्टोबर १९२९ रोजी होऊन तीत, बॅरि. ई. एम्. जोशी व श्री. सुखात्मा जगन्नाथ हे बिन विरोध निवडून आले होते तर, बॅरि. काणे, रा. ब. खरे, मि. फोर्ड, बॅरि. बागवे. वगैरे उमेदवार निवडणुकीत विजयी झाले होते.

मि. डी. जॉन, सिव्हिल सर्जन व श्री. व्यंकट मालोजी उगले यांची कॅम्प म्यु. वर सरकारतर्फे पुढे नियुक्ती करण्यात आली.

युनिव्हर्सिटी कोर्टाची निवडणूक : नागपूर युनिव्हर्सिटी कोर्टाच्या तीस सभासदाची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होऊन तीत दहा उमेदवार वऱ्हाडातून उभे होते ते सर्वच्या सर्व निवडून आले होते. त्यातील खालील सात उमरावतीचे होते.

प्रो. पांडे. श्री. ना. प्र. हिरूरकर वकील, प्रिं. ओक, श्री. वा. वा. भोळे, श्री. इनामदार, श्री. येवले, श्री. बी. एम्. पंडीत.

स्वामी कुमारानंद : स्वामी कुमारानंद ह्या सुप्रसिद्ध बंगाली स्वातंत्र्यवाद्याची दोन जाहीर व्याख्याने नोव्हेंबर महिन्याचे पहिल्या आठवडचात उमरावतीला झाली होती. पहिल्या व्याख्यानाला वीर वामनराव जोशी हे अध्यक्ष होते तर दुसऱ्या व्याख्यानाला श्री. बामणगावकर हे अध्यक्ष होते.

ना. श्रीपाद बळवंत उर्फ तात्यासाहेब तांबे.

उमरावतीचे ना. तांबे गव्हर्नर झाले.

मध्यप्रांताचे गव्हर्नर सर मॉंटेग्यू बटलर ह्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला व तो बादशहांनी मंजूर करून, त्यांचीच पुन्हा या प्रांताचे गव्हर्नर पदावर नवी नियुक्ती केली. यासाठी जो मध्यंतरीचा

चार महिन्याचा काळ जाणार होता, त्या काळात या प्रांतासाठी ना. तांबे यांना तात्पुरते गव्हर्नर म्हणून नेमण्यात आले होते.

श्री. तांबे हे इ. स. १९०३ साली उमरावतीत वकिलीसाठी आले होते. त्यांनी येथे पैसा आणि प्रतिष्ठा कमावली. उमरावती नगरपालिकेचे ते उपाध्यक्षही होते. नंतर स्वराज्य पक्षातर्फे ते मध्यप्रांत कायदे मंडळावर निवडून गेले होते आणि कायदे मंडळाचे अध्यक्षही राहिले. नंतर त्यांनी गृहमंत्रीपद स्वीकारले, त्यामुळे त्यांची सर्वत्र छी: थू: झाली, पण ते आपल्या पदास चिकटून राहिले व आता त्यांना अल्पावधीसाठी का होईना पण या प्रांताचे गव्हर्नरपदाचा मान मिळाला होता.

जाहीर सभा : दि. ४ नोव्हेंबर रोजी उमरावती जिल्हा कॉं. कमेटीतर्फे डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत श्री. बाबासाहेब खापर्डे व वीर वामनराव जोशी यांची, व्हाईसरॉय यांच्या जाहीरनाम्यावर प्रतिकूल अशी भाषणे झाली होती.

लाहोर काँग्रेससाठी प्रतिनिधी : लाहोर येथे भरणाऱ्या राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनासाठी उमरावती जिल्ह्यातर्फे सर्वश्री डॉ. पटवर्धन, गुलाबराव बक्षी, श्री. देशपांडे, वैद्य त्रिंबकराव जोशी व श्री. शाळीग्राम हे पाच प्रतिनिधी, दि. २२ नोव्हेंबर रोजी भरलेल्या जिल्हा काँग्रेसच्या सभेत निवडण्यात आले होते.

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटी : सन १९३० साठी वऱ्हाड प्रांतिक कॉं. कमेटीचे अध्यक्ष श्री. माधव श्रीहरी अणे, उपाध्यक्ष श्री. वीर वामनराव जोशी व ब्रिजलालजी बियाणी, चिटणीस श्री. ना. रा. बामणगावकर व श्री. ग. बा. दुर्गे यांची निवड नोव्हेंबरमध्ये झाली होती आणि वऱ्हाड प्रांतातर्फे ऑ. इं. कॉं. कमेटीवर सर्वश्री माधवराव अणे, डॉ. नरहर शिवराम परांजपे, बाळकृष्ण गणेश खापर्डे, महादेव पैकाजी कोल्हे, पु. ब. गोळे, ब्रिजलाल बियाणी व पंढरीनाथ अंबूलकर यांची निवड झाली. याशिवाय लाहोर कॉं. साठीही प्रतिनिधी निवडण्यात आले होते.

बाबू सुभाषचंद्र बोस यांची उमरावतीला दुसऱ्यांदा भेट.

दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस हे, दि. १ डिसेंबर १९२९ रोजी, किंग एडवर्ड कॉलेजच्या गॅदरिंगसाठी उमरावतीस आले होते.

दि. १ डिसेंबरला सकाळी आठ वाजता बाबूजींच्या हस्ते किंग एडवर्ड कॉलेजच्या गॅदरिंगचे उद्घाटन झाले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांपुढे केलेल्या भाषणाची सर्वांनी तारीफ केली होती. वास्तविक कॉलेजचा अधिकारी वर्ग सुभाषबाबूंच्या व्याख्यानामुळे आपले कॉलेज उलथे पालथे होईल की काय? अशा भीतीने घाबरला होता. पण विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळेच बाबू सुभाषचंद्र यांना मुख्य पाहुणे म्हणून स्वीकारणे भाग पडले होते व ज्यांच्यावर १२४-अ खालो खटला सुरू आहे अशा सुभाषबाबूंसमोर जाऊन कॉलेजचे अधिकाऱ्यांना मान झुकवावी लागली हेच या गॅदरिंगचे वैशिष्ट्य होते.

त्याच दिवशी दुपारी १ वा. गणेश नाटक गृहात प्रांतिक विद्यार्थी परिषद बाबू सुभाषचंद्र यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने व समारंभाने पार पडली

सायंकाळी हनुमान व्यायाम शाळेचा वार्षिकोत्सव धर्मवीर वामनराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला त्यावेळी बाबू सुभाषचंद्र बोस हे या वार्षिकोत्सवास उपस्थित होते.

त्याच दिवशी रात्री १० वा. गणेश नाटकगृहात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, उमरावती युवक संघातर्फे बाबू सुभाषचंद्र बोस यांचे 'सध्याची राजकीय परिस्थिती' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. थिएटर चिक्कार गर्दीने भरले होते.

देशभक्त सुभाषचंद्र बोस यांचे हस्ते उमरावती नगरपालिकेवर राष्ट्रीय ध्वज.

दुसरे दिवशी दि. २ डिसेंबर रोजी सकाळी बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते उमरावती नगरपालिकेवर राष्ट्रीय ध्वज उभारण्याचा कार्यक्रम थाटात पार पडला.

बाबू सुभाषचंद्र यांचे बँडचे सुस्वर स्वरात स्वागत झाल्यानंतर नगराध्यक्ष श्री. केतकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर बाबूजींचे राष्ट्रीय निशाणातील राष्ट्रीय तत्त्व व स्वातंत्र्याची भावना ध्वनित करणारे

छोटेसे भाषण होऊन टाळ्यांचे प्रचंड गजरात त्यांचे हस्ते नगरपालिकेचे इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकविण्यात आले. त्यावेळी बँडवर वंदेमातरम् हे राष्ट्रगीत वाजविण्यात आले होते.



उमरावती नगरपालिकेचे कार्यालयावर राष्ट्रीयध्वज फडकू लागला.

त्यानंतर बाबू सुभाषचंद्र बोस, वीर वामनराव व नगराध्यक्ष यांना आणि निमंत्रितांना हारतुरे व पानसुपारी झाली व डॉ. भोजराज यांनी सर्वांचे आभार मानले.

म्यु. सभासद श्री. द्वारकादासजी यांनीच, नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण लावण्याचा ठराव नगरपालिकेत आणला होता. त्यामुळे या समारंभाची व्यवस्थाही श्री. द्वारकादासजीकडेच होती. या समारंभाला लोकांची तुफान गर्दी झाली होती.

उमरावती युवक संघ : श्री. चौबळ यांच्या घरी भरलेल्या युवक संघाच्या कार्यकारिणीचे सभेत सर्वश्री डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज, डॉ. पातुरकर, श्री. वामणगावकर, वैद्य त्र्यं. गं. जोशी, श्री. रणदिवे वकील, बॅरि. पंजाबराव देशमुख, बॅरि. बागवे, बॅरि. जोशी, डॉ. दामले वगैरे मंडळींना कार्यकारी मंडळावर घेण्यात आले व पदाधिकाऱ्यांची निवड खालीलप्रमाणे करण्यात आली होती.

अध्यक्ष श्री. हिरूरकर वकील, उपाध्यक्ष श्री. चौबळ व चिटणीस श्री. सहस्त्रबुद्धे आणि श्री. खरे. नंतर संघाची घटना तयार करण्याकरिता एक कमेटी नेमण्यात आली होती.

जिल्हा हिंदु परिषद : उमरावती जिल्हा हिंदु परिषद, दि. ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर १९२९ या दोन दिवस गणेश नाटकगृहात, हैद्राबादचे धर्मवीर श्री. वामनरावजी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेला सर मोरोपंत जोशी, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. अण्णासाहेब देशमुख, श्री. जानरावजी देशमुख, शेठ पन्नालालजी वगैरे प्रमुख लोक हजर होते.

स्वागताध्यक्ष डॉ. सोमण यांनी सर्वांचे स्वागत केले. अध्यक्षांची सूचना श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी आणली; त्यास श्री. हरिहरराव देशपांडे, डॉ. सबनीस, श्री. बापूराव तालुकदार यांनी अनुमोदन दिले. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर हारतुरे अर्पण होऊन चिटणीस डॉ. भोजराज यांनी परिषदेला आलेले संदेश वाचून दाखविले व नंतर अध्यक्ष धर्मवीर वामनराव नाईक यांचे भाषण झाले.

या परिषदेत अनेक महत्त्वपूर्ण ठराव पास करण्यात आले होते व त्यावर सर्वश्री तालुकदार, डॉ. पटवर्धन, डॉ. सबनीस, श्री. ओमले, श्री. मराठे, डॉ. कुंब्रडे, श्री. वैद्य जोशी, हरिहरराव देशपांडे, हिर्लेकर वैद्य, वीर वामनराव, राधावल्लभजी लढ्ढा, अंबाप्रसादजी, डॉ. भोजराज व डॉ. सोमण वगैरेंची भाषणे झाली होती.

वऱ्हाड स्वातंत्र्य संघ : भारतीय स्वातंत्र्य संघाची स्थापना वऱ्हाडात होऊन अध्यक्षपदी वीर वामनराव जोशी, उपाध्यक्ष श्री. ना. रा. बामणगावकर आणि चिटणीस का. वि. सहस्त्रबुद्धे व वैद्य त्र्यं. गं. जोशी हयांची

निवड झाली होती. संघाची मुख्य कचेरी आकोला येथे श्री. सहस्त्रबुद्धे यांचेकडे ठेवण्याचे ठरले होते.

संपूर्ण स्वातंत्र्य मिळविणे, हिंदी समाजाची सामाजिक व आर्थिक समानतेच्या पायावर पुनर्घटना करणे हे या संघाचे ध्येय होते.

गीता जयंती : उमरावतीच्या न्यू हायस्कूलमध्ये विद्यार्थी मंडळातर्फे गीता-जयंत्युत्सव, दि. १२ डिसेंबर रोजी साजरा करण्यात आला होता.

सकाळी नमस्काराची चढाओढ, गीता–पाठ–परीक्षा, करुणाष्टके, धावण्याची शर्यत व दुपारी वक्तृत्व समारंभ होऊन त्यात गीतेची थोरवी व श्रीकृष्णाची कामगिरी ह्या आयत्यावेळी दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. नंतर वे. शा. सं. महादेव शास्त्री दिवेकर यांचे 'गीतेची शिकवण, या विषयावर भाषण झाले. श्री. चिंतामणराव मराठे यांनीही भाषण करून गीता–ग्रंथाचे महत्त्व विषद करून सांगितले. नगराध्यक्ष श्री. केतकर यांचे हस्ते बक्षिस समारंभ झाला. याप्रसंगी वीर वामनराव जोशी, वैद्यभूषण पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर, श्री. मोटे इत्यादी सद्गृहस्थ उपस्थित होते.

श्री. कानडे शास्त्री : दि. ९ डिसेंबर रोजी सायंकाळी जोग चौकात जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने श्री. दिनकर शास्त्री कानडे यांचे, श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली 'वसाहतीचे स्वराज्य' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले होते.

त्यापूर्वी दि. ७ व ८ रोजी पं. कानडे शास्त्रींची 'अमेरिकन शिक्षण पद्धती' या विषयावर ए. व्ही. स्कूलमध्ये, दुय्यम शिक्षण संघातर्फे श्री. ना. प्र. हिरूरकर यांचे अध्यक्षतेखाली व्याख्याने झाली होती.

काकोरी दिन : दि. १७ दिसेंबर १९२९ रोजी डॉ. सोमण यांचे अध्यक्षतेखाली युवकसंघ व जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे जाहीर सभा घेऊन 'काकोरी दिन' साजरा करण्यात आला होता. याप्रसंगी श्री. गुलाबराव बक्षी, श्री. हरिहरराव देशपांडे व वैद्य त्र्यंबकराव जोशी यांची भाषणे झाली.

मराठी नार्मल स्कूलचा हीरकोत्सव : उमरावती येथील नॉर्मल स्कूल फॉर मेन ह्या संस्थेचा षष्ठी सांवत्सरिक हीरकोत्सव, दि. २० व २१

दिसेंबर १९२९ रोजी यवतमाळचे सुप्रसिद्ध वकील श्री. जतकर यांच्या अध्यक्षतेखाली, थाटाने साजरा करण्यात आला होता. या समारंभासाठी मुद्दाम भव्य मंडप उभारण्यात आला होता.

समारंभाचे दिवशी प्रथम ईशस्तवन व स्वागतगीत झाल्यावर नॉर्मल स्कूलचे प्रिन्सिपॉल श्री. ओक ह्यांनी उत्सवासाठी आलेल्या या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे व निमंत्रितांचे स्वागत करून साठ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या ह्या संस्थेने उत्तम शिक्षक तयार करण्याचे कार्य कसे केले ह्यासंबंधी इतिहास निवेदन केला. त्यात त्यांनी सांगितले की, हल्ली साक्षर लोक शेकडा १५ व साक्षर मुली शे. १२ असून, शिक्षक वर्ग शे. ४६ ट्रेन्ड आहेत.

नंतर अध्यक्ष श्री. जतकर यांचे समयोचित भाषण झाले. त्यानंतर या उत्सवातील इतर कार्यक्रमात माजी विद्यार्थी व मुले ह्यांचे कवितागायन, वैद्य हिर्लेकर व श्री. धर्माधिकारी ह्यांची भाषणे, मर्दानी खेळ, कुस्त्या, नाटक इत्यादी कार्यक्रम होऊन हीरकोत्सव समाप्त झाला.

इसवी सन १९३०

भारतीय स्वातंत्र्य युद्धात १९३० इ. हे वर्ष फार महत्त्वाचे असून, यावर्षी शांततामय कायदेभंगाची प्रचंड चळवळ होऊन लक्षावधी स्त्री-पुरुषांना कडक शिक्षा व त्यासाठी दीर्घकाळ तुरुंगाच्या हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या. अनेकांना दंडाच्या शिक्षा होऊन त्यासाठी त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्ता जप्त झाल्या व त्यांचे लिलाव करून सरकारने दंडाची रक्कम वसूल केली. कित्येक गावावर आणि शहरावर पोलिस ठेवून त्याचा खर्च सक्तीने सरकारने वसूल केला. कित्येकांना फटक्याच्या शिक्षा देखील झाल्या. या चळवळीचे उमरावती शहर मोठे केंद्र होते. त्याचा साद्यंत इतिहास सहज लक्षात यावा आणि चळवळीचे स्वरूप लक्षात यावे म्हणून वर्षभरातील चळवळीची माहिती येथे प्रथम एकत्र दिलेली असून, याच काळातील उमरावतीत घडलेल्या इतर घडामोडींची माहिती त्यानंतर दिलेली आहे हे कृपया लक्षात ठेवावे.

सन १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीतील उमरावती

पार्श्वभूमी : १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीचे कारण लक्षात यावे यासाठी त्याची पार्श्वभूमी खाली थोडक्यात वर्णन केली आहे.

इ. स. १९२८ साली दिसेंबर महिन्यात कलकत्ता येथे भारतीय राष्ट्रीय महासभेचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलालजी नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते व या अधिवेशनात नेहरू योजनांतर्गत असलेल्या 'वसाहतीचे स्वराज्या'चा ठराव मंजूर करण्यात आला होता. ह्या ठरावाला बाबू सुभाषचंद्र बोस आणि पं. जवाहरलाल नेहरू यांनी दुरुस्ती सुचवून 'संपूर्ण स्वराज्या'ची मागणी मांडली. परंतु महात्मा गांधींनी मूळ ठरावावर केलेल्या भाषणात "काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याचे ध्येय सोडलेले नाही. जर हा नेहरू रिपोर्ट सरकारने ३१ दिसेंबर १९२९ पावेतो मान्य केला नाही तर, काँग्रेस पुन्हा अहिंसात्मक असहकाराची चळवळ सुरू करील व यावेळी करबंदी देखील पुकारण्यात येईल." असे आश्वासन दिले होते. तरीही गांधीजींचा हा वसाहतीचे स्वराज्याचा ठराव फार थोड्या मतांनी पास झाला. ठरावाला अनुकूल १३५० मते पडली व जहालांतर्फेच्या उपसूचनेला ९७३ मते पडली.

वरील ठरावानुसार साम्राज्यशाहीशी समेट घडवून आणण्याचा एक अखेरचा प्रयत्न मवाळ पुढाऱ्यांनी करून पाहिला, परंतु व्हॉईसरॉयने दि. ३१ ऑक्टोबर १९२९ रोजी फक्त इतकाच उल्लेख केला की "भविष्यकाळी केव्हातरी डोमिनियन स्टेटस्चे (वसाहतीच्या स्वराज्याचे) ध्येय हिंदुस्थानला गाठता येईल".

या प्रमाणे व्हॉईसरॉयकडून कोणतेच आश्वासन मिळू न शकल्याने इ. सन १९२९ च्या डिसेंबरमध्ये लाहोर येथे पं. जवाहरलालजी नेहरू

यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या राष्ट्रीय महासभेचे अधिवेशनात काँग्रेसने लढ्याचा निर्णय घेतला. डोमिनियन स्टेटस्‌ची मागणी करणारा नेहरू रिपोर्ट आता रद्द झाला आहे असे जाहीर करण्यात आले व पूर्ण स्वराज्य हे यापुढे काँग्रेसचे ध्येय ठरविण्यात येऊन, ऑल इंडिया काँग्रेस कमेटीला जेव्हा योग्य वाटेल तेव्हा कायदेभंगाचा कार्यक्रम सुरू करण्याचा अधिकार देण्यात येऊन, यात करबंदीचाही समावेश असू शकेल असे नमूद करण्यात आले व मध्यरात्रीचे मुहूर्तावर, १९३० साल सुरू होत असताना, हिंदी स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा फडकविण्यात आला+. (त्यावेळी लाल, पांढरा व हिरवा असे तीन रंग होते. मागाहून लाल ऐवजी केशरी रंग ठरविण्यात आला होता.)

दि. २६ जानेवारी १९३० रोजी सबंध हिंदुस्थानभर स्वातंत्र्य-दिन साजरा करण्याची व संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढा करण्याची प्रतिज्ञा ठरविण्यात आली. "ब्रिटिश राजवटीपुढे इतःपर मान तुकविणे हा मानवजात व परमेश्वर या दोघांविरूद्ध गुन्हा असून, आपण जर स्वेच्छेने मदत करण्याचे बंद केले व कर देण्याचे थांबविले तर आणि चिडवणूक होत असताही हिंसा केली नाही तर, या अमानुष राजवटीचा अंत होण्याची खात्री आहे." असे या प्रतिज्ञेत म्हटले होते.

नंतर १९३० च्या फेब्रुवारी महिन्यात साबरमती येथे भरलेल्या ऑ. इं. कॉ. कमेटीच्या सभेत "……महात्मा गांधी व त्यांचाच अनुवाद करणारे ह्यांना, इच्छा होईल त्याप्रमाणे व ते ठरवितील त्यावेळी आणि त्या मार्गाने व तितक्याच मर्यादेत, सविनय कायदेभंग सुरू करण्याचा अधिकार[१]" म्हणजे नेतृत्व व नियंत्रण करण्याचा अधिकार देण्यात आला होता.

+ : लाहोर काँग्रेसला उद्देशून सुभाष बाबू लिहितात, 'जहाल गटातर्फे मी एक ठराव मांडला की, काँग्रेसने देशात प्रतिसरकार स्थापन करण्याचा उद्देश पुढे ठेवावा व त्यासाठी कामगार, शेतकरी व युवक यांची संघटणा करण्याचे काम हाती घ्यावे. हा ठराव नापास झाला व त्याचा परिणाम असा झाला की, काँग्रेसने संपूर्ण स्वराज्याचे ध्येय मान्य केले असूनही ते ध्येय गाठण्यासाठी कोणतीच योजना आंखण्यात आली नाही. याहून जास्त हास्यास्पद परिस्थिती कोणती असू शकेल?' (इंडियन स्ट्रगल, पान २००)

१ : उदय : दि. १८ फेब्रुवारी १९३०

उमरावतीचा पहिला स्वातंत्र्य-दिन महोत्सव
दिनांक २६ जानेवारी १९३०

चित्र क्र. १४६ : वीर वामनराव दादा (पृष्ठ ६३१ पहा)
यांचे हस्ते पहिला स्वातंत्र्य-दिन २६ जाने. १९३० रोजी
उमरावतीत उत्साहाने साजरा झाला.
त्या प्रसंगीचा फोटो : वीर वामनराव दादा व शेजारी
रतनलालजी काळे (युनिफॉर्म मध्ये.)

महात्मा गांधींनी दि. ९ एप्रील १९३० रोजी, सविनय कायदेभंगाच्या सूचना खालील प्रमाणे दिल्या व कार्यक्रम जाहीर केला–

"……प्रत्येक खेड्याने बेकायदेशीर मीठ आणावे किंवा बनवावे. भगिनींनी दारूच्या दुकानावर, अफूच्या अड्ड्यावर व परदेशी कापडाच्या दुकानावर निरोधन करावे. प्रत्येक घरातील तरुणांनी व म्हाताऱ्यांनी दररोज टकळीवर सूत कातावे आणि सुताचे गठ्ठे विणून घ्यावे. परदेशी कापडाची होळी करावी. हिंदूंनी अस्पृश्यतेचा त्याग करावा. हिंदु, मुसलमान, शिख, पारशी व ख्रिश्चन या सर्वांनी हृदयाचे ऐक्य घडवून आणावे. अल्पसंख्यकांचे समाधान केल्यानंतर जे काही उरेल त्यावर बहुसंख्यकांनी समाधान मानावे. विद्यार्थ्यांनी शाळा–कॉलेजे सोडावी. सरकारी नोकरांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन लोकसेवेला वाहून घ्यावे. एवढे केले तर पूर्ण स्वराज्य आपोआप आपल्या दाराशी येऊन पोचलेले आपणास लौकरच दिसेल[१]."

या पार्श्वभूमीवर अहिंसात्मक कायदेभंगाची चळवळ देशात १९३० साली सुरू झाली होती.

… … …

अशा या परिस्थितीत वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीची स्थिती अशी होती की, १९२९ सालच्या प्रारंभी जिल्हा शाखांच्या पलीकडे जवळ जवळ सर्व शाखा नामशेष झाल्या होत्या आणि खुद: जिल्हा काँग्रेस कमेटच्या सुद्धा नाममात्रच राहिल्या होत्या[२].

कलकत्ता काँग्रेसनंतर राष्ट्रीय सभेच्या शाखा व उपशाखा पुनर्जीवित करण्याची जरूरी भासू लागली व मार्च १९२९ मध्ये उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीची पुनर्रचना करण्यात येऊन डॉ. भोजराज यांस अध्यक्ष व डॉ. पातुरकर आणि रा. त्रिंबकराव जोशी वैद्य हयांस चिटणीस नेमण्यात आले. तसेच सर्वश्री बामणगावकर, डॉ. पटवर्धन, रा. मुळे वैद्य इत्यादी नव्या जुन्या कार्यकर्त्यांना कार्यकारिणीचे सभासद करून हया नव्या कार्यकारी मंडळाने कार्यास सुरूवात केली.

---

१ : 'आजचा हिंदुस्तान' रजनी पामदत्त, १९४६, पा. ३५१

२ : उमरावती जिल्ह्यातील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास : १९३० : श्रं. गं. जोशी. जिल्हा कॉं. कमेटी.

वेळोवेळी ऑल इंडिया कॉं. कमेटी व प्रांतिक कॉं. कमेटी इत्यादी वरिष्ठ संस्थांकडून आलेले हुकूम पाळण्यात येऊन जनतेत जागृती करण्यात आली. ह्याच वेळी, असहकारितेचे काळात वऱ्हाडची वाणी राखणारे दे. भ. वीर वामनराव जोशी यांनी आपले वास्तव्य उमरावती शहरात कायम केले होते. त्यांनाही कार्यकारी मंडळात सामील करून घेण्यात आले. त्यांच्या उपस्थितीमुळे कॉंग्रेस कमेटीत नवीन जोम व उत्साह निर्माण झाला. इ. स. १९२९ चे अखेर पावेतो. जाहीर सभा व व्याख्यानांद्वारे सर्व जिल्ह्यात जागृती होऊन लाहोर कॉंग्रेसच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले.

लाहोरची कॉंग्रेस उत्साहात पार पडली. तिचे निर्णय जाहीर झाले. पूर्ण स्वातंत्र्याचे लालसेने जनतेत उत्साह निर्माण झाला. पहिला स्वातंत्र्य-दिन २६ जानेवारी १९३० रोजी साजरा करण्याचा आदेश जाहीर झाला व त्यावेळी जाहीर प्रतिज्ञा घेण्यासाठी ऑ. इं. कॉं. वर्किंग कमेटीकडून 'स्वातंत्र्याचा संदेश' मिळाला.

प्रतिज्ञा : "……आमची मुक्तता करून घेण्यासाठी आम्हाला सर्वांत प्रभावशाली साधन अत्याचार हे नसून बुद्धिपुरस्सर होणारी ब्रिटिश सरकाराशी सहकारिता शक्य तितकी काढून घेऊन करबंदीसह सविनय कायदेभंगासाठी, बुद्धिपुरस्सर होणारी सरकारास मदत जर आम्ही बंद केली आणि आम्हास चीड आणण्याचा प्रयत्न झाला असताही आम्ही अत्याचार न करता कर देण्याचे बंद केले तर ह्या अमानुष सत्तेचा अंत होईल. ह्यास्तव पूर्ण स्वराज्याच्या स्थापनेसाठी, कॉंग्रेसकडून वेळोवेळी मिळणाऱ्या हुकुमाची पवित्र अंत:करणाने अंमलबजावणी करण्याचा निश्चय आम्ही जाहीर करीत आहोत.[१]" अशा आशयाचा हा संदेश-प्रतिज्ञा होती.

लाहोर कॉंग्रेसचा संदेश : दि. १३ जानेवारी १९३० रोजी जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे विद्यमाने गणेश नाटकगृहात सायंकाळी 'लाहोर कॉंग्रेसचा संदेश' सांगण्यासाठी डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती. सभेत श्री. त्र्यं. गं. जोशी, श्री. वीरकर व वीर वामनराव जोशी यांची भाषणे झाली होती.

---

१ : उदय, दि. २१ जानेवारी १९३०

दडपशाहीच्या निषेधाची सभा : उ. जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने दि. २५ जानेवारी रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, तीत, दे. भ. सुभाषचंद्र बोस व इतर ११ बंगाली देशभक्तांना एक वर्षाची शिक्षा देऊन दडपशाहीस सुरुवात केल्याबद्दल सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला होता.

पहिला स्वातंत्र्य-दिन महोत्सव : दि २६ जानेवारी १९३० रोजी उमरावती जिल्हा काँ. कमेटीतर्फे स्वातंत्र्य-दिन उत्साहाने पाळण्यात आला. सकाळी वीर वामनराव जोशी यांचे हस्ते व त्यांचेच अध्यक्षतेखाली राष्ट्रीय ध्वज वंदनाचा समारंभ, स्वातंत्र्य देवीचे जयजयकारात व बॅन्डच्या निनादात साजरा करण्यात आला. नगर संरक्षक दलाचे स्वयंसेवकांसह दुपारी चार वाजता प्रचंड मिरवणूक निघून, संध्याकाळी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत आॅ. इं. काँ. कमेटीचा 'स्वातंत्र्याचा संदेश' चार भाषांतून वाचून दाखविण्यात आला होता. याप्रमाणे मोठ्या उत्साहात हा पहिला स्वातंत्र्य दिन उमरावती शहरात व जिल्ह्यातील ४०-५० ठिकाणी साजरा होऊन ध्वजवंदन आणि प्रतिज्ञा वाचन करण्यात आले होते.

श्री. बापूजी अणे यांचा राजिनामा : प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष व लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीचे सभासद श्री. माधवराव अणे यांनी, पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचे कडून, "कोणत्याही कायदे मंडळाचा सभासद, राष्ट्रीय सभेच्या निवडणुकीच्या घटनेत भाग घेऊ शकत नाही" असा हुकूम झाल्यामुळे आॅ. इं. काँ कमेटीच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला[१].

वऱ्हाड प्रां. काँ. कमेटी : दि. ९ फेब्रुवारी १९३० रोजी वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटीची पुनर्रचना करण्यात येऊन, वीर वामनराव जोशी हे अध्यक्ष, डॉ. पटवर्धन व ब्रिजलाल बियाणी हे उपाध्यक्ष आणि वैद्य पं. दा. मुळे व वैद्य त्रि. गं. जोशी हे चिटणीस, डॉ. भोजराज हे खजिनदार निवडण्यात आले[२]. त्याच दिवशी रात्री जोग चौकात वीर वामनराव यांचे अध्यक्षतेखाली 'काँग्रेसचा संदेश' या विषयांवर श्री. दादासाहेब गोळे, श्री. ब्रिजलाल बियाणी आणि श्री. सहस्त्रबुद्धे यांची व्याख्याने झाली.

---

१ : उदय : दि. १८ मार्च १९३०

२ : उमरावती जिल्ह्यांतील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास १९३० पा. २

प्रचार कार्यास प्रारंभ : वरील पदाधिकारी नियुक्त झाल्यानंतर लगेच, वीर वामनराव जोशी, डॉ. पटवर्धन, श्री. बामणगावकर इत्यादी प्रमुख पुढाऱ्यांनी सर्व जिल्हाभर दौरा काढून प्रचार केला .....आकोल्याचे श्री. सहस्त्रबुद्धे व उमरावतीचे रा. त्रिंबकराव जोशी ह्यांनीही जिल्हाभर व्याख्यानाचा दौरा काढला.....हजारो लोकांसमोर त्यांची निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने झाली.

जाहीर वादविवाद : लाहोर काँग्रेसच्या ठरावासंबंधाने देशात आज प्रचलित असलेली निरनिराळ्या पक्षांची मते लोकांसमोर यावीत ह्या उद्देशाने, वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटीतर्फे श्री. संभाजीराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३ व १४ फेब्रुवारी रोजी उमरावतीत गणेश नाटकगृहात जाहीर वादविवाद घडवून आणला होता.

प्रथम वीर वामनराव जोशी यांनी काँग्रेस पक्षाचे म्हणणे पुढे मांडावे व त्यावर प्रतिसहकार पक्षातर्फे श्री. बामणगावकर व प्रागतिक पक्षातर्फे सर मोरोपंत जोशी यांनी आक्षेप घ्यावे असा कार्यक्रम ठरला होता.

अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणानंतर वीर वामनराव जोशी यांनी आपले भाषण केले. त्यांनी, काँग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय का ठरविले ते सांगितले होते.

दुसरे दिवशी उत्तरादाखल भाषण करताना श्री. बामणगावकर यांनी दोनही विरोधकांना नम्रतापूर्वक प्रणाम करून आपल्या भाषणास सुरुवात केली होती.

नंतर सर मोरोपंत जोशी यांनीही आपले विचार मांडले व शेवटी वीर वामनराव यांनी उत्तरादाखल अस्खलीत व परिणामकारक भाषण केल्यानंतर अध्यक्षांनी वादविवाद संपल्याचे जाहीर केले होते.

युद्ध मंडळाची स्थापना : दि. १६ मार्च १९३० रोजी प्रां. काँग्रेस कमेटीने युद्ध मंडळाची स्थापना करून सत्याग्रहाची तयारी करण्याचा निश्चय जाहीर केला. त्याप्रमाणे ४ एप्रील १९३० रोजी अमरावती जिल्हा युद्ध मंडळाची स्थापना झाली. त्यांत डॉ. भोजराज अध्यक्ष, श्री. हरिहरराव देशपांडे प्रचार मंत्री, डॉ. पातुरकर दफ्तर मंत्री व त्रिंबकराव जोशी हे स्वयंसेवक विभागाचे चिटणीस असे तीन युद्धमंत्री मुकरर करण्यात आले.

तालुका कॉं. कमेटयांशी पत्रव्यवहार होऊन सत्याग्रहाचे तयारीला जोराने प्रारंभ झाला. (दि. ६ एप्रील १९३० रोजी गांधीजींची दांडी-यात्रा सुरू होऊन समुद्र किनाऱ्यावर खारे पाणी उकळून मीठ बनविण्याचा विधि यथासांग पार पडला होता.)

सत्याग्रहाची पूर्व तयारी : दि. ६ एप्रील पासून जालीयनवाला बाग स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय सप्ताहाला सुरुवात झाली. त्यानिमित्त दररोज जाहीर सभा, प्रचार दौरे, व्याख्याने झालीत. ता. ७ एप्रील १९३० पासून, श्री. हरिहरराव देशपांडे, डॉ. सोमण, डॉ. पटवर्धन, वीर वामनराव जोशी, श्री. बामणगावकर, डॉ. भोजराज, श्री. केशवराव शालीग्राम, डॉ. सबनीस, श्री. रतनलाल काळे, त्र्यंबकराव जोशी इ. मंडळींनी जिल्ह्याचे निरनिराळे भागांतून प्रचार दौरा काढला व व्याख्याने दिली. ह्या सर्व दौऱ्यात जागजागी स्वयंसेवकांची नोंद करण्यात येऊन अमरावती येथील शिबिरात त्यांना शिक्षणासाठी पाठविण्यात येत असे.

शिबिराची स्थापना : अमरावती येथे शेठ पन्नालाल यांच्या उदार आश्रयामुळे त्यांच्या गावाबाहेरील हवेशीर बन्सी बागेत स्वयंसेवकांकरिता शिबिर उघडण्यात आले. वरील दौऱ्यात नोंदलेले स्वयंसेवक शिस्तीचे शिक्षण घेण्याकरिता काही दिवस शिबिरात राहून बोलाविल्या वेळेस कामावर रुजू होण्याची हमी देऊन आपापल्या गावी परत जात असत.

श्री. त्रिंबकराव जोशी शिबिराधिपती नेमल्यामुळे त्यांच्यावरील कामाचा बोजा सारखा वाढत होता. त्यांचे मदतीस श्री. बाबाराव साऊरकर येऊन मिळाले.

पं. नेहरूंचे अटकें निमित्त कडकडीत हरताळ : कॉं. अध्यक्ष पं. जवाहरलालजी नेहरू यांचे अटकेनिमित्त दि. १५ एप्रील रोजी उमरावतीत कडकडीत हरताळ पडला. असा कडकडीत हरताळ गेल्या दहा वर्षात देखील पडला नव्हता.

त्याच दिवशी दुपारी ५ वाजता राष्ट्रीय निशाणाची व प. नेहरूंच्या फोटोची जंगी मिरवणूक जोग चौकातून निघून ती शहरातील प्रमुख रस्त्याने मिरवत सायंकाळी सात वाजता स्वस्थळी परत आली व त्याच वेळी तेथे वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, श्री. बामणगावकर, वैद्य त्र्यं. गं. जोशी, श्री. गांधी, डॉ. पटवर्धन, व

सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे होऊन, पं. जवाहरलाल यांच्या अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला. नंतर वीर वामनराव यांनी स्वत: तयार केलेले मीठ विकले व स्वदेशी मालाची होळीही करण्यात आली.

पं. जवाहरलाल नेहरू, अध्यक्ष ऑ. इं. कॉंग्रेस कमेटी.

मिठाचा सत्याग्रह : दहिहांडयास उमरावतीची तुकडी.

दहिहांडा येथील विहिरीच्या पाण्याचे मीठ तयार करून, ता. १३ एप्रीलपासून कायदेभंग करण्याचे प्रांतिक युद्धमंडळाने ठरविले होते. या



चित्र क्र. १५२ : अमरावतीच्या इतिहास प्रसिद्ध (पृष्ठ ६५० पहा)
जंगल सत्याग्रहाचे सेनापती डॉ. भोजराज.

चित्र क्र. १५३ : (पृष्ठ ६६० पहा)

दे. भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले

चित्र क्र. १४८ : मिठाचा सामुदायिक कायदेभंग (पृष्ठ ६३६-३७ पहा)
इ सन १९३०



चित्र क्र. १४९ : दे. भ. वीर वामनराव जोशी (पृष्ठ ६४१ पहा)

यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेऊन प्रचार मंत्री श्री. हरिहरराव देशपांडे यांनी तसे जाहीर केले होते. निरनिराळ्या तालुक्यातील कार्यकर्ते व सहकारी २०० स्वयंसेवक या प्रसंगास हजर होते. जोग चौक गुढ्या तोरणांनी सुशोभित करण्यात आला होता. मध्यभागी तिरंगी राष्ट्रीय झेंडा फडकत होता. सकाळी ६ वाजता वेदोक्त मंत्राने कलश–पूजा झाल्यावर सरासरी १०,००० स्त्री पुरुष समुदायासमोर समारंभास सुरुवात झाली. प्रत्येक तालुक्याकरिता एक एक व उमरावती करिता एक अशा सहा चुली पेटविण्यात येऊन त्यावर मीठ तयार करण्यात आले. सर्व समारंभ श्री. बामणगावकर व शेठ पन्नालालजी सिंघई ह्यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. दुपारी ४ वाजता स्त्रियांचा निराळा समारंभ डॉ. मिस् जावळे व सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. सरासरी ४ हजार स्त्री प्रेक्षकांच्या समोर मीठ तयार करण्यात आले. रात्री जंगी जाहीर सभा होऊन स्त्रियांनी तयार केलेली मिठाची पहिली पुडी श्री. सुखाप्पा ठेकेदार यांनी १५१ रु. स व दुसरी पुडी श्री. हरिवासभाई यांनी १२५ रु. स. विकत घेतली.

पुरुषांनी तयार केलेली पहिली पुडी ३० रु. स व दुसरी पुडी २५ रु. स हर्रास झाली आश्चर्याची गोष्ट ही की ह्या सर्व कार्यक्रमात एकही पोलिस अधिकारी हजर नव्हता. वरील समारंभात तयार केलेल्या मिठाच्या पुड्या, ता. २८ रोजी एलिचपूर, दर्यापूर, चांदूर, थुगाव, मोर्शी इ. तालुक्याच्या ठिकाणी जाहीर सभेत विकण्यात आल्या. वरील सभांतून शेकडो लोकांनी मिठाच्या लिलावात बोलून कायदेभंगात प्रत्यक्ष भाग घेतला. 'नमक का कानून ताड दिया' अशा घोषणा सभांतून होत असत. +

काँग्रेस दप्तराचा वाढता व्याप : डॉ. पातुरकर ह्यांचे दप्तरचे काम अतोनात वाढल्यामुळे त्यांचे मदतीस रा. रंगनाथराव गिरगावकर

+ टीप : मिठावरील कर किती जबर आहे व त्यामुळे हिंदुस्थानच्या लोकांचे किती हाल होतात या संबंधी मि. वेडरबर्न साहेबांनी पार्लमेंट-समोर भाषण करतांना सांगितले होते कीं

'जे मीठ तयार करण्यास १ आणा खर्च येतो ते मीठ तोंडात टाकावे म्हणून हिंदुस्थानचे रयतेस २० आणे कर भरावा लागतो. सरकारी कर नसता तर १०० रु. स जितके मीठ मिळाले असते तितके मीठ घेण्यासाठी सरकारास रु. २००० कर द्यावा लागतो'. (केसरी, दि. २७ सप्टेंबर १८९८)

व रा. दिगंबरपंत सहस्त्रबुद्धे ह्यांची योजना झाली. डॉ. पातूरकर ह्यांच्या दवाखान्यातील जागा अपुरी पडल्यामुळे कॉंग्रेस ऑफिसकरिता श्री. अण्णासाहेब बोधनकर व श्री. कोल्हटकर ह्यांच्या दोन स्वतंत्र जागा घेण्यात आल्या. श्री. बोधनकर ह्यांनी काही एक मोबदला न घेता आपली जागा दिली.

जाहीर सभा : दि. १ मे रोजी श्री. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, मध्यप्रांताचे नेते शेठ गोविंददास वगैरे पुढाऱ्यांना पकडण्यात आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. सभेत डॉ. पटवर्धन, डॉ. सोमण, श्री. शालीग्राम यांची भाषणे झाली होती.

स्वागत : उमरावतीच्या जैन समाजातर्फे दि. २ मे रोजी शेठ फत्तेचंदजी यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन, दहिहांड्याचा सत्याग्रह करून परत आलेले डॉ. पटवर्धन व इतर मंडळींचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी वीर वामनराव जोशी, शेठ पन्नालालजी यांची भाषणे झाली होती.

चरखा व खादी : चरखा, टकुळी व सूत कातणे इ. विधायक कार्यक्रमांचा जोराने प्रसार करण्यात आला. टकळ्यांचा प्रसार सर्वत्र झाल्यामुळे पेळूची मागणी वाढत चालली व म्हणून विदर्भ मिलसमधून पेळू आणवून लोकांची सोय करण्यात आली. वरूडच्या शिबिरात बारीक सूत कांतण्याचा प्रयत्न बराच यशस्वी झाला. सुताची निपज लोकांकडून जसजशी जास्त होत गेली तसतशी त्या सुताचे कापड विणण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता भासू लागली व त्याप्रमाणे अमरावतीस दोन माग (हातमाग) चालू करण्यात आले व खादीची पैदास जोरात सुरू झाली.

एप्रील महीन्याचा आढावा : एप्रील महिन्यात जिल्ह्यातून सुमारे १५० चे वर सभा झाल्या, पाचशेवर व्याख्याने झालीत. २०० सत्याग्रही स्वयंसेवक मिळाले, एक हजार रुपयांवर खादी विक्री झाली व सुमारे दीड लाख लोकांना कॉंग्रेसचा संदेश सांगण्यात आला. सुमारे हजार रुपयांचे मीठ विकल्या गेले. कायदेभंगाचे अनेक समारंभ झालेत. शाळातील लहान मुलांनी उमरावतीत दररोज प्रभात फेऱ्या काढून प्रचार केला व स्त्रियांनी घरोघर हिंडून वर्गणी जमा केली. विद्यार्थ्यांनी आणि स्वयंसेवकांनी दीड हजारावर सत्याग्रह फंड जमा केला.

डॉ. पंजाबराव यांचा खादी – प्रचार दौरा : जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख, उपाध्यक्ष श्री. शंकरराव वाटाणे व श्री. चौबळ वकील ह्यांनी खादी प्रचाराचा पायी दौरा या काळात काढून उमरावती, दर्यापूर व एलिचपूर तालुक्यात दहा ठिकाणी व्याख्याने दिली. हा पायी दौरा पुढे सुरू ठेवण्यात येणार होता.

महात्मा गांधी यांना अटक उमरावतीत कडकडीत हरताळ.

ता. ६ मे रोजी महात्मा गांधीस पकडल्याची बातमी येऊन पोहचली. ही बातमी सर्व तालुक्यात तारेने कळविण्यात आली. जिकडे तिकडे फारच औदासिन्य पसरले. व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद करून सर्वत्र कडकडीत हरताळ पाळला. दिवसभर हरताळ पाळून व सायंकाळी महात्माजींच्या फोटोची जंगी मिरवणूक काढून रात्री डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरविण्यात आली. या सभेत मि. अब्दुल वहाब, डॉ. भोजराज, डॉ सोमण, श्री. हरिहरराव देशपांडे, श्री राधावल्लभ लढ्ढा, श्री. पन्नालालजी सिंघई, सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्री. संभाजीराव गोखले यांची महात्माजींच्या गौरवपर व सरकारचा निषेध करणारी भाषणे होऊन, खादी, बहिष्कार व स्वदेशी ह्याविषयी उपदेश करण्यात आला होता.

जप्त वाङ्मयाचा कायदेभंग : प्रांतिक युद्ध मंडळाने ठरविल्याप्रमाणे ता. १० मे १९३० रोजी जप्तवाङ्मय वाचण्याचा कायदेभंग जोग, चौकात डॉ. भोजराज ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत करण्यात आला. डॉ. सोमण ह्यांनी चिपळूणकरांच्या निबंधमालेतील 'आमच्या देशाची स्थिति' ह्या जप्त झालेल्या निबंधातील मराठी उतारा वाचून दाखविला. डॉ. पटवर्धन ह्यांनी हिंदी भाषेतील 'काकोरीके शहीद' ह्या जप्त झालेल्या पुस्तकांतून बिस्मिलचा संदेश वाचून दाखविला. शेवटी दे. भ. बापूजी अणे ह्यांनी 'इंडिया इन् बॉन्डेज' हया जप्त झालेल्या पुस्तकातून इंग्रजी उतारा वाचून दाखविला. हा उतारा वाचल्यानंतर, हा कायदेभंग आपण का करीत आहोत ह्याचे सुंदर विवेचन दे. भ. बापूजी अणे ह्यांनी श्रोतृसमाजापुढे केले.

या सभेचे वेळी 'जवळच पोलिसांची तुकडी लोकांस पकडण्यास तयार आहे. सभेतच पकडा पकडी होईल' अशी गावात दाट वदंता असूनही सभेला चार-पाच हजारापर्यंत जनसमूह शुभ्र खादीच्या पोषाखात हजर होता. सभा शांतपणे पार पडली.

बॅरि. अभ्यंकर : जिल्हा युद्ध मंडळातर्फे दि. १२ मे रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरचे बॅरि. अभ्यंकर यांचे जाहीर भाषण झाले.

मिठाचा कायदेभंग बंद : वऱ्हाडातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी ११ मे रोजी दहिहांडचाच्या पाण्याचे मीठ तयार करण्याचा कार्यक्रम हजारो लोकांसमवेत अमलात आला. उमरावती जिल्ह्याच्या सर्व कानाकोपऱ्यात लाखो लोकांनी मिठाच्या कायदेभंगात प्रत्यक्ष भाग घेऊन, वऱ्हाड पुरता तरी मिठाचा कायदा नष्ट केला. सरकारकडून या कायदेभंगाबद्दल प्रांतात कुठेही प्रतिकार न झाल्यामुळे प्रांतिक युद्ध मंडळाच्या आज्ञेप्रमाणे, ता. १३ मे रोजी मिठाचा कायदेभंग बंद करण्यात आला.

हरताळ व जाहीर सभा : महात्मा गांधीचे अटकेनंतर सत्याग्रहाचे नेते झालेले श्री. अब्बास तैय्यबजी ह्यांना झालेल्या अटकेनिमित्त, दि. १३ मे रोजी उमरावतीत सर्वत्र हरताळ पाळण्यात आला व रात्री साडे आठ वाजता जोग चौकात शेठ पन्नालाल सिघई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन डॉ. सोमण, श्री. अ. वहाब, व सौ. पार्वतीबाई पटवर्धन इत्यादी वक्त्यांची श्री. तय्यबजींच्या अभिनंदनपर भाषणे झाली[१].

---

१ : **दे. भ. अब्बास तैय्यबजी** : राष्ट्रीय सभेचे एक प्रमुख नेते व महात्मा गांधींचे एक परम सहकारी दे. भ. अब्बास तैय्यबजी हे, जुन्या पिढीतील काँ. चे पुढारी, मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधिश, व एकदा काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविलेले मरहुम बद्रुद्दीन तैय्यबजी यांचे चिरंजीव होत.

श्री. अब्बास तय्यबजी, हेही बडोदा संस्थानात मुख्य न्यायाधिशाचे जागेवर होते. कायदेभंगाच्या १९३० च्या चळवळीत त्यांनी वृद्धापकाळीही भाग घेतला होता व मिठाच्या सत्याग्रहात महात्माजींना अटक झाल्यावर गुजरात मधील चळवळीचे सर्वाधिकारी म्हणून त्यांची नेमणूक झाली. गुजरात प्रांतातर्फे ऑ. इं. काँ. कमेटीवर त्यांची कित्येकदा निवड झालेली आहे. श्री. अब्बास तैय्यबजी हे वयाच्या ८२ व्या वर्षी, दि. ९ जुन १९३६ रोजी हृदयक्रिया बंद पडून मसुरी मुक्कामी वारले.

परदेशी कापडावर बहिष्कार : दि. १३ मे रोजीच दुपारी डॉ. पटवर्धन यांच्या दवाखान्यात स्थानिक कापड व्यापाऱ्यांची सभा होऊन, सहा महिने पर्यंत परदेशी कापड बोलावायचे नाही असे ठरले. या ठरावावर बहुतेक व्यापाऱ्यांनी सह्या केल्या होत्या.

जाहीर सभा : जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने दि. १८ मे रोजी वीर वामनराव यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्रीमती कमलादेवी चटोपाध्याय ह्यांना झालेल्या शिक्षेबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले व सोलापूरला लष्करी कायदा पुकारल्याबद्दल आणि धारासना येथे चालून गेलेल्या स्वयंसेवकांशी सरकारने केलेल्या निर्दयपणाच्या वर्तनाचा निषेध करण्यात आला होता.

अमरावतीस दडपशाहीला आरंभ.

जबलपूरच्या धरपकडीनंतर वऱ्हाडातही धरपकड सुरू होणार अशा वदंता सारख्या उठत होत्या. इतक्यात ता. २९ मे रोजी मराठी मध्यप्रांत युद्ध मंडळाचे पहिले सूत्रधार बॅ. अभ्यंकर यांना नागपूरला पकडून मोटारने अमरावती जेलमध्ये आणण्यात आले. लगेच दुसरे दिवशी दि. १ जुन रोजी वीर वामनराव जोशी आकोल्याहून अमरावतीस येत असता वाटेत बडनेर स्टेशनवर पकडले जाऊन त्यांचीही रवानगी अमरावती जेलमध्ये करण्यात आली. हरताळ, जाहीर सभा, मिरवणुकी इ. कार्यक्रम सारखे दोन दिवस चालू होते. दोन तीन दिवस मुकद्दमा चालून बॅ अभ्यंकर व वीर वामनराव जोशी ह्यांस दोन दोन वर्षाच्या कडक शिक्षा देण्यात येऊन भक्कम दंडही करण्यात आले. वीर वामनराव जोशी ह्यांनी आपले पश्चात दे. भ. बापूजी अणे ह्यांस प्रां. यु. मं. चे सर्वाधिकारी नेमले.

वीर वामनराव दादांना अटक झाली त्या दिवशी दुपारी ४ वा. ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची जाहीर सभा भरून स्त्री वक्त्यांची भाषणे झाली व त्यानंतर त्यांची एक जंगी मिरवणूक निघाली होती. रात्री साडे आठ वाजता आर्वीचे श्री. बाबासाहेब देशमुख यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. श्रोती व वैद्य त्र्यं. गं. जोशी, ह्यांची भाषणे झाली.

दुसरे दिवशीही हरताळ पडला होता. दु. ४ वा. जोग चौकातून वीर वामनराव व बॅरि. अभ्यंकर यांचे फोटोची रथातून जंगी मिरवणूक काढण्यात आली रथावर फुलांचा व बत्ताशांचा वर्षाव करण्यात आला होता. मिरवणूक परत आल्यानंतर रात्री ८ वा. डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्री. हरिहरराव देशपांडे, विमलाताई अभ्यंकर, डॉ. भोजराज, सौ. पटवर्धन यांची स्फूर्तिदायक भाषणे झालीत.

जाहीर निरोप समारंभ : दि. ४ जून रोजी रात्री साडे आठ वाजता, धारासना येथील मिठागारावर हल्ला करण्यासाठी, उमरावतीहून जाणाऱ्या सात सत्याग्रहींच्या तुकडीचा परिचय करून देण्यासाठी डॉ. भोजराज यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, वैद्य त्र्यं. गं. जोशी व इतर वक्त्यांची भाषणे झाली व तुकडीस निरोप देण्यात आला.

या सत्याग्रही तुकडीचे नेते श्री. बाजीरावजी ओक हे होते व सर्वश्री वा. श्री. देशमुख, मा. मा. मोहिते, नारायण मारुती, र. वि. पोंक्षे, वा. ब. वाठोडकर, म. गो. देशमुख ही सत्याग्रही मंडळी त्यात होती. या तुकडीला भुसावळ स्टेशनवरच अटक करण्यात आली व ३ ते ६ महिन्यांच्या शिक्षा देण्यात आल्या होत्या.

सायमन साहेबांची स्मशान यात्रा : दि. ८ जून रोजी दुपारी ५ वा. जोग चौकातून, हुबेहुब मनुष्याकृती केलेल्या सायमन साहेबांच्या कागदी प्रतिमेस गाढवावर बसवून व गळ्यात खेटराची माळ घालून एक जंगी मिरवणूक काढण्यात आली होती. गावातील प्रमुख रस्त्यांनी फिरून आल्यावर श्री. शालीग्राम यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. जैनुद्दीन हयांचे व्याख्यान झाले व नंतर त्या प्रतिमेस अग्नी देण्यात आला होता.

सत्याग्रहास देणग्या : सरस्वती प्रेस मधील कर्मचारी व शेठ शिवनाथ बाबू यांच्या दुकानातील नोकर मंडळींनी आपल्या पगारातून वर्गणी करून अनुक्रमे रु. ८१३ व रु. ४०, सत्याग्रहाचे मदतीकरिता काँग्रेस कमेटीस दिले. शिंपी मंडळींनी रु. ४५ व येथील व्हॉलकार्ट ब्रदर्स मधील कारकुनांनी साडे सत्तावीस रुपये सत्याग्रह फंडास दिले. उमरावती–मोर्शी–मोटार ओनर्स असोसिएशनने रु. १०१ सत्याग्रह फंडास दिले.

तसेच येथील.....मंडळींनी सत्याग्रह फंडास दरमहा २४२ रुपये सोळा महिनेपर्यंत देण्याचे ठरविले आहे. वकिलांच्या कारकुनांनी दरमहा रु. १० व भांड्यांच्या व्यापाऱ्यांनी दरमहा रु. ५० देण्याचे जाहीर केले आहे.

(वरील सत्याग्रह फंडाला मदत देणाऱ्यांची यादी नमुन्यादाखल दिलेली आहे. यात गरीब कामगारापासून मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत देणगी देणारे आहेत. यावरून १९३० साली कायदेभंगाचा जो सत्याग्रह झाला त्याला आम जनतेची कशी सहानुभूती होती ते दिसून येते.)

विदेशी कापडाविरूद्ध मोहिम : पिकेटिंग सुरु.

ता. १० जून रोजी परदेशी (विदेशी) कापडावर लवकरच पिकेटिंग सुरू करणार असा व्यापाऱ्यांना इषारा देण्याकरिता उमरावतीस जंगी मिरवणूक काढण्यात आली. हया प्रसंगी जिल्हयातील कार्यकर्ते हजर होते. ता. १३ पासून कपडयाच्या दुकानावर पिकेटिंग सुरू झाले. त्याचा परिणाम असा झाला की गुजराथी व्यापाऱ्यांनी १ महिनाभर विदेशी कापड विकणार नाही अशी काँग्रेस कमिटीजवळ प्रतिज्ञा लिहून दिली. त्यामुळे त्यांच्या दुकानावरून पिकेटिंग उठविण्यात आले. ता. १५ मे रोजी गुजराथी व्यापाऱ्यांचे अनुकरण करून इतर व्यापाऱ्यांनीही विदेशी कापड न विकण्याची प्रतिज्ञा केली व हयापुढे १८ महिने विदेशी कापड मागविणार नाही अशीही प्रतिज्ञा लिहून दिली. तालुक्यांच्या ठिकाणीही हयाच प्रमाणे विदेशी कापडावरील बहिष्काराची उठावणी करण्यात आली.

उमरावतीत दारू दुकानावर पिकेटिंग.

विदेशी कपडयाचे पिकेटिंग चालू असता उमरावती शहरातील चारही दारूच्या गुत्यांवर पिकेटिंग चालू करण्यात आले.

स्वयंसेवकांबरोबर काही देशसेविका, सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचे नेतृत्वाखाली दारूच्या गुत्यावर पिकेटिंग करीत असत. गुत्ते बंद झाल्यावर रात्री त्या त्या मोहल्ल्यांतील लोकांना गुत्यासमोर जाहिर सभेत दारू न पिण्याचा, उपदेश करण्यात येत असे.

सरकारी नोकरीचा राजीनामा : उमरावती कचेरीतील एक कर्मचारी श्री. राजाभाऊ बारलिंगे हे महात्मा गांधींच्या अटकेनिमित्त उमरावतीत हरताळ पडला त्या दिवशी गैरहजर राहिले म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी दिलगिरी प्रदर्शित न करता स्वाभिमानपूर्वक आपल्या नोकरीचा ता. १३ जुनला राजीनामा दिला.

दे. भ. श्री. हरिहरराव देशपांडे दडपशाहीचा दुसरा बळी.

ता. १५ जून, रोजी डॉ. पटवर्धन यांचे दवाखान्यात उमरावती जिल्हा युद्ध मंडळाचे प्रचार मंत्री दे. भ. हरिहरराव देशपांडे यांना १०८ कलमाखाली पकडण्यात आले. रा. हरिहरराव यांना पकडण्यात आल्यानंतर दारू पिकेटिंग जोराने सुरू करण्यात आले. खटल्याचा निकाल होऊन हरिहररावांना १ वर्षाची शिक्षा देण्यात आली. रा. हरिहरराव यांनी जिल्ह्यात शेकडो ठिकाणी व्याख्याने देऊन सारी जनता जागृत केली. त्यामुळे त्यांचेवर पोलिस अधिकाऱ्यांची वक्रदृष्टी बरेच दिवसांपासून होती. पुढील सत्याग्रहाच्या लढ्यात या जिल्ह्यात जे अपूर्व यश आले त्याचे बरेचसे श्रेय रा. हरिहरराव यांचे स्फूर्तिदायक व्याख्यानांना द्यावे लागेल.

श्री. हरिहरराव यांच्या अटकेची बातमी विद्युत गतीने शहरात पसरली व सर्वत्र हरताळ पडला. रात्री डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. दत्तोपंत नाटेकर, श्री. रामप्रसाद मोहनलाल, इत्यादींची भाषणे झाली. डॉ. पटवर्धनांचे भाषण फारच स्फूर्तिदायक झाले.

व्हॉईसरॉयच्या ऑर्डिनन्स विरुद्ध जंगी मिरवणूक : ता. १८ जून १९३० रोजी व्हॉईसरॉयच्या ऑर्डिनन्स विरुद्ध निषेध म्हणून जंगी मिरवणूक उघड्या डोक्यांनी शांतपणे काही एक न बोलता काढण्यात आली. शाहीर चोळकर, यांच्या ठिकठिकाणच्या पोवाड्यांच्या कार्यक्रमामुळे जनतेत उत्साह वाढत चालला.

उमरावतीत मिरवणूक संपल्यावर, डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. तीत श्री. गोखले वकील, श्रीरामपंत देशपांडे, श्री. चौधरी यांची भाषणे झालीत.

जिल्हयातील कार्यकर्त्यांची परिषद : ता. २० जून १९३० रोजी सायंकाळी ५ वाजता गणेश थिएटरमध्ये निरनिराळ्या तालुक्यातील लहान मोठया सरासरी २०० कार्यकर्त्यांची परिषद भरविण्यात आली. डॉ. सोमण यांनी स्वागताध्यक्ष या नात्याने भाषण केल्यानंतर, दे. भ. बापूजी अणे यांनी एक तासभर जंगल सत्याग्रहाची कल्पना व कार्यक्रम स्पष्ट रीतीने सर्वांपुढे मांडला व आपापल्या भागात सत्याग्रहाला योग्य अशा जागेची पाहणी करून स्वयंसेवकांची तयारी करण्याची सूचना जमलेल्या कार्यकर्त्यांस दिली. निरनिराळ्या तालुक्यातील प्रतिनिधींची 'जंगल सत्याग्रहात सर्वतोपरी मदत देऊ' अशी अभिवचनपर भाषणे झाली. परिषद समाप्त झाल्यानंतर सर्व कार्यकर्ते उत्साहाने आपआपल्या गावी निघून गेले.

जाहीर सभा : त्याच दिवशी रात्री साडे आठ वाजता जोग चौकात श्री. बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. ब्रिजलालजी बियाणी यांचे भाषण झाले. समारोपाचे भाषणात श्री. बापूजी अणे यांनी सांगितले की, "गेल्या दोन – तीन पिढ्यास जो काळ पाहण्याचे सौभाग्य मिळाले नाही, तो काळ पाहण्याचे भाग्य आपल्या सुदैवाने आपणास लाभले आहे. तेव्हा हा पर्वकाल समजून व निर्लोभी वृत्ती ठेवून, जितका अधिक त्याग करता येईल तितका करून ही चळवळ यशस्वी करावी."

निषेधार्थ सभा : दि. २४ जुन रोजी, मुंबईला स्वयंसेवकांच्या जमावावर पोलिसांनी जो निर्दयपणे हल्ला केला, त्याचा निषेध करण्याकरिता डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली रात्री जाहीर सभा होऊन श्री. श्रीरामपंत देशपांडे, डॉ. भोजराज, व डॉ. सोमण यांची भाषणे झाली.

ब्रिटिश मालावरील बहिष्कार : "सध्याच्या राजकीय लढ्यात सरकारने हिंदी लोकांच्या आकांक्षा दडपून टाकण्याचा जो प्रयत्न केला आहे व हिंदी लोकांस सर्वस्वी दाबून ठेवण्याचा आणि हिंदी पुढाऱ्यांस जेलमध्ये घालून व पायाखाली तुडवून टाकण्याचा जो सपाटा सुरू केला आहे, त्या धोरणाचे निषेधार्थ म्हणून आम्ही खाली सह्या करणारे उमरावतीचे स्टेशनरी, फॅन्सी मालाचे व औषधीचे व्यापारी आज सर्वानुमते असे ठरवितो की,

(१) दि. २० जून १९३० पासून एक महिनापर्यंत ब्रिटिश माल कोणताही विकणार नाही.

ही अट योग्य रीतीने पाळल्या जाते की नाही हे पाहण्यासाठी सात दुकानदारांची एक कमेटी नेमली होती आणि ही अट तोडणारे व्यापाऱ्यास दंड ठेवला होता." या ठरावावर एकूण तेवीस प्रमुख व्यापाऱ्यांच्या सह्या होत्या.

वानरसेनेची मिरवणूक : दि. २४ व २५ जून रोजी दुपारी दीड वाजता, बारा वर्षाचे आंतील लहान मुलांची एक जंगी मिरवणूक जोग चौकातून निघून, पहिल्या दिवशी शहरात व दुसऱ्या दिवशी कॅम्पमध्ये राष्ट्रगीते गात फिरली होती.

वकील वर्गाचा निश्चय : दि. २७ जुन रोजी बारूममध्ये येथील वकील वर्गाची सभा श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरून तीत हिंदुस्थान सरकार व मध्यप्रांत सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध करण्यात आला होता. त्याचप्रमाणे सांप्रत सुरू असलेल्या चळवळीला सहानुभूती म्हणून, देशातच तयार झालेले कापड – विशेषत: खादी– वापरण्याचा व डोक्यावर हातसूत व हातमाग यावरील तयार झालेल्या कापडाचे शिरस्त्राण वापरून, परदेशी कापडावर आणि सर्व प्रकारच्या इंग्लिश मालावर पूर्ण बहिष्कार घालण्याचा निश्चय जाहीर करण्यात आला होता.

प्रचार दौरा : जिल्हा कॉं. कमेटीतर्फे पुढील प्रमाणे प्रचारकार्य करण्यात आले होते.

(१) डॉ. सोमण, शेठ पन्नालाल व श्री. रतनलालजी काळे हयांनी एलिचपूर, शिराळा, जरूड, लोणी, हिवरखेड, पथ्रोट व तिवसा येथे फिरून व्याख्याने दिली.

(२) डॉ. पटवर्धन, श्री. राधाकिसन व श्री. चौधरी यांनी मोर्शी, वरूड, चांदूरबाजार, शिरसगाव, रामतीर्थ, नेरपिंगळाई व वाठोडा येथे दौरा काढून लोक जागृती केली.

(३) डॉ. भोजराज, श्री. नाईक व श्री. वातकर हयांनी वलगाव, बडनेरा, शेंदूर्जना, पोरगव्हाण इत्यादी ठिकाणी व्याख्याने दिली.

दि. १ जुलै पूर्वी हे दौरे करण्यात आले.

प्रचंड जाहीर सभा : दि. ३० जून रोजी रात्री दहा हजार लोकांची प्रचंड जाहीर सभा, श्री. संभाजीराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली

होऊन तीत श्री. भाऊराव देशपांडे, पं. देवकीचंद, श्री. बामणगावकर इत्यादी वक्त्यांची उत्साहवर्धक अशी सद्यःस्थितीवर भाषणे झाली.

मुष्ठीफंड योजना : जुलैचे पहिल्या आठवड्यात स्वयंसेवकांच्या भोजन व्यवस्थेसाठी, येथील काही उत्साही मंडळींनी मुष्ठीफंडाची योजना काढली. त्याप्रमाणे त्यांनी दोन हजारावर पिशव्या निरनिराळ्या मोहल्ल्यात वाटल्या होत्या. प्रत्येक घरात एकेक पिशवी ठेवून त्यात जेवणापूर्वी एक मुष्ठीभर धान्य टाकीत जावे व सात दिवसांनी ते धान्य शिबिरात पोचते करावे. अशी ही योजना होती.

दे. भ. बापूजी अणे यांना अटक : अमरावतीत हरताळ व प्रचंड मिरवणूक.

पुसद येथे दे. भ. बापूजी अणे यांनी जंगल सत्याग्रह केला त्यावेळी त्यांना पकडून, चोरीच्या आरोपावरून साधी कैद झाल्याचे वृत्त दि. १० जुलै रोजी सायंकाळी उमरावतीत स्वयंसेवकांनी मोटारीतून बिगूल वाजवून जाहीर केले होते.

ही बातमी ऐकताच, जिकडे तिकडे खळबळ उडाली. सहा महिन्याची शिक्षा ऐकताच, हिंदी लोकांशी तडजोड न करण्याचा सरकारचा स्पष्ट हेतू आहे असे लोक बोलू लागले. रस्त्यात, घरीदारी, क्लबातून जिकडे तिकडे दे. भ. अणे हचांचे शिवाय लोकांचे तोंडी दुसरा विषयच नव्हता.

दि. ११ रोजी उमरावतीत पूर्ण हरताळ होता. मुसलमान, बोहरी यांनी सुद्धा आपली दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवली होती. स्टेशनच्या हमालांनी "यापुढे आम्ही विदेशी माल उचलणार नाही" अशी शपथ घेऊन आपल्या गाड्यांची प्रचंड मिरवणूक काढली. पुढच्या गाडीत बापूजींचा फोटो ठेवण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी शाळेला खो देऊन सर्व दिवसभर शाळेवर पिकेटिंग केले व विशेष हे की, मुलींनी या पिकेटिंगमध्ये भाग घेऊन आपले हायस्कूल व इतर शाळा जवळ जवळ ओस पाडल्या. सायंकाळी ५ वा. नागरिकांची प्रचंड मिरवणूक निघाली. 'इतकी प्रचंड मिरवणूक उमरावतीत तरी आजपर्यंत कोणाच्या पाहण्यात आली नाही' असे जो तो म्हणत होता. ती जितकी मोठी होती तितकीच पूर्णपणे ती प्रातिनिधिक स्वरूपाची होती. मिरवणुकीत पंधरा वीस हजार पुरुष व हजार दीड हजार पर्यंत बायका सहज असतील. श्री. अण्णासाहेब देशपांडे आदी करून काही वकील मंडळीही हजर होती. मवाळांचे पुढारी मिरवणूक पाहण्यास मुद्दाम गावात आले होते.

ह्या मिरवणुकीतील विशेष म्हणजे अद्वितीय शिस्त व स्वयंसेवकांची उत्कृष्ट कामगिरी. अगदी म्हाताऱ्या बायकापासून दोन वर्षाच्या मुलीपर्यंत सर्वांना सुरक्षित सांभाळून नेण्याचे कठीण काम स्वयंसेवकांनी उत्तम तऱ्हेने केले होते.

मिरवणूक जोग चौकात आल्यावर तेथे जाहीर सभा झाली. अध्यक्ष-स्थानी डॉ. सोमण विराजमान झाले होते. सभेत सौ. पार्वतीबाई पटवर्धन, डॉ. भोजराज, श्रीरामपंत देशपांडे, श्री. पातकर यांची व शेवटी अध्यक्षांचे भाषण झाले.

डॉ. पटवर्धन व डॉ. सोमण यांना अटक. इंग्रज अधिकाऱ्यांनी लोकांवर घोडे घातले.

पुसद सत्याग्रह पाहून परत आल्यानंतर, ता. १२ जुलै रोजी वऱ्हाड प्रां. युद्ध मंडळाचे एक प्रमुख सभासद व येथील हनुमान व्यायाम शाळेचे चालक डॉ. पटवर्धन व डॉ. सोमण यांना अमरावती मुक्कामी १०८ कलमाखाली पकडण्यात आले. गावात बातमी पसरल्यानंतर हजारो लोक डॉ. द्वयांना भेटण्यास पटवर्धनांचे दवाखान्यासमोर जमा झाले. लोकांच्या आग्रहामुळे जोग चौकात जनसमूहास दोन्ही दे. भ. नी पाच पाच मिनिटे संदेश दिला. तेथून हजारो लोकांबरोबर त्यांची मिरवणूक पोलिस ठाण्यापर्यंत काढण्यात आली. त्यापूर्वी स्त्रीपुरुषांचा बराच मोठा जनसमूह पोलिस ठाण्यात जमला होता. त्यांचे आग्रहास्तव डॉ. सोमण व डॉ. पटवर्धन चार शब्द बोलणार इतक्यात डी एस. पी. व सार्जंट घोडे भरधांव फेकीत स्त्री पुरुषांचे जमावात चालून आले. त्यामुळे काही लोकांस दुखापती झाल्या. काही स्त्रियांना व पुरुषांना घोड्याच्या टापा लागल्या. रामा पांचाळ हा इसम तर रक्तबंबाळ झाला त्यामुळे लोकांनी चिडून या ऑफिसरावर दगडफेक सुरू केली. इतक्यात डॉ. पटवर्धन, सोमण व इतर पुढारी मंडळी यांनी मध्ये पडून लोकांस शांत केले. पोलिसठाण्याचे मागच्या बाजूने ठेवलेल्या मोटारीतून डॉ. द्वयांना जेलमध्ये नेण्यात आले. चिडलेले काही अशिक्षित लोक पोलिस ठाण्याभोवती घुटमळत होते. वरील ऑफिसर सायंकाळपर्यंत ठाण्याबाहेर निघाले नाहीत. सायंकाळी ६ वाजता सरासरी

५० लाठीबाज पोलिसांचे पहाऱ्यात हे ऑफिसर घोड्यावर बसून ठाण्यातून निघाले. तोच या चिडलेल्या लोकांनी शेम शेमची ओरड केली. तेवढ्यावरून चिडून त्या अधिकाऱ्यांनी निःशस्त्र लोकांवर लाठीमार करण्याचा हुकूम केला त्यात काही लोक जखमी झाल्यामुळे स्थानिक डॉक्टराकडे उपचाराकरिता पाठविण्यात आले. यामुळे गावात सर्वत्र प्रक्षुब्ध वातावरण उत्पन्न झाले.+ सायंकाळी जंगी जाहीर सभा भरवून देशभक्तांचे अभिनंदन करण्यात आले व पोलिसांचा निषेध करण्यात आला. दोन्ही डॉक्टरास एकेक वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली.

रात्री जोग चौकातील सभेत डॉक्टरद्वयांचा संदेश सौ. पटवर्धन व डॉ. भोजराज यांनी वाचून दाखविला.

+ : दि. १२ जुलै १९३० रोजी कोतवाली जवळ घडलेल्या या प्रकाराबद्दल एक सद्गृहस्थ, दि. २२ जुलै १९३० चे उदय पत्रात लिहितात– "...आता डॉ. बोलणार या अपेक्षेने लोक उत्सुक होऊन शांत बसले होते. इतक्यात मागील बाजूने, म्हणजे श्री आवटे यांच्या घराच्या बाजूने दोन घोडेस्वार एकदम दौडत आले व भरवेगाने फाटकातून, लोकांचे गर्दीतून त्यांनी घोडे कोतवालीचे व्हरांड्याशी चालविले. फाटकाशी गर्दीमुळे घोडे थबकले. पहिला घोडा कोतवालीचे व्हरांड्याशी जाऊन डावे बाजूने एक चक्कर घेऊन भोळे यांचे घराकडे तोंड करून फुरफुरतच हे ता; तोंच डॉ. पटवर्धन यांनी व्हरांड्यातून त्याचा लगाम धरला व त्या स्वारास उतरविले. ते डी. एस. पी. होते. दुसरा घोडाहो डी एस. पी. च्या पाठोपाठ आत शिरला व कोतवालीचे व्हरांड्यासमोर डावे बाजूकडून उजवी बाजूकडे असा नागमोडी वळणाने दोन तीन मिनिटे लोकांचे गर्दीतून नाचताना दिसला त्यालाही टांच मारली असावी असे वाटते. हया घोड्याच्या नाचण्यामुळे काही लोकास व बायकास लागले असे लोक बोलल्याचे ऐकू आले... 'शेम शेम व जयजयकार' हयांच्या मिश्र आरोळ्या लोक मारीत होते एक व्हॉलंटीयर एका मनुष्यास कोतवालीचे बाजूस श्री. इंदूरकरचे घरासमोर नेताना दिसला. त्या मनुष्याचे खांद्यावर व मानेवर अंगातील सदरा लाल झालेला दिसला. त्या इसमास घोड्याची टाप लागली असे दिसले. लोक हया प्रकारामुळे प्रक्षुब्ध झालेले दिसले....." (हया पत्राखाली सही आहे पण तेवढा भाग उधईने कुरतडल्यामुळे सही कोणाची आहे ते कळत नाही.

उमरावतीचा प्रसिद्ध जंगल सत्याग्रह

सुवर्णाक्षरांनी नोंदवावी अशी १७ जुलै १९३० ची अपूर्व घटना.

पूर्व तयारी : दे. भ. बापूजी अणे ह्यांचे २० जूनच्या परिषदेतील भाषण झाल्यानंतर वऱ्हाडभर व उमरावती जिल्ह्यात जंगलसत्याग्रहाकरिता अनुकूल वातावरण उत्पन्न झाले. सर्वांचे लक्ष जंगल सत्याग्रहाच्या सुरवातीच्या दिवसाकडे लागले. जुलै महिन्याच्या आरंभापासून जंगल सत्याग्रहात भाग घेण्यास स्वयंसेवक मंडळी उत्सुक झाली. ता. १० जुलै १९३० हा दिवस विदर्भाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा आहे, कारण याच मंगल दिवशी वऱ्हाडचे पूज्य पुढारी बापूजी अणे ह्यांनी जंगलचा कायदा पुसद मुक्कामी पायाखाली तुडविला. त्यांना त्याच दिवशी पकडण्यात येऊन ६ महिने साधी कैद झाली. त्यांनी आपल्या पश्चात. दे. भ. ब्रिजलाल बियाणी ह्यांना प्रांताचे सर्वाधिकारी नेमले. पुसदला सत्याग्रह आठ दिवस चालू होता. पुसद गाव मध्यवर्ती नसल्यामुळे प्रां. यु. मं ने सत्याग्रहाचे क्षेत्र उमरावती शहराजवळील वडाळी जंगलात बदलविले. वडाळी सत्याग्रहाचा सर्व भार उमरावती जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या आनंदाने आपल्या अंगावर घेतला.

वडाळी सत्याग्रह : वडाळी सत्याग्रह, १७ जुलै पासून सुरू झाला. प्रांतिक युद्ध मंडळाचे अध्यक्ष ब्रिजलाल बियाणी हे १७ तारखेस सत्याग्रह करणार होते, परंतु त्या पूर्वीच त्यांना व त्यांनी नेमलेले सर्वाधिकारी रा. गोळे यांना एकदमच पकडण्यात आले. त्यामुळे त्यांच्या मागून आलेले. प्रां. सर्वाधिकारी डॉ. भोजराज ह्यांना वडाळी सत्याग्रहाचे सेनापतित्व देण्यात आले. ता. १६ रोजी रात्री साडे आठ वाजता पहिल्या सत्याग्रही पथकाचा परिचय करून देण्यासाठी श्री. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन अनेक वक्त्यांची भाषणे झाली व दुसरे दिवशीचा कार्यक्रम सांगण्यात आला.

ता. १७ जुलै हा दिवस उमरावतीचे नागरिक कधीही विसरणार नाहीत. ता. १७ रोजी सकाळी ६ वा. जोग चौकात स्थानिक व परग्रामस्थ संस्थांतर्फे सत्याग्रहींना कुंकुमतिलक लावण्यात आला व पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर डॉ. भोजराज, 'पथक नायक' ह्यांना राष्ट्रध्वज अर्पण करण्यात आल्यावर उमरावती शहरात अपूर्व अशी २५ हजार स्त्री पुरूषांची प्रचंड मिरवणूक जोग चौकातून निघाली. याप्रसंगी श्री. बाबासाहेब खापर्डे,

श्री. बामणगावकर, श्री. संभाजीराव गोखले, पं. कानडे शास्त्री, श्रीमती दुर्गाताई जोशी. सौ. पार्वतीबाई पटवर्धन, श्रीराम सुरजमल, प्रांतिक युद्ध मंडळाचे मंत्री व प्रांतातील इतर पुढारी हजर होते. एवढी मोठी गर्दी रस्त्याने शिस्तीने जात होती. प्रत्यक्ष रणक्षेत्रावर सरासरी ३५ हजार पुरूष व ५ हजार स्त्रिया सत्याग्रह पाहण्यास आले होते. त्यावेळी वडाळीचे सर्व टेकडयावर जिकडे तिकडे माणसेच माणसे दिसत होती[1]. गावातील स्त्री–पुरूष, व्यापारी, वकील इतकेच काय पण दूरदूरच्या शहरातून व खेडयापाडयातून मंडळी रणसंग्राम पाहण्यासाठी आली होती. सदर प्रसंगी फॉरेस्टचे सर्व लहान मोठे अधिकारीही हजर होते. मिरवणूक येऊन दाखल झाल्यावर जमलेल्या जनसमुदायापुढे छोटेसेच पण अत्यंत स्फूर्तिदायक असे डॉ. भोजराज यांचे भाषण झाले. त्यानंतर डॉ. भोजराज हयांनी पहिले झाड तोडल्यावर त्यांचे साथीदारांनी गवत कापण्यास सुरूवात केली. सत्याग्रह संपवून परत येत असतां वाटेत जेलचे कोपऱ्यावर फक्त डॉ. भोजराज ह्यांना पकडण्यात येऊन ६ म. साधी कैद अगर २५० रू. दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. डॉ. भोजराज ह्यांनी दंड न देता तुरूंगाचा मार्ग पत्करला. रात्री जोग चौकात श्री. श्रीराम सुरजमल यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून पं. कानडे शास्त्री, कु. प्रमीला ओक, सौ. दांडेकर, सौ. पटवर्धन व श्री. वैद्य यांची भाषणे झाली व दुसरे दिवशीच्या सत्याग्रहींची ओळख करून देण्यात आली.

ता. १८ रोजी आकोल्याच्या सुप्रसिद्ध कार्यकर्त्या श्रीमती दुर्गाताई जोशी ह्यांच्या नेतृत्वाखाली २० स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला. पण अटक

---

१ : "……डॉ. भोजराजांनी सत्याग्रह केला त्यादिवशी मी त्यांच्या समागमे होतो...ते सत्याग्रह करित असताना, म्हणजे राखीव जंगलात आपल्या सोबत्यांसह गवत कापीत असताना १५–२० हजार लोक तो सत्याग्रह पाहण्यास जमले होते. सर्व रान व भोवतालच्या टेकडया मनुष्यमय झाल्या. होत्या व सत्याग्रहाला यात्रेचे स्वरूप आले होते. शांतताभंग होणार नाही. अशी मी डी. एस्. पी. ला हमी दिली होती. तेथे (युरोपियन) डी. एस्. पी. घोडयावर बसून आला. आता काय होते. ते पाहण्याकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. त्याने दंडेवाले पोलिस शिपाई बरोबर आणले होते. पण लाठी चार्ज करण्याचे धैर्य झाले नाही..." (कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र ले. बाबासाहेब खापर्डे : पा. ६९०)

कोणासच झाली नाही. ता. १९ ला तीच तुकडी सत्याग्रहास गेली, पण कोणासच पकडण्यात आले नाही. ता. २० रोजी रामगोपाल मिठूलालजी ह्यांचे नेतृत्वाखाली ३६ स्वयंसेवक सत्याग्रहास पाठविण्यात आले. पैकी ३० जणास ६ महिण्याची शिक्षा झाली. त्यांत श्री. विश्वासराव परशरामजी देशमुख, श्री. रामेश्वरजी अवस्थी, श्री. हरिभाऊ सखाराम ही मंडळी होती[1].

शिबिराधिपती जोशी : ता. २० रोजी रा. त्र्यंबकराव जोशी ह्यांना ११७ कलमाखाली पकडून १ व. स. म. ची शिक्षा देण्यात आली. रा. जोशी हे डॉ. पातूरकर ह्यांचे बरोबर फेब्रुवारी १९२९ पासून जिल्हा काँग्रेस कमेटी सेक्रेटरीचे काम अत्यंत उत्साहाने व चिकाटीने करीत होते. शिबिराधिपती ह्या नात्याने त्यांनी केलेली कामगिरी जिल्ह्यांतील स्वयंसेवक व अमरावतीचे नागरिक कधीही विसरणार नाहीत.

ता. २१ रोजी श्री. भोरे आकोलेकर, ह्यांचे नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्यात आला, पण कोणासच अटक झाली नाही. ता. २२ रोजी पाठविलेल्या तुकडीसही अटक झाली नाही. पुन्हा ता. २३ रोजी श्री. भोरे ह्यांच्याच नेतृत्वाखाली १६ स्वयंसेवकांची तुकडी पाठविण्यात आली. त्या सर्वांना पकडून ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. त्याच दिवशी श्री. रतनलाल काळे ह्यांना ११७ कलमा खाली पकडून १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. ता. २४ हा दिवस वडाळी सत्याग्रहाचा शेवटचा असल्यामुळे व त्या दिवशीचे सेनापतित्व श्री. शेठ राधाकिसनजी ह्यांचेकडे असल्यामुळे मिरवणुकीत व रणक्षेत्रावर प्रेक्षकसमुह फार लोटला. पण अटक कोणासच झाली नाही. वडाळी सत्याग्रहाची तयारी करण्यात वडाळीचे ठेकेदार सुखाप्पा बाबू व त्यांचे मदतनीस विठ्ठलराव शेंडे इत्यादि मंडळींनी फार मेहनत घेतली, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

नवे सर्वाधिकारी : डॉ. भोजराज ह्यांनी आपले पश्चात दे. भ. बामणगावकर ह्यांस प्रां. चे सर्वाधिकारी नेमले व अ. जि. चे सर्वाधिकारी म्हणून बनोसा येथील पोपटलाल शहा ह्यांची नेमणूक झाली.

सत्याग्रहास पुनः सुरूवात : ता. १० ऑगस्ट रोजी श्री. दादासाहेब वाटाणे ह्यांचे नेतृत्वाखाली ३३ स्वयंसेवकांच्या तुकडीने छत्रीतलावाजवळील

१ : परिशिष्ठ क्र. १ पहा.

जंगलात झाडे तोडून सत्याग्रह केला. ता. ११ ला ६ स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला पण अटक कोणासच झाली नाही. प्रां. यु. मं. ने ठरविल्याप्रमाणे ता. २४ पासून सर्व तालुक्यात व इतर जिल्ह्यात सत्याग्रह करण्यात आला व ता. १ आगस्टपासून सत्याग्रहाची परवानगी सार्वत्रिक देण्यात आली.

श्री. मंगलचंद व बर्वे : शेठ मंगलचंद बिसोरीलाल ह्यांना पोहरा सत्याग्रहात हजर राहून स्वयसेवकांना मदत केल्यामुळे ता. ३ आगस्ट रोजी ११७ कलमाखाली पकडण्यात येऊन ६ म. स. म. व ५०० रु. दंड ठोठाविण्यात आला. मारूती बर्वे हा काँग्रेसचा उत्साही स्वयंसेवक पोहरा सत्याग्रहाच्या व्यवस्थेत गुंतला असता त्यालाही ११७ कलमाखाली पकडून १ ब. स. म. ची शिक्षा देण्यात आली.

श्री. बामणगावकर व श्रीरामपंत देशपांडे : वऱ्हाडचे ६ वे सर्वाधिकारी दे. भ. बामणगावकर ह्यांना २९ जुलै रोजी ११७ क. खा. पकडण्यात आले व १ वर्षाची शिक्षा देण्यात आली. चळवळीच्या आरंभापासून दे. भ. बामणगावकर हे वीर वामनरावजींच्या खांद्यास खांदा लावून मोठ्या धडाडीने कार्य करीत असत. हयांनी आपल्या व्याख्यानांनी व संपादक या नात्याने उदयातील लेखांनी सर्व जिल्हा व वऱ्हाड प्रांतात जागृती उत्पन्न केली होती. रा. बामणगावकर हयांनी आपल्या पश्चात प्रां. चे सर्वाधिकारी म्हणून आकोल्याचे श्री. शेठ श्रीराम सुरजमल हयांची नेमणूक केली. श्री. श्रीरामपंत देशपांडे हयांस पोहऱ्यावरून परत येत असता वाटेतच पकडून ११७ क. खा. १ व. स. म. ची शिक्षा देण्यात आली. श्री. हरिहररावानंतर श्रीरामपंतांनी एलिचपूर तालुक्यात अ. जि. यु. मं. चे प्रचारमंत्री म्हणून दौरे काढून स्वयंसेवकांची संख्या बरीच वाढविली.

राष्ट्रीय सप्ताह : लोकमान्यांच्या पुण्यतिथीनिमित्त ता. १ आगष्ट पासून राष्ट्रीय सप्ताह पाळण्यात आला. ता. १ ला 'राजकीय कैदी दिना'चा हरताळ असल्यामुळे कॉलेजवर पिकेटिंग करण्यात आले. दररोज मिरवणूकी, सभा, सभासद वाढविणे इ. कार्यक्रम जोराने चालू होते. या वेळेपासून श्री. बाबासाहेब खापर्डे, नानासाहेब गोखले, पाराशरपंत बेडेकर इ. पुढारी सर्व कार्यक्रमात उत्साहाने भाग घेऊ लागले.

एका सत्याग्रहीचे स्टेटमेंट : जुलैचे शेवटचे आठवडयात मोठ्या प्रमाणावर सबंध जिल्हयात जंगल सत्याग्रह होऊन धरपकड झाली. त्यात शेंदूरजन्याचे श्री. जग्गुलालजी तांबी यांनाही पकडून उमरावती जेलमध्ये आणण्यात आले व खटला सुरू झाला. तेव्हा श्री. जग्गुलालजींनी जे स्टेटमेंट कोर्टासमोर दिले ते फार मजेशीर होते; ते असे–

"माझे नांव 'भारतीय पुत्र' आहे. बापाचे नांव 'परमेश्वर' आहे. उमर १ वर्षापासून १०० वर्षे पर्यंत, जात हिंदी, पेशा 'रिकामटेकडेपणाचा', रहना– भारत, ता. भारत, जि. भारत.

"जो पर्यंत परकीय गुलामी सत्ता हिंदुस्थानात अरेरावीने चाललेली आहे व सत्ता निरंतर चालू राहावी म्हणून आमचेच देशबांधव आपली टिचभर पोटाची खळगी भरण्याकरिता लांगुलचालन करीत आहेत, जोपर्यंत आमच्याच देशबांधवापैकी एक खोटानाटा रिपोर्ट लिहितो त्याचीच सुधारलेली आवृत्ति दुसरा अधिकारी वरिष्ठाकडे पाठवितो व आमचेच देशबांधव जज्ज म्हणवून खुर्चीवर बसून, आमचे विरूद्ध न्याय देतात. त्या गुन्हयाचा निकाल काय लागेल आणि कोठपर्यंत न्याय मिळेल हे सांगता येत नाही व त्याचप्रमाणे फिर्यादी सरकारच, साक्षीदार सरकारच, त्याची वर वकिली करणारा सरकारच व न्याय देणारे सरकारच. असा जेथे जुलूम चालतो त्या प्रकरणात मी कोणत्याच तऱ्हेचा भाग घेत नाही....."

१ ऑगस्ट १९३० ची स्थिती : 'कोणतेही वर्तमान पत्र वाचा, कोणत्याही मनुष्याशी चर्चा करा. अमुक लोकांनी कसा कायदेभंग केला किंवा सत्याग्रह कसा सुरू केला. आणि सरकारनीही हा चळवळ दाबून टाकण्यासाठी कोणाविरुद्ध कोणते उपाय योजिले ह्या शिवाय दुसरी गोष्ट ऐकू येत नाही. राष्ट्रातील वाढती चळवळ व सरकारची दडपशाही ह्यांनी हिंदी राजकीय वातावरण दुमदुमून गेले आहे.'

याप्रमाणे देशाचे संपूर्ण वातावरण कायदेभंग, सत्याग्रह, दडपशाही यांनी पूर्ण व्यापून हजारो स्त्रिया–मुले–माणसांनी देशातील तुरूंग भरून गेले होते. उमरावती शहरही त्यास अपवाद नसल्याने, किंबहुना वऱ्हाड प्रांताच्या चळवळीचे मुख्य केन्द्र असल्यामुळे येथे हरताळ, मिरवणुकी,

जाहीर सभा, प्रभात फेऱ्या व विविध प्रकारचा कायदेभंग सतत चालू होता. देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुरूंगवास-दंड-जप्त्या कशा कशाची भीती लोकांत राहिली नव्हती.

वऱ्हाड पुरते बोलायचे झाले तर वीर वामनराव जोशी आणि श्री. बापूजी अणे ह्यांनी आणि त्यांच्या हजारो लहान मोठ्या सहकाऱ्यांनी सर्व वातावरण आंदोलनमय करून सोडले होते. दि. १० ऑगष्ट रोजी ऑल इंडिया काँग्रेस वर्किंग कमेटीच्या मुंबई बैठकीत झालेला खालील ठराव 'इंडियन डेली मेल' या वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाला होता.

"...काँग्रेसच्या कार्यक्रमाशी स्वत:चा मतभेद असताही तुरूंगातील दु ख सोसण्यास तयार होऊन व स्वत: अगोदर सत्याग्रह करून दाखवून, इतरास जे देशभक्तीचे उदाहरण श्री. अणे यांनी घालून दिले त्याबद्दल वर्किंग कमेटी श्री. अणे यांचे अभिनंदन करते. जे आतापर्यंत दूर उभे आहेत ते, श्री. अणे ह्यांचे अनुकरण करून, देशामध्ये चालू असलेल्या राष्ट्रीय लढ्यात योग्य तो भाग घेतील अशी कमेटीला आशा आहे."

(टीप : गांधीजींचे कार्यक्रमात जंगल सत्याग्रहाचा समावेश नव्हता श्री. बापूजी अणे यांनी हा सत्याग्रह केला.)

दि. १० ऑगष्ट पर्यंत उमरावती जिल्ह्यात ५००, यवतमाळ जिल्ह्यात ३२५, बुलढाणा ६० व आकोला जिल्ह्यात ३०० याप्रमाणे वऱ्हाडात एकूण ११८५ लोक दडपशाहीला बळी पडले होते[1].

दप्तरचा व्याप वाढत चालला : दि. १ ऑगष्ट पासून सामुदायिक कायदेभंग सुरू झाल्यामुळे काँग्रेसचे दप्तरातील काम बरेच वाढत चालले म्हणून डॉ. पातूरकर यांचे मदतीस श्री. द. रा. दिक्षित हिशेबनीस, श्री. रघुपतराव देशमुख प्रकाशन मंत्री, श्री. शंकरराव पांडे व विष्णू भगवंत देशपांडे बुलेटीन चिटणीस अशी जोड देण्यात आली. श्री. श्रीरामपंत देशपांडे ह्यांच्या पश्चात प्रचार मंत्र्यांचे काम श्री. पाराशरपंत बेडेकर व श्री. बाबा जोशी ह्यांनी पत्करले. शिबिराचे काम श्री. दातार, श्री. वाठोडकर, डॉ. सोमण श्री. वांगे, श्री. बागलकोटे इत्यादी नवीन कार्यकर्त्याकडे सोपविण्यात आले होते.

---

१ : उदय, १२ ऑगस्ट १९३०

जादा पोलिस भुर्दंड : दि. ११ ऑगस्टचे मध्यप्रांत गॅझेटमध्ये प्रांताचे चीफ सेक्रेटरीच्या सहीने एक पत्रक प्रसिद्ध करण्यात येऊन त्यात... प्रांताच्या कांही भागात, विशेषत: उमरावती व जबलपूर जिल्ह्यात, बेबंदशाही व अत्याचाराचे बरेच प्रकार घडले असून, त्या परिस्थितीत अजून सुधारणा झालेली दिसत नाही. जंगल सत्याग्रहाखाली काही लोकांनी सार्वजनिक मालमत्तेचा निष्कारण नाश चालविला आहे. जबलपूर जिल्ह्यातील मुखारा तहसिलीतील जंगल व उमरावती जिल्ह्यातील मोर्शी, दर्यापूर व एलिचपूर या तालुक्यातील बाभुळबन ह्यास बरेच नुकसान पोचले आहे. यापैकी एकाच भागात सहा हजाराचे नुकसान झाले असून, प्रतिबंध करण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर हात टाकण्यास सुद्धा अत्याचारी लोकांनी कमी केले नाही. अधिकाराचा असा उघड उपमर्द व सार्वजनिक मालमत्तेची नासधुस यापुढे सहन करणे शक्य नाही. सबब सरकारने सहा महिन्याकरिता जबलपूरच्या मुखारा तहसिलीतील व उमरावती जिल्ह्यातील जरुड, चांदूर बाजार आणि टाकरखेडा या गावी जादा पोलिस बसविण्याचे ठरविले असून, तेथील लोकावर त्याचा खर्च बसविला जाणार आहे." असे म्हटले होते.

त्याप्रमाणे सरकारने ठिक-ठिकाणी खास पोलिस बसविले त्यास 'प्युनिटिव्ह पोलिस' म्हणत असत.

मध्यवर्ती व प्रांतिक कौन्सिलची निवडणूक.

एकीकडे आंदोलनाचा जोर वाढत असतानाच दुसरीकडे, मध्यवर्ती व प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुका सुरू झाल्या. त्यात वऱ्हाड मधील जमीनदार मतदार संघातून उमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे हे ऑगस्टमध्ये मध्यवर्ती कौन्सिलसाठी पुन्हा बिनविरोध निवडून आले होते आणि त्यांचे पुत्र श्री. बाबासाहेब खापर्डे त्याच जमीनदार मतदार संघातून प्रांतिक कायदेमंडळावर ऑक्टोबर १९३० मध्ये बिनविरोध निवडून आले होते[१].

शेठ पन्नालाल, श्री. पाराशरपंत बेडेकर व शेठ राधाकिसनजी.

शेठ पन्नालाल ह्यांस २० ऑगस्ट रोजी १५७ क. खाली पकडण्यात आले व त्याच दिवशी श्री. बेडेकर ह्यांनाही ११७ क. खाली पकडण्यात आले. ता. २२ रोजी शेठ राधाकिसन ह्यांना ११७ क. खाली पकडण्यात आले.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : पा. ६८८

श्री. पाराशरपंत बेडेकर यांना १।। वर्ष, शेठ राधाकिसन ह्यांना १।। वर्ष व १००० रु. दंड ठोठावण्यात आला. श्री. पन्नालालजीस ६ म. शिक्षा व २००० रु. दंड करण्यात आला. श्री. बेडेकर ह्यांच्या पश्चात डॉ. पातुरकर ह्यांनी दप्तरचे कामाबरोबर प्रचारमंत्र्याचेही काम सांभाळले.

डॉ. पातूरकर : ता. २८ रोजी डॉ. पातूरकर ह्यांना पकडण्यात आले व ११७ व ४२७ क. खाली त्यांना १।। वर्ष शिक्षा व २५० रु. दंड झाला. १९२९ च्या मार्च महिन्यापासून डॉ. पातूरकर काँग्रेसच्या सेक्रेटरीचे काम निस्सीमपणाने करीत असत. आपल्या धंद्यात झीज सोसूनही काँग्रेसचे कार्य पुढे सरसावण्यात त्यांनी कधीही माघार घेतली नाही व प्रचारमंत्री असताना जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी लाठीमार झाले व जादा पोलिस बसविण्यात आले त्या त्या ठिकाणी त्यांनी स्वतः जाऊन लोकांस धीर दिला. डॉक्टर साहेबांना पकडतांना पोलिसांनी आपल्या सामर्थ्याचे फाजील प्रदर्शन केले, परंतु त्याला न भिता लोकांचा उत्साह वाढत चालला. गावात हरताळ पडून गव्हर्नमेंट हायस्कूल बेमुदत बंद पडले. राजेश्री माधव गुंडेराव देशमुख व कल्पनाथ शर्मा ह्यांना ११७ क. खाली दीड-दीड वर्षाची शिक्षा देण्यात आली. डॉ. पातूरकर ह्यांचे पश्चात श्री. सहस्त्रबुद्धे ह्यांनी दप्तरमंत्र्याचे काम हाती घेतले.

सरकारी हायस्कूल बंद : डॉ. पातुरकरांच्या अटकेबद्दल सरकारी हायस्कूलचे विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला व शेवटी सरकारी हायस्कूल बेमुदत बंद झाले.

ताडीचे लिलांव : ता. २२ ऑगस्ट रोजी ११ वाजता डे. कमिश्नर ह्यांचे कचेरीत ताडीचे लिलाव पुकारण्यात येणार होते; त्याविरुद्ध पिकेटिंग करण्याकरिता डॉ. मिस् जावळे व सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांचे नेतृत्वाखाली २५ देशसेविकांची तुकडी डेप्युटी कमिश्नरचे ऑफिसचे फाटकाजवळ रांगेने उभी करण्यात आली. ऑफिसचे चोहोबाजूस वासुदेवराव दिक्षित व त्यांची स्वयंसेवक मंडळी उभी होती. त्याच वेळी श्री. शेठ राधाकिसन यांना पकडण्यात आले. सरकारी अधिकारी मंडळींनी सकाळी ७ वा. च गुप्तपणे ठेकेदारांना आत आणून बसविले होते. पिकेटिंग नंतर एकही ठेकेदार आत जाऊ शकला नाही. दुपारी दीड वाजता लिलाव संपल्यावर म. गांधीचा प्रचंड जयजयकार झाला व त्यामुळे डी. एस्. पी. साहेब चिडले व हणमंत

भीमराव पतकी नावाच्या १६ वर्षाच्या मुलास मोटारीतून गावाबाहेर लांब नेण्यात येऊन त्यांस बेदम मार दिल्यानंतर जंगलात एकटे सोडून देण्यात आले. हा अत्याचार साहेब बहादुरांनी कोणत्या अधिकाराखाली व कोणत्या कलमाखाली केला हे अजून कळत नाही. काही जबाबदार मंडळींनी हा सर्व प्रकार ताबडतोब कमिश्नर व डे. कमिश्नर याचे कानावर घातला, परंतु दोघांनीही दुरुत्तरे देऊन बेफिकिरी दाखविली.

शेठ राधाकिसनजी व आप्पा गोखले : श्री. आप्पा गोखले हे व्याख्यानाचे दौऱ्यावर असता शेगाव येथे पकडल्या गेले व त्यांना दीड वर्ष स. म. व २५० रु. दंड ठोठावण्यात आला. याच सुमारास शेठ राधाकिसनजी पहिली शिक्षा भोगीत असता त्यांचेवर जंगल सत्याग्रह केल्याबद्दल दुसरा खटला भरण्यात येऊन त्यांना ६ म. स. म. व ५०० रु. दंड करण्यात आला.

जिल्ह्याचे सर्वाधिकारी : रा. पोपटलाल शहा हे रेल्वेच्या खटल्यात गुंतले असल्यामुळे त्यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला. त्यामुळे त्यांचे जागी श्री. नानासाहेब गोखले ह्यांची नेमणूक झाली.

पुढाऱ्यांचे दौरे : दि. २६ ते २९ ऑगस्ट पावेतो, थुगाव, मोर्शी, परतवाडा, सुर्जी अंजनगाव व तोंडगाव इत्यादी गावात सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, व श्री. प्यारेलालजी सेवक ह्यांनी प्रचार कार्यानिमित्त दौरा काढला होता हजारो स्त्री–पुरुषांचे जनसमुदायापुढे त्यांची भाषणे झाली.

चांदूर येथे सौ. पटवर्धन, सौ. दांडेकर व श्री. कल्पनाथ शर्मा यांनी जाऊन स्त्रियांची व पुरुषांची अशा वेगळ्या सभा भरविल्या व मिरवणूक काढली.

परतवाड्याला बहिष्कार दिनानिमित्त सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचे व्याख्यान झाले.

पिंपळखुंटा येथे सौ. पटवर्धन, सौ. दांडेकर व श्री. देशमुख यांची दोन–तीन हजार लोकांसमोर व्याख्याने झाली.

सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी दि. ३ सप्टेंबर पासून मोर्शी तालुक्यात प्रचार कार्य केले. श्री. कल्पनाथ शर्मा, श्रीमती सावित्रीबाई

आयंदे व सौ. पटवर्धन यांनी जरूड वरूड इत्यादी ठिकाणी सभा भरवून भाषणे दिलीत व नवचैतन्य निर्माण केले.

जाहीर सभा : दि. ११ सप्टेंबर रोजी जोग चौकात रात्री आठ वाजता श्री. ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, श्री. संभाजीराव गोखले, श्री. प्यारेलाल सेवक, कॅप्टन दिक्षित व श्री. सहस्त्रबुद्धे यांची भाषणे झाली.

हुतात्मा जतींद्र दिन : दि. १३ सप्टेंबर रोजी हुतात्मा जतींद्र दिनानिमित्त सायंकाळी ५ वा. जोग चौकातून प्रचंड मिरवणूक निघाली व शहराच्या प्रमुख मार्गाने परत आली, तेव्हा श्री. ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत श्री. संभाजीराव गोखले, श्री. वखरे, श्री. मालाणी व कु. अंबूताई ह्यांची भाषणे झाली.

किंग एडवर्ड कॉलेजवर पिकेटिंग : दि. १५ सप्टेंबर रोजी किंग एडवर्ड कॉलेज उघडले तेव्हा, कॉलेजला जाणाऱ्या सर्व रस्त्यावर स्त्री-पुरुष स्वयंसेवकांनी पिकेटिंग सुरू केले होते. त्यामुळे पुष्कळ विद्यार्थी कॉलेजात जाऊ शकले नाहीत. तथापि पिकेटिंगला न जुमानता ६०-७० विद्यार्थी कॉलेजात गेलेच. त्यांत मुख्यतः मुस्लीम विद्यार्थी व होस्टेल मधील विद्यार्थ्यांचा भरणा होता.

शिक्षा : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे एक विद्यार्थी श्री. जी. एस्. देशमुख ह्यांचा खटला दर्यापूरला चालून त्यांना दीड वर्ष स. म. ची शिक्षा देण्यात आली. उमरावतीचेच एक स्वयंसेवक श्री. कल्पनाथ शर्मा यांना दीड वर्ष स. म. व २०० रुपये दंड ठोठावण्यात आला.

दंड वसुली : तुरुंगवासाची शिक्षा भोगत असलेले शेठ पन्नालाल बन्सीलाल व शेठ राधाकिसन यांच्या येथून, त्यांना झालेल्या दंडादाखल अनुक्रमे दोन हजार व पांचशे रुपये सरकारने वसूल केले.

सभा : ता. १८ सप्टेंबरला जोग चौकात पुरुषांची व ता. २२ सप्टेंबरला ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची सभा झाली.

जाहीर सभा : दि. २५ सप्टेंबर रोजी रात्री जोग चौकात श्री. ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, श्री. ठाकुर, श्री. बाबासाहेब खापर्डे व वर्धा आश्रमातील एक प्रचारक यांची भाषणे झाली.

दि. २८ सप्टेंबर रोजी स्वामी शिवानंद यांचे अध्यक्षतेखाली सौ. चंद्राताई पटवर्धन यांचे व दि. २९ रोजी स्वामी शिवानंदांचेच अध्यक्षतेखाली श्री. आबासाहेब ओझरकर, श्री. संभाजीराव गोखले, श्री. बाबासाहेब खापर्डे व श्री. प्यारेलाल सेवक यांची भाषणे झाली.

रामलीला बंद : देशातील राजकीय वातावरणामुळे उमरावतीला नवरात्रात भरणारी रामलीला बंद ठेवण्यात आली होती.

दे. भ. नानासाहेब गोखले यांना अटक.

दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याचे सुमारास स्वतः डी. एस्. पी. नेल्सन हे, ए. डी. एस्. पी. मि. जॉर्ज, सिटी इन्स्पेक्टर श्री. इंदूरकर व २५-३ लाठीधारी पोलिस इतक्या लवाजम्यासह दे. भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले यांच्या घरी जाऊन त्यांना १०८ कलमाखाली वॉरंट दाखविले. एक वर्षभर चांगली वर्तणूक ठेवण्या-करिता म्हणून जमानत देण्याबाबत हे कलम आहे. श्री. गोखले यांनी पाच मिनिटांचा वेळ मागून निघण्याची तयारी चालविली. तेवढचा वेळात ही गोष्ट गावात कळून लोक जमा झाले व हार घालून नानासाहेबांचा सन्मान करण्यात आला. नंतर पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना आपल्या गाडीतून जेलवर नेऊन पोचविले.

दि. २ ला दसरा असल्यामुळे दि. ३ ऑक्टोबर रोजी उमरावतीत हरताळ पाळण्यात आला होता व दि. २ रोजी पावसामुळे रहीत झालेली गांधी जन्म-दिनाची व दे. भ. गोखले यांचे सन्मानार्थ अशी संयुक्त मिरवणूक सायं. ५ वा. काढण्यात आली. मिरवणूक परत जोग चौकात आल्यावर दे. भ. गोखले यांच्या अभिनंदनाची जाहीर सभा श्री. आबासाहेब ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली भरून तीत श्री. पांडे यांचे व नंतर श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले. त्यानंतर श्री. प्यारेलालजी सेवक यांचे विनोदपूर्ण भाषण होऊन सभा बरखास्त झाली.

श्री. नानासाहेब गोखले यांना ११ महिन्याची शिक्षा झाली. त्यानंतर जिल्हयाचे सर्वाधिकारी म्हणून रा. ओझरकर यांची नेमणूक झाली.

ना. तांबे यांचा निषेध : दि. १ ऑक्टोबर रोजी दे. भ. गोखले यांना अटक झाल्यावर थोड्या वेळाने ना. तांबे हे नागपूरहून, पब्लीक प्रॉसिक्युटर श्री. अनगळ यांच्या घरी भेटीसाठी आले होते. ही बातमी गावात कळली व पुष्कळ लोक श्री. अनगळ यांच्या घरासमोर उभे राहून, ना. तांबे तेथून निघून जाई तोपर्यंत धिक्कार प्रदर्शक आरोळ्या मारीत होते.

उमरावती नगरपालिकेकडून अभिनंदन : दि. १ ऑक्टोबरलाच उमरावती नगरपालिकेची आम सभा होती. त्यावेळी, या कमेटीचे माजी अध्यक्ष दे. भ. नानासाहेब गोखले हे देशसेवा करीत असताना त्यांना अटक झाली म्हणून ही सभा नगराध्यक्ष श्री. केतकर यांनी मांडलेल्या ठरावान्वये तहकूब करण्यात आली होती. या ठरावात श्री. नानासाहेबाबद्दल आदर व्यक्त करून त्यांचे अभिनदन करण्यात आले होते.

वानरसेनेची मिरवणूक : दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ब्रम्हविद्या मंदिरात वानरसेनेची जाहीर सभा झाली व दि. ६ रोजी सायंकाळी ५ वा. जोग चौकातून मिरवणूकही निघाली होती.

दे. भ. श्रोती, सहस्त्रबुद्धे व सुखदेव आर्य : श्री. श्रोती ह्यास आकोल्यास पकडून अमरावतीस आणण्यात आले व १।। व. शिक्षा व १०० रु. दंड सुनावण्यात आला. याच सुमारास सुखदेव आर्य ह्यांस दर्यापूरला पकडून अमरावतीस ११७ क. खाली ६ म. शिक्षा व १५० रु. दंड अशी शिक्षा देण्यात आली. सहस्त्रबुद्धे ह्यांचे जागी श्री. वासुदेवराव दिक्षित ह्यांची युद्धमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली.

स्वदेशीचा प्रचार : नवरात्राच्या आठवड्यात, स्वदेशी प्रचार व विदेशी बहिष्कार, या बाबीवर विशेष जोर देण्यात आला. देवीचे दर्शनास येणाऱ्या हजारो स्त्री पुरुषास फक्त स्वदेशी वस्तू वापरण्याची विनंती करण्यात आली. देवळाभोवती दर वर्षी असलेला विदेशी वस्तूंचा बाजार बंद झाला. या कामी स्वयंसेवक व स्वयंसेविका मंडळी रात्रंदिवस झटत होती.

सरदार भगतसिंग, श्री. राजगुरू व श्री. सुखदेव यांच्या शिक्षेचे निषेधार्थ उमरावतीत हरताळ व मिरवणूक.

लाहोर कॉन्स्पिरसी केस मधील आरोपी सरदार भगतसिंग, श्री. सुखदेव आणि श्री. राजगुरू यांना झालेल्या अमानुष शिक्षेचे निषेधार्थ दि. ९ ऑक्टोबर रोजी उमरावतीत हरताळ पाळण्यात आला व त्यांच्या फोटोची जंगी मिरवणूक काढण्यात येऊन ती प्रमुख रस्त्यांनी फिरून जोग चौकात आल्यावर तेथे श्री. ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, सर्वश्री मोहनलाल, राजदेरकर, पांडे व श्री. प्यारेलालजी सेवक यांची भाषणे झाली.

(लाहोर कटाचा खटला किंवा लाहोर कॉन्स्पिरसी केस या नावाने त्याकाळी प्रसिद्ध असलेल्या खटल्याचा निकाल, दि. ७ ऑक्टोबर १९३० रोजी लागला होता व त्यानुसार स्पेशल ट्रायब्युनल कोर्टाने सरदार भगतसिंग श्री. राजगुरु आणि श्री. सुखदेव यांना फांशीची, सर्वश्री किशोरीलाल, महावीरसिंग, बी. के. सिंह, शिवशर्मा, गयाप्रसादसिंग, जयदेव व कनवरनाथ तिवारी यांना जन्मठेप, श्री. नंदलाल यांस सात वर्षे व प्रेमदत्त यास ५ वर्षे सक्त मजुरीची याप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या होत्या. सर्वश्री देशकुमार, अनयकुमार व सन्याल यांना दोषमुक्त ठरविले होते.)

हुतात्मा लक्ष्मणराव पाचघरे : अमरावती तुरुंगातील अधिकाऱ्यांच्या निर्दय वर्तनामुळे यावली काँग्रेस कमेटीचे चिटणीस देशभक्त लक्ष्मणराव पाचघरे ह्यांना तुरुंगातील हाल अपेष्टा सहन न होऊन ताप आला. त्यांतच ता. १३ ऑक्टोबर रोजी तुरुंगातच त्यांचा अंत झाला. त्यांचे शव मोठ्या शिकस्तीने तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडून लक्ष्मणराव पाचघरे यांचे आप्तांनी ताब्यात घेतले. त्या शवाची अमरावती शहरात प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मृतात्म्यास हजारो स्त्री पुरुषांनी प्रणाम करून सर्वांनी आपली भक्ति व्यक्त केली. जाहीर सभेत त्यांचे गुणवर्णनपर भाषणे होऊन त्यांचे शव यावली मुक्कामी पोहचविण्यात आले. अमरावती जिल्ह्यातील सत्याग्रही

वीरापैकी पंचप्राणाचे बलिदान करणारा हा वीर कोणाचेही स्मृतीतून दूर होणार नाही.

दिपावळीचा आनंदोत्सव बंद : उमरावतीच्या प्रमुख नागरिकांची सभा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात भरून, "देशांतील बहुतेक सर्व प्रमुख नेते सरकारच्या दडपशाहीमुळे तुरुंगात अगर अन्य तऱ्हेने हाल भोगीत आहेत त्याबद्दल जनतेचे मनात जे दुःख व जो खेद वाटत आहे त्याचे एक निदर्शक म्हणून दीपावली उत्सवात दुकानदार, व्यापारी व इतर सर्व नागरिकांनी गावात पानसुपारी निमित्त आमंत्रणे, पानसुपारी व रोषणाई करू नये; फटाके उडवू नयेत, वाद्य वाजवू नये, अगर कोणत्याही तऱ्हेने आनंद व्यक्त करू नये." अशा आशयाचा ठराव पास करण्यात आला होता.

नंतर थोड्याच दिवसांनी जिल्हा कॉं. कमेटीतर्फे फटाक्यांच्या दुकानावर पिकेटिंग सुरू करण्यात आले.

'उदय'चा अंक बंद : प्रेस आर्डिनन्सखाली उमरावतीच्या साप्ताहिक 'उदय' पत्रास सरकारने ७५० रुपयांचा जामीन मागितला होता त्यामुळे दि. २८ ऑक्टोबर १९३० चा 'उदय'चा अंक बंद ठेवण्यात आला होता.

(दि. २७ मे १९३० चा 'उदय'चा अंकही प्रेस ॲक्टचे निषेधार्थ बंद ठेवण्यात आला होता.)

हिंदु हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची कामगिरी : उमरावतीचे सरकारी मराठी हायस्कूल (हिंदु हायस्कूल) तेथील अधिकाऱ्यांनी बेमुदत बंद केले होते. कारण दे. भ. डॉ. पातुरकर यांचे अटकेनिमित्तचे हरताळाचे दिवशी म्हणजे दि. २८ ऑगस्ट १९३० रोजी या शाळेच्या विद्यार्थ्यांनी हरताळात भाग घेऊन शाळा बंद पाडली होती.

या प्रमाणे शाळा बंद पडल्याने या शाळेतील विद्यार्थ्यांनी घरी माशा मारीत न बसता, आपल्या हातून देशाची सेवा घडावी या सद्हेतूने दे. भ. वि. दा. ब्रम्ह, वकील आणि दे. भ. मालाणी यांचा नेतृत्वाखाली 'विद्यार्थी संघ' स्थापन करून लगेच प्रत्यक्ष कार्याला सुरूवात केली होती. या हायस्कूलात शिकणाऱ्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांपैकी शे-दिडशे विद्यार्थी उमरावतीचे होते; पण त्यातही सरकारी नोकरांची बरीच मुले होती ती सोडून, बाकीच्या विद्यार्थ्यांनी या काळात खालील प्रमाणे विधायक कार्य केले होते.

(१) येथील खादी भांडारातील खादी व स्वदेशी वस्तू भांडारातील स्वदेशी वस्तूंची शहरात आणि आसपासच्या खेडयात फिरून त्याची विक्री केली. (सुमारे ३०० रुपयांचा माल विकला.) (२) काँग्रेसचे सभासद वाढविण्याचे कार्य केले. (३) स्वदेशी व बहिष्कार प्रतिज्ञा पत्रकावर लोकांच्या सह्या गोळा केल्या. (४) शहराच्या आसपासच्या खेडोपाडी जाऊन लोकांना स्वदेशीचे महत्त्व समजावून दिले. (५) देवीचे नवरात्र यात्रेचे प्रसंगी परदेशी वस्तू वापरू नका व परदेशी खेळणी व वस्तू घेऊ नका असा प्रचार केला व त्यासाठी त्यांना परावृत्त करण्याचे कार्य केले. (६) दीपावलीत फटाके उडवू नयेत व यंदाचे दीपावळीत आनंदोत्सव करू नये यासाठी काँग्रेसने काढलेल्या मोहिमेत भाग घेतला. (७) फटाक्यांचे दुकानावरील पिकेटिंगचे वेळी स्वयंसेवकांना मदत केली. (८) आपापल्या मोहोल्यातून मुष्ठीफंड गोळा केला. (९) लोकजागृतीसाठी सायंफेऱ्या काढल्या व इतर प्रकारेही विधायक कार्य केले होते.

पं. नेहरूंचे अटके विरुद्ध हरताळ.

मिरवणूक व जाहीर सभा.

राष्ट्रीय महासभेचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अटकेचे निषेधार्थ दि. २३ ऑक्टोबर रोजी उमरावतीत हरताळ पाळण्यात येऊन, संध्याकाळी त्यांच्या फोटोची रथातून जंगी मिरवणूक काढण्यात आली होती. रात्री नेहरू मैदानावर पं. नेहरूंच्या अभिनंदनासाठी जाहीर सभा झाली.

दारु भट्टींचे लिलावाविरुद्ध जाहीर सभा.

दि. ३, ४ व ५ नोव्हेंबर रोजी उमरावतीच्या जिल्हा कचेरीत दारु भट्ट्यांचा लिलाव होण्याचे जाहीर झाले होते. त्या विरूद्ध लोकमत प्रज्वलीत करण्यासाठी व या लिलावात कोणीही बोली बोलू नये म्हणून दि. १ नोव्हे. रोजी रात्री नेहरू मैदानावर श्री. श्रीरामपंत देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरविण्यात आली होती. या सभेत श्रीमती वारुताई, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर आणि श्री. प्यारेलालजी सेवक यांची भाषणे झाली होती.

दारु मक्त्याचे लिलाव : ता. ३, ४ व ५ नोव्हेंबर रोजी कचेरीत दारूच्या मक्त्याचे लिलाव ठरले होते. पिकेटिंगच्या भीतीने सरकारने

गावोगांवच्या मक्तेदारांना अगोदरच कोर्टाच्या आवारात आणण्याची खटपट केली पण ही बातमी समजताच ता. २ रोजी दुपारी २ वाजता सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांच्या नेतृत्वाखाली ५० देशसेविका व १५० स्वयंसेवक पिकेटिंग करू लागले. दुपारी ४ वाजता लाठीबाज पोलिस घेऊन डी. एस. पी. तेथे हजर झाले व श्री. आबासाहेब ओझरकर, डॉ. खोत अशा प्रतिष्ठित माणसांना सुद्धा धक्के मारण्यात आले. ता. ३ रोजी सकाळी ७ वाजता पासून पुन्हा जोराने पिकेटिंग सुरू झाल्यामुळे एकही मक्तेदार आत जाऊ शकला नाही.

उमरावतीची शूर महिला– सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांना अटक.

वरील पिकेटिंग चालू असतां, अधिकारी वर्गाने चिडून सौ. पार्वतीबाईला ११७ क. खाली पिकेटिंगचे जागीच पकडले. वऱ्हाडांतील स्त्री–पुढाऱ्यांपैकी अटक होण्याचा पहिला मान सौ. पार्वतीबाईंनाच आहे. पती तुरुंगात गेल्यानंतर त्यांनी आपल्या अप्रतिम भाषण शैलीने सर्व अमरावती जिल्ह्यात जागृती उत्पन्न केली होती. त्यांनी येथे देशसेविका संघ स्थापन करून निरनिराळ्या मोहल्यात व्याख्याने देऊन स्त्री वर्गात संघटना उत्पन्न केली. मुलींच्या प्रभात फेऱ्या त्यांनी सुरू केल्या. तालुक्यातून व्याख्यानाचे दौरे काढून कांही ठिकाणी सत्याग्रहाच्या रणक्षेत्रावर स्वतः हजर राहून स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले. त्यांची लहान मुलगी ह्या प्रसंगी आजारी होऊन वारली असताना सुद्धा मोठ्या धैर्याने व चिकाटीने त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले होते.

पोलिसांचे अत्याचार : सौ. पार्वतीबाईंना अटक झाल्यानंतर आकोल्याच्या राधाबाई ओक ह्यांनी पिकेटिंगचे काम जोराने सुरू ठेवले. इतक्यात मक्तेदाराने भरलेली एक लॉरी तेथे आली. त्या लॉरीसमोर स्वयंसेवक आडवे पडल्यामुळे त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला. बरेच स्वयंसेवक जखमी झाले. त्यांत गुजराथी कार्यकर्ते श्री. हेमराज ह्यांना बेशुद्ध होईपर्यंत मार देण्यात आला. ह्याचवेळी दुय्यम शिबिराधिपती गुरूवर्य कृष्णराव यौकार ह्यांना चीड येऊन त्यांनी मोठ्या धैर्याने मोटारसमोर उडी घातली. अशा तऱ्हेने मोटार अडविण्याचा प्रयत्न केल्यामुळे

पुनः लाठीमार सुरू झाला. रा. योकार, रा. भागवत व रा. मोतीलाल बन्सगोपाल हयांना अटक करण्यात येऊन काही वेळाने सोडून देण्यात आले. काही देशसेविकांना मोटारीत घालून पोहऱ्याच्या निर्जन जंगलात व काहींना छत्री तलावाचे बाजूस लांब सोडण्यात आले. यांत डॉ. मिस् जावळे व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर व सौ. राधाबाई गोखले इत्यादि प्रमुख स्त्रियांना सुद्धा लांब नेऊन सोडण्यात आले. ही बातमी समजताच काँग्रेसच्या मोटारी पाठवून सर्वांना सुखरूप परत आणण्यात आले व आश्चर्याची गोष्ट ही की या सर्व देशसेविका पिकेटिंगच्या जागी पुनः दाखल झाल्या.

श्रीमती दुर्गाताई जोशी यांनाहि अटक : वरील प्रकार चालू असता प्रांताच्या आठव्या सर्वाधिकारी श्रीमती दुर्गाताई जोशी पिकेटिंगच्या जागी हजर झाल्या व देशसेविकांचा अपमान पाहून त्यांना फार चीड आली. त्यांनी आपल्या जोरदार वाणीने पोलिस अधिकाऱ्यांची हजेरी घेतली. त्यांना त्याच वेळी, त्यांनी २ म. पूर्वी वडाळी येथे केलेल्या सत्याग्रहाबद्दल पकडण्यात आले.

नवे सर्वाधिकारी : श्रीमती दुर्गाताई जोशी ह्यांनी आपले पश्चात प्रांताचे सर्वाधिकारी म्हणून श्री. आबासाहेब ओझरकर ह्यांची नेमणूक केली व अ. जि. चे सर्वाधिकारीपद श्री. अण्णासाहेब कलोती ह्यांना आबासाहेबानंतर देण्यात आले.

काळचा निशाणांची मिरवणूक : दि. ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी 'मतदारांनो मते देऊं नका', 'काऊन्सिलवर बहिष्कार घाला' अशा घोषणांसह आणि काळचा निशाणासह, पुरुषांची एक व स्त्रियांची एक अशा दोन मिरवणुकी शहरातून काढण्यात आल्या होत्या. दुसरे दिवशी कौन्सिल साठी निवडणुकी होणार होत्या व काँग्रेसने या निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता म्हणून, त्याचे विरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठी ह्या मिरवणुकी काढण्यात आल्या होत्या.

कौन्सिलचे मतदानावर पिकेटिंग : ता. १० नोव्हेंबर रोजी कौन्सिलची निवडणूक होणार म्हणून सकाळी ७ वा. पासून निरनिराळ्या पोलिंग स्टेशनवर स्वयंसेवक व देशसेविका पिकेटिंग करण्याकरिता हजर होत्या. सकाळी ९ वाजेपर्यंत पिकेटिंगचे काम शांततेने चालू होते. इतक्यात भाजी बाजारातील लक्ष्मीनारायणाच्या मंदिराजवळील पोलिंग स्टेशनवर

काही लाठीबाज पोलिस, जमलेल्या लोकांवर चालून गेले व लाठीमार सुरू झाला. ह्या हल्ल्यात सर्वश्री पांडुरंगपंत पोतदार, वामनराव झेंड व बाळ ओझरकर व इतर मंडळीस लाठीच्या जखमा झाल्या. माधवराव भागवत ह्यांना तेथेच अटक करण्यात येऊन दु. ३ वाजता सोडून देण्यात आले. खडकारीपुऱ्यात पिकेटिंग करणारे कन्हैयालाल श्रीवास्तव ह्यांना बेताने मारण्यात आले. सदाशिवलाल ह्यांनाही मार बसला. सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांना जोग चौकातील पोलिंग स्टेशनवर धक्के मारून काढून देण्यात आले. म्यु. क. समोर डॉ. मिस्. जावळे ह्यांचे नेतृत्वाखाली जोराचे पिकेटिंग सुरू होते. शहरांतील अंदाजे २००० मतदारांपैकी फक्त २५-३० मतदारांनी मते दिली.

या निवडणुकीत शहर विभाग व उमरावती सर्कल-खेडे विभाग असे निवडणुकीचे प्रकार होते. शहर विभागात श्री. चौबळ विरुद्ध श्री. अभ्यंकर व खेडे विभागात बॅरि. रामराव विरुद्ध बॅरि. पंजाबराव असा सामना होता. डॉ. सबनीस यांच्या पत्नी व डॉ. कु. सुलोचनाबाई जावळे, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर वगैरे स्त्रियांनी प्रामुख्याने पिकेटिंग मध्ये भाग घेतला. 'शेम-शेम', 'मते द्या व नरकांत जा', 'बांगड्या भरा' असे पिकेटर्स घोषणा देत होते. पोलिस बंदोबस्त सर्वत्र होता. काँग्रेस पिकेटिंग यशस्वी ठरले होते.

पुन्हा अटक : पहिल्या शिक्षेच्या विरूद्ध अपील करण्यासाठी जामिनावर खुले असलेले श्रीरामपंत देशपांडे यांना त्यांनी ४ म. पुर्वी केलेल्या एका भाषणांबद्दल ११७ क. खाली पकडण्यात आले. या दुसऱ्या खटल्यात त्यांना ९. म. स. म. व ४०० रु. दंड करण्यात आला.

सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्रीमती दुर्गाताई जोशी यांना सहा महिने शिक्षा.

दि. ३ नोव्हेंबरला पिकेटिंगचे वेळी अटक करण्यात आलेल्या स्त्री नेत्या सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्रीमती दुर्गाताई जोशी यांचेवरील खटल्याचा निकाल दि. ११ नोव्हेंबर रोजी लागून इं. पी. कोडचे कलम ११० अन्वये सौ. पटवर्धन यांना सहा महिने साध्या कैदेची व फॉरेस्ट ॲक्ट कलम २६-जी खाली श्रीमती दुर्गाताई जोशी यांना सहा महिने साध्या कैदेची या प्रमाणे शिक्षा सुनावण्यात आल्या होत्या.

त्यांच्या अभिनंदनार्थ त्याच दिवशी रात्री नेहरू मैदानावर जाहीर सभा झाली होती. दुसरे दिवशी सायंकाळी स्त्रियांची व विद्यार्थ्यांची अशा दोन मिरवणुकी निघून, रात्री नेहरू मैदानावर भरलेल्या जाहीर सभेत ह्या देशभगिनींच्या अभिनंदनपर अनेक वक्त्यांची भाषणे झाली होती.

अकोल्यात पिकेटिंगकरिता अमरावतीचे स्वयंसेवक : आकोल्यास अमरावती येथून नॅशनल मिलीशिया, स्वयंसेवक, देशसेविका व ॲम्बुलन्स कोअर मिळून ६० मंडळी पिकेटिंगकरिता पाठविण्यात आली होती. त्या ठिकाणी त्यांनी सतत तीन दिवस फारच उत्तम काम केले. अमरावतीचे शिबिराधिपती गुरुवर्य कृष्णराव योकार यांना पिकेटिंग करीत असता पकडण्यात आले व आकोल्यासच खटला सुरू झाला. ते जामिनावर मोकळे असल्यामुळे त्यांनी अमरावतीतील गढवाल दिनाच्या मिरवणुकीत भाग घेतला व त्याबद्दल त्यांना शिक्षा झाली व आकोल्यातील खटला काढून घेण्यात आला. शुश्रूषापथकाचे श्री. गुलाबराव यांचे उरावर बसून त्यांना निर्दयपणाने मार देण्यात आला व त्यांच्यावरच १४७ व ३३२ कलमाखाली खटला भरण्यात आला. हा खटला बरेच दिवस रेंगाळल्यानंतर पुढे गांधी–इर्विन तहनाम्यामुळे काढून टाकण्यात आला होता.

जवाहर दिनाची जंगी मिरवणूक : जवाहर दिनानिमित्त ता. १६ नोव्हेंबर रोजी सर्वत्र हरताळ पाळण्यात येऊन सायंकाळी पंडितजींच्या फोटोची जंगी मिरवणूक काढण्यात आली व शेवटी नेहरू मैदानावर श्री. ओझरकर वकील ह्यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. सभेत पंडितजींच्या आक्षेपार्ह ठरलेल्या भाषणाचे उतारे मराठीत ओझरकर वकील ह्यांनी, हिंदीत प्यारेलालजी सेवक यांनी, इंग्रजीत रा. दिक्षित यांनी व उर्दूत मुल्लाईब्राहीमजी मुल्लाचांदभाई उर्फ मौ. आझाद यांनी वाचून दाखविले. काही उतारे सभेतील स्त्रीपुरुषाकडून वदवून घेण्यात आले.

नंतर श्री. पांडे यांनी "व्हॉईसरॉय ह्यांनी लंडनच्या गोलमेज परिषदेसाठी जे प्रतितिधि हिंदुस्तानातून पाठविले ते आमचे प्रतिनिधि नव्हेत व त्यांनी तेथे पास केलेले ठराव आम्हास बंधनकारक नाहीत" असा ठराव मांडला. त्यास श्री. बागलकोटे व श्री. कलोती वकील यांनी दुजोरा दिल्यावर तो ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.

कायदेभंगात सामील होण्यासाठी ता. १९ एप्रिल रोजी डॉ. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली १९ स्वयंसेवकांची तुकडी दहिहांड्यास रवाना झाली. या तुकडीत निरनिराळ्या तालुक्यातील स्वयंसेवक सामील होते.

उमरावतीचे जोग चौकात हजारो लोकासमोर झेंडावंदन, पंचारती, वेदोक्त आशीर्वाद, झेंडासमर्पण इत्यादी कार्यक्रम मोठ्या थाटाने पार पडल्यावर शहरातील प्रमुख रस्त्यातून सत्याग्रही वीरांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत स्त्रीसमाज बऱ्याच मोठ्या प्रमाणात पायी चालत होता. गावाबाहेर एलिचपूर रोडवर मिरवणूक संपविण्यात येऊन, पुढील प्रवास मोटारीतून करण्यात आला. वाटेत अनेक गावी सत्याग्रही वीरांचे थाटाने स्वागत करण्यात आले.

दहिहांड्यास पोचल्यावर सत्याग्रही वीर सतत आठ दिवस मिठाचा कायदेभंग करीत होते व आसपासच्या गावी व्याख्यानेही देत असत. दि. २७ एप्रिल रोजी ही तुकडी उमरावतीस परत आली.

या सत्याग्रहात भाग घेणारी मंडळी म्हणजे डॉ. शिवाजीराव पटवर्धन सेनानायक, श्री. अ. स. जोशी, श्री. ल. य. श्रोती, धनुर्धारी श्री. रघुनाथराव खाणीवाले, श्री. कृष्णराव योकार, श्री. रायभोग, श्री. वा. रा. परवार, श्री. शे. दौ. घाटगे, श्री. द. मा. कुळकर्णी, श्री. म. बी. परवार, श्री. मो. भु. परवार, श्री. गो. बा. रिठे, श्री. ग. सी. कासमपुरे, श्री. द. रा. जोशी, श्री. ज. कविश्वर, श्री. डो. द. परवार, श्री. ग दा. बोकील ही स्वयंसेवक मंडळी होती.

दि. १८ एप्रिल रोजी या सत्याग्रहींचा परिचय करून देण्यासाठी जोग चौकात श्री. वीर वामनराव यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभाही झाली होती.

स्त्रियांकरिता व्याख्यान : जिल्हा कॉं. कमेटीचे विद्यमाने श्री लक्ष्मी-नारायण मंदिरात दि. १९ एप्रील रोजी सौ. पार्वतीबाई पटवर्धन व श्रीमती सरस्वतीबाई आष्टीकर यांनी स्त्रियांचे सभेत व्याख्याने दिली.

लो. बापूजी अणे ह्यांचा कॉंग्रेस प्रवेश

वरील प्रमाणे सर्व जिल्ह्यात कार्य सुरू असता, दे. भ. अणे कायदेभंगाच्या चळवळीपासून अलिप्त असल्यामुळे त्यांची उणीव प्रांतातील

कार्यकर्त्यांस भासत होती. बापूजी अणे हयांचे लक्ष त्यावेळी असेंब्लीचे कामकाजात लागले होते. परंतु म. गांधींच्या स्फूर्तिदायक संदेशाच्या प्रसारामुळे बापूजी अणे यांच्या मतात फरक पडून त्यांनी असेंब्लीच्या जागेचा राजीनामा दिला व सत्याग्रहाच्या मोहिमेत मला एक शिपाई म्हणून दाखल करून घ्या अशा तऱ्हेचे विनययुक्त पत्र प्रां. कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी ह्यांना पाठविले. ही बातमी हा हा म्हणता सर्व प्रांतभर पसरून या आपल्या कसलेल्या पुढाऱ्यांचा पाठिंबा मिळाल्याबद्दल जनतेचा उत्साह द्विगुणित झाला आणि या पुढे प्रांतातील सत्याग्रहाच्या मोहिमेत बापूजी अणे व वामनराव जोशी हयांची अजिंक्य जोडी झळकू लागली. लोकनायक बापूजी अणे हयांनी आपली मते उमरावती मुक्कामी ता. २१ एप्रिल रोजी भरलेल्या जाहीर सभेत 'निःशस्त्र प्रतिकार' या विषयावर भाषण करताना स्पष्ट बोलून दाखविली व कायदेभंगास प्रोत्साहन दिले.

श्री. हरिहरराव देशपांडे यांचा प्रचार दौरा : उमरावती जिल्हा युद्ध मंडळाचे प्रचार मंत्री श्री. ह. वा. देशपांडे यांनी दि. १७ ते २९ एप्रील पावेतो क्रमशः बडनेरा, वलगाव, खारतळेगाव, साऊर, शिराळा, नांदगाव, भातकुली, खोलापूर व वाठोडा या गावी दौरा केला.

त्याचप्रमाणे डॉ. सोमण, श्री. बामणगावकर आणि श्री. केशवराव शालीग्राम यांचीही दि. २१ व २३ रोजी एलिचपूर येथे 'सत्याग्रहाची मोहीम' या विषयावर भाषणे झाली.

श्री. सहस्त्रबुद्धे यांचा सत्कार : दहिहांडा येथील मिठाच्या सत्याग्रहाहून आलेले श्री. सहस्त्रबुद्धे यांचा दि. २४ एप्रील रोजी स्त्रीसमाजातर्फे व जिल्हा कांग्रेस कमेटीचे विद्यमाने जाहीर सत्कार करण्यात आला.

उमरावतीत मिठाचा सामुदायिक कायदेभंग

दि. २७ एप्रील १९३० रोजी दहिहांडयाच्या विहिरीचे पाणी आणून जोग चौकात मिठाचा सामुदायिक कायदेभंग करण्यात आला. या प्रसंगी डॉ. सोमण यांनी स्वतः मुंबईहून समुद्राचे पाणी आणले होते.

या कार्यक्रमाची नोटीस जिल्हयातील सर्व जनतेस व सरकारास आठ दिवसापूर्वी देण्यात आली होती आणि ता. २६ रोजी वीर वामनराव

चित्र क्र. १५४ : (पृष्ठ ६६२ पहा)

हुतात्मा लक्ष्मणराव पाचघरे

चित्र क्र. १५५ : (पृष्ठ ६६५ पहा)

अमरावतीची शूर महिला सौ. पार्वतीबाई पटवर्धन

१९३० च्या सत्याग्रह चळवळीच्या नेत्या.

चित्र क्र. १५६ : (पृष्ठ ६६५ पहा)

सौ. लक्ष्मीबाई दांडेकर

देशसेविका संघाच्या अध्यक्षा.



चित्र क्र. १५० : दे. भ हरिहरराव देशपांडे (उजवीकडे) (पृष्ठ ६४४ पहा)
वीर वामनराव दादा यांचे सह एका सत्याग्रही शिबिरात.



चित्र क्र. १५१ : दे. भ. डॉ. शिवाजीराव पटवर्धन आणि (पृष्ठ ६४८ पहा)
डॉ. अण्णासाहेब सोमण (उजवी कडील)
यांना अटक झाली त्यावेळी घेतलेले छायाचित्र.
(शेजारी शिबिराधिपति आचार्य त्र्यंबक गुरुजी)

चित्र क्र. १५७ : (पृष्ठ ६७० पहा)

गढवाल-दिना च्या मिरवणुकीचे नेते

जिल्हा युद्ध मंडळाचे अध्यक्ष

दे. भ. द. रा. उर्फ अण्णासाहेब कलोती, वकील



चित्र क्र. १५८ : इ. सन १९३० च्या आंदोलनातील उमरावती जिल्हा सत्याग्रही दल.
(वैद्य पं. दा. मळे मधात खर्चीवर बसलेले)

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अटकेनिमित्त
हरताळ व जाहीर सभा.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुंबई येथे एका खादी भांडाराचे उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणाबद्दल त्यांना दि. ६ दिसेंबर रोजी अलाहाबाद येथे अटक करण्यात आली. त्यानिमित्त जिल्हा कॉं. कमेटीने हरताळाचा आदेश दिला होता. त्याप्रमाणे दि. ९ दिसें. रोजी उमरावतीत हरताळ पाळण्यात येऊन रात्री जाहीर सभा झाली होती.

परदेशी कापडावर पिकेटिंग : विदेशी कापडाचे दुकानावर पुन्हा पिकेटिंग सुरू करण्याचे जिल्हा कॉं. कमेटीने ठरविले होते व त्या दृष्टीने दि. ३ दिसेंबर रोजी ब्रम्हविद्या मंदिरात दुपारी ५ वा. सौ. लक्ष्मीवाई दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा होऊन पिकेटिंगसाठी स्त्री–स्वयंसेवकांची नावे नोंदविण्यात आली.

उमरावतीचा अपूर्व गढवाल दिन

दि. २३ एप्रील १९३० रोजी पेशावर येथे गढवाली सैनिकांनी लोकांवर गोळीबार करण्याचे नाकारले. तेथील स्थानिक पुढाऱ्यांना अटक करण्यात आली होती व त्याविरूद्ध खवळलेल्या जनतेला नरम आणण्यासाठी चिलखती गाड्या पाठविण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक गाडी लोकांनी जाळली. तिच्यातले सैनिक निसटले. त्यानंतर जमावावर बेछूट गोळीबार करून शेकडोजणांना ठार किंवा जखमी करण्यात आले. १८ व्या रॉयल गढवाली रायफल्सच्या दुसऱ्या बटालियन्सच्या दोन पलटणींनी गोळीबार करण्याचे नाकारले. या पलटणीतील सैनिक हिंदु होते व भोवतालचा जमाव मुस्लिम होता. हे सैनिक रांग मोडून जमावात गेले. त्यांनी लोकांशी स्नेहभाव व्यक्त केला व काहींनी आपली शस्त्रे लोकांच्या स्वाधीन केली. त्यानंतर लगेच पेशावर मधून लष्कर व पोलिस काढून घेण्यात आले. ता. २९ एप्रील ते ४ मे पर्यंत शहर जनतेच्या हाती होते.

शेवटी ते 'परत जिंकून घेण्यासाठी' विमान दलासह ब्रिटिशांच्या मोठ्या फौजा आल्या. त्यांना प्रतिकार करण्यात आला नाही...गढवाली

पलटणीच्या १७ सैनिकावर कोर्ट-मार्शलपुढे खटला भरून एकाला जन्मठेप काळेपाणी, एकाला १५ वर्षे सक्तमजूरी, १५ जणांना ३ ते १० वर्षे, अशा रानटी शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या.[१] (या गढवाली सैनिकांना अनेक वर्षे तुरूंगात खितपत पडावे लागले होते. अखेरीस १९३७ च्या उत्तरार्धात काँग्रेस मंत्र्यांच्या वजनाने त्यांची सुटका झाली...)

या गढवाली सैनिकांना सहानुभूती दाखविण्यासाठी सर्व देशभर दि. १२ डिसेंबर १९३० रोजी 'गढवाल दिन' पाळण्याचे ठरविण्यात आले होते+.

उमरावती जिल्हा युद्ध मंडळानेही दि. १२ डिसेंबर रोजी 'गढवाल दिना'ची मिरवणूक काढण्याचे ठरवून, त्या दिवशी गावात कडकडीत हरताळ पाळावा अशी दवंडी देण्यात आली व दि. ११ डिसेंबर रोजी रात्री भरलेल्या जाहीर सभेतूनही तसे जाहीर करण्यात आले होते. त्याप्रमाणे दि. १२ डिसेंबर रोजी शहरातील सर्व दुकाने बंद होती. सायंकाळी साडे पांच वाजता नेहरू मैदानापासून मिरवणूक निघावयाची होती. गढवाल दिनानिमित्त अधिकाऱ्याकडून काहीतरी विपरित प्रकार होईल अशी जनतेची अपेक्षा होती.

जाहीर केल्याप्रमाणे तारीख १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५-३० वाजता गढवालदिनानिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत भाग घेण्याकरिता हजारो स्त्रीपुरुष नेहरु मैदानावर जमा झाले. अपेक्षेप्रमाणे गावातील वातावरण तारीख १२ पूर्वी २-४ दिवसांपासूनच 'अधिकाऱ्याकडून ही मिरवणूक बंद होणार' या बातम्यामुळे प्रक्षुब्ध झाले होते. पोलिसांच्या चोरट्या हालचाली निदर्शनास येत होत्या. अमरावतीचे पोलिस काही तरी दिव्य करून अत्याचाराचे मालिकेत आपले नाव अजरामर करून ठेवणार अशा तऱ्हेच्या अफवा सर्वत्र पसरल्या होत्या. ता. १२ रोजी ३ वाजता डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या सहीचा १४४ कलमाखाली मिरवणुकीला मनाई करणारा हुकूम यु. मं. चे अध्यक्ष रा. कलोती, युद्ध मंत्री रा. दिक्षित व प्रांतिक सर्वाधिकारी श्री. ओझरकर वकील यांच्यावर बजावण्यात आला. मिरवणूक निघण्यापूर्वी १० मिनिटे पोलिस स्टेशनातून डि; मॅजिस्ट्रेट, मि. जार्ज, रा. नर्गुनकर व सबइन्स्पेक्टर मंडळी बऱ्याचशा पोलिस शिपायांसह

---

१ : 'आजचा हिंदुस्थान', रजनी पामदत्त : १९४६ : पा. ३५१-५२

\+ परिशिष्ट क्र. ३ पहा.

नामदार खापर्डे यांच्या वाडचासमोरील पटांगणाच्या सीमेवर मिरवणूक अडविण्याच्या हेतूने येऊन उभे राहिली व लाठीबाज पोलिसांचा कठडा करून मिरवणूक अडविण्याची तयारी करण्यात आली. इकडे प्रेक्षकात मनाई हुकूम तोडून मिरवणुकीत सामील होण्याची अहमहमिका सुरू झाली. मिरवणुकीची व्यवस्था फार शिस्तीने राखण्यात आली होती. अग्रभागी बिगुलवाले त्यांच्या मागे तिरंगी झेंडा व कार्यकर्ते सर्वश्री ओझरकर वकील, कलोती वकील, दिक्षित, पांडे इत्यादि मंडळी व त्यांचे मागून नॅशनल मिलीशिया स्वयंसेवक मंडळी, देशसेविका, वानरसेना, व इतर पुरुष मंडळी चार चारच्या रांगेने चालत होती. अशा प्रकारे मिरवणूकीस सुरुवात होताच स्वयंसेवक अंदाजे १०० कदम आले असतील नसतील तोच खापर्डे यांचे वाडचासमोर मिरवणूक अडविण्यात आली. खुद्द डि. सी. व डी. एस्. पी. यांनी स्वतः मिरवणूकीस अडविले. त्यावर रा. दिक्षित यांनी 'आमचा निश्चय मिरवणूक शांततेने पार पाडावयाचा आहे' असे जाहीर केले. त्यानंतर प्रांतिक काँ. चे अध्यक्ष व वऱ्हाडचे डिक्टेटर श्री. आबासाहेब ओझरकर वकील, जिल्हा युद्ध मंडळाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती वकील व चिटणीस श्री. दिक्षित यांना अटक करण्यात आली. त्यांना अटक झालेली पाहताच प्रेक्षकातून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

नंतर सबइन्स्पेक्टर मि. इंदूरकर यांचे मदतीने, डि. मॅ. ने. मिरवणुकीतून खड्या सारखी सरासरी ७५ मंडळी निवडून काढली व त्यांना पकडण्यात आले. या प्रकारामुळे जनसमुदाय भीतीने न डगमगता जास्त खंबीरपणाने आपल्या जागी स्थिर राहिला. ७५ मंडळी पैकी सरासरी ३५ मंडळीस जेलात नेण्यात आले व बाकीच्यांना रस्त्यातच सोडून देण्यात आले. या पस्तीसांमध्ये देशभगिनी सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, अध्यक्ष देशसेविका संघ, सौ. राधाबाई गोखले चिटणीस, देशसेविका संघ, डॉ. मिस् जावळे ॲम्बुलन्सच्या कार्यकर्त्या व श्री. मथूताई लिमये यांनाही तुरुंगात कोंडण्यात आले. वरील मंडळीची रवानगी झाल्यानंतर पोलिस अधिकारी खुर्च्या टाकून तेथेच बसले त्यामुळे जनसमुदायही तेथेच बसून राहिला. हा प्रकार रात्री १२ पावेतो चालू होता. दरम्यान पोलिस अधिकाऱ्यांनी गॅसचे दिवे, पिण्याचे पाणी, फराळाच्या वस्तू, सामान, इत्यादि निरुपद्रवी वस्तूसुद्धा जप्त करण्याचा हलकटपणा केला. मधून मधून काही लोकांना लाठीने मार देण्यात आला. पोलिस अधिकारी थकल्यानंतर त्यांनी

आपला तळ उठविला. त्यानंतर रात्री १२ वाजता महात्मा गांधीच्या जयजयकारात, टेंभ्याच्या उजेडात सरासरी २० हजार स्त्री पुरुषांची जंगी मिरवणूक गावभर फिरविण्यात आली. रात्री दोन वाजता नेहरु मैदानावर मिरवणूक परत आल्यावर श्री. दातार यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. सकाळचे चार वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालू होता.

सौ. लक्ष्मीबाई दांडेकर व डॉ. मिस् जावळे : अटक झालेल्या ३५ इसमांपैकी १५ गृहस्थांवरील खटले काढून टाकण्यात आले व उरलेल्या २० लोकांना ४ महिन्यापासून ते १ वर्षापावेतो निरनिराळ्या शिक्षा देण्यात आल्या. सौ. राधाबाई गोखले व श्री. मथूताई लिमये यांचे वरील खटले काढून टाकण्यांत आले. सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांना ४ म. शिक्षा व १०० रु. दंड करण्यात आला. सौ. दांडेकर यांनी सौ. पटवर्धन यांचे बरोबर अमरावती शहरातील पिकेटिंग, प्रभात फेऱ्या, सायंफेऱ्या, मुष्टीफंड व स्त्रियांच्या जाहीर सभा इत्यादि कार्यक्रमात प्रामुख्याने भाग घेतला होता. मधून मधून त्यांनी तालुक्यातून व्याख्यानाचे दौरेही काढले होते. अशा रीतीने स्त्री समुहात जागृती उत्पन्न करण्यात त्यांनी बराच भाग घेतला. डॉ. मिस् जावळे यांस ५०० रुपयांचा जामीन घेऊन सोडून देण्यात आले. डॉ. मिस् जावळे यांनी मिठाच्या सत्याग्रहात पुढारीपणा स्वीकारून अपूर्व धैर्य दाखविले होते. त्यानंतर शिबिराचे व्यवस्थेत, मुष्टीफंड जमविण्यात, ॲम्बुलन्सची व्यवस्था करण्यात व विशेषत: दारु आणि कौन्सिल निवडणुकीचे वेळी पिकेटिंगमध्ये प्रामुख्याने बराच भाग घेतला होता.

गढवाल दिनाचे मिरवणुकीचे वेळी अटक झालेल्यांची यादी–

१ दे. भ. आबासाहेब ओझरकर वकील, अध्यक्ष वऱ्हाड प्रांतिक काँ. कमेटी. २ श्री. अण्णासाहेब कलोती वकील, अध्यक्ष उमरावती जिल्हा काँ. कमेटी, ३ श्री. वासुदेवराव दिक्षित, चिटणीस, उमरावती जिल्हा काँ. क. ४ श्री. नारायणराव पांडे, दुय्यम चिटणीस, उ. जि. काँ. क. ५ श्री. प्यारेलालजी सेवक, उपाध्यक्ष उ. जि. काँ. क., ६ श्री विष्णुपंत देशपांडे, संपादक, काँग्रेस बुलेटिन. ७ श्री. रंगनाथपंत गिरगावकर, शिबिराधिपती ८ श्री. कृष्णराव योकार, दुय्यम शिबिराधिपती. ९ श्री. शंकरराव बोधनकर, नॅशनल मिलीशियाचे कॅप्टन. १० सौ. लक्ष्मीबाई दांडेकर अध्यक्ष, देशसेविका संघ, उमरावती (११) श्रीमती राधाबाई गोखले,

चिटणीस, देशसेविका संघ, १२ डॉ. मिस् सुलोचनाबाई जावळे, अम्ब्युलन्सच्या कार्यकर्त्या. (१३) श्रीमती मथूताई लिमये, अम्ब्युलन्सच्या कार्यकर्त्या. १४ श्री. वाठोडकर, अंबागेट युवक मंडळ, १५ श्री. बाबासाहेब जोशी, बाल प्रचारक. १६ श्री. अण्णासाहेब जोशी, यवतमाळचे शिबिराधिपती. (१७) श्री. बाबाराव ढोले, सेनापती. (१८) श्री पांडुरंगपंत पोतदार, काँग्रेसची दवंडी देणारे. (१९) श्री. पुंडलीक जोशी, पोलिसात पत्रिका वाटल्याबद्दल अटक. २० श्री. नारायणराव राऊत (भातकुली) (२१) श्री. साबळे, नॅशनल मिलीशियातील सैनिक. २२ श्री. हेमराज खादीवाले, गुजराती युवक मंडळ. २३ श्री. लक्ष्मीशंकर चव्हाण, गुजराती युवक मंडळ. (२४) श्री. मणिलाल गुजराती, गुजराती यु. मंडळ. २५ श्री. देवचंदलाला शाहीर, बुधवारा शाहीर मंडळ २६ श्री. रामचंद्र वस्ताद, अंबागेट यु. मंडळ. (२७) श्री. विजयानंद पडोळे, (२८) श्री. शंकरराव खोडे, उदय चे कपं झीटर. (२९) श्री. विठ्ठलराव चौधरी. ३० श्री. लक्ष्मीनारायण माळाणी, कॉलेज विद्यार्थी. (३१) श्री. नाना नेरकर, कॉलेज विद्यार्थी. (३२) श्री. काशीनाथ पोतदार. (३३) श्री. नारायण सुतवणे, अंबागेट यु. मंडळ. ३४ श्री. नारायणराव. (३५) श्री. लक्ष्मीशंकर आचार्य (३६) शेठ श्रीनारायण. ३७ श्री. शंकरराव. ३८ श्री. पांडुरंग ज्वलेकर. ३९ (नाव समजले नाही.)

वरील लोकावर, दि. १६ दिसेंबर रोजी खटला सुरू झाला. त्या पूर्वी (कंसात नंबर दिलेल्या) १६ लोकांना सोडून देण्यात आले होते. उरलेल्या एकवीस लोकांत दोन स्त्रिया व १९ पुरुष होते. पैकी डॉ. मिस् जावळे यांनी बचाव केला. बाकीच्या सर्वांनी "आम्हाला कोर्टाच्या कामात भाग घ्यायचा नाही व मिरवणुकीच्या दिवशी आम्ही तेथे होतो" असे सांगितले. त्यानंतर दि. २३ दिसेंबर रोजी या सर्व आरोपींना सिटी मॅजिस्ट्रेटनी चार महिन्यापासून ते एक वर्षापावेतोच्या शिक्षा सुनावल्या होत्या. (त्यांची नावे व शिक्षा याची माहिती पुढे यादीत दिलेली आहे.) मिस् जावळे यांना फक्त २५० रु. दंड व समज देण्यात आला अणि श्री. बोधनकर, श्री. विष्णूपंत जोशी व श्री. बाबा जोशी यांना व फक्त दंड झालेल्यांना सोडून देण्यात आले होते.

वरील सर्व देशभक्तांचे अभिनंदनार्थ दि. २३ रोजी रात्री नेहरू मैदानावर जाहीर सभा भरली होती.

गढवाल दिनाचे दिवशी अटक झालेल्या देशसेविकांचे अभिनंदन करण्यासाठी दि. १४ दिसेंबर रोजी दुपारी चार वाजता ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची जाहीर सभा झाली व त्यानंतर तेथून एक जंगी मिरवणूकही काढण्यात आली होती.

त्याच प्रमाणे सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांना जेलमध्ये 'सी' क्लास दिल्याबद्दलही दि. २५ दिसेंबर रोजी दुपारी ४ वा. स्त्रियांची जाहीर सभा ब्रम्हविद्या मंदिरात भरली होती.

संस्मरणीय प्रसंग : उमरावती शहरातील वडाळी सत्याग्रहाचा पहिला दिवस जसा अपूर्व झाला, तसाच हा गढवाल दिनाच्या मिरवणुकीचा प्रसंगही फार संस्मरणीय झाला. मिरवणुकीवरील मनाई हुकुमाच्या विरुद्ध हा अखेरचा कायदेभंग, वडाळी सत्याग्रहाच्या पहिल्या दिवशीच्या कायदेभंगा-इतकाच अपूर्व व संस्मरणीय आहे. उमरावती शहरातील लहान मोठ्या कार्यकर्त्यांचे धैर्य या शेवटच्या प्रसंगी कसोटीस लागले व त्या परीक्षेत ते यशस्वी झाले त्याबद्दल त्या वेळचे कार्यकर्ते अभिनंदनास पात्र आहेत. दे. भ. कलोती वकील यांना शिक्षा झाल्यामुळे त्यांनी आपल्या पश्चात दे. भ. मुळे वैद्य यांना जिल्ह्याचे सर्वाधिकारी नेमले व युद्धमंत्र्याचे जागी श्री. विष्णुपंत नेरकर यांची योजना झाली.

हुतात्म्यांना श्रद्धांजली : दि. १५ दिसेंबर रोजी हुतात्मा माणिकलाल सेन व हुतात्मा बाबू गेनू यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नेहरु मैदानावर जाहीर सभा भरून, हुतात्म्यांच्या गौरवपर भाषणे करण्यात आली व श्रद्धांजली अर्पण करण्यात आली होती.

परदेशी कापडावरील पिकेटिंग
उमरावतीचा देशभक्त मौ. आझाद

गढवाल दिनाच्या प्रकारामुळे व बार्डोलीचे दे. भ. केशवलाल शहा यांच्या व्याख्यानामुळे, विदेशी कापडाच्या पिकेटिंगला पुनः जोर आला. देशसेविका व स्वयंसेवक यांनी १-२ दिवस पिकेटिंग केल्यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी काँग्रेसमार्फत विदेशी कपडयाला ३ म. करिता सील लावून घेतले व अशा रीतीने विदेशी कपडयाची विक्री बंद झाली. याच सुमारास उमरावती शिबिरातील स्वयंसेवक ऋणमोचनच्या यात्रेत विदेशी कापडावर

पिकेटिंग करण्यास पाठविण्यात आले. त्यापैकी काहींना पोलिसने निर्दयपणाने मारले. त्यापैकी ३ जणांना अटक करण्यात येऊन एलिचपूर येथे खटला चालू असता पोलिस लॉकपमध्ये २० दिवस त्यांचे हाल करून त्यांना सोडून देण्यात आले. याचप्रमाणे निरनिराळ्या तालुक्यात व्यापारी वर्गाने विदेशी कपडचाला काँग्रेसमार्फत सील लावून घेतले.[१] या बाबतीतील यशाचे पुष्कळसे श्रेय जिल्हाधिकारी रा. वैद्य पं. दा. मुळे यांना अहोरात्र मदत करणारे मुसलमान दे. भ. मुल्लाईब्राहिमजी मुल्लाचांदाभाई उर्फ मौ. आझाद यांना आहे व त्यांची कामगिरी निदान काँग्रेस कमेटी तरी कधीही विसरणार नाही.

शेठ मंगलचंद बिसोरीलाल : उमरावतीचे सुप्रसिद्ध व्यापारी व काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते शेठ मंगलचंद बिसोरीलाल ह्यांची दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी ७ वा. स्थानिक तुरुंगातून सुटका झाली. त्यांचे सन्मानार्थ सायंकाळी ६ वा. नेहरू मैदानावरून जंगी मिरवणूक काढण्यात आली होती.

१९३० च्या आंदोलनातील काही संस्मरणीय बाबी.

(१) बुलेटीन : बुलेटीन विरुद्ध ऑर्डिनन्स जारी असताना सुद्धा संपादकाचे नाव स्पष्टपणे देऊन काँग्रेस कमिटीमार्फत सरासरी ४ म. बुलेटीन प्रसिद्ध करण्यात येत असे. वडाळी सत्याग्रहाच्या सुरवातीपासून श्री. दिगंबरपंत सहस्त्रबुद्धे ह्यांच्या संपादकत्वाखाली सुरू झालेले बुलेटीन पुढे श्री. शंकरराव पांडे व विष्णुपंत देशपांडे यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होत होते. जिल्ह्यातील पोलिसांचे जुलूम व इतर बऱ्याचशा बातम्या व विशेषत: जप्त झालेला 'पेशावर' कमिटीचा रिपोर्ट यांचे प्रकाशन बुलेटीनमधून करण्यात आले.

---

१ : **विदेशी कापडा वरील बहिष्काराचा परिणाम** : इ. स १९२९ च्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या चार महिन्यात परदेशातून १,०९,१९२ कापडाचे गठ्ठे आले होते. इ. स. १९३० मध्ये विदेशी कापडावरील बहिष्कारामुळे, याच चार महिन्यात, जापानमधून आलेले ७३०० गठ्ठे जमेस धरूनही फक्त २२,३४१ गठ्ठे परदेशातून आले. एवढा प्रचंड परिणाम परदेशातील कापड आयातीवर या आंदोलनाने घडवून आणला होता. ('उदय' दि. २ डिसें. १९३०).

(२) **प्रभातफेऱ्या व सायंफेऱ्या** : गावातील लहान थोर स्त्री-पुरुष उत्साही मंडळींनी प्रभात व सायंफेऱ्या काढून जनतेत बराच उत्साह उत्पन्न केला. या बाबतीत अंबागेट युवक मंडळाने बरीच कामगिरी केली. या फेऱ्यांचे अनुकरण जिल्हाभर गावोगाव करण्यात आले.

(३) **वानरसेना** : निरनिराळ्या नानाविध उपक्रमाबरोबर वानर सेनेची ही स्थापना झाली. लहान मुलांनी आपला संघ स्थापून 'वानरसेना' या नावाखाली राष्ट्रीय लढ्यात उत्तम काम केले. यांत वसंत केतकर, पाळेकर, दांडेकर, इ. बालवीरांनी बरीच खटपट केल्यामुळे त्यांचे अभिनंदन करणे जरुर आहे.

(४) **नॅशनल मिलीशिया** : या नावाची गणवेषामधे शिस्तवार एक पलटण रा. वासुदेव बाबाजी दिक्षित ह्यांचे नेतृत्वाखाली निर्माण करण्यात आली. या सेनेची कवायत रोज घेण्यात येऊन काँग्रेसच्या प्रत्येक कार्यक्रमात ही शिपाई बाण्याची तुकडी फार शोभा देत असे. लहान मुलांची एक तुकडी 'भारत नॅशनल मिलीशिया' नावाने कु. बाळ ओझरकर यांचे देखरेखीखाली काढण्यात आली.

(५) **शांतीदल** : वडाळी सत्याग्रहाच्या आरंभानंतर शिबिरांतील स्वयंसेवक सत्याग्रहात गुंतल्यामुळे निरनिराळे कार्यक्रम शांततेने पार पडावे व पोलिसांना हात शिरकावण्याची संधी मिळू नये म्हणून शांतीदलाची स्थापना करण्यात आली. डॉ. भोजराज ह्यांनी सत्याग्रहाला जाण्याच्या आधले दिवशी ही कल्पना लोकासमोर जाहीर सभेत मांडली. तिचा जोराने प्रसार होवून १००–१५० मंडळी ह्या दलात सामील झाली व त्यांनी पुढे ६ महिने पर्यंत मोठ्या उत्साहाने सर्व कार्यक्रमाची व्यवस्था केली.

(६) **मुष्टीफंड** : नेहमी शिबिरात जेवणाऱ्या २००–२५० स्वयं-सेवकांची जेवणाची व्यवस्था करण्याकरिता मुष्टीफंडाची कल्पना प्रथम श्री. फिरंगीलाल यांनी काढून मुष्टीफंड गोळा करण्यास सुरुवात केली. त्यालाच पुढे जंगल सत्याग्रहाचे वेळी शेठ राधाकिसनजी व गोपीकिसनजी यांनी व्यवस्थित स्वरूप दिले. पुढे हा व्याप वाढल्यामुळे अंबागेट युवक मंडळ व त्याचे उत्साही अध्यक्ष रा. दातार हे सामील झाल्यामुळे मुष्टीफंडाची व्यवस्था उत्तम झाली.

(७) **शुश्रूषा पथक :** अंबागेट युवक मंडळाने सेवा समिति स्थापन करून तिच्या विद्यमाने शुश्रूषा पथक निर्माण केले. या पथकात गावातील डॉक्टर मंडळी सामील झाली. या सर्वांच्या मदतीने अंबागेट रस्त्यावरील धनसा बिल्डिंगमध्ये सरासरी २० रोगी ठेवता येतील एवढे हॉस्पिटल ता. १६ जुलै रोजी, डॉ. भोजराज ह्यांचे हस्ते उघडण्यात आले. ता. १७ जुलै पासून वडाळी सत्याग्रहाच्या रणक्षेत्रावर व तसेच पोहरा सत्याग्रहाच्या प्रसंगी गावातील नवी जुनी सर्व डॉक्टर मंडळी आळीपाळीने शुश्रूषा पथकांतील स्वयंसेवक घेऊन हजर राहत असत. जिथे तिथे मारहाण झाली तिथे तिथे जाऊन योग्य शुश्रूषा करण्यात येत असे. या पथकाचे चिटणीस डॉ. व्ही. व्ही. जंशी व डॉ. वाटवे ह्यांनी फार मेहनत घेतली ह्याबद्दल ते व त्यांचे साथीदार व अंबागेट युवक मंडळ अभिनंदनास पात्र आहेत.

श्री. पं. दा. मुळे व विष्णुपंत नेरकर : काँग्रेसचे बरेचसे कार्यकर्ते जेलात गेल्यानंतर, युद्धाच्या शेवटल्या काळात रा. मुळे वैद्य व विष्णुपंत नेरकर हे अनुक्रमे जिल्ह्याचे सर्वाधिकारी व युद्धमंत्री या नात्याने काम करीत होते. बरेचसे साथीदार व उत्साही कार्यकर्ते सरकारच्या दडपशाहीस बळी पडल्यानंतर या दोन देशभक्तांनी काँग्रेसचे तारू वादळात सुरक्षित ठेवले याबद्दल त्यांची करावी तेवढी स्तुती थोडीच होईल. दे. भ. मुळे हे फेब्रूवारी १९३० पासून प्रां. काँग्रेस कमेटीचे सेक्रेटरी म्हणून सारखे काम करीत असता, त्याबरोबरच उमरावतीतील प्रत्येक कार्यक्रमात मोठ्या आस्थेने भाग घेत होते. पुढे पुढे कामाचा भार वाढल्यामुळे त्यांनी आपला दवाखाना बंद करून आपला सर्व वेळ राष्ट्रकार्यास दिला आणि अखेरपर्यंत त्यांनी चळवळीत कसलीही शिथिलता येऊ दिली नाही. सर्व पुढारी तुरुंगात गेल्यानंतर चळवळ कायम ठेऊन ती वाढविण्याचे सर्व श्रेय त्यांनाच आहे.

दे. भ. बापूजी अणे व वीर वामनराव दादांचा अपूर्व सत्कार व मानपत्र.

दे. भ. बापूजी अणे आपला ६ म. कारावास संपवून ता. १० जानेवारी १९३१ रोजी शिवनी जेलमधून सुटले. त्यामुळे सर्व प्रांतभर

व उमरावती जिल्ह्यात फार आनंद झाला. त्यानंतर ता. १६ जानेवारी १९३१ रोजी डॉ. भोजराज ह्यांची यवतमाळ जेलमधून सुटका झाली. याच सुमारास ६ म. च्या शिक्षा संपवून बरेचसे अ. जिल्ह्यातील स्वयंसेवक सुटून आले. यानंतर फेब्रुवारी महिन्यात १ महिना सूट मिळाल्यामुळे काही स्वयंसेवक सोडण्यात आले व बाकीची मंडळी गांधी इर्विन तहनाम्यामुळे मार्च महिन्यात मुक्त झाली. दे. भ. बापूजी अणे सुटून आल्यानंतर उमरावती मुक्कामी ता. १६ जानेवारी रोजी त्यांचा अपूर्व सन्मान झाला. सर्व मंडळी सुटली. परंतु वऱ्हाडचे प्राण, वीर वामनराव जोशी यांना प्रां. सरकारने लवकर न सोडल्यामुळे जनतेस आनंदाचा पूर्ण अनुभव घेता येईना. एकदाची वीर वामनरावांची सुटका सरासरी १५ दिवस उशिरांनी झाली. सर्वत्र आनंदी आनंद झाला व वीर वामनरावांचे स्वागत उमरावती शहरात मिरवणूक, मानपत्रे, मेजवान्या इ. निरनिराळ्या प्रकारे मोठ्या थाटाने करण्यात आले.

कै. केशवराव शालीग्राम व कै. पतकी : उमरावतीचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. केशवराव शालीग्राम यांचा जानेवारी १९३१ मध्ये आजाराने अंत झाला. त्यांनी सत्याग्रहाच्या चळवळीच्या आरंभापासून व्याख्यानाचे दौरे काढून सर्व जिल्हाभर जागृती उत्पन्न केली. मीठ सत्याग्रहापासून तो जंगल सत्याग्रहापर्यंत त्यांनी प्रकृतीकडे न पाहता सतत पुढाकार घेतला. परमेश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो. त्याचप्रमाणे ताडी पिकेटिंगचे दिवशी डि. एस्. पी. चे हातून बेदम मार खाणारा स्वयंसेवक हनुमंत पतकी यांचाही परोपकार करीत असता आकस्मिक अंत झाला. स्वयंसैनिकांच्या मालिकेत श्री. पतकी यांचे नावाची नेहमी आठवण राहील.

आमचा विद्यार्थी वर्ग : अधिकारी वर्गाच्या अरेरावीने सरकारी मराठी शाळा बेमुदत बंद करण्यात आल्यानंतर त्यातील उत्साही विद्यार्थ्यांनी रा. वि. दा. ब्रम्ह वकील व श्री. लक्ष्मीनारायण मालाणी यांचे देखरेखीखाली जोराने कार्यास सुरवात केली. काँग्रेसेस सभासद वाढविणे, खादी विक्री स्वदेशी वस्तूंचा प्रसार इत्यादि विधायक गोष्टी त्यांनी आनंदाने केल्या. फटाक्यावरील पिकेटिंग, मुष्टीफंड गोळा करणे, प्रभात व सायंफेऱ्या काढणे यात त्यांनी बराच भाग घेतला. त्यात श्री. शंकरराव बोधनकर, श्री. बाबा जोशी व श्री. दत्तात्रय उंबरकर यांनी प्रचाराचे कार्य केले. श्री. उंबरकर

चित्र क्र. १५९ : स्वयंसेवक (पृष्ठ ६७८ पहा)
श्री हनुमंत भीमराव पतकी.

चित्र क्र. १६० : दे. भ वैद्य पं. दा. मुळे आणि लोकनायक बापुजी अणे.

(पृष्ठ ६७७ पहा)

यांना ११७ कलमाखाली नाशिक जिल्ह्यात पकडण्यात आले व त्यांना ३ महिनें शिक्षा झाली.

किंग एडवर्ड कॉलेजवर पिकेटिंग : बेमुदत बंद असलेले कॉलेज, पालकांना व विद्यार्थ्यांना अपमानकारक अटीवर सुरू होणार होते. म्हणून त्यांवर पिकेटिंग करण्याची जरूरी भासली. सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. राधाबाई गोखले, रा. दिक्षित, रा. मालाणी, रा. सहस्त्रबुद्धे इत्यादिकांच्या नेतृत्वाखाली तीन दिवस कडक पिकेटिंग करण्यात आले. तिसऱ्या दिवशी सायंकाळी विद्यार्थ्यांची व पालकांची सभा होऊन अटीचा पुन्हा फेरविचार करीपर्यंत पिकेटिंग तहकूब करण्याची विनंती काँग्रेस कमेटीस करण्यात आली. त्यामुळे पिकेटिंग बंद करावे लागले. अंबागेट युवक संघाने व गावातील स्त्री–पुरूषांच्या प्रभातफेऱ्यांतील मंडळींनी या कामी फार मदत दिली+

आमचा भगिनी वर्ग : सत्याग्रहाच्या पूर्व तयारीपासूनच स्त्री-वर्गाने जे अलोट धैर्य दाखविले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडेच होईल. त्यांच्या दररोजच्या वाढत्या उत्साहाकडे पाहून आपल्या लढ्याच्या मुळाशी खरोखरच ईश्वरी प्रेरणा होती असे वाटते. प्रत्यक्ष तुरुंगात जाणाऱ्या सौ. पार्वतीबाई पटवर्धन, डॉ. मिस् जावळे, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, श्रीमती मथूताई लिमये, सौ. राधाबाई गोखले यांच्या शिवाय कुमारी अंबूताई साठे, श्रीमती यमूताई टाकरखेडकर इत्यादि गावातील बऱ्याच स्त्रियांनी हा लढा यशस्वी करण्यात बराच भाग घेतला होता.

सत्याग्रही वीरांचो नावे (उमरावती तालुका)

नं.	नाव	गाव	कलम	शिक्षा
१.	वीर वामनराव जोशी	उमरावती	१२४ अ	२ वर्षे, ४५० रु. दंड.
२.	रा. हरिहरराव देशपांडे	–,,–	१०८	१ वर्ष
३.	डॉ. पटवर्धन	–,,–	,,	–,,–
४.	डॉ. सोमण	–,,–	,,	–,,–
५.	डॉ. भोजराज	–,,–	३७९	६म. किंवा २५०रु. दंड
६.	रा. त्रिबकराव जोशी	–,,–	११७	१ व.
७.	चंद्रभान जिवाजी	–,,–	२६ जी	६ महिने
८.	गणपत रामजी	–,,–	,,	–,,–

+ चळवळीच्या संदर्भात कि. ए. कॉलेजही ऑ. म. बंद करण्यात आले होते.

नं.	नाव	गाव	कलम	शिक्षा
९.	गिरधारीलाल हिरालाल	उमरावती	२६ जी	६ महिने
१०.	रामेश्वर देवीदीन अवस्थी	–,,–	–,,–	–,,–
११.	रामगोपाळ विठ्ठुराम	–,,–	–,,–	–,,–
१२.	रामनारायण बद्रीप्रसाद	–,,–	–,,–	–,,–
१३.	गंगाराम हिरामण	–,,–	–,,–	–,,–
१४.	धनराज मुरलीधर	–,,–	–,,–	–,,–
१५.	विश्वास परशराम	–,,–	–,,–	–,,–
१६.	कृष्णा जानूजी	–,,–	–,,–	–,,–
१७.	उदेभान उंद्राजी	–,,–	–,,–	–,,–
१८.	रतनलाल बापूजी काळे	–,,–	११७	१ व.
१९.	मोतीराम घोडेराम जांगडा	–,,–	२६ जी	६ म.(रा. मथुरा)
२०.	भीमभाई किसनजी नाईक	–,,–	–,,–	–,,– (रा. सुरत)
२१.	बामणगावकर	–,,–	११७	१ व.
२२.	मंगलचंद बिसोरीलाल	–,,–	–,,–	६ म., ५०० रु.
२३.	पाराशरपंत बेडेकर	–,,–	–,,–	१८ म.
२४.	राधाकिसन चंद्रभान	–,,–	२६ जी	६ म., ५०० रु.
			११७	१८ म., १००० रु.
२५.	डॉ. पातुरकर	–,,–	११७	१८ म., २५० रु.
२६.	पन्नालाल बन्सिलाल	–,,–	१५७	६ म., २००० रु.
			अपिलात निर्दोषी. शिक्षा भोगली.	
२७.	कल्पनाथ शर्मा	–,,–	११७	१८ म. १५० रु.
२८.	सौ. पार्वतीबाई पटवर्धन	–,,–	–,,–	६ म.
२९.	सौ. लक्ष्मीबाई दांडेकर	–,,–	–,,–	४ म.
३०.	लक्ष्मण यशवंत श्रोत्री	–,,–	–,,–	१८ म., १०० रु.
३१.	दिनकर हरी सहस्त्रबुद्धे	–,,–	–,,–	१ व.
३२.	एस्. व्हि. गोखले	–,,–	१०८	११ म.
३३.	सुखदेव आर्य	–,,–	११७	६ म., ५० रु.
३४.	ओझरकर वकील	–,,–	१०५	१ व., ४०० रु.
३५.	कलोती वकील	–,,–	–,,–	–,,– –,,–
३६.	प्यारेलाल सेवक	–,,–	–,,–	१ व.
३७.	एन्. टी. पांडे	–,,–	१०५	९ म., १०० रु.

३८.	डब्ल्यु. बी. दिक्षित	उमरावती	१०५	९ म., २०० रु.
३९.	लक्ष्मीनारायण मालाणी	–,,–	–,,–	८ म., २५० रु.
४०.	देवचंद लाला	–,,–	–,,–	९ म.
४१.	रामचंद्र वस्ताद	–,,–	–,,–	–,,–
४२.	अण्णा जोशी	–,,–	–,,–	–,,–
४३.	आर. एस्. वाठोडकर	–,,–	–,,–	६ म.
४४.	के. पी. योकार	–,,–	–,,–	–,,–
४५.	पांडुरंग महादेव डवलेकर	–,,–	–,,–	–,,–
४६.	हेमराज प्राकजी	–,,–	–,,–	–,,–
४७.	रंगनाथ गिरगावकर	–,,–	–,,–	–,,–
४८.	रामचंद्र गंगाधर जोशी	–,,–	–,,–	४ म.स.म., ७५ रु.
४९.	शंकर बाळकृष्ण बोधनकर	–,,–	–,,–	४ ,, १५० रु.
५०.	माधव गुंडेराव देशमुख	–,,–	११७	१८ म.
५१.	श्रीपाद भीमराव गोखले	–,,–	–,,–	९ म. व २५० रु. दंड
५२.	विष्णू भगवंत देशपांडे	–,,–	१४५	६० रु. दंड
५३.	डॉ. मिस् जावळे	–,,–	–,,–	२५० रु. दंड
५४.	बाजीराव ओक	–,,–	–,,–	६ म.
५५.	मारोती सदाशिव बर्वे	–,,–	११७	१ व.
५६.	सुखदेव नामदेव पाटील	–,,–	२६ जी	६ म.
५७.	नामदेव लक्ष्मण हिरूरकर	–,,–	–,,–	–,,–
५८.	अर्जुन तळेगावकर	–,,–	२६ जी	६ म.
५९.	मोतीराम गणपतराव	–,,–	११७	६ म.

इ. स. १९३० सालातील कायदेभंगाच्या चळवळीची उमरावती शहरापुरती संकलीत माहिती वर दिली असून, याच काळात शहरात ज्या इतर घडामोडी घडल्या त्याची माहिती पुढे दिली आहे.+

+ : १९३० च्या कायदेभंगाचे चळवळीची वर दिलेली माहिती, सा. 'उदय'चे १९३० चे अंक व जिल्हा कॉं. कमेटी तर्फे १९३१ मध्ये प्रकाशित केलेल्या (व नंतर जप्त झालेल्या) 'उमरावती जिल्ह्यातील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास' ही पुस्तिका, या दोहोंच्या आधारे दिलेली आहे.

+ इ. स. १९३० च्या सत्याग्रह संग्रामात, लोकसंख्येचे प्रमाणात व तुरूंगात जाणाऱ्या सत्याग्रहीचे प्रमाणात, सबंध हिंदुस्थानात वऱ्हाडचा दुसरा नंबर आला होता. (उदय, २७ नोव्हें. १९३१)

भारतीय चित्रकला प्रदर्शन : मुंबईच्या कलाकाराने तयार केलेले श्री. कांबळी यांचे 'भारतीय चित्रकला प्रदर्शन' उमरावतीत उघडण्यात आले होते. त्यात मनुष्याकृती हालचाल करणारी मेणाची चित्रे असल्यामुळे ही नाविण्यपूर्ण कलाकृती पाहण्यासाठी स्त्री पुरूषांची अतोनात गर्दी होत असे.

गडकरी स्मृतिदिन : दि. २३ जानेवारी रोजी कै. राम गणेश गडकरी यांचे स्मृदिदिनानिमित्त विद्यार्थी मंडळातर्फे श्री. वरेरकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन तीत श्री. भोळे, प्रो. कुळकर्णी व वीर वामनराव जोशी हयांची भाषणे झाली होती.

किंग एडवर्ड कॉलेजचे प्रिंसिपॉल आणि विद्यार्थी.

उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे प्रिंसिपॉल मि. टॉस्टविन् यांच्या अरेरावीबद्दल वृत्तपत्रातून वेळोवेळी तक्रारी येत असत. त्यांतच, हुतात्मा जतींद्रनाथ यांच्या निधन–दिनाचे प्रसंगी घडलेल्या प्रकारामुळे व दे. भ. सुभाषचंद्र बोस यांना गॅदरिंगला विद्यार्थ्यांनी बोलावल्यामुळे, प्रिंसीपॉल टॉस्टविन् हे फारच खपा झाले होते. त्यामुळे प्रिन्सिपॉल साहेबांनी काही विद्यार्थ्यांना बोलावून 'तुम्हाला तुमच्या कृत्याबद्दल प्रायश्चित्त भोगावे लागेल' अशी धमकी दिली होती.

याप्रमाणे कॉलेज युवक आणि कॉलेजचे अधिकारी यांचेत बेबनाव उत्पन्न झाला होता. अशा वेळी प्रिंसिपॉल टॉस्टविन यांना एक 'तुमच्या रक्ताचा प्यासा' अशी सही असलेले पत्र कोणी तरी पाठविले इतकेच नव्हे तर दि. ३१ जानेवारी १९३० रोजी 'अमरसिंग' हया सहीचे एक पत्रक, प्रिंसिपॉल साहेबांची हुबेहूब खोटी सही करून कॉलेजच्या नोटिस बोर्डावर लावण्यात आले होते. हे पत्र इंग्रजीत टाईप केलेले होते व 'क्रांती चिरायू होवो', 'विद्यार्थ्यांनो उठा व छात्रावासावर राष्ट्रीय झेंडा लावा.' 'गुलामगिरी सोडा व युरोपियनांना कापून काढा' असा मजकूर त्या पत्रकावर होता.

या प्रमाणे किंग एडवर्ड कॉलेजमध्ये, अधिकारी व कॉलेज युवक यांचेतील वितुष्ट वाढू लागले होते.

विदर्भ साहित्य संघ : विदर्भ साहित्य संघाचे विद्यमाने दि. ३१ जानेवारी रोजी 'गडकऱ्यांचा पुण्य प्रभाव' या विषयावर ना. दादासाहेब

खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. खरे यांचे व्याख्यान झाले व दि. १ फेब्रुवारी रोजी सौ. परमानंद यांचे 'स्मृतिकालिन स्त्रीधन' या विषयावर व्याख्यान झाले होते.

विसाव्या शतकाचा संदेश : या विषयावर दि. २ फेब्रुवारी रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा युवक संघातर्फे श्री. हरिहरराव देशपांडे यांचे विचार परिप्लुत व्याख्यान झाले होते.

उमरावती विश्रांतीगृहाचा 'सुवर्ण-दिन'

उमरावतीतील नव्या कोतवाली समोरच्या 'विश्रांती गृहा' चे सभासदांनी, सदर गृहाचे सुवर्ण-दिन महोत्सवाचे निमित्ताने दि. ७ फेब्रुवारी १९३० रोजी गणेश थिएटरमध्ये राम गणेश गडकरी कृत 'पुण्य प्रभाव' नाटकाचा प्रयोग करून दाखविला होता. या नाटकात सर्वश्री आप्पासाहेब ओक वकील, बॅरि. माधवराव बागवे, श्री. बाबासाहेब खापर्डे, रा. ब. आप्पासाहेब खरे वकील, श्री. विठ्ठल बंधूजी चौबळ वकील, श्री. गं. बा. दुर्गे वकील श्री. शामरावपंत देशपांडे वकील, कुमार नाशिककर श्री. पोंक्षे, श्री. नरहरी पुणेकर व श्री. रघुनाथ आणि गुलाबराव यांनी कामे केली होती.

दि. ८ रोजी खेळ व बक्षिस समारंभ, रिपोर्ट वाचन आणि फलाहार दि. ९ रोजी भोजन व फोटो इ. कार्यक्रमाने हा विश्रांती-गृहाचा पन्नासावा वर्धापन दिन उर्फ सुवर्ण दिन साजरा करण्यात आला.

या सर्व कार्यक्रमाला मध्यप्रांताचे गव्हर्नर ना. तांबे हे सभासद म्हणून हजर होते.

या संस्थेची स्थापना दि. ८ फेब्रुवारी १८८० साली झाली. संस्थापकात श्री. अण्णासाहेब महाजनी हे प्रमुख होते. शिवाय संस्थेच्या सभासदातून कै. मुधोळकर, ना. दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी व नामदार तांबे असे भूषणभूत लौकिकवान पुरूष निर्माण झाले आहेत... सदर संस्थेचा उगमकाळ ज्यांनी पाहिला व उपभोगिला ते श्री. श्रीधर रामचंद्र उर्फ दादासाहेब पिंपळखरे, ना. दादासाहेब खापर्डे व श्री. आबासाहेब चिखलीकर, तिच्या पन्नासाव्या वाढदिवसाचे कौतुक करायला लाभले होते.

गव्हर्नर ना. तांबे : मध्यप्रांताचे गव्हर्नर ना. तांबे यांना उमरावतीचे मुक्कामात येथील व्यापारी वर्गातर्फे सहकारी संघाचे दिवाणखान्यात मानपत्र

देण्यात आले होते. हिंदु हायस्कूलचा बक्षीस समारंभ व हस्तकौशल्याचे प्रदर्शनाचे उद्घाटन ना. तांबे यांच्या हस्ते झाले. ना. तांबे यांनी न्यू हायस्कूल व हनुमान व्यायाम शाळेला भेटी दिल्या. हनुमान व्यायाम शाळेत गव्हर्नरांना लष्करी सलामी देण्यात आली आणि कवायत करून दाखविण्यात आली होती.

ना. गव्हर्नरांनी न्यू हायस्कूलला व विश्रांती गृहाला देणगीही दिली होती.

गोवर्धन मेळा : हा मेळा उमरावतीत आला. ब्रम्हविद्या मंदिरात या मेळ्यातर्फे कीर्तन व संवाद झाले. मेळा पाहण्यासाठी स्त्रियांची अतोनात गर्दी होत असे.

नगरपालिकेचा निषेध : दि. ७ फेब्रुवारी रोजी सक्कर साथीत श्री. शेठ पन्नालाल बंसीलाल यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, पाण्याच्या टंचाईबद्दल नगरपालिकेचे धोरणाचा निषेध करण्यात आला होता.

मुसलमानांची सभा : उमरावतीतील मुसलमानांची सभा जुम्मा मशिदीत भरून, 'शिराळा खून खटल्यातील मुसलमान आरोपींना सोडल्या शिवाय, हिंदु–मुसलमानाचे दंग्यातील कैद्यांना माफी देणे योग्य नाही' अशा तऱ्हेचा ठराव करण्यात आला व तो सरकारकडे पाठविला होता.

मध्यप्रांत बँकींग चौकशी कमेटी : दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत, मध्यप्रांत बंकींग इन्क्वॉयरी कमेटीची बैठक उमरावतींत भरली होती. या काळात चौकशी समितीसमोर एकूण २८ साक्षी देण्यात आल्या. रावबहादूर डोळे, श्री. रणदिवे, श्री. य. गो. देशपांडे, श्री. बाबासाहेब खापर्डे, यवतमाळचे डेप्युटी कमिश्नर श्री. परमानंद व सर मोरोपंत जोशी हे त्यात प्रमुख होते.

उमरावती जिल्हा शिक्षक परिषद : दि. २७ ते २९ जानेवारी १९३० रोजी ही शिक्षक परिषद, मराठी म्यु. शाळा नं. १ मध्ये श्री. आबासाहेब शेणोलीकर सी. डे. इन्स्पेक्टर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तीत शैक्षणिक विषयावर चर्चा होऊन काही उपयुक्त ठराव मंजूर करण्यात आले. शेवटचे दिवशी हस्ताक्षर, हस्तकौशल्य, चित्रकला व नकाशे ह्यांत उत्कृष्ठ ठरलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख, चेअरमन जिल्हा कौन्सिल, उमरावती यांचे हस्ते बक्षिसे वाटण्यात आली होती.

१९३० चा रेल्वे कामगारांचा संप : दि. ४ फेब्रुवारीपासून जी. आय्. पी. रेल्वेच्या कामगारांनी आपल्या मागण्यांची दाद लावून घेण्यासाठी संप पुकारला होता. दि. १३ फेब्रुवारी रोजी संपावर असलेल्या रेल्वे कामगारांची उमरावतीत प्रचंड मिरवणूक निघाली होती. शहराच्या मुख्य मार्गाने फिरून ही मिरवणूक जोग चौकात आली व तेथेच वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत अकोल्याचे श्री. पेंडसे यांचे वक्तृत्वपूर्ण असे भाषण झाले. श्री. पेंडसे यांनी रेल्वे कामगारांना संप का पुकारावा लागला? ह्याची साधार माहिती सांगितली. त्यानंतर डॉ. भोजराज यांनी रेल्वे एजंटांनी कामगारांच्या न्याय्य मागण्या फेटाळल्या म्हणून त्यांचा निषेध व संपवाल्यास सहानुभूती दर्शविणारा ठराव मांडला. त्यास श्री. बामणगावकरांनी अनुमोदन दिल्यावर तो सर्वानुमते पास झाला. नंतर अध्यक्षांनी संपवाल्यास मदत करण्यासाठी श्री. बामणगावकरांचे अध्यक्षतेखाली एक कमेटी नेमल्याने जाहीर केले. तींत सर्वश्री छक्कीलालजी, गुलाबराव बक्षी, डॉ. सबनीस, ईत्यादी मंडळी होती.

विदर्भ साहित्य संघ : दि. २२ फेब्रुवारी रोजी विदर्भ साहित्य संघातर्फे नागपूरचे प्रो. पेंडसे यांचे श्री. बाबासाहेब खापर्डे ह्यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी संस्कृति व मराठी वाङमय' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. दि. २९ फेब्रुवारीला या संघातर्फेच नागपूरच्या सौ. कोठीवान यांचे व्याख्यानही आयोजित करण्यात आले होते.

श्री दास नवमी उत्सव : उमरावतीच्या राष्ट्रधर्मवीर संघातर्फे श्री दासनवमी उत्सव साजरा करण्यात आला. त्या निमित्त वीर वामनराव जोशी व श्री. हरिहरराव देशपांडे ह्यांची भाषणे, उपासनी बोवांचे कीर्तन व नमस्काराचे सामने असा कार्यक्रम झाला होता.

हिंदु बाल अनाथालय : श्रीमान् शेठ छक्कीलालजी खरैय्या यांच्या २१ हजाराच्या उदार देणगीमुळे उमरावतीला 'हिंदु बाल अनाथालय' या महिन्यात सुरू करण्यात आले होते. पाच वर्ष वयाच्या आतील मुले या संस्थेत घेतली जात होती. डॉ. भोजराज हे या अनाथालयाचे कार्यवाह होते.

होलीका निवारण मंडळ : या मंडळातर्फे दि. ३ मार्च रोजी प्रताप चौकात सेठ पन्नालाल बंसीलाल यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा

होऊन, होळीतील बीभत्स प्रकार बंद करण्याचा उपदेश करण्यात आला होता.

लेडीज क्लब : दि. २५ फेब्रुवारी रोजी कॅम्प विभागात 'लेडी यशोदाबाई लेडिज क्लब' चा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहाने व थाटाने सौ. राणीसाहेब सांगली यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला होता. या समारंभाला शहरातील अनेक प्रतिष्ठित स्त्री-पुरूष हजर होते.

भूकंप : दि. २२ मार्च रोजी रात्री ११ वाजताचे सुमारास उमरावती शहराला भूकंपाचे दोन धक्के बसले होते. धक्क्याची गती पश्चिम ते पूर्व अशी होती.

ना. मंत्र्यांची उमरावती भेट : मध्यप्रांताचे दिवाण ना. रामराव देशमुख यांनी मार्च महिन्यात उमरावतीला भेट देऊन, नगरपालिकेच्या लालखडी, राजापेठ व बेनोडा येथील बोअरिंगचे काम पाहिले व नगर पालिकेच्या अध्यक्षांशी, इंजिनिअरांशी आणि सभासदांशी पाणी पुरवठ्याचे बाबतीत चर्चा केली. या मुक्कामात त्यांनी रोहिदास मोची स्कूल व भारतीय चित्रकला प्रदर्शनालाही भेट दिली होती.

बाहुबली जैन व्यायाम शाळा : दि. ३१ मार्च रोजी सकाळी, दहिसात परवार जैन मंदिराचे मागील श्री बाहुबली जैन व्यायाम शाळेचे उद्घाटनाचा समारंभ सुर्जी अंजनगांवचे रायसाहेब मोती संगई यांच्या हस्ते थाटाने पार पडला होता.

भारत हिंदी पुस्तकालय : या संस्थेचा वार्षिकोत्सव म्यु. उपाध्यक्ष श्री. सेठ मिनामलजी यांच्या अध्यक्षतेखाली दि. ७ एप्रील रोजी साजरा करण्यात आला होता.

बदली : उमरावतीचे लोकप्रिय सिटी इन्स्पेक्टर ऑफ पोलिस श्री. परमेश्वर दयाल यांची बदली नागपूर येथे डे. सु. ऑफ पोलिसचे जागेवर झाली होती.

गांधी चौक व सिनेमागृह : गांधी चौकाचे मैदान सिनेमागृहासाठी मिळावे म्हणून काही उपद्व्यापी लोकांनी म्युनिसिपल कमेटीमार्फत प्रयत्न चालविला होता. त्याबद्दल स्थानिक वृत्तपत्रातून टीका आली होती.

शहराच्या मध्यभागी व सभा वगैरे आणि नवरात्रोत्सव यात्रेची ही जागा काही व्यक्तींनी सिनेमा थिएटर बांधण्यासाठी मागितली पण सुदैवाने ती मिळू शकली नव्हती.

अस्पृश्य परिषदेचा बोजवारा : एप्रील १९३० मध्ये, एकीकडे कायदे भंगाच्या चळवळीची धामधूम सुरू असतानाच, अस्पृश्य पुढारी श्री. गवई यांनी मुंबईचे श्री. निकालजे यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाटकगृहात दि. २६ एप्रील रोजी 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषद' भरविली होती. परंतु परिषदेला स्थानिक असे सारे शे-दिडशे लोक हजर होते.

स्वागताध्यक्ष श्री. गवई यांनी आपल्या भाषणात राजकीय चळवळीची व गांधीजींच्या सविनय कायदेभंगाची टर उडवावयास सुरुवात केली. तेथे सर्वश्री साखरे, नंदागवळी, भ. व्ह. भटकर, पुणे येथून आलेले श्री. राजभोज व श्री. ल. कृ. ओगले एम्. एल् सी. यांनी विरोध प्रकट केला होता. शेवटी अध्यक्षांचे भाषण न होताच परिषद रविवारपर्यंत तहकूब करण्यात आली.

रविवारी भरलेल्या परिषदेचे वेळी अध्यक्षांचे भाषण झाले; पण पुन्हा वाद निर्माण होऊन अनेक प्रमुख लोक निषेधार्थ परिषदेतून उठून गेले होते.

'स्वतंत्र हिंदुस्थान' बंद : वीर वामनराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली उमरावतीला १९२३ पासून प्रकाशित होणारे साप्ताहिक 'स्वतंत्र हिंदुस्थान' हे वृत्तपत्र दि. ७ जून १९३० चा शेवटचा अंक काढून सरकारच्या दडपशाहीचे व प्रेस ॲक्टचे निषेधार्थ बंद ठेवण्याचा निर्णय संचालकांनी घेतला होता.

उमरावती जिल्हा कौन्सिल : दि. २८ जून रोजी उमरावती जिल्हा कौन्सिलची सर्वसाधारण सभा भरून, तींत जिल्हा कौन्सिलवर ना. रामराव देशमुख मध्यप्रांताचे दिवाण, अगर श्री. बापूजी अणे यांच्या हस्ते दि. ५ जुलै रोजी राष्ट्रीय निशाण उभारण्याचा समारंभ करावा असा ठराव करण्यात आला होता. त्याच सभेत सत्याग्रहात भाग घेतलेल्या लोकांना नोकरीत घेण्यात यावे, कौन्सिलचे नोकरांना खादी व स्वदेशी कापड घेण्याची शिफारस करणारा आणि जिल्हा कौन्सिल बरखास्त करणाऱ्या सरकारी धोरणाचा निषेध करणारा असे ठराव मंजूर करण्यात आले होते.

हन्नुमिया फ्री लायब्ररी : दि. २९ जून रोजी सकाळी दे. भ. संभाजीराव गोखले यांच्या हस्ते, अंबापेठेतील 'हन्नुमिया फ्री लायब्ररी'चे उद्घाटन करण्यात आले होते. श्री. काशिनाथपंत भंडारे हे अध्यक्ष होते. श्री. हिदायतुल्ला व श्री. महंमद साहेब यांची भाषणे झाली. हार, तुरे, पानसुपारी होऊन थाटाने समारंभ पार पडला होता.

विद्यार्थ्यांस मदत : होस्टेलच्या विद्यार्थ्यांशी प्रिंसिपॉल साहेबांचे जे वर्तन घडले त्याचा निषेध म्हणून दि. ४ ऑगस्ट रोजी उमरावतीत सर्वत्र हरताळ पडला होता. होस्टेल मधून बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांजवळ घरी जाण्यास पैसे नव्हते व शहरात त्यांची ओळखही नव्हती. त्यामुळे काँग्रेस कमेटीने त्यांना राहण्यास घर देऊन जेवणही दिले होते.

दिवाण ना. रामराव यांचा राजीनामा मंजूर : मध्यप्रांताचें दिवाण ना. रामराव माधवराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांनी आपल्या दिवाणगिरीचा राजीनामा दिला व तो आगस्टमध्ये मंजूर झाला होता.

पालकांची सभा : किंग एडवर्ड कॉलेज मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या पालकांची सभा दि. १७ आगस्ट रोजी म्यु. ए. व्ही. स्कूलच्या हॉलमध्ये श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालो भरून, किंग एडवर्ड कॉलेजच्या प्रिंसिपॉलकडून आलेल्या पत्राचा विचार करण्यात आला व 'कॉलेज तावडतोब सुरू करावे मात्र शिस्तीचे नावाखाली विद्यार्थ्यांवर सूड घेतला जाऊ नये' अशा अर्थाचा ठराव मंजूर करण्यात आला होता. हा ठराव श्री. रणदिवे यांनी मांडला व श्री. रा. ब. ब्रम्ह यांनी त्यास अनुमोदन दिले होते.

पदकाचा त्याग : उमरावतीचे प्रसिद्ध श्री. भाऊसाहेब जोशी ह्यांनी, त्यांना काही वर्षापूर्वी मिळालेले कैसर-ई-हिंद, सेकंड क्लास पदक, डे. कमिश्नरकडे परत करण्यासाठी काँग्रेस कमेटीच्या चिटणीसाकडे दिले होते. त्या सोबतचे पत्रांत त्यांनी 'देशाच्या सद्य: स्थितीत मला हे पदक वापरणे अशक्य वाटते' असे म्हटले होते. या प्रांतातील अशाप्रकारे देशाभिमान प्रदर्शक कृत्य करणारे हे पहिलेच गृहस्थ होते.

राजनिष्ठेबद्दल पदव्या : बादशहांच्या वाढदिनानिमित्त ज्या राजनिष्ठ लोकांना सरकारतर्फे पदव्या देण्यात आल्या होत्या त्यांत उमरावतीचे सर्वश्री

ना. तांबे यांना 'सर', 'अनगळ वकील यांस 'सर', सरंजामे' वकील यांना 'राव साहेब' आणि खान साहेब मौलवी अ. कादर, वकील, यांना 'खान बहादूर' अशा पदव्या मिळाल्या होत्या.

१९३० चा गणेशोत्सव : कायदेभंगाच्या चळवळीच्या वातावरणामुळे या वर्षीचा गणेशोत्सव थाटाने झाला नाही. वेगवेगळे गणेशोत्सव न करता परकोटाचे आत एक व परकोटाचे बाहेर एक याप्रमाणे मोठे दोन सार्वजनिक गणेशोत्सव व्हावेत असे लोकमत होते व त्यासाठी दि. १६ आगस्ट रोजी ब्रम्हविद्या मंदिरात गणेशोत्सव चालकांची सभा होऊन शेवटी जोग चौकात सार्वजनिक स्वरूपाचा असा एकच गणेशोत्सव करावा असे ठरून त्यासाठी एक तात्पुरते कार्यकारी मंडळ निवडण्यात आले होते. अध्यक्ष: श्री. नानासाहेब गोखले, उपाध्यक्ष : श्री. बाबासाहेब खापर्डे, रा. ब. ब्रम्ह, श्री. अण्णासाहेब कलोती, डॉ. म्हैसाळकर व शेठ केसरीमल, सेक्रेटरी– श्री. आवटे वकील व श्री. पतकी, खजीनदार श्री. नाना जोशी, ह्याप्रमाणे तात्पुरते मंडळ होते. विद्यार्थी वर्गाने सुद्धा अशा एकत्र सार्वजनिक गणेशोत्सवात भाग घेण्याचे ठरविले होते.

हा सार्वजनिक एकाच गणेशोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. दे. भ. नानासाहेब गोखले, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्रीमती दुर्गाताई जोशी इत्यादींची वेगवेगळ्या प्रचलीत विषयांवर भाषणे वगैरे झाली होती. दि. ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जनही थाटात पार पडले.

म्यु. शाळेचा गणेशोत्सव : म्यु. ए. व्हि. स्कूल, मराठी, हिंदी आणि गुजराथी प्राथमिक शाळा यांतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून या वर्षी पासून मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला होता. बोधप्रद व्याख्याने, कीर्तन, पोवाडे नकला वगैरे विविध कार्यक्रम दहा दिवस चालू होते.

या वर्षी श्री गजानन समाजातर्फेचे गणेशोत्सवात 'स्वदेशी प्रदर्शन व येरवडा जेल' हे नाविण्यपूर्ण उपक्रम करण्यात आले होते. स्वदेशी वस्तूंचा परिचय लोकांना व्हावा म्हणून पांच दिवस प्रदर्शन ठेवण्यात आले. महात्माजींचे करुणरसपूर्ण दृष्य दाखविले होते. ही कलाकृती श्री. कोनलाडे व श्री. बिंड यांनी केली होती नंतर हे दृष्य आकोल्यास लोकांना दाखविण्यास नेण्यास आले होते.

पोवाड्याचा कार्यक्रम : बुधवारा शाहीर मंडळाचे मुख्य शाहीर श्री. देविदासपंत देशपांडे व लाला बिसारे ह्यांचे पोवाड्यांचा जाहीर कार्यक्रम दि. २६ आगस्ट रोजी जोग चौकात झाला. या कार्यक्रमाला सुमारे दहा हजार लोक उपस्थित होते.

शेठ नगीनदास यांचे घरात धाडसी चोर : दि. ११ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ चे सुमारास सराफ ओळी जवळ राहणारे श्री. नगीनदासजी सराफ यांचे घरात, त्यांच्याच दुकानात काही दिवसांपूर्वी असलेला नोकर चोरी करण्याचे हेतूने घुसला होता. तो त्या घरात लपलेला, एका मुलीचे नजरेस आल्यावरून तिने ओरड केली व घरमालक आणि शेजारी मंडळी त्यास पकडण्यासाठी गेली तेव्हा चोराने त्याचे जवळील तलवारीचा वार केला त्यामुळे एक दोघास जबर जखमा झाल्या होत्या. परंतु त्याही अवस्थेत त्यांनी चोरास पकडून पोलिसांचे स्वाधिन केले. हा प्रकार सर्व गावात कळल्याने नंतर लोकांची खुप गर्दी झाली होती.

भारतीय चित्रकला प्रदर्शन : मुंबईचे श्री. बाबूराव कांबळे यांचे भारतीय चित्रकला प्रदर्शन उमरावतीला पांच महिन्यानंतर पुन्हा आले. त्यात गांधीजींचा बंदीवास, परदेशी कापडाच्या दुकानावरील पिकेटिंग, वडाळी देखावा इत्यादी हालचाल करणारी मेणाची, माणसांच्या आकाराची चित्रे अमरावतीकरांचे आकर्षण बनले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन नगराध्यक्ष श्री. केतकर वकील यांनी दि. २७ सप्टेंबर रोजी केले होते.

टॉस्टविन राजीनामा प्रकरण : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे प्रिंसिपॉल मि. टॉस्टविन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त इंडियन डेलीमेल या वृत्तपत्रात ५ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाले होते.

"……सरकारची इभ्रत सध्याचे बिकट परिस्थितीत देखील राखण्याचा मी अतोनात प्रयत्न केला. विद्यार्थ्यांची दांडगाईवृत्ती दिवसेंदिवस बोकाळू लागली. माझ्या जीवाला धोका होईल अशा आशयाची धमकीची देखील मला पत्रे आलीत. विद्यार्थ्यांची ही अरेरावी मला अगदी असह्य झाली. असे असून देखील सरकार दडपशाहीचे व्यामोहामुळे सरस्वती मंदिरात असलीच दडपशाही सुरू करण्याचा आग्रह करते. म्हणून हा राजीनामा दिला" असे त्यात म्हटले होते.

चित्र क्र. १६१ : (पृष्ठ ६७८ पहा)

श्री केशवराव शालीग्राम



चित्र क्र. १६२ : (पृष्ठ ६९१ पहा)

श्री विठ्ठल बंधूजी चौबळ, वकील
मध्यप्रांत कायदे कौन्सिलचे सभासद.
(पूर्व वऱ्हाड शहर मतदार)



चित्र क्र. १६३ : (पृष्ठ ६९१ पहा)

बॅरि. डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख
मध्यप्रांत कायदे कौन्सिलचे सभासद.
(अमरावती तालका खेडे विभाग)

परंतु पुढे, सरकारने १४ आक्टोबरला प्रेस नोट काढून हे पत्र बनावट असल्याचे जाहीर केले. त्यावरून मि. टॉस्टविन यांची बनावट सही करून ते पत्र वर्तमान पत्राकडे पाठविले होते हे दिसून आले. अशी मजा त्याकाळी किंग एडवर्ड कॉलेज मध्ये चालत असे.

१९३० च्या कौन्सिल निवडणुकीचा निकाल : मध्यप्रांत कायदे कौन्सिलच्या निवडणूकीचे मतदान दि. १० आक्टोबर १९३० रोजी झाले होते. त्याचा निकाल दि. १२ नोव्हेंबर रोजी लागला त्यानुसार:–

१ : उमरावती तालुका खेडे विभाग मतदार संघ–

बॅरि. पंजाबराव देशमुख	४१४ मते
बॅरि. रामराव देशमुख	३२७ मते

बॅरि. पंजाबराव देशमुख हे ८७ मताचे मताधिक्याने निवडून आले होते.

२ : पूर्व वऱ्हाड शहर मतदार संघ–

श्री. चौबळ उमरावती	१२४ मते
श्री. अभ्यंकर, यवतमाळ	२४ मते

श्री. चौबळ हे १०० मताधिक्याने निवडून आले होते.

३ : पूर्व वऱ्हाड खेडे विभाग (मुस्लिम राखीव) तर्फे उमरावतीचे मि. मुजफ्फर हुसेन हे निवडून आले होते.

४ : वऱ्हाड जमीनदार मतदार संघातून श्री. बाबासाहेब खापर्डे हे अविरोध निवडून आले होते व

५ : श्रीमंत दादासाहेब खापर्डे हे ही दिल्लीच्या लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीसाठी वऱ्हाड जमीनदार मतदार संघातून अविरोध निवडून आले होते. ते वर दिले आहेच.

मध्यप्रांत कौन्सिल निवडणूकीचे मतदानाचे दिवशी काँग्रेस तर्फे पिकेटिंग करण्यात आले होते ती माहितीही वर दिलेली आहेच.

या पिकेटिंगचा मतदानावर फार परिणाम झाला. खेडे विभागात १९२६ मध्ये शे. ७० पर्यंत मतदान झाले होते. तर पिकेटिंगमुळे यावेळी हे मतदान शे. २५ पर्यंत घसरले. शहर विभागात तर शे. ५ चे वर हे प्रयाण गेले नाही.

हे पिकेटिंग उमरावतीत शहर विभागातच झाले होते कॅम्प विभागात झाले नव्हते असे दिसते. तसेच उमरावती खेडे विभागात मतदान केंद्रावर झालेले पिकेटिंगचे वेळी पिकेटर्स नी पक्षपाताची वागणूक केली असा त्यावेळी आक्षेप घेण्यात आला होता. विशिष्ठ उमेदवाराचे मतदार मतदानाला आले की, पिकेटर्स गप्प बसत. असा आक्षेप घेण्यात आला होता या शिवाय जातीयवादी प्रचारही होता असे दिसते[1].

जिल्हा स्कॉऊट असोसिएशन : दि. १५ नोव्हेंबर १९३० रोजी म्यु. ए. व्ही. स्कूलचे दिवाणखान्यात उमरावती जिल्हा स्कॉऊट असोसिएशनची वार्षिक सभा डॉ. पंजाबराव देशमुख बार-ॲट्-लॉ यांच्या अध्यक्षतेखाली होऊन, १९३१ सालासाठी खालील कार्यकारी मंडळ निवडण्यात आले होते.

अध्यक्ष : रा. ब. के. व्हि. ब्रम्ह, ॲडव्होकेट, उपाध्यक्ष- डॉ. बी. वाय्. म्हैसाळकर, स्कॉऊट कमिश्नर- डॉ. पंजाबराव देशमुख बार-ॲट्-लॉ, अ. स्कॉ. कमिश्नर व खजीनदार- श्री. एम्. एन्. ठाकुर, जनरल सेक्रेटरी- श्री. टी. वाय्. देव याशिवाय बारा लोक सभासद आहेत.

याच सभेत, तिरंगी राष्ट्रीय निशाण हे या असोसिएशनने आपले अधिकृत निशाण ठरविले होते. आणि स्कॉऊटचा गणवेष रंगीत खादीचा किंवा खादी दुर्मिळ असेल तर शुद्ध स्वदेशी कापडाचाच असावा असे ठरविण्यात आले होते.

मध्यप्रांत व वऱ्हाड मोटर्स ओनर्स व ड्रायव्हर्स कॉन्फरन्स.

दि. १४ दिसेंबर १९३० रोजी वरील कॉन्फरन्स उमरातीच्या इंद्रभुवन थिएटरमध्ये, नागपूरचे श्री. फुले एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. श्री. बाबूराव कलोती हे या परिषदेचे संयोजक होते.

मध्यप्रांत सरकारने मोटारवाल्यांना जादा कर बसविण्याचे ठरवून तसे राजपत्रातून प्रसिद्ध केले होते. त्यावर मुख्यत्वे विचार करण्यासाठी ही परिषद भरविण्यात आली होती.

---

१ उदय दि. १८ नोव्हें. १९३०

मि. मुजफ्फर हुसेन : मध्यप्रांत कायदे कौन्सिलच्या उपाध्यक्ष (डेप्युटी स्पीकर) पदाची निवडणूक दि. ९ दिसेंबर १९३० रोजी भरलेल्या कौन्सिलचे बैठकीचे वेळी होऊन रा. ब. नायडू पक्षाचे – उमरावतीचे – मि. मुजफ्फर हुसेन वकील हे ११ मते अधिक पडून निवडून आले होते. त्यांचे प्रतिस्पर्धी यवतमाळचे राष्ट्रीय पक्षाचे श्री. मा. पै. कोल्हे हे उभे होते. श्री. कोल्हे यांना २८ व श्री. मुजफ्फर हुसेन यांना ३९ मते मिळाली होती.

ना. पंजाबराव – जयस्वाल दिवाण : मध्यप्रांत – वऱ्हाडचे दिवाण म्हणून, ना. गव्हर्नर यांनी उमरावतीचे डॉ. पंजाबराव देशमुख, बार-ॲट्-लॉ व सोहागपूरचे श्री. गजाधरप्रसाद जयस्वाल वकील यांची दिवाण (मिनिस्टर) म्हणून दिसेंबर १९३० मध्ये नेमणूक केली होती.

या वेळी कौन्सिलमध्ये रा. ब. नायडू (वर्धा) यांची डेमाकॅटिक पार्टी व श्री. बाबासाहेब खापर्डे (उमरावती) यांचा राष्ट्रीय पक्ष असे दोन प्रमुख पक्ष होते. शिवाय सरकारने नियुक्त केलेले सभासदही असत.

बालमृत्यु प्रतिबंधक उपायांचा परिणाम : उमरावती शहरात नगरपालिकेतर्फे बालमृत्यु प्रतिबंधक अशी जी उपाय योजना सुरू केली होती; शिशु सप्ताह व प्रदर्शने इत्यादिव्दारे जो प्रचार केला होता, त्याचा परिणाम दिसें. १९३० अखेर दिसून आला तो येणे प्रमाणे होता–(दहा हजार जन्मास, एक वर्षाचे आंतील मुलांचे मृत्यु संख्येचे प्रमाण)

मोहल्ले	सन १९२९	सन १९३०
हमालपुरा	२७१	१६९
बेलपुरा	३४४	१७७
राजापेठ	३००	२१४
मसानगंज	२७२	२२५

परिशिष्ट क्र. १

बंदीचा कायदेभंग

(चाल :– मधु सौरभयुत चंपक.)

हिंदवीरवर नव सत्याग्रह करण्या आज चला
बंदिच्या कायद्याला । तोडण्याला धृ.
निसर्ग सृष्टी देवाची सत्ता तीवर सर्वांची ।
नसे एकल्या राजाची
म्हणून आपण, स्वहक्क स्थापन करण्यालाच चला ।
बंदिच्या कायद्याला । मोडण्याला ॥ १ ॥
वृत्ति लुटारू ब्रिटिशांची– अन्यायाने छळण्याची– ।
हिंदी–प्रजेला पिळण्याची
भारतभूच्या त्या जनतेला सुखवायास चला ।
बंदिच्या कायद्याला । तोडण्याला ॥ २ ॥
कायदेच जे अन्यायी दृष्ट, आसुरी ते पाही– ।
तुडवावे आपुल्या पायी
उपदेशितसे अम्हा महात्मा गांधी, आज चला– ।
बंदिच्या कायद्याला । तोडण्याला ॥ ३ ॥
वऱ्हाडचे हे बापूजी सर्व लोक ज्या बा पूजी ।
भोजराज ते रणगाझी
छत्राखाली त्यांच्या आपण पाइक, आज चला ।
बंदिच्या कायद्याला । तोडण्याला ॥ ४ ॥

कवि :– मा. ल. व्यवहारे

टीप :– दि. १७ जुलै १९३० रोजी डॉ. भोजराज यांच्या नेतृत्वाखाली वडाळी जंगल सत्याग्रह करण्यात आला. त्यावेळी अमरावती नगरीतून वडाळी जंगलाकडे एक भव्य मिरवणूक निघाली. तीत बहुसंख्येने स्त्रियाही होत्या. या मिरवणुकीत प्रा. मा. ल. व्यवहारे (त्यावेळेचे विद्यार्थी) यांनी रचलेले वरील गीत अनेकवार गायिले गेले. ही मिरवणूक तुरुंगाजवळ येताच गानध्वनी उंचावला, कारण त्यावेळी डॉ. पटवर्धन, डॉ. सोमण वगैरे नेते त्याच तुरुंगात स्तानबद्ध होते हे गीत त्याकाळी बरेच गाजले.

परिशिष्ट--२

वनिता समाज : सदर संस्थेच्या वार्षिकोत्सव प्रसंगी जो अहवाल सादर करण्यात आला त्या प्रमाणे–

वनिता समाज या संस्थेचे पुनरुज्जीवन दि. १९ नोव्हेंबर १९२९ रोजी करण्यात आले होते. ही संस्था फार जुनी असून मध्यंतरी कांही कारणाने बरीच वर्षे बंद होती. असे अहवालावरून दिसून येते.

वनिता समाजाचे पुनरुज्जीवन करण्याचे मुख्य कारण म्हणजे, शिवणकामाचा वर्ग सुरू करून घरगुती सर्व प्रकारचे शिवण मध्यमवर्गातील स्त्रियांस बेतता–शिवता यावे व त्याव्दारे त्यांचे प्रपंचास मदत व्हावी असे होते. नंतर या वर्गास जोडूनच संस्थेने पेटीवादन आणि इंग्रजीचे वर्ग सुरू केले होते. शिवण वर्गात ४०–४५ स्त्रियां असून, ह्या शिवाय कपडे बेतण्यास शिकण्यासाठी ५–७ मुली स्वतंत्रपणे येत असत. इंग्रजी शिकणाऱ्या बायांची संख्या २०० पर्यंत होती.

हे वर्ग बरोबर चालतात की नाही हे पहाण्यासाठी, सर्व भार एकीवरच पडू नये म्हणून संस्थेचे चौदा जणींचे एक व्यवस्थापक मंडळ नियुक्त केले होते. त्या पैकी दररोज दोघी येऊन रोजच्या कामाची व्यवस्था पाहत. त्यापैकी संस्थेच्या अध्यक्ष लेडी सौ. यशोदाबाई जोशी ह्या, त्यांचे उतारवय आणि प्रकृती ठिक नसताही दररोज येत असत. त्यांची अवस्था आणि कामाची धडाडी ह्या गोष्टी धडा घेण्यासारख्या आहेत.

पेटीचा वर्ग शिकविण्याचे काम शिक्षक श्री. बेडेकर हे निरपेक्ष बुद्धीने व अत्यंत कळकळीने करीत आहेत. सुरुवातीला या वर्गाला १२ मुली येत असत. आता ही संख्या वीस पर्यंत वाढली आहे.

या शिवाय स्त्रियांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून मधुन मधुन निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने आयोजित केली होती. जानेवारी १९३१ पावेतो दर पंधरा दिवसांनी डॉ. सेनजीत हे नियमित व्याख्याने देत असत. या शिवाय आणखी योग्य अशा सद्गृहस्थांनी व स्त्रियांनी संस्थेत व्याख्याने दिली आहेत.

शिवण वर्गासाठी एक धंदेवाईक पगारी शिंपी नेमलेला आहे. त्याचेकडून कपडे बेतने व शिवणे ही कामे शिकविली जातात. सूत

काढण्यासाठी एक स्वतंत्र दिवस ठेवला होता. परंतु प्रारंभीची हौस पुढे पुढे कमी झाल्याने कटिंगचा वर्ग उघडण्यात आला. तथापी मिसेस हर्षे सौ. रंगुताई जोशी, सौ. मालतीबाई जोशी, यांनी नियमितपणे येऊन सूत काढून त्याची खादी विकत घेतली होती.

इंग्रजी शिकविण्याचे काम मिस् चौंडीकर ह्या, कांहीएक वेतन न घेता करित असतात.

१९३० इ. च्या नोव्हेंबर पर्यंत श्रीमती माणिकताई भिडे ह्या संस्थेच्या सेक्रेटरी पदावर होत्या. पण त्या पुढे इंग्लंडला गेल्यावर त्यांचे काम सौ. ताराबाई रणदिवे यांनी आस्थेवाईकपणाने तात्पुरते केले होते.

संस्थेचा मासिक खर्च ४८ ते ५० रुपये पर्यंत आहे. आणि मासिक उत्पन्न २७ ते ३० रुपये पर्यंत आहे. दर महिन्यात येणारी २०–२२ रुपयांची तूट लेडी जोशी ह्या उदार मनाने भरून काढीत असल्यामुळे हे वर्ग चांगल्या रितीने चालले आहेत. चालू वर्षी उन्हाळ्यात दुपारी ३ ते ५ शिवण कामाचे वर्ग मिस अल्मेडा ह्या घेणार आहेत[१].

१ : उदय दि. २१ एप्रील १९३१

परिशिष्ठ क्र. ३

(पृष्ठ क्र. ६७० पहा)

दि. २३ एप्रील १९३० चे 'पेशावर हत्याकांड'

(गढवाल दिनाची पार्श्वभूमि)

इ. स. १९२९ च्या लाहोर काँग्रेसचा स्वातंत्र्याचा ठराव, काँग्रेस संघटणेचे व खुदाई खिदमतगार स्वयंसेवकांनी वायव्य सरहद्द प्रांतातील खेडोपाडी नेऊन पोचवला. तेव्हा तेथील लष्करी अधिकाऱ्यांनी हे संकट ओळखून ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली.

या दडपडशाहीचे प्रतिकारासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी दारु दुकानापुढे निरोधन चळवळ सुरू केली. हा प्रारंभ दि. ५ एप्रील रोजी झाला. पण दारू मक्तेदारांनी थोडो मुदत मागीतल्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी ५ एप्रिल ऐवजी २२ एप्रिल ठरवून दिली होती.

दि. २२ एप्रीललाच अ. भा. काँग्रेस समितीने लाहोर बैठकीच्या वेळी नेमलेली चौकशी समिती पेशावरकडे निघाली. वायव्य हरहद्द प्रांतात चालू असलेल्या दडपशाहीची पाहणी करण्यासाठी ही समिती (डॉ. सय्यद महंमद, लाला दुनीचंद व मौलाना कासूरी) नेमली होती. या समितीला अटक या ठिकाणी अडकवण्यात आले व त्यांना प्रतिबंध करून परत पाठविले गेले.

या समितीस प्रतिबंध करून वापस पाठविल्याचे वृत्त पेशावर व इतर प्रमुख ठिकाणी कळले तेव्हा तेथे निषेध व्यक्त करण्यासाठी सभा भरल्या, मिरवणूका निघाल्या.

त्यावेळी पेशावरच्या नऊ प्रमुख नेत्यांना पकडण्यात आले. दि. २३ एप्रीलच्या या नेत्यांच्या अटकेविरूद्ध पुन्हा सभा, मिरवणूकी सुरू झाल्या.

पेशावरच्या किस्साखानी बाजाराजवळ जमलेल्या हजारोंच्या नि:शस्त्र व शांत जमावावर गोळ्या झाडण्यासाठी गढवाल पलटणीच्या दोन तुकड्या बोलावण्यात आल्या. परंतु त्या तुकड्यातील सैनिकांनी नि:शस्त्र व शांत जमावावर गोळ्या झाडण्याचे नाकारले. या अपूर्व घटनेमुळे ब्रिटिश

सेना अधिकाऱ्यांना हादरा बसला. पण लगेच अधिकाऱ्यांनी गोऱ्या सोल्जरांची पलटण आणून आपली रक्ताची तहान भागवून घेतली.

'किस्साखानी बाजाराजवळ हजारोंच्या जमावावर गोळ्या झाडल्या जात असता, स्त्री-पुरूष आपली जागा न सोडता आपली प्रेते पकडून बसले होते.' हे वर्णन पटेल अहवालात आहे. विशेषत: सरदार मंगलसिंग आपली पत्नी व मुले यांना टांग्यातून घेऊन चालले असता, टांग्यातील बाई व त्यांचे लहान मुल यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या व त्यांची प्रेते लोकांनी ताब्यात घेऊ नयेत म्हणून त्यांच्यावरही पुन्हा गोळीबार करण्यात आला. असले हे अमानुष नव्हे तर इतिहासातील कोणत्याही अत्याचारांना लाजविणारे प्रकार तेथे घडले.

मुले, स्त्री-पुरुष यांच्या पुढील रांगामधील लोक घायाळ होऊन पडल्यानंतर, मागील लोक आपली छाती उघडी करुन पुढे सरसावले. काहींच्या शरीरावर २०-२० गोळ्यांच्या जखमा झाल्याचे दिसून आले आहे. इतक्या हलकल्लोळातहि त्या लोकांनी आपली जागा सोडली नाही.

पक्षोभाने तात्काळ भडकून जाऊन आपल्या बंदुकीस हात घालणारा पठाण अशा रीतीने अत्याचारापुढे आहुती देण्यास तयार झाला हे अद्भूत दृश्य दाखविणारी पेशावरची ही किस्साखानी पेठ झाली.

पेशावरच्या या अत्याचारात बळी पडलेल्या व पीडीत झालेल्या लोकांना सहाय्य करण्यासाठी पं. मदनमोहन मालविय यांनी परवानगी मागीतली होती. ती सरकारने नाकारली.

ह्या २३ एप्रिल १९३० च्या रक्तरंजित अत्याचाराची स्मृती पुसुन टाकण्याचा प्रयत्न इंग्रज सरकारने भरपूर केला. तेथे झालेल्या रक्तपाताचे भीषण दर्शन जगाला होऊं नये म्हणून पेशावरची तटबंदी चिरेबंदी करुन टाकली. पण खुनाची घाण झाकली जात नाही. त्यामुळे व विशेषत: नि:शस्त्र जनतेचे शांततेचे वर्तन पाहुन गढवाली पलटणीच्या दोन तुकड्यांतील सैनिकांनी वरिष्ठाचे हुकूम अमान्य केले, गोळ्या झाडण्या ऐवजी स्वत: गोळ्या खाण्याची हिंमत दाखविली, या अपूर्व घटनेच्या वार्ता

एकून जगातील पत्रकार–वार्ताहर–त्या पुण्यक्षेत्राची पाहणी करण्यास धावले, आणि सरकारी डाव पेचावर मात करुन त्याही परिस्थितीत काँग्रेस चौकशी मंडळाचे काम फत्ते करणाऱ्या पटेल समितीच्या अहवालाने हे बलिदान अमर करुन ठेवले. या अत्याचाराचे साद्यंत व साधार वर्णन विठ्ठलभाई पटेल–अहवालात आहे. श्री. विठ्ठलभाई पटेल व बॅरि. रणधीर पंडित (श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांचे पति) यांनी या हत्याकांडाची चौकशी पुरी करुन व चित्रासह हा अहेवाल प्रसिद्ध करुन या समितीने किती मोठी देशसेवा केली आहे हे सदर अहवाल वाचण्यानेच ध्यानी येते.

(या कांडाची सरकारी चौकशी न्यायमूर्ती सुलेमान समितीने केली होती.)

ज्या १८ व्या रॉयल गढवाली रायफल्सच्या दुसऱ्या बटालियन्सच्या दोन पलटणींनी गोळीबार करण्याचे नाकारले त्यांचेवर कोर्ट–मार्शल पुढे खटला भरुन एकाला जन्मठेप काळेपाणी, एकाला १५ वर्षे सक्त मजुरी, आणि १५ जणांना ३ ते १० वर्षे अशा रानटी शिक्षा ठोठावण्यात आल्या होत्या. (२३ एप्रील १९३० रोजी ही घटना घडली. नंतर कोर्टमार्शल ७–८ महीने चालले. व सदर सैनिकांना वरप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या. हा निकाल जाहीर होताच जनतेने स्वयंस्फूर्त गढवाल दिन पाळला होता.)

या गढवाली सैनिकांना अनेकवर्षे जेल मध्ये खितपत पडावे लागले होते. इ. सन १९३७ मध्ये काँग्रेसची मंत्रीमंडळे देशाच्या आठ प्रांतातून आली व त्यावेळी या मंत्र्यांच्या प्रयत्नाने या लोकांची सुटका झाली होती.

स्वतंत्र हिंदुस्तानच्या इतिहासात या गढवाली सैनिकांच्या बहादुरीची स्मृति जनतेच्या हृदयात सदैव जिवंत आहे. पेशावरच्या हुतात्म्यांची अजरा-अमर गाथा देशवासीयांचे अंतकरणातून कधिही मिटणार नाही.

या गढवाली सैनिकांनी निःशस्त्र जमावावर गोळ्या झाडण्याचे वरिष्ट अधिकाऱ्यांच्या हुकूमांचे पालन न केल्या बद्दल महात्मा गांधींनी नापसंती व्यक्त केली होती. लंडनमध्ये गोलमेज परिषदेसाठी गांधीजी गेले तेव्हा तेथे एका चार्लस पेत्रास नांवाच्या फ्रेंच पत्रकाराला त्याबद्दलची खालील कारणे त्यांनी सांगीतली होती.

"गोळीबार करण्याचा हुकूम एकाद्या सैनिकाने मोडला तर आपण घेतलेली शपथ त्याने मोडली असा त्याचा अर्थ होईल व त्याबद्दल तो गुन्हेगार ठरेल. अधिकाऱ्यांना व सैनिकांना मी हुकुम मोडण्यास सांगू शकत नाहो, कारण माझ्या हाती सत्ता आल्यानंतर बहूधा मी त्याच अधिकाऱ्यांचा व त्याच सैनिकांचा उपयोग करीन. जर मी त्यांना आज्ञा मोडण्याची शिकवण दिली तर माझ्या हाती सत्ता आल्यानंतर ते तेच करतील अशी मला भीति वाटते.[१]"

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे इतिहासात जालियनवाला बागे सारखीच ही पेशावर हत्याकांडाची घटना महत्वाची आहे. आणि या घटनेशी संबंधित गढवाली सैनिकासाठी देशभर जनतेने स्वयंस्फूर्त पाळलेल्या गढवाल दिनाची स्मृती या इतिहासात अजरामर झाली आहे.

१ : मॉद, या फ्रेंच पत्राच्या दि. २०-२-३२ च्या अंकात प्रसिद्ध झालेली गांधीजींची मुलाखत.



चित्र क्र. १६४ : (पृष्ठ ७१७ पहा)

हुतात्मा श्री राजगुरु

चित्र क्र. १६५ : (पृष्ठ ७१७ पहा)

शहीदेआजम सरदार भगतसिंग

चित्र क्र १६६ : विदर्भ प्रांतिक महिला परिषद, अधिवेशन १ ले उमरावती. (पृष्ठ ७३६-३७ पहा)
(मध्यंतरी खुर्चीवर) परिषदेच्या अध्यक्ष : डॉ. कमलाबाई देशपांडे, सातारा.

इसवी सन १९३१

स्त्रियांची जाहीर सभा : दि. २ जानेवारी रोजी दुपारी ४ वा. ब्रम्हविद्या मंदिरात सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या 'शिक्षादिना' निमित्त स्त्रियांची जाहीर सभा झाली होती.

हुं; बाबू गेनू दिन व सत्याग्रहींचा सन्मान

हुतात्मा बाबू गेनू[१] दिनानिमित्त दि. ३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वा. नेहरु मैदानातून एक मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीसोबत, नुकतेच बंधमुक्त झालेले सत्याग्रही होते. शहराच्या मुख्य मार्गावरून ही मिरवणूक जात असता बंधमुक्त सत्याग्रहींचा पुष्पहार घालून लोक सत्कार करीत. ही मिरवणूक परत ठिकाणावर आल्यानंतर, आकोल्याचे सुप्रसिद्ध देशभक्त व नुकतेच बंधमुक्त झालेले शेठ श्रीराम

---

१ : **हुतात्मा बाबू गेनू** : बाबू गेनू हा सामान्य तरुण. बालवयातच त्याचे मनात जो देशभक्तीचा अंकुर उत्पन्न झाला तो उत्तरोत्तर वाढीस लागला. १९३० च्या कायदेभंगाचे चळवळीकडे त्याचे लक्ष वेधल्या जाऊन त्याने मुंबईस येऊन आपले नांव स्वयंसेवक दलात दाखल केले. थोडक्याच दिवसात मिठाच्या कायदे भंगाबद्दल त्याला शिक्षाही झाली. ही शिक्षा भोगून आल्यावर त्याने पुन्हा स्वयंसेवकात आपले नांव दाखल केले. त्यावेळी मुंबईत परदेशी वस्त्रांच्या दुकानावर आणि गोदामावर पिकेटिंग सुरू होते. कालबादेवी भागातील परदेशी कापडाचे गोदामावर पिकेटिंग चालू होते व त्या गोदामातून कापड घेऊन बाहेर वाहन जाऊ द्यायचे नाही असा स्वयंसेवकांचा निर्धार व कार्यक्रम होता. त्यासाठी दिवस-रात्र तेथे स्वयंसेवकांचे पहारे बसविण्यात आले होते.

(पुढील पानावर)

सुरजमल यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली. तींत श्रीमती मथूताई लिमये, श्री. बाबा जोशी व श्री. भीमभाई इत्यादी बंधमुक्त झालेल्या काही सत्याग्रहींची भाषणे झाली होती.

सत्याग्रहींची सुटका : वडाळी व पोहरा येथील जंगल सत्याग्रहाचे वेळी अटक होऊन शिक्षा झालेले खालील सत्याग्रही, शिक्षा भोगून अमरावती व रायपूर जेलमधून जानेवारी १९३१ चे पहिल्या आठवड्यात बंधमुक्त झाले होते.

सर्वश्री महादेवराव शिराळा, दौलत पुंड पोरगव्हाण, काशीराव मोरे आकोली (ता. अमरावती), अनवरखान पठाण टवलार, नारायणराव देशकर अमरावती, नारायणराव घोंगडे गणोरी, गणपतराव कोळी आष्टी, मोतीसींग राजपुत हिरूर कसबा, रामेश्वरजी अवस्थी अमरावती, अमृतराव निंबाळकर धामोरी, विठ्ठलराव मंगरूळकर यावली, मोतीलालजी जांगडा, पंजाबराव कदम, गणोरी, कृष्णराव मोरे, आष्टी, सखाराम घाटोळे, अडगाव (मोर्शी), बाजीराव केवरे, कारंजा, रतनसिंग जाट, कारंजा, जयराम चव्हाटे, वर्धा, नागदेव माळोकार वर्धा, रामचंद्र सोनवाने, वर्धा, बाबूराव आजनकर, वर्धा, महादेव पांचघरे वर्धा, जगन्नाथ पराते व गंगाराम कबाडी, उमरावती, भीमभाई नाईक, अमळनेर (जि. सुरत), शंकरराव पाटील, चांदूर रेल्वे, अमरसिंग, चांदूर रेल्वे.

(मागील पानावरून)

दि. १२ दिसेंबर १९३० रोजी भल्या पहाटे त्या गोदामातून परदेशी वस्त्रांचे गठ्ठे भरून एक ट्रक बाहेर निघाला. त्यावेळी स्वयंसेवक बाबू गेनू तेथे पहाऱ्यावर होता. तो एकदम ट्रकसमोर जाऊन आडवा पडला. परंतु ट्रक ड्रायव्हरने सरळ त्याचे अंगावरूनच गठ्ठे भरलेला ट्रक नेला. बाबू गेनू जागच्या जागी शहीद झाला. ही घटना भल्या पहाटे सूर्योदयापूर्वी घडली. थोड्या वेळातच बाबू गेनू शहीद झाल्याची बातमी सर्वत्र पसरली. त्याबरोबर ताबडतोब सर्व देशात बाबू गेनू दिन पाळण्यात आला. सामान्य प्रतीचा बाबू गेनू असामान्य ठरला. (श्री. अच्युतराव कोल्हटकरांनी १९३१ मध्ये बाबू गेनूचे चरित्र लिहून प्रसिद्ध केले होते.)

उमरावती जिल्हा कौन्सिल व तालुका बोर्ड सभासदांची परिषद.

दि. ८ जानेवारी १९३१ रोजी उमरावती जिल्हा कौन्सिलचे सभासद व तालुका बोर्डाचे सभासदांची परिषद उमरावती जिल्हा कौन्सिलचे सभागृहात रा. ब. के. वा. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. उमरावती जिल्हा कौन्सिलचे उपाध्यक्ष श्री. वाटाणे हे स्वागताध्यक्ष होते.

या परिषदेत मुख्य पाहुणे म्हणून मध्यप्रांत–वऱ्हाडचे शिक्षण मंत्री ना. पंजाबराव देशमुख यांचे मुख्य भाषण झाले. या परिषदेत या संस्थातील कारभारासंबंधीच्या अडी–अडचणींबाबत अनेक ठराव पास करण्यात आले होते.

उमरावती जिल्हा प्रा. शिक्षक परिषद.

उमरावती जिल्ह्यातील प्रा. शिक्षकांची परिषद दि. ५ व ६ जानेवारी रोजी श्री. शेणोलीकर डे. इन्स्पेक्टर ऑफ स्कूलस् यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

जिल्हा टुर्नामेन्ट व स्कॉऊट असोसिएशन.

स्कॉऊट असोसिएशन तर्फे दि. ६, ७ व ८ जानेवारी रोजी रिफार्म क्लब समोरील पटांगणात स्कॉऊटचे खेळ झाले. शेवटल्या दिवशी यशस्वी खेळाडू विद्यार्थ्यांना ना. पंजाबराव देशमुख यांच्या हस्ते बक्षिसे देण्याचा समारंभ झाला होता.

संमेलन : श्री शिवाजी मराठा हायस्कूलचे द्वितीय वार्षिक संमेलन दि. ७, ८ व ९ जानेवारी रोजी ना. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते.

मौ. महंमदअली यांचे निधन : उमरावतीत हरताळ.

मौ. महंमदअली यांचे दि. ६ जानेवारी रोजी आकस्मिक निधन झाले. त्याबद्दल उमरावती जिल्हा कॉं. कमेटीचे आदेशानुसार दुखवटा व्यक्त करण्यासाठी उमरावतीत हरताळ पाळण्यात आला. सायंकाळी नेहरू मैदानातून महंमदअलींच्या फोटोची मिरवणुक काढण्यात आली व रात्री नेहरू मैदानात मि. अ. वहाब यांच्या अध्यक्षतेखाली शोक सभा झाली. त्याच प्रमाणे

उमरावतीतील मुसलमानांची जाहीर सभा मि. मुजफ्फर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली होऊन मौ. महंमदअली यांचे बद्दल दुखवटा व्यक्त करण्यात आला होता.

हुतात्मा सिद्धेश्वरपंत गोरे : हुतात्मा सिद्धेश्वरपंत गोरे यांचे निधनाबद्दल दि. १० जानेवारी रोजी उमरावतीत कडकडीत हरताळ पाळण्यात येऊन, दुपारी त्यांच्या फोटोची नेहरू मैदानातून जंगी मिरवणूक काढण्यात आली होती. रात्री शेठ मंगलचंदजी ह्यांच्या अध्यक्षतेखाली दुखवटयाची जाहीर सभा झाली.

(उमरावतीच्या सरकारी मराठी हायस्कूलचे (हिंदु हायस्कूलचे) हेडमास्तर रा. रा. गोरे यांचे सर्वात लहान चिरंजीव व बुलढाणा येथील तरूण वकील दे. भ. सिद्धेश्वरपंत गोरे हे दिनांक ७ जानेवारी रोजी एका दारूचे दुकानावर सायंकाळी शांततेने पिकेटिंग करीत असता, दुकानदार कलालाने चिडून जाऊन विटेचा खंगर फेकून मारल्यामुळे त्यांच्या डोक्यास अती भयंकर जखम होऊन १२ तासाच्या आतच त्यांचा मृत्यू झाला होता.)

दिवाणास मानपत्र : उमरावती जिल्हा निवासी शेतकऱ्यांकडून ना. पंजाबराव देशमुख यांना दि. ८ जानेवारी रोजी मानपत्र देण्यात आले होते.

उमरावतीचे ना. श्री. जोग वकील यांचा ठराव.

मध्यवर्ती कायदे मंडळात वऱ्हाडतर्फे निवडून गेलेले उमरावतीचे श्री. जोग वकील यांनी "फांशीची शिक्षा रद्द करण्याकडे जागतिक प्रवृत्ती दिसून येत आहे, म्हणून सोलापूरचे दे. भ. मल्लाप्पा धनशेट्टी प्रभृती आरोपींची फांशीची शिक्षा रद्द करावी" अशा आशयाच्या ठरावाची नोटीस जानेवारी महिन्यात दिली होती.

शिशु संगोपन व सूतिकागृह संस्था : ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन खालील कार्यकारी मंडळ निवडण्यात आले होते.

अध्यक्ष–मिसेस डे, उपाध्यक्ष–मिसेस स्टेट, सेक्रेटरी–डॉ. श्री. वि. भागवत, जॉ. सेक्रेटरी–डॉ. भा. ज. बनसोड, खजिनदार–रावबहादूर डॉ. भट, मेंबर्स–श्री. जयवंत तहसिलदार व मिस् होम्स.

या संस्थेतर्फे अंबापेठेत एक सूतिकागृह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

डॉ. भोजराज यांची सुटका : वडाळी जंगल सत्याग्रहाचे नेते डॉ. भोजराज यांना झालेली सहा महिन्याची शिक्षा भोगून ते जानेवारीचे दुसऱ्या आठवड्यात यवतमाळच्या जेलमधून बंधमुक्त झाले होते.

पिकेटिंग : परदेशी कापडाच्या दुकानातील परदेशी कापडांचा गठ्ठा बांधून त्यावर आपली मोहोर लावण्याचे कार्य उमरावती काँ. कमेटी यशस्वी रीतीने करीत आहे. विदेशी माल दुसऱ्या गावी व्यापाऱ्यांना हलविता येऊ नये म्हणून स्वयंसेवक दक्षतेने सतत पिकेटिंग चालवीत होते.

सोलापूरच्या देशभक्तांना फांशी.

अमरावतीत कडकडीत हरताळ व जाहीर सभा.

सोलापूरच्या आरोपींना फांशी दिल्याचे कळताच दि. १३ जानेवारी रोजी उमरावतीत कडकडीत हरताळ पाळण्यात आला होता.

सोलापूरचे दे. भ. कै. मल्लाप्पा, सारडा प्रभृतींच्या पुण्यस्मरणार्थ स्थानिक व्यापाऱ्यांनी हा हरताळ पाळला. त्याच प्रमाणे कॉटन मार्केट, जिनिंग-प्रेसिंग फॅक्टऱ्या बंद होत्या. संध्याकाळी हुतात्म्यांच्या फोटोची मिरवणूक काढण्यात आली होती व रात्री डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. तीत सरकारचा निषेध करण्यात आला.[१] याच सभेत बंधमुक्त झालेले डॉ. भोजराज यांचाही सन्मान करण्यात आला होता.

---

१ : **सोलापूरचे हुतात्मे** : म. गांधी यांनी ५ मार्च १९३० रोजी मिठाचा कायदा तोडण्याबद्दल आपला निश्चय जाहीर केल्यावरुन त्यांना कर्डी मुक्कामी अटक होऊन येरवडा जेलमध्ये नेण्यांत आले होते. इंग्रज सरकारच्या या कृत्यामुळे सर्व देशभर स्वातंत्र्याकरिता पेटणाऱ्या ज्वालांचा भडका उडाला. सोलापूर येथे त्याचा परिणाम असा झाला कीं, शहराच्या सर्व भागातून दंग्याचे वातावरण दिसू लागले. ८ मे १९३० रोजी जनतेचा क्षोभ इतक्या थराला पोहोचला की, पोलिसांना गोळीबार करावा लागला.

(पुढील पानावर)

लोकनायक बापूजी अणे यांचा भव्य सत्कार

दि. ९ जानेवारी रोजी दे. भ. बापूजी अणे यांची शिवणी जेलमधून – शिक्षा पूर्ण झाल्यामुळे – सुटका झाली होती. त्यानंतर दि. १५ जानेवारी रोजी त्यांचे उमरावतीस आगमन झाले. त्या प्रसंगी उमरावती-करांतर्फे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले होते.

प्रथम बडनेरा रोडवर भारत समाज मिलीशियाने त्यांना लष्करी थाटाची सलामी दिली. सायंकाळी साडेपाच वाजता नेहरू मैदानावरून त्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीचे रस्ते लता पल्लवांनी व निशाणांनी श्रृंगारले होते. थोड्या थोड्या अंतरावर बापूजींचा पुष्पहारांनी

(मागील पानावरून)

त्यांत २५ लोक ठार व १०० जखमी झाले व ३ पोलिस मारल्या गेले. खवळलेल्या जनतेने सहा पोलिस चौक्या जाळल्या व सेशन्स कोर्टाला आग लावून दिली. शेवटी १२ मे रोजी मॉर्शल लॉ आणि कर्फ्यू लावण्यात आला. शहरात मशीनगन्स उभ्या करण्यांत आल्या. शहरातील शेकडो लोक पकडून जेलमध्ये ठेवण्यांत आले. २२ मे पर्यंत कर्फ्यू जारी होता. हा जनतेचा उठाव स्वयंस्फूर्त होता. पकडलेल्या लोकांवर खटले भरण्यांत आले. त्यापैकी दे. भ. मल्लाप्पा धनशेट्टी, श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. किसन सारडा व श्री. कुर्बान हुसेन यांना सोलापूरच्या सेशन्स जज्जाने फांशीची शिक्षा सुनावली होती.

वास्तविक दंग्याचे काळात सोलापूरला मार्शल लॉ लागू केल्यामुळे पाहिजे तेवढा बचावाचा पुरावा आरोपींना मिळू शकला नाही व जो कांही पुरावा समोर आला त्यावरुन तीन आरोपी तरी–परस्पर विरोधी पुराव्यामुळे निर्दोष ठरतात असा आपला अभिप्राय मुंबई हायकोर्टाचे जस्टीस माडगांवकर यांनी दिला होता. परंतु चीफ जस्टिसांना हे मत पसंत न पडल्यामुळे त्यांनी हे प्रकरण तिसऱ्या न्यायमूर्तीकडे निकाला करिता सोपविले होते व तेथे फांशीची शिक्षा कायम झाली. प्रिव्ही कौन्सिलकडे केलेले अपीलहि फेटाळल्या गेले. गव्हर्नरांनी दयेचा अर्जही नामंजूर केला. शेवटी या चारहि देशभक्तांना दि. १२ जानेवारी १९३१ रोजी येरवडा जेल मध्ये फांशी देण्यात आले होते.

सत्कार होत होता. मिरवणुकीतही गांधीजी व बापुजींचा सारखा जयघोष सुरू होता. मिरवणूक पाहण्यासाठी व बापूजींचे दर्शनासाठी रस्त्याने लोकांचो चिक्कार गर्दी झाली होती. तीन तास फिरून ही मिरवणूक परत नेहरू मैदानावर आली व लगेच सभेच्या कामास सुरूवात झाली.

सुरूवातीला पुष्पहार अर्पणाचा समारंभ बराच वेळ चालला. शेवटी वऱ्हाड प्रांतिकचे तत्कालिन सर्वाधिकारी दे. भ. कृष्णराव गारडगावकर यांनी विनंती केल्यावर लोकांकडून हार अर्पण बंद केले गेले.

प्रथम श्री. गारडगावकर यांनीच प्रास्ताविक भाषण केले. नंतर लोकनायक बापूजी अणे ह्यांचे समयोचित भाषण झाले. सत्काराबद्दल त्यांनी उमरावतीकरांचे आभार मानले. त्यांचे सुमारे अर्धा तास भाषण झाले व हा समारंभ संपला. या सभेला सुमारे १५ हजार लोकसमुदाय हजर होता.

नगर पालिकेतर्फे बापूजींना मानपत्र.

दुसरे दिवशी दुपारी ३ वाजता बापूजींचे स्त्रियांकरिता ब्रम्हविद्या मंदिरात व्याख्यान झाले व त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता उमरावती नगरपालिकेतर्फे बापूजींना मानपत्र देण्याचा भव्य समारंभ झाला. याही प्रसंगी लोकांची प्रचंड उपस्थिती होती.

महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचा पुण्यतिथि उत्सव.

सालाबादप्रमाणे याही वर्षी महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचा पुण्यतिथि उत्सव दि. २४ ते ३१ जानेवारी पावेतो राहुरामाच्या चाळीत श्री. दांडेकर मास्तर यांचे घरासमोरील मंडपात विविध कार्यक्रमांनिशी साजरा झाला होता.

प्रवचने, कीर्तन, पालखी वगैरे कार्यक्रम या उत्सवानिमित्त झाले होते.

सत्याग्रहींची सुटका : उमरावतीच्या तुरूंगातून सुमारे १५० सत्याग्रहींना त्यांची शिक्षेची मुदत संपण्यापूर्वीच, दि. २४ जानेवारीला सोडून देण्यात आले होते.

त्याच दिवशी शेठ पन्नालाल बन्सीलाल हे अपीलात निर्दोष ठरल्यामुळे, त्यांचीही उमरावती जेल मधून सुटका झाली होती. या बंधमुक्त

झालेल्यांचे अभिनंदनार्थ त्याच दिवशी सायंकाळी नेहरू मैदानातून मिरवणूक काढण्यात येऊन, नंतर त्याच ठिकाणी रात्री सेठ फत्तेचंद मांगीलाल यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. तीत शेठ पन्नालाल सिंघई व इतर सत्याग्रहींची भाषणे झाली होती.

तसेच दि. २७ जानेवारी रोजी श्री. पन्नालालजी सिंघई यांचा सत्कार शेठ फत्तेचंदजी यांचे अध्यक्षतेखाली बाहूबली व्यायाम शाळेत जैन समाजातर्फे करण्यात आला होता.

स्वातंत्र्य दिन : दि. २६ जानेवारी रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त नेहरू मैदानातून मिरवणूक काढण्यात आली व रात्री शेठ पन्नालाल सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली होती.

वानर सेनेचे कार्यालय : दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी डॉ. भोजराज यांच्या हस्ते वानर सेनेचे कार्यालयाचे उद्घाटन झाले.

स्त्रियांची जाहीर सभा : दे. भ. सुभाषचंद्र बोस यांचे अभिनंदनार्थ ३१ जानेवारी रोजी ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची जाहीर सभा भरली होती.

दे. भ. पं. मोतीलाल नेहरू यांचे निधन.

उमरावतीत हरताळ व प्रचंड मिरवणूक.

दे. भ. पं. मोतीलालजी नेहरू यांचे दि. ६ फेब्रुवारी रोजी लखनौ मुक्कामी दुःखद निधन झाले. ही वार्ता उमरावतीस येताच, त्याच दिवशी रात्री काँग्रेस कमेटीतर्फे दवंडी देऊन ता. ७ रोजी हरताळ व मिरवणुकीची घोषणा करण्यात आली होती.

दि. ७ फेब्रुवारी रोजी उमरावतीत हरताळ पाळण्यात आला. नगरपालिकेने आपल्या शाळा व कार्यालय बंद ठेवले होते. न्यू हायस्कूलही बंद होते. सायंकाळी नेहरू मैदानातून कै. पं. मोतीलालजी नेहरू यांच्या फोटोची मोटारीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सामील झालेले लोक बोडक्या डोक्यांनी होते.

ही मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने फिरून परत नेहरू मैदानावर आल्यानंतर तेथे डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून

पं. मोतीलालजी नेहरू.

तीत पंडितजींच्या गुणवर्णनपर अनेक वक्त्यांची भाषणे झाली व दुखवटयाचा ठराव पास करण्यात आला होता.

त्याचप्रमाणे दि. १६ फेब्रुवारी रोजी पं. मोतीलालजींचे श्राद्ध-दिनानिमित्त दुपारी १२ पासून हरताळ पाळण्यात येऊन सायंकाळी नेहरू मैदानातून मिरवणूक काढण्यात आली व रात्री डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन तीत डॉ. भोजराज व इतर वक्त्यांची भाषणे झाली होती.

काँग्रेसला देणगी : उमरावतीला खेळ करीत असलेल्या 'दी लिडींग स्टॉर पारशी थिएट्रिकल कंपनीने', दि. ८ फेब्रुवारी रोजी 'कृष्ण-कृष्ण' या नाटकाचा प्रयोग करून खर्च वजा जाता आलेले उत्पन्न रू. १९८-५० काँग्रेस कमेटीला देणगी दाखल दिले होते.

ह. भ. प. निजामपुरकरांना मानपत्र : उमरावतीच्या श्री सोमेश्वर मंदिरात गेल्या तीन वर्षापासून दरवर्षी महाशिवरात्री उत्सवानिमित्त हरिकीर्तन करीत असलेले, ह. भ. प. मुरलीधरबोवा उपासनी, निजामपूरकर ह्यांचा, त्यांच्या उत्कृष्ठ कीर्तन शैलीचा गौरव व्हावा म्हणून, त्यांना महाशिवरात्रीचे कीर्तनप्रसंगी ब्रम्हवृंदादि श्रोतृवर्गातर्फे संस्थेच्या चालकांनी संस्कृतमध्ये मानपत्र अर्पण केले होते. बोवांनीही या सन्मानाचे प्रसंगी समयोचित शब्दात श्रोतृवर्गाचे आभार मानून आनंद व्यक्त केला होता.

सुटका व सत्कार : उमरावतीचे दे. भ. राधाकिसनजी यांची उमरावती जेलमधून दि. १८ फेब्रुवारी रोजी सुटका झाली. आणि त्याच दिवशी रात्री साडे आठ वाजता, आकोल्याचे श्री. ब्रिजलालजी बियाणी व शेठ राधाकिसनजी यांचा सत्कार नेहरू मैदानावर शेठ मंगलचंदजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत करण्यात आला. या प्रसंगी डॉ. भोजराज व सौ. लीलाताई इत्यादी वक्त्यांची श्री. बियाणीजी आणि श्री. राधाकिसनजी यांच्या गौरवपर भाषणे होऊन शेवटी उत्तरादाखल श्री. बियाणीजी व शेठ राधाकिसनजी यांची भाषणे झाली होती.

महात्माजींच्या स्नुषा सौ. गांधी यांचे भाषण : दि. २१ फेब्रुवारी शनिवारी रात्री साडे आठ वाजता नेहरू मैदानात सेठ राधाकिसनजी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, महात्मा गांधी यांच्या स्नुषा सौ. सुशीलाबेन गांधी यांचे जाहीर भाषण झाले होते.

शिरगणती १९३१ : उमरावती शहर म्युनिसिपल हद्दीतील १९३१ च्या शिरगणतीचे आंकडे–

घरांची संख्या– ११,११३

स्त्रियांची संख्या– २१,१६४

पुरुष संख्या– २५,२५९

एकूण लोकसंख्या– ४६,४२३

बोरसद दिन : स्थानिक काँ. कमेटीतर्फे दि. २७ फेब्रुवारी रोजी 'बोरसद–दिन' पाळण्यात आला होता. त्यानिमित्त नेहरू मैदानातून सायंकाळी मिरवणूक काढण्यात येऊन, शहरातील प्रमुख मार्गाने फिरून ही मिरवणूक नेहरू मैदानात आल्यावर तेथे, महात्माजींच्या स्नुषा सौ. सुशीलाबेन गांधी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तींत डॉ. वऱ्हाडपांडे, कु. अंबूताई

साठे, श्रीमती टाकरखेडकर व श्रीमती उमाबाई मराठे यांची भाषणे झाली होती.+

उमरावतीची पाणी टंचाई : मध्यप्रांत–वऱ्हाडचे कायदे मंडळाच्या मार्च महिन्यात भरलेल्या बैठकीच्या वेळी, उमरावतीचे कौन्सिल सदस्य श्री. चौबळ यांनी उमरावती शहरातील पाणी टंचाईबद्दल प्रश्न विचारला होता. तेव्हा ना. जयस्वाल यांनी उत्तर दिले की, "पाणी पुरवठ्याचा प्रश्न म्युनिसिपॅलीटीच्या कार्यक्षेत्रात पडत असून सदर कमेटी याबाबत योग्य तो उपाय योजील अशी आशा आहे. पाण्याच्या दुर्मिळतेमुळे उमरावतीतील लोकांच्या दुर्दशेची सरकारला जाणीव आहे. उमरावती शहराकरिता पाणी पुरवठ्याच्या योजनेच्या सर्व्हेसाठी, मार्च १९३० पर्यंत ६५८५ रु. खर्च झाला असून १९३०–३१ मध्ये रु. २८००० खर्च होतील असा अंदाज आहे."

होलिकोत्सव : स्थानिक कौं. कमेटीचे विनंतीस अनुसरून, काही तुरळक अपवाद वगळता यंदाचा उमरावतीचा होलिकोत्सव (धूळवड) बिभत्सोद्गार किंवा रंग गुलाल अथवा धुळबडीचे प्रकार न करता साजरा झाला होता.

दि. ४ मार्च रोजी दुपारी चार वाजता, होळी सुधार मंडळातर्फे छत्रपुरी बालाजी मंदिरापासून भक्त प्रल्हादाच्या फोटोची मिरवणूक काढण्यात

+ **बोरसद दिन** : गुजरात मधील बोरसद या ठिकाणी जानेवारी १९३१ मध्ये श्रीमती लिलावतीबाई या महिलेला, अटकेत असतांना बेशुद्ध पडेपर्यंत पोलिसांनी मारहाण केली होती. या अमानुष प्रकाराचे निषेधार्थ तेथे सुमारे १५०० स्त्रियांनी मिरवणूक काढण्याचे ठरवून एकत्र जमल्या. त्यावेळी या स्त्रियांच्या जमावावर पोलिसांनी अत्यंत निर्दय व निंद्य असा लाठीहल्ला केला व ही मिरवणूक उधळून लावली होती. पोलिसांनी या प्रसंगी कित्येक स्त्रियांच्या पाठीवर, पोटावर, डोक्यावर, कमरेत आणि हातावर लाठ्या मारल्या. लहान मुलांना छड्यांनी झोडपून काढले. कित्येक स्त्रियांचे केस धरून त्यांच्या वक्षस्थळी गुद्दे मारण्यात आलेत व बिभत्स शिव्याहि दिल्या. या घटनेचे निषेधार्थ देशभर 'बोरसद-दिन' पाळण्यात येऊन जाहीर सभा भरल्या व मिरवणूकी काढण्यात आल्या होत्या.

आली होती. ही मिरवणूक शहरातून मुख्य मार्गाने फिरून स्वस्थळी आल्यानंतर तेथे विदेशी कापडाची होळी पेटविण्यात आली होती.

दि. ४ रोजीच वानर सेनेतर्फे, लहान मुलांच्या पळण्याच्या व सूत कातण्याच्या शर्यती आयोजित केल्या होत्या. दुसरे दिवशी या शर्यतीतील यशस्वी मुलांना शेठ राधाकिसनजी यांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात येऊन हा होलिकोत्सव साजरा करण्यात आला होता.

बंधमुक्त देशभक्तांचे स्वागत : 'गांधी–इर्विन' करारानुसार सुटलेल्या देशभक्तांचे स्वागत दि. ८ मार्च रोजी साडे आठ वाजता नेहरू मैदानावर भरलेल्या जाहीर सभेत करण्यात आले होते. सभेचे अध्यक्षस्थानी डॉ. भोजराज हे होते.

याप्रसंगी श्री. ओझरकर श्री. गोखले, श्री. भाऊसाहेब देशपांडे, श्री. मोहरीर, सौ. पटवर्धन, श्रीमती दुर्गाताई जोशी व श्री. तात्यासाहेब जरूडकर इ. वक्त्यांची भाषणे झाली होती.

गांधी–इर्विन करार : राजबंद्यांची सुटका.

दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ५ चे सुमारास गांधी–इर्विन करारानुसार[१] अमरावती तुरूंगातून खालील देशभक्त बंधमुक्त झाले होते.

१ : गांधी–इर्विन करार : हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लार्ड इर्विन आणि महात्मा गांधी यांचेत एक करार होऊन त्यास दि. ५ मार्च १९३१ रोजी लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीत मान्यता देण्यात आली होती व त्यानुसार सर्व राजबंदी मुक्त करण्याचा कार्यक्रम प्रांतिक सरकारांनी जाहीर केला होता. मध्यप्रांत कायदे मंडळाच्या दि. ६ मार्चच्या बैठकीत सरकारतर्फे हा करार वाचून दाखविण्यात आला व राजकीय कैदी-- प्रथम 'अ' व 'ब' वर्गाचे आणि नंतर 'क' वर्गाचे सोडण्याची घोषणा करण्यात आली होती. त्याच प्रमाणे काँग्रेस वर्किंग कमेटीने सर्व प्रांतिक शाखांना खालील सूचना केल्या होत्या.

"सविनय कायदेभंग व करबंदीची चळवळ थांबविण्यात यावी आणि ह्या बाबतीत कोणत्याही कायद्याचे किंवा नियमांचे उल्लंघन करण्यात

(पुढील पानावर)

डॉ. पातूरकर, दे. भ. संभाजीराव गोखले, दे. भ. अण्णासाहेब कलोती, दे. भ. ओझरकर वकील, दे. भ. तात्यासाहेब जरूडकर, दे. भ. गणेशराव देशमुख, डॉ. पिंपरकर, दे. भ. मोहरीर, दे. भ. भाऊराव देशपांडे, दे. भ. काणे वकील, दे. भ. मन्नालालजी, दे. भ. नानाजी खंडार, दे. भ. बालकिसनजी, दे. भ. नेरकर, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, श्रीमती दुर्गाताई जोशी, या १८ देशभक्तांना तुरुंगातून सुटल्यावर मोटारीतून सरळ काँग्रेस ऑफिसवर आणण्यात आले होते; तेथे जमलेल्या लोकांनी या बंधमुक्त पुढाऱ्यांचा व गांधीजींचा जयजयकार केला. काँग्रेस कमेटीतर्फे त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. नंतर सौ. पटवर्धन व श्रीमती दुर्गाताई यांनी आभार प्रदर्शनार्थ भाषणे केली होती.

दे. भ. डॉ. पटवर्धन : दे. भ. डॉ. पटवर्धन यांची तुरूंगातून सुटका होऊन ते रात्रीचे मेलने येणार म्हणून दि. ८ रोजी दवंडी देऊन

(मागील पानावरून)

येऊ नये. ब्रिटिश मालावरील बहिष्कार थांबविण्यात यावा. आणि त्या व्यवहारात पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे, परंतु मादक पेये, औषधी आणि सर्व परदेशी कापडाची व दारूची दुकाने ह्यांवरील बहिष्काराला परवानगी देण्यात यावी, जरूर तेथे ते सुरू करावे, परंतु हे पिकेटिंग चढाईचे असू नये व धाकदडपशा, अटकाव, लोकांस अडथळा व कोणत्याही सामान्य कायद्याचा भंग ह्या विरहीत ते असावे. जेथे जेथे वरील अटींचे पालन होणार नाही तेथे पिकेटिंग बंद ठेवण्यात यावे परदेशी माला ऐवजी स्वदेशी माल वापरण्या बाबतचा आग्रह सुद्धा चालू राहील. संघटितपणे मिठाचा कायदेभंग किंवा मिठागारावर हल्ले होणार नाहीत. परंतु ज्या ठिकाणी मीठ गोळा केले जाते त्या ठिकाणच्या लोकांना घरगुती कामा करिता किंवा स्थानिक विक्री करिता मीठ गोळा करण्याची अगर बनविण्याची बंदी आहे. अनधिकृत पत्रके बंद करण्यात यावी. शेतसारा देण्याची सक्ती करण्यात यावी आणि खेडी सोडून गेलेल्या लोकांनी परत यावे. आर्थिक दुःस्थितीमुळे ज्यांना सारा भरणे अशक्य असेल अशांनी तहकुबी किंवा माफी करिता अन्य मार्गाचा अवलंब करावा."

... ...

गव्हर्नर जनरल इन् कौसिलनेही लोकांच्या माहितीसाठी एक पत्रक प्रसिद्ध केले होते.

कॉं. कमेटी तर्फे जाहीर केले होते. म्हणून बडनेरा रोडवर सायंकाळी हजार दीड हजार लोक जमले होते. परंतु डॉ. पटवर्धन वर्धेला उतरून रात्री अकराच्या गाडीने येतील हे कळताच सर्व लोक निराशेने घराकडे परतले.

नंतर डॉ. साहेब रात्री ११ च्या गाडीने आले तेव्हा बडनेरा स्टेशनवर डॉ. भोजराज वगैरे मंडळींनी त्यांचे हार घालून स्वागत केले व तेथून ही मंडळी मोटारने उमरावतीस आली तेव्हा म्युनिसिपल कमेटीजवळ श्री शिवाजी व्यायाम शाळेतर्फे त्यांना पुष्पहार घालण्यात आले.

स्त्रियांची सभा : दि. ११ मार्च रोजी दुपारी ४ वा. ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची जाहीर सभा भरून सौ. पटवर्धन व सौ. दांडेकर ह्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

सुटका व सत्कार : दि. ११ मार्च रोजी दे. भ. रतनलालजी काळे व दि. १२ मार्च रोजी दे. भ. हरिहरराव देशपांडे हे तुरुंगातून सुटून आले. दि. १३ मार्च रोजी डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत श्री. संत, श्री. रतनलालजी काळे व श्री. हरिहरराव देशपांडे यांची भाषणे झाली. या प्रसंगी त्यांचा सत्कारही करण्यात आला होता.

सर्व राजबंदी सुटले : दिनांक १० मार्च रोजी दुपारी, रामटेकचे श्री. संत खेरीज करून, उमरावतीचे तुरुंगातून डॉ. पारसनीस, पं. कानडे शास्त्री इत्यादी सर्व राजकीय कैद्यांना बंधमुक्त करण्यात आले होते. श्री. संत ह्यांना दि. १३ रोजी सोडण्यात आले. सकाळी डॉ. सोमणही खांडवा जेलमधून सुटून आले होते. या सर्व सत्याग्रहींचा सायंकाळी मिरवणूक काढण्यात येऊन रात्री नेहरु मैदानावर श्री. ओझरकर वकील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

दे. भ. बामणगावकर : दे. भ. नानासाहेब बामणगावकर हे दि. १२ मार्च रोजीच शिवणी जेलमधून सुटले होते. परंतु वीर वामनराव दादासाठी ते दि. १४ पावेतो नागपुरला दोन तीन दिवस थांबून दि. १४ ला सायंकाळी मेलने ते उमरावतीस आले होते. दि. १४ लाच उमरावतीचे पहिले शिबिराधिपती श्री. त्र्यं. गं. जोशी व मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यातील काही कार्यकर्ती मंडळी उमरावतीला आली होती. रात्री डॉ. भोजराज

यांचे अध्यक्षतेखाली नेहरु मैदानावर भरलेल्या जाहीर सभेत दे. भ. त्र्यंबकराव जोशी व इतर कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

वीर वामनरावजींना सोडण्याचे बाबतीत प्रांतिक सरकार कशी कुचराई करीत आहे व वऱ्हाडचे पहिले डिक्टेटर ते असल्यामुळे ते सुटून येईतो वऱ्हाडपुरता तरी सत्याग्रहाचा लढा मिटला असे होणार नाही, असे उद्‌गार दे. भ. वामणगावकरांनी आपल्या भाषणात काढले होते.

सर्व राजबंदी सोडण्यात आले परंतु वीर वामनराव दादांची सुटका करण्याचे बाबतीत प्रांतिक सरकार दिरंगाई करीत होते म्हणून दि. १६ रोजी रात्री अमरावतीत नागरिकांची जाहीर सभा होऊन प्रांतिक सरकारचा निषेध करण्यात आला होता. शिवाय प्रांतिक सरकार व महात्मा गांधी यांना तारांही करण्यात आल्या होत्या.

अखेर दि. १७ रोजी त्यांची शिवणी जेलमधून सुटका होऊन दि. १८ मार्च रोजी ते अमरावतीस मेलने आले. तेव्हा बडनेरा स्टेशनवर सर्वश्री दे. भ. वामणगावकर, डॉ. भोजराज, श्री. मुळे, सौ. पटवर्धन, श्रीमती दुर्गाताई जोशी इत्यादी मंडळी त्यांचे स्वागतार्थ गेली होती. तेथून मोटारने ही सर्व मंडळी अमरावतीस दादांना घेऊन आली तेव्हा, बडनेरा रोडवर श्री. नाटेकर यांचे घरासमोर जमलेल्या हजारो लोकांनी वीर वामनरावजींचा प्रचंड जयजयकार केला. मिलीशिया तर्फे त्यांना सलामी देण्यात आली. नंतर तेथूनच मिरवणूकीला सुरुवात झाली. लोकांचा जमाव उत्तरोत्तर वाढतच होता व ठिकठिकाणी त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात येत होते. या प्रमाणे प्रमुख मार्गांनी ही मिरवणूक नेहरु मैदानावर अडीच तासांनी घेऊन पोचली. सभेचे व्यासपीठ पेशवाई थाटाने व शृंगारलेले होते. दे. भ. पन्नालालजी सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. निरनिराळ्या संस्थातर्फे वीर वामनराव यांना पुष्पहार घालण्यात आल्यावर पावसामुळे केवळ वीर वामनराव दादांनी आभाराचे थोडक्यात भाषण केल्यानंतर हा सत्कार सोहळा संपला होता.

मानपत्र : दि. २१ मार्च रोजी अमरावतीच्या मारवाडी समाजातर्फे शेठ पन्नालालजी यांच्या अध्यक्षतेखाली गणेश नाटकगृहात, वीर वामनराव जोशी व आकोल्याचे श्री. ब्रिजलालजी बियाणी यांना मानपत्रे देण्यात

आली होती. याप्रसंगी उत्तरादाखल केलेल्या भाषणात वीर वामनराव दादांनी 'वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचा अध्यक्ष या नात्याने, वऱ्हाड प्रांतातील सर्व काँग्रेस कमेटया गांधी-इर्विन समेटाच्या शर्तीनुसार वागतील' अशी घोषणा केली होती.

दि. २४ मार्च रोजी गुजराथी समाजातर्फे वीर वामनरावजी, डॉ. पटवर्धन, सौ. पटवर्धन, श्री. संभाजीराव गोखले ह्यांना मानपत्र देण्यात आले. त्याच दिवशी दुपारी ४ वा. ब्रम्हविद्या मंदिरात वीर वामनरावदादा, डॉ. पटवर्धन, श्री. बामणगावकर व श्री. संभाजीराव गोखले या बंधमुक्त पुढाऱ्यांचे सत्कारार्थ सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा झाली होती.

व्हॉईसरॉयना तार : सरदार भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि हरिकृष्ण यांना झालेल्या फांशीच्या शिक्षेचा फेरविचार व्हावा, अशा अर्थाची तार उमरावतीच्या विदर्भ युवक संघातर्फे व्हॉईसरॉयना दि. २१ मार्च रोजी करण्यात आली होती.

वऱ्हाड प्रांतिक कॉ. कमेटीची सभा : वऱ्हाड प्रांतिक कॉ. कमेटीच्या कार्यकारी मंडळाची सभा शनिवार दि. २१ मार्च रोजी उमरावती येथे डॉ. पटवर्धन यांच्या घरी भरली होती.

या सभेत कराची काँग्रेसला प्रांतिक कॉ. तर्फे सभासद निवडण्यात आले व आँ इं. कॉ. कमेटीवर सर्वश्री वीर वामनराव जोशी, श्री. बामणगावकर, श्री. बापूजी अणे, श्रीमती दुर्गाताई जोशी, श्री. गोळे, श्री. ब्रिजलालजी बियाणी व श्री. अंबुलकर यांची निवड करण्यात आली होती.

नंतर गांधी–इर्विन तहानुसार सत्याग्रह बंद करण्याबाबत सर्व लहान थोर युद्ध मंडळांना व काँग्रेस कमेटयांना आज्ञा करणे, वऱ्हाडच्या सत्याग्रहात कारावास भोगलेल्या व प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चळवळीला सहकार्य देणारांचे अभिवादन, सौ. पटवर्धन, सौ. दांडेकर, श्रीमती दुर्गाताई जोशी यांच्या कारावासाबद्दल अभिनंदन, त्याच बरोबर अन्य प्रकारे चळवळीत भाग घेणाऱ्या भगिनींचे, बालक–बालिकांचे अभिनंदन इत्यादी ठराव करण्यात आले होते.

वऱ्हाडच्या सत्याग्रह संग्रामात बुलढाण्याचे वकील, हुतात्मा श्री. सि. गं. गोरे, यावलीचे हुतात्मा पांचघरे यांना, त्यांनी केलेल्या आत्म

बलिदानाबद्दल त्यांचा गौरव व त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याबद्दल ठराव पास करण्यात आला. कै. पं. मोतीलालजी नेहरू यांचे बद्दल शोक प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

भगतसिंग, राजगुरु दिन : विदर्भ तरुण संघातर्फे दि. २३ मार्च रोजी रात्रौ नेहरु मैदानवर डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. त्र्यंबकराव जोशी, मौ. आझाद, श्री. पांडे, श्री. मराठे, सौ. पटवर्धन व श्री. हरिहरराव देशपांडे यांची भाषणे होती.

दि. २४ मार्च रोजी श्री. भगतसिंग–राजगुरु–सुखदेव ह्यांना द्यावयाची ठरविलेली फांशी देण्यात येऊ नये असे सुचविणारा ठराव पास करण्यात आला होता.

सरदार भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना फाँशी दिल्याची वार्ता दि. २५ ला सकाळी उमरावतीत कळल्या बरोबर, काँग्रेस कमेटीचे आज्ञेप्रमाणे शहरात हरताळ पाळण्यात आला. सायंकाळी या शहीदांच्या फोटोंची मोटारीतून बोडक्याने प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत सरकारच्या निषेधार्थ काळी निशाणे, त्याच प्रमाणे "भगतसिंग–राजगुरू–सुखदेव ह्यांच्या वैभवशाली मरणाचा आम्हास हेवा वाटतो." "मृत्यूच्या पैलतीरी परमात्मा आपल्या स्वागतार्थ तयार आहे." अशी घोष वाक्ये लिहिलेले फलक दिसत होते.

शहराच्या प्रमुख मार्गावरून ही मिरवणूक फिरून परत नेहरू मैदानावर आल्यानंतर वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन दे. भ. बामणगावकर, श्री. दिक्षित, श्री. सुखदेव आर्य, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, डॉ. भोजराज, कु. अंबूताई साठे व दे. भ. संभाजीराव गोखले यांची भाषणे झाली होती.

जाहीर व्याख्यान : सत्याग्रहाची तयारी : दि. १ एप्रील पासून सुरू होणाऱ्या राष्ट्रीय सत्याग्रहाची पूर्ण माहिती निवेदन करण्यासाठी दि. २९ रोजी, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन दे. भ. संभाजीराव गोखले व डॉ. भोजराज ह्यांची भाषणे झाली होती.

राष्ट्रीय सप्ताह : दि. ६ एप्रीलपासून राष्ट्रीय सप्ताहास सुरूवात झाली. त्यानिमित्त त्यादिवशी रात्रौ श्री. बामणगावकर यांचे अध्यक्षतेखाली

जाहीर सभा होऊन दे. भ. हरिहरराव देशपांडे व श्री. गुलाबराव बक्षी यांची भाषणे झाली.

या सप्ताहात सभा व्यतिरिक्त, काँग्रेसचे सभासद वाढविणे व खादी प्रचार, इ. कार्यक्रम करण्यात आले होते. जोग चौकात दररोज रात्री सभा भरत. गावातील बहुतेक सर्व पुढाऱ्यांची या सप्ताहात भाषणे होऊन दि. १३ एप्रील रोजी सप्ताहाचा समारोप झाला होता.

उमरावतीच्या विदर्भ नाट्य समाजाने दि. १८ एप्रील रोजी 'सन्याशाचा संसार' ह्या नाटकाचा प्रयोग गणेश नाट्य गृहात करून दाखविला व त्याचे उत्पन्न काँग्रेस कमेटीला मदत म्हणून दिले होते.

उमरावती नगरपालिकेची निवडणूक : उमरावती नगरपालिकेची त्रैवार्षिक निवडणूक जवळ आल्यामुळे शहरात निवडणुकीची धामधुम सुरू झाली. उमेदवाराकडून मतदारांची मतयाचना सुरू झाली. आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. मतदान होऊन दि. १६ एप्रील रोजी त्याचे खालील प्रमाणे निकाल लागले. वार्ड नं. १ श्री. खारकर व श्री. रामेश्वरजी अवस्थी, वार्ड नं. २ व वार्ड नं. ३ च्या निवडणुका वीर वामनराव दादांच्या व श्री. बामणगावकरांच्या मध्यस्तीने अविरोध झाल्या. त्याप्रमाणे वार्ड २ मध्ये श्री. वासुदेवराव देशपांडे व श्री. नारायणराव हिंगे, वार्ड नं. ३ मध्ये श्री. बाबूराव कलोती व श्री. यशवंतराव बागोकर हे निवडून आले. वार्ड नं. ४ श्री. मोतीलालजी व श्री. जनन्नाथजी, वार्ड नं. ५ श्री. इस्माईलखान व श्री. महंमदरफी, वार्ड नं. ७ श्री. देशपांडे वकील व श्री. हंबर्डे, वार्ड नं. ९ डॉ. जोशी, व श्री. रामय्या, वार्ड नं. ८ श्री. दामुअण्णा म्हैसाळकर व श्री. बलभीम शिंदे इत्यादी मंडळी निवडून आली होती. नंतर सरकारने सर्वश्री हिदायत अली, खा. ब. मीर तुराबअली खान, आर. ए. गायकवाड, आणि, शिवराम पाटील यांना नगरपालिकेवर सदस्य नेमले, त्यानंतर दि. १८ जुनं रोजी सिलेक्शन होऊन सर्वश्री चंदवासकर वकील, डॉ. मोहोड, श्री. गुलामअली व श्री. अब्दुल्ला हे निवडून आले होते. दि. ६ जुलै रोजी अध्यक्ष उपाध्यक्षांची निवडणूक होऊन सेठ मिनामलजी हे अध्यक्ष व श्री. हिरूरकर वकील हे उपाध्यक्ष निवडले गेले.

श्री. भीमराव हनुमंत पतकी यांचे निधन : १९३० च्या कायदे भंगाचे चळवळीचे वेळी, ताडी दुकानाच्या लिलावावरील पिकेटिंग चालू

असतांना, श्री. भीमराव हनुमंत पतकी या मुलाला (स्वयंसेवकाला) डी. एस्. पीं. नी पकडून जंगलात नेऊन बेदम चोप देऊन जंगलात एकटचाला सोडून दिले होते. तो भीमराव पतकी दि. १९ रोजी विहिरीत पडून मरण पावला होता.

जिल्हा कॉं. ची सभा : उमरावती जिल्हा कॉं. कमेटीच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. १७ एप्रील रोजी डॉ. पटवर्धन यांच्या घरी, डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली भरून नवीन निवडणूकी पावेतो, डॉ. भोजराज अध्यक्ष, सेठ पन्नालालजी व दे. भ. बामणगावकर हे उपाध्यक्ष आणि वैद्य त्र्यंबकराव जोशी हे चिटणीस, या शिवाय वीस लोकांची सभासद म्हणून निवड, जेथे जादा (प्यूनिटिव्ह) पोलिस बसविण्यात आले होते व लोकांवर अन्य प्रकारे जुलूम झाला त्या भागात दौरे, १९३० च्या युद्धाचा रिपोर्ट तयार करणे, विदेशी कापडावरील बहिष्काराचा पुरस्कार करणारे पत्रक काढणे, प्रत्येक तालुक्याचे ठिकाणी तालुका परिषदा व राजबंदी परिषदा भरविणे, युद्ध मंडळाचे हिशेब पूर्ण करणे इत्यादी कामे करण्यात आली होती व त्या प्रमाणे एक जाहीर पत्रक काढून कार्यकर्त्यांना निरनिराळ्या सूचना केल्या होत्या.

सेवादलाची मिरवणूक व सभा : उमरावतीच्या सेवादला तर्फे दि. २६ एप्रील रोजी सायंकाळी मिरवणूक काढली व रात्री जाहीर सभा होऊन तींत दे. भ. रतनलालजी काळे, दे. भ. वैद्य त्र्यं. गं. जोशी व दे. भ. नानासाहेब गोखले यांची भाषणे झाली. डॉ. सोमण हे अध्यक्षस्थानी होते.

राष्ट्रीय पक्ष : मध्यप्रांत कायदे कौन्सिलमध्ये असलेल्या वऱ्हाड राष्ट्रीय पक्षाची बैठक दि. १९ एप्रील रोजी श्री. रामरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. नीळकंठराव देशमुख यांचे बंगल्यावर भरली होती. कौन्सिलचे आंत व कौन्सलचे बाहेर या पक्षाच्या कार्याचे सिंहावलोकन करण्यात येऊन पुढील कार्याचे दिशेवर या सभेत विचार विनिमय करण्यात आला होता.

प्रभातफेऱ्या पुन्हा सुरू : मे १९३१ पासून पुन्हा प्रभात फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. दररोज सकाळी राष्ट्रीय गाणी म्हणत ह्या प्रभात फेऱ्या शहरातून निघत असत.

स्वातंत्र्य दिनोत्सव : विदर्भ युवक संघातर्फे दि. १० मे रोजी, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. जोग चौकात या कार्यक्रमासाठी तयार केलेल्या व्यासपीठावर महाराणा प्रताप, छत्रपति शिवाजी महाराज, बंडवाले नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व झांशीची राणी लक्ष्मीबाई या वीर रत्नांची छायाचित्रे पुष्पहार मंडित केली होती. सुरूवातीला नॅशनल मिलीशिया ने लष्करी सलामी दिली. जत्तरल आवारी यांच्या अटकेच्या निषेधाचा ठराव मंजूर झाला व नंतर दे. भ. नानासाहेब गोखले व डॉ. सोमण यांची जोरदार भाषणे व शेवटी वीर वामनराव दादांचे समारोपाचे भाषण होऊन 'वंदेमातरम्'च्या जयघोषात सभेचे काम संपले होते.

बालविवाह प्रतिबंधक मंडळ : शारदा ॲक्टचा उद्दिष्ट हेतू अंमलात आणण्यासाठी उमरावतीला 'बाल विवाह प्रतिबंधक मंडळ' स्थापन करण्यात आले होते. श्री. जयकृष्णपंत कुऱ्हाडे हे या मंडळाचे चिटणीस होते.

वसंत व्याख्यान मालेत 'वऱ्हाड' : पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेत दि. २० मे रोजी श्री. राघवेंद्रराव यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीचे माजी दिवाण श्री. रामरावजी देशमुख यांचे 'वऱ्हाड निजामास द्यावा काय ?' ह्या विषयावर व्याख्यान झाले होते.

वऱ्हाड प्रांतिक कॉ. कमेटी : वऱ्हाड प्रांतिक कॉ. कमेटीच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. २४ एप्रील रोजी दुपारी, डॉ. पटवर्धन यांच्या निवासस्थानी भरून, (१) कराची काँग्रेसच्या ठरावात, ऑ. इं. कॉ. कमेटीने विचारल्या प्रमाणे, सुधारणा सुचविण्यासाठी वीर वामनराव, दे. भ. बापूजी अणे, दे. भ. ब्रिजलाल बियाणी व श्रीमती दुर्गाताई जोशी यांची कमेटी नेमण्यात आली. (२) वऱ्हाडातील सर्व तालुका व जिल्हा कॉ. च्या निवडणूका करणे, (३) गतवर्षीच्या कायदाभंगाच्या चळवळीचा सविस्तर अहवाल तयार करणे. (४) युद्ध मंडळे बंद करून, काँग्रेस कमेटयांनी पूर्ववत कामाचा चार्ज घेणे. (५) वऱ्हाड प्रांतिक राजकीय परिषद भरविणे. (६) वैद्य त्र्यं. गं. जोशी यांचा दुय्यम चिटणीसचा राजिनामा मंजूर करून त्या जागी श्री. हरिहरराव देशपांडे यांची निवड इत्यादी कामकाज करण्यात आले होते.

एका रिटायर्ड पोलिस अधिकाऱ्याची उमरावती पाणी पुरवठ्याची योजना.

उमरावतीच्या पाणी टंचाईमुळे येथील नागरिकांचे हाल होत असल्याने, पाणी पुरवठ्याचे योजनेबाबत निरनिराळे लोक निरनिराळ्या योजना सुचवीत असत. त्या प्रमाणे रा. ब. महादेव प्रसाद शुक्ल नावाचे एका रिटायर्ड पोलिस अधिकाऱ्यांनी अशी योजना सुचविली होती की,

"उमरावती म्युनिसिपॅलिटीने वर्धा नदीवरून रेल्वेने पाणी पुरवठ्या बाबत रेल्वे बोर्डाशी संपर्क साधावा व रेल्वेने हे काम हाती घेऊन, दिवसातून चार खेपा धरल्यास एका गुडस् ट्रेन मधून २८००० मण या हिशेबाने ११२००० मण पाणी आणता येईल. आणि हे पाणी एका पैशाला एक पिपा या भावाने विकल्यास दररोजचे ३७५० रु. उत्पन्न होईल."

अर्थात यावर म्युनिसिपॅलिटीने विचार केला नाही असे दिसून येते. पण पाणी टंचाईवर लोक आपापले कल्पक विचार व्यक्त करीत हे ही यावरून दिसून येते.

उमरावतीच्या प्रभातफेऱ्या : इ. सन १९३१ च्या सुरुवाती पासुन उमरावतीत खालील मडळांच्या प्रभात फेऱ्या सुरु असत.

१ : अंबागेट बालसमाज प्रभातफेरी २ : गुलामपुरी मंडळ प्रभातफेरी ३ : भाजीबाजार मंडळ प्रभातफेरी. ४ : नेहरु मंडळ प्रभातफेरी. ५ : मुकुंद बाल समाज प्रभातफेरी. ६ : अंबादरवाज्यातर्फे मुलींचीहि प्रभातफेरी काढण्यात येई. या प्रभातफेऱ्यांत एकंदर १५० मुले भाग घेत असत. श्री. म. ज. गोखले हे या प्रभातफेऱ्यांचे नियंत्रक होते.

उमरावती लोकल बोर्ड : उमरावती लोकल बोर्डाच्या निवडणुकी मार्चमध्ये झाल्यानंतर, दि. १० एप्रील रोजी अध्यक्ष–उपाध्यक्षांची निवडणुक झाली. त्यांत श्री. गणेश शेषराव जाधव हे अध्यक्ष व श्री. बापुराव पाटील हे उपाध्यक्ष निवडून आले होते. जिल्हा बोर्डावरील प्रतिनिधि म्हणून श्री. गणेशराव देशमुख, श्री. खुशालराव पवार, श्री. ल. गो. देशपांडे व श्री. बाबूलाल दामूसा यांची निवड झाली होती.

व्याख्यान : दि. २२ मे रोजी रात्री जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, लोकनायक बापूजी अणे यांचे 'सद्यःस्थिती'

वर जाहीर व्याख्यान झाले. "गेल्या वर्षभर आठ-दहा महिने सतत सत्याग्रहाचा प्रचंड लढा लढविल्यावर, जो गांधी-इर्विन करार घडून आला त्यामुळे हिंदुस्थानचे असे कोणते हित साधले गेले आहे?" या विषयावर बापूजींनी मुद्देसुद विचार मांडले व हा लढा देशाच्या हिताचा कसा आहे हे पटवून दिले होते.

मुक्त राजबंदी परिषद : दि. ७ जुन रोजी, सकाळी ८ वा. गणेश नाटकगृहात उमरावती तालुक्यातील 'मुक्त राजबंदींची परिषद' खामगावचे डॉ. पारसनीय यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती. परिषदेचे स्वागताध्यक्ष शेठ राधाकिसनजी हे होते.

या परिषदेला तालुक्यातील २०० मुक्त राजबंदीपैकी १३५ राजबंदी हजर होते. तसेच दर्यापूर, एलिचपूर, चांदूर इ. तालुक्यातील राजबंदी परिषदेला आले होते.

सुरुवातीला राष्ट्रगीत होऊन, कायदेभंगाच्या चळवळीची व प्रतिपक्षाकडून झालेल्या अत्याचारांची थोडक्यात माहिती सांगण्यात आली व स्वागताध्यक्षांनी सर्वांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यानंतर दे. भ. हरिहरराव देशपांडे यांनी, चाळीस दिवस पर्यंत धीरोदात्तपणे अंधारकोठडीची शिक्षा भोगणारे बाळ सत्याग्रही श्री. महादेव कोकाटे ह्यांची सर्वाना ओळख करून दिली व त्यांचा सत्कार करण्यात आला. नंतर अध्यक्षांनी आपले वक्तृ-वपूर्ण असे एक तास भाषण केले.

त्यानंतर हुतात्मा पांचघरे, हुतात्मा भाऊगीर गोसावी व हुतात्मा सिद्धेश्वरपंत गोरे यांच्या बलिदानाबद्दल गौरवप्रदर्शक व कै. शालीग्राम व कै. पतकी यांचे निधनाबद्दल दुःख प्रदर्शक व सध्याच्या शांततेचे काळात आपली संघटणा करून, विधायक कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्याविषयी आणि वेळ पडल्यास काँग्रेसची आज्ञा होताच पुन्हा लढ्यात सामील होण्याविषयी राजबंदीना विनंती करणारा वगैरे चार ठराव मंजूर करण्यात आले होते.

उमरावती तालुका राजकीय परिषद : दि. ७ जुन रोजीच सकाळी साडे नऊ वाजता 'उमरावती तालुका राजकीय परिषद,' जोग चौकात तोरणे, पताका इत्यादींनी श्रृंगारलेल्या भव्य पटांगणात यवतमाळचे डॉ. टेंभे

यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती. स्वागताध्यक्ष वैद्य पं. दा. मुळे हे होते.

या परिषदेला तालुक्यातील सर्व लहान थोर कार्यकर्ते तसेच डॉ. पारसनिस, श्री. विठ्ठलराव कोडें, यवतमाळचे श्री. रामभाऊ जोशी, परतवाड्याचे डॉ. पिंपरकर व श्री. काणे वकील, चांदूर चे श्री. भगवंतराव जोशी, शंकरराव वातकर, म्हसदकर इ. मंडळी उपस्थित होती.

प्रारंभी 'वंदेमातरम्' व 'जनहो दास्यबेडि तोडा' ही राष्ट्रगीते होऊन नंतर श्री. गिरगावकर यांनी परिषदेचा कार्यक्रम समजाऊन सांगितला. त्यानंतर स्वागताध्यक्षांचे व नंतर अध्यक्षांचे भाषण होऊन, निरनिराळे पाच ठराव मंजूर करण्यात आले होते.

उमरावती जिल्हा व तालुका कॉंग्रेस कमेटी : इ. सन १९३१–३२ सालासाठी जुनच्या पहिल्या आठवड्यात, उमरावती जिल्हा कॉंग्रेस व तालुका कॉं. कमेटींच्या निवडणुका पार पडल्या. त्यानुसार–उमरावती जिल्हा कॉं. कमेटी : अध्यक्ष, दे. भ. डॉ. भोजराज, उपाध्यक्ष, दे. भ. बामणगावकर, दे. भ. आबासाहेब ओझरकर व दे. भ. पन्नालालजी सिंघई, चिटणीस – वैद्य त्र्यं. गं. जोशी व श्री. गिरगावकर. उमरावती तालुका कॉं. कमेटी : अध्यक्ष, दे. भ. गणेशराव देशमुख (आसरा), उपाध्यक्ष, दे. भ. मंगलचंद बिसोरीलाल, चिटणीस – दे. भ. सदाशिव खुशालराव पांडे, बडनेरा.

बॅरि. रामराव देशमुख यांचे गांधीजीस पत्र : "हिंदुस्थानच्या भावी फेडरेशनच्या राज्यघटने विषयीचा प्रश्न निकालात काढत असताना, आपण वऱ्हाडच्या जनतेला अत्यंत महत्त्वाचा वाटत असलेला, वऱ्हाडचे दर्जा संबंधीचे प्रश्नाकडे आस्थापूर्वक लक्ष द्यावे अशी विनंती आहे ..... शक्य असल्यास गोलमेज परिषदेला ह्या प्रश्नाचे खास सल्ला मसलतीसाठी श्री. बापूजी अणे यांना बरोबर घेऊन जावे." अशा आशयाचे पत्र, उमरावतीचे बॅरि. रामराव देशमुख यांनी कॉंग्रेसचे सर्वाधिकारी या नात्याने महात्मा गांधी यांना जुन महिन्यात पाठविले होते.

या पत्रास महात्मा गांधींनी उत्तर पाठवून, या प्रश्नाचा सहानुभूती पूर्वक विचार होईल असे आश्वासन देऊन, लंडनला जाण्याचे ठरल्यास या

प्रकरणाचा अभ्यास करीन, असे कबूल केले होते. त्याप्रमाणे वऱ्हाड सर्वपक्षीय परिषदेने वऱ्हाडचे प्रश्नासंबंधी एक नोट तयार करून तो गांधीजींना सादर केली होती.

उमरावती जिल्हा बोर्ड : जिल्हा बोर्डाच्या अध्यक्ष–उपाध्यक्ष–पदाची निवडणूक दि. १८ जुन रोजी होऊन श्री. वाटाणे हे अध्यक्ष व श्री. चौबळ हे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले होते.

फाशीच्या शिक्षेचा निषेध : दि १८ जुन १९३१ रोजी सायंकाळी ७ वाजता गणेश थिएटरात वीर वामनराव ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत, कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या निधनाबद्दल दुखवटयाचा व लाहोरास पंजाब विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभ प्रसंगी गव्हर्नरावर गोळया झाडल्याचे आरोपावरून श्री. हरिकिसन यांस जी फांशीची शिक्षा देण्यात आली व त्याला फांशी दिल्यानंतर त्याचे प्रेत त्याच्या आप्तेष्टांच्या हवाली न करण्याच्या कृत्याच्या निषेधाचा ठराव पास करण्यात आला होता. या ठरावावर श्री. हरिहरराव देशपांडे यांचे फारच उद्‌बोधक असे भाषण झाले होते.

हिंदुस्थानी सेवादल : उमरावतीत हिंदुस्थानी सेवादलाची स्थापना करण्यासाठी, दि. २७ जुन रोजी, डॉ. पटवर्धन यांचे निवासस्थानी कार्यकर्त्यांची सभा भरून, उमरावती जिल्हा हिंदुस्थानी सेवादलाचे बोर्डावर खालील सभासद निवडण्यात आले होते.

दे. भ. डॉ. सोमण, दे. भ. रतनलालजी काळे, दे. भ. हरिहरराव देशपांडे, व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर.

उमरावती तालुक्यातर्फे दे. भ. अण्णाराव जोशी, मोर्शीतर्फे दे. भ. यादवराव बापूजी फरकाडे, एलिचपूरतर्फे दे. भ. बाळकृष्ण सीताराम बरवे वकील, चांदूरतर्फे दे. भ. रघुनाथराव वातकर, दर्यापूरतर्फे दे. भ. चिकाटे मास्तर.

यातून पदाधिकारी खालील प्रमाणे निवडण्यात आले. अध्यक्ष–डॉ. सोमण, सेक्रेटरी–श्री. रतनलालजी काळे, जॉ. सेक्रेटरी–श्री. अण्णाराव जोशी.

अनावरण समारंभ : २८ जुन रविवार रोजी, जिल्हा कॉ. कमेटीचे कार्यालयात दे. भ. बापूजी अणे यांच्या हस्ते कै. वामनराव मोहरीर यांच्या फोटोचे अनावरण करण्यात आले होते.

वऱ्हाड प्रांतिक कॉं. कमेटी : वऱ्हाड प्रांतिक कॉं. कमेटीच्या नव्या निवडलेल्या व को-ऑप्ट. केलेल्या सभासदांची साधारण सभा, दि. २८ जुन रोजी उमरावती येथे गणेश नाटक गृहात दुपारी ४ वा. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सभेत पुढील अधिकारी व कार्यकारी मंडळ निवडण्यात आले होते.

अध्यक्ष-वीर वामनराव जोशी, उपाध्यक्ष-डॉ. पारसनीस (खामगाव) व श्रीमती दुर्गाताई जोशी (आकोला), चिटणीस-श्री. ब्रिजलालजी बियाणी व श्री. हरिहरराव देशपांडे, खजिनदार-वैद्य पंढरीनाथ दामोधर मुळे व सभासद-सर्वश्री डॉ. पटवर्धन, पं. कानडेशास्त्री, श्री. दादासाहेब गोळे, श्री. अब्बासअली बोहरा, श्री. कृष्णराव गारडगावकर, लो. ना. बापूजी अणे.

अध्यक्षांनी नेमलेले सदस्य डॉ. भोजराज, श्री. रतिलालजी, श्री. संभाजीराव गोखले, श्री. खुशालचंद कापडिया, श्री. मोतीलालजी केला. त्याच प्रमाणे ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीवर नेमलेले सदस्य-

वीर वामनराव जोशी, लोकनायक बापूजी अणे, श्री. पन्नालालजी सिंघई, श्री. ब्रिजलालजी बियाणी, श्री. बापट वकील यवतमाळ, डॉ. पारसनिस व श्रीमती दुर्गाताई जोशी.

वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचे घटनेला तपासून दुरस्ती सुचविण्या-साठीही एक कमेटी नेमण्यात आलो होती. सभेला ५० सभासद उपस्थित होते.

जंगल सत्याग्रहाचा स्मृति दिन : स्थानिक कॉंग्रेस कमेटीचे विद्यमाने जंगल सत्याग्रह स्मृति दिनानिमित्त, दि. १० जुलै रोजी सायंकाळी झेंडावंदन व त्यानंतर गणेश नाटकगृहात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली डॉ. पटवर्धन यांचे 'सत्याग्रहाचे युद्धशास्त्रात स्थान' या विषयावर व्याख्यान झाले होते.

स्त्रियांची सभा : दिनांक १९ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता ब्रम्हविद्या मंदिरात स्त्रियांची सभा भरून सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांचे 'स्वदेशीचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले होते.

जाहीर व्याख्याने : दिनांक २३ जुलै रोजी गणेश नाटक गृहात, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे

विद्यमाने, श्री. ह. वा. देशपांडे यांचे 'बहिष्कार' या विषयावर व दि. २६ जुलै रोजी श्री. बामणगावकर यांचे 'काँग्रेस व अल्प संख्यांक' या विषयावर जाहीर व्याख्याने झाली होती.

सामाजिक विषयांवर व्याख्याने : वनिता समाजातर्फे दर महिन्याला एक सामाजिक विषयावरील व्याख्यान माला सुरू करण्यात आली होती. त्यानुसार वीर वामनराव जोशी यांचे सामाजिक विषयावरील पहिले व्याख्यान झाले. पुढील व्याख्यान सौ. विमलाबाई देशमुख यांचे ठरले होते.

टिळक पुण्यतिथी : लोकमान्य टिळकांचे अकराव्या पुण्यतिथी निमित्त, जिल्हा काँग्रेस कमेटी तर्फे दि. ३० जुलै पासून लोकमान्य सप्ताह पाळण्याचे ठरवून ह्या सप्ताहात दररोज सायंकाळी साडे सहा वाजता प्रसिद्ध वक्त्यांची लोकमान्यांचे गुणगौरवपर भाषणे आयोजित केली होती. उच्चासनावरील लो. टिळकांच्या पुष्पहारांनी सुशोभित फोटो समोर सातही दिवस व्याख्याने झाली व दररोज व्याख्यानाला प्रचंड प्रमाणात लोकसमुदाय हजर राहत असे.

पं. दिनकरशास्त्री कानडे, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, श्री. बापट वकील, श्री. बाबासाहेब खापर्डे, व डॉ. भोजराज यांची व्याख्याने झाली होती.

गणेश वाचनालय : वाचनालयाच्या कार्यकारिणीची सभा होऊन, अध्यक्ष श्री. अण्णासाहेब कलोती वकील, उपाध्यक्ष श्री. गोविंददास छबीलदास व चिटणीस : श्री. दे. प्र. पांडे आणि श्री. दशरथ ह्यांची निवड झाली होती.

दि. ३० जुलै रोजी गणेश वाचनालयात भरलेल्या सभेतच एक वक्तृत्वोत्तेजक मंडळ स्थापन करण्यात आले. डॉ. मशानकर हे या मंडळाचे अध्यक्ष होते.

जाहीर सभा : दि. ७ ऑगस्ट रोजी सायंकाळी गणेश नाटक गृहात दे. भ. संभाजीराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, मुंबईस राष्ट्रीय मुसलमान पक्षाने बोलाविलेल्या सभेत गुंडांनी केलेल्या अत्याचाराचा निषेध करण्यात आला होता. या सभेत श्री. जोशी, मौ. आझाद इ. वक्त्यांची भाषणे झाली होती.

राम रहिम : माता खिडकी जवळ उघडण्यात येणाऱ्या नियोजित वीर व्यायाम शाळेचे मदतीसाठी श्री लक्ष्मीकांत मंडळातर्फे दि. ८ ऑगस्ट रोजी 'संगीत रामरहिम' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला होता. त्यातील स्थानिक नटास श्री. बामणगावकर यांचे हस्ते पदके देण्यात आलीत. व्यायाम शाळेला शेठ मिनामलजी यांनी रु. १०१ ची देणगी दिली होती.

उमरावतीत गव्हर्नर : मध्यप्रांताचे गव्हर्नरांचा उमरावतीत आठ दिवस मुक्काम होता. या मुक्कामात त्यांनी अनेक बिन सरकारी प्रतिष्ठित गृहस्थांच्या भेटी घेतल्या व त्यांचेशी वऱ्हाडचे प्रश्नावर चर्चा केली होती. वऱ्हाड विभक्त व्हावा यासाठी, श्री. एस्. वाय्. पाटील. रा. सा. कोरडे, श्री. अमृतकर, डॉ. काणे, शेठ मिनामलजी, श्री. चौबळ इत्यादींचे शिष्ठ मंडळाने गव्हर्नरांची भेट घेतली व संयुक्त घटनेत वऱ्हाडच्या हक्काची मागणी केली व कायदे करण्याचा व आर्थिक व्यवस्थेचा हक्कही मागितला होता.

ना. गव्हर्नरांनी या मुक्कामात किंग एडवर्ड कॉलेज, मराठी व उर्दू हायस्कूल, इरविन हॉस्पिटल इ. संस्थांना भेट दिली. जिल्हा बोर्ड व रिफॉर्म क्लबने गव्हर्नरांना ॲट्होम दिला होता.

निषेध : दि. १४ ऑगस्ट रोजी वफ्द ॲक्टचे निषेधार्थ बोहरा समाजातर्फे हरताळ पाळण्यात येऊन, दुपारी तीन वाजता काळचा निशाणासह मिरवणूक काढण्यात आली होती. सायंकाळी बोहरा बेरियल ग्राऊंडवर शेठ अल्लीभाई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत काही वक्त्यांची निषेधपर भाषणे झाली होती.

जाहीर सभा : दि. १५ आगस्ट रोजी सायंकाळी वीर वामनराव दादा यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, गोलमेज परिषदेला महात्माजींना न पाठविण्याबाबत काँग्रेसने दिलेल्या निर्णयाबद्दल श्री. हरिहरराव देशपांडे, श्री. बामणगावकर, श्री. अळतेकर ह्यांची माहितीपूर्ण अशी भाषणे झाली होती.

वेरावळ अत्याचाराचा निषेध : जुनागढ संस्थानातील वेरावळ या गावी, गेल्या महिन्यात मुसलमान गुंडांनी केलेल्या अत्याचाराचे निषेधार्थ दि. १८ आगस्ट रोजी श्री. जोग एम्. एल्. ए. यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, वक्त्यांची अत्याचाराचे निषेधपर भाषणे झाली होती.

झोटिंग पाच्छाई : शेक्सपिअरच्या 'मेझर फॉर मेझर' चे, वीर वामनराव जोशी यांनी केलेले रुपांतरित नाटक 'झोटिंग पाच्छाई' या नव्या नाटकाचा पहिला प्रयोग दि. १९ ऑगस्ट रोजी नाट्यकला प्रसारक संगीत नाटक मंडळीने उमरावतीत रंगभूमिवर सादर केला होता. नाटकाला चिक्कार गर्दी होती.

समेट भंग : दि. २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी डॉ. पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून डॉ. भोजराज, एलिचपूरचे श्री. धोंडोपंत देशपांडे व श्री. हरिहरराव देशपांडे यांची सरकारकडून झालेल्या समेट भंगासंबंधी भाषणे झाली होती.

सौ. लक्ष्मीबाई राजवाडे : सौ. लक्ष्मीबाई राजवाडे, ग्वालहेर यांचे दि. २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात लेडी सौ. यशोदाबाई उर्फ आवकासाहेब जोशी यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय महिला परिषद' या विषयावर स्त्रियांकरिता जाहीर व्याख्यान झाले होते. व्याख्यानाला सुमारे चारशे स्त्रिया उपस्थित होत्या. स्त्री शिक्षण व स्त्रियांची सामाजिक उन्नती ह्या दोन विषयापुरते या महिला परिषदेने आपले कार्यक्रम सध्या मर्यादित केले असले तरी, परिषदेच्या सदस्य असलेल्या स्त्रियांना स्वतंत्रपणे राजकीय कार्यात भाग घेण्यास प्रतिबंध नाही. असे सांगून त्यांनी शारदा कायद्यास धाब्यावर बसविण्याची जी काही ठिकाणी अलिकडे प्रवृत्ति दिसून येते तीस आळा घालण्याबद्दल स्त्री-समाजाकडून खटपट होणे जरूर आहे असे सांगितले होते.

जाहीर सभा : दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, महात्माजींच्या विलायत प्रयाणासंबंधी डॉ. पटवर्धन, श्री. बामणगावकर आणि श्री. हरिहरराव देशपांडे यांची भाषणे झाली होती.

नवीन राष्ट्रध्वज : ऑल इंडिया काँ. कमेटीने मान्यता दिलेल्या नव्या राष्ट्रीय ध्वजाचा, राष्ट्रध्वजवंदन समारंभ दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वा. वीर वामनराव जोशी यांच्या हस्ते जोग चौकात थाटाने साजरा झाला.

शहर म्युनिसिपॅलिटीच्या कचेरीवरही वीर वामनराव दादांचे हस्ते नवीन राष्ट्रध्वजारोपण करण्यात आले होते. या नवीन ध्वजाला केसरी,

पांढरा व हिरवा अशा रंगाचे पट्टे असून, मधल्या पांढऱ्या पट्टीवर निळ्या रंगात, उजवीकडून डावीकडे असे चित्र होते.

वऱ्हाड प्रांतिक कॉं. कमेटी : व. प्रां. कॉं. कमेटीच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. ३० आगस्ट रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली उमरावती येथे भरली होती. सभेला १७ पैकी १२ सभासद हजर होते.

विदेशी कापडावरील बहिष्कार व पिकेटिंगचे बाबतीत ऑ. इं. कॉं. वर्किंग कमेटीचे आज्ञेप्रमाणे यथाशक्ती अंमल बजावणी करावी असे ठरविण्यात आले होते. त्याच प्रमाणे जातीय एकता ह्या बाबतीतील सर्वाधिकारी डॉ. पटवर्धन यांना, स्वयंसेवक संघटणेचे सर्वाधिकारी श्री. ब्रिजलालजी बियाणी यांना व कॉंग्रेस संस्था संघटित करणे, द्रव्यनिधि मिळविणे आणि कार्यालयासंबंधीचे सर्व अधिकार वीर वामनराव दादांना देण्यांत आले होते. बंगाल जलपीडितांना मदत करण्याची विनंती करणारा ठरावही मंजूर करण्यात आला होता.

महिला परिषदेची प्रांतिक शाखा : वनिता समाजातर्फे दि. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची सभा भरून, अखिल भारतीय महिला परिषदेच्या प्रांतिक शाखेची स्थापना करण्यात आली.

लेडी सौ. यशोदाबाई जोशी ह्या अध्यक्ष व सौ. कालिंदीबाई घाटे ह्या चिटणीस निवडण्यात आल्या होत्या.

अस्पृश्यता निवारण मंडळ : प्रांतिक कॉं. कमेटीच्या नव्या योजने प्रमाणे, अस्पृश्यता निवारण करण्यासाठी अस्पृश्य पुढाऱ्यांची कॉंग्रेस कमेटीत सभा भरून, कॉं. कमेटीच्या विद्यमाने एक जिल्हा मंडळ निर्माण करण्यात आले होते. जिल्हा कॉं. अध्यक्ष हे त्या मंडळाचे अध्यक्ष आणि चिटणीस श्री. दिक्षित वकील, श्री. भटकर व श्री. लक्ष्मणराव मेश्राम हे होते. सर्वश्री ओगले, नाईक, गाडगे व हुसेन हे अस्पृश्य पुढारी कार्यकारी मंडळावर निवडले होते.

म्यु. थर्ड इयर ट्रेन्ड शिक्षक संघाचा द्वितीय वाढदिवस समारंभ. दि. ६ सप्टें. रोजी सकाळी, म्यु. ए. व्हि. स्कूलचे इमारतीत दे. भ. बामणगावकर यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला होता.

या समारंभाला गावातील प्रमुख मंडळी हजर होती. त्यात वीर वामनराव दादा, ना. दादासाहेब खापर्डे, श्री. हरिहरराव देशपांडे, श्री. खरे, श्री. अण्णासाहेब ओक, श्री. चंदवासकर, डॉ. भोजराज, नगरपालिकेचे अनेक सभासद व इतर नागरिक उपस्थित होते.

प्रारंभी राष्ट्रगीत झाल्यानंतर, संघाचे चिटणीस श्री. वाघ यांनी अहवाल वाचून दाखविला. नंतर म्यु. शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. चंदवासकर व मराठी नार्मल स्कूलचे प्रिंसिपॉल श्री. ओक, यांची समयोचित भाषणे झाली. शेवटी अध्यक्ष श्री. बामणगावकरांचे भाषण होऊन समारंभ संपला होता.

यतींद्रनाथ दिन : दि. १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी दे. भ. संभाजीराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जतींद्रनाथ दिनानिमित्त भरलेल्या जाहीर सभेत श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. हरिहरराव देशपांडे, व सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे झाली होती.

मुलींचा मेळा : गणपती उत्सवासाठी अंबागेटचे आतील श्री. माधवराव अग्निहोत्री यांनी मुलींचा मेळा काढला होता. या मेळ्याचे कार्यक्रम शहरातील अनेक प्रमुख गणेशोत्सवात झाले होते.

गणेशोत्सव १९३१ : उमरावतील गणेशोत्सवात, निरनिराळ्या मंडळांच्या कार्यकमात, कीर्तन, प्रवचनाव्यतिरिक्त, ना. दादासाहेब खापर्डे, श्री. बाबासाहेब खापर्डे, स्वामी शिवानंद, डॉ. पटवर्धन, डॉ. सोमण, वीर वामनराव जोशी, श्री. हरिहरराव देशपांडे, श्री. अण्णासाहेब कलोती, श्री. संभाजीराव गोखले, सौ. पटवर्धन, श्री. प्यारेलालजी सेवक, सर मोरोपंत जोशी, बॅरि. रामराव देशमुख, श्री. वाळके यांची भाषणे झाली होती.

अस्पृश्यता निवारण : दि. १७ सप्टेंबर रोजी वडाळी येथील सार्वजनिक गणपतीसमोर श्री. विठ्ठलराव शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. भवानराव मिरगी व श्री. पुंजाप्पाजी ह्यांची 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर भाषणे झाली व नंतर 'सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये अस्पृश्यांना स्पृश्य हिंदु इतकाच भाग घेऊ द्यावा' अशा अर्थाचा ठराव मंजूर होऊन लगेच त्याची अंमलबजावणीही सुरू झाली होती. गुलाल, बुक्का लावणे,

गणपतीच्या आरतीनंतर पुष्पांजली अर्पण करणे वगैरे सर्व गोष्टी सर्व मिळूनच पार पडत असत. एकाच विहिरीवर स्पृश्य अस्पृश्य पाणी भरतात. येत्या गांधी जयंती सप्ताहात वडाळी वस्तीवर श्री. विठ्ठलराव शेंडे वगैरे मंडळी खादी विक्रीचे कार्य करणार आहेत.

चलन : ज्ञान प्रसारक मंडळाचे विद्यमाने दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता ब्रम्हविद्या मंदिरात रा. ब. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली प्रिंसिपॉल भाटे (सांगली) यांचे 'चलन' या विषयावर जाहीर भाषण झाले होते. त्यांनी आपले भाषणात चलन पद्धतीचा इतिहास सांगून, 'आजच्या प्रमाणे पुन्हा पुन्हा उद्‌भवणारी ही आर्थिक अडचण कायमची नाहीशी करण्यासाठी, सर्व राष्ट्रात द्विदल चलन पद्धती सुरू असणे आवश्यक आहे' असे प्रतिपादन केले होते.

प्रिं. भाटे हे किंग एडवर्ड कॉलेजच्या गॅदरिंगसाठी उमरावतीस आले होते.

हिजली हत्याकांडाचा निषेध : दि. २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हिजली हत्याकांडाचे निषेधार्थ जाहीर सभा भरून तीत डॉ. सोमण, श्री. बामणगावकर इत्यादि वक्त्यांची भाषणे झाली होती.+

डॉ. ॲनीबेझंट यांचा जन्मदिन : प्रख्यात थिऑसॉफिस्ट डॉ. ॲनी बेझंट बाईच्या ८५ वा जन्मदिनोत्सवानिमित्त उमरावतीच्या थिऑसॉफिस्ट सोसायटीचे विद्यमाने, दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वा. ब्रम्हविद्या मंदिरात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, डॉ. पटवर्धन व सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचो डॉ. बेझंट बाईचे चरित्रावर भाषणे झाली होती.

पेंडके सावकारांचा हृदयद्रावक मृत्यू : एका काळचे धनाढ्य सावकार म्हणून उमरावतीत ख्यातनाम असलेले श्री. केशवराव नाईकजी पेंडके ह्यांचा दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ३ वाजता, त्यांच्या राहत्या घराचा इमला त्यांच्या अंगावर पडून ते त्यात दबल्यामुळे अत्यंत हृदयद्रावक

+ परिशिष्ट क्र. १ पहा.

असा त्यांचा अंत झाला होता. उमरावतीत जुन्या शहरांतील 'पेंडके गल्ली' यांचेच नावाने ओळखल्या जाते.

गांधी सप्ताहाचा समारोप : उमरावतीतील गांधी सप्ताहाचे सर्व कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले व दि. ८ आक्टोंबर रोजी गणेश नाटक गृहात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली समारोपाची जाहीर सभा होऊन तीत श्री. बामणगावकर, श्री. संभाजीराव गोखले इत्यादि नेत्यांची भाषणे झाली होती.

अस्पृश्यता निवारण : दि. १२ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वा. माताखिडकी जवळील पटांगणात डॉ. पटवर्धन यांचे 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले होते.

वऱ्हाडच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन : ".....एकंदर परिस्थितीचा विचार केला तर, वऱ्हाडातील एकंदर सुखवस्तुपणा जाऊन एकीकडे मजुर व दुसरीकडे एकादा लक्षाधिश वा कोटयाधिश अशी परिस्थिती दिसू लागली आहे.....सरकारने दुष्काळाची कामे सुरू करून बेकारीस आळा घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण वऱ्हाडातील बेकारीत सुशिक्षित व अशिक्षित ह्या सर्वांचा भरणा आहे....." असे विचार स्थानिक वृत्तपत्रातून आक्टोबर मध्ये प्रकट होऊ लागले होते. वऱ्हाडच्या (उमरावती त्यात आहेच) आर्थिक परिस्थितीतील परिवर्तनाची ही चाहूल होय.

जिल्हा सत्याग्रहाचा इतिहास जप्त : जिल्हा काँग्रेस कमेटीने १९३० च्या कायदेभंगाचे काळातील सत्याग्रहाचा अहवाल "अमरावती जिल्ह्यातील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास" या नावाने छापून प्रसिद्ध केला होता. परंतु दि. १९ आक्टोबर रोजी दुपारी ४ चे सुमारास पोलिसांनी जिल्हा काँ. कमेटीचे ऑफिसमध्ये प्रवेश करून सदर पुस्तकांच्या ३१४ प्रति जप्त केल्या होत्या.

विदेशी मालावर निरोधन : उमरावती नवरात्रोत्सवाचे यात्रेतील परदेशी वस्तूंच्या मालांचे दुकानावर काँग्रेस कमेटीतर्फे निरोधन सुरू केले होते व त्यास चांगलेच यश मिळू लागले होते. परदेशी खेळण्यांची विक्री बंद झाली होती.

कोनशिला समारंभ : दि. १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेचार वाजता भाजीबाजार विभागात श्री शिवाजी व्यायाम शाळेचे इमारतीचा कोनशिला समारंभ श्री. के. टी. मंगलमूर्ति, आय्. सी. एस्., यांच्या हस्ते थाटाने साजरा झाला होता.

मुस्लिम तरुण संघ : उमरावतीच्या मुस्लिम तरुण संघातर्फे वऱ्हाड ब्रिटिशांनी परत करावा या निजामाचे मागणीला पाठिंबा देऊन, निजामा-विरुद्ध चालू असलेल्या मतप्रचाराचा निषेध केला होता.

स्त्रियांची सभा : एकवीरा देवीचे मंदिरात डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली, दि. १३ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता. स्त्रियांची सभा होऊन सौ. पार्वतीबाई पटवर्धन व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांची 'स्वदेशीचे महत्त्व' या विषयावर भाषणे झाली होती.

जाहीर सभा : दि. १९ ऑक्टोबर सायंकाळी साडेसहा वाजता जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत लोकनायक बापूजी अणे यांचे 'सद्य:कालिन प्राप्त कर्तव्य' या विषयावर व्याख्यान झाले होते. याच सभेत मेळघाटचे कोरकू पुढारी श्री. लहानू यांचेही अभिनंदन करण्यात आले होते.

दे. भ. सुभाषबाबूंच्या अटकेचा निषेध.

बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी दे. भ. सुभाषचंद्र बोस यांना ते जगतदल येथील मजूर परिषदेस हजर राहण्यासाठी निघाले असता दि. ११ आक्टो. रोजी, नवपाडा पोलिस स्टेशनवरील अधिकाऱ्यांनी केलेल्या अटकेचे निषेधार्थ दि. १४ ऑक्टोबर रोजी रात्री जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. हरिहरराव देशपांडे, डॉ. सबनीस व डॉ. सोमण यांची भाषणे झाली होती.

अस्पृश्यांच्या दोन सभा : दि. १२ ऑक्टोबर रोजी माताखिडकी जवळील पटांगणात डॉ. सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची जाहीर सभा भरून 'महात्मा गांधीवर नेते या नात्याने आमचा पूर्ण विश्वास आहे' असा ठराव मंजूर करण्यात आला होता. श्री. भटकर व श्री. ओगले यांनी या ठरावाला केलेला विरोध निष्फळ ठरला.

दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी श्री. भटकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची एक खाजगी सभा भरून, तींत डॉ. आंबेडकर 'हेच आमचे खरे नेते, असा ठराव मंजूर केला गेला.

सरकारच्या निषेधाची दुसरी सभा : बंगालमधील चितागांगच्या शाळांवर धाड घालून लष्करी अमलदारांनी विद्यार्थ्यांना जी निर्दयपणे मारझोड केली त्याबद्दल सरकारचा निषेध करण्यासाठी, विदर्भ युवक संघातर्फे दि. १५ ऑक्टोबर रोजी गणेश नाटकगृहात डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत वैद्य त्र्यं. गं. जोशी, श्री. पन्नालालजी गांधी व श्री. हरिहरराव देशपांडे यांची भाषणे झाली होती.

विदर्भ युवक परिषदेचे २ रे अधिवेशन : विदर्भ युवक परिषदेचे दुसरे अधिवेशन दि. २४ ऑक्टोबर रोजी, सायंकाळी ६ वा. गणेश नाटकगृहात, मुंबईच्या युवक संघाचे प्रवर्तक श्री. युसुफ मेहेरअली यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाले. या प्रसंगी नाटकगृह चिक्कार भरले होते व सर मोरोपंत जोशी, दे.भ. सं. वि. गोखले, वीर वामनराव जोशी, दे.भ. डॉ. भट, श्री. बामणगावकर, इत्यादी गावातील ठळक पुढारी, त्याच प्रमाणे स्थानिक बहुतेक वकील व डॉक्टर्स व इतर प्रमुख नागरिक परिषदेला हजर होते.

सुरुवातीला महाराष्ट्र व्यायाम शाळेचे अध्यक्ष डॉ. म्हैसाळकर यांनी 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत, परतवाड्याचे डॉ. पिंपरकर यांनी 'भारत न रह सकेगा हरगीज गुलाम खाना' हा राष्ट्रभावनोद्दीपक गजल व श्री. देवगावकर यांनी स्वागतगीत म्हटल्यावर, चिटणीस श्री. सहस्त्रबुद्धे यांनी १९२८ साली भरलेल्या युवक परिषदेच्या प्रथम अधिवेशनापासूनचा वृत्तांत सांगून, सदर युवक परिषदेने १० मे हा 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळण्याचा जो उपक्रम सुरू केला होता त्याचे अनुकरण इतर सर्व प्रांतात होऊन, या उपक्रमाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाल्याचे सांगितले.

नंतर परिषदेला शुभ चिंतनपर आलेले संदेश वाचून दाखविण्यात आल्यावर, स्वागताध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांचे अत्यंत स्फूर्तिप्रद व ओजस्वी भाषण झाले होते.

त्यानंतर अध्यक्षांची औपचारिक सूचना श्री. हरिहरराव देशपांडे यांनी केली व त्यास सर्वश्री मोहियोद्दीन वकील, सौ. राधाबाई ओक, आकोला

व इतर काहींनी दुजोरा दिल्यावर श्री. मेहेरअली स्थानापन्न झाले व त्यांनी आपले हिंदीतून भाषण केल्यानंतर, त्या दिवशीचे काम संपले.

रात्री विषय नियामक समितीची बैठक बराच वेळ चालली होती. या बैठकीत ठरावाचे मसुदे तयार करण्यात आले.

दुसरे दिवशी, दि. २५ ला सकाळी ८ वा., पुन्हा परिषदेला सुरुवात होऊन निरनिराळे ठराव मंजूर करण्यात आलेत व परिषद संपली.

या युवक परिषदेत खालील आशयाचे ठराव झाले होते--
१. १९३० च्या सत्याग्रह आंदोलनात भाग घेतलेल्या तरुणांचे अभिनंदन. २. सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणे व देशाचे निर्भेळ स्वातंत्र्य शांततेच्या मार्गाने मिळविणे हे ध्येय परिषदेचे राहील. ३. माणसाचे माणसाकडून होणारे शोषण किंवा पुरुषांकडून स्त्रियांबाबत होणारा अन्याय नष्ट करणे व उत्पादन, विभागणी व विनियम या सर्व प्रकारच्या साधनांवर राष्ट्राची मालकी. ५. लाल बावटयाखाली सर्वांनी यावे असे आवाहन. ६. उपयुक्तता नष्ट झालेल्या चाली-रूढीविरुद्ध, विशेषत: बालविवाह, विधवा-विवाह-प्रतिबंध, अस्पृश्यता, जाती-व्यवस्था व पडद्याची प्रथा ह्या सारख्या चाली विरुद्ध बंड उभारणे. ७. हिजली येथील राजबंदीवरील व चितागांगच्या विद्यार्थ्यांवरील अत्याचाराचा निषेध. ८. वऱ्हाड प्रांत निजामाला वापस दिला जाऊ नये. ९. शेतकरी व कामकरी यांचे संघटण उभारणे.

विदर्भ प्रांतीय महिला परिषदेचे पहिले 'उमरावती अधिवेशन'

दि. २४ ऑक्टोबर १९३१ रोजी विदर्भ प्रांतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन उमरावती येथील गणेश नाटकगृहात दुपारी १२ वाजतापासून भरले होते.

या अधिवेशनासाठी परगावाहूनही बरेच स्त्री प्रतिनिधि उपस्थित होते, त्याशिवाय उमरावतीतील बहुतेक प्रमुख स्त्रियांनी त्यांत भाग घेतल्याचे आढळून येत होते. परिषदेला एकंदर पांचशे स्त्रीसमाज हजर असावा.

सुरुवातीला मुलींचे स्वागतपर गीत व राष्ट्रगीत होऊन रीतसर सूचनेनंतर स्वागताध्यक्ष लेडी सौ. यशोदाबाई जोशी ह्या स्थानापन्न झाल्या व त्यांनी आपले भाषण वाचून दाखविले.

त्यानंतर परगावाहून परिषदेला शुभेच्छा संदेश आले ते चिटणीस सौ. कालिंदीबाई घाटे यांनी वाचून दाखविले त्यांत; ग्वालेहरच्या श्रीमंत सौ. लक्ष्मीबाई राजवाडे व सौ. रमाबाई तांबे यांचेही संदेश होते.

त्यानंतर अध्यक्षांची सूचना सौ. मथुराबाई द्रविड यांनी केली व त्यास श्रीमती पुष्पावती राजुरकर, श्रीमती राधाबाई अभ्यंकर, श्रीमती इंदिराबाई सहस्त्रबुद्धे व सौ. भट इत्यादींनी पाठींबा दिल्यावर अध्यक्ष डॉ. श्रीमती कमलाबाई देशपांडे (सातारा) ह्या वंदेमातरम्‌च्या व महात्माजींच्या जयजयकारात स्थानापन्न झाल्या व त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले. त्या म्हणाल्या " .....सामाजिक सुधारणा आधी की, राजकीय सुधारणा आधी, हा वाद फार जुना– टिळक आगरकरांपासून–किंबहुना नवीन हिंदुस्थानाच्या जन्मापासून, अगर त्याहून निश्चित सांगायचे तर इंग्लिश शिक्षणाचा आस्वाद घेऊन नवीन तऱ्हेने विचार करू लागलेल्या पण–स्वत्व राखण्यासाठी व्याकुल झालेल्या पहिल्या पिढीपासून आहे. आज तरी स्थिती अशी आहे की, हे दोन सुरुवातीस परस्पर भिन्न असणारे प्रवाह आज इतके जवळ आलेले आहेत की, दोन्ही प्रवाह मिळून एकरूप होतात असे म्हटले तरी चालेल.

... ...अस्पृश्यता – निवारण राष्ट्रीय सभेच्या हेतूत शिरले. त्याचप्रमाणे पटेल बील, शारदा कायदा इ. सामाजिक वाटणाऱ्या गोष्टी राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या लोकांनी हातामध्ये घेतल्या व राजकीय गोष्टी ज्या ठिकाणी होतात त्या सभागृहातून म्हणजे लेजिस्लेटिव्ह असेम्ब्ली व कौन्सिलमध्ये त्यासंबंधी ठराव केले.

..... १९०५ इ. साली बंगभंगाची चळवळ झाली, १९०८ इ. साली राजद्रोहाची लाट उसळली, १९१५ साली होमरूलची चळवळ झाली व १९२० साली असहकारितेची लाट पसरली. १९२९–३० साली कायदेभंगाचे लाटेने काही काळ इतर सर्व चळवळी थांबविल्या. यांतील प्रत्येक दुसरी लाट कहिलीपेक्षा मोठी यावी, चळवळ नुसत्या शहरापुरतीच

न थांबता खेडोपाडी जावी, आणि कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी इतका पुढाकार घ्यावा की प्रत्येक मिरवणुकीत अगर कार्यक्रमात त्यांनाच कार्याध्यक्ष अगर सेनापति नेमण्याची प्रथा पडावी. या गोष्टी होण्यास, ग्रामसंघटना, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, सक्तीचे शिक्षण ह्या प्रथम दर्शनी राजकीय न दिसणाऱ्या गोष्टींची मदत झाली ही गोष्ट इतिहासकाराला नाकबूल करता येणार नाही ....."

अध्यक्षांचे भाषणानंतर चिटणीस सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी विषय नियामक मंडळाची यादी वाचून दाखविली व परिषदेच्या बैठकीचे पहिल्या दिवशीचे कामकाज समाप्त झाले. त्यानंतर विषय नियामक मंडळाची बैठक झाली.

दुसऱ्या दिवशी, ठरल्याप्रमाणे १२ वाजता दुपारी परिषदेच्या कामकाजाला राष्ट्रगीताने सुरुवात झाली. प्रथम अध्यक्षांनी सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांना महात्मा गांधींचे अभिनंदनपर असलेला पहिला ठराव मांडण्याची सूचना केली. सौ. पटवर्धनांनी पहिला ठराव मांडतांना, सभेचे काम सुरु करण्यापूर्वी महात्मा गांधींचे अभिनंदन करणे किती आवश्यक आहे हे सांगून, महात्माजींनी स्त्रियांचे उन्नतीसाठी केलेल्या कार्याचे महत्त्व प्रेक्षकांना पटवून दिले. अनुमोदन देतांना कु. ताराबेन मश्रूवाला ह्यांनी महात्माजींनी स्त्रीशिक्षणाला मदत केली आहे असे सांगितले. ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ह्यानंतर नं. २, ३, ४, ५ व ६ हे ठराव अध्यक्षांनी मांडले व ते सर्वानुमते पास झाले. त्याचप्रमाणे नं. ७, ८, ९, १० व ११ हे ठराव अध्यक्षांनी मांडले व तेही पास झाले. ठराव नं. १३ व १४ हेही पास झाले. त्यानंतर अध्यक्षांनी स्त्रियांच्या धंदेशिक्षणविषयक ठराव नं. १२ मांडला व तो सर्वानुमते पास झाला. नंतर अध्यक्षांनी १६ नंबरचा ठराव विचारात घेण्याचे ठरविले. त्यावेळी सौ. पार्वतीबाईंनी १५ नंबरचा ठराव अगोदर मांडण्याविषयी विनंती केली. त्यावर हा महत्त्वाचा ठराव असून इतर ठराव मांडून झाल्यावर शेवटी तो विचारात घेण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगितले. त्यावर सौ. पार्वतीबाईंनी अध्यक्षांना पुन्हा विनंती केली की '१५ नंबरचा ठराव अगोदर घ्यावा. तसे न झाल्यास मी आपल्या जागेचा राजीनामा देईन व ह्यापुढे माझा परिषदेशी संबंध राहणार नाही' तेव्हा अध्यक्षांनी शेवटी या ठरावाला

१ तासाचा अवधी देण्यात येईल असे पुन्हा सांगितले. पण सौ. पार्वतीबाई व इतर अनेक स्त्रिया महात्मा गांधींच्या जयघोषात परिषदेतून उठून गेल्या. ह्या प्रकारामुळे सभेत खळबळ उत्पन्न होऊन १५ ते २० मिनिटे सभेचे काम बंद पडले. नंतर स्थिरस्थावर झाल्यावर सभेच्या कार्यास सुरुवात झाली.

ह्यानंतर मांडण्याचे ठरावांपैकी ठराव नं. १७ सौ. सीताबाई ब्रम्ह यांनी मांडला. ठरावावर बोलताना त्यांनी बालसंगोपन गृहे व प्रसूती गृहे किती जरूर आहेत हे साध्या व सोप्या भाषेत सांगितले व मिस मेयो यांनी या संदर्भात जी टीका केली त्यांत बरेच तथ्य आहे असे सांगितले. या ठरावाला सौ. नामजोशी व सौ. निमदेवकर यांनी अनुमोदन दिल्यावर ठराव पास झाला. सौ. कालिंदीबाई घाटे यांनी स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाचा ठराव नं. १८ मांडला. त्यास सौ. लक्ष्मीबाई वैद्य यांनी पाठिंबा दिला व ठराव पास झाला. त्यानंतर हिंदुकायदा बदलण्याविषयीचा ठराव नं. १९ सौ. शांताबाई भट यांनी मांडला. या ठरावावर बोलतांना सौ. भट म्हणाल्या "ज्या प्रमाणे पुरुष हे सरकारची प्रजा आहे, त्याप्रमाणे स्त्रियाही आहेत. तेव्हा त्यांना उपयुक्त असे कायदे पास करण्यात आले पाहिजेत व हा ठराव किती महत्त्वाचा आहे" हे त्यांनी निरनिराळी उदाहरणे देऊन सांगितले. या ठरावाला सौ. कालिंदीबाई घाटे व सौ. विमलाबाई देशपांडे यांनी अनुमोदन दिले. सौ. देशपांडे यांनी 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' ह्या स्मृतिकारांच्या तत्त्वावर हिंदु-कायदा प्रस्थापित झाला असल्याचे सांगितले व ह्या कायद्यात जर सुधारणा करायची तर ती मुळातच केली पाहिजे असे सांगितले. हा ठराव सर्वानुमते पास झाला. त्यानंतर अस्पृश्यता नष्ट करण्याविषयीचा ठराव नं. २० सौ. ताराबाई रणदिवे यांनी मांडला. 'कोणत्याही व्यक्तीची लायकी ही जातीवर असू नये तर ती गुणावर असावी' हे सांगून या अस्पृश्यतेमुळे आजपर्यंत किती नुकसान झाले याचे त्यांनी वर्णन केले आणि हा ठराव नुसता पास करून चालणार नाही तर तो कृतीत आणावा लागेल असेही सांगितले. या ठरावाला सौ. गंगूताई भोळे ह्यांनी अनुमोदन दिले व ठराव सर्वानुमते पास झाला.

नंतर सौ. कालिंदीबाई घाटे यांनी, खेड्यातून साक्षरता व स्वच्छता या बाबतीत तेथील लोकांची उन्नती करण्यासंबंधीचा ठराव नंबर २१

मांडला. त्यास सौ. निमदेवकर यांनी अनुमोदन दिल्यावर तो पास झाला. नंतर ठराव नं. २३ ताईमहाराज यांनी मांडला. 'शाळातून धार्मिक शिक्षणाची सोय व्हावी' असे त्या ठरावात होते. त्यास सौ. शांताबाई भट ह्यांनी विरोध करून म्हटले 'शाळातून धार्मिक शिक्षण देणे म्हणजे आई-बापांनी आपली जबाबदारी टाळणे होय, म्हणून हे शिक्षण घरीच देणे योग्य. शिवाय शाळेत वेग-वेगळ्या जाती-धर्माची मुले असतात, त्यामुळे बरेच घोटाळे माजतील.' त्यानंतर या ठरावावर आणखी दोन विरोधी वक्त्यांची भाषणे होऊन ठराव मतास टाकण्यात आला व तो पास झाला. नंतर अध्यक्षांनी सौ. पार्वतीबाईंनी ज्या ठरावाबद्दल परिषदेतून सभात्याग केला तो नं. १५ चा ठराव मांडला. "स्त्रियांचा राजकारणात जेथे जेथे संबंध येतो तेथे तेथे अखिल भारतीय महिला परिषदेने राजकारणात लक्ष घालावे अशी या परिषदेची शिफारस आहे." असा तो ठराव होता व त्यावर त्यांनी सांगितले की, ह्याबद्दल दोन प्रकारची मते अस्तित्वात आहेत. म्हणून हा शिफारसवजा ठराव आपण अखिल भारतीय महिला परिषदेकडे पाठवावा व नंतर जे ठरेल त्याप्रमाणे आपण आपले धोरण स्वीकारावे. त्यानंतर हा ठराव पास झाला.

शेवटी अखिल भा. महिला परिषदेवर पाठविण्यासाठी १० स्त्रियांची नावे सुचविण्यात आली व अध्यक्षांचे आभार प्रदर्शन झाल्यावर अखिल-भारतीय-महिला परिषदेच्या धोरणानुसार व तत्त्वानुसार चालणारे हे निव्वळ शिक्षण विषयक व समाज विषयक प्रांतिक अधिवेशन यशस्वी तऱ्हेने संपले.

या अधिवेशनातून सौ. पार्वतीबाई व त्यांच्या बरोबर जो महिला वर्ग सभात्याग करून गेला होता त्यांनी जोग चौकात राष्ट्रीय निशाणास वंदन केले व ब्रम्हविद्या मंदिरात सभा भरवून सौ. पार्वतीबाईंना परिषदेतून का सभात्याग करावा लागला हे सांगून त्या कारणाबद्दल सौ. पार्वतीबाईंच्या अध्यक्षतेखाली आपली नापसंती व्यक्त करण्यात आली. सदर सभेत श्री. युसूफ मेहेरअली यांचेही भाषण झाले. त्यांनी चळवळ केली म्हणून धन्योद्गार काढले होते.

अशा रीतीने उमरावतीला भरलेली पहिलीच प्रांतिक महिला परिषद गाजली व या परिषदेत स्त्रीवर्गाने आपल्या सामाजिक हक्कांचा आवाज ठरावाद्वारे उठविला. +

(+ या प्रकरणाचे शेवटी परिशिष्ठ क्र. १ मधील अहवाल पहा.)

श्री. मेहेरअली : प्रांतिक युवक परिषदेचे अध्यक्ष म्हणून आलेले श्री. युसुफ मेहेरअली यांचे हस्ते दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता झेंडावंदनाचा कार्यक्रम जोग चौकात झाला.

त्याच दिवशी त्यांनी हनुमान व्यायाम शाळेला भेट दिली व रात्री ८–३० वाजता जोग चौकात श्री. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे जाहीर भाषण झाले होते.

श्रीमती कमलाबाई देशपांडे : प्रांतिक परिषदेच्या अध्यक्ष म्हणून उमरावतीस आलेल्या साताऱ्याच्या श्रीमती कमलाबाई देशपांडे यांचे, दि. २६ ऑक्टोबर रोजी येथील न्यू. हायस्कूलमध्ये सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली, विद्यार्थ्यांना उपदेशपर भाषण झाले होते.

त्याच दिवशी महिला समाजातर्फे सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात 'स्मृति आणि स्त्रिया' या विषयावर डॉ. श्रीमती कमलाबाई देशपांडे यांचे सौ. विमलाबाई एम्. ए., यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांकरिता माहितीपूर्ण व्याख्यान झाले.

फटाक्यावर बहिष्कार : स्थानिक काँग्रेस कमेटीतर्फे परदेशी फटाक्यावर बहिष्कार घालण्याबाबत जोरात प्रचार सुरू झाला होता.

विदर्भ प्रांतिक महिला परिषद : या परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा दि. २६ ऑक्टोबर रोजी भरून, सौ. पटवर्धन यांनी चिटणीस पदाचा दिलेला राजीनामा मंजूर करण्यात आला व दि. २५ च्या पूर्वी सौ. पटवर्धन यांनी चिटणीस या नात्याने केलेल्या कार्याबद्दल आभार व दि. २५ च्या परिषदेतील त्यांच्या वागणुकीबद्दल नापसंती व्यक्त करणारा असे दोन ठराव मंजूर करण्यात आले होते.

मुसलमान व वऱ्हाडचा प्रश्न : दि. २६ ऑक्टोबर रोजी काही मुसलमानांची सभा, सेठ श्रीनारायण रामबिलास यांच्या अध्यक्षतेखाली भरून, " वऱ्हाडच्या प्रश्नाबाबत चालविण्यात येत असलेल्या चळवळीकडे लक्ष न देता, वऱ्हाड प्रांत परत करण्याचा प्रश्न, निजाम व सार्वभौम सरकार यांचेत झालेल्या तहानुसार सोडविण्यात यावा " असा मि. शरफुद्दीन यांनी मांडलेला व मि. हिदायतअली यांनी दुजोरा दिलेला ठराव मंजूर करण्यात आला होता.

होती. याप्रमाणे उमरावतीच्या पुढाऱ्यांचे शेतसारा – माफीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे म्हणून सारखे दौरे सुरू होते.

जाहीर व्याख्यान : दि. २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता जोग चौकात डॉ. भोजराज यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत, लोकनायक बापूजी अणे यांचे 'शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती' या विषयावर व्याख्यान झाले. 'सध्याची शेतकऱ्यांवरील कराची पद्धती कशी निर्घृण आहे व त्यातच यंदा अतिवृष्टीमुळे पिके साफ बुडाली असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतसाऱ्याची सूट, तहकुबी देणे कसे न्याय्य व आवश्यक आहे' हे त्यांनी आपल्या भाषणात विषद करून सांगितले होते.

सरकारचे आभार : उमरावतीच्या अंजुमन–इ–मुस्लिम या संस्थेच्या भरलेल्या सभेत, उमरावतीस या (दिसेंबर) महिन्यापासून अँग्लो–उर्दू गर्ल्स स्कूल उघडल्याबद्दल मध्यप्रांत सरकारचे आभार मानण्यात आले व या शाळेत शिकणाऱ्या मुलींच्या संख्येकडे लक्ष देऊन ही शाळा पुढेही चालू ठेवावी अशी सरकारला विनंती करण्यात आली होती.

निषेधार्थ सभा : दि. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, सेनापती बापट यांना झालेल्या ७ वर्षे काळ्या पाण्याचे शिक्षेबद्दल सरकारचा निषेध करण्यात आला. त्यासंबंधी श्री. त्रिबंकराव जोशी, श्री. संभाजीराव गोखले, सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे झाली होती.

नगर भवानी : दि. ४ दिसेंबर रोजी गणेश नाटकगृहात श्री. आसरकर लिखित 'नगर भवानी' या स्थानिक स्वराज्य संस्थांतील सावळ्या गोंधळावर आधारलेल्या नाटिकेचा प्रयोग उमरावतीच्या विदर्भ नाट्य समाजाने करून दाखविला होता. त्यातील कलावंतांची कामे बरी झाली होती व प्रयोग रंगला होता.

म्युनिसिपल करवाढीचा निषेध : शहर म्यु. कमेटीने नवीनच वाढविलेल्या कराच्या निषेधार्थ, दि. ५ दिसेंबर रोजी रात्री ८ वा. जोग चौकात दे. भ. बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नगरवासीयांची जाहीर सभा झाली. तीत डॉ. भोजराज, श्री. पु. य. देशपांडे, शेठ फत्तेचंदजी, शेठ मोतीलालजी आणि श्री. गुलाबराव बक्षी यांची भाषणे झाली होती.

जाहीर सभा : दि. ९ दिसेंबर रोजी गणेश नाटकगृहात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, शेतकऱ्यांच्या आजच्या स्थितीवर दे. भ. बामणगावकर व श्री. पु. य. देशपांडे यांची भाषणे झाली होती.

गोलमेज कॉन्फरन्सचा बोजवारा : दि. ११ दिसेंबर रोजी सायंकाळी ५ वा. गणेश नाटकगृहात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, 'गोलमेज कॉन्फरन्सचा बोजवारा कसा वाजला' या विषयावर दे. भ. संभाजीराव गोखले व हरिहरराव देशपांडे यांची भाषणे झाली होती.

कै. मोहरीरांचा श्राद्धदिन : वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सुरुवातीपासूनचे चिटणीस व धडाडीचे कार्यकर्ते कै. वामनराव मोहरीर यांचा श्राद्धदिन जिल्हा काँ. कमेटीचे वतीने, दि. १८ दिसेंबर रोजी जाहीरपणे साजरा करण्यात आला. त्यानिमित्त श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत कै. मोहरीरांच्या गुणवर्णनपर डॉ. सोमण, डॉ. पटवर्धन, दे. भ. संभाजीराव गोखले, व वरुडचे श्री. मोहरीर यांची भाषणे झाली होती. कै. मोहरीरांचे मृत्यूनंतर तब्बल सात वर्षांनी हा श्राद्धदिन जाहीर रीतीने काँ. कमेटीने साजरा केला होता.

वऱ्हाडातील मुसलमानांची सभा : सर्व वऱ्हाडच्या मुसलमानांची सभा, या नावाने उमरावतीला दि. २० दिसेंबर रोजी शे-दिडशे मुसलमानांची सभा भरली होती. (बरार मुस्लिम कॉन्फरन्स्)

या सभेत निजामच्या वऱ्हाडबद्दलच्या मागणीस मान्यता देण्यात येऊन ही मागणी पूर्ण करण्यासाठी ब्रिटिश सरकारला विनंती करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता. तसेच, वऱ्हाड सर्वपक्षीय समिती व इतर संस्थांनी निजामाविरुद्ध 'झुटया व गलत' स्वरूपाच्या चालविलेल्या मतप्रचाराचा निषेध करण्यात येऊन, ह्या झुटया प्रचाराविरुद्ध खरा प्रचार करण्यासाठी मि. अब्दुल रौफशहा, मि. जैनुद्दीन, मि. शरफुद्दीन वकील इत्यादी सुमारे दहा व्यक्तींची कमेटी नेमण्यात आली होती. तसेच काश्मीर मधील मुसलमानांच्या वावटळीस पाठिंबा देण्याचा ठराव करण्यात आला होता. ही कॉन्फरन्स उर्दू प्रा. शाळा नं. ३ च्या आवारात दुपारी ३ वा.

भरली होती व कौन्सिलचे डेप्युटी स्पीकर मि. मुजफ्फर हुसेन वकील उमरावती हे या कॉन्फरन्सचे स्वागताध्यक्ष होते आणि बाळापूरचे मि. महम्मूद साहेब जहागीरदार हे अध्यक्ष होते.

श्री. करंदीकरांचे व्याख्यान : दि. २० दिसेंबर रोजी सायंकाळी साडे सहा वाजता जोग चौकात, ज्ञान प्रसारक मंडळाचे विद्यमाने श्री. नानासाहेब गोखले वकील यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, केसरीचे संपादक श्री. ज. स. करंदीकर यांचे 'गोलमेज परिषद' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले होते.

दे. भ. त्र्यंबकराव जोशी यांना अटक.

गांधी–इर्विन कराराची सरकारकडून पायमल्ली.

उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीचे चिटणीस देशभक्त त्र्यंबकराव जोशी (त्र्यंबक गुरुजी) यांना, दि. २१ दिसेंबर १९३१ रोजी ते बडनेरला सुभाषबाबूंना भेटून परत येत असताना उमरावती रेल्वे स्टेशनवर, पोलिसांनी वारंट दाखवून अटक केली व लगेच उमरावती जेलमध्ये पाठविले होते.

ही बातमी गावात पोचताच त्याच दिवशी रात्री जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून दे. भ. त्र्यंबकराव यांचे अभिनंदन करण्यात आले. सभेत श्री. बामणगावकर आणि श्री. पी. वाय्. देशपांडे यांची भाषणे झाली होती.

दुसऱ्या दिवशी वऱ्हाड प्रां. काँ. कमेटीचे अध्यक्ष वीर वामनराव जोशी यांनी श्री. त्र्यंबकराव यांची जेलवर भेट घेऊन त्यांना बचाव करण्याची परवानगी दिली. तसेच राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीचे सभासद लोकनायक अणे यांनीही बचाव करण्याची परवानगी दिली होती. कारण, स्वातंत्र्यासाठी यावेळी अधिकृत लढा राष्ट्रीय सभेने सुरू केलेला नव्हता, तर गांधी–इर्विन–करार होऊन त्या प्रमाणे धोरण सुरू होते. मात्र हा करार मोडला असे खापर राष्ट्रीय सभेच्या अनुयायांवर फोडण्याचा नोकरशाहीचा डाव होता व त्यासाठीच असे खटले नोकरशाही भरू लागली होती. त्यामुळे बचाव देणे व राष्ट्रभक्तांचे पूर्ण अनत्याचारित्त्व लोकनिदर्शनास आणणे जरुरीचे होते.

तिसरे दिवशी मि. रहिमखान मॅजिस्ट्रेट यांचे समोर दे. भ. त्र्यंबकराव यांचा खटला उमरावती जेल मध्येच सुरू झाला. जेलचे बाहेर लोकांची खुप गर्दी खटला ऐकण्यासाठी जमली होती परंतु फक्त दहाच लोकांना आंत सोडण्यात आले होते.

दे. भ. त्र्यंबकराव यांच्यातर्फे श्री. बाबासाहेब खापर्डे व त्यांना मदत करण्यासाठी श्री. मोडक, श्री. रणदिवे व श्री. पी. वाय्. देशपांडे ही वकील मंडळी होती. सरकारतर्फे श्री. अनगळ वकील हे काम चालवीत होते.

त्र्यंबकरावांना जामीनावर सोडावे असा अर्ज त्यांचे वकीलांनी केला पण मॅजिस्ट्रेटनी तो फेटाळून लावला. या खटल्यात दे. भ. त्र्यंबकराव यांचेवर, त्यांनी नोव्हेंबर महिन्यात लाला लजपतराय स्मृतिदिनाचे वेळी जे भाषण केले ते आक्षेपार्ह आहे असे सरकारचे म्हणणे होते व म्हणून कलम १२४-अ खाली हा खटला भरला होता.

दुपारी त्र्यंबकराव यांना जामीनवर मुक्तता व्हावी असा अर्ज त्यांचे वकीलांतर्फे डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन्स् जज्जासमोर करण्यात आला पण तो फेटाळण्यात आला. शेवटी खटला चालून त्यांना मॅजिस्ट्रेटने दोन वर्षाची शिक्षा सुनावली होती.

दि. २५ दिसेंबर रोजी दुपारी श्री लक्ष्मीनारायण मंदिरात दे. भ. त्र्यंबकराव जोशी यांचे अटकेचा व खटल्याचा वृत्तान्त सांगण्यासाठी सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा भरली होती.

पुढे या खटल्यात हायकोर्टापर्यंत दाद मागण्यात आली आणि हायकोर्टात त्यांना शेवटी १ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा कायम राहिली. जुलै १९३२ मध्ये हा निकाल लागला.

गांधी-इर्विन करारानंतर वऱ्हाडात झालेला हा पहिला खटला होता. सरकारनेच हा करार पायाखाली तुडविला.

दे. भ. त्र्यंबकराव यांना हायकोर्टाने शिक्षा दिली त्याच दिवशी ७ जुलै १९३२ रोजी काँग्रेसचे नवे सर्वाधिकारी श्री. लक्ष्मणराव देशमुख

यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीत जाहीर सभा भरून त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

लोकनायक बापूजी अणे यांचा दौरा : शेतकऱ्यांचे विपन्न स्थितीबद्दल व्याख्याने देण्यासाठी लोकनायक बापूजी अणे यांचा उमरावती जिल्ह्यात दि. २५ व २६ दिसेंबर रोजी दौरा झाला होता. या दौऱ्यात दर्यापूर व चांदूर रेल्वे येथे त्यांची व्याख्याने झाली होती.

सिल्व्हर टाऊनवर पिकेटिंग : सिल्व्हर टाऊन इ. कंपन्यांतून असणाऱ्या जुगाराच्या खेळांपासून लोकांना परावृत्त करण्याचा प्रयत्न, विदर्भ युवक संघातर्फे, हस्तपत्रके, जाहीर सभा व निरोधन याद्वारे केला जात होता.

त्यातच या सिल्व्हर टाऊनचे शेजारीच 'गोल्डन टाऊन' या नावाची एक नवी कंपनी निर्माण होऊन, तेथेही तोच प्रकार सुरू झाला आणि लौकरच 'डायमंड शो' या नावाने आठवडी बाजाराजवळ तिसरा जुगारी अड्डा सुरू झाला. या प्रमाणे उमरावतीत राजरोस तीन जुगारी अड्डे मोहक नावाने चालू लागले होते. नंतर 'लकी शो' नावाने आणखी एक अड्डा सुरू झाला.

विदर्भ युवक संघाने विद्यार्थ्यांचे सहकार्याने या मायावी, जुगारी व लोकांची लूट करणाऱ्या कंपन्यांपासून लोकांना सावध करण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. गोऱ्या अधिकाऱ्यांना मात्र यांत जुगार दिसत नव्हता व त्यांनी या कंपन्यांना परवाने दिले होते.

पुढे, दि. २२ दिसेंबर रोजी या जुगारी अड्ड्याविरुद्ध सायंकाळी गणेश नाटकगृहात सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरून तीत, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. पी. वाय्. देशपांडे, श्री. सहस्त्रबुद्धे व मौ. आझाद यांची भाषणे झाली आणि अशा रीतीने उमरावतीत सुळसुळाट झालेल्या ह्या जुगारी कंपन्याविरुद्ध जेव्हा तीव्र लोकमत प्रकट होऊ लागले तेव्हा सरकारला त्याकडे दुर्लक्ष करणे अशक्य होऊन, पोलिसांनी दि. २५ दिसेंबर रोजी हे सारे जुगारी अड्डे बंद पाडले होते.

पं. जवाहरलाल नेहरूंचे अटकेचा निषेध : पं. जवाहरलालजी नेहरू यांना सरकारने केलेल्या अटकेचे निषेधार्थ, दि. २७ दिसेंबर रोजी

शहरात हरताळ पाळण्यात आला व सायंकाळी साडेसहा वाजता जोग चौकात शेठ पन्नालालजी सिंघई यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. काकासाहेब तांबे, डॉ. सोमण, सौ. यशोदाबाई जोशी, श्री. काळे, मौ. आझाद व डॉ. पटवर्धन यांची भाषणे झाली होती.

गिरणीवाला : अरुणोदय संगीत नाटक मंडळीचा मुक्काम उमरावतीला दिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून होता. या मंडळीची लोकप्रिय अशी नाटिका 'गिरणीवाला' उमरावतीतही अत्यंत लोकप्रिय ठरली होती व त्यांतील गाणी सर्वतोमुखी झाली होती. या नाटिकेत मारवाडी पात्र होते. तेवढ्यासाठी 'मारवाडी समाजाची हिडिस चित्रे या नाटिकेत रंगविण्यात आली असून, जातीजातीतून फूट पाडण्याचा हा प्रयत्न आहे. या कारणास्तव व त्याचा निषेध म्हणून ही नाटिका पाहू नये, अशा आशयाची जाहीर पत्रके छापून ती उमरावतीत वाटण्यात आली होती.

वऱ्हाडला स्वयंनिर्णयाचा हक्क असावा : दिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात काँग्रेस कमेटीतर्फे वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली गणेश नाटकगृहात जाहीर सभा होऊन तीत वऱ्हाडला स्वयंनिर्णयाचा हक्क असावा, व वऱ्हाड निजामास देण्यात येऊ नये. या विषयावर ठराव मंजूर करण्यात आला होता. या ठरावावर अनुकूल अशी श्री. बामणगावकर, श्री. एस्. वाय्. पाटील. श्री. सं. वि. गोखले व श्री. पी. वाय् देशपांडे यांची भाषणे झाली होती.

परिशिष्ट क्र. – २

(पृ. ७३९ पहा)

विदर्भ प्रांतीय महिला परिषद

अधिवेशन पहिले

लेखिका :– श्रीमती माणिकबाई भिडे

अखिल विदर्भ प्रांतीय महिला परिषदेची शाखा त्या परिषदेच्या उत्साही सेक्रेटरी श्रीमंत सौ. लक्ष्मीबाईसाहेब राजबाडे, ग्वाल्हेर, यांच्या विशेष खटपटीमुळे उमरावती येथे प्रथम स्थापन करण्यात येऊन त्या शाखेतर्फे विदर्भ प्रांतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन उमरावती येथे ता. २४ व २५ ऑक्टोबर १९३१ रोजी भरविण्यात आले. अ. भा. म. परिषदेचे ध्येय सर्व जातींच्या, दर्जाच्या व सर्व मतांच्या स्त्रियांच्या उन्नतीला अत्यंत परिपोषक असे असल्यामुळे उमरावती येथील सर्व स्त्रियांनी यात प्रथमपासूनच फारच हौसेने व मेहनतीने भाग घेऊन, पैशाची हरएक तऱ्हेची मदत अत्यंत उदारपणे केली. सर्व जातींचे व दर्जाचे निदर्शक असे एक कार्यकारीमंडळ निवडण्यात येऊन त्यामार्फत सर्व व्यवस्था करण्याचे ठरले. स्वागताध्यक्षाचे जागी उमरावतीच्या प्रसिद्ध नागरिक व समाज सुधारक सौ. लेडी यशोदाबाई जोशी यांची निवडणूक करण्यात येऊन सौ. कालिंदीबाई घाटे व सौ. पार्वतीबाई पटवर्धन या चिटणीस, व सौ. ताराबाई रणदिवे या खजिनदार नेमिल्या गेल्या. परिषदेचे अध्यक्षस्थान पुण्याचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. न चि. केळकर यांच्या विदुषी कन्या श्रीमती डॉ. कमलाबाई देशपांडे यांना देण्यात आले होते.

आरंभी स्वागताध्यक्ष सौ. यशोदाबाई जोशी यांनी सर्वांचे स्वागत करून पुढील आशयाचे भाषण केले. "हिंदुस्थानात निरनिराळ्या वर्गातल्या स्त्रियांच्या निरनिराळ्या अडचणी असतात. उदाहरणार्थ मुसलमान व इतर काही जातीत असलेली पडद्याची चाल, हिंदुमुलीस न मिळणारा बापाच्या इस्टेटीतील हिस्सा, परंतु मुसलमान मुलीस असलेला हक्क, बालपणी केलेल्या विवाहामुळे लहान वयांतच मातृपद प्राप्त होऊन त्यामुळे होणारी अर्भकांची वाढती मृत्युसंख्या, बंगाल प्रांतात मुसलमान मुलीचे बालवयांतच होणारे

विवाह, मद्रासकडे ब्राम्हणेतर जातीत होणारे प्रौढविवाह, हिंदुसमाजातील पुष्कळ जातीच्या विधवांना असलेला पुनर्विवाहनिर्बंध तर काही जातीत प्रचारात असलेली काडीमोड पद्धति वगैरे निरनिराळ्या चालीरीतीमुळे निरनिराळ्या अडचणी आहेत. तरी पण सर्व हिंदीस्त्रियांना सामान्य अशाही काही अडचणी आहेत. उदाहरणार्थ ज्ञान मिळवण्याचा अभाव चोहोकडे सर्वच हिंदी स्त्रियांत आहे. सर्वच हिंदी स्त्रियांचा दर्जा पुरुषाच्या बरोबर मानला जात नाही. पुष्कळ ठिकाणी तर स्त्रियांचा दर्जा फारच हलका मानला जातो. स्त्रियांच्या अंगी ज्ञान मिळविण्याची असलेली योग्यता किंवा अंगात असलेले कर्तृत्व किंवा पराक्रम दाखविण्याचा प्रसंग त्यांना कधीही मिळत नाही व त्यामुळे पुष्कळ स्त्रियांच्या गुणावर विरजण पडून ते तसेच दबून राहतात. पुष्कळशा हिंदी बायकांना पात्रता नसते व म्हणूनच त्यांना नेहमीच पुरुषवर्गावर अवलंबून राहावे लागते. अशा काही विशेष अडचणी हिंदी स्त्रियांना आहेत. त्या नाहीशा करण्याची जाणीव उत्पन्न करणे व नाहीशा करण्याचे सामर्थ्य आपल्या स्त्रियांच्याच खटपटीवर अवलंबून आहे त्याचीही जाणीव उत्पन्न करणे हा परिषदेचा मुख्य उद्देश आहे. अशी जाणीव देशातील बहुतेक स्त्रियांना झाल्याखेरीज त्या बाबतीत संघटित प्रयत्नही होणे शक्य नाही. स्त्रियांची हल्लीची चळवळ पहिल्या पायरीवरच या देशात आहे, म्हणूनच इतर देशात स्त्रियांचा दर्जा येथल्याहून कितीतरी अधिक आहे. लग्न न करता देखील केवळ आपल्या पराक्रमाने आपला निर्वाह करणाऱ्या हजारो स्त्रिया परदेशात आहेत. जे धंदे केवळ पुरुष करीत होते, त्यातील बहुतेक सर्व महायुद्धाचे वेळी परदेशी स्त्रिया करूं लागल्या, व त्यामुळेच त्यांच्या अंगच्या गुणांचाही विकास झाला इतर देशांत स्त्रिया राजकारणात पडतात, वकिली, डॉक्टरी वगैरे धंदे करतात व आज बहुतेक धंद्यात स्त्रिया पुरुषाप्रमाणे कामे करीत आहेत व म्हणूनच त्यांच्या व हल्लीच्या हिंदी स्त्रियांचे स्थितीत पुष्कळ फरक आहे. हा फरक नाहीसा होण्याचा मुख्य उपाय म्हणजे स्त्रियांमध्ये ज्ञानाचा प्रसार होणे. हाच उपाय येथे योजिला जात आहे." त्यानंतर डॉ. श्रीमती कमलाबाई देशपांडे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारून पुढीलप्रमाणे अत्यंत गंभीर व विचार परिप्लुत भाषण केले.

"विदर्भ प्रांतीय भगिनींनो,

सुरवातीस प्रथम करावयाची गोष्ट म्हणजे आपले मन पूर्वक आभार मानणे ही होय. आपण मला येथे बोलावून एक विशेष प्रकारचा मान

दृष्टि आज वऱ्हाडातील सर्वात अधिक शिक्षण संधि असलेल्या स्त्रीच्यावर लागलेली नसून आजच्या परिषदेस येणाऱ्या सर्वात कमी शिक्षण व काम करण्याची संधि असलेल्या स्त्रीला काय करता येईल इकडे लागलेली आहे व त्यामुळे त्यांनी मनात आणल्यास त्यांना काय करता येईल याचाच मी अधिक विचार केला आहे.

काय पाहिजे हे आता कळलेले आहे, पण ते कसे मिळावयाचे याचा विचार करून कामाला सुरवात करावयाची आहे. कामाला सुरवात करताना आपण कोण हे पाहण्यासाठी अंतर्मुख दृष्टि करताच मागील भाग्यशाली भूतकाळ दिसू लागेल. दक्षिणेत उतरल्यानंतरची आर्याची पहिली वसाहत व बृहमहाराष्ट्राची सुरवात जेथे झाली तो हा प्रदेश आहे. मराठी वाङ्मयाची व भाषेची सुरवात या प्रांती झाली. रुक्मिणी, दमयंती, इंदुमती या पौराणिक स्त्रिया, जिजाबाईसारख्या ऐतिहासिक स्त्रिया, भवभूती-सारख्या वैवाहिक जीवनाचे उत्कृष्ट चित्र निर्माण करणारा प्रतिभाशाली कवि व त्याने निर्माण केलेली सीता, मालतीसारखी अनुकरणीय स्त्रीचित्रे ही जेथे निर्माण झाली, तेथील स्त्रियांनी मनावर घेतल्यास त्यांना भूतकाळची परंपरागत मदत अत्यंत आहे व म्हणूनच मला आजच्या परिषदेच्या यशस्वितेबद्दल खात्री वाटत आहे.

शब्दापेक्षा कृतीची जरूर आहे तेव्हा आजच्या समारंभात आपण शब्द तितके कमी खर्च करून कार्याला सुरवात करु; निदान ज्या प्रमाणात बोलू त्याची दुप्पट शक्ति प्रत्यक्ष कार्यासाठी राखून ठेवू व ही आमची इच्छा परमेश्वरी कृपेने तडीस जावी असे म्हणून हे भाषण मी संपविते."

त्यांचे भाषण झाल्यावर विषयनियामक कमेटीची निवड करण्यात येऊन सायंकाळी चार वाजेपर्यंत व रात्री आठ ते बारा या कमेटीची बैठक होऊन एकंदर तेवीस ठराव बहुमताने मंजूर झाले त्यापैकी विशेष महत्त्वाचे ठराव खाली दिले आहेत.

(१) महात्मा गांधी यांनी स्त्रियांचे कार्यक्षेत्र वाढवून हिंदुस्थानातील स्त्रियांचा नावलौकिक सर्व जगात वाढविला असल्याने त्यांच्याबद्दल या सभेस सहानुभूति वाटत असून त्यांना परमेश्वराने आयुरारोग्य द्यावे, अशी या सभेची प्रार्थना आहे.

(२) रायसाहेब हरविलास सारडा यांनी जो बालविवाह प्रतिबंधक कायदा पास करून घेतला आहे त्या बाबतीत कोणासहि सूट मिळू नये असे या सभेचे मत आहे.

(३) मॉरिस – कॉलेजात सी. पी. शिक्षण खात्याने प्रोफेसरचे जागी एका स्त्रीची नेमणूक केली, ह्याबद्दल ही परिषद शिक्षण – खात्याची आभारी आहे, व किंग–एडवर्ड–कॉलेजांतही त्याचप्रमाणे एका स्त्री प्रोफेसराची नेमणूक व्हावी.

(४) हिंदुस्थानातील दिवसेंदिवस वाढत्या दारूच्या प्रसारामुळे हजारो कुटुंब धुळीस मिळत आहेत, व स्त्रियांचे जीवन अत्यंत कष्टमय होत असल्याने दारु व इतर मादक पदार्थांचे निर्मूलन करणाऱ्या चळवळीत स्त्रियांनी जरूर भाग घ्यावा.

(५) रायसाहेब हरीबिलास सारडा ह्यांचे 'विधवांना पतीच्या निधनानंतर त्याच्या संपत्तीचा वारसा मिळण्याबद्दल' जे नवे बिल आहे त्याला ह्या सभेचे पूर्ण अनुमोदन असून विधवांबद्दल हरिविलास सारडा ह्यांनी कळकळ बाळगून जो बहुमोल प्रयत्न केला आहे त्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

(६) स्त्रियांचा राजकारणात जेथे जेथे संबंध येतो तेथे तेथे अखिल – भारतीय – महिला – परिषदेने राजकारणात लक्ष घालावे, अशी या सभेची शिफारस आहे.

(७) हिंदुस्थानच्या आत्यंतिक गरिबीच्या व बेकारावस्थेच्या स्थितीमध्ये गरीब व अनाश्रित स्त्रियांना घरात बसून मिळवून देणारा इज्जतीचा धंदा त्या दृष्टीने चरख्याचा, हात मागाचा धंदा व इतर घरगुती धंदे, उपयोगी असल्याने त्याला पाठिंबा द्यावा, आणि खादी व इतर तयार वस्तू वापराव्या, अशी सभेची प्रार्थना आहे.

(८) एकंदर हिंदु–कायदा बदलण्यासाठी त्यांतील वारस, दत्तक, व विवाह, ह्या बाबतीत स्त्रियांच्या दृष्टीने सुधारणा करण्यास एक कमिटी नेमून, तिने आणलेल्या सूचना मद्रासला होणाऱ्या अ. भा. म. परिषदेस पाठवाव्यात.

१९०५ साली वंगभंगाची चळवळ झाली, १९०८ साली राजद्रोहाची लाट उसळली, १९१५ नंतर होमरूलची चळवळ झाली. १९२० साली असहकारितेची लाट पसरली, १९२९ साली कायदेभंगाच्या लाटेने काही काळ इतर सर्व चळवळी थांबविल्या. यांतील प्रत्येक दुसरी लाट पहिलीपेक्षा मोठी यावी, नुसत्या शहरापुरतीच चळवळ न जाता खेडोपाडी जावी आणि कायदेभंगाचे चळवळीत स्त्रियांनी इतका पुढाकार घ्यावा की, प्रत्येक मिरवणुकीत अगर कार्यक्रमात त्यांनाच कार्याध्यक्ष अगर सेनापति नेमण्याची प्रथा पडावी या गोष्टी होण्यास ग्रामसंघटना, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, सक्तीचे शिक्षण या प्रथम दर्शनी राजकीय न दिसणाऱ्या गोष्टीची मदत झाली ही गोष्ट इतिहासकाराला नाकबूल करता येणार नाही. 'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति' ही गोष्ट देवाचे भक्तीला जशी लागू आहे तशी ती राष्ट्र–देवाचे भक्तीचे बाबतीतही लागू आहे. आपण काय करतो यापेक्षा आपण ते कसे, कोणत्या भावाने करतो याला महत्त्व आहे व तेवढेच आपण साधण्याचा प्रयत्न करू.

आपली आजची परिषद ही अखिल भारतीय महिला परिषदेची एक शाखा असल्याने, त्या परिषदेने मान्य केलेली कार्याची रूपरेषा आपण मान्य करून त्या मार्गानेच पुढे जाणार आहोत. आपणास काय वाटते हे ठराव करून मद्रासला येत्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या परिषदेस कळविणे हे जसे आपले काम आहे, तसेच जे ठराय करू ते आपल्या प्रांतात म्हणजे वऱ्हाडात शक्य तितके अमलात आणून दाखविण्याची त्याहूनही मोठी जबाबदारी आपणावर आहे. यंदाचे ठराव हे केव्हांही शाब्दिक राहणार, कारण आपणास अजून कार्याचा अनुभव नाही. यंदा ठराव करून पुढील वर्षी जे ठराव पुढे येतील त्यांना अनुभवाचा पाठिंबा असल्याने अर्थातच अधिक महत्त्व येईल.

गेल्या वर्षाच्या लाहोर येथे झालेल्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या विद्वान व कार्यतत्पर अध्यक्ष सौ. मथुलक्ष्मी रेड्डी, एम. बी. आणि सी. एम्. मद्रास कायदेकौन्सिलच्या दुय्यम अध्यक्ष, यांनी आपल्या भाषणात Hartog Committe चे आधारे, स्त्रियांच्या सद्यास्थितीचे व अडचणींचे फार सुंदर आविष्करण केले आहे. मला वाटते की, आपण त्यांचे भाषणाचा आधार घेऊन त्यापैकी आपल्या प्रांतात काय करता येईल तेवढे ठरवून

घेऊन करून पाहावे. मुलामुलींच्या शाळांची शहरातील संख्या वाढविणे, लोकल बोर्डामार्फत नवीन शाळा सुरू होण्याची खटपट करणे, मुलांच्या व मुलींच्या शारीरिक शिक्षणाचे बाबतीत पालकांना अधिक लक्ष घालण्याबद्दल विनंती करणे, दुय्यम शिक्षणात व कॉलेजातही मातृभाषा हे माध्यम करण्याची युनिव्हर्सिटीत खटपट करणे, योग्य शिकलेल्या नर्सेस व सुइणी कडून व्याख्यानाद्वारे व प्रत्यक्ष सेवेच्या द्वारेही बैद्यकज्ञानाचा प्रसार करणे स्वदेशी कापडाचे व इतर देशी वस्तूंचे स्टोअर्स (दुकाने) चालविणे इ. अनेक उपयुक्त गोष्टी या कार्यक्रमाचे आटोक्यात येत असून, जर वर्षभर यापैकी काही बाबतीत सतत काम केले तर वर्षाचे शेवटी किती तरी काम झालेले आढळेल. स्त्रियांना अगदी घरातील व्यवसायांना जोडून करावयाचे काम वाटले तर घरातील नोकरचाकर निरक्षर असल्यास त्यांना साक्षर करणे. युरोपात आज प्रवास करू लागले तर निरक्षर मनुष्य सांपडत नाही. वर्तमानपत्रे वाचण्याची संवय इतकी वाढलेली आहे की, कितीही गरीब कुटुंब असो त्यांत एक पैशाचे वर्तमान पत्र यावयाचेच व ते मोलकरणी पासून सर्वांनी वाचावयाचेच. या सर्व साधारण साक्षरतेचा परिणाम राष्ट्राची ग्रहण शक्ति वाढविण्याकडे अप्रत्यक्षपणे होतो. हे साक्षरता वाढविण्याचे काम या परिषदेच्या स्त्रियांनी हाती घेतले व आपला प्रांत नव्हे आपला राहता गाव हीच आपल्या कार्यक्षेत्राची मर्यादा आखून घेतली तरी त्यांना असे आढळून येईल की काम करावयास भरपूर वाव आहे. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता या गोष्टी साक्षरते प्रमाणे आपल्या समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत गेलेल्या नाहीत. त्या बाबतीतही कार्य करण्यास भरपूर अवसर आहे व रस्ते झाडणे आणि शहर सुधारणे ही महात्मा गांधींची आवडती कामे असल्याने राजकीय दृष्टि त्यांत निगडित आहेच. हिंदुस्थानात स्त्रियांची संख्या बारा कोटी असून साक्षर स्त्रियांचे प्रमाण शेकडा १.५ आहे. म्हणजे शेकडा ९८.५ स्त्रिया निरक्षर आहेत. ही स्थिती निदान वऱ्हाड प्रांतापुरती सुधारावयाची झाल्यास आपल्या परिषदेला भरपूर कार्यक्षेत्र आहे. शारदा कायदा पास झाल्याने विवाहाची मर्यादा तत्त्वतः वाढली आहे व शिक्षणाच्या मार्गांतील एक अडचण कमी झाली आहे. स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्याच्या सवलती देणे, कायद्याच्या अभ्यासाची, वैद्यकीच्या अभ्यासाप्रमाणेच स्त्रियामध्ये आवड उत्पन्न होणे व स्त्रियांना कायद्याच्या दृष्टीने आपली दीनवाणी स्थिति सुधारून घेण्याच्या मागे लागणे इत्यादी अनेक कामे आहेत व ज्यांना शिक्षण व वेळ आहे त्यांनी तिकडे लक्ष देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु माझी

चित्र क्र. १७० : दिवाण बहादूर (पृष्ठ ७९३ पहा)
श्री के. वा. उर्फ नानासाहेब ब्रम्ह, वकील

चित्र क्र. १७१ : (पृष्ठ ८१३ पहा.)
श्री अंबादेवीची पालखी : सीमोल्लंघनास निघाली.

चित्र क्र. १७२ : अमरावतीचा नवरात्र जत्रा.

चित्र क्र. १६८ : (पृष्ठ ७५३ पहा)
विदर्भ युवक संघाचे सर्वाधिकारी श्री पी. वाय्. देशपांडे, वकील



चित्र क्र. १६९ : (पृष्ठ ७४५ पहा)
दे. भ. वैद्य त्र्यं. गं. उर्फ आचार्य त्र्यंबक गुरुजी

वाहून घेतलेल्या विभूतीने स्वतंत्र अखिल भारतीय स्त्रीविश्वविद्यालयाचा पाया घालून मातृभाषांची उन्नति व स्त्रीशिक्षण या एका काळच्या परस्परविरोधी म्हणजे राजकीय व सामाजिक गोष्टीचा मेळ घातला आहे. अथवा स्वराज्यात होणाऱ्या मातृभाषाप्रधान विद्यापीठांना उदाहरण घालून दिले. त्यानंतर नागपूर विश्वविद्यालयाने मातृभाषेचे माध्यम निदान अर्धवट मान्य करून मातृभाषेचे महत्त्व वाढविले आहे व मुंबई विश्वविद्यालयातही या पद्धतीचा चंचूप्रवेश झाला आहे. आणखी होत नाही याचे कारण राजकीय हेतूसाठी झालेली मुंबई इलाख्यांची विचित्र रचना असून त्याबद्दल तत्रस्थांना फार वाईट वाटत आहे. भाषावार विद्यापीठे स्थापन व्हावी ही मागणी जोराने राजकीय सुधारक व समाजसुधारक दोघेही करीत आहेत व केवळ शैक्षणिक व सामाजिक ध्येय मान्य करणाऱ्या अखिल भारतीय महिला-परिषदेलाही स्वतत्र ठराव करून अखिल भारतीय स्त्रीविश्वविद्यालयाच्या या उपक्रमाबद्दल आपली मान्यता दाखविण्याची जरूर भासली आहे.

यापुढे असा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो तो हा की, अशी वस्तुस्थिती असता या विदर्भ प्रांतीय महिला परिषदेने – किंवा त्याहून अधिक व्यापक तऱ्हेने बोलावयचे झाल्यास अखिल भारतीय महिला परिषदेने–आपले कार्यक्षेत्र राजकीय गोष्टींना ज्यात बहिष्कार घातलेला आहे किंवा राजकीय चळवळीचे बाबतीत तटस्थ वृत्ति धारण केलेली आहे असे ठेवावे किंवा कसे ? माझ्या विचाराप्रमाणे या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी म्हणजे होय ! कार्यक्षेत्र स्वतंत्र व तटस्थच ठेवावे असे आहे, कारण या दोन्ही चळवळीचे ध्येयामध्ये भेद मी मानते असे नसून मार्गामध्ये भेद मानते. खऱ्या राजकीय सुधारकाला ज्याप्रमाणे नुसते राजकीय स्वातंत्र्य पुरेसे वाटणार नाही तर ते स्वातंत्र्य राष्ट्रातील सर्व व्यक्तींना सारखे मिळावे असे वाटेल त्याच प्रमाणे खऱ्या समाजसुधारकाची उडी ही व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, स्त्री–स्वातंत्र्य येथे न थांबता अंतिम राष्ट्रस्वातंत्र्याखेरीज त्याचेही समाधान होणार नाही. असे असता देखील दोन्ही कार्यक्षेत्रे वेगळी राखावी असे म्हणण्याचे कारण पहिले असे की, कोणतेही काम करावयाचे म्हणजे त्याची काहीतरी मर्यादा आखून घ्यावी लागते व दुसरे असे की, या दोन चळवळीचो ध्येये एकच असली तरी मार्गामध्ये फरक आहे. अगणित कामे आपणापुढे पसरली आहेत पण त्यापैकी आपले कार्यक्षेत्र ठरविताना आपणाला कोणते जमेल हे ठरवून ते मात्र सतत केले पाहिजे. या दृष्टीने पाहता ज्यांना पक्षनिष्ठ राजकारण

सोडून निव्वळ सामाजिक अगर शैक्षणिक काम करणे जमेल त्यांनी त्या कार्याकडे आपणास वाहून घेतले तर त्यांत चूक कोणती ? येथपर्यंत सर्व ठीक जमते. परंतु वादाला सुरवात होते ती याचे पुढे. पक्षनिष्ठ फिरते राजकारण व पक्षनिष्ठविरहित–त्या मानाने स्थिरतर–सामाजिक कार्य याची तुलना होऊ लागली म्हणजे. अधिक महत्त्वाचे कार्य म्हणजे राजकारण व समाजकार्य करणे हे कमी दर्जाचे असा ध्वनि निघू लागतो व तो समाजकार्यकर्त्यांना आवडत नाही. आमचेही कार्य तितकेच महत्त्वाचे आहे हे लोकांनी कबूल केले पाहिजे अशी धडपड सुरू होते. वस्तुतः दोन्ही कार्ये सारख्याच महत्त्वाची आहेत पण सामाजिक, शैक्षणिक या गोष्टीचे स्वरूप नित्य असल्याने ते उठून दिसत नाही इतकेच. समुद्राची एक लाट येते व शेजारील कड्याला धक्का देऊन कडा पाडून टाकते पण पाण्याचा साधा प्रवाह दररोज तेथे येऊन कड्यावर घांसून घांसून कड्याचा पाया पोखरीत असतो ही गोष्ठ उठून दिसली नाही तरी सत्य आहे. कडा कोसळतांना पाहून चकित झालेला प्रेक्षक जरी सर्व श्रेय त्या राक्षसी लाटेला देईल तरी शास्त्रज्ञाचे दृष्टीतून तो पाण्याचा संथ प्रवाह सुटणार नाही व तो दोहींना सारखेच महत्व देईल व आश्चर्यचकित झालेल्या प्रेक्षकालाही आज नाही तरी उद्या ते पटेल.

राजकारणाखेरीज इतर गोष्टीत पडणारांनी आपली मनोवृत्ति अशीच राखावी असे मला वाटते. राजकारण महत्त्वाचे की समाजकारण महत्त्वाचे या वादात आपला वेळ खर्च न करता जो सर्वात कमी मान असेल तो पतकरावा. काहीतरी उपयुक्तता आहे हे कबूल केल्यावर ती उपयुक्तता सर्वात श्रेष्ठ, पहिल्या नंबरची आहे हा वाद घालण्यात अर्थ नाही. शेवटचा नंबर मान्य करून कामाला सुरवात करू या. महाराष्ट्रात शिवाजीने राज्यस्थापना केली त्यापूर्वी साधुसंतांनी धार्मिक बाबतीत जागृति केली व त्यामुळे शिवाजीच्या कार्यास जमीन तयार झाली असे इतिहासकार आता म्हणतात. त्यावेळी खुद्द साधुसंतांनाच आपण राज्यस्थापनेचा पाया घालीत आहोत असे वाटले नसेल, मग यशासाठी भाषण कोठले ? तरी काम व्हावयाचे ते झालेच. साधुसंतांनी धार्मिक जागृति केली पण शिवाजीच्या राजकीय जागृतीस ती उपयोगी पडली. हीच गोष्ट लक्षात घेऊन ज्याला या गोष्टीची आवड असेल त्यांनी या कार्यात पडावे व आमच्या कार्याला पहिल्या नंबरचे महत्व द्या हा वाद सोडून द्यावा.

मला देत आहा व आपली अंतकरणपूर्वक असलेली इच्छा पाहून मलाही ते आमंत्रण स्वीकारण्याचा मोह होत आहे. तरी पण कार्याच्या महत्त्वाचा विचार करू लागले म्हणजे मात्र मला ते पार पाडण्याचे सामर्थ्य आहे. किंवा कसे याची जबरदस्त शंका उत्पन्न होते व 'प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः' या चरणाची आठवण होते. माझ्या मनात संशय उत्पन्न करणारी दुसरी गोष्ट म्हणजे माझा दोन वर्षांचा परदेशी प्रवास. बाहेरचे जग पाहिल्याने जगाचा अधिक अनुभव येतो म्हणतात व आपणास माझे नाव या कामासाठी सुचावयास हेहि एक कारण असावे, परंतु माझ्यामधील संशय वाढविण्यास तीच गोष्ट कारण होत आहे. मी हिंदुस्थानात नसलेली दोन वर्षे, इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. यापूर्वी कधी इतक्या तीव्रपणाने न दिसलेले जनता जनार्दनाचे विराट स्वरुप या दोन वर्षांतच प्रगट झाले आणि या सर्व महत्त्वाचे काळात मी प्रत्यक्ष हजर नसल्याने– जरी वर्तमानपत्राद्वारे मला काही हकीगत कळत होती तरी–मला आज सर्वच जग नवीन वाटत आहे व एखादा मधील दुवा तुटलेल्या माळेप्रमाणे अगर एखादा झोपी गेलेला दीर्घकालाने जागा व्हावा त्याप्रमाणे माझ्या मनाची स्थिती होऊन गेली आहे.

अखिल भारतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन १९२६ साली पुणे येथे झाले व त्यानंतर पाटणा, दिल्ली, मुंबई व लाहोर अशा चार ठिकाणी अधिवेशने होऊन आता साहावे अधिवेशन मद्रास येथे येत्या डिसेंबरमध्ये होणार आहे. महिला परिषदेने पहिली दोन वर्षे आपले कार्यक्षेत्र केवळ शैक्षणिक ठरवून घेतले होते व नंतर त्यात सामाजिक गोष्टीचीही भर घालण्यात आली व या दृष्टीने पाहता आजच्या परिषदेचे कार्यक्षेत्र म्हणजे राजकीय गोष्टी, विशेषतः ज्याला पक्षनिष्ठ राजकारण अगर अनित्य किंवा फिरते राजकारण म्हणता येईल तेवढे वगळून बाकीच्या सर्व गोष्टींचा–शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक यांचा–यांत समावेश होतो असे म्हणण्यास हरकत नाही. राजकीय गोष्टी, जरी ते पक्षनिष्ठ फिरते राजकारण आहे म्हणून वगळल्या तरी त्यांचा परिणाम या इतर चळवळीवर होत नाही अगर इतर चळवळी राजकारणास मुद्दाम दूर लोटीत आहेत असे नाही. त्यांचा होणारा योग्य तो परिणाम स्वीकारण्यास या चळवळीच्या मंडळींनी आपली मने त्या बाबतीत संस्कारक्षम ठेवली आहेत. पक्षनिष्ठ राजकारणाचा उत्कृष्ट नमुना म्हणजे राष्ट्रीयसभा अगर काँग्रेस परंतु काँग्रेसचा

मुख्य उद्देश जो वर पासून कामाला सुरुवात करून ही चळवळीची लाट अगदी खेड्यापाड्यापर्यंत नेऊन पोचवावयाची व प्रत्येक जिल्हा, तालुका, गावे, खेडी येथपर्यंत लहान लहान शाखा उत्पन्न करून तेथे ही चळवळ वर्षभर चालू ठेवावयाची, त्या उद्देशाचा अखिल भारतीय महिला परिषदेचे कार्यकर्त्यांचे मनावर परिणाम झालेला असून, या महिला परिषदेच्याही प्रांत निहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय अशा शाखा उत्पन्न झालेल्या असून वर्षभर काम चालू राहण्याची सोय त्यांचे द्वारे होत आहे.

विदर्भ महिला परिषद अखिल भारतीय महिला परिषद यांच्या ध्येयाचा विचार करू जाता एका गोष्टीचा विचार करावासा वाटतो. अशा तऱ्हेने राजकीय गोष्टीपासून अलिप्त राहणे योग्य आहे काय ? राजकीय चळवळीचे महत्त्व व सामाजिक चळवळीचे महत्त्व कोणालाच अमान्य करता येत नाही. प्रश्न येतो तो येवढाच की, कोणाला किती महत्त्व द्यायचे. सामाजिक सुधारणा आधी की राजकीय सुधारणा आधी हा वाद फार जुना–टिळक आगरकरांपासून किंबहुना नवीन हिंदुस्थानच्या जन्मापासून अगर त्याहून निश्चित सांगायचे तर इंग्लिश शिक्षणाचा आस्वाद घेऊन नवीन तऱ्हेने विचार करू लागलेल्या पण स्वत्व राखण्यासाठी व्याकूल झालेल्या पहिल्या पिढीपासून--आहे. आज तरी स्थिती अशी आली आहे की, हे दोन सुरवातीस परस्परभिन्न असणारे प्रवाह आज इतके जवळ आले आहेत की, दोन्ही प्रवाह एकमेकात मिसळून एकरूप होतात असे म्हटले नाही तरी एकातील रंगाची छटा दुसऱ्यात दिसल्याखेरीज राहत नाही.

अस्पृश्यतानिवारण हा एक वेळ अगदी सामाजिक किंबहुना धार्मिकही वाटणारा विषय राष्ट्रीय सभेच्या हेतूत शिरला. त्याच प्रमाणे पटेल बिल, शारदा कायदा इ. समाजिक वाटणाऱ्या गोष्टी राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या लोकांनी हातामध्ये घेतल्या व राजकीय गोष्टी जेथे होतात त्या सभागृहातून म्हणजे (Legistative Assembly व Councils) मध्ये, त्यासंबंधी ठराव केले. उलट स्वदेशीसारखी एकवेळ केवळ राजकीय वाटणारी व १९०५ च्या बंगभंगाच्या चळवळीला जी कारणीभूत झाली ती गोष्टही आज नाकारणारा कोणी समाजसुधारक असेल असे वाटत नाही. मातृभाषेला महत्त्व देणाऱ्या समर्थ विद्यालयासारख्या संस्था एकाकाळी केवळ राजकीय मतांचा प्रचार करणाऱ्या मानल्या जात, तर आज प्रो. कर्वे यांच्यासारख्या केवळ समाजसुधारणेस

(९) हिंदुधर्माला कलंकभूत असलेली अस्पृश्यता काढून टाकण्याचा स्त्रियांनी मनापासून प्रयत्न करावा.

(१०) १९२६ इ. साली प्रांतिक शिक्षण खात्याने एक तज्ज्ञ स्त्रियांची कमिटी, स्त्री शिक्षणातील सुधारणांचा विचार करण्यासाठीं, नेमली होती. त्या कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झालेला होता. परंतु पुढे मॅक्फायडन-कमिटीचा रिपोर्ट बहुतेक फेटाळला गेला आहे. तेंव्हा त्याबरोबरच हाही रिपोर्ट फेटाळला जाऊं नये, परंतु शक्य तितक्या लवकर या रिपोर्टास सुरवात व्हावी.

सौ. मथुराबाई द्रवीड यांनी शेवटी अध्यक्ष व सभेस आलेल्या सर्व भगिनींचे गोड शब्दांनी आभार मानिले व अध्यक्षांचे समारोपाचे भाषण होऊन परिषदेचे काम अत्यंत यशस्वी तऱ्हेने पार पडले[१].

१ : मासिक मनोरंजन, (नोव्हेंबर १९३१ पृष्ट ४७०-८२)



सौ. लेडी यशोदाबाई जोशी.
स्वागताध्यक्ष

श्रीमती कमलाबाई देशपांडे, Ph. D.
अध्यक्ष

सौ. कालिंदीबाई घाटे, B A.
चिटणीस

परिशिष्ट क्र. १

(पान ७३१ पहा)

हिजली हत्याकांड : इ. सन १९३१ मध्ये बंगाल मधील हिजली अटेन्शन कॅम्प मध्ये, तेथील अधिकारी व तेथील कैदी यांचे भांडण बरेच दिवस चालू होते. एके दिवशी संध्याकाळी कॅम्प मधील पहारेकरी व कॅम्प मधील कैदी यांच्यात बरीच बोलाचाली झाली. एका कैद्याने शिपाया जवळील बायोनेट हिसकून घेण्याचा प्रयत्न केला अशी शिपायांची तक्रार होती.

दि. १६ सप्टेंबर १९३१ रोजी ५० पोलिस व २५ शिपाई यांनी लाठ्या व बॅटन घेऊन कैद्यांचे बराकीवर हल्ला केला व कोणत्याही तऱ्हेची पूर्व सूचना न देता गोळ्या घालण्यास सुरुवात केली. अर्थात स्वतःचा जीव बचावण्यासाठी कैदी सैरा वैरा पळूं लागले. त्या शिपायांनी एकंदर कॅम्पमध्ये व हॉस्पिटलमध्ये १०० गोळ्या झाडल्या. इतकेच नव्हे तर जेवणाच्या खोलीत बाँथरूम मध्ये, जेथे जेथे कैदी आढळले, तेथे तेथे त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. अशा रीतीने २० कैदी जखमी झाले. संतोषकुमार मित्र हा कलकत्त्याचा स्थानबद्ध व तारकेश्वर सेन हे दोघे स्थानबद्ध पोलिसांच्या हल्ल्यात ठार झाले.

पोलिसांना गोळ्या सोडण्याचा हुकुम झाल्यामुळे उत्तेजन आले, व निःशस्त्र अशा कैद्यांवर त्यांनी बेजबाबदारपणे हल्ला करून गोंधळ माजविला. त्यावेळी त्यांना आवरून धरील असा अधिकारी तेथे नव्हता. दोन मिनिटाच्या अंतरावर असलेला कमांडर एक तासांनी तेथे आला. अर्थात त्याच्या संमतीने हा प्रकार घडला असे लोक म्हणू लागले. नंतर सरकारने या घटनेच्या चौकशीसाठी कमिशन नेमले. परंतु त्याचा अभिप्राय पोलिसांचे बाजूनेच आला होता. या घटनेला 'हिजली हत्याकांड' या नावाने त्यावेळी प्रसिद्धि मिळाली होती व सर्व देशभर या प्रकाराचा निषेध करण्यात आला होता[१].

(१ : भारतीय स्वातंत्र्य युद्धाचे रणझुंझार : सं. शं. रा. दाते. पा. १६९)

इसवी सन १९३२

स्वातंत्र्य युद्ध पुन्हा सुरू झाले.

दि. २ जानेवारीचे मध्यरात्री दिल्लीवरून व्हॉईसरॉयने महात्मा गांधींना तारेने कळविले की, "तुम्ही पाठविलेल्या तारेत सरकारला सविनय कायदे भंगाची धमकी दिली आहे व सरकार असल्या धमकीला तोंड द्यावयास तयार आहे." ही तार वाचताच 'युद्ध सुरू झाले' असे उद्‌गार गांधीजींनी काढले आणि "तुम्ही दिल्ली करार जाणून बुजून मोडला आहे. सरकारी आव्हानाचा आम्ही स्वीकार करतो." अशी तार व्हॉईसरॉयला केली. त्याबरोबरच काँग्रेसच्या कार्यकारिणीने हे भविष्य जाणूनच काँग्रेसची घटना तहकूब केली व पुन्हा सर्वाधिकारी नेमण्याच्या सूचना सर्व काँग्रेस कमेटयांसाठी जारी केल्या होत्या.

बाबू सुभाषचंद्र बोस यांना अटक

निषेधार्थ जाहीर सभा.

बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी बाबू सुभाषचंद्र बोस यांना सरकारने अटक केली. त्या अटकेचे निषेधार्थ, दि. ३ जानेवारी रोजी सायं. साडे सहा वाजता जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली, सभा भरून तीत श्री. बामणगावकर, श्री. पुरुषोत्तमराव देशपांडे आणि श्री. संभाजीराव गोखले यांची भाषणे झाली होती.

म. गांधींना अटक : हरताळ, मिरवणूक

महात्मा गांधींना अटक झाल्याची बातमी उमरावतीत दि. ४ जानेवारी रोजी दुपारी पोचली. त्याबरोबर सर्व शहरात हरताळ पाळण्यात

येऊन सायंकाळी ५ वा. जोग चौकातून महात्मा गांधींच्या तसबिरीची फुलांच्या वर्षावात भव्य मिरवणूक काढण्यात आली व ती शहराच्या प्रमुख मार्गाने परत येऊन तेथेच वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पाच-सहा हजार लोकांची प्रचंड जाहीर सभा होऊन तीत महात्माजींचे अभिनंदन करण्यात आले होते. सभेत सर्वश्री बामणगावकर, हरिहरराव देशपांडे, पी. वाय्. देशपांडे, सौ. विमलताई देशपांडे, व सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांची भाषणे झाली. सभेत सौ. लक्ष्मीबाई जोशी (मुर्तिजापूर) यांनी सोन्याची अंगठी व सौ. विमलाबाई देशपांडे यांनी सोन्याचा हार काँग्रेस फंडास अर्पण केला होता. +

स्त्रियांची सभा : महात्मा गांधी यांचे अभिनंदनार्थ, दि. ५ जानेवारी रोजी दुपारी ब्रम्हविद्या मंदिरात, स्त्रियांची सभा भरून, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. विमलाबाई देशपांडे व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर ह्यांची भाषणे झाली.

वीर वामनराव दादांचे फर्मान : "नोकरशाहीने दुराग्रहाने गांधी-तहनामा पायाखाली तुडवून काँग्रेसला युद्धाला पाचारण केल्यामुळे निरुपायास्तव ह्या आव्हानाचा स्वीकार करून सत्याग्रहाचे शांतीमय रणकुंड पुन्हा पेटविणे काँग्रेसला प्राप्त झाले आहे आणि तिने त्याप्रमाणे स्वातंत्र्ययुद्धाचा पुकारा केला आहे. तेव्हा अशा आणिबाणीच्या वेळी प्रत्येक स्वातंत्र्य भक्ताने सर्वस्वावर तिलांजली देऊन एकदम रणांगणावर येऊन दाखल झाले पाहिजे व जनतेने ह्या स्वातंत्र्य वीरांस युद्धात विजय प्राप्त व्हावा म्हणून सर्वतोपरी साहाय्य केले पाहिजे. काँग्रेसने पुकारलेले युद्ध शांततामय असल्यामुळे युद्धाचा शेवट लागेपर्यंत सत्य व अहिंसा या तत्त्वाची बळकट कास धरून शांतपणाने येतील त्या आपत्ती सहन करून, आपला स्वातंत्र्याचा आग्रह कायम ठेवला पाहिजे. पुढाऱ्यांना एकदम उचलून तुरुंगात डांबून टाकण्याचा प्रतिपक्षाचा इरादा असून, त्याची अंमलबजावणी एकदोन दिवसाच्या आंतच होईल अशी स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. पुढाऱ्यांच्या अभावीही लोक हिंमतीने स्वातंत्र्य युद्ध शांतपणे चालू ठेवतील तर, ब्रिटिशांना नमते घेण्यावाचून व हिंदुस्थानास

+ टीप : वर्तुळ परिषदेतून गांधीजी भारतात दि. २८ डिसें., १९३१ रोजी परत आले होते व मुंबईला जनतेने त्यांचे प्रचंड स्वागत केले होते.

स्वातंत्र्य देण्यावाचून गत्यंतर उरणार नाही." असे पत्रक वीर वामनराव जोशी यांनी दि. ५ जानेवारी रोजी प्रसिद्ध केले होते.

जाहीर सभा : दि. ५ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता जोग चौकात वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन त्यांनीच अ. भा. काँग्रेस वर्किंग कमेटीने आंखलेल्या युद्धविषयक योजनेचा अर्थ विशद रीतीने निवेदन केला होता.

काँग्रेस कमेटचा तहकूब : सर्वाधिकारी नेमले.

"इ. स. १९३० च्या स्वातंत्र्य युद्धात वऱ्हाडने सुमारे दोन हजार स्वातंत्र्यवीर रणांगणावर बळी दिले होते. ह्या खेपेस ही संख्या वीस हजारावर गेली पाहीजे." अशी इच्छा राष्ट्रीय वृत्तपत्रांनी व्यक्त करून लोकांना त्यासाठी आवाहन केले होते, त्यांत "...काँग्रेसचे युद्धक्षेत्र अत्यंत विस्तृत असल्यामुळे प्रत्येकास त्यात शक्य ते कार्य करण्यास पूर्ण वाव आहे व त्या दृष्टीने वऱ्हाडात तयारी व्हावी म्हणून वऱ्हाडातील प्रांतिक काँग्रेस कमेटी जिल्हा, तालुका व ग्राम काँग्रेस कमेटचा तहकूब करण्यात येऊन सर्व कामे करण्याचे अधिकार, त्या त्या कमेटीच्या अध्यक्ष व चिटणीसांना देण्यात आले आहेत. वऱ्हाडचे सर्वाधिकारी वीर वामनराव जोशी व कार्यमंत्री श्री. ब्रिजलाल बियाणी हे या पुढे सर्व कामे करतील आणि वऱ्हाडातील काँग्रेसची सर्व कामे चालविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या सर्वाधिकारी व कार्यमंत्र्याची नियुक्ती केली आहे. त्यानुसार अमरावती जिल्ह्याचे सर्वाधिकारी म्हणून डॉ. भोजराज व कार्यमंत्री श्री. हरिहरराव देशपांडे यांची नियुक्ती झाली." असेही जाहीर केले होते.

सर्व बंधुभगिनींनी या प्रसंगी धैर्याने पुढे यावे अशी विनंतीही राष्ट्रीय वृत्तपत्रांनी जनतेस केली होती.

युवक संघानेही सर्वाधिकारी नेमला : काँग्रेस वर्किंग कमेटीने केलेल्या युद्धाच्या घोषणेस अनुसरून विदर्भ युवक संघाने, घटनेची व इतर सर्व कामे तहकूब करून संघाचे अध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे ह्यांना सर्वाधिकारी नेमण्यात आल्याची घोषणा केली होती.

दडपशाहीचे निषेधार्थ सभा : दि. ६ व ७ जानेवारी, सायंकाळी साडे सहा वाजता नेहरू मैदानावर वीर वामनराव यांच्या अध्यक्षतेखाली सरकारच्या

दडपशाहीच्या निषेधार्थ जाहीर सभा होऊन अनुक्रमे श्री. ना. रा. बामणगावकर व श्री. पु. य. देशपांडे यांची पहिल्या सभेत व डॉ. सोमण, श्री. ब्रिजलालजी बियाणी आणि श्रीमती दुर्गाताई जोशी यांची दुसऱ्या सभेत व्याख्याने झाली होती. शनिवार, ता. ९ रोजी प्रताप चौकात डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून श्री. बामणगावकर प्रभृतींची भाषणे झालीत.

हुतात्म्यांचे पुण्यस्मरण : दिनांक ८ जानेवारी रोजी सायंकाळी वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली नेहरू मैदानात भरलेल्या जाहीर सभेत डॉ. पटवर्धन, डॉ. सोमण, डॉ. भोजराज, डॉ, सबनीस व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांची भाषणे होऊन गेल्या १९३० च्या स्वातंत्र्य युद्धात कामास आलेल्या तीन विदर्भ स्वातंत्र्य वीरांचे जाहीर पुण्य-स्मरण करण्यात आले होते[१].

---

१ : **विदर्भातील तीन हुतात्मे** : १९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनात वऱ्हाडात एकूण तीन देशभक्तांना हुतात्मापद प्राप्त झाले होते. ते तीन हुतात्मे म्हणजे–

हुतात्मा सिद्धेश्वर गोरे : वकील बुलढाणा, हे तेथील दारुचे दुकानावर पिकेटिंग करीत असता, दारु दुकानदाराने फेकून मारलेल्या दगडाचा जबर मार लागून ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांचा अंत झाला होता. ते वयाने तरुण होते व त्यांनी नुकतीच वकिली सुरू केली होती. उमरावतीच्या हिंदू हायस्कूलचे हेडमास्तर रा. ब. गोरे यांचे ते चिरंजीव होते.

हुतात्मा लक्ष्मणराव पाचघरे : उमरावती तालुक्यातील यावलीचे हु. पाचघरे अमरावती जेलमध्ये होते व तेथे त्यांना अवघड असे चक्कीचे काम देण्यात आले. त्याचा परिणाम छातीतील दुखणे सुरू झाले व त्याकडे जेलच्या अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही. ते पुढे न्युमोनियाने जेलमध्ये आजारी होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला होता.

हुतात्मा भाऊगीर : चांदूर रेल्वे येथील हु. भाऊगीर हे अगदी लहान वयातच सत्याग्रह संग्रामात नागपूरला सामील झाले. दारु लिलावाचे वेळी पिकेटिंग करीत असताना त्यांना पकडण्यात येऊन बराच मार देण्यात आला व त्यांचे डोके जोराने भिंतीवर आपटण्यात आल्याने ते बेशुद्ध होऊन पडले व नंतर बरेच आजारी झाले. त्या आजारातच ८–१० दिवसांनी त्यांचा अंत झाला होता.

हा भयंकर आरोप पाहून सर्वांनी या खटल्यात बचाव करावा असे ठरविले आणि सर्वाधिकारी वीर वामनराव जोशी यांनी तशी परवानगीही दिली

सौ. पार्वतीबाईवरील आरोप व त्यांना कैद केल्याची वार्ता शहरात पसरताच शहरभर असंतोष पसरला. रात्री नेहरू मैदानात वीर वामनराव यांचे अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा भरून, देशभक्त दांपत्यांचे अभिनंदन करण्यात आले. सभेत श्री. नारायणराव बामणगावकर, श्री. पु. य. देशपांडे व सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांची उत्साहवर्धक भाषणे झाली व नंतर वीर वामनराव यांचे समारोपादाखल अत्यंत स्फूर्तिदायक असे भाषण झाले होते.

सौ. पटवर्धन यांची जामीनावर सुटका : पाच पाच हजाराच्या दोन जामीना व तितकाच जात मुचलका घेऊन दुसरे दिवशी सौ. पार्वतीबाई यांची मुक्तता करण्यात आली होती व खटला पुढे चालविला जाणार होता.

स्त्रियांची सभा : दि. १७ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता अंबागेट वरील धनसा बिल्डिंगमध्ये सौ. विमलाबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचे अभिनंदन करण्यासाठी स्त्रियांची जाहीर सभा भरली होती. सभेत कु. छबूताई पाटील, अंबूताई साठे, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, सौ. रमाबाई ओक व सौ. सुभद्राबाई जोशी यांची भाषणे झालीत.

लोकनायक अणे यांचे भाषण : दि. १८ जानेवारी रोजी सायंकाळी नेहरु मैदानावर वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत, डॉ. पटवर्धन यांना कडक शिक्षा झाल्याबद्दल व सेठ जमनालाल इत्यादिकांना अटक केल्याबद्दल निषेध दर्शविण्यात आला. मुख्य वक्ते लोकनायक बापूजी अणे हे होते.

श्री. पी. वाय्. देशपांडे : यांना अटक करण्यात येऊन ९ महिने स. म. ची व ५०० रु. दंडाची शिक्षा देण्यात आली. त्यांचे अभिनंदनार्थ दि. १९ रोजी नेहरु मैदानात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. पुरुषोत्तमरावांचे अभिनंदन करण्यात आले. सभेत श्री. बामणगावकर, श्री. सं. वि. गोखले, श्री. ह. वा. देशपांडे, व श्री. गोपाळराव खेडकर यांची भाषणे झाली होती.

डॉ. पटवर्धन आणि श्री. पी. वाय्. देशपांडे यांना उमरावती तुरुंगातून रायपूर तुरुंगात नेण्यात आले होते.

उलट इतर जेलमधून महात्मा भगवानदीन व इतर ११५ राजकीय कैद्यांना उमरावती जेलमध्ये आणण्यात आले होते.

स्वातंत्र्य दिन : दि. २६ जानेवारी रोजी नेहरू मैदानावर जाहीर सभा होऊन स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला वीर वामनराव जोशी हे अध्यक्ष होते. सभेत स्वातंत्र्याचा ठराव वाचून दाखविण्यात आला व अध्यक्षांचे भाषण झाले. प्रार्थना व राष्ट्रगीत झाले. सकाळी ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला होता.

पेशावर दिन : दि. २९ जानेवारी रोजी रात्री नेहरू मैदानात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून पेशावर दिन साजरा करण्यात आला. याच सभेत लोकनायक बापूजी अणे यांचे अभिनंदनही करण्यात आले होते. सभेत श्री. बामणगावकर आणि श्री. संभाजीराव गोखले यांची भाषणे झाली.

डॉ. सोमण–भोजराज यांना अटक : करण्यात येऊन ताबडतोब तुरुंगात नेण्यात आले.

दि. ३० रोजी हरिहरराव देशपांडे यांना दर्यापूरला अटक करून अमरावती जेलमध्ये आणण्यात आले होते.

वरील देशभक्तांवर खटले चालून डॉ. सोमण व डॉ. भोजराज यांना प्रत्येकी एक वर्ष सक्त मजुरी व १५० रु. दंडाची शिक्षा देण्यात आली. हरिहरराव यांचा खटला चालू होता.

वरील देशभक्तांना शिक्षा होताच त्यांचे अभिनंदनार्थ दि. १७ फेब्रुवारी रोजी रात्री वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्री. बामणगावकर व श्री. संभाजीराव गोखले यांची भाषणे झाली होती.

उद्घाटन : उमरावतीत नवीन स्थापन झालेल्या वक्तृत्वोत्तेजक मंडळाचे उद्घाटन, दि. २० फेब्रुवारी रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे हस्ते ब्रम्हविद्या मंदिरात सायं. ५ वाजता झाले होते.

फिरती व्याख्याने : दि. २० फेब्रुवारी रोजीच सायंकाळी ४ ते ८ चे दरम्यान, शहरातील निरनिराळ्या मोहोल्ल्यातून स्वदेशी व बहिष्काराचे प्रचारार्थ सुमारे पंचेचाळीस ठिकाणी व्याख्याने झाली.

जाहीर सभा : दडपशाहीमुळे स्थगित झालेल्या पुरी येथील काँ. अधिवेशनाचे स्मरणार्थ दि २१ फेब्रुवारी रोजी रात्रौ आठ वाजता नेहरू मैदानात वीर वामनराव यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. बामणगावकर व श्री. संभाजीराव गोखले यांची भाषणे झाली होती.

सौ. पटवर्धन यांना एक वर्ष शिक्षा : सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचेवर चाललेल्या खटल्याचा निकाल दि. २६ फेब्रुवारी रोजी लागून त्यांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली होती. या शिक्षेविरुद्ध सौ. पटवर्धन यांनी वरिष्ठ कोर्टाकडे अपील केले व त्याचा निकाल (कलम ११७ व ३०२) दि. ३ एप्रील रोजी लागून, सेशन कोर्टाने खालच्या कोर्टाचा निकाल कायम केला. फक्त सक्तमजुरीऐवजी साधी कैद केली. शिवाय त्यांना ब वर्ग देण्यात आला. सौ. पटवर्धन यांना प्रथम उमरावती तुरुंगात व नंतर नागपूर जेलमध्ये नेण्यात आले होते.

राष्ट्रध्वज दिन : दि. ३० एप्रील रोजी सायंकाळी नेहरू मैदानातून राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढण्यात येऊन रात्री त्याच ठिकाणी जाहीर सभा झाली.

सकाळी शहरात दोन तीन ठिकाणी सामुदायिक राष्ट्रध्वज वंदनाचे कार्यक्रमही झालेत.

वासनवमी उत्सव : भाजीबाजारातील समर्थ मंडळाचे विद्यमाने महाराष्ट्र धर्म प्रवर्तक श्री. समर्थ रामदास स्वामी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्यानिमित्त महाप्रसाद व अन्नदान करण्यात आले.

नमस्कार संघातर्फेही ब्रम्हविद्या मंदिरात हा उत्सव दि. २७ ते २९ पावेतो साजरा करण्यात आला होता.

जाहीर सभा : दि. २७ एप्रील रोजी रात्री नेहरू मैदानात सेठ मथुरादासजी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्री. मराठे व वीर वामनराव जोशी यांची व्याख्याने झाली होती.

वनिता समाज : वनिता समाज ही महिलातून कार्य करणारी उपयुक्त अशी फार जुनी संस्था आहे. या संस्थेने आपली एक शाखा २८ फेब्रुवारी १९३२ रोजी बुधवारा विभागात बुटी यांचे इमारतीत सुरू केली होती. या शाखेचे उद्घाटन सौ. मथुराबाई द्रवीड, हेडमिस्ट्रेस गर्ल्स हायस्कूल यांच्या हस्ते झाले. समारंभास स्त्रियांची खूप गर्दी झाली होती.

वऱ्हाडचा प्रश्न : राष्ट्रपंचायतीचे (लेजिस्टेटिव्ह असेम्ब्लीचे) सभासद, उमरावतीचे श्री. शंकरराव जोग यांनी एप्रील १९३२ मध्ये व्हॉईसरॉयना पत्र पाठवून, वऱ्हाडच्या प्रश्नाशी संबंध असलेल्या सर्व पक्षांचे संमतीशिवाय हा प्रश्न निकालात काढणे न्याय्य ठरणार नाही असे कळविले होते व त्यासाठी त्यांनी हिंदुस्थान सरकार, मध्यप्रांत सरकार, हैद्राबाद सरकार व वऱ्हाडातील जनता या चार पक्षाच्या प्रतिनिधींची परिषद भरवावी अशी सूचना केली होती.

खुदाई खिदमतगार : वीर वामनराव जोशी कृत 'खुदाई खिदमतगार' या नव्या नाटिकेचा पहिला प्रयोग दि. ३ मार्च रोजी मनोहर स्त्री संगीत नाटक मंडळीने गणेश नाटकगृहात करून दाखविला होता.

या नाटिकेत मोगल सम्राट जहांगीर व नूरजहान यांची न्यायनिष्ठा उत्कृष्ठ रीतीने दाखविण्यात आली आहे.

याच नाटक मंडळीने उमरावतीचे मुक्कामात श्री. बामणगावकृत 'नामदार ए.एस्.एस्.' ही नाटिकाही रंगभूमीवर आणली होती.

प्रभातफेरी संघ : उमरावतीच्या प्रभातफेरी संघातर्फे दररोज प्रभातफेरी सुरू असे. गेल्या बहिष्कार सप्ताहात या संघाने सप्ताहभर सायंफेरी काढून स्वदेशीचा प्रचार केला होता.

महात्मा गांधी दिन : दि. ४ मार्च रोजी सायंकाळी गांधी-दिना-निमित्त नेहरु मैदानातून महात्मा गांधींच्या फोटोची मिरवणूक काढण्यात आली होती व रात्री गांधी चौकात जाहीर सभा झाली होती.

बेकार संघाची स्थापना : दि. १ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता गणेश नाटकगृहात बॅरि. रामराव देशमुख यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तींत बेकार संघाची स्थापना करण्यात आली होती.

वऱ्हाड सर्वपक्षीय समिती : दि. ६ मार्च रोजी, वऱ्हाड सर्व पक्षीय समितीची बैठक सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीला खापर्डे वाड्यात भरून, वऱ्हाड निजामास द्यावा की नाही ? याबद्दल हिंदुस्थान सरकारने मध्यप्रांत सरकारला विचारणा केली होती काय ? वऱ्हाड सर्व पक्षीय समितीतर्फे एक खलिता मध्यप्रांत सरकार मार्फत वर्तुळ परिषदेकडे (गोलमेज परिषदेकडे) गेला. त्यावर मध्यप्रांत सरकारने काय मत दिले ? ह्याची माहिती मिळविणे वगैरे संबंधी बैठकीत विचार होऊन एका शिष्टमंडळाने गव्हर्नरांची भेट घ्यावी असे ठरले व तसा ठरावही करण्यात आला होता. ह्या ठरावाची प्रत श्री. बाबासाहेब खापर्डे यांना पाठविण्याचे ठरविण्यात आले.

या समितीचे अध्यक्ष लोकनायक अणे हे तुरुंगात असल्यामुळे त्यांनी आपल्या जागेचा राजीनामा पाठविला होता. त्यावर विचार होऊन राजीनामा मंजूर न करता त्यांनाच अध्यक्ष कायम करण्याचे ठरविण्यात आले होते.

टीप : **बडपशाहीचा आढावा** : "वऱ्हाड मध्यप्रांतात माहे फेब्रुवारी व मार्च १९३२ या दोन महिन्यातच एकंदर एकहजार त्र्याण्णव राष्ट्रसभा भक्तांवर कायदेभंगाबद्दल खटले भरले होते. पैकी एक हजार नऊ जण शिक्षा भोगीत होते.

दंड एकंदर ४५२८९ रुपये ठोठावण्यात आला. पैकी १०९२५ रु. दंड वसूल झाला होता."

१९३० मध्ये कायदेभंगाची चळवळ ह्या प्रांतात झाली होती, त्यावेळी दहा महिन्यात ४००० वर लोकांना शिक्षा झाली होती. दंडाचे प्रमाण तर ह्यावेळी कल्पनातीत आहे.

"श्री. सुभाषचंद्र बोस व श्री. शरदचंद्र बोस या दोन्ही बंधूंना शिवणीचे तुरुंगात एकाच ठिकाणी ठेवले असून, सुभाष बाबूंना भोजनभत्ता म्हणून एक रुपया रोज देण्यात येतो व तो वाढविण्याचा सरकार विचार करीत आहे."

वरील माहिती मार्च १९३२ मध्ये प्रांतिक कायदेमंडळात श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी विचारलेल्या प्रश्नास सरकारतर्फे देण्यात आली होती.

उमरावतीचे स्वदेशी प्रचार मंडळ : दि. ७ मार्च १९३२ इ. रोजी उमरावतीला स्वदेशी प्रचार मंडळ स्थापन करण्यासाठी गणेश नाटक गृहात श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील प्रमुख नागरिकांची सभा भरली होती.

'लोकांच्या वाढत्या स्वदेशी व्रतासंबंधीच्या औदासिन्यामुळे देशाची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस निकृष्ठावस्थेस पोचत चालली आहे व म्हणून स्वदेशीचा प्रचार व्हावा, स्वदेशी वस्तूं संबंधी लोकांना आपुलकी वाटावी या उद्देशाने हें मंडळ स्थापन्याचा उपक्रम केला' असे त्या बाबतचे या सभेचे ठरावात म्हटले होते व ही संस्था निर्माण करण्यासाठी घटना तयार करण्याकरिता खालील लोकांची कमेटी नेमण्यात आली होती. अध्यक्ष–सर मोरोपंत जोशी, उपाध्यक्ष–श्री. अण्णासाहेब देशपांडे आणि सभासद सर्वश्री ठाकुर, नाटेकर, सौ. विमलाबाई देशपांडे, श्रीमती शांताबाई भट, डॉ. भट इत्यादी.

शेवटी श्री. वि. दा. ब्रम्ह यांचे परिणामकारक भाषण व अध्यक्षांचे समारोपाचे भाषण झाले होते.

ज्ञान प्रसारक मंडळाचा अभिनव उपक्रम : उमरावतीच्या ज्ञान प्रसारक मंडळाने, स्त्रियांसाठी एक फिरते वाचनालय चालू केले होते. आणि पुरुषांसाठी एका अभिनव पद्धतीचे ज्ञान केंद्र सुरू करण्याची योजना आखली होती. त्यानुसार, गावातील निरनिराळ्या सद्गृहस्थाकडे जी वृत्तपत्रे येतात ती वाचून झाल्यावर (जुनी) गोळा करून त्यांतील विविध विषयाचा मजकूर कापून त्या कात्रणाचे फाईल्स तयार करायचे व अशी फाईले या ज्ञानकेंद्रात ठेवायची अशी ही योजना होती. उत्कृष्ट संदर्भ ग्रंथालय असे त्याचे स्वरूप होते.

या ज्ञानप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. ना. प्र. हिरुरकर, उपाध्यक्ष श्री. के. बी. देशमुख, श्री. म. य. म्हैसाळकर, श्री. का. गो. भंडारे व श्री. वि. बं. चौबळ आणि चिटणीस श्री. द. स. सुळे हे होते.

या योजनेनुसार एकूण ५५ विषयांची फाईले तयार करण्याचा मंडळाचा विचार होता. त्यांत म्युनिसिपॅलिटी, प्राथमिक शिक्षण, धंदे, स्वदेशी व राजकारण, प्रांतिक कायदे मंडळ, वरिष्ट कायदे मंडळ, सैन्य, अर्थशास्त्र,

इतिहास, बेकारी, विश्वविद्यालये, कायदे–कोर्ट, स्त्री–शिक्षण, कलाकौशल्य, चरित्रे इत्यादी विषय होते.

कायदेमंडळात डॉ. पटवर्धन : दि. १६ मार्च रोजी उमरावतीच्या बार असोसिएशनची सभा होऊन तीत, डॉ. पटवर्धन यांना झालेली शिक्षा अती जबर असून ती कमी व्हावी अशा गव्हर्नरांना विनंती करणारा ठराव पास झाला होता.

त्याच सुमारास मध्यप्रांत कायदे मंडळाचे बैठकीत श्री. बाबासाहेब खापर्डे यांनीही "उमरावतीचे डॉ. पटवर्धन यांना राजद्रोहाचे आरोपावरून जी तीन वर्षाची शिक्षा झाली ती कमी करण्याचा सरकारचा विचार आहे काय ?" असा प्रश्न विचारला होता. त्यावर सरकारतर्फे असे सांगण्यात आले होते की, "सरकार डॉ. पटवर्धन यांच्या खटल्यातील कागद पत्र मागवून विचार करील." (त्या प्रमाणे सरकारने डॉ. पटवर्धन यांची शिक्षा एप्रील १९३२ मध्ये कमी केली होती.)

उमरावती म्युनिसिपॅलिटीत अंदाधुंदी : दि. ११ मार्च रोजी गांधी चौकात रात्री साडे आठ वाजता श्री. गुलाबराव बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून, तीत श्री. रामेश्वरजी अवस्थी म्यु. सदस्य यांनी, नगरपचायतीचे कारभारावर सडकून टीका केली होती.

उमरावतीत दडपशाहीचे सत्र : दि. ७, ८, ९ व १० मार्च १९३२ रोजी रात्री गांधी चौकात जाहीर सभा भरून तीत जप्त वांड्मयातील उतारे वाचून दाखविण्यात आले होते. सौ. रुक्मिणीबाई मालाणी श्री. लक्ष्मीनारायणजी मालाणी, श्री. माणिकलालजी सोमाणी व श्री. डवलेकर ह्यांनी ह्या जप्त वाड्मय वाचण्याचे कामी भाग घेतला होता.

ता. ९ रोजी दुपारी उमरावतीत, जिल्हा काँग्रेस कमेटीचे तिसरे सर्वाधिकारी श्री. मथुरादासजी, श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. राजाभाऊ बारलिंगे, श्री. लक्ष्मीनारायण मालाणी व श्री. दुबे यांना अटक करण्यात येऊन, श्री. सहस्त्रबुद्धे व श्री. बारलिंगे यांना प्रत्येकी सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा व ५० रु. दंड, श्री. मालाणी यांना ३ महिने सक्त मजुरी व १०० रु. दंड, श्री. दुबे यांना ४ महिने स. म. याप्रमाणे शिक्षा देण्यात

आल्या होत्या. श्री. मथुरादास वसनजी वैद्य यांना ९ महिन्यांची शिक्षा देण्यात आली होती.

मौलाना अबुल कमाल आजाद यांच्या अध्यक्षतेखाली गांधी चौकात सभा भरून वरील शिक्षा झालेल्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

कला कौशल्याचे प्रदर्शन : उमरावतीच्या वनिता समाज आणि बालमंदिर या संस्थातर्फे म्यु. ए. व्हि. स्कूलचे हॉल मध्ये दि. २० मार्च पासून, स्त्रिया व शाळेतील मुले यांच्या हस्तकौशल्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. सौ. विमलाबाई देशमुख यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे दि. २० रोजी उद्घाटन करण्यात आले.

बेकार संघाच्या सभा : बेकार संघामार्फत दि. ११ मार्च रोजी रात्री हमालपुऱ्यात सभा होऊन बेकारांच्या संघटनेचे महत्त्व वक्त्यांनी सोप्या शब्दात समजावून सांगितले होते.

त्यानंतर या संघातर्फे दि. १६, १७ व १८ रोजी, अनुक्रमे महाजनपुरा, भाजीबाजार आणि खोलापुरी गेट येथेही प्रचार सभा घेण्यात आल्या होत्या.

विदेशी साखरेवर बहिष्कार : विदेशी साखर विकू नये व विकत घेऊ नये म्हणून उपदेश करणाऱ्या सभा रविवार दि. २० मार्च रोजी आठवडी बाजारात व नंतर गांधी चौकात डॉ. सबनीस यांचे अध्यक्षतेखाली झाल्या होत्या.

मुंबई नाटिका संयुक्त मंडळी : श्री. अनंतराव गद्रे यांच्या मुंबई नाटिका संयुक्त मंडळीचा मुक्काम मार्च १९३२ च्या शेवटच्या आठवड्यात उमरावतीस होता. या मंडळीने छोट्या दोन तासांच्या नाटिका रंगभूमीवर सादर करून रसिकांचे मनोरंजन केले. उमरावतीला अशा नाटिका रंगभूमीवर प्रथमच झाल्या व अशा नाटिका करणारी महाराष्ट्रातील ही पहिली नाट्य संस्था होती. त्याच प्रमाणे अशा छोट्या नाटिका लिहीणारे श्री. अनंतराव गद्रे हेही पहिले नाटककार होते.

या नाट्य संस्थेची 'कुमारी १९३१' 'आई' 'प्रीतिविवाह' वगैरे नाटिका कोठेही लोकादरास पात्र होण्यासारख्या होत्या. या मंडळीतील

नटवर्ग समंजस असून, कु. राम ह्या बाल नटास श्री. बामणगावकर यांच्या हस्ते व नंतर वीर वामनराव यांच्या हस्ते पदके देऊन गौरव करण्यात आला होता.

जाहीर सभा : दि. २४ मार्च रोजी रात्रौ गांधी चौकात श्री. दिक्षित यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. बाळू मराठे यांचे अटके निमित्त त्यांचे व दि. २६ मार्चचे सभेत श्री. देव यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

अस्पृश्यांची सभा : दि. २३ मार्च रोजी हमालपुऱ्यात अस्पृश्य समाजाची सभा भरून, अस्पृश्यांस कोणता मतदारसंघ फायदेशीर होईल या विषयावर भाषणे झाली होती.

पाणीपट्टीस विरोध : उमरावती नगरपालिकेने पाणीपट्टीत वाढ केली त्याविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणारे अर्जावर सह्या घेण्याचे आंदोलन या महिन्यात जोरात होते. शेकडो लोक आणि जबाबदार मंडळी अशा अर्जावर सह्या देत होती.

राजा-मुंजे करारास पाठिंबा : दिनांक २१ मार्च रोजी रात्रौ श्री. नाईक एम्. एल्. सी. यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या अस्पृश्य समाजाचे सभेत, अखिल भारतीय दलित संघाचे जनरल सेक्रेटरी श्री. ठवरे यांचे संयुक्त मतदारसंघ अस्पृश्यास हितकारक कसा, या विषयावर व्याख्यान झाले. त्याच सभेत 'राजा-मुंजे' कराराला पाठिंबा देण्यात आला होता.

महात्मा गांधी दिन : दि. ४ एप्रील रोजी रात्रौ गांधी चौकात वीर वामनराव दादा यांचे अध्यक्षतेखाली गांधी दिनानिमित्त जाहीर सभा होऊन श्री. बामणगावकर वगैरेंची भाषणे झाली होती.

पाणीपट्टीचा निषेध : दि. १४ एप्रील रोजी रात्रौ प्रताप चौकात शेठ पन्नालाल सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरून लोकमत लाथाडून नळपट्टी बेसुमार वाढविली या बद्दल, नगरपालिकेचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता. या सभेत श्री घासीराम, शेठ मोहनलाल, श्री. अवस्थीजी व श्री. गुलाबराव वक्षी यांची भाषणे झाली होती.

स्वदेशी वस्तु प्रचारक मंडळ : सदर मंडळाची घटना व नियम तयार करण्यात येऊन ते मंजूर करण्याकरिता दि. १ एप्रील रोजी सायंकाळी जोग चौकात सर मोरोपंत जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन घटना मंजूर करण्यात आली व रीतसर मंडळ स्थापन करण्याचे जाहीर झाले होते. त्यानुसार मंडळ स्थापनेचा ठराव श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी मांडला, त्यास श्री. विश्वनाथराव ब्रम्ह यांनी पाठिंबा दिला. त्याप्रमाणे मंडळाचे अध्यक्ष सर मोरोपंत जोशी व चिटणीस श्री. स. अ. आवटे, श्री. वि. दा. ब्रम्ह आणि सौ. विमलाबाई देशपांडे यांची निवड करण्यात आली होती व या मंडळाचे सभासद वाढविण्याचे ठरविण्यात आले होते.

उमरावतीत कार्यकर्त्यांना शिक्षा : श्री. मोतीरामजी गोरडे, श्री. नारायणराव राऊत, श्री. लक्ष्मणराव वरखेडे या भातकुली येथील कार्यकर्त्यांना उमरावती कोर्टात प्रत्येकी ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. भातकुली कांग्रेस कमेटीचे सर्वात नवे सर्वाधिकारी श्री. मोतीरामजी व एलिचपूर येथील प्रचारक श्री. गो. म. देव यांना प्रत्येकी चार महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली होती.

बेकार संघाचे कार्य : बेकार संघाची स्थापना होऊन एक महिना झाला. त्या अवधीत या संघाने तिघांना नोकऱ्या लावून दिल्या. भाजीपाल्याची व फ्रेममेकिंगची दुकाने काढण्यात आलीत. तसेच मास्तरकी व इतर नोकऱ्यांसाठी सुशिक्षितांची मागणी संघाकडे येते पण बेकार म्हणवून घेण्याची आमच्यातील सुक्षितांना लाज वाटते. या संघाने चैत्रमासातील गौरी निमित्तच्या पत्रिका वाटण्याचे काम स्वीकारण्याचे जाहीर केले होते. या प्रमाणे बेकारांना काम मिळवून देण्याचे प्रयत्न या बेकार संघाकडून होत असत.

'बेकारी कशी नष्ट होईल' या विषयावर या बेकार संघातर्फे दि. ८ एप्रील रोजी भाजी बाजारात श्री. मुळे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत श्री. राजंदेरकर व श्री. बरगडे यांची भाषणे झाली होती.

राष्ट्रीय सप्ताह : दि. ६ एप्रीलपासून राष्ट्रीय सप्ताहानिमित्त दररोज शहरात जाहीर सभा सुरू झाल्या होत्या.

डॉ. सोमण यांची सुटका : दे. भ. डॉ. सोमण यांचा हृदयविकार अधिक बळावल्यामुळे त्यांची दि. ८ एप्रील रोजी रायपूर तुरूंगातून सुटका झाली. त्यांचे वजन १६ पौडांनी घटले होते.

मिश्र मतदार संघाचा पुरस्कार : दि. ८ एप्रील रोजी सायंकाळी म्यु. ए. व्हि. स्कुलच्या हॉलमध्ये श्री. एस्. जी. नाईक, एम्. एल्. सी. यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची जाहीर सभा भरून तीत श्री. प्रभाकरराव भटकर यांचे संयुक्त मतदार संघाचा पुरस्कार करणारे भाषण झाले होते.

श्री. सोमाणी व श्री. कोरान्ने यांना अटक व शिक्षा.

दि. ८ एप्रील रोजी सकाळी उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी श्री. माणिकलाल सोमाणी यांना काँग्रेस कचेरीत व एक तरुण कार्यकर्ते श्री. कृष्णराव कोरान्ने यांना सायंकाळी कलम १७ (१) खाली अटक करण्यात येऊन त्यांना प्रत्येकी ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. शिवाय श्री. सोमाणी यांना ५०० रुपये दंड झाला होता.

मालटेकडीवर राष्ट्रध्वज : दि. ६ एप्रील रोजी अगदी सकाळी कोणा अज्ञात व्यक्तीने मालटेकडीवर राष्ट्रध्वज फडकविल्याचे आढळून आले. तसेच गावात काही लाल शाईने लिहिलेल्या मोठ्या जाहिराती चिटकविण्यात आल्या होत्या. जिल्हा कचेरी व तहसील कचेरीवरही राष्ट्रीय निशाण लावण्यात आले होते. हो निशाणे कोणी लावली याचा पोलिस तपास सुरू झाला होता.

फिरते निरोधन : दि. ८ एप्रीलपासून येथील परदेशी कापडाच्या दुकानावरील फिरत्या निरोधनाच्या चळवळीस सुरुवात झाली होती. अटक कोणास झाली नाही पण निरोधकांची नावे पोलिसांनी लिहून घेतली होती.

जालियानवाला बाग दिन : दि. १३ एप्रील रोजी रात्री गांधी चौकात सौ. सुशीलाबाई सबनीस यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत श्री. बाळ ओझरकर, श्री. तिवाटणे, श्री. जाजू इत्यादी कार्यकर्त्यांची भाषणे झाली होती व त्याच दिवशी जेलमधून सुटका झालेल्या नागपूरच्या तेरा राजबंदींचा सभेत सन्मान करण्यात आला होता.

श्री. गिरगावकर व श्री.तिवाटणे यांना अटक.

उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीचे दोन तरुण कार्यकर्ते श्री. रंगनाथ गिरगावकर व श्री. तिवाटणे ह्यांना अनुक्रमे सकाळी व दुपारी पकडण्यात आले होते. त्यांच्या अभिनंदनाची जाहीर सभा रात्री गांधी चौकात झाली.

या शिवाय बेकायदा मीठ बनविण्याच्या आरोपावरून, सभेची व त्या दिवशीच्या कार्यक्रमाची दवंडी देत असता उमरावतीचे एक स्वयंसेवक श्री. मारुती बर्वे व श्री. कुळकर्णी चिवडेवाला यांनाही अटक करण्यात आली होती.

परदेशी कापडावरील फिरते निरोधन चालूच होते. त्या संबंधी कोणासही पकडण्यात आले नव्हते.

नवे सर्वाधिकारी : श्री. नारायणराव भदे हे उमरावती काँग्रेसचे ५ वे सर्वाधिकारी नियुक्त झाले होते.

जाहीर सभा : दि. १७ एप्रील रोजी रात्री गांधी चौकात नवे सर्वाधिकारी श्री. नारायणराव भदे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन श्री. बाळ ओझरकर, श्री. पुंजाप्पा, श्री. आजूजी व श्री. भागवतकर यांची भाषणे झाली होती.

झेंडावंदन : दि. २४ एप्रील रोजी सकाळी भाजी बाजारात श्री. नारायणराव भदे, जिल्हा काँग्रेसचे पांचवे सर्वाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली मासिक राष्ट्रध्वजवंदनाचा कार्यक्रम पार पडला होता.

जेल अधिकाऱ्याचा निषेध : स्थानिक जेल अधिकाऱ्यांनी राजबंदी बरोबर जे निष्ठुरपणाचे अन्याय्य वर्तन चालविले आहे त्याचा निषेध करण्यासाठी दि. २४ एप्रील रोजी रविवारी रात्री गांधी चौकात सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत श्री. पुंजाप्पा, श्री. खोडे यांची भाषणे झाली व जेल-अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला होता.

पालकांची सभा : "हमालपुरा मराठी शाळा नं. ५ मधील चार हेडमास्तर एका वर्षात, स्कूल कमेटीचे अध्यक्षांनी बदलविले (बदल्या केल्या) त्यामुळे मुलांच्या अभ्यासाची हेळसांड झाली व त्याचे प्रायश्चित विद्यार्थ्यांना परीक्षेत भोगावे लागले. सबब त्या मुलांना प्रमोशन द्यावे" असा, नगर-

पालिकेचे अध्यक्ष व डेप्युटी इन्स्पेक्टर ऑफ स्कुल्स् यांचेकडे विनंती करणारा ठराव दि. २२ एप्रील रोजी श्री. नायडू वकील यांच्या अध्यक्षतेखाली, त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सभेत मंजूर करण्यात आला होता.

नगरपालिकेच्या निषेधाची जंगी मिरवणूक : शहर नगरपालिकेने बेसुमार वाढविलेल्या पाणीपट्टीचे निषेधार्थ दि. २३ एप्रील रोजी सायंकाळी ६ वा. जोग चौकातून नागरिकांची एक जंगी मिरवणूक निघाली होती. निषेध प्रदर्शक काळी निशाणे व नगरपालिकेत चालू असलेल्या सावळ्या गोंधळाची दर्शक चित्रे व बोर्ड, मिरवणुकीत ह ती. निषेधपर घोषणा देत ही मिरवणूक शहरातील निरनिराळ्या भागातून फिरल्यावर ती परत रात्री साडे आठच्या सुमारास जंग चौकात आली व तेथे श्री. दक्षी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन पं. देवदत्त शर्मा, श्री. काळे, पं. अवस्थीजी व श्री. परशराम यांची भाषणे होऊन सभा समाप्त झाली.

सभेत वक्त्यांनी नगरपालिकेच्या कारभारावर टीका केली व पाणी पट्टीचे दर वाढविल्याबद्दल निषेध व्यक्त केला होता.

स्वदेशी सभेचे जाहीर हळदी कुंकू : स्वदेशीच्या प्रचारार्थ स्थापन झालेल्या येथील स्वदेशी प्रचार सभेतर्फे, दि. २४ रविवारी ब्रम्हविद्या मंदिरात जाहीर हळदीकुंकवाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यानिमित्ताने निरनिराळ्या स्वदेशी मालाचे प्रदर्शनही तेथे भरविण्यात आले होते आणि उपयुक्त स्वदेशी माल कोठे मिळतो ह्याची माहिती देण्यात आली होती.

अशा प्रकारे कोणाच्याही व्यक्ती स्वातंत्र्याला बाध न आणता स्वदेशीचा प्रसार व प्रचार या शहरात सुरू होता.

उमरावतीच्या कार्यकर्त्यांना शिक्षा : श्री. रंगनाथपंत गिरगावकर आणि श्री. तिवाटणे यांच्या खटल्याचा निकाल लागून त्यांना प्रत्येकी सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली होती. शिवाय श्री. गिरगावकर यांना ५० रु. दंड करण्यात आला होता.

परदेशी कापडावरील निरोधने शहरात चालू असून, एका निरोधकास मारल्याची तक्रार या आठवडयात नगर काँग्रेसकडे आली होती.

काश्मीर रिलीफ फंड : काश्मीरमध्ये मुसलमानांनी केलेल्या अत्याचारामुळे तेथील हिंदूची परिस्थिती केविलवाणी झाली होती व त्यांचे

मदतीसाठी 'काश्मीर रिलीफ फंड' सुरू करण्यात आला होता. उमरावतीत हिंदुमहासभेतर्फे काश्मीर रिलीफ फंड गोळा करण्याची मोहीम सुरू करण्यात आली होती.

उमरावती तुरुंगात राजबंद्यांचे हाल : येथील तुरुंगात नवीन बदलून आलेल्या अधिकाऱ्यांनी 'क' वर्ग राजबंद्यांचे अन्न-पाण्या-वाचून हाल सुरू केले होते. बेदम मारहाण करणे व कोंडून ठेवणे असा कार्यक्रम जेल अधिकाऱ्यांनी सुरू केला होता. दळण दळावयास लावणे, पाणी भरावयास लावणे इत्यादी कामे राजबंदीवर लादण्यात आली होती.

बेकार सप्ताह : दि. २० एप्रीलपासून उमरावती शहरात बेकार संघातर्फे 'बेकार सप्ताह' पाळण्यात आला होता व त्यानिमित्त गांधी चौक, टिळक चौक, भाजीबाजार, राजापेठ इत्यादी ठिकाणी व्याख्याने होऊन सर्वश्री मुळे, राजंदेरकर, देवरस, पैठणकर, बाबासाहेब परांजपे, सौ. विमलाताई देशपांडे, वि. दा. ब्रम्ह आणि श्री. हिरुरकर यांची भाषणे झाली होती.

हरताळ, मिरवणूक व जाहीर सभा.

पं. मदनमोहन मालवीय आणि सौ. सरोजिनी नायडू यांच्या अटके निमित्त, दि. २६ एप्रील रोजी उमरावतीत, कडकडीत हरताळ पाळण्यात येऊन सायंकाळी काँग्रेस कचेरीपासून एक मिरवणूक काढण्यात आली होती. शहरातील प्रमुख मार्गाने मिरवणूक फिरून आल्यानंतर गांधी चौकात रात्री वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, दे. भ. नानासाहेब बामणगावकर यांचे भाषण झाले होते.

परदेशी कापडावर पिकेटिंग : निरोधकांना अटक.

उमरावती येथे परदेशी कापडावर प्रथम फिरते निरोधन सुरू होते. नंतर ते काही दुकानावर, विदेशी कापड सिलबंद होईपर्यंत सुरू होऊ लागले. हे निरोधन (पिकेटिंग) पूर्णपणे शांततेने व कोणाच्याही व्यक्ति स्वातंत्र्याला बाध न आणता केले जात असे. या काळात कोणाही निरोधकास अटक वगैरे झाली नव्हती. परंतु दि. ३० एप्रील रोजी प्रताप चौकातील एका दुकानावर निरोधन सुरू असता एक युरोपियन गृहस्थ त्या दुकानात मोटारीतून कापड घेण्यासाठी आला. त्या गृहस्थासही स्वयंसेवकांनी शांततेने

विदेशी कापड घेऊ नका असा उपदेश केला तेव्हा त्या युरोपियनाने स्वयंसेवकांस धक्के व बुक्या मारल्या. तरीही स्वयंसेवक शांतच होते. परंतु हा प्रकार चालू असता तेथे बघ्यांची बरीच गर्दी जमली व त्या गर्दीपैकी एकाने, साहेबाने स्वयंसेवकास मारू नये या हेतूने साहेबाची कंबर धरली तेव्हा कंबर धरणारास साहेब मारू लागले. या गडबडीत साहेब खाली पडून त्यांना थोडे लागले व कंबर धरणारा इसम पळून गेला आणि साहेबही मोटारीत बसून चालते झाले.

परंतु काही वेळाने सिटी इन्स्पेक्टर आणि डेप्युटी कमिश्नर हे ही घटनास्थळी आले व गेले तेव्हाही निरोधन शांततेने चालूच होते. पण सायंकाळी निरोधन करणारे सात स्वयंसेवकांना पकडण्यात आले आणि रविवारी पाच स्वयंसेवकाना अटक करण्यात आली.

या अटक झालेल्या स्वयंसेवकांत, सर्वश्री माधवराव देठे, तुकारामजी बनारसे, दिनकर सोमाजी, गुलाबराव चुन्नतकर, मुकुंदराव कांडलकर, उत्तमराव सोनटक्के, गणपतराव गोविंदराव सावंत, वासुदेव बडनखे, लक्ष्मण पोतदार, ओंकार देशमुख, लक्ष्मण भोपले, हरिभाऊ सावळापूरकर, शंकरराव साऊरकर, मनोहरराव डोरले हे लोक होते.

उमरावतीचा रानटी जेलखाना : येथील तुरुंगातील राजबंदींच्या छळाविषयी ज्या बातम्या बाहेर आल्या त्यानुसार, नागपूर, खामगाव व उमरावतीचे मिळून एकूण दहा राजबंदींना गुन्हाखान्यात ठेवण्यात आले होते. खाण्यासाठी फक्त चार पोळ्या, अर्धी पळी वरण व अर्धी वाटी भाजी देण्यात येई. प्रार्थना केली तर दंडाबेंडी, कंबलपट्टा, बुटाच्या लाथा वगैरे शिक्षा ठरलेल्या असत. नागपूरच्या बारा वर्षांचा लक्ष्मण कोष्टी याला सुद्धा हीच कठोर शिक्षा दिली होती. वेळेवर उठले नाही की, बुटाच्या ठोकरा आणि गलिच्छ शिव्यांचा वर्षाव होत असे. ५० लोकांचे बॅरक मध्ये १०० लोकांना कोंबण्यात आले होते. स्नानाला पाणी दुर्मिळ. झेंडावंदन केले तर गोळीबाराची धमकी व वॉर्डरचा दंडयाचा मार. शिवाय अन्न देत नसतच. अन्नत्याग करणाराचे छातीवर बसून लोखंडाच्या नळीने दुध्र जबरस्तीने पाजले जाई. आणि गुन्हाखान्यात ठेवले जाई. एकूण जुलुमाने शिस्त पाळायला लावणे हे जेल अधिकाऱ्याच्या रानटी व्यवस्थेचे त्यावेळी स्वरूप होते.

स्वयंसेवकांना शिक्षा : पिकेटिंग करताना ३० एप्रील रोजी अटक झालेल्या स्वयंसेवकांपैकी सर्वश्री माधवराव देढे, दिनकर सोमाजी, तुकाराम बनारसे, गुलाबराव चुन्नतकार, मुकुंदराव कांडलकर यांना चार महीने सक्त मजुरीची व इतर स्वयंसेवकांना तीन महिने सक्त मजुरी याप्रमाणे शिक्षा देण्यात आल्या. आणि श्री. सीतारामजी जाजू, पाचवे सर्वाधिकारी श्री. नारायणराव भदे आणि सहावे सर्वाधिकारी श्री. गोपाळराव खेडकर यांना सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली.

श्री. रघुनाथ जोशी, लक्ष्मणराव काळे, नारायणराव गोडबोले व जुगादे यांना प्रत्येकी चार महिने सक्त मजूरी. त्याच प्रमाणे हरी विठोबा ताकपीरे, बालवीर गणपतराव, लक्ष्मणराव भोकरे, देवीचंद बुच्चा, प्यारेलाल रामचंद्र या पाच जणांना निर्दोष सोडण्यात आले होते. (१० मे १९३२)

जाहीर सभा : सातवे सर्वाधिकारी श्री. गोखले यांच्या अध्यक्षते-खाली दि. ६ मे रोजी रात्री गांधी चौकात जाहीर सभा भरून, अटक झालेल्या सर्व देशभक्तांचे अभिनंदनपर सर्वश्री खोडे, बाळ ओझरकर आणि पुंजाप्पा यांची भाषणे झाली होती.+

पिकेटिंग बंद : मे चे दुसऱ्या आठवड्यात परदेशी कापड विकणाऱ्या व्यापाऱ्यांनी विनंती केले वरून तूर्त पिकेटिंग बंद करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला होता व तसे जाहीर करण्यात आले होते.

उडाणटप्पू : दे. भ. वीर वामनराव जोशीकृत 'उडाणटप्पू' या नवीन मनोरंजक नाटकाचा प्रयोग, दि. ७ व ८ मे १९३२ रोजी, अरुणोदय संगीत नाटक मंडळीने करून दाखविला होता. दोन्ही खेळास गर्दी होती.

नूतन संगीत विद्यालय : पुण्याच्या या संस्थेच्या नाट्य शाखेचे नाट्य प्रयोग उमरावतीत होत आहेत. गंधर्व नाटक मंडळी उमरावतीहून गेल्या पासून या दर्जाच्या गायनाची नाटक कंपनी येथे आली नव्हती. सौ. हीराबाई बडोदेकर यांच्या सारख्या मधुर आवाजाच्या सुप्रसिद्ध संगीत नटीचे गायन हा या नाट्यशाखेचा आत्मा असल्यामुळे संगीताच्या दृष्टीने

+ **चळवळीचा आढावा** : जवळ जवळ तीन महिन्यांत, स्वातंत्र्य-चळवळीत ८० हज़ार लोक तुरुंगात गेले होते, २९ वेळा गोळीबार करण्याचा सरकारवर प्रसंग आला व ५००० स्त्रिया जेलात गेल्या होत्या.

नाटके सरस होतात; त्यामुळे या नाट्य शाखेच्या नाटकास रसिकांची गर्दी होत असे.

राजबंद्यांची सुटका : उमरावती जेलमधून गेल्या आठवड्यात एकूण २४ राजबंदी, त्यांची शिक्षा पूर्ण झाल्यामुळे सोडण्यात आले होते. त्यांत स्थानिक व परगावचे लोक होते.

जेल व्हिजिटर्स : उमरावती तुरुंगावर जेल व्हिजिटर्स म्हणून प्रांतिक सरकारने खालील लोकांची नेमणूक केली होती.
रा. ब. खरे, खा. ब. अब्दुल कादर, सौ. रणदिवे, बॅरि. इ. एम्. जोशी.

राजबंदींचे छळाबद्दल निषेध : उमरावतीच्या तुरुंगात राजबंदींचा छळ होतो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी दि. २२ मे रोजी गांधी चौकात सर्वाधिकारी श्री. माधवराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून श्री. खांडे, श्री. रामेश्वरजी अवस्थी, श्री. भागवतकर, श्री. वामनराव मोरे व श्री. बरगड यांची भाषणे झाली होती.

उमरावती तुरुंगाची चौकशी : उमरावती तुरुंगातील राजबंदींची गाऱ्हाणी चव्हाट्यावर आल्यामुळे त्याची वऱ्हाडच्या कमिश्नरामार्फत चौकशी करण्यात आली होती. कमिश्नर साहेब चिखलदऱ्यावरून उमरावतीस आले व राजबंदीशी भेटून व विचारपूस करून परत गेले. पण या चौकशीनंतरही म्हणावा तसा जेल अवस्थेत फरक पडला नव्हता.

शिस्तीचे नावाखाली सामर्थ्याबाहेर काम घेणे व देणे आणि स्वच्छ खाणे पिणे याचा अभाव जो होता तो अद्याप कायम आहेच. जेवणाच्या परेडमधून पायात जोडे घालून जेल अधिकाऱ्याने जाणे वगैरे अजून चालू आहेच. राजबंदीची मुदत भरली असताही त्यास चार दिवसानंतर सोडण्यात आले. हा उमरावती तुरुंगातील प्रकार म्हणजे व्यवस्था नसून अव्यवस्थाच नव्हे काय ?

स्वदेशी दिन : पं. मदन मोहन मालवीय यांच्या आज्ञेनुसार येथील स्वदेशी प्रचार सभेतर्फे दि. २९ मे रोजी जोग चौकात श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली 'स्वदेशी दिन' साजरा करण्यात आला होता. सुरुवातीला चिटणीस श्री. विश्वनाथराव ब्रह्म यांनी प्रचाराची माहिती

दिल्यावर श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे स्वदेशीवर माहितीपूर्ण भाषण झाले होते.

अभिनंदनाची सभा : जिल्ह्यांचे सर्वाधिकारी श्री. माधवराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० मे रोजी रात्री गांधी चौकात सभा भरून दे. भ. सेठ मालाणी हे रायपूर तुरुंगातून सुटून आल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते. श्री. मालाणी यांचे गेल्या तीन महिन्यात तीन पौंड वजन घटले होते.

उमरावती तुरुंगात हार्वेचे अत्याचार : राजबंदीचे छळाबद्दल उमरावती तुरुंगाने नाव कमावले आहे. चौकशी नंतरही परिस्थितीत काहीच फरक नाही. शिक्षेची मुदत संपल्यानंतरही दोन-दोन, तीन-तीन दिवस निष्कारण अडकावून ठेवणे, उद्दामपणाचे उत्तरे देणे, काम पुरे करून घेतल्यानंतरही अन्न खराब व कमी देणे इ. चालूच होते. श्री. अच्चुतराव देशपांडे (आकोला) यांना ते प्राणोपवेशण करीत असतांना दंडाबेडी देण्यात आली आणि मुदत भरल्यानंतरही ती काढण्यात आली नाही. तसेच २२ एप्रील रोजी, कारण नसताही खामगावचे श्री. कोरडे गुरूजी यांना गुन्हा खान्याची शिक्षा देण्यात आली. रमजानअली, आफतअल्ली व अन्ना बाबू हे लहान सहान गोष्टीबद्दल शिव्या देण्यात व मारण्यात बरेच तरबेज असून, त्यांच्या कृपेमुळेच राजबंदीवर निरनिराळ्या शिक्षा भोगण्याचा प्रसंग येतो. वर तक्रार करण्याची सोय नाही. नागपूरचे श्री. वैद्य यांनी जमादाराने शिव्या दिल्या बद्दल वर तक्रार केली. पण त्या तक्रारीचे परिमार्जन होण्याऐवजी त्यांना गुन्हाखाना मात्र देण्यात आला.

उमरावतीच्या एका अल्पवयी राजबंदीस, तो वॉर्डरला न विचारता शौचास गेला. या कारणास्तव त्याच्या हातावर खुर्ची ठेवून व त्यावर वॉर्डरला बसवून पाठीवर मारण्याची अमानुष शिक्षा देण्यात आली होती.

जेल अधिकारी हार्वे यांचे कारकिर्दीत उमरावती जेलमध्ये असे प्रकार सुरू होते. दि. ४ जुन रोजी उमरावती तुरुंगातून उमरेडचे सद्ग्रहस्थ श्री. टेकाडे यांची मुक्तता झाली. त्याच दिवशी येथे गांधी-दिन असल्यामुळे त्या निमित्ताने त्यांचे सभेत वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. या व्याख्यानात श्री. टेकाडे यांनी उमरावती तुरुंगात सध्या राजबंदीवर जे जुलूम होत आहेत त्याची साधार माहिती त्यांनी सांगितली

होती. राजबंद्यांवर अन्नपाण्यावाचून तडफडत मरण्याचा व नाना तऱ्हेच्या कठोर शिक्षा सहन करण्याचा कसा प्रसंग येतो याचीही त्यांनी भाषणात माहिती दिली होती.

प्रतिनिधींची सुटका : नागपूरच्या परिषदेकरिता उमरावतीहून गेलेल्या ज्या मंडळीस अटक झाली होती त्या श्री. पांडूरंग दिवाकर, श्रीनिवास काशीकर, श्री. मारोती बाजीराव ढांगे, आनंदराव पुंजाजी माळी व भोलाप्रसाद या पांच जणांना सोडून देण्यात आले होते[१].

अभिनंदनाची जाहीर सभा : जबलपूर तुरुंगातून सुटून आलेले येथील कार्यकर्ते श्री. गोखले यांच्या अभिनंदनार्थ दि. १० जुन रोजी गांधी चौकात श्री. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन सर्वश्री खोडे, बाळ झंझरकर, पुंजाप्पा व भागवतकर यांचो अभिनंदनपर भाषणे झाली होती.

वादळ : दि. १२ जुन रोजी भयंकर वादळ होऊन उमरावतीत कित्येक झाडे पडली आणि कित्येक घरावरील टीन व कौले उडालीत. आठवडी बाजारातील टीन उडाल्यामुळे जखमा होऊन एक स्त्री व दोन इसमांना अत्यवस्थ स्थितीत इर्विन हॉस्पिटलमध्ये पोचविण्यात आले होते. त्यापैकी एका मुसलमान इसमाचा इस्पितळात मृत्यू झाला.

आठवडी बाजारात अशा पद्धतीने झालेला गेल्या तीस वर्षातील हा दुसरा मृत्यू होता.

नागपूर–भुसावळ पॅसेंजर्स उमरावतीस येऊ लागल्या.

अलीकडील काळात बडनेरा ते उमरावती व उमरावती ते नागपूर अशा मोटारी चालू झाल्यापासून उमरावती रेल्वे स्टेशनचे उत्पन्न कमी झाले होते. त्यामुळे बडनेरहून सुटणाऱ्या व बडनेरला येणाऱ्या, नागपूर व भुसावळकडच्या पॅसेंजर गाड्या उमरावतीस आणल्या जाऊ लागल्या होत्या.

---

१ : दि. १९ मे रोजी नागपूर येथे वऱ्हाड मध्य प्रांताची संयुक्त (काँग्रेस) परिषद भरण्याचे ठरले होते. पण या परिषदेस बेकायदा कृत्य ठरवून सरकारने ती होऊ दिली नाही व परिषदेसाठी गेलेल्या अनेक प्रतिनिधींना अटक करण्यात आली होती त्यांत उमरावतीचेही पांच प्रतिनिधि होते.

व उमरावती स्टेशनवरून सुटू लागल्या. परंतु मेल, एक्सप्रेस व पार्सल ह्या गाड्या अद्यापि बडनेर वरूनच जात. म्हणून ह्या गाड्या देखील उमरावतीस आणाव्यात त्यामुळे पॅसेंजरचे उत्पन्न टिकेल आणि स्थिर होईल. अशी सूचना करण्यात आली होती.....

उमरावती स्टेशनचे उत्पन्न स्थिर करायचे असेल व वाढवायचे असेल तर, उमरावती स्टेशन मुख्य लाईनवर घेणे हाच एक सरळ मार्ग आहे व तोच मार्ग आज नाही तर उद्या रेल्वेस पत्करावा लागेल...अशीही रेल्वेस सूचना केली गेली होती.

श्री नारायण गुरूचे पंढरीस पायी गमन.

उमरावतीचे श्री नारायण गुरु महाराज हे वारकऱ्यांचे दिंडीसह दि. १६ जुन रोजी पायी पंढरपुरास जाण्यास प्रथमच निघाले होते. त्यावेळी त्यांच्या, शहरातील अनुयायांनी व भक्तांनी त्यांना समारंभपूर्वक निरोप दिला होता.

(श्री. नारायण गुरुंची ही पालखी १९३२ पासून दरवर्षी पायी पंढरपुरास आजपर्यंत जात आहे. श्री. नारायण गुरु थोड्या वर्षा पूर्वी ब्रम्हैक्य पावले तरी त्यांचे अनुयायांनी यांत खंड पडू दिला नाही. उमरावतीहून पंढरपुरास पायी जाणारी ही दुसरी पालखी होय. लक्ष्मीनारायण मंदीराची पालखी ही इ. सन १८७९ पासून पंढरपुरास जात असे ती माहीती परिशिष्ट क्र. १२ मध्ये पाहावी.)

शोक सभा : राजे लक्ष्मणराव भोसले, न्यायमूर्ति कोरटकर व रा. ब. महाजनी यांचे निधनानिमित्त स्थानिक हिंदुसभेतर्फे दि. १७ जुन रोजी रात्री गणेश नाटक गृहात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा होऊन सर्वश्री अण्णासाहेब देशपांडे, रा. ब. ब्रम्ह, बॅरि. बागवे, वीर वामनराव जोशी आणि श्री. बामणगावकर यांची मृतांच्या गुणवर्णनपर भाषणे झाली व शेवटी दुखवटयाचा ठराव मंजूर करण्यात आला होता.

उमरावतीत धरपकड व शिक्षा : दि. २१ जुन रोजी सकाळी, जिल्हा काँग्रेसचे सातवे सर्वाधिकारी श्री. माधवराव गोखले, श्री. रामभाऊ बरगडे, दवंडीवाले, श्री. भागवतकार आणि 'उदय' ऑफिसमधील कंपोझीटर

श्री. शंकर खोडे या चौघांना अटक होऊन, श्री. गोखले यांना चार महिन्याची व इतर तिघांना तिन महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली होती.

विदेशी कापडावर पुन्हा पिकेटिंग : दि. १५ जुन रोजी रात्री गांधी चौकात श्री. माधवराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन तीत सर्वश्री खांडे व भागवतकार यांची भाषणे झाली व परदेशी कापडावर निरोधन सुरू करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता.

यज्ञ : सिंहस्थासाठी नाशिकला जाणाऱ्या काही महंतांचा राजापेठेत मुक्काम होता. त्यांच्या धुनीचे परिसमाप्तीनिमित्त व्दादशीचे दिवशी तेथे यज्ञ करण्यात आला. या यज्ञास अंदाजे दहा पंधरा हजाराचा खर्च आला तो येथील मारवाडी मंडळींनी सहन केला होता. या यज्ञसमारंभाला स्त्री–पुरुषांची अलोट गर्दी लोटली होती.

'उदय' चे संपादकांवर हल्ला.

'उदय' मधुन प्रसिद्ध झालेल्या बातमीमुळे चिडलेल्या अधिकाऱ्याचे दुष्ट कृत्य.

दि. ३१ मे १९३२ रोजी 'उदय' चे संपादक श्री. नानासाहेब बामणगावकर हे, दे. भ. संभाजीराव गोखले यांचे कडून सकाळी ११ चे सुमारास, जोग चौक व लायब्ररी यांचे मधल्या रस्त्याने परत जात असताना एका धोतर नेसलेल्या मुसलमानाने त्यांचेवर अचानक हल्ला केला होता. त्यावेळी श्री. बामणगावकरांचे सोबत श्री. भागवत नावाचे गृहस्थ होते. बामणगावकरांनी त्यांचे हातातील छत्रीचे साहाय्याने हल्ला करणारास मागे लोटले व त्यांचे मनगट पकडले आणि तू कोण आहेस असे विचारले तेव्हा तो गृहस्थ घाबरला आणि 'कल मेरेकू गाली क्यों दी' असे म्हणत तो पळायच्या तयारीत होता इतक्यात डॉ. कुळकर्णी व श्री. त्रिंबकराव म्हैसाळकर बँके समोरच्या रस्त्याने तांग्यातून जाताना दिसले, तेव्हा बामणगावकरांनी त्यांना आवाज देऊन, पळणाऱ्या मारेकऱ्याला पकडा म्हणून सांगितले. तेव्हा दोघेही झटपट तांगा थांबवून उतरले व मारेकऱ्यास पकडून पोलिसचे हवाली करण्यात आले. तेव्हा तेथे केलेल्या चौकशी वरून तो मारेकरी थूगावचा मुसलमान गृहस्थ आहे असे कळले. वरील प्रकार घडल्यानंतर ४ जून

रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांना धमकीचे निनावी पत्र पोस्टाने मिळाले. त्यांतील मजकुरावरून हे स्पष्ट झाले होते की, 'उदय' मधून मोर्शीचे पोलिस विरुद्ध काही मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे चिडून जाऊन तेथील संबंधित अधिकाऱ्याने थूगावचे गुंड हाताशी धरून बामणगावकरांवर हल्ला करविला होता व बाबासाहेब खापर्डे यांनाही धमकीचे पत्र पाठविले होते.

ज्यावेळी वरील प्रकार घडला त्याच सुमारास मुंबईला जातीय दंगा झाला होता व बामणगावकरावर हल्ला करणारा इसम मुसलमान असल्यामुळे याची माहिती वृत्तपत्रातून आली तर उमरावतीतही जातीय दंगल होईल या भीतीने खुःद डेप्युटी कमिश्नरांनी बामणगावकरांना बोलावून ही हकीकत प्रसिद्ध करू नका अशी विनंती केली होती. त्यामुळे वरील प्रकारासंबंधीची माहिती पुढे जुनअखेर प्रसिद्ध करण्यात आली.

वृत्तपत्रकारांचे जीवन कसे धोक्यात असते याचा, ही घटना म्हणजे नमुना होय.

उमरावती नगरपालिकेच्या सब कमेटचा : उमरावती नगरपालिकेच्या सब् कमेटचा नियुक्त करण्याचा प्रश्न बऱ्याच दिवसापासून ताटकळत पडला होता. अखेर जुन महिन्याचे शेवटचे आठवडयात ह्या सब कमेटचांची निवड होऊन डॉ. जोशी पब्लिक हेल्थचे, श्री. शामराव देशपांडे हे एज्युकेशनचे, श्री. बागोकर वॉटर वर्क्सचे, श्री. वासुदेवराव देशपांडे हे फायनान्सचे आणि मि. हिदायतअली हे पी. डब्ल्यु. डी. कमेटीचे या प्रमाणे चेअरमन्स निवडण्यात आले होते.

उमरावती तुरुंग : उमरावतीच्या तुरुंगातील राजबंद्यांना जेल अधिकाऱ्याकडून त्रास देणे चालूच होते. नागपूरचे राजबंदी श्री. आंबेकर हे दीड दोन महिन्यापासून जेलमध्ये अन्नसत्याग्रह करीत असताना त्यांना जबरदस्तीने अन्न घालण्यात येई. श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. बजरंग ठेकेदार आदी राजबंद्यांना चक्की दिली गेली. लहान सहान सबबीवर बेताने मारण्याची धमकी राजबंद्यांना दिली जाई. आणि माफीचे दिवस कापण्यात येत असत. .....सागरचे स्वामी कृष्णानंद यांना, त्यांच्या सन्यासधर्मास योग्य असे कपडे वापरण्यास बंदी केल्यामुळे त्यांनी दर रविवारी निषेधार्थ उपोषण सुरू केले होते. दिनांक २२ एप्रील रोजी राजबंद्यांना अन्न पाणी देण्यात

आले नव्हते. त्याचे निषेधासाठी दर महिन्याचे २२ तारखेस राजबंदी उपोषण करीत असत. दि. २२ जुन रोजी केलेल्या या उपोषणाची शिक्षा म्हणून कित्येक राजबंद्याना दंडाबेडी देण्यात आली होती. उमरावती तुरुंग म्हणजे राजबंद्यांना छळण्याचे एकप्रकारे केंद्र झाले होते.

...एका मुक्या राजबंद्यास तो बोलत नाही म्हणून मारहाण करण्यात आली. याप्रमाणे सतत राजबंद्यावर होत असलेल्या जुलुमाविरुद्ध निषेध प्रदर्शित करण्यासाठी वर्ध्याचे श्री. भय्याजी कंबलवार यांनी उपोषण सुरू केले होते. त्यामुळे त्यांना सेल मध्ये ठेवण्यात आले.

उपोषण करणारांना जबरदस्तीने दूध नाहीतर पीठ मिसळलेले पाणी पाजण्यात येई. ता. ३, ४ व ५ जुलै रोजी या सर्व जेल जुलुमाचे प्रतिकारार्थ आणि निषेध म्हणून सर्वच राजबंद्यांनी अन्न सत्याग्रह केला होता.

मिठाचा सत्याग्रह : दि. ४ जुलै रोजी भाजीबाजार मध्ये मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. शिवाय त्या दिवशी शहरात हरताळही होता.

पोस्ट ऑफिसवर निरोधन : दि. ४ जुलै रोजीच पोस्ट व तार ऑफिसवर स्वयंसेवकांनी निरोधन केले. एकूण अकरा स्वयंसेवकांना अटक करण्यात आली. त्यापैकी श्री. पुंजाप्पा व इतर पाच स्वयंसेवकांना प्रत्येकी सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली होती व इतरांना अल्पवयी म्हणून सोडून देण्यात आले होते.

निरोधनाबद्दल अटक : परदेशी कापडाच्या दुकानावर निरोधन करणाऱ्या भीमराव व रुस्तम या नावाच्या दोघा स्वयंसेवकांना अटक करण्यात येऊन त्यांना प्रत्येकी तीन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा देण्यात आली. निरोधने चालूच आहेत.

गांधी–दिनाची सभा : दि. ४ जुलै रोजी रात्री श्री. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली गांधी चौकात जाहीर सभा भरून श्री. बामणगावकर यांचे भाषण झाले होते.

आठवे सर्वाधिकारी : आठवे सर्वाधिकारी म्हणून श्री. लक्ष्मणराव देशमुख यांची नियुक्ती जुलै दि. ५ रोजी करण्यात आली. होती

अमरावती नगराध्यक्षाकडून ना. पंजाबराव यांना पानसुपारी

मध्यप्रांत–वऱ्हाडचे दिवाण ना. पंजाबराव देशमुख यांना नगराध्यक्षांनी पानसुपारी केली. त्याच वेळी म्यु. चे चौकशी करणारे माजी अधिकारी श्री. खान यांनाही नगराध्यक्षाकडून पानसुपारी करण्यात आली होती.

उमरावतीत बॉम्बचा स्फोट ? : उमरावतीच्या हेडपोस्ट ऑफिसमध्ये दि. ७ जुलै रोजी दिवसा सकाळी ११ वाजता बॉम्बसारखा मोठा स्फोट झाला. त्यामुळे सर्वत्र खळबळ माजली. पोलिसला वर्दी देण्यात आली. स्फोट झाल्यानंतर पोस्ट ऑफिसचे भितीतील पोस्ट बॉक्समधून धुराचे लोट निघू लागले.

थोड्याच वेळात घटनास्थळी डी. एस् पी. व सिव्हिल सर्जन येऊन चौकशीस सुरुवात झाली स्फोट झाला त्यावेळी पेटीचे आसपास कोणीच नव्हते असा पुरावा मिळाला. नंतर ती पोस्ट बॉक्स उघडण्यात आली. तेव्हा त्यांतील सर्व पत्रे जळून खाक झाल्याचे आढळून आले. त्यातच एक अर्धवट जळलेल्या पार्सल सारख्या पृष्ठाचे डब्यात काही द्रव्य आहे असे दिसून आले. हा द्रव पदार्थ कोणता ह्याची परीक्षा करण्यासाठी तेथील जळलेली काही पत्रे वगैरे नेण्यात आली होती.

झालेल्या स्फोटाचा आवाज चांगला मोठा झाला होता. पार्सलवर फक्त तीन पैशाचे तिकीट लावलेले होते व उर्दूमध्ये काही मजकूर लिहिलेला होता

या स्फोटप्रकरणी पुढे दि. १८ रोजी येथील एका सेठजीचे नोकरास पोलिसांनी संशयावरून अटक केली होती. त्याचे नाव माया बकस असे होते.

जंगल सत्याग्रहाचा स्मृति–दिन : दि. १० जुलै रोजी जंगल सत्याग्रहाचा स्मृति–दिन साजरा करण्यासाठी, सकाळी श्री. काशिराव यांच्या नेतृत्वाखाली स्वयंसेवकांची एक तुकडी वडाळीस जाण्यासाठी निघाली. तेव्हा त्या तुकडीतील सहा लोकांना शहरातच अटक करण्यात आली. परंतु श्री. आत्माराम गोविंद यांनी वडाळीस जाऊन सत्याग्रह केला व तेथे स्वतःस अटक करवून घेतली होती.

उमरावतीत झडत्या : दि. ११ जुलै रोजी पोलिसांनी सर्वश्री माळाणी, बाळू मराठे व दुबे यांच्या घरांच्या झडत्या घेऊन, हुतात्मा भगतसिंगाची

हिंदी–मराठी चरित्रे व फोटो आणि काही टिळकावरील कवितांची पुस्तके जप्त करण्यात आली होती.

अकरा राजबंदी मुक्त : उमरावती तुरुंगातून ११ जुलै रोजी एकूण अकरा राजबंदी मुक्त करण्यात आले होते. त्यापैकी हिंगणघाटचे चार, द्रगचे तीन, बिलासपूरचा एक, खामगावचे दोन व रायपूरचा एक याप्रमाणे अकरा लोक झाले होते.

उमरावती तुरुंगात राजबंद्यावर जुलूम.

उमरावती तुरुंगाला गृहमंत्र्यानी भेट दिली तरी राजबंद्यांच्या तक्रारीची दाद लागली नाहीच.

सायंकाळी जेल बंद झाल्यावर काही मुले आपसात एकमेकांशी बोलली त्याबद्दल अभद्र शिव्या व मार हे त्यांना दुसऱ्या दिवशी बक्षीस मिळाले. श्री. गोपाळराव खेडकर, श्री. कृष्णराव देशपांडे, श्रावणे वगैरे राजबंद्यांचे उपोषण चालूच होते. बंद्यांच्या गाऱ्हाण्याची दाद लागत नाही म्हणून प्रमुख राजबंद्यांचा हा अन्न सत्याग्रह सुरू होता.

आषाढी एकादशीचे दिवशी प्रत्येक राजबंद्यांना फक्त अर्धा आण्याचा साबुदाणा दिला गेला होता. जुलैचे शेवटचे आठवडयात श्री. खेडकर यांनी अन्न सत्याग्रह थांबविला व श्री. डांगरे या अन्न सत्याग्रहामुळे अतिशय आजारी झाले होते.

दे. भ. आवारी यांचे अनुयायी श्री. आंबेकर यांची दाढी, त्यांच्या धर्मसमजुती विरुद्ध जबरदस्तीने काढण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी अन्न सत्याग्रह केला होता. त्यांची दि. २५ जुलै रोजी जेल मधून मुदत भरल्याने मुक्तता झाली होती.

एका मुक्त राजबंदीची कैफियत : "गुरुवार दि. २१ एप्रील १९३२ रोजी, भाजी खराब आल्यामुळे आम्ही ती परत केली आणि सायंकाळी जेवण न देताच आम्हाला उपाशी बंद करण्यात आले. नंतर सायंकाळी वॉर्डर वगैरे आणून बॅरक मधून पाणी काढून घेण्यात आले. दुसरे दिवशी सकाळी आम्ही जेलच्या नियमाप्रमाणे बाहेर निघालो पण त्यांना आम्ही काही गुन्ह्यात सापडलो नाही म्हणून रमजान अलीनी तक्रार काढली.

रमजान अलीनी माझे पायावर बुटाचा पाय ठेवून मला ढकलले. मी तोंडावर पडलो व माझे गुडघे फुटले. नंतर दोघा वॉर्डरांनी मला उचलून फेकले व माझे समोर जबलपूरचा नारायण नावाचा राजबंदी होता त्यासही याच प्रमाणे त्रास दिला. नंतर हातपाय धुण्यास किंवा शौचास जाऊ न देता मला गुन्हाखान्यात (अंधार कोठडीत) नेऊन ठेवण्यात आले. तेथे पाच पिला साफावाले कैदी व दोन वॉर्डर व बाबू रमजानअली यांनी माझे अंगावर घोंगडी टाकली व तोंडात बोळा कोंबला आणि मला इतके झोडपून काढले की मी बेशुद्ध झालो. सावध झाल्यावर मी पाहिले तो गुन्हाखाना बंद करून सर्व लोक निघून गेले होते. माझा जीव कासावीस व्हायला लागला त्यामुळे मी पिण्यास पाणी मागितले तर नंबरदाराने रमजान अलीस आणले व दोनतीन वॉर्डरने मला धरून मेहेतराकडून लघवी पाजली व पुन्हा बंद करून निघून गेले. तीन दिवस मला पाणी मुळीच मिळाले नाही. ता. २५ परेड दिवस होता. सुपरिन्टेडेन्ट व सिव्हिल सर्जन आले होते त्यांना मी माझी सर्व हकीकत सांगितली, पण त्यांनी काहीच ऐकले नाही. ते गेल्यावर रमजान अलीनी पंचवीस पेपर आणले व मला घोटायला दिले. मी चार दिवसाचा उपाशी व पाणीही न मिळाल्यामुळे व मला बसलेल्या मारामुळे माझी प्रकृती फार क्षीण झाली होती. त्यामुळे माझेकडून काम पुरे होऊ शकले नाही, त्यामुळे रमजान अलीने माझे डोक्यावर रूळ मारला. त्याने माझे डोके फुटले. रक्त निघाले व मी मुर्च्छित पडलो. पुढे ता. २८ ला मला जेवण दिले व पुन्हा कामास लावले व काम कमी झाल्याबद्दल जेवणात कपात केली गेली. मला ७ मे पर्यंत गुन्हाखान्यात ठेवण्यात आले व ८ मे ला तेथून काढून कोलूचे काम+ मला दिले. सात दिवस मी कोलूचे काम केले व नंतर पेपर पॉलिशच्या कामात टाकले.

अजूनही १७–१८ वर्षाचे मुलांना कोलूचे काम देण्यात येते व काम पूर्ण न झाल्यास शिक्षा देण्यात येतात व वाटेल तशी मारपीट सुरू आहे.

ना. राघवेंद्रराव ह्यांनी चौकशी केली तरीही अजून उमरावती जेलमध्ये अशी बेबंदशाही चालूच आहे." अशी कैफीयत लंधीखेडा ता. सौंसर जि. छिंदवाडा येथील एक राजबंदी श्री. छोटेलाल गज्जू छवरे

+ कोलूचे काम :– तेल घाणा ओढण्याचे काम.

यांनी, दि. ९ ऑगस्ट १९३२ रोजी उमरावती जेलमधून सुटल्यानंतर दिली होती

श्री. बामणगावकर नगरपालिकेवर अविरोध निवडून आले.

श्री. बाबुराव कलोती यांच्या अकाली निधनामुळे वार्ड नं. ३ च्या म्यु. सभासदाचे जागेची पोट निवडणूक दि. १६ ऑगस्ट रोजी होणार होती. परंतु या पोटनिवडणुकीत श्री. बामणगावकर यांचाच एकमेव अर्ज असल्याने ते अविरोध निवडून आल्याचे अधिकाऱ्यांनी जाहीर केले होते. अर्जाची छाननी दि. २३ जुलै रोजी झाली, त्याच वेळी केवळ एकच अर्ज या जागेसाठी बामणगावकरांचा होता हे दिसून आले होते.

नागरिकांची प्रचंड जाहीर सभा : सर सॅम्युअल होअर यांनी हिंदुस्थानबद्दल जे प्रतिगामी धोरण जाहीर केले होते त्याचे निषेधार्थ दि. २१ जुलै रोजी सायंकाळी उमरावतीच्या नागरिकांची सभा गणेश नाटक गृहात रा. ब. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सभेला लोकांची प्रचंड गर्दी झाली होती.

या सभेत सर मोरोपंत जोशी यांनी ठराव मांडून भाषण केले त्यास श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी अनुमोदन देताना भाषण केले. श्री. देशपांडे यांचेही ठरावावर भाषण झाले. ठराव मंजूर झाला.

ठराव खालीलप्रमाणे होता:-

"उमरावतीच्या नागरिकांच्या या सभेचे असे मत आहे की, हिंदुस्थानच्या हल्लीच्या राजकीय परिस्थितीत नवीन ऑर्डिनन्सची बिलकूल गरज नाही व नव्हती आणि या ऑर्डिनन्समुळे असंतोष बळावण्याचा संभव आहे. तसेच या सभेचे असेही मत आहे की, सर सॅम्युअल होअर यांनी पार्लमेंटात भाषण करून हिंदुस्तानच्या सुधारणासंबंधी राऊंड टेबल कॉन्फरन्सचा मार्ग सोडून देण्याचे जे धोरण जाहीर केले ते प्रतिगामी असून हिंदुस्थानचे दृष्टीने हितावह नाही."

स्वदेशी प्रचार सभेचे पत्रक, स्वदेशी कापड का वापरावे ?

उमरावतीच्या स्वदेशी प्रचार सभेमार्फत दि. २६ जुलै रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून, स्वदेशी कापडच का वापरावे ? याची मीमांसा केली होती.

"परदेशी कापड घेतल्याने, वापरल्याने अगर विकल्याने आपल्या देशाचे आर्थिक नुकसान होते ही गोष्ट निर्विवाद व सत्य आहे. परदेशी कापड घेतल्याने सर्व पैसा परदेशी जातो व आपले देशात उद्योगधंदे कमी होऊन बेकारी वाढते.

देशी कापड वापरल्यामुळे सध्या कितीतरी लोकास पोटा पाण्याचा रोजगार मिळाला आहे. त्याचे आंकडे असे–

इ. सन १९३१ मध्ये देशात ३३९ मिल काम करीत आहेत व २४ मिल तयार होत आहेत. दररोज ३९५४७५ मजुरांना काम मिळते व २६३३१७६ गाठी कापसाच्या खपतात. स्वदेशी व्रतामुळे आज पर्यंत परदेशी कापड किती कमी होत चालले आहे हे खालील आकड्यांवरून स्पष्ट होईल.

	१९२८-२९	१९२९-३०	१९३०-३१	१९३१ मध्ये किती कमी
		(आंकडे कोटी रुपयांत)		
एकंदर कापड व सुत	६३.२	५९.४	२५ २	३४.२
रेशीम	५.०	४.५	२.९	१.३
कृत्रिम रेशीम	४.७	४.३	३.०	१.६
व इतर	५ ०	४.२	२.३	१.९
एकूण किती परदेशी कापड आले ?	७७ कोटी	७२ कोटी	३३ कोटी	३९ कोटींनी कमी म्हणजे
		९० लक्ष रु.	४० लक्ष रु.	४० ल.रु. शे. ५४

या प्रमाणे स्वदेशी व्रताचा परदेशी कापडाचे आयातीवर परिणाम झाला तरी ३३ कोटी रुपये आपण विनाकारण परदेशी पाठवीत आहोत. केवळ स्वदेशीचे व्रत कडक पाळले तरी हा पैसा देशाचे उद्योग विकासास व रोजगार उपलब्ध होण्यास उपयोगी पडेल. देशी कापड वापरल्याने खालील फायदे होऊ शकतात.

१) पैसा देशातच राहील. २) देशी उद्योगधंदे वाढतील.
३) बेकारी कमी होईल. ४) देशातील कच्चा माल देशातच खपेल. शेतकऱ्याचा फायदा होईल."

उमरावतीचा टिळकोत्सव : सालाबादप्रमाणे याही वर्षी टिळकोत्सवाचा सोहळा दिनांक २३ जुलै पासून गणेश नाटक गृहात सुरू झाला होता. पहिल्या दिवशी श्री. बाबासाहेब खापर्डे यांचे गीता रहस्यावर प्रवचन झाले दुसरे दिवशी सर मो.रे.पंत यांचे 'लोकमान्यांचे राजकारणातील स्थान' या विषयावर श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान व तिसरे दिवशी वीर वामनराव जोशी यांचे प्रवचन झाले होते. नंतर हिर्लेकर शास्त्री व वीर वामनराव जोशी यांची प्रवचन. श्री. मराठे, बी. ए. यांचे 'लोकमान्य पंचांग' या विषयावर भाषण, नंतर कै. लोकमान्य टिळक यांची नात सौ. कालिंदीबाई घाटे बी. ए. यांचे व्याख्यान व दि. ३१ रोजी आकोल्याचे केळकर वकील यांचे व्याख्यान आणि दि. १ ऑगष्ट रोजी वीर वामनराव यांचे अध्यक्षतेखाली टिळकोत्सवाचा समारोप असे कार्यक्रम झाले होते.

पुढाऱ्यांची सुटका : दि. २५ जुलै रोजी उमरावती तुरुंगातून दे. भ. आंबेकर व महाजन यांच्या बरोबरच वडगाव, हिंगणघाट व रायपूर येथील पाच राजबंद्यांची सुटका झाली होती.

त्यापूर्वी, १९ जुलै रोजी खामगावचे पुढारी श्री. कोरडे गुरुजी व ता. २१ जुलै रोजी आकोल्याचे श्री. कृष्णराव गारडगावकर यांचीही उमरावती जेलमधून मुक्तता झाली होती.

लोकनायक अणे यांची मुक्तता : लोकनायक बापूजी अणे यांची दि. १२ जुलै रोजी तुरुंगातून मुक्तता झाली व या मुक्ततेनंतर त्यांचे पहिले भाषण उमरावती येथील टिळकोत्सवात झाले होते.

उमरावती नगरपालिकेचे सेक्रेटरी : गेल्या अनेक वर्षा पासून उमरावती नगरपालिका आपला कारभार हंगामी सेक्रेटरी नेमून करात होती. शेवटी ११ जुलै १९३२ रोजी नगरपालिकेचे आम सभेत श्री. शिवकृष्ण लखोटिया, वकील यांना कायम सेक्रेटरी म्हणून नेमण्याचा निर्णय बहुमताने घेण्यास आला होता.

श्री शिवाजी मराठा हायस्कूल : उमरावतीचे श्री शिवाजी मराठा हायस्कूल हे बेरार मराठा एज्युकेशन सोसायटीने इ. सन १९२५ साली सुरू केले होते व ते दि. ३१ जुलै १९३२ पर्यंत चालवून नंतर

दि. १ ऑगस्ट १९३२ पासून, या हायस्कूलातील शिक्षकांनी स्थापन केलेल्या 'श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीला' सोपविले होते.

या प्रमाणे उमरावतीची श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी दि. १ ऑगस्ट १९३२ रोजी अस्तित्वा आली.

अमानुष खून ? : दि. १० ऑगस्ट रोजी दत्तमंदिराचे विहिरीत एका स्त्रीचे प्रेत पाण्यावर तरंगताना दिसले. येथील तेली समाजातील एका गृहस्थाच्या सुनेचे ते प्रेत होते अशी ओळख पटली. सुरवातीस जीव दिल्याचा गवगवा झाला. परंतु मृत मुलीच्या बापाने पोलिसकडे अर्ज करून हा खून करण्यात आल्यामुळे चौकशीची मागणी केली होती. त्याने केलेल्या अर्जात लिहिले होते की ता. ६ चे रात्री सुमारे १० वाजता मृत मुलीचा नवरा व सासूने मिळून गरम कढवलेले तेल त्या मुलीचे अंगावर टाकून तिचा जीव घेतला जेव्हा तेल टाकले तेव्हा मुलीने किंकाळ्या फोडल्या त्या ऐकून शेजारी धावून आले पण दरवाजा उघडण्यात आला नाही. दुसऱ्या दिवशी मुलीच्या सासऱ्याने मुलीचे बापाकडे जाऊन सांगितले की, मुलगी दिसत नाही. शेवटी वरील घटनेनंतर तीन दिवसांनी सदर मुलीचे प्रेत दत्त मंदिराच्या विहिरीत तरंगताना आढळून आले होते. तिच्या शरिरावर जळल्याच्या जखमा दिसत होत्या. मृत मुलीच्या बापाचे सांगण्याप्रमाणे हा अत्यंत अमानुष रीतीने केलेला मुलीचा खून होता. सर्व गावभर या कृत्याची चर्चा त्यानंतर सुरू होती.

सुटका : उमरावती तुरूंगात आठ महिन्याची शिक्षा भोगून सागरचे श्री. कृष्णानंद व श्री. विश्वासराव भावे, वर्धेचे श्री. बुद्धसेन दरबार, खामगाव येथील श्री. जानराव व श्री. रामचंद्रराव, छिंदवाडा येथील श्री. गजाननराव पाठक, या सत्याग्रही बंदींची, शिक्षेची मुदत संपल्यामुळे या आठवड्यात सुटका झाली होती.

नागपूरचे दे. भ. राजाभाऊ डांगरे हे क्षयाने आजारी असताही त्यांना दिलेल्या सवलती काढून घेऊन, त्यांना गिट्टी फोडण्याचे काम देण्यात आले. त्यामुळे त्यांच्या हाता–पायास सूज येऊन त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाली. पण उमरावती जेलचे सध्याचे तुरूंगाधिकारी ह्या गोष्टीकडे काणाडोळा करीत होते.

सुटका : उमरावतीचे श्री. पी. वाय्. देशपांडे हे दि. १६ रोजी शिवणी जेलमधून आणि श्री. राजाभाऊ बारलिंगे हे जबलपूर जेलमधून सुटून उमरावतीस आले होते.

दि. २२ ऑगस्ट रोजी रात्री गांधी चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून सुटून आलेल्या देशभक्तांचे अभिनंदन करण्यात आले.

अमरावती तुरुंगातील हार्वेशाही : उमरावती जेलमधील दहिहांडयांचे श्री. पुरुषोत्तम शास्त्री यांना बेदम मारण्यात आल्यामुळे त्यांच्या छातीत काहीतरी बिघाड होऊन ते अत्यवस्थ झाले होते. इतर राजबंदींची शिक्षा ज्या सवलतीने कमी होऊन ते सुटतात त्या सवलतीप्रमाणे हे सुटायला पाहिजे होते. पण त्यांना सोडायचे नाही असा जेल अधिकाऱ्यांचा निश्चय होता. आणि असे बरेच राजबंदी उमरावती तुरुंगात छळ भोगीत होते. हार्वेशाहीला सैतानशाहीचे रूप यावे अशी जेलखात्याची इच्छा असावी व म्हणूनच हा राजरोस प्रकार उमरावती जेलमध्ये चालू होता.

महात्मा भगवानदिन हे सुप्रसिद्ध नेते उमरावती तुरुंगात होते. त्यांचा दम्याचा विकार बळावला होता. पण जेल सुपरिन्टेन्डेन्ट हार्बे त्याकडे लक्ष द्यायला तयार नव्हते.

सुटका व अभिनंदनाची सभा : उमरावती तुरुंगातून दि. २५ ऑगस्ट रोजी रायपूरचे काँग्रेस कार्यकर्ते दे. भ. क्रांतिकुमारजी व कटणीचे दे. भ. सत्यदेवजी यांची सुटका झाली. त्यांच्या अभिनंदनार्थ त्याच दिवशी रात्री भाजी बाजारमध्ये दे. भ. गणेशराव देवराव पांडे, बदनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत श्री. बारलिंगे, श्री. सत्यदेवजी आणि श्री. क्रांतिकुमारजी यांची उत्कृष्ट भाषणे झाली होती.

ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष डॉ. किवलू यांना झालेल्या अटकेबद्दल त्यांचे अभिनंदनही याच सभेत करण्यात आले होते.

दि. २९ रोजी उमरावती तुरुंगातून यवतमाळचे श्री. रामभाऊ भटजी, हिंगणघाटचे श्री. नरहर वामन सहस्त्रभोजने व महादेव सोनकुसरे आणि जबलपूरचे ठाकुर दादूसिंग या राजबंदींची मुक्तता झाली होती.

उमरावतीचे तुरुंगाधिकारी व कायदे मंडळ : एप्रील १९३२ मध्य उमरावती तुरुंगाचे अधीक्षक श्री. पावनस्कर हे रजेवर गेले व त्यांचे जागी दि. १९ एप्रील रोजी एक इंग्रज अधिकारी मि. हार्वे आले होते. या हार्वे साहेबांचे कारकिर्दीत उमरावती तुरुंगातील राजबंद्यांचा छळ करण्यात आला व त्याच्या बातम्या बाहेर येऊन सर्व प्रांतभर पसरल्या. राजबंद्यावर अनेक प्रकारे जुलूम करण्याचे बाबतीत उमरावती तुरुंग प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे शेवटी या उमरावती तुरुंगातील छळाचा व उमरावती जेलचे सुपरिंटेन्डेन्ट मि. हार्वे यांना बडतर्फ करावे असा प्रश्न मध्यप्रांत कायदे मंडळात श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी काम तहकुबीची सूचना आणून उपस्थित केला आणि तुरुंगातील राजबंद्यावर होणाऱ्या अत्याचारास कायदे मंडळात वाचा फोडली होती. त्यावेळी सरकारने जेल अधिकाऱ्यांची बाजू उचलून धरली. परंतु शेवटी या गाऱ्हाण्यांचे चौकशीसाठी सप्टेंबर महिन्यात सरकारने ना. राघवेंद्रराव सह काही सरकारी व काही बिन सरकारी सभासदांची एक कमेटी नियुक्त केली. त्यांत श्री. खापर्डे, श्री. नायडू, श्री. केदार, श्री. पारेख व बॅरि. शरिफ इत्यादी कायदेमंडळाचे सदस्य होते.

ही चौकशी कमेटी दि. ११ सप्टेंबर रोजी उमरावती तुरुंगातील राजबंद्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी येणार असल्याने, जे राजबंदी या जेल मधून सुटले होते त्यांनी आपल्या कैफियती या कमेटी समोर द्याव्या असे आवाहन करण्यात आले होते.

ठरल्याप्रमाणे ही चौकशी कमेटी आली व रविवार आणि सोमवार या दोन दिवशी कमेटीने प्रथम तुरुंगातील नोकरांची व दुसरे दिवशी जेलमधील राजबंद्यांची जबानी घेतली होती.

गणेशमूर्तींची स्थापना : दि. ४ सप्टेंबर रोजी म्यु. शाळा गणेशोत्सवाच्या श्री. गणेशमूर्तींची स्थापना सकाळी ९ वा. दे. भ. बामणगावकर यांच्या हस्ते करण्यात आली व १० वाजता लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. पु. य. देशपांडे यांच्या हस्ते 'स्वदेशी वस्तू बाजाराचे' उद्घाटनाचा कार्यक्रम थाटाने साजरा झाला होता.

सुटका : उमरावती तुरूंगातून श्री. वासुदेव काशीनाथ बडनखे, श्री. मनोहर गोपाळ डोरले, रत्नागिरीचे श्री. गोविंद रघुनाथ सावंत,

भातकुलीचे श्री. ओंकार देशमुख, श्री. मुकुंदराव सोनटक्के आणि श्री. गुलाबराव चुनतकार, यवतमाळचे श्री. माधवराव देढे, वाशीमचे श्री. महादेवराव दातार व जबलपूर येथील श्री. कमलसिंग यांची दि. ३ सप्टेंबर रोजी मुक्तता झाली होती.

त्याच प्रमाणे याच आठवड्यात उमरावती तुरुंगातून सागरचे दे. भ. डॉ. पंडित हे सुटले होते व चौकशी कमेटी समोर साक्ष देण्यासाठी त्यांनी उमरावतीलाच राहण्याचे ठरविले होते.

उमरावतीचे तरुण कार्यकर्ते श्री. सहस्त्रबुद्धे हेही जबलपूर तुरुंगातून सुटून याच आठवड्यात उमरावतीस पोचले होते.

दि. ५ सप्टेंबर रोजी, सौंसर तालुक्यातील सावंगा येथील श्री. लक्ष्मण झोलबा, मान्याचे श्री. रघुनाथ जंशी, श्री. सीताराम जाजू, संकरसा कलाल, जैन व श्री. हरिभाऊ जैन ह्यांची सुटका झाली होती.

लोकनायक अणे यांचे व्याख्यान : दि. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता गणेशोत्सवात वीर वामनराव जंशी यांचे अध्यक्षतेखाली लोकनायक बापूजी अणे यांचे 'राष्ट्रीयत्व' या विषयावर व्याख्यान झाले होते.

त्याच प्रमाणे शुक्रवारी रात्री ९ वा. जोग चौकात आग्रा येथील ठाकूर गोविंदसिंगजी यांचे, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संगीत राष्ट्रीय भजनाचा कार्यक्रम झाला होता.

जाहीर सभा : दि. १० सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता गांधी चौकात, विदर्भ युवक संघातर्फे श्री. गो. भ. देव यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून संघाचे तुरुंगातून सुटून आलेले चिटणीस दे. भ. दि. ह. सहस्त्रबुद्धे, त्याच प्रमाणे उमरावती तुरुंगातून मुक्त झालेले काँग्रेस कार्यकर्ते श्री. तिवाटणे, श्री. सीताराम जाजू, श्री. रंगनाथ जोशी, श्री. वासुदेवराव बडनखे, श्री. हरिभाऊ व इतर स्वयंसेवकांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले होते. सभेत खामगावचे दे. भ. कोर्डे गुरुजी, नागपूरचे श्री. वाचासुंदर, श्री. सहस्त्रबुद्धे व श्री. तिवाटणे आदींची भाषणे झाली.

गणेश विसर्जन : दि. १३ सप्टेंबर रोजी उमरावती शहरातील सर्व गणपतींची एकत्र व भव्य मिरवणूक समारंभपूर्वक निघून शहराच्या

प्रमुख मार्गाने फिरून आल्यानंतर जोग चौकातील विहिरीत या गणपतींचे विसर्जनाचा सोहळा पार पडला होता.

उमरावती जिल्हा – महिला परिषद.

ता. १७ सप्टेंबर १९३२ रोजी दोन प्रहरी एक वाजता येथील गणेश नाटकगृहात उमरावती जिल्हा महिला परिषदेच्या अधिवेशनास सुरवात झाली. प्रतिनिधी व प्रेक्षक यांनी अर्धे नाटकगृह चिक्कार भरुन गेले होते. सुरवातीला स्वागतपर पद्यांचे पेटीवर सुस्वर गायन झाले. व त्यानंतर स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीविषयी नित्य खटपट करणाऱ्या येथील सौ. सावित्रीबाई भट ह्यांनी सौ. मथुराबाई द्रवीड ह्यांनी आतापर्यंतच्या स्त्रियांच्या हितासाठी केलेल्या एकंदर कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून, सौ. मथुराबाई द्रवीड ह्यांजकडेच आजच्या परिषदेचे अध्यक्षस्थान सोपविण्यात यावे अशी सुचना माडली. निरनिराळ्या प्रतिनिधींनी ह्या सुचनेस पाठिंबा दिल्यानंतर टाळ्यांच्या गजरात अध्यक्ष सौ. मथुराबाई द्रवीड ह्यांनी अध्यक्षस्थान स्विकारले व आपले अध्यक्ष ह्या नात्याने करावयाचे भाषण केले. त्यानंतर अध्यक्षांनी स्वतःच क्रमाक्रमाने सात ठराव मांडले व त्यापैकी प्रत्येकावर लहान लहान पण पुर्ण विवेचक भाषणे केली. ह्यात पहिला ठराव येथील स्त्रियांच्या उन्नती प्रित्यर्थ सतत गेली तिस वर्षे ज्या खटपट करीत आहेत त्या, सौ. अक्कांच्या (सौ. लेडी जोशी) गौरवाबद्दल होता. आणि (२) स्त्रियांचे कॉलेज स्थापन केल्याबद्दल सौ. रमाबाई तांबे ह्यांचे अभिनंदन, (३) कॉलेजात स्त्रियांना संगीतकला व प्रपंचशास्त्र हे विषय घेता यावे, (४) व्हेजीटेबल तुपाची विक्री बंद व्हावी, (५) देशी उद्योग-धंद्यांना मदत करण्यासाठी स्वदेशी वस्तूंस प्रोत्साहन, (६) स्त्रियांच्या प्रौढशिक्षणाच्या वर्गास म्युनिसिपालीटी व डि. बोर्ड ह्यांनी मदत द्यावी. व (७) अकोला येथील रा. ब. महाजनींच्या मृत्युमुळे त्यांच्या पत्नीवर कोसळलेल्या दुःखात ही परिषद वाटेकरी आहे, असे बाकीचे ठराव होते. हे सातही ठराव क्रमाक्रमाने पास झाल्यानंतर चर्चेचे ठराव पुढे आले. (१) हिन्दु विधवांच्या वारसा हक्काबद्दल दि. ब. हरविलास सारडा ह्यांनी तयार केलेल्या बिलास पाठिंबा व त्या बिलास पुर्वी ज्यांनी विरोध केला त्यांचा निषेध, (२) स्त्रीसमाजात जातीभेदाचे विष पेरले म्हणून मुख्यप्रधानांच्या जातिनिर्णयाचा निषेध, (३) मुलींचे प्राथमिक शिक्षण, खात्याने स्वतःच्या हातात घ्यावे, (४) अज्ञ मुले व मुली ह्यांच्या गुन्ह्याचा

निवाडा करण्यासाठी स्त्री न्यायाधिशाची योजना, (५) मुलींच्या ए व्ही. स्कुल्सना मदती दाखल सरकारनी द्यावयाच्या देणगी विषयीचे नियम लवचीक बनवावे, (६) प्रांतात खाजगी सुतिकागृहे स्थापन करण्याकडे लक्ष पुरवावे, (७) उमरावती येथील मुलींच्या सरकारी हायस्कूलांतील वर्ग व बोर्डींग वाढविण्यात यावे (८) प्रौढ स्त्रियांना शिक्षण देण्याकरिता प्रांतभर गावोगावी स्त्रियांचे समाज व शिक्षण मंडळ स्थापने (९) सार्वजनिक प्रसंगी स्पृश्यास्पृश्य भेद ठेवू नये (१०) अनाथ व विपद्ग्रस्त स्त्रियांसाठी अनाथाश्रम स्थापण्याचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमावी, असे दहा ठराव क्रमाक्रमाने चर्चेस घेण्यात आले व अध्यक्ष, सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. कालींदीबाई घाटे, सौ. मालतीबाई मंगळमुर्ती, सौ. कमलाबाई शिंदोरे, सौ. सरोजोनीबाई इनामदार, सौ. पद्मावतीबाई मोटे, श्रीमती माणिकताई भिडे, सौ. सावित्रीबाई भट, सौ. मालतीबाई बागवे, सौ. मुळे, सौ. शांताबाई गोखले, सौ. अनुताई जोशी व सौ. तारादेवी जोशी ह्यांची निरनिराळ्या ठरावावर भाषणे झालीं. अनुक्रमे हे ही ठराव क्रमवारीने सर्वानुमते पास झाले. त्यानंतर अध्यक्षांनी समारोपाचे भाषण केले व लवकरच बुलढाणा येथे भरणाऱ्या प्रांतिक महिला परिषदेच्या अधिवेशनाकरिता पाठवावयाच्या प्रतिनिधींची नावे वाचून दाखविल्यानंतर व शेवटी 'वंदे मातरम्' गीताचे गायन झाल्यानंतर ह्या अधिवेशनाचे काम समाप्त झाले.

स्कॉऊट संघाची 'ग्राम सुधारणेवर' व्याख्यान माला.

उमरावतीच्या स्कॉऊट संघातर्फे येथील नार्मल स्कूल फॉर बॉइज् मध्ये, दर शनिवार दुपारी 'ग्रामसुधारणा' या विषयावर एक व्याख्यानमाला दि. १७ सप्टेंबर पासून आयोजित केली होती.

या व्याख्यान मालेचे पहिले पुष्प 'गावगाडा' ह्या विषयावर, येथील सुप्रसिद्ध नागरिक व वकील रा. ब. ब्रम्ह यांनी गुंफले होते.

त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, 'महाराष्ट्रात पूर्वी 'गावगाडा' हा शब्द प्रचलीत होता. गावगाडयाचे काम म्हणजे सर्व गावचे काम, असा त्याचा अर्थ होता. गावचे सर्व काम निरनिराळ्या वतनदार कामगारांकडून सुव्यवस्थित व्हावे असा या संस्थेचा उद्देश होता.

खेडे गावची व्यवस्था पहाण्याचे काम बारा वतनदार कामगार मंडळाकडे असे. त्यांना 'बलुतेदार' म्हणत. या पैकी पाटील पटवारी (कुलकर्णी)

व महार या तिघांचाच संबंध प्रत्यक्ष राज्य सत्तेशी येत असे व राज्य सत्ता देखील त्यांच्याच मार्फत खेड्याशी संबंध ठेवीत असे. या खेरीज जे नऊ वतनदार कामगार असत त्यांचा समाजाशी संबंध येऊन समाजाचे स्वास्थ व नित्य गरजा भागविण्याकडे ते लक्ष पुरवीत. हे नऊ वतनदार म्हणजे सुतार, लोहार, कुंभार, चांभार, परिट, न्हावी, गुरव, गारपगारी व जोशी असे असत.

गुरवाचे काम देवळाची झाडलोट करून देऊळ साफ ठेवणे हे असे. गारपगारी हा कामगार खेड्यावर येणाऱ्या दैवी आपत्ति कशा दूर होतील याचा विचार करून तदनुरूप व्यवस्था करीत असे. धार्मिक लग्नकार्यादी विधी व देवांची पूजा अर्चा करण्याचे काम जोशी या वतनदार कामगाराचे असे.

या सर्व बलुतेदारांना पैशाचे रूपाने वेतन मिळत नसे. गावच्या उत्पन्नातून ठराविक प्रमाणात त्यांना धान्य वगैरे गरजा भागविणाऱ्या वस्तू मिळत असत. या सर्व बलुतेदारांवर देखरेख ठेवण्याचे काम पाटलाचे असे.

पूर्वीची बारा बलुतेदारांची ग्राम व्यवस्थेची पद्धती ग्राम सुधारणेचे दृष्टीने पुन्हा अस्तित्वात आणण्याचे ठरविले तर, त्या यादीत आणखी तीन वतनदार कामगारांची भर घालावी लागेल. हे तीन कामगार म्हणजे सावकार (पैसे पुरविणारा), वैद्य व शिक्षक हे होत."

महाराष्ट्रातील 'गावगाडा' या संस्थेचा थोडक्यात इतिहास सांगून त्यांनी आपले व्याख्यान संपविले होते.

गांधीजींचे प्रसिद्ध प्राणांतिक उपोषण.

उमरावतीत प्रचंड जाहीर सभा व हरताळ.

दि. २० सप्टेंबर पासून महात्मा गांधी प्राणांतिक उपोषणाला सुरुवात करणार होते. त्याबद्दल, दि. १८ रविवारचे दिवशी रात्री साडे आठ वाजता जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जंगी जाहीर सभा भरून, तीत डॉ. सबनीस, श्री. प्यारेलालजी, श्री. बाबासाहेब देशपांडे, श्री. गुलाबराव बक्षी व श्री. नानासाहेब बामण-गावकर यांची परिणामकारक व्याख्याने झाली होती.

"महात्माजींचा प्राण वाचवावयाचा असेल तर अस्पृश्यांना त्यांचे न्याय्य हक्क हिंदु समाजाने बहाल करून त्यांचेशी समतेचे नाते अवलंबिले पाहिजे व अशा रीतीने हिंदु समाजातच अस्पृश्यांचा समावेश राहावा असे धोरण आखले पाहिजे." असा वक्त्यांनी उपदेश केला होता.

हरताळ मिरवणुक व जंगी जाहीर सभा.

दुसरे दिवशी दि. १९ रोजीही श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली स्पृश्या-स्पृश्य स्त्री पुरुषांची प्रचंड सभा होऊन, 'महात्मा गांधी आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे प्राणांतिक उपोषण करणार म्हणून त्यांना ईश्वराने उदंड आयुरारोग्य द्यावे' अशी सामुदायिक प्रार्थना करण्याकरिता अमरावतीच्या नागरिकांची रा. ब. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता.

दि. २० सप्टेंबर रोजी दुपार पासून गांधीजींचे प्राणांतिक उपोषणाला सुरवात होणार होती. म्हणून त्या दिवशी सकाळ पासूनच उमरावती शहरात स्वयंस्फूर्त हरताळ पाळण्यात आला होता. सायंकाळी महात्मा गांधींच्या प्रतिमेची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली व ही मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गाने फिरून जोग चौकात परत आल्यानंतर तेथे रा. ब. ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली जंगी जाहीर सभा भरली. अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषणानंतर त्यांनी सभेपुढे येणारा ठराव वाचून दाखविला.

"हिंदुस्थानच्या आगामी सुधारणेच्या राज्यघटनेबाबत इंग्लंडच्या मुख्य प्रधानांनी जातीविषयक जो निकाल दिला त्यामुळे हिंदुस्थानावर, विशेषत हिंदु धर्मावर नवीन संकट उत्पन्न झाले आहे अशी महात्मा गांधींची दृढ भावना आहे, व हे संकट दूर होईपर्यंत उपास करून देहत्याग करायचा असा खडतर निश्चय महात्माजींनी केला आहे हे सर्वास विदित आहेच.

हे हिंदु समाजावरील संकट, हा हिंदु धर्मावरील आघात निवारला जावा व महात्माजींना आपले व्रत प्राणत्यागापर्यंत चालू ठेवण्याचे कारण पडू नये अशी हया सभेची उत्कट इच्छा आहे. म्हणून ही सभा सर्व हिंदु समाजास विनंती करते की, हयाबद्दल जे जे प्रयत्न करणे शक्य असतील ते ताबडतोब करण्यात यावेत."

या ठरावावर श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. गायकवाड, श्री. केळकर शास्त्री, श्री. सयाजीराव, श्री. बाबासाहेब देशपांडे, श्री. दिवेकर शास्त्री, श्री. बलदेवप्रसाद यांची भाषणे झाली. शेवटी अध्यक्षांनी ठराव मतास टाकला व तो सर्वानुमते मंजूर झाल्यावर, त्यांचे समारोपाचे भाषण होऊन सभा संपली.

भगिनी वर्ग आणि हरिजन मंदिर प्रवेश

दि. २० सप्टेंबर रोजी ब्रम्हविद्यामंदिरात सौ. सावित्रीबाई भट यांच्या अध्यक्षतेखाली अमरावतीच्या स्त्रियांची जाहीर सभा होऊन सभेत सौ. प्रमिलाबाई ओक, सौ. कालिंदीबाई घाटे, सौ. शांताबाई भट आदी भगिनींची व वेदशास्त्र संपन्न महादेवशास्त्री दिवेकर यांचे 'अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाला' मान्यता द्यावयास अनुकूल मत प्रतिपादन करणारी भाषणे झाली व तशा प्रकारचा एक ठराव या स्त्रियांच्या सभेने एकमताने पास केला होता.

उमरावतीत अकाली दिवाळी : धर्म भोळेपणाचा नमुना.

एका कानात कुलुप व दुसऱ्या कानात दिवाळीचा दिवा अशा स्वरुपातील देवता स्त्री वेषात कोणाला तरी कोठे तरी दिसली व "शनिवार रविवार आणि सोमवारी जे दिवाळी करणार नाहीत त्यांच्या घरांना कुलुपे लागतील" असे त्या देवतेने (स्त्री ने) सांगितल्याची हूल गावभर उठल्याने त्यावर विश्वास ठेवून दि. २४, २५ व २६ सप्टेंबर रोजी अंधश्रद्धाळू लोकांनी गावच्या बऱ्याच मोहोल्यात दीपवाळी प्रमाणे घरावर दिवे लावले होते.

श्री अंबा मंदिर हरिजन मंदिर प्रवेश.

'हिंदु समाजाच्या संघटनेच्या वाढी प्रीत्यर्थ उमरावतीच्या श्री अंबेचे मंदिरात अस्पृश्यांना दर्शनांसाठी जाऊ द्यावे' असे दि. २५ सप्टेबर रोजी रात्री श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात भरलेल्या सात-आठ हजार लोकांच्या सभेने ठरावाद्वारे मत व्यक्त केले होते, वरील आशयाचा ठराव श्री. बामणगावकरांनी मांडला, त्यावर श्री. अण्णासाहेब देशपांडे, रा. ब. ब्रम्ह, वीर वामनराव जोशी व वे. शा. सं. श्री. केळकर शास्त्री यांनी भाषणे करून आपापले विचार व्यक्त केल्यानंतर मुख्य ठराव एक गृहस्थ विरुद्ध असता प्रचंड बहुमतांनी पास झाला.

हा पास झालेला ठराव सभेचे अध्यक्षांनी श्री अंबादेवी संस्थानकडे पाठविला होता.

अस्पृश्य समाजाची सभा : दि. २७ सप्टेंबर रोजी उमरावतीच्या डिस्प्रेस क्लॉस असोसिएशनचे तर्फे श्री. संपतराव नाईक, एम्. एल् सी. यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत श्री ओगले इत्यादी अस्पृश्य समाजातील उभयपक्षाचे पुढाऱ्यांची भाषणे झालीत. महात्मा गांधी आणि श्री. बाबासाहेब आंबेडकर यांचेत झालेल्या पुणे– कराराबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते. त्याच सभेत श्री अंबादेवीचे पंचांनी अस्पृश्यांना अंबादेवीचे दर्शनास परवानगी द्यावी अशी पंचांना विनंती करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता.

आत्महत्या : उमरावतीचे एक अर्जनविस श्री. मारोतराव भाट यांनी दि. ३० सप्टेंबर रोजी हेडपोस्ट ऑफिस जवळील विहिरीत उडी टाकून आत्महत्या करून घेतली होती.

श्री. भाट यांनी कोणाकडून तरी कर्ज घेतले होते व मुद्दल फिटून व्याज देणे राहिले होते. त्यासाठी मुदत मिळेना. राहत्या घराचा लिलाव त्या रकमेसाठी लागला होता व दुसरे दिवशी त्यांचे घर लिलावाने हर्रास होणार होते. याची त्या साल्स व मानी गृहस्थास इतकी खंत वाटली की शेवटी त्याने जगाचा रामराम घेण्याचा मार्ग पत्करला होता.

स्पृश्यास्पृश्य नागरिकांची जाहीर सभा

पुणे– करार अस्तित्वात येऊन महात्माजींनी उपोषण सोडले याबद्दल आनंद व समाधान व्यक्त करण्यासाठी दि. २८ सप्टेंबर रोजी महात्मा गांधींच्या फोटोची येथील नागरिकांनी प्रचंड मिरवणूक काढली व शहराच्या मुख्य मार्गाने फिरून ती जोग चौकात आल्यावर तेथे रा. ब. ब्रम्ह यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत प्रथम सर्वांनी उभे राहुन प्रार्थना म्हटली. नंतर श्री. मन्नु मेहतर यांनी वैदिक प्रार्थना म्हटल्यावर श्री. बाबासाहेब खापर्डे, गायकवाड व वीर वामनराव जोशी ह्यांची स्पृश्यास्पृश्यांच्या करारास पाठिंबा देणारी भाषणे झाली होती.

उमरावतीत अस्पृश्य मंदिर प्रवेशाची चळवळ : महात्माजींनी ज्या दिवशी प्राणांतिक उपोषणास प्रारंभ केला त्याच दिवशी रा. ब. ब्रम्ह यांच्या

अध्यक्षतेखाली जोग चौकात झालेल्या प्रचंड सभेतच, शहरातील स्पृश्य–अस्पृश्यांचा प्रश्न तांतडीने सोडविला जावा ह्या करिता रा. ब ब्रम्ह यांच्या अध्यक्षतेखाली एक तात्पुरते मंडळ स्थापन करण्यात आले होते व या मंडळात श्री. पी. वाय्. देशपांडे व श्री. व्ही. डी. ब्रम्ह हे दोन तरुण चिटणीस, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. वाटाणे व नाईक हे उपाध्यक्ष आणि वीर वामनराव जोशी, श्री. संभाजीराव गोखले, सौ. विमलाबाई देशपांडे वगैरे वजनदार मंडळी सभासद होती.

वरील तात्पुरत्या मंडळाने अस्पृश्यांना देवळे खुली व्हावीत यासाठी दि. २१ सप्टेंबर रोजी श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली वाईचे पंडित श्री. दिवेकर शास्त्री यांचे व्याख्यान घडवून आणले होते.

उमरावती शहरात आणि त्याच बरोबर वऱ्हाड प्रांतात अस्पृश्यांना मंदिरे बंद राहू नयेत ह्याकरिता चळवळ करावयाची असेल तर ती उमरावतीच्या जगदंबेचे मंदिरापासून सुरू केली पाहिजे, असे विचारी लोकांस वाटले व ते त्या उद्योगास लागले होते.

रा. ब. ब्रम्ह, श्री. कृष्णाजी गोपाळ देशपांडे, श्री. बाबासाहेब खापर्डे, श्री. महादेवराव गणोरकर वगैरे मंडळींनी अंबादेवी संस्थानचे पंचांना भेटून त्यांना 'हा अस्पृश्यांना मनाई करण्याचा प्रश्न सलोख्याने व एकमताने सोडवावयास तयार व्हा' असा सल्ला दिला होता व त्याप्रमाणे अंबा संस्थानचे पंच खाजगी बैठकीत आणि संस्थानच्या पंच कमेटीचे सभेत बसून या विषयाचा विचार करूं लागले होते.

वरील प्रमाणे एका बाजूने विचार सुरू असताच दुसरीकडे वीर वामनराव जोशी, पं. दिवेकर शास्त्री, श्री. पी. वाय्. देशपांडे, श्री. गुलाबराव बक्षी, डॉ. सबनीस, सौ. विमलाबाई देशपांडे आणि इतर वृद्ध–तरुण मंडळींनी उमरावतीच्या स्त्री–पुरुष नागरिकांत अस्पृश्यांना मंदिर प्रवेशास मनाई असू नये व अंबा संस्थानात जाण्याची त्यांना पूर्ण परवानगी असावी यासाठी लोकमत जागृत करण्याकरिता, स्पृश्यास्पृश्य हिंदु स्त्री – पुरुषांच्या जाहीर सभा भरवून आणि हजारो स्त्री पुरुषांच्या अर्जावर सह्या घेऊन एक मोठी मोहीमच उभारली होती. त्यामुळे शहरातील नागरिकांत विलक्षण जागृती निर्माण होऊ लागली व अंबा मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा याला

लोकमत अनुकूल होऊ लागले होते. फक्त अडचण होती ती देवी संस्थानचे पंचापैकी काही पंचांच्या दुराग्रहाचीच होती.

डॉ. ॲनीबेझंट यांचा जन्मोत्सव : दि. १ ऑक्टोबर रोजी, येथील ब्रम्हविद्यामंदिरात सायंकाळी, डॉ. ॲनीबेझंट बाईचा जन्मोत्सव श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला होता.

या प्रसंगी श्री. बाबासाहेब देशपांडे आणि प्रो. रामनाथ वगैरे वक्त्यांची भाषणे व शेवटी अध्यक्षांचे भाषण झाले होते.

महात्मा गांधींचा वाढदिवस : दि. २ ऑक्टोबर रोजी, रात्री जोग चौकात वीर वामनराव यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, महात्मा गांधींचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सभेत डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. बामणगावकर, श्री. प्यारेलालजी सेवक व श्री. गुलाबराव बक्षी यांची समयोचित भाषणे झाली होती.

धर्मशास्त्र दृष्ट्या चर्चा : अस्पृश्य मंदिर प्रवेशाला धर्म शास्त्राधार आहे की, नाही या संबंधी दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात श्री. अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली दोन विद्वान शास्त्रांचा जाहीर वादविवाद झाला होता. वे. शा. सं. केळकर शास्त्री उमरावती व पं. दिवेकर शास्त्री वाई ह्यांनी धर्मशास्त्रांचा आधार देऊनच अस्पृश्यांचे मंदिर प्रवेशाचे प्रश्नावर आपापली मते व्यक्त केली होती.

नवे सर्वाधिकारी : उमरावती जिल्ह्याचे सर्वाधिकारी श्री. लक्ष्मणराव देशमुख यांना सहा महिने सक्त मजुरी व २०० रू. दंड अशी शिक्षा झाली. त्यांना देण्यात आलेला जेलमधील ब वर्ग त्यांनी नाकारला. त्याच प्रमाणे श्री. देशकर यांनाही सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.

श्री. देशमुखांचे जागी काँग्रेसचे जिल्ह्याचे सर्वाधिकारी म्हणून श्री. रामेश्वरजी अवस्थी, फ्री प्रेस पत्राचे एजंट यांची नियुक्ती झाली होती.

सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची सुटका.

सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांना सेशन कोर्टाने दि. ३ एप्रील १९३२ रोजी निकाल देऊन एकवर्ष साध्या कैदेची शिक्षा सुनावली होती व त्यावर

वरिष्ठ कोर्टाकडे अपील होणार होते. दरम्यान त्यांना शिक्षा भोगण्यासाठी प्रथम अमरावती व नंतर नागपूर जेलमध्ये ठेवण्यात आले, ही माहिती पूर्वी दिली आहेच. त्यानंतर दि. १५ सप्टेंबर १९३२ रोजी नागपूर सेंट्रल जेलमधून १०० रुपयांच्या जात मुचलक्यावर त्यांची सुटका झाली होती. त्यांनी कोर्टाकडे केलेल्या अपीलाचा निकाल ॲडिशनल ज्युडिशिअल कमिश्नर श्री. भवानीशंकर नियोगी यांनी दि. ३ ऑक्टोबर रोजी दिला त्यांत सौ. पार्वतीबाईंना निर्दोष ठरवून मुक्त केले होते.

अभिनंदाची जाहीर सभा : सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची निर्दोष सुटका झाल्याबद्दल त्यांचे व कायदेभंगाच्या चळवळीत शिक्षा भोगून आल्याबद्दल सर्वश्री सोमाणी, गिरगावकर, कृष्णराव कोरान्ने, शंकरराव कोर्डे, भीमराव काजळे, सावंत, भागवतकार, बरगडे वगैरे देशभक्तांचे दि. ८ ऑक्टोबर रोजी जाहीर सभा भरून अभिनंदन करण्यात आले होते.

सभेत श्री. सोमाणी, श्री. खोडे, श्री. कोरान्ने व सौ. पटवर्धन यांची व्याख्याने झाली होती.

रणजीत क्रिकेट टुर्नामेंटस् : उमरावतीच्या हिंदु हायस्कूलच्या मैदानावर दि. २३ आक्टोबर पासून रणजीत क्रिकेट टुर्नामेंटस् सूरू झाल्या होत्या. त्या पाहण्यासाठी शहरांतील क्रिकेट शौकीनांची मैदानावर गर्दी होत असे.

डॉ. कोकर्डेकरांचे अभिनंदन : उमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातर्फे व्यायाम विषयक शिक्षण घेण्यासाठी जर्मनी येथे गेलेले श्री. कोकर्डेकर हे शिक्षण घेऊन सप्टेंबर महिन्यात उमरावतीस परत आले होते.

दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी गणेश नाटक गृहात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. कोकर्डेकर, डी. पी. ई. (बर्लिन) आर. एल्. एस्. (लंडन) यांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता.

सुटका : उमरावती तुरुंगातून सप्टेंबरचे शेवटचे आठवड्यात उमरावतीचे तरुण कार्यकर्ते श्री. शंकरराव खोडे, श्री. रामभाऊ बडनखे, श्री. जीवनधर भागवतकार व नागपूरच्या हिंदुस्थानी सेवा दलाचे कार्यकर्ते

श्री. स. वि. रानडे आणि जबलपूरचे पं. राधिकाप्रसाद त्रिपाठी ह्यांची सुटका झाली होती.

सार्वजनिक सत्यनारायण : वडाळी येथे स्पृश्या-स्पृश्यांत सार्वजनिक सत्यनारायण होऊन, एका बिछायतीवर भेदाभेद न ठेवता स्पृश्य-अस्पृश्य बसले व प्रसाद ग्रहण केला.

ह्या प्रसंगी श्री. सुखाप्पा, श्री. देव व श्री. जोशी ह्यांची भाषणे झाली होती.

शुद्धीसमारंभ : स्थानिक आर्यसमाज मंदिरात वे. शा. सं. दिवेकर, शास्त्री यांचे हस्ते रविवार दिनांक २ रोजी सकाळी, आर्य समाजातर्फे श्रीमती हीराबाई रहिमतपुरकर व त्यांच्या मुलाचे शुद्धीकरण होऊन त्यांची नांवे अनुक्रमे कलावती व गिरधर अशी ठेवण्यात आली होती.

सनातन धर्मांची स्थित्यन्तरे : दि. ८ आक्टोबर रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली वे. शा. सं. दिवेकर शास्त्री यांचे 'सनातन धर्माची स्थित्यन्तरे' या विषयावर साधार व परिणामकारक भाषण झाले होते.

विहीर आणि देऊळ खुले केले : येथील हिऱ्या मोत्याचे दलाल व आर्य समाजी श्री. पुंडलीक विठोबा यांनी आपले खाजगी देऊळ व विहीर अस्पृश्य बंधूसाठी खुली केल्याचे जाहीर केले होते.

अस्पृश्यता निवारण : दि. १० ऑक्टोबर रोजी रात्री ८–३० वा. जोग चौकात, माजी गृहमंत्री श्री. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली, माजी शिक्षणमंत्री रा. ब. केळकर यांचे 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले होते.

जाहीर सभा : 'अस्पृश्यता व शास्त्र' या विषयावर दि. ३ ऑक्टोबर रोजी वे. शा. सं. पंडित दिवेकर शास्त्री व वे. शा. सं. केळकर शास्त्री यांचेत जो जाहीर वादविवाद झाला होता त्यावर मतप्रतिपादन करण्यासाठी दि. ५ ऑक्टोबर रोजी वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली श्री. बामणगावकर व श्री. वि. दा. ब्रम्ह वगैरे वक्त्यांची जाहीर सभेत भाषणे झाली होती.

सहभोजन : उमरावतीच्या आर्यसमाजाचे चिटणीस श्री. जयकृष्णपंत कुऱ्हाडे यांच्या अविश्रांत खटपटीमुळे दि. ८ ऑक्टोबर रोजी आर्य समाज मंदिरात त्यांनी सहभोजनाचा योग जुळवून आणला होता.

डॉ. वऱ्हाडपांडे, डॉ. भट, डॉ. पातुरकर, श्री. गायकवाड, डॉ. सबनीस इत्यादी डॉक्टर्स, श्री. ब्रम्ह, श्री. रणदिवे, श्री. दामले. श्री. शिदोरे, श्री. चौबळ, श्री. अनगळ, श्री. पु. य. देशपांडे, श्री. बोबडे, श्री. वामनराव देशमुख इत्यादी वकील, प्रो. रामनाथ, प्रो. पांडे, प्रो. माळवणकर आणि दादासाहेब इंगोले, श्री. मारोतराव कदम, श्री. जयराम पाटील, श्री. ओगले, श्री. गवई, श्री. नाईक, श्री. आचार्य, सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. पार्वतीबाई, सौ. रुखमाबाई, सौ. सुशीलाबाई सबनीस, सौ. सरलाबाई चौबळ, सौ. केसरबाई गवई वगैरे स्पृश्यास्पृश्यातील प्रमुख मंडळीसह सुमारे दोनशे मंडळी या सहभोजनाला हजर होती.

(या सहभोजनात ज्यांनी भाग घेतला त्यांना ब्रम्हवृंदाचे सभेने बहिष्कृत म्हणून नंतर जाहीर केले होते.)

नवरात्र व स्वदेशी : नवरात्रात देवीजवळ भरणाऱ्या यात्रेत परदेशी मालाची दुकाने लागू नयेत म्हणून येथील स्वदेशी संघातर्फे, देवीच्या आसपासची सर्वजागा नगरपालिकेकडून भाडयाने घेतली होती. स्वदेशी वस्तूंचे मालाची विक्री चांगली झाली. परदेशी वस्तूंच्या विक्रीला या उपक्रमाने एकप्रकारे यात्रेचे वेळी शह बसला होता.

उमरावती नगरपालिका व अस्पृश्य : दि. ८ ऑक्टोबर रोजी उमरावती नगरपालिकेच्या सर्व साधारण सभेत, शहरातील नगरपालिकेच्या मालकीचे सर्व पाणवठे (नळ व विहिरी) अस्पृश्य बंधूसाठी मोकळे करण्याबद्दलचा ठराव बहूमताने मंजूर केला होता.

सुटका : दि. १० ऑक्टोबर रोजी उमरावती तुरुंगातून सर्वश्री तुळशीराम दोबे, आर्वीचे नारायण नाथानी, चांदूरचे आत्माराम गोविंद सहारे व महीपत हनुमंत मटाळे, आणि उमरावतीचे श्री. काशीराव पागरु यांची सुटका झाली होती.

श्री. बाबुलाल अग्रवाल आणि आकोल्याचे श्री. दयालाल यांना जेलमध्ये फार त्रास देण्यात आला असे निवेदन श्री. तुळशीराम दोबे यांनी केले होते.

आकोल्याचे राजबंदी दे. भ. दयालाल यांना दि. ३ ऑक्टोबर रोजी उमरावतीचे तुरुंगात ३० फटके मारण्यात आले होते.

प्रो. हर्षे यांचे व्याख्यान : पुण्याच्या 'रत्नाकर' मासिकाचे विद्वान संपादक आणि टिळक महाविद्यालयाचे रजिस्ट्रार प्रो. हर्षे, वाङ्मय विशारद यांचे, दि. १५ ऑक्टोबर रोजी येथील वक्तृत्वोत्तेजक मंडळातर्फे ब्रम्हविद्या मंदिरात प्रो. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली 'आधुनिक मराठी वाङ्मयातील विचार प्रवाह' या विषयावर विव्दत्ताप्रचुर व्याख्यान झाले होते.

विदर्भ प्रकाशन संस्थेतर्फे त्याच दिवशी सकाळी त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

सुटका : खामगावच्या राष्ट्रीय विद्यालयाचे आचार्य श्री. परांजपे व श्री. मांगीलालजी आणि उमरावती जिल्हा काँग्रेसचे सातवे सर्वाधिकारी श्री. माधवराव गोखले यांची दि. २२ ऑक्टोबर रोजी उमरावती तुरुंगातून मुक्तता झाली होती.

वकिलीची सनद रद्द : उमरावतीचे श्री. पी. वाय्. देशपांडे वकील यांना कलम १२४–अ प्रमाणे शिक्षा झाली होती म्हणून, नागपूर हायकोर्टाने त्यांची वकिलीची सनद बेमुदत रद्द केली होती.

परदेशी फटाक्यांवर बहिष्कार मोहीम : यंदाचे दिवाळीत परदेशी फटाके लोकांनी उडवू नयेत म्हणून गेल्या आठ दिवस मुलामुलींच्या मिरवणुकी उमरावतीत निघाल्या होत्या. परदेशी फटाके उडवू नये आणि विकत घेऊ नयेत अशी लोकभावना जागृत करण्यासाठी श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. मराठे, श्री. ओझरकर, श्री. खोडे इत्यादी तरूणांनी मोहोल्या–मोहोल्यातून सभा घेऊन व्याख्यानाद्वारे ही बहिष्काराची मोहीम सुरू केली व नेटाने चालविली होती.

सुटका : उमरावती जिल्हा काँग्रेसचे तिसरे सर्वाधिकारी दे. भ. मथुरादास वसनजी व पाचवे सर्वाधिकारी दे. भ. नारायणराव भदे यांची गेल्या आठवड्यात तुरुंगातून सुटका झाली होती.

श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांची प्रवचने.

धुळ्याचे सुप्रसिद्ध वक्ते आणि 'रामी रामदास' मासिकाचे संपादक श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांची दि. १ व २ नोव्हेंबर रोजी उमरावतीचे

ब्रम्हविद्या मंदिरात 'रामदासाचे राजकारण' या विषयावर साधार व उत्कृष्ट प्रवचने झाली होती.

श्री धन्वंतरी उत्सव : वैद्यभूषण हिर्लेकर शास्त्री यांचेकडे दि. २७ ऑक्टोबर रोजी श्री धन्वंतरी उत्सवानिमित्त 'डॉक्टर व आयुर्वेद' या विषयावर, डॉ. भागवत एम्. बी. बी. एस्, यांचे अध्यक्षतेखाली डॉ. गायकवाड एम्. बी. बी. एस्. यांचे विचार परिप्लुत व्याख्यान झाले होते.

विदर्भ आयुर्वेद विद्यालयातही सालाबादप्रमाणे धन्वंतरी उत्सव साजरा करण्यात येऊन त्यानिमित्त पानसुपारी झाली होती.

विदर्भ महिला परिषदेची एक वर्षातील कामगीरी.

अखिल भारतीय महिला परिषदेची एक शाखा म्हणून 'विदर्भ महिला परिषद' उमरावती येथे इ. स. १९३१ च्या सप्टेंबरमध्ये स्थापन करण्यात आली होती व या शाखेतर्फे प्रांतिक विदर्भ महिला परिषदेचे अधिवेशन अमरावती येथे दि. २४ ऑक्टोबर १९३१ रोजी डॉ. कमलाबाई देशपांडे (सातारा) यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते. परिषदेच्या ह्या वार्षिक अधिवेशनानंतर, नवीन स्थानिक कमिटीची सभा होऊन, सौ. मथुराबाई द्रविड ह्या अध्यक्ष व श्रीमती माणिकबाई भिडे व सौ. विमलाबाई देशपांडे ह्या चिटणीस निवडल्या गेल्या आणि अखिल भारतीय महिला परिषदेच्या स्टॅन्डिंग कमेटीच्या मेंबर म्हणून सौ. विमलाबाई देशपांडे यांना नेमण्यात आले होते.

अ. भा. महिला परिषदेच्या मद्रास येथे दिसेंबर मध्ये भरलेल्या अधिवेशनासाठी वऱ्हाड प्रांतातून सहा प्रतिनिधी पाठविण्यात आले होते. या अधिवेशनात वरील सहा प्रतिनिधीपैकी तिघींनी निरनिराळ्या ठरावावर भाषणे केलीत.

या परिषदेच्या अमरावती स्थानिक समितीच्या सभा नियमाने दरमहा भरत व तींत स्त्रियांच्या उन्नतीविषयी विचार केला जाई. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या हक्काविषयी जेव्हा नविन बिले, कायदे मंडळात

येत असत त्या त्या वेळी अशा बिलांना पाठिंबा देण्यासाठी स्त्रियांच्या सभा भरविल्या जात. दि. ब. हरबिलास सारडा यांनी लेजिस्लेटिव्ह असेम्बलीत हिंदु विधवांच्या वारसा हक्काबद्दल जेव्हा बिल आणले त्यावेळी त्या बिलाला सर्व स्त्रियांचा पाठिंबा आहे हे दर्शविण्यासाठी हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतात स्त्रियांच्या सभा झाल्या. त्याच प्रमाणे अमरावतीतही या परिषदेच्या स्थानिक समितीने स्त्रियांची एक प्रचंड जाहीर सभा भरविली होती व पाठिंबा व्यक्त केला होता. या सभेतच मद्रास अधिवेशनात झालेल्या ठरावांची माहिती श्रीमती माणिकताई भिडे यांनी सांगितली होती. तसेच नवीन राज्य घटनेत सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिला जावा व स्त्री-पुरुषांची समानता मान्य केली जावी अशा आशयाचा जो खलिता अ. भा. महिला परिषदेने, राऊण्ड् टेबल कान्फरन्सच्या प्रतिनिधींना पाठविला होता त्यासंबंधीची सर्व माहिती सौ. विमलाबाई देशपांडे यांनी सभेत सांगितली होती.

प्रत्येक नागरिकाला आणि विशेषकरून स्त्रियांना असणे आवश्यक अशी माहिती, सर्व प्रौढ महिलांना प्राप्त करून देण्यासाठी, स्त्रियांचे दैनिक अगर साप्ताहिक, समाज मंडळ स्थापन करून काढावे व त्याद्वारे निरनिराळ्या उपयुक्त विषयावर व्याख्याने आयोजित करण्याची म्हणजे स्त्री-शिक्षणाची एक योजना सौ. विमलाबाई देशपांडे यांनी या सभेत मांडली व त्यास कु. चंद्राबाई साने यांनी अनुमोदन दिले होते.

खेडेगावातील अगर अस्पृश्य वर्गातील स्त्रियांना स्वतःची सुधारणा कशी करून घ्यावी हे समजावून देण्यासाठी सौ. ताराबाई रणदिवे, श्रीमती गंगुबाई भोळे व श्रीमती लक्ष्मीबाई नाईक यांनी अस्पृश्य वर्गातील स्त्रियांसमोर दोन चारदा व्याख्याने दिली.

ज्ञानप्रसारक मंडळाच्या सभासद सौ. इंदिराबाई सुळे या विदर्भ महिला परिषदेच्याही सभासद आहेत. फिरत्या लायब्ररीचा प्रसार करून स्त्रियात वाचनाची गोडी उत्पन्न करण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले.

दि. ३० ऑगस्ट १९३२ रोजी स्त्रियांची जाहीर सभा घेण्यात येऊन तीत परिषदेचा एका वर्षाचा अहवाल सांगण्यात आला.

याशिवाय परिषदेतर्फे 'हिंदु स्त्रियांचे हक्क व त्यांत कोणत्या सुधारणा हव्यात' या विषयांवर रा. ब. ब्रम्ह यांचे एक सुश्राव्य व्याख्यान आयोजित केले होते.

वर्षभरातील विदर्भ महिला परिषदेची कामगिरी जरी विशेष नसली तरी, तीमुळे स्त्रियांना संघटितरीत्या काम करण्याची सवय मात्र बरीच झाली आहे व स्त्री – सुधारणेसंबंधीच्या नवनव्या कल्पना काढून त्या मूर्त स्वरूपात कशा आणता येतील ह्या गोष्टींचा विचार स्त्रिया करू लागल्या आहेत."

... ...

विदर्भ महिला परिषदेने आपल्या एक वर्षाच्या म्हणजे १९३१–३२ चे कार्याचा वरील अहवाल सप्टेंबर १९३२ मध्ये प्रसिद्ध केला. त्यावरून त्याकाळी उमरावतीतील महिलांच्या चळवळीची प्रगती किती झाली होती याचा काहीसा अंदाज केला जाऊ शकतो.

गांधी दिनाची जाहीर सभा व दहा महिन्याच्या चळवळीचे समालोचन.

उमरावती जिल्हा काँ. कमेटीचे विद्यमाने दि. ४ नोव्हेंबर रोजी रात्री आठ वाजता गांधी चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली म. गांधी दिनानिमित्त, नागरिकांची जाहीर सभा भरून तीत श्री. बामणगावकर यांनी गेल्या दहा महिन्याच्या राजकीय चळवळीचे समालोचन केले होते.

त्याच सभेत तुरुंगातून सुटून आलेले दे. भ. मथुरादास वसनजी, दे. भ. माधवराव गोखले व श्री. काशीराव बापू यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

युनिव्हर्सिटी कोर्टाची निवडणूक : नागपूर युनिव्हर्सिटी कोर्टाच्या झालेल्या निवडणुकीत उमरावतीचे श्री. ना. प्र. हिरुरकर वकील, श्री. न. ल. इनामदार एम्. ए. टी. डी., व सौ. विमलाबाई देशपांडे एम्. ए. हे तीन उमेदवार निवडून आले होते.

देशभक्त गोपाळराव खेडकर : उमरावती जिल्हा काँग्रेसचे एक सर्वाधिकारी देशभक्त गोपाळराव खेडकर यांची उमरावती तुरुंगातून दि. ९ नोव्हेंबर रोजी शिक्षेची मुदत संपल्यामुळे सुटका झाली होती.

त्याच दिवशी रात्री साडेआठ वाजता दे. भ. रामेश्वरजी अवस्थी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तींत डॉ. खेडकरांचे अभिनंदनपर सर्वश्री बामणगावकर, वीर वामनराव जोशी व श्री. खेडकर यांची भाषणे झाली होती.

दे. भ. हरिहरराव देशपांडे : यांची दि. १२ नोव्हेंबर रोजी शिवनी जेलमधून मुक्तता होऊन दिनांक १४ नोव्हेंबर रोजी ते उमरावतीस आले होते.

दि. १५ नोव्हेंबर रोजी श्री. बाबासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले.

कॅम्प नगरपालिकेचे स्वयंवर : दि. १४ नोव्हेंबर रोजीं अमरावती कॅम्प नगरपालिकेची निवडणूक लाल विरुद्ध हिरव्या रंगाचे चिन्हात होऊन, हिरवा रंग यशस्वी झाला होता.

लाल रंग शेतकरी संघाचे उमेदवारांचा होता. या निवडणूकीत सर्वश्री रा. ब. खरे, डॉ. वसावे, श्री. पांडूजी, मि. याकुब, श्री शिवदास, मि. हाजी हे हिरव्या रंगाचे उमेदवार व सर्वश्री जोशी, मि. आज व श्री. सुखाप्पा हे अविरोध निवडून आले होते.

लाला लजपतरॉय यांची पुण्यतिथी : दि. १७ नोव्हेंबर रोजी रात्री, विदर्भ युवक संघातर्फे, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून स्व. लाला लजपतरॉय यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सभेत डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. बक्षी, श्री. राजदेरकर, श्री. कुऱ्हाडे, श्री. बामणगावकर व डॉ. सबनीस यांची लालाजींच्या गुणवर्णनपर भाषणे झाली होती.

ना. जयस्वाल यांना पानसुपारी : मध्यप्रांत – वऱ्हाडचे मंत्री ना. जयस्वाल यांना दि. १७ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष सेठ मीनामलजी यांनी नगरपालिकेत पानसुपारी दिली. त्या प्रसंगी ना. जयस्वाल यांचे भाषणही झाले होते.

श्री शिवाजी व्यायाम शाळा : भाजीबाजार विभागातील या व्यायाम संस्थेचा वार्षिकोत्सव दि. १८ नोव्हेंबर रोजी ना. पंजाबराव देशमुख, शिक्षणमंत्री, मध्यप्रांत–वऱ्हाड, यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने साजरा करण्यात आला होता.

सुटका : उमरावती तुरुंगातून रायपूरचे दे. भ. महंमद इस्माईलखाँ, कटणीचे ठाकुर भैय्यालाल व उमरावतीचे श्री. दत्तात्रय या राजबंदींची गेल्या आठवड्यात मुक्तता झाली होती.

दारु मक्त्यांचे लिलावावर पिकेटिंग : दि. २८ ते ३० नोव्हेंबर १९३२ या तीन दिवसपर्यंत उमरावती येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीत, मुद्दाम उभारलेल्या शामियान्यात दारूच्या मक्त्यांचे लिलाव होणार असे जाहीर झाले होते. या लिलावावर दि. २८ व २९ रोजी जिल्हा काँ. कमेटीच्या स्वयंसेवकांनी शांतपणे पिकेटिंग सुरू केले. कचेरीच्या फाटकावर पोलिस बंदोबस्त होता परंतु स्वयंसेवक थेट शामियान्यापर्यंत पोचून व हातातील झेंडे फडकावून घोषणा देईपर्यंत त्याकडे पोलिसांचे लक्षच गेले नव्हते. स्वयंसेवकांनी शामियान्याजवळ घोषणा देताच पोलिसांचे व लिलावात बोली बोलण्यासाठी आलेल्या मक्तेदारांचे लक्ष त्यांचेकडे वेधल्या गेले व सारे मक्तेदार कुतुहलाने या स्वयंसेवकांभोवती जमले व दुसरीकडे पोलिस अधिकारी या अनपेक्षित प्रकारामुळे धावपळ करू लागले.

कॅप्टन गोविंदराव देव यांच्या नेतृत्वाखाली पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांचे हातून पोलिसांनी झेंडे हिसकून घेतले व त्यांच्या जवळील सामानही जप्त करून, स्वयसेवकांना बळजबरीने कचेरी कंपौंडच्या बाहेर काढून देण्यात आले. कोणासही अटक करण्यात आली नाही. दुसऱ्या दिवशीही असाच प्रकार घडला. पिकेटिंग करणारी एक तुकडी पोलिसांनी हाकून लावली, तोच दुसऱ्या फाटकातून दुसरी तुकडी आत येऊन पिकेटिंग करू लागली, त्यामुळे पोलिसांची फार त्रेधा उडून त्यांनी या दुसऱ्या तुकडीला धक्काबुक्की करून कपौंड बाहेर काढले. याप्रमाणे दोन्ही दिवशी कोणासही अटक झाली नाही.

कु. शांता आपटे यांच्या गायनाचा जलसा : 'शामसुंदर' या बोलपटात आपल्या अभिनयाने प्रसिद्धि पावलेल्या व पुढे 'कुकूं' या सामाजिक बोलपटाद्वारे प्रसिद्धिच्या शिखरावर चढलेल्या, पुण्याच्या कु. शांता आपटे यांच्या गायनाचा जलसा दि. १ व २ दिसेंबर १९३२ रोजी गणेश नाटक गृहात श्री. मंगलमूर्ती आय्. सी. एस्. यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीस प्रथमच झाला होता.

गायनप्रेमी रसिकांची दोन्ही दिवस जलशाला गर्दी होती.

गांधी दिन : दि. ४ दिसेंबर रोजी जिल्हा कॉं. कमेटीचे विद्यमाने दे. भ. हरिहरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली गांधी–दिनानिमित्त जाहीर सभा होऊन दे. भ. रंगनाथपंत जोशी यांचे भाषण झाले होते.

धनुर्धारी श्री. रघुनाथ खानीवाले यांचे
जापानला प्रयाण : निरोप समारंभ.

उमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम शाळेतील श्री. रघुनाथराव खानीवाले हे आपल्या धनुर्विद्येचे प्रयोग दाखविण्यासाठी जापानला जाणार होते. त्या प्रसंगी त्यांना नागरिकांतर्फे निरोप देण्याचा समारंभ दि. ४ दिसेंबर रोजी गणेश नाटक गृहात श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली होऊन त्यांना निरोप देण्यात आला होता.

डॉ. भोजराज यांची सुटका व सत्कार : उमरावती जिल्हा कॉंग्रेसचे सर्वाधिकारी दे. भ. डॉ. भोजराज यांची शिवणी जेलमधून दि. १७ दिसेंबर रोजी सुटका झाली, त्यामित्त त्यांचे आणि त्याच प्रमाणे हिंदुस्थानी सेवादलाचे कार्यकर्ते श्री. गोडबोले यांचे, दि. ११ दिसेंबर रोजी जिल्हा कॉं. कमेटीतर्फे दे. भ. डॉ. सोमण यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून अभिनंदन करण्यात आले होते.

बजाज–सुभाष सेनगुप्त : तुरूंगात आजारी असलेल्या दे. भ. जमनालालजी बजाज, बाबू सुभाषचंद्र आणि दे. भ. सेनगुप्त या नेत्यांची सुटका करण्यात यावी अशी मागणी करण्यासाठी दि. १२ दिसेंबर रोजी रात्री उमरावतीच्या नागरिकांची जाहीर सभा, गणेश थिएटरमध्ये श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरून, तीत वरील पुढाऱ्यांच्या सुटकेची मागणी करणारी विविध वक्त्यांची भाषणे झाली होती.

नगरपालिकेचा निषेध : "उमरावती नगरपालिकेची करवाढ कमी करण्याविषयीची सभा, बाहेरच्या लोकांनी सभेचे वेळी अडथळा आणून चालू दिली नाही." या सबबीवर नगराध्यक्षांनी ती सभा बेमुदत तहकुब केली याचा निषेध व्यक्त करण्यासाठी, दि. ९ दिसेंबर रोजी रात्री जोग चौकात श्री. शिवलिंग आप्पा मिसे यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तीत श्री. गुलाबराव बक्षी, श्री. फडके वगैरे वक्त्यांची भाषणे झाली होती.

कॉटन मार्केट निवडणूक : उमरावतीच्या कॉटन मार्केट कमेटीची निवडणूक दि. १४ दिसेंबर रोजी होऊन तीत सर्वश्री गणेशराव, वामनराव जानराव नवसारीकर, सय्यद, ताले महंमद, वल्लभदासजी, जगन्नाथजी मालपाणी, ठाकरे, रामचंद्रराव, एस्. वाय्. पाटील, व सेठ मिनामल ही मंडळी निवडून आली होती.

हरिजन दिन : उमरावती जिल्हा हरिजन सेवा संघातर्फे दि. १८ दिसेंबर रोजी 'हरिजन-दिन' साजरा करण्यात आला होता.

त्यानिमित्त सकाळी स्वयंसेवक आणि काही प्रतिष्ठित गृहस्थांनी हरिजन मोहोल्यात जाऊन सफाई कार्य केले. रात्री आठ वाजता ब्रम्हविद्या मंदिरात दे. भ. वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन तीत, "हरिजनांना बिनशर्त मंदिरे खुली करण्यात यावीत-विशेषत: गुरुवायुर मंदिर - व स्थानिक नगरपालिकांची हरिजनांचे मोहोल्ल्यात पाणीपुरवठा, शौचकूप ई. आरोग्य बाबीकडे विशेष लक्ष देऊन तशी त्वरित व्यवस्था करावी" अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावावर डॉ. वऱ्हाडपांडे, श्री. बामणगावकर, श्री. ओगले, श्री. प्यारेलालजी सेवक, डॉ. भोजराज व सरदार अमरसिंगजी यांची भाषणे झाली होती. शेवटी रा. ब. ब्रम्ह यांनी व अध्यक्षांनी भाषण केल्यानंतर हरिजन दिनाचा कार्यक्रम संपला.

लष्करी शिक्षणाच्या वर्गाचे उद्घाटन : हनुमान व्यायाम शाळेतर्फे नाताळच्या सुटीत लष्करी शिक्षणाचा वर्ग सुरू केला होता. त्याचे उद्घाटनाचा समारंभ, नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्राचे संपादक दे. भ. गोपाळराव ओगले यांच्या हस्ते दि. २५ दिसेंबर रोजी सकाळी दसरा मैदानावर थाटाने पार पडला होता.

सदर्हू लष्करी शिक्षणाकरिता दसरा मैदानावर लहान मोठे तंबू उभारून १५० शिक्षणार्थींची राहण्याची सोय करण्यात आली होती व मैदानाचे एका टोकास दलाचा केसरी ध्वज उभारण्यात आला होता.

मैदानावर पाहुणे येताच त्यांना लष्करी बॅन्डची सलामी देण्यात आली. त्यांचे हस्ते ध्वज फडकविण्यात आल्यानंतर कार्यक्रम सुरू झाला.

श्री. हरिहरराव देशपांडे यांनी प्रास्ताविक भाषण केले व नंतर अध्यक्षांनी भाषण करून वर्गाचे उद्घाटन केले होते.

कवि यशवंत : सुविख्यात 'कवि यशवंत' यांच्या पद्य गायनाचा कार्यक्रम गेल्या आठवड्यात येथील किंग एडवर्ड कॉलेज मध्ये व नंतर ब्रम्हविद्या मंदिरात झाला. या कार्यक्रमाला विशेषत: विद्यार्थी वर्गाची गर्दी होती.

सुटका व सत्कार : उमरावती हेड पोस्ट ऑफिसवर निरोधन केल्याबद्दल शिक्षा झालेले दे. भ. पुंजाप्पा यांची दि. २३ दिसेंबर रोजी उमरावती तुरुंगातून सुटका झाली. त्यांचे वडाळी ग्रामवासीयांतर्फे दे. भ. विठ्ठलराव शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर स्वागत करण्यात आले होते.

चित्र क्र. १८७ : श्री हरिश्चंद्र पाटील यांचा 'गणपती', दिंडी आणि टिपऱ्याची मुले. (पृष्ठ ८८१ पहा)

(इ. सन १९११)

विशेष परिशिष्टयें

卐 जी माहीती ग्रंथातील प्रकरणांत देणे सोईचे नव्हते, किंवा जी माहीती उशीरा उपलब्ध झाली ती येथे विशेष परिशिष्टांद्वारे दिलेली आहे.

चित्र क्र. १८५ :

श्रीमती गीता साने.

चित्र क्र. १८६ :

श्रीमती विमलाबाई देशमुख.

(पृष्ठ ८६८ पहा)

चित्र क्र. १८४ : श्रीमती लक्ष्मीबाई खापर्डे (पृष्ठ ८६३ पहा)
उमरावतीच्या पहिल्या नगर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा.

परिशिष्ट – १

श्री. अंबादेवी संस्थान, अमरावती

श्री अंबादेवी संस्थान, उमरावती हे सर्वदूर प्रसिद्ध असून, दरवर्षी नवरात्राचे वेळी अंबादेवीची मोठी यात्रा भरते. नऊ दिवस निरनिराळे कार्यक्रम होऊन विजया दशमीस देवीची पालखी निघते व ती सीमोल्लंघनासाठी दसरा मैदानावर जाते. ही प्रथा फार वर्षापासून सुरू आहे. याशिवाय दर मंगळवारी हजारो भाविक स्त्री–पुरुष देवीचे दर्शनास जातात. आणि मंगळवारचे दिवशी देखील छोटी यात्रा भरते. श्री अंबादेवी ही महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांची कुलदेवता आहे.

श्री अंबादेवीची मूर्ती ही स्वयंभू वाळूकामय असून बसलेली आहे. देवीचे मूळ मंदिर फारच जुने असावे. या जुन्या मंदिरावरच नवीन मंदिर उभारले असे दिसते.

इ. स. १८७० च्या गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाइन डिस्ट्रिक्टस् मध्ये 'हे मंदिर हजारो वर्षापूर्वी बांधलेले आहे.' असे नमूद केले आहे. तर इ. स. १९२८ च्या सेटलमेंटच्या वेळी जे रेव्हेन्यू (नझूल) रेकार्ड तयार करण्यात आले होते त्यांत '१००० वर्षापूर्वी पासून हे मंदिर असल्याचे' नमूद केले आहे. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे राज्याभिषेकाचे वेळी अंबादेवीस निमंत्रण पत्रिका आली होती[१] असे सांगतात.

देवीचे दर्शनासाठी वर्षभर यात्रेकरू येतात आणि मंदिरात जवळ जवळ वर्षभर धार्मिक विधि सुरू असतात. पूर्वी नवरात्रौत्सवाचे वेळी, दररोज रात्री गाणाऱ्या कलावंतीणींची हजेरी लागत असे. उमरावतीत शेकडो उत्तम गाणाऱ्या कलावंतीणींची वस्ती होती. त्यातील काही कलावंतीणी या नवरात्रोत्सवाचे वेळी आपापली हजेरी देऊन श्रद्धा प्रकट करीत असत.

---

१ : श्री. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.

असे दिसते की, इ. स. १९१३ सालचे दसऱ्यापासून ही कलावंतीणींच्या हजेरीची प्रथा सुरू होती. कारण देवी संस्थानच्या पंच मंडळीचा तसा ठराव १९१४ सालचा आहे. पुढे ही प्रथा बंद करण्यात आली. तरी बरीच वर्षे ही 'हजेरी' ची प्रथा सुरू होती[१].

इ. सन १८८९ चे सुमारास उमरावतीला सरकारतर्फे दरवर्षी गुरांचे प्रदर्शन भरविले जाई. त्यास 'अंबाजत्रा' असे नाव दिलेले असे. ही प्रथा बरीच वर्षे चालू होती असे दिसते.

एक मजेदार प्रसंग : इ. सन १८८९ साली श्री अंबादेवी संस्थानात एक मोठा मजेदार प्रसंग घडला.

श्री अंबादेवीचे मूल्यवान दागिने संस्थानचा पहारेकरी शिपाई झामसिंग वल्द मलुसिंग यांचे ताब्यात होते व त्याने ते श्री. पिदडी यांच्या वाडचातील लादनीत नेऊन ठेऊले होते. जेव्हा दागिने देवीचे अंगावर घालण्यासाठी हवे होते तेव्हा पंचांनी त्या शिपायास मागितले. तेव्हा त्याने दागिने देण्यास साफ इन्कार केला. त्यासाठी देवी संस्थानच्या पंचांची सभा भरून पहारेकरी झामसिंग याला पंचासमोर बोलावण्यात आले. पंचाचे प्रश्नांची उत्तरे त्याने दिली ती–

सवाल : श्री अंबेचा गहिना[२] जो हल्ली पिदडीचे वाडचात आहे आणि ज्यावर तुम्ही अंबादेवीचे नोकर म्हणून पहान्यावर आला तो गहिना श्री अंबादेवीच्या संस्थानच्या पंच लोकांचे स्वाधीन करता की नाही, किंवा तो त्यांच्या स्वाधीन करण्यास तुमची काही हरकत आहे. सदर्हू गहिना श्री अंबादेवीवर चढविण्यासाठी पाहिजे आहे.

जबाब : माझी हरकत आहे. कारण श्री. हरिसिंग जमादार यांनी जाते वेळी मला असे सांगितले आहे की या गहिन्याला कोणालाही हात लावू देऊ नये.

सवाल : सदर्हू गहिन्याचे मालक आम्ही पंचलोक देवीच्या तर्फे आहो हे तुम्हाला माहीत आहे किंवा नाही.

---

१ : श्री अंबादेवी नवरात्रात 'गाण्याची वेळ दुपारी १ ते ५ असावी' असे ठराव नं. ९ दि. १३–९–१९१४ प्रमाणे ठरविले होते.

२ : 'गहिना' म्हणजे दागिने.

जबाब : होय माहित आहे की, तुम्ही पंचलोकच मालक आहात.

सवाल : हा गहिना ज्या लादनीत आहे त्या लादनीच्या कुलुपाच्या किल्ल्या तुमचे जवळ आहेत काय ?

जबाब : सदहूं लादनीच्या किल्ल्या मजपासी नाहीत. हरिसिंग जमादार हा जाते समयी घेऊन गेला.

यावर पहारेकऱ्याची सही घेण्यात आली आणि १४ पंचांनी वहीवर सह्या केल्या.

वरील पंचांनी पिदडीचे वाडयात जाऊन परवा म्हणजे २ जुलाई १८८९ रोजी, योग्य वाटेल ती तजवीज करून गहिना आपले ताब्यात घ्यावा असे या पंच सभेत ठरले.

पण तसे घडले नाही. पुन्हा २१ तारखेला पंचांची सभा भरली एकतीस पंच हजर होते. श्री. एकनाथ लक्ष्मण लाला यांचे अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. हरिसिंग यांची जबानी पंचाचे समोर झाली ती–

सवाल : देवीचा गहिना तुमचे ताब्यांत आहे तो पंचाचे ताब्यात देण्यास कबूल आहात ?

जबाब : मी देवीचा नोकर आहे.

सवाल : ज्या खोलीत गहिना आहे त्या खोलीत दोन निरनिराळी कुलुपे लावून एकाची किल्ली तुमचे पाशी राहावी व दुसऱ्याची किल्ली पेंडके बाळकृष्ण नाईक यांचे पाशी राहावी अशी व्यवस्था होण्यास तुमची हरकत आहे की काय ?

जबाब : आमची हरकत नाही. आतील पेटयासही दोन कुलुपे लावली असता येक कुलपाची किल्ली माझ्या ताब्यात व दुसऱ्याची पंचाचे ताब्यात ठेवण्यास माझी हरकत नाही.

सवाल : गहिना पंचाचे ताब्यात ठेवण्यास कबूल आहा काय ?

जबाब : पंचाचे ताब्यात गहिना देण्यास कबूल नाही.

पंच कमेटीचे काम नंतर येथेच तहकुब झाले होते.

पुन्हा २८ जुलैला पंचांची सभा भरली. ३० सभासद हजर होते. सभे समोर हरिसिंग वल्द दरबारसिंग याचा अर्ज आला. त्यात त्याने अर्ज

केला होता की, "मजपाशी श्री. देवीच्या गहिन्याच्या किल्ल्या तीन, एक किल्ली तिजोरीचे आंतील व बाहेरील लादनीच्या दोन. एकूण किल्ल्या तीन आजपावेतो माझे पाशी होत्या. आज रोजी मी सर्व म्हणजे तीनही किल्ल्या कमेटीचे स्वाधीन केल्या आहेत. तिजोरीत व पेटघात एकंदर गहिना यादीप्रमाणे माझे पासून तपासून घेऊन गहिना पावल्याची रसीद मला द्यावी आणि कमेटीस माझी अशी विनंती आहे की, फार दिवसापासून मी आणि माझे वडील देवीची नवकरी महिन्याचा पगार घेऊन करीत आहो ते मी आज तारखे पावेतो ईमानदारीने नोकरी केली हे कमेटीने लक्षात आणून मला काहोतरी बढती मिळावी अशी माझी प्रार्थना आहे."

या सभेत वर लिहिल्याप्रमाणे हरिसिंग जमादार याने किल्ल्या आणून दिल्या. त्या किल्ल्या सेठ रामप्रसादजी, मुनीम श्रीराम सालीगराम, या कमेटीचे अध्यक्ष यांच्या स्वाधीन कराव्या असे ठरले व किल्ल्या पावल्याबद्दल पावती लिहून दिली.

याच सभेत १२ सद्ग्रहस्थांची उपसमिती नेमून त्यांनी दागिन्यांची यादी तपासून त्याप्रमाणे दागिने ताब्यात घ्यावे असे ठरले.

दुसरी एक उपसमिती नेमून, त्यांनी मे. डेप्युटी कमिश्नर साहेब बहादूर यांस कळवावे असे ठरले.

डेप्युटी कमिश्नर यांनी दागिन्यांवर पहाऱ्यासाठी एक पोलिस शिपाई ठेवला होता, त्याचा पगार देण्याचा ठराव संमत झाला.

पुढे दि. ४ ऑगस्ट १८८९ रोजी पंचांची सभा भरून देवीचे दागिने ठेवण्यासाठी जागा, तिजोरी तयार करण्यासाठी एक सब कमेटी नेमण्यात आली. नंतर २४ सप्टेंबर १८८९ रोजी पुन्हा सर्व साधारण सभा होऊन त्यात देवीचे दागिने ठेवण्यासाठी नवीन जागा तयार झाली आहे व तिजोरी आली त्यास संमती देण्यात आली.

पुन्हा दुसऱ्या दिवशी २५ सप्टेंबरला दिवसा बारावर दोन वाजता पिदडी यांच्या हवेलीतून देवीचे दागिने वाजत गाजत आणले जावेत, श्री देवीचा सर्व असबाब घेऊन यावा व त्या दागिन्यांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी श्री देवी संस्थानकडे राहावी, असे ठरविण्यात आले. दागिने

आणण्याचा समारंभ करण्यासाठी ७ सभासदांची एक समिती नेमण्यात आली. आणि गहिना आणण्याचे समारंभासाठी सर्व लोकांस निमंत्रण करावे, तसेच श्री. नागोराव नरसिंह चीफ ऑफ पोलिस यांस बंदोबस्तासाठी निमंत्रण द्यावे, असे ठरले.

नंतर पंचकमेटीने पिंडडीचे वाड्यात जाऊन श्रावण शु. ५ नागपंचमीचे दिवशी संवत १९४५ रोजी दागिने तपासून ताब्यात घेतले. हे दागिने ठरल्याप्रमाणे वाजत गाजत देवी संस्थानमध्ये आणले का नाही याबद्दल उल्लेख नाही. परंतु बहुधा ते वाजत गाजत मिरवणूकीने आणले असावेत.

आणखी एक मजेदार घटना : ऑगस्ट १८८९ मध्येच एक मजेदार घटना आणखी घडली ती अशी–देवीचा पुजारी सोनभट म्हणून होता. त्याचे विरुद्ध सेक्रेटरींनी तक्रार केली त्याबद्दल हरिसिंग व इतरांकडे चौकशी करण्यात आली.

सदर्हू पुजारी १२ महिन्यापूर्वी देवी जवळ असताना श्री. रामरावपंत कलोती यांनी चंबूत एक पैसा व ब्राम्हणाचे हाती म्हणून एक पैसा दिला. श्री. सोनभट यांच्या हाती दिलेला पैसा हा पैसा नसून अधेली होती. तरी त्याने एक पैसा म्हणूनच सांगितले व अधेली म्हणून कळविले नाही. यावरून श्री. रामराव कलोती यांनी तक्रार केली. या चुकीबद्दल प्रायश्चित्त म्हणून सोनभट यांचा सात महिन्यांचा पगार रोखून ठेवण्यात आला व त्याला कामावरून दूर करण्यात आले होते. नंतर त्याला कामावर पुन्हा ठेवण्यात आले. परंतु पगार दिला गेला नाही. नंतर झालो तेवढी शिक्षा बस झाली म्हणून अपराधाबद्दल माफी करण्यात आली व पगार देण्यात आला व त्या दिवशीची दक्षिणाही त्याला देण्यात आली.

एका अधेलीने सोनभट पुजाऱ्याला पंचाचे चौकशीला तोंड द्यावे लागले. हे अधेली प्रकरण बरेच दिवस चालू होते. पुढे दि. १५–९–१८९७ रोजी हा सोनभट नोकरी सोडून गेला.

देवी संस्थानची पाठशाळा : इ. सन १८९० मध्ये देवी संस्थानने पाठशाळेसाठी इमारत बांधली. आणि इ. सन १९११ मध्ये देवी मंदिरातील जुना सभा मंडप पाडून नव्या सभा मंडपाचे बांधकाम सुरू झाले.

देवी संस्थानची वेदशाळा चैत्र शु. १ संवत १९६२ (इ. सन १९०६) पासून सुरू करण्यात आली. या वेदशाळेसाठी श्री. जयकृष्ण रघुनाथ गाडे यांनी नगदी रु. ५०० आणि कठोरा येथील एक शेत देवी संस्थानला दान दिले होते.

त्याचप्रमाणे धर्मशाळा बांधण्यासाठी श्री. रघुनाथ शिवराम गाडे यांनी आपली जागा देवी संस्थानला इ. सन १८९८ मध्ये दान दिली होती.

शिखराचे बांधकाम : अंबादेवीचे व महादेवाचे शिखराचे बांधकाम इ. सन १८९६ साली करण्यात आले व त्यासाठी श्रीमती मनीषाबाई हनुमान परदेशी हिने पंधराशे रुपयाची देणगी संस्थानला दिली होती.

श्री. तुकाराम रघुनाथ गाडे यांनी नाल्या कडील धर्मशाळा बांधून दिली (इ. सन १९००) याशिवाय श्री हेमराज बिनीलाल कलाल यांनीही एक धर्मशाळा बांधून देण्याचा अर्ज दिला होता तो पंचांनी मंजूर केला.

इ. सन १९१० चे सुमारास गोरक्षण संस्थेची सर्व व्यवस्था श्री अंबादेवी संस्थानने स्वीकारली होती.

हवनाचा मान : शारदीय नवरात्राचे वेळी जो होम होतो त्यांत हवन देण्याचा मान हा गावचा पटवारी आणि मोठया देवीचा म्हणजे एकवीरा देवीचा पुजारी यांचेकडे पूर्वापार चालत असावा. कारण जानेवारी १९२३ इ. मध्ये अंबादेवी संस्थान पंचकमेटीचे बैठकीत वाद विवाद होऊन जुन्या रीतीप्रमाणे गावचा पटवारी आणि एकवीरा देवी संस्थानचा पुजारी यांनी हवन करावे असा निर्णय घेतला होता. त्याच प्रमाणे, मधुक पुष्प फलांचा होमात उपयोग, जुन्या रीती प्रमाणे व शास्त्राप्रमाणे, करण्याचे कार्यात पूर्व पक्षांनी अडथळा आणू नये असेही ठरविले होते.

विशेष म्हणजे या सभेला काशी, नाशीक, महोबा, इंदूर, इत्यादी ठिकाणचे लोक उपस्थित होते.

राष्ट्रीय कार्याला संस्थानचा सहयोग.

श्री अंबादेवी संस्थानने, इ. सन १८९७ साली उमरावतीस भरलेल्या राष्ट्रीय महासभेच्या (काँग्रेसच्या) अधिवेशनाचे वेळी भांडी–कुंडी, हंड्या-झुंबरे वगैरे साहित्य देऊन सहकार्य दिले होते. त्यानंतर इ. सन १९१६ झाली

उमरावतीला श्री. हरिसिंग गौर यांचे अध्यक्षतेखाली प्रांतिक राजनैतिक परिषद भरली होती त्यावेळीही संस्थानने साहित्य देऊन सहयोग दिला होता. नंतर १९२४ मध्ये स्वदेशीचे आंदोलन सुरू होते. त्या काळात काही लोकांनी संस्थानकडे अर्ज देऊन विलायती साखरेचा प्रसाद वाटण्यास मनाई करावी अशी सूचना केली होती. तेव्हा संस्थानचे पंचकमेटीचे सभेने दर्शनास येणाऱ्या लोकांनी विलायती साखऱ्याचो मिठाई देवीची शिरणी म्हणून वाटण्याकरता आणू नये. त्याबद्दल, खारका, मनुका, मेवा किंवा गुळाचे पदार्थ आणावेत असे ठरविले होते.

याशिवाय अंबादेवी संस्थानने स्वत:ची पाठशाळा व वेदशाळा काढली होती, न्यू एज्युकेशन सोसायटीचे शैक्षणिक कार्याला दरसाल दोनशे रुपयांची देणगी आणि अंबादेवी व्यायाम शाळेप्रित्यर्थ दरसाल रु. १५० खर्च करण्याचे ठरविले होते. (१९२५–२६)

अंबादेवीचा कळस पडला : दिनांक २७ सप्टेंबर १९२८ रोजी अंबादेवीच्या शिखराचा कळस एकाएकी पडला. त्यामुळे बरीच खळबळ माजली असावी. या प्रश्नासाठी पंचांची बैठक दि. १४ ऑक्टोबर १९२८ ला झाली. चर्चे नंतर असा निष्कर्ष काढण्यात आला की, अंबादेवी संस्थानात सुरू असलेले सदावर्त काही कारणाने तेथून हलविले म्हणून कळस पडला असावा. शेवटी कळसाची पुनर्स्थापना करावी, दानधर्म व दक्षिणा द्यावी असे ठरविण्यात आले होते.

हरिजन मंदिर प्रवेशाची चळवळ : इ. स. १९२६-२७ मध्ये श्री अंबादेवीचे मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून चळवळ सुरू झाली. ऑक्टोबर १९२६ मध्ये 'मंदिरात दर्शनासाठी आम्हास प्रवेश मिळावा' असा अर्ज उमरावतीतील काही अस्पृश्य मानलेल्या मंडळींनी केला होता व नंतर ह्या अस्पृश्य मंडळीचे मागणीस उचलून धरून त्यास चळवळीचे स्वरूप आणण्यासाठी श्री. बॅरि. पंजाबराव देशमुख, श्री. बॅरि. बागवे, श्री. रणदिवे वकील आणि श्री. चौबळ प्रभृती नेते मंडळी समोर आली. श्री. अंबादेवी संस्थानची पंचमंडळी व गावातील ब्रम्हवृंदांनी त्यास विरोध केला. पुढे श्री. दादासाहेब खापर्डे यांनी मध्यस्ती करून मंदिर हरिजनांना खुले केले[१]. या बाबतची उपलब्ध माहिती १९२६ व १९२७ या वर्षाचे इतिहासात आलेली आहे. ती पहावी.

---

१ : कै. खापर्डे चरित्र पा. ६६४

मंदिराचा जीर्णोद्धार : मिळालेल्या माहितीप्रमाणे असे दिसते की, इ. स. १८६३-६४ साली श्री अंबादेवीची मूर्ती तेथेच एका चबुत्र्यावर होती पण त्यावर मंदिर नव्हते. त्या काळी सर्व वस्ती परकोटाचे आंतच होती. परकोटाबाहेर दूर अंतरावर रेल्वे स्टेशन व हल्लीच्या कॉटन मार्केटचे पश्चिमेकडील जमिनीवर हंगामात कपाशीचे बोझे ठेवण्याची जागा (रुईगंज) आणि शहराच्या पश्चिमेकडे गंभीरपूर हनुमान मंदिर एवढे सोडले तर सर्वत्र जंगल, झाडे व शेते होती.

त्यावर्षीच उमरावतीचे दोन सद्ग्रहस्थ श्री. नाना चिमोटे आणि श्री. केवलचंदजी यांनी या देवीचे चबुत्र्यावर मंदिर बांधण्यासाठी वर्गणी जमवून मंदिर बांधले. नंतर एक पंच कमेटी स्थापन झाली[१]. तेव्हापासून श्री अंबादेवी मंदिराचे बांधकाम हळू हळू सुरू होऊन ते आज आहे त्या प्रमाणे झाले असे दिसते.

मात्र पूर्वी देवीचे मंदिर तेथे चांगल्या स्थितीत असावे व ते पडले किंवा मुस्लिम राजवटीत ते नष्ट केले गेले असावे.

या प्रमाणे श्री अंबादेवी संस्थानचा म्हणजेच उमरावतीच्या श्री अंबादेवीचा इतिहास आहे.+

---

१ : कै. टिकेकर मास्तर यांच्या आठवणी.

+ श्री. अंबादेवी मंदिराची १८८९ पासूनची प्रोसिडिंग बुके आहेत. त्या पूर्वीची नाहीत. काही मोडी मधून प्रोसिडींग आहे. त्याचा उपयोग तूर्त होऊ शकला नाही.

परिशिष्ट – २

उमरावतीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन.

इंग्रजी राज्याची सुरुवात होवून, जसजशा नव्या सुधारणा येऊ लागल्या आणि शिक्षणाचा प्रसार वाढू लागला तसतसा नव्या चळवळींचा जन्म उमरावतीत होऊ लागला. विशेषत: पुण्या-मुंबईकडील नव्या सुधारणांची हवा उमरावतीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला आंदोलित करू लागली असे दिसून येते. त्यामुळेच पुढे, येथील सुप्त कला, विद्वता, कल्पकता यांचा विलास आणि वाङ्मय सृष्टीचा विकास दिसून येतो. त्याची उपलब्ध माहिती खाली दिली आहे.

अमरावतीच्या नाटच संस्था व नाटककार.

उमरावतीला स्थापन झालेली पहिली नाटक मंडळी ही श्री. गोपाळराव उर्फ बाबासाहेब बेडेकरांची होय. इ. सन १८९८ मध्ये उमरावती अमॅचुअर कंपनी या नावाने या कंपनीचे पहिले नाटक 'सौभद्र' हे रंगभूमीवर आले. त्या नंतर शारदा, मृच्छ कटिक, वेणी संहार इत्यादी नाटके या कंपनीने रंगभूमीवर आणली, श्री. गोपाळराव बेडेकरांचे पहाडी, पल्लेदार आवाजाने प्रेक्षक मंत्रमुग्ध होत असत. ते उत्तम गायक नट होते. त्यांची कोदंडाची भूमिका संगीताचे दृष्टीने फार बहारीची होत असे.

"श्री. केशवराव भोसल्यांची स्वदेशहितर्चिंतक नाटक मंडळी व बाबा बेडेकरांची नाटक मंडळी यांचा मुक्काम नागपुरास असतांना बाबा बेडेकर 'कोदंड' आणि केशवराव भोसले 'शारदा' अशा जोड भूमिकांचा एकत्र प्रयोग होत असे. त्याची संगीत संगत सात-सात आठ-आठ तास फार बहार उडवीत असे. नाटक संपून बाहेर पडावे तो उजाडलेले असे[१].

बाबासाहेब बेडेकरांनी आपल्या गायन कौशल्याने या नाटक कंपनीला कीर्ती मिळवून दिली. पण ही कंपनी जास्त काळ टिकली नाही. १९०७ मध्ये ही कंपनी बंद पडली. पुढे बाबासाहेब बेडेकर हे कीर्तने करीत त्यातही ते फार सिद्धहस्त होते.

---

१ : विदर्भ आणि मराठी रंगभूमि : शं. ना. सहस्त्रबुद्धे : दै. मराठा दि. १०-११-५८

उमरावतीचे श्री. विठ्ठल बंधुजी चौबळ हे मोठे नाट्यरसिक, संगीततज्ञ, उत्तम नट व नाट्यदिग्दर्शक होते. इ. सन १९२५-२६ मध्ये त्यांनी 'मित्रप्रभा' या नावाची हौशी लोकांची नाट्य संस्था स्थापन केली होती व या मंडळातर्फे 'पुण्यप्रभाव' या नाटकाचा प्रयोगही करण्यात आला होता.

उपलब्ध माहितीनुसार इ. सन १९३०-३१ चे सुमारास स्थानिक हौशी कलावंतांनी एक स्त्री-पुरुष कलाकारांचा संमिश्र नाट्य प्रयोग उमरावतीत गणेश थिएटरमध्ये सादर केला होता. त्यांत नथ्थुबुवांच्या शिष्या गुलाबबाईसह आणखी एका गायिकेने या नाटकात काम केले होते. पुरुष भूमिकेत सर्वश्री बाबुराव कलोती, पंत व बेडेकर या मंडळींनी कामे केली होती. उमरावतीत झालेला स्त्री पुरुष कलावंतांचा हा पहिलाच नाट्य प्रयोग होय.

नंतर श्री. विठ्ठल बंधूजी चौबळ यांच्या प्रयत्नाने इ. सन १९४० मध्ये 'उद्याचा संसार' या नाटकाचा संमिश्र प्रयोग करण्यात आला. त्यांत कु. भालेराव व वेलणकर भगिनी यांनी स्त्री भूमिका केल्या होत्या. डॉ. नानासाहेब गोगटे यांनीही या नाटकात काम केले होते. याचे दिग्दर्शन श्री. चौबळ यांनी केले होते[१].

दि. ४ जानेवारी १९४१ रोजी प्रभात टॉकीज मध्ये 'घराबाहेर' नाटकाचा संमिश्र प्रयोग सिव्हिक गार्ड चे मदतीसातीसाठी करण्यात आला. त्यांत सर्वश्री बापट, खरे व बोबडे या हौशी पुरुष कलावंतांनी व सौ. शैलाबाई गोडबोले व सौ. ताराबाई बापट या भगिनींनी कामे केली होती. श्री. चौबळ साहेब (माजी दिवाण) यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते. सजावट कोनलाडे बंधु यांची होती[२].

इ. सन १९४६ मध्ये 'सत्तेचे गुलाम' हे संमिश्र नाटक त्यांनी दिग्दर्शित केले व त्यांत त्यांनी (चौबळांनी) स्वतः मार्तंडरावाची भूमिका केली होती. आणि शिक्षण महर्षी भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी त्यांत शेतकऱ्याची भूमिका वठविली होती.

---

१ : नगर वाचनालय शताब्दि स्मरणिका १९७३

२ : दै. उदय : दि. १०-१-४१

इ. सन १९४३ मध्ये 'विदर्भ नाटय मंदिर' या नावाची संस्था नाटयसेवेसाठी उदयाला आली. सर्वश्री बाबासाहेब खापर्डे, डॉ. विष्णू भिकाजी कोलते, दादासाहेब फडके, काकासाहेब सहस्त्रबुद्धे, दिवाणजी ह्या मंडळीने या संस्थेचे स्थापनेत पुढाकार घेतला होता. या संस्थेतर्फे इ. स. १९४४ ते १९५४ या काळात अनुक्रमे नविन कल्पना, उमाजी नाईक, आग्रयाहून सुटका, भाऊबंदकी, ही नाटके सादर केली गेलीत.

मराठी रंगभूमीची शताब्दि : उमरावतीच्या नाटयप्रेमी रसिकांनी, मराठी रंगभूमिला १०० वर्षे पूर्ण झाल्याचे निमित्ताने इ. स. १९४३ साली 'मराठी रंगभूमी शत सांवत्सरिक महोत्सव' उमरावतीत मोठया उत्साहाने साजरा केला होता. प्रख्यात लेखक व नाटककार श्री. मामासाहेब वरेरकर (मुंबई) हे समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून आले होते. या महोत्सवाचे निमित्ताने नाटय वस्तूचे प्रदर्शन भरविले गेले आणि मराठी रंगभूमीच्या विकासाचे निरनिराळे टप्पे दाखविण्याचे दृष्टीने या प्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपांची नाटके सादर करण्यात आली होती.

हा नाटय महोत्सव खूप गाजला. आणि त्याने नव्या पिढीला स्फूर्ति दिली हेच या महोत्सवाचे वैशिष्टय मानावे लागेल. कारण यांतूनच नंतर अनेक नवे नट, दिग्दर्शक आणि नाटककार निर्माण झालेत. पुढे वनिता समाज, विजय मंडळ, निळकंठ मंडळ, आझाद हिंद मंडळ व मधुसूदन कला मंदिर इत्यादि संस्थांनी रंगभूमिची जी सेवा सुरू केल्याचे दिसून येते त्याचे श्रेय या नाटय महोत्सवाला द्यावे लागेल.

नाटककार : इ. स. १८८३ चे आसपास, येथे श्री बजाबा रामचंद्र प्रधान हे एक नाटकार म्हणून प्रसिद्ध होते. त्याबरोबरच ते कवीही होते. त्यांचे 'दैवसेनी' हे काव्य प्रसिद्ध असून त्यांचे, शेक्सपीअरच्या 'कॉमेडी ऑफ एरर्स' नाटकाचे 'भ्रांतिकृत चमत्कार' हे भाषांतरित नाटकहि प्रसिद्ध होते.

या खेरीज त्यांनी सद्गुणी, फार दिवसांची गोष्ट व एक हृदयद्रावक गोष्ट, ह्या प्रदीर्घ कथा विविधज्ञानविस्तार या मासिकातून इ. स. १८७५ ते १८८६ चे दरम्यान प्रसिद्ध केलेल्या आहेत. त्यांच्या वाङमयीन कर्तृत्वासंबंधीचा लेख, वऱ्हाड शाळा पत्रकाच्या १८८६ चे एका अंकात प्रसिद्ध झाला होता.

इ. स. १८९० चे सुमारास श्री. गंगाधरपंत उर्फ तात्यासाहेब सबनीस हे येथील सरकारी हायस्कूलमध्ये शिक्षक होते व ते एक मोठे नाट्य सेवक, कवी – पदरचनाकार – होते. त्यांची संस्कृत पद्यावली प्रसिद्ध आहे. तसेच 'रत्नावली' हे त्यांचे नाटक बेळगांवकर स्त्री संगीत नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले होते.

इ. स. १८९९ मध्ये श्री. जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे यांनी संस्कृत 'मुद्राराक्षस' या नाटकाचे मराठी भाषांतर केले होते व ते दादासाहेब खापर्डे यांच्या यशस्वी दिग्दर्शनानंतर रंगभूमीवर आणण्यात आले. श्री. भाऊसाहेब असनारे हे यशस्वी नाटककार होते तसेच उत्तम सतार वादकही होते. नूतन नाट्य मंडळाचे चालक श्री. रामभाऊ कुंदगोळकर यांना 'सवाई गंधर्व' ही पदवी भाऊसाहेब असनारे यांनीच दिली होती.

श्री. वीर वामनराव दादा यांनी इ. स. १९०७ पासूनच राजकीय व सामाजिक क्षेत्रांत असामान्य कामगिरी बजावली आहे. आणि त्याबरोबरच त्यांनी नट व नाटककार म्हणून केलेली सेवा ही देखील अविस्मरणीय आहे. दादाचे पहिले नाटक कर्णवध (१९११) होय, पण ते रंगभूमीवर आलेच नाही. 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे त्यांचे नाटक दि. ८ डिसेंबर १९१४ मध्ये प्रथम रंगभूमीवर आले. या नाटकाचा हा पहिलाच प्रयोग उमरावतीच्या इंद्रभुवन थिएटरमध्ये श्री. केशवराव भोसले यांच्या ललित कलादर्श नाटक मंडळीने केला होता. नंतर दादांचे दुसरे प्रसिद्ध नाटक 'रणदुंदुभी' हे दिनांक १७ फेब्रूवारी १९२७ रोजी मुंबई येथे बलवंत संगीत मंडळीने प्रथमच रंगभूमीवर आणले. या प्रयोगातील भूमिका:– कंदर्प परशुराम सामंत, कालकुट – बाळकोबा गोखले, हलाहल – दिवेकर, युवराज – चिंतामणराव कोल्हटकर, धीरसिंह व प्रमुख न्यायाधिश – केळकर तेजस्विनी – मा. दिनानाथ मंगेशकर, आणि सौदामिनी – कृष्णराव कोल्हापुरे यांनी केल्या होत्या. या दोन नाटकांनी दादांना अमाप कीर्ती मिळवून दिली आणि कंपनीची आर्थिक स्थितीही त्या प्रयोगांनी सुधारली.

मा. दिनानाथ मंगेशकर यांचे नाव सर्वतोमुखी झाले ते वीर वामनरावांच्या 'रणदुंदुभी' नाटकातील 'तेजस्वीनी' मुळे. एकाद्या सव्यसाची वीराप्रमाणे त्यांनी या नाटकातील गद्यभाग व पद्यभाग ओतप्रोत रंगवून सोडला होता.

वीर वामनराव दादांची या शिवाय धर्म सिंहासन, शीलसन्यास, व झोटिंग पादशाही इ. नाटकेही रंगभूमीवर आली आहेत.

दादांच्या 'रणदुंदुभी' या नाटकातील काही प्रवेश ऑल इंडिया रेडियोच्या मुंबई केंद्रावर दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी, देशाच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाचे वेळी ध्वनिक्षेपित करण्यात आले होते.

श्री. नारायण रामलिंग उर्फ नानासाहेब बामणगावकर हे वीर वामनरावांचे समकालीन नाटककार होत. त्यांची धनुर्भंग व आत्मतेज ही नाटके सवाई गंधर्व श्री. रामभाऊ कुंदगोळकर यांच्या नूतन नाट्य मंडळाने रंगभूमीवर आणली होती. आणि विशेष म्हणजे त्यावेळी ब्रिटिश सरकारने या नाटकांचे प्रयोग करण्यास बंदी केली होती. यावरून त्या नाटकांचे स्वरूप लक्षात यावे. या शिवाय 'भीष्मप्रतिज्ञा' हे आणखी एक नाटक त्यांनी लिहिले होते.

उमरावतीचे श्री. विश्वनाथ चिंतामण बेडेकर एम्. ए. एल्. एल्. बी. या तरुणाने लिहिलेल्या 'ब्रम्हकुमारी' या नाटकाचा पहिला प्रयोग बळवंत संगीत मंडळीने दि. १५ जुन १९३३ रोजी सांगली मुक्कामी केला होता.

'ब्रम्हकुमारी' नाटकात स्त्रीवर्गाची दु:खे फारच उत्कटतेने मांडलेली आहेत व स्त्री वर्गाची वकिली बिनतोड युक्तीवादाने केली असून त्यासाठी पौराणिक कथेचा आधार घेतलेला आहे.

चित्रपट सृष्टीत कथालेखक व दिग्दर्शक म्हणून गाजलेले श्री. विश्राम बेडेकर ते हेच.

या शिवाय श्री. शं. ना. उर्फ काकासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी, 'आत्मविश्वास', राणीचंद्रावती, खरा प्रेमसन्यास, हीच मुलीची आई इ. नाटके लिहिली असून, नाटयाचार्य खाडीलकर, नाट्य स्वरूप गडकरी, नाट्य लेखन रहस्य इ. नाटय परीक्षणात्मक ग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. त्यांची कीचकवध, आगऱ्याहून सुटका, राक्षसी महत्वाकांक्षा, करीन ती पूर्व, भाऊबंदकी, सवाई माधवरावांचा मृत्यु इ. नाटकावर उत्तम परीक्षणेही लिहिलेली आहेत. श्री. सहस्त्रबुद्धे हे विदर्भ नाट्य मंदिराचे एक प्रमुख आधारस्तंभ होते.

उमरावतीचे सुप्रसिद्ध बांसरीचे कारखानदार श्री. दादासाहेब आसरकर हेही उत्तम नाटककार होते. त्यांनी लिहिलेले 'तिजोरीची किल्ली'

हे नाटक नाट्यकला प्रसारक मंडळीने रंगभूमीवर आणले होते. श्री. आसरकर हे रंगभूमीचे निरलस सेवक होते.

डॉ. श्री. भवानराव म्हैसाळकर यांचे 'प्रजेचा राजा' हे नाटक बालमोहन संगीत नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले होते.

या शिवाय श्री. भोळे, श्री. ना. कृ. दिवाणजी इत्यादी नाटककार उमरावतीत बरेच प्रसिद्धिला आले होते.

धार्मिक व सामाजिक संस्था : अव्वल इंग्रजीचे काळातच येथे इ. स. १८६७ मध्ये नगर वाचनालय (नेटिव्ह जनरल लायब्ररी) ही पहिली सार्वजनिक संस्था स्थापन झाली. नंतर याच संस्थेचे विद्यमाने वऱ्हाड 'वक्तृत्वोत्तेजक' सभा व पुढे 'बालवक्तृत्वोत्तेजक सभा' अनुक्रमे इ. स. १८७२ व १८८७ साली सुरू झाल्या होत्या.

इ. स. १८९५ साली उमरावतीत एक 'प्रायव्हेट हायस्कूल' सुरू झाल्याचा उल्लेख मिळतो. उमरावतीत सुरू झालेले हे पहिले 'प्रायव्हेट हायस्कूल' होय. या संस्थेतून राष्टीय शिक्षण मुख्यत: दिले जाई.[१]

इ. स. १८९५ मध्येच उमरावतीला प्रथमच इंडस्ट्रियल स्कूल म्युनिसिपल आवारांत सुरू झाले. नंतर या संस्थेचे रूपांतर 'व्हिक्टोरिया टेक्निकल हायस्कूल' मध्ये होऊन इ. स. १९०७ मध्ये या संस्थेची भव्य इमारत मोर्शी रोडवर बांधण्यात आली. तेथेही एक मोठे सभागृह आहे. ही संस्था हल्ली सरकार मार्फत 'कलानिकेतन' या नावाने चालू आहे. धंदेशिक्षणाच्या ज्या शाळा महाराष्ट्रात चालू आहेत त्यात उमरावतीची ही शाळा बहुधा सर्वात जुनी असावी. ही शाळा उमरावतीत सुरू करण्याचे श्रेय कै. रा. ब. रं. न. मुधोळकर यांना दिले जाते.

इ. सन १८९६ मध्ये रावबहादूर रं. न. मुधोळकर यांच्या नेतृत्वाखाली 'सार्वजनिक सभा' स्थापन झाली. याच वर्षी महर्षी अण्णासाहेब कर्वे हे प्रथमच उमरावतीला आले होते[२].

इ. सन १९०० मध्ये 'थिऑसॉफिकल सोसायटीची' स्थापना झाली. व या संस्थेतर्फे उमरावतीला 'ब्रम्हविद्या मंदिर' या नावाचे मोठे सभागृह बांधण्यात आले. उमरावतीचे हे पहिले सार्वजनिक सभागृह होय.

---

१ व २ : नगर वाचनालय : शताब्दि स्मरणिका : १९७० : पा. ४६

(पुढे याच सभागृहाचे रूपांतर डॉ. जोशी हॉल मध्ये झाले.) हे सभागृह बांधण्यापूर्वी मोठाले सार्वजनिक कार्यक्रम इंद्रभुवन थिएटर मध्ये होत. नंतर ब्रम्हविद्या मंदिरात सर्व कार्यक्रम होऊ लागले.

इ. सन १९०१ मध्ये अंबादेवीचे देवळांत 'वेदशाळा' ही संस्था स्थापन झाली. वेदविद्येचे पद्धतशीर शिक्षण या संस्थेतर्फे दिल्या जात असे. ही संस्था २५ वर्षे सुरळीत चालू होती.

इ. सन १९०५ मध्ये 'बेरार एज्युकेशन सोसायटी' ही शैक्षणीक संस्था स्थापन झाली व या संस्थेचे वतीने उमरावतीला 'काशीबाई प्रायव्हेट हायस्कूल' सुरू करण्यात आले.

इ. सन १९०० मध्ये 'तुकाराम आखाडा', इ. सन १९०८ मध्ये महाराष्ट्र तालिमखाना व इ. सन १९१४ मध्ये हनुमान व्यायाम शाळा ह्या संस्था स्थापन झाल्या. या संस्थांनी शारीरिक शिक्षण प्रसाराचे कार्य सतत चालविले आहे.

इ. सन १९२५ मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल' आणि 'श्री शिवाजी मराठा हायस्कूल' या दोन शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या. शिवाजी एज्युकेशन सोसायटी १९३२ मध्ये स्थापन होऊन, शिवाजी मराठा हायस्कूल १ ऑगस्ट १९३२ पासून या संस्थेकडे आले होते. याशिवाय उमरावतीत महाराष्ट्र हायस्कूल, रामकृष्ण विद्यालय, न्यू हायस्कूल, समर्थ हायस्कूल इत्यादी प्रायव्हेट हायस्कूले सुरू झाली होती.

परिशिष्ट – ३

उमरावतीचा शिराळशेट उत्सव व यात्रा.

दरवर्षी नागपंचमीचे दुसरे दिवशी, श्रावण शु. ६ ला उमरावतीच्या माताखिडकी मोहोल्यात, मिटकऱ्याचे विहीरीजवळ 'शिराळशेट उत्सव' होत असे व त्या निमित्त तेथे यात्रा भरत असे. हा उत्सव व यात्रा बरीच वर्षे चालू होती. गेल्या १५–२० वर्षापासून हा उत्सव बंद पडला आहे.

हा उत्सव येथील काही लिंगायत समाजातील महिला करीत असत. श्रावण शु. ६ ला सकाळीच शिराळशेटीचा पुतळा (मूर्ती) बसविला जाई, दिवसभर पूजा, अर्चा, भजन पूजन व्हायचे. त्यानिमित्त तेथे लहानशी यात्रा भरायची. अनेक प्रकारची दुकाने तेथे लागत. लोकांची गर्दी होत असे. रात्री मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत. नंतर मूर्ती विसर्जनाचा सोहळा होत असे. हा कार्यक्रम एकच दिवसाचा असे परंतु तो उमरावतीचे सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे एक अंग होऊन बसला होता.

हा शिराळशेटी कोण ?

हा शिराळशेटीचा उत्सव आणि यात्रा अनेक वर्षे उमरावतीत साजरा होई. पण हा शिराळशेटी कोण व त्याचा हा उत्सव का केल्या जातो जाता याची माहिती कोणाला नसे. केवळ धार्मिक यात्रा व मनोरंजनाचे कार्यक्रमामुळे सांस्कृतिक उत्सव म्हणून त्याकडे लोक पाहत असत. वस्तुस्थिती अशी होती की, हा उत्सव मुळात विजापूर जिल्हा व महाराष्ट्राचे बऱ्याच मोठ्या परिसरात पंधराव्या शतकापासून सुरू होता. त्या भागातील, विशेषत: लिंगायत लोक पुढे वऱ्हाडात आले तेव्हा, त्यांनी हा उत्सव वऱ्हाडात आणला. त्यांची हकीकत अशी आहे.

"इ. स. १३९६ साली दक्षिणेत दुर्गा देवीचा एक भयंकर दुष्काळ पडला. हा दुष्काळ बारा वर्षे पर्यंत होता. या मुदतीत, त्या भागांतील एक धर्मनिष्ठ व सार्वजनिक हितबुद्धीच्या शिराळशेट नावाचे लिंगायत वाण्याने गुजरात व महाराष्ट्र या देशामध्ये हजारो बैल फिरते ठेवून धान्याचा पुरवठा केला. (बैलांच्या पाठीवर गोण्या ठेवून गुजरातेतून



चित्र क्र. १७४ : (पृष्ठ ८२३ पहा)

मराठी रंगभूमि शताब्दि महोत्सवाचे अध्यक्ष
लेखक व नाटककार
श्री मामासाहेब वरेरकर, मुंबई.



चित्र क्र. १७५ : शिराळशेट (पूजेचा) (पृष्ठ ८२८ हा)



चित्र क्र. १७६ : खुर्चीवर बसलेले (डावीकडून) : (पृष्ठ ८३२ पहा)

१) निळकंठ नामजोशी. २) बाबासाहेब खापर्डे. ३) रामभाऊ केसकर (संपादक प्रमोदसिंधू)
४) बाबूराव करंदीकर. ५) खंडेराव सखाराम पारळकर.

चित्र क्र. १७७ : उमरावतीचे पहिले वृत्तपत्र. (पृष्ठ ८३१ पहा)

उमरावतीचे पहिले वृत्तपत्र "वऱ्हाड सत्य प्रकाश" या नांवाचे होते. इ. सन १८६४-६५ मध्ये हे वृत्तपत्र उमरावतीत प्रसिद्ध होत असे. त्या वृत्तपत्राचा दि. १८ जुन १८६८ चा एक अंक आता उपलब्ध झाला असून त्याच्या मुखपृष्ठाचे छायाचित्र सोबत दिले आहे.

हे वृत्तपत्र शिलाप्रेसवर छापले जात असे. आकार डेमी होता. जेथे हे वृत्तपत्र छापले जाई तो छापखाना उमरावतीच्या सबजी मंडी (म्हणजे भाजी बाजार?) मध्ये होता. आणि छापखान्याचे (त्यावेळच्या भाषेत कारखान्याचे) नांव सत्यप्रकाश हेच होते, या पत्राचा संपादक कोण होता याचा पत्ता लागत नाही. अंकाच्या एका पानावर फक्त खालील एक लाईन छापलेली आहे. ती अशी-

"हे पत्र उ. येथे स. वि. याणी आ. स. प्र. छा. छा. प्र. केले." म्हणजे 'हे पत्र उमरावती येथे स. वि. यांनी आपल्या सत्यप्रकाश छापखान्यात छापून प्रसिद्ध केले. पण हा स. वि. कोण याचा पत्ता लागत नाही.

या सत्यप्रकाशचे अंकाच्या मुखपृष्ठावर अंकाची वर्गणी, जाहीरातीचे दर, सोडचिठ्ठी वगैरेच्या नोटीसा, इतर पानावर सरकारी जाहीराती, लहान लहान बातम्या वगैरे मजकुर आहे. आणि शेवटचे पानावर 'वऱ्हाड सत्यप्रकाश' ही अक्षरे आणि त्याचेच खाली खालील श्लोक दिलेला आहे.

"लोभा सोड कदापि मत्सर मनि क्रोधाहि आणू नको ॥
विव्दाना बहुमान दे विपदिहि सन्मार्ग सोडू नको ॥
वाणी मंजुळ बोल तू रुभराते जोडी जन्म रंजनी ॥
प्रार्थि संकट वारणार्थ मझला जो तारि दुःखार्ग की ॥

गॅझेटियर फॉर हैद्राबाद अमाईन डिस्ट्रिक्टस् १८७० मध्ये या वृत्तपत्राचा उल्लेख "उमरावतीचे पहिले वृत्तपत्र" अशा अर्थाने आलेला आहे.

वऱ्हाड-शाळा-पत्रक : इ सन १८७६ साली "वऱ्हाड शाळा पत्रक" या नांवाने सरकारच्या शाळा खात्यातर्फे हे पत्रक (वृत्तपत्र) आकोल्याहून निघत असे. या पत्रकाचा मुख्य उद्देश, शाळा खात्याची आदेश पत्रे, सुचना, बदल्या-बढत्या ह्या सर्व शिक्षण खात्यातील लोकांना कळाव्या एवढाच दिसून येतो. पुढे या पत्रकात उपयुक्त माहीती, शिक्षण क्षेत्राशी संबंधित अशी माहीती, शाळांना मदत देणाऱ्या नागरिकांची नांवे, बदल्या बढत्या व काही बातम्या देण्यात येऊ लागल्या. हे पत्रक सुमारे १०० वर्षे सुरु होते. वऱ्हाट जॉईट बोर्डातर्फे हे पत्र नंतर काढण्यात येई. हे पत्रक नंतर उमरावर्त हून प्रकाशित होत असे व अखेर पर्यंत ते उमरावतीसच होते. सुरुवातीला पत्रकावर संपादकाचे नाव नसे. पुढे संपादकाचे नाव छापल्या जाऊ लागले. पत्रकाच्या काही संपादकाच्या नावाची यादी याच ग्रंथातील पृष्ठ ८३१ वर आलेली आहे.

धान्य आणवून महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाला पुरविले.) व लोकांचा दुवा मिळविला. शिराळशेटीची ही कर्तव्यनिष्ठा पाहून बादशहाने त्यांस आपल्या 'बेदर' या राजधानीत बोलावून त्याचा सन्मान केला व "तुला काय हवे ते मागून घे" असे सांगितले तेव्हा त्याने पैसा, अडका किंवा वतन जहागीर यापैकी काही एक न मागता, आपणास साडेतीन घटका बादशहाचा अधिकार मिळावा, अशी विनंती केली. तेव्हा तिला बादशहाने लगेच संमती देऊन तो आपल्या तख्तावरून खाली उतरला. परंतु त्याने परत विनंती केली कीं, माझी बादशाही तख्तास पाय लावण्याचीही योग्यता नाही, तरी बादशहाने साडेतीन घटका आपला शिक्काच तेवढा माझे स्वाधीन करावा व मी जे कांही करीन ते मंजूर करावे, बादशहाने हे सारे कबूल केले. यानंतर या साडेतीन घटकात शिराळशेटीने बहामनी राजाकडून हिंदु धर्मासंबंधीच्या ज्या देणग्या व इनामे, तसेच देवस्थानांच्या जमिनी खालसा केल्या होत्या त्या सर्व खुल्या केल्या. इतकेच नव्हे तर काही देवस्थानाला नवीन जमिनी नेमून दिल्या. त्याने स्वतः करता मात्र काहीच घेतले नाही, तेव्हा बादशहाने त्याच्या जनहितैषी व निरपेक्षबुद्धीमुळे खुष होवून त्याच्या नकारास न जुमानता त्याच्या मुलास सरदारकी दिली. शिराळशेटीच्या या अल्पकालिन, औट घटकेच्या राज्याची गोष्ट श्रावण शु. ६ ला घडली. त्याचे स्मरणार्थ महाराष्ट्रात श्रावण शुद्ध ६ स शिराळशेट बसवितात व उत्सव करतात.

(माणदेशातील बंडाळी मोडण्यासाठी गेलेला नामशेटी नावाचा सरदार याच्याच वंशातला. 'वरकुटे' (पुणे जिल्हा) गावाजवळ त्याच्या फौजेचा तळ पडला होता. म्हणून या गांवास "नामशेटीचे वरकुटे" असे नाव पडले आहे[१].)

शिराळ शेटीचा हा उत्सव संपूर्ण दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा वगैरे भागात शेकडो वर्षे चालू असल्याने तिकडील गावकीतील वहीवाट आणि कायद्यात देखील या उत्सवाचा मानपान कोणी घ्यावा, कामकाज कोणी सांगावे हयाचा शिरस्ता ठरून गेला आहे. तो असा-

"सीरालसेट मान गाव सिरस्ता

---

१ : सुलभ विश्वकोश : भाग ६ : दाते – कर्वे : पा. २४२६

१ मोकदमाचा पुढे चालावा.
२ याचे मागे

१ सेटे महाजन
१ गाद लोकांचे

२

ज्या गावी देशमुख असतील तेथे देशमुखाच्या आधी पुढे न्हावीयाने घेऊन चालावे त्यामागे सर्वांचे चालावे[१]"

१ : मराठे कालीन समाजदर्शन : गावकीतील कायदे : इतिहास संशोधक शंकरराव जोशी सत्कार समिती : १९६० : पा. १८

परिशिष्ट – ४

उमरावतीची वृत्तपत्र सृष्टी : साप्ताहिके, मासिके वगैरे.

'सत्यप्रकाश' हे उमरावतीचे पहिले मराठी मासिक होय. अशी माहिती गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस् १८७० मध्ये दिलेली आहे. संभवतः हे मासिक उमरावतीत इ. सन १८६४–६५ चे आसपास निघत असावे. संपादकाचे नाव उपलब्ध नाही.

इ. सन १८६५ मध्ये साताऱ्याचे श्री. गणेश नारायण कोल्हटकर यांनी उमरावतीस छापखाना टाकला व 'वऱ्हाड समाचार' या नावाचे साप्ताहिक सुरू केले होते. नंतर त्यांनी हा छापखाना व वर्तमानपत्र, आकोल्याचे श्री. फडके यांना भागीदार करून, आकोल्यास नेले. तेथे हे वृत्तपत्र पुष्कळ दिवस चालू होते[१].

इ. स. १८७४ मध्ये वऱ्हाड जॉईंट बोर्डाचे विद्यमाने 'वऱ्हाड शाळा पत्रक' या नावाचे मासिक प्रथम आकोल्यातून व नंतर उमरावतीहून सुरू करण्यात आले होते. या मासिकाचे संपादक पुढे श्री. गोपाळ शिवराम जोगळेकर बी. ए. एल्. एल्. बी. वकील हे होते. नंतर सर्वश्री अरविंद देशपांडे, १९२७ नंतर श्री. द. स. सुळे, श्री. गोपाळराव बाजीराव देशमुख (खेडकर) हे काही काळ संपादक होते. पण त्यांनी स्वतःचे ग्रामसेवक नावाचे साप्ताहिक काढले तेव्हा या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर श्री. अ. तु. वाळके हे संपादक झाले आणि पुढे श्री. आर. डी. देशपांडे, श्री. ना. कृ. दिवाणजी व श्री. वि. तु. चौधरी हे संपादक होते.

इ. स. १८९१ मध्ये उमरावतीतून 'ज्ञान संग्रह' या नावाचे मासिक प्रसिद्ध होऊ लागले. 'मंथली मॅगेझीन' म्हणून त्याकाळी हे मासिक फार वाचले जात असे.

या मासिकाचा भर सुधारणेवर होता. श्री. यशवंत गोविंद केसकर हे या मासिकाचे संपादनकर्ते होते. श्री. यशवंत गोविंद व श्री. अंताजी गोविंद केसकर दोघे बंधु इ. सन १८७५ पासून उमरावती नगरपालिकेचे सभासदही होते. उमरावतीत त्यांचा 'प्रमोदसिंधु' या नावाचा छापखाना होता. तेथेच हे मासिक

---

१ : बहुरूपी, चिं. य. कोल्हटकर : १९५७: पा. ७

छापल्या जात असे. (श्री. यशवंत गोविंद यांचे संपादकत्वाखाली सन १८८१ साली देखिल एकादे वृत्तपत्र सुरू असावे, कारण उमरावती नगर–पालिकेच्या प्रोसिडिंग वरून असे दिसते की त्यावेळी श्री. यशवंत गोविंद हे 'एडिटर' होते. त्याच वेळच्या ठरावावरून असेही दिसते की, म्यु. कमेटीने संडासपट्टीचे नियम स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध करावेत असे ठरविले होते. यावरून १८८१ मध्येही उमरावतीत वृत्तपत्र चालू होते व श्री. यशवंत गोविंद[१] हे त्याचे संपादक होते.)

असे दिसते की, काही लोकांनी मिळून प्रमोद सिंधु छापखाना व 'ज्ञानसंग्रह' मासिक यासाठी एक मंडळी स्थापन केली असावी, कारण ज्ञानसंग्रह मासिकाचे इ. सन १८९३ चे मलपृष्टावर "यशवंत गोविंद केसकर, ज्ञानसंग्रह व्यवस्थापक मंडळीचे सेक्रेटरी" असे लिहिले आहे. हे मासिक बरीच वर्षे चालू होते.

या मासिकात, मिसेस फासेट यांच्या ग्रंथाधारे लिहिलेली 'संपत्ति शास्त्र' ही प्रदीर्घ लेखमाला, वऱ्हाडची ऐतिहासिक माहिती, ही उमरावतीचे श्री. लक्ष्मण रेणको डोळे यांची लेखमाला, 'नादीरशहाची बखर' मराठी ग्रंथकार आणि त्यांचे ग्रंथ, वेदकालातील स्त्रियांची स्थिती इत्यादी साहित्य क्रमशः प्रसिद्ध झाले होते.

संभवतः १८९४ चे सुमारास श्री. रामभाऊ केसकर+ यांच्या संपादकत्वाखाली 'प्रमोद सिंधु' हे वृत्तपत्र उमरावतीत सुरू झाले होते. या वृत्तपत्राचा सामाजिक सुधारणेवर भर असे. इ. सन १८९४ मधील या वृत्तपत्राच्या एका अंकात श्री. दादासाहेब खापर्डे यांचा 'विधवेला

---

१ : यशवंत गोविंद केसकर ह्यांचे १८७५ चे आसपास एकादे वृत्तपत्र असावे. कारण म्यु. प्रोसिडिंग दि. १० सप्टेंबर १८७५ रोजी मॅनेजिंग कमेटीत त्यांचे नावापुढे 'संपादक' असे लिहिले आहे.

+ 'रामु केसकर, बाबू करंदीकर आणि इतर काही तरूण मुले बडनेरला आली. त्यांनी पुष्पमाला घातल्या आणि भिरवणूक काढून घरी पोचविले. (कै. दादा सा. खापर्डे यांचे चरित्र, पा. २४४). २ जानेवारी १९०६ ची वरील नोंद दादासाहेब खापर्डे यांच्या डायरीत आहे. त्यांत रामु केसकर हे नाव आहे. यावरून प्रमोद सिंधु या वृत्तपत्राचा संपादक तो हाच रामभाऊ केसकर असावा.

पुनर्विवाहाची परवानगी असावी' हा लेख प्रसिद्ध झाला होता. याच काळात 'वैदर्भ' या नावाचे एक वृत्तपत्र निघत होते. ही दोन्ही वृत्तपत्रे शिळाप्रेसवर छापली जात. 'वैदर्भ' पत्राला रावबहादूर मुधोळकरांचा तर 'प्रमोद सिंधूला' श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांचा आश्रय असे व त्यांच्या पुढारीपणाचा या वृत्तपत्रांना लाभ मिळत असे[1].

इ. स. १९०५ चे सुमारास श्री. भांगले या नावाचे गृहस्थांनी 'कर्तव्य' साप्ताहिक येथे सुरू केले होते.

श्री. भांगले हे पाटणकर संगीत नाटक मंडळीत स्त्री पात्राचे काम करीत असत. ही मंडळी उमरावतीला आली तेव्हा येथील मुक्कामात श्री भांगले यांनी नाटक मंडळी सोडली, येथेच विवाह केला व छापखान्याचा धंदा सुरू केला होता. नंतर श्री. भांगले हे सार्वजनिक कार्यातही भाग घेत असत. ते उत्कृष्ट वक्ते होते. भगवे कपडे परिधान करीत. लोकांत सच्छिलता निर्माण करणे हा उद्देश नजरेसमोर ठेवून त्यांनी 'कर्तव्य' हे वृत्तपत्र सुरू केले होते.+

इ. स. १९२० मध्ये जेंव्हा उदय सुरू झाले तेव्हा त्याचे एका अंकावर खालील जाहीरात प्रसिद्ध झाली होती.

कर्तव्य बंद पडले. कोल्हटकर छापखाना विकला.

अद्यापी पुष्कळ लोकांचा घोटाळा होत आहे असे दिसून आले म्हणून आम्ही मुद्दाम जाहीर करीत आहो की, प. वा. बापूराव कोल्हटकर यांचा कोल्हटकर छापखाना आम्ही विकत घेतला असून कर्तव्य वर्तमानपत्रही आता निघत नाही. तेव्हा कोल्हटकर छापखान्याचे नावाने आता कामे न पाठविता... अशी विनंती आहे.

(दि. १० ऑगष्ट १९२०)

एम्. गणेश
मॅनेजर अरुण छापखाना.

---

१ : 'उदय' दि. ५ मे १९४४

+ श्री. भांगले हे अकाली वारले होते. पुढे त्यांच्या पत्नि विमलाबाईनी छापखाना चालविला असे दिसते. कारण इ. स. १९२५ चे अखेर "भारत प्रेसच्या मालक श्रीमती विमलाबाई भांगले यांनी काही ग्रंथ एका शाळेला देणगी दिले" असे वृत्त २९ दिसें. २५ चे उदय मधून प्रसिद्ध झाले होते बहुदा या भांगल्याच्या पत्नी असाव्यात.

यावरून 'कर्तव्य' हे वृत्तपत्र १९२० पावेतो सुरू होते असे दिसते.

इ. स. १९११ च्या उमरावती जिल्हा गॅझेटीयरमध्ये उमरावतीत त्यावेळी सुरू असलेल्या वृत्तपत्रांची यादी दिलेली आहे. ती अशी :- १ सफर-ए-बरार (उर्दू), २ प्रमोद सिंधु (मराठी), ३ कर्तव्य (मराठी), ४ व्यापार-समाचार (मराठी) ५ वाग्विलास (मराठी).

त्यानंतरच्या काळात 'भारत', श्री. बामणगावकरांचा 'तरुण हिंदु' आणि श्री. कुरकुरे यांचा 'वऱ्हाडचा शेतकरी' ही वृत्तपत्रे उमरावतीतून निघत असत.

इ. स. १९१४ साली 'बहिष्कृत-भारत' या नावाने वृत्तपत्र श्री ग. आ. उर्फ नानासाहेब गवई यांनी उमरावतीतून सुरू केले होते.

या साप्ताहिकाचे, दि. ६ जानेवारी १९२३ चे अंकात, त्यावेळी उमरावतीचे दौऱ्यावर असलेले श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य, मठ संस्थान करवीर (डॉ. कुर्तकोटी) ह्यांचे बद्दल काही मजकूर प्रसिद्ध झाला. परंतु तो सपशेल चुकीचा असल्याने व ही गोष्ट संपादकाचे लक्षात आल्यामुळे त्यांनी जगद्गुरूंची दि. १६ एप्रील १९२३ रोजी लेखी जाहीर बिनशर्त माफी मागितली होती. हा माफीनामा साप्ताहिक उदयच्या दि. १७ एप्रील १९२३ च्या अंकात बहिष्कृत भारतचे संपादक व लेजिस्टेटिव्ह असेम्बलीचे मेंबर रा. ग. आ. उर्फ नानासाहेब गवई यांच्या सहीने प्रसिद्ध झाला होता. (बहिष्कृत भारत, हे वृत्तपत्र नागपूरला छापल्या जात असे.)

इ. स. १९२० साली लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने व त्यांच्या राजकारणाला साहाय्य करण्याच्या हेतूने, श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी साप्ताहिक 'उदय' सुरू केला. हे पत्र दर मंगळवारी प्रसिद्ध होत असे. उदयचा पहिला अंक दि. २७ जानेवारी १९२० रोजी प्रसिद्ध झाला होता. या साप्ताहिकाचे संपादक नंतर कविभूषण ब. ग. खापर्डे हे होते. दि. ८ नोव्हें. १९२७ पासून श्री नारायण रामलिंग बामणगावकर हे संपादक झाले आणि दि. ५ ऑगस्ट १९३० रोजी कायदेभंगाच्या चळवळीत श्री. बामणगावकर यांना अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाली तेव्हा श्री. बाबासाहेब खापर्डे हे संपादक होते. नंतर १९३१ मध्ये श्री. बामणगावकरांनी

संपादकाची सूत्रे पुन्हा हाती घेतली होती. पुढे हे वृत्तपत्र व अरुण छापखाना त्यांनी इ. स. १९३२ च्या सुरुवातीला काही सबलतीने श्री. नानासाहेब बामणगावकर यांना विकला.[1] (नंतर उदय इ. सन १९३३--३४ पासून अर्ध साप्ताहिक करण्यांत आले) तेव्हापासून श्री. बामणगावकर हे उदयचे संपादक व मालक होते. श्री. नानासाहेब बामणगावकरांचे मृत्यूनंतर उदय दैनिक झाले असून, श्री. वैद्य बंधू ते चालवीत आहेत.

इ. सन १९२३ मध्ये महात्मा गांधींच्या राजकारणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी श्री. वीर वामनराव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वतंत्र – हिंदुस्थान' हे वृत्तपत्र श्रीमान स. कृ. वऱ्हाडपांडे यांच्या संपादकत्वाखाली उमरावतीतून सुरू करण्यात आले होते. सुमारे सात वर्षे चालुन हे वृत्तपत्र इ. सन १९३० मध्ये बंद पडले. आणि पुन्हा, स्वातंत्र्योत्तर काळात, इ. स. १९४८ साली श्री. वि. बं. उर्फ बाबासाहेब वैद्य यांच्या संपादकत्वाखाली सुरू करण्यात आले होते. मार्गदर्शक वीर वामनराव जोशी हेच होते.

इ. स. १९२५ मध्ये रामनवमीचे मुहूर्तावर साप्ताहिक 'रामदासी' या नावाचे, केवळ धार्मिक विषयावर चर्चा करणारे वृत्तपत्र अमरावतीत सुरू झाले होते. श्री. त्र्यंबक बळवंत गोरे हे या पत्राचे संपादक होते.

पुण्याचे श्री. ग. स. नलाबडे यांनी दि. २४ दिसेंबर १९२५ पासून एक आठवड्यासाठी उमरावतीत 'संग्राम' नावाचे दैनिक चालविले होते. उमरावतीला या काळात भरलेल्या अ. भा. ब्राम्हणेतर काँग्रेसचे अधिवेशना विरुद्ध या पत्राचे धोरण होते व तेवढ्यासाठीच त्यांनी आठवडाभर हा उपक्रम उमरावतीला केला होता.

जुलै १९२४ पासून उमरावतीला विदर्भ सहकारी संघातर्फे 'सहकारी विदर्भ' हे मासिक गोपाळ शिवराम जोगळेकर, बी. ए. एल्. एल् बी., यांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले होते.

विदर्भातील सहकारी संस्थांची एकत्रित माहिती देणे व सहकारी चळवळीचा प्रसार व प्रचार करणे हा या मासिकाचा उद्देश होता.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र पान : ७०२

'इंद्रधनुष्य' या नावाचे एक मासिक १९३७ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर उमरावतीतून सुरू झाले होते. या मासिकाचे संपादक प्रो. कृष्णमूर्ती कविरत्न (कलकत्ता) हे होते.

इ. स. १९२७ मध्ये विजयादशमीचे मुहूर्तावर सत्यशोधक चळवळीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी श्री. दलपतसिंग चव्हाण यांचे संपादकत्वाखाली 'महाराष्ट्र केसरी' हे वृत्तपत्र उमरावतीतून निघू लागले होते.

'माहेश्वरी–जगत' या नावाचे एक हिंदी साप्ताहिक, दि. ११ जुलै १९२९ पासून श्री. कन्हैय्यालालजी कलंत्री यांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले होते. माहेश्वरी समाजाची धार्मिक व सामाजिक सेवा हा या पत्राचा उद्देश होता.

'भोळा शेतकरी' या नावाचे मासिक, दि. २८ जानेवारी १९३२ पासून, श्री. महादेव हरबाजी पांडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले होते. शेतकरी वर्गाच्या उन्नतीचे ध्येय या मासिकाने स्वीकारले होते. डॉ. नायब हे संपादक होते.

'वज्रप्रहार' या नावाचे साप्ताहिक ऑगष्ट १९३२ पासून श्री. राजहंस रामचंद्र पाटील यांचे संपादकत्वाखाली सुरू करण्यात आले होते.

'काँग्रेस' या नावाचे साप्ताहिक, डॉ. एन्. डी. सबनीस यांच्या संपादकत्वाखाली दि. २९ ऑगस्ट १९३२ पासून सुरू करण्यात आले होते.

सौ. ताराबाई मोडक यांचे संपादकत्वाखाली उमरावतीहून 'शिक्षण पत्रिका' १९३३ साली जेष्ट शु. १ शके १८५५ मध्ये सुरू झाली होती. केवळ शिक्षण विषयक मजकूर या पत्रिकेत येत असे.

'विरशैव संजीवनी' हे मासिक श्री. बामणगावकरानी १९३६ मध्ये सुरू केले होते. पुढे त्याचे संपादक श्री. वि. तु. चौधरी हे होते. वीरशैव लिंगायत समाजाच्या कल्याणासाठी हे मासिक चालविल्या जात असे.

ऑगष्ट १९३६ मध्ये 'ज्योतिष प्रचारक' या नावाचे, ज्योतिष विषयाला वाहिलेले साप्ताहिक श्री. जे. डी. राऊळकर यांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले होते.

इ. स. १९३७ मध्ये श्री. माधवराव देशपांडे यांच्या संपादकत्वाखाली 'आव्हान' नावाचे साप्ताहिक सुरू झाले होते.

इ. स. १९३७ चे सुमारास श्री. म. कृ. कुरकुरे यांच्या संपादकत्वाखाली 'विदर्भ' साप्ताहिक सुरू झाले. परंतु काही काळ चालून ते बंद पडले, व पुढे दीड वर्षाचे विश्रांती नंतर, फेब्रुवारी १९४० मध्ये पुन्हा सुरू करण्यात आले होते.

'समाजोन्नती' या नावाचे मासिक, अखिल सोमवंशीय क्षत्रिय कासार समाजाचे उन्नतीसाठी श्री. द. वि. तिवाटणे यांच्या संपादकत्वाखाली इ. स. १९३९ साली सुरू होते.

महायुद्धाच्या सरकारी बातम्या प्रकाशित करण्याचे दृष्टीने रा. ब. शिदोरे यांच्या संपादकत्वाखाली 'युद्धवार्ता' हे साप्ताहिक १९४० मध्ये उमरावतीत सुरू झाले होते.

इ. स. १९४० साली श्री. एस्. एस्. चुके यांनी 'ज्योतिःप्रकाश' हे मासिक चालू केले होते. ते पुढे साप्ताहिक होऊन, त्याचे संपादकत्वाची धुरा श्री. वसंतराव चुके हे सांभाळू लागले. आज तागायत हे साप्ताहिक चालू आहे.

दि. ५ एप्रिल १९४३ रोजी, वर्षप्रतिपदेच्या सुमूहूर्तावर उमरावतीतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे 'श्री गुरूदेव' मासिक सुरू झाले. संपादक श्री. अं. वा. नवाडे हे होते. एप्रिल १९४५ मध्ये हे मासिक बंद पडून नंतर वाद निर्माण झाला होता पण पुढे मे १९४५ मध्ये समेट होऊन संत तुकडोजी महाराज हे या मासिकाचे चालक ठरले होते.

काँग्रेसचे धोरणानुसार बहुजन समाजाचे मुखपत्र म्हणून, साप्ताहिक 'हिंदुस्थानचा' पहिला अंक दि. १७ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रसिद्ध झाला होता. त्याचे संपादक श्री. गणेशपंत उर्फ बाळ गद्रे, एम्. ए. एल्. एल्. बी. हे होते. उमरावतीचे वृत्तपत्रीय व्यवसायात, श्री. बाबासाहेब खापर्डे (उदय' चे प्रथम संपादक) यांच्या नंतर पहिलाच वकील हया धंद्याला लाभला होता हे त्याचे वैशिष्ठ्य.

(इ. सन १९५० पासून या साप्ताहिकाचे संपादक श्री. बाळकृष्ण विष्णू उर्फ बाळासाहेब मराठे हे झाले व त्यांनीच पुढे ते दैनिक करून आजपावेतो उत्तम प्रकारे चालविले आहे.)

उमरावतीच्या वृत्तपत्र सृष्टीची इ. सन १८६४ ते १९४७ पावेतोची उपलब्ध माहिती वरप्रमाणे दिली आहे.

हस्तलिखिते : उमरावती शहरात युवक मंडळी कडून १९३२ ते १९४० या दरम्यान बरीच उत्तमोत्तम हस्तलिखित मासिके, त्रैमासिके किंवा षण्मासिके निघत असत. साहित्य, राजकारण व समाजकारण या सर्व विषयांत तत्कालिन विद्यार्थी व युवकांना किती अभिरुची होती याचा प्रत्यय या हस्तलिखितांवरून येत असे. या हस्तलिखित मासिकांच्या संपादकांचे एक संमेलन दि. ३ नोव्हेंबर १९३९ रोजी उमरावतीला भरले होते. त्यावेळी उमरावतीत एकूण १५ हस्तलिखित मासिके निघत असत. त्यांची नांवे अशी –

प्रौढ विभाग : दुंदुभि, उषा, हिंदवीर, युवक, उषःकाल, क्रांति, सामर्थ्य, समर्थ व आदर्श,

बालविभाग : बालसुधा, प्रकाश, बालोत्तेजक व बालोद्यान.

परिशिष्ट – ५

उमरावतीचे परमहंस श्री. जनार्दन स्वामी.

उमरावतीला सुमारे साडे तीनशे वर्षांपूर्वी परमहंस श्री. जनार्दन स्वामी या नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांची समाधी श्री एकवीरा देवीचे मंदिरात आहे. त्यांची पुण्यतिथी दरवर्षी कार्तिक महिन्यात देवी संस्थानातर्फे साजरी केली जाते.

साडे तीनशे वर्षांपूवी म्हणजे सतराव्या शतकाचा काळ. त्यावेळी उमरावती हे लहानसे ग्राम होते. आणि येथे हिंदु, जैन व मुस्लिम धर्मीयांची वस्ती होती. शिवाय विद्वान ज्योतिषी उमरावतीत वास करीत होते ती माहिती पूर्वी आलेली आहेच.

सध्या अंबेचे मंदिर गावाचे मध्यभागी वस्तीत असले तरी त्यावेळी तेथे घनदाट जंगल असावे. मजरे अवरंगपूर (म्हणजे हल्लीचा साबणपुरा) येथे थोडी वस्ती आणि मसजीद होती त्याचा लेखी पुरावा आहे. पण एकंदरीत देवीचे मंदिराचे भागात जंगल होते. जवळपास शेते असावीत. यावेळी, नांदगावपेठ येथील एका वैराग्यशील तरुणाने देवीचे मंदिरा-नजीकच्या नाल्याचे दक्षिण तीरावर आपले निवासस्थान बांधून तेथे मुक्काम ठेवला व ती जागा त्यांची तपोभूमी म्हणून ओळखल्या जाऊ लागली.

वर म्हटल्याप्रमाणे जनार्दन स्वामी हे मूळचे नांदगाव पेठचे. बंधुल गोत्रात व शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेत त्यांचा जन्म झाला. मातेचे उदरात (गर्भात) बारा महिने होते. नंतर त्यांचा जन्म झाला, असे सांगतात. त्यांचे जन्माचे वेळी मातेला सुषुप्ती अवस्था प्राप्त झाली व नंतर बालक मातेचे स्तनपान करताना दिसले.

वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षापावेतो त्यांचे बालपण नांदगाव येथेच गेले. नंतर माता-पुत्राचे भांडण होऊन हे बालक नांदगावाहून जे निघाले ते सरळ उमरावतीला येऊन अंबादेवीचे मंदिराजवळ, वर म्हटले प्रमाणे राहू लागले. याप्रमाणे त्यांनी गृह त्याग केला. आणि श्री अंबेची भक्ती सुरू केली.

श्री जनार्दन स्वामींची शरिरयष्टी कसलेली होती. तपश्चर्येमुळे त्यांना तेज चढले होते. गोऱ्यापान चेहऱ्यावर कुरळे केस व दाढी मिशा यामुळे ते भव्य दिसत असत. ते विरक्त, ब्रम्हचारी होते पण त्यांनी शेवटपावेतो संन्यास घेतला नाही. अंगावर लंगोटी शिवाय वस्त्र नसे.

जनार्दन स्वामींचा नियम दररोज अंबादेवीचे दर्शन करण्याचा असे व दर्शन घेतल्याखेरीज ते अन्न ग्रहण करीत नसत. एकदा अतिवृष्टीमुळे अंबानाल्यास पूर आला. पूर तीन दिवस पर्यंत उतरला नाही. स्वामींना उपवास घडला. कारण देवीचे दर्शनाखेरीज अन्न-ग्रहण करायचे नाही असा त्यांचा नियम होता. तिसरे दिवशी अंबादेवी स्वामीचे स्वप्नात आली व तिने स्वामींना सांगितले की, तू दररोज ज्या विहिरीचे पाणी स्नान-संध्येसाठी वापरतोस त्या विहिरीत अगदी वर जो बाण (पाषाण) आहे, तो काढून त्याची प्रतिष्ठापना कर तो बाण म्हणजे मीच होय. स्वामींनी त्याप्रमाणे केले. ती प्राणप्रतिष्ठा केलेली मूर्ती म्हणजेच हल्लीची एकवीरा देवी (मोठी अंबा) होय.

श्री जनार्दन स्वामी हल्लीचे एकवीरा देवीचे मंदिर आहे तेथेच एका भागात राहत. तेथे त्यांचा आश्रम होता आणि तत्कालिन लोक त्यांना मोठे सत्पुरुष म्हणून ओळखत असत.

अनेक वर्षे त्यांनी जगदंबेची सेवा केल्यानंतर, तेथेच त्यांचा परलोकवास झाला. त्यांची समाधी एकवीरा देवीचे मंदिरालगत पूर्वेकडे आहे. अमरावतीची जनार्दनपेठ ही याच जनार्दन स्वामींचे नावाने वसविलेली आहे.

या पेक्षा जास्त माहिती श्री जनार्दन स्वामीसंबंधाने मिळू शकत नाही. उमरावती ग्रामातील पहिले सत्पुरूष-तपस्वी म्हणून श्री जनार्दन स्वामींचाच उल्लेख मिळतो[१].

टीप : श्री जनार्दन स्वामी यांना दोन बंधू होते. त्यापैकी एकाचे नाव चिंतामण असे होते. त्यांचे वंशज (सातवी पिढी) आज अंजनसिंगी (ता. चांदूर रेल्वे) येथे राहते. श्री. निवास महाराज हे त्यांचे नाव असून ते साधुवृत्तीने राहतात. त्यांचे आडनाव पेठकर आहे.

१ : श्री. वसंतराव उमदीकर यांचे अप्रकाशित साहित्यांतून साभार.

परिशिष्ट – ६

कै. श्री. नारायण गुरु.

कै. श्री नारायण गुरूंचा जन्म अयोध्या नगरी तआश्वीन शु. अष्टमीला झाला. हे कुटुंब महाराष्ट्रातले, नगर जिल्ह्यातील मढी गावचे मढीकर. इ. सन १८५७ नंतर हे कुटुंब प्रथम चित्रकुटला व तेथून नंतर अयोध्येला गेले व तेथेच त्यांनी वास्तव्य केले. अयोध्येत एक सुंदर राममंदिर आहे. त्या मंदिराचे पुजारीपण (उपाध्येपण) या कुटुंबाकडे होते.

उमरावती नजीकच्या माहुलीला (धांडे) ता. दर्यापूर वास्तव्य केल्यामुळे श्रीगुरुंना माहूलीकर अशी उपाधीही लागली आहे.

यज्ञ, स्वाहाकार यांच्या संबंधीचे पत्रकावर ते 'श्रीगुरू, शंकरानुचर नारायणगुरु माहुलीकर' अशी सही करीत.

त्यांचे मूळ नाव 'धर्मराज' होते. म्हणजे धर्मराज लक्ष्मीकांत मढीकर हे त्यांचे खरे नाव 'नारायणगुरु' हे नाव त्यांना नंतर प्राप्त झाले.

इ. स. १९१२ मध्ये समाधिस्थ होण्यापूर्वी श्री नारायणगुरूंचे गुरु महाराज परमहंस श्री. शंकर महाराज यांनी, दस्तावेज लिहिला. त्यांत श्री गुरुनारायण हे नाव लिहिले होते. कारण याच नावाने श्री शंकर महाराज धर्मराजाला हाक मारीत असत. त्या दिवसापासून सर्व लोक श्री धर्मराजाला श्री नारायणगुरू ह्या नावाने ओळखायला लागले. त्यांचे शिष्य त्यांच्या नावाचा जयघोष करतांना 'धर्मराज श्री. गुरुनारायण महाराज की जय' असे म्हणतात.

धर्मराजाचे शिक्षण फारसे झाले नाही. काळ्या रामांचे मंदिरात श्री. रामभाऊ पराडकर नावाचे महाराष्ट्रीय पुजारी होते. ते महाराष्ट्रीय मुलांना धुळपाटीवर अक्षरे शिकवीत. त्यांचेपाशी श्रीगुरूंनी धुळपाटीवर कित्ते गिरवून अक्षर ओळख करून घेतली होती. नंतर ते वेदपाठशाळेत गेले. तिथे अगदी थोडे दिवस त्यांनी संहिता म्हटली. चाळीस अध्यायाची यजु:संहिता त्या लहानशा मुलाने इतक्या थोड्या वेळात आत्मसात केलेली पाहून त्यांच्या गुरूंना, गोडसे शास्त्री यांना धन्यता वाटली.

वयाच्या तेरा–चौदाव्या वर्षी ते घरातून बाहेर पडले. सुमारे दहाबारा वर्षे ते आसेतुहिमाचल भटकत होते. वयाच्या अकराव्या वर्षापासून २१ व्या वर्षापर्यंत त्यांचा हा संचार झाला. शेवटी ते वऱ्हाडात शेगावला आले. श्री गजानन महाराजांचे दर्शनाला गेले तेव्हा त्यांनी सांगितले तू ज्यांचा शोध करतो आहेस ते इथे नाहीत पूर्वेकडे चालायला लाग आणि त्यांनी उमरावतीच्या दिशेकडे बोट दाखविले. श्री गुरु शेगाव–आकोट मार्गाने दर्यापूरला आले व तेथेच श्री. गोविंदराव देशपांडे या श्रीमंत गृहस्थाकडे श्रीगुरूंचा मुक्काम होता.

तेथे चंद्रभागेत स्नान करावे, आखाड्यात तालीम करावी मनापासून देवपूजा करावी आणि आपल्या आदर्श आचरणाने लोकांची मने वेधून घ्यावी असा क्रम, तेथे असे तो, चालू होता.

श्री. गोविंदराव देशपांडे यांना संतती नव्हती. त्यांनी श्रीगुरूंना दत्तक घ्यावे या विचाराने तसा मनोदय त्यांचेजवळ बोलून दाखविला. पण गुरूंना तर सर्व जग तृणमय होते, शेवटी त्यांनी गोविंदरावाचे इनाम गाव 'माहुली' (धांडे) म्हणून आहे तेथे राहण्याचे कबूल केले व धाड्यांचे माहुलीस श्रीगुरु गेले व तेथे झोपडी करून राहिले पुढे श्रीगुरुंनी तेथेच चंद्रभागानदीच्या काठी विठ्ठलरुखमाई मंदिर बांधले व तेथेच राहूं लागले. माहुलीचे वास्तव्यात त्यांचेकडून अनेक चमत्कार घडल्याने लोक त्यांना फार मानू लागले. पण गुरूंना सद्गुरूच्या भेटीची ओढ लागली होती. म्हणून इ. स. १९११ च्या सुमारास ते अमरावतीस आले.

श्रीगुरूंनी अंबामातेचे दर्शन घेतले आणि अंबादरवाजाचे बाहेर त्यांना विदेहावस्थेत, एका तरवटावर पडलेला एक मुसलमान अवलिया दिसला. त्या तेजाने गुरू आकर्षित झाले म्हणा किंवा भाग्याने त्यांना त्या अवलियाकडे ओढून नेले म्हणा, पण त्या अवलियापाशी त्यांना जाऊन बसावेसे वाटले खरे.

त्या अवलियाचे नाव होते कादरमियाँ. ते कुणाशीच बोलत नसत. विदेही स्थितीत एका पोत्यावर नित्य पडून राहत असत. श्रीगुरु त्यांच्या जवळ जाऊन बसले एका शब्दाचीही देवघेव झाली नाही. ते एकमेकाकडे नुसते पाहत होते. थोड्या वेळाने कादरमियाँनी त्यांचेजवळ एक पोते

मागितले. श्रीगुरूजवळ काय मिळणार ? पण श्रीगुरूंचा ज्यांचेकडे मुक्काम होता त्या गृहस्थाच्या घराच्या पायरीवर पाय– पुसणे म्हणून ठेवलेले जुने पुराणे फाटके पोते श्रीगुरूंनी उचलून आणले. आणि कादरमियांना अर्पण केले.

सायंकाळी श्रीगुरु पुन्हा कादरमियांच्या दर्शनाला गेले तेव्हा ते पोते श्रीगुरूंना देऊन मियां म्हणाले 'ले के जाव' पण श्री गुरूंनी ते परत घेतले नाही.

हया पोत्याचे मोबदल्यात कादरमियांनी श्रीगुरूंला श्री. शंकर महाराजासारख्या अद्वितीय नररत्नाचा परिचय करून दिला. कादरमियां कुणाशीही बोलत नसत पण श्रीगुरूंचे व त्यांचे रहस्य जमले आणि त्यांनी श्री गुरूंना सांगितले 'मेरे पास तुम्हारा काम नाही, है, जाव, शंकर भटजीके पास जाव, वह हमारा बडा भाई है, उधर तेरा काम है,' जाव बेटा, शंकर महाराजके तरफ जाव,' आणि त्यांनी शंकरमहाराजांच्या निवासाच्या दिशेने बोट दाखविले.

श्री. शंकर महाराज त्यावेळी नमुन्यात नानासाहेब गणोरकरांच्या घरी राहत असत. श्री गुरु तेथे गेले. श्री शंकर महाराजांना त्यांनी त्रिवार प्रणिपात केला. पहिल्या प्रणिपाताच्या वेळी सद्गुरूंनी प्रश्न केला. हरि हरि हवा ? ' श्रीगुरु काहीच बोलले नाही. त्यांनी दुसरा प्रणिपात केला. 'हरी हरि करा.' दुसऱ्या प्रणिपातानंतर आज्ञा झाली.श्रीगुरूंनी तिसरा प्रणाम केला 'सप्ताह करा : पुंडलिक वरदा हरि विठ्ठल. येवढे बोलून श्री शंकर महाराज आपल्या खोलीत गेले आणि त्यांनी दार लावून घेतले.

एका नंदादीपाने दुसरा नंदादीप उजळला. नामजप आणि सप्ताह करण्याची श्री शंकर महाराजांनी दिलेली आज्ञा श्री गुरूंनी तहहयात पाळली आहे. श्री. शंकर महाराजांच्या पादुका असलेली पालखी घेऊन केलेली पंढरीची वारीं, नामजप. कीर्तने, प्रवचने, वैदिक कर्म यथासांग होण्यासाठी, होणारे श्रौत आणि स्मार्तयज्ञ वगैरे अखंडपणे चालू आहेत.

..... श्रीगुरूंची आत्यंतिक त्यागवृत्ती, कुणाला काय देतील आणि काय कबूल करतील ते सांगता येत नसे. सोन्याची कडी, भरजरी रुमाल, पीतांबर, उंची शाली, गाद्यागिरद्या, मठातील भांडीकुंडी, पलंग, आरसे, बांधकामाचे साहित्य, टाळ, मृदंग, तबला पेटी, पैसे जे काय सेलअ

ते कुणी मागण्याचाच अवकाश, श्रीगुरुंनी काढून दिलेच म्हणून समजावे. यज्ञोत्सवास लाखो रुपये आणि अनेक प्रकारच्या वस्तू व धान्य येई, उंची वस्त्रे श्रीगुरूंनी भक्तगण अनेकदा अर्पण करीत, पण एक फाटके धोतर आणि हातातील काठी ह्याशिवाय कोणताही परिग्रह श्रीगुरु जवळ बाळगीत नसत. गाई, म्हशी, घोडे, दागदागिने, वस्त्रे, पात्रे, धनधान्य, श्रीगुरूंनी अक्षरशः लुटविले. अनेकदा अंगावरचे कोरे धोतर सोडून तरट गुंडाळून श्रीगुरूंनी ते धोतर दान केले आहे. अशा किती तरी गोष्टी त्यांच्या दानासंबंधी सांगता येण्यासारख्या आहेत.

उमरावतीतून पंढरपूरला श्री शंकरगुरूंच्या पादुका घेऊन जाणारी श्री नारायणगुरूंची पालखी सगळ्यांच्या परिचयाची झालेली आहे. पालखी निघतांना दहापाच लोक असतात आणि शेवटी पालखी पंढरपूरला पोचते तेव्हा पांचशे होतात. हा नेम गुरूंचा कधी चुकला नाही. मार्गात कितीही संकटे येओत, पालखी वेळेवर पंढरीला पोंचलीच पाहिजे.

त्याचप्रमाणे नारायणगुरूंचे यज्ञ, स्वाहाकार, दरवर्षी होत असत. उमरावतीत हे एकच महापुरुष असे होते की त्यांची पंढरीची पालखी आणि यज्ञ याबद्दल ख्याती होती.

आता त्यांच्या शिष्य परिवाराने नारायणगुरूंचे गावातील मठाची व्यवस्था व दरवर्षी पंढरीच्या पालखीची न चुकता वारी चालविली आहे.

हिंदु स्मशानभूमीवर श्री शंकर महाराजांच्या समाधी शेजारीच ब्रम्हरूपी विलीन झालेले नारायणगुरूंची समाधी आहे.

चित्र क्र. १७८ : इंद्रधनुष्य'चे संपादक (पृष्ठ ८३६ पहा)
प्रो कृष्णमूर्ती 'कविरत्न'



चित्र क्र. १७९ : श्री नारायण गुरु (पृष्ठ ८४१ पहा)

चित्र क्र. १८० : (पृष्ठ ८४५ पहा)
संत गाडगे बाबांचा पुतळा, गाडगे नगर, अमरावती.

चित्र क्र. १८१ : (पृष्ठ ८४७ पहा)
ह. भ. प. जयरामबाबा विवरेकर.

चित्र क्र. १८२ : लेडी सौ. यशोदाबाई जोशी (पृष्ठ ८५५-५६ पहा)
वनिता समाजच्या संस्थापिका.

परिशिष्ठ – ७

'देवकी नंदन गोपाला'

संत गाडगे बाबा या विख्यात संत पुरुषाचे चरणस्पर्शाने उमरावती नगरी पुनीत झालेली असून, हा महान संत दि. २० डिसेंबर १९५६ रोजी उमरावतीच्या उत्तर सीमेवर विसावला आहे. शहराच्या उत्तर सीमेलगत शेगांवचे हद्दीत गाडगे महाराजांचा पार्थिव देह समाधिस्थ झालेला असून तेथेच त्यांची भव्य समाधी व त्यावरील त्यांची प्रतिमा, आपली शिकवण लोक कितपत पाळतात हे पाहत बसलेले बाबा आज कोणासही दिसून येतात. गाडगे बाबांच्या या समाधीचे परिसरात त्यांचेच नावाने गाडगे नगर ही वस्ती वसलेली असून, ती उमरावतीचे उपनगर गणल्या जाते. याच परिसरात शिवाजी शिक्षण संस्थेच्या शिक्षण संस्था, आय्. टी. आय्. इंजिनीअरिंग कॉलेज व विदर्भ महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्थांच्या भव्य वास्तू उभ्या आहेत. आणि आता शेजारीच कै. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख हे आपल्या शिक्षण संस्थांकडे गौरवाने पाहत उभे आहेत.

दरवर्षी गाडगे महाराजांची यात्रा भरते. दुरदुरून भाविक लोक येतात, आणि या महान संताचे दर्शन घेऊन धन्य होतात.

श्री संत गाडगे महाराज हे मोठे संत पुरुष होऊन गेलेत. उमरावती जिल्ह्यातील कोतेगाव (ता. दर्यापूर) ही त्यांची जन्मभूमी आणि दि. २३ मार्च १८७६ ही त्यांची जन्म तारीख. जातीने परिट. लहानपणी गावातली गुरे राखत. मामाच्या शेतात काम करीत, प्रापंचिक होते. लहानपणचे नाव डेबू.

डेबूला लोकांचे दुःख दिसे. वऱ्हाडची जमीन पिकविणाऱ्यांच्या तोंडावर कळा नाही, औताला दोर नाही, चाबकाला वादी नाही, नांगराला फाळ नाही, भाकरीवर तेल नाही, अंगावर धड़ूत नाही, बायकोला लुगड नाही, आजारी पडला तर औषध पाणी नाही, आणि घरांत रात्री दिवा नाही.

बाता मात्र सव्वा सव्वा हात. डेबूने विचार केला 'बुडती हे जन देखवेना डोळा, येतो कळवळा म्हणुनीया'.

त्यांनी परिटाची संघटणा केली, त्यांच दारू पिणं कमी केलं. थोडी शिस्त घालून दिली पण त्यांचे कोणी ऐकणार कशाला ?

डेबूला गुरू उपदेश मिळाला. अन् बुधवार दि. १ फेब्रुवारी १९०५ रोजी, हाती काठी व गाडगं घेऊन डेबू घराबाहेर पडला, नेहमीसाठी.

अन् मग हा डेबू 'डेबूजी महाराज' झाला. त्यासाठी त्याला लोखंडाचे चणे खावे लागले होते. तपश्चर्या केली होती, लोक त्यांना गाडगे महाराज म्हणत. महारांजांचा दौरा सर्व देशभर झाला. पुढे त्यांनी तीर्थक्षेत्री कितीतरी धर्मशाळा बांधल्या. शिस्त फार, त्यांची कीर्तने म्हणजे मेजवानी. 'गोपाला गोपाला। देवकी नंदन गोपाला' या भजनातच ब्रम्हानंदी टाळी लागत असे.[१]

"गाडगेबाबा महाराष्ट्रभर फिरले. ज्या गावी ते जात त्या गावाची सफाई बाबा स्वत: हातांनी करायचे. श्रमदानाची व ग्रामोद्धाराची खरी सुरुवात गाडगेबाबांनी केली. ज्या ज्या गावी बाबा जात त्या त्या ठिकाणी बाबा कीर्तन करीत असत. त्यांच्या साध्या वाक्पटुत्वाला वाङ्मयीन तेज चढायचे. तीर्थयात्रा करू नका. चमत्कारावर विश्वास ठेवू नका. असा इषारा देताना, आजच्या नवविचारांच्या विद्रोही तरुणांनाही ते लाजवीत.[२]

"गरिबाच्या मुलाले शिस्पेन पाटी द्या, आपल्या पोराले विलायतला पाठवायची इच्छा करता अन् एक दोन आण्याची वही देताना कुरकूर करता ? आपण मानसं नाही ? मग आपल्याले विद्या नको ? [३]"

"कधीही देवळात पाऊल न ठेवणारा, दांभिकापुढे न वाकणारा, स्वत:च्या कार्यात सदैव धुंद असणारा हा लोकात्मा विसाव्या शतकातील चमत्कार होता.[४]

गाडगे महाराजांचा उमरावतीशी संबंध फार जुना. ते नेहमीच उमरावतीस येत असत आणि शेवटी त्यांचे पार्थीव शरीरही उमरावतीच्या सीमेवरच विसावलें.

महान संत. कुणीही आदराने मान लववावी असा हा माणूस. आपल्या शरीररूपी लोखंडाचं त्यान परिस केलं, लोकांचाही सोनं व्हावं म्हणून जन्मभर झटला आणि शेवटी त्याचं खरं स्मारक "गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला' या भजनाने अमर झालं.

---

१ : श्री. संत गाडगे महाराज : दांडेकर :

२, ३, व ४ : समाज संत गाडगे बाबा : मधुकर राजे : तरुणभारत : १८-४-७६

परिशिष्ठ – ८

कै. जयरामबाबा विवरेकर : (जन्म इ. स. १८६६ मृत्यु १९६५)

कै. जयरामबाबा विवरेकर यांचा ज्ञानदेवाश्रम उमरावतीत प्रख्यात आहे. बाबांचे उमरावतीस वास्तव्य १९४५ पासून होते. उमरावतीत त्यांचा शिष्य परिवार बराच मोठा आहे. बाबांचे शिक्षण मराठी २ री पर्यंतच झालेले. परंतु श्री गजानन महाराजांचा अनुग्रह झाला आणि त्यांची वाणी ज्ञानेश्वरी प्रसवू लागली, परमार्थ लोकांना सांगू लागली. बाबा प्रापंचिक होते. स्वतः शेतात खपत. कष्ट करीत. ठरलेल्या वेळी कीर्तन – प्रवचन करीत असत.

बाबांचा जन्म भामटी जातीत झाला. जन्म एलिचपूरचा. वडलाचे नाव राणोजी व आईचे बायजाबाई. घरची अत्यंत गरिबी. मोलमजुरी करून हे कुटुंब पोट भरत असे. पुढे हे कुटुंब अंजनगावी राहायला आले. तेथे बाबा शाळेत दुसरी पर्यंत शिकले पण गरिबीमुळे त्यांना शिक्षण सोडून काबाडकष्ट करणे भाग पडले.

काही काळानंतर हे कुटुंब आकोला जिल्ह्यातील विवरे या गावी येऊन राहिले. तेथे बाबा गवताचे भारे आणण्यासाठी डोंगरावर जात अगर गुरे राखण्यासाठी रानात फिरत. त्यामुळे त्यांची मूळची एकांतवासाची आवड दुणावली. त्या काळात त्यांना तमाशे पाहण्याची व लावण्या करण्याची गोडी लागली. पण त्यातूनच त्यांना भजनात गोडी वाटून ते स्वतः भजनात रमू लागले. विसाव्यावर्षी त्यांचे लग्न झाले व दोन मुले झाली. या काळात बाबांची आर्थिक परिस्थिती थोडी सुधारली व त्यांनी वडिलोपार्जित तागाचा धंदा सुरू केला. वयाच्या बेचाळीसाव्या वर्षापर्यंत त्यांचे आयुष्य संसारी माणसासारखे गेले. ते पुढे सिद्ध पुरुष होतील असे त्यावेळी कोणास वाटले नाही, पण पुढे त्यांचेत विलक्षण स्थित्यंतर घडून आले. त्यांचेवर गजानन महाराजांचा अनुग्रह झाला. एके दिवशी सकाळी शेतात गेल्यावर बाबांना झोप लागली व स्वप्न पडले. त्यांत श्री तुकोबारायाचे कीर्तन त्यांनी गजानन महाराजासमवेत ऐकले. जागे झाल्यावर त्यांनी एकदम अंगावरील कपडे फाडून टाकले व ते दिगंबर झाले. संध्याकाळपर्यंत ते शेतातून परतले नाहीत, म्हणून त्यांचे शोधार्थ काही लोक शेतात गेले

तेव्हा बाबा दिगंबर अवस्थेत भटकताना दिसले. ते कोणाशी काही बोलेनात. तेव्हा त्यांना वेड लागले असे समजून लोक परतले व ती हकीकत बाबाच्या घरी कळविली. हे ऐकून त्यांच्या मंडळीस फार वाईट वाटले. त्यांनी बाबांना घरी आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण उपयोग झाला नाही. पुढे गजानन महाराजांचे सांगण्यावरून त्यांना नारायण महाराज पातुरकरांनी प्रपंच करावयास लावले. नंतर बाबांनी वारकरी संप्रदायाची दिक्षा घेतली.

सुमारे दहा वर्षे संसार केल्यावर त्यांचे पहिले कुटुंब निवर्तले. त्यावेळी वनात जाण्याचा त्यांनी विचार केला. पण मातोश्रीच्या इच्छेप्रमाणे त्यांचे दुसरे लग्न झाले. दुसऱ्या कुटुंबाचे नाव जनाबाईच आहे. सापत्न-भावामुळे पुढे घरात भांडणे सुरू झाली म्हणून ते सपत्निक वनात जाण्यास निघाले. प्रारंभी त्यांनी चिखलगावी वास केला. नंतर चिचोलीच्या डोंगरात एक वर्ष काढले. पुढे ते सातपुड्यात मुक्तागिरीवर गेले. तेथे तीन वर्षे राहून करजगावच्या जंगलात सहा महिने राहिले. त्यावेळी ते जवळच्या खेड्यातून कीर्तन-प्रवचने करीत असत. त्यानंतर ते पातुरच्या डोंगरात दोन वर्षे राहिले व पुन्हा करजगावच्या जंगलात तीन वर्षे काढली. कीर्तन प्रवचनामुळे त्यांची आजूबाजूच्या खेड्यात ख्याती झाली.

१९४५ इसवी मध्ये ते उमरावतीस आले. स्थानिक लोकांची परमार्थाची तळमळ पाहून ते गावाबाहेर एका शेतात राहिले. तेथेच त्यांनी ज्ञानेश्वराश्रम बांधला. बाबा व त्यांच्या पत्नी शेतात खपून आपला चरितार्थ चालवीत. ते क्षणभरही रिकामे नसत. शेतात काम नसेल तेव्हा जवळ असणाऱ्या लोकांना परमार्थाबद्दल सांगत. त्यांचा स्वभाव कनवाळू व गोड होता. त्यांची भाषा वऱ्हाडी, सोपी व सुटसुटीत असून अनुभवामृताने ओथंबलेली, अतएव सहज सुंदर, प्रासादिक होती. बाबा गावात कीर्तन प्रवचने करीत व आश्रमांतही प्रवचने करून सहजावस्थेत आपले आयुष्य घालवीत. ज्ञानदेवाश्रमास त्यामुळे क्षेत्राचे स्वरूप आले होते. आषाढ वद्य नवमी १९६५ इ. रोजी सकाळी सूर्योदयापूर्वी बाबा पंचतत्वात विलीन झाले. १९५१ ते १९६५ पर्यंत ते अंबादेवी (मोठी) येथे चातुर्मासी कीर्तन प्रवचनें करीत असत. त्यांनी कौंडिण्यपूर देवी संस्थान जवळ विहीर व धर्मशाळा बांधली. उमरावतीचे श्री. शंकरसा मामर्डे हे जयरामबाबांचे परमभक्त असून त्यांनी बाबांची परवानगी घेऊन राजापेठ शेजारी जयरामबाबा नगर

वसविले आहे. त्या नगरांतच बाबांच्या समाधीची प्राणप्रतिष्ठा करून ब्रँझचा अर्धपुतळा बसविलेला आहे.

ज्ञानदेव किरण भाग १ व २, पसायदान, जयराम वाक्सुधा, निजसोपान हे धार्मिक ग्रंथ बाबांनी लिहिले. मृत्यूचे वेळी त्यांचे वय १०४ वर्षांचे होते.

परिशिष्ट–९

कै. मृगेंद्र शंकर स्वामी : कै. मृगेंद्र शंकर स्वामी या नावाचे एक जंगम गृहस्थ एकोणीसाव्या शतकाचे उत्तरार्धात उमरावतीच्या बुद्धिस्वामी मठात राहत असत. त्यांचे बरेचशे कन्नड भाषेतील साहित्य आहे. त्याच प्रमाणे मराठीतूनही त्यांचे बरेचशे अभंग आहेत. हे मराठी अभंग सोलापूरच्या वारद ग्रंथमालेतर्फे १५ वा ग्रंथ म्हणून प्रसिद्ध झाले आहेत.

श्री मृगेंद्र शंकर स्वामींचे निराकारी संवाद, अभंग, पदे आणि बसवेश्वरस्तोत्र इत्यादी साहित्य आहे.

श्री मृगेंद्र शंकर स्वामींची इतर माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांचे जाणे–येणे श्री. दादासाहेब खापर्डे यांचेकडे होते. इतकेच नव्हे तर त्यांनी त्याकाळी राष्ट्रीय आंदोलनात काँग्रेसचे समर्थन केल्याचे दिसते.

उमरावतीचा पहिला श्री बसवेश्वर जयंती उत्सव इ. स. १९११ मध्ये श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली या स्वामींनीच सुरू केला व तेव्हापासूनच या उत्सवाची सुरुवात झाली.

इ. स. १९०५ ची स्वामींची एक डायरी उपलब्ध आहे. त्या डायरीचे वैशिष्ट्य असे आहे की, त्या दिवशी जो काय वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग घडला असेल त्याचे वर्णन त्याच दिवशी काव्यात लिहून ठेवण्यात आलेले आहे. वऱ्हाडप्रांत १९०५ साली मध्यप्रांताला जोडला त्या प्रसंगावर त्यांनी रचलेला एक अभंग प्रकरण ५ मध्ये दिलेला आहेच.

परिशिष्ट क्र. – १०

उमरावतीचे स्त्री – जीवन.

उमरावतीच्या स्त्री–वर्गाच्या चळवळीचा काळ उणा पुरा गेल्या १०० वर्षाच्या आतीलच आहे, परंतु त्यापूर्वी एकूण सर्वसामान्य भारतीय स्त्रीचे जीवन कसे परावलंबी आणि अज्ञानांधकारात रुतलेले होते याची थोडी कल्पना आल्याखेरीच गेल्या शंभर वर्षातील बदललेल्या स्त्री–वर्गाच्या अवस्थेची व त्यासाठी स्त्री–वर्गाने केलेल्या प्रयत्नांची कल्पना येणार नाही म्हणून सुरुवातीला ती पार्श्वभूमी थोडक्यात येथे देणे जरुरीचे आहे.

इसवी सनापूर्वी किंवा नंतर एकदोन शतकात, मनुस्मृति अस्तित्वात आली. या मनुस्मृतीमध्ये स्त्रियांविषयी परस्पर विरुद्ध भासणारे असे उद्‌गार काढलेले आढळतात. "नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थिति, सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुंजते" (९–१४) असे स्त्रियांच्या बद्दल मनूचे मत असल्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये असे त्याने प्रतिपादिले आहे. "पितारक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने रक्षन्ति स्थविरे पुत्रा : न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" (लहानपणी पित्याने, तारुण्यात पतीने आणि वृद्धपणात पुत्रांनी स्त्रीचे रक्षण करावे. स्त्री ही स्वातंत्र्य देण्यास योग्य नव्हे, असे तो म्हणतो. (९–३)

अशा तऱ्हेने सर्वसामान्य भारतीय स्त्रीवर्गावर परावलंबित्व लादण्यात येऊन, तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढेच ठरवून देण्यात आले व स्त्रीचा संपत्ति किंवा शिक्षणाचा हक्क नाहीसा करण्यात आला. या प्रमाणे भारतीय स्त्री ज्ञानापासून पूर्णपणे वंचित झाली. परावलंबी बनली. ही स्थिती एकोणीसाव्या शतकाचे सुरवातीपावेतो, कायम होती.

या प्रमाणे भारतीय स्त्रीचे जीवन सुमारे दोन हजार वर्षे एक-प्रकारच्या गुलामीने जखडले गेले होते. इतकेच नव्हे तर, या शेकडो हजारो वर्षाच्या संवयीने भारतीय स्त्री देखील या अज्ञानांधकारालाच आपले खरे जीवन समजू लागली. होती.

या दोन हजार वर्षाचे इनिहासात स्त्रियांच्या समानतेचा, किमान हक्काचा प्रश्न कोणीही उपस्थित सुद्धा केला नाही. मग त्यासाठी झगडणे तर दुरच ! त्यात क्वचित् अपवाद जर कोणाचा असेल तर तो अकबरांचा !

मुस्लिम शासकांनी दिलेली, स्त्रियांच्या हक्काची पहिली सनद.

ज्या स्त्री-विषयक सुधारणांना १९ व्या शतकांत प्राधान्य मिळाले त्या घडवून आणण्याचा प्रयत्न भारताचे इतिहासात जर प्रथम कोणी केला असेल तर तो महंमद तुघलकाने (१३९०-९४) !

सतीच्या प्रथेला प्रथम बंदी घातली म्हणून लार्ड बेंटिंगचे (१८२८-३५) नाव कृतज्ञतेने घेतले जाते. पण त्याच्यापूर्वी ६०२ वर्षे, वेड्या महंमद तुघलकाने ज्या अनेक वेड्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला त्यांत हिंदु स्त्रियांच्या सक्तीच्या सतीला बंदी घालण्याचा प्रयत्न ही एक होती. सती जाण्यापूर्वी सरकारी परवाना काढावा अशी अट त्याने घातली होती. (परंतु मुल्ला-मौलवी आणि शास्त्री - पंडितांनी व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांनी ही अट व्यवहारात फोल ठरविली.)

बदनाम व कर्दनकाळ अल्लाउद्दीन खिलजीच्या (१२९६-१३१६) नावे निदान एक तरी सुधारणा नमूद करण्यासारखी आहे. ती म्हणजे वेश्यांना बंदी. वेश्यांनी विवाह करावा यासाठी त्याने हुकूम काढले होते.

परंतु अकबराने (१५५६-१६०५) केलेल्या सुधारणा तर फारच व्यापक व मूलगामी होत्या. त्यांच्या कायद्याची संहिता म्हणजे 'ऐने अकबरी ! "भारतीय स्त्रियांच्या हक्कांची पहिली सनद." असे ऐने अकबरीचे वर्णन केले तर त्यात अतिशयोक्ति होणार नाही.

अकबर - प्रणीत - स्त्रीविषयक सुधारणामध्ये पुढील कलमे आहेत.

१ हिंदु स्त्रीने सती जाण्यास प्रतिबंध.

२ हिंदुस्त्रीच्या पुनर्विवाहास मान्यता.

३ बाल विवाहास बंदी. (विवाहापूर्वी मुलीचे वय किमान चवदा आणि मुलाचे सोळा असावे. या वयासंबंधी कोतवालाचा शिफारस वजा दाखला मिळविला पाहिजे.)

४ विषम विवाहास बंदी. (वर आणि वधू मधील वयांत बारा वर्षापेक्षा अधिक अंतर असू नये.)

५ वेश्या व्यवसायाला प्रतिबंध. (त्या संबंधीचे खास नियम, परवाना पद्धती, वेगळी वस्ती वगैरे)

अकबराच्या या स्त्रीविषयक सुधारणांमुळे, हिंदु व मुससलमान स्त्रियांना पूर्वी कधीही नव्हते इतके हक्क प्रथमच मिळाले होते.

परंतु कट्टर सनातनी मुल्ला – मौलवी आणि शास्त्री – पंडितांनी अकबराविरुद्ध हिंदु – मुस्लिम या दोन्ही जमातींना चिथावण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांनीही हया सुधारणा अंमलात आणण्याचे कामात पदोपदी अडथळे आणलेत व हया सुधारणा अंमलात येऊ दिल्या नाहीत.

भारताचा दोन हजार वर्षाचा इतिहास पाहिला तर, स्त्री–विषयक सुधारणेचे दृष्टीने अकबराएवढा प्रयत्न कोणीही केलेला दिसत नाही ..... अकबराच्या 'ऐने अकबरीत' भारतीय स्त्रीच्या हक्काची पहिली सनद लिहिलेली आहे, असाच इतिहास निर्वाळा देईल.[१]

पुढे, १९ व्या शतकाचे पहिल्या पंचवीस वर्षात इंग्रजी राजवट भारतात सुरू झाली आणि पाश्चात्य संस्कृतीची हवा इकडे येऊ लागली. विश्वमानव मुक्ततेचा सिद्धांत याच काळात पाश्चात्य संस्कृतीने दिला. पण परंपरागत आचार – विचार येथील समाज जीवनात एवढे पक्के रुजले होते की, तत्कालीन समाजव्यवस्थेविरुद्ध बोलणे म्हणजे स्वत:वर आपत्ती ओढवून घेण्यासारखे होते, मग कृती करणे दूरच अशी एकूण स्थिती त्याहीवेळी भारतात विद्यमान होतीच.

ही स्थिती बदलवून टाकण्यासाठी नवीन ध्येयाचा प्रत्यय झाल्याशिवाय अथवा नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ कळल्याशिवाय परम्परागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होणे शक्यच नव्हते. पण त्यासाठी काही काळ जाणे अपरिहार्य होते.

नंतर आणखी सुमारे दोनशे वर्षाचा काळ गेला. आणि अखेर 'स्त्रीमुक्ती' आंदोलनाची सुरुवात इ. स. १८१४ साली परकीय लोकांकडून झाली.

'स्त्री मुक्ती' चा श्रीगणेशा.

भारतातील पहिली मुलींची शाळा

"मुंबई बेटावर इ. स. १८१४ साली अमेरिकन पाद्रयांनी (मिशनऱ्यांनी) मुंबईस येऊन जागोजागी मुलीस शिकविण्याच्या शाळा

१ : युगांतर : २५ नोव्हेंबर १९७३ पृ. ४३–४४

घातल्या व त्याप्रीत्यर्थ हजारो रुपये खर्च केले. ह्या लोकास मुलींच्या शाळा स्थापण्यास फारच प्रयास पडले. श्रीमंत लोक तर आपल्या मुलीस बिलकुल शाळेत पाठवीत नसत. परंतु गरीब लोकांच्या मुलींस घागरे, चोळ्या, साड्या, पैसे अशी इनामे देऊन मुली जमवीत. कित्येक लोक त्यावेळी दुप्पट भाडे घेऊन देखिल शाळा घालावयास भाड्याने जागा देत नसत. परंतु पाद्र्यांनी आपले उद्योग सोडले नाहीत. तेव्हापासून मुलींच्या शाळा सुरू झाल्या. मुलीस विद्या शिकविण्याची शाळा मुंबईत पूर्वी एकही सापडणे कठीण होते. मुलासच धड वाचता येत नसे, मग मुलीस वाचावयास व लिहावयास शिकविण्याच्या खटपटीत कोण पडतो ? आणि या शिवाय बायकास वाचावयास व लिहावयास शिकवू नये असा हिंदु लोकांचा समज होता[१]."

साक्षरता ही ज्ञानाची गुरुकिल्ली होय, पण ह्या साक्षरतेचीच भारतीय स्त्रियांना बंदी होती परंतु मुंबई बेटावरील इंग्रजांचे राज्यात इ. स. १८१४ साली अमेरिकन मिशनऱ्यांनी हिंदु मुलींसाठी पहिली शाळा काढून हजारो वर्षे ज्ञानापासून वंचित अशा भारतीय स्त्रीला ज्ञानाची कवाडे खुली करून दिलीत.

नंतर इ. स. १८२४ मध्ये पुण्यासही ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मुलींची शाळा काढली. तो पावेतो एतद्देशीय माणसाने सुरू केलेली सबंध भारतात एकही मुलींची शाळा नव्हती.

एतद्देशीय माणसाने मुलींसाठी काढलेली भारतातील पहिली शाळा.

इ. स. १८४८ साली मुंबई बेटावर तेथील ख्यातनाम नागरिक श्री. जगन्नाथ शंकरशेठ यांनी आपल्या वाड्यात मुलींच्या शिक्षणासाठी 'जगन्नाथ शंकरशेठ मुलींची शाळा' सुरू केली[२]. एतउद्देशीय माणसाने सुरू केलेली भारतातील हीच पहिली शाळा होय.

मुंबई बेट हे त्यापूर्वीच्या दिडशे वर्षापासून इंग्रजांच्या मालकीचे होते व तेथे त्यांची सत्ता होतीच. त्यामुळे मुंबईत राहणाऱ्या भारतीय लोकांना

---

१ : मुंबईचे वर्णन : मांडगावकर : १८६३ : पृ. २१२

२ : अर्वाचीन चरित्र कोश : चित्रावशास्त्री : पृ. २७२

इंग्रजांच्या पद्धती, त्यांची संस्कृती आणि त्यांचेतील स्त्री-स्वातंत्र्याची ओळख झाली होती. त्यामुळेच जगन्नाथ शंकरपेठ मुलींची शाळा सुरू होऊ शकली.

पण त्यानंतर तीन वर्षांनी इ. स. १८५१ मध्ये + अजम ज्योतीराव गोविंदराव फुले (पुढे महात्मा फुले) यांनी पुण्याला जेव्हा मुलीचीं शाळा सुरू केली तेव्हा तेथील लोकांनी म. फुल्यांविरूद्ध मोठा गहजबच केला. हिंदु मुलींना शिक्षण देणे हे महापाप. म. फुल्यांनी हे पाप केले, त्यामुळे तेथील लोक त्यांच्यावर खवळणार नाहीत तर काय करतील?.

परंतु या विरोधाला म. फुले यांनी तोंड देऊन, मुलींची शाळा तर जिद्दीने चालूच ठेवली, शिवाय दलितांच्या मुलांमुलींसाठीही शाळा सुरू केल्या. नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ म. फुले यांना कळला होता व म्हणूनच ते परंपरागत सामाजिक बंधनाविरूद्ध बंड करण्यास सिद्ध झाले होते. त्यांची सुरुवात 'स्त्री मुक्ती' च्या या आंदोलनाने झाली.

ज्यावेळी मुंबई-पुण्याकडे मुलींच्या शिक्षणाची ही चळवळ एतद्देशीयांनी आणि परकीय मिशनऱ्यांनी सुरू केली त्याच सुमाराला बंगाल मध्येही श्री. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा काढली होती. परंतु लोकाश्रयाचे अभावी त्यांना ही शाळा बंद करावी लागली[१].

अशा रीतीने शतकानुशतकाच्या भारतीय स्त्री वर्गाच्या अज्ञानांधकाराचे युग इंग्रजी राजवटीत संपून 'स्त्री मुक्ती' पर्व सुरू झाले व स्त्री वर्गाला साक्षर होण्याची संधी मिळाली.

(पुढे न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, प्रि. गोपाळ गणेश आगरकर आणि महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनी स्त्री-उन्नतीसाठी जे प्रयत्न केलेत त्यातूनच आज सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने कार्य करणाऱ्या भारतीय महिला निर्माण झाल्या हे सर्वविदित आहेच.)

... ...

वर वर्णन केल्याप्रमाणे भारतात जी स्थिती होती तीच उमरावतीच्या स्त्रीवर्गाची स्थिती होती. पाश्चात्य संस्कृतीचे वारे थोडे उशिरा वऱ्हाडात

+ श्री. अ. ना. देशपांडे लिखित 'आधुनिक मराठी वांङ्मयाचा इतिहास' या ग्रंथातील पृ. ८ वर 'इ. सन १८४२' म्हटले आहे. ते विधान चूक वाटते

१ : अर्वाचीन चरित्र कोश : चित्रांव शास्त्री : पृ. ७१

पोचले. तरी स्वत.च्या हक्काची मागणी करणारी धीट स्त्री येथे निर्माण व्हायला आणखी कित्येक वर्षांचा काळ जावा लागला. तो इतिहास पुढे येईलच.

अठरावे शतकाचे मध्यात पुण्या-मंबईकडे स्त्री-मुक्तीचे हे पर्व सुरू झाले त्यावेळी, वऱ्हाडप्रांत हा निजामाकडे होता. इ. स. १८५३ साली इंग्रजांनी वऱ्हाडप्रांत वहिवाटीने चालविण्याचे करारावर निजामाकडून घेतल्याने येथेही इंग्रजी राजवट सुरू झाली. इंग्रजांच्या पद्धतीची न्यायालये, पोलिस विभाग सुरू झाले. १८५९ मध्ये उमरावतीला रेल्वे आली. इ. स. १८६१ मध्ये उमरावतीत पहिली प्राथमिक खाजगी मुलांची शाळा सुरू झाली इ. स. १८६६ साली वऱ्हाडात शिक्षणखाते सुरू झाले व त्याचवर्षी उमरावतीला हायस्कूलही उघडण्यात आले. १८६८ ते ७० चे काळात येथे मुलींची प्राथमिक शाळा प्रथमच सुरू झाली. सर्व वऱ्हाडच्या राज्यकारभाराचे केंद्र उमरावती बनले होते. वऱ्हाडच्या ज्युडिशिअल कमिश्नरचे कोर्ट उर्फ हायकोर्ट उमरावतीला होते. त्यामुळे वकिली व्यवसाय-निमित्ताने अनेक इंग्रजी विद्याविभूषित वकील उमरावतीला स्थायिक झाले. (इ. स. १८५७ ला मुंबईला विश्वविद्यालय सुरू झाले होते व या विश्व-विद्यालयाची कायद्याची पदवी धारण करणारे वकील त्या काळी, कमी संख्येने, पण उमरावतीला होते.)

या प्रमाणे उमरावतीला वकील, हायस्कूल चे शिक्षक, सरकारी नेटिव्ह अधिकारी इत्यादी सुशिक्षितांची संख्या वाढू लागली. या सर्व सुशिक्षितांची फुरसतीच्या वेळी एकत्र जमण्याची व गप्पागोष्टी करण्याची जागा म्हणजे सक्करसाथीतील 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' ही होती तेथे सुशिक्षितांत अनेक सामाजिक बाबींवर चर्चा आणि वाद-विवाद चालत. त्यांत स्त्री-शिक्षण, बाल-विवाहाला प्रतिबंध, मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा इत्यादी विषय असत. या चर्चेत भाग घेणारात स्त्रियांविषयींचा पाश्चात्यांचा उदार दृष्टिकोण माननारे लोक असत. त्यातूनच पुढे स्त्री-संघटणेसाठी वातावरण अनुकूल होऊ लागले.

उमरावतीत वनिता समाजाची स्थापना.

उमरावतीतील त्याकाळातील एक तरुण वकील श्री. अण्णासाहेब उर्फ मोरोपंत जोशी (पुढे सर मोरोपंत जोशी) हे कर्ते सुधारक होते.

त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. यशोदाबाई (पुढे लेडी जोशी) आणि त्यांच्या समविचारी मैत्रिणी यांनी, मुंबईच्या आर्य महिला समाजाचे धर्तीवर इ. स. १८९२–१८९३ साली उमरावतीला 'वनिता समाज' या स्त्री-संघटनेची स्थापना केली. सौ. यशोदाबाई जोशी, सौ. यमूताई चिटणीस, सौ. सीताबाई सबनीस, सौ. येसूताई अभ्यंकर, सौ. राधाबाई मुधोळकर व श्रीमती द्वारकाबाई वैद्य हया भगिनी वनिता समाजाच्या आद्य संस्थापिका व पहिल्या कार्यकारिणीच्या सदस्या होत. सौ. यमूताई चिटणीस यांचे पती श्री. मल्हारराव उर्फ दादासाहेब चिटणीस हे वकील असून भोळे कम्पौन्डात (हल्लीची तखतमल इस्टेट) राहत असत. त्यांना स्त्रियांचे उन्नती विषयी कळकळ असे. त्यांच्या साहाय्याने वनिता समाजाचे कार्य सुरू झाले. पहिली ५–६ वर्षे श्री. चिटणीस त्यांचे घरीच वनिता समाजाचे काम चाले. पुढे समाजाचे कार्य वाढले तेव्हा, म्यु. सराय च्या दगडी इमारतीत (हल्लीचे जयस्तंभ चौकात) या संस्थेचे कार्यालय नेण्यात आले. ही जागा नगरपालिकेने या वनिता समाज संस्थेला नाममात्र भाडधाने दिली होती. 'वनिता समाज' याच दगडी इमारतीत मोठा झाला.

सुरवाती पासूनच जातपात, धर्म इत्यादी भेद न मानता, स्त्रियां व मुलींची उन्नती करणे, घराच्या चार भितीचे आंत, जवळपास बंदिस्तच असलेल्या स्त्रियांचे दळण वळण वाढवणे, व त्यांना संसार नेटका करण्यासाठी अवश्य त्या गोष्टी शिकविणे, ही वनिता समाजाने उद्दिष्टे होती.

लोकांनी बिचकून जाऊ नये म्हणून प्रथम दर शनिवारी दुपारी कीर्तने तेवढी होत, श्री. दादासाहेब चिटणीस, बडनेऱ्याचे श्री. पेंडसे वकील, श्री. मोरूभाऊ आगाशे इत्यादी मंडळी ही कीर्तने करीत व त्यांतून 'स्त्रियांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या' समजावून सांगत. बायकांना ही कीर्तने आवडू लागली पण गावात "हे सुधारक बायकांना बाटवायला निघाले" अशी टीका सुरू झाली.

लोणची, मुरांबे, तऱ्हेतऱ्हेचे रुचकर व पथ्यकर पदार्थ, मुलांची जोपासना, लोकरीचे वीणकाम, कपडे बेतणे, शिवणे, कशिदा–भरतकाम, हया गोष्टी दुपारच्या वेळात शिकविण्यास सुरुवात झाली पण हया गोष्टीची गावात टिंगल होत असे. (आज हया सगळ्या गोष्टी 'होमसायन्स'

म्हणून शाळा कॉलेजातून शिकविल्या जातात व त्यासाठी Bsc. Msc. हया पदव्याहो विद्यापीठ देते.)

या प्रमाणे वनिता समाजाचे काम चालू होते. उमरावतीत स्त्रियांनीच स्त्रियांचे उन्नतीसाठी स्थापन केलेली हीं पहिली संस्था होय आणि या संस्थेच्या जन्मदात्या व आश्रयदात्या म्हणून सौ. यशोदाबाई जोशी (लेडी जोशी) यांना श्रेय दिले जाते.

उमरावती काँग्रेस आणि वनिता समाजाने भरविलेले कलाकुसरीचे प्रदर्शन

इ. स. १८९७ साली राष्ट्रीय काँग्रेसचे तेरावे अधिवेशन सर शंकरन् नायर यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीला भरले होते. या अधिवेशनाचे वेळी, स्त्रियांच्या कलाकुसरीचे व स्वदेशी वस्तूंचे एक लहानसे प्रदर्शन, पुरुष मंडळीचे विरोधाला न जुमानता, वनिता समाजातर्फे भरविण्यात आले होते.

अधिवेशनाला आलेल्या प्रांतातील, परप्रांतातील आणि स्थानिक स्त्री–पुरुषांनी हे प्रदर्शन पाहून त्याचे कौतुक केले. वनिता समाजाचे स्त्रियोन्नतीचे कार्याला एक प्रकारे लोकांची मान्यता मिळाली.

काँग्रेस अधिवेशनासोबत, स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविण्याचा हा पहिलाच प्रसंग होता पण या प्रसंगाने, काँग्रेस अधिवेशनासोबत दरवर्षी स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविण्याची प्रथा पुढे सुरू झाली. ही प्रथा सुरू करण्याचा मान वनिता समाजाला म्हणजेच उमरावतीचे स्त्रीवर्गाला आहे. संघटितपणे सामाजिक कार्यात भाग घेण्याचा अमरावतीच्या स्त्री–वर्गाचा हा पहिलाच प्रसंग असावा.

काँग्रेस अधिवेशनाला 'स्त्री' वर्गाची उपस्थिती : उमरावतीला भरलेल्या या काँग्रेस अधिवेशनाला तिन्ही दिवस प्रेक्षक व श्रोते म्हणून स्त्री–वर्गाची उपस्थिती बरीच मोठी असे.[१]

परंपरागत रूढींनी जखडलेली व 'चूल आणि मूल' एवढ्याच कार्यक्षेत्रात गुरफटलेली उमरावतीची स्त्री इ. स. १८९७ साली सार्वजनिक व राजकीय कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचीही ही पहिलीच वेळ असावी.

---

१ : कै. दादासाहेब खापर्डे चरित्र, पान २९

तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता, इ. सन १८९३ ते १८९७ ही वर्षे उमरावतीच्या स्त्री–वर्गाचे दृष्टीने महत्त्वाची मानावी लागतील कारण या काळातच उमरावतीचा स्त्री–वर्ग कमी संख्येने का होईना–वनिता समाजाचे रूपाने संघटित आणि काँग्रेससारख्या राजकीय संस्थेच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिला. घराच्या चार भिंतीचे आत, चूल आणि मूल यांत बंदिस्त असलेली अमरावतीची स्त्री घराबाहेर पडू लागली, ही त्या काळातील मोठीच प्रगती मानावी लागेल.

स्वदेची आंदोलनात 'वनिता समाज' : इ. सन १९०५ साली वंगभंगाचे चळवळीने पेट घेतला आणि त्या मागोमाग देशात स्वदेशीची लाट उसळली. त्यावेळी वनिता समाजाच्या सदस्यांनी, स्वदेशीचे प्रचारार्थ सभा घेतल्या व समित्या स्थापन केल्या.

वनिता समाजाचे स्त्री शिक्षणाचे कार्य : साक्षरता ही ज्ञानाची गुरुकिल्ली. स्त्रियांना साक्षर केल्याखेरीज त्यांचा व समाजाचाही उद्धार होणार नाही ही खूणगाठ बांधून, वनिता समाजाने प्रथम पासूनच स्त्रियांना साक्षर करण्यावर भर दिला. त्या काळात वऱ्हाडात मुलींच्या प्राथमिक शाळा तेवढ्या असत. उमरावतीला इ. स. १९०५–६ साली मुलींचे नार्मलस्कुल सुरू झाले होते[१]. माध्यमिक शिक्षण घ्यायची इच्छा असल्यास मुलींना पुण्या – मुंबईकडे पाठवावे लागत असे. ही गोष्ट गोरगरिबांच्या मुलींना परवडणारी नव्हती. उमरावतीस मुलींच्या माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वनिता समाजाचे एक शिष्ट मंडळ वऱ्हाडच्या कमिश्नरांना भेटायला गेले होते व या शिष्टमंडळाने 'उमरावतीत मुलींचे हायस्कूल काढावे' अशी मागणी कमिश्नराकडे सादर केली. या खटपटीमुळेच पुढे–इ. स. १९१६–१७ चे सुमारास उमरावतीला मुलींचे हायस्कूल आणि वसतिगृह सुरू झाले[२]. त्यामुळे स्त्री–शिक्षणाचो गती वाढली आणि त्या बरोबरच मुलींच्या लग्नाचे वयही वाढू लागले.

वनिता समाजाने पुढे स्त्री शिक्षण व बालशिक्षणाचे कार्य सतत चालू ठेवले आहे.

---

१ : अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ : पृ. ३३८

२ : सेटलमेंट प्रकरणात ही जागा गर्ल हायस्कूलसाठी १९१६–१७ साली दिल्याची नोंद आहे.

१९०८ ते १९१४ या काळातील उमरावतीच्या स्त्री वर्गाची सार्वजनिक हालचालींची फारशी माहिती मिळत नाही.

इ. स. १९०८ ते १९१४ या काळात देशातही राजकीय वातावरण थंड होते. या काळात लो. टिळक मंडाले जेलमध्ये अटकेत होते. १९१४ मध्येच पहिले जागतिक महायुद्ध सुरू झाले. त्याच वर्षी मध्यप्रांत – वऱ्हाडचे कायदेमंडळही स्थापन झाले होते.

स्त्रियांच्या गायन वादनाचा जलसा.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून स्त्रीवर्गाच्या परम्परांगत बेडया शिक्षणामुळे तुटू लागल्या होत्या. इ. स. १९१४ साली दिसेंबरचे ३ तारखेला स्त्रियांच्या गायन वादनाचा जाहीर जलसा उमरावतीच्या गणेश नाटकगृहात तिकीट लावून करण्यात आला होता. या जलशाच्या कार्यक्रमाला पुरुष वर्गाची कोणतीही मदत न घेता केवळ स्त्रियांनीच त्याची सर्व व्यवस्था केली हे त्याचे वैशिष्टय होते. या कार्यक्रमात उमरावतीच्या फिमेल हायस्कूल व नार्मलस्कूल मधील मुलींनी भाग घेतला होता. हा उपक्रम बॅरि. काणे यांच्या इंग्रज पत्नि सौ. इंदिराबाई काणे यांच्या प्रयत्नाने झाला व या जलशाचे खर्चवजा उरलेल्या उत्पन्नाचा विनियोग या भगिनींनी शहरातील आंधळे पांगळे लोकांना थंडीचे निवारणार्थ उबदार कपडे देण्यासाठी केला होता[१].

वऱ्हाडात सुरू झालेल्या इंग्रजी राजवटीच्या ६० वर्षाचे कालानंतर येथील स्त्री जागृतीचे स्वरूप वरील सारख्या सार्वजनिक, सामाजिक, स्वावलंबी अवस्थेपावेतो पोचले होते. पुरुषांच्या मदती शिवाय येथील स्त्रिया स्वतंत्रपणे समाजसेवेचे कार्यात स्वतःच्या विचारानुरूप भाग घेऊ लागल्या, ही स्त्री वर्गाची या कालखंडातील महत्त्वाची प्रगती व त्या बरोबरच पुरुषाची गुलामगिरी झुगारून दिल्याची ही खूण होय.

स्त्री वर्गाचा राजकीय क्षेत्रात प्रवेश.

पहिल्या जागतिक युद्धाचे काळात देशात अनेक बंधने आली होती. आणि युद्धामुळे महागाई वाढली होती. १९१८ साली युद्ध बंद झाले पण

---

१ : केसरी, दि. ८ दिसेंबर १९१४

देशात इन्फ्ल्यूएंझाची साथ येऊन फार मनुष्य हानी झाली. याच काळात रौलट ॲक्ट व जालियनवाला बागेची कत्तल, १९२० मध्ये लोकमान्याचे निधन व गांधी युगाला प्रारंभ झाला. राजकीय वातावरण वळण घेऊ लागले, तापू लागले. असहकारितेचे युग सुरू झाले.

म. गांधीच्या हाती देशाच्या पुढारीपणाची आणि जनआंदोलनाची सूत्रे जाताच टिळक–कालखंडापेक्षा ते आंदोलन दसपटीने अधिक जागृत, व्यापक आणि लढाऊ तर झालेच, पण त्यामध्ये प्रथमच आणि स्वयंस्फूर्तीने शेकडो–हजारो स्त्रिया सामील झाल्या. लहान मोठ्या शहरात तर पाहता पाहता शेकडो स्त्री–कार्यकर्त्यांची पथके उभी राहिली. केवळ प्रभातफेऱ्यात, प्रचारातच नव्हे तर सामुदायिक कार्यक्रमात, सत्याग्रहात, – लाठी मारात, गोळ्या झेलण्यात, त्या पुढे सरसावल्या. गांधीजींच्या आंदोलनाने स्त्रियांची मने जिंकली – भारली गेली – आणि त्या प्रथमच घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने रस्त्यावर आल्या. भारतीय महिलांनी अचानक मारलेली ही झेप ऐतिहासिक महत्त्वाची मानावी लागेल. ही एक नवी पातळी होती गुणात्मक बदल होता.

गांधी युगात स्त्री–वर्गाची कामगिरी.

इ. स. १९२० साली जेव्हा लोकमान्य टिळकांचे निधन झाले त्यावेळी उमरावतीत हरताळ पाळला गेला व लोकमान्यांच्या चौरंगाची (फोटोची) मिरवणुक निघाली. त्या मिरवणूकीत शेसव्वाशे महिलांनी भाग घेतला होता. मिरवणूकीत सामील होण्याचा उमरावतीतील महिलांचा बहुधा हा पहिलाच प्रसंग असावा. त्याच संदर्भात, दि. २२ ऑगस्ट १९२० रोजी स्त्रियांनीच स्त्रियांची खास जाहीर सभा भरवून, लो. टिळकांचे निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करून, टिळक स्वराज्य फंड जमविण्याचे त्या सभेत ठरविले होते. या सभेच्या अध्यक्ष, श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या पत्नी, सौ. लक्ष्मीबाई खापर्डे हया होत्या आणि सभेतील व्याख्यात्या सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. विमलाबाई शेवडे आणि सिंधूताई गोळे हया होत्या.

ऑक्टोबर १९२० मध्येच उमरावतीला मजुरांची ट्रेड युनियन स्थापन करण्यासाठी श्री. कृ. वा. मोडक यांच्या अध्यक्षतेखाली जी पहिली सभा भरली तींत पुरुष कार्यकर्त्यासोबतच सौ. ताराबाई मोडक यांनीही भाषण

केले होते. (सौ. ताराबाई मोडक हचा पुढे बाल शिक्षण तज्ञ म्हणून प्रसिद्धीला आल्या आहेत.)

इ. स. १९२१ मध्ये महात्मा गांधी प्रथमच टिळक स्वराज्य फंडासाठी उमरावतीला आले. त्यावेळी त्यांचे सोबत सौ. कस्तुरबा गांधी हचाही होत्या. या दोघांचाही जाहीर सत्कार स्त्रियांनी सिटी क्लब चे इमारतीत केला. त्यावेळी या समारंभाला हजारो स्त्रिया उपस्थित होत्या व गांधीजींनी टिळक स्वराज्य फंडासाठी अपील करताच या सभेत हजर असलेल्या अनेक स्त्रियांनी आपल्या अंगावरील आभूषणे टिळक फंडासाठी दिलीत. गांधीजींनी हिंदीत स्त्रियांना उपदेश केला, त्याचा अनुवाद सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी मराठीतून करून सांगितला होता. या सभेच्या संयोजक सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. मनुताई खापर्डे, कु. चंद्राताई शेवडे, + सौ. विमलाबाई शेवडे हचा होत्या.

नंतर असहकारितेचे युग सुरू झाले. त्यावेळी सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. मनुताई खापर्डे, कु. चंद्राताई शेवडे व सौ. विमलाबाई शेवडे यांनी त्यात भाग घेऊन जाहीर सभातून भाषणे दिलीत.

याच वर्षी १९२१ मध्ये महिलांनी टिळक-जयंती साजरी केली. त्यात भाग घेणाऱ्या महिला म्हणजे, कु. लीलाबाई तळेगांवकर, श्रीमती ब्रम्ह, कु. दुर्गाबाई लोखंडे, कु. माणिकताई बापट, सौ. गंगुताई बापट, सौ. मनूताई खापर्डे, सौ. सावित्रीबाई भट व सौ. पार्वतीबाई पटवर्धन हचा होत. या टिळक जयंतीनंतरच दि. २ ऑगस्ट १९२१ रोजी जोग चौकात परदेशी कापडाच्या होळीचा कार्यक्रम श्री. वाय्. जी. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला, तेव्हा या कार्यक्रमाला हजर असलेल्या एकूण ४–५ हजार जमावापैकी अंदाजे २०० स्त्रिया होत्या.

वनिता समाजाचे कार्यात खंड व उमरावती महिला समाजाचा उदय.

इ. स. १९१६ साली श्री. मोरोपंत जोशी हचांनी नागपूरला वकीली सुरू केल्याने ते तेथे राहायला गेले. अर्थातच सौ. यशोदाबाई यांनाही नागपूरला राहायला जावे लागले. त्यामुळे वनिता समाजाचे कार्यात

+ कु. चंद्रीताई शेवडे हचा त्या काळात Fire brond म्हणून खुप गाजल्या होत्या.

खंड पडला. (श्री. मोरोपंत हे १९१६ ते १९२६ या काळात नागपुरला राहत असत.) त्यामुळे उमरावतीला स्त्री संघटनाच नाही अशी स्थिती निर्माण झाली. ही परिस्थिती सुमारे चार वर्षे होती.

परंतु दि. १८ फेब्रुवारी १९२१ रोजी उमरावतीच्या स्त्री वर्गाची एक सभा गणेश थिएटरमध्ये भरून तींत 'अमरावती महिला समाज' या नावाची संस्था स्थापन करण्यात आली. या सभेत सौ. पार्वतीबाई पटवर्धन आणि कु. चंद्राबाई शेवडे यांची 'असहकारिता व स्त्रियांचे कर्तव्य' या विषयांवर भाषणे झालीत.

या महिला समाजाचे कार्य जोग चौकातील ब्रम्हविद्यामंदिरात चाले. श्रीमती बयाताई मुळे हया अत्यंत कुशल भगिनीचे मदतीने शिवण वर्ग चालत आणि प्रदर्शनेही भरविली जात.

इन्फंट वेलफेअर सोसायटी ही नवीनच गोष्ट त्या काळात भारतात सुरू झाली होती. तिच्या हमालपुऱ्यांतील केंद्रात महिला समाजातर्फे स्त्रिया काम करीत. बेबी शो केले जात. निबंध स्पर्धा कामकरी गृहिणींच्या घरी भेटी देऊन त्यांच्या अडचणी समजून घ्यायच्या, मुलांसाठी कपडे शिवून द्यायचे इत्यादी कामे या संस्थेतर्फे केली जात. समाजाच्या सदस्यांनी संक्रांतीचे हळदीकुंकू एकत्र सार्वजनिक करायचे अशी प्रथाच असे. त्यावेळी हरीजन भगिनींना मुद्दाम निमंत्रण करून अस्पृश्यता निवारणाचेही प्रयत्न समाजाकडून केले जात. संक्रांती निमित्त करावयाच्या दानधर्माचे पैशातून येथील डफरिन हॉस्पिटलला कापडाची ठाणे, घोंगड्या वगैरे देण्याचीही प्रथा असे.

समाजातर्फे राष्ट्रीय कीर्तने, व्याख्याने, वादविवाद वगैरे कार्यक्रम वरचेवर होत. दरवर्षी गणेशोत्सवही मोठ्या प्रमाणावर साजरा होई. हळुहळू गावात सुशिक्षित स्त्रियांची वाढ होत होती, तसतसे संस्थेचे कार्यक्रमही वाढत असत.

१९३० च्या सुमारास, त्यावेळच्या मध्यप्रदेशातील मुलींच्या शाळांच्या निरीक्षिका कु. थॉमसन यांच्या सल्ल्यानुसार समाजाने एक मुलींची माध्यमिक शाळा सुरू केली. या शाळेत अध्यापनाचे कार्य समाजाच्या सदस्या स्वतःच करीत. ही शाळा ब्रह्मविद्या मंदिरात भरे. पुढे जागा कमी पडू लागल्याने

ती सौ. ताराबाई रणदिवे यांच्या घरी भरू लागली. नूतन कन्या शाळा चालू होईपर्यंत ही माध्यमिक शाळा सुरू होती.

हा महिला समाज पुढे १९४१–४२ चे सुमारास वनिता समाजात विलीन करण्यात आला.

या महिला समाजाच्या अध्यक्ष सौ. सावित्रीबाई भट, खजिनदार सौ. सत्यभामाबाई जोशी व सेक्रेटरी सौ. शांताबाई गोखले हया होत्या.

इ. स. १९२६ चे सुमारास लेडी जोशी ह्या परत अमरावतीस राहायला आल्यानंतर वनिता समाजाचे कार्य पुन्हा सुरू झाले. त्यावेळी कॅम्प विभागातील बडया लोकांचा, कमी संख्या असलेल्या महिलांचा 'वनिता समाज' आणि शहरातील स्त्रियांचा 'महिला समाज' अशी स्थिती बराच काळ होती. महिला समाजात गावातील बहुतांशी सर्व सुशिक्षित स्त्रिया काम करीत. सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. शांताबाई गोखले, सौ. ताराबाई रणदिवे, सौ. सीताबाई ब्रह्म, सौ. शांताबाई भट, सौ. मनुताई खापर्डे आणि वनिता समाजात कार्य करणाऱ्या बहुतेक सर्व स्त्रिया होत्या.

उमरावतीची नगर महिला काँग्रेस कमेटी : दि. ४ ऑगस्ट १९२१ रोजी उमरावती नगर महिला काँग्रेस कमेटीचे स्थापनेसाठी सौ. लक्ष्मीबाई खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची सभा होऊन सौ. मनुताई खापर्डे, सौ. सविताबेन चोकसी व सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे झाली व नगर महिला काँग्रेसच्या अध्यक्ष म्हणून सौ. लक्ष्मीबाई खापर्डे व उपाध्यक्षा म्हणून सौ. गिरजाबाई देशपांडे व सौ. अमृतीबाई यांची निवड करण्यात आली.

या सभेला गावातील गुजराती व मारवाडी महिलाही उपस्थित असल्याचा उल्लेख आहे.

झेंडा सत्याग्रहात भाग घेणारी उमरावतीची पहिली स्त्री-स्वयंसेवक.

इ. सन १९२३ साली नागपूरला झेंडा सत्याग्रह सुरू झाला. त्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी उमरावतीतून काँग्रेस कमेटीतर्फे जे ११ स्वयंसेवक नागपूरला पाठविण्यात आले होते, त्यात एक महिला सत्याग्रही होती. (त्या भगिनीचे नाव उपलब्ध नाही.) उमरावतीच्या या तुकडीने नागपूरच्या झेंडा सत्याग्रहात भाग घेतला. त्यात पुरुष स्वयंसेवकांना अटक झाली पण स्त्री स्वयंसेविकेला अटक न झाल्याने ती परत आली होती.

विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन.

इ. स. १९२४ साली उमरावतीला विदर्भ साहित्य संघाचे दुसरे अधिवेशन भरले होते. त्यांत सौ. ताराबाई साठे व कु. गीता साने+ या महिलांनी भाग घेतल्याचा उल्लेख मिळतो.

इ. स. १९२५ सालचे टिळकोत्सवात सौ. सरस्वतीबाई देशपांडे एम्. ए. (पूर्वाश्रमिच्या विमलाबाई कोल्हटकर) यांचे एक जाहीर व्याख्यान झाले. हे त्या टिळकोत्सवाच्या कार्यक्रमातील वैशिष्ट्य मानल्या गेले होते.

इ. स. १९२५–२६ च्या वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीवर उमरावती जिल्ह्यातर्फे जे लोक सभासद म्हणून पाठविले होते त्यात सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचीही प्रांतिक कमेटीवर निवड झाली होती.

ब्राम्हणेतर महिला परिषद.

इ. स. १९२५ मध्ये उमरावतीला ब्राम्हणेतर काँग्रेसचे अधिवेशनासोबत ब्राम्हणेतर महिला परिषद वर्ध्याच्या सौ. लक्ष्मीबाई नायडू यांच्या अध्यक्षतेखाली

+गीता साने (बी. एस्सी. गणित, बी. टी.) हया वऱ्हाड मध्यप्रांत हायस्कूल सर्टिफिकेट बोर्डाच्या शालान्त (मॅट्रिक) परिक्षेत प्रथम श्रेणीत पास पहिल्या विद्यार्थीनी, १९२६ साली सरकारी मुलींच्या हायस्कूल मधून प्रथम श्रेणीत पास होऊन त्यांनी दोन मेडल्स व दोन शिष्यवृत्त्या मिळविल्या होत्या. त्या काळात आठवीची परिक्षाहि बोर्डाची असे. तीतहि १९२३ साली त्यांनी आर. एस. रंगा मेडल व शिष्यवृत्ति मिळविली होती. शाळेला हा सन्मान मिळवून देणारी हया शाळेची गीता साने ही पहिलीच विद्यार्थीनी. तसेच वऱ्हाड–मध्यप्रांतातील सायन्स कॉलेजची पहिलीच विद्यार्थीनी होती. कादंबरी, निबंध व दीर्घ प्रबंध असे विविध प्रकारचे विपुल लेखन करणारी विदर्भाची पहिली लेखिका.

उत्तर प्रदेशातील मेरठ व बिहार मधील धनबाद येथील मुलींची नवीन लहान हायस्कूले वाढवून त्यांचा सर्वांगीण विकास करून स्त्री शिक्षणाचे त्यांनी फार मोठे कार्य केले आहे. लग्नानंतर आपले नाव, आडनाव न बदलणारी भारतातील कदाचित ही पहिलीच स्त्री असावी. त्यांचे सामाजिक कार्य बिहारात विविध प्रकारचे व मोठे आहे. राजकारणातही त्यांनी भाग घेतला आहे.

भरली होती. (या परिषदेत उमरावतीच्या ज्या भगिनींनी भाग घेतला त्यांची नावे प्रयत्न करूनही मिळू शकली नाहीत.)

मालिनी–खान विवाहाचा निषेध.

पुण्याच्या कु. मालिनी पाणंदीकर बी. ए. बी. टी. या तरुणीने तेथील गुलाबखान बी. ए. बी. टी. या मुस्लिम तरुणाशी रजिस्टर्ड मॅरेज केले होते. त्यामुळे सर्वत्र बरीच खळबळ माजली होती. कित्येक सुधारकांनी या विवाहाचे अभिनंदन केले तर कित्येक लोकांनी निषेध केला.

त्यावेळी उमरावतीला दि. ९ जुलै १९२७ रोजी स्त्रियांची जाहीर सभा भरून या विवाहाचा व या विवाहाचे स्वागत करणाऱ्या व्यक्ती आणि वृत्तपत्रांचा निषेध केला होता.

स्पृश्य–अस्पृश्य भगिनींचा तीळगुळ समारंभ.

अस्पृश्य स्त्रियांनी सौ. विमलाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १९२८ साली स्पृश्य स्त्रियांसाठी तीळगुळ समारंभ घडवून आणला तर स्पृश्य महिलांनी सौ. अन्नपूर्णाबाई शेवडे यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्य स्त्रियांचा तीळगुळ समारंभ घडवून आणला होता.

विदर्भ युवक परिषदेत महिला.

दि. २० आक्टोंबर १९२८ रोजी उमरावतीत भरलेल्या विदर्भ युवक परिषदेत, उमरावतीच्या कु. गोदूताई केतकर आणि कु. कृष्णाबाई खरे आणि आकोल्याच्या श्रीमती दुर्गाताई जोशी व सौ. राधाबाई ओक या महिलांनी भाग घेतला होता.

या शिवाय इ. स. १९२७ साली व त्यानंतरच्या वर्षातून उमरावतीत शिशु सप्ताहाला सुरवात झाली. त्यात अनेक स्त्रियांनी व्याख्यात्या म्हणून भाग घेतल्याचे दिसून येते. बालमृत्युप्रतिबंधक अशा या मोहिमेत सर्व स्तरातील स्त्रियांनी भाग घेतला असे दिसून येते. स्त्री जागृतीचे हे चिन्ह होय.

स्त्रियांतर्फे सार्वजनिक गणेशोत्सव व टिळक जयंती साजरी केली जात असे. रामकृष्ण परमहंसाच्या पुण्यतिथी निमित्त स्त्रियांचे कार्यक्रम होत असत.

इ. स. १९२८ च्या दिसेंबर मध्ये अस्पृश्य महिला परिषद कु. कृष्णाबाई खरे यांच्या अध्यक्षतेखाली खोलापुरी गेट जवळ भरली होती. एका स्पृश्य महिलेचे अध्यक्षतेखाली अस्पृश्य महिलांनी उमरावतीत भरविलेली ही पहिली परिषद होय.

देशभक्तांच्या मृत्युसंबंधी दुखवटयांच्या सभा स्त्रिया भरवित असत किंवा अशा भिरवणुकीतही स्त्रिया भाग घेत असत.

सामाजिक कार्यात स्त्रियांचे योगदान.

परंपरागत स्त्री जीवनाची कोंडी फोडून उमरावतीच्या महिलांनी धार्मिक व राजकीय क्षेत्रात भाग घेण्यापावेतो (इ. स. १८९५ ते १९२८) प्रगती केली याची माहिती वर दिलेली आहे. परंतु १९२८ नंतर उमरावतीच्या भगिनींनी सामाजिक, स्त्री–मुक्तीच्या चळवळीत भाग घेण्याची तयारी दाखविली याची त्रोटक माहिती अशी –

शारदा बिलाला पाठिंबा देण्यासाठी आर्य समाजातर्फे भरविलेल्या जाहीर सभेत १९२९ मध्ये सौ. चंद्राताई पटवर्धन यांनी भाषण केले होते.

यवतमाळ स्त्री–शिक्षण परिषदेतील ठरावांची माहिती देण्यासाठी १९२९ मध्ये उमरावतीला स्त्रियांची सभा महिला समाजातर्फे भरली होती. वनिता समाजाने सामाजिक विषयावरील व्याख्याने १९३१ मध्ये घडवून आणली. कॅम्प विभागात लेडिज क्लब स्थापन झाला (१९३०)

विदर्भ प्रांतिक महिला परिषद.

अखिल भारतीय महिला परिषदेच्या कार्याची माहिती देण्यासाठी वनिता समाजातर्फे १९३१ मध्ये सौ. लक्ष्मीबाई राजवाडे (ग्वाल्हेर) यांचे भाषण, लेडी सौ. यशोदाबाई उर्फ आक्कासाहेब जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ ऑगस्ट १९३१ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात आयोजित केले होते. त्याचा परिणाम म्हणून वनिता समाजातर्फेच दि. ४ सप्टेंबर १९३१ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात भरविण्यात आलेल्या सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील स्त्रियांचे सभेत, अखिल भारतीय महिला परिषदेची प्रांतीय शाखा म्हणून 'विदर्भ महिला परिषदेची' स्थापना करण्यात आली व या नव्या संस्थेच्या पहिल्या अध्यक्ष सौ. यशोदाबाई जोशी व चिटणीस सौ. कालिंदीबाई घाटे यांना निवडण्यात आले होते.

विदर्भ महिला परिषदेचे पहिले अधिवेशन.

उमरावतीच्या ह्या विदर्भ महिला परिषदेच्या कार्यकर्त्या स्त्रियांचा उत्साह एव्हढा दांडगा होता की, संस्थेची स्थापना झाल्यापासून केवळ पन्नास दिवसात त्यांनी विदर्भ महिला परिषदेचे पहिले अधिवेशन दि. २४ ऑक्टोंबर १९३१ रोजी उमरावतीला गणेश नाटकगृहात, साताऱ्याच्या डॉ. कमलाबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरविले होते. स्वागताध्यक्ष लेडी सौ. यशोदाबाई जोशी होत्या. वऱ्हाडच्या सर्व भागातील स्त्रिया या अधिवेशनाला उपस्थित होत्या शिवाय उमरावती शहरातील बहुतेक सर्व प्रमुख स्त्रियांही उपस्थित होत्या. या प्रमाणे सुमारे पांचशें स्त्रियांची उपस्थिती या परिषदेला होती.

या परिषदेत शैक्षणिक व सामाजिक स्वरूपाचे ठराव मंजूर करण्यात आलेत व स्त्रियांच्या सामाजिक हक्काचा आवाज प्रथम या १९३१ च्या परिषदेत स्त्रियांनी संघटितरीत्या उठविला असे दिसून येते. पतीच्या इस्टेटीत वारसा हक्क, अगतिक स्त्रियांना घटस्फोटाचा हक्क, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, इत्यादी कायदे व्हावेत अशी मागणी करणारे ठराव या परिषदेत मंजूर करण्यात आले होते.

उमरावतीच्या स्त्री-वर्गाने घरातून बाहेर पडून समाजसेवेला सुरुवात केल्यापासून, म्हणजे इ. सन १८९३ पासून स्त्रियांनी आपल्या सामाजिक व कायदेशीर हक्कांचा उच्चार सामुदायिकरीतीने व जाहीरपणे करण्यासाठी ३७ वर्षाचा (१९३१) आणि महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणाची सुरुवात झाली तेव्हापासून सुमारे ८०-८२ वर्षाचा काळ जावा लागला ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. स्त्रिया सुशिक्षित झाल्या व राजकारण आणि सार्वजनिक समाजसेवेतही भाग घेऊ लागल्या परंतु प्रत्यक्ष सामाजिक व कायदेशीर स्त्री-हक्कांचा उच्चार करण्याचा धीटपणा त्यांचे अंगी यायला मात्र दीर्घ काळ जावा लागला यावरून मनुने ठरवून दिलेल्या स्त्री वर्गाच्या मर्यादेची पकड केवढी घट्ट होती याची कल्पना करता येते.

ही विदर्भ महिला परिषद सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, सौ. विमलाबाई देशपांडे व त्यांच्या शेकडो समर्थकांनी केलेल्या सभा त्यागाने गाजली होती. स्त्रियांचा मोठ्या संख्येने सभात्याग ही गोष्ट त्या काळी मोठेच 'सेन्सेशन' निर्माण करणारी होती.

एका महिला मंडळाचे वनिता समाजात विलिनीकरण

याच सुमारास (सन १९३१–३२) बॅरि. पंजाबराव देशमुख यांच्या सुविद्य पत्नी सौ. विमलाबाई देशमुख यांनीही एक महिला मंडळ चालविले होते. हे मंडळ नंतर वनिता समाजाला येऊन मिळाले.

पुढे १९४० पावेतोचे काळात सर्वश्री माणिकताई भिडे, चिटणीस, शारदाबाई मुदलियार, सरलाबाई चौबळ, विमलाबाई देशमुख, शारदाबाई मुधोळकर, रंगूताई जोशी, सुशीलाबाई दामले, हीराबाई बोके, गिरजाबाई वाटाणे व कमलाबाई शाहणे यांनी एका पाठोपाठ कार्यवाह–पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली व वनिता समाजात नवनवे उपक्रम सुरू केले होते.

१९३० व १९३२ च्या कायदेभंगातील महिला : इ. स. १९३० व १९३२ या सालात कायदेभंगाचे प्रचंड आंदोलन देशभर झाले त्यास अमरावती शहराने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला होता. त्या काळात उमरावती शहर वऱ्हाडच्या आंदोलनाचे केंद्र बनले होते. त्यावेळी ह्या आंदोलनात अनेक महिलांनी भाग घेतला होता व त्याचे नेतृत्व सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी केले होते. याशिवाय सौ. लक्ष्मीबाई दांडेकर, डॉ. कु. सुलोचनाबाई जावळे, श्रीमती मथूताई लिमये, सौ. राधाबाई गोखले, कु. अंबूताई साठे, श्रीमती यमूताई टाकरखेडकर व श्रीमती उमाबाई मराठे आदि भगिनींनी त्यांत भाग घेतला आहे.

या आंदोलनात सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांना १९३० मध्ये सहा महिने कारावासाची शिक्षा झाली व १९३२ मध्ये त्यांचेवर ३०२ कलमाखाली खटला भरल्या जाऊन एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्यावर अपील करण्यात आले होते. तरी सुमारे सहा महिने त्यांना जेलमध्ये शिक्षा भोगावीच लागली होती. पुढे दि. ३ ऑक्टोबर १९३२ रोजी त्या अपीलात निर्दोष ठरल्या.

त्याच प्रमाणे सौ. लक्ष्मीबाई दांडेकर यांना १९३० साली ४ महिने तुरुंगवासाची व डॉ. कु. जावळे यांना २५० रुपये दंडाची शिक्षा झाली होती. याशिवाय प्रभातफेऱ्या व पिकेटिंगमध्ये अनेक मुली व स्त्रियांनी भाग घेतला होता.

सार्वजनिक कार्यात भाग घेणाऱ्या भगिनी म्हणजे सौ. मथुराबाई द्रवीड, सौ. कमलाबाई शिदोरे, सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. पद्मावती मोटे, श्रीमती माणिकताई भिडे, सौ. सावित्रीबाई भट, सौ. बागवे, सौ. शांताबाई गोखले. इत्यादी महिलांची नावे येतात.

सौ. पार्वतीबाई पटवर्धनांची देशसेवा : उमरावतीच्या राजकीय क्षेत्रात मात्र सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्याच एकट्या अशा दिसतात की ज्यांचे जीवन, १९२० पासून आजतागायत अत्यंत कर्तृत्व, धडाडी, देशसेवा, समाजसेवा आणि त्यागाने भरलेले आहे. (गेली सुमारे पंचावन-छप्पन वर्षे त्या उमरावतीच्या राजकीय व सार्वजनिक जीवनात स्त्रीवर्गाचे त्यागनिष्ठेने सतत प्रतिनिधित्व करीत आहेत. हल्ली कुष्ट रोग्यांची सेवा करतात.)

काही कार्यकर्त्या भगिनी : सौ. ताराबाई मोडक ह्या उमरावतीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'शिक्षण-पत्रिका' या मासिकाच्या संपादक होत्या. उमरावतीच्या पहिल्या स्त्री-संपादक म्हणून त्यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी मुलीसाठी एक शाळाही चालविली होती. पुढे त्यांनी बालशिक्षण तज्ज्ञ म्हणून मोठे नाव कमावले आहे. डहाणू जवळील कोसवाड येथे राहून त्यांनी आदीवासीतही काम केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रपतींनी त्यांचे कार्याचा गौरव करून त्यांना 'पद्मश्री' पदवी दिली आहे.

त्याचप्रमाणे सार्वजनिक-सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या सौ. ताराबाई रणदिवे, सौ. विमलाबाई देशपांडे एम्. ए. ह्या १९३२ साली नागपूर विद्यापीठ कोर्टावर निवडून गेल्या होत्या. युवक संघाचे कार्यात व १९३२ साली हरीजनोद्धाराचे प्रश्नावर गांधीजींनी प्राणांतिक उपोषण सुरू केले होते त्या काळात, उमरावतीत हरीजन-मंदिर-प्रवेशासाठी जे आंदोलन झाले त्याच्या प्रचार मोहिमेत त्यांनी धडाडीने भाग घेतला होता.

याच काळात सौ. सावित्रीबाई भट यांच्या अध्यक्षतेखाली हरीजनांना मंदिर-प्रवेश मिळावा म्हणून उमरावतीतील स्त्रियांची एक जाहीर सभा ब्रम्हविद्या मंदिरात दि. २० सप्टेंबर १९३२ रोजी भरली होती.

याच काळात उमरावती जिल्हा महिला परिषद सौ. मथुराबाई द्रवीड यांच्या अध्यक्षतेखाली गणेश थिएटर मध्ये भरून अनेक सामाजिक स्वरूपाचे ठराव करण्यात आले होते.

स्पृश्यास्पृश्य सहभोजनात स्त्रियांचा भाग.

दि. ८ ऑक्टोबर १९३२ रोजी आर्यसमाज मंदिरात स्पृश्यास्पृश्य सहभोजनाचा कार्यक्रम झाला. त्यांत सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, सौ. सुशीलाबाई सबनीस, सौ. सरलाबाई चौबळ, सौ. रुक्माबाई व सौ. केशरबाई गवई[१] या स्पृश्य-अस्पृश्य भगिनींनी भाग घेतला होता.

अस्पृश्य महिलांची सुधारणा व्हावी यासाठी सौ. ताराबाई रणदिवे, सौ. गंगूताई भोळे व सौ. लक्ष्मीबाई नाईक[२] यांनी हरीजन मोहोल्ल्यात जाऊन तेथील स्त्री-वर्गांच्या सभा भरवून त्यांचेत जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता.

इ. स. १९३१-३२ नंतरच उमरावतीच्या स्त्रीवर्गाने, हिंदु स्त्रियांचे हक्क व त्यांत सुधारणा, सार्वत्रिक मतदानाचा हक्क व स्त्री-पुरुष समानतेचा हक्क, विधवा स्त्रियांचा वारसा-हक्क, अस्पृश्योद्धार या सारख्या आपल्या हक्कांचा व सामाजिक सुधारणांचा विचार सुरू केला होता व धीटपणे जाहीर रीतीने त्या आपल्या हक्कांची व सामाजिक परिवर्तनाची मागणी करू लागल्या होत्या असे दिसून येते.

या प्रमाणे उमरावतीतील स्त्री-जीवनाची वाटचाल उपलब्ध माहितीचे आधारे वर दिली आहे. परंपरागत रूढी आणि चूल व मूल एवढेच कार्यक्षेत्र माननाऱ्या स्त्रीवर्गाने या चौकटीतून बाहेर पडून, प्रथम समाजसेवा (शैक्षणिक व महिलांचे उद्योग वगैरे) नंतर राजकीय क्षेत्रात आणि त्यानंतर सामाजिक क्षेत्रात प्रवेश केला व स्वतःच्या हक्कांचा पुकारा केला असे दिसून येते. आज सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी प्रवेश केलेला असला तरी, ८० वर्षांपूर्वी स्त्रियांना सार्वजनिक कार्यात भाग घेण्याची किंवा आपल्या सामाजिक हक्कासाठी तोंड उघडण्याची मनाई, तत्कालीन नियम-धर्माने त्यांचेवर लादली होती. खुद्द स्त्रियाही असेच मानीत की, ज्ञान मिळविण्याचा किंवा स्त्रियांनाही पुरुषासारख्याच भावना आहेत हे

---

१ : सौ. केशरबाई गवई ह्या श्री. नानासाहेब गवई यांच्या पत्नी व कमिश्नर श्री. गवई यांच्या मातोश्री होत.

२ : सौ. लक्ष्मीबाई नाईक ह्या अस्पृश्य वर्गाच्या प्राथमिक शाळा शिक्षिका होत्या व सामाजिक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध होत्या.

सांगण्याचा त्यांना अधिकार नाही. समाजानेही हे अलिखित कायदे मानून तसे वागणे आपला धर्म आहे असा दृढ समज करून घेतला होता. अव्वल इंग्रजी राजवटीत पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्काने या जुन्या कल्पना बदलू लागल्या तरी नवी समाज व्यवस्था किंवा सुधारणा प्रत्यक्षात यायला पाऊण शतकाचा काळ जावा लागला असे दिसून येते.

उमरावतीच्या १९३२ पावेतोच्या स्त्री संस्था.

१	वनिता समाज,	स्थापना	१८९५
२	महिला समाज,	स्थापना	१९२१
३	देशसेविका संघ,	स्थापना	१९३०
४	विदर्भ महिला परिषद,	स्थापना	१९३१

उमरावतीतील स्त्री–जीवनाची इ. सन १९३२ पावेतोची संक्षिप्त माहिती आणि प्रगती वर दिली आहे.

याशिवाय महिलांच्या विविध संस्था व त्यांच्या कार्याची माहिती याच ग्रंथाच्या पहिल्या भागातील प्रकरण ५ मध्ये (१९१४) व १९२० नंतरची माहिती दुसऱ्या व तिसऱ्या भागात त्या त्या वर्षात दिलेली आहे, ती पहावी. (वनिता समाजाचा १९३० चा अहवाल, १९३१ या वर्षाच्या शेवटी परिशिष्ट २ वर, महिला समाजाचा १९३१ पावेतोचा अहवाल १९३१ या वर्षाच्या शेवटी परिशिष्ट १ वर आणि महिला परिषदेची एक वर्षाची कामगिरी १९३२ या वर्षाचे माहितीत दिलेली आहे.)

परिशिष्ट क्रमांक–११

उमरावतीतील स्त्रिया व मुलांच्या रोगोपचारांचे पहिले हॉस्पिटल.

हल्ली राज्य सरकार मार्फत चालविले जाणारे 'जिल्हा स्त्री रुग्णालय' या नावाचे हॉस्पिटल श्रीकृष्ण पेठेनजीक किंवा कला निकेतन (पूर्वीचे बेरार व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्यूट) चे मागे असून ते सर्वज्ञात आहे.

या रुग्णालयाचे मूळ नाव 'लेडी डफरिन हॉस्पिटल फॉर वुईमेन ॲन्ड चिल्ड्रेन' असे होते व हे हॉस्पिटल इ. स. १८९५ ते ३१ जुलै १९३९ म्हणजे सुमारे ४४ वर्षे पावेतो, अंबागेटचे बाहेर, गांधी चौकाचे नजीक (बलवंत मोटार कंपनीचे ऑफिस आहे त्या ठिकाणी) होते व सुमारे ४ एकर जागेवर या हॉस्पिटलचा व्याप पसरलेला होता. उमरावतीत स्त्रिया व मुले यांच्या रोगोपचारासाठी सार्वजनिक स्वरूपाचे सुरू झालेले हेच पहिले हॉस्पिटल होय.

हे हॉस्पिटल अमरावतीत सुरू करण्याचे संपूर्ण श्रेय लेडी डफरिन (काउंटेस ऑफ् डफरिन) यांच्या मानवतावादी वृत्तीलाच द्यावे लागेल. लेडी डफरिन ह्या इ. स. १८८४ ते इ. स. १८८८ या काळातील हिंदुस्थानचे गव्हर्नरजनरल व व्हाइसराय लॉर्ड डफरिन (पुढे 'मार्क्विस ऑफ् डफरिन आणि आव्हा×) यांच्या पत्नी होत. अखिल भारतातील स्त्रिया व मुले यांच्या कल्याणाच्या योजना त्यांनी आखल्या.

लेडी डफरिन ह्या स्त्रिया आणि मुले यांच्या कल्याणाचे (वेलफेअर) कार्यात बराच रस घेत असत आणि त्यामुळेच त्यांच्या प्रेरणेने 'काउंटेस ऑफ डफरिन फंड ' इ. स. १८८३–८४ मध्ये संपूर्ण हिंदुस्थानात सुरू करण्यात आला होता. वऱ्हाडात हा फंड गोळा करण्यासाठी, वऱ्हाडचे कमिश्नर मार्फत प्रत्येक जिल्ह्याच्या डेप्युटी कमिश्नरांना जरूर त्या सूचना देण्यात येऊन, जिल्हा समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या.

उमरावती जिल्ह्याची ' काउंटेस ऑफ डफरिन फंड, जिल्हा समिती ' स्थापन करण्यासाठी, दि. १५ मे १८८८ रोजी, उमरावतीचे तत्कालिन डेप्युटी

× ही पदवी त्यांना महाराणीच्या सुवर्णमहोत्सवाचे वेळी देण्यात आली. 'आव्हा' हा आसाममधील एक प्रांत आहे.

कमिश्नर मि. बुलक यांच्या अध्यक्षतेखाली २० लोकांची एक जिल्हा समिती निवडण्यात आली होती. तींत उमरावतीचे श्री. आर. एन्. मुधोळकर वकील, श्री. बाळकृष्ण पेंडके, श्री. एकनाथ लक्ष्मण वकील, श्री. यशवंत गोविंद केसकर, संपादक प्रमोद–सिंधु व श्री. दोराबजी कासवजी हे प्रमुख गृहस्थ होते.

या जिल्हा कमेटीचे निर्णयानुसार खुद्द अमरावती शहरासाठी एक डफरिन फंड कमेटी नेमण्यात आली होती. तीत खालील लोक होते.

सर्वश्री नबाब फतेअली, बहिरुद्दीन जेठमल बँकर, बाळकृष्ण पेंडके, भवानभाई हेमचंद, केवलचंद, गंभीरचंद, खान मुसा, मणिराम, जाफरजी, तय्यबअली चौधरी, मणिलाल बन्सी, विठ्ठलदास भाटिया, बलवंत त्र्यंबक वकील, कोंडो बालाजी वकील, नगरपालिकेचे सेक्रेटरी विष्णू हरि, रावजी हंबर्डे, गिरिराव तहसिलदार, मुधोळकर वकील, मोरोपंत जोशी वकील, जोग वकील, केतकर वकील, अंताजी गोविंद वकील.

या कमेटया मार्फत जिल्हयातून व उमरावती शहरातून काउंटेस ऑफ डफरिन फंडा' साठी रकम गोळा करण्यात येऊन, उमरावती येथे 'डफरिन हॉस्पिटल फॉर वुईमेन ॲन्ड चिल्ड्रेन' या नावाने हॉस्पिटल बांधण्याचे ठरले. या फंडाला उमरावती नगर पालिकेने एक हजार रुपयाची देणगी दिली व हे हॉस्पिटल अंबागेटचे बाहेर, जेथे उमरावतीचा धान्य बाजार भरतो+ तेथे बांधावे असे सुचविले.

उमरावती नगरपालिकेची ही सूचना मान्य झाली व नगरपालिकेने ती सुमारे चार एकर जागा हॉस्पिटलसाठी उपलब्ध करून दिली. तेथे या हॉस्पिटलच्या इमारती इ. स. १८९५ साली बांधून पूर्ण झाल्या आणि हॉस्पिटल सुरू झाले.

त्या काळी शहराची मुख्य वस्ती परकोटाचे आतच होती. परकोटाबाहेर तुळरक इमारती, मैदान व झाडे होती. खास स्त्रिया व मुले यांच्या उपचारासाठी अंबागेटचे लगत बांधलेल्या या हॉस्पिटलचा उपयोग शहरातील स्त्रिया आणि मुले यांना चांगला होऊ लागला होता.

+ इ. स. १८९३ पूर्वी उमरावतीचा धान्य बाजार हल्लीच्या जुन्या मोटार स्टँड चे समोरील त्यावेळच्या मोकळचा जागेत भरत असे.

हे हॉस्पिटल 'काउंटेस ऑफ डफरिन फंड कमेटी' बेरार, ब्रँच, या कमेटीच्या नियंत्रणाखाली चालविले जात असे. या कमेटीचे अध्यक्ष वऱ्हाडचे कमिश्नर (अधिकारपरत्वे) असून, एकूण १४ लोक सभासद असत आणि कमिश्नरांचा सुपरीन्टेन्डेंट हाच या कमेटीचा ऑनररी सेक्रेटरी राही. इ. स. १९२८ पावेतो ही व्यवस्था कायम होती. इ. स. १९२८ मध्ये श्री. एफ्. जे. फोर्ड या नावाचे एक अँग्लो इंडियन गृहस्थ या कमेटीत मानद सचिव होते.

त्यानंतर इ. स. १९२९ साली 'काऊंटेस ऑफ डफरिन फंड कमेटी' बेरार ब्रँचचे मानद सचिव पदावर उमरावतीचे रा. ब. आर. एम्. खरे वकील यांची निवड झाली व ते या कमेटीचे आणि डफरिन हॉस्पिटलचे इ. स. १९५५ पावेतो सतत मानद सचिव राहिले (नंतर १९५५ ते १९७५ पावेतो ते डफरिन फंड, बेरार ब्रँचचे मानद सचिव राहिले आणि डफरिन हॉस्पिटल कमेटीचे उपाध्यक्ष म्हणून इ. स. १९५५ पासून आजतागायत आहेतच. या प्रमाणे गेली ४८ वर्षे त्यांचा या हॉस्पिटलशी व फंडाशी सतत संबंध राहिला असून त्यांच्या सार्वजनिक कार्याचा हा आदर्श मानावा लागेल.)

रा. ब. खरे यांचे कारकिर्दीतच या लेडी डफरिन हॉस्पिटलचे अंतर्गत व्यवस्थेत बऱ्याच सुधारणा झाल्या. त्यांनीच हॉस्पिटलच्या कामकाजासंबंधी एक नियमावली तयार करून ती १९३३ साली लागू केली होती व पुस्तक रूपाने प्रसिद्ध केली. या नियमावलीने अखिल भारतातील रूग्णालयांनाही मार्गदर्शन केले होते. भारतातील अनेक रुग्णालयाकडून या पुस्तकाची मागणी झाली.

इ. स. १९३३ नंतर या हॉस्पिटलचा व्याप बराच वाढला आणि ही जागा कमी पडू लागली. त्यासाठी डफरिन फंड कमेटीने तत्कालिन मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारकडे सुमारे २० एकर जागेची मागणी केली व सरकारने या हॉस्पिटलसाठी बेरार व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटचूटचे मागील २० एकर जागा विनामूल्य कमेटीस दिली.

जागेची व्यवस्था या प्रमाणे झाली पण त्या जागेवर इमारती बांधण्यासाठी पुन्हा पैशाचा प्रश्न उभा राहिला. तेव्हा निरनिराळ्या व्यक्ती व संस्थांकडून या कामासाठी खालील प्रमाणे देणग्या मिळाल्या होत्या.

१	काऊंटेस ऑफ डफरिन सेंट्रल फंड, दिल्ली.	रु. ५०,०००
२	मध्यप्रांत – वऱ्हाड सरकार (किंग्ज जार्ज पंचम, ज्युबिली मेमोरियल फंडातून.)	रु. ५०,०००
३	निजाम ऑफ हैद्राबाद.	रु. २०,०००
४	सेठ लक्ष्मीनिवास, जहागिरदार, वलगाव (ऑपरेशन-थिएटरसाठी, लेडी गोवन यांचे स्मरणार्थ.)	रु. ५,०००
५	अमरावती नगरपालिका, अमरावती.	रु. २,५००
६	अमरावती जिल्हा बोर्ड.	रु. २,५००

या शिवाय, जुने डफरिन हॉस्पिटल ज्या जागेवर होते त्या जागेचे प्लॉटस् पाडून ते विकण्यात आले व त्यातून सुमारे दीड लक्ष रुपये मिळाले.

अशा रीतीने सुमारे तीन लक्ष रुपये खर्चून नव्या जागेवर, हॉस्पिटलला सोयीस्कर अशा इमारती बांधण्यात आल्या व दि. १ ऑगस्ट १९३९ पासून लेडी डफरिन हॉस्पिटल या नव्या प्रशस्त जागेत सुरू करण्यात आले.

या नव्या हॉस्पिटलला इमारतीचे नकाशे आणि खर्चाचे अंदाजपत्रक, त्यावेळचे जिल्हा लोकल बोर्डाचे इंजिनियर रायसाहेब चॅटर्जी यांनी कोणत ही मोबदला न घेता करून दिले होते. इतकेच नव्हे तर, या इमारतीची बांधकामे सुमारे सात आठ वर्षे चालू होती. त्या बांधकामावर रायसाहेब चॅटर्जी यांनी जातीने देखरेख केली. त्याचाही मोबदला त्यांनी घेतला नाही.

इ. स. १९४८ साली कमिश्नरची जागा रद्द करण्यात आली. तेव्हा कलेक्टर, उमरावती यांची (१) डफरिन हॉस्पिटल व (२) काउंटेस ऑफ डफरिन फंड, बेरार ब्रँच कमेटीवर अधिकारपरत्वे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. ही व्यवस्था इ. स. १९५५ पावेतो होती. इ. स. १९५५ मध्ये लेडी डफरिन हॉस्पिटल हे प्रांतिक सरकारने आपल्या नियंत्रणाखाली घेऊन, पुढे या हॉस्पिटलचे 'लेडी डफरिन हॉस्पिटल' हे जुने नाव बदलवून त्या ऐवजी 'जिल्हा स्त्री रुग्णालय' (District Hospital For Wemen,

Amravati) असे नामकरण करण्यात आले. त्याच नावाने हे हॉस्पिटल आज चालू आहे+

स्त्रिया व मुलांसाठी उमरावतीत इ. सन १८९५ साली सुरू करण्यात आलेले हे पहिले हॉस्पिटल होय.

परिशिष्ट क्र. – १२

श्री लक्ष्मीनारायण मंदिर

उमरावतीत भाजीबाजार विभागातील प्रख्यात श्री लक्ष्मीनारायण मंदिराचे स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. श्री नारायण मंदिर, त्या समोरील सभामंडप व सभोवारच्या पडव्या आहेत ती सर्व जागा (दोन घरे) श्री. नागोबा कोंडबा शेठ यांची होती व ती घरे केवले सावकाराचे त्यांचेवर असलेले कर्ज व काही नगदी रकम देऊन केवले सावकारांनी इ. स. १८७५ साली खरेदी केली आणि केवले सावकारांनी ती संपूर्ण जागा (घरे) श्री. विठ्ठलानंद सरस्वती यांना मंदिर बांधण्यासाठी अर्पण केली, असे तत्कालिन दस्तऐवजावरून दिसून येते. त्या जागेवरच हल्लीचे नारायण मंदिर, विठ्ठलानंदाचे दुसरे एक शिष्य श्री. मोतीरामजी भिवापूरकर यांनी बांधून दिले अशीही माहिती मिळते. यावरून श्री लक्ष्मीनारायण मंदिर इ. स. १८७५ ते १८७७ चे दरम्यान बांधून पूर्ण झाले व तेथे श्रीनारायण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली गेली असे स्पष्ट दिसते.

जुने विठ्ठल–रुकमाईचे मंदिर : या लक्ष्मीनारायण मंदिराचे आवारातच उत्तरेचे बाजूने श्री विठ्ठल–रुकमाईचे मंदिर आहे व त्या समोरच श्री विठ्ठलानंद

+ आधार : १ : उमरावती नगरपालिकेतील जुने रेकॉर्ड (डफरिन हॉस्पिटल, १८८३ ते १८९७)

२ : रा. ब. खरे, ॲडव्होकेट, ओ. बी. इ. मानद सचिव, ऑफ डफरिन फंड, यांचा दि. २५ एप्रील १९७५ चा रिपोर्ट

३ : उदय दि. १ व ४ ऑगस्ट १९३९

चित्र क्र. १८८ : कै. श्री हरिश्चंद्र पाटील, तारखेडा. (पृष्ठ ८८१ पहा)



चित्र क्र. १८९ : शासकीय मराठी नॉर्मल स्कूल (पुरुषांचे) वलगांव रोड, अमरावती.



चित्र क्र. १९० : नॉर्मल स्कूलचे प्रिंसिपॉल
श्री शिवराम हरि उर्फ दादासाहेब गोखले, एम्. ए.

चित्र क्र. १९१ : (पृष्ठ ८९१ पहा)
नॉर्मल स्कूलचे प्रिंसिपॉल
रा. रा. वामन रघुनाथ जे.शी.

चित्र क्र. १९२ : नॉर्मल स्कूलचे प्रिंसिपॉल (पृष्ठ ८९१ पहा)
श्री दामोदर केशव ओक, बी. ए.

सरस्वती यांची समाधी आहे. हे श्री विठ्ठल-रुखमाईचे मंदिर सुमारे दीडशे वर्षे एवढे जुने असावे. कारण सप्टेंबर १८७९ इसवीमध्ये या विठ्ठल रुखमाई मंदिराचे मालक श्री. सीताराम रघुनाथ नंदगवळी, आडनाव भगत यांनी एक करारनामा करून हे विठ्ठल रुखमाई मंदिर, श्री. मोतीरामजी भिवापूरकर, श्री बाळकृष्ण बापूजी केवले, श्री. बाळकृष्ण जयराम पेंडके, श्री. देवजी व।। रामसा तेली सराफ व श्री. विठ्ठलसा राघोसा खत्री बजाज या पंचांचे स्वाधीन केले होते. त्या करारनाम्यात श्री. सीताराम भगत म्हणतात.

"येथे माझे वडिलांनी म्हणजे रघुनाथ यांनी, श्री विठ्ठल रुखमाईचे देऊळ, पुनसा लाड यांचे घराजवळ ..... स्थापन केले तेव्हापासून, देवस्थानची मालकी माझे बापाकडे व त्यांचे मृत्यूनंतर माझेकडे आहे ..... हल्ली देवालय मोडकळीस आले असून, काही इमारत पडली व राहिली इमारत पडण्यासारखी झाली. ती दुरुस्त करण्यास मजला शक्ती नसल्यामुळे मी तुम्हा पंच लोकांस सदरहू देवस्थानची मुखत्यारी लिहून देतो व देवालयावरील माझा हक्क सोडतो. यावरून हे विठ्ठल रुखमाईचे मंदिर इ. सन १८७९ पूर्वी किमान ४०-५० वर्षे अगोदर तरी बांधले गेले असावे. म्हणजे ते इ. स. १८३० चे आसपास बांधलेले असावे.

वरील पंच मंडळी ही श्री विठ्ठलानंद सरस्वती यांची भक्त आणि श्री नारायण मंदिराची व्यवस्थापक मंडळी असल्याने, इ. स. १८७९ साली वर उल्लेखिलेले विठ्ठल रुखमाई मंदिर व त्यावेळी नवे बांधलेले श्री नारायण मंदिर ही दोन्ही मंदिरे एकाच व्यवस्थेखाली आलित व विठ्ठलानंद सरस्वती या मंदिरात वास्तव्य करू लागले असावेत असे एकूण माहितीवरून अनुमान निघते.

श्री विठ्ठलगीरबोवा उर्फ विठ्ठलानंद सरस्वती.

इ. स. १८५७ च्या देशव्यापी बंडानंतर, अंदाजे १८६०-६२ चे आसपास, श्री विठ्ठलगीरबोवा (पुढे विठ्ठलानंद सरस्वती) हे, आळंदीचे स्वामी म्हणून प्रसिद्धिला आलेले श्री नृसिंह सरस्वती यांचे सोबत गाविलगडच्या बंदिवासातून, उमरावतीस आले तेव्हा, स्वामींनी विठ्ठलगीर बोवांना, हल्ली नारायण मंदिर आहे त्याचे समोरच घोडयावरून उतरवून दिले व या परिसरात राहण्याचा आदेश दिला होता. (ती हकीकत

फोटोसह याच ग्रंथाच्या पहिल्या भागातील पृष्ठ १८१ वर आलेली आहे ती पहावी.) तेव्हा पासून विठ्ठलगीरबोवा हे उमरावतीच्या या परिसरात रहात असावेत आणि नंतर विठ्ठलगीर बोवांची भेट रेवशाचे (उमरावतीतील श्री मुरलीधर मंदिराचे) ब्रम्हचारी महाराज म्हणून प्रख्यात असलेल्या साधू पुरूषाशी होऊन, त्यांचे सल्ल्यानुसारच विठ्ठलगीरबोवा हे खारतळेगावच्या श्री दत्तमंदिरात वास्तव्य करू लागले असावेत.

पुढे इ स. १८७२–७३ चे आसपास पंढरपूर मुक्कामी विठ्ठलगीर बोवांची उमरावतीचे केवले सावकार यांची भेट झाली व केवले सावकार हे विठ्ठलगीरबोवांचे भक्त बनले व त्यांनी विठ्ठलगीरबोवांना उमरावतीस राहण्याचा आग्रह केला पण 'सन्यासी पुरुष कोणाचे घरी राहणार नाही' असे म्हटले वरून केवले सावकारांनी वर सुरुवातीस नमूद केले प्रमाणे श्री. नागोबा कोंडबा शेठ यांची दोन घरे जी कर्जात होती, ती विकत घेऊन विठ्ठलगीरबोवांना मंदिर बांधण्यासाठी अर्पण केली आणि त्या जागेवर श्री मोतीरामजी भिवापूरकर यांनी नारायण मंदिर बांधून दिले. तेव्हापासून विठ्ठलगीरबोवा उर्फ विठ्ठलानंद सरस्वती यांचे मुख्य वास्तव्य या नारायण मंदिरात होऊ लागले असे दिसून येते.

विठ्ठलगीरबोवा हे खारतळेगावला दत्तमंदिरात राहू लागले तेव्हापासूनच ते पंढरीचे यात्रेला दरवर्षी आषाढी एकादशीस जात असावेत पण ते पहिल्याने आळंदीस जात. कारण गाविलगडचे किल्ल्याचे बंदिवासातून त्यांना सोडवून उमरावतीस आणणारे आळंदीचे स्वामी नृसिंह सरस्वती हे त्यावेळी आळंदीस असत.

त्या नंतर पंढरीला केवले सावकारांशी भेट व त्यांचे सोबत उमरावतीस येणे, नारायण मंदिराची निर्मिती वगैरे माहिती वर दिली आहेच.

पंढरीला नारायण मंदिराची पालखी : इ. सन १८७६–७७ चे आसपास नारायण मंदिर बांधून पूर्ण झाल्यानंतर येथून नारायण मंदिराची पालखी पायी बडनेरला व तेथून रेल्वेने आळंदीला (पुण्याला) आणि तेथून ज्ञानोबांच्या पालखी सोबत पायी पंढरीला जाऊ लागली होती. सोबत ५०–६० लोक असत. अर्पण परत आळंदीपर्यंत पायी व तेथून रेल्वेने बडनेरापर्यंत या प्रमाणे पालखी सुरु झाली. पालखी पंढरीहून परत

आली म्हणजे त्यासाठी बडनेरला रेल्वेवर केवले सावकारांच्या बैलगाड्या जात. त्यांतूनच विठ्ठलानंद सरस्वती उमरावतीस येऊन एक दिवस केवले सावकारांकडे मुक्काम करीत व दुसरे दिवशी मंदिरात जात. असा क्रम सतत सुरू होता, असे मिळालेल्या माहिती वरून दिसते.

नारायण मंदिराची ही पालखी पंढरीस नेण्याची प्रथा विठ्ठलानंदांनीच सुरु केली असावी असे दिसते.

पंढरपुरास ठिकठिकाणाहून आषाढी एकादशीसाठी दरवर्षी ज्या पालख्या येतात, त्यांची जी यादी तेथे आहे तींत 'शेष नारायणाची पालखी उमरावती' असे नमूद आहे. यावरुन हल्लीचे लक्ष्मीनारायण मंदिर हे मुळात शेष नारायण मंदिर असावे व मागाहून लक्ष्मीची मूर्ती बसविण्यात आल्याने या मंदिराला श्री लक्ष्मीनारायण मंदिर असे संबोधल्या जाऊं लागले असावे.

उपलब्ध माहितीचे आधारे, ही पंढरीस जाणारी शेषनारायणाची पालखी, उमरावतीतून पंढरीस जाणारी पहिली पालखी होय. आजही लक्ष्मीनारायण मंदिराची (पादुकांची) पालखी दरवर्षी आषाढी एकादशी साठी पंढरीस जाते. ह्या पादुका परंपरेनुसार रेल्वेने आळंदीस नेण्यात येतात व तेथून श्री ज्ञानेशांचे पालखी सोबत पंढरीस पायी नेल्या जातात[१]. आळंदीला लक्ष्मीनारायण संस्थानचे तंबू डेरे वगैरे आहेत. ते पंढरपुरास या पालखी सोबतच नेतात व येताना परत तंबू वगैरे सामान आळंदीस आणून ठेवण्यात येते व पादुका रेल्वेने उमरावतीस परत आणल्या जातात. पालखीत विठ्ठलानंदाच्या पादुका नेण्याची प्रथा, विठ्ठलानंदाचे स्वर्गवासानंतर अंदाजे इ. स. १८९३ नंतर[२] सुरू झाली असे दिसते.

विठ्ठलानंदाचे स्वर्गवासानंतर त्यांचे शिष्य दयानंद गुरू विठ्ठलानंद हे गादीवर आले. त्यांचा मृत्यू इ. स. १९१७ साली झाल्याने त्यांचे शिष्य दयानंद गुरु नित्यानंद हे १९१७ साली गादीवर आले. नित्यानंदांनी मृत्यूपूर्वी दि. १४ ऑगष्ट १९१७ रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले होते. त्यानुसार दयानंदांना गादी मिळाली होती.

---

१ : पंढरीला आषाढी यात्रेसाठी पायी पालख्या नेण्याची प्रथा इ. सन १८३६ पूर्वी सुरु झाली. (पालखी सोहळा : नेऊरगावकर : १९७२ : पृ. १०, २९, ३०)

२ : ॲडि, डिस्ट्रिक्ट जज्ज, उमरावती यांचे कोर्टातील प्रकरण क्र. ५३ ऑफ १९२८, निकाल दि. १२-३-१९३०

श्री लक्ष्मीनारायण संस्थान : वर म्हटले प्रमाणे इ. स. १८७५ साली श्री विठ्ठलानंद सरस्वती व त्यांचे भक्तगणांनी, श्री विठ्ठल रुखमाई मंदिरालगतची दोन घरे श्री. नागोबा कोंडबा सेठ यांचे कडून विकत घेतल्यानंतर तेथे श्री नारायणाचे मंदिर, सुंदर सभामंडप आणि सभोवार ओसऱ्या बांधल्या. त्यामुळे येथील मूळ विठ्ठल–मंदिराचे महत्त्व घटून श्री नारायण मंदिराचे नाव सर्वतोमुखी चालू झाले आणि विठ्ठल रुखमाईचे जुने मंदिराची अवस्था उपमंदिरासारखी झाली.

कार्तिक सोहळा : श्री लक्ष्मीनारायण मंदिरात दरवर्षी कार्तिकी एकादशीचा सोहळा पूर्वी फार मोठ्या प्रमाणात साजरा होत असे. अनेक खेड्या–पाड्यातून दिंड्या येत आणि नारायणाची पालखी–भव्य रथ शहराच्या मुख्य मार्गांनी फिरून मंदिरात येत असे. त्यावेळी शहरातील या पालखीचे मार्गावर गावातील तरुण मंडळी पाणी वगैरे टाकून रांगोळ्या काढीत आणि पालखीचे मार्गावर दर्शनासाठी लोक गर्दी करीत. उमरावतीत पंढरीच्या उत्सवाचे स्मरण व्हावे अशा थाटाने हा सोहळा होत असे. नंतर दहीहांडी व मोठ्या प्रमाणात अन्नदान होई. आता तसा थाट राहिला नाही. परंतु वहिवाटीप्रमाणे पालखी–रथ निघतो. उत्सवही केला जातो.

श्री महादेव मंदिर : श्री लक्ष्मीनारायणाच्या मंदिराचे गाभाऱ्यालगतच दक्षिणेकडे जो दुसरा गाभारा आहे, तेथील श्री महादेवाची स्थापना इ. सन १८८६ ते १८८८ चे दरम्यान श्री. मोतीरामजी भिवापूरकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली अशी माहिती मिळते.

या प्रमाणे तीन मंदिरांचा हा समुह आज श्री लक्ष्मीनारायण संस्थान, भाजीबाजार, या नावाने प्रसिद्ध असून हल्ली या मंदिराचे सरपंच श्री. बाबूशेठ भिवापूरकर आणि त्यांचे सहकारी हे संस्थानचा कारभार उत्तम प्रकारे करीत आहेत. संस्थानचे उत्पन्नातही वाढ झाली आहे. वर्षभरात अनेक कीर्तने, पुराण वगैरे धार्मिक कार्यक्रम येथे चालूच असतात.

एक शतक पूर्ण केलेले भाजीबाजारातील उमरावतीचे हे श्री लक्ष्मीनारायण मंदिर नगरातील भाविक स्त्री पुरुषांचे महत्वाचे पूजास्थान आहे.+

+ आचार्य त्र्यंबक गुरुजी यांनी संकलित केलेल्या माहितीचे व सेटलमेंट रेकार्डचे आधारे.

परिशिष्ट क्र.–१३

कै. श्री. हरीश्चंद्र पाटील यांचा 'गणपती'

उमरावतीस होणाऱ्या दर वर्षीचे गणेशोत्सवात तारखेडा येथील श्री. हरीश्चंद्र पाटील यांचा गणपती फार जुना व प्रख्यात असून, ही गणपतीची मूर्ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत माणसाइतक्या उंचीची (सुमारे साडेपाच फूट उंच) असते. ही मूर्ती या पाटील घराण्यातील लोक स्वतःच तयार करतात. मूर्ती अतिशय सुंदर, भव्य आणि पाहणारांना मंगलमय अशीच भासते. या गणपतीचे दर्शनासाठी व मूर्ती पाहण्यासाठी दरवर्षी गणेशोत्सवाचे काळात लोकांची गर्दी होते. हा गणेशोत्सव पूर्णपणे खाजगी असून, या पाटील घराण्यातील लोक हा उत्सव स्वखर्चाने साजरा करितात. हा गणेशोत्सव आणि स्वहस्ते मूर्ती तयार करण्याची ही प्रथा या घराण्यात गेली सुमारे तिनशे वर्षांपासून अव्याहत सुरू आहे असे कुटुंब प्रमुख सांगतात.

तारखेडा हा हल्ली उमरावतीचा एक मोहल्ला गणल्या जातो. परंतु तारखेडा हे एक स्वतंत्र गाव असून त्या गावची पोलीस मुलकी पाटीलकी कै. हरीश्चंद्र पाटील यांचे पूर्वजापासून या घराण्यात चालू आहे.

अशा या घराण्यातील कै. हरीश्चंद्र पाटील यांचे एक पूर्वज, (त्यांचे पणजोबा श्री. प्रितमजी पाटील यांचे वडील) श्री. विक्रमजी पाटील यांच्या पासून ही गणेशोत्सवाची प्रथा त्यांचे घराण्यात सुरू झाली व ती परंपरा आज तागायत कायम आहे.

ही प्रथा सुरू करण्याचे कारण असे घडले की, श्री. विक्रमजी पाटील यांचे गुरु ह. भ. प. श्री मुनी महाराज म्हणून एक सन्यासी सत्पुरुष होते व ते निःसीम गणपतीचे उपासक असून, पाटलांच्या वाडयातच एका लहानशा खोलीत राहत असत आणि ध्यान–धारणा–पूजा–अर्चा करीत असत. ते दरवर्षी गणेश चतुर्थीचे वेळी दहा दिवस गणपतीचा उत्सवहि साजरा करीत. या उत्सवासाठी जी मूर्ती तयार करायची ती, कुमाराकडून माती आणून मुनी महाराज स्वतःच्या हातानेच (दीड दोन फूट उंचीची) तयार करीत आणि तीस शेंदूराची उटी लावून नंतर दहा दिवस त्या मूर्तीची पूजा अर्चा करीत. दहा दिवस भजन वगैरे धार्मिक कार्यक्रमही होत असे. तसेच पणत्यांची रोषणाई केली जात असे.

नंतर अनंत चतुर्दशीला पूजा आरती होऊन भजनी मंडळीसह आदल्या वर्षीच्या मूर्तीची विसर्जनाची मिरवणूक वाजत गाजत वलगाव रोडवरील कल्लाबाबाचे विहिरीपर्यंत नेण्यात येई व तेथे मूर्ती विसर्जीत करीत. मुनी महाराजांचा हा कित्येक वर्षे क्रम होता.

पुढे श्री मुनी महाराजांचा अंतःकाळ जवळ आला तेव्हा त्यांनी विक्रमजी पाटलांना सांगितले की, 'आता माझा अंतःकाळ जवळ आला आहे. आता यापुढे माझे गणपतीचे हे व्रत असेच तुम्ही वंशपरंपरेने चालू ठेवावे. मूर्ती स्वहस्तेच करीत जावी आणि माझी समाधी गणपतीचे समोरच द्यावी.' त्याप्रमाणे मुनी महाराज लौकरच समाधिस्थ झाले. त्यांची समाधी त्यांचे इच्छेप्रमाणे करण्यात आली ती आजही गणपतीमूर्तीसमोर आहे.

मुनी महाराजांचे आज्ञेनुसार विक्रमजी पाटलांनी हा गणेशोत्सव सुरू केला. ते दरवर्षी हातानेच मातीची मूर्ती करीत व त्या मूर्तीस शेंदूर लावून दहा दिवस हा उत्सव केला जाई. आदल्या वर्षीची मूर्ती शिरवीत असत. याप्रमाणे विक्रमजी पाटलापासून या पाटील घराण्यात गणेशोत्सवाची ही प्रथा सुरू झाली. त्यांनी आपल्या वाडयातच गणपतीसाठी मंदिर बांधले. तेव्हापासून स्वखर्चाने हा गणेशोत्सव या पाटील घराण्याने सुरू केला.

श्री. विक्रमजी पाटलांचे नंतर त्यांचे पुत्र श्री. प्रितमजी पाटील व त्यांचे पुत्र श्री. नारायणजी पाटील व नंतर त्यांचे पुत्र श्री. हरीश्चंद्र पाटील याप्रमाणे वंशपरंपरेने हा गणेशोत्सव दरवर्षी ठरलेल्या धार्मिक पद्धतीने साजरा करीत. मूर्ती स्वहस्ते घरीच केली जात असे.

श्री. हरीश्चंद्र पाटील हे दहा-बारा वर्षाचे असताना त्यांनी मूर्ती तयार करण्याची कला शिकून घेतली होती. श्री. हरीश्चंद्र पाटील हे विठ्ठल भक्तही होते. ते पंढरीची वारी करीत. आषाढीचे पंढरीचे वारीवरून परत आल्यानंतर मूर्ती तयार करण्याचे काम सुरू होत असे. मूर्ती तयार झाल्यानंतर मूर्तीला शेंदूर लावीत व त्या मूर्तीचा दहा दिवस उत्सव साजरा होत असे. मूर्तीला रंग देण्याची प्रथा पुढे सुरु झाली.

श्री. हरीश्चंद्र पाटलांचे एकुलते एक पुत्र श्री. बाजीराव पाटील हे होते. त्यांनीच आपला गणपती फार जुना आहे म्हणून तो मोठा करावा असे वडिलांना सुचविले व तेव्हापासून श्री. हरीश्चंद्र पाटलांनी गणपती

मूर्तीचा आकार मोठा म्हणजे माणसाएवढा उंचीचा (सुमारे ५½ फूट) केला. ही अवाढव्य मूर्ती घरी हातांनीच केली जाऊ लागली व मूर्तीला रंग देण्याची प्रथा सुरू झाली. उमरावतीत एवढा प्रचंड मातीचा गणपती त्याकाळी नव्हताच (आणि आजही नाही.) त्यामुळे हा श्री. हरीश्चंद्र पाटलांचा 'गणपती' सर्वदूर प्रख्यात झाला. गणेशोत्सवाचे काळात या मूर्तीचे दर्शनासाठी लोक गर्दी करू लागले. तेव्हापासूनच हा गणपती 'हरीश्चंद्र पाटलांचा गणपती' या नावाने प्रसिद्ध झाला तो लौकिक आजही कायम आहे.

श्री. हरीश्चंद्र पाटील हे इ. स. १९३१ मध्ये स्वर्गवासी झालेत. त्यांचे नंतर श्री. बाजीराव पाटलांनी गणेशमूर्ती तयार करण्याचे काम २-३ वर्षे केले पण नंतर त्यांचे वडील पुत्र श्री. गजाननराव हे मूर्ती तयार करीत असत. परंतु श्री. गजाननराव हे सरकारी नोकरीत असल्याने त्यांना बाहेर दौरे वगैरे असत. इ. स. १९४४-४५ पासून हे मूर्ती तयार करण्याचे काम त्यांचे धाकटे बंधू श्री. नारायणराव यांनी हाती घेतले. हल्ली ही मूर्ती तयार करण्याचें व रंगविण्याचे कार्य श्री. नारायणराव हेच करीत असतात. वंशपरंपरेने हा गणपती या घराण्यात असल्याने घरातील लहान मुलांना देखिल मूर्ती तयार करण्याची कला शिकविण्यात येते आणि लहान मुले देखिल मूर्ती तयार करण्यास हातभार लावतात.

सन १९१८-१९ मध्ये उमरावतीत प्लेग आला होता. तोपर्यंत एक मूर्ती बाराही महिने पूजेसाठी राहत असे व जुनी विसर्जित करण्यात येई. मूर्ती पोकळ असली तरी तिला उचलण्यासाठी दहा-बारा माणसे लागतात. प्लेगचे काळात गावातील माणसे जंगलात राहायला गेली होती. गावात माणसे नसल्याने श्री. हरीश्चंद्र पाटलांनी पूजे नंतर कलशाचे पाणी घालून जागच्या जागीच मूर्तीचे विसर्जन केले होते. तेव्हापासून दोन मूर्ती राहतात व उत्सवाचे दिवसात तीन मूर्ती असतात. तिसरे वर्षीची मूर्ती विसर्जित केली जाते. जेव्हापासून मोठी मूर्ती करण्याचा प्रघात पडला तेव्हापासूनच गणपती विसर्जनाची मिरवणूक जवाहरगेट (पूर्वीचा भुसारीगेट) वरून राजकमल चौक मार्गाने देवीजवळ जाऊन गांधी चौकातील विहिरीवर विसर्जन करण्याची प्रथा पडली आहे.

पूर्वी अनंत चतुर्दशीचे दिवशीच या मूर्तीचे विसर्जन होत असे व त्यामुळे गावातील इतर गणेशमंडळास मिरवणूकीसाठी वाजंत्री, बत्त्या वगैरे

मिळण्यास त्रास होई. सर्वच गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीबरोबर असल्यामुळे एकेवर्षी बरीच भानगड झाली. आपसात भांडण तंटे झालेत. त्यामुळे गावातील प्रतिष्ठीत मंडळी श्री. दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी, श्री. वीर वामनराव दादा व श्री. हरीश्चंद्र पाटील यांची एक बैठक होऊन विचार विनिमयानंतर हा गणपती पौर्णिमेस उठवावा व गावातील सर्वांनी अनंत चतुर्दशीस आपापले गणपती उठवावेत असे ठरले. तेव्हापासून पौर्णिमेचे दिवशी हरीश्चंद्र पाटलांचा गणपती उठवितात.

मूर्ती तयार करण्याची पद्धत : ही भव्य गणेश मूर्ती तयार करण्यासाठी कमावलेली माती हवी असते. पूर्वी श्री. हरीश्चंद्र पाटलांचे कारकिर्दीत कुंभाराचे येथून माती आणून मूर्ती तयार करण्यात येत होती पण पुढे कुंभार लोकांना माती देणे त्रासाचे वाटू लागले, म्हणून आषाढीला पंढरपूरला जाण्यापूर्वी शेतातून एक बंडी काळी माती आणली जाते. उन्हाळ्यात तीन पोते घोड्याची लीद जमवून ठेवलेली असते. पंढरपूरहून आल्यावर काळी माती भिजवून कढी प्रमाणे पातळ करुन ती चाळणीने एका डबक्यात गाळली जाते व घट्ट झाल्यावर काढून, बारीक चाळलेली लीद ५ टोपले, माती ४ घमेले व गाळीव राख एक घमेले यांचे मिश्रण करून व पायांनी तुडवून, या मातीचा ढीग लावून ठेवला जातो व तो आठ दिवस मुरू दिला जातो. नंतर आठ दिवसांनी एक घमेले या मातीचा पेंड घेऊन त्यात सुमारे १ पाव रुई मिसळून दगडावर लाकडी मोगराने ठोकून ते एकजीव केले जातात.

अशा रीतीने कमावलेल्या मातीची मूर्ती करण्याचे काम नंतर सुरू केल्या जाते. जरुरी प्रमाणे गोंदही वापरण्यात येतो. असा कार्यक्रम मूर्ती तयार होईपर्यंत चालू असतो. दररोज सकाळ संध्याकाळ एकेक तास काम करून मूर्ती घडविण्याचे हे काम चालते. मूर्ती तयार झाल्यावर ती वाळली नाही तर मग गोवऱ्यांचा शेक आतून बाहेरून देऊन मूर्ती वाळविली जाते. पोळ्याचे दिवशी मूर्ती सुकविण्याचे काम पूर्ण होऊन मूर्ती साफ केली जाते व जरुर पडल्यास प्लॅस्टरने भेगा भरल्या जातात. नंतर सँडपेपरने मूर्ती घासण्यात येते. पोळ्याचे दुसऱ्या दिवसापासून मूर्ती रंगविण्याचे काम सुरू होते.

मूर्तीला जो गोरा रंग (बॉडी कलर) दिला जातो तो जुनी दगडतळी उगाळून व ती सडवून त्यातून रंग करण्यात येतो. तो रंग वाळल्यावर गरम

कपड्याने घासून चकाकी (पॉलीश) आणली जाते. याप्रमाणे ही भव्य मूर्ती तयार करणे फार कष्टाचे व दीर्घ मुदतीचे काम आहे. ते या पाटील घराण्यातील लोक निष्ठेने करीत असतात.

गणेश चतुर्थीला या भव्य मूर्तीची ब्राम्हणाकडून प्राणप्रतिष्ठा करतात. दहा दिवस सकाळ–सायंकाळ पूजा आरती होऊन भजनांचे कार्यक्रम होतात. कधी गणेश पुराण, प्रवचन वगैरे धार्मिक कार्यक्रम ठेवले जातात व उत्सव साजरा केला जातो. पौर्णिमेला भजनी मंडळीस महाप्रसाद असतो व त्याच दिवशी सायंकाळी गणपती विसर्जनाची मिरवणूक दिंडी, बॅन्ड, वाजंत्री यासह थाटात काढण्यात येते. चार चाकाच्या भव्य रथावर मंगलमूर्ती विराजमान असतात. दुसऱ्या गाडीत कै. हरीश्चंद्र पाटील यांचा फोटो असतो. सुशोभित केलेल्या या रथाला ५–६ बैलजोड्या जुंपल्या जातात. मिरवणुकीत सर्वांचे पुढे घोड्यावर चोपदार असतो. शिवाय भजनामध्ये शिंगाडा असतो. अशा वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने ही मिरवणूक भाजीबाजार, जव्हारगेट, राजकमल चौक मार्गे गांधी चौकात रात्री १० ला पोंचते व तेथे पूजा आरती होऊन श्रीं चे विसर्जन विहिरीत केले जाते आणि मग सर्व लवाजमा आपल्या स्थानावर परत येतो.

कै. हरीश्चंद्र+ पाटलांचे कारकिर्दीपासून भव्य गणेशमूर्ती व थाटाने निघणारी विसर्जनाची मिरवणूक ही प्रथा आज पावेतो कायम आहे व त्यांचे नातू श्री. गजाननराव, श्री. विठ्ठलराव आणि श्री. नारायणराव हे ती प्रथा निष्ठेने चालवित असतात.

+ कै. श्री. हरीश्चंद्र पाटील यांच्या घराण्यात तारखेडा या गावची पोलिस मुलकी पाटीलकी फार जुन्या काळापासून चालू असून, देशमुखीची सनदही या घराण्यात आहे.

कै. हरीश्चंद्र पाटील हे या घराण्यातील एक मोठे नामवंत पुरुष होते. ते शहरातील प्रमुख व वजनदार व्यक्ती म्हणून त्या काळी ओळखले जात. ते पाटीलकीचे काम करीत असताना, गावात कामास जायचे वेळी मोठ्या लवाजम्यानिशी जात असत. समोर काळा घोडा घेऊन एक हवालदार, त्याच्या मागे बारा कोतवाल, नंतर पाटील साहेब–कधी कधी सोबत पटवारी– आणि त्यांचे मागे पुन्हा चार हवालदार अशा थाटात पाटीलबोवांची स्वारी

(पुढील पानावर)

कै. हरीश्चंद्र पाटलांचा हा 'गणपती' या उमरावती शहराचे भूषण मानल्या जातो[१]

(मागील पानावरून)
जेव्हा रस्त्याने निघायची तेव्हा आजूबाजूने जाणारे येणारे लोक, दुकानदार वगैरे मंडळी उठून त्यांना मुजरा करीत. असा त्यांचा त्याकाळी थाट होता. श्री. हरीश्चंद्र पाटील यांचा जन्म इ. स. १८३५ चा. त्यांचे निधन १९३१ च्या ऑक्टोबरात झाले.

त्यांचे पुत्र श्री. बाजीराव पाटील हे देखिल तालुका बोर्डाचे व्हाईस चेअरमन आणि सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट होते. आता चालू पिढीतील श्री. विठ्ठलराव हे पोलिस पाटील आहेत तर श्री. गजाननराव हे तहसीलदार पदावर होते, आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. अमरावतीत जी काही थोडी जुनी घराणी आज आहेत त्यांत हे तारखेडचाचे घराणे फार जुने आहे.

या घराण्याकडे मोहरमच्या ताज्याचा देखिल मान एकेकाळी होता. त्यासाठी हैद्राबाद सरकारकडून सालीना दीडशे रुपये मोहरमचे वेळी त्यांना मिळत असत. पुढे ब्रिटिश राजवटीत थोडे दिवस दरसाल रु. ५० मिळत. पुढे बंद झाले. हा ताजिया साधा रूपेरी कागदाने मढविलेला असे व त्यावर कागदाच्या निळचा रंगाच्या चिमण्या चिटकविण्यात येत असत. त्यामुळे हा ताजिया 'चिडीयाका ताजा' या नावाने त्याकाळी फार प्रसिद्ध होता. करबल्यात हा ताजा सर्वांचे पुढे राहत असे. पुढे जातीय दंगलीनंतर ही प्रथा बंद केली गेली.

या पाटील घराण्यात कै. श्री. हरीश्चंद्र पाटील हेच ख्यातनाम होते. हरीश्चंद्र पाटील यांचा गणपती या नावाने पाटीलबोवा अजरामर झाले आहेत.

१ : श्री. गजाननराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांनी दिलेल्या माहितीचे आधारे.

टीप : हल्ली २० फूट, २२ फूट उंचीच्या गणेशमूर्ती केल्या जातात हे आपण पाहिले व वाचले आहे. परंतु हरीश्चंद्र पाटील यांची साडे पांच फूट उंचीची महाकाय गणेशमूर्ती १९११ साली तयार केली जात असे. त्याकाळी एवढी मोठी मूर्ती सबंध वऱ्हाडांत फक्त हीच असावी.

परिशिष्ट क्र – १४

वऱ्हाडी प्रजेला साक्षर करण्याचे कार्यात सिंहाचावाटा असलेली सस्था 'मराठी नार्मल स्कूल'

इ. सन १८५३ साली इंग्रज आणि निजाम यांचेत तह होऊन वऱ्हाड प्रांत इंग्रजाकडे वहीवाटीसाठी आला. आणि इंग्रजांनी वऱ्हाडात ज्या ज्या सुधारणा केल्या त्यांत शिक्षण ही महत्त्वाची बाब होती.

वऱ्हाडात तत्पूर्वी एकही सरकारी शाळा नव्हती. पंतोजी किंवा मुल्ला खाजगी शिक्षण देत असत, परंतु त्या शिक्षणाला अर्थ नव्हता. इ. स. १८६६ साली वऱ्हाडात प्रथमच शिक्षण खाते स्थापन झाले. डॉ. सिक्लेअर हे इंग्रज गृहस्थ या खात्याचे पहिले डायरेक्टर होते.

या शिक्षण खात्यातर्फे सरकारी प्राथमिक शाळा ठिकठिकाणी सुरू करण्यात आल्या, त्यासाठी मुख्यतः मुंबई – पुण्याकडून शिक्षक आणण्यात आलेत, परंतु या तिकडील शिक्षकांना इकडील हवा पाणी मानवेना, म्हणून ते नोकऱ्या सोडून परत जाऊ लागले. तेव्हा "या भागातच शिक्षक तयार केल्या शिवाय वऱ्हाडातील शिक्षणाला स्थाई स्वरूप लाभणार नाही" हे ओळखून श्री. सिक्लेअर यांनी इ. स. १८६८ साली वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन आकोला येथे नार्मलस्कूलचे दोन वर्ग सुरू केलेत व त्यासोबत एक वर्ग उर्दूचा सुरू केला. या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास सरकारकडून दरमहा रु. ५ स्कॉलरशिप मिळत असे. (स्टायपेंड हे नाव नंतर मिळाले.) हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम होता व विद्यार्थ्यांना शिक्षकाच्या नोकरीची हमी देण्यात आली होती. मात्र त्यांना त्यासाठी बॉन्ड लिहून द्यावा लागत असे. मराठी ४ थी पास झालेल्या विद्यार्थ्यांतून निवड करून या नार्मलस्कूलमध्ये विद्यार्थी घेतले जात. पुढे या नार्मलस्कूलला 'ट्रेनिंग कॉलेज' हे नाव पडले.

या नार्मलस्कूलमध्ये भरती होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुढे वाढली. म्हणून मग कॉम्पिटेटिव्ह एक्झामिनेशन सुरू करण्यात येऊन तीत पास होणाऱ्यांनाच या स्कूलमध्ये प्रवेश मिळू लागला. इ. स. १८७६ साली या शाळेच्या मराठी विभागात ४९ व हिंदी विभागात ३५ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते, त्यांतून अनुक्रमे २७ व १४ विद्यार्थी घेतले गेले. यासाठी परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांपैकी निम्मी मुले ब्राम्हणांची होती.

सन १८७९ पर्यंत दरसाल दोन मराठी वर्ग आणि एक हिंदुस्थानी वर्ग मिळून केवळ ३० विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत असत; नंतर डायरेक्टरांनी १८७९ सालीच ही संख्या ६० केली. तरीही बरेच दिवसपर्यंत ह्या सर्व जागा लायक विद्यार्थ्यांचे अभावी भरल्या जात नसत.

१८७९ साली झालेल्या परिक्षेचे या शाळेचे निकाल खालील प्रमाणे होते.

	मराठी विभाग		हिंदुस्थानी विभाग	
वर्षक्रम	पटावर	पास	पटावर	पास
१	१६	४	६	३
२	१०	४	४	२

यावरून त्याकाळी परीक्षा किती कडक घेतल्या जाई ते दिसून येते.

इ. स. १८७८–७९ साली ट्रेनिंग कॉलेजमध्ये नवीन २४ विद्यार्थी भरती केले गेले, पैकी ६ असिस्टंट मास्तर होते. असि. मास्तराची नोकरी करणे किंवा नार्मलस्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून शिक्षण घेणे त्यावेळी सारखेच वाटे. कारण दोघांचीही दरमहा प्राप्ती ६ रुपयेच होती.

इ. स. १८८०–८१ मध्ये मराठी विभागाकडे दोन वर्ग मिळून ४९ आणि हिंदुस्थानी विभागाकडे १० विद्यार्थी शिकत होते. पैकी वर्ष अखेरीस मराठीचे ११ व हिंदुस्थानीचे २ विद्यार्थी पास झाले व त्या सर्वांना नोकऱ्या मिळाल्या. त्याच्या पुढील वर्षी मराठी विभाग १०८ व हिंदुस्थानी विभाग ८१ याप्रमाणे विद्यार्थी परीक्षेस बसले, त्यातून अनुक्रमे ४१ व २७ पगारी विद्यार्थ्यांना जागा मिळाल्या. पण आश्चर्याची गोष्ट ही की यावर्षी अमरावती जिल्ह्यातून प्रवेश परीक्षेला एकही विद्यार्थी नव्हता.

१८७९–८० सालापर्यंत म. शाळातून साधारणपणे लेखन, वाचन व गणित आणि कोठे कोठे थोडे बहुत इंग्रजी हे विषय शिकविले जात असत, परंतु १८८० साली शिक्षणाच्या इयत्ता ठरवून अभ्यासक्रमाला व्यवस्थित स्वरूप दिले गेले, तेव्हापासून मराठी ६वी अगर इंग्रजी २री इयत्ता पास झालेल्या विद्यार्थ्यांमधून निवड करून घेतलेले विद्यार्थी या संस्थेत शिक्षण घेण्याकरिता लायक ठरविले जात.

इ. स. १८९६ पावेतो ह्या संस्थेत दोन वर्षांचाच अभ्यासक्रम सुरू असे. परंतु रावसाहेब सी. वि. पटवर्धन, डायरेक्टर ऑफ् प. इन्ट्रक्शन्स

यांनी वरिष्ठांची परवानगी घेऊन इ. स. १८९७ साली तिसरे वर्षाचा वर्ग जोडला आणि या संस्थेचे महत्त्व वाढविले. तिसऱ्या वर्षाची परीक्षा शेकडा ६० गुण मिळवून पास होणारास दरमहा २५ रुपयावर स्टार्ट मिळण्याची व्यवस्था केली. ह्यावेळी मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यास शिक्षण खात्यात १५ रु. दरमहाची इंग्लीश टीचरीची जागा मिळत असे. अर्थात इंग्लीश शिकलेले लोकही या संस्थेत भरती होऊन येथील शिक्षणाचा व पगार वाढीचा फायदा घेऊ लागले. ह्याचसाठी भूमिती, बीजगणित, सायन्स (पदार्थ विज्ञान शास्त्र, ज्योतीषशास्त्र) व संस्कृत या उच्च दर्जाच्या शिक्षणात अंतर्भूत होणाऱ्या चार विषयांची जोड ह्या संस्थेच्या अभ्यासक्रमात करून दिली गेली.

याप्रमाणे या नार्मलस्कूलमधून तयार झालेल्या विद्यार्थ्याकडून शिक्षणाचे काम उत्तम रीतीने तडीस जाऊ लागले.

नार्मलस्कूल उमरावतीला आले : ही संस्था इ. स. १९०६ साली उमरावती येथे आणली. त्यावेळी सर्व बाजूंनी उमरावती शहराला बरेच महत्त्व प्राप्त झाले होते. सर्व प्रांतीय संस्था उमरावतीसच असत. फक्त ट्रेनिंग स्कूल ही एकटीच प्रांतीय संस्था आकोल्यास होती. तीही यावर्षी उमरावतीस आणली गेली. त्यामुळे पश्चिम वऱ्हाडमधून उमरावतीस या संस्थेत भरती होण्यासाठी फारसे विद्यार्थी येईनात. म्हणून या संस्थेची एक शाखा इ. स. १९१६ चे सुमारास आकोल्यास सुरू करण्यात आली. तेथे दोन वर्षाचा अभ्यासक्रम ठेवण्यात आला होता. आणि तेथील विद्यार्थ्यातून निवड करून १२-१४ विद्यार्थी थर्ड इयरला उमरावतीस घेतले जात.

वऱ्हाडप्रांत इ. स. १९०३-४ साली मध्यप्रांतास जोडल्या गेला तेव्हापासून, ट्रेनिंग स्कूलच्या ऐवजी "मराठी नार्मल स्कूल" हे नाव संस्थेस मिळाले. त्यावेळी वऱ्हाड-मध्यप्रांतात एकूण पांच नार्मल स्कूल्स् होती. ती १९१६-१७ मध्ये सात झाली. आणि १९१८ साली ही संख्या १० झाली. त्याच वर्षी यवतमाळ येथे नार्मल स्कूल सुरू झाले. आणि पुढच्या वर्षी बुलढाण्यास सुरू झाले. परंतु पुढे यवतमाळचे नार्मल स्कूल तोडून, दोन नार्मल स्कूल्स् वऱ्हाडात राहिली. इ. स. १९१५ त उमरावती येथील नार्मलस्कूलास रिट्रेनिंग क्लास जोडला. तो पर्यंत रिट्रेनिंग ही संस्था स्वतंत्र संस्था समजली जाई.

नार्मल स्कूलच्या विद्यार्थ्यास अध्यापनाची प्रॅक्टीस व्हावी आणि अध्यापनाच्या खुब्या व अडचणी कळाव्या म्हणून आरंभापासून ह्या शाळेस एक प्रॅक्टिसिंग स्कूल नावाची संस्था जोडलेली आहे. ती प्रथम सरकारी होती नंतर बोर्डाकडे देण्यात आली व पुन्हा सरकारी झाली. तीत आरंभी ४ इयत्ता व एकच शिक्षक असून त्यास प्रॅक्टिसींग स्कूलचा हेडमास्तर हा हुद्दा होता. या शाळेची परीक्षा त्यावेळी डेप्युटी इन्सपेक्टर घेत असत.

नार्मल स्कूलमध्ये वऱ्हाड प्रांतातील दूरदूरचे विद्यार्थी यावयाचे. या सर्वांना आपल्या राहण्या जेवणाची सोय स्वतंत्र रीतीने करणे अशक्य व अनिष्ट असल्यामुळे या संस्थेस जोडून बोर्डिंग सुरुवाती पासूनच निर्माण केले आहे. मुसलमान विद्यार्थ्यासाठी वेगळी इमारत घेऊन तेथे सोय केली आहे. नार्मल स्कूल उमरावतीस येईपर्यंत उर्दू शाखेचे विद्यार्थी मराठी नार्मल स्कूलच्याच इमारतीत आपला अभ्यासक्रम पार पाडीत. परंतु पुढे सदर शाखेकडे विद्यार्थी वाढू लागल्याने इ. सन १९०९–१० चे सुमारास दोन्ही संस्था सर्व प्रकारे अगदी वेगळ्या करून दिल्या. मराठी नार्मल स्कूलचे मुख्याधिकाऱ्यास पूर्वीपासून चालत आलेला 'प्रिन्सिपॉल' व उर्दू नार्मलस्कूलचे मुख्यास नवीन निर्माण केलेला 'सुपरिन्टेन्डेन्ट' हा हुद्दा मिळाला. सुरुवातीला बोर्डिंगचा कारभार एकादा विद्यार्थी प्रिन्सिपॉलच्या मदतीने पाही. पण काही अनिष्ट प्रकार घडल्याने हळू हळू बोर्डिंग सुपरिन्टेन्डेन्ट शिक्षकापैकी नेमला जाऊ लागला.

इ. सन १८९७ साली पाहुणाचार्ज संबंध दिवसाचा दोन्ही वेळचा तीन आणे पडे. या वरून त्यावेळी दोन्ही वेळच्या जेवणाचा खर्च एका माणसाला अडीच आणा पडे. त्यात वरण, भात, पोळी, भाजी, कढी व तूप एवढे पदार्थ उत्तम रीतीने होत असले पाहिजे हे उघड आहे. बोर्डिंगात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना गडी माणसाच्या पगाराचा सुद्धा प्रत्येकी दरमहा अडीच–पावणे तीन अगर फार तर ३ रुपये खर्च येत असे. सेकंड इयर मधले विद्यार्थ्यांनी तर येथे मिळणाऱ्या स्कॉलरशिपमध्ये आपल्या कपड्या–लत्त्यांचा वगैरे खर्च भागवून दीड–दोन तोळ्यांची सोन्याची अंगठी बोटात घालून आपल्या नोकरीच्या गावी चार्ज घेण्यास जावे. हे ऐकून 'सर्व यस्य वशाद्गात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' या कालीदासोक्तीची आठवण झाल्या वाचून रहात नाही.

ही संस्था स्थापन झाली त्यावेळी तिचे मुख्याध्यापक श्री. नारो रघुनाथ मोहोळकर हे होते. त्यांना ६० रु. पगार असावा. श्री. मोहोळकर हे गणित विषयात पारंगत असत. पुण्यात केरुनाना छत्रे व वऱ्हाडात मोहोळकर हे सुप्रसिद्ध गणिती असत. श्री. मोहोळकरांचे नंतर त्या जागी श्री. निळकंठ नारायण भट व त्यानंतर श्री. वामनराव रघुनाथ जोशी हे होते. श्री. जोशी यांना त्यावेळी १२५ रु. पगार होता.

नंतर श्री. कृ. म. पैठणकर हे प्रिन्सिपॉल झाले. त्यानंतर श्री. हरि मोरेश्वर शेवडे, श्री. शि. ह. गोखले एम्. ए. व त्यांचे नंतर अंदाजे १९१५ साली श्री. दामोधर केशव ओक, बी. ए. हे नागपूरच्या त्याच जागेवरून बदलून उमरावतीस आले. ते नागपूर युनिव्हर्सिटी कोर्टाचेही मेंबर होते. त्यांना रु. ३५० पगार सरकार देत असे. यांचे कारकिर्दीतच नार्मलस्कूलला गायन क्लास जोडला गेला. गार्डनिंग, स्काऊटिंग, फर्स्टएड् आणि हायजिन, तसेच मॅन्युअल ट्रेनिंग ह्यांचेच कारकिर्दीत येथे सुरू झाले. आतापर्यंत फुटबॉल, हॉकी वगैरे ॲथलेटिक असोसिएशनच्या खेळात या संस्थेचे विद्यार्थी भाग घेत नसत परंतु ह्यांचे कारकिर्दीत हे सर्व खेळ येथे सुरू झालेत. युनिफार्म पद्धत याच काळात सुरू झाली. 'उन्नति' नावाचे हस्तलिखित मासिकही याच काळात या संस्थेचे विद्यार्थ्यांनी चालविले होते आणि जुन्या-नव्या विद्यार्थ्यांचे व्यवस्थीत संमेलनही यांचेच काळात येथे सुरू करण्यात आले.

मराठी नार्मल स्कूलचे वऱ्हाडातील सामाजिक परिस्थितीवर घडून आलेले परिणाम.

इ. सन १८६८ पासून इ. सन १८७७ साल अखेर पावेतो दरसाल ५ : ५ च विद्यार्थी नार्मल स्कूलमधून शिक्षकाचे जागी गेले आणि प्रत्येकाने सरासरी २५-२५ मुलांसच शिक्षण दिले असे मानल्यास, १८६८ साली सुटलेले ५ विद्यार्थी ५ × २५ = १२५ मुलांना एका वर्षात शिक्षण देऊ शकतात. त्यांनी पेन्शन घेईपर्यंत (३० वर्षे) नोकरी केली अर्थात १२५ × ३० = ३७५० मुलांना त्यांनी ज्ञानदान केले. त्याच प्रमाणे १८६९ साली ५ विद्यार्थ्यांनी पेन्शन घेईपर्यंत ३७५० मुलांना शिक्षण दिले. १८७० साली सुटलेल्या ५ जणांनी ३७५० मुलांना याप्रमाणे १८६८ पासून १८७७ पर्यंतच्या दहा वर्षात ३७५० × १० = ३७५०० मुले साक्षर बनली. पुढील दहा वर्षात दरसाल सरासरी १० : १० च विद्यार्थी सुटू लागले

असे मानल्यास वरील हिशेबाप्रमाणे त्यांनी सन १८७८ पासून सन १८८७ पर्यंत ७५००० मुले तयार करण्याचे काम केले असे म्हणता येते. याच क्रमाने परिस्थितीनुरूप विचार केल्यास या संस्थेतून ट्रेनिंग घेऊन बाहेर पडलेल्या शिक्षकांनी अक्षरशः लक्षावधी मुले साक्षर केलीत. एकंदर वऱ्हाडातील उण्या पुऱ्या आठ-नऊ लक्ष मुलांना १९२५ पावेतो पूर्ण साक्षर बनविण्याचे श्रेय मराठी नार्मल स्कूलमधून तयार होऊन गेलेल्या शिक्षकांनी संपादन केले असे दिसून येते[1].

(इ. सन १९२९ चे २० व २१ दिसेंबरला या नार्मल स्कूलचा 'षष्ठि सांवत्सरिक हीरकोत्सव' यवतमाळचे श्री. अण्णासाहेब जतकर, वकील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला ती माहिती या ग्रंथाच्या भाग २ मधील इ. सन १९२९ मध्ये पहावी.)

१ : मराठी नार्मल स्कूलची ५० वर्षे : ना. श्री. मुळे : वऱ्हाड शाळा पत्रक, पुस्तक ५०, अंक २-३, मे व जुन १९२५ : पृ. ८४ ते ९७

अमरावती शहराचा इतिहास

भाग पहिला

○ व्यक्ति - सूची ○

–अ–

अकबर, बादशहा ११४
अगस्त्य ऋषी १८
अजिमुद्दीन, इ. ए. सी. २१५
अणे, लोकनायक बापूजी
तथा मा. श्री. ३००, ३०२, ३३७
अत्रे, शिक्षक, प्रायव्हेट स्कूल ३०१
अफजलबाई, कलावन्तीण ३२४
अब्दुल करीमखाँ ३३७
अंबादास, नायब, खोलापूर १२६
अभ्यंकर २५९
अमीरखान चीन बहाद्दूर ४४
अयोध्याप्रसाद २२१
अर्जुन (पांडव) ६
अलादियाखाँ (तबला वादक) ३२४
अली, दरवडेखोर ३२१, ३२२
अली, बंधू, (शौकत व महंमद) ३४१
अमीर अली (मीर साहेब) तथा
अमीरखान, ठग ८६, ८९ ते १११,
१४८, १५२, १५४, १५५
अय्यर, सुब्रम्हण्यम्, सर न्यायाधिश
२३३, २४०, २४२, ३५७
अय्यर, सुब्राय २३३, २४५
अर्देसर, दिनशा, इ. ए. सी. २१६
असनारे, अ. के. २५८
असनारे, ज. के. (तथा भाऊसाहेब,
वकील) २१४, २५३, २५८
ॲनी बेझंट, डॉक्टर २४७, २५२,
३४१ ते ३४४
ॲडम, बॅरिस्टर, (मद्रास)
२३३, २४१, २४३

–आ–

आगरकर, प्रिन्सि. गो. ग. २२१
आजमशहा ४२
आदोळे, समशेरबहाद्दर, भवानजी
८१, ८७
आत्माराम भिकाजी ३०१
आदिनाथ, भगवान ८
आपटे, बाबासाहेब ३१८
आपटे, महादेव चिमणाजी ३१८
आपटे, हरी नारायण, ३१५, ३१६
(कादंबरीकार)
आपटे, विनायक २७४
आपटे, शिक्षक ३०१
आपटे, (संस्कृतकोशकार) १०
आपाजीपंत ७६, ७७
आयर्स्ट २२७, २२८, २७५
आसफजहाँ, निजाम १७६, १७९
आसरकर, बाळाभाऊ २५८
आळंदीचे स्वामी १८० ते १८३
आळशी, पां. गो. २१३, २९३

–इ–

इमामअली, सर. ३४९

–इ–
इन्दुमती (प्रभूरामचंद्राची आजी) १८
इन्द्रभान, मारवाडी, सावकार. १९२
इस्माईलखान, नवाब ५९
इस्माईल यार जंग ११४
–ई–
ईल, राजा, ईलिचपूर ९
ईश्वरसिंग, हे. मास्तर २०९
–उ–ऊ–ऋ–
उडगीकर, वा. रं. २०७
उमर, दरवडेखोर ३२१, ३२२
ऋषभदेव (भगवान ऋषभनाथ) ८
–ए–ऐ–
एकनाथ लक्ष्मण २२०, २२१
एट्कीन, हेड मास्तर २०५
एडवर्ड, सप्तम, बादशहा २८४, २८७ ते २८९
एलिफन्स्टन १४६ ते १५१
–ओ–औ–
ओक, एकनाथ तात्या २०७
ओंकारजी, एजंट ३१८, ३५०
ओडवायर, सर मायकेल (लेफ्ट. गव्ह.) २३६
औरंगजेब बादशहा, ११, ३१, ४० ते ४२ २६१, २८६
–क–
कढी– हेडमास्तर ३००, ३०१
कबूरमल २२१
करीम, पेंढारी १४६, १४७, १५१, १५४ ते १५६
करंदीकर, वि. ह. (तथा दादासाहेब) २१३, २४१
करंदीकर, बाळकृष्णपंत २५२
कर्झन, लॉर्ड (व्हॉ. राय) २८२, २८४, २९५, ३२७
कवडे, आवजी ४७
कॅडॅक, कमिश्नर ३१७, ३५१
कॅडी साहेब ३१४
कॅरेट, कर्नल २८९
काण्णव, सावकार, कारंजा ३००
काणे, इन्दिराबाई ३३८
काणे, गोविंदराव २३३, २४३
काणे, बॅरि. भास्करराव ३३८
काणे, बाळकृष्ण, क्रांतिकारक ३२९
कानगो ७७
कामा २३२
कार्ल मार्क्स १३३, १३४
कासलीकर, बाबासाहेब, गायक २५०
काळे, वि. का. २५०
किरज् फोर्ड ३२८
क्लीव्ह लँड (इस्पे. जन., पोलीस) ३१२
कुमार, नरसिंग (नृसिंह) राणा
इंजिनीअर, नेपाळ २९०, २९१
कुरुंदवाडकर, सरदार ६४
कुसाजी गणेश, सरदार ४५
कृष्णाजी अनंत उर्फ आप्पासाहेब तहसिलदार २८६, २८८, २८९
कृष्णाजी शामराज (सबनीस) ५५
कृष्णाजी हरी सरदार ४५
केतकर, इंजिनीअर, ग्वाल्हेर २९१
केवलचंद गंभीरचंद २२०
केसकर, अंताजी गोविंद २२०
केसकर, नारायण गोविंद २२०
केसकर, यशवंत गोविंद २२०

–क–

केसो महादेव, सरदार ४५, ४६
केळकर, साहित्याचार्य न. चि. २३०, २३३, २४२, ३४१, ३४२
कोंडो बालाजी २२०, २२१
कोतवाल, शिनण्पा, सांगली २९०
कोलबूक १४९
कोल्हटकर, ग. ना. २०९
कोल्हटकर, श्री. कृ. नाटककार २५१
कोनेरपंत ७९
क्लोज्, कर्नल १३३, १५० ते १५२
कौंडिण्य ऋषी ६

–ख–

खरे, रा. ब. रा. मो.– २५३, २९३
खाडिलकर, काकासाहेब तथा कृ. प्र. (नाटककार) २९० ते २९२
खापर्डे ग. श्री. तथा श्रीमान दादासाहेब २०२, २०४, २०६, २१०, २१३, २१९, २२०, २२२, २२४ ते २२६ २२८ ते २३३, २३६, २४२, २४५ ते २५४, २६०, २८१, २८५, २८७ ते २९१, २९४, २९६ ते ३०२, ३०४, ३१० ते ३१३, ३१५ ते ३१७ ३१९ ते ३२१, ३२५, ३२६, ३३१ ३३४, ३३७, ३४२ ते ३४५, ३५१ ३५२, ३५७
खापर्डे ब. ग. तथा कविभूषण अण्णासाहेब २९२, ३०३
खापर्डे, बा. ग. तथा बाबासाहेब– २४२, २४३, २५२, २८७, ३०० ते ३०२, ३३४, ३३५ ३३७, ३४३ ३४४, ३४६, ३५७
खापर्डे, सौ. मनूताई ३०३
खाफीखान (इतिहासकार) ४४
खार, बिसन नारायण २३३, २४३
खोटे, बलवंत २८१
खोत, डॉक्टर बी. व्ही. २२०, २२९
खोदादाद सैनिक ३४०

–ग–

गंगात्रे, पेंटर. अमरावती २०४
गज्जर, प्रोफेसर २९३
गजानन महाराज, संत (शेगाव) ३१२, ३१३
गणपतराव मिस्त्री, अमरावती (घंटी घडघाळ तयार करणारा) २५५
गणोजेकर, मास्तर २०४
गनेडीवाल, ना. रा. (सावकार) १९४
गफूरखान, पेंढारी ९३, ९८, १०२, १०५, १०७, ११०
गाडगीळ वकील सांगली २९०
गाढे कृ. स., सरदार १७८
गांधी, महात्मा मो. क. २३६, २५९, २९७, ३४१, ३४७, ३४८
गायकवाड, सयाजीराव, बडोदा नरेश ३३४
गायकवाड, संपतराव ३३४
गार्लंडबाई २५३
गिरिधर (माळव्याचा सुभेदार) ४६
गिरिधारीलाल (राजा) १८९
गिरिराव, तहसिलदार २२१
गुजर, तुकोजी ५५
गुजर, सयाजी ५५
गुलाबराव महाराज, संत २९६, २९७, ३०१

—ग—
गुलाबबाई कलावन्तीण, अमरावती ३२४
गुलाम अहंमद २३३,२४४
गृत्समद ऋषी १४३
गोकुलदास, राजा, सावकार ३५३
गोखले, नामदार गो. कृ. २३०,२३३, २९७,२९८
गोखले, नानासाहेब तथा सं. वि. ३४३,३५७
गोडबोले, नारायण (वकील) २१३
गोपाळपंत ७६,७७
गोपाळ खुशाल, वकील २१३
गोरे, जी. एम्. (हेडमास्तर) २०५
गोविंददास छवीलदास २०४
गोविंद प्रभु १०,२०
गोविंदबक्ष (सुभेदार) १२३
गोविंद बल्लाळ (सरदार) ४८
गोविंद हरी ५३
गोविंदहरे २०४
गौर, सर हरिसिंग ३४२,३४४
ग्लॅड्स्टन २४४
ग्रॉविएल, प्रिन्सिप ३४६
—घ—
घडघाळजी ३२२
घालवडे ४८
घाटगे, जोत्याजी ८२
घोष, अरविंद बाबू ३२७,३२८,३२९
घोष, बारिन्द्र बाबू ३२७ ते ३२९
घोषाल २३२,२३३,२४०
—च—
चक्रधर, स्वामी १०
चंदूलाल १२३
चाकी, प्रफुल्ल ३२९
चाफेकर, हरिभाऊ २४७,२४८, २७४,२७५
चाफेकर, गणेश २७५
चाफेकर, दामोदर २४७,२४८, २७४,२७५
चाफेकर—बंधू २०७,२४२,२४७, २४८,२७४,२७५,३०१
चाफेकर बाळकृष्ण २७४,२७५
चाफेकर, वासुदेव २७५
चामर्स साहेब २४६
चार्ल्स, आनंदा २३२,२३३,२४४, २४५,३२५
चिकाटे, म. दे. ३३३
चिटणीस, कुशाबा ६१,८०
चिटणीस, चिमणाजी रुक्मांगद ६३
चिटणीस, वकील ३०७
चितळे, अनंतभट ५७,५९,७७
चित्तु उर्फ शितु उर्फ छट्टू पेंढारी ८९,९१,९३,९४,९६ ते १११, १४६ ते १४९,१५१,१५४ ते १५६
चिमाजी आप्पा ४५ ते ५०,६९
चेअनी विलसन ३१८
चेंडके, म. के. ३३३
चेनसिंग ८७
चोरघडे, देवाजीपंत तथा दिवाकर कृष्ण ५१,६३,६४
चंद्र, समशेरजंग बहादूर (सेनापती नेपाळ) २९०
—छ—
छट्टू — चित्तू पहा

–छ–

छत्रे, काशीनाथपंत ३१८

छत्रे, वि. मो. ३१७,३१८

–ज–

जगन्नाथ महाराज, पंडित (पुणे) २९८

जटार, श्रीराम भिकाजी (हेडमास्तर) २०५,२०७

जतकर, शान्ता (कलावन्तीण) ३२४

जनार्दन नारायण २२०

जनार्दन स्वामी १२

जमाल साहेब २१८

जयसीराम (लाहोर) २३३,२४०

जयवंत (नट व शिक्षक) ३०१

जरासंध २१

जसवंतराव (जसवंतराऊ) १४६

जळगावकर, गंगू (कलावन्तीण) ३२४

जाधव, गणपत ३०६,३०७

जाधव, पिलाजी ४५

जॉर्ज, पंचम (बादशहा) २८५,३३१, ३३३

जिनराजदास, एम्. ए. २५३

जोग, प्र. ना. वकील २१३,२२०,२२५, २२८,२३०,२४४,२४५, २८९, २९२३

जोग, वासुदेवराव २५२

जोगळेकर (भटजीचे मावस बंधू) ३१४

जोगीण, कलावन्तीण ३२६

जोशी, केशवराव, नागपूर २३३,२४०

जोशी, धोंडो बापूजी १४७

जोशी, डॉ. त्र्यंबकराव २५३

जोशी, दादासाहेब (सर मोरोपंताचे वडील) २५४

जोशी, दादासाहेब (पंडित) २२९

जोशी, सर मो. वि. तथा अण्णासाहेब २१३, २२० ते २२२, २२७ ते २३१, ,२४५,२४८,२५५,२९७,३००,३११ ते ३१३,३३९,३४२,३५३

जोशी, बाळासाहेब २५३

जोशी, नामदेवबुवा (गवई) २४९

जोशी, वामनबुवा (गवई) २५०

जोशी, वा. गो. वीर वामनराव जोशी पहा

जोशी, वासुकाका, पुणे २९०,२९१

जोशी, विष्णु हरी २२०

ज्योतिबा, पेंढारी १५१

–झ–

झकरियाखान ४४

झुल्फिकारखान ४२

झुंवर, नायकीण ३२४

–ट–

टागोर २१३,२३३

टिळक, लोकमान्य बा. ग. २०२,२२६, २३१,२३२,२३८,२४२,२४३,२४६, २४७,२८१,२८६, २९० ते २९२, २९७ ते २९९, ३०५,३१२,३१६, १७,३२६,३४०,३४१, ३४३ ते ३४५

टिळक, नारायणराव, गायक ३३७

टेलर, कॅप्टन फिलीप मेडोज ८६,८८, ते ९०, १११, १५५,१५६,१७६, १८१

टोपे, सेनापती तात्या १७९ ते १८१

ठुबे, रावबहाद्दूर ३३४

–ड–

डलहौसी, लॉर्ड (ग. ज.) १३४,१८८

डागा, कस्तुरचंद ३५४

डांगे ३०१

–ड–
डायर, जनरल (पंजाब) ३४८
डिसा २२०
डी. सिल्व्हा (शिक्षणाधिकारी) २०६
डोरले, गोपाळराव एस्. २८७,२८९, ३४३,३५७
डोरीन, कॅप्टन (रोड सुपरि.) १३२
डोव्हेटन, कर्नल १५१
डोळे, रामचंद्र रेणको ३१९,३५०,३५३
–त–
तळवलकर, र. बा. २०३,२०५,२२०
तांबे, ना. एस्. बी. ३४३,३४५,३५७
तांबे, विष्णुपंत (गायक) २५०
ताराबाई (छत्रपती) ४२
तिखे, रंगनाथ २९० ते २९२
तिवारी, दु. आ. (शाहीर) ५०
तुकाराम न्हावी (संस्थापक तुकाराम आखाडा) ३०९,३१३
तुकोजी श्यामराव मिरजकर ७३
तुळजागीर बाबा ३०
त्रिबक गणेश, स्मॉल कॉज जज्, २१६
थत्ते, भास्करराव २५१
थापा कुलवीर (सैनिक) ३४०
–द–
दंडे, अमरावती २३२
दत्त, रमेशचंद्र २८५
दत्त, वीरेन्द्रनाथ २३३,२४०
दत्तुबुवा (गायक) तावडे २५०
दमयंती (नलपत्नी) १८
दयाबहादर, सुभेदार, माळवा ४५,४६
दरबानसिंग (सैनिक) नोगी, दरबानसिंग पहा
दलेलपुरी गोसावी २४
दांडेकर, दादा १८१, १८२
दांडेकर, नारायण. बी. २०२
दादाभाई, नागपूर ३४४, ३४५
दामले, गणेश कृष्ण ४३
दामले दत्तात्रय कृष्ण ३५५
दामले, वकील, अमरावती ३०७
दास, देशबंधु चित्तरंजन २०५, ३२९
दिगंबर रा. ब. दे. वि. वकील २१३
दिक्षित, ब्रम्हचारी २६८
दुराणी, भाऊसाहेब, एस. के. २१३, ३१६, ३४३, ३५७
देव, (काँग्रेस अधिवेशन) २४०
देवकरण ३५०
देवजी गवळी ८७
देवजी हंबीर ४८
देवभानकर, रा. सा. (हे. मा.) ३०, २०५
देवल बंधू ३१८
(देवल सर्कसचे मालक)
देवाजी पंत चोरघडे, चोरघडे पहा
देविदास अंताजी ३३३
देशपांडे, भिकाजीपंत (हैद्रा.) २०५
देशपांडे, शामराव, यवतमाळ २५०, २५३, ३००, ३०९, ३१०, ३१६, ३२०, ३२१
देशमुख (हेडमास्तर) २०५
देशमुख, गणपतराव शिवानंदस्वामी पहा
देशमुख, माधवराव ३३४
देशमुख, बॅरि. रा. मा. तथा अण्णासाहेब २९८, ३४४

देशमुख, सदाशिवराव ३३६
देसाई, नसरवानजी २५२
दोस्त महंमद (पेंढारी) १५१
–ध–
धनराज पोखरमल गनेडीवाल (सावकार) अमरावती १०९, ११७, १२८, १२९, १९१, १९२, १९४, २२५, ३५१
धोंडजी महादेव ४६
–न–
नंगे बाबा, संत (नंगाबाबा) २५८
नटबकजन, डॉक्टर ३६२
नंदपुरी बाबा (गोसावी) ३३३
नत्थुबुवा, गवई, तावडे २५०
नलराजा १८
नवरोजी दादाभाई २४४
नाईक, दरबानसिंग नोगी (सैनिक) ३४०
नागु, पेंढारी १४९
नातू बंधू २७७, २३८, २४२, २४६, २४८
नाना फडणीस ६०
नामदेवबुवा (गवई) जोशी २४९, २५०, ३०२, ३०४, ३२५
नामदेवबुवा (गवई) वऱ्हेकर २५०
नायडू,पार्थसारथी (मद्रास) २३३,२४०
नायडू रामजस (मद्रास) २३३, २४४
नारायण महाराज, संत केडगावकर ३३१, ३३२
नारो गणेश बेहरे ७३
नासिरुद्दौला (नवाब) १२७
निजाम अलीखान, नवाब ६०, १२२
निजाम–उल्–मुल्क् ४७
नित्यानंद स्वामी १८३
निंबाळकर, जगदेवराव, नाईक ८२
निंबाळकर, रामचंद्र, नाईक ८२
निरुळकर, भाऊ, हैद्रा. २०८
निशाद हुसेन, गवई ३२४
नृसिंह दैवज्ञ १३
नृसिंह सरस्वती (आळंदी) १८१ते१८३
नूरमहंमद दरवेश २२८
नेकोलेट, एच्., एस., डे. कमि. २५९, २६०
नेगी, गोबरसिंग नाईक ३४०
नेगी, दरबानसिंग नाईक ३४०, ३५६
नॉबेल मार्गारेट. भगिनी निवेदिता पहा
–प–
पटवर्धन, वि. रा., महर्षी अण्णासाहेब २०७, २०८
पन्नालाल व्यास ३१०
परांजपे, रँग्लर २८१
परीक्षिती (राजा) २०
पवार, तुकोजी ४८
पवार, यशवंतराव ४९, ५०
पंचोत्रेकर, सरदार ८७
पॅट्रीक्, कर्नल किर्क ११३, ११४
प्रधान, ब. रा. २०३
प्रभु, आत्माराम भिकाजी २०७
प्रल्हादबुवा खोलापूरकर, गवई २५०
पाटील जयराम २५०, ३१४, ३२०, ३२१, ३३४, ३३५
पाटील, शाहाजी ३१२, ३१३
पाठक, चिमणाजी राजाराम २०२, २०७

–प–
पांडुरंग गोविंद, वकील २३३, २४३, २४७
पांडुरंग विष्णू ३३३
पाणिनी (व्याकरणकार) ८
पाराशर, दादाजी ७३
पॉल, बिपीनचंद्र २३३, २४५ ३२१, ३२६
पाळेकर, बाबासाहेब (वकील) २१३, ३१६
पिंगळे, गोविंदराव ६१, ८०
पीरखान (पेंढारी) ९७, १०६, १०८
प्रिस्ट्ले ३१२
प्रिडॉनस (असि. कमि.) २१५
पुणतांबेकर, एस. व्ही. ३४३, ३५७
पुणेकर, धोंडूबाई (कलावन्तीण) ३२४
पुरणमल, सावकार ३०, १२३, २०७, २५७, २५८
पुरोहित, सावकार ३३५
पेंडके, बा. जे. २२०
पेन्टलँड, लॉर्ड ३५७
पेशवे, बाजीराव बल्लाळ (प्रधान) ४५ ते ४८, ५६, ६७ ते ६९ ७१, ७२, ७४
पेशवे, बाळाजी बाजीराव ५६
पेशवे, बाळाजी विश्वनाथ (पंत प्रधान) ४३, ४४, ५३, ७४
पेशवे, माधवराव, थोरले २२०
पेशवे, माधवराव, सवाई ६१, ६३, ७९, ८०
पेशवे, राघोबादादा ६३
पेशवे, रावसाहेब ३११ ते ३१३
पेस्तनजी, विकाजी १२३, १३०, १३१, १३३, २०९
पोखरमल, रामविलास ११७
पोखरमल, ना. रा. सावकार ३५३
प्लाउडन, कमि. बेरार १६३, १६४
फडके, खं. बा. (अकोला) २०९
फडके, दाजीबा ६१, ८०
फडणीस, नाना (बाळाजी जनार्दन) ६०, ६१, ६२, ८०
फत्तेलाल शालीग्राम (सावकार) ३५३
फत्तेचंद, शेठ २१४
फारिंग्या, ठग १५४
फरीदशहा, दरवेश २२८
फर्डिनांड, आर्च ड्युक ३४०
फ्राजर (मेजर) ९१
फेअरर, कॅप्टन ए १९४
फैजी पहेलवान ३१०
फौलर, ए. एल. १५७
–ब–
बंकीमचंद्र ३२८
बनाजी (बन्या) ३०९
बन्धूजी जनार्दन (जज्) २१५
बॅनर्जी, उमेशचंद्र २३३, २४३
बॅनर्जी, डब्ल्यु. सी. २३१ते२३३,३२५
बॅनर्जी, सुरेन्द्रनाथ २२१,२३०ते२३३ २३६, २४२, २४३, २४६
बनाजी (पारशी) २५३
बन्सीलाल अभीरचंद (सावकार) १९२, १९३, ३५३
ब्रम्ह, दी. ब. के. वा. २१३,३१६,३४६
बर्न, जे. एच्. २०१
बलदेवसिंग राजपूत (प. ख्रि.) २६३

–ब–

बलराम (श्रीकृष्णाचा भाऊ) २३
बल्लाळ ३००
बाजी भीवराव ४८
बापट, अण्णा मास्तर ३०७ ते ३१०, ३१४
बापट, पां. म. ३१३
बापट, मॅजिस्ट्रेट ३२२
बाबाजी, भालेराव ४१
बाबाजी महाराज पंडित, पुणे ३०३
बामणगावकर, ना.रा. तथा नानासाहेब ३४५
बार्लो, सर, ग. ज. १४६
बालगंधर्व (नारायण राजहंस) २५०, ३०२, ३०६
बासील महंमद, पेंढारी १५४, १५६
बाळकृष्ण जयराम २२०
बाळकृष्ण बळवंत १३७, १६०
बाळ महाराज पंडित (पुणे) २९८
बाळाजी जनार्दन. फडणीस, नाना पहा
बिटचाबुवा, गायक २५०
बिलग्रामी, इ. ए. सी. २१६
बिसनचंद राजा (सुभेदार) ३०, ११७, १२३ ९१६,
ब्रीग्ज ३,१४२
बुऱ्हाण, पेंढारी १४६,१४९
बुलक एफ्.एस्.कमि. २१५,२२९,२८९
बुलाखीदास कल्याणदास
ब्युसबॉय, जे. टी., डे. कमि. २१५, २२९ ,२८९
बेंटिंग, लॉर्ड बुइल्यम, ग. ज. ८६, १५३, १५५
बेडेकर, बाबासाहेब तथा गोपाळराव २५१,२५४,३२६,३३६
बेदरकर, एन्. एस्. ३४३,३५७
बेल, कॅप्टन जे. जी. १३७,१६ ,१९२
बोके, देवीदास मारोती २५८
बोडस्, गणपतराव ३०५
बोधनकर, बाळकृष्णपंत २५२
बोस, खुदीराम, क्रांतिकारक ३२९
बोरा, भूपेन्द्र २३३,२४५

–भ–

भगतसिंग, सरदार ३२६
भगिनी निवेदिता २८१
भट, डॉ. डब्ल्यु आर. ३४३,३५७
भटजी उर्फ भिडे गुरुजी, दामोदर
बळवंत २५०,३०१, ३०६ ते ३१५, ३२१
भवानी शिवराम ६०
भागवत, शिक्षक १७९,२०४
भागवत, सदाशिव २३३,२४१,३४४
भांगले ३१९,३५०
भांडारकर, डॉ. २२१
भालेराव, शिक्षक ३०१
भिकू, पेंढारी ९१, १४८
भिडे, नरहरपंत ३०६
भिडे, बळवंतराव ३०६
भिंडे, वासुअण्णा ३०७
भीष्मक राजा १८,२०,२१,२३
भोसले, अमरावतीकर भाग १ प्रकरण २
भोसले, कान्होजी ३९,४२,४३,४६, ५३,५५,५६,७४,७५
भोसले, कुसाजी ५६,५

–भ–
भोसले, कृष्णराव ५८,६२
भोसले, कृष्णाजी ५८
भोसले, केशवराव (नट) ३३४
भोसले, जानोजी, नागपूरकर ५८, ६३,६४
भोसले, जिजाजी ५६,५८,५९,६२
भोसले, परसोजी ३९ ते ४३
भोसले, बापूजी ४० ते ४३, ५६,५८,
भोसले, बाबासाहेब ५८,६२,७९
भोसले, बाळासाहेब ३८,५८,६२,६३
भोसले, बिंबाजी ४३
भोसले, मुधोजी ३८ ते ४०, ५८ ते ६१
भोसले रघूजी (रघुजीबाबा) २८,३९, ४५, ५१ ते ५३, ५५ ते ५७, ६८, ७४, ७५, ७८ ते ८०, १९६
भोसले, रघूजी (दुसरा) ६१,६२
भोसले, राणोजी उमराबतीकर उर्फ सवाई सन्ताजी १४,१६,१७, २८,३१, ३७ ते ४१, ४३ ते ५८, ६२ ते ६४, ६७ ते ७८, ११८
भोसले, धाकटा राणोजी दुसरा (जिजाजीचा मुलगा) ५७ ते ५९, ६२, ७७ ते ७९
भोसले, रामचंद्र ५८
भोसले, रामाऊ (राणोजीची चुलती रमाबाई) ५२,७३
भोसले, रायाजी ५६
भोसले, रूपाजी ३८ ते ४३
भोसले, शहाजी राजे ३८
भोसले, शिवाजी उमराबतीकर ५८ ते ६२, ८१,८२
भोसले, सखूजी (उमरावतीकर राणोजीचा मुलगा) ३८,५६,५८
भोसले, सखोजी (राणोजीचा पणतू) ३८,५८,६१,६२,७९,८०
भोसले, सन्ताजी (राणोजीचा मुलगा) ४३,५६,५८
भोसले सन्ताजी (राणोजीचा वडील भाऊ) ४३,४४
भोसले, सवाई सन्ताजी राणोजी भोसले, उमरावतीकर पहा.
भोसले, साबाजी ३९ ते ४१, ४३, ५२, ५७ ते ६०, ७८,८१
भोसले, हिंगणीकर ३८ ते ४३
–म–
मकरंद भारती, गोसावी १४,१६
मॅकेन्झी, कर्नल, कमिश्नर २६३
मॅकेन्टॉश, डी. जे. (शिक्षणाधिकारी) १८१,२०२,२०६
मंडलोई, नन्दलाल (इन्दूर) ५३, ७६,७७
मलबारी शेठ २२१
मलिकंबर १२१
मसेर १३२
महंमद, पहेलवान ३१०
महंमदशहा बहामनी २७६
महंमदशहा बादशहा ४४,५२,७२
महाजनी, विष्णु मोरेश्वर १८०,२०५
महिपतराय, राजा (सुभेदार) ११३, ११४,१२४
महिपतराव (पो. इन्स्पे.) ३२५
माणिकराव, प्रोफेसर, बडोदा ३१५
माताजी कलकत्ता २९०, २९१

मार्तंड रामचंद्र ३३३
मालवीय, पं. मदनमोहन २३३, २३६,२४०,२५२
मालज (बाबासाहेब खापर्डेंचा मित्र) ३०१
मॉरीश, सर, डिस्ट्रिक्ट जज् ३३१
मॉर्निंगटन १४९
मिंटो, लॉर्ड (ग. ज.) ३३६
मिसाळ, सदोबा २६३
मीर आलम (निजामाचा दिवाण) ११३,११४
मीर साहेब, ठग–अमीरअली पहा.
मुकर्जी भास्कर २०५
मुकुंद बुवा, गायक २५०
मुजुमदार, अंबिकाचरण २३३,२४३
मुंजे, डॉक्टर, नागपूर २१३,३४४
मुधोळकर, रा. ब. रं. न. तथा तात्यासाहेब– २०६,२१३, २२० ते २२२, २२६ ते २३३, २३६, २४३, २४५, २४८, २५३, २६०, २९७, ३००, ३२१, ३३८, ३३९, ३४२, ३५३
मुनीश्वर (ज्योतिषी) ३१
मुळे, हेडमास्तर ३१०
मृगेन्द्र शंकर स्वामी २९५
मॅकेन्झी, ब्रिगेडीअर १२५,१२६
मेयो, लॉर्ड, व्हॉईसराय १९४
मोदी ६६
मोर्ले, सर जॉन, भारत–मंत्री ३३६
मोहरील, वकील ३४४
मोहंमद अली, सरनायब, उमरावती १२६
मोहंमद बुदाखान तालुकदार उमरावती १२६
मौलाबक्ष, राजगायक, बडोदा २४९ ३३७

य

यादू ३१०
यासीनखान ३०८
येसूबाई, छत्रपती ४३
योगानंद स्वामी, उमरावती ३३६
योगानंद स्वामी, परतवाडा ३१३

र

रॅण्ड, वॉल्टर चार्लस् २२७, २२८, २३८, २३९, २४७, २४८, २७४, २७५, ३०१
रॅली ब्रदर्स १३५, ३२२
रमजानखान (सारंगी–वादक) ३२४
रमाबाई (राणोजी भोसलेची चुलती) भोसले, रामाऊ पहा
राघो गोविंद ४८
राजगुरु, क्रांतिकारक (लाहोरकट) ३२६
राजन, पेंढारी ९८, १०१
राजवाडे, इतिहासाचार्य वि. का. १, ३१६
राजाराम, छत्रपती ३६ ते ४३
राजिदेकर, अकोला २३३, २४१
राठी, किसनदास गोवर्धन २२०
राणबा ४८, ५०
रानडे, न्या. मू. म. गो. २३१, २३३, २९८
रानडे, महादेव विनायक २७४, २७५
रामकृष्ण उमरावतीकर, ग्रंथकार १३

रामकृष्ण परमहंस, स्वामी २८२
रामचंद्रपंत अमात्य ४०
रामचंद्र नारायण, इ. ए. सी. २१५
रामप्यारी बाई २५०
रामबिलास गनेडीवाल २२१
रामरतन गणेशदास ३५३
रामलाल २१९
रामाऊ उर्फ रमाबाई साबाजी भोसलेची पत्नी व राणोजीची चुलती, भोसले रामाऊ पहा.
रामू, नाईक (पेंढारी) १२५
रुक्मी १८, २१
रुक्मिणी देवी १८ ते २४, २३५
रुक्नुद्दौला, दिवाण ६०
रूपराय ४८
रेनॉल्ड, कॅप्टन १२८
रोशन महंमद (तालीम-मास्तर) ३०७
रोहिणखेडकर, ह. रा. २०३
रौलट, न्यायाधिश, इंग्लंड ३४५

-ल-

लाला लजपतराय ३२६, ३२७
लॉयल, सर आल्फ्रेड ४
लिली, डब्ल्यु. एस्. २२१
ल्यूकास २२५
लेंबे सराफ २०४
लो, कर्नल, जॉन, रेसिडेंट हैद्राबाद १७६
लोपामुद्रा (अगस्तीची पत्नी) १८

-व-

वऱ्हेकर, नामदेवबुवा, गवई २५०
वॅलेस, कर्नल ६६, १५० ते १५२
वाघ, सन्ताजी ४९
वाडिया, बी. पी. ३४२
वाच्छा, दीनशा एदलजी २३२, २३३, २४०, २४४, २९८
वॉलकर्ट ब्रदर्स १३६
वासील महंमद बासील महंमद पहा
व्यास, पन्नालाल २५०, ३१०
विठ्ठलानंद सरस्वती (विठ्ठलगीरबुवा) १८२, १८८
विदर्भ, राजा १३
विनाजी नीळकंठ ५५
विवेकानंद, स्वामी २८२
विष्णुपंत, शिक्षक २०४
विष्णु हरी २२१
विसाजी हरी ७६
व्हिक्टोरिया, महाराणी २२७, २३७, २४१, २४५, २७५, २८४
वीर वामनराव जोशी २०४, २५०, २९७, ३००, ३०१, ३१५, ३१९, ३३४, ३३५, ३३७, ३४४, ३४५, ३५०
वीर समशेरजंग, नेपाळ नरेश २९०
वुंडहाऊस, आर. डब्ल्यु. इंजि. २९०
विठ्ठल बल्लाळ, वऱ्हाडचा सुभे. ७८
वेंकटराम ५१
वेडरबर्न सर २४४
वेलफोर, जनरल सी. बी. १२९ते१३१
वेलस्ली, लॉर्ड ऑर्थर ६२, ६४ते६६, १४६
वैद्य, कृष्णराव (हेडमास्तर) २०४
वैद्यबंधू (अंबादास व अनंत) २०४
वैद्य, बाबूराव, (पेशव्यांचा प्रति.) ६०

-श-ष-

शंकराजी नारायण सचिव ४०

शंकरन् नायर २२७, २३० ते २३२, २३६, २४०, ३२५
शहाजहान बादशहा ११४
शहाजी पाटील
शहाबुद्दीन, प्रवासी ३६१
शाहू, छत्रपती १७, ३७, ४२ ते ४४, ५२, ५३, ५५ ते ५७, ६७, ७० ते ७२, ७४ ते ७७, ११८
शाहणे, डॉ. डब्ल्यू. आर. ३४३, ३५७
श्यामनारायण, पंडित २३३, २४०
शिकंदरजहाँ तथा अकबरअली तथा फौलादजंग, निजाम ८९, १२२, १२७
शितू पेंढारी चित्तू पेंढारी पहा
शिंदे, दौलतराव १५६
शिवरतनसिंग २३३, २४४
शिवाजी, छत्रपती ३८ ते ४३
शिवानंद, स्वामी ३३६, ३३७
शिवाप्पा गुराप्पा (कॉन्ट्रॅक्टर) ३१९, ३५०
शिशुपाल, राजा २१
शुक (शुकाचार्य) २०
शेटे, पर्वताप्पा १२०
शेटे, शिवराम आप्पा १२०
शेवडे, टी. एल्. तथा दादासाहेब वकील ३३७, ३४३, ३४४, ३५७
शेषाद्रि, नारायण २६२, २६३

–श्र–श्री–

श्रद्धानंद, स्वामी ३४७
श्रीकृष्ण, भगवान ६, १८, २० ते २४, २३५
श्रीनिवासराव, प्रतिनिधी ७२
श्रीनिवास शास्त्री, शिक्षक ३०१
श्रीराम रूपराम, सावकार ३५३
श्रीराम शालीग्राम, सावकार ३५३

–स–

सच्चिदाश्रय स्वामी ३०७
ब्रम्हचारी दिक्षित
सतकर, येठ्याजी ४८
सतकर, विभूतराव ४९
सत्यपाल, डॉ. (पंजाब) ३४७
सदाशिवपंत, भाऊ ६६
संभाजी राजे, छत्रपती ३९ ते ४३
सय्यद बंधू ४३, ४४
सलाबतखान, नबाब, एलीचपूर ८७, १५०, १५१
साऊंडर, मेजर सी. बी. कमि. १७७
साठे, खंडेराव २७४
साठे, प्रोफेसर २३४, २४४
सातारकर, कलावंतीण ३२४
सालारजंग, सर २४१, २०७, २०८
साबजी, श्री. विष्णुशेट ३१२, ३१३
सिकंदरजहाँ १८९
सिक्लेअर, डॉक्टर २०५
स्मिथ दलाल २०८
स्लीमन कर्नल १५४
सुखदेव (क्रांतिकारक) (लाहोर कट) ३२६
सूरज नारायण, जज् २१५
सुशीला (कौडिण्य ऋषीची पत्नी) ६
सेटलवाड २३२, २३३, २४५
सोयराबाई, छत्रपती ४१
स्कॉट कॅप्टन १८१
स्लोकॉक, एफ्.एस.ए, (चिफ् सेक्रे. व कमि.) ३५०, ३५१

–ह–

हक्सर, कॉन्ट्रक्टर १३९
हद्दूखां ग्वाल्हेर ३१८
हंबर्डे रावजीपंत, सावकार २९०
हमीद अब्दुल २५३
हॅमिल्टन, कॅप्टन १२५
हरकरे, डी. व्ही.
(अण्णासाहेब) ३३७, ३४३, ३५७
हॅलिबर्टन, कर्नल १४९
हरि गोविंद ५३
हरि बल्लाळ ६४
हंसूमियां, नवाब,
एलीचपूर १०८, ११६
होळकर, शिवाजीराव ३११
हॉर्सब्रूक, कमिश्नर २२९
हिरु, पेंढारी ९८, १४६, १४७, १४९
हिल्लॉप, स्टेफेन २६२
हील, ब्रिगेडीअर १८२, १८१
हुसेनअली ४४
हयूम साहेब २२९ २४४
हेग, लेफ्टनंट (असि. कमि.) २१५
हेस्टिंग्ज, लॉर्ड, (ग. ज.) १५४
होळकर, मल्हारराव
(मल्हारबा) ४८, ४९
होळकर, यशवंतराव ६५, १५४

भाग १ ला

विशेष–घटना–संघटना–स्थल सूची वगैरे.

–अ–

अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद (अधिवेशन अमरावती) ३३४
अखिल भारतीय शारीरिक शिक्षण
परिषद (अधिवेशन अमरावती) ३१५
अखिल महाराष्ट्र शारीरिक
शिक्षण परिषद ३१५
अमरावती, अमॅचुअर
नाटक मंडळी, २५४, ३३६
(अमरावतीकर संगीत नाटक मंडळी)
अमरावती –इंग्रजी स्पेलिंग– ३,४
अमरावतीत इंग्रजी पलटणी ६५, ६६
अमरावती, इन्द्राची ६
अमरावती कसबा आणि पेठ
अमरावतीचा (पहिला) २७, १७९
डे. कमिश्नर १७४
अमरावती परगणा १७८
अम. व बालगंधर्व ३०२ ते ३०५
अमरावतीत माधवराव पेशवे ६३, ६४
अमरावतीत लॉर्ड वेलस्ली ६४
अमरावतीत १८५७ चे
योध्ये १८१ ते १८४
अमरावतीचे शेटचे ११९, १२०
अलीपूर बॉंब केस ३२९

–आ–

आचार्य परिषद, यवतमाळ ३५४
आदिनाथ, जैन मंदिर ८, ११, २६

इ–ई

इंडिअन नॅशनल कॉंग्रेस
(राष्ट्रीय सभा) २५३, ३५७
इन्द्रभुवन थिएटर २५२ ते २५४, ३२७
३२७, ३२९, ३५४
ईस्ट इंडिया कंपनी ३६२

—उ—ऊ—

उदय, वृत्तपत्र ३४४
उदासी बाबाचा आखाडा ३०
उदुंबरावती १ ते ८
उंबरावती १ ते ८, २०
उमरावती, कसबा, पेठ २७, १७९
उमरावती, नाम व्युत्पत्ती ७, ८
उमरावतीच्या निम्मे मोकादमीचे खरेदीखत १४ ते १६
उमरावती, परगणे १७८
उमरावती भोसल्याची १६, १७, १८ व (उमरावतीकर भोसले) संपूर्ण प्र. २ रे
अमरावतीकर भोसल्यांची वंशावळ५८
उमरावती राजधानी १०, १७६

—ए-ऐ—

एकवीरा (मोठी) देवी १२,२७,१९६
औरंगपूर (अवरंगपूर) मजरे ११,१३ १४, १६, २८, ३७, ११६, २६०, २६१
औरंगजेबाची सनद ११,३१ ते ३३
औरंगजेब नामा ३६२
अंबा दरवाजा ११३,११५,११६, ३२३, ३२४, ३३६
अंबादेवी तालीम (आखाडा) ३०
अंबा नाला २६
अंबा मंदिर ४,११,१२,१९,२०.२२, २४, २७, २९, १९६, २३५, ३२५ ३२६, ३३६

—क—

कन्फेशन ऑफ् ए ठग ठगाची जबानी पहा
कंपनी गार्डन (राजेंद्र बाग) २१९
कँप म्युनिसिपॅलिटी न. पा. कँप पहा
कलानिकेतन, व्हि. टे. इंस्टिट्यूट पहा
कलावन्तिणी, अमरावती ३२३ ते ३२६
करंदीकर, (चिट. अम. काँग्रेस-अधिवेशन इ. स. १८९७) २३२
कर्तव्य (मराठी) वृत्तपत्र ३५४
कसबे अमरावती २७, १७९
कस्तुरबा गार्डन, कोरोनेशन गार्डन पहा
कापूस व्यवसाय १२८ ते १४५ १६६, १९६
कायदे कौन्सिल (मध्य. वऱ्हाड) ३३९
काशीबाई प्रा. हायस्कूल ३००
कॉटन यार्ड, कॉटन मार्केट १३४ते१४१ १५८ते१६५, १६८ते१७२,३३१,३५४
काँग्रेस अधिवेशन इ. स. १८९७ २२७ते २४७, ३२५
(अ) अधिवेशनातील ठराव २४२ ते २४४
(ब) अध्यक्षांचे भाषण २३६ ते २४०
(क) स्वागताध्यक्षांचे भाषण २३३ ते २३६
किंग एडवर्ड कॉलेज, वि. म. वि. पहा
किर्लोस्कर नाटक मंडळी २५७, ३०५
किल्लहर्लेंड शाही ३१३, ३२४
कुंडिनपूर १८, १९, २२ ते २५
कुंभारवाडा २७,६३
कोरोनेशन गार्डन (कस्तुरबा गार्डन) २६०, ३३३, ३३४
कोरोनेशन मंडपाची होळी २८४ ते २८९

—ख—

खडकारी पुरा २८,२९

खापर्डे, दादासाहेब यांचे काँग्रेस अधिवेशनातील स्वागताध्यक्षीय भाषण (१८९७) २३३ ते २३६
खुनारी खिडकी ११२, ११४, ११५
खोलापूरी दरवाजा ११२, २५८
–ग–
गडगडेश्वर संस्थान ३३३
गणेश थिएटर (प्रभात टॉकीज) २५७, २५९, २९२, २९८, ३३८, ३५४
गनेडीवाला फर्म २६१
गंधर्व नाटक मंडळी ३०५
गंभीरपूर (गमरापूर) २५
गंभीरपूर हनुमान संस्थान २५८,२६१
गांधी चौक २६२
गायनशाळा, पहिली २४९,२५०
–घ–
घंटाघर (घंटी घड्याळ) २५५,२५६
–छ–
छत्रपुरी खिडकी ११२
छत्री तलाव (कालापाणी) २१६ ते २१८, २५१
छत्रे सर्कस २९१,३१७,३१८
–ज–
जमनादास पोतदार फर्म ३१८,३५०
जालियानवाला बाग हत्याकांड ३४७ ते ३४९
जिल्हा बोर्ड २५१
जुगलकिशोर व्यायाम शाळा ३०
जुना बजाजा २८२,९
जुनी कोतवाली २५६, २५७, २९६
जुनी टाकसाळ २८, २९, ११९
जुम्मा मशीद ११,२६,२६०,२६१
जेल (तुरुंग) २६१, २६२
जेल, स्त्रियांचा जुना २६२
जोग चौक ३०, २५२, २५५, २८९, २९०, २९७, ३४३, ३५४
जोग धर्मार्थ दवाखाना २८९
जोशी मार्केट ३३१
जोशी हॉल (ब्रम्हविद्या मंदिर) २८९
–झ–
झाडखंड महादेव मंदिर ३३३
ट–ठ–ड
टाकसाळ ११८, ११९
ठग १५३, १५४
ठगाची जबानी ८६, ८८ ९० ते १११
डेप्यु. कमिश्नर, पहिला १७४, १७६
डेप्यु. कमिश्नर (इ. स. १८५३ ते १९०८) २६५ ते २६७
–त-थ–
तलाव मोहल्ला २८
तारखेडा २५, २६, २८, १३१, १४०, १६०, २६१
तुकाराम आखाडा ३०, २५०, ३१०
तुळजागीर बाबाचा आखाडा ३०
थिऑसॉफिकल सोसायटी २५१, २५२
–द–
दत्त मंदिर २९, १२०, १८२, २९८
दरबार डे. इ.स. १९११ ३३१
दलेलपुरी नाला २५
दहिसाथ ३०, ३२३
दिल्ली दरबार ३३७
देवगिरीचे यादव १०
–ध–
धनराज लेन (ओळ) २८,११७,१९१

धनराज पोखरमल फर्म ३५३
धान्याचे भाव (१८५३ ते १९३०) ३६५ ते ३६७
–न–
नगर पालिका (शहर) अमरावती १३७ ते १४०, १५१ ते १६५, १६८ ते १७०, १९२ ते १९४, २२४, २२६, २५१, २५६, २५८, २५९, २६१, २८९ २९३, ३३९, ३४६, ३५४,
नगर पालिका (कॅम्प) अमरावती २१८, ३५४
नगर पालिका – अमरावती
(अ) पहिली निवडणूक १९३
(ब) अध्यक्ष – उपाध्यक्ष (इ. स. १८७० ते १९७७) २६८ ते २७२
नगर वाचनालय (नेटिव्ह जनरल लायब्ररी) २०७, २२२
नथ्थूसा पासूसा फर्म ३५३
नागपूरी गेट ११२, २५७
नाटक मंडळी, अमरावतीची पहिली २५४
नालसाहेब पुरा २८
नीलकंठेश्वर मंदिर २९
नेकोलेट पार्क (नेहरू मैदान) (शिवाजी पार्क) २५०, २८६, २८९, २९३, ३१७, ३३४, ३५४
नेटिव्ह जनरल लायब्ररी
नगर वाचनालय पहा.
न्यू बेरार कंपनी १७२
न्यू हायस्कूल २८९
–प–
पटवी पुरा २८ ते ३०
पटेल खिडकी ११२
परकोट २८ ते ३०, ५१, ८९, ११२ ते ११६ २२१, २५७, २६३ ३१८ ते ३२०, ३३२
परगणे अमरावती १७८
पहिला डेप्यु. कमिश्नर १७४
पहिली नाटक मंडळी (अमरावतीची) २५४
पहिला पुनर्विवाह २५१
पहिला सार्वजनिक गणेशोत्सव २५४
पहिली प्राथमिक शाळा २०३
पहिली बँक (बँक ऑफ बॉम्बे पहा)
पहिली राजकीय अटक ३२०, ३२१
पहिले महायुद्ध ३४०, ३४१
पहिले सरकारी हायस्कूल ३०, २०१ २०५, २०६, २९९
प्रभात (पाक्षिक) ३५४
पाटणकर संगीत नाटक मंडळी २५८
पाटिल – पटवारी परिषद २४८, २४९
पेठ अमरावती १७९
पेंढारी १५४, १५५
पेंढाऱ्याचा अमरावतीवर हल्ला ९० ते १०९, १४८, १५०, १५१
पेस्तनजी फर्म १३०, १३१
पोस्ट आफीस, दहिसाथ ३३२, ३३३
प्रताप व्यायाम शाळा ३०
प्रभात टॉकीज २५८
प्रमोद-सिंधू (मराठी) वृत्तपत्र ३५४
प्रांतिक राजनैतिक परिषद (अमरावती अधिवेशन) ३४२
प्रायव्हेट हायस्कूल ३०० ते ३०२ ३०६, ३१०

–फ–
फर्डिनाण्ड, ऑस्ट्रियन युवराज ३४६
–ब–
बंडखोर रामू नाईकाचा धुमाकुळ १२५
बंडाच्या (१८५७) काळातील अमरावती १७९ ते १८४
बंसीलाल अभीरचंद फर्म १९२, १९३
बसवेश्वर चौक ३०
बसवेश्वर जयंती, लिंगायत पंथ २९६
बॅन्क ऑफ् बॉम्बे १३५, १९१, ३५३
ब्रम्हविद्या मंदिर (जोशी हॉल) २५३, २५४, २९७, २९८, ३३७
बालाजी मंदिर १९६, २६२
बालाजी व्यायाम शाळा ३०
बाहुबली व्यायाम शाळा ३०
बिशनचंदची (राजा) हवेली ११६
बुधवारा, अमरावती २८, १२०
बुद्धिस्वामीचा मठ २९५
बेरार एज्युकेशन सोसायटी ३००
–भ–
भाजी बाजार ८, २८, ३०, ३३३
भुसारी गेट (जवाहर गेट) २९, ११२, ११५, ११६, ३३८
भूक मोर्चा, पहिला २२५
भोसले अमरावतीकर, वंशावळ ५८
भोलेश्वर महादेव मंदिर २६
–म–
मजरे औरंगपूर, (औरंगपूर पहा)
मजुरीचे दर (इ. स. १८९१ ते १९१२) ३६४
मराठी नॉर्मल स्कूल २०३
महाजनपुरा २५ ते २७
महाजनपूर दरवाजा ११२
महायुद्ध पहिले (१९१४ ते १९१८) ३४६, ३५७
महाराष्ट्र नाटक मंडळी ३१५
महाराष्ट्र व्यायाम शाळा (महाराष्ट्र-तालीमखाना) ३०, २८९, ३२१
महिला महाविद्यालय २८९
माणिक तोला बाँब केस ३२८, ३२९
माता खिडकी २८, ११२, ३३३
माल टेकडी २६, ११४, ३००, ३११
माळीपुरा २८
मिशन स्कूल २०३
मुरलीधर मंदिर २९
मुधोळकर पेठ २९५
म्युनिसिपल सराय २६०, ३५४
मोफ्युसल कं. (ऑईलमील) १७२, ३५४
–र–
रॅली ब्रदर्स : रॅली प्लॉटस् १३६, १६१, ३२१, ३५३
राजापेठ २५
राजापेठ तलाव २५१, ३११
राजेंद्र बाग (कंपनी गार्डन पहा)
राणोजी भोसलेची वतने ५२ ते ५३
रामजी काण्णव कंपनी ३५४
रामलीला, अमरावती २५०, २५१
राष्ट्रीय महासभा (इंडियन नॅशनल काँग्रेस, पहा)
राष्ट्रीय शाळा २९९, ३००
'राक्षसी महत्वाकांक्षा' नाटक ३३४, ३३५
रुक्मिणी-हरण आख्यायिका २० ते २४
रेसकोर्स अमरावती २१८, २१९

रौलट ॲक्ट, काळा कायदा ३४७
–ल–
ललित कलादर्श नाटक मंडळी ३३४
लक्ष्मीनारायण मंदिर २६, १८२
१८३, २४९, २५६, २९७
लाईट ट्रॅम वे १३७
लोकसंख्या – अमरावती
(अ) इ. स. १८६७ ते १९०१
१९४ ते १९६
(ब) इ. स. १८६७ ते १९७१ २७३
–व–
वकिली व्यवसाय २११ ते २१५
वक्तृत्वोत्तेजक सभा २१९, २५७
वजने – मापे (कोष्टके) ३६८
वडाळी तलाव
वनिता समाज २५३
वऱ्हाड समाचार, वृत्तपत्र २०९, २१०
वसईची मोहीम ४८ ते ५०
वस्तूंचे भाव (१३ वे शतक ते
२० वे शतक) ३५९ ते ३६३
वाग्विलास वृत्तपत्र ३५४
वॉल्कर्ट ब्रदर्स १३६, १७१
१९७, ३५३
व्यापार समाचार वृत्तपत्र ३५४
विठ्ठल मंदिर २९
विदर्भ महाविद्यालय
(किंग एडवर्ड कॉलेज) ३३९
वेस्ट पेटंट प्रेस कंपनी १७२
व्हिक्टोरिया टेक्निकल इंस्टिटयूट
(कला निकेतन) २०६, ३३८,
३३९, ३५४
वृत्तपत्रे ३५४
–श–ष–
शंकरन् नायर यांचे अमरावती काँग्रेस
अधिवेशनातील (इ. स. १८९७)
अध्यक्षीय भाषण २३६ ते २४०
शाळा, शिक्षण संस्था २०० ते २०६
शिवाजी व्यायाम शाळा ३०
शेटे अमरावती ११९, १२०
श्रीराम व्यायाम शाळा ३०
–स–
सक्करसाथ २८, २९, ११६
सन्देश, दैनिक ३३६
सम्मित्र समाज २५४
सफर ए–बरार (उर्दू–वृत्तपत्र) ३५४
साखर डोह २६
सात खिराडी ३२३
साबणपुरा २८, २६०, २६१, ३२३
सिटी कोतवाली (नवी कोतवाली)
२५६, ३३१
सिटी क्लब २६०
सोमेश्वर मंदिर ८
स्त्रियांचा गायनाचा जलसा २२८
–ह–
हनुमान व्यायाम शाळा २०,२०४,२१४
हनुमान संस्थान, गंभीरपूर
हमालपुरा २१०
हार्वे ॲंड सभापती १७२
हायस्कूल, सरकारी २०, २०१
२०५, २०६
होमरूल लीग चळवळ
२५२, २२७, २४२, २४५, २५७
–ज्ञ–
ज्ञानेश्वर मंदिर २९६

अमरावती शहराचा इतिहास

भाग दुसरा

○ व्यक्ति - सूची ○

–अ–

अकबर बादशहा ८५० ते ८५२
अग्रवाल, बाबूलाल ७०२
अग्निहोत्री माधवराव ४२४, ६१२, ७३०
अणे, लोकनायक मा. श्री. तथा बापूजी ३७०, ९६, ९९; ४२६, ३१, ३२, ३६, ५४, ६३, ते ६५, ७९ ते ८२; ५०३, २०, २६, ३५, ३६, ४२, ४३, ५९, ६०, ७३, ७४; ६०५ ते ६०७, ६१८, ३१, ३५, ३६, ३९, ४१, ४५, ४७, ५०, ५५, ७७, ७८, ८७; ७०६, ७०७, ९४, १६, २०, २१, २३, २५, ३३, ४३, ४५, ४७, ५५, ५७, ५८, ६१, ८५, ८८, ८९
अनगळ वकील, रा. ब. ४२४, ६१२, ७३०
अनयकुमार, लाहोर कट ६६२
अनवरखान पठाण ७०२
अंबुलकर, पंढरीनाथ ६१८, ७१६
अब्दुल करीमखां ५६०
अब्दुल कादर वकील ५०८, ५२५, ६८९, ७७३
अब्दुल रसीद ४५२, ५५०
अब्दुल रौफशहा–पांढरकवडा ३९६, ४२९, ४३०, ४३२, ४३९, ४७८, ४८१, ७४४
अब्दुल वहाब ६३९, ६४०, ७४१
अब्दुल रा. ब. रहमानखां ५१८
अब्दुल हफीज ३७५
अब्दुल्ला ७१८
अब्बास तय्यबजी ५४१, ६४०
अब्बासअली बोहरा ७२५
अब्रु, डॉक्टर ५५६, ५८०
अभ्यंकर, एक्झि. इंजीनिअर
अभ्यंकर, तात्यासाहेब ४१५, ६६७
अभ्यंकर, बॅ. मोरोपंत नागपूर ४८०, ५४२, ६४० ते ६४२
अभ्यंकर, यवतमाळ ६९१
अभ्यंकर, सौ. येसूबाई ५६
अभ्यंकर, श्रीमती राधाबाई ७३६
अभ्यंकर, विमलाबाई ६४२
अमरसिंग, चांदूर रेल्वे ७०२, ८०८
अमरसिंग, सब् इन्स्पे. ४६०
अम्बाप्रसाद ६२१
अमीन, केशवराव ४५४
अमृतकर, नारायणराव वकील ५१६, ५१८, ५२४, ५६५, ७२७
अमृतीबाई ४३८, ८६३
अयाचित, दासोपंत ४८९
अयोध्याप्रसाद, बी. ए. ५७९, ५८०
अल्लाउद्दीन खिलजी ८५१
अली इमाम, सर ४९१
अली बंधू ४३०, ४४०

(अ) मौ. महंमदअली
४४०, ७०३, ७०४
(ब) मौ. शौकतअली
४२९, ३०, ३४, ४०, ८१
अलीभाई, शेठ (बोहरा) ७२७
अलेक्झांडर ५७२
अल्मेडा, कुमारी ६१६
अवस्थी, रामेश्वर ५६५, ६५२, ६८०, ७०२, ७१८, ७६३, ७६५, ७६९, ७७३, ७९७, ८०५
असनारे, ज. के. तथा भाऊसाहेब वकील ३७९ ते ७२, ७६, ७८ ते ८२. ९१, ९२, ९४ ते ९७, ४०५, १९ ते २२, ३१, ३२, ४३, ६३, ५५, ६७, ८२४
अळतेकर ७२७
–आ–
आगरकर, एम्. व्ही. ४८१
आगाशे, मोरुभाऊ ८५६
आचार्य, लक्ष्मीशंकर ६८३, ८००
आजनकर बाबूराव ७०२
आझाद, मौ. अबुलकलाम ७६४
आझाद, मौ. अहंमद हुसेन ३९५, ४४१, ४६
आझाद मौ. इब्राहीम चांदभाई ६६८, ५५, ७१७, २६, ४७, ४८
आझाद, सरदार पृथ्वीसिंग ४५७ ते ४६१
आझाद, बॅरि., मुंबई ५०९
आठवले, सौ. ५८०
आंबेडकर, डॉ. बाबासाहेब तथा भी. रा. ५६८, ९६, ७३४, ९५
आयंदे, सौ. सावित्रीबाई ६५८, ५९
आर्मिटेज, डे. कमि. ५१९, ३४
आर्य, सुखदेव ६६१, ६८०, ७१७
आवंके ६०७
आवटे, स. अ., वकील ४१३, ६४९, ६८९, ७६६
आवारी, जनरल ४६९, ७२०, ७८१
आष्टीकर, ब. ना. ३९१
आरसकर, व्ही. बी. (दादासाहेब)
आसेगावकर, दादासाहेब पाटील ५२१
आळशी, पां. गो. वकील ३९९
–इ-ई–
इटकीकर, उत्तमराव ५५५
इनामदार, न. ल. (हे. मा.) ४९०, ५०७, ५१४, ५४०, ५७५, ६१६, ८०४
इनामदार, सौ. सरोजिनी ७९१
इन्द्र, प्रोफे. (स्वामी श्रद्धानंदाचे पुत्र) ५७०
इन्दूरकर, पोलिस इन्स्पे. ४२७, ६६०, ६७१
इमामबक्ष, पहेलवान ५००
इरवीन, लॉर्ड (व्हाइसरॉय) ५८७, ५८८
ई. राघवेन्द्रराव, नामदार ५५४, ६०९, ७२०, ७८२, ७८८
ईश्वरचंद्र विद्यासागर ८५४
ईश्वरसिंग, सरदार, हे. मा. ५१६
–उ ऊ–
उगले, व्यं. मा., सदस्य न. पालिका ६१६
उडबळे, रामाप्पा ४२२

उदेभान उंद्राजी ६८०
उधोजीराव वकील, नागपूर ३६९
उपाध्ये, कवि जयकृष्ण
उपाध्ये, सौ. जानकीबाई ४८४
उपासनी, कीर्तनकार ६८५
उंबरकर ६७८
उमेदसिंग ठाकूर ५०५
उस्मान अलीखान, नवाब, हैद्राबाद
–ए-ऐ–
एकनाथमूर्ती, प्रोफे. ४१९
एकनाथ लक्ष्मण वकील ८७३
एटकीन् ५४६
एडवर्ड, सप्तम, बादशहा ४७४
ऐय्या, गोपाळकृष्ण ४७७
–ओ–औ–अं–
ओक, प्रिन्सि. अण्णासाहेब तथा
दामोधरपंत ४२२, ८९, ५१४, ३१, ३९, ३१६, २३, ७३०, ८९१
ओक, आप्पासाहेब ६८३
ओक, टी. एल्., वकील ४३६, ८१
ओक, बाजीराव ६४२, ८१
ओक, मुरलीधरपंत ५७६
ओक, प्रमीलाताई ६५१, ७९४
ओक, सौ. रमाबाई, अकोला ७३४, ५७
ओक, सौ. राधाबाई ६६५, ८६५
ओक, वैजनाथपंत ५७६
ओगले, गोपाळराव, संपा. महाराष्ट्र ८०८
ओझरकर, बाळ ६६७, ७६, ७६७, ६८, ७२, ७५
ओतुरकर, प्रोफे. नासिक ७४१
ओगले, ल. कृ., एम्. एल्. सी. ५२२, ५१, ५४, ६१, ६३, ६४, ६६, ६२१, ८७, ७२९, ३३, ९५, ८००, ८०८
ओझरकर, आबासाहेब तथा के. वा., वकील ३८५, ८७, ९१, ४२९, ३२, ६५९, ६०, ६२, ६५, ६६, ६६, ६८, ६७० ते ६७२, ६८०, ७१३, १४, २३
ओन्स्, डाय्. पब्लीक इन्स्ट्रक्शन ४७२
औंधकर, नट ५२२
कदम, पंजाबराव ७०२
कदम, मारोतराव ८००
कन्हैयालाल, पं. रायबहादूर ४०३, ५७६
कन्हैयालाल शेठ ३८२
कंवलवार, भय्याजी ७७९
कवाडी, गंगाराम ७०२
कमलसिंग ७८९
करंदीकर, बाबू ८३२
करंदीकर ज. स., केसरी ७४५
कर्तारसिंग, सरदार, क्रांतिकारक ४५७
कर्वे, महर्षी अण्णासाहेब ७५० ख, ८२६, ५४
कलंत्री, कन्हैयालाल, संपा. ८३६
कलंदर ले. शे. ५४७, ५५
कलोती, द. रा. तथा अण्णासाहेब वकील ३९१, ४३१, ८०, ९६, ५०६, १२, ३६, ४२, ५१, ५४, ५६, ६२, ६३, ७५, ८३, ९०, ९१, ६०३, ६६, ६८, ७० ते ७२, ७४, ८०, ८९, ७१३, २६, ३०,

कलोती बाबूराव ६९२, ७१८, ८३, ८२२
कलोती, रामराव ८१७
कलाल, हेमराज ८१८
कल्याणकर ६०७
कल्याणीदेवी ४४७
कवरनाथ, लाहोर कट ६६२
कवीश्वर, श्री. ज. ६३५
काजळे, भीमराव ७९८
कांडलकर, मुकुंदराव ७७१, ७७२
काणे, सौ. इन्दिराबाई ८५९
काणे, डॉक्टर, परतवाडा ७२३, ७२७
काणे, द. कृ. ५०५, ५१३
काणे, बॅरि. भास्करराव ५४७, ५५, ६१३, १६, ८५९
कादरमियाँ, अवलिया ८४२, ४३
कानडे, पं. दिनकरशास्त्री ५६४, ७०, ७४, ६२२, ५१, ७१४, २५, २६
कानफाडे ४७१
कानिटकर, रा. अ. कौन्सिलर ४७१, ८०, ८१, ५०५ ५०९, १४, २०
कापडिया खुशालचंद ७२५
कापसे ६०७
कांबळे चित्रकार ६८२, ९०
कारखानीस, त्र्यं. सी. (अण्णासाहेब) ५२३
काशीकर, श्रीनिवास ७७५
काशीप्रसाद ३८९
काशीराव ७८०
कासमपुरे, ग. सी. ६३५
काळे, यादव माधव ४६३, ८०, ८९, ५०५, १०, ४६, ५८३
काळे, रतनलाल बापूजी ६३३, ४६, ५२, ८०, ७१४, १९, २४, २५, ४८, ६९
काळे, रा. वि. ३९१, ४९२
काळे, लक्ष्मणराव ७७७
कॉव्हेली, डी. एस्. पी. ३७९
क्रांतिकुमार ७८५
किचलू डॉक्टर, ४७८, ७८७
किलरो, शिक्षणाधिकारी ४४२, ५१९
किशोरीलाल (लाहोर कट) ६६२
कुंझरू, पं. हृदयनाथ ५०९, १०, ६२
कुंदगोळकर, रामभाऊ (सवाई गंधर्व) ८२५
कुबडे, डॉक्टर ६२१
कुमारानंद, स्वामी ६१७
कुरकुरे, संपादक ८३४, ३७
कुऱ्हाडे, जयकृष्णपंत ७२०, ८००, ८०५
कुलट, सीतारामजी ७६८
कुळकर्णी, आरोग्याधिकारी, न.पालिका ५५३, ८०, ७७७
कुळकर्णी, चिवडेवाला ७६८
कुळकर्णी, द. मा. ६३५
कृपलानी, आचार्य ५९७
कृष्णमूर्ति, कवीरत्न ८३६
कृष्णा जानूजी ६८०
कृष्णानंद स्वामी ७७८, ८६५
केतकर, एम्. एस्. ५७५
केतकर, वसंत ६७६
केतकर, ज्ञानकोशकार श्री. व्यं. ५४६

केतकर, सदाशिवराव वकील
३९६, ५०६, ८४, ९०, ९१, ९६,
६०४, ६०६, १९, २०, २२, ६१,
८९, ८७३
केदार,बॅरि. नाम , नागपूर ५८८, ७८८
केला, मोतीरामजी ७२५
केवरे, बाजीराव ७०२
केवलचंद गंभीरचंद ८२०, ७३
केवले, बा. बा., सावकार
८७६ ते ७९
केसकर, अं. गो. ८३१, ७३
केसकर, य. गो. ८३१, ३२, ७३
केसकर, रा. गो. ८३२
केसरीमल शेठ, धामक
३७९, ५४१, ६८९
केळकर, अकोला ४२०, ३२, ७८५
केळकर, नट ८३४
केळकर, नाम., रा. ब. नारायणराव
५१४, ७९९
केळकर, साहित्याचार्य न. चि. तथा
तात्यासाहेब ४६५,५०५, २७,७५०अ
केळकर, नाम. सदाशिवराव
(दिवाणबहादूर) ४७२, ७४, ८०
केळकर शास्त्री ४००
कोकर्डेकर, डॉक्टर ४३९, ५९३, ७९८
कोकाटे, महादेव ७२२
कोठीवान, सौ. सुशीलाबाई ६८५
कोतवाल, शंकर खंडो ५३१
कोनलाडे, रामभाऊ, चित्रकार
६८९, ८२३
कोरटकर, न्या. मू. ७७६
कोरान्ने, कृष्णराव ७६७, ९८
कोरे, रोडाप्पा शंकराप्पा ८३७
कोर्डे, गुरूजी ७७४, ८५, ८९, ९८
कोलते, प्रो. व्ही बी. ८०१, २३
कोल्हटकर, अ. ब., संदेशकार
कोल्हटकर ग. ना., संपा. ८३१
कोल्हटकर, चिंतामणराव, नट ८२४
कोल्हटकर श्री. कृ. ४६३, ८९
कोल्हटकर ६३८
कोल्हापुरे, कृष्णराव, नट ८२४
कोल्हे, मा. पैं. ५,५०,६०१, १८,९३
कोळी, गणपतराव, आष्टी ७०२
कोरडे, रावसाहेब ५०५, ७२३, २७
कौशिक, विश्वनाथ ५१८
–ख–
खतीब, एलीचपूर ३८१
खत्री, विठ्ठल राघोसा (बजाज) ८७७
खत्री, सदाशिव हीराचंद ३८१
खरे, कु. कृष्णाताई ५८४,९३,९६;
८६५,६६
खरे, रा. ब. रा. मो. ३७९; ४१०;
५०८,२७,२९,८६,६१६; ८३; ७३०,
७३; ८०५,७४
खंडार, नानाजी ७१३
खरे, वासुदेव शास्त्री, नाटककार ४७३
खरे, व्ही. एम्., ॲडि. जज् ५५२
खलीलदास बाबा ५८१
खाडिलकर, कृ. प्र., नाटककार, ५२७
खाडिलकर, शाहीर ५९२
खांडेकर, शिक्षक ४९०
खान, जी. ए., कमिशनर ५०६,५१२
खानीवाले, धनुर्धारी रघुनाथ
६३५, ८०७

खापर्डे, श्रीमान् दादासाहेब तथा ब. ग. ३६९, ७०, ८२ ते ८४, ८६, ९६, ९८, ९९; ४०८, १०, १६, १७ ३०, ३५, ४३, ५४, ५५, ६६, ८९, ९०; ५०१, ५०३, ५०५, ५०९ ते ५१५, ३६, ३७, ४७, ५९, ६१, ६८, ६९, ७१ ते ७३, ७६, ७७, ८८, ९० ते ९२, ९४, ९७; ६०१, ६०६, ६०८, ६०९, ५६, ८२-८३ ९१; ७०४, ३०; ८१९, २४, ३२, ३३, २९, ६०, ८४.

खापर्डे, ब. ग. तथा कविभूषण अण्णासाहेब ४६२, ८९; ५०७, २२, २३, ३५, ३६, ४७; ६०२, ६०९, १०, ८३४

खापर्डे, बाबासाहेब तथा बा. ग. ३७१, ७५, ७७ ते ८२, ८७ ते ८९, ९२, ९५; ४०५, ४०८, ४०९, १७, २० ते २२, २४, २५, २९, ३२, ३५, ५३ ते ५५, ६३, ६६, ६७, ७१, ७८, ८०, ८२, ८३, ८५, ९०, ९२, ९४ ते ९७; ५०१, ५०५, ५०७, १०, ११, १३, १५, २०, २२, २६, ३१, ३५, ३६, ३८, ३९, ४२, ४३, ४६, ४७, ५०, ५१, ५३, ५६, ५९ ते ६१, ६३, ६५, ७०, ७३, ८२, ८३, ८६ ते ८९, ९२, ९५; ६०२, ६०३, ६०७, ६०८, १३, १४, १८, २१, २२, ४६, ५०, ५३, ५६, ५९, ६०, ८३ ते ८५, ८९, ९१, ९३; ७२६, ३०, ४४, ४६, ४७, ५८, ६१, ६३, ६६, ७४, ७६, ७८, ७३, ८५, ८८, ९३ ते ९८; ८०७, २३, ३४, ३७.

खापर्डे, सौ. मनूताई ४१७, २५, ३८, ४२; ५९४; ६१३; ८६१, ६३.

खापर्डे, सौ. लक्ष्मीबाई ३८८, ४३८, ५९२, ८६०, ६३

खारकर ७१८

ख्वाजा हसन निजामी ५६२, ५६३

खुदाबक्ष ५६४

खेडकर, आबासाहेब तथा गोपाळराव देशमुख ४९३, ५२१, २२, ३५, ५५५, ५५७, ५६५, ५६६, ७४२, ७५७, ७७२, ७८१, ८०४, ८०५, ८३१

खोडे, शंकरराव ६७३, ७६८, ७७२ ७७३, ७७५, ७७७, ७९८.

खोत, डॉक्टर ५६३, ६६५

खोतकर वा. ना. ३९१, ५०६

-ग-

गंगाराम हीरामण ६८०

गजाधर ४४५

गजानन महाराज, सत-शेगाव ८४२, ४७, ४८

गडकरी, रा. ग. (कवि गोविंदाग्रज) ५२३; ६८२, ८३

गडकरी, बा. सं., कादंबरीकार ४७२; ५३६

गणपत रामजी ६७९

गणोरकर, नानासाहेब ८४३

गणोरकर, नारायणराव, दर्यापूर ४५४

गणोरकर, महादेवराव ७९६

गद्रे, अनन्तराव, नाटककार ७६४

गद्रे, बाळासाहेब, संपादक ८३७

गयाप्रसाद, लाहोर कट ६६२

गद्रे, डॉक्टर ५०६

गवई, सौ. केसरबाई ८००, ७०

गाडगे ७२९

गवई, नानासाहेब तथा ग. आ. ३७३; ४६६; ५१८, १९, ६५; ६८७; ८००, ३४.
गाडगे महाराज, संत ६०४; ८४५, ४६
गाडे, ज. रा. ८१८
गाडे, तु. रा. ८१२
गाडे, र. शि. ८१२
गाडे, मास्तर ४७२
गाढवे, गायक ६०७
गांधी, सौ. कस्तूरबा ४१७, १८; ७५५; ८६१.
गांधी, महात्मा मो. क. महात्मा गांधी पहा.
गांधी, शेठ पन्नालाल ५९०; ६०७, ३३; ७३४.
गांधी, सौ. सुशीलाबेन ७१०
गामा पहेलवान, रुस्तम-ए-हिंद ४९९; ५००
गायकवाड, आर. ए. ७१८
गायकवाड, दादासाहेब ४९३
गारडगावकर कृष्णराव ७०७, ७२५, ७८५
गिरगावकर, आ. मा. (कारकून) ४११, १२
गिरगावकर, रंगनाथ ६३७, ७२, ८१ ७२३, ६८, ६९, ९८
गिरधारीलाल हीरालाल ६८०
गिरिराव अण्णा, तहसिलदार ५७७, ८७३
गुजराती, मणीलाल ६७३
गुप्ता, मन्नालाल ४९०
गुंड, पंजाबराव शामराव, मोर्शी ४९३, ५१६
गुरुबक्षराय (लाहोर कट) ३८३
गुर्जर ५३६
गुर्जर, श्रीमती वारुताई ४४२, ५७०, ६६४
गुलशेरखान ४४०, ५९३
गुलाबखान, ५६२
गुलाबचंद, दमोह ४०८
गुलाबबाई, कलावन्तीण ८२२
गुलाम अली ५८४, ७१८
गुलाम महंमद ४९६
गुलाम मूर्तजा ५२५
गुलाम हुसेन, दस्तगीर ४०९
गेनू, हुतात्मा बाबू ६७४
गोकुलदास, शेठ ४५३
गोखले, आप्पासाहेब ६५८
गोखले, बाबूराव ४६५
गोखले, बाळकोबा, नट ८२४
गोखले, म. ज. ७२१
गोखले, माधवराव ७७३ ते ७७७ ८०१, ८०४
गोखले, सौ. राधाबाई ६६६, ७१ ७२, ७९, ८८
गोखले, सौ. शांताबाई ७९१, ८६३, ६९
गोखले, शि. र. ६९१
गोखले, श्री. भी. ६८१
गोगटे, डॉ. नानासाहेब तथा त्र्यं. म. ८२२
गोडबोले, यशवंत, कलेक्टर, बिहार ५७२
गोडबोले, लक्ष्मणराव ४२५
गोडबोले, वासुदेवराव ४२५

गोखले, सं.वि. तथा नानासाहेब, वकील ४६८, ७१, ८३, ९०, ९६; ५०३,१० ६८, ७५, ८९, ९१, ९३; ६०५ ते ६०७, १४, ७२, ३९, ४४ ते ४६, ५१ ५३, ५८ ते ६१, ८०, ८८, ८९; ७१३ १६, १७, १९, २०, २५, २६, ३०,३२ ३४, ४१, ४३, ४४, ४८, ५१, ५६ ते ५९, ७२, ७५, ७७, ९६
गोडबोले, शैलाबाई ८२२
गोडसे शास्त्री ८४१
गोपाळराव खुशाल, वकील ३९९
गोपीकिसन, शेठ ६७६
गोपीचरण भगवानदास ४९६
गोरडे, मोतीरामजी, भातकुली ७६६
गोरे, रा. सा. जी. एम्. (हे. मा.) ५४५, ५४६, ७०४, ७५४
गोरे, त्र्यं. ब. ८३५
गोरे, हुतात्मा सिद्धेश्वर ७०४, ७१६ ७२२, ७५४
गोविंददास, शेट ६३८
गोविंदहरे, गणपतराव ३८१
गोविंददास, छबीलदास ३९४, ७२६
गोविंद तानबा ५०६
गोसावी, सेक्रेटरी, न. पालिका ५९१
गोसावी, हुतात्मा भाऊगीर ७२२
गोळे, पु. ब. (दादासाहेब) ६१८, ६३१, ६५०, ७१६, ७२५
गोळे, सौ. सिंधूताई ३८८, ८६०
गोळेगावकर, हैद्राबाद ४८९
गौर, डॉ. सर हरिसिंग ४००, ५८६, ८१९
गंगासिंग, पहेलवान ४९९

–घ–
घाटगे, शे. दौ. ६३५
घाटे, सौ. कालिंदी ७२९,७३६,७३८ ७५०अ, ७८५, ७९१, ७९४, ८६६
घाटे, ना. म. ४८९
घाटोळे, सखाराम ७०२
घासीराम नथ्थूलाल, शेठ ४१३, ५४८ ५४९, ७६५
घोंगडे, नारायणराव, गणोरी ७०२
घोरपडे, वामनराव ५६५

–च–
चॅटर्जी, रायसाहेब, इंजिनिअर ८७५
चट्टोपाध्याय, श्रीमती कमलादेवी ६४१
चंदवासकर, वकील ४९३, ५१०, ३८ ४७, ४९, ८४; ७१८, ३०
चंद्रभान जिवाजी ६७३
चंद्राचार्य, यतिमहाराज ३७९
चव्हाटे, जयराम ७०२
चव्हाण, दलपतसिंग ५५,७६६
चव्हाण, लक्ष्मीशंकर ३६७
चांदे ३९६, ४८०
चांदेकर, दाजी शास्त्री ५१५
चाफेकर, वकील ३८६
चिकाटे, मास्तर, दर्यापूर ७२४
चिखलीकर, आबासाहेब ६८३
चिंचाळकर, शिक्षक ४७२
चिटणीस, मल्हारराव वकील ८५६
चिटणीस सौ. यमूताई ८५६
चिटणीस, सर शंकरराव ५२२, ६०१
चिन्तामणी, सी. वाय्. ४९४
चिन्धुबुवा ५१८
चिपळूणकर, वा. ल. वकील ५४८

चिमोटे, नाना, सावकार
५१०, ८९, ८२०
चुके, वसंत ८३७
चुके, एस् एस्. ८३७
चुनतकर, गुलाबराव ७७१, ७२, ८९
चेम्स्फर्ड, सर फ्रेड्रिक जॉन ५१६
चोरे, ना. ग. ४९३
चोळकर, डॉक्टर ४१७
चोळकर, शाहीर ६४४
चौकशी, सविता बेन ४३८, ८७३
चौंडीकर, शिक्षिका ६९६
चौधरी, तय्यबजी ८७३
चौधरी, पं. रामभुज दत्त
४०६, ४०७, ३४
चौधरी, वि. तु., संपा. ८३१
चौधरी, विश्वनाथ ६७३
चौधरी, विश्वनाथ आप्पा
४७१, ७४४, ६४६
चौधरी, (चौधराणी) सरलादेवी
४०७, ४३४
चौबळ, बाबूकाका तथा वि. बं. ५६८
६९, ७५, ९३, ६१३, १५, २१ ३९,
६७, ८३, ९१, ७११, २४, २७, ७२,
८००, १९, २२, ७०
चौबळ, सौ. सरलाबाई ८००, ८६८
–छ–
छक्कीलाल ६८५
छत्रपती शिवाजी राजे ५२८, ६२,
६३, ८९, ९३, ७२०, ७५० ज, ८१३
छबरे, छोटूलाल गज्जू ७८२
–ज–
जगतराम, पं. क्रांतिकारक ४५७
जगदेव भुताजी (मातोंडी) ३७३
जगन्नाथजी ७१८
जगन्नाथ शंकरशेट ८५३, ५४
जठार, श्री. कि. (हे. मा.) ५४६
जतकर, नायब तहसिलदार ६०७
जतकर, अण्णासाहेब, वकील
४३२, ८०, ६२३, ८९२
जनाबाई, संत विवरेकर बाबांची पत्नी
८४८
जनार्दन स्वामी, परमहंस ८३९, ४०
जयकर, बॅरि. मुकुंदराव ५१४, १५
जयदेव, लाहोर कट ६६२
जयवंत वकील, बाबासाहेब ३७१,
७४, ७७, ७९, ८६, ४११
जयवंत, ना. तहसिलदार ३७६, ७०४
जयस्वाल, नाम. गजाधरप्रसाद
६९३, ७११, ८०५
जरुडकर, तात्यासाहेब ७१३
जवळकर, दिनकरराव ५०९, ५७९
जवादिवार, शिक्षक ५४०
जसराज ३८१
जहागिरदार, वामनराव ५०६
जांगडा मोतीराम घोडेराम ६८०,७०२
जाजू, सीतारामजी ७३७, ६८,७२, ८९
जाट रतनसिंग ७०२
जाधव, ग. शे. ७२१
जाधव, भास्करराव ५१७, १९, २२
जाफरअली खान, उल्–मुल्क ३९६
जाफर हुसेन ३९४
जॉर्ज, ए. डी. एस्. पी. ६६०, ७०
जिजामाता ५६२
जिरगे ५१९

जावळे, डॉ. कु. सुलोचना ५४०, ६३७, ५७, ६६, ६७, ७० ते ७४, ८१, ८६८
जुगादे ७७२
जैन, शेठ पन्नालाल ४४३, ५९०
जैन, हरीभाऊ ७८९
जैनुद्दीन ६४२, ७४४
जोग वकील, प्रल्हादपंत ३९९, ५०३, ७६, ७०४, ८७३
जोग, ना. म. शंकरराव ७२७, ६०
जोगळेकर, गो. शि. ८३१, ३५
जोगळेकर, मामासाहेब ३९६, ४०९, ८१, ५०१
जोगळेकर, एस्. डी. ओ. ५२७
जोशी, अ. स. ६३५
जोशी, सौ. अन्नपूर्णाबाई ७९१
जोशी, बॅरी. इ. एम्. तथा आबासाहेब ५४७,५५,७५,७६, ९३,९६
जोशी, सौ. तारादेवी ७९१
जोशी, वैद्य त्र्यंबक गुरु ६०३,६०५, ६०८,१५,१८, २० ते २२, २८, ३० ते ३३, ३७,४१,४२,५२,७९; ७१४,१५,१७,१९,२०,२३,३४,४२, ४३,४५,४६
जोशी, डॉ. त्र्यंबकराव ७७८
जोशी, द. रा. ६३५
जोशी, श्रीमती दुर्गाताई ५९३; ६५१, ६६,६७,८९; ७१३,१५,१६,२०,२५, ५४; ८६५.
जोशी, नानासाहेब ६८९
जोशी, नारायण वामन ४९७
जोशी, पु. गो. एरंडोल ३७३
जोशी, पुंडलीक ६७३
जोशी, बाबासाहेब यवतमाळ ६७३
जोशी, बाबा, अमरावती ६५५,७८; ७०२
जोशी, भगवंतराव ७२३
जोशी, भाऊसाहेब ६८८
जोशी, सौ. माकती ६९६
जोशी, सर मो. वि. तथा अण्णासाहेब ३७१,७४,३९२ ते ४०४, ४६८,७२,७५,९३,९४; ५०९,१४,१५, ३५,४२,४४,४६,४७,५८,६२,८३,८६, ९७; ६०५,१६,२१,३२,७३,८१,८३, ८४; ७२४, ३०,३४,४७, ६१,६२,६६, ८३,८५; ८५५,६१,६२,७३,८४.
जोशी, लेडी यशोदाबाई ५८१; ६९५, ९६, ७२८, २९,३५, ४८,५०अ, ९०; ८५६, ५७, ६१, ६३, ६६, ६७
जोशी, रंगनाथ ८०७
जोशी, सौ. रंगूताई ६९६; ८६८
जोशी, रघुनाथ ७७२, ७८९
जोशी, रा. गं. ६८१
जोशी, रा. वा. ४२१
जोशी, रामभाऊ, यवतमाळ ७२३
जोशी, वा. गो. वीर वामनराव पहा
जोशी, वा. र. ८९१
जोशी, व्ही. व्ही. ५८४, ६७७, ७१८
जोशी, वासुकाका, चित्रशाळा पुणे ४६९
जोशी, सौ. सुभद्राबाई ७५७
जोशी, सौ. सत्यभामाबाई ५९९, ८६३

जोशी, हरी वामन ४९८
ज्वालासिंह बाबा ४५९
–झ–
झामसिंग मल्लुसिंग ८१४
झिबोम्की, पहेलवान ५००
झिस्को, पहेलवान ५००
झेंड, वामनराव ६६७
–ट–
टंडण, पुरुषोत्तमदास ५६९
टर्नर, कमिश्नर, वऱ्हाड ४७२
टाकरखेडकर, श्रीमती यमूताई ७११, ८६८
टागोर, रवींद्रनाथ ४०७
टॉस्ट्वीन, प्रिन्सिपॉल ४७३, ७५, ५३४, ४४,४४, ६८२, ९९, ९१
टिळक, ला. बाळगंगाधर ३६९, ७८ ते ८७, ८९, ९०, ९२, ४०१, १३, २२, ३६ ते ३८, ४१, ५२, ६८, ७०, ७९, ९२, ५७४, ७८१, ७८५, ८३४, ५९, ६०
टेकाडे, कवी आनंदराव ४७०
टेंभे, डॉक्टर, यवतमाळ ७२२
टेरेन्स मक्स्विनी
टोपे, तात्या ७२७
–ठ–
ठवरे, सेक्रे. दलित संघ ७६५
ठाकरे, गु. ज. ४९३
ठाकूर, गोविंदसिंग ५७०,६५९,७८९
ठाकूर, दादूसिंग ७८७
ठाकूर, नानासाहेब ७४२, ६२
ठाकूर, भय्यालाल ८०६
ठाकूर, एम्. एन्. ६९२
–ड–
डफरीन, लॉर्ड, व्हाइसराय ८७२
डफरीन, लेडी ८७२
डबीर, शं. गो. ५२०
डवलेकर, पां. म. ६८१
डांगरे ७८१, ८६
डांगे, नीलकंठराव ३८२, ४१९, ६०८
डायर, जनरल ३८३, ८४, ४०७, २९
डायर ५०५
डायस ५७७
डुबे ७८०
डे, मिसेस ७०४
डोरले, म. गो. ७७१, ८८
डोळे लक्ष्मणराव ३७२; ८३२
डोळे, रावबहाद्दूर ६८४
–ढ–
ढांगे, मा. का. ७७५
ढोलें, डॉक्टर ५१६, २४
–त–
तळवलकर, रा. ब. (हे. मा.) ५४६
तळेगावकर, अर्जुन ६८१
तळेगावकर, कु. लीलावती ४३८,८६१
ताई महाराज, ७३९, ७५५
ताकपिरे, ह. वि. ७७३
ताजुद्दीन, जबलपूर ३९६
तांबी, जग्गुलालजी ६५४
तांबे, सौ. रमाबाई ७३६, ७९०
तांबे, विष्णुपंत ४२५, ५३१, ७४८
ताम्हणकर शास्त्री ५१५
ताम्हणे, म. म. केशवराव ३७०
तालुकदार, बापूराव ६२१
तिडके, बॅरि. एम्.बी. ५५५, ५७, ६५

तांबे नाम. श्री. ब. (तात्यासाहेब) ३७०, ७२, ७९, ८६, ८७; ४१३,२४ ३६, ७४, ८२, ८३, ८५, ९०; ५०३ ५०८, १०, १५, २२, २५, ४४, ४६, ८०, ८८; ६०४, १७, १८, ६१, ८३, ८४, ८९, ७९९.
तिवाटणे, द. वि. ७६७ ते ७६९, ७८९ ८३७
तिवारी (लाहोर कट) ६६२
तुघलक, महंमद ८५१
तोष्णीवाल, राधाकिसन, अकोला ५४२, ४३.
त्रिपाठी, राधिकाप्रसाद ७९९
–थ–
थत्ते, प्रोफे. ५३४
थॉमसन्, कु; शाळानिरीक्षिका ८६२
–द–
दंडे, बापूसाहेब ३७०, ८२, ८७
दत्त, बटुकेश्वर ६०७, ६०८, ६२
दत्ताबोवा पद्माकर, औरंगाबाद ४८९, ५२३
दत्तु बुवा ४८९
दयानंद गुरु विठ्ठलानंद ८७९
दयानंद सरस्वती ४५१, ५८१
दयालाल ८००, ८०१
दरबार, बुद्धसेन ७८६
द्रविड, श्रीमती मथुराबाई ५५६,६१६ ७३६, ५०फ, ६०, ९०, ८०२, ६९.
दाउदखान, बॅरि. सुफी ३८१, ६१६
दांडेकर, मास्तर ७०७
दांडेकर, आर. व्ही. ४८१
दांडेकर, सौ. लक्ष्मीबाई ६५१, ५८, ६४, ६६, ६७, ६९, ७१, ७२, ७४; ७१३, १४, १६, १७, २४, ३३, ४१, ५२, ५४, ५७, ६८; ८७६, ६८.
दातार, महादेव ६५५, ६७२, ६७६, ७८९
दाते, केशवराव, नट ५२२
दामले, अण्णासाहेब वकील ३७०,३८७ ३८८, ४११, ५५४.
दामले, डॉक्टर ६२१
दामले, रावबहाद्दूर, अकोला ३७४ ४७२
दामले, श्रीमती सुशीलाबाई ८६८
दास, देशबंधू चित्तरंजन ४४७, ४५६, ४५७, ४६४, ४६५, ४७१, ४७९, ५०१ ते ५०४, ५४६, ५५६, ५९१.
दास,हुतात्मा यतीन्द्रनाथ (जतींद्रनाथ) ६१२ ते ६१४, ६८२, ७३०
द्वारकादास मिश्र, सदस्य, नगरपालिका ५३९, ६११, ६१५, ६२०.
दिगंबर, दे. वि. ३९९
दिनकर सोमाजी ७७१, ७२
दिवाणजी, प्रो. ना. कृ. ८२३, २६,३१
दिवेकर, पं. महादेवशास्त्री ६२२, ७९४, ९६, ९७, ९९
दिवेकर, प्रो. योगशक्ति ६०२
दिवेकर, नट ८२४
दिक्षित, द. बा. ५०७, ७५
दिक्षित, द. रा. ६५५, ७५
दिक्षित, कॅ. वा. बा. ६५७, ५९, ६१, ७० ते ७२, ७६, ७९, ८१, ८१, ७१७
दुबे ७६३

दुराणी, स. कृ. तथा भाऊसाहेब वकील ३६९, ४२१, २३, २४, २८, ३१, ५२६, ३१, ७४, ७५
दुर्गे, बापूराव तथा गं. बा. ४८०, ५०७. ५७. ६०३. १८. ८३
देढे, माधवराव ७७२. ८९
देव, गो. म. ७६६. ८९. ८०६
देव, टी. वाय्., शिक्षक ६९२
देव, समर्थभक्त शं. श्री. ५६३. ८०९–२
देवकीचंद्र, पंडित ६४७
देवगावकर, शिक्षक ५४०. ७३४
देवचंद लाला ६७३. ८१
देवभानकर, हे. मास्तर ५४६
देवरणकर, वासुदेवराव ४९६
देवरस ७७०
देशकर, नारायणराव ७०२
देशकुमार, लाहोर कट ६६२
देशपांडे, ए. एम्. ४८१
देशपांडे, अच्युतराव ७७४
देशपांडे, अरविंद, संपा. ४३१
देशपांडे, आ. रा. (कवि. अनिल) ४८९. ५४६. ९३
देशपांडे, कमलाबाई. डॉ. सातारा ७३६. ४०. ५० अ ५० ब. ८०२. ६७
देशपांडे, कृष्णराव गोपाळ ४८१. ७८१. ९६
देशपांडे, केशव शामराव ४८९
देशपांडे, गंगाधरपंत ४४७
देशपांडे, सौ. गिरिजाबाई ४३८. ८६३
देशपांडे, गु. रा. ४८९
देशपांडे, गोविंदराव. दर्यापूर ८४२
देशपांडे, देविदासपंत, शाहीर ६९०
देशपांडे, धोंडोपंत ७२८
देशपांडे, ना. ब. ५४१
देशपांडे, पी. वाय्. तथा बाबासाहेब ५७५, ९३. ७३४. ४१. ४३ ते ४८. ५१ ते ५५. ५७. ५८. ८७. ८८. ९२. ९४ ते ९६. ८०० ८०१. ८०५
देशपांडे, बाबासाहेब, मोर्शी ३८५
देशपांडे, भाऊराव ६४७. ७१३
देशपांडे, माधवराव, संपा. आव्हान ८३९
देशपांडे, य. खु. यवतमाळ ४६३. ८९. ५४६
देशपांडे, य. गो. तथा अण्णासाहेब ३७०. ७२. ७७. ८१. ८५. ८६. ८८. ४१०. २०. २१. २३. २९. ३२. ३८. ८०. ८३, ८९. ९२. ५०७. ५०९. २२. ३६. ३७. ४२. ४३. ६६. ८४. ८९. ९१. ९६. ६०६. १८. ४७. ८४. ७१८. ६२. ७३. ७६. ८५. ९४. ९७. ८६१
देशपांडे, राजाभाऊ तथा आर.डी. ८३१
देशपांडे, ल. गो. ७२१
देशपांडे, ल. वि. ३९१
देशपांडे, वासुदेवराव ७७७
देशपांडे, सौ. विमलाबाई (सरस्वतीबाई) ५०३. ७३८. ४० ते ४२, ५७. ६२. ६६. ७०. ९१ ९६. ८००. ८०२ ते ८०४. ६३. ६४. ६७. ६९. ७०
देशपांडे, वि. भ. ६५५. ७२. ७५. ८१
देशमुख, ओंकार ७७१, ८९.
देशमुख, काशीराव बापू ३८१, ८५. ८८, ५१६, १८, १९, २४, ६३, ७६२

देशपांडे, शामराव वकील ३७८. ४३६. ४४. ८३. ७७८
देशपांडे, श्रीरामपंत वकील ६४४,४५, ४८, ५३ ५५, ६४, ६७.
देशपांडे, सरस्वतीबाई (विमलाबाई पहा.)
देशपांडे,हरिहर वामन ५१०,९३,६०३, १४,२१ २२, ३२, ३३, ३७, ३९, ४२, ४४, ५३, ७९, ८३, ८५, ८८ ७१४, १७, १८, २०, २२, २४ ते २८, ३०, ३३, ३४, ४१, ४४, ५२, ५३, ५५, ५७, ५८; ८०५, ८०६ ८०९.
देशमुख, रा. ब. के. जी. खामगाव ३७३
देशमुख, गणेशराव, आसरा ७१३, २१, २३, ८०८
देशमुख, गोपाळराव. (खेडकर, गोपाळराव पहा.)
देशमुख, जानराव बाजीराव ४९९, ५००,५०३,५०८,१०,२४, २५,६२१.
देशमुख, जी. एस्. ६५९
देशमुख, देवराव रंभाजी ५४२, ४३
देशमुख, बॅरि. एन्. एम्. ५५७; ७१९
देशमुख,पंजाबराव, मोर्शी ४८२; ५१०
देशमुख, बॅरि. पंजाबराव शामराव तथा शिक्षण महर्षी भाऊसाहेब ४९३; ५०४, ४१, ४७, ५५, ५७, ६१, ६३, ६६, ६९, ७५, ७९, ८७, ६२१, ३९, ६७, ९१ ते ९३, ७०३, ७०४, ८०, ८०५. १९, २२, ४५
देशमुख, बाबासाहेब, आर्वी ६४१
देशमुख, म. गो. ६४२
देशमुख, मा. गुं. ६५७, ८१
देशमुख, यशवंत, जनुनेकर ५६७
देशमुख, रघुपतराव ६५५
देशमुख, रामराव, शिराळा ५०८,२५
देशमुख, बॅरि. रामराव माधवराव तथा नाम. अण्णासाहेब ३९८,४२०,३२,६६, ७१, ८०, ८२, ९०, ९३, ९६, ९७; ५००, ५०१, ५०३, ५०७, १०, ११, २६, ३७, ४१ ते ४३, ५४ ते ५६, ६०, ७३, ८२, ८८, ८९, ६०९, १५, २१, ६७, ८४, ८६ ते ८८, ९१, ७१९, २०, ३०, ६०.
देशमुख, लक्ष्मणराव ७४६, ७९, ९७
देशमुख, वा. श्री. ६४१; ८००
देशमुख, वि. प. ६५२
देशमुख, सौ. विमलाबाई ५८१; ७२५, ५२, ६४, ६५, ६८
देशमुख, व्यंकटराव ५३१
देशमुख, एस्. वाय्. ४९३; ६५२
देशमुख, हणमंत मेघःश्याम, वकील ३७०, ८८, ९१; ५६७, ८८
देशमुख, हे. मास्तर ५८१
देसाई, वसंतराव ५१८, ८२
देहलवी, पं. रामचंद्र ५७०
दोबे, तुळशीरामजी ८००
दोराबजी कावसजी ८००
दौंडकर मास्तर ४६७

–ध–

धनराज मुरलीधर ६८०
धनसुखदास ५९३
धनागरे, विद्यार्थी ५७३
धरमचंद शेठ, राणीवाले ४३८, ४४, ४६; ५३८

धर्माभिक्षू, पंडित ५८१
धात्रक, इ. ए. सी., एम्. बी. इ. ३७३, ४२५
धीरसिंह, सरदार, क्रांतिकारक ४५७
—न—
नगीनदास शेठ ३९१,४१९,५३,६९०
नजीर हुसेन बेग, मेजर ४४१, ७८.
नत्थूभाई गवई ३७०. ४३७. ८०. ५०१. ३०. ८२२
नथमल शेठ ३८१
नंदगवळी ६८७
नाथानी, नारायण ८००
नंदलाल शेठ ३८१
नंदलाल (लाहोर कट) ६६२
नंदूरकर ५९३
नर्गुनकर, डि. मॅजिस्ट्रेट ६७०
नलावडे, ग. म., संपा., संग्राम ५१९. २०. ५४. ८३५
नवसारीकर, वा. जा. ८०८
नवाडे, अं. वा. ८३७
नाईक, धर्मवीर वामनराव ६१९. २०. ४६. ७२९
नाईक, सौ. रुक्माबाई ७८०
नाईक, श्रीमती लक्ष्मीबाई ८०३. ७०
नाईक, डॉ. शं. रा. ५२०
नाईक, संपतराव गायकवाड एम्. एल्. सी. ५०६. १८. ९६. ७६७ ९४ ते ९६
नागपूरकर, दादा ६६७
नागरमलजी ५५१
नागार्जुन (नाग वंशीय राजा) ५१३
नागोबा कोंडबा, शेठ ८७६, ७९. ८०
नाटेकर. दत्तोपंत ६४४. ७६२
नामदेवबुवा वऱ्हेकर, गायक ५२९ ते ५६१. ५६०
नायडू, रा. ब. के. एस्., वर्धा ५१६ ते ५१८. ६९३, ७८८
नायडू, सौ. लक्ष्मीबाई, वर्धा ५१७, १९, ८६३
नायडू, सौ. सरोजिनी ७७०
नायगावकर, गुलाबराव पाटील ५१६
नायब डॉक्टर, संपा. ८३६
नारायणगुरु, संत ७७६, ८४१ते८४४
निकालजे, मुंबई ६८७
निजामुद्दीन ५८३
निजामपूरकर, मुरलीधरबुवा कीर्तनकार ७१०
निंबाळकर, अमृतराव ७०२
निंबाळकर. रावसाहेब ५१८
निमदेवकर, सौ. रमाबाई ५९९, ७३८, ३९
नियोगी, भवानीशंकर ७९८
नृसिंह सरस्वती, आळदीचे स्वामी ८७७, ७९
नेरकर, विष्णुपंत ६७४, ७७, ७१३
नेरकर, नाना ६७३
नेल्सन, डी. एस्. पी. ४२७, ५८८; ६०१, ६०
नेहरू, पं. जवाहरलाल ४६९, ६२७ ३१, ३३, ३४, ६४, ७४७
नेहरू, सौ. ब्रीजलाल ४०३
—प—
पटवर्धन, महर्षी अण्णासाहेब ७०७
पटवर्धन. सौ. मनोरमाबाई ४४२

पटवर्धन, सौ. चंद्राताई ५८०, ६०९, १३, १६, ६०, ८६६
पटवर्धन, सौ. पार्वतीबाई ३८८, ४११ १७, १८, ३८, ४२, ४६, ५०७, ८०, ८४, ६१४ १६, ३४, ३७, ३९, ४०, ४२, ४३, ४८, ४९, ५१, ५७ ते ५९, ६४, ६५, ६७, ७२, ७९, ८०, ७०१, १३, १५ ते १७, २५, २९, ३०, ३३, ३७ ते ४०, ४३, ४६, ५०अ, ५२, ५६, ५७, ५९, ९७, ९८, ८००, ६० ते ६३, ६६ ते ७०.
पटवर्धन, कवि माधव ज्युलीअन ५७३
पटवर्धन, रा. सा. सी. व्ही. ८८८
पटवर्धन, पद्मश्री डॉ. शिवाजीराव तथा दाजीसाहेब ३७७ ते ३८९, ४०९, १३, १८, ३५, ४३, ४५, ४७, ५३, ६७, ७८, ९४, ९६, ५०२, ५०७, २७, ३५, ३६, ३८, ४३, ४८, ५०, ६१, ६३, ६६, ७५, ७६, ७२, ८०, ८४, ८५, ९३, ९८, ६०३, ६०५, ६०७, ६०८, १३, १५, १८, २१, २८, ३१ ते ३३, ३५, ३८, ३९, ४१, ४२, ४४, ४६, ४८, ६४, ७९, ९४, ७१३, १४, १६, १७, १९, २०, २४ ते २६, २८ ते ३०, ३२, ३४, ४१, ४२, ४४, ४८, ५४ ते ५९, ७६३.
पटेल, कु. मणीबेन ७१५
पटेल, सरदार वल्लभभाई ६६९
पटेल, सरदार विठ्ठलभाई ६९९
पंडित, सुभाषचंद्रजी ३८८
पंडित, बी. एम्. ६१६
पंडित, रणधीर ६९९
पंडित, सौ. विजयालक्ष्मी ६९९
पडोळे ४२२
पडोळे, विजयानंद ६७३
पतकी, हनुमंत भीमराव ६५७, ७८, ७१८, १९, २२
परदेशी, मनीषाबाई ८१८
परवार, शेठ पन्नालाल बन्सीलाल ३९०
परवार, म. भी. ६३१
परवार, मो. भु. ६३५
परवार, वा. रा. ६८३
परमानंद, सौ. ६८३
परमानंद डे. कमि. ६८४
परमेश्वरदयाल, सिटी इन्पे. ५६९, ६८६
परशुराम ७६९
पराडकर मास्तर ४७२
पराडकर, रामभाऊ पुजारी ८४१
परांजपे, आचार्य ८०१
परांजपे, न. शि. ५२०, ६१८
परांजपे, रघुनाथ ५७५
परांजपे, काळकर्ते शि. म. तथा अण्णासाहेब ६१४
परांजपे, डॉ तपस्वी बाबासाहेब ३८१, ९१, ९२, ४३१, ६५, ७९, ८०, ७७०
पराते, महादेव ७०२
पवार, खुशालराव ७२१
पवार, खासेसाहेब, देवास ५४८
पागरू, काशीराव ८००
पाचघरे, महादेव ७०२
पाचघरे, हुतात्मा लक्ष्मण ६६२, ७१६, २२, ५४
पांचाळ, राम ६४८

पाचलेगावकर महाराज, संत ५८९, ६०६
पाटील, गजानन ८८३, ८५, ८६
पाटील, गु. रा. परसोडा ४९३
पाटील, कु. छबूताई ७५७
पाटील, जयराम ३७९, ५७५, ८००
पाटील, डोंगरसिंग ५१८
पाटील, नारायण ८८२, ८३, ८६
पाटील, पंढरीनाथ, चिखली ५१६,१८
पाटील, प्रितमजी ८८१, ८२
पाटील, विठ्ठलराव ८८५, ८६
पाटील, विष्णू ५७७
पाटील, शंकरराव ७०२
पाटील, शिवरामपंत ३८५,६२५,७१८
पाटील, एस्. वाय्. तथा दादासाहेब वाटाणे ५०७, ५५, ६५, ८७, ६३९, ७०३, २४, २७, ४८, ९६, ९६, ८०८
पाटील, सुखदेव नामदेव ६८१
पाटील, हरीश्चंद्र (तारखेडा) ६०४, ८८१, ८२, ८४ ते ८६
पाठक, डेप्यु. कमिश्नर ३७३, ७६
पांडुरंग सावजी. ५२१
पांडे, ग दे. ७९७
पांडे, दे. अ. ७२६
पांडे, ना. त्र्यं. ४८९, ६७१, ७२, ८०
पांडे, म. ह, संपा. ८३६
पांडे, प्रोफे., के. ई. सी. ६१६, ८००
पांडे, शंकरराव ६५५, ६०, ६२, ६८, ७५, ७१७
पांडे, स. खु. ७२३
पाणंदीकर, मालिनी ५६२, ८६५
पातकर ६४८
पातुरकर, डॉक्टर ५९३, ६०३, ६०५, २१, २८, ३२, ५२, ५५, ५७, ६३, ८०, ७१३, ८००
पातुरकर, ह. भ. प. ५७०
पाध्ये, ग. दा. ५४६
पानसे ४५३, ८०
पारधी, त्रि. मो. ४४०
पारसनीस, डॉ. ४३२, ७१४, २२ २४, २४
पारेख ७८८
पावनसकर ७८८
पिटके ४८९
पिटरसन, पहेलवान ५००
पिंपरकर, डॉ. गंपूनाना ७१३, २३, ३४
पिंपरीकर, वासुदेव ३९६, ४३२
पिंपळखरे, श्री. रा. (दादासाहेब) ६८३
पिल्ले ५७७
पुंजाप्पाजी ७३०, ६८, ७२, ७५, ७९
पुंड, दौलत, पोरगव्हाण ७०२
पुंडनाईक ४८०
पुंडलीक विठोबाजी ७९९
पुणतांबेकर, बॅरि. श्री. व्यं. ३७१, ७२
पुणेकर, नरहरी ६८३
पेठकर, श्रीनिवास महाराज ८४०
पेंडके, केशवराव, सावकार ७३१, ३२
पेंडके, बाळकृष्ण जयराम ८१५, ७३
पेंडसे, प्रोफे. शं. दा. ६८५
पेशवे, नानासाहेब ७२०
पैठणकर, कृ. म. ५७६, ७७०, ८९१

पोतदार, काशीनाथ ६७३
पोतदार, पांडुरंग ६६७, ७३
पोतदार, ब. क. ५३१
पोतदार, लक्ष्मण ७७१
पोलक, न्यायाधीश ५२५
पोवळे, उ. ग. ३९४
पोंगे, र. वि. ६४२, ८३
पोंक्षे शास्त्री ३८७
प्रतापसिंगजी ७४२
प्रधान, वकील ५१६, १८
प्रधान, बजाबा रामचंद्र ८२३

–फ–

फडके, दादासाहेब (द. शं.) ८२३
फडनाईक, श्रीराम ५२०
फतेअली, नवाब ८७३
फतेचंद पुनमचंद, शेठ ३७०, ८०, ८६, ४३५, ९६, ५७६, ८६, ६३८, ७४३
फतेचंद मांगीलाल ४१७, १९, २१, ३१, ४५, ७०८
फरकाडे, या. बा. ७२४
फर्नांडीज, प्रोफे. ५२२
फॉर्बस, बॅरि. ५४७
फासेट, मिसेस ८३२
फिरंगीलाल ६७६
फुले, महात्मा ज्योतीबा ५१५, ७४, ८५४
फुले, एम्. एल्. सी. ६९२
फोर्ड, म्युनि. सदस्य ६१६
फोर्ड, एफ्. जे. ८७४
फ्रँक्लीन ५७२

–ब–

बंकटसिंग ५९३
बच्चू महाराज ६०७
बजरंग ठेकेदार ७७८
बजाज, जमनालाल ५५०, ६०९ ७५७, ८०७
बटलर, सर माँटेग्यू, गव्हर्नर ५०४, २२, ६०८, १७
बडनखे, रामभाऊ ७९८
बडोदेकर, सौ. हीराबाई, गायिका ५५६, ५७, ६०, ७७२
बनखडे, वासुदेवराव ७७१, ८८, ८९
बनसोड, डॉ. भा. ज. ४५४, ७०४
बनारसे, तुकाराम ७७१, ७२
बन्नू ५७७
बरगडे ७६६, ७३, ७६, ९८
बर्वे, मास्टर मनोहर, गायक ४८६
बर्वे, बा. सी. ७२४
बर्वे, मारुती ६५३, ८१, ७६८
बलदेवप्रसाद ४२५, ७९४
बहिरुद्दीन जेठमल, बँकर ८७३
बक्षी, गुलाबराव ३७७, ७८, ८१, ८७, ८९, ४२५, ३८, ५०२, ४९, ८१, ८४, ८६, ६०५, ६०८, १४, १८, २२, ८५, ७१८, ४३, ६३, ६५ ६९, ९२, ९६, ९७, ८०५, ८०७
बॅनर्जी, जीनेन्द्रनाथ ४४७
बॅनर्जी, आर्. एन्, सेटलमेंट ऑफिसर ५००, ५५६
बॅनर्जी, सुरेन्द्रनाथ ४४८, ४७१
ब्रम्ह, सौ. सावित्रीबाई ६१६, ८६१
ब्रम्ह, सौ. सीताबाई ७३८, ८६३

ब्रम्ह, रा. ब. के. वा.
३७१,७४,८६; ४११,५४, ७१ ते ७५,
८३,९०,९५; ५०३,५०५,५०६. १२.
१५. २७. ४६. ५५. ७२. ७३.८२.८३.
८९; ६०१. ८८ ८९. ९२; ७०३. ३१.
७६ ८३.९१. ९३ ते ९६. ८०४.८०८
ब्रम्ह, सौ. ताई ५९९
ब्रम्ह, वि. दा., वकील
५९३, ६६३, ७८, ७६२, ६६, ७०,
७३, ९६, ९९
ब्रम्हचारी, महाराज, रेवसा ८७८
बसवेश्वर, महात्मा ६९७
बहेरामजो, नागपूर ५९२
बागडे, केशवराव, पुणे ५१७ ते ५१९
बागलकोटकर ५५०, ६५५, ६६८
बागवे, बॅरि. माधवराव
५५५, ५५७, ५६३, ५६९, ५७५,
५९३, ६१५, ६१६, ६२१, ६८३,
७७६, ८१९
बागवे, सौ. मालतीबाई
७९१, ८६९
बागोकर, यशवंतराव ७१२, ७७८
बापट, गं. बा. ४८१
बापट, सौ. गंगूताई ४३८, ८६१
बापट, टी. एस्., वकील
३८७, ४८०, ५२०, ७२६
बापट, सौ. ताराबाई ८२२
बापट, पी. बी. ४९६
बापट, वकील, यवतमाळ ७२५
बापट, कु. माणिकताई ४३८; ८९१
बापट, संपा., प्रजापक्ष ४२८
बापट, सेनापती ७४३
बाबुलाल दामुसा ७२१
बामणगावकर, ना. रा. (नानासाहेब)
४१९, २१ ते २५, २८, ३५, ३७
३९, ४१ ४५, ४७, ५३, ६७, ६९
७८. ७९, ८१, ८८, ९०, ९२, ९४
९६. ५०१ ते ५०३ ५०७, १०, २०
२८. ३६. ३८. ३९. ४८. ५०. ५४
५८. ६४. ६७. ७५. ८२. ९३. ९३
९६. ६०२. ६०४ ते ६०८. ६०९
१४. ते १८. २१. २१. २८. ३२. ३३
३६. ३७. ४७. ५० ते ५३. ८०. ८५
७१४. १५. १७ ते १९. २३. २७
२९ ते ३२. ३४. ४० ते ४५. ४८. ५१
५२. ५४. ५७ ते ६०. ६५ ७०. ७६ ते
७९. ८३. ८८, ९२. ९४ ९७. ९९;
८०४. ८०५. ८०८. ८२५. ३४ ते ३६
बायजा (जयरामबाबांची आई) ८४७
बारु, न्यायाधीश ५११. १२. २५
बालकिसनजी ७१३
बारलिंगे, राजाभाऊ ६४४
७६२, ८७
बालगंधर्व (नारायणराव राजहंस)
नट ५७३. ५८२
बिजवे, मोतीसावजी ४९६. ५०६
५४९. ५८४. ६०८
बिंड, चित्रकार ६८९
बियाणी, ब्रीजलाल ६१८. ३१. ४५.
५०; ७१०. १५. १६. २०. २३. २९.
५३. ५४
बीडन, मिसेस एम्. ओब्रायन ४०३
बुच्चा देवीचंद ७७२
बुलकर, डे. कमिशनर ८७३

बेंजामीन, रॉबर्टसन ४७४
बेझंट, ॲनी डॉ. ४९५. ७९७
बेंटिंग, लॉर्ड., ग. ज. ८५१
बेडेकर, गोपाळराव (बाबासाहेब)
३७०. ५२९. ५३०. ५७०. ६९५. ८१९. ८२२
बेडेकर, वि. चि. (विश्राम) ८२५
बेडेकर, पाराशरपंत ६५३, ६५५ ते ६५७. ६८०
बेदरकर, ना. म. (दादासाहेब)
३७२. ३८५. ३९६. ४२४
बेहरे, ना. के; कवी ४६९
बोकील, ग. द. ६३५
बोके, डी. एम्. ५५७
बोके, सौ. हीराबाई ८६८
बोडस, गणपतराव, नट ५२३. ८२
बोधनकर. अण्णासाहेब ६३८. ७२. ७३. ७८. ८१
बोंडे, रा. ग. ४९३
बोबडे ८००
बोस, नाम., मंत्री ६०९
बोस, शरच्चंद्र ७६१
बोस, सुभाषचंद्र ३९० ते ३९२; ६१०. १८ ते २०. २७. २८ ३१. ८२; ७०८. ४१. ४५. ५१. ६१; ८०७
–भ–
भक्तींबा देसाई ४६९
भगतसिंग, सरदार, क्रांतिकारक ६०७. ६०८. ६२; ७१६. १७. ८०
भगत, सीताराम (नंदगवळी) ८७६
भगवानदीन, महात्मा ४४२; ७५८. ८७
भट, नी. ना. ८९१
भट, सौ. शांताबाई ७३६. ३८. ३९. ९४; ८६३
भट, सौ. सखूताई ४४२
भट, सौ. सावित्रीबाई ४३८. ९९; ७९०. ९१. ९४; ८६१. ६३. ६९
भट. डॉ. श्रीधरपंत ३७१. ७२. ७६, ७९; ४९४. ९५; ५२५. ७३. ७५. ८०. ९२; ७०४. ३४. ६२
भटकर, प्रभाकर ७६७
भटकर, एम्. व्ही. ५६५ ६८७. ७२९. ३३. ३४
भंडारे, काशीनाथपंत ६८८. ७६२
भदे, नारायणराव ७६८, ७७२, ८०१
भवाळकर ५१४
भय्यादास ठाकूरदास ३९४
भवानभाई हेमचंद ८७३
भाऊगीर, हुतात्मा ७५४
भांगले, संपा., कर्तव्य ८३३
भांगले, विमलाबाई ८३३
भागवत, माधवराव ६६७, ७७७
भागवत, वकील, वा. दा. ३८५, ८९ ९८, ४१७, ३२, ३५, ३९, ४७, ५३ ७७. ७८, ८०. ८२
भागवत, डॉ. श्री. वि. ५७५,७०४,८०२
भागवतकर ७६८. ७३. ७५ते७७. ९८
भाग्यवती देवी ४४२, ४५
भाटिया विठ्ठलदास ८७३
भाट, मारोतराव ७९५
भांडारकर. डॉ. सर रा. गो. ५६२
भार्गव, पं. ठाकूरदास ४०३
भाटे, प्रिन्सि., सांगली ७३१

भालेकर, कृ. पां. ५१५
भालेराव ५२१
भावे, कृ. ब. ५०७
भावे, व्ही. व्ही. ४८१. ७८६
भिकमसिंग ४८१ ५१५. २०
भिडे, श्रीमती माणिकताई ६९६. ७५०अ, ७९१, ८०२,८०३,६८,६९
भिडे, नट, महा. नाटक मं. ५२३
भिवापूरकर, दत्तदयाल ३७९
भिवापूरकर, बाबूशेठ ८८०
भिवापूरकर, मोतीरामजी ८७६ ७७. ७९. ८०
भिवापुरवाले, बिसनदयाल ३७०
भीमराज भागीरथ ५२१
भैय्यालाल ४२५. ४७
भोकरे, लक्ष्मणराव ७७२
भोजराज, डॉक्टर जी. जी. ५०६.५८. ६४. ७४. ७९. ७४. ८४. ८६. ८७. ९२. ९३. ६०२ ते ६०८. ११. १६. १८. २०. २१. २८. ३० ते ३३. ३९. ४२. ४५. ४६. ४८ ते ५२. ७६ ते ७९. ८५. ७०५, ७०८. ७०९, १२, १४, १४, १७, १८, २३, २५, २६. २८. ३०. ४२. ४३. ५३ ते ५५. ५८. ८०७, ८०८
भोपळे, लक्ष्मणराव ७७१
भोरे, अकोलेकर ६५२
भोलाप्रसाद ७७५
भोसले, केशवराव, नट ६५२
भोसले, रघूजीराव नागपूर ५६३
भोसले, राजाराम, कोल्हापूर ५६३
भोसले, राजे लक्ष्मणराव ५१४. ७७६
भोसले, शहाजी ५२८
भोसले, शिवाजी, सातारा ५२८
भोळे, गंगूताई ७३८, ८०३, ७०
भोळे, वा. वा., वकील, ३८९. ४८४. ९६. ५०७. १८. २२. २५. ८२. ८३. ९६. ६०२. ६०३. १६. ८२. ८२६
–म–
मॅक्डोनल्ड, आय्. सी. एस्. ३७३
मॅक्स्विनी, टेरेन्स ३९५. ९६
मंगरूळकर ७०२
मंगलचंद बिसोरीलाल ६५३. ७५. ८०. ७०४. १०. २३
मंगलमूर्ति, के. टी. ७३३, ८०६
मंगलमूर्ति, सौ. मालतीबाई ७९१
मंगलसिंग ६९८
मंगेशकर, मास्टर दीनानाथ ४५३. ८२४
मटाळे, म. गो. ८००
मढीकर, धर्मराज – नारायणगुरु पहा
मन्नालाल शिवनारायण ५३०. ७१३
मन्नू मेहतर ७९५
मल्लाप्पा धनशेट्टी ७०४ ते ७०६
मराठे, श्रीमती उमाबाई ७११. ८६८
मराठे, चिन्तामणराव ३८४, ६२२
मराठे, बा. वि. तथा बाळासाहेब ७१७. ५९. ६५. ७८०. ८०१. ३७
मशानकर, डॉक्टर ७२६
मश्रुवाला, ताराबेन ७३७
महबूबमिया काद्री. खा. ब. ४०३
महंमद इद्रिस ५८४
महंमद इस्माइलखां ८०६

महंमदसाहेब जहागिरदार, बाळापूर ७४५
महंमदसाहेब ४४६. ५३९. ५४९. ६८
महंमद रफी ७१८
महाजन, मॅने., आर्यावर्त ३८९
महाजन, मो. न. ४३९
महाजनी, रा. ब. वि. मो. तथा अण्णासाहेब ३७३. ४७२. ५४६. ६८३. ७७६. ७९०
महात्मा गांधी ३७५,९१.४०५ते४०७, ४०९, ११, १२, १४ते१९, २२, २७, २८, ३४, ३५, ४१, ५१, ५७, ६८, ७०, ७६, ७९, ८६, ९०; ५४९, ५०, ५५, ५६; ६०३, १०, १४, २७ते२९, ३६, ३९, ४०, ५७, ७२, ८७, ८९, ९९; ७०७, १०, १५, २३, २४, ५०थ, ५०न, ५१, ९२, ९३, ९७; ८६० ६१, ६९
महाराणा प्रताप ७२०
महाराणी लक्ष्मीबाई ७२०
महादेवराव ७०२
महावीरसिंग (लाहोर कट) ६६२
महामुनी, मा. वि. ५१५
म्हसदकर ७२३, ४२
मांगीलाल ८०१
माँटेग्यू एड्वीन् सॅम्युअल ५१६
माडगावकर, जस्टिस ७०६
मांडे, अनंतराव ५५३
मामर्डे, शंकरसा ८४८
मार्टिन, जे. टी., मंत्री ५१५
मालपाणी, व. ज. ८०८
मालवीय, पं. मदनमोहन ५३७, ३८, ६०५, ६०६, १०, ९८; ७७०, ७३
मालाणी, लक्ष्मीनारायण ६६३, ७३, ७८, ७९, ८१; ७६३, ७४, ८०
मालाणी, सौ. रुक्मिणीबाई ७६३
माळोकार, नागदेव ७०२
मित्र, संतोषकुमार ७४९
मित्र, सत्येन्द्रनाथ ४०३
मिया महंमदशहा ४०३
मिरगी, भवानराव ७३०
मिर्झा अझिमुल्ला, बेग ७४१
मिसे, शिवलिंगआप्पा ८०७
मीनामल, शेठ ५८४, ६८६, ७१८, २७, ८०५, ८०८
मीर तुराबअली खान (जहागिरदार) ४६८, ७१८
मुकुंद गणपत ५३१
मुखर्जी, भास्कर, हे. मा. ४४३, ४७, ४८, ५६, ७१. ७२, ५०२, ४६
मुखर्जी, यु. एन्., कर्नल ४४८
मुचळंबे, संगाप्पा सिद्धाप्पा ४९१, ९६, ५१२, ३८
मुजफ्फर हुसेन, वकील ३७०, ७५ ते ७७, ८०, ८१, ८५, ८७ ८८, ९१, ५०६; ६०६, ११, १५, ९१ ९३, ७०४, ४२, ४५
मुंजे, डॉ., नागपूर ३७०, ५१५, ३७ ३८, ७६
मुदलिआर, सर ए. रामस्वामी ४०३, ५०७
मुदलिआर, सौ. शारदाबाई ८६८
मुधोळकर, सौ. राधाबाई ८५६

मुधोळकर, बॅरि. रा. ब. रं. न. तथा तात्यासाहेब ३८९, ९९, ४१०, ७३ ते ७५, ५५८, ९३, ६१३, ८३, ८२६ ३३, ७३
मुधोळकर, सौ. शारदाबाई ८६८
मुरलीधर नारायणदास ५२१
मेशराम लक्ष्मणराव ७२९
मुसा खान ८७३
मुळे, दशरथपंत ५६०
मुळे, वैद्य पं. दा. ४२४, ४६, ५३२ ९०, ६०३, २८, ३१, ७४, ७५, ७७ ७१५, २३, २५, ५६, ६६, ७०,
मुळे, श्रीमती बयाबाई ८६२
मृगेन्द्रशंकर, स्वामी ८४९
मेने बापूसाहेब ३८७
मेयो, लॉर्ड, व्हॉइसराय ५८७
मेयो, मिस्. ७३८
मेहेरअली, युसुफ ४९३, ९४; ७३५
म्हैसाळकर, डॉ. त्र्यंबकराव ७७७
म्हैसाळकर, दामुअण्णा ७१८
म्हैसाळकर, डॉ. भवानराव ५०६, ५८, ७१, ७५, ८०, ९२, ९३ ९७, ६८९, ९२; ७३४, ४४; ८२६
म्हैसाळकर, म. य. ७६२
मोअज्झम अली ४६५, ६६
मोटे, सौ. पद्मावती ७९१; ८६९
मोटे, रावसाहेब ६२२
मोडक, कृ. वा. वकील ३९४, ९५; ४३६; ७४६; ८६०
मोडक, सौ. ताराबाई ३९२ ९४; ४१६; ८३६, ६०, ६१, ६९
मोतीराम गणपतराव ६८१
मोतीलाल पुरुषोत्तम, शेठ ३८१; ५६५
मोतीलाल बन्सीलाल ६६६; ७१८
मोतीसिंग रजपूत ७०२
मोरे, काशीराव ७०२
मोरे, कृष्णराव ७०२
मोहनलाल, शेठ ६६२; ७६५
मोहरील, वा. गो., वकील ३७६, ८५, ९८, ४१७, २१, २४, २५, २९ ते ३२, ३८, ४०, ४७, ६३, ६७, ७१, ७७ ते ८०, ८२, ८५, ८६, ८८, ९४, ९७ ते ९९, ५०४, १३, २४
मोहिते, मा. मा. ६४२
मोहोड. डॉ., शरीर-बल-वर्धक ५९३, ७१८
मोहोळकर, नी. र. ८९१
मौलवी, महंमद याकूब ४०३
मौ. मोहियोद्दीन ७३४
मौ. मौलाना कासुरी ६९७
मौलाबक्ष गवई, बडोदा ५२९

–य–

यशवंत, कवि. य. दि. पेंडारकर ८०९
याकूब हसन ४७८
यादव, बाबूराव ५१८
युसुफ मेहेरअली ७३३, ३९, ४०
येवले ६१६
योकार, कृष्णराव ६३५, ६५, ६६, ६८, ७२, ८१

–र–

रणदिवे, सौ. ताराबाई ६१६, ९६, ७३८, ५०अ, ७३, ८०३, ६३, ६९, ७०

रणदिवे, रा. सा. श्री. द. वकील
५०३, ५०७, १५, २२, ६९, ९३, ९५, ६२१, ८४, ८८, ७४६, ८००, १९,
रमजान अली ७८१, ८२
रहाळकर, एन्. एम्. (नानासाहेब) ५३६, ७७
रहिमखान, मॅजि. ७४६
रहितपूरकर, हीराबाई ७९९
राऊत, नारायणराव ६७३, ७६६
राऊळकर, जा. दा. ८३६
राजगुरु, (लाहोर कट) ६६२, ७१६, १७
राजगोपालाचारी, चक्रवर्ती ४६५, ६६
राजदेरकर ६६२, ७६६, ७०, ८०५
राजपाल, प्रकाशक, लाहोर ५६४, ६०५
राजभोज, पुणे ६८७
राजाराम, छत्रपती, कोल्हापूर ५१७ ते ५१९
राजूरकर, पुष्पावती ७३६
राजू, प्रिन्सि., के. ई. सी. ५७३
राजू, सीताराम, बंडखोर ४६१
राजेन्द्रप्रसाद, बाबू ४६५, ६६
राठी, शेठ नारायणदास ३९०
राणी राजवाडे, सौ. लक्ष्मीबाई ग्वाल्हेर– ७२८, ३६, ५०अ, ८६६
राणीसाहेब, सांगली ६८६
राणोजी (संत विवरेकरांचे वडील) ७४७
रानडे, शिक्षक ४९०
रानडे, न्या. मू. म. गो. ८५४
राधाकिसन चंद्रभान, शेठ ४१७, १९, २२, २५, २६, २८, ३१, ३५, ३८, ९६, ६४६, ५२, ५६ ते ५९, ७६, ८०, ७१०, १२, २२
रानडे, स. वि. ७९९
रॉबर्टसन, रेव्हरंड ५७२
रामकृष्ण परमहंस, स्वामी ५८४
रामगोपाल विठूराम ६५२, ८०
रामचंद्र वस्ताद ६७३, ८१
रामभाऊ भटजी ७८५
रामण्णा ६०६
रामनारायण बद्रीप्रसाद ६८०
रामप्रसाद मोहनलाल ६४४, ८१६
राममूर्ति, प्रोफे. ४१९, ५१७, १८
रामराय निमगार, राजे, पानागल ५१७ ते ५१९
रामय्या ७१८
रामेश्वर पंडित ५६५, ७०
राय. सर प्रफुल्लचंद्र ५०९
रावबहाद्दुर, गोकुलचंद, दमोह ४०८
रीडिंग, लॉर्ड, व्हॉईसराय ४९५
रुस्तम गोपाळराव, डी. एस. पी. ४१०, २५
रुस्तमजी बेमनजी ४५४
रेड्डी, कूर्मवेंकट ५१७, १८
रेड्डी, सौ. मथूलक्ष्मी ७५०त

–ल–

लखोटिया, शिवकृष्ण, वकील ७८५
लढ्ढा, राधावल्लभ ५९३; ६०३, २१, ३९
लढ्ढा, श्री. ना., वकील ३७२, ८५, ८९; ४९६; ५०६, ३८, ७६, ६१६

लहानू, कोरकू-पुढारी ७३३
लहिरा, पं रामनारायण ३९६
लक्ष्मण झोलबा ७८९
लक्ष्मीनारायण, जहागिरदार ८७५
लाला, एकनाथ लक्ष्मण ८१५
लाला, दुनीचंद ६९७
लाला, बिसारे, शाहीर ६९०
लाला लजपतराय ४४७, ७८, ५५८ते ५६०, ९४, ९५, ६१०,७४२,४६,८०५
लाला, शिवप्रसाद, कलाल ४०९, २२, २५, २८, ३६
लॉरेन्स्, लॉर्ड, व्हॉइसराय ३७४
लिमये, धों. ल., वकील ४७९, ५०७
लिमये, श्रीमती मथूताई ६७१ते६७३ ७०२, ८६८
लीलावतीबाई, श्रीमती ६११
लोखंडे, कु. दुर्गाबाई ४३८, ८६१

–व–

वजीर बेग ४३१
वरखेडे, लक्ष्मणराव ७६६
वरेरकर,भा.वि., नाटककार६८२,८२३
वर्मा, पंडित ५८९,
वऱ्हाडपांडे, डॉ कृ. दा. ३६९, ७२, ७७ ७९ ते ८२, ८४, ८७, ९१, ९४, ९६, ४१०, २१, २४, २५, ३५, ३८, ३९, ४१, ४४, ४६, ५८, ५९, ७१, ७६, ७८, ८६,८७, ९०, ५०२, ५०३, ५०६ ७०५, ७०९, १०, ९७, ८००, ८०५, ८०८, ३५,
वहाब, अहंमद ५४७, ७०३
वहीद ५०३
वांगे ६५५
वाचासुंदर ७८९
वाटखेडकर, बाबासाहेब ४९०, ५०१
वाटवे, डॉ. ६०३, ६७७
वाटाणे, सौ. गिरिजाबाई ८६८
वाटाणे, दादासाहेब (पाटील एस्. वाय्. पहा)
वाठोडकर, वा. ब. ६४२,५५,७३,८१
वाडीलाल शेठ, श्रॉफ ३७८,४१५,१८
वाडेगावकर, वामनराव ५३१
वाघ, उ. ता. ४९४, ७३०
वातकर, ६४६, ७२३, २४
वानखडे, मो. तु. ४९४, ५१६, २४
वामनबुवा जोशी, गायक ५३०, ३१
वाळके, अ. तु., संपा. ७३०
विठ्ठलानंद सरस्वती तथा विठ्ठलगीर ८७६ ते ८७९
विमलानंद स्वामी, एलीचपूर ५६१ ६०५
विल्सन, डे. कलेक्टर ४१०ते४१२,७२
विल्सन आर. ए., डि. मॅजि. ४२२
विवरेकर,संत जयरामबाबा८४७ते८४९
वीरकर ६३०
वीर वामनरावदादा तथा वा. गो. जोशी ३६९, ७२, ७७, ७९ ते ८२ ८६ ते ९६, ४०५, ४०६, ४०८, १० १७, २० ते २८, ३० ते ३२, ३४, ३५ ४१, ५५, ६७, ७०, ७१, ७६ ते ७८ ८०, ८६, ८८, ९२, ९४, ९६ ते ९९, ५१०, ४२, ८२, ८६, ६०५ ते ६०९ १३, १७ ते २२, ३० ते ३६, ३८, ३९ ४१, ४२, ४४, ५३, ५५, ७७ ते ७९ ८२, ८३, ८५, ८७, ७१४,

वीर वामनरावदादा तथा वा.गो. जोशी
१६ ते १८, २०, २१, २४ ते २६, २८ ते ३४, ४१, ४३ ते ४५, ४८, ५१ ते ५४, ५६ ते ६०, ६५, ७०, ७२ ते ७४, ७६, ७८, ७९, ८५, ८७, ८९, ९२, ९४ते९७ ९९, ८०४, ८०५, ८०८, २४, २५, ३५, ८४
वेडरबर्न ६३७
वैद्य, ग. मो. ३८९
वैद्य, चिं. वि., भारताचार्य ६०१, ६०४
वैद्य, श्रीमती द्वारकाबाई ८५६
वैद्य, बाबासाहेब तथा वि. ब. ८३५
वैद्य, मथुरादास वसनजी ७५९, ६३, ६४
वैद्य, सौ. लक्ष्मीबाई ७३८
व्यास, जटाशंकर ५००
व्यास, पन्नालाल ४१७,३२, ४२, ८१, ९०, ५१५, ४९, ७०. ७६, ८७, ८९, ९३, ६१३, २१, ३३, ५६
व्यास, पृथ्वीराज ४०८
–श–
शंकर महाराज, परमहंस ८४१, ४३, ४४
शंकराचार्य, जगद्गुरु, डॉ. कुर्तकोटी ४१२, ४२, ४३, ६६, ५८५, ६०९, ८३४
शब्बीर हुसेन ४३८
शर्फुद्दीन, महंमद वकील ५०९, १८, ४३, ६४, ९३, ६१३, ७४०, ४४
शर्मा, कल्पनाथ ६५७ ते ६५९ ६८०
शर्मा, पं. कालीचरण ५८१
शर्मा, देवदत्त ७६९
शर्मा, राघवेन्द्रराव. हैद्राबाद ४९०
शर्मा, पं. रामचंद्र ५७१
शहा, केशवलाल ६७४
श्याम, दे. भ. सन्यासी ४६७
शालिग्राम, केशवराव ४०९, २२, २५, ३८, ५०२, ३८, ३९, ६१४, १५, १८, ३३, ३६, ३८ ४२, ७८, ७२२
शास्त्री वकील, अमरावती ३७७, ८४
शास्त्री, पुरुषोत्तम ७८७
शास्त्री, पं. रामप्रसाद ५७१
शास्त्री, प्रोफे, हरिकृष्ण ५१२
शाह, पोपटलाल ६५२, ६५८
शाहणे, डॉक्टर ३९१, ४१३, २२, २४, २५, ५३, ५४, ७८, ५८५
शाहणे, सौ. कमलाबाई ५९९, ८६८
शिंदे, हुतात्मा जगन्नाथ ७०६
शिंदे, कर्मवीर वि. रा. ५८८
शिंदे, बलभीम ७१८
शिदोरे, रा. सा. शालीनदत्त, वकील ८००, ३७
शिदोरे, सौ. कमलाबाई ८६९
शिरबाबीकर, वि. मा. ३९१, ४८०, ९६
शिराळशेट ८२८, २९
शिवनाथबाबू, शेठ ३९१. ४०७, १३, १५, १९, २१, २२, ५०६ ४९, ७६, ६४३
शिवनीकर, उ. गो. ४९३
शिवशर्मा, लाहोर कट ६६२

शिवानंदस्वामी तथा देशमुख ३६९, ८२, ८७, ४१६, १७, २५, ३०, ३९, ७०, ७८, ७९, ९०, ९२, ५०१, ५०३, २१ ते २३, ३६, ३८, ५०, ७०, ६०४, ६०६, ६०७, १३, १५, ६०, ७३०
शुक्ल, महादेवप्रसाद ७२१
शुक्ल, मॅजि. ५६९
शूरतादेवी ४०८
शेख, अब्दुल महंमद ३७५
शेठी, तपस्वी अर्जुनलाल ३९३, ४३१
शेंडे, विठ्ठलराव ७३०, ३१, ८०९
शेणोलीकर, आबासाहेब ६८४, ७०३
शेरीफ, बॅरि. ७८८
शेवडे, सौ. अन्नपूर्णाबाई ५८०, ८१, ८६५
शेवडे, कु. चंद्राताई ३९२, ४११, १७, २२, २५, २८, ८६१, ६२
शेवडे, टी. एल्. तथा दादासाहेब वकील ३७१, ७५ ते ७८, ८० ते ८२, ८५ ते ८८, ४०८, १०, १७, २०, २२, २४ ते २६, ३१, ३२, ३७, ३९, ५४, ६६, ७१, ७८, ८०, ८२, ९०, ९२, ९४, ९६, ९७, ९९, ५००, ५०५ ते ५०७, १०, ११, १५, २०, २८, ५०, ५४, ५८, ६१, ६३, ६४, ७०, ७२, ७३, ८२, ९३
शेवडे, सौ. विमलाबाई ३८८, ४२५, ८६० ६१,
शेवडे, ह. मो. ८९१
शेळके, रा. बा. कारकून ४४४, ४५
शौकतअली, मौलाना – अलीबंधू पहा

–श्र–

श्रद्धानंद, स्वामी ४५१, ५२, ५५०, ५१, ५४
श्रावणे ७८१
श्रॉफ् वकील ५०३
श्राफ्, वाडीलाल ३७८, ४१५
श्रीनारायण रामबिलास ७४०
श्रीराम शालीग्राम, शेठ ३७२, ८१६
श्रीराम सुरजमल, शेठ ५०५, ६५१, ५३, ७०१
श्रीवास्तव, कन्हैयालाल ६६७
श्रौती, ल. य. ६३५, ४१, ६१, ८०

–स–

संकरसा, कलाल ७८९
संगई, शेठ नंदलाल ३७९
संगई, रायसाहेब मोतीसा ६८२
सगणे, एम्. डी. ४००, ४०३
सत्यदेव, पं. विद्यालंकार ५७०, ६०४, ७८७
सदाशिवलाल ६६७
संत ७१४
सन्याल, (लाहोर कट) ६६२
सबनीस, तात्यासाहेब तथा गंगाधरपंत ८२४
सबनीस, डॉ. एन्. डी. ५७५, ६०५, १६, २१, ३३, ८५, ७३३, ५४, ५६, ६४, ९२, ९६, ८००, ८०५, ३६
सबनीस, सौ. सीताबाई ८५६
सबनीस, सौ. सुशीलाबाई ७६७, ८००, ७०
समर्थ रामदास, स्वामी ७५९
समीरमल भैरवदास ४९६

सय्यद तालेमहंमद ८०८
सरंजामे, रा. ब. र. द. वकील ५०६, ६८९
सरनाईक, वकील ४३६
सहस्रबुद्धे, इन्दिराबाई ७३६
सहस्रबुद्धे, का. वि. ४४४, ६२१, ३२
सहस्रबुद्धे, काकासाहेब तथा शं. ना. ८२३, २५
सहस्रबुद्धे, कृ. ग. ४८९
सहस्रबुद्धे, ग. ना. ५४६
सहस्रबुद्धे, दि. ह. ६३८, ६७५, ६७९, ६८०, ७४१, ७८९
सहस्रबुद्धे, एन. जी. ४५३, ४८१
सहस्रभोजने, न. वा. ७८७
सहारे, आ, गो. ८००
साऊरकर, बाबाराव ६३३
साऊरकर, शंकरराव ७७१
साखरे, ६८७
साजा, लतीफ महंमद ५४७
साठे, कु. अंबूताई ७०९–१०, ७१७ ७५७, ८६८
साठे, सौ. ताराबाई ४८९, ८६४
साठे, पु. बा. ४८९, ५२२
सातारकर वकील, अकोला ५७३
साने, कु. गीता ४८९, ८६४
साने, द. ब. कौन्सिलर ३७९, ३९० ५०५, ५०७, ५१०, ५१४
सावळे ६७३
सामंत, परशुराम, नट ८२४
सायमन ५८२, ९४, ६४२
सारडा, हरबिलास ४००, ७५० प, ७९०, ८०३
सारडा, हुतात्मा किसन ७०६
सावरकर, डॉ. ग. दा. तथा बाबाराव ४१७, ६१, ५७०, ७२, ८७
सावरकर, स्वा. बॅरि. वि. दा. तथा तात्याराव ४१७, ५९
सावंत, गणपत गोविंद ७७१
सावंत, गो. र. ७८८, ९८
सावळापूरकर, हरिभाऊ ७७१
सिक्लेअर डॉ., डाय्. पब्लिक इन्स्ट्रक्शन ५४५, ८८७
सिंघई, शेठ पन्नालाल ३८६, ९१ ते ९३, ५४१ ते ५४३, ९०, ६०३, ६०५, ६०६, ३७ ते ४०, ४६, ५६, ५७, ५९, ८०, ८४, ८५, ७०७, ७०८, १५, १९, २३, २५, ४८, ६५
सिंह. बी. के. (लाहोर कट) ६६२
सीतारामलाल, खामगाव ४०९
सुखदेव, (लाहोर कट) ७१६, ७१७
सुखाप्पा जगन्नाथआप्पा ठेकेदार ३७९, ४२२, ५२५, ५४७, ५४९, ६१६, ६३७, ६५२, ७९९, ८०५
सुतवणे, नारायण ६७३
सुपारे, सोमेश्वर ४२२
सुरे, प्रांफे. ५३४, ६१६
सुळे, सौ. इन्दिराबाई ८०३
सुळे, द. स., संपा. ७६२, ८३१
सेन, तारकेश्वर ७४९
सेन, हुतात्मा माणिकलाल ६७४
सेन, सतीन्द्र ६१५
सेनगुप्ता ८०७
सेनजित, डॉक्टर ६९५

सेवक, प्यारेलाल ४१०, ७२, ६५८ ते ६६०, ६२, ६४, ६८, ७२, ८०, ७३० ९२, ९७, ८०८
सैफुद्दीनखान, वकील ५४७, ८०
सैय्यद महंमद ६९७
सोनकुसरे ७८७
सोनटके, उत्तमराव ७७१
सोनटक्के, मुकुंदराव ७८९
सोनभट, पुजारी ८१७
सोनवणे, माणिकराव ७०२
सोमण, डॉ. द. ब. ३९६, ४१९, २१, ३०, ३६, ३७, ३९, ४०, ४७, ५३, ६७, ७१, ७८, ७९, ५०७, ३८, ५०, ६१, ६५, ८९, ९३, ६०२, ६०३, ६०५, ६०६, ६०९, १३, १५, २१, २२, २३, ३६, ३८ ते ४०, ४५, ४६, ४८, ५५, ७९, ९४, ७४४, ४८, ५४, ५६, ५८, ६७,
सोमण, श्रीमती ५८०
सोमाणी, श्री. माणिकलाल ७६३, ६७, ९८
सोहनसिंह बाबा ४५९
स्टँडन, सर पी. बी. ५०५
स्लॉय, सर फ्रँक, गव्हर्नर ४७२ ते ४७४, ५०४, ३२,
स्टेट, मिसेस ७०४
–ह–
हकीम अत्तरवाले ४२५
हकीम, मीर जाफरखान ३७७, ८०, ९२
हफीज बेग, डॉ. ४२९
हंबर्डे, रावजी सावकार ४५४, ८७३,
हंबर्डे, ग. रा. तथा अण्णासाहेब ४९९, ५५६, ७१८
हरकरे, अण्णासाहेब ५७४
हरिकिसन तथा हरिकृष्ण, लाहोर कट ७१६, २४
हरिदासभाई ६३७
हरिभाऊ सखाराम ६५२
हरिराम ५४७
हरिसिंग दरबारसिंग जमादार ८१४ ते ८१७
हर्डिकर, डॉक्टर ५९६
हर्षे, संपा., रत्नाकर ८०१
हर्षे, श्रीमती माई ६९६
हॉचिन्सन, बॉम्बे बँक ३७९
हाजीसाहेब, शेख ३७०, ४१७, ८०५
हार्वे, जेल–अधिकारी ७७४, ८८
हिंगे, नारायणराव ७१८
हिदायत अली, वकील ५०९, ८४, ९३ ६१५, ८८, ७१८, ४०, ७८
हिरूरकर, ना. ल. ६८१
हिरूरकर वकील, प्र. ना. ३९१, ४१६, ५०७, १२, २३, ५७, ५८, ७३, ९३, ९६, ६०३, ६०४, १६, २१, २२ ७१८, ६२, ७०, ८०४
हिर्लेकर, वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री ६०२, २१ ते २३, ७८५, ८०२
हीरालाल, रा. ब. ५१३
हुंडेकर, महादाप्पा ५८४
हूड, गं. ना. ४८०, ५२०
हेगू, ६०७
हेडां, राधावल्लभ ५९०
हेमराज खादीवाले ६२५, ७३, ८१

अमरावती शहराचा इतिहास

भाग २

विविध-विषय-सूची

अमरावती नगर घटना, संघटना, संस्था

१ घटना

अंबादेवी मंदिर-प्रवेश आंदोलन ५४४, ५६५ ते ५६९, ७९४ ते ७९६, ८१९, ६९

अमरावतीच्या कलावन्तिणी ८१३, ८१४

अमरावती-नरखेड रेल्वे ५८६

अमरावती-सिटी-सर्व्हे-सेटलमेंट ४८७, ५००

अमृतसरची कत्तल-श्राद्धदिन ३८०

इरविन हॉस्पिटल-उद्घाटन ५८७, ५८८

उग्रमंगल नाटकाचा प्रयोग ४५३

कायदेभंगाची चळवळ ७६१

कीचक वध-बंदीमुक्त पहिला प्रयोग ५२७, ५२८

क्लीवलँडशाही ५७४

खाजगी लवाद कोर्ट ३९६, ३९७

गडकरी स्मृति-दिन ५८२

गढवालदिन-
१. मिरवणूक ६६८ ते ६७४
२. अटक झालेले स्वयंसेवक ५७२,५७३

जंगल सत्याग्रह, अमरावती (वडाळी) ६५० ते ६५२, ७०२, ७०४, ७२५, ७८०

जंगल सत्याग्रहींची यादी (इ.१९३०) ७०२

जिल्हा दरबार ४१३

निजामाचा वऱ्हाड परत मागण्याचा मेमोरँडम (इ. सन १९२४) ४९१

नेमस्त-जहाल-सामना ३७१, ३७२

परकोट-प्रकरण ५३८, ५३९

परदेशी कापडाची होळी ४३७, ३८

पहिला बर्फाचा कारखाना ५००

पहिला स्वातंत्र्य-दिन महोत्सव ६३१

पहिली शिक्षण परिषद (इ. स. १८८३) ५४६

बँकिंग-कमिशन ६८४

बालमृत्यूचा तक्ता ५५३

भवभूति-स्मृति-दिन ५८३

मजुरांची पहिली सभा ३९२

मेकॅनिकल इंजिनीअर्स परिषद (अधिवेशन दुसरे) ४४०

रामकृष्ण परमहंस-पुण्यतिथी ५८४

राष्ट्रीय सप्ताह ६०५

शिराळशेट उत्सव व यात्रा ८२८ ते ८३०

शिराळा-खून खटला ५०८, ५०९, ५१२, ५१३

शिशु-सप्ताह ५८०, ५८१

शिरगणती-(इ. स. १९३१) ७१०

सक्तीचे मोफत शिक्षण ४९४

अमरावतीचे 'स्त्री जीवन' ८५० ते ८७१
सामाजिक व सांस्कृतिक जीवन ८२१ ते ८२७
हरिजन दिन ८०८
हार्वेशाही (अमरावती तुरुंग) ७७४, ७८, ७९, ८१ ते ८३, ८७, ८८

२) संघटना–संस्था–अमरावती

अंजुमन–इ–मुस्लिम ७४३
अंबादेवी-संस्थान ५२१, ६१, ९५ ते ९७, ८१३ ते ८२०, २७, ३९, ४०, ४२, ४८
अंबापेठ युवक मंडळ ६७३, ७६, ७९
आर्य समाज ४९०, ५५०, ५४, ५९, ६४, ७०, ७५, ७९, ९४, ६०५, ६०७, ७९९, ८००, ६६, ७०
अस्पृश्यता निवारण मंडळ ७२९
इन्फंट वेलफेअर सोसायटी ५८०, ८६२
इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी ४९२
एकवीरादेवी (मोठी अंबा) मंदिर ८३९, ४०
कारकून संस्था ४८०
कॉटन मार्केट कमेटी ६०२, ७०५, ७०८, ८२०
किंग एड्वर्ड मेमोरियल सोसायटी ४७३, ४७४
को–ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक ५२२
कोळी समाज ३७२
गजानन क्लब (समाज) ५२१, ६८९
गंभीरपूर हनुमान मंदिर ८२०
गुजराती युवक मंडळ ६७३
गुजराती समाज ६१६
गुलामपुरी मंडळ ७२१
गोरक्षण संस्था ४१९, ६०६, ८१८
जिल्हा स्त्री-रुग्णालय (लेडी डफरीन हॉस्पिटल पहा)
जैन समाज ६३८, ७०८
टिचर्स, असोसिएशन ४४३
तरुण सेवक मंडळ ३८१
थिऑसॉफिकल सोसायटी ६१०, ८२६, २७
दुय्यम शिक्षक संघ ५५३, ६२२
नगर (स्थानिक) काँग्रेस कमेटी ४१३, ३५, ४१, ४४, ६७, ९६, ५९६, ६८८, ७०५, ७०८ ते ७११, १३, १४, १७, १८, २५, ३२, ४०, ४८
नत्थुबुवा गायन समाज ४९२
नाट्यसंस्था व नाटककार ८२१ ते ८२६
नूतन शिक्षण समाज तथा न्यू एज्युकेशन सोसायटी ५१४, ७१, ८१९
नमस्कार संघ ७५९
नेहरू मंडळ ७२१
पहिली ट्रेड युनियन ३९४
प्रियबंधु समाज ५०६, ६०६
बाल वक्तृत्वोत्तेजक सभा ८२६
बॉय स्काउट असोसिएशन ५९५, ६९२, ७०३, ९१
बाल–संगोपन संस्था ५५३
बाल समाज ७२१
बाल-विवाह-प्रतिबंधक मंडळ ७२०
बुधवारा शाहीर मंडळ ६९०
बुद्धिस्वामी मठ ८४९

बेकार संघ ७६०, ६४, ६६, ७०
बेरार एज्युकेशन सोसायटी ८२७
बोहरा समाज ७२७
ब्रम्हविद्या मंदिर ३७२, ८२६, २७
भाजीबाजार मंडळ ७२१
भारत समाज ७४२
मराठा एज्युकेशन सोसायटी ७८५
मराठा समाज ५५५, ८७१
मारवाडी समाज ७१५
मुकुंद मंडळ ७२०
मुक्त राजबंदी परिषद ७२२
मुसलमान प्रेस बोर्ड ४२८
मुस्लीम तरुण संघ ७३३, ७४२
म्युनि. ट्रेण्ड् शिक्षक संघ ७२९, ७३०
म्युनि. रिफॉर्म ॲसोसिएशन ६०८
मौलाबक्ष प्रासादिक गायन समाज ५३०, ५३१, ५६०
युवक संघ ६०५ते६०७, ६१९, ६२०, ६२२, ६८३, ७४१, ८०५, ६९
राष्ट्रवीर संघ ६०२, ६८५
राष्ट्रीय शिक्षण मंडळ ४४०
राष्ट्रीय स्वयंसेवक मंडळ ३७७
रिफॉर्म क्लब ७०३, ७२७
लक्ष्मीनारायण मंदिर ८७६ ते ८८०
वक्तृत्वोत्तेजक मंडळ ७२६, ५८, ८०१
वक्तृत्वोत्तेजक सभा ८२६
विदर्भ तरुण मंडळ ५८५, ७१७, ८९
वीरशैव शिक्षण मंडळ ६०७
वीरशैव समाज ४४८
लक्ष्मीकांत मंडळ ७२७
शिवाजी एजुकेशन सोसायटी ७८६, ८२७, ४५
सत्यशोधक समाज व ब्राम्हणेतर चळवळ ४९४, ५१५ ते ५२०, ५४३
सन्मित्र मेळा ६१२
समर्थ मंडळ ७५९
सार्वजनिक सभा ८२६
सेवा समिती ३७८, ८७
स्वदेशी प्रचार (प्रसार) मंडळ ५९०, ७६२, ६६, ६९, ७३, ८३; ८००
स्वराज्य संघ (मंडळ) ३६९, ७१, ७६, ८१, ८४, ४३१
सहकारी संघ ६८३
हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ७५६, ७९८
हरिजन सेवा संघ ८०८
हरीश्चंद्र पाटील यांचा गणपती ८८१ ते ८८६
हिंदी तरुण स्वयंसेवक संघ ३७३, ४१३
हिंदी स्वराज्य संघ (मंडळ) ३६९ ते ३७२, ७६, ७८, ८१, ८४, ९०, ९१, ४३१, ५५
हिन्दू बाल अनाथालय ६८५
हिन्दू मिशन सोसायटी व बोर्डिग ५०७, ५२२, ५५१, ५५६, ५५९
हिन्दू सभा ५१२, ५२१, ५९४, ६०७
हिन्दू सामाजिक परिषद ५१४ (अधिवेशन पहिले)
होलिका निवारण (होली सुधार) मंडळ ६८५, ७११
ज्ञानदेवाश्रम ८४७, ४८
ज्ञान प्रसारक मंडळ ५६४, ६७१ ७४५, ७६२, ८०३

(३) महिला संघटना–संस्था

अ. भा. महिला परिषद ५९६, ७२९ ३९, ५०अ, ५०क, ५०च, ५०त, ५०प, ८०३

अस्पृश्य महिला परिषद ८६६

देशसेविका संघ ६६५, ६८, ७१; ८७१

नगर महिला काँग्रेस कमेटी ४३८, ८६३

महिला परिषद (प्रांतिक व जिल्हा शाखा) ७२९, ९०, ९१; ८६९

महिला समाज ४११, ५८१, ८४, ९४, ९९; ६१६; ७४०; ८६१ ते ८६३, ६६

लेडी यशोदाबाई जोशी लेडीज् क्लब ६८६, ८६६

वनिता समाज ५९९, ६९५, ९६; ७२५, ६०, ६४; ८२३, ५६ ते ५८, ६१, ६३, ६६, ६८, ७१

विदर्भ प्रांतिक महिला परिषद (अधि. १ ले) ७३५ ते ७४०, ५० अ, ५० क, ५० ख, ५० च; ८६६, ६७, ७१

सूतिका गृह ७०४

(४) इ.स. १९३० च्या आंदोलनातील तात्कालिक घटना–संघटना

काँग्रेस बुलेटिन ६७५

नॅशनल मिलिशिया ६३८, ७१, ७२, ७६, ७०६, १५, २०

प्रभातफेरी संघ ७६०

मुष्टी फंड ६४७, ७२, ७६, ७८

युवक काँग्रेस ७४१

युद्ध मंडळ ६३२ ते ६३४, ३६, ३९ ते ४१, ४४, ४८, ५०, ५१, ५३, ६५, ७०, ७१

वानरसेना ६४६, ६१, ६७, ७६, ७०८, १२

विद्यार्थी दल ६६३, ६४

शांतिदल ६७६

शुश्रूषा पथक (अँब्युलन्स कोअर) ६६८, ७१ ते ७३, ७७

सेवादल ७१९

संरक्षक दल ६७१

स्वयंसेवक ६६८

सत्याग्रहींची यादी (कायदे भंग १९३०) ६७९ ते ६८१

हिंदुस्थानी सेवा दल ७२४, ८०७

(५) शैक्षणिक संस्था

अँग्लो उर्दू गर्ल्स स्कूल ७४३

आयुर्वेद महाविद्यालय ५३२

इंजीनिअरिंग कॉलेज ८४५

उर्दू नॉर्मल स्कूल ४४२, ४४३

काशीबाई प्रायव्हेट हायस्कूल ८२६

किंग एड्वर्ड कॉलेज तथा विदर्भ महाविद्यालय ४७२ ते ४७५, ५०२, ५०९, ५१३, २७, ५३४, ५४४, ५५३, ५७३, ५८३, ५८८, ५९५, ६१८, ६१९, ६७९, ६८२, ६८८, ७२७, ७५०प ८०९, ८४५

नूतन कन्या शाळा ८६३

प्रॅक्टिसिंग स्कूल ८९०

प्रायव्हेट हायस्कूल ८२६

महाराष्ट्र हायस्कूल ८२७

न्यू हायस्कूल ४९०, ५०८, ५१४, ५३१, ५४१, ५४८, ५७२, ५७३, ५९२, ६२२, ६२३, ६८४, ७०८, ७४०, ७४१, ८२७
मराठी नॉर्मल स्कूल फॉर मेन ४४२, ४४३, ४७१, ५०७, ५३९, ५५७, ५८३, ६२२, ७९१, ८८७ ते ८९२
महिला महाविद्यालय ४१६
मुलींचे नॉर्मल स्कूल ८५८, ५९
मुलींची माध्यमिक शाळा (१९३०) ८६२
मुलींचे सरकारी हायस्कूल ७९१, ८५८, ५९
म्यु. ए. व्ही. स्कूल ४७१, ४८३, ५०८, ५९०, ६८९, ६९२
रामकृष्ण हायस्कूल ८२७
राष्ट्रीय शाळा ३९५, ४३३, ४२, ६९, ७०
रोहिदास मोची स्कूल ६८६
विदर्भ आयुर्वेदिक विद्यालय ८०२
विदर्भ महाविद्यालय – किंग एड्वर्ड कॉलेज, पहा
वीरशैव प्राज्ञ पाठशाळा ५३६
वेदशाळा (अंबा संस्थान) ८१८, १९, २७
व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटचूट (इंडस्ट्रिअल स्कूल तथा कला निकेतन) ५०९, ५८, ८८ ६०९, ८७४
शिवाजी मराठा बोर्डींग ५२१,४१,९३
सदानंद गुरुकूल ५६१, ६२
श्री शिवाजी मराठा हायस्कूल ४९३, ५११, १२, ७३, ८८, ६१५, ७०३, ८५, ८२७
समर्थ हायस्कूल ८२७
सरकारी उर्दू मोहामेडन हायस्कूल ७२७
सरकारी मराठी (हिंदू) हायस्कूल ४३३, ४७, ६७, ७१, ७२, ८२; ९२, ५०२, ५०७, ५४४ ते ५४७, ५७, ६६३, ८४, ७२७, ५४, ९८
हिंदी राष्ट्रीय शाळा ४१२, ७१३

(६) विद्यार्थी संघटना

प्रांतिक विद्यार्थी परिषद ६१९
मराठा विद्यार्थी संमेलन ५४८
विदर्भ युवक संघ ५९५, ६०२, ७२० ३४, ४१, ४७, ५३
विद्यार्थी मंडळ ६८२

(७) दवाखाने

इरवीन हॉस्पिटल ५८७, ८८; ७२७
धर्मार्थ दवाखाना व रुग्णालय ५३२
रावजी हंबर्डे धर्मार्थ हॉस्पिटल ४५४
लेडी डफरिन हॉस्पिटल (जिल्हा स्त्री रुग्णालय) ८६२, ८७२ ते ८७६

(८) नाट्य-संस्था-अमरावती

अमरावती अमॅच्युअर नाटक कंपनी (अमरावतीकर सं. ना. मंडळी) ८२१
आझाद हिंद मंडळ ८२३
नीलकंठ मंडळ ८२३
मधुसूदन कला मंदिर ८२३
मित्रप्रभा नाटक मंडळी ८२२
विजय मंडळ ८२३

विदर्भ नाट्य मंदिर ८२३, २५
विदर्भ नाट्य समाज ७१८, ७४३

(९) व्यायाम–शाळा, अमरावती

अंबादेवी संस्थान व्यायाम शाळा ५०७, ६१; ८१९
जुगलकिशोर व्यायाम शाळा ५६० ७०, ८१
तुकाराम आखाडा ८२७
बाहुबली जैन व्यायाम शाळा ६८६, ७०८,
महाराष्ट्र व्यायाम शाळा ५७१, ७३, ९३, ९७; ६०६, ३४; ८२७
वीर व्यायाम शाळा ७२७
शिवाजी व्यायाम शाळा ५८३, ९७; ७१४, ३३, ८०५
श्रीराम व्यायाम शाळा ५०७, ५९, ७१
हनुमान व्यायाम शाळा– (हनुमान व्या. प्रसारक मंडळ) ४४५, ५०६, ५०७, २७, ४३, ४९, ५९, ८४, ९१, ९७; ९८, ६०१, ६०२, ६०६, १९, ४८, ८४; ७४०, ५६; ८०८, २७

(१०) वाचनालय

असनारे वाचनालय ४६७
गणेश वाचनालय ७२६
नेटिव्ह जनरल लायब्ररी तथा नगर वाचनालय ३८५, ८२६, ५५
भारत हिंदी पुस्तकालय ६८६
मोफत वाचनालय ५२२
म्युनिसिपल फ्री लायब्ररी ६८८

(११) नगर-पालिका

१) कॅम्प–म्युनि.– ५४७, ५५, ७३; ६०४, ६०९, १६, ८०५
२) टाऊन म्युनि. ३७०, ८६; ४३९, ४०, ५४, ६८, ८५ ते ८७, ९४, ९६; ५०६, ५०८, १०, १२, २४, ३८, ३९, ४८, ४९, ५३, ५५, ५६, ७४, ८३, ८४, ९०, ९३, ९४, ९६; ६०४, ६०५, ६०८, १०, ११, १५, १८ ते २०, ६१, ६७, ८४, ८६, ९३; ७०७, ७०८, ११, १४, १९, २०, २८, ४३, ६३, ६५ ६८, ६९, ७८, ८०, ८३, ८५; ८००, ८०७, ७३, ७५

(१२) राजकीय पक्ष

काँग्रेस पक्ष ६३२
डेमॉक्रॅटिक पार्टी ६९३
जहाल पक्ष ३७१, ७२
नाफेर पक्ष ४६७
नेमस्त पक्ष ३७१, ७२
प्रतिसहकार पक्ष ५३५, ३७ ४१ ते ४३, ८९, ९०; ६३२
प्रागतिक पक्ष ६३२
ब्राम्हणेतर पक्ष ५७९
मवाळ पक्ष ५३५, ४२, ४३
राष्ट्रीय पक्ष ३७६; ५७४, ७१९
लिबरल लीग ५०९
शेतकरी संघ ५५७, ७९, ८७
सत्यशोधक समाज ५४३
समाज–क्रांतिकारक पक्ष ५७४
स्वराज्य पक्ष ४६४, ६५, ७१, ८१, ८२, ९४, ९५, ९७; ५०८, ११, २६, ४१ ते ४३, ९०

स्वतंत्र काँग्रेस पक्ष ५४३
१३) वृत्तपत्रे-नियतकालिके, अमरावती ८३१ ते ८३८
'आव्हान' साप्ताहिक ८३६
इन्द्रधनुष्य ८३६
उदय, साप्ताहिक-द्वि-साप्ताहिक, दैनिक ६०२, ६३, ८३४, ३५
काँग्रेस साप्ताहिक ८३६
कर्तव्य, साप्ताहिक ८३३, ३४
ग्रामसेवक, साप्ताहिक ८३१
ज्योतिष प्रचारक, साप्ताहिक ८३६
तरुण हिंदू ८३४
प्रभात, पाक्षिक ३५४
प्रमोद-सिंधू ३५४, ८३२, ३४
बहिष्कृत भारत ४६६, ८३४
भारत ८३४
भोळा शेतकरी, मासिक ८३६
महाराष्ट्र केसरी ५७९, ८३६
माहेश्वरी-जगत् (हिंदी) ८३६
युद्धवार्ता, साप्ताहिक ८३७
रामदासी ८३५
वज्रप्रहार, साप्ताहिक ८३६
वऱ्हाड शाला-पत्रक ८३१
वऱ्हाडचा शेतकरी ८३४
वऱ्हाड समाचार २०९, २१०, ८३१
वाग्विलास ३५४, ८३४
विदर्भ, साप्ताहिक ८३७
वीरशैव संजीवनी ८३६
वैदर्भ ८३३
व्यापार समाचार ३५४, ८३४
शिक्षण-पत्रिका ८३६
श्रीगुरुदेव, मासिक ८३१
संग्राम, साप्ताहिक ५१९ ते ५२१, ५४, ८३५
सत्यप्रकाश ८३१
सन्देश, दैनिक ३३६
सफर-ए-बरार (उर्दू) ३५४, ८३४
समाजोन्नति, साप्ताहिक ८३७
सहकारी विदर्भ, मासिक ५२९, ८३५
स्वतंत्र हिंदुस्थान, साप्ताहिक ४७६, ९७, ६८७, ८३५
हस्तलिखिते ८३८
हिंदुस्थान, साप्ताहिक-दैनिक ८३७
ज्ञानसंग्रह मासिक ८३१

(ब) अमरावती तालुका

घटना-संघटना

अमरावती तालुका राजकीय परिषद ७२२
तालुका काँग्रेस कमेटी ४६७, ५५०, ७२३
तालुका बोर्ड (लोकल बोर्ड) ५३३, ७०३, ७२१

(क) अमरावती जिल्हा

संघटना-संस्था

जिल्हा काँग्रेस कमेटी ३८५, ४१५, १६, २२, २४, २५, २८, ३२, ६७, ५०७, ५०९, ८२, ६०३, ६०४, ६०७, १५, १६, १८, २२, २९ ते ३१, ४१ ४२, ४६, ६३, ६९, ७२, ७९, ८१, ७२३ ते ७२५, ३२, ४२, ४४, ४५, ६३, ६७, ६८, ७६, ८०१, ८०६
जिल्हा कौन्सिल (बोर्ड) ५०३, ६०, ८६, ६०१, ६०९, १५, ३९, ८४, ८७, ७०३, २४, २७, ८०४, ७५

जिल्हा शिक्षक परिषद ६८४, ७०३
जिल्हा हिंदू परिषद ५२१, ८७
मुक्त राजबंदी परिषद (इ. १९३१) ७२२

(ड) विदर्भ (वऱ्हाड)

प्रांतिक घटना-संघटना

नागपूर विद्यापीठ ५१३, ६१६
पैसा फंड मेळा ५९३
प्रांतिक कायदे कौन्सिल ६०२, ६०३, १६, ९१, ९३; ७११, ६३, ८५९
प्रांतिक कारकून परिषद (अधिवेशन ४ थे) ५७६, ७७
प्रांतिक परिषद ५७४
बॉय स्कॉउट रॅली (विदर्भ संमेलन) ५९७
बेरार मुस्लिम कॉन्फरन्स ७४४
मध्यप्रांत-वऱ्हाड मोटर ओनर्स व ड्रायव्हर्स असोसिएशन ६९२
महाराष्ट्र खादी संघ ५६३
महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद ५८५
वऱ्हाड कायदे कमेटी ५०४, ५०५, ६०१, ७८८
वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषद, ५६८, ९६,
वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटी ३७२, ७७, ९६, ४३३, ४६, ८०, ८१, ९७, ५०७, २०, ३७, ६१८, २९ ते ३३, ३६, ७१, ७२, ७७; ७११, १६, १८, २०, २४, २९, ४४, ४५, ५३, ५५, ५७
वऱ्हाड प्रांतिक प्राथमिक शिक्षक परिषद (अधिवेशन १ ले) ५१३, १४,
वऱ्हाड प्रांतिक राजकीय परिषद ७२०, ८१९
वऱ्हाड मवाळ परिषद (अधिवेशन १ ले) ५१०
वऱ्हाड सर्वपक्षीय समिती ७४४, ६१
वऱ्हाड सहकारी परिषद संघ ५२२, ६०९, ८३५
वऱ्हाड स्वातंत्र्य संघ ६२१, २२
विदर्भ जंगल सत्याग्रह (इ.स.१९३०) ६४५, ५० ते ५३ ५६, ७८
विदर्भ युवक परिषद (अधिवेशन १ ले) ५९२, ९३
(अधिवेशन २ रे) ७३४,३५,४०,८६५
विदर्भ प्रकाशन संस्था ८०१
विदर्भातील तीन हुतात्मे ७५४
विदर्भ साहित्य संघ ४६३, ६४, ८९, ९०, ५३६, ६०१, ६०२, ६०४, ६०९ ८२, ८३, ८५, ८६४

(इ) अखिल भारतीय घटना

गांधी-इरवीन-करार ६६८, ७८, ७१२, १३, १६, २२, ४५, ४६
गोलमेज परिषद (राऊंड टेबल कॉन्फरन्स) ७२७, ४४, ५२, ६१, ८३, ८०३
जालीयानवाला बाग ३७९
८२ ते ८४, ९३, ४२९, ६३३, ७०० ६७; ८६०
झेंडा सत्याग्रह, नागपूर ४६८, ६९
दिल्ली करार ७५१
नेहरू योजना (रिपार्ट) ५९६, ६२८
पटेल अहवाल ६९८, ९९, ७५०ख
पुणे करार ७९५

पेशावर हत्याकांड (इ. १९३०) ६९७ ते ७००, ५८
भारतीय स्वातंत्र्य युद्ध (इ. १९३०) ६२५ ते ७००
राजा–मुंजे-करार ७६५
रौलट ॲक्ट ८६०
लाहोर कट ६१४, ६२
लाहोर काँग्रेस ६२७, २८, ३०, ३२
वेरावळ अत्याचार ७२७
सविनय कायदेभंग–आंदोलन ६२७ ते ६५५
१) पार्श्वभूमी व पूर्वतयारी ६२७ ते ६३४
२) मिठाचा कायदेभंग, दहिहांडा ६३४, ३५, ३८, ४०
३) मिठाचा कायदेभंग अमरावती ६३६, ३७, ४०, ७२, ७८
४) जप्त वाङ्मय वाचन ६३९, ४०
५) जंगल सत्याग्रह ६५० ते ५२, ७०२, ७०४, ७२५, ८०
सायमन कमिशन ५८२; ९४
सारडा बील ६१६, ७५० ख ७९०, ८६६
सावरकर पट्टी ४८८
सोलापूरचे हुतात्मे ५०५, ५०६
हंटर रिपोर्ट ३८३, ८४
हिजली हत्याकांड ७३१, ४९

(फ) अखिल भारतीय संघटना-संस्था

अखिल भारतीय अस्पृश्य परिषद ५१५, १७; ६८७
अ. भा. पोस्टल परिषद (अधिवेशन ४ थे) ५७७
अ. भा. ब्राम्हणेत्तर अस्पृश्यता निवारक परिषद ५१९
अ. भा. ब्राम्हणेत्तर काँग्रेस (अधिवेशन २ रे) ५१५ ते ५१९, ५३२
अ. भा. ब्राम्हणेत्तर परिषद ५२३, २४; ८३५, ६३
अ. भा. ब्राम्हणेतर महिला परिषद ५१५, १७, १८, ८६३, ६४
अ. भा. राष्ट्रीय सभा (All India National Congress) ३६९; ४१६, २०, २३, २४, ३२, ३९; ५०९, ६७, ९४, ९८; ६१४, २७, २८, ३०, ३१, ४०, ५५, ६४; ७१६, २०, २५, २८, २९, ४५, ५०क ५० ख, ५१, ५३, ५५, ८१८, ५७
अ. भा. सामाजिक परिषद ५१५, १७, १८, २४
अ. भा. हिंदू महासभा ४७८, ५३७, ५०, ५८, ६१, ६४, ६७; ६०६; ७७०, ७९
आर्यधर्म परिषद ५७०
टिळक स्मारक स्वराज्य फंड ४१७, १८, ३३, ८६०
पहिले महायुद्ध ५२६
बोरसद दिन ७१०, ११
मुस्लिम लीग ३७६, ७८, ४१६
शिख लीग ४१६
शुद्धी परिषद ५७०
सत्यशोधक समाज परिषद ५१५, ५१७ ते ५२०, ५७९

• शुद्धि-पत्र •

भाग १ ला

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	१९	सान्निध्यातीत	सान्निध्यातील
३	२६	दुंबरावती	उदुंबरावती
३	२७	महाराष्ट्राचा	व [१] महाराष्ट्राचा
४	शेवटची	क्र. २ पहा	क्र. ४ पहा
५	३०	Amravati Pudur	Amravathi Pudur
७	१	जार	हजार
७	२	कीह	की
७	१९	मतोर्वोड	मतोर्वोड़
८	२४	नद्यामतुप्	नद्यां मतुप्
८	२५	चतुरर्थी	चतुर्थी
९	१२	वर्ज	वर्ज्य
१४	१४	चेले	केले
१४	१७	नेनणे	नेतणे
१७	२३	इतके	इतके जुने
२१	२१	विधिनोव्दह	विधिनोद्वह
२१	२३	त्वामुव्दहे	तामुद्वहे
२४	७	पूवीचे	पूर्वीचे
२७	२८	पृ. २५	पृ. २५ आणि
३१	शेवटची	Sha	Shah
३२	६, ७	report	respect
३३	२२	arder	order
४२	१३	गोंडवाना	गोंडवना
४४	शेवटची	२	१
४७	१	भट	भेट
४७	२८	१	१ व २
४८	९	भीमराव	भीवराव
४८	२३	वर्तात	वर्षात

५०	११	गारेगार	कारेगार
५१	१३	आश्रय गावास	आश्रय : गावास
५२	२१	(पुण)	(पुणे)
५२	२३	३ व ४	३ व ४ :
५५	२८	आन्होजी	कान्होजी
५९	१४	वंशपरागत	वंशपरंपरागत
६१	शेवटची	११ व १९	१८ व १९
६९	१०	संताछी	संताजी
७२	६	आष्टकोनी	अष्टकोनी
७७	३	चमादिलाखर[१]	जमादिलावर[१]
७७	४	४	१४
८०	१३	कुशाबा[१]	कुशाबा
८०	२४	दिजे[१]	दिजे[१]
८०	२५	पा. १४६	पा. १४६ व १४७
८३	१३	मॅचेस्टर मध्ये	मॅचेस्टरमध्ये
८७	१०	ओळीस	ओलीस
८८	२३	सालारणंग	सालारजंग
१०९	४	सात लक्ष	चार लक्ष
११८	२९	फेस	फेज्
११९	१०	रहावी	राहावी
१२१	६	आमदनीत	अमदानीत
१२४	१५	छत्तपुरी	छत्तरपुरी
१४३	शेवटचो	(पुढील पानावर)	(पुढील पानावर १६ व्या ओळीनंतर 'गृत्समद' या शब्दापासून 'असावा' या शब्दापर्यंतचा मजकूर.)
१४४	१६ नंतर.....		मागील पानावरील तळटीप सुरु.
१५९	१९	accuired	acquired
१६१	१४	beore	before
१६२	२३	Sanctin	Sanction
१६३	११	be	by

१६३	३०	Couducted	Conducted
१६४	३	Fuuds	Funds
१८०	४	दुसऱ्या	दुसरी
१८५	२९	पावलॉ	पावलॉव
१८९	शेवटची	डॉक्युमेंट नं. ४२	डॉक्युमेंट नं. ४२३७
१९८	१	आयात-निर्यात	आयात-निर्यात[1]
२०१	१६	उघण्यात	उघडण्यात
२०३	३	७%	७०%
२०७	१६	शताद्वि	शताब्दी
२१६	११	पाण्याने	पाण्याचे
२१९	५	जातवावर	जातवार
२३६	२७	ती	तीन
२४९	१२	टिळवांची	टिळकांची
२५२	१३	थिऑसॉफिल	थिऑसॉफिकल
२५२	१६	थिऑथॉफीचा	थिऑसॉफीचा
२५३	१४	१ विव्दान	एक विद्वान
२५६	२१	म्हणणे	म्हणजे
२६५	सुरुवात	प्रकरण चवथे २६	प्रकरण चवथे २६५
२६८	६	नेकोलेटस	नेकोलेट
२७०	७	फिट्झरोड	फिट्झरोल्ड
२७१	शेवटची	४५ ते ८४	४५ ते ४८
२८३	१९	ठरेल	उरेल
२८३	२०	ठरलेली	उरलेली
२८९	२५	वलगाव	वडगाव
२९२	८	आपली	आपल्या
२९८	८	न गोखले	ना. गोखले
२९८	२४	दाघांची	दोघांची
३०१	१०	मागरार	भागणार
३१०	१८	क्लॉस	क्लास
३११	१	पण व बाहेर	पण बाहेर
३३१	१९	संमारंभ	समारंभानिमित्त
३३३	२१	मार्त्तंड	मार्तंड

३३९	१९	अॅलडिशन	अॅडिशनल
३५१	१५	to up to	to
३५५	१	परिशिष्ट क्र. ३	परिशिष्ट क्र. ४ पृ. ३४० पहा
३५७	१	परिशिष्ट क्र. ४	परिशिष्ट क्र. ४ पृ. ३४३ पहा
३५७	१३	जी. एम. खापर्डे	जी. एस्. खापर्डे
३६२	२५	१७२	१७८२
३६६	१५	क्वार्डर	क्वॉर्टर्स
३६७	२	चनादळ	चनादाळ

भाग २ रा

—० शुद्धि-पत्र ०—

३८८	२५	नुकतेक	नुकतेच
३९०	८	हात्या	होत्या
४०४	१२	असेल	असतील
४०७	१७	अबालवृद्ध	आबालवृद्ध
४१७	शेवटची	खुर्चा	खुर्च्या
४३६	२६	साथंकाळी	सायंकाळी
४४०	२	आणात्यास आहे	आणल्यास, आहे
४४०	२६	अटचेके	अटकेचे
४४५	३	देशाभिमाबद्दल	देशाभिमानाबद्दल
४४९	६	रगाची	रंगाची
४५१	२१	झालीं	झाली
४५३	४	सघ	संघ
४५३	१२	जाला	आला
४५३	१७	भीषग्वर्गांना	भिषग्वर्यांना
४५४	२५	पच	पंच
४५६	२३	१९२२ व्या	१९२२ च्या
४५९	शेवटची	तळटीप	पुढील मजकूर पृ. ४६० वर सुरवातीपासून आहे.
४६४	९	उमरावतीतीला	उमरावतीतील
४६८	२५	झेडा	झेंडा

४७३	१९	हस्तादोलन	हस्तांदोलन
४७५	३	प्रतिष्ठ	प्रतिष्ठा
४७८	२५	संदर	सुंदर
४९०	२२	शवड	शेवडे
४९१	२३	term. he may expected	term, he may be expected
४९६	२१	भैखदान,	भैरवदास;
४९६	२१	गुल महंमद	गुलाम महंमद
५०४	१३	सर्वास सभे	सर्वास उभे
५१०	१५	निषेष	निषेध
५१७	१२	वक्याचे	वक्त्याचे
५१८	५	मॉहेमेडन	मोहॉमेडन
५१९	२४	सत्वशोधक	सत्यशोधक
५२३	६	पूर्वीहा	पूर्वीही
५२३	८	प्लचेटमधून	प्लँचेटमधून
५२४	२६	१९२३	१९२६
५२६	२५	अशांनी	अशांना
५३१	९	गणपत शंकर	गणपत, शंकर
५३२	२	त्यात	त्यास
५३८	शेवटची	ठरावाला	ठरावावर
५३९	२१	वदे त्वां	वन्दे त्वां
५४६	१	प्रसिद्ध	प्रसिद्धी
५४६	१२	देवभाकर	देवभानकर
५४६	२४	गणेश, नागेश	गणेश नागेश
५४९	१३	पुर्ण	पूर्ण
५५५	८	बरि., पंजाबराव	बॅरि. पंजाबराव
५५७	१९	प्रक्षत	प्रत्यक्ष.
५६१	२२	होती अंबा	होती. अंबा
५९९	१५	भ	भट
६१३	१	जल	जेल
६२२	१८	बाबासाहेब	बाबासाहेब
६३४	३	स्वदेशी	विदेशी

६३९	१९	जोग, चौकात	जोग चौकात
६५२	४	महिण्याची	महिन्याची
६६९	२५	२९ एप्रिल ते मे	२९ एप्रिल ते ४ मे
६७४	२	दि. १४	दि. २४
६७९	शेवटची	ऑ.	ऑगस्ट
६९८	१५	पक्षोभाने	प्रक्षोभाने
७३१	९	अळचण	अडचण
७३९	तळटीप	परिशिप्ट क्र. १	परिशिष्ट क्र. २
७५०अ	२०	न. चि.	न. चिं.
७५०ज	२७	भाषण कोठले ?	भांडण कोठले ?
७५०न	१	स्त्रिच्यावर	स्त्रियावर
७५६	शेवटची	प्रमाणे त्यांना तेथेच त्यांना	प्रमाणे तेथेच त्यांना
७७२	२	देढे	देठे
७७७	९	व्दादशी	द्वादशी
७८०	३	म्यु. चे	म्यु. ची
७८५	७	प्रवचन	प्रवचने
७८७	२४	किवलू	किचलू
७८९	१२	कलाल, जैन	कलाल जैन
७९७	६	रामनाथ	रामनाथन्
७९७	१६	शास्त्रांचा	शास्त्र्यांचा
८०३	१६	करुन काढावे व त्याद्वारे	करून त्याद्वारे
८०८	३	सय्यद, तालेमहंमद	सय्यद तालेमहंमद
८०८	१२	नगरपालिकांची	नगरपालिकांनी
८२८	१५	जातो जाता याची	जातो याची
८४३	१०	नाही, है	नही है,
८४३	शेवटची	सेलअ	असेल
८४४	३	श्री गुरुंनी	श्री गुरूंना
८५०	११	वर्यास	वयसि
८५०	११	संस्थिति	सँस्थिति:
८५२	१	मुसस्लमान	मुसलमान
८५३	शिर्षक	विषेब	विषेश
८५३	२३	एतउद्देशीय	एतद्देशीय

८५४	२	शंकरपेठ	शंकरशेठ
८५६	११	त्यांचे	यांचे
८६१	२८	चंद्रीताई	चंद्राताई
८७१	१६	अहवाल १९३१	अहवाल १९३०
७७१	१७	महिला समाजाचा १९३१	महिला समाजाचा १९२८-२९
८७३	३	पेडके	पेंडके
८७१	१८	अहवाल १९३१ या	अहवाल १९२८ या
८७७	१४	सोडतो.	सोडतो."
८९०	२९	सर्व यस्य वशाद्गात्	सर्वं यस्य वसादगात्
८९१	११	कारकिर्दीच	कारकिर्दीतच
९१७	२	ब. ग.	ग. श्री.

○ संदर्भ ग्रंथ-सूची ○

१ श्री गोविंद प्रभू यांचे चरित्र : डॉ. कोलते.
२ श्री. दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र : बा. ग. खापर्डे
३ सर मोरोपंत जोशी यांचे चरित्र : श्री. हिंगवे
४ श्री आळंदीचे स्वामी : श्री. पाळेकर : १९६२
५ ब्रम्हर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र : अप्रबुद्ध
६ बहुरूपी : चि. ग. कोल्हटकर : १९५७
७ खापर्डे दफ्तर व डायरी
८ व्यायामाचार्य दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी यांचे आत्मवृत्त व चरित्र : १९५७
९ सरदार पृथ्वीसिंह : राहुल सांकृत्यायन
१० अभिनव मराठी ज्ञानकोश : भिडे : प्रथम खंड.
११ सुलभ विश्वकोश : दाते-कर्वे : भाग १ व २
१२ महाराष्ट्रीय ज्ञानकोश : डॉ. केतकर : विभाग २ रा; भाग ६, ११ १३, १४, १५, १७
१३ राजवाडे नामादिशब्दव्युत्पत्ति कोश : कै. वि. का. राजवाडे.
१४ भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.
१५ अर्वाचीन चरित्र कोश : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.
१६ पेशवे दफ्तर क्र. १०, १३, १५, १६, २० व २१.
१७ वऱ्हाड प्रांताचा इतिहास : या. मा. काळे.
१८ विदर्भातील ऐतिहासिक लेख संग्रह : खंड पहिला : (उमरावतीकर भोसले संग्रह) विदर्भ संशोधन मंडळ : १९५९
१९ शाहु दफ्तरातील कागद पत्रांची वर्णनात्मक सूची : खंड १
२० आसफिया रेकार्ड : हैद्राबाद दफ्तर : १८५१ (आंध्र अभिलेखागार हैद्रा.)
२१ शिवाजी कालीन महाराष्ट्र : अ. रा. कुळकर्णी
२२ नागपूर प्रांताचा इतिहास : या. मा. काळे.
२३ हरिवंशाची बखर : वासुदेवशास्त्री खरे.
२४ मराठी रियासत : सरदेसाँई : खंड १
२५ नागपूरकर भोसल्यांची बखर : गुप्ते : सं. या. मा. काळे
२६ सभासद बखर : शं. ना. जोशी.
२७ काव्येतिहास संग्रह (३१) : नागपूरकर भोसल्या संबंधीची कागदपत्रे : साने

२८ मल्हार रामराव विरचित संभाजी राजे यांचे चरित्र : साने
२९ ब्रम्हेंद्रस्वामी धावडशीकर : चरित्र व पत्रव्यवहार : पारसनिस.
३० काव्येतिहास संग्रह : ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे : साने (५९)
३१ शाहु महाराज यांची रोजनिशी : वाड-पारसनिस (१५३)
३२ बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी १८४४-४५ : संग्राहक : वाड : संपादक : पारसनिस : १९०७ : खंड १
३३ पेशवे कालीन महाराष्ट्र : भावे
३४ ऐतिहासिक लेख संग्रह : वासुदेवशास्त्री खरे : भाग ३.
३५ नागपूरकर भोसल्यांची कामगिरी : सरदेसाई
३६ ऐतिहासिक पत्र संग्रह, भाग १५ : य. वा. खरे.
३७ शाहु दप्तर क्र. ३१ (पुणे अभिलेखागार)
३८ छत्रपती शाहु महाराज यांची रोजनिशी : भाग १ ला : राजकीय महत्त्वाच्या गोष्टी : वाड-पारसनिस : १९१७
३९ शाहु दप्तर क्र. २ पुडके क्र. ४
४० राजवाडे, खंड ६
४१ मराठ्यांच्या इतिहासाची साधने : पुरंदरे
४२ काव्येतिहास संग्रह क्र. ३१ : ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे : साने (नवीन आवृत्ती)
४३ मराठवाड्याचा इतिहास (मराठवाडा परिचय) विश्वभारती प्रकाशन, मालेगाव
४४ क्या आप जानते है ? क. कि. बियाणी.
४५ उमरावती जिल्ह्यातील सत्याग्रहाचा त्रोटक इतिहास, १९३० : उमरावती जिल्हा कॉ. कमेटी.
४६ मराठे कालीन समाज दर्शन, गावकीतील कायदे : १९६०
४७ महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास : शं. दा. पेंडसे.
४८ भारतीय ज्योतिःशास्त्र : शं. बा. दिक्षित.
४९ मुंबईचे वर्णन : माडगावकर : १८६३
५० काँग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास : १९३५
५१ आजचा हिंदुस्थान : रजनी पामदत्त : १९४६
५२ मराठी साहित्याची रूपरेषा : डॉ. दांडेकर
५३ भारतीय स्वातंत्र्याचे रणझुंझार : सं. शं. ना. दाते १९७०

५४ पहिले महायुद्ध : दि. वि. गोखले.
५५ श्री क्षेत्र कदंब (कळंब) माहात्म्य : पुंडशास्त्री
५६ संत गाडगे महाराज : दांडेकर
५७ पालखी सोहळा : नेऊरगावकर
५८ स्थान-मार्ग-दर्शक : महंत दत्तराज शेवलीकर
५९ महाराष्ट्रातील खेड्यांची व शहरांची वर्णक्रमी १९६५
६० विष्णुपर्व; हरिवंश; भागवत. (संस्कृत ग्रंथ)
६१ भारतीय इतिहास-संस्कृति : पुस्तक ४८ वे : जाने. १९७६
६२ उमरावती नगरवाचनालय, ६९ वर्षाचा अहवाल : १९३६
६३ विश्ववृत्त मासिक, अंक १ ला : १९०६
६४ साप्ताहिक 'केसरी' पुणे, १८९७, १८९८, १९१४
६५ अमरावती नगरवाचनालय : शताब्दि स्मरणिका १९७०
६६ पुरुषार्थ १९५७ : वीरकथा अंक
६७ प्रसाद मासिक, पुणे : दिसें. १९५७, जानें. ५८, जुलै ५९
६८ दैनिक हिंदुस्थान : दिवाळी अंक १९७३
६९ युगांतर : नोव्हें. १९७३
७० वऱ्हाड शाळा-पत्रक : पुस्तक ५० : मे-जुन १९२५
७१ साप्ताहिक 'उदय' अमरावती (१९२० ते १९४७)
७२ कै. मृगेंद्र शंकर स्वामींचे अप्रकाशित साहित्य १९०५

—० इंग्रजी ग्रंथ ०—

1. Primary Census Abstract 1971
2. District Census Hand Book 1971 (Amravati District)
3. The Confession of a Thug : Capt, Meados Tylor : 1839
4. The Nizam : Henry Briggs, 1845
5. The Later Mughals : Irvin : Vol : 1 and 2
6. The Bhonslas of Nagpur, Last Phase : Shri R. M. Sinha
7. The Revenue & Finance in Maratha Administration : Shri. Vashistha :

8. Hyderabad Affairs :
Moulavie Syed Mehadiali, 1883 A. D.
(Vol. 1 to 12)
9. The Indian Capitalist Class :
Shri V. I. Povlov,
10. Gazetteers For Hyderabad Assigned
Districts : 1870 : Sir Allfrad Loyal
11. Central Provinces District
Gazetteer, 1911 : Amravati District :
Edited by S. V. Fitzerald and
A. E. Nelson : Vol. A
12. Amravati District Gazetteer, 1968
13. The Claims of the Nizam Government
to the Restoration of Berar : 1924,
Memorandum published by Nizam
Government.
14. Elphinstone Correspondence 1804-1808
Shri R. M. Sinha : 1961.
15. Administrative Reports : Resident of
Hyderabad.
16. Census Report : 1881 : Govt. Publication
17. Hyderabad Under Sir Salarjung
Maulavie Chirag Ali . 1880.
18. Khaparde Records; Vol.7.
19. Amravati District Bar Souvenir
(Centenary Number) 1875-1976.
20. Hyderabad Residency Record :
Vol. 79, 794. (National Archives, Delhi)
21. History of the Hydrabad Contingent.
By Majar R. G. Barton : 1905

याशिवाय अनेक नियतकालिके, स्मरणिका व व्यक्तिश: मिळविलेली माहिती.

○ उपसंहार ○

अमरावती शहराच्या इतिहासाचा पहिला व दुसरा भाग मिळून सुमारे ८३५ वर्षांचा अमरावतीचा उपलब्ध इतिहास या ग्रंथात आलेला आहे. पैकी पहिल्या भागाची मांडणी व दुसऱ्या भागाची मांडणी भिन्न पद्धतीने केलेली असून सत्य इतिहास वाचकांना मिळावा हा त्यामागे हेतू आहे. तिसरा भाग १९३३ ते १९४७ अजून पूर्ण व्हायचा आहे. अर्थात तो थोडा उशिरा वाचकांच्या हाती पडेल.

या इतिहासात अजून बऱ्याच वास्तूंची किंवा घटनांची माहिती द्यावयाची राहिली आहे. उदाहरणार्थ, मेसॉनिक लॉज, चिलमशावलीचा दर्गा, सिनेमा थिएटर्स व मुक्या आणि बोलक्या फिल्मची सुरुवात, उमरावतीतील पूजा स्थाने, करबला यात्रा व मोहरम, पोळा व त्याची परंपरा, अमरावती शहरातील पाणीपुरवठा, मूळ वस्ती नंतर शहराची झालेली १९४७ पर्यंतची वाढ, मठसंस्था, सांप्रदाय इत्यादी अशा अनेक बाबींची माहिती देता येण्यासारखी आहे. परंतु माहिती एकत्र करणे ही सोपी गोष्ट नाही. जी माहिती द्यायची ती निरनिराळ्या ठिकाणचे संबंधित रेकार्ड तपासून द्यावी लागते व त्याला बराच वेळ लागतो. केवळ कपोलकल्पित गोष्टीवर विसंबून माहिती देणे इतिहासाला मंजूर नाही. सुरुवातीच्या निवेदनात म्हटल्याप्रमाणे हे काम किमान ५ ते ७ वर्षाचे आहे. शिवाय इतिहासाची अभिरुची असलेली ५-७ माणसे मदतीला असल्याखेरीज हे काम एकट्याला झेपणे शक्य नाही. तसेंच पौराणिक काळाच्या अखेरच्या वर्षातील अर्वाचिन काळाच्या सुरुवातीची, आणि १८०३ ते १८५३ या कालखंडातील उमरावतीची माहिती यात दिली त्यापेक्षा जास्त देता येणे शक्य आहे. परंतु त्या संबंधीची कागदपत्रे वगैरेसाठी मुंबई, पुणे, हैद्राबाद व दिल्ली येथे जाऊन आणि तेथे बराच काळ मुक्काम ठोकून माहिती मिळवावी लागेल.

एकूण या एका गावाचा इतिहास संकलीत करणे हे काम फार कष्टाचे, खर्चाचे आणि दीर्घ मुदतीचे आहे. परंतु असा परिपूर्ण ग्रंथ जर तयार झाला तर त्याचा उपयोग भावी पिढ्यांना व संदर्भासाठी उत्तम प्रकारे होऊ शकेल यात शंका नाही. शिवाय अशा ग्रंथात अपरिहार्यपणे देशाच्या म्हणा किंवा प्रांताच्या म्हणा, घडामोडींची माहिती येणारच.

तूर्त अगदी अल्प वेळात जेवढी म्हणून माहिती एकत्र जुळविता आली ती जुळवून या दोन भागांत दिलेली आहे. त्याने वाचकांची उमरावती शहरासंबंधीची जिज्ञासा अल्पांशाने तरी तृप्त होईल अशी आशा आहे.

भाग २ मध्ये इ. सन १९२२ ची पूर्ण माहिती देता आली नाही. कारण त्यावर्षाचे 'उदय' चे अंक मिळू शकले नाहीत. तसेच १९३६ चे उदयचे फाईल बरेच जीर्ण व फाटलेले असल्याने त्या वर्षातील सविस्तर घडामोडींची माहिती देणे कदाचित शक्य होणार नाही.

इतिहास विषयाचा छंद असलेल्या व्यक्ती एकत्र आल्या आणि त्यांनी हा उपक्रम हाती घेतला तर उमरावती शहराचा इतिहास आज दिला त्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक व माहितीने परिपूर्ण असा, तयार करता येणे शक्य आहे हे मात्र निश्चित. तसा प्रयत्न जर झाला तर त्याला माझे पूर्ण सहकार्य राहील.

राष्ट्रीय अभिलेखागार दिल्ली येथे हैद्रबाद रेसिडेन्सीच्या कागदपत्रांचे शेकडो खंड उपलब्ध असून १८०३ ते १८५३ व तदनंतरच्याही काळातील उमरावतीच्या अनेक घडामोडींची मूळपत्रे त्यांत मिळू शकतील. तसेच आंध्र राज्य अभिलेखागार हैद्राबाद येथेही पर्शियन लिपीतील किमान दहा हजार जुनी कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्यांतूनही अमरावतीच्या तत्कालीन घडामोडींची अज्ञात माहिती उजेडात आणणे शक्य होईल. पण त्यासाठी वरील ठिकाणी दीर्घकाळ मुक्काम ठोकून माहिती मिळवावी लागेल.

याशिवाय ऐकलेल्या हकिकतीनुसार, अमरावतीच्या अंबादेवीचे मंदिराशी संबंधीत अशी माहिती दरभंगा महाराजांचे लायब्ररीत उपलब्ध असलेल्या 'झा घराण्याचा' इतिहास, यांतून मिळण्याचा संभव आहे. साप्ताहिक 'केसरी' व 'टाईम्स ऑफ इंडिया' चे सूरुवातीपासूनचे अंक पुणे व मुंबई येथे उपलब्ध आहेत.

एकूण साद्यंत इतिहासाची साधने अशी ठिकठिकाणी विखुरलेली आहेत. ती प्रयत्नपूर्वक एकत्र करावी लागतील. त्यासाठी दीर्घकाळ परिश्रम, प्रवास आणि खर्च करणे क्रमप्राप्त आहे.

प्रस्तुत ग्रंथासंबंधी विद्वान वाचकांनी आपले अभिप्राय व्यक्त केले तर त्यांचे मी स्वागतच करीन.

– लेखक.

आता विश्वात्मके देवे ।
येणे वाग्यज्ञे तोषाने ॥
तोषोनी मज देयावे ।
पसायदान हे ॥

–संत ज्ञानेश्वर

'अमरावती शहराचा इतिहास' हा ग्रंथ एकूण तीन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प होता. पैकी–

पहिल्या भागात, अकराये शतक ते इ. सन १९१९;

दुसऱ्या भागात, इ. सन १९२० ते १९३२ व

तिसऱ्या भागात, इ. सन १९३३ ते १५ ऑगस्ट १९४७
या कालखंडातील माहिती दिली आहे.

या ग्रंथ रूपाने भाग पहिला व दुसरा एकदमच प्रसिद्ध होत असून, भाग तिसरा सवडीने प्रसिद्ध केला जाईल.

पुरवणी

मराठी नार्मल स्कूल, अमरावती

इ. स. १९३२ पर्यंत ७ वा मराठी किंवा इंग्रजी तिसरी पास असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परिक्षा घेऊन निवड केली जात असे. सन १९३३ पासून मॅट्रिक पास असलेल्या विद्यार्थ्याकरितां एक वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला होता. त्यास 'मॅट्रीक सेकंड इयर' हे नांव होते. ही व्यवस्था १९४१ पावेतो होती.

मॅट्रिक सेकंड इयर पास असलेले व सर्व्हिस मध्ये असलेल्या शिक्षकाकरतां थ्री इयरचा अभ्यासक्रम १९३९ ते १९४३ पर्यंत आकोला येथे व १९४४ ते १९४६ पर्यंत अमरावती येथे होता. नंतर हा वर्ग बंद करण्यात आला.

इ. स. १९५६ ला राज्यपुनर्रचना होऊन मध्यप्रदेशातील विदर्भ विभाग (आठ जिल्हे) महाराष्ट्रास मिळविण्यात आल्यानंतर, महाराष्ट्रातील दोन वर्षाचा ज्युनिअर पी. टी. सी. चा अभ्यासक्रम येथे चालु करण्यात आला. मॅट्रिक पास असणारा करता हा अभ्यासक्रम एक वर्षाचा होता. मॅट्रिकपास ज्यु. पी. टी. शिक्षकास खाजगीरित्या सिनिअर पी. टी. सी. परिक्षेला बसण्याची सवलत होती.

इ. स. १९६८ पासून मॅट्रिक पास विद्यार्थ्याकरितां दोन वर्षाचा अध्यापन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

मराठी नार्मल स्कूलचे प्रिंसिपॉल

या संस्थेचे स्थापनेपासून १९१५-१६ पावेतोच्या प्रिंसिपॉलची माहीती या ग्रंथाच्या पृष्ठ ८९१ वर आलेली आहे. श्री. दा. के. ओक १९३१ पावेतो येथे प्रिंसिपॉल होते. त्या नंतरचे प्रिंसिपॉल व त्यांचा कार्यकाल असा–

श्री. परमानंद भिसीकर	१९३१ ते १९३३
श्री. नरहर पांडुरंग मांडके	१९३४ ते १९४४

श्री. वा. म. बोधनकर	१९४५ ते १९४६
श्री. रामचंद्र माधव उपाध्ये	१९४६ ते १९५०
श्री. दत्तात्रय हरी अग्निहोत्री	१९५० ते १९५७
श्री. वि. ना. देव	१९५७ ते १९५७
श्री. चिं. वि. खांडेकर	१९५७ ते १९५९
श्री सू. के. भिसे	१९५९ ते १९६३
श्री. रा. दे. बाभुळगांवकर	१९६३ ते १९६७
श्री. रा. वि. पंडित	१९६७ ते १९६९
श्री. गो. अं. जामकर	१९६९ ते १९७०
श्री. क. शा. करजगावकर	१९७० ते १९७१
श्री. गु. ल. जगताप	१९७१ ते १९७२
श्री. भा. शि. राणे	१९७२ ते १९७३
श्री. म. बा. देवघरे	१९७३ ते १९७५
श्री. श्री. ब. पसारकर	१९७५ पासून[१]

१ : प्राचार्य शासकिय अध्यापक विद्यालय (पुरुष), अमरावती यांनी दिलेल्या माहीतीचे आधारे.

पुरवणी

(पृष्ठ २५०–२५१ पहा)

उमरावतीचा रामलीला महोत्सव

उमरावती येथे रामलीला महोत्सवाची सुरुवात श्री. रामप्रसाद पंचम तिवारी उर्फ फक्कड महाराज (रा. महाराजपूर, ता. कूडा, जिल्हा प्रतापगढ, उत्तर प्रदेश) यांनी वयाच्या २१ व्या वर्षी इसवी सन १८४७ ते १८५० च्या दरम्यान, स्थानिक लोकांतून कलाकार निवडून केली. सन १८५० ते १९२९ पर्यंत उमरावती येथील या रामलीलेत स्थानिक हौशी लोकच नट म्हणून भाग घेत असत. सन १९३० मध्ये श्री. फक्कड महाराजांचे नातू व सध्या घंटाघर हनुमान मंदिराचे पुजारी श्री. माताबदल तिवारी आणि येथे राहणारे इतर उत्तर भारतीय लोकांनी पुढाकार घेऊन एका रामलीला मंडळाची स्थापना केली व तेव्हापासून उत्तर प्रदेशातून रामलीला करणाऱ्या कलाकार मंडळीला पाचारण करून रामलीला महोत्सवाचा कार्यक्रम नवरात्राचे काळात नेहरु मैदानावर साजरा केला जाऊ लागला.

सन १८५० च्या आसपासच रामप्यारी मंदिर (भुसारी गेटचे आत) येथे दरवर्षी मार्गशीर्ष पंचमीला–वर्षातून फक्त एकदा–धनुष्ययज्ञ लीला हा कार्यक्रम लहान स्वरुपात साजरा केला जात असे. पण पुढे हा कार्यक्रम बंद पडला.

हल्ली उमरावतीला होणारा रामलीला महोत्सव येथे स्थायिक झालेल्या उत्तर भारतीय बंधूचे सहकार्याने रामलीला कमेटी साजरा करीत असते.

वरील माहितीवरून दिसून येते की, उमरावतीचा रामलीला महोत्सव हा शे–सव्वाशे वर्षे इतका जुना आहे आणि अर्थातच उत्तर भारतीय लोकांचे कमी अधिक प्रमाणात या शहरात सतत वास्तव्य आहे.

हा रामलीला महोत्सव नवरात्र सुरू होते त्या दिवसापासून नेहरु मैदानावर सुरु होतो. दहा दिवस रामचरित्रावर आधारित रामलीला कलावंत करून दाखवितात आणि दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रावण दहनाचा

कार्यक्रम होतो. त्यावेळी होणारे दारुकाम (आतषबाजी) पाहण्यासाठी केवळ शहरातील लोकच नव्हे तर शहराच्या पंचक्रोशीतील अनेक ग्रामवासी लाखोंच्या संख्येने येतात. त्या वेळी तेथे अनेक दुकानेही असतात. यात्रेचे स्वरूप असते. दहा दिवस होणाऱ्या रामलीलेला देखील हजारो लोक दररोज उपस्थित असतात.

उत्तर भारतीय बंधूंनी सुरू केलेला हा रामलीला महोत्सव उमरावती शहराच्या सांस्कृतिक जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान ठेवून आहे व याचे श्रेय येथे राहणाऱ्या उत्तर भारतीय बंधूंना आहे[१].

---

१ : कै. रामप्रसादजी तिवारी उर्फ फक्कड महाराज यांचे नातू व घंटाधर हनुमान मंदिराचे पुजारी / व्यवस्थापक श्री. माताबदलजी तिवारी (वय ७७) यांनी दिलेल्या माहितीचे आधारे.